दलित कवितेचे अर्धशतक







मराठी दलित कवितेचा इतिहास

डॉ. महेंद्र भवरे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

दलित कवितेचे अर्धशतक

मराठी दलित कवितेचा इतिहास

प्रारंभ ते २०१०

डॉ. महेंद्र मारोतराव भवरे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** दलित कवितेचे अर्धशतक मराठी दलित कवितेचा इतिहास
(प्रारंभ ते २०१०)

➢ **लेखक :** डॉ. महेंद्र मारोतराव भवरे

➢ **प्रथमावृत्ती :** २०१८

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत : रुपये ८७९.००**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अध्यक्षांचे मनोगत

आधुनिक मराठी साहित्यात अनेक साहित्यप्रवाह निर्माण झाले आहेत. सामाजिक जीवनातील विविध स्तरांचे चित्रण साहित्यात होत गेल्याने स्वातंत्र्यानंतर विशेषतः साठोत्तरी कालखंडात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य या संज्ञा समोर आल्या. यातील दलित साहित्याने आपला वेगळा ठसा मराठी साहित्यात उमटविला आहे.

समाजातील वर्णाश्रम व्यवस्थेमुळे फार मोठ्या जनसमूहाला वंचित-अस्पृश्य घोषित केले. या जनसमूहाचे इतरांसारखे जगणेही अवघड झाले होते. स्वातंत्र्यानंतर शिक्षण हे परिवर्तनाचे एक साधन म्हणून स्वीकारले असले तरी साहित्य, संस्कृती, समानता, सत्ता या क्षेत्रांत त्यांना सर्वांसोबत पुरेशी संधी उपलब्ध नसल्याने या अन्यायाचे प्रतिबिंब लेखन साहित्यात उमटू लागले. मराठी कवितेत अन्याय अन् अनास्थेचे चित्रण येऊ लागले. ही दलित कविता या साहित्यप्रकाराची सुरुवात होती.

जनभरात धर्म हा समाजव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक असतो. अनेक सामाजिक-धार्मिक सुधारणा या अनुषंगाने होत असतात. भारतात धर्माच्या नावाखाली अस्पृश्य वंचित समाजासंबंधीची विचार-मते ही अन्यायकारक असल्याने दलित कवितेने धर्माधिष्ठित परंपराच धीटपणे नाकारली. अंधश्रद्धा, रूढींच्या जोखडाखाली मानवतेच्या संबंधात दुरावा निर्माण करून जनसामान्यांचे होणारे शोषणही मराठी दलित कवितेत ठळकपणे येऊ लागले. मराठी दलित कवितेतील हे लेखन म्हणजे मानवी हक्कासाठीचा एक प्रकारचा संघर्षच होता. एवढेच नव्हे तर लोकजागृतीचा एक प्रयत्न होता.

अन्यायाविरुद्धचा विद्रोह हा सामाजिक-सांस्कृतिक जीवनात जुलमी व्यवस्थेविरुद्धचे एक बंड असते. मानवी इतिहासात अशी अनेक उदाहरणे दिसून येतात. मराठी साहित्याच्या इतिहासातील दलिक कविता लेखनाने असेच वाङ्मयीन उठावाचे काम झाले आहे. या बंडखोरीत स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय या मूल्यांची पाठराखणच केली गेली. हा इतिहास डॉ. महेंद्र भवरे यांनी ‘ दलित कवितेचे अर्धशतक ’ या ग्रंथात अभ्यासपूर्ण रीतीने मांडला आहे, आणि हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशित करीत असल्याचा आम्हाला खूप आनंद आहे.

बाबा भांड

बाबा भांड,

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

दिनांक १ नोव्हेंबर २०१८.

मनोगत

भारतीय साहित्यात स्वातंत्र्योत्तर काळात एक अभूतपूर्व घटना घडली ती म्हणजे दलित साहित्याचा उदय. दलित साहित्य ही विसाव्या शतकातील एक वाङमयीन आणि सांस्कृतिक घटना आहे.दलित साहित्याच्या प्रांतात कविता या साहित्य प्रकाराने अर्धशतकाचा कालखंड ओलांडला आहे. पुढील पिढ्यांना, अभ्यासक आणि संशोधकांना हा इतिहास अवगत होण्यासाठी मराठी दलित कवितेचा इतिहास अक्षरबद्ध करणे ही अभ्यासाची आणि काळाचीही गरज होती. या हेतूने 'दलित कवितेचे अर्धशतक'(प्रारंभ ते २०१०) हा दलित कवितेच्या अर्धशतकाचा इतिहास लिहिला आहे. साहित्यातून समाज आणि समाजाच्या विचारसरणीचे प्रतिबिंब उमटत असते. साहित्य ही जीवन दर्शन घडविणारी कला आहे. कालमानानुसार साहित्यात परिवर्तन होत असते. काळ जसा पुढे जातो तसे साहित्य भूतकाळात जमा होते, इतिहासजमा होते.आणि इतिहासजमा झालेले साहित्य इतिहास लेखानासाठी साधनभूत ठरत असते.

सामाजिक सांस्कृतिक जीवनात व्यवस्थेविरुद्ध एखादे बंड झाले कि, त्यातून समाजाला आणि साहित्याला काही मूल्ये प्राप्त होत असतात. विसाव्या शतकात अशा एका ऐतिहासिक बंडाची सुरुवात दलित साहित्याने केली. त्यातून साहित्याला नवी मूल्ये प्राप्त झाली. साहित्याच्या क्षेत्रात कोणतेही नवे परिवर्तन प्रथमतः कवितेतूनच होताना दिसते. दलित साहित्यही त्याला अपवाद नाही. दलित कवितेने साहित्य विश्वाला दिलेले योगदान, तिचे स्वरूप, काळाप्रमाणे तिच्यात होत गेलेली स्थित्यंतरे आणि बदल यासंबंधी कालानुक्रमे, चिकित्सकपणे या कवितेचा इतिहास शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

इतिहासाचे पुनरावलोकन आणि वर्तमानाचे सामाजिक, सांस्कृतिक वास्तव हे विश्लेषण दलित कवितेने केले आहे. समाज व्यवस्थेतील व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज यांचा नातेसंबंध, सामूहिक जीवनातील सांस्कृतिक पर्यावरण, सांस्कृतिक बदलाचे स्वरूप अशा विविध अंगाने दलित कवितेचा आशय प्रकट झाला आहे. दलित साहित्याची सुरुवात महाराष्ट्रात झाली. दलित साहित्य चळवळीच्या प्रेरणेतून भारतातील विविध राज्यातून दलित साहित्याच्या अभिव्यक्तीला चालना मिळाली. त्यामुळे भारतातील विविध भाषिक समाजात साहित्य संपन्न करण्याची मोठी आणि महत्वाची भूमिका दलित कवितेने पार पाडली आहे असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. भारतीय साहित्यात जातिव्यवस्थेच्या संदर्भात जी मांडणी दलित कवितेने केली आहे तशी मांडणी इतर साहित्यात झाली नाही. जाती अंताची अपरिहार्यता याविषयीचे मूलगामी चिंतन दलित कवितेने जोरकसपणे मांडले आहे. ते राष्ट्रीय पातळीवर पोहचविण्याचे कार्य या इतिहासाच्या माध्यमातून घडू शकेल असा विश्वास वाटतो.

माणसाच्या मुलभूत हक्क प्राप्तीसाठी विद्रोह या मूल्याची देणगी दलित कवितेने दिली आहे. दलित कविता ही समूहमनाचा आविष्कार असल्यामुळे सामूहिक जाणीव आणि विद्रोह हे मूल्य सर्वसामान्यांना आपल्या हक्कासाठी संघर्षरत होण्यास प्रेरणा देणारे ठरेल. दलित कवितेने स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय या लोकशाही मूल्यांचा स्वीकार केला आहे. ज्या प्रतिगामी शक्ती लोकशाही मूल्ये पायदळी तुडविण्याचा प्रयत्न

करतात अशा शक्तीविरुद्ध दलित कविता उभी राहते. माणसाच्या होणाऱ्या शोषणाच्या विरोधात उभी राहते. ती माणसाच्या बाजूने उभी राहते. हा दलित कवितेचा स्वभाव आणि या कवितेतील फुले-आंबेडकरी विचार सर्व स्तरावर पोहचण्यास या इतिहासाची निश्चितच मदत होईल असा विश्वास वाटतो. दलित कवितेच्या झालेल्या निर्मितीचे जतन करणे हाच मुख्य उद्देश या इतिहास लेखनामागे आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ हा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे ही बाब आमच्या साहित्य चळवळीला उभारी देणारीच आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा.बाबा भांड , मंडळाचे सचिव, सहसचिव आणि मंडळाचे सदस्य या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. आमचे मित्र कवी,चित्रकार भ.मा.परसवाळे यांनी खास या ग्रंथासाठी आस्थापूर्वक मुखपृष्ठ आणि रेखाचित्रे तयार केली. कविमित्र अजित अभंग यांनी सुबक मांडणी करून दिली. त्याबद्दल या दोघांचाही मी फार फार आभारी आहे.

डॉ.महेंद्र मारोतराव भवरे.

अनुक्रम

प्रकरण - १

दलित कविता : पूर्वपरंपरा । पृष्ठ क्र. ७

प्रकरण : २

दलित कविता : उगम आणि विकास । पृष्ठ क्र. ७१

प्रकरण : ३

दलित कविता : १९८१ - १९९० । पृष्ठ क्र. १८५

प्रकरण - ४

दलित कविता : १९९१ - २००० । पृष्ठ क्र. २३७

प्रकरण - ५

एकविसाव्या शतकाच्या पाऊलखुणा । पृष्ठ क्र. ३२९

प्रकरण : ६

उपसंहार । पृष्ठ क्र. ४३१

परिशिष्ट / १

संदर्भ ग्रंथ सुची । पृष्ठ क्र. ४५७

परिशिष्ट/ २

काव्यसंग्रह सूची । पृष्ठ क्र. ४५९

दलित कविता : पूर्वपरंपरा

आंबेडकरपूर्व सामाजिक चळवळ आणि काव्याविष्कार

आदिविद्रोही म. फुले । शिवराम जानबा कांबळे । गोपाळबाबा वलंगकर
किसन फागू बंदसोडे । हरिभाऊ तोरणे । शाहीर भाऊ फक्कड इत्यादी.

आंबेडकरकालीन सामाजिक चळवळ आणि कलात्मक आविष्कार

आंबेडकरी चळवळ । आंबेडकरी जलसे

जलशातील काव्य आणि शाहीर

पतितपावन । शाहीर भीमराव करडक । केशव सुका आहेर (मास्तर)
रामचंद्र नामदेव सोनावणे । शाहीर केरू अर्जुन घेगडे । अर्जुन हरी भालेराव
केरुबुवा गायकवाड । रामचंद्र आडांगळे । शिवराम सावळाराम गडकरी
रतन दला जाधव । शाहीर अमृतबुवा बावस्कर । अण्णाभाऊ साठे इत्यादी.

आंबेडकरी चळवळ : आंबेडकरी गीते आणि बुद्धगीते

वामनदादा कर्डक । दलितानंद । श्रीधर ओहोळ । राजानंद गडपायले
कवी दीनबंधू शेगावकर । लक्ष्मण केदार । नागोराव पाटणकर
लक्ष्मण राजगुरू । लोककवी बी. काशीनंद । उत्तम मुळे । शाहीर विठ्ठल उमप
प्रभाकर पोखरीकर । बंधूमाधव । साहेबराव कोकाटे । दत्तात्रय खडसाळे
ज्ञानेश पुणेकर । शाहीर प्रभाकर गवई । पांडुरंग वनमाळी
प्रतापसिंग बोदडे । हरेंद्र जाधव इत्यादी.

समारोप



प्रकरण : १

दलित कविता : पूर्वपरंपरा

आंबेडकरपूर्व सामाजिक चळवळ आणि काव्याविष्कार

✹ आदिविद्रोही म. फुले

जगाच्या इतिहासात चौदावे, पंधरावे आणि सोळावे शतक अतिशय क्रांतीकारक मानले जाते. युरोपात हा प्रबोधनाचा कालखंड मानला जातो. या काळाने जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. या प्रक्रियेमुळे युरोपियन समाजाची वाटचाल पारंपरिक व्यवस्थेकडून आधुनिक युगाकडे झाली. भारतीय संदर्भात विचार केल्यास प्रबोधनाच्या चळवळीसाठी एकोणिसावे शतक उजाडावे लागले. म. फुल्यांचा उदय आणि त्यांच्या चळवळीमुळे भारतात प्रबोधनाचे युग अवतरले. कार्ल मार्क्स ज्या काळात वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान मांडत होता, त्याचवेळी म. फुले इथल्या प्रस्थापित धर्म आणि व्यवस्थेची चिरफाड समर्थपणे करीत होते.

फुल्यांच्या मते अस्पृश्य वर्गाच्या दु:स्थितीला केवळ ब्राह्मण वर्ग जबाबदार आहे. हिंदू संस्कृती ही केवळ ब्राह्मण वर्गाची संस्कृती आहे. सर्व जुन्या संस्कृत ग्रंथाचा ब्राह्मणांनी आपल्या सोयीनुसार अर्थ लावला आहे. हिंदूंचा असा विश्वास होता की, वेद हे अपौरुषेय आहेत. लोकांच्या वेदप्रामाण्यावरील विश्वासाचा फायदा ब्राह्मण वर्गाने आपल्या स्वार्थासाठी करून घेतला. ज्ञानाचे अधिकार आपल्या हातात ठेवले. समाजाला अज्ञानात ठेवले. या अज्ञानामुळे बहुजन समाजाचे शोषण झाले. दलित, शोषित, पीडित, स्त्रिया यांच्या वाट्याला गरिबी आणि अन्याय आल्यामुळे हा वर्ग पिचून गेला. म्हणून फुल्यांनी 'वेद हे भेद आहेत' असे म्हणत वेदांचे अपौरुषेयत्व नाकारले आणि भारतीय संस्कृतीची वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून मांडणी केली.

म. फुल्यांनी असा सिद्धांत मांडला की, ब्राह्मण म्हणजे आर्य. त्यांनी भारतावर आक्रमण केले व येथील मूळ रहिवाशांचा पराभव केला. या पराभूत झालेल्या समाजाला शूद्रातिशूद्र मानले गेले. ''ते लोक परकीय देशातून येऊन या देशातील मूळचे राहणारे लोकास जिंकून त्या सर्वास त्यांनी आपले दास केले. त्यास अक्षय आपले ताब्यात ठेवण्याकरिता केवळ स्वहितास अनुलक्षून पुष्कळ ग्रंथ करून ते आपणा सर्वांस ईश्वरापासून प्राप्त झाले, असे त्यावेळचे अज्ञानी लोकांस सांगून त्यांचे मन सर्वस्वी वळविले. त्या ग्रंथात त्यांनी असे लिहिले आहे की, शुद्रास ईश्वराचा उत्पन्न करण्याचा हेतू इतकाच आहे की, त्यांनी सदासर्वदा भट लोकांच्या सेवेत तत्पर असावे व जेणे करून त्यांची मर्जी खुष राहील असे करावे, म्हणजे ते ईश्वराला पावन होऊन त्यांचे देहाचे व जन्मास येण्याचे सार्थक झाले... शूद्रादिअतिशूद्रांची मते एकमेकांस मिळू नये म्हणोन पूर्वी भट लोकांनी एक मोठा धूर्त कावेबाज विचार शोधून काढिला... जतिभेदाचे थोतांड उपस्थित करून, त्याजवर अनेक स्वहितसाधक ग्रंथ केले व ते अज्ञानी लोकांचे मनात भरविले''[१] (गुलामगिरीची प्रस्तावना) या मताच्या आधारे असे म्हणता येईल की भटांनी समाजावर कायमचे वर्चस्व लादण्यासाठी पुराणे रचली. वर्णसंस्था, जातीसंस्था

समाजावर लादली. जातिव्यवस्था ही मानवनिर्मित आहे. म्हणूनच ती मोडून दुसरी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. या मांडणीतून फुल्यांनी अस्पृश्यांमध्ये जातीभेदाबद्दल, अन्यायाबद्दल संघर्षाची भावना निर्माण केली. मानवतावाद, बुद्धिप्रामाण्यवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मानवी मूल्यांची जोपासना फुल्यांच्या चळवळीने केली. मानव तेवढा एक. जातिभेद, धर्मभेद, राष्ट्रभेद हे खोटे आहेत. मनुष्याच्या जन्माने त्याचे श्रेष्ठत्व किंवा निचत्व ठरत नाही. कारण जन्मत: सर्व माणसे सारखी असतात. फुल्यांच्या विचारातून मानवी समतेची, मानवतावादाची भूमिका स्पष्टपणे प्रत्ययाला येते. धर्मामधील सत्य तपासताना त्यांनी मानवी बुद्धीचा निकष महत्त्वाचा मानला. जातीव्यवस्थेखाली दडपला गेलेला माणूस आपली उन्नती करून घेऊ शकत नाही. आत्मोन्नतीच्या आड येणाऱ्या सर्व बंधनांना झुगारुन दिले पाहिजे हा फुल्यांच्या विचारांचा केंद्रवर्ती आशय आहे. या विचारातूनच बहुजन समाजाच्या चळवळीला चालना मिळाली.

सामाजिक लढ्याचा आवाज म. फुल्यांनी सांस्कृतिक माध्यमातून मुखरीत केला. गोब्राह्मण प्रतिपालकाऐवजी 'कुळवाडी भूषण' हा शिवाजी महाराजांवर पोवाडा लिहिला. लोकांत रुजलेल्या अभंगाऐवजी 'अखंडा'ची रचना केली. स्वतंत्र सामाजिक जाणिवेचे 'तृतीय रत्न' हे नाटक लिहिले. म्हणजेच विषय समजावून देण्यासाठी संवाद हे माध्यम म. फुल्यांनी वापरले. ही सारी निर्मिती म्हणजे शूद्रातिशूद्रांच्या शोषणाविरुद्धचा पहिला विद्रोही आवाज होता.

आधुनिक मराठी काव्याचे जनकत्व मराठी साहित्य विश्वाने केशवसुतांना बहाल केले आहे. केशवसुतांनी पाश्चात्य साहित्यमूल्यांच्या स्वीकारातून मराठी काव्यात रोमँटिसिझम फुलवला. मात्र ऐतिहासिक सत्य असे आहे की, म. फुल्यांनी केशवसुतांपूर्वी काव्यनिर्मिती केली आहे. ''फुल्यांनी प्रस्थापितांच्या विरोधात बंडखोरी करण्याच्या त्यांच्या प्रेरणा पश्चिमी अंधानुकरणातून नव्हे तर येथील विद्रोही परंपरेत शोधल्या होत्या.''[२] नव्या मनूतील शूर शिपाई म्हणून स्वत:ला जाहीर करताना केशवसुतांनी जुन्या मनूबद्दल काहीच सांगितले नाही. 'मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे।' असे म्हणताना यामागील कार्यकारणभाव किंवा वर्णव्यवस्थेची मीमांसा केली नाही. मनूचे स्वरूप पहिल्यांदा सांगितले ते म. फुल्यांनीच! फुल्यांनी हे कार्य अत्यंत तळमळीने आणि स्फोटकपणे केले आहे. विद्ध्वंस आणि विधायकता, नकार आणि स्वीकाराचे ओजस्वी दर्शन म. फुल्यांच्या काव्यात घडताना दिसते. मानवी मूल्यांचा उद्घोष त्यांच्या कवितेने केला असून, पारंपरिक अभंगाऐवजी अखंडाची रचना करून मराठी काव्यविश्वाला पर्यायी प्रकार दिला आहे. मानवमुक्तीचे आंदोलनच त्यांनी काव्यातून उभे केले आहे. केशवसुतांच्या कवितेतील आशावादाची अखेर देवाच्या पायाशी होते. उदा.,

भिकार या जगी इच्छित न मिळे काही
म्हणूनी तुझे पायी भिक्षान्देही
केशवसुता म्हणे देवा दिनानाथा
तुझेपायी माथा वाहियेला.[३]

या उलट म. फुल्यांच्या काव्याचा उद्घोष बहुजनांच्या वतीने होऊन जुन्याचा विद्ध्वंस करुन, मानवीमूल्यांच्या स्वीकारात परावर्तीत होऊन अंतिमत: हे काव्य माणसांच्या कल्याणासाठी, मानव्याच्या प्रतिष्ठापनेसाठीच सर्वस्व वाहून घेते. म्हणून आधुनिक काव्याची सुरुवात म. फुल्यांपासूनच झाली असे म्हणणे रास्त ठरते. आदिविद्रोही आणि आधुनिक कवी म्हणून म. फुल्यांचे स्थान निर्विवाद मान्य करणे संयुक्तिक ठरावे. कारण ''जोतीरावांची कविता कधी पददलिताच्या दु:खाचा आर्त हुंकार होताना दिसते तर कधी या उपेक्षितांच्या संघटनेचे ती रणशिंग होते. १९६० नंतर मराठीत दलित, आदिवासी, ग्रामीण, भटक्याविमुक्तांचे साहित्य, स्त्रियांचे साहित्य असे जे अनेक प्रवाह निर्माण झाले आणि त्यांनी आगळ्या वेगळ्या अनुभवांचे व अभिनव शब्दकळेचे विस्मित करणारे विश्व मराठी वाचकांसमोर ठेवले, त्या सर्वांचा प्रेरणारंभ आपल्याला जोतीरावांच्या लेखनात आढळतो.''[४] अशा स्वरूपाचे साहित्याचे प्रवाह निर्माण करण्याचे बळ केशवसुतांच्या कवितेत नव्हते. केशवसुत हे कर्ते सुधारक होते असाही इतिहास नाही. म्हणूनही साहित्याच्या आदिविद्रोहित्वाचे जनकत्व आपसूकच म. फुल्यांकडे जाते! त्यांनी हिंदूधर्माची परखड चिकित्सा केली. जातिभेद नष्ट व्हावेत, स्त्रीपुरुष समता प्रस्थापित व्हावी, सत्य धर्माची उपासना व्हावी असा त्यांच्या विचारांचा आशय आहे. त्यांनी ब्राह्मणी संस्कृतीवर कडाडून हल्ले चढवले आणि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या मूल्यांवर अधिष्ठीत समाजरचनेची मागणी केली. त्यांचा लढा म्हणजे मानवमुक्तीचे आंदोलनच होते. याही अर्थाने ते आदिविद्रोही ठरतात.

'माणूस'हा फुल्यांच्या 'अखंड'रचनेचा केंद्रबिंदू होता. माणसाला नाकारणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध परखडपणे आसूड ओढण्याचे काम त्यांच्या काव्याने केले आहे.

चांडाळ ब्राह्मण । मांगा दूर धरी । स्वत: पाणी भरी । आडावरी ।।१।।
तान्हेने व्याकूळ । जरी मांग मेला । दया ब्राह्मणाला । येत नाही ।।२।।
मानवाचे द्वेष्टे गर्व अभिमानी । जगात दुर्गुणी । कळचेटे ।।३।।
मांगाच्या लग्नात । दक्षता ते घेती । सोवळ्याने खाती । ज्योती म्हणे ।।४।।[५]

अशाप्रकारे ब्राह्मणी प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडण्याचे काम या कवितेने केले आहे. मानव्याची प्रतिष्ठापणा, समतेची प्रस्थापना हेच फुल्यांच्या काव्यनिर्मितीचे प्रयोजन होते. त्यांनी बहुजन समाजाला भाषा दिली. जनसामान्यांच्या भाषेचा अंगीकार केला. फुल्यांच्या सामाजिक चळवळीतूनच पारंपरीक लोककलेला नवे स्वरूप प्राप्त झाले. विचार आणि चळवळीच्या प्रचार प्रसारासाठी सांस्कृतिक माध्यमांचा उपयोग करण्यात आला. ''म. फुले व त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी जाणीवपूर्वक अखंड, जलसे, पोवाडा यासारख्या लोकसंवादाच्या माध्यमातून मानवमुक्तीचा संदेश अज्ञानी, अडाणी व निरक्षर लोकांपर्यंत पोहोचवला.''[६] ''महाराष्ट्रातील तमाशासारख्या पारंपरीक प्रकटीकरणाच्या (Performing) कलेच्या माध्यमातून 'सत्यशोधकी जलशा'ची निर्मिती झाली. जलशातील आकृतीबंध जुना असला, तरी त्यातील आशय मात्र नवीन होता. ''रामचंद्र बाबा घाटगे यांनी १९१५ साली सत्यशोधक जलशाची स्थापना केली आणि १९४५पर्यंत एकोणतीस फड तयार झाले.''[७] हे जलसे म्हणजे सत्यशोधक चळवळीच्या प्रचाराचे महत्त्वाचे साधन होते. फुल्यांच्या काळातच उदयाला आलेले गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागूजी बनसोडे इत्यादी समाजसुधारक, लेखक, कवी यांनी १९व्या शतकात पार पाडलेले समाजकार्य आणि त्यांचा लेखनप्रपंच हा आंबेडकरपूर्व काळातील एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक ठेवा आहे. पूर्वपरंपरा म्हणून या कार्याचा आढावा घेणे अपरिहार्य ठरते.

✸ शिवराम जानबा कांबळे (१८७५)

'' ज्या काहींनी त्या काळी संघर्ष हाच जीवनाचा अंतिम हेतू मानून अस्पृश्यांच्या उद्‌द्धारासाठी जीवाचे रान केले त्यात शिवराम जानबा कांबळे यांचा अग्रभागी सगौरव उल्लेख करावा लागेल.''[८] समाजाला संघटित करून त्यांनी कर्तव्याची जाणीव करून दिली. तत्कालीन वृत्तपत्रांतून निर्भिडपणे परखड लेखन करून समाजस्थितीचे वास्तवचित्र लोकांपुढे ठेवून समाजमन चेतविण्याचे कार्य केले. 'सोमवंशीय मित्र' हे वृत्तपत्र सुरू करून लोकजागृतीचे, प्रबोधनाचे कार्य पार पाडले.

✸ गोपाळबाबा वलंगकर (मृत्यू १९००)

वलंगकर यांनी म. फुल्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन महान समाजिक कार्य केले. तत्कालीन सामाजिक प्रश्नांना 'दीनबंधू', 'सुधारक' या वृत्तपत्रांतून सामाजिक प्रश्नांना फोडली. १८८८मध्ये त्यांनी 'विटाळविद्‌ध्वंसन' ही पुस्तिका हिंदू समाजाला उद्देशून लिहिली. फुल्यांप्रमाणेच हिंदूंचे धर्मग्रंथ आणि आचार संहिता यांवर कडाडून हल्ला चढवला. १८९४मध्ये ब्रिटीश सैन्यात अस्पृश्यांना भरती करावे म्हणून सरकारला निवेदन सादर केले. १८९०मध्ये 'अनार्यदोष परिहार मंडळी' ही संस्था स्थापन करून त्याद्वारे दलित पीडितांना संघटीत करून अन्यायाविरोधात लढण्यासाठी संघटित केले. त्यांचे कार्य क्रांतीकारक होते. महात्मा फुल्यांच्या तालमीत तयार झालेल्या गोपाळबाबांनी फुल्यांप्रमाणेच 'अखंड' रचना केली आहे. ''गोपाळबाबांचे पद्यलेखन म्हणजे सामाजिक अंतरंगांचा स्फोटच. आधुनिक काळातील ते पहिल दलित कवी.''[९] असे डॉ. गंगाधर पानातवणे यांनी म्हटले आहे. गोपाळबाबांच्या अखंडांतून प्रामुख्याने धूर्त ब्राह्मणांचा कावेबाजपणा, कपटनिती, स्त्रियांची अवहेलना, धर्माच्या नावाने केले जाणारे सामाजिक शोषण असे अनेक विषय प्रत्ययाला येतात.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेत विद्या, अध्ययन या विषयीचे सर्व अधिकार ब्राह्मणांनाच होते. इतरांना अज्ञानात ठेऊन, स्वतःकडे श्रेष्ठत्व घेऊन समाजावर अधिराज्य गाजवण्याची ब्राह्मणी प्रवृत्ती होती. कोण श्रेष्ठ आणि कोण हीन हे ठरवण्याचे

अधिकार ब्राम्हणांनी सर्वस्वी आपल्या हातात राखून ठेवले. पुराणे, शास्त्रे, धर्मग्रंथ, स्मृतीश्रुती सारेकाही जणू शोषणाची हत्यारेच त्यांच्या हाती एकवटली होती. म्हणूनच वलंगकर म्हणतात,

हेच शास्त्रकर्ते हेच न्याय देते । गुरू हेच होते पूर्वकाळी ।१।
म्हणून या नीचांनी तुम्हा नीच केले । श्रेष्ठत्व आणिले आपणांस ।२।
कोणा ब्राह्मणास पुज्य ते मानावे । कोणास आणावे धर्मकार्या ।३।
ब्राह्मणेतरांनो विचार तुम्ही करा । अभिमान धरा मानवाचा [१०]

येथे ब्राह्मणेतरांना आवाहन केल्याचे दिसून येते. आपल्या वाट्याला हीनत्व येण्यास ब्राह्मणच कसे कारणीभूत आहेत हे स्पष्ट केले आहे. त्याचे कारण ब्राह्मण हेच शास्त्र लिहिणारे होते. न्यायदानही त्यांच्याच हातात होते आणि गुरूही तेच होते. इतरांना नीच ठरविणारांना पूज्य कसे मानावे असा प्रश्न उपस्थित करून ब्राह्मणांचीच संभावना 'नीच' म्हणून केली आहे. साध्या सरळ भाषेतील ही अभिव्यक्ती असून, त्यात एक स्पष्ट परखडपणाबरोबरच निर्भय वृत्तीचाही प्रत्यय येतो.

हिंदू धर्माचे ब्राह्मण ते वकील । लुटीले सकळ जन त्यांनी ।
धर्ममिसे लोक नाडिले वकीले । स्वार्थ साधियले आपुले ते[११]

अशाप्रकारे सकळ जनांना लुटणारे, घर्माच्या नावावर लोकांची अडवणूक करणारे, लुबाडणूक करून स्वतःचा स्वार्थ साधणारे, हिंदू धर्माची वकिली करणारे ब्राह्मण! त्यांच्या कपटनिती कारस्थानाचे स्वरूप खालीलप्रमाणे स्पष्ट होते,

कोणते ब्राह्मण मुखातून झाले । शूद्र तया केले कोण्या देवे ।
ऋषीचे ते कुळ गंगेचे हे मूळ । विचारी तो खुळ धूर्त म्हणे ।
तशी खोटी शास्त्रे लिहुनिया जाण । शपथा आणाने भय घाली
आणि त्या दृष्टांनी कपटे ती केली । विद्या ती ठेवली आपल्या हाती ।।[१२]

ब्राह्मणांच्या उत्पत्तीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करून त्यांचा धूर्तपणा, खोटेपणा आणि कपटीपणा कोणता याविषयाचे स्पष्ट प्रतिपादन वलंगकरांनी केलेले दिसून येते. ब्राह्मणांनी विद्येच्या चाव्या स्वतःच्या कमरेला बांधून ठेवल्या, त्यामुळे शुद्रातिशूद्र, स्त्रिया या शिक्षणापासून वंचित राहिल्या. ही दुष्टपणाची कपटनिती सामाजिक जीवनातील प्रगतीत मोठा अडसर ठरली. विधवा स्त्रियांची विटंबना, स्त्रियांची अवहेलना, कर्मठांचा भ्रष्ट व्यवहार यांविषयीचे विवेचन वलंगकरांच्या अखंडांत पाहावयास मिळते.

कर्मठांचा धर्म सोवळ्या ओवळ्यांत । मानी तो सर्वास पापपुण्य ।१।
कृषीकर्मी नर नेणे धर्मनीती । कष्ट ते करिती जन्मभर ।२।
धर्मनीतीकडे व्यापारी ना पाहे । द्रव्य हेच आहे, पुण्य त्यांचे ।३।
धर्माची ही तत्त्वे विद्वान शोधिती । निंदे पात्र होती जनांचिया ।४।
सत्यदास सांगे बंधु सुधारका । भिऊ तुम्ही नका कर्मठांशी ।५।[१३]

कर्मठांचा धर्म हा दांभिक स्वरूपाचा आहे. कर्मठांनीच पापपुण्याच्या कल्पना जनमानसांत रुजविल्या. त्यामागे स्वतःचा स्वार्थ साधून घेण्याची वृत्ती कार्यरत होती. आयुष्यभर कष्ट उपसणाऱ्या शेतकऱ्यांचे होणारे शोषण, व्यापाऱ्यांची नफ्यालाच धर्म मानणारी वृत्ती यासंबंधिचे विवेचन वरील अखंडात आहे. कर्मठांची नीती स्वार्थांध आहे. म्हणून सुधारक बंधूंनी कर्मठांची भीती बाळगता कामा नये. असे आवाहन केले आहे. राष्ट्राला पारतंत्र्यात लोटण्यासाठी कोणती गोष्ट कारणीभूत ठरली असेल तर ती आहे जातीभेद. जातीभेदामुळेच राष्ट्र लयाला गेले. असा निष्कर्ष वलंगकरांच्या अखंडांनी मांडला आहे.

जातीभेदाने राज्य ते गमाविले । गुलाम हो झाले परक्यांचे ।१।
अजुन ना सोडी जाती अभिमान । देशा नुकसान झाले तरी ।२।
ऐशिया नराशी काय हो म्हणावे । पशूत गणावे दास म्हणे ।३।[१४]

प्रत्येक काळात ब्राह्मणांनी सत्तेशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. परक्यांचे गुलाम होण्यात त्यांना कोणताही कमीपणा वाटला नाही. देशाचे नुकसान झाले तरी चालेल पण जात्याभिमान सोडता कामा नये हा त्यांचा आचारधर्म आहे. अशा माणसांची गणना माणसांत न करता पशूंतच केली पाहिजे असे या कवीचे म्हणणे आहे. वलंगकरांच्या अभिव्यक्तीत सातत्याने बेडरपणा दिसून येतो. कोणताही मुलाहिजा न ठेवता स्पष्ट आणि परखड प्रतिपादन करणे हा त्यांच्या अभिव्यक्तीचा विशेष होय.

थोडक्यात, गोपाळबाबा वलंगकर यांनी म. फुल्यांच्या अखंड रचनेचा वारसा पुढे चालू ठेवला. अखंडांच्या माध्यमांतून सामाजिक जाणीवा मुखरीत केल्या. दलित पिडितांमध्ये संघर्षाचे भान जागविले. दलितांच्या वाट्याला आलेले दुःख आणि शोषणाचे मूळ हे ब्राह्मणी धर्मातच आहे, असा स्पष्ट विचार त्यांच्या अखंडातून प्रत्ययाला येतो. ''गोपाळबाबा हे अस्पृश्यातील पहिले समाज क्रांतिकारक, पहिले पत्रकार, पहिले वक्ते आणि न्यायमूल्यांची भाषा देणारे पहिले सम ाजकवी'' असा अद्यत्वाचा मान डॉ. गंगाधर पानतावणे यांनी गोपाळबाब वलंगकरांना दिला आहे.

✸ किसन फागू बंदसोडे (१८७९-१९४६)

या काळातील एक सक्रिय लेखक, नावाजलेले कवी आणि दलितसमाजाचे पुढारी म्हणजे किसन बंदसोडे. हिंदूधर्मातील रुढी, धर्माच्या नावावर केले जाणारे शोषण यांविरोधात त्यांनी आवाज उठविला. मात्र ब्रिटीश राजवटीत धर्मांतराला त्यांनी विरोध केला. हिंदू धर्मात राहूनच सुधारणा घडवून आणता येतील याबद्दल त्यांना खात्री वाटत होती. समाजसेवेत त्यांनी आयुष्य खर्ची घातले. प्रबोधन घडवून आणण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रेही सुरू केली. 'निराश्रीत हिंद नागरिक', 'विटाळविद्ध्वंसक', 'मजूरपत्रिका', 'चोखामेळा', इत्यादी वृत्तपत्रांतून संपादकीय लेखनाबरोबरच परखड लेख लिहून लोकशिक्षणाचे मोठे कार्य केले. अस्पृश्य समाजाला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. ''दलितांच्या धगधगत्या अंतःकरणाचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेतून उमटले''.[१६] 'प्रदीप' हा त्यांचा कवितासंग्रह. या देशातील भेदभाव आणि विषमता, विषमतेला कारणीभूत ठरणारा धर्म याचे विदारक चित्र त्यांच्या कवितेने रेखाटले आहे. उदा,

पहा पहा सारे जन हो हा हिंद देश माझा ।
दुहीचे मूलस्थान । भेदाचे येथे रान । वैरास देई मान । हा हिंद देश माझा
जगात कोठे नाही । तो भेद येथे पाही । जन्माने वर्ण ठरवी । हा हिंद देश...
भटास उंच पदवी । इतरास नीच ठरवी । धर्मात ठेवी यादवी । हा हिंद देश...
मनुजास पशूहून । मानी जो येथे हीन । तोच आर्यावर्त जाण। हा हिंद देश माझा [१७]

जगात कुठेही नसेल अशा विषमतेला जन्म देणारा हा देश आहे. जेथे जन्मतःच अधिकारभेदाची देणगी मिळते. भटांना श्रेष्ठ आणि इतरांना कनिष्ठ मानले जाते. माणसाला पशूपेक्षाही हीन पातळीवरचे जगणे जगण्यास भाग पाडले जाते. आणि हे सारे काही धर्माच्या नावाखाली राजरोसपणे सुरू असते. असा हा देश आहे. अशाप्रकारे या देशातील सामाजिक वास्तवाचे भेदक चित्र या कवितेतून स्पष्ट होते. या देशातील रुढी, परंपरा, चालीरिती यामुळे माणूस पराभूत झाला. त्याचा विकास होऊ शकला नाही. या रुढीचे, चालीरितीचे स्वरूप कसे आहे?

मोहक रूप दिसे भारी । परि विषच भरले अंतरी
हास्यवदन दिसे वरी जरी । अंतरी क्रोधे होई लाल बहु चौचाल
हिने शास्त्री नादी लाविले । वेदाहुनी श्रेष्ठ वदविले
पुराणिका हिने नाचविले । संत महंता नेसवूनि लुगडे
पाही नाच खुशाल बहु चौचाल[१८]

इथल्या रुढी परंपरा, चालीरितीचे बाह्यरूप आकर्षक आणि अंतरीचे रूप जहरी स्वरूपाचे आहे. मोहक रूपाने आकर्षित करायचे, अंतरीचे विष पसरवत राहायचे. ओठांत एक आणि पोटात दुसरेच. अशा प्रकारचा चौचालपणा

जोपासणारी, पुराणिक आणि संतमहंतांना नादी लावून खुशालपणे त्यांचा नाच पाहणारी अशी ही चौचाल रुढी आहे. इथल्या वैदिक परंपरेनेच माणसाला पशूपातळीवर पोहोचविले-

पशूहूनी केले हीन नच उरू दिला कुठे मान
अपमान करूनी मान कापली, कृत्य असुराचे
महार विसरतील कैसे । कृत्य तुमच्या पूर्वजांचे[१९]

असा निर्वाणीचा इशारा बंदसोडे यांची कविता देते. माणसाचाच अपमान करणाऱ्या, माणसासोबत असुरी कृत्य करणाऱ्या व्यवस्थेला आव्हान देण्याचे कार्य या कवितेने पार पाडले आहे. अस्पृश्यांच्या वाट्याला आलेल्या परिस्थितीचे विदारक चित्र उभे केले आहे. मात्र बंदसोडे यांची कविता हरिजवळ करुणा भाकताना दिसते.

हरि! मज पशु कर वा पक्षी कर । परी नको करू महार
पक्षीयोनी मज राघू केले तरी हिंदू शिकवितो
महार केलिया विटाळ मानूनी शिक्षण बंदी करितो
यास्तव पशू कर वा पक्षी कर[२०]

या देशात 'महार' म्हणून जन्माला येणे म्हणजे शिक्षा भोगण्यातच जन्म घालविणे. माणूस म्हणून त्याचे अस्तित्व नाकारले जाते. त्यापेक्षा पशू किंवा पक्षी म्हणून जन्मास येणे काय वाईट! माणसाच्या, त्यातही 'महार' जातीत जन्माला येणे नाकारणारी ही उद्विग्न अवस्था आहे. पक्षीयोनीत पोपट म्हणून जन्माला आले तरी हिंदूकडून पोपटाला शिकविले जाते. मात्र महार म्हणून जन्माला आले तर त्याचा विटाळ मानून त्याला शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. वर्णव्यवस्थेचे हे मानवी अधिकार नाकारणारे अघोरी स्वरूप आहे. म्हणून 'महार' म्हणून जन्माला येण्यापेक्षा पशू किंवा पक्षी म्हणून जन्माला येणे बरे. अशी आर्त जाणीव या कवितेतून स्पष्ट होते. त्यातून अधिकारभेद करणाऱ्या व्यवस्थेची भीषणताही सूचित होते. आत्मटीका हा बंदसोडे यांच्या कवितेचा महत्त्वाचा विशेष होय. स्वकीयांना त्यांच्या लाजिरवाण्या जगण्याची परखड जाणीव ही कविता करून देते.

थू: तुमच्या तोंडावर लेक हो
कसले वतनदार, महार तुम्ही, कसले वतनदार
वतनदाराची बघा लेकरे फिरती दारोदार ...
गुरे ओढणे लाजिरवाणे धिक हा संसार तुमचा रे
उच्छिष्टाची आस सदाची धड मिळेना भाकर
थू: तुमच्या तोंडावर।
अंगण झाडणे केर फेकणे नित्याचा व्यवहार तुमचा रे
ह्या कामगिरीचे हक्क केवढे, उष्टे तुकडे चार... थू: तुमच्या तोंडावर[२१]

अशाप्रकारे स्वकीयांचा धिक्कार करणारी जाणीव येथे प्रकट झाली आहे. अस्पृश्यांच्या वाट्याला आलेले भिकारपण, मेलेली गुरे ओढायला लावणारी लाजिरवाणी परिस्थिती, अन्नान्न दशा, चतकोर तुकडयासाठी पडेल ती करावी लागणारी कामे अशा लाचार जगण्याचे हे वास्तवचित्र आहे. असे जगणे जगणाऱ्यांचा येथे धिक्कार केलेला दिसून येतो. या धिक्कारामागे स्वकीयांनी अशा प्रकारचे जगणे नाकारले पाहिजे असा चेतना जागृतीचा विचार आहे. ही जागृतीच तातडीने झाली नाही म्हणून हा कवी अधिकाधिक कठोरपणे व्यक्त होतो. आणि लाचार जगण्यावर प्रहार करतो. उदा.

अक्कल महाराची गं गेली
याची सुदबुद सारी हरवली
कोणी आला गेला त्यासी म्हणे भला
जोहारासाठी मान कशी झुकली[२२]

या उपरोधपूर्ण रचनेतून, अस्पृश्यांनी गुलामी आणि लाचारी झुगारून दिली पाहिजे अशा प्रकारचा विचार सूचित केला आहे. ताठ बाण्याने जगण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. या अपेक्षेची पूर्तता व्हावयाची असेल तर ज्ञान प्राप्त करून घेतल्याशिवाय, शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.

उठ शिक तातडी बाराखडी, खडी तालीम सोड आता
धर स्वाभिमान, मिळवी मान, अपमान चुकवी तू पुरता[२३]

येथे मानाचे जगणे जगायचे असेल तर शिक्षण आणि स्वाभिमानाची कास धरली पाहिजे.त्याशिवाय जीवन सार्थकी लागणार नाही.असा संदेश ही कविता देते.

साहू नका कुणाचा जुलूम
होऊ नका कुणाचे गुलाम
सोडून द्यारे सारे बदकाम [२४]

असे स्वाभिमानी जगण्याचे आवाहन या कवितेने केले आहे. गुलामीतून मुक्त व्हायचे असेल तर संघर्षाशिवाय पर्याय नाही.हा संघर्ष धारदार व्हावा यासाठी बंदसोडे यांची कविता स्वकीयांना आपल्या पूर्वजांची, पूर्वजाच्या पराक्रमाची आठवण करून देते.

भीड धरुनी भ्याड वृत्तीने का रे जगले
सांगा तुमचे पूर्वज नाही युद्धी का लढले?
शत्रूचा त्या करूनी वध । स्थापिला तुम्ही जयस्तंभ
कोरेगावी होता संबंध[२५]

जे लोक इतिहास विसरतात ते भविष्य घडवू शकत नाहीत. याचे भान कविला आहे. म्हणूनच इतिहासकाळातील बलीदान आणि पराक्रमाची आठवण करून देण्यात आली आहे. इंग्रजी सैन्यात दलितांनी (पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनी) पेशवाईविरुद्ध पराक्रम केला. एक नवा इतिहास घडविला.पेशव्यांना पराभूत केले. या पराक्रमाचे स्मारक कोरेगाव येथे आहे. मनुस्मृतीला शिरोधार्य मानण्याची परंपरा पेशवाईपर्यंत अतिशय प्रबळ होती. पेशवाईने आपल्या गरजेप्रमाणे पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वांचा, संकल्पनांचा उपयोग केला म्हणून दलितांनी पेशव्यांविरुद्ध दिलेला लढा हा दलित स्वतंत्र्याचा, दलित मुक्तीलढयाचाच एक भाग होता. हे भान जागवितानाच अस्पृश्यांनी मुक्तीसाठी संघर्ष हे तत्त्व स्वीकारणे अटळ असल्याचे या कवितेने सूचित केले आहे.

थोडक्यात, किसन फागू बंदसोडे यांच्या कवितेने दलित जीवनाचे विदारक चित्र रेखाटले आहे. सामाजिक विषमता, या विषमतेला कारणीभूत ठरलेला धर्म, या देशातील चौचाल रुढी परंपरा, चालीरिती, जन्मत:च अधिकारभेद करणाऱ्या वर्णव्यवस्थेची भीषणता असे अनेक विषय या कवितेने अधोरेखित केले आहे. आत्मटिका हा या कवितेचा विशेष असून स्वकीयांना धिक्कारणारी जाणीवही व्यक्त केली आहे. लाचार जगण्यावर प्रहार करतानाच गुलामीतून मुक्त होण्यासाठी ज्ञान आणि शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असा संदेश दिला आहे. डॉ.पानतावणे यांच्या मते, ''दलित शोषितांच्या भावभावनांचे चित्रण हा या कवितेचा प्राण आहे. ती भपकेबाज अलंकारसृष्टीत किंवा शब्दांच्या आतषबाजीत रमत नाही.तिला त्याचा सोसही नाही. 'व्यक्त होण्यासाठी' ती जन्मली आहे. कारण तिला कधीही व्यक्त होण्याचा अधिकार नव्हता.''[२६] मुक्तीसाठी संघर्ष हेच या कवितेचे मुख्य सूत्र आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

आंबेडकरपूर्व अस्पृश्योद्धाराच्या चळवळीत ज्या लेखक, कवी, समाजसुधारक यांचे योगदान आहे त्यात गोपाळबाबा वलंगकर, किसन फागू बंदसोडे, याबरोबरच हरिभाऊ तोरणे, गणेश अक्काजी गवई, शाहीर भाऊ फक्कड, रामचंद्र हरी बनसोडे, बळीराम बुवाजी कदम इत्यादींचा समावेश डॉ. भगवान ठाकूर यांनी 'आंबेडकरी' जलसे या आपल्या ग्रंथात केला आहे.

✸ हरिभाऊ तोरणे

हे अस्पृश्योद्धाराच्या चळवळीतील एक महत्त्वाचे नाव मानले जाते. १८७०-७५ च्या सुमारास त्यांचा जन्म झाला असावा. तरुणपणीच त्यांच्या संवेदनशील मनावर म. फुल्यांच्या चळवळीचा व विचारांचा खोलवर परिणाम झाला होता. त्यांनी विपूल लेखन केले होते परंतु 'चावडीतील बैठक' व 'वांग्यातील भूत' या दोन पुस्तकांच्या उल्लेखाशिवाय फारसे काही हाती लागत नाही. शिक्षणाचे महत्त्व सांगणाऱ्या फार्समधील हरिभाऊ तोरणे लिखित गाणे खालीलप्रमाणे आहे-

व्हा व्हा सावध, उठा बंधूनो, सूर्य उदय झाला
सुधारणेची प्रभा फाकली भारत खंडाला

साध्यासोप्या भाषेतून शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे हा या रचनेमागील मुख्य हेतू आहे.

सोडा अभिमान,समाजाचे होते नुकसान
एकीबळे स्वातंत्र्य जिंका बेकीने वागू नका

वरील रचनेत समाजाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणाऱ्या बाबींचे विवेचन करून गुलामीतून मुक्त होण्यासाठी एकजुटीचे महत्त्व विशद केले आहे.

✸ शाहीर भाऊ फक्कड

शाहीर भाऊ फक्कड यांचे मूळ नाव मालोजी भंडारे असे होते. त्यांची जन्मतारीख उपलब्ध नाही. १९२०-१९३० हा त्यांच्या शाहिरी रचनेचा उत्कर्षकाळ मानला जातो. ''प्रारंभीच्या काळात त्यांनी पारंपरिक शाहिरी केली, तर उत्तरार्धात सामाजिक प्रबोधनात्मक शाहिरी करून म. फुले, छत्रपती शाहू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या त्रिदैवताचा विचार आणि तत्त्वज्ञानाला दलित जनसामान्यांपर्यंत नेऊन पोहचवले''[२७]

भारतभूचे आम्ही वारसदार,नच डरणार आम्ही नच हटणार
भीमार्जून बंधू आमचे,वंशज आम्ही बळी राजाचे

या रचनेवरुन त्यांचेवर असलेला फुल्यांच्या विचारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. रामचंद्र बनसोडे यांनी १९१८ साली सत्यशोधक जलसे सुरू केले. त्याचप्रमाणे बळीराम बुवाजी कदम यांनी १९३१ पूर्वी सत्यशोधक जलशाची सुरुवात केली होती.

थोडक्यात, आंबेडकरपूर्व काळातील गोपाळबाबा वलंगकर ते बळीराम बुवाजी कदम यांच्यापर्यंतच्या पूर्वसूरीचे योगदान अस्पृश्योद्धाराच्या चळवळीत फार मोलाचे आहे. संक्षिप्ततः असे म्हणता येईल की, एकोणिसाव्या शतकात म.ज्योतिबा फुल्यांचा उदय आणि त्यांच्या चळवळीमुळे भारतात प्रबोधनाचे युग अवतरले.बहुजन समाजाच्या चळवळीला गती मिळाली. म. फुल्यांचे साहित्य म्हणजे शुद्रातिशूद्रांच्या शोषणाविरुद्धचा पहिला आवाज होय. म. फुले हे एकोणिसाव्या शतकातील पहिले आधुनिक आणि विद्रोही कवी होत. फुल्यांच्या विचार आणि चळवळीच्या प्रभावातून अनेक लेखक, कवी आणि समाजसुधारक उदयाला आले. गोपाळबाबा वलंगकर ते बळीराम बुवाजी कदम अशी एक परंपरा रुढ झाली. या परंपरेत कवितेतून परिवर्तनवादी विचार प्रकट झाला. मुक्तीसाठी संघर्ष हेच या परंपरेतील काव्याचे सूत्र होते.

आंबेडकरकालीन सामाजिक चळवळ आणि कलात्मक आविष्कार

✸ आंबेडकरी चळवळ

२०व्या शतकातील आंबेडकरी चळवळ हे मानवमुक्तीच्या आंदोलनाचे ऐतिहासिक पर्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ सुरू केली. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय या मानवी मूल्यांचा

पुरस्कार केला. त्याआड येणाऱ्या रुढी, परंपरा, धर्मग्रंथ, धर्म या सर्व गोष्टींना नकार दिला. समाजवादी समाजरचनेची निर्मिती हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे आणि त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. माणसाच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणणारी व्यवस्था त्यांना अभिप्रेत होती. लोकशाही व्यवस्था निर्माण करणे हे त्यांच्या विचारांचे मुख्य सूत्र होते. कोणत्याही काळात समाज, संस्कृती, तत्त्वज्ञाने, विचार, चळवळी यांचा प्रभाव साहित्यावर पडत असतो. ''चळवळीची जाणीव तेव्हाच विकसीत होत असते जेव्हा जीवनाला अधिकच विकृत रूप प्राप्त होते. जीवनाचा संकोच जेव्हा अधिक होतो तेव्हा चळवळी उदयाला येतात.''[२८] विसाव्या शतकात दलित अस्तित्वाच्या शोधातूनच डॉ.आंबेडकरांनी विश्लेषण केले. त्यांनी 'ब्रोकन मेन' थिअरी मांडली. या थिअरीनुसार नेटिव्हांच्या टोळ्यांचा आर्यानी पराभव केला, त्यांनी नेटिव्हांना आपल्यात सामावून घेतले. परंतु काही टोळ्या अशा होत्या की, ज्यांनी आर्यांची संस्कृती स्वीकारली नाही, ते जातिग्रस्त व्यवस्थेला शरण गेले नाही. त्यात आदिवासी आणि दलितांचा समावेश होता. या अनार्यांची जी जीवनपद्धती डॉ. आबेडकरांनी मांडली आहे त्यात वैदिक परंपरा नाकारणे, ती नष्ट करणे आणि समताधिष्ठीत समाजरचना निर्माण करणे असा विचार मांडला. या विचारावर उभी झालेली आंबेडकरी चळवळ १९५६ पर्यंत अतिशय गतिमानपणे विकसित होत गेली. १९२० ते १९५६ हा आंबेडकर चळवळीचा आंबेडकरकालीन कालखंड होय.

साधारणतः १९२०च्या माणगावच्या आणि २० मार्च १९२०च्या नागपूरच्या परिषदेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला प्रारंभ झाला. प्रामुख्याने १९२५ मध्ये महाड येथील महार वतनदार परिषद, १९२७ चा महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पुणे करार, गोलमेज परिषदेत केलेली भाषणे, १९३५ ची धर्मांतर घोषणा आणि १४ ऑक्टोबर १९५६ ला केलेला बुद्ध धम्माचा स्वीकार हे आंबेडकरी चळवळीतील मुख्य टप्पे आहेत. हाच आंबेडकरी चळवळीचा सुवर्णकाळ होता असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

✸ आंबेडकरी जलसे

सत्यशोधक चळवळीच्या काळातच विचार, प्रचार आणि प्रबोधनाचे साधन म्हणून 'सत्यशोधकी जलसे' आकारास आले होते. लोककलेच्या तमाशा या प्रकारात क्रांतीकारक बदल करून 'जलसा' हे नवे माध्यम आकारास आले होते. १९३० च्या आसपास सत्यशोधक चळवळ मंदावली.त्याच वेळेस सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळीचे नेतृत्व आंबेडकरी चळवळीने स्वीकारले.

चळवळीच्या गरजेतून, विचारांच्या प्रसारासाठी, लोकप्रबोधनासाठी 'आंबेडकरी जलसे' आकारास आले. आबेडकरी चळवळीच्या पायाभरणीच्या काळात 'आंबेडकरी जलशांनी' मौलीक स्वरूपाचे कार्य केले.''हे जलसे सत्यशोधकी जलशांच्या अनुकरणातून निर्माण झाले. हे अनुकरण अर्थात जलशांच्या रचना पद्धतीचे होते. जलसा नावाचा हा प्रकार मूळच्या वगनाटयाचे बदललेले रूप आहे. मूळचा तमाशा आणि वग ह्यात चळवळीच्या दृष्टीने बाधा आणेल ते शाहिरांनी वजा केले, उदाहरणार्थ, बतावणी वजा केली, नमन वजा केले आणि मूळच्या तमाशात आंबेडकरी विचाराच्या प्रसारासाठी जे आवश्यक असेल ते व्यक्त करण्यासाठी मूळ प्रकाराला नवे रूप दिले. उदा. तमाशातला सोंगाडया सनातनी हिंदूवर, त्यांच्या प्रवृत्तीवर आघात करण्यासाठी जलसेकारानी वापरला.''[२९] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान, विचार, कर्तृत्व आणि व्यक्तित्व यातूनच जलसेकारांना प्रेरणा मिळाली. '' डॉ.आंबेडकर या दीपस्तंभापासून प्रेरणा घेऊन जन्मलेले हे जलसे दलित समाजरूपी 'मूकनायकाच्या' भावभावनांचे दर्शन घडवितात. त्याच्या बंधमुक्ततेची नवी गाणी गातात. दलितमुक्तीचा इतिहास घडवणारे, समग्र मानवमुक्तीचा भीमपराक्रम करणारे डॉ. आंबेडकर हेच या जलसाकाराचे प्रेरणास्त्रोत आहे.''[३०]

आद्य आंबेडकरी जलसाकार **भीमराव करडक** यांच्या मते 'जलसा म्हणजे अस्पृश्यांच्या माणुसकी हक्कांचा साद्यंत इतिहास होय. बाबासाहेब आंबेडकर राजकीय बैठकीवरून जो बहुमोल उपदेश करीत, जे संदेश देत, त्या संदेशाचा

आणि उपदेशाचा अनुवाद म्हणजे जलसा होय''[३१] शेकडो वर्षापासून माणूस म्हणून वंचित केल्या गेलेल्या अस्पृश्य समाजाला जागृत करणे, त्यांचे उद्‌बोधन करणे, स्वत्व आणि स्वाभिमान जागा करणे हेच जलसाकारांनी आपले जीवितकार्य मानले. जलशाचे प्रभावसामर्थ्य लक्षात घेऊनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भीमराव करडक आणि आणि मंडळींचा जलसा पाहून, ''माझ्या दहा सभा मिटिंगा आणि करडक मंडळीचा एक जलसा बरोबर आहे.''[३२] असे उद्‌गार काढले होते. यावरुनही आंबेडकरी जलशामागील प्रयोजन स्पष्ट होते. आंबेडकरी जलशाच्या सादरीकरणात विविध विषयाच्या अनुषंगाने काव्यनिर्मिती झाली आहे.

जलशातील काव्य आणि शाहीर

आंबेडकरी जलशाच्या वाटचालीत साधारणत: १९३०-४५ या कालखंडात अनेक कलावंतानी आपले योगदान दिले आहे. त्यात प्रामुख्याने भीमराव करडक, पांडुरंग गोविंद पवार, दिनकर भीमाजी भोसले, रामचंद्र हणमंत आडांगळे, शिवराम सावळाराम गडकरी, रामचंद्र नामदेव सोनावणे, केरुजी घेगडे, केरुबुवा गायकवाड, अर्जुन हरी भालेराव, केशव सुका आहेर, आण्णाभाऊ साठे, पतितपावनदास, अमृतबुवा बावस्कर, कवी शेखर, कवी धोंडीराम निकम, चांगदेव खैरमोडे, कोंडदेव श्रीराम खोलवडीकर अशा असंख्य कलावंतांचा समावेश होतो. प्रारंभीच्या काळात पतितपावनदास यांनी वक्तृत्व आणि किर्तनाच्या माध्यमाततून आंबेडकरी चळवळीचा विचार लोकांपर्यंत पोचविला होता.

✸ पतितपावनदास (जन्म १९ वे शतक, अंतिम दशक)

पतितपावनदास यांचे नाव केशव नारायण देव असे होते, त्यांचा जन्म वर्धा जिल्हयातील तिगाव येथे १९व्या शतकाच्या अंतिम दशकात झाला. घरादाराची पर्वा न करता त्यांनी आंबेडकरी चळवळीत स्वत:ला झोकून दिले होते. महाड सत्याग्रहात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. लोकजागृतीसाठी त्यांनी 'पतितपावन' हे पाक्षिक सुरू केले. त्यांनी 'संत चोखामेळा' हे ओवीबद्ध चरित्र लिहीले असून, 'भारत भाग्योदय' (१९३०) हे नाटकही लिहिले आहे. समाज जागृतीसाठी त्यांनी उपदेशपर रचना केल्या. त्यात भाषेचा एक फटकळपणा दिसून येतो. सत्याग्रहाच्या चळवळीत सामील होण्याचे आवाहन त्यांनी आपल्या रचनेतून केले आहे. मात्र जे सत्याग्रहात सामील होणार नाहीत ते नामर्द होत, असा आक्रमक सूर आळविला आहे.'

या मर्दानो! नावे लिहाया सत्याग्रही जाया
नामर्दानो! पळापळा हो अधोगती जाया
या मर्दानो, नावे लिहाया सत्याग्रही जाया
नामर्दानो पळा पळा हो कळवा निज भार्या
या मर्दानो, नावे लिहाया सत्याग्रही जाया
नामर्दानो पळा पळा हो लुगडे नेसाया
या मर्दानो नावे लिहाया सत्याग्रही जाया
मुर्दाडांनो, निघूनि जा हो मुर्दाडचि खाया
समाजसेवा करुनी मर्द सत्याग्रही मरतो
दास्यकर्दमी लोळत घोळत नामर्दचि पडतो
समाजसेवा करुनी मर्द अजरामर होतो
श्वानापरी तोंड घासुनी नामर्दचि मरतो
समाजसेवा करुनी मर्द नरकेसरी झाला
घरकोंबडा हा नामर्द व्यर्थ घरचे घरी मेला
पवित्र माता पवित्र पिता ज्याचे असतील

समाजसेवेसाठी तेचि प्राण देतील'[३३]

सत्याग्रहाचा हा फटका अंतर्मुख करणारा आहे. सत्याग्रहाची चळवळ अधिकाधिक मजबूत होण्यासाठी दलितांना केलेले आवाहन आणि आव्हान या रचनेतून प्रत्ययाला येते. चळवळीविषयीची आस्था त्यातून स्पष्ट होते. मर्द आणि नामर्द या संदर्भात लौकीक जीवनातील संदर्भ देऊन सत्याग्रहाचे महत्त्व अधोरेखित करणे हा हेतू येथे पाहावयास मिळतो. मर्द नामर्दातील मूलभूत फरक नेमकेपणाने सांगतानाच चळवळीतील सैनिकांनी पेटून उठावे यासाठीची ठिणगी टाकण्याचे कार्य या फटक्याने सहजसाध्य केले आहे. स्वकीयांच्या मनात विद्रोहीची पेरणी करण्याचे कार्य पतितपावनदास यांच्या लेखणी-वाणीने पार पाडले आहे. किर्तनाच्या माध्यमातून हे कार्य त्यांनी पूर्णत्वास नेले. हक्कासाठी संघर्ष हे त्यांच्या काव्यरचनेतील मूलभूत सूत्र आहे. 'पतितपावनदासांना बाबासाहेबांचा खूप सहवास लाभला होता. पण त्याचे त्यानी कधी भांडवल केले नाही. बाबासाहेबांची आज्ञा प्रमाण मानून सैनिकाची निष्ठा ते जगत होते.'[३४] म्हणून अन्याय, विषमता, जातिभेद, धर्मांधता या बाबतीत त्यांनी परखडपणे प्रश्न उपस्थित केले.

''तुम्ही माणसे आम्ही माणसे हिंदू हिंदू
तुम्ही आम्ही
ऐसे असोनी धर्म मंदिरी आम्ही आम्ही
तुम्ही तुम्ही ''[३५]

हिंदू धर्मात सहिष्णूता आहे असे सांगीतले जाते, मग माणसामाणसात हा धर्म भेद कसा निर्माण करतो. त्यावेळी ही सहिष्णूता आणि सर्वसमावेशकता जाते कुठे? असा हा प्रश्न आहे. अशाप्रकारे हिंदू धर्मातील भेदनिती आणि दांभिकता स्पष्ट केली आहे. माणुसकीचे हक्क प्राप्त करून घ्यावयाचे असतील तर संघर्षाशिवाय पर्याय नाही.त्यासाठी स्वकीयांना ते आपल्या पूर्वजाच्या पराक्रमाची आठवण करून देतात आणि अस्पृश्यतेच्या गुलामीतून मुक्त होण्याचे आवाहन करतात,

''क्षत्रियाची बाळे आपण, महार, मांग, भंगी
चांभारादी सर्व बंधुनी जावे रणांगणी
अस्पृश्यतेचे पाश तोडुनी स्वतंत्र व्हा सारे''[३६]

महार, मांग, चांभार, भंगी ह्या सर्व जाती क्षत्रिय वंशाच्या आहेत. याचे भान आणून देण्याचा प्रयत्न येथे दिसून येतो.पतीतपावनदास यांची रचना अस्पृश्यांच्या वेदनेतून जन्मास आली आहे. म्हणूनच त्यांच्या रचनांतून समाजव्यवस्था बदलू पाहणाऱ्या मनमंथनाची निग्रही भूमिका दिसून येते.''[३७] असे मत कृष्णा किरवले यांनी मांडले असून ते पतितपावनदास यांच्या काव्यरचनेचा उचित न्याय देणारे आहे.

✹ शाहीर भीमराव करडक (१९०४) :

शाहीर भीमराव करडक हे आंबेडकरी जलशाचे आद्य प्रवर्तक मानले जातात. बालपणापासून त्यांना गाण्याची आवड होती. १९३० साली 'नाशिक सत्याग्रहाचा पोवाडा' रचून त्यांनी शाहिरीच्या क्षेत्रात पदार्पण केले. काळाराम मंदिर सत्याग्रह हे आंबेडकर चळवळीतील दीर्घकाळ चाललेले आंदोलन होते. हिंदू धर्मातील दांभिकता, अस्पृश्यता, हिंदू धर्मीयांची सनातनी वृत्ती, आंबेडकरांचा शिक्षणविचार इत्यादी अनेक विषयांवरील रचना त्यांनी जलशाच्या माध्यमातून सादर केल्या. पारंपरिक तमाशात असलेले गणेशस्तवन त्यांनी नाकारले. डॉ.आंबेडकरांना नमन करूनच ते आपल्या सादरीकरणाला सुरुवात करीत असत.

हे भीमराया नमितो पाया, द्यावी मती आम्हा तव गुण गाया ।।धृ।।
जगी आमचा नाही वाली तूच आमुची कृपा साऊली
अस्पृश्यांची खरी माऊली ।
दलितांना उद्धाराया । द्यावी मती आम्हा तव गुण गाया ।१।[३८]

या नमनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित समाज यांच्यातील नाते माय लेकरासारखे असल्याचा निर्वाळा दिला आहे. मातारूपी आंबेडकरांनी दलितांच्या उद्धारासाठी आम्हास बुद्धी द्यावी असे आवाहन या नमनातून करण्यात आले आहे. पारंपरिक नमनात गणेश स्तवन किंवा गणेशाजवळ याचना केलेली असायची. करडकांनी नमनामध्ये वरीलप्रमाणे बदल करून समाजप्रबोधनासाठी डॉ.आंबेडकरांची महती विशद केली आहे. अस्पृश्यता, विषमता, अधिकारभेद ही हिंदू धर्माची खास वैशिष्टये आहेत. अस्पृश्य समाजाला आपली उन्नती करून घ्यावयाची असेल तर हिंदू देवदेवतांच्या नादी लागण्यात अर्थ नाही असाच विचार करडकांनी आपल्या रचनेतून मांडला आहे.

पुरे झाली सेवा हिंदू देव-देवतांची
काय केली उन्नती सांगा,आम्हा दलितांची ।१।
हिंदू धर्मामध्ये निश्चित अस्पृश्यता अटळ
हरिजन सेवक संघ फार्स व्यर्थ कुटी टाळ ।२।[३९]

हिंदू देवदेवतांनी दलितांची उन्नती केली नाही. अस्पृश्यता ही अटळपणे हिंदू धर्माच्या केंद्रस्थानी असणारी गोष्ट आहे. त्यातून विटाळ, बाट, विषमता या गोष्टींचीच देणगी मिळाली.अशा बाबींना नकार देणे अपरिहार्य ठरते अशी जाणीव अस्पृश्य समाजाला करून देणे हा या रचनेचा उद्देश आहे. गांधींनी 'हरिजन सेवक संघा'ची स्थापना करून त्यात अस्पृश्यता निवारण या कार्यक्रमाला स्थान देण्यात आले होते. परंतु त्यांचा हा प्रयत्न दिखाऊ आणि वरपांगी स्वरूपाचा होता.तो एक फार्स होता. कारण हिंदू धर्माच्या तत्त्वांना धक्का न लावता गांधीना सुधारणा घडवून आणावयाची होती. म्हणूनच करडकांनी हिंदू धर्मातील दांभिकतेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. ते म्हणतात-

नाही समता तुमचे अंगी । तुम्ही लिहिली शास्त्रे ढोंगी ।१।
ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य,शुद्र । हिंदू धर्मास पाडिले छिद्र
उच्च नीच भावना अंगी । जडविली पुराणे ढोंगी
पोटासाठी खोटे ग्रंथ । त्यामुळे झाले अठरा पंथ
हे सोवळे तुमचे वरपांगी । करडक म्हणे अंतरी हे ढोंगी ।२।[४०]

हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेने जन्मत:च अधिकारभेद वर्णाच्या माध्यमातून सांगीतले. त्याच्या समर्थनार्थ स्मृती, श्रुतीसारखे ग्रंथ व पुराणाची निर्मिती केली. बाह्यरूपात सोवळेपणा आणि अंतरंगात कावेबाजपणा अशी हिंदूधर्माची प्रवृत्ती होती. हेच वरील रचनेतून स्पष्ट होते. अस्पृश्यांच्या वाट्याला हीनत्व का आले याचीही मीमांसा करडकांनी केली आहे

अस्पृश्य बांधवांनो । वडिलांची चाल सोडा ।।धृ।।
पूर्वीच्या चालीरीती,मेलेले मांस खाती
वाईट झाली आपुली स्थिती,कोणी न आपणास शिवती ।। [४१]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला लाचारी, गुलामी आणि गलिच्छ जीवनातून बाहेर पडण्यासाठी वेळोवेळी उपदेश केला आहे.तोच विचार करडकांनी वरील रचनेतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मृत जनावराचे मांस खाणे, जुन्या चालीरीतीचा अवलंब करणे यामुळेच अस्पृश्यांची वाईट अवस्था झाली.त्यामुळेच त्यांच्या स्पर्शाचाही विटाळ बाळगला गेला. एका अर्थाने डॉ. आंबेडकरांच्या उपदेशाचाच अनुवाद केल्याचे येथे प्रत्ययाला येते. हिंदू धर्मियांच्या सनातनी वृत्तीवर प्रकाश टाकण्याचे कार्यही करडकांच्या काव्यातून पाहावयास मिळते.

बहिष्कृत संत चोखा, मातंग रोहिदास
पतित होते तरी पावन प्रभूला ।।
मग का न मंदिरी हक्क तयाला ।।धृ।।[४२]

बहिष्कृत जातीतून आलेल्या चोखामेळा, रोहिदास या संतांना मंदिरामध्ये प्रवेश मिळाला नाही. सनातनी वृत्तीच्या लोकांनी त्यांचेवर बहिष्कार घातला. या प्रकारे सनातनी वृत्तीचे दर्शन घडवून सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातील अंतर्विरोध

कवीने स्पष्ट केला आहे. भीमराव करडकांनी बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविचार आपल्या काव्याच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी 'आंबेडकरांचा'च आदर्श लोकांसमोर ठेवला-

विनंती माझी दलित बंधूना,शिक्षण द्याहो मुलामुलींना ।।धृ।।
हिंदू राजे पेशवाईत। पूर्वज आपले अशिक्षित
बंदी होती शिक्षणाला । शिक्षण द्या हो मुलामुलींना ।।१ ।।
शिक्षणाचा चमत्कार । बाबा आंबेडकर झाले बॅरिस्टर
करडक विनवी सर्व बंधूना,शिक्षण द्याहो मुलामुलींना ।।२।। [४३]

पूर्वजांच्या वाट्याला आले ते आपल्या वाटयाला येऊ नये. शिक्षणाशिवाय उद्धार नाही. म्हणून दलितांना विनंती करताना, शिक्षणामुळे कोणता चमत्कार घडला याचा दाखलाही दिला आहे. दलितांनी आंबेडकरांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे अशी त्यामागील भूमिका आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्याची भूमिका या जलशातील सादरीकरणातून प्रत्ययाला येते.

गुलामीत पूर्वज मेले । तुम्हा कोणी जागृत केले ।।धृ।।
सत्याग्रहाचे फुंकुनि शिंग । जुन्या रुढीचा केला भंग
माणुसकी दाविला मार्ग, हे कार्य कोणी केले [४४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खऱ्या अर्थाने दलितांचे आत्मभान जागविले. माणूस म्हणून जगण्याचा मार्ग दाखविला. मात्र बाबासाहेबानंतर दलितांना समर्थ नेतृत्व लाभले नाही याविषयीची खंतही शाहिरांच्या अभिव्यक्तीतून प्रकट झाली आहे.

कोण कुणाचा गुरू ना चेला । जो तो पुढारी झाला
मतभेदानी समाज ग्रासला । चळवळ खिचड काला ।।धृ।।
अकलेचे निघाले दिवाळे । संघटनेला गेला तडा
जनता दुभंगली,बरळत सुटली । हाड नसे जिभेला ।।१।।[४५]

डॉ.आंबेडकरांच्या निर्वाणानंतर सामाजिक, राजकीय जीवनात निर्माण झालेल्या मतभेदाचे चित्र वरील रचनेत दिसते. विविध गट निर्माण झाले त्यामुळे संघटनेचे विघटन झाले. दुभंगलेपणाचे हे अस्वस्थ करणारे वास्तव येथे अधोरेखित झाले आहे. बुद्ध धम्माचा स्वीकार, बाबासाहेबांचे महापरीनिर्वाण, स्वार्थी पुढारी इत्यादी अनेक विषयावरील रचना जलशाच्या माध्यमातून लोकमनापर्यंत पोहचवून तत्कालीन सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाचे भान जागविण्याचे कार्य भीमराव करडक यांनी प्रामाणिकपणे पार पाडले.

✹ केशव सुका आहेर (मास्तर) (जन्म २९.१०.१९१५)

आहेर मास्तरांनी करडक यांच्यापासून प्रेरणा घेऊन जलसा मंडळ स्थापन केले. त्या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकरांची थोरवी, वतनदारीचे दुष्परिणाम, धर्मांतर, इत्यादी अनेक विषयावर रचना केल्या. त्याचबरोबर पाळणा, पोवाडा, स्त्रीगीते, लावणी अशा प्रकारचीही काव्यरचना आहेरांनी केली आहे. तत्कालीन समाजजीवनात अस्पृश्यांना जी सापत्नभावाची वागणूक दिली जात होती त्यात मंदिरात प्रवेश नाकारणे अशी हिंदूची दलितांच्या संदर्भात कृतीशीलता होती. या हिंदू मानसिकतेला नाकारणारी जाणीव आहेरांनी खालीलप्रमाणे व्यक्त केली आहे.

जाणे नको मंदिरात । जणू जाणे तुरुंगात
खुले करा हृदयमंदिर । माणुसकीची जाणीव ठेवा
समतेची केवळ पूजा । नाही तर आहे काय मंदिरात ४६

हिंदू धर्माने जोपासलेला जातीवाद म्हणजे 'घाण' आहे. अशाप्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. उदा.

जातिवाद सारा । विषमतेचा वारा

तिथे समता आणि माणुसकीला नाही थारा
हिंदू धर्मात असली ही घाण आहे.[४७]

समता आणि माणुसकीपासून माणसाला वंचित ठेवण्याचे काम हिंदू व्यवस्थेने केले म्हणूनच ही व्यवस्था नाकारण्यासाठी हिंदू धर्माचा बाबासाहेबांनी त्याग केला.

समता, स्वातंत्र्य, बंधुभावाचा धम्म घेतला नवा
कानी पडला जातीवाद्यांची बिघडली सारीच हवा.
आम्ही गुलामगिरीच्या नरकात असता
नाही वाटल्या त्यांना लाजा ।।[४८]

बुद्धाच्या धम्मात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मूल्यत्रयी केंद्रस्थानी आहे. मानवी मूल्यांची देणगीच धम्माने दिली आहे. बुद्ध धम्माचा स्वीकार ही घटना कर्मठांना, सवर्णाना आवडली नाही. अशा प्रवृत्तीचे वाभाडे काढण्याचे काम वरील रचनेत दिसून येते. करडकांच्या रचनांमध्ये येऊन गेलेले विषय आहेर यांच्या रचनेतही पाहावयास मिळतात.

✸ रामचंद्र नामदेव सोनावणे (जन्म १४.७.१९११)

१९११मध्ये मौजे साताळी ता. येवला या नाशिक जिल्हयातील गावी सोनावणे यांचा जन्म झाला. १९३० साली 'भीमनामी जलसा मंडळाची' त्यांनी स्थापना केली. 'खुद्द डॉ. आंबेडकरांनी १९५५ साली नाशिक येथे सोनावणे यांचा जलसा पाहून सर्व कलावंताचे कौतुक केले होते'[४९] आंबेडकरांना नमन करून सारे शाहीर आपल्या जलशाची सुरुवात करीत असत. सोनावणेही त्याला अपवाद नाहीत.

या कुलभूषणा, तू भवभयहरणा धरी कृपाछाया ।।धृ।।
प्रथम आरंभी तुजशी नमिता यश देई कार्या
सात कोटी दलित बंधूचा आशिर्वाद घ्याया
सर्वांसाठी शिक्षण अमृताचा रुजविलास पाया
रात्रंदिन उन्नतीसाठी झिजवितसे काया
घाट घातला धर्मांतराचा तुम्हीच भीमराया
बहु आनंदे, हिंदू धर्माची सोडू आम्ही माया[५०]

शिक्षणाचे महत्त्व दलितांच्या मनीमानसी रुजविणारा, अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी झटणारा, धर्मांतराचा घाट घालणारा, कुलभूषण अशी आंबेडकरी रूपे या नमनात प्रत्ययाला येतात. आंबेडकरी व्यक्तित्वाचे विविध पैलू त्यांनी आपल्या इतरही रचनांमधून लोकांसमोर मांडले आहेत.

चोराशी न आवडे चंद्राचे दर्शन । घुबडाशी न आवडे भानुकिरण
जारणीस नावडे पतिव्रतेचे गुण । कागासी वाटे मत्सर हंस पाहून
ऐसे भीमरावाचे गुण । कानी ऐकून भट ब्राह्मण
करिती मत्सर अंतरी फार । मायावी कपट अनिवार
परि भीमराव खरे शूरवीर । सर्वांचा त्यांनी घेतला समाचार[५१]

आंबेडकरांचे मोठेपण सांगून ब्राह्मणी कपटवृत्तीचा समाचार घेणे असे प्रयोजन या रचनेत पाहावयास मिळते. जुन्या रुढी, अंधश्रद्धा, गुलामगिरी, लाचार वृत्ती या साऱ्यांना मूठमाती देऊन शिक्षण आणि ज्ञानाची कास धरुन स्वाभिमानी बाण्याने जगण्याचे आवाहन सोनावणे यांच्या काव्यातून केलेले पाहावयास मिळते,

समाजक्रांतीने मानव चालला प्रगतीकडे
जुन्या रुढीचे तुमच्या अंगी जीर्ण घोंगडे जी ।
सोडा गुलीमगिरी ही भीमराव देई धडे

शिकवा मुला-मुलींना, चला धैर्याने पुढे जी ।
सोडा भिकेची झोळी, तोडा गुलामीचे कडे
मर्दा निर्भय हो, पाहू नको मागे पुढे जी ।
मानव स्वतंत्र आहे, नशीब हे केवढे
शाहीर सोनावणे म्हणे, फेका मलीन घोंगडे । [५२]

समाजक्रांतीने मानवाची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरू झालेली आहे. अशा वेळेस जुन्या रुढी, गुलामगिरी, भिकार वृत्ती अशा गोष्टींना तीलांजली दिली पाहिजे असा विचार या रचनेत प्रकट झाला आहे. गुलामीतून मुक्त होण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गावरुन वाटचाल करणे श्रेयस्कर ठरणार आहे.त्यासाठी लाचारी सोडून निर्भयपणा, स्वाभिमान आणि शिक्षणाची कास धरली पाहिजे असे आवाहन करतानाच गुलामीचे कडे बेडरपणे तोडण्याचा मंत्र हा क्रांतीसन्मुख होऊन प्रवास करण्याची दृष्टी प्रकट करतो. शिक्षणाच्या बाबतीत गाफील राहता कामा नये असेही सोनावणे यांच्या कवितेने ठणकावून सांगितले आहे. आंबेडकरांची शिकवणूक आचरणात आणणे हाच आपला जीवनमार्ग असल्याचे कथन त्यांच्या कवितेने केले आहे.

दगडाचा देव तुला काय देईल मतिमंदा
जा शरण भीमरावाला,तोडील बंधा[५३]

दास्यमुक्तीचा मार्ग म्हणजे आंबेडकरी विचार हेच सोनावणे यांच्या शाहिरीचे सूत्र आहे.

✸ शाहीर केरू अर्जुन घेगडे (जन्मवर्ष उपलब्ध नाही. मृत्यू १९४७)

शाहिर घेगडे यांचे शिक्षण चौथीपर्यंत झाले होते. त्यांनी आंबेडकरी चळवळीत सर्वस्व झोकून दिले. अनेक सभातून त्यांनी आपली शाहिरी सादर केली. आंबेडकरांचा संदेश खेडयापाडयातील जनतेपर्यंत पोहचवणे हेच त्यांच्या काव्यरचनेचे उद्दिष्ट होते. आंबेडकरी चळवळीतील सत्याग्रह, राजकीय पक्ष, मजूर पक्ष, आंबेडकरी व्यक्तिमत्व इ.त्यांच्या काव्याचे मुख्य विषय आहेत. आंबेडकरी चळवळीत काळाराम मंदिराचा सत्याग्रह हा दीर्घकाळ चाललेला सत्याग्रह होता. हा संदर्भ त्यांच्या कवितेत खालीलप्रमाणे आला आहे.

कडकडली वीज आली चमकत
सीतामाईची तुटली नथ । लक्षुमणाचा उजवा हात
धक्का बसला कळसाला । बंधुनो चला जाऊ हो सत्याग्रहाला...
बरी नाही वतनदारी । शुद्ध आहे गुलामगिरी
तिच्यापायी झालो भिकारी । विचार करा जरा अंतरी
माणुसकी तुमची कळते जनतेला । बंधुनो चला जाऊ हो सत्याग्रहाला[५४]

अस्पृश्यांच्या वाट्याला आलेली वतनदारी पद्धत म्हणजे गुलामगिरी, त्यामुळेच अस्पृश्य समाज भिकेला लागला. गुलामगिरी नाकारण्यातच खरे माणूसपण आहे. अशाप्रकारे जुन्या चालीरितीला, रुढींना नाकारण्याचे आवाहन ही कविता करते. आंबेडकरी सुधारणावाद हा घेगडयांच्या काव्याचा केंद्रबिंदू होता.

सुधारणेच्या लागते पाठी गं । बाबासाहेब आंबेडकरांसाठी
सदा न कदा येळकोट केला त्याचा आला मला वीट
खंडोबाला दिली सोडचिठठी ग...[५५]

खंडोबा आणि तत्सम दैवतांना नाकारण्याची, फारकत घेण्याची आगळी वेगळी तऱ्हा येथे पाहावयास मिळते. बाबासाहेबांच्या वैचारिक आदेशातून हा नकार ठोसपणे व्यक्त झाला आहे. दलितांनी राजकीयदृष्या प्रगल्भ झाले पाहिजे. संघटित झाल्याशिवाय राजकीयदृष्ट्या यशस्वी होता येणार नाही. त्याशिवाय सरकार दरबारी आपल्या समस्या मांडता येणार नाही. हे भान दलितांमध्ये जागविण्याचे कार्य त्यांच्या काव्यातून पूर्णत्वाला गेले आहे. ते म्हणतात-

राजकीय दलित सारे । जागृत व्हारे । कठीण वेळ ही आली
असेंब्लीची निवडणुकीची । वर्गयुद्धाची नौबत झडली
तुम्ही लढा जिंकला तर । राहील मान वर । किंमत जगण्याची ।[५६]

अस्पृश्यांच्या मनात राजकीय दृष्ट्या जागृती घडविणे हा त्यांच्या काव्याचा हेतू आहे. आपणाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, ती जपता यावी यासाठी निवडणुका जिंकणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपल्या जगण्याला अर्थ उरणार नाही असे स्पष्ट प्रतिपादन केल्याचे प्रत्ययाला येते. आंबेडकरी चळवळीतील विविध टप्पे घेगडयांच्या काव्याचा विषय झाले आहेत. उदा. स्वतंत्र मजूर पक्ष.

बहुमोल कामगिरी डॉ.आंबेडकरांची
निर्माण केली प्रचंड शक्ती कामगारांची
अहा! तरुण वीरांची ।।
वीर रक्ताच्या मर्दाने लाल झालेला
स्वतंत्र मजूर पक्षाचा झेंडा फडकविला
गगनभेदी ठोकली आरोळी एकजुटीची । निर्माण केली प्रचंड[५७]

तत्कालीन राजकीय जीवन, राजकीय पक्ष, त्यांची धोरणे इत्यादीचे चित्रण शाहीर घेगडे यांनी अतिशय मार्मिकपणे केले आहे. उदा.-

हिंदी राजकारणाच्या बाजारी । निघाली काँग्रेसची एक वृद्ध नारी
हट्टवादी ती भारी असे । अहिंसेचे तिला भरले पिसे
तत्त्व हुकली मार्ग चुकली । स्वराज्य मिळेल कैसे ?-
हिंदी राजकरणाच्या बाजारी । निघाली एक हिंदू महासभेची नारी
हट्टवादी ती भारी असे । हिंदुत्वाचे तिला भरले पिसे
तत्त्व हुकली मार्ग चुकली । स्वराज्य मिळेल कैसे ?
हिंदी राजकारणाच्या बाजारी । निघाली एक कम्युनिझमची लाल प्यारी
हट्टवादी ती भारी असे । कम्युनिझमचे तिला भरले पिसे
तत्त्व हुकली मार्ग चुकली । स्वराज्य मिळेल कैसे.[५८]

वरील रचनेत स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध राजकीय पक्ष आणि त्यांचे तत्त्वज्ञान, विचारप्रणाली यासंबधी सूचना मिळते त्यात प्रामुख्याने गांधीची अहिंसेच्या मार्गाने जाणारी स्वातंत्र्य चळवळ, हिंदूत्ववादी हिंदू महासभा, कम्युनिष्टांची साम्यवादी चळवळ, मुस्लिम लीगची अलगतावादी, पाकीस्तानधार्जिनी भूमिका या चारही राजकीय विचारप्रणाल्यांमध्ये एकवाक्यता नसल्यामुळे भारताची पारतंत्र्यातून मुक्तता कशी होणार याविषयीची चिंता व्यक्त झाली आहे. कारण या विचारधारा आपापल्या धोरणांना चिकटून बसणाऱ्या, हटवादीपणा करणाऱ्या असल्यामुळे त्यांचे संघर्षाचे मार्ग चुकले आहेत. त्यामुळे हिंदुस्थानी राजकारणाचा बाजारच झाला आहे. या रचनेतून भारतातील स्वातंत्र्याची चळवळ, तित नसलेला एकसंधपणा, विविध गटांचे आपापल्या धोरणानुसार राजकारण, त्यामुळे स्वांत्र्याची प्राप्ती होण्यास दुरापास्त झालेली अवस्था. अशाप्रकारच्या स्थितीगतीचे एक अस्थिर, डळमळीत चित्र स्पष्ट होते. यावरुन शाहीर घेगडे यांच्या राजकीय प्रवृत्तीकडे पाहण्याचा निरीक्षणदृष्टीचा प्रत्यय येतो. त्याचबरोबर 'काँग्रेसची वृद्धनारी', 'हिंदू महासभेची नारी', मुस्लिम लीगची दिलप्यारी', कम्युनिझमची लालप्यारी', यासारख्या प्रतिमांच्या उपयोजनांतून त्या त्या राजकीय विचारधारेचे राग, रंग स्वभाव आणि प्रवृत्तीचा निर्देश होतो. त्यामुळे शाहीर घेगडयांचे काव्य सहजपणे श्रोत्यांच्या मनाला भिडते. हे त्यांच्या काव्याचे मोठे यश आहे. २०व्या शतकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा उदय हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे. कारण त्यांच्या आगमनामुळेच दलितांच्या अंध:कारमय जीवनात जागृतीचा प्रकाश पसरला. डॉ.आंबेडकर या महामानवाचे शाहिराच्या मनातील चित्र खालीलप्रमाणे आहे-

महाराचं पोर बिट्या लई हुशियार । बिटया लई हुशियार
साऱ्या जगात नाही असं होणार । अरं बघ बघ बघ
अंधारात आम्हासनी वाट दाखविली । भोळी जनता त्यांनी जागृत केली
देव माणसावानी ग्यान भरलय चिकार । बिटया भरलय चिकार
साऱ्या जगात असं नाही होणार । अरं बघ बघ बघ
गव्हर्नरा व्हाईसरा गोरा अधिकारी । त्यांच्यासंगे गॉटमॅट बोलतोय भारी
इंग्लीश माणसावानी घालूनी विजार । बिटया घालुनी विजार
साऱ्या जगात असं नाही होणार.[५९]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व अतिशय साध्यासोप्या भाषेत मात्र अधिकाधिक प्रभावी पद्धतीने रेखाटण्यात शाहिराची लेखणी यशस्वी ठरली आहे. ''या गाण्यानं एकेकाळी दलितांच्या घराघरात प्रेमाचं स्थान प्राप्त केलं होतं. लहान थोरांच्या तोंडी खेळत होतं. समग्र दलितांचं भावजीवन या गाण्यात आहे.''[६०] थोडक्यात शाहीर घेगडे हे आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते होते म्हणून त्यांच्या काव्यातही कार्यकर्त्याची समाजाप्रती असणारी धडपड पाहावयास मिळते. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्थितीचे सुक्ष्म निरीक्षण आणि लोकभाषेतून केलेल्या आविष्कारामुळे त्यांचे काव्य जनसामान्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचले.

✸ अर्जुन हरी भालेराव (जन्म १९०६)

अर्जुन हरी भालेराव यांचा जन्म दि. १.१२.१९०६ रोजी कसबे तडवळे, जि.उस्मानाबाद येथे झाला. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत,गावातील शाळेत, वर्गाच्या बाहेर बसून चौथीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्या काळात ब्राह्मणांशिवाय इतर जातींच्या मुलांना शाळेत प्रवेश नव्हता. पुढे त्यांनी शिक्षकी पेशात नाव कमावले. या शाहिराच्या गावात १९४१ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली 'महार मांग वतनदार परिषद' भरली होती. त्या परिषदेचा लोकमनावर फार मोठा प्रभाव पडला, अनेकांनी घरादाराची पर्वा न करता समाजकार्याला वाहून घेतले त्यापैकीच या गावाचे मास्तर म्हणजे शाहीर अर्जुन हरी भालेराव हे एक होत. आंबेडकरी विचार प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी शाहिरी रचना केली. रुढी परंपरांना नकार देणारी जाणीव त्यांच्या काव्यात प्रकट झाली आहे. गुलामीचा धिक्कार, शिक्षणाचे महत्त्व, अस्पृश्यता, इत्यादी अनेक विषय त्यांनी आपल्या काव्यातून हाताळले आहेत. दलितांचे उच्चवर्णियांकडून होणारे शोषण या विषयावर त्यांनी अनेक रचना केल्या. त्यांचे दोन दीर्घ 'भीमपाळणे' ह्या रचनाही महत्त्वपूर्ण आहेत. रुढींना कापून काढण्यासाठी ज्ञान या शस्त्राचा वापर करा असे आवाहन त्यांनी आपल्या समाजाला केले.

आता अंधकार फाकडं हांऽ हांऽ हाऽ
आता अंधकार फाकडं
नवे दिन उगवुरे समाजाचे । घ्यारे बोल ध्यानी भीमरायाचे जीऽ जी
ज्ञानशास्त्र मिळाले आपल्याला । परजा रुढी कापण्याला हांऽ हांऽ हां
धडधडा पेटवा आता रुढी हांऽ हांऽ[६१]

समाजाचा नवा उदय व्हावा यासाठी डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा अंगीकार करणे अपरिहार्य ठरते. त्यांच्या प्रेरणेतूनच ज्ञान आणि शास्त्राची ओळख झाली त्याचा उपयोग शस्त्रासारखा रुढीची नाळ कापण्यासाठी करावा. रुढीला आग लावावी असा बंडखोर विचार भालेराव यांच्या शाहिरीतून प्रकट झाला आहे. आंबेडकरी चळवळीचा इतिहास आणि आंबेडकरी कर्तृत्व हेच सर्व शाहिरांच्या आस्थेचे विषय आहेत असे प्रत्ययाला येते. उदा.

किती धमक्याचा पूर वाहिला । भीती शिवली ना भीमाला
प्राणावरती उदार हो जाहला । दिला नवा उन्मेष समाजाला
गर्जा आता जयभीमाला । हो जीऽ जीऽ[६२]

समाजाला नवी उभारी देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले आहे म्हणून त्यांचा जयजयकार करा असे आवाहन शाहिरानी केले आहे. लढता लढता मरण आले तरी चालेल मात्र अस्तित्वहीन असे गुलामीचे जीवन जगता कामा नये. असा विचार त्यांच्या काव्यातून स्पष्ट झाला आहे. उदा.

मर्दानी पाऊल द्यावे । पवित्र्यात दंड ठोठावे
छातीचे डौल मारावे । मिशाचे पीळ भरावे
घ्यारे लाठीकाठी हाती । हकूम भीमजीचा...[६३]

अशाप्रकारे लाढाऊ बाणा लोकांच्या मनात रुजविण्याचे कार्य या काव्याने पूर्णत्वाला नेले आहे. भालेराव यांच्या लेखणीने आंबेडकरांचा शिक्षणविचार, शिक्षणासंबंधी केलेला उपदेश, शिक्षणाचे महत्त्व या सर्व बाबी आपल्या काव्याच्या माध्यमातून लोकांपर्यत पोहचविल्या. त्यासाठी त्यांनी फटक्याची रचना केली आहे.

घराला वासा नसावा पण मुलगा शाळेत असावा
करणीत खोटा मनाचा मोठा वैरी दारात नसावा
सुखदु:खाची सांगू कोंडी,जुगार चावडीत नसावा ।।१।।
जुगारात झुकला प्राणास मुकला विचार करणारा असावा हाऽ जीऽऽऽ[६४]

फटका या रचनेतून उपदेशाचा फटका मारला जातो. त्यामागे लोकोन्नतीचाच विचार असतो.या रचनेतही हेच पाहावयास मिळाले. घर, दार, चावडी या तीन स्थळाचे संदर्भ येथे आले आहेत. वासा नसला तरी चालेल. म्हणजे प्रापंचिक दु:खात न अडकता मुलाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. मनाचा मोठेपणा दाखवणारा मात्र दांभिक कृत्य करणारा वैरी दारात नसावा.आणि जुगारासारख्या नादात अडकून जीव जाण्याची वेळ येता कामा नये. अविचाराने वागता कामा नये अशाप्रकारचा उपदेश केलेला दिसून येतो. डॉ.बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष भालेराव यांच्या कवनातून पाहावयास मिळतो-

रिपब्लिकन पक्ष आमुचा । तोच सांगेल हुकुम साचा ।
म्हणे अर्जुना भीमरावाची । जनता सांगेल आज्ञा त्यांची
शिरसावंदू त्या हुकूमाची । प्राणपणानी होऊ धनी पैज जिंकूनी ।।[६५]

गोलमेज परिषद, पुणे करार ह्या आंबेडकरी चळवळीतील महत्त्वाच्या घटना आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. गोलमेज परिषदेत ती मान्यही करण्यात आली होती.मात्र गांधीना ही बाब रुचली नाही. गांधीनी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला विरोध केला. ती मागणी रद्द व्हावी म्हणून आमरण उपोषण सुरू केले. गांधीची प्रकृती ढासळत गेली. हे उपोषण त्यांच्या जिवावर बेतेल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. म्हणून अनेकांना आपले सर्वस्व पणाला लावावे लागले. गांधीच्या कुटुंबघटकापासून ते दिग्गज काँग्रेस राजकीय लोकांपर्यंत सर्वांनाच डॉ. आबेडकरांजवळ याचना करावी लागली. ही घटना शाहिराने चित्रित केली आहे.-

मांग, चांभार आणि ढोरा । बगलेत घेऊन केल्या तारा
कस्तुरबाने विनविले । दयाळू भीम पाझरले ।।२।।
उदार झाले करुनी विचारा । दिली मान्यता पुणे करारा
महात्म्याचे प्राण वाचविले । बाबा उपकारी ठरले ।।३।।[६६]

अशाप्रकारे गांधीचे प्राण वाचविण्यासाठी बाबासाहेबांना पुणे करारावर सही करावी लागली. डॉ.आंबेडकरांनी गांधींचे प्राण वाचविणे ही इतिहासातील घटना वैशिष्टयपूर्ण आहे. थोडक्यात, आबेडकरी विचार, कर्तृत्व आणि चळवळीतील विविध घटनांचे दिग्दर्शन शाहीर अर्जुन हरी भालेराव यांच्या शाहिरीने केले आहे.

✸ केरुबुवा गायकवाड (जन्मतारिख उपलब्ध नाही. मृत्यू २४ मे १९६८)

केरुजीचे कुटुंब मूळचे मराठवाडयातील रोशम सांगवी या गावचे. दुष्काळामुळे चरितार्थाचे साधन शोधत

केरुजीचे वडील नारायणराव गायकवाड विदर्भातील अकोला येथे येऊन स्थायीक झाले. तेथेच केरुजीचा जन्म झाला. केरुबुवांना लहानपणापासूनच गाण्याची उपजत आवड होती. 'अकोला येथे हमालीचे काम करताना श्रमपरिहारासाठी ते उत्स्फुर्तपणे गीत गात असत'.[६७]

१९४० साली 'अस्पृश्य सत्यार्थ प्रकाशक जलसा मंडळ' स्थापन केले. जलशासाठी उत्स्फुर्तपणे कवने रचली. अ.भा. शेडयुल्ड कास्ट फेडरेशन या राजकीय संघटनेचे अनेक वर्षे विदर्भ प्रदेशाचे उपाध्यक्षपदही भूषविले. पुढे १९५७ साली रिपब्लिकन पक्षात सहभाग नोंदविला. 'केरुबुवानी मानापानाची, हारतुऱ्यांची अपेक्षा न करता बाबासाहेबांचा जिवंत संदेश घरोघर पोचवला. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशाचा अनुवाद करण्यातच त्यांच्या लेखणीने धन्यता मानली.'[६८] बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या त्रिसुत्रीचा संदेश केरुजींनी आपल्या कवितेतून समाजमनाला दिला.

१. विद्येवाचून जगात नाही थोर । विद्या शिकून जग गेलं म्होर
आम्ही असेच मागे राहणार? विद्येपायी माणूस होणार
विद्या नसल्यावर म्हणती ढोर । त्याला माणूस कोण म्हणणार
२. भीमनाम मुखामध्ये घ्यावे । नित्यरोज शाळेमध्ये जावे।।[६९]

शिक्षणाशिवाय माणसाला मोठेपणा प्राप्त होत नाही. शिक्षणामुळे माणसाला माणूसपण प्राप्त होते. शिक्षण नसेल तर माणूस आणि जनावरात तसा काहीच फरक नाही. अशा प्रकारे शिक्षणाचा संस्कार त्यांच्या कवितेने लोकमनावर केला आहे. तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात संतांची चळवळ सुरू झाली. त्यात बहुजन समाजातील जनाबाई पासून अस्पृश्य जातीतील चोखामेळा पर्यंत अनेक संत पाहावयास मिळतात. मात्र विठ्ठलाच्या दरबारातही दुजाभावच असल्याचा निष्कर्ष केरुबुवांनी मांडला आहे.

नको नको इठूबा देव आम्हाला । पावला का सांगा कधी म्हाराला ।।
सावता माळी, गोरा कुंभार, राऊळी गेला ज्ञानेश्वर
चोखोबाला ठेवला त्यानं पायरीला
बाराही वर्ष करावी इठोबाची भक्ती । तरी कधीच नव्हे संतती
चित्त द्यावे केरुबुवाच्या ह्या बोला ।।[७०]

अस्पृश्य जातीचा दु:स्वास करणारी संताच्या चळवळीची अपप्रवृत्ती येथे पाहावयास मिळते. म्हणून अशा देवाच्या वाटेला जाण्याचे काही प्रयोजनच उरत नाही. देवाला नाकारणारी विद्रोही जाणीव केरुबुवांनी व्यक्त केली आहे. दलितांच्या मनातील अंधश्रद्ध कल्पनांना झुगारुन देणारी जाणीवही त्यांनी व्यक्त केली आहे,

सखे सोड जानाई, जोखाई, नको मरीबाई
केलं तिनं काई, खरं खरं गं खरं सांग सखे बाई जी
नको खंडुबा, भैरुबाला, आग्या यताळाला, आग लागू त्याला
नको सटवाई ग नको सटवाई आणि मसुबाला जी जी।[७१]

ग्रामदेवतांच्या उपासनेमुळे दलितांचे कधीही भले झाले नाही. या देवतांच्या नादी लागणे म्हणजे अज्ञानातच बुडणे होय. त्यामुळे या देवदेवतांना आग लावणारी भाषा प्रकट होते.येथे केरुबुवा यांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्पष्ट होतो. जनजागृतीचा यशस्वी प्रयत्न त्यांच्या कवितेने केला आहे.बाबासाहेब आंबेडकर हे केरुबुवांचे श्रद्धास्थान. बाबासाहेबांच्या सामर्थ्याविषयी प्रचंड विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

१. आता सूर्य निघाला कडकडून । टाकील दुष्टांचे कंठ फोडून
ती वेळ आली पहा घडून
२. भीमराया बिना कैवारी सखे दुसरा नाही जगात

अस्पृश्यांमध्ये। शोभतो भीम,चंद्र जसा की नभात ।[७२]

दुष्टांच्या बाबतीत तप्त सूर्य आणि अस्पृश्यांसाठी शितल चंद्र अशी आंबेडकरी प्रतिमा केरुबुवांनी साकार केली आहे. दलितांचा कैवार भीमरायाशिवाय जगात दुसरा कोणीही घेऊ शकत नाही असा विश्वास येथे व्यक्त झाला आहे. भीमपराक्रमाची नोंद खालीलप्रमाणे घेतली आहे.

जगामध्ये मनुष्य जो आला । उपकार त्यांनी केला
मोठं त्याचं नाव । करणीनं देव बनतो नीट ऐकावं
बाबासाहेबांच्या बोलावर । शीर घेती तळहातावर
हत्तीवर जैसा पडतो व्याघ्र । तैसे धावती शत्रूवर
असे लाभले पुढारी शूर । दलितात भरलं त्यानं वारं
जागृती केली की चौफेर ।[७३]

बाबासाहेबांनी दलितांचे आत्मभान जागृत केले.त्यामुळे दलित माणूस संघर्षासाठी सिद्ध झाला.बाबासाहेबांच्या हाकेला ओ देऊन सर्वस्व झोकून दिले, 'शीर तळहातावर घेतले.' असे जागरण बाबासाहेबांनी घातले होते. इतिहासातील गांधी आंबेडकर संघर्ष परिचित आहे. गांधीचा दृष्टिकोन भूतदयावादी होता. मनपरिवर्तनाने अस्पृश्यता मिटेल असे त्यांना वाटत होते. अस्पृश्यांसाठी 'हरिजन' हा शब्द वापरला.सारेच देवाची लेकरे असतील तर अस्पृश्यच तेवढे हरिजन कसे? म्हणून जलसाकारांनी या शब्दाला कडाडून विरोध केला, कारण हा शब्द अपमानकारक होता. म्हणून 'अस्पृश्यांना म्हणती हरिजन । केले कपट गांधीजीनं' अशी गांधींची संभावना केली जाते.एवढेच नव्हे तर 'हरिजन' म्हणजे कोण याचा उलगडाही शाहिराने केला आहे.

अस्पृश्याला म्हणतो हरिजन । केलं कपट गांधीजीनं..
पंडिताने खरा अर्थ केला । हरिजन म्हणतो आम्ही त्याला
ज्या मुली वाहती देवाला । नेऊन सोडती देवळाला
आईबापाचा हक्क उठला । मग त्या येती जवानीला
लग्न करू नाही नेम ठरला । भर्तार मानती देवाला
लोक येती देवदर्शनाला । सुंदर स्त्रिया दिसती त्यांना
रत होती विषयवासनेला । संतान होती त्या बायाला
हरिजन म्हणतो आम्ही त्याला । कळवितो बाबा ।।५।।[७४]

येथे देवदासीची संतान असा स्पष्ट अर्थ 'हरिजन' या शब्दाच्या बाबतीत उकलून दाखविला आहे. त्यामुळे 'हरिजन' हा शब्द स्विकारण्याचे काही प्रयोजनच उरत नाही. म्हणून दलितांना उद्देशून ते म्हणतात-

गांधीचे कपट तुम्हासमोर । आज मांडले सोयीस्कर
मर्द हा तुम्ही दलित वीर । जो तुम्हा हरिजन म्हणेल तर
त्याला तुम्ही साफ द्या नकार[७५]

अशाप्रकारे गांधीचे कपट लोकांसमोर मांडून अस्पृश्यांच्या मनात नकाराची जाणीव चेतविली. केरुबुवा यांनी आपल्या कवनातून हिंदू धर्म, नेते, अस्पृश्यातील लाचारी वृत्ती यावर प्रखर टिका केली आहे. 'केरुबुवांची रचना आंबेडकरी विचाराची वाहक तर आहेच, शिवाय ती दलितांच्या अंतरंगात शिरुन त्यांच्या भावनांनाही बोलके करते आहे. स्वाभिमान शिकविणे हा तर तिचा धर्म आहे'.[७६] हे डॉ. कृष्णा किरवले यांनी मांडलेले मत यथार्था आहे. या काळातील रामचंद्र आडांगळे, दिनकर भीमाजी भोसले, पांडुरंग गोविंद पवार, इत्यादी शाहिरांचे जलशातील योगदान महत्त्वाचे आहे.

✸ रामचंद्र आडांगळे

रामचंद्र आडांगळे यांचा जन्म १८९०च्या सुमारास धांदरफळे, जि. अहमदनगर येथे झाला. तर मृत्यू १९४८

मध्ये झाला. त्यांनी केलेली रचना म्हणजे, 'पुणे करार अर्थात गांधी आंबेडकर करार, डॉ.बाबासाहेब आबेडकरांचे संपूर्ण चरित्र, काही समाजोन्नतीपर एकतारी भजने इ. पुस्तिकासोबतच 'भीमप्रताप संदेश', 'बिगुल', या नावाची पुस्तिका आडांगळे याच्या नावावर आहे. 'भीममळा' हे त्यांचे दीर्घकवन.त्यात त्यांनी रूपकात्मक मांडणी केली आहे. ३२ कडव्याची ही रचना असून पहिल्या १७ कडव्यात तत्कालीन आंबेडकर अनुयायी व कार्यकर्त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. पहिल्याच कडव्यात-

धन्य रामजीच्या बाळा कोण जाणे तुमची कळा
समता माळणीचा मळा तुम्ही त्यांचे धनी
जागोजाग राखणदार किती शिपाई, जमादार, नाईक आणि हवालदार
भरले मळ्या पाणी ।।२।।[७७]

अशाप्रकारे समता फुलवणारा हा मळा असून या मळ्याचे धनी रामजीपुत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. अशी आंबेडकर गौरवाची भावना येथे प्रत्ययाला येते. या रचनेत आंबेडकर अनुयायी आणि कार्यकर्त्यांसोबतच अकरा जलसाकारांची नोंद केली असून शेवटी बाबासाहेबांच्या इच्छेप्रमाणे सैन्यात भर्ती होण्याचे आवाहन आडांगळ्यांनी केले आहे.[७८] आडांगळे यांनी सामाजिक,राजकीय,धार्मिक विषयावर अनेक गाणी लिहीली आहेत. महाडचा संगर त्यांनी खालीलप्रमाणे चित्रित केला आहे.

झुंजले झुंजार वीर । रणी रणशूर । मर्द बहादूर महाडमुक्कामी
चवदार तळ्यावर । शिंग फुंकले क्रांती प्रखर । मार्च सत्तावीस लढा अनिवार...[७९]

या देशातून अस्पृश्यता हा रोग मूळापासून मिटवायचा असेल तर आंबेडकरांसारख्या डॉक्टर शिवाय दुसरा पर्याय नाही.-

हिंदुस्थान देशातून जातीभेद घालवा
अस्पृश्यता हा महारोग । हिंदुस्थान पडला डाग । करा ऑपरेशन
भीमराव । डॉक्टर बोलवा[८०]

अशा अन्वर्थक रचना आडांगळ्यांनी केल्या असून एकजूटीचे तत्त्वज्ञानही आपल्या कवनातून सांगितले आहे.

उदा.

ध्यान धरा रे एकी करा हीच वेळ खरी
दलिता किती सांगू का येईना ध्यानीमनी
भीमाविण नसे कोणी आपला धनी[८१]

एकजुटीचे आवाहन करतानाच ढोंगी पुढाऱ्यांवर, त्याच्या दांभिक वृत्तीवर आडांगळे याची लेखणी टीकास्त्र सोडताना दिसते.

जनता ही भोळीभाळी पुढारी झाले फार फार
कार्य हे तुमचे आमचे पैसे की जनतेचे
बोल बोलोनिया फुकाचे समाज केला गार गार
जगा सांगे मी मेंबर। माझा सर्वांपुढे नंबर
भांडे बांधोनिया कंबर । जनतेत वारंवार
लांबलचक झोकी बाता । गरिबांना मारी लाथा
कधी कळेना समाजहिता । जमिनीला झाला भार भार ।[८२]

फुकाचे बोल बोलून भोळ्या जनतेला गार करणारे, वेळोवेळी भांडणारे, गरिबांना लाथ मारणारे असे पुढारी, ज्यांना समाजहित कळत नाही असे लोक केवळ भुईला भार आहेत. अशी मार्मिक टीका टिप्पणी या कवितेने केली आहे.

थोडक्यात, आंबेडकरी विचाराने पेटलेल्या या समाजहितेशी शाहिराने १९३२ ते १९४८ या जवळपास १६ वर्षाच्या काळात एकनिष्ठ व सेवाभावी वृत्तीने जलसा चळवळ चालवून आंबेडकरी चळवळीस मोठा हातभार लावला.याच काळातील आणखी एक महत्त्वाचे जलसाकार म्हणजे शिवराम सावळाराम गडकरी.

✹ शिवराम सावळाराम गडकरी : (१९१०-१९४७)

मुंबईत पहिल्या पिढीतील आंबेडकरी जलसाकारात जे प्रथम श्रेणीचे जलसाकार होते त्यातील गडकरी हे महत्त्वाचे जलसाकार होते. ते 'ज्येष्ठ आणि गुणवत्तेच्या दृष्टीने एक श्रेष्ठ जलसाकार तर होतेच, शिवाय बाबासाहेबांच्या शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे सक्रीय कार्यकर्तेही होते.[८३] महार वतन, सावकारी, शिक्षण, अंधश्रद्धा इ. विषयावरील वर्गांचे सादरीकरण त्यांनी केले आहे. जलशाची सुरुवात भीमस्तवनाने केली जात असे.

रामजीसुता यावे सभारंगना
कापराच्या ज्योती, लावुनिया वाती, करू वंदना
गडकरी बोले, शत्रूपक्ष भ्याले भीमरावांना[८४]

भीमस्तवन किंवा जलशातील गाणी म्हणजे जणूकाही आंबेडकरी कर्तृत्वाची स्फुर्तीगीतेच असत.जलसा प्रयोगाच्या शेवटी एकजुटीचा संदेश दिला जात असे.

तुम्हा आमचा जोहार । भीमरावाचा आधार
कवी गडकऱ्यांचा सार । जना विनवी वारंवार । करा ऐक्याचा प्रचार[८५]

गडकरी यांचा जलसा १९३३-१९४१ असा दहाच वर्षे चालला. 'राजकीय कार्याचा व्याप वाढल्यामुळे त्यांनी जलसे थांबविले. त्यांना अल्पायुष्य लाभले. अवघे ३७ वर्षाचे आयुष्य लाभलेले हे एकमेव जलसाकार असावेत'.[८६] याच काळातील संभाजी पदुजी आडसूळ, काशिनाथ गोडाजी ऊर्फ के.जी.अहिरे. यांचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या शाहिरांनी साध्या सरळ भाषेतून कवने रचून समाजजागृतीचे कार्य केले. शिक्षणाचे महत्त्व आणि महारकी सोडण्याविषयीचे आवाहन करताना आडसूळ म्हणतात,

१. ज्याला शिक्षणाचं ज्ञान, त्याला मिळणार मान
अज्ञानाचा सुज्ञान झाल्यावरी

२. सोडा सोडा महार जात । जा हो जा शहरात[८७]

अज्ञानातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हाच मार्ग आहे.त्याशिवाय मान मिळणार नाही. याचबरोबर जातियतेला मुठमाती देण्यासाठी शहराकडे धाव घ्या असा आंबेडकरी संदेश त्यांच्या शाहिरीने दिला आहे. लष्करभरती हा आंबेडकरी चळवळीतील महत्त्वाचा मुद्दा होता. शाहीर के.जी.अहिरे आपल्या रचनेत म्हणतात,

सोडा अविचारा, तोडा गुलामगिरीचा खोडा, करा मनाचा हो धडा,
आव्हान तरुणाला, व्हावे सावध अशा वेळेला ।।धृ।।

झाली भीमवाणी, यावे रणी, दलित वीरांनी, करा कीर्ती जगी ।
तरुणांनी स्काऊट होऊनी । उचला पैजेचा विडा, अहिरे कविचा ।
धडा, शिका लष्करी तीडा,करा कीर्तीला,लावा जन्मुनी दीप वंशाला ।।३।।[८८]

'गुलामगिरीचा खोडा' आणि 'लष्करी तीडा' या दोन महत्त्वपूर्ण विषयाला केंद्र करणारी ही रचना आहे. गुलामगिरीच्या बंधनाला झुगारुन दलित तरुणांनी लष्करात भरती व्हावे असे आवाहन दलित तरुणांना केल्याचे प्रत्ययाला येते. एका अर्थाने स्वाभिमानी बाण्याने जगण्याचा धडाच शाहिराने आपल्या रचनेतून शिकविला आहे. आंबेडकरी चळवळ, गांधीची चळवळ, मुस्लिम लिग ह्या समकालीन चळवळी आहेत. गांधीच्या चळवळीतील अंतर्विरोध स्पष्ट करताना अहिरे म्हणतात,

अंहिंसा वृत्तीची ऐका थोरी । तुम्ही आम्ही बंधू एकच सारी
नव्हे हिंदुस्थानी जातवारी । असा जगामधी प्रचार करी[८९]

गांधीच्या चळवळीची वृत्ती ही जातवार विचार करणारी होती असा निष्कर्ष शाहिराने मांडला. गांधींचा अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रमही वरपांगी स्वरूपाचाच होता. त्यामुळे हिंदूधर्माला जडलेला अस्पृश्यतेचा महारोग बरा करण्याचा इलाज फक्त डॉ.आंबेडकरांकडे आहे. असे या कवीमनाला वाटते,

हिंदू धर्म रोग जडला भारी । त्याची आंबेडकर करी डॉक्टरी
त्यावर इंजीक्षण नागपुरी । संस्था फेडरेशन स्थापन करी
तिला मान्यता मिळे सरकारी । गडबडले मग राष्ट्र पुढारी[९०]

हा विषय पूर्वीच्या शाहिरांच्या रचनेतही येऊन गेला आहे. शाहीर अहिरे यांची रचनाही त्याला अपवाद नाही. धुळे जिल्हयातील **शाहीर रतन दला जाधव** यांनी १९४० ते १९४९ या कालखंडात आपल्या पोवाडयातून दलितांची पूर्वस्थिती आणि बाबासाहेबांच्या उदयामुळे झालेले परिवर्तन याचे चित्र रेखाटले आहे,

आज कितीक वर्षापासून । धर्मरुढीनं ठेवलं डांबून सर्व दलिताला
गावाबाहेर केर जसा पडला । किंमत नव्हती महार मांगाला ।
माणुसकीचा हक्क नव्हता त्याला । गुलामगिरीची बेडी होती पायाला
गुलाम बनवून ठेवले सर्वाला । जी जी जी
दलितांशी गांजीले फार ।
सनातन्यांनी जुलूम केला ।
दलितांचे भाग्य थोर । ईश्वरी अवतार । रत्नजडित लालच सापडला ।
अचानक प्रकाश मग पडला । खरोखर सूर्य उदय झाला
पौर्णिमेचा चंद्रच उगवला । जमवूनि दलित चांदण्याला
नवे रूप दाविले नेत्राला । मिळाला हो अमृताचा प्याला
वंदितो त्यांच्या मी चरणाला । बंधूनो जयभीम भीम तुम्ही बोला । जी जी जी[९१]

धर्मरुढीनेच दलितांना बंदिवान करून ठेवले. आंबेडकरांचा उदय म्हणजे नवा सूर्योदयच होता. भीमरूपी सूर्योदयामुळे दलितांच्या जीवनात प्रकाश पडला. आंबेडकर म्हणजे जणू पौणिमेचा चंद्र. दलितांना हे नवे चंद्रदर्शन झाले. आंबेडकरांचा उदय म्हणजे 'इश्वरी अवतार' असे वर्णन करण्यात आले आहे. तोवरच्या काळात आंबेडकरांनी धर्मांतर केले नव्हते किंवा देवाला नाकारण्याची जाणीव प्रगल्भ झाली नव्हती. अनेक शाहिरांच्या रचनामधून अशा स्वरूपाच्या संकल्पनाचा उपयोग करण्यात आला आहे. काळ आणि लोकमानस यांचाही शाहिरांच्या रचनेवर, प्रभाव आहे असे दिसून येते.

✹ शाहीर अमृतबुवा बावस्कर (जन्म -१९२७)

शाहीर अमृत तुकाराम बावस्कर यांचा जन्म खान्देशात रावेर तालुक्यातील रणगाव या गावी १९२७ साली झाला. त्यांना लहानपणापासून गाण्याची आवड होती. '१९३६-३७ साली डॉ. आंबेडकर रावेर तालुक्यातील सावद या गावी आले होते. या प्रसंगी शाहीर अमृत बावस्करानी बाबासाहेबांची भेट घेतली.'[९२] तिथूनच त्यांच्या जीवनाला नवे वळण लागले आणि आंबेडकरी विचार व्यक्त करण्यासाठी त्यांची लेखणी सरसावली.

अरे फुटतील बारा वाटा अमृता तुला एक धैर्य पाहिजे
आणि धैर्याचा खांब भीमबाबा यांचा संदेश पाहिजे

अशी त्यांच्या लेखणीमागील प्रेरणा होती. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामागील तात्विक अधिष्ठानाची मांडणी शाहिराने केली आहे.

विश्व हे घर आणि मूळ माहेर
समता नीती आधार
विषमतेला मारुनी टोला त्याने पाडली दातावर[९३]

समता आणि नीतीच्या आधारे विषमतेचे दात पाडण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. दलितोद्धाराचे त्यांचे कार्य इतिहासाला परिचित आहे.

माझ्या भीमाने केला गं बाई दलितांचा उद्धार
अन् नऊ कोटी दलितजन हाच सोन्याचा संसार [९४]

नऊ कोटी दलितांचा उद्धार करण्यासाठी बाबासाहेबांनी आपल्या संसाराची किंवा घरादाराची पर्वा केली नाही. दलितजन हाच त्यांच्यासाठी संसार होता. अशाप्रकारे बाबासाहेबांच्या त्यागमय जीवनाचे वास्तव येथे अधोरेखित झाले आहे.

✹ अण्णाभाऊ साठे (१९२०-१९६९)

आंबेडकरकालीन सामाजिक राजकीय चळवळीचा विचार करताना कम्युनिष्ट चळवळीतून पुढे आलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरीचा विचार करावा लागेल. त्यांनी शाहिरी रचनेत आशयाच्या दृष्टीने बदल घडवून आणला. गणेशस्तवना ऐवजी मातृभूमी आणि राष्ट्रपुरुषांना वंदन करण्याची रीत घालून दिली.

प्रथम मायभूच्या चरणा छत्रपती शिवबाचरणा
स्मरोनी गातो कवना ।।धृ ।।[९५]

'नमनातील ही क्रांती प्रथम भाऊ फक्कडांच्या शाहिरीतून प्रकट झाली.तीच परंपरा पुढे अण्णाभाऊंनी चालू ठेवली.'[९६] ''शाहिरी वाङ्मयाला कम्युनिष्ट विचाराची जोड देण्यात अण्णाभाऊंनी भरीव कार्य केले. मूलत: त्यांची शाहिरी रचना ही कम्युनिष्ट विचार अभिव्यक्त करण्यासाठी जन्मास आली होती हे जरी खरे असले तरी अण्णाभाऊंच्या जीवनातील संघर्ष, त्यांनी भोगलेली उपासमारी, दिवसभर रक्त ओकूनही श्रमाचा मोबदला मिळविण्यासाठी करावी लागणारी लाचारी, जमीनदारांची मिरासदारी, भांडवलदारी आणि दुसरीकडे वाढत जाणारी बेकारी या सर्व प्रश्नांनी अण्णाभाऊंचे जीवन व्यापून टाकले होते. अण्णाभाऊंनी भोगलेले जीवन आणि कम्युनिष्ट विचार यांच्यात सुसंवाद असल्यामुळे अण्णाभाऊ कम्युनिष्ट पक्षाचे पुरस्कर्ते बनले. त्यांना भोगलेले जीवन अभिव्यक्त करण्यासाठी व्यासपीठ हवे होते. कम्युनिष्ट पक्षाने त्यांना ते व्यासपीठ उपलब्ध करून दिले ही वस्तुस्थिती आहे.''[९७]

स्तालिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, बंगालची हाक या आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटनांवरील त्यांच्या रचना फार गाजल्या. कामगार, शेतकरी, कष्टकरी या वर्गाचे होणारे शोषण, त्यांची सुखदु:खे हा विषय त्यांच्या रचनांच्या केंद्रस्थानी होता. व्यापारी, भांडवलदाराकडून होणारा काळाबाजार म्हणजे गोरगरिबांचे शोषण, भांडवलदार म्हणजे शोषक व्यवस्था या जाणिवेतून अण्णाभाऊ रचना करताना दिसतात.

काळ्या बाजाराचा रोग आला । मागं लागला गोरगरिबाला
सुखाचा घास मिळना झाला । काळ हा अतिबिकट आला...
वरती बसले चोर नफेबाज । करिती ते आज आपुले काज
म्हणती देशात आमुचे राज ।।

सारा माल ठेविती दाबून । विकती चोरुन दामदुपटीनं
नियंत्रण कायदा दिला उडवून । किमती मनसोक्त घेती अडवून
काढिती लोकांनाच बडवून ।।[९८]

नफेखोरीमुळे काळ्या बाजाराचा अतिरेक झाला आहे. या नफेखोरांनी धान्याचा साठा करून ठेवला. त्यामुळे

गोरगरिबांचा संसार विस्कळीत झाला. साठा करून ठेवलेला माल चोरुन लपून दामदुपटीने विकून प्रचंड नफा मिळवायचा ही व्यापारी भांडवलदारांची नफेखोर वृत्ती आहे. कायद्याच्या राज्यात गरिबांना न्याय मिळणे दुरापास्त झाले आहे. भांडवलदारांनी कायद्याला धाब्यावर बसविले आहे. असे वास्तवदर्शी चित्र अण्णाभाऊंनी आपल्या रचनेतून लोकांपुढे ठेवले. अण्णाभाऊंची 'मुंबईची लावणी' म्हणजे वर्गजाणिवेचे प्रत्यंतर घडविणारी रचना. गरीब आणि श्रीमंत, गगनचुंबी इमारती आणि झोपडपट्ट्या, सुखासीन जीवन आणि अन्नान्न दशा असा विरोधाभास त्यांनी स्पष्ट केला आहे

मुंबईत उंचावरी । मलबार हिल इंद्रपुरी
कुबेरांची वस्ती तिथं सुख भोगती ।।
नायगाव,धारावीला । माटुंग्याच्या शेजाराला
बेकाराची पोरं घाणीमध्ये लोळती ।।७।।
फोरास रोड तीन बत्ती गोलपीठा नाक्यावरती
शरीर विकून कितीएक पोट भरती ।।८।।[९९]

एकीकडे भांडवलदार उच्चभ्रूची, धनाढय लोकांची वस्ती ज्याला अण्णाभाऊंनी 'इंद्रपुरी' असे संबोधले आहे. ती कुबेरांची वस्ती आहे. दुसरीकडे बेकार, गरीब, कष्टकऱ्यांची वस्ती आहे. त्यांच्या दैनंदिन जीवनातील मूलभूत गरजांची पूर्तता होऊ शकत नाही. कुबेरांच्या वस्तीतील भांडवलदार आणि झोपडपट्टीतील घाणीत लोळणारी बेकारांची मुले. हा प्रचंड विरोधाभास मुंबई नगरीत पाहावयास मिळतो. एकीकडे सुबत्ता असणारा वर्ग आहे. दुसरीकडे फोरासरोड, गोलपिठयावर देहविक्रय करून पोट भरणारे स्त्रियांचे जग आहे. अशा दाहक वास्तवाचे भीषण चित्र अण्णाभाऊंनी लोकांपुढे सादर केले आहे. 'माझी मैना गावावर राहिली'[१००] ही अण्णाभाऊंची रचना त्याकाळात महाराष्ट्रात फार लोकप्रिय झाली होती. पोटाची खळगी भरण्यासाठी गाव सोडून मुंबईचा रस्ता धरणाऱ्या, पत्नीपासून विलग व्हावे लागणाऱ्या, त्यामुळे भावजीवन कसे विस्कळीत झाले अशा व्यक्तिमत्वाची मनोव्यथा अण्णाभाऊंनी प्रकट केली आहे.

''माझी मैना गावावर राहिली
माझ्या जिवाची होतीया काहिली
ओतीव बांधा । रंग गव्हाळा । कोर चंद्राची
उदात्त गुणाची । मोठया मनाची । सीता ती माझी रामाची ।।''

मैनेच्या रंगरूपाचे याप्रकारे दर्शन घडविले आहे. गरीबीमुळे भोगाव्या लागणाऱ्या वनवासाची कथाच अण्णाभाऊंना सांगावयाची आहे. गरीबीच या वनवासाला कारणीभूत ठरली आहे.

अशाप्रकारे ताटातुट होताना जिच्या 'मनाची कळी कोमेजून गेली' अशी ही मैना. तिला अनेक प्रकारे समजूत घालून, वचने देऊन पोटासाठी उन्हातान्हाची पर्वा न करता मुंबई गाठली असा हा शाहीर. गरीबी आणि भूक जिव्हाळ्याच्या माणसामध्ये कशी ताटातूट घडवून आणते हे स्पष्ट करताना 'काहिली झालेले मन'च अण्णाभाऊनी लोकांपुढे उघडे केले आहे. मैना गावाकडे राहिल्यामुळे तिची भेट होऊ शकत नाही. खंडित महाराष्ट्रामुळेही मनाची कशी तगमग होते आहे याचे वर्णन अण्णाभाऊ करतात-

त्याच दरम्यान उठली चळवळ संयुक्त महाराष्ट्राची
बेळगाव, कारवार, निपाणी, गोव्यासह एक राज्याची ।
महाराष्ट्राने गुढी उभारली विजयाची
दाखविली रीत पाठ भिंतीला लावून लढायची
परी तगमग थांबली नाही माझ्या अंतरीची
गावाकडे मैना माझी भेट नाही तिची
तीच गत झाली आहे या खंडित महाराष्ट्राची
बेळगाव, कारवार, डांग, उंबरगावावर मालकी दुजांची ।।

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी झाली. त्यासाठी अनेकांना शहीद व्हावे लागले. मुंबईसह महाराष्ट्र झाला मात्र कर्नाटक, गुजरातमधील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट होऊ शकला नाही. म्हणून मैना दुरावल्यामुळे मनाला होणारी वेदना आणि मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रापासून दुरावल्यामुळे मनाला होणारी वेदना समान आहे. व्यक्तिगत दु:खाबरोबरच सामाजिक दु:खाशी समरस होणारी अण्णाभाऊंची जाणीव याठिकाणी प्रत्ययाला येते. अण्णाभाऊनी आपल्या शाहिरीतून दलित, पीडित, शोषित, कामगार, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, या साऱ्यांच्या जीवनातील व्यथा वेदनांना शब्दांकित केले. रुढी, परंपरा, दैववाद, अज्ञान याविरुद्ध आधुनिक विचारांची बंडखोर भूमिका मांडली. सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाची भूमिका मांडून आर्थिक लढयाचे सूत्र मांडले.अण्णाभाऊंनी मार्क्सवादी विचारप्रणालीचा स्वीकार केलेला असला तरी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आणि कार्यकर्तृत्वाचा मोठा परिणाम त्यांचेवर झाला होता. म्हणून 'फकिरा' ही त्यांची गाजलेली कादंबरी त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली आहे. एवढेच नव्हे, तर आंबेडकरी विचार कर्तृत्वाचा गौरव करणारी रचना त्यांनी सादर केली. त्यातून सामाजिक क्रांतीचे महत्त्व स्पष्ट होते.

''जग बदल घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला का ऐरावत
अंग झाडूनी निघे बाहेरी । घे बिनीवरती घाव ।।

धनवंतांनी अखंड पिळले । धर्मांधानी तसेच छळले
मगराने जणू माणिक गिळले । चोर जाहले साव ।।

ठरवून आम्हा हीन कलंकित । जन्मोजन्मी करुनी अंकीत
जिणे लादूनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव ।।

एकजुटीच्या या रथावरती । आरुढ होऊनी चलबा पुढती
नव महाराष्ट्र निर्मून जगती । करी प्रकट निज नाव ''[१०१]

बाबासाहेबांचा संघर्षाचा मंत्रच अण्णाभाऊंनी लोकांना सांगितला. गुलामगिरीतून समाजाला बाहेर पडण्याचा मार्ग बाबासाहेबांनी दलितांना दाखविला. दलितांच्या वाटयाला ही गुलामगिरी का आली याची कारणमीमांसा केली. धनवंतांकडून होणारी पिळवणूक, धर्मांधाकडून होणारी छळवणूक, धर्माच्या नावावर दलितांना हीन ठरवणारी, माणसाला पशूपातळीवर पोचवणारी प्रवृत्ती, माणसामाणसात अधिकारभेद करणारी व्यवस्था. या सर्वांच्या विरोधात उठाव करायचा असेल तर एकजुटीशिवाय पर्याय नाही. एकजुटीने संघर्षरत झाले पाहिजे तरच आपणास नवजीवन प्राप्त होईल. असा बंडखोरीचा विचार बाबासाहेबांनी समाजाला दिला. हाच विचार अण्णाभाऊनी आपल्या रचनेद्वारे समाजमनापुढे ठेवला.

थोडक्यात, अण्णाभाऊ साठे हे आंबेडकरकालीन सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक चळवळीतील मोठे आणि महत्त्वाचे व्यक्तिमत्व आहे. दलित शोषित पीडित समाजाला आपल्या दाहक वास्तवाचे भान आणून देतानाच आपल्या वाटयाला आलेल्या गुलामी आणि लाचार परिस्थितीला कारणीभूत ठरलेल्या शोषक व्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी करण्याचा संदेश त्यांच्या शाहिरी रचनेने समाजाला दिला आहे.

जलशातील काव्य आणि शाहीर या संदर्भात असे म्हणता येईल की, जलशाच्या परंपरेत अनेक जलसाकार,शाहिरांचे योगदान लाभले आहे. साधारणत: १९२०-१९५६ या आंबेडकरी चळवळीच्या कालखंडातील या सर्व शाहिरांनी आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यास मोठा हातभार लावला. कारण त्या काळात आंबेडकरांनी सुरू केलेल्या वृत्तपत्र, पाक्षिकांचा अपवाद सोडल्यास चळवळीच्या विचार, प्रचार आणि प्रसाराची कोणतीही साधने नव्हती. या दृष्टीने जलशाचे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व, विचार, तत्त्वज्ञान आणि कर्तृत्व यातूनच जलसाकारांना प्रेरणा मिळाली.

आंबेडकरी चळवळीच्या सुवर्णकाळाचे चित्र जलशातील सादर झालेल्या रचनांमधून अधोरेखित झाले आहे. आंबेडकरी विचारांचा अनुवाद या जलशांनी केला आहे. या जलशातील आशय हा पद्यात्मक असून हा आशय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयापासून त्यांच्या महापरिनिर्वाणापर्यंतच्या समकालीन घटनाप्रसंगाचा, आणि चळवळीचा आलेख चित्रित करणारा आहे.

भीमराव करडक हे आंबेडकरी जलशांचे आद्य प्रवर्तक होत. आपल्या रचनेतून त्यांनी समाजप्रबोधनासाठी बाबासाहेबांची महती विशद केली. हिंदू धर्मातील दांभिकता, सनातनी वृत्ती, सांस्कृतिक क्षेत्रातील अंतर्विरोध इ. अनेक गोष्टींचे दर्शन घडविले. 'जातिभेद, अस्पृश्यता, महारवतन, सावकारी, शिक्षण अशा अनेक विषयांना स्पर्श करून दलितांमध्ये स्वत्व आणि स्वाभिमान जागा करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य भीमराव कर्डक यांनी त्यांच्या जलशातील सादरीकरणातून पार पाडले आहे. दलितांमध्ये चेतनाजागृती केली.आपल्या कवित्वाच्या माध्यमातून सामाजिक सांस्कृतिक वास्तवाचे भान जागविण्याचे कार्य यशस्वीरित्या, प्रामाणिकपणे पार पाडले. आणि पुढील अनेक शाहिरांना चालना दिली

भीमराव करडक आणि त्यांचे समकालीन इतर सर्व शाहिरांनी जलशांच्या माध्यमातून दलितांचे प्रबोधन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करतानाच त्यांचा विचार स्पष्ट करून समाजापर्यंत परिवर्तनाचा, परिवर्तनासाठी संघर्षाचा विचार पोचवला.

काही शाहिरांनी पाळणा, पोवाडा, फटका, स्त्रीगीते अशाही रचना केल्या. या रचनातून प्रामुख्याने हिंदू धर्मातील जातियवाद, जुन्या रुढी, चालीरिती, अंधश्रद्धा, दलितांची गुलामगिरी, लाचारी या बाबींवर कडाडून हल्ला चढविला आहे. दास्यमुक्तीचा खरा मार्ग म्हणजे आंबेडकरी विचार हे ठणकावून सांगितले आहे.

आंबेडकरी चळवळीतील सत्याग्रह, महाडचा संगर, मनुस्मृतीदहन, शेडयुल्ड कास्ट फेडरेशन, मजूर पक्ष, धम्मस्वीकार असे अनेक विषय आपल्या काव्यरचनेतून हाताळले. बाबासाहेबांच्या अष्टपैलुत्वाचे दर्शन घडविले. शिक्षणाचे महत्त्व मनीमानसी रुजवितानाच स्वाभिमानी बाण्याने जगण्याचा संदेश दिला. डॉ.आंबेडकरांचे कर्तृत्व आणि व्यक्तित्व अतिशय साध्यासोप्या भाषेत मात्र प्रभावीपणे रेखाटण्यात शाहिरांची लेखणी यशस्वी ठरली आहे.

बाबासाहेब आंबेडकरांचे विरोधक, तत्कालीन इतर राजकीय प्रवाह आणि प्रवृत्तींचे रागरंग यांचा निर्देश शाहिरांच्या रचनेतून स्पष्ट झाला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय स्थितीगतीचे निरीक्षण लोकभाषेतून प्रभावीपणे नोंदविले आहे. गांधी-आंबेडकर संघर्षाचे रूप विविध घटनाप्रसंगाच्या अनुषंगाने चित्रित झाले आहे. प्रामुख्याने गांधीची काँग्रेस, हरिजनसेवक संघ, स्वतंत्र दलित मतदार संघास गांधीचा असलेला विरोध, गांधीचा कपटीपणा, पुणे करार इ. अनेक प्रसंगाच्या निमित्ताने संघर्षाची रूपे सिद्ध झाली आहेत.

शाहिरांच्या या सर्व रचनेतून विविध भाषिक रूपांचा आविष्कार झाला आहे. हिंदू देवदेवतांना नकार देताना या देवदेवतांना आग लावण्याची भाषा प्रकटली आहे. गुलामीचा धिक्कार आणि स्वाभिमानी ताठ बाण्याचा स्वीकार हे सूत्र सर्वत्रच आढळून येते. ज्ञान शास्त्राचा उपयोग शस्त्रासारखा करण्याचा संदेश देणारी भाषा, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाची तात्त्विक भाषा, दलितांनी सैन्यात भरती व्हावे यासाठी आवाहन करणारी भाषा, महारकी सोडण्याचे आवाहन करणारी भाषा, जातीयतेला मूठमाती देण्याचे आवाहन करणारी भाषा,स्वकीयांवर हल्लाबोल करणारी आत्मटीकेची भाषा, लोकोन्नतीचा विचार मांडणारी उपदेशपर भाषा, दलितांना स्वाभिमान शिकवणारी आणि दलितांच्या भावभावनांना बोलके करणारी भाषा. अशी विविध भाषिक रूपे प्रत्ययाला येतात. एकजुटीच्या तत्त्वज्ञानाची, समाजहिताची भाषा आणि परंपरागत मानसिकता बदलण्यासाठीची कडवट भाषा. अशीही रूपे पाहावयास मिळतात.

शाहिरांच्या रचनेतून वर्गसंघर्षाची जाणीवही व्यक्त झाली आहे.दलितांना आपल्या जगण्याच्या दाहक वास्तवाचे भान आणून देतानाच, प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधातील विद्रोही भाषेतून बंडखोरीचा संदेश देण्यात जलशातील काव्यरचना यशस्वी ठरली आहे.

काळ आणि लोकमानस याचाही प्रभाव या शाहिरी रचनेवर आहे. 'इश्वरी अवतार' यासारख्या संकल्पनांचा आधार घेऊन आंबेडकरांचे वर्णन करण्यात आल्याचे दिसून येते. आंबेडकरी विचार तत्त्वज्ञानाच्या चौकटीत न बसणारी ही बाब आहे.

आंबेडकरी चळवळ: आंबेडकरी गीते (१९४५-१९७०)

आंबेडकरी जलसे मंदावल्यानंतर आंबेडकरी शाहिरांनी वेगवेगळ्या पद्धतीने चळवळीसाठी गाणी लिहून लोकांसमोर सादर केली. शहरात, गावात, सभा, मिटिंगा अशा ठिकाणी ही गाणी सादर होऊ लागली. वामन कर्डकांच्या मते- '१९५६ साली धर्मांतर झाले. आम्ही बौद्ध झालो, नवा विचार,नवा आदर्श घेऊन सन्मानाने, ताठ मानेने जगू लागलो. नवशिक्षितांची एक पिढी तयार झालेली, या दरम्यानच जलसा मंडळे अस्त होऊ लागली. कव्वालांची, गायनपाट्यांची नवी पिढी उदयास आली'.[१०२] वामनदादांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे. ''जलस्यानंतरची दुसरी पिढी बैठ्या गायन पाट्यांची. राजानंद गडपायले, श्रीधर ओहळ, सदानंद वांद्रे, धरमदास मोहिते, नागपूरचे नागोराव, दीनबंधू, दलितानंद, लक्ष्मण केदार, आणि वामन कर्डक हे बैठ्या गायनातील पहिल्या पिढीचे कवी''[१०३] या सर्व कलावंतांचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे हे कलावंत केवळ गाणी लिहून थांबले नाहीत तर त्यांनी ती गाऊन सादर केली. दीनबंधू आणि श्रीधर ओहळ सोडून बाकी सारे गायक होते.अर्थातच या पिढीच्या केंद्रस्थानी वामन कर्डक आहेत.

आंबेडकरी विचाराने प्राप्त झालेला दृष्टिकोन मांडण्याचा जोरदार प्रयत्न या गीतकाव्यामागे आहे. विचार, प्रचार आणि प्रसारासाठी काव्यनिर्मिती ही विसाव्या शतकातील महत्त्वपूर्ण घटना आहे. गायन पाट्या आणि भजनी मंडळ्यांचे कार्य ह्या काळाचा विचार केल्यास फारच महत्त्वपूर्ण ठरते. सर्व कलावंतानी आपल्या काव्यातून रुढी परंपरांचे थोतांड झिडकारुन, तथागत बुद्धाचा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आणि आंबेडकरी मुक्तीसंग्रामाचे रूप जनतेपर्यंत पोहचविले. आंबेडकरी विचारकृती लोकमनात रुजविण्याचे कार्य या गीतकाव्यानी केले म्हणून या काव्यप्रकाराला 'आंबेडकरी विचार' गीत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

वामन कर्डकांच्या काळात अनेक लोक लिहिते झाले. आणि गीतकाव्यातून आंबेडकरी चळवळीला मोठे बळ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न झाला. वामनदादांनी उल्लेख केलेल्या कलावंत कवी व्यतिरीक्त अनेकांची नावे सांगता येतील. या कलावंतांची मोठी मांदियाळी आहे. किसन खरात, हरेंद्र जाधव, शंकर कांबळे, भीमदास हिंदळेकर, विठ्ठल उमप, उत्तम मुळे, नवनीत खरे, भिकाजी भंडारे, भगवंत चोपडे, साहेबराव कोकाटे, राजस जाधव, प्रतापसिंग बोधडे, विष्णू डांगे, प्रभाकर पोखरीकर, राम मोरे, रंगराज लांजेवार, प्रकाश पाटणकर, विष्णू शिंदे इत्यादी असंख्य कवी कलावंतांनी आंबेडकरी गीते, भीमगीते, बुद्धगीते या माध्यमातून प्रबोधनाचे महान कार्य केले. आंबेडकरी विचार घराघरात, झोपडयाझोपडयांतील कानामनात पोहचविला. या कलावंतानी निर्माण केलेले 'गीतकाव्य' हा आंबेडकरी चळवळीतील महत्त्वाचा टप्पा आहे. चळवळीचा भाग म्हणून हे काव्य निर्माण झाले आहे हे लक्षात घेणे आवश्यक ठरते. आंबेडकरी विचार आणि चळवळ पुढे नेण्याच्या प्रेरणेतून या गीतकाव्याचा जन्म झाला आहे. म्हणून ते आंबेडकरी चळवळीतील 'ऐतिहासिक पर्व' ठरले आहे.

✹ वामनदादा कर्डक (१५ ऑगस्ट १९२२ - १५ मे २००४)

वामनदादांचे पूर्ण नाव वामन तबाजी कर्डक. जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी झाला. नाशिक जिल्हयातील, सिन्नर तालुक्यातील देशवंडी हे त्यांचे मूळ गाव. घरच्या अत्यंत गरीब अशा परिस्थितीमुळे शिक्षण झाले नाही. मात्र जेमतेम अक्षरओळख झाली. उदरनिर्वाहासाठी बालपणीच आई-वडीलांसोबत मुंबई गाठली. पडेल ती कामे केली. कोळशाच्या वखारीत, गिरणी कामगार म्हणून, चिक्की, आईसफ्रूट विकण्याचेही काम केले. भीषण दारिद्रय अनुभवले. ऐन तारुण्यात त्यांचा आंबेडकरी चळवळीशी संबंध आला. मुंबईतील शिवडी भागात वास्तव्याला असताना ते समता सैनिक दलात

सामील झाले.देहलवी नावाच्या मास्तरकडून बाराखडी, मुळाक्षरे शिकली. आणि दुकानाच्या पाटया, बोर्ड वाचून जोडाक्षरे शिकली.वामनदादांवर गीतलेखनाचे किंवा गायनाचे संस्कार कुणीही केले नाही. १९४३ पासून त्यांच्या काव्यरचनेला सुरुवात झाली. त्यांनीच म्हटले आहे ''आमची प्रेरणा परमपुज्य बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या प्रेरणेनेच चेतनाहीन समाजात जागृतीची प्रचंड लाट उसळलेली. तिच्यात मीही आलोच. महाड, नाशिकचे संग्राम यशस्वी झालेले. १९४३ साल उजाडलेले. त्यावेळी मी वयात न आलेला गिरणी मजूर. मराठी नीट समजत नव्हती. तरी माझ्या गीतलेखनास सुरुवात झाली.''[१०४] बाबासाहेबांच्या प्रेरणेतून वामन कर्डकांनी आयुष्याच्या अंतापर्यंत आंबेडकरी चळवळीचा भाग म्हणून लेखन गायन केले. त्यांनी जवळपास पाच हजारावर गीते लिहीली आहेत. हिंदी भाषेतूनही गीतरचना केली आहे.'वाटचाल' (संपादक-वामन निंबाळकर), 'मोहळ', 'हे गीत वामनाचे' (संपादक -कॉ.भास्कर जाधव) 'महानायक वामन कर्डक' 'महान लोककवी वामनदादा कर्डक', 'संग्राम पिटक' ('वामनदादा कर्डक', यांची गझल भाग १.) संपादक प्रमोद वाळके. महाकवी वामनदादा कर्डक : खंड १ ते ४, या चारही खंडाचे संपादक : माधवराव गायकवाड, प्रा.डॉ. सागर जाधव इ. वामनदादांचे काव्यग्रंथ प्रसिद्ध असून 'माझ्या जीवनाचे गाणे' हे त्यांचे आत्मकथनही प्रसिद्ध आहे.

बुद्ध-आंबेडकरांच्या विचारांच्या ठाशीवपणाने, भरीवपणाने जडावलेली कविता म्हणून त्यांची कविता महत्त्वाची आहेच, परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र आणि चारित्र्य नितळपणे शब्दांच्या माध्यमातून काव्यबद्ध करण्याची एक नवी रीत वामनदादांनी घालून दिली.त्यांच्या कवितेचा प्रारंभच मूळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मदिन सोहळ्याने होतो.मराठी मातीला प्रणाम करून आणि महार जातीला मान देऊन भीमजन्माची कथा वामनदादांनी सांगितली आहे. बाबासाहेबांचा जन्म ही महनीय घटना आहे. या घटनेमुळे वेली फुलांनाही हर्ष झाला अशी भावना व्यक्त केली आहे.

चकित जाहले वरती अंबर । नजर तयाची खिळली भूवर
म्हणे कुणाचे आज स्वयंवर पडला मंडप अवघा भूवर
नभांगणाहून नटले भू-वन । पुनवेचेही गेले मीपण
चंद्र लाजला,लपू लागला,असा सोहळा भूमिवरी आजला[१०५]

जन्मसोहळ्याचे वर्णन करताना एखाद्या स्वयंवराचा देदिप्यमान सोहळा असावा अशी भव्यदिव्यता कवीने रेखाटली आहे. बाबासाहेबासारखा युगप्रवर्तक महापुरुष जन्माला आल्यामुळे झालेल्या उलथापालथीचे अतिशय भावगर्भ चित्र वामनदादांच्या लेखणीने चितारले आहे. आंबेडकरांच्या महतीबरोबरच त्यांचे विषयीची भावनाही कवितेत प्रकट झाली आहे. शिक्षण आणि ज्ञानाचे सामर्थ्य किती बलदंड असू शकते याचे भान सर्वसामान्यांना आणून देण्याचे कार्य आंबेडकरांनी केले. हजारो वर्षापासून गुलामीत जखडलेल्या समूहाला मुक्तीचा बंडखोर विचार दिला.

जखडबंद पायातील साखळदंड । तटातट तुटले तू ठोकताच दंड
झाले गुलाम मोकळे भीमा तुझ्या जन्मामुळे
कुजे वृक्ष तैसाच होता समाज । हिरवी हिरवी पाने अन् तयालाच आज
अमृताची आली फळे भीमा तुझ्या जन्मामुळे
काल कवडीमोल जिणे वामनचे होते । आज जुळे जगताशी प्रेमाचे नाते
बुद्धाकडे जनता वळे, भीमा तुझ्या जन्मामुळे[१०६]

कवडीमोलाचे जगणे ज्यांच्या वाटयाला आले अशा सर्वसामान्यांचा प्रतिनिधी म्हणूनच वामनदादा अभिव्यक्त होतात. नव्या अर्थपूर्ण जगण्याच्या प्राप्तीमुळेच जगाशीही नाते जुळू शकले. हा प्रेमाचा,जगाशी असलेल्या नात्याचा ओघ अंतिमत: बुद्धाकडेच वळणारा आहे.हा मार्ग आणि सामर्थ्य भीमरावामुळेच लाभले आहे. हा कर्तृत्व आणि स्फुर्तिप्रद आशय पेरीत जाणे हे वामनदादांच्या काव्याचे मोठे सौंदर्यस्थळ आहे. वामनदादानी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेकविध पैलूंचे दर्शन घडविले आहे. विविध रूपातील आंबेडकर व्यक्तिमत्वाचे पैलू साकार झाले आहेत. लेकराची माता,काळाशी झुंज देणारा यौद्धा, ज्ञानदाता, दीनदुबळ्या समाजाच्या अंत:करणावर उमटलेला अमिट ठसा अशी अनेकविध रूपे सिद्ध

झाली आहेत. निखळ काव्यात्म प्रतिमांचे संघटन झाल्यामुळे कवितेला एक वेगळी उंची प्राप्त झाली आहे.

अंत:करणाच्या पाटीवर दीनदुबळ्या समाजाच्या
युगे युगे जो राहील तो भीम माझा ठसा होता
काय सांगू तुला वामन भीम माझा कसा होता
सात ठिगळाच्या बंडीचा भीम माझा खिसा होता[१०७]

कर्डकांच्या समग्र कवितेत बाबासाहेब आंबेडकरांचे रूप. व्यक्तिमत्व आणि सामर्थ्याच्या प्रतिमांचे विश्व भारणारे आणि भारुन टाकणारे आहे. आंबेडकरांचे व्यक्तिमत्व जेवढे थोर आहे तेवढेच ममताळूही आहे. शोषित पीडितांचे त्यांनी पितृत्व स्वीकारले आहे. अशा व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवून नवा माणूस घडविण्यासाठी, नवा मार्ग दाखविण्यासाठी बाबासाहेबांसारख्या मार्गदात्याची नितांत आवश्यकता असल्याचे या कवितेने प्रतिपादन केले आहे. या कवितेतील मातेच्या रूपातील आंबेडकरी रूप अधिकच भावणारे आहे.

तुझीच कमाई आहे गं भीमाई । कुणाचेच काही इथे कष्ट नाही
लाभले न जेथे प्यावयास पाणी । ज्ञानाची धारा अशी माळरानी
तुझ्याच प्रतापे आणलीस आई । कुणाचेच काही इथे कष्ट नाही.[१०८]

कुटुंबासाठी खस्ता खात जगणाऱ्या आईसारखेच अवघे आयुष्य लोककल्याणासाठी वेचणाऱ्या आंबेडकरांचे रूप येथे प्रत्ययाला येते. आंबेडकरी विचारवाणीचं आणि सामर्थ्य कृतीचे काव्यशिल्प म्हणजे वामन कर्डकांची कविता असे म्हणता येईल कारण भीमवाणी कानावर पडताच त्यांना कविता स्फुरली आहे. ''भीमवाणी पडली माझ्या कानी, तीच वाणी ठरली माझी गाणी.'' अशी कवित्वाची प्रेरणा कवीला मिळाली आहे.त्यांच्या कवितेने नव्या कहाणीचे रूप धारण केले आहे-

मी नवी कहाणी होऊन वाणी गाते भीमाची गाणी..
मी काय म्हणावे ताडांना गगना भिडणाऱ्या माडांना
नादान बिचारे मूढपणे हसती ह्या खुरटया झाडांना
काय कल्पना असे उद्याची आज अशा मुर्दाडांना
जा सांग जा वामन । यांचे सर्पण करील या मैदानी । मी नवी कहाणी... [१०९]

मुर्दाड मनाचे सर्पण करण्यासाठी सज्ज झालेली ही नवी कहाणी आहे. अशाप्रकारे भीमाची गाणी गाणारी ही कहाणी कवितेच्या रूपात सांगितली आहे. आंबेडकरी विचार म्हणजे माणसांची 'मने पेटवणारी गाणीच' होती. आंबेडकरांच्या हाकेला प्रतिसाद देणारी, प्राणाची बाजी लावणारी पिढी आंबेडकरी आंदोलनाने निर्माण केली होती. सामाजिक सांस्कृतिक क्रांतीच्या लढयात या पिढीने आपले सर्वस्व पणाला लावले.याची जाणीव आजच्या पिढीला करून देण्याचे कार्य कर्डकांची कविता करते.

आठवते का सांगा भीमरायाची ललकारी
घुमून उठल्या होत्या देशाच्या दरी कपारी
दूर फेकली होती ही जनता कोटी कोटी
मिळू दिली ना कोणी कष्टाची चटणी रोटी
तरी उपासी पोटी संदेश भीमाचा ओठी
खवळून उठली होती नऊ कोटीची लाचारी
विळे कुऱ्हाडी भाले, ना तलवारीचे पाते
तरी जोडले होते रणमैदानाशी नाते
तुफान उठवित होते,ते क्रांतीचे उद्‌गाते ।
करी कुणाच्या नसता रणवीरा परी तलवारी[११०]

आंबेडकरी चळवळीच्या, संघर्षाच्या धगधगत्या इतिहासाची आठवण करून देऊन वर्तमान पिढीने संघर्षरत होण्याचे आवाहन ही कविता करते. समकालीन जीवनात संघर्षाची धग कायम ठेवण्यासाठी देदिप्यमान संघर्षाचा इतिहास वर्तमान समूहजीवनासमोर ठेवणे कवीला महत्त्वाचे वाटते. कारण इतिहासाकडे जे पाठ फिरवतात ते भवितव्य घडवू शकत नाहीत याची जाणीव कवीला आहे. म्हणून हा इतिहास पुन:पुन्हा अधोरेखित केला जातो. आंबेडकरी त्यागाची जाणीव ठेवण्यासाठी, हक्काबाबत जागरूक राहण्यासाठी वर्तमानाच्या कानात क्रांत्योद्‌गार गुंजत ठेवण्यासाठी वामनदादाची कविता तत्पर झालेली दिसते. वामन कर्डकांच्या कवितेची भूमिका धम्मविचारांशी समांतर आहे. धम्मस्वीकाराच्या घटनेमुळेच आंबेडकरी चळवळीने उच्चांक गाठला होता. म्हणून ही ऐतिहासिक, सांस्कृतिक घटना अनेक कवींच्या कवितेचा विषय झाली.वामनदादाची कविता त्याला अपवाद नाही.

झाकली कधी न जयाने लाज । फेकिले वस्त्र आम्ही ते आज
चौदा आक्टोबर सन छप्पन, करुनी धम्मचक्र प्रवर्तन
सत्‌धम्माची दीक्षा देऊन, भीमरायाने आम्हा चढविला पंचशीलेचा साज ।
झडली नौबत पराक्रमाची, तोडून चौकट वर्णाश्रमाची
झाली प्रतिज्ञा पुरी भीमाची
अस्पृश्यतेच्या गर्तेमधुनी सुटला दीन समाज ।।[१११]

या रचनेतील प्रतिमासृष्टी सांस्कृतिक व्यूहाशी संबंधित आहे. वस्त्र ही प्रतिमा सामाजिक आणि सांस्कृतिक अंगाने एक नवा अर्थ सूचित करते. तो अर्थ धर्माशी संबंधित आहे. हिंदू धर्म, या धर्माने केलेले कायदे, प्रमाण मानलेले ग्रंथ, जाचक निर्बंध या सर्व गोष्टी माणसाची प्रतिष्ठा आणि प्रगतीच्या आड येणाऱ्या होत्या.मोठया गतिरोधक होत्या, माणसाला माणूस म्हणून जगू न देणाऱ्या होत्या. म्हणून नकारासाठी 'वस्त्र' ह्या प्रतिमेचे उपयोजन करण्यात आले आहे. दलित कवितेत केवळ नकार नाही तर स्वीकारही आहे. तो स्वीकार मानवी मूल्यांच्या संदर्भात आहे. 'पंचशीलेचा साज' ही स्वीकारासाठी योजलेली प्रतिमा आहे. 'वस्त्र' आणि 'साज' ह्या प्रतिमातून नकार आणि स्वीकाराच्या जाणिवा स्पष्ट होतात. संस्कृतीसंगराचे अत्युच्य रूप धम्मस्वीकाराच्या कृतीने स्पष्ट झाले आहे.

मंगलमय दिन विजयादशमी। सुवर्ण संधी आली नामी
नागपुरी नागांच्या धामी । युद्ध संपले विजयी झाले
धम्मपुरुष भीमराज ।।

इतिहासात बुद्धानंतर अडीच हजार वर्षांनी धम्मचक्रप्रवर्तनाचा यशस्वी प्रयत्न डॉ.बाबासाहेबांनी विसाव्या शतकात केला.म्हणून 'धम्मपुरुष' ही प्रतिमा व्यापक अर्थाने सिद्ध झाली आहे.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी महास्थवीर चंद्रमनी यांनी बाबासाहेबांना दीक्षा दिली.त्यानंतर बाबासाहेबांनी लाखो लोकांना एकाच वेळी दीक्षा दिली. आणि पूर्वाश्रमीचा अस्पृश्य बुद्ध झाला! तो 'माणसात' आला. ही मोठीच क्रांतीकारक घटना आहे. 'नागांच्या धामा'लाही एक सांस्कृतिक आणि वांशिक अर्थ आहे.नागवंशीय लोक बुद्धधर्मीय होते.या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भाचा अन्वय वामनदादाची कविता सहजपणे लावताना दिसते. हा तिचा खास विशेष आहे. वामनदादा हे अस्सल कवी आणि गायक कलावंत होते. त्यामुळे संगीतातील अनेक साधने काव्यात्म प्रतिमा बनून साकार होतात.उदा. 'त्रिसरणाची वीणा वाजे पंचशीलाचे टाळ'. या प्रतिमा बुद्ध तत्त्वातील विविध संकल्पनांशी जोडून साकार होतात. आणि अर्थाच्या नवनव्या छटा प्रकट करतात. 'समतेची शाल निळी'[११२] ही कविता फार लक्षणीय ठरली आहे.

हिंदू धर्माची फेकून द्या कांबळी । घ्या बुद्धाची समतेची शाल निळी
द्वेष धाग्यानी विणलेली जीर्ण जुनी । ठिगळाची अशी वापरावी कुणी
रंग मानवतेचा जिला ना मुळी । हिंदू धर्माची..

बुद्ध धम्माचा उद्‌घोष करायचा असेल तर हिंदू धर्माला कायमची सोडचिठ्ठी दिली पाहिजे असा बेधडक संदेश ही कविता देते. स्वकीयांच्या मनात स्फुलिंग पेरत जाते.'कांबळी' आणि 'शाल' या प्रतिमाच्या उपयोजनातून धर्मांधता आणि

मानवता या दोन परस्परविरोधी विरोधकाचे वास्तव श्रोत्यांपुढे ठेवले आहे. हिंदू धर्मात भावंडभाव हे तत्त्व नाही. उच्चनीच भेदभावाने ते खच्चून भरले आहे. तिथे मानवतेला थारा नाही. म्हणून बुद्ध हे असे ठिकाण आहे जिथे माणसाला माणूस म्हणून स्वीकारले जाते. हा डॉ.आंबेडकरांचा संदेश ध्यानात घेण्याचे आवाहन वामनदादाची कविता करते.

भीम संदेश ध्यानीच ना ये कसा
हिंदू धर्मात राहून वामन असा
नको तुडविला जाऊस पायतळी

स्वतंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय ही मूल्ये बुद्ध तत्त्वज्ञानातून प्राप्त झाल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नमूद करून ठेवले आहे. वामनदादांनी हाच विचार अतिशय आत्मविश्वासाने लोकांच्या मनावर बिंबवला आहे. बुद्धाचा सर्वसमावेशक बहुजनवाद लोकांना गाण्याच्या माध्यमातून समजावून सांगितला आहे. वामनदादांच्या कवितेने समकालीन सामाजिक, राजकीय निष्क्रियतेवर भाष्य केले आहे. या कवितेने माणसाच्या निष्क्रियतेला ललकारत, त्याच्या मर्दानगीलाच आव्हान दिले आहे. उदा.

अन्यायाची चिरा चांबडी, चिरा करा चिंधडया
चिरा करा चिंधडया नाहीतर भरा हाती बांगडया

धारदार शब्दांचा ताठपणा या कवितेला लाभला आहे.त्यातूनच 'आम्ही तुफानातले दिवे'[११३] यासारखी श्रेष्ठतम कविता साकार झाली आहे.

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊस धारा मुळी न आम्हा शिवे ।
हल्ल्यावरती होती हल्ले अभंग अमुचे बालेकिल्ले
असाच ताठर माथा आमुचा जरा न खाली लवे..
तथागताच्या चिरंतनातून मानवतेच्या कणाकणातून
भीमयुगाच्या निरांजनातून तेल मिळाले नवे
एक दिव्याने पेटवलेले, चरितेसाठी पाठविलेले
काळ्या रानी अखंड येथे फिरती अमुचे थवे ।।

लढाऊ समूहाचे चित्र ही कविता उभे करते. हा लढाऊ बाणा एका थोर आणि वैभवशाली तत्त्वज्ञानाच्या परंपरेने दिलेली देणगी आहे. बुद्धाच्या चिरंतन ठरलेल्या मानवतावादी तत्त्वाने ही शक्ती दिली असून, आंबेडकरी विचारयुगाने जगण्याचे इंधन पुरविले आहे.दिव्य तत्त्वाने आणि भव्य विचाराने पेटलेले हे दिवे चरितेसाठी परिभ्रमण करणारे आहेत.बहुजनांच्या हितासुखासाठी 'चरत भिक्कवे चरिकं' हा मार्गक्रमणाचा विचार, बुद्धाचा संदेश आहे. उदात हेतूच्या पूर्ततेसाठी ही चरिता आहे. येथे उच्च प्रतिचा ध्येयवाद आणि सुखी जीवनाचे स्वप्न उराशी बाळगले आहे.'जळू परंतु धरती उजळू प्रकाश येथे असाच उधळू' अशी येथे प्रतिज्ञा आहे. थोडक्यात, समता, बंधुता आणि मानवतावादाचे शिल्प या कवितेने उभे केले आहे. समूहमनाचे सामर्थ्य स्पष्ट करण्याचे, समूहमन चेतविण्याचे कार्य ही कविता पार पाडते. एका अर्थी विचारलढयाचे तत्त्व मानवी मनात ऊफाळते ठेवण्याचे कार्य या कवितेने साधले आहे. वामनदादांच्या एकूणच काव्यविश्वातील ही एक श्रेष्ठतम आणि स्फूर्तिप्रद कविता ठरली आहे. वामनदादांची कविता आत्मटीकेतून वास्तवाला सामोरी जाते. वर्तमानाच्या फलकावर सर्वस्वाला हरताळ फासणाऱ्या मुर्दाड मनाला पेटविण्याचे, नवी जाग आणण्याचे कार्य पार पाडते. उदा.

मला चिड येत नाही हाच माझा गुन्हा
दोष देऊ कुणा सांगा दोष देऊ कुणा..
भीम माझ्यामधी होता, मान ताठ होती माझी
आज माझ्यातला भीम इथं मीच केला उणा[११४]

आत्मटीकेच्या प्रकटीकरणातील 'मी' समूहाच्या प्रातिनिधिक रूपात साकार होतो. आंबेडकरकालीन चळवळीचे आणि स्थितीगतीचे अतिशय प्रभावी असे चित्र वामनदादांच्या कवितेने रेखाटले आहे. प्रतिकात्मक मांडणीतून शोकात्म दर्शन घडविले आहे. 'भीमरायाचा मळा'[११५] यासारख्या रचनेतून अवकळेचे चित्र रेखाटले आहे. ते अस्वस्थ करणारे आहे.

जाताच पिता अनुभवी । तापला दुहीचा रवी
संपली नवी टवटवी । बोले तो वामन कवी
आज मोजी घटका पळा । माझ्या भीमरायाचा मळा

बाप काळाच्या पडदयाआड निघून जाताच दुही आणि वैरभावाची, विभाजन आणि अलगतेची दाहकता वाढत गेली. त्यामुळे मळ्याला नवतेज प्राप्त होण्याची शक्यता संपली. आंबेडकरी विचार कृतीशीलतेच्या, वैभवशाली मळ्याचा मालक अंतर्धान पावताच उभे पीक वाळून गेले. म्हणून असा प्रश्न निर्माण झाला की,

कोण राखील आता भीमाचा मळा । वाळुनी चालला हा उभा जोंधळा
शेत सोडून जाता धनी मावळा । सोनियाच्या स्थळा पातली अवकळा
जीव जाळीत सुटल्या उन्हाच्या झळा । बोलती रोपटयांना जळा रे जळा
रानढोराचा येता जथा वेगळा । कोवळे कोंभ हे कापती चळचळा

आंबेडकरोत्तर काळातील चिंताक्रांत अवस्थेचे, सोनेरी स्थळांना अवकळा प्राप्त झालेल्या स्थितीचे चित्रण येथे पाहावयास मिळते. आंबेडकरोत्तर काळात नव्याने जन्माला आलेल्या पिढीच्या वाटयाला काय वाढून ठेवले आहे याचे हे प्रतिकात्म चित्र आहे.प्रतिकात्मकतेतून सामाजिक स्थिती आणि स्थित्यंतराचे स्वरूप स्पष्ट करीत जाणे हा वामनदादांच्या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. मानवी जीवनाच्या संदर्भात प्रदीर्घ चिंतन वामनदादाच्या कवितेने प्रकट केले आहे. या चिंतनातून मानवी जीव आणि जीवनाचे नाते बुद्धाच्या तत्त्वाशी जोडले आहे.

पंचशीलाचे तत्त्व पाळाया । मुखे मैत्रीचा मंत्र घोळाया
बंध मायेचे पक्के आवळाया । आला द्वेषाची दुनिया जाळाया
दिव्यासम जळूनी जग उजळाया । धरेसम भार सर्वाचा घ्याया
जगावे जिवा,जिवा सांभाळाया । आसवे जिवासाठी गाळाया
असा उपकारी असावा जीव । नसावा करणीने काळा जीव..[११६]

प्रत्येकाला एक दिवस मृत्यूला कवटाळून मातीशी कायमचे अलिंगन देणे अटळ आहे याचे भान असणे अगत्याचे आहे. म्हणून जोपर्यंत आपल्या जिवात जीव आहे तोपर्यंत मायेची, प्रेमाची उधळण करीत जिवाचे सोने केले पाहिजे. असा मूलगामी विचार वामनदादांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. प्रज्ञा, करुणा, मैत्री या मूल्यांचाच उद्घोष या कवितेने केला आहे. अशा प्रकारची मानवी जीवनाचं महान तत्त्वज्ञान सांगणारी, ही माणूसकेंद्री चिंतनगर्भ कविता आहे असे निश्चितच म्हणता येते. 'बंदु रे शिपया' यासारख्या रचनेतून सांसारिक दारिद्र्यासह अस्वस्थ करणारा भगिनीभाव स्पष्ट झाला आहे. यशोधरेचे भावविश्व,मातेची विविध रूपे दादांच्या विविध कवितांतून साकार झाली आहेत.

थोडक्यात आंबेडकरी चळवळीत प्रबोधन आणि लोकजागृतीचे महान कार्य वामनदादांच्या गीतांनी, शाहिरी आणि कवितेने पार पाडले आहे. वामनदादांच्या गीतकाव्याने पुढील अनेकांना कवित्वाची प्रेरणा मिळाली. त्यातून बुद्धभीम गीतकार, कवी, गायकांची मोठी परंपराच निर्माण झाली. आंबेडकरी लोकगीतांनी साठोत्तरी दलित कवितेच्या उदयापर्यंतचा कालखंड आपल्या अभिव्यक्तीने गाजविला. आंबेडकरी चळवळीला समांतर असा हा आविष्कार आहे.

✸ दलितानंद (१९२०-१९७४)

दलितानंद यांचे मूळ नाव गोविंद आबाजी आहिरे असे आहे. 'दलितानंद' हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आहिरे यांच्या गौरवार्थ बहाल केलेले नाव होय. दलितानंदाचे वडील आंबेडकरी चळवळीतील बिनीचे कार्यकर्ते होते. त्यामुळे

दलितानंदही चळवळीत सामील झाले. त्यांचे शिक्षण चौथीपर्यंतच झाले होते. तरुण वयात त्यांनी अनेक छोटयामोठया नोकऱ्या केल्या. पुणे कराराच्या निषेधार्थ मोर्चा काढल्यामुळे ब्रिटीश सरकारने त्यांना अटक केली. दोन महीने कारावास भोगला. १९४८ साली हैद्राबादच्या निजाम संस्थानाविरोधी त्यांनी आंदोलन केले. १९५३ आणि १९६४ साली भूमीहीनांच्या सत्याग्रहात सक्रीय सहभाग घेतला, त्याबद्दल त्यांना करावास भोगावा लागला[११७] आंबेडकरी चळवळीसाठी त्यांनी शेकडो गाणी लिहिली. महाराष्ट्रभर गीतगायनाचे कार्यक्रम सादर केले. त्यांच्या गीतांच्या चोपडया, पुस्तिका प्रकाशित आहेत. शिवाय काही ध्वनिमुद्रिका व कॅसेटही निघाल्या. बाबासाहेबांचा सहवास लाभलेल्या या कलावंताने चळवळीला आयुष्य वाहिले होते.

बाबासाहेब आंबेडकर हा एकूणच आंबेडेकरी लोकगीतांचा, भीमगीतांचा केंद्रबिंदू आहे. कारण बाबासाहेबांमुळेच दलितांना मानाचे जगणे प्राप्त होऊ शकले.

राहिली नव्हती जीवनात कसलीच वाण
भीमा! तुझ्यामुळे जगी होता मला मान
अन्यायाविरुद्ध डोक्यात पीक पिकविले
बंड कराया मला तूच शिकविले
बंडासवे शिकविला होता स्वाभिमान[११८]

माणसाला माणुसकीचे, मानाचे जिणे प्राप्त करून देणारा, अन्यायाविरुद्ध बंडखोरी करण्यास शिकवणारा आणि बंडासोबतच स्वाभिमान शिकवणारा अशी आंबेडकरी रूपे येथे सिद्ध झाली आहेत. 'अन्यायाविरुद्ध डोक्यात पीक पिकवणारा' हे आंबेडकरांचे सर्जनशील प्रतीक येथे साकार झाले आहे. चार इयत्ता शिकलेल्या शाहिराने अशाप्रकारची अर्थलक्ष्यी प्रतिके सिद्ध करावीत ही मोठी लक्षणीय बाब आहे. त्यांची रूपकात्मक आणि प्रतिकात्म रचनाही पाहण्यासारखी आहे.

हे शिवार भीमरायाचं बघ नाही कुणाच्या बाचं
अगं कारभारणी,राखण करू चल याचं
हे शिवार धन्यानं केलय आपल्या हवाली
बुद्ध तत्त्वाचं पिकलंय भरघोस आल्या साळी
आचरणाची करून मळणी भरू कोठार हे बुद्धीचं ।१।
घाल माथ्यावर काचा अन् गोफण घेऊन हाती
नजर पाखरावर तशी वढाळ ढोरावरती
काटीकुपाटी मोडून घुसतील । होईल नुकसान पीकाचं ।२।[११९]

बाबासाहेबांनी दलितांना बुद्ध धम्माची देणगी दिली. विज्ञाननिष्ठ जीवनमार्ग दाखविला, प्रज्ञा, करुणा, मैत्री ही मूल्ये दिली. बुद्ध तत्त्वज्ञानातून प्राप्त झालेल्या मूल्यांची जोपासना करण्याचं आवाहन आपल्या कारभारणीला येथे केलेले आहे. धम्म स्वीकारला म्हणजे जबाबदारी संपली असे नव्हे तर त्याची जोपासना करणे हे आपले आद्य कर्तव्य ठरते याची जाणीव कवीने करून दिली आहे. कारण बाबासाहेबांनी साऱ्या दलितांना बुद्ध धम्माच्या झोळीत टाकले आणि अल्पावधीतच त्यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यामुळेही त्यांनी सोपविलेल्या जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडणे अगत्याचे ठरले. त्यांनी दिलेलं दान जतन करणे हेच आपल्या आयुष्याचे ध्येय असल्याचे भान आणून देण्याचे कार्य वरील रचनेतून पाहावयास मिळते. हे भान दलितांनी, आंबेडकरी अनुयायांनी कितपत बाळगले असा प्रश्न उपस्थित होतो. त्यासाठी आंबेडकरोत्तर काळाचे,विघटनाचे चित्र कवीने उभे केले आहे

मी भीमाचा आहे मजला सांगाया लाज वाटे
भीममार्गात याच हाताने पेरिले मी दुहीचे काटे ।।
त्या भीममाऊलीने अहोरात्र माझ्यासाठी

कष्टून जीवापाड घेऊन मजला पाठी
जुलूम अन्याय साहून मोठमोठे
मी भीमाचा आहे मजला सांगाया लाज वाटे...[१२०]

हा आत्मटीकेचा स्वर अस्वस्थ करणारा आहे. 'दुहीचे काटे' आपल्याच हाताने पेरणारी प्रवृत्ती आंबेडकरोत्तर काळात वाढीस लागली आणि समाजमन विस्कळीत झाले. तेव्हा आपण भीमाचे अनुयायी आहोत हे कोणत्या तोंडाने सांगायचे? हा नैतिक पेच निर्माण झाला.

माणूस म्हणून ज्यानं आमचा केला सन्मान
त्याच्यापायी किती आम्ही राखलं इमान ?[१२१]

हा मूलभूत प्रश्न कवीने समाजालाच विचारला आहे. आंबेडकरांशी, त्यांच्या विचारांशी आपली बांधिलकी असेल, आपणाकडून झालेले बेईमानीचे वर्तन सुधारायचे असेल तर सामाजिक एकसंधपणा निर्माण झाला पाहिजे अशी अपेक्षा दलितानंदाच्या कवितेने व्यक्त केली आहे.-

झालं गेलं विसरुन दादा । बंधुभावानं या निदान वागा
लयी कष्टानं विणलेला धागा । भीमपुष्प हे गुंफाया लागा[१२२]

अशाप्रकारे भावंडभाव वाढीस लागणे हाच बेईमान वर्तन संपुष्टात आणण्याचा एकमेव मार्ग आहे अशी ग्वाही दलितानंदांच्या कवितेने दिली आहे. म्हणून आंबेडकरी विचारांच्या मार्गाने वाटचाल करणे अटळ ठरते,

ज्यांच्या पुण्याईने जगी मी रोज
जगतो मी मानाचे जीवन आज ।।धृ ।।
पाजून पान्हा ज्याने ज्ञानाचा । बनविले जगी मलाही मानाचा
त्या आधारुन करावे कामकाज[१२३]

आंबेडकरी ज्ञानशक्तीच समाजमनाला तारुन नेणार आहे असा विश्वास कवीने येथे व्यक्त केला आहे.

✹ श्रीधर ओहोळ (१९२३-१९७६)

श्रीधर रमेश ओहोळ यांचा जन्म अहमदनगर जिल्हयातील, राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे १५ जुलै १९२३ रोजी झाला. शिक्षण सातवीपर्यंत. उपजिविकेसाठी मुंबई येथे माझगाव डॉकमध्ये नोकरी. बालपणापासून काव्यरचनेचा छंद. त्यांची स्वत:ची 'रत्नसंचय गायन पार्टी' होती. सुप्रसिद्ध कव्वाल गायक गोविंद म्हशिलकर यांच्यासाठी ते रचना करीत असत. एक शीघ्र कवी म्हणून त्यांचा लौकीक होता. त्यांच्या गीतांचे 'भीमसंदेश'चे सहा भाग प्रकाशित झाले. शेकडो ध्वानिमुद्रिकाही प्रकाशित असून त्यांच्या निधनानंतर ''काजवा'' गीतसंग्रह प्रकाशित झाला. त्यांना भारतीय कला साहित्य अकादमी तफे १९९५ साली मरणोत्तर 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' दिला गेला. श्रीधर ओहोळ यांच्या गीतरचनेत अन्यायाविरुद्ध दलितांनी पेटून उठावे यासाठीचे आवाहन आहे.

अन्यायाची येऊ दे चीड मैदानी घे उडी
उठ दलिता,दिशा क्रांतीची फुटली रे तांबडी ।धृ।

बेबंद गुंड ते धर्ममार्तंड भारी माजले
भीमरायाने ठोकिला दंड त्रिखंड गाजले
त्या नराधमाची त्याने रणी लोंबविली चामडी ।१।

ती धर्मरुढी तोडण्या बेत बंडाचे बांधले
ती मनुस्मृती पेटवुनी सारे ब्रह्मांड हलविले
उसळू दे लाट सैराट तोड ही रुढी रांगडी ।२।[१२४]

दलितांच्या मनात सळसळते चैतन्य निर्माण व्हावे, अन्यायाच्या विरोधात चिड निर्माण व्हावी आणि पेटून उठावे अशा प्रकारची ही चेतनादायी रचना आहे. येथे बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचे दाखले दिले आहेत. बाबासाहेब धर्ममार्तंडाच्या बेबंदशाहीला लगाम घालण्यासाठी दंड ठोकून उभे राहिले, बेबंद गुंडाची चामडी लोंबविली. मनुस्मृती दहन करून साऱ्या जगाला हादरा दिला. हा आदर्श समोर ठेऊनच रुढींना गाडून टाकण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. असा लढाऊ बाणा दलितांच्या मनात जागृत करण्याचे काम या गीताने केले आहे. 'बंडाचे बेत' ही लक्षणीय प्रतिमा असून बंडखोरीचा आवेगही या रचनेत पाहावयास मिळतो. श्रीधर ओहोळ यांचे 'जयंतीगीत' ही महत्त्वपूर्ण रचना आहे. भीमजयंतीचे कार्यक्रम आंबेडकरांच्या हयातीतच सुरू झाले होते. ती कशी साजरी करावी याबद्दल ओहोळ सांगतात,

लावूनी दीपपंक्ती गाऊ या गीत संगती
भीमाची जयंती माझ्या भीमाची जयंती ।धृ।

सन्मानाने जिणे जगू या सानंदे आनंद लुटू या
भीमरायाच्या भगवंताच्या मनोरथासाठी झटू या
बस्स ही खरी जयंती गाजवू या दिगंती...[१२५]

डॉ.आंबेडकरांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी झटणे म्हणजेच खऱ्या अर्थाने भीमजयंती साजरी करणे होय. श्रीधर ओहोळ यांनी 'आईचे हृदय' व 'जिवाची कहाणी' ही दोन खंडकाव्ये लिहिली. जिवाची कहाणी या काव्यात धम्मस्वीकार, धम्मदीक्षा सोहळा, दीक्षा घेतल्यामुळे जिवाच्या मनाला झालेला संतोष, नवबुद्ध बनल्यामुळे गावपाटलाकडून त्याची झालेली मानहानी, सवर्णाकडून झालेली बेदम मारहाण अशा विविध घटना प्रसंगाच्या अनुषंगाने कथारूप आविष्कार यात झाला असून या रचनेला 'करूण कहाणीचे' रूप प्राप्त झाले आहे. आपल्या श्रद्धास्थानाला जिवापाड जपण्याविषयीचा विश्वास त्यांच्या कवितेने व्यक्त केला आहे.

का छळता! उगी अंतही बघता ही जनता विचारवंत आहे
जर ठिणगी ही पेटून उठली मग कुठही उसंत आहे
हितशत्रूनो! जीव घ्याल तधि रणमैदानी भेटाच अधि
भय नाही जोवर पाठीशी गौतम आणि भीम भगवंत आहे
भीमरायाच्या शब्दासाठी घरदार वा जीव जाईल जावो
बाबा गेले, सर्वही गेले या जिवड्याची का खंत आहे...[१२६]

अशाप्रकारे छळकऱ्यांना, हितशत्रूंना आव्हान देत भीमरायाच्या शब्दासाठी जिवावर उदार होणारी भावना या कवीने व्यक्त केली आहे. आंबेडकरी निष्ठाच त्याच्या कवितेने प्रकट केली आहे.

✸ राजानंद गडपायले (१९२४-२०००)

राजानंद गडपायले यांचा जन्म १० नोव्हेंबर १९२४ रोजी यवतमाळ येथे झाला. त्यांचे मूळ नाव लंकानाथ गोविंद गडपायले असे होते. राजानंदाचे वडील शिक्षक होते. मृदंगवादक आणि भजनकरी होते. त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची गाणी लिहिली. यवतमाळ आणि परिसरात त्यांच्या भजन मंडळाने नावलौकीक मिळवला होता. राजानंदाच्या मनावर बालपणापासूनच या सर्व गोष्टींचा परिणाम झाला होता.

राजानंद लहान वयातच पुण्याला पळून गेले. तरूण वयात मुंबईला आले. 'माझगावच्या आंबेडकर अनुयायांच्या वसाहतीत राहात असतानाच त्यांनी भावगीते लिहायला आरंभ केला'[१२७] १९४२-४३ च्या दरम्यान त्यांनी आंबेडकरी गीत लेखनास प्रारंभ केला. त्यांनी 'राजानंद गायन पार्टी' स्थापन केली. या माध्यमातून आंबेडकरी विचार आणि चळवळ सर्वदूर पोहचविण्याचे कार्य गडपायले यांनी केले. ''डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत गायन पार्ट्यांना फार मोठे स्थान आहे. आंबेडकर विचार आणि चळवळ सर्वदूर, घराघरात मनामनात नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणाऱ्या या गायन पार्ट्यांनी महाराष्ट्र चेतवला. हजारो माणसे बेभान होऊन रात्र रात्रभर गाणी ऐकत. प्रेमानं बिदागी देत.''[१२८] 'राजानंद गडपायले

या कलावंताच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण म्हणजे बाबासाहेबांनी त्यांना दिलेलं प्रशस्तीपत्र.' पुण्याजवळील तळेगावी डॉ. बाबासाहेब आले असताना, राजानंद गायन पार्टीचे गाणे त्यांनी ऐकले. राजानंदाच्या कवनांनी आणि गाण्यानं बाबासाहेब आनंदून गेले. सबंध गाणे त्यांनी मनापासून ऐकले. उत्फुल्ल मनाने त्यांनी राजानंदाना प्रशस्तीपत्र दिलं,

> I was extremely pleased with the musical performances and singing by Rajnand and his party.
>
> - Dr. B.R. Ambedkar 15/06/1950[१२९]

राजानंद गडपायले हे आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य कवी होते. सामान्य माणसाला कळतील अशा भाषेतून साधी सरळ रचना करणे हा त्यांच्या कवितेचा विशेष होता. 'गीत भीमायन' ही त्या काळातील गाजलेली, खेडयापाडयात, घराघरात पोहोचलेली रचना होय. ही कथारूप रचना आहे. या रचनेतून बाबासाहेब आंबेडकरांचा संपूर्ण जीवनपट चित्रित केला आहे. ''एकसष्ट कवनाचा तो विणलेला गोफ आहे. बाबासाहेबांच्या जन्मापासून ते निर्वाणापर्यंतची ती भावगाथा आहे. ' गीतभीमायन 'चा आरंभ स्मृतीवंदनाने होतो. आणि मग बाबासाहेबांच्या जीवनगुच्छातील एकेक फुल उमलत जाते''[१३०] बाबासाहेबांचे बालपण, भीमाईच्या निधनानंतर आत्या मीराबाईने बाबासाहेबांचा केलेला सांभाळ, बाबासाहेबांचे शालेय जीवन, शाळेतील अस्पृश्यतेचा अनुभव, कृष्णाजी आंबेडकर या शिक्षकाचे लाभलेले प्रेम, रमाईशी झालेला विवाह, पिता रामजीचे निधन, इत्यादी सर्व चरित्र घटक एखादया चित्रपटासारखे साकारले जातात. बाबासाहेबांचा सार्वजनिक जीवनातील प्रवेश, महाड, नाशिक येथील सत्याग्रह, मनुस्मृती दहन, धर्मांतराची घोषणा, धम्मस्वीकार, आणि शेवटी महापरिनिर्वाण अशा घटनाप्रसंगाचा जिवंत चित्रपट गीत भीमायनाने साकार केला. लोकांपुढे सादर केला. त्यामुळे बाबासाहेबांचे जीवनचरित्र आणि विचार लोकांपर्यंत पोहचले.

'पटाचाराची कहाणी', 'सोनबाची सत्यकथा' या कथारूप रचनाही फार गाजल्या.''पटाचारा ही बुद्ध काळातील श्रावस्ती नगरीतील एका धनवंताची लेक. अनेक दु:खांना सामोरे जात ती शेवटी बुद्धाला कशी शरण जाते याची करुण कहाणी कवीने चितारली आहे. 'सोनबाची सत्यकथा' या रचनेत, बाबासाहेबांना पिण्यासाठी आपण पाणी देऊ शकलो नाही या खंतीने वेडा झालेल्या सोनबाची करुण कहाणी आहे. 'पटाचाराची कहाणी' नागोराव पाटणकर या गायकाने महाराष्ट्रभर नेली. 'गीतभीमायन'ही विख्यात गायक सतीश अडसूळ यांनी घराघरात नेले.''[१३१] धम्मस्वीकारामुळे दलित जीवनाचे सांस्कृतिक संदर्भ बदलून गेले. त्याचप्रमाणे आंबेडकरी चळवळीत भीमजयंती ही स्वाभिमानाचे प्रतीक बनली. दसरा दिवाळीपेक्षाही मोठे महत्त्व जयंतीला प्राप्त झाले. या सणाच्या निमित्ताने सासुरवाशिनी आपल्या माहेराला जाण्यासाठी आतूर झाल्या.

भीमजयंतीचा सण आला! जाते गं माहेराला
बंधू माझा न्ह्यावया आला
मानवती अवघे आनंद । उभारुनी गुढया पताका आणि तोरणे
मंगल वाद्ये नाद घुमविती
लखलखती दीप ज्योती, झेंडा निळा हा सजविला ।१।

ताज्या सुमनाच्या माळा भीम मुर्तीच्या पाहून गळा
पंचप्राण आरती ओवाळी हर्षभरे बांधव महिला ।२।

भीमनगर माहेर माझं मैतरणीनो बिगी चला गं
राहू नका बाई कुणीही मागं, बंधू राजानंद भरंल की राग
जायाचं दूर पाऊल झणी उचला. ।३।[१३२]

जयंतीच्या सणासाठी भावाने बहिणीला न्ह्यावयाला जाणे, निळ्या झेडयांची सजावट, भीममूर्तीच्या गळ्यातील पुष्पमाला, भीमनगर माहेर हे सारे संदर्भ सांस्कृतिक बदल आणि स्थित्यंतर सूचित करतात. या स्वरूपाच्या गीतांमधून

आंबेडकरांच्या जन्मदिनी होणारा आनंद, ओसंडून वाहणारा उत्साह, आतुरता ह्या सर्व भावभावनांचा प्रत्यय येतो. धम्मस्वीकारामुळे बुद्धतत्त्वज्ञानातील अनेक संकल्पना वेगवेगळ्या पद्धतीने आंबेडकरी गीतांतून प्रकट झाल्या.

कुहू कुहू कोकिळावाणी । भीमा तुझी गाते मी गाणी... ।धृ।
बुद्ध कबीर आणि फुलेंचे, सत्य जगाला दावियले तू
पाषाणागत मुक्या जीवांना, बोलायला लावियले तू
दिली मला मंजूळवाणी .... ।१।

फुलाफळांनी बहरुन आली समतेची तव बाग बघुनी
त्रिशरणाची मोट ही चाले, पंचशिलाच्या वाटामधुनी
झुळझुळ वाहते पाणी... ।२।

घरात माझ्या असता कधी मी गावामधल्या बुद्धविहारी
असो कुठेही मळ्यात अथवा वाऱ्यांसंग डुलत्या शिवारी
रानीवनी, सर्व ठिकाणी... ।३।

राजानंद तथागताचा स्वीकारिला मी धम्म महान
युगायुगाची, व्याकुळलेली शमली आहे माझी तहान
नाद घुमे दाही दिशानी... ।४।[१३३]

बाबासाहेबांमुळेच बुद्ध, कबीर, फुल्यांची ओळख झाली. त्यांच्यामुळेच मुक्यांना वाचा प्राप्त झाली. तथागताचा धम्म स्वीकारल्यामुळे युगायुगापासून तहान शमली. अशाप्रकारे आंबेडकरी कर्तृत्वाची महती गायीलेली पाहावयास मिळते. त्यासाठी योजलेली प्रतिमासृष्टी लक्षणीय आहे. 'पाषाणागत मुके जीव', 'समतेची बाग', 'त्रिशरणाची मोट', 'पंचशिलाची वाट', 'व्याकुळलेली तहान' ह्या अतिशय अर्थपूर्ण प्रतिमा आहेत. बाबासाहेब आंबेडकरांमुळे सामाजिक, सांस्कृतिक जीवनात झालेल्या परिवर्तनाचे आणि स्थित्यंतराचे सूचन या प्रतिमासृष्टीतून होताना दिसते. बाबासाहेबांचे निर्वाण हा दलितांच्या जगाला बसलेला प्रचंड धक्का होता. आंबेडकरी गीतकारांनी या घटनेच्या अनुषंगाने अनेकांगानी आपल्या भावनांना वाट करून दिली. हृदय पिळवटून टाकणाऱ्या रचना राजानंदानी साकार केल्या.

१. माऊली माऊली भिमाई माऊली
कृपेची सावली जगाला दुरावली
निर्वाण पावली, परंतु दलितांच्या हृदयी सामावली ।धृ।

सोडून गेली जगाला जरी/आहे आमुच्या हृदयांतरी
मुलासंगे माऊली तशी उन्हासंगे सावली
तशी आमुच्यातच ही भीमाई विसावली [१३४]

२. स्मशानी हायरे दरिया किनारी जाऊन आलो
चितेवर देह बाबांचा मी जळता पाहून आलो ।धृ।
भडकल्या अग्निच्या ज्वाळा जनसागर तो तळमळला
अरेरे, जीवनाला आग आपुल्या लावुनी आलो
अरेरे काय हे मी पाहिले या राजानंदाने
मी जळालो का नाही, त्या ठायी जिथे मी जाऊनी आलो... [१३५]

३. थांबा रे दलितानो, ऐसा निष्ठूर करुनि बेत
नका रे उचलू भीमाचे प्रेत ।धृ।
जन्मभरी तो जळतचि आला । अग्नि देता त्याच शवाला

तुटते काळीज सांगू कुणाला ।३। थांबारे...[१३६]

बाबासाहेबांच्या जाण्याने दलित जगाचे मातृत्वच हरवले. त्यामुळे सारा जनसागर तळमळला, बाबासाहेबांनी सारे आयुष्यच दलितांसाठी पणाला लावले. 'जन्मभरी तो जळतची आला'. त्यांच्या निर्वाणाने एका युगाची समाप्ती झाली. कवीने अतिशय आर्ततेने समाजमनाच्या भावनांचे प्रकटीकरण आपल्या काव्यातून केले आहे. शोकगर्भ आणि गंभीर परिमाण साधणारे हे काव्य श्रोत्यांची मने व्यथित करणारे आहे. तेच राजानंद गडपायले यांच्या काव्याचे सामर्थ्य आहे. असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

✸ कवी दीनबंधू शेगावकर (जन्म ३ मार्च १९२६ - मृत्यू २६ डिसेंबर २०००)

सिशीनाथ अंबुजी शेगावकर ऊर्फ दीनबंधू यांचा जन्म ३ मार्च १९२६ रोजी अकोला जिल्हयातील बाळापूर तालुक्यातील डिग्रस ह्या गावी झाला. दीनबंधूच्या घरात धार्मिक वातावरण होते. त्यांचे चुलते हरिदासी किर्तन करीत असत. चुलत्याच्या वारकरी परंपरेचा परिणाम त्यांचेवर झाला, दीनबंधूची आईसुद्धा धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. जात्यावरील आईच्या ओव्यांनीही दीनबंधू प्रभावीत झाले. आणि बालवयातच अभंगरचना करण्यास आरंभ केला.

त्यांच्या शाहिरी जीवनाचा प्रारंभ १९४५ साली झाला. त्यांनी मोठ्या प्रमाणात काव्यरचना आणि इतर लेखन केले आहे. दीनबंधू यांच्या रचनेचा पहिला संग्रह 'उद्धार' हा १९५० साली प्रकाशित झाला. त्यानंतर 'समाज चेतावणी' (१९५४), 'भीमपदी श्रद्धांजली' (१९५६), 'क्रांतीची ललकारी' (१९५८), 'आई मी भीम होईन' आणि 'अभंग प्रकाशन' (१९६८) हे संग्रह प्रकाशित झाले. १९६८ ते १९७२ या कालखंडात प्रकाशित झालेले 'बौद्ध हुंकार', 'भीमगुणमाला', 'दलित जागृती,' 'हेच द्या वरदान', 'बुद्ध गुणावली', 'बुद्ध भीम पाळणा पोवाडा' इ. याशिवाय 'भीमजन्माची कथा', आणि 'आंबेडकरांचा ओवीबद्ध संग्रह', 'धम्मपद आणि शूद्र पूर्वी कोण होते' या ग्रंथावर त्यांनी लिहीलेली छोटेखानी पुस्तके आदी वाङ्मय उपलब्ध आहे.[१३७] साध्या रसाळ आणि अतिशय सोप्या भाषेत ओवीबद्ध रचना करणाऱ्या दीनबंधूनी 'भीमकाव्यरचना' (१९५८), 'धम्मघोषणा' (१९६९), 'धम्मयात्रा वर्ग' (१९६९), 'धम्मसिद्धता वर्ग' (१९७०) आणि 'धम्मदीक्षा वर्ग' (१९७०) अशा दीर्घकाव्य पुस्तकांची निर्मिती करून आपल्या काव्य प्रतिभेने असंख्य वाचकांची मने जिंकली[१३८]

दीनबंधू हे पेशाने शिक्षक होते. शिक्षकी करता करताच मॅट्रिक, इंटर आणि बी.ए.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी 'तथागत' हे नियतकालिक सुरू केले होते. विष्णू प्रभाकराच्या एका हिंदी नाट्यकृतीचा 'अशोक विजय' या नावाने अनुवाद. या सर्व गद्यलेखनातून दीनबंधूचा अभ्यास व विवेचक दृष्टी प्रतीत होते. ३५-४० वर्षे त्यांनी अव्याहत लेखन केले. दीनबंधू हे आंबेडकरी विचारांचा वारा प्यायलेले प्रभावी व्यक्तिमत्व. समाज आणि समाजासाठी लेखन हेच त्यांनी आपले कार्यक्षेत्र मानले. कलापथक घेऊन ते गावोगावी फिरले. शिबीरे, चर्चासत्रे आयोजित करून बाबासाहेबांचा विचार जनतेपर्यंत नेण्यात त्यांनी धन्यता मानली. सव्वालक्ष पृष्ठांची छपाई त्यांच्या रचनेच्या माध्यमातून झाली.[१३९]

दीनबंधू यांच्या काव्यरचनेतून अनेक विषय मुखरीत झाले आहेत. शिक्षण, धर्म, स्वातंत्र्य, सामाजिक संघटना, नेत्यांचा भ्रष्टपणा, आंबेडकरी चरित्र, आंबेडकरी कर्तृत्व आणि चळवळ असे असंख्य विषय त्यांच्या काव्यरचनेचा भाग झाले आहेत. डॉ. बाबासाहेबांनी समाजाला शिक्षणाचे महत्त्व सांगितले. शिक्षणाशिवाय उद्धार नाही. या विचारांचा समाजमनावर मोठाच परिणाम झाला. मात्र हा परिणाम निरक्षर, सामान्य जनतेवर घडवून आणण्यासाठी आंबेडकरी लोकगीतांचे मोठे योगदान लाभले आहे. दीनबंधू यांची खालील रचना फार लोकप्रिय झाली होती.

घरी नको राहू मधू शाळेत जाई
किती सांगू तुला कसे समजत नाही
तुझा बाप शिकला नव्हता शाळा । रूपयाचा खुर्दा कधी मोजला नाही
आपलाच मास्तर आता शाळेत आला । जीव लावून शिकवतो साऱ्या पोराला

बामणाच्या मास्तरवानी मारत नाही ।।
राग नको भरू नव्या कपडयासाठी । फाटकंच पुस्तक तुझी फुटकीच पाटी
काय काय करु, एकटीची कमाई ।।
शिकवीन शाळा तुला भीक मागूनी । कॉलेजात टाकीन मुंबईला नेऊनी
आंबेडकरासारखा पंडित होई ।। घरी नको राहू मधू ....[१४०]

या गाण्यातून मोलमजुरी करून एकटीच्या कमाईवर घरदार, संसार चालविणाऱ्या गरीब कष्टकरी आईचे मनोगत व्यक्त झाले आहे. प्रसंगी भीक मागून मुलाला शाळेत शिकवीन आणि त्यामुळे शिकून आपला मुलगा आंबेडकरासारखा पंडित होईल. अशाप्रकारचे स्वप्न पाहणाऱ्या आईची प्रतिमा येथे साकार झाली आहे. अडाणी, निरक्षर लोकांच्या मनात आंबेडकरांचा शिक्षणविषयक उपदेश कसा घर करून होता, त्यामुळे सर्वसामान्य माणसेही कसे निर्धाराने पेटून उठली होती. याचाच प्रत्यय वरील रचनेतून येतो. धर्माविषयी काही मूलभूत प्रश्न दीनबंधूनी उपस्थित केले आहेत. हिंदूधर्म हा देशघातकी असून त्याने विटाळाचा बाजार मांडला आहे. अशाप्रकारचा निष्कर्ष त्यांनी आपल्या रचनेतून मांडला आहे.

हा धर्म कसा ? हे कर्म कसे ? हे समजत नाही मजला ।धृ।
मांग, महार या चांभाराचा धोबीदादा बाट धरे
पालू फडके धुतो परंतु महारापासून दूर सरे
धोबी म्हणावा मोठा तरी धनगर त्याचा बाट धरे
धनगर म्हणावा मोठा तरी तो कुणबी त्याचा बाट धरे
दिमाख मिरवी पाटिलकीचा मानासाठी झुरत मरे
कुणबी म्हणावा राजा तरी, तो ब्राह्मण त्याचा बाट धरे
सत्रंजीवर बसे परंतु अन्नाचा इंकार करे
त्या तत्त्वाला पाठ करोनी इंग्रज अपुला बाट धरे
आफ्रिकेच्या हॉटेलमधी हिंदूला तो दूर करे
देशघातकी नीती हिंदूची , बाजार केला बाटाचा[१४१]

हिंदू धर्माच्या ठायी असलेले 'बाटाचे' लोण आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचले आणि दक्षिण आफ्रिकेत हिंदू भारतीयांना प्रवेश मिळत नव्हता. धर्म ही बाब विशेषत: हिंदू धर्म नीती ही माणसामाणसात भेद निर्माण करणारी आहे. या भेदाने जातीची उतरंड निर्माण केली आहे. हिंदू भेदनीतीचा बळी ठरलेल्या मांग, महार, चांभारापासून कुणब्या पर्यंतच्या सर्व जाती एकमेकींना श्रेष्ठ ठरतात. परंतु ब्राह्मणाच्या दृष्टीने ह्या सर्व जाती नीच ठरतात. कुणबी स्वत:ला राजा म्हणवत असला तरी ब्राह्मणाने त्याला कधीच जवळ केले नाही. त्यांच्या सतरंजीवर बसत असला तरी ब्राह्मणाने कुणब्याचे अन्न वर्ज्य केले. धर्माच्या नावावर जातीय तिढा भारतीय समाजात हिंदू धर्मामुळे निर्माण झाला. म्हणून हा धर्म कसा ? हे कर्म कसे ? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. हा धर्म नसून विटाळाचा बाजार मांडणारी देशघातकी हिंदूनीती आहे. ही जातीय नीतीच देशाच्या अधोगतीला कारणीभूत ठरली आहे.

या सुंदर भारत देशाला, का आली प्रेतकळा ।धृ।
सांगा कोठे विद्वानांची बुद्धी गेली होती ?

शूरवीरांच्या शूरपणाची का झाली रे माती
परचक्राला रे का हटला ।१।
जातीजातीचे डबके केले या हिंदू धर्माने
देश बुडाला म्हणून गड्या रे स्थायी भटशाहीने
परक्यांनी लुटले राष्ट्राला ।२।[१४२]

देशावर परचक्र आले. इथली विद्वत्ता, पराक्रम त्यापुढे टिकाव धरू शकला नाही. त्याचे मूळ कारण हिंदू धर्माने जातीजातीचे डबके निर्माण केले. इथली जातियताच विभाजनाला कारणीभूत ठरली.त्याचा फायदा परकीय सत्तेने उठवला आणि आपला देश परकीयांच्या स्वाधीन झाला. अनेक वर्षे गुलामीत खितपत राहिला. गुलामीच्या या देशात अंतर्गत पातळीवर तर अनेक अंतर्विरोध होते. दलितांच्या वाटयाला आलेली गुलामगिरी भयानक स्वरूपाची होती. त्यांना या गुलामीतून बाहेर काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाच उदय व्हावा लागला.

हाच हाच तो चौदा एप्रिल विश्वपटावर झळकला
कोटी कोटी पद दलित जनांच्या तोडावयास्तव जुलमी शृंखला ।१।

तेज रवीचे, वेग वायुचा, हिमालयाचा स्वाभिमान
दिला जो झाला जगताला वरदान ।२।

युगायुगांचे रडत होतो या दिवसापासून हसू लागलो
गुलामीमध्ये मरतच होतो आता जीवन जगू लागलो ।३।[१४३] (आ.शा /१५२)

आंबेडकरांच्या रूपाने दलितांना मुक्तीदाताच लाभला. त्यांचा उदयच मुळी पददलितांच्या पायातील गुलामीच्या शृंखला तोडण्यासाठी झाला. त्यांनीच दलितांच्या मनात स्वातंत्र्याची प्रबळ उर्मी निर्माण केली. ते दलितांसाठी वरदानच ठरले. खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगण्याचे बळ दलितांमध्ये आंबेडकरांमुळेच निर्माण झाले. असा आशय सदर रचनेतून स्पष्ट होतो. रवीचे तेज, वायुचा वेग, हिमालयाचा स्वाभिमान या शब्दकळांमधून आंबेडकरांकडून दलितांना प्राप्त झालेल्या वरदानाचा नेमकेपणा स्पष्ट होतो. दीनबंधू हे अस्सल कवी कलावंत होते त्याचबरोबर बेडरपणे अभिव्यक्ती करीत होते याचाही प्रत्यय अनेक रचनामधून प्रत्ययाला येतो. ब्राह्मणाच्या कावेबाजपणाचे रूप ते खालीलप्रमाणे स्पष्ट करतात,

उद्योग मिळावा पोट भरण्याचा भटांनी ग्रंथाचा खेळ केला
वर्ण जातियता निर्मिले राक्षस आजवरी देश नागविला
माया, ब्रह्म, आत्मा, ईश्वराचे ज्ञान माजविले रान अनर्थाचे[१४४]

भटांनी केलेली ग्रंथनिर्मिती हा त्यांचा पोटभरू धंदा होता. त्या माध्यमातून भटांनी वर्ण जातियता हे राक्षस जन्मास घातले. माया, ब्रह्म, आत्मा, ईश्वर ही सारी साधने जणू अनर्थाचे रान माजविण्यासाठीच होती. धर्माच्या नावावर या सर्व तत्त्वांचा शस्त्रासारखा वापर केला. ईश्वर, देव ह्या संकल्पना सारे काही थोतांड आहे असे दीनबंधूनी स्पष्टपणे सांगितले आहे,

१. मंदिरात देव उभा पायरीस राहिलो
जनतेला हीन दगडासही भासलो
नाही देव धावून आला ।।[१४५]

२. काय केले जनतेसाठी रामकृष्णाने
गुलामगिरीचे पाश ओढूनी बांधिले कपटाने
देव कसे म्हणता! [१४६]

अशाप्रकारे देवाविषयी स्पष्टीकरण देऊन देवाला नाकारणारी जाणीव आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. हे सारे नाकारण्याचे आवाहन त्यांची कविता करते,

उठा दलितांनो ओळखा ना हीत । असे स्वस्थचित बैसले का ?
सोडोनिया द्या रे जुना रुढीधर्म । भीमबाचे मर्म घरी आणा
कोण ज्ञाने झाला जगाचा उद्धार । चला मार्ग थोर तोचि असे [१४७]

जुने रुढीधर्म नाकारुन आंबेडकरी विचारांची कास धरणे हाच आपल्या मुक्तीचा मार्ग आहे. ज्ञानाच्या मार्गावरुन

वाटचाल करणे हाच थोर मार्ग आहे. एकाप्रकारे विज्ञाननिष्ठाच दीनबंधूनी दलित मनामध्ये पेरण्याचे कार्य आपल्या कवितेच्या माध्यमातून केले. सनातन धर्मानेच माणसाला दुर्गतीस पोचविले. त्यामुळे हिंदू धर्मातील अनेक लोक परधर्मात प्रवेश करू लागले. कारण हिंदू धर्मांतर्गत माणूस म्हणून मानाचे जगणे प्राप्त होणे शक्य नव्हते अशी स्थिती निर्माण झाली.

धर्माबाबत सारी जनता । कोरी पाटी असेची आता
जाती कुळाचार तुकडे खाता । सैरावैरा धावते ।।
अवलिया दिसता धावे तिकडे । देवी दडता धावे इकडे
अधर्माच्या गळी पडे । धर्मविरहे जनता ही ।।
सनातन्यानीच या जनतेला । आणले अशा दुर्गतीस
का न परधर्माचे होती घास? जन मेंढरे ठेविता ।।
ज्ञानद्वारे करुनी बंद । धर्मप्रकाश केला मंद
लोक ठेवले मुके अंध । धन्य जात्यन्ध भूदेव
परी भीमघोषणेने आता । सद्धर्म होय पुन:स्थापिता[१४८]

ज्ञानाची दारे बंद करून लोकांना मूक आणि अंध बनवण्याची कृती भूदेवांनी केली. म. फुल्यांनी ब्राह्मणाला भूदेव म्हटले आहे. ब्राह्मण स्वत:ला या भूमीवरचे देव समजत असत. हिंदू धर्मात राहून इथल्या दलित पीडित, अस्पृश्यांचा उद्धार होणार नाही, त्यांना माणूसकीचे हक्क प्राप्त होणार नाही. म्हणूनच डॉ.बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली होती. त्यामुळे सद्धम्माची पुन:स्थापना होणार आहे अशा प्रकारचा कवीने विश्वास व्यक्त केला आहे. कारण तोवरच्या काळात जनतेने सनातन्यांच्या या अधर्मालाच धर्म मानून धर्माचा अभिमान बाळगला. त्यातून कोणतेही मन:स्वास्थ्य लाभले नाही

व्यर्थ आम्ही वाहिला अभिमान तुझा अंतरी
व्यर्थ लढलो रे तुझ्यास्तव शीर घेऊन संगरी
नष्ट होवो धर्म जो शांती न दे 'दीनबंधू'ला[१४९]

असा धर्म नष्ट होण्याची अभिलाषा कवीने मनात बाळगली आहे. या अधर्माचा कुचकामीपणा सिद्ध करून सद्धम्म म्हणजेच बुद्ध धम्माचे मोठेपण विशद केले आहे. त्यासाठी धम्मक्रांतीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. 'दीनबंधू' नवे जग निर्मूनी क्रांती रे क्रांती रे त्यावीण ना शांती'' असे क्रांतीचे आवाहन केले आहे. सामाजिक क्रांती संघटित झाल्याशिवाय होऊ शकत नाही. हक्क मिळवून घ्यायचे असतील तर संघटनेशिवाय, संघटित होऊन संघर्ष केल्याशिवाय पर्याय नाही. म्हणून दीनबंधू म्हणतात,

आता स्वाभिमान घेऊनिया उठा संघटोनी झटा हक्कासाठी
नसे स्वाभिमान जरासाही अंगी व्यर्थ नर जगी जन्मला तो.[१५०]

आपल्या अंगी स्वाभिमान बाणावला नसेल तर आपल्या जन्मालाही अर्थ उरणार नाही अशाप्रकारे संघटना, स्वाभिमान, संघर्ष ह्या गोष्टींचे महत्त्व लोकांच्या मनी मानसी रुजविण्याचे कार्य दीनबंधूच्या कवितेने पार पाडले आहे. बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग करून आपल्या लाखो अनुयायांसह केलेला बुद्धधम्माचा स्वीकार ही मोठी सांस्कृतिक क्रांती होती. या क्रांतीमुळे कोणते परिवर्तन झाले याचे चित्र दीनबंधूंच्या कवितेने अधोरेखित केले आहे.

''कैकानी माळा तोडल्या । कैकानी जटा कापल्या
कैकानी धुन्या त्यागिल्या । मन केले सिद्ध हो
कित्येक दगडी देवांना । ब्राह्मणी पोथ्या ग्रंथाना
देऊनी रजा पुसती खुणा । जुन्या नष्ट धर्माच्या ।।
आणि गाव गुलामीच्या बेडया । वतनाच्या लंगडया कुबडया
मोडोनी केल्या चिंधडया चिंधडया । वेशीवरी भिरकाविल्या ।।
मृत जनावरे ओढणे । मरणाची रचणे सरणे

जळो वेठबिगारी जिणे । स्वतंत्र श्वास घ्यावया ।।[१५१]

अशाप्रकारे जुन्या धर्माच्या खुणा पुसल्या गेल्या, नष्ट करण्यात आल्या. त्यामुळेच स्वतंत्र श्वास घेता आला. सांस्कृतिक स्थित्यंतर आणि विसाव्या शतकात साकार झालेले परिवर्तनाचे हे वास्तवचित्र आहे.

थोडक्यात, दीनबंधू यांच्या कवितेने सर्वसामान्य अडाणी जनतेच्या मनात परिवर्तनासाठी निर्धाराने पेटून उठणारा विचार अधोरेखित केला आहे. सामाजिक क्रांतीसाठी संघटना, स्वाभिमान आणि संघर्षाचे सूत्र लोकांच्या मनीमानसी रुजविले आहे. सनातन हिंदू धर्माविषयी मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. दलितांच्या वाटयाला आलेल्या गुलामीचे, भीषण रूप सिद्ध केले आहे. धर्माच्या नावावर अनर्थाचे रान माजविणाऱ्या ब्राह्मणी कावेबाजपणाचे रूप बेडरपणे स्पष्ट केले आहे. दलित जगाच्या सांस्कृतिक स्थित्यंतर आणि परिवर्तनाचे चित्र रेखाटले आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या' विद्रोहाचे पाणी पेटले आहे' या ग्रंथात दीनबंधूंच्या कवितेची काही मूलभूत वैशिष्टये नोंदविली आहेत. ''दीनबंधुची गीते दलित- अस्पृश्यांच्या कठोर वास्तवाचे दर्शन घडवितात. कधी इतिहासाची पाने उलटून तर कधी वर्तमानाचा मागोवा घेत. दीनबंधूच्या लेखनामागे एक निश्चित असे सामान्य मन आहे. हे मन कधी आक्रोश करते, कधी तळमळते तर कधी अंतरीचा जिव्हाळा व्यक्त करते, कधी अंतर्मुख होऊन आत्मकर्तव्याची जाणीवही करून देते.''

✹ लक्ष्मण केदार (जन्म १९२८)

लक्ष्मण केदार यांचा जन्म १ जानेवारी १९२८ रोजी झाला. जोपूळ, (ता. चांदवड, जि.नाशिक) हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे शिक्षण ७ व्या इयत्तेपर्यंत झाले होते. नोकरीच्या शोधात ते मुंबईला आले. बालपणापासूनच त्यांनी गायकीचा छंद जोपासला होता. १९५० पासून त्यांनी गीतलेखनाला प्रारंभ केला. त्यांनी स्वत:ची 'निलांबर गायन पार्टी' हा संच उभारला होता. चळवळीची गीते, संयुक्त महाराष्ट्र, गोवा मुक्तीसंग्राम, भीमबुद्धगीते, लोकगीते आणि लावण्या असे वैविध्यपूर्ण लेखन केले. लक्ष्मण केदार यांची गाणी खेडयापाडयातील लोकांपर्यंत पोहचली होती. एच.एम.व्ही.सारख्या कंपनीने त्यांच्या गाण्याच्या तबकडया प्रकाशित केल्या होत्या. त्यामुळे सभा,संमेलन, विवाहादी प्रसंगी लाऊडस्पीकर मधून लक्ष्मण केदार यांची गाणी वाजवली जात असत. 'भीमानं लावलाय दिवा'[१५२] ही त्यांची अतिशय लोकप्रिय रचना होय.

करून करणी दिपवली धरणी । भयाण रात होती जेव्हा
अंधेऱ्या वस्तीत भीमानं लावलाय दिवा ।धृ।
अन्यायाची सुरी, धरी माणूस माणसावरी
असली दादागिरी पाहूनी भीम पेटला उरी
तयार झाला रणी उतरला गर्जत सिंहाचा छावा ।१। ..
त्या भगवंतापदी लीन तो झाला सर्वाआधी
जन हे लक्षावधी टाकले नंतर ओटीमधी
हीन-दीनांना दु:खी जनांना दिला सुखाचा हा ठेवा ।३।
ह्या नगरीला धनी हजारो वर्षे नव्हता कुणी
आला भीम नरमणि टाकली नगरी बदलूनी
लक्ष्मणा ही करणी पाही जग सारं करतय वाहवा ।४।

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाची विविध रूपे या रचनेतून साकार झाली आहेत. भयाण रात्री अंधेऱ्या वस्तीत दिवा लावणारा, धरणी दिपवणारा, अन्यायाच्या विरोधात गर्जना करीत रणात उतरणारा सिंहाचा छावा, बुद्ध धम्माच्या ओटीत टाकून हीनदीनांना धम्माच्या रूपाने सुखाचा ठेवा देणारा, हजारो वर्षे ज्या नगरीला धनी नव्हता त्या नगरीचे रूप बदलून टाकणारा अशी अनेक रूपे येथे प्रत्ययाला येतात. यातील प्रतिकात्मकता आणि अर्थाची सूचकता अतिशय लक्षणीय स्वरूपाची आहे. साध्यासोप्या शब्दकळेतून सादर झालेली आंबेडकरी कर्तृत्वाची गाथा सर्वसामान्यांना

मोठीच भुरळ घालणारी ठरली होती. इतर विविध रचनांमधून आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू साकार झाले आहेत. 'महाउपकारी', 'विद्वत्तेचा पंडित', 'घटनापती', 'दलितांचा सखा' असे कितीतरी पैलू सिद्ध करण्याचे कार्य लक्ष्मण केदारांच्या काव्यातून घडले आहे. उदा.

पडीक भूमी जीवन अमुचे । कुणी कसेही उडवीत होते
मालक झाला त्याच भूमीचा । भूषविले ते मंगल नाते
तनमन डसवून बीज रुजवुनी । पिकवुनी गेला पिका
कोणी नाही भीमासारखा.....[१५३]

पडीक भूमीवर बीज रुजवून पिक पिकविणारे आंबेडकरी रूप म्हणजे एक नवसर्जक प्रतीक ठरले आहे. लक्ष्मण केदार यांच्या 'शेजारीण सखे बाई'[१५४] या रचनेला प्रचंड लोकप्रियता मिळाली,

बुद्ध कबीर भीमराव फुले, या भूमीवर जन्मले
त्यांनी जनजीवन फुलविले गं शेजारीण सखे बाई ।धृ।
देवाच्या नावावर जे करती छुमंतर
ते भरती आपुली घरं गं, शेजारीण सखे बाई ।२।
देव अंगात आल्यावर, दारू गांजा हवा भरपूर
गंडे दोरे खर्च नंतर गं शेजारीण सखे बाई ।५।
सुख देवच देतोय जीवा, पोरं देतोय मागशील तवा
मग न्हवरा कशाला हवा गं, शेजारीण सखे बाई ।६।
त्या भीमरायानं दिला एक जीवनमार्ग भला
पंचशीलाच तारील तुला गं, शेजारीण सखे बाई ।९।

या भूमीवर बुद्ध-कबीर-फुले-भीमराव ही जनजीवन फुलविणारी महान परंपरा आहे. अशा भूमीवर अंधश्रद्धा पसरवणाऱ्या भोळसट कल्पनांवर आघात करून विज्ञाननिष्ठेचे झणझणीत अंजन डोळ्यात घालणारी अशी ही रचना आहे. देवा दगडाच्या नावावर केले जाणारे शोषण, त्यातून वाढीस लागलेली अंधश्रद्धा , नवससायासाच्या खाईतून समाजजीवनाला बाहेर काढण्यासाठी बुद्धाचे 'पंचशील' तत्त्वच उपकारक ठरणार आहे. मनोरंजन आणि प्रबोधन ह्या दोहोंचा सुरेख संगम या रचनेत प्रत्ययाला येतो. थोडक्यात, बुद्ध-फुले-आंबेडकर या विचार परंपरेतून प्राप्त झालेली मूल्ये केंद्रस्थानी ठेवून आपल्या उद्‌बोधक रचना फुलविण्याचे आणि खुलविण्याचे कार्य लक्ष्मण केदार या कलावंताने सहजसाध्य केले.

✸ नागोराव पाटणकर (जन्मतारीख उपलब्ध नाही , मृत्यू १० सप्टेंबर १९७२)

नागोराव पाटणकर हे आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीतील मोठे कलावंत होते. पाटणकरांचे सारे कुटुंबच गायक होते. ''त्याच्या आईवडिलांनी भजनीमंडळ काढले होते. परंतु या भक्तिप्रधान अध्यात्मिक भजनी मंडळाला नागोरावांनी तडा दिला आणि 'नवनिर्माण गौतमी गायन पार्टी' काढली तेव्हापासून नागोरावांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारासाठी गायची प्रतिज्ञा केली.''[१५५] नागोराव पाटणकरांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सहवास लाभला होता. त्यांनी वयाच्या २२-२३ वर्षापर्यंत महाराजांसोबत खेडोपाडी फिरुन जनजागृतीचे कार्य केले. त्याच काळात त्यांनी 'एक तारा खंजेरी' हे नाटक बसविले होते. त्यातूनच त्यांनी आपल्या गायकांचा संच तयार केला. कवी-गायक-कव्वाल असे त्यांचे तिहेरी व्यक्तिमत्व होते.

हिंदुत्ववादी रुढी परंपरा, वाईट चालीरिती या विरुद्ध नागोरावांनी आपल्या काव्यातून आवाज उठवून लोकजागृती केली. लोकगीतांच्या माध्यमातून प्रबोधन केले. बाबासाहेबांचा आपल्या कवनातून गुणगौरव केला. तसेच आंबेडकरोत्तर काळातील विघटनाला कारणीभूत ठरलेल्या प्रवृत्तीवर सडेतोड टीका केली. दलितांमध्ये अस्मिता जागृत करण्याचे कार्य

त्यांच्या रचना आणि सादरीकरणातून पार पाडले. जुन्या रुढी परंपरा नाकारताना त्यावरचा इलाज म्हणजे बुद्धधम्म आहे असे ते सांगतात,

ऐक रे माझ्या मित्रा सोड खंडोबाजी जत्रा
मर्द असून मर्दा अंगाचा करीशी का खुर्दा
घेई बुद्धाची दीक्षा तोच करी तुझी रक्षा
नागनाथ विनवी तुला देई वचन मला
आतातरी जाऊ नको चुकुनिया जेजुरीला.. [१५६]

अतिशय साध्या सोप्या शब्दकळातून उपदेश करणाऱ्या त्यांच्या रचना आहेत. आंबेडकरी गुणगाण करताना ते म्हणतात,

भीमरायासारखा मला विद्वान पाहिजे
हल्ली या जगी असा गुणवान पाहिजे ।धृ।
जनतेचा वाली कोणी नसे ऐका बंधुनो
दुसऱ्यांचे शील राखण्या शीलवान पाहिजे ।।१५७

अतिशय उल्हसीत मनाने ते जयंती दिनाचे चित्र रेखाटतात,

आली आली भीमजयंती । हलवू मनाची आज भ्रमंती
दोघे मिळून जाऊ संगती । जनसमुदाय जमला विशाल गं
येतील सारे थोर पुढारी । प्रत्येकाची शैली न्यारी
बघ ती निघाली जनता सारी । भीमज्ञानाची घेऊनी मशाल गं[१५८]

भीमजयंतीच्या कार्यक्रमासाठी सारी जनता 'भीमज्ञानाची मशाल' घेऊन निघाली आहे. असे मनोज्ञ चित्र साकार झाले असून आपण त्यात लगबगीने सामील झाले पाहिजे असे आपल्या सखीला आवाहन केलेले दिसून येते. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर पुढाऱ्यांची नीतीमत्ता बदलत गेली त्याचेही वास्तव नागोरावांनी कवितेतून सांगितले आहे.

होता अमुचा एकच नेता
भीमरायाचा आसरा होता
स्वार्थी झाले सारे पुढारी
अन जय भीम बोले[१५९]

आंबेडकरोत्तर काळातील फाटाफुटीला, विघटनाला स्वार्थी पुढारीच कारणीभूत ठरले आहेत. जयभीमचा केवळ उदो उदो करायचा आणि आपला स्वार्थ साधून घ्यायचा अशा दांभिक पुढाऱ्यांवर टीकास्त्र सोडण्याचे काम नागोरावांच्या गीतांनी केले आहे.

नागोराव पाटणकर हे गीतकार म्हणून जसे परिचित होते त्याहीपेक्षा गायक आणि कव्वाल म्हणून फार लोकप्रिय होते. याच काळात इतरही गीतलेखक आणि गायक आपल्या सादरीकरणातून लोकजागृतीचे कार्य करीत होते. ज्यांनी एकापेक्षा एक सरस रचना लोकांपुढे सादर केल्या. त्यात प्रामुख्याने लक्ष्मण राजगुरु, लोककवी बी. काशिनंद, लोककवी उत्तम मुळे, लोकशाहीर विठ्ठल उमप या कलावंतांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल.

✹ लक्ष्मण राजगुरू : (१९३४)

लक्ष्मण सखाराम राजगुरू यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९३४ रोजी झाला. पुणे जिल्हयातील, शिरुर तालुक्यातील मालठण हे त्यांचे मूळ गाव. आंबेडकरी चळवळीत त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. १९५० पासून त्यांनी गीतलेखन आणि गायनास प्रारंभ केला. 'राजगुरू आणि संच' असे त्यांच्या गायनपार्टीचे नाव होते. गायन, लेखन हा पूर्णवेळ पेशा पत्करून आंबेडकरी चळवळीसाठी आयुष्य खर्ची घातले. निगर्वी, नि:स्वार्थी कलावंत म्हणून त्यांचा लौकीक होता.

'दीनांचा धनी' आणि 'बुद्ध भीमाची ओवी' या त्यांच्या गीतांना अमाप लोकप्रियता लाभली होती.

माझ्या खंबीर नेत्यानं , पाणी चाखलं तळ्याचं
त्यानं जिवाच्या पल्याड , केलं राखण मळ्याचं ।धृ।

बोधीसत्त्वाच्या तत्त्वाचं , खत टाकिलं मळ्यात
त्याला कुंपण घातिलं , बुद्ध धम्माच्या आळ्याचं. ।१।

बोध अमृत शिंपून मळा फुलविला त्यानं
नवजीवन घडविलं कोटी फुलांचं कळ्याचं ।२।

अष्टशीलाच्या कुपीत , असे भांडार ज्ञानाचं
भाग्य जागवी क्षणात , दीक्षा भूमीच्या खळ्याचं ।३।

साऱ्या विखुरल्या फांदया पानं लागली गळाया
नाही कुणी आता उरलं , भीमरायाच्या लळ्याचं ।४।

नऊ कोटीच्या संगतीने , राजगुरुने गळ्यात
बघा ताईत बांधिलं , भीम बुद्धाच्या नावाचं ।।५।।[१६०]

आंबेडकरी कर्तृत्व आणि बुद्ध तत्त्वज्ञानाच्या संदर्भात रूपकात्मक मांडणी केल्याचे येथे प्रत्ययाला येते. या गीतात सांगरूपकाचा वापर केला आहे. मळ्याचे रूपक वापरले आहे. शब्दाची नादमयता, ताल, नादमाधुर्य याचे नेमके भान राजगुरुंनी राखले आहे. तळ्याचं पाणी, बोधीसत्त्वाच्या तत्त्वाचं खत, धम्माच्या आळ्याचं कुंपण, बोधमृत शिंपून मळा फुलविण्याची कृती, कोटी फुलांच्या कळ्यांचं घडविलेलं नवजीवन या सर्व सांगरूपकाचे रूपांतर प्रतिकात होते. मळ्याचं रूपक पुढे 'आंबेडकर' या प्रतिकाची जागा घेते. आंबेडकरांच्या निर्वाणानंतरच्या काळातील भयाण विराणतेचं दर्शन त्यातून घडते. आंबेडकरी समूहाचा, प्रातिनिधिक भावनिक उद्‌गार लक्ष्मण राजगुरू यांनी प्रकट केला आहे.

'दीनांचा धनी' हे गीत सुद्धा प्रचंड लोकप्रिय ठरले. या रचनेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, कबीर, शिवाजी महाराज, गौतम बुद्ध या साऱ्या राष्ट्रपुरुष आणि त्यांच्या तत्त्वांचे सार लोकांच्या कानामनात भीनविले.

गरिबामंदी गरीब घरचा जन्मला एक हिरा
नाव तयाचं तुला सांगतो ऐकून घे शाहिरा
असा झालाच नाही कुणी , असा होणार नाही कुणी , दीनाचा धनी ।धृ।

पुढाऱ्यांमंदी पुढारी माझा भीमराव खंबीर
दीक्षा देऊन केलाय ह्या नऊ कोटींचा उद्धार
असा झालाच नाही कुणी .... ।१।...

मानवासाठी धर्म असावा नसावं नुसतं युद्ध
शांतीदूत अन् सत्यशोधक माझा गौतम बुद्ध
असा झालाच नाही कुणी.... ।५। [१६१]

भीमरायाचे खंबीर नेतृत्व, अस्पृश्यांच्या उद्धारासाठी झगडणारे म. फुले, सुभेदाराच्या सुनेला बहीण मानून सन्मान करणारे शिवाजी महाराज, ज्ञानाचा सागर असलेले संत कबीर, सत्यशोधक आणि शांतीदूत गौतम बुद्ध या सर्वांचे आदर्श लोकमनात रुजविण्याचे महान काम राजगुरू यांच्या गीतांनी केले आहे. आजही हे गीत आदर्शवत ठरणारे आहे. हे राजगुरू यांच्या गीतांचे सामर्थ्य आहे.

✸ लोककवी बी. काशीनंद: (१९३५)

बी. काशीनंद यांचा जन्म १९३५ साली झाला. पांढराबोडी, नागपूर येथे त्यांचे वास्तव्य होते. शिक्षण फारसे नव्हते. अशा या अल्पशिक्षित बी. काशीनंदांना नागोराव पाटणकरांचा सहवास लाभला होता. पाटणकरांनी त्यांची अनेक गीते गायीली आहेत. १९५६-५७ च्या दरम्यान बी. काशीनंदानी 'सिद्धार्थ गायन पार्टीची' स्थापना केली. आणि त्यावेळेपासून त्यांनी गायनाला सुरुवात केली. बुद्ध आंबेडकरांचा विचार हीच त्यांच्या गीतांमागील प्रेरणा आहे

विनम्र होऊन प्रारंभ करतो । आधी भीमाचे जयगान पहिले
तथागताच्या धम्माचा करून या । हसतमुखाने सन्मान पहिले[१६२]

अशी त्यांची भूमिका असून आपल्या गीतात वैकुंठ , व्यक्तीपूजा , देवादिकांना मुळीच स्थान नसल्याचे त्यांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून सांगितले आहे. त्यांच्या गीतातील आंबेडकरांचे व्यक्तिमत्व खालीलप्रमाणे आहे,

पाहून भीमाचं ज्ञान बोले इतिहासाचं पान
पंडित आणि विद्वान । सारे घाबरती गुणवान
माझ्या भीमाच्या नावानं- रं माझ्या भीमाच्या ।धृ ।[१६३]

प्रकांडपंडित आंबेडकर अशी प्रतिमा इथे साकार झाली आहे. त्याचप्रमाणे आंबेडकरांचा ताठ बाणा खालीलप्रमाणे पाहावयास मिळतो,

नाही नाही पटणार नाही, ही मनधरणी चतुराई
बोले ठासून भीम त्या ठायी
अशा दीडदमडीच्या पायी माझा समाज विकणार नाही.[१६४]

या स्वरूपांच्या बी. काशीनंदाच्या रचना त्या काळात फार लोकप्रिय झाल्या होत्या. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना मानाचे स्थान आणि स्वाभिमानाचे जीणे प्राप्त करून दिली. त्यामुळे लाचारीची रडगाणी गाणे आपल्या दृष्टीने अशोभनीय ठरते अशा प्रकारचा जिद्द आणि संघर्षाचा विचार त्यांच्या गाण्यांनी लोकांच्या मनात पेरला.

काय गातोस हे माझ्या मित्रा । लाचारीची ही रडकी गाऱ्हाणी
रक्त भीमाचे अंगात आहे । लाथ मारू काढू तिथे पाणी[१६५] (द शा /५९)

एकप्रकारे, त्यांच्या गीतांनी संघर्षातून यशस्वी होणारा आशावादच लोकांना शिकविला असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

आंबेडकरी लोकगीतांच्या परंपरेत **उत्तम मुळे** हे फार महत्त्वाचे गीतकार आहेत. ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गीतकार होते. उत्तम लक्ष्मणराव मुळे यांचा बुलढाणा जिल्हयात १९३४ साली अत्यंत गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांचे शिक्षण इयत्ता ६वी पर्यंत उर्दू भाषेतून झाले. त्यामुळे त्यांनी बहुतेक गीतरचना हिंदी भाषेतूनच केल्या आहेत. साधारणत: १९४९ -५० सालापासून त्यांनी गीतलेखनाला सुरुवात केली. त्यांच्या गीतांच्या कृष्णा शिंदे व सुरेश वाडकर यांच्या स्वरातील ध्वनिमुद्रिका व कॅसेट्स भारतातच नव्हे तर श्रीलंका , नेपाळ , ब्रह्मदेश , सिंगापूर , फिजी बेटे , रशिया इथल्या बौद्धधमीय जनतेत लोकप्रिय आहेत.

१. बुद्ध गौतम का संदेश जग को सुनाये
सत्य और शांती के आदर्श हम ना भुलाये..... [१६६]

२. न जातीभेद है कोई न उंच और नीचता के भाव
जुदा हर दोष अवगुण से तथागत बुद्ध का वो गाव [१६७]

३. मानवताके हक दिलवाकर , जीवन का तो दान दिया
दीक्षा देकर भीम ने हमको , मुक्ती का वरदान दिया[१६८]

ही मुळे यांची अत्यंत गाजलेली काही गीते. बुद्धाच्या संदेशानेच जगात सुख आणि शांतता प्रस्थापित होऊ शकते असा प्रचंड विश्वास त्यांच्या गीतांनी निर्माण केला. सामाजिक सुखदु:खाचे , सामाजिक विकृतीचे वास्तवही त्यांच्या गीतांनी मांडले आहे.

✸ शाहीर विठ्ठल उमप (१९३१ - २०१०)

शाहीर विठ्ठल उमप हे आंबेडकरी लोकगीतांच्या परंपरेतील एक मोठे नाव आहे. त्यांचा जन्म १५ जुलै १९३१ रोजी झाला. शिक्षण इयत्ता ६ वी पर्यंत झाले. वयाच्या आठव्या वर्षापासून गायनास सुरुवात केली. वयाच्या १६ व्या वर्षापासून उमपांनी गीत लेखनास प्रारंभ केला. प्रारंभी टपाल खात्यात नोकरी केली. पुढे पूर्णवेळ शाहिरी पेशा स्वीकारला. पहाडी आवाजाचा शाहीर असा त्यांचा लौकीक होता. अनेक मराठी चित्रपटातून त्यांनी अभिनय केला. विविध नाटकातून भूमिका केल्या. त्यांचे 'जांभूळ आख्यान' हे नाटक प्रचंड लोकप्रिय ठरले. 'माझी वाणी भीमाचरणी', 'उमाळा', 'रंग शाहिरीचे', 'माझी आई भीमाई' इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'फू बाई फू' हे आत्मकथनही प्रसिद्ध आहे. विठ्ठल उमप हे मराठीतील एक अग्रगण्य शाहीर होते.

हिंदूच्या देवदेवतांना नाकारणारी जाणीव विठ्ठल उमपांनी आपल्या गीतांतून व्यक्त केली आहे. कारण बुद्धाचा मार्ग बाबासाहेबांनी जीवनप्रणाली म्हणून दाखविला आहे. त्यामुळे सर्व गोष्टींची प्राप्ती झाली आहे.

हवे ते मिळाले नको मज अन्य सिद्धार्थाच्या सेवेने झालो धन्य
अहो त्या रामाला ठोकला राम राम
नको मजला अभंग तुकोबाचे । नको भक्तिगीत त्या विठ्ठलाचे
तेहतीस कोटी देवा दिला पूर्णविराम[१६९]

पारंपरिक भक्तीची परंपरा, देवदेवता, हिंदूचे तेहतीस कोटी देव या सर्व गोष्टीने दलित पीडितांना सांस्कृतिक गुलामगिरीत ढकलले. आत्मोन्नतीचे सर्व मार्ग त्यामुळे बंद झाले. बाबासाहेबांनी धम्म दिल्यामुळे दलितांच्या सांस्कृतिक जीवनाचे संदर्भच बदलून गेले, त्यामुळे या धम्माची जोपासना करणे हे आपले कर्तव्य आहे. अशी जाणीव या ठिकाणी व्यक्त केली आहे. ''पंचशील तत्त्वावर आजही भारत आपुला चाले'' असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या विश्वासाला तडा जाता कामा नये. आपल्या कृतीत सातत्य असले पाहिजे. धम्माचा भार वाहणे हेच खरे सत्कार्य आहे.

सत कामी नको आता खंड । आमुचे हे कार्य आहे उदंड
करू द्या वैऱ्या करिती पाखंड । आमच्या शिरावरी हा धर्मभार[१७०]

धम्मकार्याला प्राधान्य देणारी भूमिका येथे स्पष्ट होते. धम्मदाता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणामुळे दलितांचे जग शोकाकूल झाले. या शोकाकूल आणि चिंताग्रस्त स्थितीचे चित्र शहिरांनी रेखाटले आहे.

तुझ्या वाचून आम्हा जगी ना वाव
कसा लागेल आता निभाव ।धृ।
गेला कुठे तू कोण्या राऊळी । दलित जनता झाली बावळी
वासरा सोडूनी माऊली । गेली हंबरती धाव भीमाई धाव[१७१]

या अवस्थेतून , मन:स्थितीतून समाज बाहेर पडला पाहिजे. कारण आता बाबासाहेब नसले तरी त्यांनी दिलेला विचार आचाराचा मार्ग आपल्याजवळ आहे. त्या मार्गाने वाटचाल करणे हेच आपले कर्तव्य ठरते असा सांत्वन आणि समजुतीचा स्वर त्यांनी आळविला आहे.

दु:ख गेले पूज्य बाबांच्या सवे । टाक पुसून आता ही आसवे ।धृ।
नको दु:खाची ओलांडू सीमा । ह्या तम कृत्याची जहाली सीमा .....
निष्ठूर जग हे आज उदयाचे । देईल आवाहन तुजला युद्धाचे
धर्मचक्र बुद्धाचे , हाती हवे[१७२]

दु:खात आकंठ डूबून आसवे गाळण्यात आता काही अर्थ नाही कारण बाबांसोबतच दु:खही गेले आहे. उद्याच्या निष्ठूर जगाशी दोन हात करायचे आहेत. त्यासाठी आपल्याकडे बुद्धाचे 'धर्मचक्र' हेच एकमेव हत्यार आहे. याचे भान बाळगण्याचे आवाहन शाहिराने केले आहे. शाहीर विठ्ठल उमप हे आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या पहाडी आवाजाने लोकप्रबोधनाचे, लोकजागृतीचे कार्य करीत राहिले. बुद्ध आंबेडकर हा त्यांच्या जीवनाचा ध्यास आणि श्वास होता. त्यामुळे 'जयभीम', 'जयबुद्ध' असा जयघोष करीतच ते नागपूरच्या दीक्षाभूमीवर मृत्यूला सामोरे गेले!

आंबेडकरी लोकगीताच्या परंपरेत प्रामुख्याने वामन कर्डक ते प्रतापसिंग बोदडे अशी एक मोठी परंपरा सांगता येते. या परंपरेतील काही गीतकारांच्या गीतांचा परामर्ष घेऊन स्पष्टीकरण करता येईल. भगवंत चोपडे , हरेंद्र जाधव , पांडुरंग वनमाळी, प्रभाकर गवई, गोपीनाथ मिसाळ, विद्यानंद गायकवाड, दत्तात्रय खडताळे , हृदयनाथ सिन्नरकर , विष्णू डांगे, किसन खरात, राम मोरे, राजस जाधव, कुंदन कांबळे, प्रभाकर पोखरीकर, अनिल भारती, वसंत मोरे, धरमदास मोहिते, गौतम सुत्रावे, रविचंद्र हडसनकर अशा अनेक गीतकार आणि गायकांनी या परंपरेत मोठे योगदान दिले आहे. यापैकी अनेकांच्या रचनांमधून पारंपरिक रचनांचा प्रभाव, संस्कृतप्रचुरतेचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. उदा.

१. वाळूमध्ये सुवर्ण सोज्वळ रत्न सागरात
तसा चमकशी सदास्वतेजे तू या देशात
जन क्षुब्धार्ण व जरी धरी तव वाट आडवून
तरी तव धैर्या, तव शौर्या ये भर ओसांडून[१७३]
(**नारायण रामचंद्र मोरे**)

२. भूतो न भविष्यती अवतार झाला । नवजीवन दिले आम्हाला
पुनर्जन्म दिला अस्पृश्यांना
श्रमिक जना आनंद विनवी । मानावा भीम ईश्वर मनी
जय , जय , जय , जयभीम बोला[१७४]

पहिल्या रचनेत संस्कृतप्रचुरतेसह अवतार, ईश्वर ह्या पारंपरिक संकल्पनांचे उपयोजन झाल्याचे प्रत्ययाला येते. दुसऱ्या रचनेत संस्कृतप्रचुरतेसह अवतार, पुनर्जन्म, ईश्वर या पारंपरिक संकल्पनांचे उपयोजन झाल्याचे प्रत्ययाला येते.

मानवतेचा जो हत्यारी धर्म नव्हे तो नच कैवारी
परमेशाची सर्व लेकरे तिथे न परका भाव
जय हो भीमराव , जय भीमराव..... [१७५] (**संजीव**)

आंबेडकरांचा जयघोष करतानाच ईश्वरशाही जोपासणाऱ्या संकल्पनेचा वापर केलेला दिसतो. **प्रभाकर पोखरीकर** यांनी 'सोनबा'ची कथा आपल्या गाण्यातून सांगितली आहे.

हे पाणी आणिले मी माठ भरुनी । हे पोटभर जा हो पिऊनी ।धृ।
जीव जीवात होता त्याचा तोवर । तो प्राण सोडिला बाबा म्हणूनी
हे घोटभर जा हो पिऊनी .....[१७६]

पनवेलच्या नाक्यावर पाण्याचा माठ घेऊन , डॉ. बाबासाहेबांची प्रतिक्षा करीत जीव सोडणारा 'सोनबा येवले' यांची ही कथा आहे. मात्र इतिहासात सोनबा येवले किंवा त्यांचे नातेवाईक, वारसादार यांची नोंद आढळत नाही. या कथेबाबत नेमके पुरावे मिळत नाहीत.

बंधूमाधव यांनी डॉ. आंबेडकरांना बुद्धाचा अवतार म्हटले आहे.

बुद्धाचा अवतार जगी तू बुद्धाचा अवतार
जगी लाभला जणू दुजा की बुद्धाचा अवतार[१७७]

'बुद्धाचा अवतार' या रचनेत राम , कृष्णापासून सिद्धार्थ , लेनीन , लिंकन , मार्क्स इ. अनेक संदर्भ आले आहेत. या जगात कोणी दीनांचा दरबार भरविला , तर कोणी गुलामीचा बाजार बंद केला , कोणी साम्यवादाचा संभार केला या साऱ्यांत मानव्याचे संस्कार, पशुपातळीवर जगणाऱ्या माणसाला 'माणसा'त आणण्याचे काम केले ते मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी! असे बंधुमाधवांनी स्पष्ट केले आहे.

डॉ. बाबासाहेबांनी धम्मचक्र गतिमान केले म्हणजे 'गतजन्माची ही पुण्याई आज आली फळाला' असे **साहेबराव कोकाटे**[१७८] यांनी आपल्या गीतात म्हटले आहे. तर **दत्तात्रय खडताळे** दलित जगाला आर्ततेने आवाहन करतात,

बाबांच्या लाडक्या मुलांनो घर हे सोडू नका
भीमाची आज्ञा मोडू नका..... ।धृ।
काडी काडी जोडून जोडून घरटे हे बनविले
पित्यापरी सांभाळिले अन् हक्क मिळवुनी दिले
घट ज्ञानाचे स्वाधीन केले घट ते फोडू नका ।१।[१७९]

एकजूटीने राहण्याचे हे आवाहन आहे. आंबेडकरी ज्ञानशक्तीची जोपासना करावी आणि यशाचे शिखर चढणारांना मागे ओढू नका असेही आवाहन करण्यात आले आहे.

ज्ञानेश पुणेकर आपल्या गीतातून डॉ. बाबासाहेबांच्या जन्मापासून निर्वाणापर्यंतचा प्रवास चित्रित करतात. आंबेडकरी लढयाचे चित्र ठळखपणे रेखाटतात.

क्रांतिवीर महापुरुष जन्मा आले धरतीवर । धन्य ते भीमराव आंबेडकर

असा उद्घोष त्यांनी केला आहे. चवदार तळ्याचा सत्याग्रह हा जलशापासून लोकगीतापर्यंत सर्वांच्याच आस्थेचा विषय ठरला आहे. आंबेडकरांच्या या क्रांतीकारक कृतीशीलतचे विविध परिणाम अधोरेखित झाले आहेत. उदा.

१. जवा चवदार तळ्याचं पाणी चाखलं
भीमापुढे कर्मठांनी डोकं टेकलं [१८०]
(**धरमदास मोहिते**)

२. नाशिक महाड येथे वर्णलढे गाजले
दलितांच्या एकतेसमोर शत्रू वाकले [१८१]
(**अनिल भारती**)

✸ शाहीर प्रभाकर गवई

शाहीर प्रभाकर दगडू गवई यांचा जन्म बुलढाणा जिल्हयातील भादोला या गावी झाला. १९५० साली त्यांनी 'आंबेडकर ध्येयवादी कलापथकाची' स्थापना केली. भादोलेकरांचे कलापथक म्हणून ते महाराष्ट्राला परिचित होते. या कार्यात त्यांना गोपीनाथ मिसाळ यांची मोठी साथ मिळाली होती. या शाहिराच्या शाहिरीने दलित जनतेला आंबेडकरी प्रयत्नवाद शिकविला.

प्रयत्नवादी हो दलिता , दैववादी तू होऊ नको
फुटली दिशाही तांबडी , रणशिंगा तू विसरू नको ।।[१८२]

दैववादाला नाकारणारी जाणीव येथे स्पष्ट झाली असून संघर्ष अपरिहार्य आहे असे शाहिराने सूचित केले आहे. बाबासाहेबांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर हिंदुत्ववाद्यांचे पित्त खवळले. त्यांनी बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे असा प्रचार सुरू केला. लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. हे दांभिकपण चव्हाटयावर मांडण्याचा प्रयत्न शाहिराने केला आहे.

जगन्नाथपुरीचा भगवान बुद्ध बनविला तुम्ही जगन्नाथ

सांगा आजच्या काळात देईल का कुणी साथ ?
भगवान बुद्ध विष्णूचा अवतार । अशी जगाला दिली भूलथाप
खऱ्यांचं खोटं खोटयाचं खरं । उघडकीस आलं आपोआप
कवित्व हे लाखमोलाचं । आहे त्या गवई - मिसाळाचं[१८३]

शाहीर गवई - मिसाळ यांनी वामनदादाचे शिष्यत्व पत्करले होते. वामनदादासारख्या महान कलावंताने आपल्या शिष्याचे कौतुक करावे यातूनच या शाहिरांच्या कार्याचे मोठेपण सिद्ध होते. वामनदादा म्हणतात,

भादोला गाव आहे बुलढाण्या शेजारी । संसारी लोक इथले सत्याचे पुजारी
गाणारे दोन बंधू गवई - मिसाळ । वृत्तीने शांत आणि वाणीने रसाळ
प्रभाकर शाहीर होता जगाला जाहीर । वामनाचा चेला होता स्वत:ही शाहीर [१८४]

आंबेडकरी विचारांचे मर्म लोकांना समजावून सांगण्यासाठी गवई - मिसाळांनी आपली हयात खर्च केली.

पांडुरंग वनमाळी यांची गीते दलितांना आवाहन करणारी आहेत. दलितांनी एकजुटीची मशाल हातात घेऊन भीमरायावर गुलाल उधळावा , स्वाभिमान जागा ठेऊन सवर्णांना धडा शिकवावा असा संदेश त्यांच्या गीतांनी दिला आहे. तसेच भीमजयंती थाटामाटात साजरी करताना गाजत गर्जत बाबासाहेबांना मानवंदना द्यावी असेही आपल्या गीतातून सांगितले आहे.

भीमाबाईने भीवाला जन्म दिला आणि आपली नणद मीराबाई यांचेकडे भीवाला स्वाधीन करून प्राण सोडला. ही हृदयद्रावक कथा **हृदयनाथ सिन्नरकर** यांनी आपल्या गीतातून सांगितली आहे. तर **कुंदन कांबळे** यांनी आपल्या गीतातून भीमाने गाजवलेल्या सभेचे वर्णन केले आहे.

सिंहगर्जना अशी गर्जला भेदून उठली नभा
बलदंड ठोकुनी उभा भीमानं अशी गाजवली सभा [१८७]

या सभेचे वर्णन करतानाच डॉ. आंबेडकरांनी रुढीचा खुबा मोडणे, वैऱ्यांच्या विखारी जिभा छाटणे, समतेचे हक्क प्रदान करणे, बाबासाहेबांपुढे विरोधकांचे मस्तक झुकणे अशी आंबेडकरी कृतीशीलता स्पष्ट केली आहे.

प्रतापसिंग बोदडे[१८६] यांनी आपल्या गीतातून भीमाच्या कमाईचा गौरव केला आहे. या कमाईबद्दल समाधानाची तृप्तीची भावना व्यक्त केली आहे. या कमाईत रमाईनेही भीमाला साथ दिली आहे. भीमाने विलायतेला जाऊन पूर्ण केलेले शिक्षण, सामाजिक संघटन, शिक्षणामुळे दलितांना प्राप्त झालेली मानसन्मानाची पदे, धम्मामुळे दलितांच्या जीवनात प्राप्त झालेला नवप्रकाश ही सारी भीमाच्या कमाईची फळं आहेत. म्हणून या कमाईचा गौरव करताना ते म्हणतात,

माझ्या भीमाची ही कमाई सारी माझ्या भीमाची
हीच कमाई जगात ठरली पहिल्या क्रमाची ।धृ।
दूर देशात जाऊन , तिथं उपाशी राहून
दीप ज्ञानाचा घेऊन , आला उजेउ घेऊन
जगात किर्ती गाती ऐशा पुरुषोत्तमाची ।।२।।

धम्म देऊन आम्हास , केला आमचा विकास
बोले भूमीशी आकाश , आला नवप्रकाश
कमाल झाली फळे मिळाली , त्याच्या श्रमाची ।।५।।
माझ्या भीमाची....

हरेंद्र जाधव[१८७] यांनी अतिशय मौलिक स्वरूपांच्या रचना आंबेडकरी समाजास दिल्या आहेत. त्यांनी रूपकात्मक मांडणी केली आहे. वामनदादा , लक्ष्मण राजगुरू यांच्या रचनेत यापूर्वीच मळ्याचे रूपक येऊन गेले आहे.

हरेंद्र जाधवांच्या कवित्वातही हे रूपक खालीलप्रमाणे येते

लयास गेली युगायुगाची हीन - दीन अवकळा
पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा ।धृ।
रानमाळ असता भीमाने देह इथे झिजविला
शिंपडून रक्ताचं पाणी शिवार हा भिजविला
बहरली कणसं इमानी माणसं नाचतो जोंधळा ।१।
त्रिसरणाची झडप तयाला कुंपण पंचशिला
बुद्धं सरणं मार्ग एक हा जाण्यासाठी भला
मिटते भ्रांती , मिळते शांती , खुलते जीवनकळा ।२।
बोधीवृक्ष हे डुलती कैसे बांधा बांधावरी
गोड लागते सावली तया जीवनाची भाकरी
मळा हा राखू फळे ही चाखू झरा बाजूला निळा ।३।
कोल्हेकुई ही कुपाकुपानं चाले बाहेरुन
दुहीचा कुंदा वरती डोके काढितो आतून
हरेंद्रासंग धरुया दोघं हाती एकीचा विळा ।४।

या गाण्यातील निसर्ग घटक विचारप्रणालीशी जोडूनच प्रकट होतात. त्यातून विचारविश्व आणि अर्थाची व्यापकता सिद्ध होते. प्रतिमांना लगडलेल्या अर्थाच्या व्याप्तीमुळे एक वेगळेच सौंदर्य या काव्याला प्राप्त झाले आहे. निसर्ग प्रतिमा, रंगसंगती, रस, रंग, गंध, रूप, ताल, नाद, या सर्व घटकांची समृद्धी या काव्यात आहे. रानमळा, शिवार, रक्ताचं पाणी, जोंधळा, पंचशीलेचे कुंपण, त्रिसरणाची झडप, बांधावर डोलणारे बोधीवृक्ष, निळा झरा, या प्रतिमासृष्टीसोबतच शोषक व्यवस्थेचे प्रतीक असलेला 'कुंदा' ही आहे. डोके वर काढणाऱ्या कुंदयाचा नायनाट करण्याचा उपाय म्हणजे 'एकीचा विळा' हाती घेणे हाच आहे. अशाप्रकारे एकजुटीचे महत्त्व, संघटित शक्तीचे महत्त्व विशद करण्यात आले आहे. या रचनेत रूपकाचे रूपांतर प्रतीकात होते. अतिशय वैशिष्टयपूर्ण अशी ही रचना आहे. हरेंद्र जाधव यांची गाजलेली आणखी एक रचना म्हणजे 'बाबासाहेब आंबेडकर'

हे खरंच आहे खरं, श्री. भीमराव रामजी आंबेडकर
बाबासाहेब आंबेडकर नाव हे गाजतय हो जगभर ।धृ।.....
जातीभेदाच्या तोडिल्या तोफा । मार्ग सत्याचा दाविला सोपा
आम्हा बांधून ठेवलाय खोपा । बौद्ध धम्माचा टांगलाय सोपा
जाणून महती , सुखानं जगती दलितांची लेकरं ।२।[१८८]

या रचनेत विविध आंबेडकरी प्रतिमा साकार झाल्या आहेत. अंधरूढीला, गुलामीला कातर लावणारा, धम्माच्या खोप्यात दलितांना सुरक्षित ठेवणारा, नवज्ञानाचा रवी, अशी अनेक प्रतिमारूपे साक्षात झाली आहेत.

अनेक कवी, गीतकारांनी अनेकरूपी आंबेडकरी प्रतिमा सिद्ध केल्या आहेत. 'होता तो भीम माझा कोहीनूर भारताचा' (विष्णू डांगे), 'होतास दु:खितांचा सन्मित्र सोबती तू' (रंगराज लांजेवार), 'प्रज्ञामय तू हिमाचल' (विद्यानंद गायकवाड). 'आकाशगंगेच्या पटावर, हिमालयाच्या शुभ्र तटावर अन् प्रचीच्या लल्लाटावर, प्रतिमा ही रंगते.' (भगवंत चोपडे), 'बलिदानाचे कफन बांधूनी झिजला तू भीमराया' (राम मोरे) 'दलितांच्या दीपा तू मानवता रूपा' (शांताराम नांदगावकर), 'शोषितांच्या अस्मितेचा जागता अंगार तू' (भागवत बनसोडे), 'त्या सिंहाच्या छाव्यानं नाही बाळगलं भ्याव' (राजस जाधव), 'कोटी कोटी जनतेचा तू मार्गदीप आहे' (रंगराज लांजेवार) 'प्रज्ञाशील करुणेची भीम खाण होता ' (प्रशांत अम्बादे), अशाप्रकारे एखादया महापुरुषाचे शेकडो पैलू विविध पद्धतीने प्रतिमाबद्ध व्हावेत. असे भारतीय कवितेत यापूर्वी घडलेले नाही.

✸ बुद्धगीते

धम्मस्वीकारानंतर बुद्धगीतांना मोठाच बहर आला. त्यातही वामनदादा आघाडीवर होते. त्यांच्यासह श्रीधर ओहोळ, गौतम सुत्रावे, अनिल भारती, राजस जाधव, राजा ढाले, ग. रा. पालकर, शांताराम नांदगावकर, विष्णू डांगे, मनोहर जाधव, रंगराज लांजेवार अशा अनेक गीतकारांचे योगदान लाभले आहे.

१. त्रिशरणाची मंगलवाणी , घुमते मंगलधामी
बुद्धं शरणं गच्छामी , धम्म शरणं गच्छामी , संघं शरणं गच्छामी ।धृ।
ना शोध कुणाचा उसना , दु:खाचे कारण तृष्णा
तोड तयावर सांगून गेला महान अंतर्यामी ।३।
आली रे संधी नामी , सांगितले वामनला मी
उचल पोतडी पंचशीलेची, येईल अपुल्या कामी ।५।
(**वामन कर्डक**)

२. त्या पिंपळपारावर राजगृहापरी सुंदर
ध्यानस्थ आसनावर बसविला भीमभास्कर
दर्शनास नारी नर येतील गडे दिनभर
लगबगीनं तुम्ही जागं पूजा गं[१९०]
(**वामन कर्डक**)

सर्वसामान्यांच्या लौकीक जीवनातील प्रतिमा प्रतिकांची निवड हे वामनदादांच्या रचनाशैलीचे खास वैशिष्टये आहे. परिचित असणारी, तितकीच वैविध्यपूर्ण, अडाणी, निरक्षर लोकांना सहजपणे अवगत होणारी प्रतिमासृष्टी व्यापक अर्थाने सिद्ध होते. 'पंचशीलेची पोतडी ' 'पिंपळपार ' ह्या प्रतिमामुळे बुद्ध तत्त्वज्ञानातील पंचशील, बोधीवृक्षाखाली बुद्धाला प्राप्त झालेले ज्ञान अशा बाबी डोळ्यासमोर सहजपणे साकार होतात. बुद्धासंस्कृतीचा पट श्रोत्यांच्या नजरेसमोर साकार करणे हे उद्दिष्ट वामनदादांच्या बुद्धगीतानी पूर्णत्वाला नेले आहे.

आचाराविण विचार वाया , व्यर्थ असे ते ज्ञान
बोध हा बुद्धाचा तू जाण ।धृ।
पंचशील अन् प्रज्ञा करुणा , मनुजाचे हे भूषण जाणा
त्रिसरणाला तसे जीवनी आहे अग्रस्थान ।१।[१९१]
(**गौतम सूत्रावे**)

नुसते विचार मांडून चालत नाही तर विचाराला आचाराची जोड मिळणे अगत्याचे असते. हाच बुद्धाचा मौलिक विचार आहे. बुद्धतत्त्वज्ञानातील प्रज्ञा , शील , करुणा , अष्टांगमार्ग मानवतावाद अशा विविध तत्त्वांचा उद्घोष सुत्रावे यांच्या विविध रचनांमधून झाला आहे. 'कणाकणांनी ज्ञान वेचुनी प्रबुद्ध हो मानवा' असा उद्घोष करताना प्रज्ञेचा प्रकाशच माणसाला नवा मार्ग दाखविल असा बुद्धाचा विचार ते स्पष्ट करतात. आणि

मनोभूमीतून पुन्हा रुजावा बोधीवृक्ष हा पुन्हा
त्या शाखेची शीतल छाया लाभावी बहुजना
करुणाप्रेरित कार्य तुझे हे संजिवन दे जिवा प्रबुद्ध हो मानवा...[१९२]

अशी अभिलाषा व्यक्त करण्यात आली आहे. 'अमृवाणी ही बुद्धाची ' हे सुत्रावे यांचे गीत फार लोकप्रिय ठरले. त्यांची सर्व बुद्धगीते अतिशय दर्जेदार आहेत. बुद्धाच्या गृहत्यागापासून ज्ञानप्राप्तीपर्यंतचे अनेक टप्पे बुद्धगीतातून मुखरीत झाले आहेत. उदा.

वैर जिंकावे प्रेमाने युद्धाने वाढते युद्ध

शाक्य कोलिय संघर्षी ते वदले गौतम बुद्ध ।धृ।
नदी रोहिणी पाण्यासाठी वाद तो शाक्यांचा
संघ घेई बहुमताने निर्णय युद्धाचा
हिंसाकारक त्यांच्या मतांना गौतम करी विरोध , शाक्य कोलिय... ।१।
संघाचा तो नियम मोडता भोगी स्वत: शिक्षा
वचनासाठी घेती शांतीने परिव्राजकाची दीक्षा
सर्व सुखाचा त्याग करूनी सत्य केले सिद्ध शाक्य कोलिय... ।२।
मानव दु:ख हराया केली घोर तपस्या वनी
ज्ञानसूर्य हा देई जगाला धम्म खरा जीवनी
सत्य, अहिंसा, आणि शांतीचा करूनिया बोध शाक्य कोलिय.।३।[१९३]

बुद्धाच्या गृहत्यागाला कारणीभूत ठरलेल्या घटनेचे चित्र येथे साकार झाले आहे. युद्धाने युद्ध वाढते म्हणून प्रेमाने वैर जिंकावे असा बुद्धाचा संदेश आहे. बुद्धाचा गृहत्याग हा त्याने पाहिलेल्या तीन घटना म्हणजे प्रेतयात्रा , जराजर्जरता इ. अशा गोष्टीपुरता मर्यादित नव्हता. तर मानवी जीवनातील मूलभूत गोष्टीचे , दु:खाचे निराकारण कसं करता येईल हा बुद्धापुढील मुख्य प्रश्न होता. त्यासाठी रोहिणीचा संघर्ष हे निमित्त ठरले. अवैदिक परंपरा नव्याने मांडण्याचा प्रयत्न बुद्ध गीतानी केला आहे. यज्ञ संस्थेच्या विरोधातून, कर्मकाडांच्या विरोधातून बुद्धतत्त्वज्ञान उदयास आले. निरीश्वरवादी, विज्ञाननिष्ठ असे बुद्धाचे तत्त्वज्ञान आहे. दास्यमुक्तीचा मार्ग या तत्त्वज्ञानाने दाखविला आहे.

येथे समानतेचा तू दीप पाजळोनी
गेलास मानवाला तू दास्यमुक्त करुनी ।धृ।
प्रतिपादिलीस सत्ये तू मर्त्य मानवाला
निर्वाण मार्ग तुची जगतास दाविलेला
जगलास या युगाचा प्रेषित म्हणूनी ।३। [१९४]
(**रंगराज लांजेवार**)

बुद्ध या युगाचा प्रेषित होता अशी कवीची भावना आहे. सुखाचा त्याग करून प्रेमाचे दान करणारा असा हा बुद्ध आहे. म्हणून,

जीवनातल्या मंदिरी बांधा पूजा समतेची
अनुसरा शिकवण बुद्धाची ।धृ।[१९५]
(राम मोरे)

असे आवाहन बुद्ध गीतातून करण्यात आले आहे. कारण

युगे युगे आम्ही होतो अंधारात । दूर होता गाव चुकलेली वाट
अशावेळी एक अहिंसेचा तारा । पुरवी आम्हाला प्रकाशाची धारा
दूर झाली तेव्हा निराशेची खंत ।१। [१९६]
(अनिल भारती)

आमच्यासाठी दयेचा सागर असलेला त्राता एकच आहे तो म्हणजे गौतम बुद्ध. अशा प्रकारचा विश्वास बुद्धगीतातून प्रकट झाला आहे. खालील काही रचना बुद्ध आणि बुद्धतत्त्वांचे मर्म स्पष्ट करतात,

१. ज्ञान देऊनी अज्ञानाचा दूर करी अंधार
बुद्ध हे बुद्धीचे भांडार ।धृ।[१९७]
(ग. रा. पालकर)

२. तथागताची अमृतवाणी, नित्य घडवी जीवनलेणी
समता, ममता, करुणा, क्षमता तृष्णेला तोडी[१९८]
(रविचंद्र हडसनकर)

३. शोधिता मानवी कल्याण अंती परि तो भाव जाणून
अंतरी त्यागच तो भरला शांतीचा ध्यास मनी धरला
बुद्ध जगी वंदनीय ठरला[१९९]
(विश्राम भिवंदे)

४. शांतीसाठी सिद्धार्थाने त्यागियला संसार
घालविण्या ह्या जगतामधले तमगुण क्रोधांगार [२००]
(मनोहर जाधव)

अशाप्रकारे, बुद्ध आणि त्याचे तत्त्वज्ञान हे अज्ञानाच्या अंध:कारावर मात करणारे आहे. तृष्णेवर मात करण्याचा मार्ग दाखवणारे , नवी जीवनलेणी घडवणारे , मानवी कल्याणाचा मार्ग दाखवणारे, क्रोधांगार घालवणारे असल्याचा निर्वाळा बुद्धगीतांनी दिला आहे.

एकंदरीत, आंबेडकरी चळवळीत बुद्धगीतांचे फार मोठे योगदान आहे. बुद्धाचा आदर्श जनतेसमोर ठेवण्यात ही बुद्धगीते यशस्वी ठरली आहेत. बुद्धतत्त्वांची मूलतत्त्वे लोकांच्या कानामनापर्यंत भीडवण्याचे महान कार्य या गीतांनी केले आहे.

आंबेडकरी लोकगीते, बुद्धगीते लिहिणारे सर्व गीतकार हे गायक होते असे नव्हे. ही लोकगीते लोकांच्या कानामनापर्यंत पोचविण्यासाठी अनेक गायककलावंताचे, कलापथकातील कलावंतांचे, खेडयापाडयातील भजनी मंडळ्या आणि त्यातील सारे कलावंत, म्युझिक आणि कॅसेट कंपन्या या साऱ्यांचेच मोठे योगदान लाभले आहे. 'आंबेडकरी लोकगीते' (संपा. बबन लोंढे) या ग्रंथात ज्या लोककलावंत गायक - गीतकारांची सूची देण्यात आली आहे. त्यात जवळपास ४६१ कलावंताचा नामनिर्देश करण्यात आला आहे. आंबेडकरी चळवळीसाठी ज्या कलावंतांनी स्वत:ला वाहून घेतले होते त्यात प्रामुख्याने वामन कर्डक, श्रावण यशवंते, गोविंद म्हशीलकर, प्रल्हाद शिंदे, कृष्णा शिंदे, नागोराव पाटणकर, विठ्ठल उमप, भिकाजी भंडारे, प्रतापसिंग बोदडे, किसन खरात, पांडुरंग वनमाळी या सर्व गायकांनी आंबेडकरी लोकगीते चळवळीचा भाग म्हणून लोकांपर्यंत आपल्या सादरीकरणातून पोचविली. त्याचप्रमाणे सुलोचना चव्हाण, अजित कडकडे, पुष्पा पागधरे, उत्तरा केळकर, सुरेश वाडकर, येसूदास, सोनु निगम, आनंद शिंदे , मिलिंद शिंदे, भीमराव पांचाळे आदीनी तुरळक प्रमाणात व्यावसायिकतेचा भाग म्हणून बुद्धभीमगीते गायीली आहेत. या सगळ्यांचेच योगदान मान्य केले पाहिजे.

समारोप

येथवरच्या सर्व चर्चेच्या अनुषंगाने आंबेडकरी लोकगीतांच्या संदर्भात पुढीलप्रमाणे निष्कर्ष मांडता येतील.

आंबेडकरी लोकगीतांचा १९४५ - १९७० हा कालखंड बहराचा कालखंड म्हणता येईल. दलित कवितेच्या उदयानंतरही ही लोकगीते वेगवेगळ्या माध्यमातून सादर होत राहिली. आजही ऑर्केस्ट्रा, सीडी , कॅसेट्सच्या माध्यमातून ऐकायला मिळतात. बुद्ध- फुले-आंबेडकर या विचारपरंपरेतून प्राप्त झालेली मूल्ये केंद्रस्थानी ठेवून आंबेडकरी लोकगीतांची निर्मिती झाली आहे. आंबेडकरी लोकगीतांचा आविष्कार आंबेडकरी चळवळीला समांतर आहे. किंबहुना तो चळवळीचाच एक भाग आहे.

प्रबोधन, लोकजागृती हे या गीतांचे उद्दिष्ट आहे. आंबेडकरांचा विचार, उपदेश, शिक्षणापासून धम्मापर्यंतचा विचार आणि प्रचार प्रसार करण्याचे कार्य या गीतांनी पार पाडले आहे. आंबेडकरी लोकगीतांनी वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण आविष्कार केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र आणि चारित्र्य नितळपणे शब्दांच्या माध्यमातून मांडण्याची एक नवी रीत या गीतांनी घालून दिली. साध्यासोप्या शब्दकळेतून स्फुर्तीप्रद आशय पेरला. दलितांमध्ये अस्मिताजागृती करण्यासाठी आंबेडकरी चळवळीच्या धगधगत्या इतिहासाची आठवण वर्तमानपिढीला करून देण्याचे कार्य या गीतांनी केले आहे.

दलितांच्या वाट्याला आलेले दु:ख, दैन्य, दास्य, याचे मूळ हिंदू धर्मात असल्याचा निष्कर्ष या गीतांनी मांडला आहे. स्वकीयांना नवी उभारी देण्याचे, सामाजिक क्रांतीचा विचार जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य केले. दलित-अस्पृश्यांच्या कठोर वास्तवाचे दर्शन घडविले आहे. सामाजिक क्रांतीसाठी संघटित संघर्षाची अपरिहार्यता प्रकट केली आहे. सर्वसामान्य, अडाणी, निरक्षर जनतेच्या मनात परिवर्तनासाठी पेटून उठण्याचा विचार अधोरेखित केला आहे. धर्माच्या संदर्भात प्रश्न उभे केले आहेत. गुलामीमागील कार्यकारणभाव शोधला आहे. जुन्या रुढी परंपरा, देवदेवतांना नाकारणारी प्रखर जाणीव व्यक्त केली आहे. दलितांमध्ये लढाऊ बाणा निर्माण केला. संघर्षातून यशस्वी होणारा आशावाद शिकविला. आंबेडकरी संघर्ष आणि प्रयत्नवाद जनतेला शिकविण्याचे महान कार्य या गीतांनी पार पाडले आहे.

डॉ.आंबेडकरांचे चरित्रघटक, आंबेडकर जयंती, धम्मस्वीकार, धम्मस्वीकारानंतरचे सांस्कृतिक स्थित्यंतर, महापरिनिर्वाण, आंबेडकरोत्तर काळातील विघटन-विभाजन इत्यादी ठळक विषय आंबेडकरी लोकगीतांनी हाताळले आहेत.

गीतकारांनी आपल्या गीतातून ब्राह्मणी कावेबाजपणाचे रूप बेडरपणे स्पष्ट केले आहे. तसाच आत्मटीकेचा सूरही आळविला आहे. आत्मटीकेतून चळवळीच्या अंतर्विरोधाचे वास्तव स्पष्ट केले आहे. हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. या गीतांनी समकालीन सामाजिक राजकीय निष्क्रियतेवर भाष्य केले आहे. सामाजिक स्थिती आणि स्थित्यंतराचे स्वरूप स्पष्ट केले आहे. आंबेडकरोत्तर काळातील विघटन, गटातटाचे राजकारण यावर सडेतोड टीका केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण हा अनेक गीतकारांच्या गीतांचा विषय झाला आहे. डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणामुळे निर्माण झालेल्या शोकाकूल स्थितीगतीचे, दलितांच्या भावभावना आणि मानसिकतेचे चित्र साकार झाले आहे. हृदय पिळवटून टाकणारे, श्रोत्यांची मने व्यथीत करणारे हे शोकदर्शन गंभीर परिणाम साधणारे आहे.

काही गीतकारांनी आपल्या रचनांमधून कथारूप आविष्कार घडविला आहे. काही गीतांवर पारंपरिक रचनांचा प्रभाव स्पष्टपणे प्रत्ययाला येतो. काही गीतकारांनी डॉ. आंबेडकरांसाठी अवतार, ईश्वर अशा संकल्पनांचे उपयोजन केले आहे. पुनर्जन्म, ईश्वरशाही जोपासणाऱ्या पारंपरिक संकल्पनाचाही वापर केला आहे.

या लोकगीतातील रूपकात्मक रचना वैशिष्टयपूर्ण ठरल्या आहेत. या संदर्भात वामन कर्डक , राजानंद गडपायले, लक्ष्मण राजगुरु, हरेंद्र जाधव या कलावंताचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या सर्वांनी आपल्या रचनांमधून सांगरूपकाचे उपयोजन केले आहे. 'मळ्या'चे रूपक या सर्वांनीच योजले आहे. या सांगरूपकाचे पुढे प्रतिकात रूपांतर होते. हे रूपक 'आंबेडकर' प्रतिकात परावर्तीत होते. या स्वरूपाच्या रूपकात्मक मांडणीतून आंबेडकरी समूहाचा प्रातिनिधिक , भावनिक उद्‌गार अभिव्यक्त झाला आहे. या स्वरूपाची गीते आजही आदर्शवत ठरणारी आहेत.

या गीतांनी बुद्ध तत्त्वांचा उद्‌घोष करताना श्रोत्यांशी मनोभावे संवाद साधला आहे. बुद्ध- भीमगीतांमुळे बुद्ध तत्त्वज्ञानातील अनेक संकल्पना विविध पद्धतीने साकार झाल्या आहेत. नव्या प्रतिमा सिद्ध झाल्या आहेत. उदा. 'समतेची बाग', 'पंचशीलाची वाट', 'त्रिसरणाची झडप', 'बोधीवृक्ष', 'बौद्ध धम्माचा खोपा', 'बोधीसत्त्वाच्या तत्त्वाचं खत', 'अष्टशीलाची कुपी', 'दीक्षाभूमीचे खळे', 'पिंपळपार', 'पंचशीलेची पोतडी', 'त्रिसरणाची विणा', 'पंचशीलाचे टाळ' अशा असंख्य प्रतिमा नव्यानेच सिद्ध झाल्या. बुद्धभीम गीतांच्या माध्यमातून निरीश्वरवादी, अनात्मवादी तत्त्वज्ञानाची मांडणी

करून अवैदिक परंपरा नव्याने मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. या गीतांनी मानवी जीवनाचं, उदात्त मूल्याचे तत्त्वज्ञान मांडून विज्ञाननिष्ठ विचारसरणीची पेरणी केली आहे.

दलितांच्या जीवनाला प्राप्त झालेला नवप्रकाश, मिळालेली मानसन्मानाची पदे ही भीमाईच्या कमाईची फळ आहेत असा उद्‌घोष या गीतांनी केला आहे. अन्यायाविरुद्ध बंडखोरी आणि बंडखोरीसोबत स्वाभिमान शिकवणारे आंबेडकरी रूप सिद्ध झाले असून शेकडो आंबेडकरी प्रतिमा आणि प्रतिकांची सिद्धता झाली आहे. उदा. 'दलितांचा सखा', 'दलितांचा राजा', 'कोहीनूर भारताचा', 'दु:खितांचा सन्मित्र सोबती', 'शोषितांच्या अस्मितेचा अंगार', 'विद्‌वत्तेचा पंडित', 'घटनापती', 'सिंहाचा छावा', 'नवज्ञानाचा रवी', 'अंधेऱ्या वस्तीत दिवा लावणारा', 'दलितांची माऊली' अशा अनेकानेक आंबेडकरी प्रतिमा सिद्ध झाल्या असून आंबेडकरांचे नवसर्जक प्रतीक साकार झाले आहे. आंबेडकरी चळवळीचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक लेखाजोगा आंबेडकरी लोकगीतांनी मांडला असून ही गीते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अचाट आणि अफाट कामगिरीचा पद्यमय इतिहास होय.

■

संदर्भ सूची

■

१. **म. फुले,** (प्रस्तावना) गुलामगिरी
२. **भा. ल. भोळे**, (प्रस्तावना) महात्मा ज्योतीराव फुले, साहित्य अकादमी
३. **केशवसुत**, (संपादित) संपूर्ण केशवसुत, संपा. शकुंतला क्षीरसागर, पॉप्युलर, पृ ३७४
४. **भा. ल. भोळे**, उक्त
५. **म. फुले**, **समग्र फुले वाङ्‌मय**, शासकीय प्रकाशन, पृ ५५८,५५९
६. **मधुकर जोशी**, दलित रंगभूमी व नाटय चळवळ,
७. उक्त
८. **गंगाधर पानतावणे**, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. ३३
९. **गंगाधर पानतावणे**, वादळाचे वंशज, पृ. ३३
१०. **गोपाळ बाबा वलंगकर**, वादळाचे वंशज, पृ. ३४
११. उक्त, पृ ३५
१२. **गोपाळ बाबा वलंगकर**, आंबेडकरी शाहिरी, एक शोध, कृष्णा किरवले, पृ. ५४
१३. **गोपाळबाबा वलंगकर**, वादळाचे वंशज, डॉ.गंगाधर पानतावणे, पृ. ३६
१४. उक्त पृ. ३५
१५. **गंगाधर पानतावणे**, वादळाचे वंशज पृ ३७
१६. **गंगाधर पानतावणे**, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. ४४
१७. **किसन फागू बंदसोडे**, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, गंगाधर पानतावणे पृ. ५६,५७
१८. उक्त
१९. उक्त
२०. उक्त, पृ.५८

२१. उक्त, पृ. ५९
२२. उक्त
२३. उक्त
२४. उक्त
२५. **किसन फागू बंदसोडे**, आंबेडकरी शाहिरी, पृ ५९
२६. **गंगाधर पानतावणे**, विद्रोहाचे पाणी पेटले आहे पृ ६०
२७. **भगवान ठाकूर**, आंबेडकरी जलसे
२८. **नागनाथ कोत्तापल्ले**, साहित्याचा अन्वयार्थ पृ. ३६
२९. **दत्ता भगत**, दलित साहित्य, यचममुवि पृ. ६०, १९९२
३०. **भगवान ठाकूर**, आंबेडकरी जलसे, पृ. ९५
३१. उक्त पृ. ९७
३२. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, (उक्त) - आंबेडकरी जलसे पृ. ९९
३३. **पतितपावनदास**, वादळाचे वंशज पृ. ४५
३४. उक्त पृ. ४२
३५. उक्त पृ. ४४
३६. उक्त
३७. **कृष्णा किरवले**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, पृ. ६६
३८. **भीमराव करडक**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, कृष्णा किरवले, पृ. ७५
३९. उक्त, पृ. ४०
४०. उक्त, पृ. ७०
४१. उक्त, पृ. ७०
४२. उक्त, पृ. ७१
४३. उक्त, पृ. ७२
४४. **भीमराव करडक**, आंबेडकरी जलसे, भगवान ठाकूर, पृ. १२८
४५. उक्त पृ. १३३
४६. **केशव सुका आहेर**, आंबेडकरी जलसे, भगवान ठाकूर, पृ. १६९
४७. **केशव सुका आहेर**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, कृष्णा किरवले, पृ. ९८
४८. उक्त पृ. ९९
४९. **कृष्णा किरवले,** उ नि. पृ. १०३
५०. **रामचंद्र नामदेव सोनावणे**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, पृ. १०४
५१. **रामचंद्र नामदेव सोनावणे,** आंबेडकरी जलसे, भगवान ठाकूर पृ. १८०
५२. उक्त, पृ. १८३
५३. उक्त, पृ. १८०
५४. **शाहीर केरू अर्जुन घेगडे**, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, गंगाधर पानतावणे पृ.६८
५५. उक्त
५६. उक्त, पृ. ७१
५७. उक्त
५८. उक्त, पृ. ७०

५९. उक्त, पृ. ७२
६०. **डॉ. गंगाधर पानतावणे,** विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. ७२
६१. **अर्जुन हरी भालेराव**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, कृष्णा किरवले पृ. ८९
६२. उक्त, पृ. ९०
६३. उक्त
६४. उक्त, पृ. ९१
६५. **अर्जुन हरी भालेराव**, आंबेडकरी जलसे, भगवान ठाकूर, पृ. २५९
६६. उक्त, पृ. २६०
६७. **केरुबुवा गायकवाड**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, कृष्णा किरवले, पृ. ९२
६८. **गंगाधर पानतावणे**, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. १०३
६९. **केरुबुवा गायकवाड**, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. १०३
७०. उक्त, पृ. १०४
७१. उक्त, पृ. १०५
७२. उक्त
७३. **केरुबुवा गायकवाड**, आंबेडकरी जलसे, पृ. २४६
७४. उक्त, पृ. २४७
७५. उक्त
७६. **कृष्णा किरवले**, आंबेडकरी शाहिरी एक शोध,
७७. **रामचंद्र आंडागळे**, आंबेडकरी जलसे,
७८. **भगवान ठाकूर**, आंबेडकरी जलसे, पृ. १९०
७९. **रामचंद्र आंडागळे**, आंबेडकरी जलसे, भगवान ठाकूर, पृ. १९२
८०. उक्त
८१. उक्त
८२. उक्त
८३. **भगवान ठाकूर**, उक्त, पृ. २०३
८४. **शिवराम सावळाराम गडकरी**, आंबेडकरी जलसे, पृ. २००
८५. उक्त पृ. २०२
८६. **भगवान ठाकूर**, उक्त पृ. २०३
८७. **संभाजी अडसूळ**, आंबेडकरी जलसे, पृ. २०७
८८. **के. जी. अहिरे**, आंबेडकरी जलसे, पृ. २१०
८९. उक्त, पृ. २११
९०. उक्त
९१. **रतन दला जाधव**, आंबेडकरी जलसे, पृ. २२९
९२. **कृष्णा किरवले**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, पृ. १०६
९३. **अमृतबुवा बावस्कर**, आंबेडकरी शाहिरी एक शोध, कृष्णा किरवले पृ. १०६
९४. उक्त, पृ. १०७
९५. **अण्णाभाऊ साठे,** आंबेडकरी शाहिरीः एक शोध, पृ. १५७
९६. **कृष्णा किरवले,** आंबेडकरी शाहिरीः एक शोध, पृ. १५७
९७. उक्त, पृ. १६२

९८. **अण्णाभाऊ साठे**, उक्त पृ. १६९
९९. उक्त, पृ. १७०
१००. उक्त, पृ. १७१,१७२
१०१. उक्त, पृ. १७३
१०२. **वामन कर्डक,** (प्रस्तावना) आंबेडकरी लोकगीते, संपादक, बबन लोंढे
१०३. **वामन कर्डक,** माझ्या जीवनाचे गाणे, पृ. ६१, संपादक, रविचंद्र हडसणकर
१०४. **वामन कर्डक,** (प्रस्तावना), आंबेडकरी लोकगीते, संपादक, बबन लोंढे
१०५. **वामन कर्डक,** मोहळ, (पहिली आवृत्ती), पृ. २
१०६. उक्त, पृ. ४
१०७. उक्त, पृ. १०
१०८. उक्त, पृ. २५
१०९. उक्त, पृ. ११
११०. उक्त, पृ. ६
१११. उक्त, पृ. २२, २३
११२. उक्त, पृ. ३२
११३. उक्त, पृ. ४०
११४. उक्त, पृ. ३४
११५. उक्त, पृ. १३, १४
११६. उक्त, पृ. ८०
११७. **बबन लोंढे,** आंबेडकरी लोकगीते, पृ. १८१
११८. **दलितानंद,** वादळाचे वंशज, गंगाधर पानतावणे, पृ. ८६
११९. उक्त, पृ. ८७
१२०. उक्त, पृ. ८९
१२१. उक्त, पृ. ८९
१२२. उक्त, पृ. ८९
१२३. **आंबेडकरी लोकगीते**, पृ. १२२
१२४. **श्रीधर ओहोळ,** आंबेडकरी लोकगीते पृ. ६४
१२५. उक्त
१२६. उक्त
१२७. **डॉ. गंगाधर पानतावणे,** अस्मितादर्श, वार्षिक विशेषांक, १९९८
१२८. उक्त
१२९. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर,** (उद्धृत), अस्मितादर्श १९९८
१३०. **गंगाधर पानतावणे,** अस्मितादर्श, १९९८
१३१. उक्त
१३२. **राजानंद गडपायले,** आंबेडकरी लोकगीते, पृ. ४६
१३३. उक्त, पृ. ५५
१३४. उक्त, पृ. ९१
१३५. उक्त, पृ. ६३
१३६. उक्त, पृ. ५४

१३७. **कृष्णा किरवले,** आंबेडकरी शाहिरी..एक शोध, पृ. १५०
१३८. **हरीश खंडेराव,** प्रवर्तक काव्य मीमांसा, पृ. ८४
१३९. **डॉ. गंगाधर पानतावणे,** विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. १३३
१४०. **दीनबंधू शेगावकर,** विद्रोहाचे पाणी पेटले आहे, गंगाधर पानतावणे, पृ. १२४,१२५
१४१. **दीनबंधू शेगावकर,** आंबेडकरी शाहिरी..एक शोध, कृष्णा किरवले, पृ. १५०
१४२)उक्त, पृ. १५१
१४३. उक्त, पृ. १५२
१४४. उक्त, पृ. १५१
१४५. उक्त, पृ. १५३
१४६. उक्त, पृ. १५३
१४७. **दीनबंधू शेगावकर,** विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. १२८
१४८. उक्त, पृ. १३१
१४९. उक्त, पृ. १२६
१५०. उक्त, पृ. १२९
१५१. उक्त, पृ. १३२
१५२. **लक्ष्मण केदार,** आंबेडकरी लोकगीते, संपादक, बबन लोंढे, पृ. ८३
१५३. उक्त, पृ. ८५
१५४. उक्त, पृ. ८४
१५५. **महेंद्र गायकवाड,** दलित शाहिरी, पृ. ६१
१५६. **नागोराव पाटणकर,** दलित शाहिरी, महेंद्र गायकवाड, पृ. ६१
१५७. उक्त, पृ. ६२
१५८. **आंबेडकरी लोकगीते,** पृ. ७६
१५९. दलित शाहिरी, **महेंद्र गायकवाड**, पृ. ५३
१६०. **लक्ष्मण राजगुरु,** आंबेडकरी लोकगीते, पृ. ९५
१६१. उक्त
१६२. **बी. काशीनंद,** दलित शाहिरी, महेंद्र गायकवाड, पृ. ५८
१६३. उक्त, पृ. ५९
१६४. उक्त, पृ. ५९
१६५. उक्त, पृ. ५९
१६६. **उत्तम मुळे,** दलित शाहिरी, महेंद्र गायकवाड, पृ. ५५
१६७. उक्त
१६८. उक्त
१६९. **शाहिर विठ्ठल उमप**, आंबेडकरी शाहिरी..एक शोध, कृष्णा किरवले, पृ. १९४
१७०. उक्त, पृ. १९५
१७१. उक्त, पृ. १९५
१७२. उक्त, पृ. १९६

१७३. **नारायण रामचंद्र मोरे,** आंबेडकरी लोकगीते, पृ. ३८
१७४. **आ. श्री. रणपिसे,** आंबेडकरी लोकगीते, पृ. ३९
१७५. **संजीव,** उक्त, पृ. ४५
१७६. **प्रभाकर पोखरीकर,** उक्त, पृ. ५७
१७७. **बंधुमाधव**, उक्त, पृ. ६६
१७८. **साहेबराव कोकाटे,** उक्त, पृ. ८८
१७९. **दत्तात्रय खडताळे,** उक्त, पृ. ९३
१८०. **धरमदास मोहिते,** उक्त, पृ. ९९
१८१. **अनिल भारती,** उक्त, पृ. ९८
१८२. **शाहीर प्रभाकर गवई,** आंबेडकरी शाहिरी, पृ. १८३
१८३. उक्त, पृ. १८४
१८४. **वामन कर्डक,** उक्त, पृ. १८८
१८५. **कुंदन कांबळे,** आंबेडकरी लोकगीते, पृ. ३०
१८६. **प्रतापसिंग बोदडे,** आंबेडकरी लोकगीते, पृ. १०८
१८७. **हरेंद्र जाधव,** आंबेडकरी लोकगीते, पृ. १०३
१८८. उक्त
१८९. **वामन कर्डक,** आंबेडकरी लोकगीते, संपादक, बबन लोंढे, पृ. १४२
१९०. उक्त, पृ. १४३
१९१. **गौतम सुत्रावे,** उक्त, पृ. १४७
१९२. उक्त, पृ. १५४
१९३. उक्त, पृ. १५५
१९४. **रंगराज लांजेवार,** उक्त, पृ. १७४
१९५. **राम मोरे,** उक्त, पृ. १५१
१९६. **अनिल भारती,** उक्त, पृ. १४८
१९७. **ग. रा. पालकर,** उक्त, पृ. १४९
१९८. **रविचंद्र हडसणकर,** उक्त, पृ. १६२
१९९. **विश्राम भिवंदे**, उक्त, पृ १६३
२००. **मनोहर जाधव,** उक्त, पृ. १७१

दलित कविता : उगम आणि विकास

विसाव्या शतकातील दलित कविता : कुळारंभ

आंबेडकरी वृत्तपत्रातील कविता । मिलिंद कॅम्पसची कविता (१९६३ – १९७५) । प्रातिनिधिक कवितासंग्रह 'आकार'

दलित कविता १९७१ - १९८०

नामदेव ढसाळ । बाबुराव बागूल । वामन निंबाळकर
दया पवार । त्र्यंबक सपकाळे । ज. वि. पवार । प्रल्हाद चेंदवणकर
केशव मेश्राम । अर्जुन डांगळे । राजा ढाले । यशवंत मनोहर
प्रकाश जाधव । राम दोतोंडे । रविचंद्र हडसनकर इत्यादी.

समारोप

प्रकरण : २

दलित कविता: उगम आणि विकास

विसाव्या शतकातील दलित कविता: कुळारंभ

दलित कवितेच्या पूर्वपीठिकेत आदिविद्रोही म. फुले, त्यांची कविता, फुल्यांच्या विचारप्रभावातून निर्माण झालेली कविता यांचा परामर्श घेतला आहे. त्याचप्रमाणे विसाव्या शतकातील आंबेडकर चळवळ, या चळवळीला समांतर असा कलात्मक आविष्कार जो जलशातील काव्याच्या रूपाने जसा झाला तसाच आंबेडकरी लोकगीतातूनही झाला यासंबंधी साधार विवेचन करण्यात आले आहे.

अभ्यासाचा मुख्य विषय दलित कवितेचा इतिहास हा असल्यामुळे साठोत्तरी दलित कवितेचा प्रामुख्याने अभ्यास अभिप्रेत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित कवितेचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी सुरू केलेल्या वृत्तपत्रातून दलित कवितेचा कुळारंभ झालेला दिसतो. त्याचप्रमाणे आंबेडकरी लोकगीते जोमदारपणे चळवळीचा विचार लोकांपर्यंत पोहचवित असताना एक विशिष्ट भूमिका घेऊन कविताही लिहिली जात होती. ती फुटकळ रूपात प्रसिद्ध होत होती. एखाद दुसरा कविता संग्रहही प्रसिद्ध झालेला पाहावयास मिळतो. असे असले तरी अभिव्यक्तीचे साधन म्हणून आंबेडकरी वृत्तपत्रांनीच कवितेला, अभिव्यक्तीला आधार दिला आहे असे इतिहासात पाहावयास मिळते.

- देवराय इंगळे (जन्म १८८९ - मृत्यू १९७२)

आंबेडकरी वृत्तपत्रातील कवितेचा विचार करण्यापूर्वी देवराय इंगळे त्यांच्या कवितेचा विचार करणे अपरिहार्य ठरते. देवराय इंगळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समकालीन आहेत. १९२४ ते १९२८ या काळातील त्यांची कविता उपलब्ध आहे. देवराय इंगळे यांचा जन्म अस्पृश्य जातीतील गरीब महार कुटुंबात जुलै १८८९ मध्ये झाला. अस्पृश्यांच्या सुधारणेसाठी झटणाऱ्या अस्पृश्य व्यक्तिंपैकी इंगळे हे एक महत्त्वाचे कार्यकर्ते होते. देवराय इंगळे यांच्यावर म. फुल्यांच्या विचारांचा प्रभाव होता. १९१८ - १९च्या दरम्यान त्यांनी 'बहिष्कृत भारत बोधिनी' अर्थात यल्लमा या नाटकाचे लेखन केले व त्याचे प्रयोगही केले. बहिष्कृत वर्गाच्या परिषदा भरविल्या.अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपले संपूर्ण जीवन खर्ची घातले. त्यांचे कार्य कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्राच्या काही भागापुरतेच मर्यादित होते.

१९२२ साली 'कर्नाटक बहिष्कृत संघ' नावाची संस्था स्थापन केली व त्याद्वारे त्यांनी खेडोपाडी जाऊन बहिष्कृत वर्गातील महार, मांग, चांभार, ढोर इ.जातीतील लोकांना जागृत करून त्यांची मने तयार केली. तसेच उत्तर कर्नाटक आणि दक्षिण महाराष्ट्रातील काही भागांमध्ये तालुका, जिल्हा व प्रांतीक परिषदा व सभासंमेलने भरवून सरकारास व इतर पुढाऱ्यास अस्पृश्यांवर होणारे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय बाबतीतील अन्याय निदर्शनास आणून दिले. जातिवाचक आडनावाचे निर्मूलन करणे, देवदासी पद्धतविरोधी चळवळ करणे, मृत जनावरांच्या मांस भक्षणास प्रतिबंध घालणे आणि अस्पृश्यतेविरोधी चळवळ उभी करणे अशी चार प्रमुख कार्ये त्यांनी आपल्या हाती घेतली होती.

१९२४ नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बेळगावातल्या आगमनाने दलित चळवळ जोमाने सुरू झाली. देवराय इंगळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १९२४ साली निपाणी येथे 'बहिष्कृत भारत' प्रांतीय संमेलन भरवून त्यास बाबासाहेब आंबेडकरांना आमंत्रित केले होते.११ व १२ नोव्हेंबर १९२५ रोजी बेळगावमध्ये बहिष्कृत हितकारिणीचे तिसरे संमेलन देवराय इंगळे यांच्या नेतृत्वाखाली भरविले गेले. 'विविध ठिकाणी मुली व मुलांकरिता वसतीगृह सुरू करून शिक्षणाची काळजी वाहणारा हा धडाडीचा व झपाटलेला कार्यकर्ता इतरांपेक्षा वेगळा होता'. असे मत प्राचार्य ल. बा. रायमाने यांनी व्यक्त केले आहे.

'देवराय इंगळे यांनी लिहिलेले काव्य, अभंग आणि मौलिक विचार हे अप्रतिम असे आहेत. मराठीतील दलित साहित्याचा उदय हा १९६०- ६५ मानला जातो.परंतु यापूर्वी म्हणजे १९२४- २८ च्या दरम्यान त्यांनी लिहिलेले काव्य हे आद्य दलित काव्य ठरेल' असे मत 'कर्नाटक दलित पितामह देवराय इंगळे : चरित्र आणि काव्य' या ग्रंथाचे कर्ते प्रा. चंद्रकात वाघमारे यांनी व्यक्त केले आहे.

✹ देवराय इंगळे यांची कविता

इंगळे यांनी १९२४- २८ च्या दरम्यान काव्यलेखन केले आहे. वरील ग्रंथातून इंगळे यांच्या कवितांचे खालील संदर्भ घेतले आहेत. इंगळे यांच्या १९२४ ते १९२८ या काळातील पाच दुर्मिळ दैनंदिनी प्राप्त झाल्या त्यातून हे काव्य प्राप्त झाले आहे. इंगळे यांनी बाबासाहेबांचे नेतृत्व मनोमन स्वीकारले होते. दलित एकजुटीचा ध्यास त्यांनी घेतला होता.

बांधवानो आमुची अवस्था
हीन किती झालेली पाहाता
असे असूनी स्वस्थच बसता
काय म्हणू याला?

अशाप्रकारे दलितांच्या मनात चेतना जागृती करण्याकडे त्यांचा कल होता हे दिसून येते. त्यांच्या काव्यात जनजागृतीची तळमळ आहे. त्याचप्रमाणे सामाजिक प्रश्नाचे स्वरूप उजागर करतानाच सत्याची कास धरण्याचा आग्रह ते करतात असे दिसून येते.

असे पहा योग्य दिशा आम्हाला
सुलभ आपुला साधा भला ।।धृ।।
अनाचार घालुनि आळा । सनातनाला करा गोळा ।।१।।
विश्वासाचे झाड लावा । एकमेका तुम्ही स्नेह ठेवा ।।२।।
समता तेथे भेद कोठुनी । अस्पृश्यता मग जाईल पळुनी ।।४।।

अनाचाराला आळा घालून सनातनत्व झिडकारले पाहिजे.सत्य हा मंत्र आपल्या मुलांना शिकविला पाहिजे. सत्याचा मार्ग काटेरी असतो.अभिमानशुन्य बनता कामा नये असे आवाहन करणारी ही कविता दलिताना स्वाभिमानी बाणा अंगिकारण्याचा संदेश देते. देवाच्या नावावर मधले दलालच आपले पोट भरत असतात.'दलालाचा धनी तूच आहेस' असे देवाला सांगण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. या कवीने सर्व प्रकारचे आवाहन देवालाच केले आहे. दुष्ट भावना विसरण्याचे, सर्व प्रकारच्या चिंता दूर करण्याची विनवणी केल्याचे दिसून येते.

सुबुद्धी - कुबुद्धी भेद हे का?
निर्मियली सांग या लोका

भेदाभेद का निर्माण केले असा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सामाजिक दांभिकता आणि कावेबाजपणाही उघड केला आहे.

बंधु म्हणुनि आम्हावरती । डुक्कराशी जवळ करिती
परि हीन तयाहुनी का । आहो बा आम्ही ।।२।।

असा जिवघेणा प्रश्न उपस्थित करून बंधने तोडून टाकण्याचे आवाहन या कवितेने केले आहे. अस्पृश्यतेची भीषणता स्पष्ट करून वाचकांना अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला आहे.

आम्ही अस्पृश्यास्पृश्य । जगती आमुचि झाली हास्य धृ
नीच दशा केली हीन । आम्हा नाकारिती जन ।।१।।

मात्र सामाजिक जीवनात विरोधाभास असा आहे, की भांडणतंटा करू नका असा उपदेश करणारे, राष्ट्रभक्ती सांगणारेच राष्ट्रभक्तीपासून दूर राहतात.हा त्यांचा दांभिकपणा आहे. स्वत:ला अस्पृश्योद्धारक म्हणवणारे घातक आहेत. कारण त्यांचे 'बोल एक करणी न्यारी, ह्यांचे अंतरंग कडू भारी' असे वास्तव आहे. मात्र आपण सत्याच्या मार्गाने चालल्यास भिती बाळगण्याचे काही कारण नाही असे देवराय यांनी आपल्या कवितेतून स्पष्ट केले आहे.

सत्यासाठी छळ सोशीन जगात
तारील भगवंत मजशी सत्य ।।२।।
सत्यासाठी मरण दंडास मी पात्र
होईन अपात्र असत्याला ।।३।।

अस्पृश्यांना कोणीच वाली नसल्यामुळे भगवंतानेच त्यांना तारून न्यावे. 'नाही आम्ही कोणाचे कोण' अशाप्रकारे अस्तित्त्वच निरर्थक असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणून अस्पृश्यांच्या मनात चेतना जागृती करून, अस्पृश्यांचा उद्धार झाला पाहिजे, त्यासाठी अस्पृश्यांनी अक्कल गहाण ठेवता कामा नये, अज्ञानी राहता कामा नये म्हणून देवराय अस्पश्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात.

विद्याबलाने जगातील । मोठमोठे राष्ट्र उद्धारी ।।
करा प्रवेश बंधुजन हो । विद्या देवीच्या द्वारी ।।

शिक्षण घेऊन ज्ञानी बनले पाहिजे आणि आपणास कोणी वाली नसल्यामुळे अस्पृश्यांनी स्वावलंबी बनले पाहिजे असे देवराय यांनी आवर्जून सांगीतले आहे. देवदासी प्रथेविरुद्ध देवराय यांनी चळवळ उभारली होती.या अनिष्ट पद्धतीचा समूळ नाश करण्यासाठी प्रत्येक बहिष्कृतांच्या घरी जाऊन देवदासी अथवा जोगती न सोडविण्याविषयी कळकळीची विनंती केली.बहिष्कृत वर्गास जागे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

वेडे का बनता बंधुनो । धृ ।
आपुल्या आई - बहिणी । मुलींना जोगत्या सोडिता ।।१।।
देह विकोनी व्यभिचार । करूनी नरकी का पडता? ।।२।।

देवांना मुली सोडणे हे वेडेपणाचे आहे असे कृत्य करणे व्यभिचाराला बळी पडून नरकात जाण्यासारखे आहे. यातून मुक्ती झाली पाहिजे अशी देवरायानी चिंता वाहिली आहे. या नरकातून बाहेर पडायचे असेल तर हिंदू धर्माचा त्याग केला पाहिजे.

शांतपणे या नरक चुकाया । हिंदू धर्म त्यागा हो ।।

असे हे आवाहन आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा करण्यापूर्वीचे हे आवाहन आहे. यावरून देवराय यांची भूमिका स्पष्ट होते.इतर कुठल्याही धर्मापेक्षा सत्यधर्म हाच खरा धर्म असल्याचे स्पष्ट प्रतिपादन देवराय करतात यावरून त्यांचेवर असलेला म.फुल्यांचा प्रभाव स्पष्ट होतो.

नको मुस्लिम - ख्रिस्ती व्हाया
बौद्ध - शीख - हिंदू रहाया
सत्य - धर्म आपुला घ्याया
हात पसरूनी पुढे या ।।३।।

वरील रचना पाहता फुल्यांच्या 'अखंड' रचनेचाही प्रभाव आहे असे प्रत्ययाला येते.देवराय यांच्या कवितेचा

महत्त्वाचा विशेष म्हणजे ती दांभिकतेचा भेद करते आणि दुटप्पीपणावर कठोर भाष्य करते.

कोण करील एकादशी । तो सदा नरकवाशी ।।धृ।।
ज्याच्या गळी आहे माळा । तो मानावा चांडाळा ।।१।।
जो जाईल पंढरीशी । शेणासमान माना त्याशी ।।२।।
जो धरील विणापातक । तो ठकाहुनी ठक्क ।।३।।

जप तप, दान, चंद्रभागेतील स्नान, संत - संग या सर्व गोष्टी नाकारतानाच रामकृष्णाचे गौडबंगालही या कवितेने उघड केले आहे.

रामकृष्ण अंगी नाही नम्रपण । आचरण घाण बहुत त्यांचे ।।१।।
सज्जना मारिले दुर्जना पाळीले । विष कालविले सत्यधर्मी ।।२।।
संहाराया दुष्टा अवतारिले म्हणता । अस्पृश्य लेखिता काहो आम्हा ।।४।।
बुडविला आम्हा अस्पृश्य करून । दुष्ट तुम्हाविण कोण ऐसा ।।५।।

असे स्पष्ट आणि परखड विवेचन येथे केलेले दिसून येते.एकप्रकारची बेडर अभिव्यक्ती येथे पाहावयास मिळते.शेवटी या कवितेचे मानवतावादातच पर्यावसान होते. एका अर्थाने म.फुल्यांच्या कवितेचा वारसा देवराय यांनी पुढे चालविला असे म्हणता येईल. आंबेडकरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या कवितेपेक्षा वेगळ्या स्वरूपाची कविता देवराय यांनी लिहिली आणि जनसामान्यात मोठी जागृती घडवून आणली. हे त्यांचे कार्य ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय मौलीक स्वरूपाचे ठरले आहे. आंबेडकरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या कवितेच्या तुलनेत देवराय इंगळे यांनी सामाजिक भानातून बेडर अभिव्यक्तीची परंपरा रुढ केली होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मात्र दलितांच्या, अस्पृश्यांच्या वतीने देवाजवळ करुणा भाकणारी, आळवणी आर्जवे करणारी ही कविता असून 'देव' या संकल्पनेचा परिप्रेक्ष्य ती ओलांडू शकली नाही. ही त्या काळाचीच मर्यादा होती, काळाच्या चौकटीची मर्यादा होती असे म्हणता येईल.

विसाव्या शतकाच्या पहिल्या पर्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली वृत्तपत्रे, साप्ताहिके यामुळे जनमानसात विलक्षण क्रांती घडून आली. सामाजिक प्रबोधन आणि चळवळ प्रभावी ठरण्यासाठी वृत्तपत्रे, नियतकालिके ही प्रभावी साधने ठरली आहेत. बाबासाहेबांनी सुरू केलेले मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत(१९२७), जनता(१९३०), प्रबुद्ध भारत(१९५५) या वृत्तपत्र आणि साप्ताहिकाच्या माध्यमातून दलितांचे आत्मभान जागृत झाले, स्वाभिमान जागृत झाला आणि संघर्षाची दीक्षा प्राप्त झाली. 'जनता' वृत्तपत्र आधी पाक्षिक होते. ३१ ऑक्टोबर १९३२ पासून ते साप्ताहिक करण्यात आले. या साप्ताहिकाची कारकीर्द फार मोठी आहे. जवळपास सव्वीस वर्षे 'जनता' सुरू होते. 'Tell the slave he is slave and he will revolt' हे घोषवाक्य जनतेचेच आहे. तो आंबेडकरी चळवळीचा सर्वाधिक प्रामाणिक इतिहास आहे. शोषणमुक्तीचे जे संघर्ष जगात झाले त्यापैकी सर्वात विचित्र व क्रुरतम अशा जातिव्यवस्थेविरुद्ध महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या अनुयायांनी केलेल्या महान संघर्षाचा तो आलेख आहे. [१] वरील सर्व वृत्तपत्रातून जीवनाच्या विविध समस्या हाताळल्या गेल्या. या वृत्तपत्रातील वैचारिक लेखन हा महत्त्वाचा दस्ताऐवज आहे. वैचारिक गद्याची समृद्धी हे या वृत्तपत्रांचे खास लक्षण म्हणता येइल. परंतु कवितेला सुद्धा या वृत्तपत्रांनी स्थान दिले आहे. आंबेडकरी व्यक्तिमत्व आणि सामाजिक जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता 'जनता' या साप्ताहिकातून सातत्याने प्रकाशित झाल्या आहेत.

✸ आंबेडकरी वृत्तपत्रातील कविता :

जनता खास अंक १९३३ तसेच ३१ ऑक्टोबर १९३१ ते ३ डिसेंबर १९३२ या काळातील 'जनता' साप्ताहिकातून ज्या कवींच्या कविता प्रकाशित झाल्या त्यात प्रामुख्याने नारायण रामचंद्र मोरे, कवी श्री व्ही. ए., एकनाथ सी. बोर्डे, बळवंत हनुमंत वराळे, शांता नाथ, हरिभाऊ तोरणे, पुरुषोत्तम सदाशिव नारायणे, चांगदेव नारायण मोहिते, चिंतामण सयाजी साळवे, एस.जी. भामगरे, कवी शेखर, द्रौपदासुत, यशवंत कृष्ण रुदाणेकर इत्यादीचा समावेश आहे. या सर्व कवींच्या

कविता ह्या स्वतंत्र बाण्याच्या आहेत असे म्हणता येत नाही. कारण त्यांचेवर पूर्वसुरीचा अभिव्यक्तिच्या संदर्भात मोठा प्रभाव दिसून येतो. उदाहरणादाखल खालील कवितेचा विचार करता येईल.

जेणे श्रेष्ठ बहु समाज बनतो ते जे असे वाङ्मय ।
त्याला वाढविण्यास नित्य झटण्या व्हा हो तुम्ही तन्मय ।।
चोखा तद्वत भीमराव अपुले हे तात जाणा खरे
त्यांची कामगिरी सदैव तुमच्या ध्यानी असुद्या बरे ।।४।।
थेंबाथेंबापासून नद कैसा होय भव्य भूमिवरी
तैसाच न्याय जाणा वाङ्मय वाढेल हेच या समयी ।।५।।
(जनता, १९३३, **एकनाथ सी. बोर्डे**)

'अस्पृश्य समाजस्थिती व तरुणाचे कार्य' या शीर्षकाची ही कविता विविध पातळ्यांवरील सामाजिक भेदाची जाणीव करून देतानाच समता आणि बंधुभावाची रुजवण समाजात होण्याची आवश्यकता प्रतिपादन करते. चोखामेळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगिरीचे भान बाळगण्याचे आवाहन करते. तसेच वाङ्मय विषयक जाणीवही स्पष्ट झाली आहे. ज्यामुळे समाजाला श्रेष्ठता प्राप्त होईल अशा स्वरूपाचे वाङ्मय वाढले पाहिजे. तसे ते वाढेल असा विश्वासही व्यक्त झालेला दिसतो. १९३३ मध्ये ही जाणीव होणे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. समाजनिष्ठ साहित्याची स्वतंत्र वाङ्मयनिर्मिती करण्याची आवश्यकता प्रतिपादन करणारा हा विचार आहे. अभिव्यक्तिच्या प्रकाराचे अनुकरण असले तरी विचारांचे वेगळेपण येथे अधोरेखित होताना दिसते.

यशवंत कृष्ण रुदाणेकर या कवीने 'राजहंस माझा निजला' या चालीवर 'अंतरू नका या बोला' अशी रचना सादर केली आहे. हा सुद्धा मराठी कवितेच्या अनुकरणाचा (रचनेच्या संदर्भात) प्रकार आहे हे लक्षात येते.

जन्मले सोमवंशात । अंतरू नका या बोला
साजेल तेज त्या शशिचे । वडिलांच्या सत्कीर्तीला
भासेल हेचि हो मजला । कवण देउ उपमा तिजला
किर्तीला मळवू त्या । वर्तावे याच या बोला
किर्तीची गुंफुनि माला
सत्कृत्य रत्न हे त्याला
मधि ओवुनि कंठी घाला
विनवितो शिशू सकलाला । अंतरू नका या बोला ।।१।। (जनता, २०.८.१९३२)

पुढे ही कविता गतवैभवाचे दाखले देत 'मनूजपणाला' मेळवण्याचे आवाहन करते. सदाचाराचे वर्तन करण्याचा उपदेश करते. 'जिंकावे रणी काळाला' असे कृतिशील झाल्यानंतर पुण्याचा काळ येईल आणि तुमचे हे कार्य पाहून यशोदेवता तुमच्या गळ्यात माळ घालेल, शेवट गोड होईल, असा आशय या कवितेतून प्रकट झाला आहे. प्रारंभीच्या या कवितांवर तत्कालीन प्रचलित मराठी आणि संस्कतप्रचुर भाषेचाही प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. या कवितेला स्तुतीगानाचे स्वरूप प्राप्त होते. उदा. रामचंद्र मोरे यांची (जनता, १९९३) ही कविता,

वाळूमध्ये सुवर्ण, सोज्वळ रत्न सागरात
तसा चमकशी सदा स्वतेजे तू या देशात
मृतप्राय निज समाज देही प्राण ओतिलेस
शिशिर संपला, स्वैर संचरे वसंत-उल्हास

स्वतेजाने तळपणारे आंबेडकरी रूप येथे चित्रित झाले आहे. मृतप्राय झालेल्या समाजमनात चैतन्य ओतल्यामुळे पानगळ संपून झाडाला नवी पालवी फुटून निसर्गात नवा उल्हास संचारावा तसे आंबेडकरांच्या आगमनामुळे समाजमन

उल्हसित झाले आहे. असे भाव प्रकटीकरण आणि आंबेडकरांचे गुणसंकीर्तन करताना कवीने आंबेडकरांचे अनेक पैलू दिग्दर्शित केले आहेत. कुशल धुरंधर, निर्भय वीर, निश्चल, शूर अशी अनेक विशेषणे बहाल करून हे गुणसंकीर्तन केले आहे. गुणगौरव करताना शब्दांचा साज चढविला आहे.

नभा निलिमा, सुवास सुमना, कांति सुवर्णाला
तसा खरोखर महाभाग तू प्रिय भारतभूला

बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० च्या दरम्यान सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून दिले आणि आपल्या कार्याच्या झपाटलेपणाने सर्व समाजास चकित केले होते. त्यामुळे हे आंबेडकरी व्यक्तित्व आणि कर्तृत्व गौरवगीताचा विषय ठरले. **शांता नाथ** यांनी 'प्रार्थना' या रचनेतून विद्वत्जड आणि पांडित्यप्रचूर भाषेचा आविष्कार केला आहे. उदा.

आयुर्बल यश विपुला विभवा
अनुदिनी दे इशा ।।धृ।।
शासन शास्ता धृति- धी- वंता ।
अत्यंज जनतेशा ।।
शुक्लेदुवत वृद्धिंगत हो
नाशो तम विवशा (जनता १९३३)

अशी ही प्रार्थना आहे. दलितांचे दैवत वाढो अशी आशा या प्रार्थनेतून व्यक्त करण्यात आली आहे.

हरिभाऊ तोरणे यांनी 'भीम भूपाळी'ची रचना केली आहे. भूपाळी हा मध्ययुगीन पद्यप्रकार आहे. प्रभातसमयी प्रसन्न मनाने भीमरायांना वंदन करणारी भावना या भूपाळीतून व्यक्त झाली आहे.

प्रभावशाली राष्ट्र धुरंधर सखया भीमराया
प्रभातकाली प्रसन्नहृदये प्रणाम तव पायी ।।धृ।।
भूतदया ती उज्वल समता गेली की विलया ।।
दुष्ट विषमता आली भारतखंडा ग्रासाया ।।
एकमेवाद्वितीयसम सोने सगळे लुटूनिया ।।
सोनखताच्या राशी रचिल्या जगास झुलवाया ।।
हिंदुधर्म आजिचा पेंढारी हा खरा ।
नामर्द करी मर्दास ठेचुनी पुरा ।
अमृतास नरक बनवि हा काटेरी पिंजरा ।
योग्य प्रसंगी अवतरलासी दीना रक्षाया
प्रभातकाली प्रसन्नहृदये प्रणाम तव पायी ।।१।। (जनता खास अंक, १९३३)

हिंदू धर्म आणि विषमता या दोन गोष्टी येथे केंद्रस्थानी आहेत. हिंदू धर्माने माणसाचे माणूसपणच हिरावून घेतले आहे. या दोन गोष्टींमुळे भारतखंडाला कसे ग्रासले आहे अशा प्रसंगी भिमरायाचा अवतार गरिबांचे रक्षण करण्यास्तव झाला आहे. अशी श्रद्धाळू भावना येथे प्रकट झाली आहे. एवढेच नव्हे तर महाभारतातील शंभर विरुद्ध पाच अशा झगड्यात पांडवांचा विजय झाला तसाच स्पृश्यास्पृश्यांचा झगडा आहे. भीमराया म्हणजे पांडव चमूचा कैवारी! आंबेडकरांचा समतेच्या प्रस्थापनेसाठीचा झगडा, ज्याचे पहिले रणशिंग महाडला फुंकले त्या भीमरायाला प्रणाम करताना या भूपाळीतून बाबासाहेबांचे गोलमेज परिषदेतील कार्य, पुणे करार, गांधींचे उपोषण इत्यादी संघर्ष, या संघर्षात बाबासाहेबांना मिळत गेलेले यश, त्यावर जीव ओवाळून टाकणारी श्रद्धा या भूपाळीतून व्यक्त झाली आहे. **चांगदेव नारायण मोहिते** यांनी 'मनाचा मनवा' या शीर्षकाखाली रचना केली आहे. या रचनेतून सामाजिक भान, तत्कालीन सामाजिक स्थितीचे एक विदारक वास्तव सूचित होते.

रुढ्यांचे पाश हदयाना भिडूनी विद्ध ते झाले
तयांच्या अश्रू नयनांचे पुसाया ना कोणी आले ।।
विषाने पूर्ण भिजलेला सुरा हातात घेवोनी
दिनांचे कंठ छेदाया धनिक हे बसले टपुनी ।।
जलाचे थेंब टाकोनी पिठाचे दूध केलेले
पिवुनी शांत झालेली इथे ही झोपली बाळे ।।
उपाशी अर्धपोटाने दलितता येथ निजलेली
उद्याची काळजी टोचे तयांना झोप मग कुठली ।। (जनता २३/०७/१९३२)

रुढीमुळे हतबल झालेल्यांचे दु:ख समजून घेणारे कोणी उरले नाही. श्रीमंतांची मिजासखोरी दीनदलितांच्या माना कापण्यासाठी विषारी सुरी हातात घेऊन सज्ज आहे. दुसरीकडे अन्नान्नदशेने ग्रासलेला दीनदलित समाज आहे. हा सामाजिक अंतर्विरोध येथे स्पष्ट होतो. तिसरीकडे धर्माचे मूळ दया आहे असे म्हणणारे निर्दयी झाले आहेत. नजर टाकावी तिथवर छळांचे, छळकऱ्यांचे साम्राज्य पसरले आहे. अशी सामाजिक विरोधाभासी परिस्थिती या रचनेतून साक्षात होते.

आंबेडकरी चळवळीतील काळाराम मंदिर सत्याग्रह हा अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. आंबेडकरी चळवळीतील प्रदीर्घ काळ चाललेला हा लढा आहे. मानवी हक्कांसाठीचा हा लढा होता. या लढ्याचे चित्र तत्कालिन कवितेत उमटले आहे. **कवी शेखर, कवी द्रौपदासुत, पुरुषोत्तम सदाशिव नारायणे, चांगदेव नारायण मोहिते, एस.जी. भामगरे** इत्यादी अनेक कवींनी या ऐतिहासिक घटनेचा परामर्श आपल्या कवितेतून घेतला आहे. काळाराम मंदिर सत्याग्रहामुळे वातावरण भारून गेले होते. या काळातील स्फुर्तिप्रद अशा रचना लिहिल्या जात होत्या. उदा-

ही हिंद भूचि बाळे । भिणार नाही काळे
काळासि झुंजण्याला । सत्याग्रही निघाला ।।६।।
भिमराव हेत माझा । दूजे नयेची काजा
भूषवी हिंदभूला । सत्याग्रही निघाला ।।७।। (चांगदेव ना. मोहिते, जनता ५/१२/१९३१)

काळाशी झुंजण्यासाठी सिद्ध झालेल्या सत्याग्रही वीराचे चित्र येथे रेखाटले आहे. त्याचबरोबर बाबासाहेबांचे सामर्थ्यही सूचित केले आहे. काही कवींनी या सत्याग्रहाच्या अनुषंगाने हिंदी भाषेतूनही रचना केली आहे. या रचनांना 'जनता'च्या अंकातून प्रसिद्धी मिळाली आहे. उदा-

मरना तो है कोइ एक दिन अजर अमर होके मरे
विटला है हिंदू धर्म की तुम शुद्धी करने चले ।६।
लकळा फत्तर मुरत हो कोहिपर भी शेंदूर हो रंगा
जितनेही देवी देवतोपर हक्क शाबित करने चले ।७।
(पुरुषोत्तम सदाशिव राणे, जनता २९/११/१९३१)

वरील रचनेतील विटला, लकळा हयासारख्या शब्दकळा मराठी शब्दाचे आपल्या ऐपतीप्रमाणे हिंदीकरण करण्याचा प्रयत्न करतात. **एस.जी. भामगरे** यांनी प्रेमाचा इशारा या कवितेत सत्याग्रहीस इशारा दिला आहे.

मर्दानी बाणा अंगात । यावया करा मेहनत
शिका तो खेळ लाठीचा । इशारा बाल केरुचा (जनता ५/१२/१९३१)

अटक केल्यानंतर कारागृहात जाताना केरू तेजाळ यांनी त्यांच्या मित्रास व अस्पृश्य सत्याग्रहीस प्रेमाचा इशारा दिला आहे. हातावर शीर घेऊन, आपल्या संघशक्तीने रुढी मोडण्यासाठी सज्ज झाले पाहिजे असा हा इशारा आहे. संघर्षाच्या साधनांनबद्दलही तो आहे, संघर्षाबद्दलही आहे. **कवी शेखर** यांनी, 'निज दास्यता हराया, बलि देवु आपला या / जोहारगीत गाया सत्याग्रहा चला रे' असे आवाहन केले आहे. थोडक्यात काळाराम मंदिर सत्याग्रह ही कवींना

निर्मितीसाठी प्रेरणा देणारी महत्त्वाची घटना ठरली आहे.

सामाजिक स्थितीगती हा विषय या काळातील कवितेत प्रकर्षाने जाणवतो. त्यात प्रामुख्याने धर्म, समाज, वतनदारी, दलितांचे जगणे असे विषय कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत. या काळातील कविता समाजमनाला आपल्या हक्कासाठी पेटून उठण्याचे आवाहन करताना दिसतात. काळाने आपले स्वत्व हिरावून घेतले आहे. माणसाला पशूपेक्षाही हीन वागणूक दिली जाते याची खंत बाळगून अपमानाचे जिणे झिडकारले पाहिजे. देवदेवळे आपल्या स्पर्शाने बाटतात अशी धर्मरिती आहे. तिचा धिक्कार केला पाहिजे. असे जगणे मूकपणे स्वीकारणारांपेक्षा कुत्रे बरे असा उद्वेगही या कवितेतून व्यक्त होतो.

धर्म नव्हे हा
जहरी साप हा दंशिले अम्हा
मारिली मने स्वाभिमान चेपुनि याने
बन्धुनो अतां साप हा बघा स्वीकारा सुधा
निज हक्कांची मानवतेच्या बाण्याची (श्री व्ही.एन., जनता खास अंक, १९३३)

अशाप्रकारे धर्म म्हणजे जहरी साप असून या सापाने दंश केल्यामुळे स्वाभिमानी मने मारून टाकली आहेत. म्हणून आपल्या हक्काची जाणीव आणि स्वाभिमानी बाण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले आहे. एका अर्थाने आपल्या हक्कप्राप्तीचे भान जागविण्यासाठी कवीने हा डंका पिटला आहे. **बळवंत हनुमंत वराळे** यांनी 'समाजा कोण तुझा वाली' या शीर्षकाच्या कवितेने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

बघुनि तुझी ही स्थिती समाजा कुणा दया आली?
कुणी घेतला जन्म तुझ्यास्तव कोण तुझा वाली? ।।धृ।।

अशा प्रकारे समाजालाच विचारलेल्या अनेक प्रश्नांतून सामाजिक स्थितीगतीचे वास्तव मांडले आहे. तुमच्या हितासाठी कोणी संकटात उडी घ्यायला तयार नाही. तुमची काळजी घेण्याची कुणाला गरज वाटत नाही. तुमचा कोणीही वाली उरला नाही.

तुझ्यांत जन्मुनि खपे तुझ्यास्तव सदासर्वकाळी
सांग समाजा हाच जगी ना तुझा खरा वाली ।।१०।।

असा या कवितेचा शेवट आहे. समाजाचा खरा वाली कोण या विषयीचा निर्देश येथे केला आहे.

डॉ. हरिश्चंद्र निर्मळे[२] यांनी दलितांची नियतकालिके या ग्रंथात तत्कालीन कवी आणि कविता याविषयी साधार मांडणी केली आहे. त्यांच्या मते, ''या कवितेतील व्यथेपासून विद्रोहापर्यंतच्या प्रवासात सर्वश्री बळवंत वराळे, चांगदेव मोहिते, गुंडो कांबळे, चिंतामण साळवे, राम गुंजाळ, बाळानंद विटेकर, एस.जी. भामगरे, बी.टी. कांबळे, बना साळुंखे, किसन पवार, राजा पैठणकर, शेखर शांताकांत या कवींसोबतच सौ. गंगूताई वैद्य, शांतादेवी तडवे, मालती चव्हाण या कवयित्रीनींही आपल्या पाउलखुणांचे ठसे उमटवले.'' आंबेडकरी चळवळीची रुजूवात झाल्यानंतर हळूहळू दलितांचे आत्मभान जागृत होत गेले. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणाविषयी केलेला उपदेश जनमानसात भिनत गेला. रुढी परंपरांचे अवडंबर याविषयी आकलन होत गेले. उदा-

तुडविता तुम्ही पायानी । हृदमंदिर करिता चूर
दावोनी बाऊ रुढीचा । आणिता आव धर्माचा (जनता ७/१२/१९४०)

त्याचप्रमाणे तत्कालिन दलित जीवनाचे दु:ख, दैन्य, दास्य याविषयीची भीषणताही कवितेतून चित्रित होताना दिसते. समाजजीवनात प्रामुख्याने अस्पृश्यांच्या वाट्याला आलेली वतनदारी म्हणजे मोठी शिक्षाच होती. वतनदारांची काय अवस्था होती याचे चित्र खालील कवितेतून स्पष्ट होते.

प्रेतास झाकुनी सदनी । राहिला उभा सरकारी
आसुडांचे फटके बसती । जोड्यांना नाही गणती
लाथांनी फुटली छाती । लाखोली शिव्यांची वाहती
वतनाची ऐशी रीती
(**गुंडो कांबळे,** जनता १५/१/१९३८)

वतनदार म्हणजे गुलामच! त्याला माणसासारखी वागणूक मिळत नव्हती. त्यामुळे वतनदारी ही एक मोठी सजा होती. गावकीची, यस्करकीची कामे यापेक्षा वेगळी नव्हती. या कामासाठी वेळकाळाचे काही बंधनच नव्हते.

सदा चिंध्या डोक्यावर । वस्त्र नाही अंगावर
सदा राही गावापार । वरी अपमानाचा भार
(**के.टी. शिंगाडे**, जनता ९/३/१९४०)

गावासाठी सेवा देणाऱ्या यसकराला मात्र गावात राहण्याचाही अधिकार नव्हता. गावकुसाबाहेरच त्याला जीवन व्यतीत करावे लागत होते. दारिद्रय आणि अपमान त्याच्या पाचविलाच पुजलेले होते. अशाप्रकारे या काळातील कविता दलित जीवनाचे दर्शन घडविताना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या कवितेचे प्राणतत्त्वच आहे असे प्रत्ययास येते. दलित कवितेचा आरंभबिंदू म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर! **बळवंत हनुमंत वराळे** यांच्या 'सेनानायक डॉ. आंबेडकरांना' या प्रदीर्घ रचनेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुकारलेल्या संघर्षाला यश प्राप्त झाले. त्याबददल सेनानायकाच्या यशोगाथेचा गौरव करणारी भावना कवितेतून व्यक्त होताना दिसते.

आंबेडकरा धन्य तुझी बा करणी । खुंटते वदाया वाणी
घेतला खरा दीनात्सव अवतार । ज्ञानाला अंत न पार
लढलास लढा म्हाडाचा धैर्याने । घातली माळ विजयाने
भटभिक्षुक मनात थिजले
सोवळे तयाचे भिजले ।
चौदार तलावी सगळे ।
ते करो अता धावा अपुल्या मनुचा । तू राजसत्तणा अमुचा ।। १ ।।
(जनता, १२ डिसेंबर १९३१)

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांविषयी गौरवाची भावना व्यक्त झाली आहे. आंबेडकर म्हणजे दीनदलितांसाठी जणू काही अवतारच ठरले. त्यांच्या कर्तृत्वामुळे भटभिक्षुकांची काय अवस्था झाली याचे वर्णन येथे केलेले दिसते. त्याचप्रमाणे या रचनेमधून बाबासाहेबांची विविध रूपे प्रत्ययाला येतात. उदा, दुष्ट रुढीला तुडवून, तिचा फुटबॉल करून लाथेचा टोला देऊन दिक्कालात उडविणारा, प्राणाची चिंता न करता समाजकार्यात झोकून देणारा, लोकांचा देव अशी विविध रूपे सिद्ध झाली आहेत. दुसऱ्या एका 'ति. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वगत' या कवितेत (जनता, २ एप्रिल १९३२) भीमराया हा खरा अस्पृश्यांचा दाता असून, त्यांच्या कर्तृत्वामुळेच आंबेडकरांचे मातापिता स्वर्गातून आनंदाने सुमने उधळीत असतील अशी कल्पना केली आहे. त्याचप्रमाणे सतीदेवता ओवाळीत असतील, भूमातादेवी आनंदाने हसली असेल, विधात्याने कौतुक केले असेल अशाप्रकारे स्वगताचा कल्पनाविलास मांडला आहे. काही कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'नवा मनु' ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. उदा.

वारा हा क्रांतीयुगाचा । झोंबतो अंगाला भारी
फवारे तत्त्वज्ञानाचे । झोडिती हिंद-कैवारी
मनु गेला, नवा आला । नव्याने केले थैमान
नव्याचे राज्य होणार । जुन्याला मानितो कोण?
(**चिंतामण सयाजी साळवे**, जनता १९/१२/१९३१)

डॉ. आंबेडकरांना 'नव्या युगाचा मनू' या रूपात पाहणारी कवीची दृष्टी येथे प्रत्ययाला येते. याच कवींची 'दीनबंधू डॉ. आंबेडकरांना' ही रचना पंडिती, संस्कृतप्रचुर भाषेच्या प्रभावातून साकार झालेली दिसते. उदा-

सतेज गोल आननी कितीक इंदू लोपले
त्वदीय कृती देखुनी सुरेंद्र चित्ती तोषले ।धृ।
दलितबंधु तू सखा
शोभसी रे नायका,
तोडुनी गुलामपाश दुदुंभिते फुंकिले
सौख्यज्ञान लालसा विपूल तुजसी लालसा
देवदूत तू खरा म्हणूनी इथे धाडिले ।
(चिंतामण सयाजी साळवे, जनता ८/१०/१९३२)

पौराणिक, धार्मिक, अलौकिक संकल्पनांचा वापर करून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे जणू काही देवदूतच! म्हणूनच या पृथ्वीतलावर त्यांना पाठविण्यात आले. अशाप्रकारचा कल्पनाविलास येथे पाहावयास मिळतो. अशी अनेक आंबेडकरी रूपे कवितेतून साकार करण्याचा प्रयत्न झाला आहे. उदा-

जीवे फकीर व्हावे, अस्पृश्य उद्धारावे
मानिला हाच मोक्ष, माझाच भीमनेता
(**ना.रा. वाघमाचे**, जनता २०/७/१९४०)

अस्पृश्यांचा उद्धार हेच ज्यांच्या जीवनाचे ध्येय होते असे आंबेडकरी रूप येथे प्रत्ययाला येते. वरील अभिव्यक्तीच्या संदर्भात डॉ. हरिश्चंद्र निर्मळे[३] म्हणतात, ''हिंदू समाजाने अतिनीच मानलेल्या जातीतील एका सर्वसामान्य दलिताचे असामान्य कर्तृत्व, त्यामुळे त्याला समाजमनात लाभलेले आदराचे स्थान, त्यातून झालेले त्याच्या गुणाचे स्तवन, आपाततः मिळालेले देवपण आणि देवपण प्राप्त झालेल्या व्यक्तिमानसाची आरंभिलेली विभूतीपूजा ही या कवीतांची निर्मितीप्रेरणा आहे'' यावरून थोडक्यात असे म्हणता येइल की दलित कवितेच्या निर्मितीचे कारक तत्त्व आणि प्रेरणास्थान म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर! प्रारंभीच्या दलित कवितेने या प्रेरणास्थानाची विभूतीपूजा आरंभिली होती हा इतिहास आहे.

थोडक्यात १९३०-१९४० या दशकात आंबेडकरी वृत्तपत्रांनी दलित कवितेचा पाया घातला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विसाव्या शतकातील दलित कवितेचा कुळारंभ आंबेडकरी वृत्तपत्रातून झाला. दलित कवितेच्या आविष्काराला या वृत्तपत्रांनी महत्त्वाचे स्थान दिले. या कवितेवर मराठी कवितेचा मोठा प्रभाव आहे. संस्कृतप्रचुर, विद्वज्जड भाषेचा प्रभाव आहे. संस्कृत भाषेतील शब्दांचे उपयोजनही केले आहे. या भाषिक उपयोजनातूनच 'आंबेडकर स्तुतीगान' असा काव्यप्रकार अस्तित्त्वात आला. आंबेडकरी कर्तृत्वालेख मांडताना बाबासाहेबांची विविध रूपे साकार झाली आहेत. गौरवाची भावना व्यक्त करताना बाबासाहेबांना 'अवतार'ही ठरविल्या गेले आहे. अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून वर्णन करताना कल्पनाविलासही मांडला आहे. काही कवींनी 'नवा मनू', 'देवदूत' असेही संबोधले आहे. थोडक्यात कुळारंभाच्या या कवितेत आपल्या प्रेरणास्थानाची विभूतीपूजा आरंभिली आहे.

या कवितांनी पारंपरीक मराठीतील विविध वृत्तरचनांचा आधार घेतला. मध्ययुगीन काळातील 'भूपाळी'सारखा प्रकार हाताळला गेला. भूपाळीच्या माध्यमातून आंबेडकरांप्रती श्रद्धा व्यक्त केली. गझलसदृश रचना करण्याचाही प्रयत्न केला आहे. 'राजहंस माझा निजला'च्या चालीवर केलेले अनुकरणही प्रत्ययाला येते. या कवितेने पारंपरीक, धार्मिक, आध्यात्मिक संकल्पनांचा पुरेपूर वापर केला आहे. अंत्यज जनतेशा, अमृत, नरक, मनू, सती देवता, भूमाता देवी इत्यादी अनेक बाबी निदर्शनास येतात.

काळाराम मंदिर सत्याग्रह हा आंबेडकरी चळवळीतील दीर्घकाळ चाललेला लढा होता. या ऐतिहासिक घटनेचा

मोठा प्रभाव या कवितेवर आहे. या लढ्याचे, तत्कालीन वातावरणाचे चित्र रेखाटलेले असून दलित कवींना प्रेरणा देणारी ही महत्त्वाची घटना ठरली. सामाजिक स्थितीगतीचे वास्तव मांडणे हा या कवितेचा स्थायीभाव ठरला आहे. समाज, धर्म, वतनदारी, दलितांचे जगणे असे अनेक विषय या कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत. या कवितांनी दलिताना आपल्या हक्कप्राप्तीचे भान जागविण्यासाठी जागृतीचा डंका पिटला आहे.

मिलिंद कॅम्पसची कविता (१९६३ ते १९७५)

१९५० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. हे महाविद्यालय १९६० ते १९८० या काळात एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र बनले. ''या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य डॉ. म. भी. चिटणीस आणि नंतरच्या काळात डॉ. म. ना. वानखेडे यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा आणि चळवळीचा वेध घेऊन समाजात सुरू असलेल्या मूल्यसंघर्षाला अभिव्यक्ती मिळवून देण्यासाठी वैचारिक व वाङ्मयीन उपक्रमांना योग्य दिशा दाखवली. त्यासाठी मिलिंद जर्नल, मिलिंद मॅगेझिन, मिलिंद साहित्य परिषद, 'अस्मिता त्रैमासिक' यासारखे उपक्रम सुरू झाले.''[४] १९६३ च्या दरम्यान या मिलिंद महाविद्यालयात आणखी एक नवा उपक्रम पुढे आला तो पुढे इतिहास बनला. तो म्हणजे मिलिंद हस्तलिखित पाक्षिक. यातून नव्याने अभिव्यक्त होऊ पाहणाऱ्या पिढीला एक अभिव्यक्तीचे साधन प्राप्त झाले. यातून पुढे सशक्त लेखक कवींची पिढी पुढे आली. सुखराम हिवराळे, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, योगिराज वाघमारे, अरुणा लोखंडे, ते ना. तु. पोघे, महेंद्र भवरेंपर्यंत,''[५] भित्तीपत्रकाबरोबरच मिलिंद वार्षिकांक हे विदयार्थ्यांसाठी अभिव्यक्त होण्याचे माध्यम ठरले. १९६३ ते १९७५ या बारा वर्षांच्या कालखंडात मिलिंद वार्षिकांकातून शेकडो कवींनी हजारो कविता लिहिल्या आहेत. म्हणून साठोत्तरी दलित कवितेच्या इतिहासाचा धांडोळा घेताना मिलिंद कॅम्पसची कविता टाळून पुढे जाता येणार नाही. कारण मिलिंद संस्कृतीने अनेक दिग्गज कवी दलित साहित्य प्रांताला दिले आहेत. ज्यांनी पुढे दलित कवितेच्या वटवृक्षाचा विस्तार करण्यास्तव मोठाच हातभार लावला आहे.

मिलिंद कॅम्पसची प्रारंभीची कविता अगदीच चाचपडताना दिसते. पूवसुरींच्या कवितेचे अनुकरण आशयविषयाच्या बाबतीत तिला टाळता आलले नाही. बरेचसे कवी हे स्वच्छंदतावादाच्या आश्रयानेच अभिव्यक्त होताना दिसतात. **'कातळासही फुटली भाषा नव्या युगाची प्रथम तेधवा'** ही मिलिंद कॅम्पसची अनोखी ओळख आहे. भाषा जरी पारंपरिक मराठी कवितेच्या वळणाची असली तरी आशय मात्र नवा आहे. एका स्फूर्तीगीताचे हे बोल मिलिंद कॅम्पसमध्ये नव्या बीजाचे रोपण झाल्याचे सूचित करते. मिलिंद मॅगेझिनचे वैशिष्ट्य विशद करताना थोर लेखक शंकरराव खरात म्हणतात, ''या मॅगेझिनचे पहिले महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यातील विदयार्थ्यांचे अनुभव. हे अनुभव अस्सल आणि रसरशित असे आहेत. चारपाच कादंबऱ्या लिहिण्यापेक्षा हे अधिक महत्वाचे आहे. या मॅगेझिनचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे यातील कविता. काव्यामध्ये आविष्कारीत झालेले अनुभव जिवंत आणि अस्सल वाटतात. विदयार्थ्यांचेच अनुभव अगदी सहजतेने आणि उत्फूर्तपणे व्यक्त झालेले आहेत. त्यामुळे त्याला व्यापक भावनात्मकतेची बैठक आपोआपच लाभते. फॅशन किंवा हौस म्हणून उपऱ्या भावनेतून आलेल्या कविता येथे नाहीत. यातील भावनांचा संबंध प्रत्यक्ष जीवनातील भावआंदोलनाशी आहे. त्यामुळे त्याला एक वेगळा जिवंतपणा प्राप्त झाला आहे. व वेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. विदयार्थ्यांच्या या कविताना विविध आयाम प्राप्त झाले आहे. ''[६] या काळातील प्रारंभीची कविता अगदीच स्वच्छंदतावादी आहे. उदा

तुझ्या सागरल्या मनी ओथंबले गंगाजळ
तुझ्या पावन दिठीत घुमे मांगल्याची शीळ
(**यशवंत मनोहर**)

अशाप्रकारे मांगल्याची शीळ घालणारी ही अभिव्यक्ती आहे. त्याचबरोबर मावळतीच्या रंगाचे दर्शनही या कवितेने घडविले आहे.

काजळल्या दाही दिशा विरल्या काळोखात वाटा
क्षितिजाच्या काठावर आज उभा मी एकटा
(**वामन निंबाळकर**)

किंवा

तव प्रीतीच्या तेलात माझ्या जीवनाची वात
वाटे भिजून जळावी निशिदिन अखंडीत
(**नाना पी. पारखे**)

तारुण्यसुलभ भावभावनांचा वेग आणि आवेग येथे सळसळताना दिसतो. उदा.

१. पैंजनात शब्दगंध / ओठी अबोलीचे गीत
मौन जाईच्या गंधाने / दारी दरवळली रात
(**यशवंत मनोहर**, १९६४)

२. वचनाची आस अंतरी जपली । तंद्रीत आहे मी प्रीतीत नटली
छेडू नको राया शिणलासे जीव । ढळल्या अश्रूंचा जिंकू नको डाव
(**पाईकराव व्ही. डी.**, १९६४)

३. पहिल्या भेटीत नदीच्या किनारी । दिसताच काया भारावून गेली
(**ताराचंद नागदेवे**, १९६४)

अशाप्रकारे तारुण्यसुलभ भावना त्याचबरोबर पाने, फुले, ऋतू, वारा अशा आसमंतात ही कविता हेलकावे खाताना दिसते. पहिली भेट, हूरहूर, विरह, आठवण अशा प्रेमलापात ही कविता अडकलेली दिसते. याबाबत प्राचार्य **ल.बा. रायमाने** यांचे मत मोठे मार्मिक आहे. ''आमच्या विद्यार्थ्यांच्या अनुभूतीची उभारी वेगळी आहे. यातून सामाजिक नीतीमतेचा पुरस्कार कोठे केलेला आढळतो तर कोठे सडत चाललेल्या शरीरातील हिरव्या प्रेरणांचा मागोवा घेतलेला दिसतो.''[७] मात्र लवकरच इथल्या कवितेला सामाजिक भान आलेले दिसते. तत्कालीन दलित जीवनावरील अन्याय अत्याचाराचे पडसाद या कवितेत उमटू लागले.

शिरसगाव: एक हृदयभेदक प्रकार
सतीची नग्न धिंड, दानवतेचे मानवतेला आव्हान
व्यथित मानवता व्यथा कालची आणि उद्याची
संवेदना तरारते व्यथा भडकते अणू पेटतो
आणि विश्व गिळाया धावते
(**अनामिक**, १९६४)

ओबडधोबड आकारात अशी कविता शब्दबद्ध होताना दिसते. त्याचवेळेस या कवितेला बुद्धाच्या हाकाही आता ऐकू येताहेत असे दिसते.

पानापानातून बोधिवृक्षाच्या बुद्धं सरणं मंत्र ठिबकला
पुन्हा एकदा याच भूमीतून तोच नाद भीम होउन रुजला
(ज्ञानेश्वर ताकसांडे, १९६४)

कवितेचा सूर आता बदलत चालला आहे. असे निदर्शनास येते. उदा.

धुराचे लोळ पोटात घेत असलेले आकाश
अन् नग्न सायंकाळ माणुसकीचे वस्त्र फेडलेली

घराघरावर रस्त्यावर माणसे गच्च
थांबलेले श्वास त्यांचे लहान मुले चिप्प
अनंत वेदनांचे ओझे घेऊन डोळे
जळत होते किती अेकाचे
(**वामन निंबाळकर**, १९६९)

अशाप्रकारे निंबाळकरांची कविता तुटलेल्या माणसाचे, माणुसकीचे भयावह वास्तव चित्रित करताना दिसते. हा कवितेचा सूर वेगळा आहे. एकूणच सामाजिक पर्यावरणातील धुसरता जशी येथे प्रत्ययाला येते तशीच वेदनांच्या ओझ्यांनी वाकलेल्या समाजाचे एक प्रातिनिधिक चित्र साकार होते. माणुसकीला पारख्या झालेल्या समाजमनाचे दर्शन येथे घडते. खचलेली आणि वैराण उजाड झालेली माणसे, अमानुष प्रवृत्ती अशी अनुभूती मुखरीत करण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. पुढे ही कविता समतेचा पुकाराही करताना दिसते.

या समतेच्या वावटळीत आम्हाला गरगरायचे आहे
त्यात सगळे मिसळून जाणार आहेत
ते जाळून निघणार आहेत त्या पवित्र प्रकाशाने मानवतेच्या
(**उत्तम खिल्लारे**)

अशाप्रकारे समता आणि मानवतेचा ध्यास या कवितेला लागला आहे. मानवतेच्या उजेडात सगळे न्हाउन निघतील अशाप्रकारचा आशावाद येथे व्यक्त होताना दिसतो. विषमता, अस्पृश्यता, उच्चनीच भेदभाव, सरंजामी मानसिकता यावर मात करण्यासाठी समतेचा पुरस्कार करणे अपरिहार्य ठरते. कारण

धरणे बांधिली कोटीची वाही पाण्याचा तो पूर
तहानलेले जीव आम्ही पाण्यासाठी दूरदूर
(**मधुकर इंगोले**)

स्वातंत्र्यानंतर अनेक योजना आल्या मात्र गरिबी आणि दास्य कायमच राहिले. स्वातंत्र्याने माणसाचा भ्रमनिरास केला. माणसे जवळ येण्याऐवजी दुरावा वाढत गेला.

कुनाकडचं पावनं तुम्ही किसन कांबळ्याकडले
म्हंजे कोन तुमी बुद्ध मंजी महार
म्हाऱ्या! छी : थू व्हईल आता समल्या गावात
खुरशी बाटवलीस चल उचल पायरी
(**उत्तम खिल्लारे**, १९७०)

राजकारण्यांना तर या वास्तवाकडे पाहायला फुरसद नाही. त्यांना त्यांची खुर्ची शाबूत ठेवायची आहे. त्यामुळे कवीमनाची जी उद्विग्नता बाहेर पडते ती पाहण्यासारखी आहे.

मत पाहिजेना तुम्हाला
तर लावा कपाळा मनुस्मतीची राख
आणि मगच टाका पाउल पुढे आमच्या कंगाल वस्तीमध्ये
(**उत्तम खिल्लारे**)

असा इशारा राजकारण्यांना या कवितेने दिला आहे. विद्रोहाचे एक वेगळे रूप येथे प्रत्ययाला येते. कविता आता प्रश्न उपस्थित करताना दिसते.

सनातन अंधार हा उजळणार नाही काय
माझ्या नसानसातले रक्त शिंपडल्याशिवाय

(**बाबुराव गुडसूलवार**)

अन्यायी व्यवस्थेसमोर असा उद्विग्न सवाल ठेवतानाच व्यवस्थेला आव्हानही दिले आहे.

हे उच्चवर्गीय मक्तेदारानो अनितीच्या दुष्ट सापांनो
या जरा गावकुसाबाहेर पाहावया मानवतेची पोरं
येथे दिवसाआड चूल पेटते त्यातही सारे कसे करपते
कसे जगावे त्यावर?
(**बा. द. गायकवाड**)

आत्मभानाची अवस्था प्राप्त झाल्यामुळे आता गावकुसाबाहेरही एक सजगता आली आहे. गावकुसाबाहेरचे मन आता संघर्षशील झाले आहे.

आता त्यांच्या हातात / पोटतिडकीच्या ज्वलंत मशाली आहेत
तुमच्या बुरसटलेल्या विचारांना जाळण्यासाठी
(**किशोर जी. मोरे,** १९७३)

पंचवीस वर्षांचे तरणेबांड स्वातंत्र्य दलितावरील अन्यायाचा हात रोखू शकले नाही. उलट अन्याय अत्याचारात भरच पडत गेली. त्यामुळे त्याविरोधात सर्वस्व झोकून देणारी संघर्षशील वृत्ती दलित मनात पेटून उठली.

अजूनही आभाळ गळतय अन्यायाचं
पंचवीस वर्षांचा हा हिशेब तसा साधा आहे
ब्राह्मणगाव - एरणगाव - बावडा
अनेक प्रसिद्ध अप्रसिद्ध बळी धिंडी
मारहाण पाण्याच्या घोटासाठी घेतलेला जीव
आता एक करावे रक्त उसळू द्यावे
बाबाचे नाव घ्यावे उभे आयुष्य झोकून द्यावे
(**वसंत जाधव**)

असे अन्यायाचे हिशेब मांडून, आंबेडकरी प्रेरणेने व्यवस्थेच्या विरोधातील स्वीकारलेले आव्हान या कवितेत प्रत्ययाला येते. निर्दयी सामजिक मनोवृत्तीचे दर्शनही या कवितेने घडवले आहे.

पोटात इंगळे भडकतच असतील तर रडा ढसा ढसा
भूक शमविण्यासाठी इथे आसवे तरी निदान
प्राषण करायला हवीत
पाठीला चिपकलेल्या पोटाकडे पाहून
इथं कुणाच्या बेंबीला कळ लागायची नाही
कुजत पडलेल्या उसाशांना येथील वारे शिवणारे नाही
(कुत्रा झालो असतो तर... **ना. तु. पोघे,** १९७४)

सामाजिक जीवनातील विसंगती स्पष्ट करून माणुसकीला पारखे झालेल्या जगाचे दर्शन या कवितेने घडवले आहे. माणसाविषयी सहानुभूती नसलेल्या माणूसकीशून्य जगात कुत्र्याला जवळ केले जाते मात्र माणसाला पायरीपासून दोन हात दूरच ठेवले जाते. हे अंतर्विरोधी वास्तव पाहून कवीला वाटते आपण कुत्र्याच्या जातीत जन्मलो असतो तर बरे झाले असते. कुत्रा होऊन निदान माणसातल्या माणुसकीची उब तरी मिळाली असती. अशी उद्वेगातून आलेली ही उपरोधिक संतप्त प्रतिक्रिया या कवितेने नोंदविली आहे.

रात्र रातभर जागी उभी दैन्याची नगरी

खिन्न सावळा अंधार शिरी अश्रूंची शिदोरी
लक्ष वेदना साहुनी केली दैन्याची चाकरी
इथे रोज एकादशी ओस झालीया पंढरी
(**दत्तात्रय हैबतराव शिंदे**, १९७४)

दु:ख, दैन्य, दास्य, अभावग्रस्तता, उपासमार जिथे पाचवीलाच पुजलेले आहे अशा जगाचे चित्र या कवितेने रेखाटले असून ओसाड आणि रखरखित सामाजिक स्थितीचे दर्शन घडविले आहे. जगण्याचे एक भीषण वास्तव या कवितेने चित्रित केले आहे. चरित्रात्मक अंगाने मुखरीत होणारी ही कविता प्रातिनिधिक रूपात व्यक्त होते.

रानात झुडूपाआड गाय व्यावी तसा जन्मलो उघड्यावर
अंगास लपेटलेल्या हातभर फडक्याचा निवारा घेऊन
सुगरणीच्या खोप्यावानी रणरणत्या उन्हात झाडाच्या फांदीला
लटकतोय झोक्यातून...
पाउल उचलेल त्या दिशेला मज्जाव होता
हमरस्त्यावर स्त्रीत्व लुटले जात असताना
गावातून नागव्या अंगाची धिंड निघताना
त्रिकाळ हास्य फुटतय या देशाच्या ओठावर
काय दिलय या देशानं मला स्वातंत्र्य?
छे! स्वातंत्र्यात वावरतोय फक्त
हाडामासांनी सांधलेला अस्तित्त्वहीन सांगाडा
माझ्यात स्वातंत्र्य कुठाय?
(**ना. तु. पोघे,** १९७५)

निराधार जगण्याचे दु:खद वास्तव येथे अधोरेखित झाले आहे. स्वातंत्र्य केवळ नावापुरतेच आणि पदोपदी होत असलेली नाकाबंदी, असुरक्षितता, स्त्रियांची बेआब्रू हे भेसूर वास्तव स्वातंत्र्याच्या पंचविशीनंतरही कायम आहे. ही भेसूरता पाहून देशाच्या ओठावर मात्र त्रिकाळ हास्य फुटताना दिसते. हा जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. स्वातंत्र्याने केलेली माणसाची गळचेपी आणि माणसाला प्राप्त झालेले कलेवराचे रूप याचे विदारक वास्तव येथे चित्रित झाले असून जन्मापासून देशाच्या स्वातंत्र्यापर्यंत वेदनेचा आक्रोश करणाऱ्या या कवितेला आपसूकच एक प्रातिनिधिक रूप प्राप्त झाले. समकालीन जीवनातील अन्याय अत्याचाराचे संदर्भ या कवितेला आहेत. स्त्रियांची लुटली गेलेली इज्जत,एरणगाव येथील रामदासचा घेतलेला बळी, शिरसगाव येथील दलित स्त्रियांवरील अत्याचार, दलितांचे हत्याकांड, बहिष्कार असे अनेक विषय कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्याचप्रमाणे

रडत रडत उघड्या झोपडीत / मी जन्मलो भिकेची झोळी घेऊन
फाटक्या छपरातून दारिद्रय डोकावतं
जीर्ण झोपडीचे पाय कुरकुरतात गीत गरीबीचं
(**जयकुमार मगर**, १९७५)

जन्माचे आणि जगण्याचे असे अनेक संदर्भ विविध कवितांमधून साक्षात झाले आहेत. सर्वांचेच जगणे जेव्हा समान पातळीवर असते तेव्हा आविष्कारातही पुनरावृत्ती होणे साहजिक आहे. अस्पृश्यतेची मानसिकता कशी खोलवर रुजलेली आहे याचाही प्रत्यय या कवितेने दिला आहे. उदा.,

मी असलो म्हणजे, आलास म्हणून बसवीत असतो
अन खुशालीची सुपारी कातरीत ओळखीची मजल गाठतो
पण ती सुद्धा अंधुकच पुसट अशा आरशासारखी

चेहरा विद्रूप करणारी
मग उमगतात जवळपणाचे धागे पण तेही कच्चेच असतात
शेवटी तंग होऊन तुम्ही अन् आम्ही
या शब्दांनी दूर जातात
कळत नाही दूरचे अंतर लांब राहूनच जगावे लागते
(**बा. द. गायकवाड,** १९७३)

या कवितेने अतिशय मार्मिकपणे अलगावाची, दुराव्याची भावना स्पष्ट केली आहे. मनाच्या पातळीवरील अस्पृश्यतेची, माणसापासून माणसाला दूर ठेवणारी अस्पृश्यतेची मानसिकता कशी खोलवर रुजलेली असते, उच्चनीच भेदभावाला कसे खतपाणी घातले जाते याचे नेमके दर्शन घडविले आहे. आत्मभानाची अवस्था प्राप्त झाल्यामुळे आता गावकुसाबाहेरही एक सजगता आली आहे. गावकुसाबाहेरचे मन आता संघर्षशील झाले आहे. लचकेतोड प्रवृत्तीवर ही कविता आता तुटून पडताना दिसते.

हाडं खायची का रे सोडलीत कुत्र्यांनो
कळलं का रे आताशी कुठं अस्तित्त्व हाडाचे
(**राम दोतोंडे,** १९७५)

अर्थाच्या दृष्टीने एक वेगळा सूर या कवितेने आळविला आहे. कुत्र्यांना आकर्षित करण्याचे सामर्थ्य हाडात असते. त्यामुळेच लाचार होण्याची ताकद कुत्र्यात येते. व्यवस्थेच्या अनुषंगाने विचार केला तर लाचारी पत्करणारे घटक आणि लाचार करणारी व्यवस्था असे द्वैत येथे सूचित होते. हाडे हे व्यवस्थेचे प्रतीक ठरते. या व्यवस्थेला अंकित होणारे लाचार समाजमन यासाठी कुत्र्याची प्रतिमा योजली आहे. अशा प्रवृत्तीचा उपहास करणारी जाणीवच या कवितेतून प्रत्ययाला येते. तळागाळातल्या समाजाला चघळू पाहणारी रवंथखोर व्यवस्था आणि जागृत झाल्यामुळे लचके तोडू पाहणाऱ्या व्यवस्थेला धिक्कारण्याचे सामर्थ्य असलेला तळागाळाचा समाज असा एक संघर्ष ही कविता सूचित करते. मिलिंद कॅम्पसच्या कवितेत चिंतनशीलताही प्रकट होऊ लागली. उदा.,

या सृष्टीची ऐक हाक एखादे झाड लावून टाक
पाखरांचे थवे येउन बसतील याच झाडावर घरटी करतील
चिमणे संसार चिवचिवत राहतील शेकडो चोचींना दुवा देतील
कुणी सांगावे काय होईल एखादा बुद्ध चालत येईल
झाडाखाली ध्यानस्थ होईल साक्षात्कारे सिद्धार्थ होईल
मानवतेला देईल हाक
(**यू. आर. गेडाम**, १९६६)

अशाप्रकारे मिलिंद कवींना बुद्धाच्या मानवतेची हाक ऐकू येत होती. त्या चिंतनातून कविता आकारास येत होत्या. मानवतावादाच्या मार्गाने ही कविता आता मार्गस्थ होताना दिसते. या कवितेविषयी प्राचार्य **ल. बा. रायमाने** म्हणतात, ''या कवितेत अभिव्यक्तीचा खास असा वेगळेपणा नाही पण आशय मात्र आजपर्यंतच्या परंपरेहून वेगळा आहे. आमच्या विद्यार्थ्यांच्या अनुभूतीची उभारी वेगळी आहे. सामाजिक विषमतेला बळी पडलेल्यांची सुखदुःखे मोठ्या कळवळ्याने आणि सहानुभूतीने चित्रित केलेली आहेत. ''[८] लोकलयही या कवितेतून उजागर होताना दिसते. उदा.

सई माझ्या सजनिले । चईन पडेईना
केयीच्या पानावरी । डोले राघू न मयना
दयन मया दयल बाई । उरला एक दाना
माहेरच्या लोकायले । सुखी ठेवजो बुद्ध भगवाना

दयन दयता बाई । थकले दोनी हात
उरल दयन दयावले। तू येरे बा भीमराजा
(**विजयकुमार गवई**, १९६६)

लोकगीताच्या आकृतीबंधातून बुद्ध आणि भीमाच्या नावाची आळवणी होऊ लागली. वऱ्हाडी बोलीच्या उपयोजनामुळे या कवितेला एक वेगळाच गोडवा प्राप्त झाला आहे. बुद्ध भीमाविषयी असलेल्या अंत:करणातील भावनेला वाट मोकळी करून दिल्याचे येथे प्रत्ययाला येते. लोकगीतांच्या प्रभावातून विविध रचना साकार झाल्या आहेत.

१. पहिली ओवी मी बाबाला वाहीन
हदयात मी माझ्या बाबाला पाहीन

२. हिंदूच्या देवाचा भाव गेला मनातून
बुद्ध भीमाच्या फोटुला मी ठेवते जपून

३. सुटं बुटं कोट माझ्या भावाच हे लेणं
विसरून कशी जाऊ माझ्या बाबाचं हे देणं
(**विजयकुमार गवई**)

४. शिक शिक मुला हाती घेऊन लेखणी
होशील तू बालिस्टर बाबासाहेबावाणी
(**पी. एस. बावीसकर**)

बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व, सर्वसामान्यांच्या मनात असलेली बाबासाहेबांविषयीची श्रद्धा, भावभावना, लोकगीताच्या, लोकलयीच्या प्रभावातून साकार झालेल्या रचनांमधून मुखरीत झाल्याचे प्रत्ययाला येते. याच प्रभावातून गेय रचनाही सिद्ध झाल्या आहेत. उदा.

१. निळ्या अंबराच्या खाली । झोका बांधिला वेलीला
या गं सयांनो गाउ । भीमाची गोड गाणी
पंचारती हाती घेऊ । ओवाळू भीमचरणी
(**लता जाधव** १९६९)

२. या विश्वाला दिव्यत्वाची प्रचिती घडली आज
भीमाईने दिली आम्हाला चिरकालीन जाग
आम्हा दीनदलिताना स्फूर्तीचा तू श्वास दिला
अंधारात बुडणाऱ्यांना ज्ञानाचा प्रकाश दिला
समता बंधुता ज्ञान कलांचा पावन संगम केला
चैतन्याने अन स्फूर्तीने समता केली बहाल
(**राजा गायकवाड**, १९६९)

मिलिंद कॅम्पसच्या कवितेने विविध बोलींचाही अभिव्यक्तीसाठी आधार घेतला आहे. येथे वऱ्हाडी बोलीचा जसा प्रत्यय येतो तसाच खान्देशातील अहिराणी बोलीचाही प्रत्यय येतो. उदा

मना भीम व्हयी गया
अमर से त्यानी किरती
त्याना सारखा पुढारी जया नही व्हनार बी नही
मना भीमनी करणी लिखाले

कया टाक हिमालयाना कागद कया धरनीना
तरी व्हनार नही
(**के. एन. गरुड,** १९७३)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध या दोन व्यक्तित्वानी मिलिंद कवींचे भावविश्व कसे व्यापून टाकले होते याचा प्रत्यय असंख्य कवितेतून येताना दिसतो. काही उदाहरणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. नमन करुया प्रभू श्री भीमाला । त्याची किर्ती हो पसरे दिशांना
(**हरिश गेडाम**)

२. याच भूमीवर युगायुगाची पहाट झाली
मंत्र ठिबकला अमोल होता बुद्धं सरणं पानातून बोधिवृक्षाच्या
घनअंधार जगात यमक साधले काळाचे सम पडली
आणि तोच नाद पुनरपि एकदा भीमरूपाने रुजला तेव्हा -
कातळासही फुटली भाषा नव्या युगाची प्रथम तेधवा
(**यशवंत मनोहर**, १९६५)

३. आठवणीच्या अश्रूधारा झरझर झरती नेत्रामधूनी
मनात येता बाबांची ती थोर कहाणी
(**एन. जी. पाटील**)

४. आधी दिसते तुझे ते महान भाग्यशाली कपाळ
आणि जाणीव होते स्वत:च्या करंटया कपाळाची
वाटतं त्यावरील एक रेष जरी असतो
तरी स्वत:ला मानल असतं अधिक भाग्यवान
(**भीमराव खंडारे**)

इथे श्रद्धेची भावना जशी व्यक्त होते त्याचप्रमाणे आंबेडकरी कर्तृत्वाची महान थोरवीही कथन केली जाते. धम्मस्वीकाराने एका नव्या युगाचा आरंभ झाल्याची सूचना त्यातून मिळते. नव्या मन्वंतराची ओळख अशाप्रकारे या कवितेने करून दिली आहे. यशवंत मनोहरांच्या कवितेत पारंपरीक मराठी कवितेच्या वळणाची भाषा जरी उपयोजित झालेली असली तरी आशयाचे नवेपण लक्षात घेण्याजोगे आहे. या आविष्कारात एका नव्या युगाची नांदी घुमताना दिसते. शून्यातून विश्व निर्माण व्हावे तशी या भूमीवर युगायुगाची पहाट झाली. ही भीमयुगाची पहाट आहे, बुद्धानंतर उगवलेली! नव्या भाषेला जन्म देणारी, मुक्यांना वाचा देणारी, उजेडाची वाणी देणारी. या आविष्कारातून मिलिंद संस्कृतीच्या कवितेची वाणी कशी असेल याचीही सूचना मिळते. म्हणून आरंभकाळातील कवितेचे नवे रूप लक्षवेधक ठरले आहे.

शून्यालाही फुटेल अंकुर पथ्थरातही प्राण पेटतील
युगायुगाची स्वप्ने फुलवित क्रांतीलाटा उरात फुटतील
प्रज्ञा करुणा शांती देवता इथे नांदतील
भीमायणाच्या स्वरआलापे दिशा उजळतील
आव्हानाच्या मंत्रबळावर उठेल सागर ढवळीत अंबर
त्या तेजाने न्हाउन निघतील विश्वावरती नरनारी नर
क्रांतीमंत्र हा इथे रुजोनी पहाट होईल नव्या युगाची
सद्धमाची . . . मानवतेची
(**सुखराम हिवराळे**, १९६५)

'मिलिंद गौरव' शीर्षकाच्या या कवितेत एक सळसळता आवेग आहे. क्रांतीसुक्तासारखी ती मंत्रमुग्ध करणारी असून उच्चप्रतिचा ध्येयवाद या कवितेने उराशी कवटाळला आहे. मिलिंद संस्कृतीचा आत्मतेजाने फुललेला हा क्रांतीस्वर सदधम्म आणि मानवतेच्या वाटेवरचा आश्वासक स्वर ठरला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

या मातीत अंकुरले एक चैतन्य
तेव्हा युगायुगाच्या मनाला आली जाग
कळून चुकले जीवनाला लागली आग
दुभंगली धरणी, उसळली वेदना आणि
कातळाला फुटला पाझर
(**ल. बा. रायमाने**, १९६५)

जमीनीचे पोट फाडून तरारलेला कोंब वर यावा तशी वेदना उसळून वर आली आणि कातळालाही पाझर फुटला असे नव्या युगाचे आगमन प्रज्ञा करुणेला जोजावतच झाले. हा नवा शोध होता. युगाला दिशा देणारी जाणीव त्यामागे होती. मिलिंद संस्कृतीच्या परिप्रेक्षात प्रतिभेला असे उधाण येत होते. त्यातून दलित कवितेची दिशाही निश्चित झाली. नव्या वळणाची वाट दलित कवितेला प्राप्त झाली होती. निसर्ग प्रतिमांच्या उपयोजनातून एका नव्या जगाचे चित्र अधोरेखित झाले.

पानापानात भरला नवआशेचा किरण
शीळ बावऱ्या वाऱ्याची आसमंती घुमते तान
स्वच्छ हासता आभाळ निळ मंगल सकाळी
लाख कंठात घुमली रामपाहारी भूपाळी
(भूपाळी, **सुखराम हिवराळे**,१९६३)

निळ्या प्रभेची चाहूल लागल्याचा प्रत्यय या भूपाळीने दिला आहे. नवचैतन्याने भारलेल्या नागसेनवनातील वातावरणाचे हे प्रतिकात्मक चित्रण होय.

धर्मचक्र परिवर्तन केले । चैतन्याचे दिप उजळले
कणाकणातून या भूमीच्या । घुमेल हाच निनाद
(**हरीशकुमार**, १९६३)

असे भान प्रकट होताना दिसते.

इथेच जळूनी अंधार
प्रकाशाचे उर फुरारले
(**देवेंद्रकुमार तायडे**, १९६६)

अशा प्रकारच्या जाणिवा कवितेतून व्यक्त होऊ लागल्या. आता मिलिंद कॅम्पस्ला तीर्थक्षेत्राचे रूप प्राप्त झाले. मात्र हे शैक्षणिक तीर्थक्षेत्र होते. सामाजिक भानाचे हे क्षेत्र आहे याची जाणीव प्रकर्षाने व्यक्त झाली. मिलिंद कॅम्पस ही प्रेरणाभूमी ठरली. त्यामुळे

रूपास आल्या दिनदुबळ्यांच्या बलशाली आशा
आम्हा मिळाली समता, सूचिता, भविष्य अन वरदान
(**यशवंत मनोहर** १९६५)

असा एक खंबीर आधार मिलिंद कॅम्पस्ने, नागसेन वनाने दिला. आंबेडकरी यशाचे मंगलगान गायीले जाऊ लागले. त्याचप्रमाणे आंबेडकरी प्रतिमा कवितेतून साकार होऊ लागली.

प्रांगणात मिलिंदच्या लवंडती थेंबथेंब
त्यात तुझे प्रतिबिंब बाबा, हसे शांत स्निग्ध

तुझ्या ज्ञानपुष्पराशी फुललेल्या नागसेनी
ध्यास लागलेला आहे अंबरास भिडण्याशी
(**एल.आनंद** १९६६)

बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या या ज्ञानभूमीत हजारो विदयार्थी शिक्षण घेत होते. त्याचे विलोभनीय चित्र या कवितेत साकार झाले आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी महाविदयालयाला 'मिलिंद' आणि परिसराला 'नागसेनवन' असे नामकरण केले. यामागे एक फार मोठा सांस्कृतिक इतिहास आहे. म्हणून मिलिंद कवींना ही शैक्षणिक संस्था मंदिरासारखी पवित्र वाटते, तीर्थस्थान वाटते. आशाआकांक्षेचे मंगलधाम वाटते. मिलिंद ही एक फार मोठी प्रेरक शक्ती त्यांना वाटते. उदा

१. औरंगाबादच्या डोंगरपायी हाय एक वन
मिलिंद विद्यामंदिर तिथं, नाव हाय नागसेन
(**मारुती वाघमारे**)

२. हे मिलिंद! हे पवित्र भूभाग
स्थिर उत्तुंग तू प्रतीक महान

३. नवसृजनाचे अभिनव कार्य
नव्या जगाचा हा प्रारंभ
(**चैतन्य भैसारे**)

४. मिलिंद जय अभिमान आमुचा तू एक तीर्थ महान
भीमा वंदुनी गाऊ निशीदिनी मंगल तव यशगान
(**यशवंत मनोहर**)

५. आजन्म कसा विसरेन मी माझ्या मिलिंदची छाया
शब्द मज तोकडे ते वात्सल्य वर्णाया
(**वामन गेडाम**)

अशाप्रकारे 'मिलिंद' आणि 'नागसेनवन' या प्रेरणाभूमीने शेकडो विद्यार्थ्यांचे जीवन फुलवले. समाजाकडे पाहण्याची दृष्टी दिली. समाजात ताठ मानेने चालण्याचा मजबूत कणा दिला. याविषयीची कृतज्ञता अनेक कवींनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे.

फुलल्या ह्या वेली सुगंध येथे दरवळला
फुलाफुलांच्या नवरत्नांनी मिलिंद मंडप सजविला
विविध फुले सुशोभती बहरली तरू नागवनी
अंकुरातुनी आवाज निघती बुद्धं शरणं गच्छामी
(**बारशाराम लडतरे**, १९६९)

बुद्धाला शरण जाणाऱ्या प्रार्थनेने मंत्रमुग्ध झालेल्या मिलिंद परिसराचे हे देखणे आणि गंभीर रूप आहे. स्वाभिमानासह गुरुची महतीही या कवींनी गायीली आहे.

१. कणकण रुजला माझ्या रक्तात इथल्या मातीचा
म्हणूनच बनलोय आज असा पोलादी छातीचा
(**जनार्दन कांबळे**, १९७५)

२. मिलिंद हे घर आहे सर्वांचे माहेर

वावरताना येथे प्रेमाने भरे उर
नाही लागे मायबाप कुणाही पाखरास
गुरुच्या रे पंखाखाली मिळे आसरा निवांत
(**अेसकुमार पखाले**, १९७५)

केवळ 'मिलिंद'ची महता स्पष्ट करणे एवढेच या कवितेचे कार्य नाही. या कवितेने जसे सामाजिक भान व्यक्त केले आहे तसेच राष्ट्रप्रेम, देशप्रेमही व्यक्त केले आहे. त्याची काही उदाहरणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. रक्त उसळले होते तेव्हा नसानसातून
स्वाभिमानाची आग पेटली होती आमच्या मनामनातून
देश आमुचा आम्ही देशासाठी
लाख चांदण्या टिपीत होत्या आत्मकहाणी फासावरच्या लक्ष जीवांची
देशासाठी - केवळ देशासाठी
(**शांताराम हिवराळे**)

२ शूर आम्ही जाऊ रणी नाही कुणा भिणार आम्ही
लाज राखण्या भारतभूची एकीने हो राहू आम्ही
(**राजा गायकवाड**)

३. पेटले हे विश्व आज अंध:कार चोहिकडे
तळपू द्या शांतिचक्र, द्या या मनुजास धडे
(**नाना गायकवाड**)

४. लोकशाहीची ज्योत तेवती अखंड राहील
अखंड राहील भारत माझा काश्मीरचा मुकूट
(**एस. के. गोंडाने**)

५. स्वातंत्र्याचा सूर्य उगवला दिशादिशातून फुलून आला
जपलेले ते स्वप्न उरीचे येईल केव्हा आकाराला
(**नारायण वाघमारे**)

अशाप्रकारे राष्ट्रप्रेमाच्या जाणिवा या कवितेतून व्यक्त होताना दिसतात. देशाप्रती स्वाभिमान, एकजुट, शांतीची प्रस्थापना, एकात्मता इ. जाणिवा व्यक्त होतानाच स्वातंत्र्याचा सूर्य उगवून अनेक वर्षे उलटली तरी उरातील स्वप्नाकडे त्याचा प्रकाश फाकलाच नाही याची खंतही येथे प्रकट झालेली दिसते. राष्ट्रप्रेमाबरोबरच सांस्कृतिक ठेव्याची महतीही मिलिंद कवींनी सांगितली आहे. जगप्रसिद्ध अजिंठा, वेरुळ लेण्या हे औरंगाबाद शहराचे वैभव! ह्या लेण्या बुद्धसंस्कृतीशी निगडीत आहेत. तो एक महाकाव्याचा विषय आहे. मिलिंद कवी या अजरामर कलाकृतीवर भाष्य करतात - उदा.

छिन्नीच्या प्रत्येक घावातून दगडाच्या छातीवर
फुललेली भावफुले
रंगबावऱ्या वेलींची चित्रे रंगमयी कुंचल्यांनी चित्रित केलेले
गीतमयी ती लयमुग्धा बुद्धाच्या स्मितरेषेतून ओसंडणारी
मावळतीची चैतन्यमयी किरणे काळाने जपून ठेवलेल्या
सत्तावीस खुणांचा वेध घेणारी
(**शांताराम हिवराळे**, १९६८)

अजिंठ्याच्या बुद्धलेण्यांची ही चित्रमय भावगर्भता येथे प्रत्ययाला येते. ही शिल्पवेडी कोरीव लेणी युगायुगाच्या

आठवणी डोळ्यात साठवून उभी आहे. चराचराला मुग्ध करण्याचे सामर्थ्य तिच्यात ओतप्रोत भरलेले आहे. अनंताच्या अंतापर्यंत या लेण्यांचे फुलत जाणारे अबोल विश्व माणसाच्या अंत:करणाला बोलके करते. अशा प्रकारचा सौंदर्याविष्कार या कवितेने केला आहे. मिलिंद कवितेचे हे वैभवच आहे असे म्हटले पाहिजे.

मराठी कवितेत आई या विषयावर अनेकांनी कविता लिहिल्या आहेत. प्रेमस्वरूप आईपासून वात्सल्यसिंधूपर्यंत तिचे उदात्तीकरण करण्यात आले. दारिद्रयात खितपत पडलेली आई मात्र कधी मराठी कवितेचा विषय झाली नाही. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' असेही म्हटल्या गेले. मात्र दारिद्रयाच्या भिकार जगाकडे मराठी कवितेची नजर गेली नाही. मिलिंद कॅम्पसच्या कवितेने मात्र आईचे अनोखे, अभूतपूर्व रूप आणि संवेदनशीलता प्रकट केली ती अंतर्मुख करणारी आहे.

निळ्या आभाळात शोभणारा
सप्तरंगी इंद्रधनुष्य पाहताना
डोळ्याच्या कडा सुखावण्याऐवजी त्या ओलावतात
मायनं नेसलेल्या सप्तरंगी सात ठिगळी लुगड्याची
आठवण होऊन
(**पोघे एन. टी**, १९७४)

दारिद्रयाचे अर्थशास्त्रच येथे सूचित झाले आहे. आईकडे पाहण्याचा प्रचलित दृष्टिकोन येथे मोडित निघतो आणि नवा दृष्टिकोन प्रस्थापित होतो. हे नवेपण दलित कवितेचेही नवेपण आहे. नेत्रसुखद सौंदर्य आणि डोळे ओलावणारे वास्तव असे हे द्वंद्व आहे. आकाशीच्या क्षणभंगूर आभासी जगाची प्रतिमा आणि दारिद्रयाच्या रणभूमीवरची वास्तव प्रतिमा असेही एक द्वंद्व येथे स्पष्ट होते. स्त्री जाणिवा हा एक वेगळा पैलू या कवितांचा सांगता येईल. एखाद्या कवितेत पौराणिक दाखले देत या जाणिवा व्यक्त होताना दिसतात. उदा.

जनक कन्यका साध्वी सीता अयोध्येची सम्राज्ञी असता
सांभाळीत रघुकुळीचा अंकुर रानोरानी का भटकली?
(**लता दवंडे**, १९७४)

असा मूलभूत प्रश्न स्त्री जीवनाच्या संदर्भात या कवितेने उपस्थित केला आहे. त्यातून स्त्रीला दुय्यमत्व देणाऱ्या व्यवस्थेची मानसिकता सूचित होते. कवयित्रींनी आईविषयी मात्र वेगळीच जाणीव प्रकट केली आहे. प्रचलित जाणिवेपेक्षा ती वेगळ्या स्वरूपाची आहे.

आई सारं जग तुझा गौरव करतय
माझा मात्र तुझ्यावर राग आहे
तू मला स्त्रीजन्म दिलास अन तुझे अश्रू माझ्या स्वाधीन केलेस
तुझा वारसा चालवण्यासाठी
मुलगी झाली म्हणून तूच कोपऱ्यात तोंड खुपसून रडलीस
कारटी, पोरटी म्हणून तूच
करंट्या स्त्रीत्वाची जाणीव करून दिलीस
(**कुंदा वाघ**, १९७४)

आईचे उदात्तीकरण करणाऱ्या जगाचा एक उपहास येथे पाहावयास मिळतो. स्त्रीने आपला वारसा आपल्या दु:खासहित पुढच्या पिढीकडे आपल्या मुलीच्या रूपाने सोपवला. जन्मत:च स्त्रीत्वाची जाणीव करून दिली. याविषयीची संतापाची भावना वरील कवितेत व्यक्त झाली आहे. दुसऱ्या एका कवयित्रीने जनावरागत वावरणाऱ्या पुरुषी व्यवस्थेलाच आव्हान दिले आहे.

हजारो वर्षांच्या तमयुगाचाच तू तसाच राहिलास
तुला म्हणून सांगते जिथे देवाचा पाळणा खाली झालाय
तिथं तुला जागा मिळणार नाही
नव्या युगाच्या पहाटवाऱ्याला विचारून बघ
पुरुषं सरणं गच्छामी ब्लॉक झाले आहेत
आता उरलेय फक्त तुझ्या हिशेबाचे चोपडे
ते पुरे करायला आम्ही
हातातल्या बांगड्या बाजूला ठेवून बसलोय
(**राधा कांबळे**, १९७५)

आधुनिक युगाच्या आणि आधुनिक मूल्यांच्या आधारे संघर्षासाठी सिद्ध झालेल्या स्त्रीमनाचा हा आविष्कार आहे. पुरुषाला शरण जाणाऱ्या प्रवृत्तीला इथे नकार दिलेला दिसून येतो. स्त्रीमनाच्या विद्रोहाची ही अभिव्यक्ती आपले वेगळेपण जोपासणारी आहे. पुरुषी उन्मत्तपणाचा हिशोब पूर्ण करण्यासाठी स्त्री आता सज्ज झाली आहे.

१. दुखःच ज्यानी आम्हाला मुरवून जगायला शिकवले
त्यानीच आमच्या जीवनाचीही लक्ष्मणरेषा ओढून दिली
(**कुसुम मोरे**)

२. विषमतेचे मादक पेय पिऊन झिंगताहेत मश्गूल होऊन
हे म्हणे न्याय करणार आमचा
ज्यांच्यासमोर स्त्रीची किंमत फक्त चरणाची दासी
एक बाहुलं जिथं तिच्या मनाला भावभावनेला स्थानच नाही
ते म्हणे विचार करतात स्त्रियांच्या मुक्ततेचा
(**सुऋचा चव्हाण**)

पुरुषी व्यवस्थेच्या दुटप्पीपणावर या कवितांनी भाष्य केले आहे. अभिव्यक्तीची उपरोधिक तऱ्हाही येथे प्रत्ययाला येते. अशाप्रकारे मिलिंद कॅम्पसच्या कवितेने स्त्रीजाणिवेचा प्रखर आविष्कार केला आहे. सामाजिक, पुरुषी प्रवृत्तीवर कठोर भाष्य केले आहे. तसेच या कवितेने आणखी एक केले ते म्हणजे प्रेमकवितेलाही सामाजिक भानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. उदा

मी अजूनही उभा आहे साऱ्या सूर्याच्या ज्वालाजवळ
यायचे असेल तर अजूनही ये
सारे तिथंच टाकून तुला मला मुके करणारे संस्कार
पाण्यासाठी भीक मागायला सांगणारे तत्त्वज्ञान
सौंदर्यांच्या काचदानात तुला अडकवून ठेवणारे...
आलीच तर एकलव्याचा जिव्हाळा घेऊन ये
तिथल्या मातीच्या गंधालाही वास येतोय परकेपणाचा
आलीच तर एवढं एक घेऊन ये
यशोधरेच्या निद्रेने ये
(**अविनाश डोळस**, १९७५)

या कवितेत प्रेयसीला केलेले आवाहन आहे. तरी पण ही कविता रुढ प्रेमकवितेसारखी वाटत नाही. माणसाच्या जगण्यावर निर्बंध घालणारे, त्यांचे स्वातंत्र्य हिराऊन घेणारे, माणसाला भिकेला लावणारे तत्त्वज्ञान नाकारण्याचे आवाहन

त्यात आहे. तसे स्त्रीला एक मादी किंवा भोगाची वस्तू समजणाऱ्या पुरुषी व्यवस्थेचा धिक्कार करणारा विचारही त्यात सामावला आहे. सहजीवनाची वाटचाल कशी असू शकेल याविषयीचा संकेत त्यात आहे. वैयक्तिक संसारापेक्षा सामाजिक संसाराचीच सूचना त्यातून मिळते. या अर्थाने या कवितेला सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रेमकवितेला सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रारंभ मिलिंद कॅम्पसच्या कवितेने केला आहे असे म्हणता येईल.

थोडक्यात, मिलिंद कॅम्पसची कविता म्हणजे साठोत्तरी दलित कवितेचा ओनामा आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. या कवितेने नव्या बीजाचे रोपण केले आहे. त्यासाठी मिलिंद वार्षिकांकांचे मोलाचे, ऐतिहासिक योगदान लाभले आहे. अगदी प्रारंभीची कविता स्वच्छंदतावादाच्या अंगाने जाणारी, पूर्वसुरीचे अनुकरण करणारी अशी आहे. प्रेमालापात ती अडकली आहे. मात्र लवकरच तिला सामाजिक भान आल्याचे दिसून येते.

तत्कालीन दलितांवरील अन्याय अत्याचाराचे पडसाद या कवितेत उमटले असून, तिने तुटलेल्या माणसाचे भयावह वास्तव चित्रित केले आहे. त्याचबरोबर वेदनांच्या ओझ्याने वाकलेल्या समाजाचे प्रातिनिधिक चित्र साकार केले आहे. या कवितेला समता आणि मानवतेचा ध्यास असून स्वातंत्र्याने माणसाची केलेली गळचेपी, माणसाला प्राप्त झालेले कलेवराचे रूप, स्वातंत्र्याने केलेला भ्रमनिरास स्पष्ट केला आहे. राजकारण्यांना इशारा देणाऱ्या या कवितेने विद्रोहाचे एक वेगळे रूप साकार केले आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारले आहेत. गावकुसाबाहेरचे संघर्षशील मन चित्रित केले आहे. अन्यायाचे हिशेब मांडून व्यवस्थेला आव्हान दिले आहे. सामाजिक जीवनातील विसंगती स्पष्ट करून माणुसकीला पारखे झालेल्या तसेच ओसाड आणि रखरखित सामाजिक स्थितीचे दर्शन घडवले आहे. सामाजिक भानासह राष्ट्रप्रेमही व्यक्त केले आहे. राष्ट्रप्रेमाबरोबरच सांस्कृतिक ठेव्याची महती विशद करताना सौंदर्याविष्कारही घडविला आहे. मिलिंद कॅम्पसच्या कवितेचे हे वैभव आहे.

समकालीन जीवनातील अन्याय अत्याचार, दलितांची हत्याकांडे, अस्पृश्यता, बहिष्कार, स्त्रियावरील अत्याचार अशा अनेक विषयांना या कवितेने आपले केंद्र केले आहे. संघर्षरत असलेल्या या कवितेने रवंथखोर व्यवस्था आणि तिला धिक्कारणारा तळागाळातला समाज असे द्वैत मांडले आहे. चिंतनशील असलेली ही कविता मानवतावादाच्या रस्त्याने मार्गस्थ झाली आहे.

लोकगीत आणि लोकलयीचा आकृतीबंध या कवितेने स्वीकारला आहे. त्यातून बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीची आंतरिक भावना व्यक्त केली आहे. गेय रचनाही सिद्ध झाल्या आहेत. अभिव्यक्तीसाठी बोलीभाषेचेही उपयोजन केले आहे. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध या दोन व्यक्तित्वांनी मिलिंद कवींचे भावविश्व व्यापले आहे. त्यामुळे या व्यक्तित्वाबददल जशी श्रद्धेची भावना व्यक्त होते तशीच त्या व्यक्तित्वाची थोरवीही कथन केली जाते. धम्मस्वीकारामुळे नव्या युगाचा आरंभ झाल्याचा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. या कवितेने मिलिंद संस्कृतीचा आत्मतेजाने फुललेला क्रांतीस्वर निनादत ठेवला आहे. आंबेडकरी ज्ञानभूमीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भावविश्वाचे प्रातिनिधिक चित्र या कवितेने रेखाटले असून या ज्ञानभूमीबददल कृतज्ञताही व्यक्त केली आहे. मिलिंद कॅम्पस आणि नागसेनवन परिसराचे देखणे, ज्ञानाची आसक्ती असणारे आणि गंभीर रूप साकार केले आहे.

मिलिंद कॅम्पसच्या कवितेने प्रखर स्त्रीवादी जाणिवा प्रकट केल्या आहेत. आईचे अनोखे आणि अभूतपूर्व रूप साक्षात केले आहे. कवयित्रींच्या कवितांनी आईचे उदात्तीकरण करणाऱ्या जगाचा उपहास केला आहे. त्याचबरोबर आईने आपल्या मुलीकडे दु:खाचा वारसा सोपविला याविषयी संतापाची भावना व्यक्त केली आहे. जनावरागत वावरणाऱ्या पुरुषी व्यवस्थेला आव्हान दिले आहे. आधुनिक युगाच्या आणि आधुनिक मूल्यांच्या आधारे संघर्षासाठी सिद्ध झालेल्या स्त्रीमनाचा विद्रोही आविष्कार झाला आहे. पुरुषी व्यवस्थेच्या दुटप्पीपणावर कठोर भाष्य केले आहे. तसेच प्रेमकवितेलाही सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रारंभ मिलिंद कॅम्पसच्या कवितेने केला आहे. मिलिंद कॅम्पसच्या कवितेमुळेच दलित कवितेला नवे वळण प्राप्त झाले आहे. साठोत्तरी दलित कवितेचा आरंभबिंदू म्हणून तिचे स्थान ऐतिहासिक स्वरूपाचे

ठरले आहे.

✸ प्रातिनिधिक कवितासंग्रह 'आकार' प्रकाशक: महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा, १९६७

फुले आंबेडकरी कवितेला आकार देणाऱ्या कवींचा समावेश असणारा 'आकार' हा प्रातिनिधिक कवितासंग्रह १७.१२.१९६७ रोजी प्रकाशित झाला. या कवितासंग्रहात चोखा कांबळे, सौ. कुसूम गांगुर्डे, दया पवार, राम मोरे, यादवराव गांगुर्डे, अर्जुन डांगळे, चंद्रमोहन वाघ, बंधुमाधव, वसंत राजस, मधु गंध, सुगंधा शेंडे, हरिश बुकाणे, मा. क. वाळंज, हिरा बनसोडे, वामन बुकाणे, बाबुराव बागूल इ. सोळा कवी-कवयित्रींच्या कवितांचा समावेश आहे. या संग्रहाविषयी बौद्ध साहित्य सभेचे अध्यक्ष घन:श्याम तळवटकर यांनी लिहिले आहे, की ''शतकानुशतके अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत दडपलेली मने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बंधमुक्त केली आणि आता ती मने बोलू लागली आहेत. त्यांना मिळालेल्या आकाराचे हा कवितासंग्रह प्रतीक आहे. ''[९] हे तळवटकर यांचे मत रास्तच आहे. तसेच दलित, बौद्ध समाजातील कवींच्या नव्या जाणिवांच्या आंबेडकरी प्रेरणेतून साकार झालेला हा पहिलाच प्रातिनिधिक कवितासंग्रह होय. असे असले तरी या कवितासंग्रहातील कवितांमधून नवखेपणाच्या अनेक खुणा प्रत्ययाला येतात. पूर्वसुरीच्या मराठी कवितेचा प्रभाव आणि अनुकरण व स्वच्छंदतावादी प्रवृत्तीचा प्रभाव दिसून येतो. गीतोपदेश, आत्म्याचे शुद्धीकरण, परमेश्वराचे अजस्त्र जाते, लक्ष्मीपुत्र अशा पारंपरीक संकल्पनांचा भरणाही आहे. त्याचबरोबर मानव जागृत होईल आणि जाणीव नेणिवेचा खेळ संपेल असाही या कवितेचा सूर आहे. थोडक्यात, संमीश्र भावाभिव्यक्ती या कवितेत दिसून येते. स्वच्छंदतावादाचा प्रभाव आणि आंबेडकरी विचारांचा प्रभाव अशा दोन प्रकारे 'आकार'मधील कवितांचा विचार करता येईल.

चंद्र, चांदण्या, प्रतीक्षा, उदासी, विरह, मिलन, धुंदफुंद श्रृंगार, वैफल्य इत्यादी गोष्टींना केंद्रस्थानी ठेवून काही कवितांमधून प्रेमविषयक जाणीव प्रकट झाली आहे. विरलेल्या स्वप्नांचे स्मरण जसे या कवितेला होते तसेच स्पर्शातून येथे सुगंध फुलताना दिसतो. म्हणूनच स्वत:ला अबला समजणारे स्त्रीमन येथे दिसून येते. उदा.

मी अबला तू माझे बल की / मम अंधाचे लोचन तू की
तुझिया वाचूनी उदास वाटे / जग हे सारे मज एकाकी
(**कुसूम गांगुर्डे**/ १०)

प्रियकराला म्हणजे पुरुषाला आपली ताकद मानणारे स्त्रीचे परावलंबित्व येथे साक्षात झाले आहे. हिरा बनसोडे या कवयित्रीने कुंती, मीरा अशा पौराणिक प्रतिमांचा आधार घेऊन जाणिवा व्यक्त केल्या आहेत. त्याचवेळी

माझ्या अंधाऱ्या अंधत्वात / प्रकाशाला नाव आहे
माझ्या काळ्या काळोखात / पौर्णिमेला भाव आहे (५३)

अशी प्रकाशगर्भ ओढही व्यक्त केली आहे. **वसंत राजस** या कवीनेही तिच्याशिवायच्या रित्या जीवनाची कथा सांगताना 'राधा घरी नाही कान्हा कसे हसेल गोकुळ? असा प्रश्न उपस्थित केला आहे. मात्र एवढ्यावरच त्यांची कविता विराम घेत नाही तर पुढे ती प्रकाशाच्या शोधात निघाली आहे असे दिसून येते. ध्येयसिद्धीसाठी संघर्षाशिवाय पर्याय नसल्याचा निर्वाळा त्यांच्या कवितेने दिला आहे. लढता लढता मरायचे हे लढवय्याचे ध्येय जाणून घेतले आहे.

दाट घनांच्या रात्रीनंतर / सूर्य उधळतो प्रकाश किरणे
अवसेनंतर पुनव उगवते / पसरीत गगनी शुभ्र चांदणे (३१)

लढत लढत मार्गक्रमण केले की प्रकाशाची प्राप्ती होईलच असा आशावाद **बंधुमाधवां**च्या कवितेने उरीपोटी बाळगला आहे. **दया पवारां**च्या कवितेने मात्र निवाऱ्याचा प्रश्न कवितेच्या केंद्रस्थानी आणला आहे. महानगरातील सामान्य माणसाच्या अभावग्रस्ततेची, हतबलतेची करुण कहाणी सांगितली आहे. 'गतीमान करावे वाटते गाळात रुतलेले दैन्याचे चक्र' अशी जाणीव जोरकसपणे त्यांच्या कवितेने व्यक्त केली आहे.

शौचाला नेणाऱ्या लोटयातूनच
प्यालोय पाण्याबरोबर दु:खाचे कडवट घोट

असे वेदनेचे चरित्र साकार झाले आहे. असे असले तरी दया पवारांच्या कवितेची एक बाजू श्रृगांर आणि वैफल्याची जाणीवही व्यक्त करते. उदा.

वाट किती पाहू राया / थांबला का दूरदेशी
आसवांनी भिजे सारी / माझी मुलायम उशी (१६)

विरहिणीची अवस्था येथे प्रकट होते. त्याचवेळी वैफल्याने जखमी झालेल्या मनाचे मनोगतही व्यक्त होते.

तिने घेतले आहे सतीचे वाण / स्वत: होऊन भस्म होण्याचे
अन माझ्या मनाचा कमंडलू / टिप टिप आसू ढाळीत आहे
अस्थिपंजर देहावर (१८)

कमंडलू हे संन्यस्त जीवनाचे साधन आहे. या कमंडलूला तडे गेले आहेत. प्रेमातील वैफल्याबददल या कवितेला काही सांगावयाचे आहे. विफलतेतून मनाला झालेल्या जखमेमुळे मनाच्या पातळीवर पेटून उठणारे आक्रंदन येथे पाहावयास मिळते.

यादवराव गांगुर्डे यांच्या कवितेने वासनेच्या भूकेला हददपार करणारी जाणीव व्यक्त करतानाच दांभिकता आणि बकप्रवृत्तीवर भाष्य केले आहे. **वसंत राजस** यांच्या कवितेने फाटक्या जिंदगीचे चित्र रेखाटले आहे. स्वाभिमानी बाणा हरवलेल्या सामाजिक मनाचे दर्शन घडवले आहे. लाचार वृत्ती बाळगल्यामुळे स्वाभिमान लोप पावला आहे. जगण्याला प्रेतकळा आली तरी माणसे पेटून का उठत नाहीत असा रास्त सवाल त्यांच्या कवितेने उपस्थित केला आहे. **मधु गंध** यांच्या कवितेने सामान्यातील सामान्याची महती गाण्याची आस बाळगली आहे. मानवतेच्या नरडीला नख लावण्याऱ्या अमानवी प्रवृत्तीचा वेध घेतला आहे. **हरिश बुकाणे** यांनी दफणासाठी कफन सापडत नाही असे सांगत सामाजिक जीवनातील व्यथा वेदना प्रकट केली आहे. 'मुठभर कण्या वितभर पोटासाठी, उसन्या मागून मिळत नाहीत' अशी जीवघेणी वेदना प्रकट केली आहे. **सुगंधा शेंडे** यांच्या कवितेने सामाजिक सांस्कृतिक जीवनातील विरोधाभास उजागर केला आहे.

रुढीचे मढे / संस्कृतीच्या शालूला / बुरसटले कडे

असा कवितेचा उद्‌गार आहे. **मा. क. वाळंज** यांच्या कवितेने स्वाभिमानी बाणा जोपासणारी जाणीव व्यक्त केली आहे. 'आमच्या जगावर तो पहा सूर्य उगवत आहे' अशी नव्या जगाचा उदय होत असल्याची सूचनाही देऊन ठेवली आहे. अर्जुन डांगळे यांची कविता दिशाहीन पार्श्वभूमीवर स्वत:ला घडवण्यासाठी प्रेरणास्थानाच्या शोधात निघाली आहे. प्रकाशाच्या दिशेचा ध्यास त्यांच्या कवितेला लागला असून दु:ख, दैन्य, दास्य, बेकारी आणि मूलभूत गरजांचा अभाव याविषयीचे सामाजिक भान जागविले आहे. तेजाला अंधाराने झाकोळून टाकणाऱ्या प्रवृत्तीचा निर्देश या कवितेने केला आहे. प्रकाशाला बांध घालू पाहणाऱ्या प्रवृत्तीवर डांगळ्यांच्या कवितेने भाष्य केले आहे.

आकार या संग्रहातील श्रेष्ठ कविता म्हणून **बाबुराव बागूल** यांच्या कवितांचा निर्देश करता येईल. बागूल हे तत्त्वचिंतक लेखक होते. दलित साहित्य चळवळीचे अध्वर्यू होते. विद्रोह हे मूल्य प्रस्थापित करण्याचे मौलिक कार्य त्यांच्या साहित्याने केले आहे. दलित कवितेचा आरंभबिंदू म्हणूनही त्यांची कविता महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक ठरली आहे. प्रखर असा विद्रोही स्वर त्यांच्या कवितेने दलित साहित्याच्या प्रांतात घुमविला आहे. या देशात जन्म घेणे चूकच ठरते कारण येथे माणूस म्हणून स्वीकारले जात नाही. जन्मत:च अधिकारभेद करणारी व्यवस्था येथे कार्यरत होती म्हणून बागूलांची कविता नागवल्या गेलेल्या माणसाला मार्ग दाखविते-

ज्यांनी केली चूक येथे जन्म घेण्याची

त्यांनीच ती सुधारली पाहिजे
देश सोडून! अथवा भीषण युद्धे करून! (५४)

देशांतर करणे किंवा याच भूमीवर युद्ध छेडणे यापैकी एक मार्ग स्वीकारायचा आहे. परंतु येथे अस्पृश्य ठरवल्या गेलेल्यांची नाळ या देशाच्या आदिमतेशी जोडलेली असल्यामुळे त्याला देशत्याग करण्याची गरज नाही. मात्र याच भूमीवर त्याला युद्ध छेडता आले पाहिजे म्हणजे संघर्ष उभा करता आला पाहिजे. अशाप्रकारे बागूलांची कविता माणसाला संघर्षसन्मुख करते. माणसाच्या खदखदणाऱ्या मनात विद्रोहाची ठिणगी टाकते.आत्मसन्मानासाठी विद्रोहाची शिकवण देते. एका अर्थाने ही कविता चळवळीतील संघर्षाची दीक्षा देते. परिवर्तनाच्या पायावर दलित शोषिताना उभे करण्याचा एक ठाम विचार या कवितेने दिला आहे. म्हणूनच ती उद्घोष करते. -

ती मशाल तेवढी घे
आणि त्या झोपड्यांच्या वस्तीकडे जा
जसा येसू गेला तसा जा
नी तथागत बोलला तसाच बोलत रहा
कारण तिथे क्रांतीचा लाडका लेक अस्पृश्य रहात असतो
तो दिसाया असा तसा दिसतो
पण त्याला बघून सशस्त्र मनू घाबरला होता
अन् दशरथी राम कत्तलखोर झाला होता (५५)

माणसाची मने प्रकाशमान करण्याचे कार्य मशाल या प्रतीकातून घडते. मन आणि विचार या दोन्ही गोष्टी एकरूप झाल्या की क्रांतीच्या प्रसुतीचे डोहाळे लागतात. मात्र हे माणसाच्या मनात रुजविण्यासाठी सर्व वाटाच मनूने बंद केल्या होत्या. त्यातूनच एक कत्तलखोर परंपरा अस्तित्त्वात आली. या परंपरेला शह देण्यासाठीच क्रांती अपरिहार्य आहे. म्हणून क्रांतीला उददेशून बागूल म्हणतात.

मला माहीत आहे या देवदेवतांच्या देशात
चार्वाक चिरडला गेला नी बुद्ध अवतार झाला
तशी तू होऊ नयेस म्हणून वाटल्यास लवकर येऊ नको
यायचे असेल तेव्हाच ये, पण येशील तेव्हा
निदान तुझ्याजवळ आंबेडकरांची जळजळ तरी असू दे! (५७)

आपल्यापेक्षा वरचढ ठरणाऱ्या तत्त्वांना आणि विचारांना संपवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे, त्यात अपयश आल्यास त्या तत्त्वविचारांना स्वत:च्या परंपरेत सामावून घेणे ही प्रक्रिया उपनिषद काळापासून सुरू आहे. या प्रक्रियेतूनच चार्वाकाच्या विचारपरंपरेला तुच्छ लेखण्याचा प्रयत्न झाला. निरीश्वरवादी, अनात्मवादी, विज्ञाननिष्ठ बुद्धाला अवताराच्या मालिकेत नेऊन बसवण्यात इथली सनातन परंपरा यशस्वी झाली आहे. मात्र हे थोतांड समजून घेण्यासाठी फारसे प्रयत्न करावे लागत नाहीत कारण सनातन परंपरेचे हे जलताडन आंबेडकर भारतात फुसकाच बार ठरणार आहे. क्रांतीस आवाहन करताना कोणते भान बाळगले पाहिजे याची जाणीव बागूलांच्या कवितेने स्पष्ट केली आहे. कळकळ आणि जळजळ ह्या साऱ्याच गोष्टी परिस्थितीच्या रेटयातून, इतिहासाच्या आकलनातून आणि प्रत्यक्ष सोसलेल्या घणाच्या घावातून तावूनसुलाखून निघालेल्या डॉ. आंबेडकरांना अवगत झाल्या होत्या. वैचारिक आणि तात्त्विक द्वंद्वाच्या पार्श्वभूमीवर बागूलांची कविता एक वेगळे भान प्रकट करते.

हे प्रकाश पिऊन पुनित झालेले हात
बुद्धाला वाहण्याचे मी ठरवले होते
ते हात ... मी बंदुकीने बांधून घेऊ?

प्रज्ञावंत झालेल्या हातात बंदुका शोभत नाहीत हे कवीला स्पष्ट करावयाचे आहे. शस्त्रावर विश्वास ठेवून शोषणाचा अस्त करायला निघालेली जाणीव आणि अहिंसेच्या अस्त्राने मुक्तीचा मार्ग शोधणारी जाणीव हे दोन्ही दु:खनिरोधाचे मार्ग असले तरी दु:खनिरोधासाठी आपले हात शस्त्राला दयायचे नाही हीच भूमिका प्रबळ ठरते. शस्त्र आणि संबोधी ह्या दोन्ही परस्परविरोधी गोष्टी आहेत. वैचारिक आणि तात्त्विक द्वंद्वाच्या पार्श्वभूमीवर दु:खनिरोधासाठी अहिंसेच्या तत्त्वाचा अंगिकार करणे क्रमप्राप्त असल्याचे तीव्र भान बागूलांच्या कवितेने स्पष्ट केले आहे.

थोडक्यात, **आकार**मधील कवितातून संमीश्र भावाभिव्यक्ती झाली आहे. स्त्रियांच्या कवितेतून स्वत:ला अबला समजणारे स्त्रीमन प्रकट झाले आहे. पौराणिक स्त्री प्रतिमांचा आधार घेऊन जाणिवा प्रकट झाल्या आहेत. वैफल्यामुळे मनात पेटून उठणारे आक्रंदन प्रकट झाले आहे. या कवितेने ध्येयसिद्धीसाठी संघर्षाशिवाय पर्याय नसल्याचा निर्वाळा दिला आहे. संघर्षातून प्रकाशाची प्राप्ती होईल असा आशावाद व्यक्त केला आहे. दांभिकता आणि बकप्रवृत्तीवर भाष्य केले आहे.

या कवितेने दु:ख, दैन्य, दास्य, बेकारी आणि मूलभूत गरजांचा अभाव या विषयीचे सामाजिक भान जागविले आहे. स्वाभिमानी बाणा हरविलेल्या सामाजिक मनाचे दर्शन घडवून नागवल्या गेलेल्या माणसाला विद्रोह आणि संघर्षाचा मार्ग दाखवला आहे. सामाजिक सांस्कृतिक जीवनातील अंतर्विरोध उजागर केले आहेत. बागूलासारख्या श्रेष्ठ कवीने माणसाच्या खदखदणाऱ्या मनात विद्रोहाची ठिणगी टाकण्याचे काम केले असून चळवळीतील संघर्षाची दीक्षा दिली आहे. त्यांच्या कवितेने दलित शोषिताना परिवर्तनाच्या पायावर उभे करणारा एक ठाम विचार दिला आहे. दु:ख निरोधासाठी अंहिसा तत्त्वाचा अंगिकार करणे क्रमप्राप्त असल्याचे तीव्र भान प्रकट केले आहे.

एकंदरीत **आकार** हा केवळ कवितासंग्रह नसून दलित बौद्धांचा साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचा 'सांस्कृतिक दस्तऐवज' आहे. या संग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत अर्जुन डांगळे यांनी म्हटले आहे, की ''पुस्तक रूपाने प्रथम दलित वर्गातील कवींची कविता एकत्र आणण्याचे कार्य या कवितासंग्रहाने केले. एका अर्थाने या काव्यसंग्रहाचे कार्य हे पायाभरणीचे होते असे म्हटल्यास अनुचित ठरणार नाही. नव्याने विकसीत होणाऱ्या जाणिवांचा आविष्कार 'आकार' या कवितासंग्रहातून दिसतो. 'आकार' हा काव्यसंग्रह आंबेडकरी जाणिवांचा आद्य प्रातिनिधिक वाङ्मयीन आविष्कार होय.''[१०] अर्जुन डांगळे यांचे हे मत या संग्रहाचे रूप स्वरूप आणि कार्य स्पष्ट करणारे आणि या संग्रहास आदयत्वाचा मान देणारे आहे ते अमान्य होण्यासारखे नाही.

दलित कविता (१९७१ - ८०)

दलित कवितेची पूर्वपरंपरा पाहिल्यानंतर असे लक्षात येते, की महात्मा फुल्यांचे साहित्य म्हणजे शूद्रातिशूद्रांच्या शोषणाविरुद्धचा पहिला विद्रोही आवाज होता. म.फुले हे एकोणिसाव्या शतकातील पहिले आधुनिक आणि विद्रोही कवी होत. आंबेडकरी चळवळीला समांतर असा कलात्मक आविष्कार आंबेडकरी जलशांच्या रूपाने झाला. आंबेडकरी चळवळीच्या सुवर्णकाळाचे चित्र जलशातील रचनांमधून साकार झाले. सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाचे भान दलितांमध्ये जागविण्याचे कार्य यशस्वीपणे या जलशांनी पार पाडले. दास्यमुक्तीचा खरा मार्ग म्हणजे आंबेडकरी विचार. हे जलशातील रचनांनी ठणकावून सांगीतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कर्तृत्व आणि व्यक्तित्व अतिशय साध्यासोप्या भाषेतून प्रभावीपणे रेखाटण्यात जलशातील कवित्व यशस्वी ठरले.

आंबेडकरी लोकगीतांचा आविष्कारही चळवळीला समांतर असा आहे. किंबहुना चळवळीचाच तो एक भाग आहे. प्रबोधन, लोकजागृती हे या लोकगीतांचे मुख्य उद्दिष्ट होते. या लोकगीतांनी दलितांमध्ये लढाऊ बाणा निर्माण केला. आंबेडकरी संघर्ष आणि प्रयत्नवाद जनतेला शिकवण्याचे महान कार्य केले. बुद्धभीमगीतांच्या माध्यमातून निरीश्वरवादी, अनात्मवादी तत्त्वज्ञानाची मांडणी झाली असून अवैदिक परंपरा नव्याने मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. या गीतांनी मानवी जीवनाचे, उदात्त मूल्यांचे तत्त्वज्ञान मांडून विज्ञाननिष्ठ विचारसरणीची पेरणी केली. विविध आंबेडकरी प्रतिमा आणि प्रतीके

निर्माण केली. आंबेडकरी चळवळीचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक लेखाजोखा मांडला. आंबेडकरी लोकगीते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अचाट आणि अफाट कामगिरीचा काव्यात्मक इतिहास होय.

आंबेडकरी वृत्तपत्रे आणि इतर वृत्तपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके यामधून प्रसिद्ध झालेली कविता पाहिल्यास असे प्रत्ययाला येते, की या कवितेच्या केंद्रस्थानीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व आहे. नव्याने चाचपडणारी ही कविता जुन्या परंपरागत काव्याविष्काराच्या अनुकरणातून बाहेर पडू शकली नाही. दलित कवितेचा स्वतंत्र चेहरा खऱ्या अर्थाने सिद्ध झाला तो १९७१ -८० या दशकात. या दशकातील कवितेने आजवरच्या एकूणच कवितेच्या परंपरेला प्रचंड धक्के दिले.ही कविता स्वत:च्या भाषिक सामर्थ्यासह स्वत:च्या दणकट अंगापिंडासह, तेवढ्याच दमदार आक्रमक चालीसह प्रवासाला निघाली आणि एकूणच कवितेच्या इतिहासाला नवे वळण लागले. दलित कविता ही विसाव्या शतकातील एक वाङ्मयीन आणि सांस्कृतिक वस्तुस्थिती आहे. दलित कवितेचा प्रारंभ खऱ्या अर्थाने साठोत्तर काळात झाला असला तरी त्यापूर्वीच जलशातील गाणी, आंबेडकरी लोकगीते, विविध कवींनी केलेले आविष्कार इत्यादी. यामुळे दलित कवितेची पायाभरणी झाली होती असे म्हणता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित कवितेचे प्रेरणास्थान असल्यामुळे त्यांच्या विचारांचे, तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दलित कवितेला आहे. आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे ''बाबासाहेब येईपर्यंत ह्या समाजाची (दलितांची) नाळ शिक्षणापासून, ज्ञानापासून तोडण्यात आली होती. पायाखाली जमीन आणि डोक्यावर छप्पर नव्हते. शहरात ते मोलमजुरी करून झोपडपट्टयात किंवा अंधाऱ्या चाळीत राहत होते. तर खेडेगावात ते सालकर किंवा येसकर म्हणून गावाबाहेर राहत होते. शिक्षणाचा अभाव, ज्ञानाचा अभाव, उत्पादन साधनांचा अभाव यापासून झालेले त्यांचे अभावपूर्ण जीवन लाचारीने वेढलेले होते. बाबासाहेब आले आणि त्यांनी हाक देऊन त्यांच्यातला माणूस जागा केला. हा दलित माणूस सर्व सामर्थ्यानिशी आणि साहित्यानिशी या चळवळीत सामील झाला.''[११] १९२० साली डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक' वृत्तपत्र सुरू केले. दलितांचे राजकीय हक्क आणि त्यांच्यावरील होणाऱ्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी 'मूकनायक' सुरू करण्यात आले. त्यानंतर १९२७ साली 'बहिष्कृत भारत', १९३० ते १९५६पर्यंतच्या कालखंडातील जनता हे साप्ताहिक म्हणजे आंबेडकरी चळवळीची समग्र दैनंदिनीच होय. या आंबेडकरी वृत्तपत्रांनी जनमानसात विलक्षण क्रांती घडवून आणली. १९२० नंतरच्या काळात भारतीय राजकीय आणि सामाजिक जीवनात उलथापालथी होत होत्या. राजकारणाची सूत्रे गांधीच्या हातात होती. याच काळात हिंदू राष्ट्रवादाची थिअरी मांडण्यात आली. हिंदू मुस्लीम समस्या सोडवण्यासाठी फाळणी झाली पाहिजे असा बॅ. जीनांचा आग्रह होता. गांधीनी हा प्रस्ताव नाकारला म्हणून मुस्लिम लिगची स्थापना झाली. त्यातून जातीनिहाय, धर्मनिहाय प्रतिनिधित्व असा विचार पुढे आला. हिंदू धर्मावर आधरित हिंदुत्ववाद्यांची व इस्लामवर आधारित जीनांची भूमिका होती. याच वेळेस स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आमच्या प्रतिनिधित्वाचे काय असा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपस्थित केला. इथेच खऱ्या अर्थाने दलितांच्या प्रश्नाला वाचा फुटते. दलित अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आणि देशभर दलितांचे ध्रुवीकरण झाले.

१९१९ मध्ये डॉ. आंबेडकरांनी साऊथ ब्युरो कमिशनपुढे अस्पृश्यांच्या राजकीय हक्काची कैफियत मांडली. १९२४ मध्ये अखिल भारतीय बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' ही त्यांनी चळवळीची घोषणा ठरवली. मार्च १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. पुढच्या परिषदेच्या वेळेस २५ डिसेंबर रोजी मनुस्मृतीचे दहनही केले. सायमन कमीशनपुढे निवेदन देऊन अस्पृश्यांच्या राजकीय हक्काची मागणी केली. १९३० च्या दरम्यान नाशिकच्या काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह केला. गोलमेज परिषदेत आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. ही बाब गांधीना मान्य झाली नाही म्हणून गांधीनी येरवडा तुरुंगात उपोषण सुरू केले. नाईलाजाने डॉ. आंबेडकरांना ही मागणी सोडून द्यावी लागली.

फक्त बहिष्कृत जातींचे राजकारण करण्यापेक्षा संपूर्ण शोषित वर्गाचे राजकारण करावे म्हणून १९३६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी 'मजुर पक्षाची' स्थापना केली. पण त्यात त्यांना फारसे यश आले नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाले तर

ते हिंदूच्या हाती जाईल आणि हिंदूच्या हाती सत्ता गेली तर त्यांच्याकडून अस्पृश्यांच्या हिताचे रक्षण होणार नाही म्हणून देशातील सर्व दलित नेते एकत्र आले आणि त्यांनी १९४२ मध्ये 'शेड्यूल कास्ट फेडरेशन'ची स्थापना केली. शेकाफे ही राजकीय पार्टी झाल्यामुळे दलिताना एक नवा चेहरा मिळाला. जात आणि धर्म यापलिकडे जाऊन एक नवा चेहरा घेऊन आंबेडकरी चळवळ आणि नेतृत्व पुढे आले.

डॉ. आंबेडकरांचा नेहमीच लोकशाही व्यवस्थेवर विश्वास होता. लोकशाही हे एक मंदिर आहे त्याचे पावित्र्य टिकवले तर बहुसंख्यांकांना सुखाने जगता येईल असे त्यांचे मत होते. खरी लोकशाही निर्माण करावयाची असल्यास आज हजारो वर्षे डोक्यावर नाचत आलेला वरचा वर्ग खाली आणि समाजातील खालचा वर्ग वर गेल्याशिवाय खरी क्रांती होणार नाही अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. आसासह पूर्ण चाक फिरल्याशिवाय खरी क्रांती होऊच शकत नाही आणि ते चाक भारतात दलित बांधवच फिरवतील असा त्यांचा विश्वास होता.

डॉ. आंबेडकरांनी 'शूद्र पूर्वी कोण होते?', 'अस्पृश्य मुळचे कोण?' यासारख्या ग्रंथातून जे विश्लेषण केले त्यात 'ब्रोकन मॅन थिअरी' मांडली. या थिअरीनुसार नेटिव्हाच्या टोळ्यांचा आर्यांनी पराभव केला. त्यांनी नेटिव्हांना आपल्यात सामावून घेतले. परंतु काही टोळ्या अशा होत्या की ज्यांनी आर्यांची संस्कृती स्वीकारली नाही, ते आर्यव्यवस्थेला शरण गेले नाही. त्यामुळे बहिष्कृत केल्या गेले तरी अनार्यांनी चातुवर्ण्य स्वीकारले नाही. त्यात आदिवासी आणि दलितांचा समावेश होता. या अनार्यांची जी जीवनपद्धती बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली त्यात वैदिक परंपरा नाकारणे, ती नष्ट करणे आणि समताधिष्ठित समाजरचना निर्माण करणे असा विचार दिला. या विचारावर उभी झालेली आंबेडकरी चळवळ १९५६पर्यंत गतिमानपणे विकसीत होत गेली. दलितांच्या राजकीय आणि सांस्कृतिक चळवळीचा प्रचार आणि प्रसार भाषणे-गाणे-जलसे-लोककला असा विकसीत होत गेला. जोपर्यंत दलित माणूस अशिक्षित होता तोपर्यंत जलसे-गाणे आदीवर भागत होते. दलितांमध्ये मध्यमवर्ग निर्माण झाल्यावर दलित साहित्य निर्माण झाले.

आपला देश १९४७ साली स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर काही प्रश्न सुटले. अस्पृश्यता हा कायद्याने गुन्हा मानण्यात आला. अधिकृतपणे व्यवस्था समतेची झाली परंतु व्यवहारात विषमताच होती. त्यामुळे समता प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष निर्माण झाला. मूल्यांच्या प्रस्थापनेसाठीचा हा संघर्ष जीवनाच्या सर्व अंगाना भिडणारा होता. या संघर्षासाठी सिद्ध झालेला एक छोटा समूह अस्पृश्यांचा होता. ज्यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला. मूल्ये आणणारा हा छोटा समूह आहे. मूल्यांच्या प्रस्थापनेसाठीच साहित्य निर्माण झाले. नवशिक्षितांचा मोठा वर्ग दलित समूहात निर्माण झाला. त्याची गरज वेगळी होती. या वर्गाला स्वत:चे म्हणून काहीही मराठी साहित्यात मिळत नव्हते. अन्याय अत्याचाराबद्दलची तीव्रता जाणिवेच्या पातळीवर याच वर्गाला जाणवली. त्याची प्रतिक्रिया साहित्याच्या, प्रामुख्याने कवितेच्या माध्यमातून अधिक आक्रमक स्वरूपात व्यक्त झाली.

ज्या वर्गाला डॉ. आंबेडकरांनी 'ब्रोकन मॅन' म्हटले तो वर्ग स्वत:ला अस्पृश्य म्हणवून घेवू इच्छित नव्हता. जाणिवा तीव्र असल्यामुळे अभिव्यक्त होण्याचे साधन त्याच्याकडे 'शब्द' हेच होते. म्हणून त्याला स्वत:चे साहित्य प्रस्थापित करण्याची गरज निर्माण झाली. विचारांचा मिळालेला वारसा व तो वारसा समाजात प्रस्थापित करण्यासाठी साहित्याची निर्मिती करणे गरजेचे होते. विचारांच्या मिळालेल्या वारशाची निर्मिती म्हणजे दलित साहित्य होय. जाणीवपूर्वक निर्माण झालेले हे साहित्य होय. विचारांच्या वारशामुळे चिंतनाचे केंद्र बदलले. त्यातून वारशाची काव्यात्म निर्मिती जाणीवपूर्वक झाली. जाणिवेचे साहित्य निर्माण करणे हा चळवळीचा भाग आहे. जाणीव चळवळीचे रूप घेते ती १९६० नंतरच्या काळात. या काळात दलित साहित्याने चळवळीचे रूप धारण केले आहे. भारतीय राज्यघटना अस्तित्त्वात आली. राज्यघटना ही एक जीवनप्रणाली म्हणून स्वीकारली गेली. जीवनप्रणालीची मूल्यव्यवस्था ही स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय या चतु:सूत्रीवर उभी झालेली होती. त्यातून एक चिंतनकेंद्र अस्तिवात आले.

स्वातंत्र्याच्या चळवळीची सूत्रे गांधीच्या हाती गेल्यानंतर तत्त्वत: शेतकऱ्यांचे प्रश्न, दारिद्र्याचे प्रश्न आणि

सामाजिक संदर्भात अस्पृश्यतेचाही प्रश्न हाती घेतला गेला. परंतु त्याच वेळेस डॉ. आंबेडकरांची चळवळ दलितांच्या, बहुजनांच्या स्वातंत्र्यासाठीच सुरू होती. सामाजिक स्वातंत्र्याच्या चळवळीतून जे अंतर्विरोधाचे स्वरूप पुढे आले त्यातून जन्माला आलेली जातीव्यवस्था, अस्पृश्यता याची भेदक तीव्रता आंबेडकरी चळवळीमुळेच राष्ट्रीय पातळीवर समाजाच्या निदर्शनास आली. आंबेडकरी लढ्यामुळेच समता व सामाजिक न्याय या मूल्यांचे अधिष्ठान स्वातंत्र्याच्या चळवळीला प्राप्त झाले.

थोडक्यात स्वातंत्र्याची चळवळ, सामाजिक उत्थानाची चळवळ, भारतीय राज्यघटना आणि बुद्ध धम्माचा स्वीकार या चार टप्प्यांवर चिंतनाची केंद्रे बदलत गेली. या पार्श्वभूमिवर दलित साहित्य चळवळीचा उदय झाला. जाणिवेच्या साहित्याची ही चळवळ १९६० च्या दरम्यान सुरू झाली. पुढच्या पाच सहा वर्षांत या चळवळीला आकार येऊ लागला. १९६७ च्या दरम्यान साहित्य चळवळीची संस्थात्मक संरचना होताना दिसते. याच काळात दलित साहित्य चळवळीची अकादमीक मांडणी होताना दिसते.

जगण्याच्या संदर्भात समता हे जीवनाचे मूल्य बनावे याच मूल्यावर समाजरचना उभी राहावी हे आंबेडकरी चळवळीचे उद्दिष्ट होते याच उद्दिष्टातून दलित कवितेची निर्मिती झाली आहे. दलित कवितेच्या उदयाची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. दलित कवितेच्या उदयाचा संबंध अपरिहार्यपणे सामाजिक उलथापालथीशी आहे. हजारो वर्षांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जगाचे संदर्भ दलित कवितेत आले आहेत. धर्माला नाकारणारी जाणीव प्रकट होताना दिसते. हा धर्म कसा होता? हिंदू धर्म हा चैतन्यवादी धर्म आहे. या धर्मात पुनर्जन्म, परलोक, देव देवता, आत्मा, मोक्ष, कर्मकांड या बाबींना महत्त्व आहे.

ऋग्वेदातील पुरुषसुक्तात चातुर्वर्ण्याचे मूळ सांगितले आहे. मनुस्मृतीने स्त्री आणि शूद्रांना स्वातंत्र्य देऊ नये कारण ते हीन आणि अपवित्र आहेत असे म्हटले आहे. चातुवर्ण्य व्यवस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनोऱ्याची उपमा दिली आहे. ''हिंदू समाज हा एक मनोरा आहे आणि एक एक जात म्हणजे एक एक मजला आहे. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास शिडी नाही. ज्या मजल्यात त्यांनी जन्मावे त्याच मजल्यावर त्यांनी मरावे. खालच्या मजल्यावरील इसम मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस कितीही नालायक असो खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्राज्ञा नाही.''[१२]

वेदातील कर्मविपाक सिद्धांताने दलिताच्या प्रगतीची दारेच बंद केली. या सिद्धांतानुसार ब्राह्मणांनी अध्ययन अध्यापन करावे, क्षत्रियाने हाती शस्त्र धरून राष्ट्राचे रक्षण करावे, वैश्याने तागडी घेऊन व्यापार करावा आणि शूद्रानी वरील तीनही वर्णाची सेवा करावी असे सांगितले आहे. शूद्रांना सर्व प्रकारच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले. त्यांच्या वाट्याला कायम उपेक्षा आणि छळच आला. डॉ. आंबेडकरांच्या मते हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्था हीच दलितांच्या दु:स्थितीला कारणीभूत ठरली आहे. ''जातीसंस्था ही चातुर्वर्ण्याने निर्माण केलेली असमानतेची व तिरस्काराची उतरंड आहे. ती हिंदूंच्या सामाजिक जीवनाचा निर्बंध बनली आहे. जातिसंस्थेने सार्वजनिक हितबुद्धीच नष्ट केली. मने संकुचित केली. समाजाला नीतिभ्रष्ट नि दुबळे करून ठेवले. जात ही एक भावना आहे. ती मनाची एक अवस्था आहे. ती टाकणे म्हणजे भावनात्मक बदल घडवून आणणे. पण असा बदल धर्म होऊ देत नाही. रुढी आड येते. शास्त्र तिला आधार देते. म्हणून धर्मशास्त्रे हीच मानवाची खरी शत्रू आहेत. जातिव्यवस्थेने येथे सामान्य जनतेला इतके दलित, निर्बल, प्रतिकारशून्य व गुलाम प्रवृतीचे बनविले आहे की तिने भारताच्या संपूर्ण इतिहासात कधीही देशांतर्गत जुलमी अत्याचारी राज्यकर्त्यांविरुद्ध बंड केलेले आढळत नाही.''[१३] हिंदू धर्मात राहून दलितांची उन्नती होणार नाही म्हणून डॉ. आंबेडकरांनी बुद्ध धम्माचा स्वीकार आपल्या लाखो अनुयायांसह केला. हे या देशातील मोठे सांस्कृतिक स्थित्यंतर होते. त्यामुळे दलित जीवनात क्रांतीकारक बदल झाले. हे स्थित्यंतर साठोत्तरी दलित कवितेच्या निर्मितीला कारणीभूत ठरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत दलितांसाठी आरक्षणाची, सवलतीची तरतूद केली होती. दलिताना हक्काची जाणीव करून दिली होती. त्यामुळे गावागावात शिकलेले दलित आपले न्याय हक्क मागू लागले. देशाला स्वातंत्र्य मिळाले राज्यघटना अस्तित्त्वात आली तरी दलितांवरील अन्याय अत्याचार थांबले नव्हते. १९७० साली पेरुमल चेटटीयार कमिटीने दिलेल्या अहवालानुसार स्वातंत्र्योत्तर काळात दलितांवर झालेल्या अत्याचाराचे प्रमाण खूप वाढले होते. हेच संख्याशास्त्रीय आकडेवारीवरून सिद्ध होते. त्याचा परिणाम स्वाभाविकपणे दलितांच्या मनात क्षोभ निर्माण झाला. दुसरीकडे दलित नेते निष्क्रीय होते या पार्श्वभूमीवर १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना झाली. 'बावडा' या गावी दलितांवर झालेल्या अनन्वित अत्याचाराच्या संदर्भात सरकारने त्वरीत कारवाई करावी अन्यथा आंदोलन केले जाईल असा इशारा बारा दलित साहित्यिकांनी सरकारला दिला. ही घटना १२ मे १९७२ची. या बारा साहित्यिकांत नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज.वि.पवार, अर्जुन डांगळे आदींचा समावेश होता. स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांवर झालेल्या अत्याचाराचे तपशील शंकरराव खरात यांनी दिलेले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत-

''दलिताना जिवंत जाळणे, दलित कुटुंबियांना घरात कोंडून जाळणे, दलितांची घरे वस्त्या पेटवणे, त्यांना मारपीट करणे, त्यांचे खून करणे, दलितांच्या पाणी पिण्याच्या विहिरीत विष्ठा घाण टाकणे, त्यांच्या जमिनी व शेतीतील उभी पिकं दांडगाईने कापून नेणे, त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकून त्यांच्या दैनंदीन जीवनाची कोंडी करणे, दलित स्त्रियांचा विनयभंग करणे, त्यांची जबरदस्तीने अब्रू घेणे, अस्पृश्य म्हणून गुलामगिरीची कामे करण्याबददल त्यांच्यावर दंडेलीने रुढी परंपरेचे दडपण आणून जबरदस्ती करणे हे व अशाच स्वरूपाचे अत्याचार दलितांवर याकाळी होत होते.''[१४] १९६३ साली शिरसगाव अत्याचार प्रकरण गाजले, तसेच एरणगाव येथील रामदास नारनवरे या दलित तरुणाला बळी देण्यात आले. गवईबंधुचे डोळे फोडण्यात आले. १९७२ मध्ये बावडा या गावात दलितांवर जे अत्याचार झाले त्याचा निषेध म्हणून दोन दलित तरुणांनी मशाली घेऊन विधानसभेच्या गच्चीवरून सभागृहात उड्या टाकल्या. पत्रके वाटली. १९७३ साली दलित पँथरने भगवदगीता दहनाचा कार्यक्रम केला. त्यात अरुण कांबळे वगैरे तरुण नेते सामील होते. या दशकात दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारात 'सामाजिक बहिष्कार' हे मोठे हत्यार होते. ''गावाच्या वाटा बंद, दलित तरुणीवर बलात्कार करणे, त्यांची नग्न धिंड काढणे, तरुणांचा कुठल्यातरी देवीपुढे शिरच्छेद करणे, नरबळी देणे, जाब विचारणाऱ्या तरुणाचे धारदार शस्त्राने डोळे काढणे! '' दलितांवर होणाऱ्या अत्याचारात पूर्वी फक्त सामाजिक धार्मिक कारणे कारणीभूत होत. तर आता त्याच्या जोडीला शैक्षणिक आर्थिक आणि राजकीय कारणांचीही भर पडली आहे. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये दलित समाजावर सामुदायिक अत्याचार झाले. दलितांचे खून झाले. अनेकांची घरे जाळली गेली.[१५] दलितांची शैक्षणिक प्रगती हेही अन्याय अत्याचाराचे कारण ठरले. भारतीय राजकीय पक्ष जातियतेचे राजकारण राजरोसपणे करू लागले. याची परिणती म्हणजे जातिय दंगलीनी धारण केलेले रौद्ररूप. ज्यावेळी दलित समाज हक्काने काही मागू लागतो त्यावेळी सर्वशक्तीनिशी सवर्ण समाज दलितांवर तुटून पडतो असे वास्तव या काळात पाहावयास मिळते. दलित पँथरच्या निर्मितीला वरील सर्व पार्श्वभूमी आहे. दलितांवरील अन्याय अत्याचारामुळेच दलित पँथरचा जन्म झाला. गावागावात जिथे दलितांवर अत्याचार होत होता तिथले लोक पँथरकडे येत व पँथरचे तरुण त्या गावी जाऊन तिथल्या अन्याय करणाऱ्या जमिनदार व सावकारांना दहशत दाखवीत. इतकी की काही वेळा जमीनदार सवर्ण घाबरत व गाव सोडून जात.

थोडक्यात, अन्याय अत्याचाराच्या विरोधातील प्रक्षोभ आणि संतापाने दलित कवितेला जन्म दिला आहे. तिला आक्रमक बनविले आहे. त्यातून विद्रोह आणि नकार यासारखी मूल्ये सिद्ध झाली. या दशकातील कविता ही दलित वेदनेतून निर्माण झाली. वेदनेने विद्रोहाला जन्म दिला आणि ते दलित कवितेचे केंद्रवर्ती मूल्य ठरले. समकालीन वास्तवाचे, अन्याय अत्याचाराचे भीषण रूप या काळातील कवितेने चित्रित केले आहे.

दलित कविता ही चळवळीतून निर्माण झालेली कविता आहे. त्यामुळे चळवळ आणि चळवळीच्या विचारांची अभिव्यक्ती यांचा अनुबंध तपासण्यासाठी १९७१-८० या दशकातील विविध कवींनी साकार केलेल्या कवितांचा परामर्ष

घेऊन हा संबंध तपासता येईल. त्याचप्रमाणे दलित कवितेतील जाणिवा, आशय, अभिव्यक्ती, प्रतिमासृष्टी, भाषा आणि इतर वैशिष्ट्ये शोधता येतील.

१९७१-८० या दशकभरात निर्माण झालेली कविता या काळातील चळवळीला समांतर अशी आहे. किंबहुना चळवळ आणि कविता यांचे एकजीनसीपणाचे नाते दिसते. याचे एक महत्त्वाचे कारण असे आहे की या काळातील कवी हे प्रत्यक्ष चळवळीचाच एक अविभाज्य भाग आहेत. हे कवी जसे मोर्च्यात, सभेत, रस्त्यावर उभे आहेत. सामाजिक अन्यायाच्या विरोधात उभे आहेत तसेच ते कवितेतही उभे आहेत. त्यामुळेच घोषणा, नारेबाजी, वक्तृत्वपूर्णता, आवेशपूर्णता, बंडखोरी, विद्रोह, नकार या आणि यासारख्या इतर वैशिष्ट्यांनी ही कविता गजबजलेली आहे असे प्रत्ययाला येते. या दशकातील दलित साहित्यसृष्टीला मौलिक योगदान देणारे जे कवी आहेत त्यात प्रामुख्याने नामदेव ढसाळ, बाबूराव बागूल, दया पवार, वामन निंबाळकर, ज.वि.पवार, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, राजा ढाले, प्रकाश जाधव, केशव मेश्राम अशा अनेक कवी कलावंतानी आपल्या कवितेच्या आविष्कारातून दलित कवितेचा बंडखोर आणि रौद्रगंभीर चेहरा साकार केला. त्याचप्रमाणे या कवितेचे विद्रोही, स्फोटक, करुणाजनक आणि मीमांसक असे रूपही सिद्ध केले. नवी मूल्येही प्रस्थापित केली. काही ठळक कवींच्या कवितांचा परामर्ष घेऊन, वरील विशिष्टता स्पष्ट करता येईल.

✸ नामदेव ढसाळ (जन्म- १५ फेब्रुवारी १९४९, मृत्यु १५ जाने.२०१४)

दलित कवितेच्या आरंभकाळातच विद्रोही आणि स्फोटक आशयाला वाट मोकळी करून देण्याचे कार्य नामदेव ढसाळ यांच्या कवितेने केले आहे. या दशकात ढसाळांचे **गोलपिठा** (१९७२), **मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले** (१९७५), **आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र प्रियदर्शनी** (१९७६) असे पाठोपाठ तीन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आणि आजवरच्या एकूणच कवितेचा प्रांत आणि साहित्याचे जग ढवळून निघाले. ढसाळांच्या कवितेने चित्रित केलेले जग अनोखे होते. आजवरच्या साहित्य परंपरेला या जगाचा ओझरता स्पर्शही झाला नव्हता. समाज, साहित्य, संस्कृती, इतिहास, तत्त्वज्ञान, नकार, विद्रोह, बंडखोरी या सर्व घटकांना कवेत घेऊन भक्कम भूमी ढसाळाच्या कवितेने तयार केली.

'दलित कवितेचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. त्यांच्यामुळे दलित 'माणसात' आला. त्याच्या ठिकाणी आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मावलंबन कुणी निर्माण केले असेल तर बाबासाहेबांनीच! त्यांच्या मुक्तीलढ्याचा आणि दलित कवितेचा अतिशय जवळचा संबध आहे[१६] हा संबंध ढसाळांची कविता खालीलप्रमाणे उलगडून दाखविते

सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला
आत्ता अंधायात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे..
सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षांनंतर लाभला
आत्ता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे.

येथे सूर्य ही प्रतिमा डॉ.आबेडकरांसाठी योजलेली आहे. सूयोन्मुख झाले पाहिजे म्हणजे आंबेडकरोन्मुख झाले पाहिजे. शतकांच्या प्रवासानंतर सूर्यफुले हाती ठेवणारा 'फकीर' लाभला आहे. काळाच्या पार्श्वभूमीवर झालेला आंबेडकरांचा उदय म्हणजे सूर्योदय. म्हणजेच आंबेडकररूपी सूर्याने अंधाऱ्या लोकजीवनावर प्रकाश पेरला आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेला विचार आणि या विचारशक्तीच्या दिशेने प्रवास करण्याचे आवाहन येथे आहे. शतकानुशतके ज्यानी सूर्याकडे पाठ फिरवून प्रवास केला म्हणजे अंधाराची सोबत केली. परंतु या अंध:कारात खितपत पडलेल्या समूहाला उजेडाची दिशा दाखविण्याचे काम बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांचे आत्मभान जागवून स्वाभिमानाचे जिणे आणि माणुसकीचे हक्क प्राप्त करून देण्यासाठी संघर्षाची, उजेडाची दीक्षा दिली. अशाप्रकारे दलित कविता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी सुरू केलेले मानवमुक्तीचे आंदोलन हा अभिन्न संबंध आहे. तो संबंध ढसाळांच्या कवितेने स्पष्ट केला आहे असे दिसून येते. समुहाच्या वाटयाला आलेले दु:ख, दैन्य, दास्य, समूहाची अगतिकता या सर्व बाबीची भीषणता चित्रित करणे हे ढसाळांच्या कवितेचे एक उदिष्ट आहे. उदा.

रस्त्याच्या कडेकडेने वाढविलेले कचऱ्याचे डोंगर
तसे दु:ख आपल्या जीवनात
आपण सर्व किड्यांचे भायबंद असल्यासारखे
छाटीव करवले गेलेलो आयच्या उदरातून पडलेपासून

येथे समूहाच्या वाटयाला आलेल्या दु:खाची भीषणता प्रत्ययाला येते. किड्यांचे भायबंद असल्यासारखे जगणे, अशा जगण्याला भूक, उपासमार, रोगराई, गलिच्छपणा यामुळे हलाखीच्या जगण्याचे दर्शन ढसाळांच्या कवितेतून घडते. 'गोलपिठा'तील हे जग सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जगापासून फार लांब आहे. ज्या संस्कृतीने माणसाचे हक्क, प्रतिष्ठा नाकारली आहे अशा माणसांचे जग या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्यातून या जगातील माणसे सरपटत राहतात. ज्यांचे अनेक पातळ्यांवर अध:पतन झाले आहे असा सामाजिक स्तर चित्रित करण्याचे काम 'गोलपिठा'ने केले आहे.

आजही मेणबत्तीसारखी जळतात माणसे चौकाचौकातून
कोरभर भाकरी, पसाभर पाणी यांचा अट्टाहास केलाच तर
फिरवला जातो नांगर आजही घरादारावरून
चिंदकातले हात सळसळलेच तर छाटले जातात आजही नगरानगरातून

विषमतेने लादलेल्या लांछनास्पद जीवनाचे हे भेसूर चित्र आहे. या भेसूर चित्रणासह या कवितेने स्वातंत्र्योत्तर काळातील स्थित्यंतराचा वेध घेतला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यामुळे सर्वसामान्य माणूस सुखावला होता. सुखाचे दिवस वाटयाला येतील असे परिस्थितीने पिचलेल्या माणसाला वाटत होते. विषमता, दारिद्रय, धर्मांधता, जातियता हे सारेच संपुष्टात येईल असे वाटत होते. मात्र स्वातंत्र्याने सामान्य माणसाचा भ्रमनिरास केला. म्हणूनच **स्वातंत्र्यात माणूस निराश व्हतो** असा निष्कर्ष ढसाळांची कविता मांडते. एवढेच नव्हे तर ती स्वातंत्र्यावर संतप्त होऊन पेटून उठते.

पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ठ
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे
रामराज्याच्या कितव्या घरात आपण ऱ्हातोत
उद्गम विकास, उंची संस्कार, संस्कृती
कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा

असा मूलभूत प्रश्न या कवितेने उपस्थित केला आहे. स्वातंत्र्यावरच प्रश्नचिन्ह ठोकले आहे. त्यातून स्वातंत्र्याचा उजेड सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पोहचलाच नाही याबद्दलची खात्री या कवीने दिली आहे. सामाजिक सांस्कृतिक जीवनातील शोषण, अन्याय, अत्याचार, स्वातंत्र्याने केलेला भ्रमनिरास, लादली जाणारी बंधने या सर्वांविरुद्धचा समग्र विद्रोह ढसाळांच्या कवितेने पहिल्यांदाच पुकारला असे दिसून येते.

रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यानो
किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी?
मरेपर्यंत राहायचे का असेच युद्धकैदी?
ती पाहारे ती पाहा मातीची अस्मिता आभाळभर झालीय
माझ्याही आत्म्याने जिंदाबादची गर्जना केलीय
रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यानो
आता या शहराशहराला आग लावीत चला

नाकेबंदी तोडण्यासाठी, अन्यायाच्या विरोधात उभे राहण्यासाठी समूहाला येथे कृतिशील केले आहे. येथे शहर हे व्यवस्थेचे प्रतीक आहे. ज्यांनी आयाबहिणीची विटंबणा केली, चौकाचौकातून माणसे जाळली, घरादारावरून नांगर फिरवला, संघर्ष करणारांचे हात छाटले, ज्यांच्याकडून समूहाची नाकेबंदीच करण्यात आली अशी निर्दयी व्यवस्था आणि

व्यवस्थेचे कर्ते म्हणजे 'शहर' असा प्रतिकात्म अर्थ शहराच्या प्रतिमेतून सूचित झाला आहे. स्वकीयांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विद्ध्वंसाचा विचार आणि स्वेतरांची निर्घृणता अशाप्रकारचे द्वंद्व येथे पाहावयास मिळते. प्रक्षोभामुळे येथे विद्रोह पुरेसा स्फोटक झाला आहे. ही स्फोटकता अन्यायी व्यवस्थेच्या निर्घृणतेमुळे जन्माला आली असे म्हणता येईल. स्फोटक विद्रोहासोबतच प्रखर नकारही ढसाळांच्या कवितेत प्रत्ययाला येतो. प्रतिकाराचे आंबेडकरी तत्त्वज्ञान हे या नकारनिर्मितीचे केंद्र आहे. विषमतेच्या विरोधात नकाराचे शस्त्र परजण्याचे आवाहन आंबेडकरी तत्त्वज्ञानानेच केले आहे. याचा अर्थ हे तत्त्वज्ञान परिवर्तनाच्या लढ्यातील एक मूलभूत हत्यार आहे. म्हणूनच ढसाळांची कविता खालीलप्रमाणे प्रकट होते.

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस रहायचे आम्ही
श्वास घुसमटत

अंधाराला सूर्य दिसणे म्हणजे आंबेडकरी ज्ञानशक्तीमुळे अभिव्यक्तीचे साधन प्राप्त होणे होय. आंबेडकरी विचारामुळे प्राप्त झालेले संघर्षाचे बळ प्राप्त झाल्याची ग्वाही येथे पाहावयास मिळते. वर्णव्यवस्थेने लादलेले जीवन हे अंधकारमय होते. नरकाच्या कोंडवाड्यासारखे होते. अशा जीवनाला नाकारणारी जाणीव आंबेडकरांनीच दलितांच्या मनात जागृत केली. हजारो वर्षांचे अपमानित जगणे धिक्कारण्याचे बळ 'सूर्यफुले हाती ठेवणाऱ्या फकीरामुळे' प्राप्त झाले. आत्मशोधामुळेच नकाराची भूमिका सिद्ध होत जाते.

हजारो वर्षे होतो खंगत
या गुहागुहाच्या प्रचंड अंधारात
कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावीत जाणार आहे यापुढला काळ

निर्घृण व्यवस्थेत खंगत पडलेल्या समाजाला नवा विश्वास, अस्मिता आणि जगण्याच्या बळासह विद्रोहाचे शस्त्र डॉ आंबेडकरांनी दलित समाजाच्या हातात दिले. त्यामुळेच पुढचा काळ पेटवत जाण्याची कृती साध्य होणार आहे. इतिहास आणि वर्तमानातील स्थितीगती, इतिहासातील, गतकाळातील स्थितीशीलता आणि वर्तमानातील गतिमानता व भविष्यातील कृतिशीलता अशा त्रिविध संबंधाने स्पष्ट झालेली जाणीव येथे प्रत्ययाला येते. ढसाळांच्या कवितेत व्यक्त झालेला स्फोटक विद्रोह, प्रखर नकार त्याचप्रमाणे अतिशय व्यापकपणे स्वीकारही व्यक्त झाला आहे. 'माण्साने' ही कविता त्याचे उत्तम उदाहरण आहे. या स्वीकारामुळेच दलित कवितेतील विद्रोहाला व्यापक परिमाण प्राप्त झाले आहेत. दलित कविता केवळ विद्रोह पुकारून थांबत नाही तर ती समताधिष्ठीत समाजरचनेची मागणी करते. या कवितेत प्रारंभी विद्ध्वंसाची भाषा खालीलप्रमाणे येते.

माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे....
हे सारे सारे विश्वव्यापू गळूप्रमाणे फुगू द्यावे
अनामवेळी फुटू द्यावे रिचू द्यावे

केवळ विद्ध्वंसाच्या भाषेमुळे ही कविता विद्रोही ठरत नाही तर मूल्याधिष्ठिततेमुळे या विद्रोहाला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त होते-

नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये
काळागोरा म्हणू नये तू ब्राह्मण तू क्षत्रिय तू वैश्य तू शूद्र असे हिणवू नये
कुठलाही पक्ष काढू नये घरदार बांधू नये नाती न मानण्याचा
आयभैन न ओळखण्याचा गुन्हा करू नये
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे

चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा माणसावरच सूक्त रचावे
माणसाचेच गाणे गावे माणसाने (पृ. ३२)

प्रारंभी या कवितेतील विद्ध्वंसक भूमिका अतिशय टोकदार झाली आहे. मात्र या भूमिकेत ढसाळ शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, कवी, क्रांतीकारक या सर्वांना एकाच मापाने मोजतात. ज्यांच्या तत्त्व विचार प्रणालीमुळे प्रत्यक्षातील कृतीमुळे मोठे बदल घडून आले. अनेकांना प्रेरणा मिळाली त्या सर्वांना ''त्यांच्या शब्दासकट गटाराचे मेनहोल उघडून त्यात सलग सडत ठेवावे'' हे सारे अनाकलनीय वाटते. ही त्यांच्या कवितेची भूमिका वाचकांच्या मनात संभ्रम निर्माण करणारी आहे. त्यांचा हा नकार कवी प्रकृतीच्या संदर्भात अंतर्विरोध निर्माण करणारा, स्वत:च्या प्रकृतीधर्मावरच अन्याय करणारा आहे असे दिसून येते. मात्र शेवटी ही कविता मानवतावादावर येऊन थांबली आहे. या कवितेने विधायक भूमिका स्पष्ट केली आहे. विचार आणि मूल्यांबद्दलची स्पष्ट जाणीव व्यक्त केली आहे. ही कविता समताधिष्ठीत जगाचे स्वप्न पाहते. 'एक तीळ सर्वांनी करंडून खावा' यातून बंधुत्वाची, समतेविषयीची आशावादी जाणीव व्यक्त होते. माणसाचे सूक्त, माणसाचे गाणे, एक तीळ सर्वांनी करंडून खाणे यातून मानवी मूल्याचे दर्शन घडते. ''हे एकप्रकारे मूल्यचक्रप्रवर्तन आहे. ते माणसाला माणूसकीचे भान आणून देते आणि त्याच्या मानव धर्माचा आविष्कार करते''[१७] मानवतेवरील निष्ठेतूनच प्रखर आशावाद दलित कवितेने व्यक्त केला आहे असे दिसून येते. मानव्याची प्रतिष्ठापना, माणसाला सन्मान प्राप्त व्हावा असे उच्च प्रतिचे ध्येय आणि प्रखर आशावाद येथे प्रकट होतो. स्फोटक विद्ध्वंसाकडून निरागस मानवतेकडे या कवितेचा प्रवास होताना दिसतो. विद्ध्वंसकतेकडून विधायकतेकडे या कवितेचा प्रवास झाला आहे. म्हणून केवळ नकार नव्हे तर मानवी मूल्यांचा स्वीकार, विधायक रचनात्मकतेचा स्वीकार हे खास वैशिष्ट्य येथे प्रत्ययाला येते. ढसाळांची कविता उपेक्षित जीवनाच्या भीषणतेसह वेश्या जीवनाचेही दारुण चित्र रेखाटते. भांडवली जगात, व्यवहारी जगात स्त्रीत्वाची, मातृत्वाची खरेदी विक्री होते हे या कवितेला आवर्जुन सांगायचे आहे. व्यवहारी जगाने स्त्रीचे अस्तित्त्वच पुसून टाकले आहे.

१. सहा पाकळ्यांचं छिन्नविछिन्न कमळ
ज्यात सूर्य घुसळला विषधारी

२. दरसालातलं अकळ स्तनागार
दरसालातलं दु:ख रांडाकार

इथे स्त्रीत्व, मातृत्वाला कुठलीही किंमत राहत नाही. पुरुषांच्या हातातील बाहुल्या बनून जगणे हेच त्यांचे आयुष्य. नैसर्गिक जीवन जगता येत नाही. कुठल्याही सोम्यागोम्यानं यावं दार ठोठावून जावं अशा अवनत अवस्थेला हे जगणे जाऊन पोहचते. महानगरी जीवनातील नरक हा खास असा प्रांत 'गोलपिठा'मध्ये मध्ये साक्षात झाला आहे. 'गळणारे धो धो गू पाणी', 'महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्या', 'उकिरड्याचा आखाडा भळभळतोय चिद्घन', 'मी वाढत राहिलो रस्त्याच्या विष्ठेवर' अशा नरकाच्या कोंडवाड्यात जगणाऱ्या समूहाचे दाहक वास्तव येथे प्रत्ययाला येते. नरक ही अध:पतित जगाची प्रतिमा आहे. भूक, उपासमार, रोगराई, गलिच्छपणा अशा परिस्थितीमुळे ज्यांचे जगणेच हालाखीचे झाले आहे अशा जगाचे प्रतिनिधित्व नरक ही प्रतिमा करते.त्यामुळे नरकाच्या कोंडवाड्याची भीषणता अधिक दाहक आणि उग्र स्वरूपात स्पष्ट होते.

विद्रोह म्हणजे संताप, वैर असाही विद्रोहाचा अर्थ सांगण्यात येतो. मात्र विद्रोही मनाचा संताप क्रुर स्वरूपाचा नसतो तर तो मानवतेवरील निष्ठेतून आलेला असतो. म्हणून या विद्रोहाला कारुण्य या मूल्याची जोड असते. त्यामुळे मानवतेची विटंबणा करणाऱ्या प्रवृत्ती, अमानुषता, क्रुरपणा या विषयी संताप आणि चिड विद्रोही अभिव्यक्तितून प्रकट होत असते.

त्यांची सनातन दया फॉकलंड रोडच्या भडव्याहून उंच नाही
खरंच त्यांनी आपल्यासाठी आभाळात मांडव घातला नाही

बोलून चालून ते सामंतशहा त्यांनी तिजोरीत लॉक केलेला प्रकाश
लादलेल्या पडीबाज आयुष्यात फुटपाथ देखील आपली नाही
माणूसपणाची किळस यावी इतके त्यांनी बनविले आहे लाचार
करपून गेलेल्या आतड्यात साधी माती भरायला मिळत नाही
उगवणारा न्यायी दिवस लाच खाल्ल्यागत त्यांचाच होतो पाठीराखा
आणि कत्तल घडताना सढळ हातातून
नि:श्वासही ढळत नाही

सामंतशाही प्रवृत्तीच्या क्रुरतेबद्दल आणि त्यांनी केलेल्या अमानुष कृतीबद्दल येथे उद्वेग आणि संतापाची भावना प्रकट झाली आहे. त्याचवेळी या पीडादायक प्रवृत्तीने ज्यांना लाचार बनविले, ज्यांचे छत्र हिरावून घेतले, ज्यांच्या जीवनात कुठलीही सुरक्षितता ठेवली नाही, उपासमारीची वेळ आणली आहे, ज्यांची कत्तल घडवली जाते अशा समूहाबद्दल कळवण्याची भावना विद्रोही मनाने प्रकट केली आहे. कारण हे विद्रोही मनही त्या समूहाचा एक घटक आहे.

पीडा देणाऱ्याविषयी मात्र तिरस्काराची भावना व्यक्त झाली आहे. शोषक व्यवस्थेचा अमानुषपणा, क्रुरपणा आणि दयाळूपणा ह्या गोष्टी किती नीच पातळीवरच्या आहेत हे स्पष्ट करण्यासाठी 'फॉकलंड रोडचा भडवा' आणि 'सनातन दया' दाखविणारी शोषकांची उंची आणि पातळी सारखीच आहे. या दोन्ही प्रवृत्तीचे येथे समस्तरीकरण करण्यात आले आहे. शोषक व्यवस्थेच्या निर्दयी कृतीतून स्वकीयांच्या दृष्टीने वाटयाला आलेल्या जगण्याचे स्वरूप किळसवाण्या, लाचार पातळीवर गेले आहे. ते विदारक आहे. ही विदारकता अतिशय करुणाजनक ठरली आहे. मांडव, लादलेले पडीबाज आयुष्य, फुटपाथ, करपून गेलेले आतडे, घडणारी कत्तल या सर्व प्रतिमा लाचार आणि किळसवाण्या जगाच्या निदर्शक ठरतात. अशाप्रकारे एकाचवेळी संताप, चिड, करुणा आणि विद्रोह या सर्व बाबींची प्रचिती देण्याचे सामर्थ्य ढसाळांच्या कवितेत आहे.

भारतीय संस्कृतीत तत्त्वज्ञानाच्या परंपरेत अनेक उदात्त मूल्ये सांगीतलेली आहेत. मात्र या बाबतीत प्रत्यक्षात समाजरचनेतील व्यवहारात कमालीचा विसंवाद आहे. सारी परमेश्वराची लेकरे असा उद्घोष केला जातो. परंतु प्रत्यक्षात माणसाला क्षुद्र लेखणारा व्यवहार केला जातो. अशा सांस्कृतिक विसंवादाला नाकारणारी प्रखर जाणीव ढसाळांच्या कवितेने व्यक्त केली आहे.

हे वाद्या!
तुला वेशीबाहेरला आक्रोश ऐकू आला नाही का?
पेटलेला माणूस दिसला नाही का?
उदासिनतेचा विराटपणा तुला स्पर्शला नाही का?
तुझे गुणगान गावे असे होत नाही
वाटते पान खाऊन तुझ्यावर पचापच थुंकावे
तुला लेडाच्या गाडग्यात बुडवावे (१०, ११)

विद्रोही मनाने विचारलेले प्रश्न उपस्थित झाले आहेत. वेशीबाहेरील आक्रोश, पेटलेला माणूस, उदासिनतेचा विराटपणा या सामाजिक वास्तवाकडे पाठ फिरवणाऱ्या प्रवृत्ती, तत्त्वज्ञाने, विचारप्रणाली या संदर्भात निर्माण झालेले हे सर्व प्रश्न आहेत. हे प्रश्न प्रत्यक्षातील सांस्कृतिक व्यवहारातील वास्तवामुळे निरुत्तर करणारे ठरले आहेत. म्हणून त्यांना नाकारून त्यांच्या विरोधात संतप्तपणे उभी ठाकणारी विद्रोही व्यक्तिमत्वाची प्रतिमा येथे सिद्ध होते. पान खाऊन तुझ्यावर पचापच थुंकावे, 'तुला लेडाच्या गाडग्यात बुडवावे' या प्रकारे प्रतिक्रियात्मक प्रतिमा सिद्ध होतात. ज्यांना वेशीबाहेरील आक्रोश ऐकू येत नाही, पेटलेला माणूस दिसत नाही, जे माणसाला उदासिनतेच्या विराटपणात ढकलून देतात, जे माणसाला हीन लेखतात अशा सर्वच तत्त्वज्ञान, विचार आणि मूल्यांची लायकी काय आहे किंवा ते कसे कुचकामी आहे हे ढसाळांची

कविता सिद्ध करते. सांस्कृतिक जगातील व्यवहाराची, त्यामागील प्रवृत्तीची एवढी चिरुफाड करणारी कविता आजवरच्या काळात एकूणच भारतीय कवितेत लिहिली गेली नाही. ढसाळांनी बेडरपणे ही सांस्कृतिक चिरफाड केली आहे. एवढेच नव्हे तर संस्कृतीच्या मिरासदारांना खणखणीत इशाराही दिला आहे.

नष्टचर्येच्या गटारात
सडत होतो आम्ही अगतिक किड्यासारखे आजपर्यंत....
लक्तरात गुंडाळलेली आमुची अब्रू गोलपिठ्यावर नागविणारांनो
तुमचा ऱ्हास जवळ आलाय :
मुक्तछंदाच्या संजीवनीने आम्ही जिवंत झालो आहोत.
तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी!
शब्द म्हणाले अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा (६)

हे संस्कृतीचे मिरासदार लक्तरात गुंडालेली अब्रू नागविणारे आहेत. त्यांच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी कवींचे शब्द आव्हान देत उभे आहेत. कवीचे शब्द म्हणजे त्याच्या समूहाचेच शब्द आहेत. कारण ज्यांची लक्तरात गुंडाळलेली अब्रू गोलपिठ्यावर नागविली गेली आहे, त्यांच्या वतीनेच हा कवी बोलत आहे. येथे अंधार आणि सूर्य या दोन प्रतिमा फार महत्त्वाच्या आहेत. अंधार ही मूक समाजासाठी आलेली प्रतिमा असून सूर्य ही मूक समाजाला वाचा देणारी प्रतिमा आहे. जो समाज शतकानुशतके अंधकारात खितपत पडला होता तो सर्व प्रकारच्या अधिकारापासूनही वंचित होता. त्याला अभिव्यक्तीचे, व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य नव्हते. मूकपणे अन्याय सहन करणे हाच त्यांच्या जगण्याचा अर्थ होता. आंबेडकर नावाचा सूर्य उदयाला आल्यानंतर मूक समाजाच्या जगण्याचे अर्थ बदलून गेले. 'गुलामाला गुलामीची जाणीव करून दिली म्हणजे तो बंड करून उठतो' या आंबेडकरी वचनाप्रमाणे गुलामाला आपल्या जगण्याची जाणीव झाली. त्याने आजवरची आपली मूकवेदना बोलकी केली. 'नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस रहायचे आम्ही श्वास घुटमळत' असा प्रश्न उपस्थित केला. हे बळ आंबेडकर या सूर्यामुळे प्राप्त झाले. म्हणजेच 'आंधाराने सूर्य पाहिला तेव्हा शब्द हुंकारले' ही कृती घडली त्यामुळे संस्कृतीच्या मिरासदाराच्या पापांचे छिनाल घट फोडण्यासाठी गुलामांचे शब्द कटिबद्ध झाले. अंधारग्रस्ताना सूर्याच्या दिसण्यातून शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होण्याची शक्ती प्राप्त झाली. या ठिकाणी आंबेडकररूपी सूर्याचे कर्तृत्व आणि ताकद जशी प्रत्ययाला येते त्याचप्रमाणे अंधाररूपी समाजाला हा सूर्य दिसल्यामुळे वाचा फुटली आणि हे वाचा फुटलेले समाजमन कसे पेटून उठले संघर्षासाठी सज्ज झाले याचे अतिशय प्रत्ययकारी चित्र ढसाळांच्या कवितेने रेखाटले. एका अर्थाने नामदेव ढसाळांची कविता दलित जगात आंबेडकरी शक्तीमुळे संचारलेल्या सळसळत्या रक्तप्रवाहाचे मानसच वाचकांसमोर ठेवते. लढाऊ बाण्याचे आक्रमक चित्र सादर करते आणि संस्कृतीच्या मिरासदारांना आव्हान देऊन आवाक व्हायला भाग पाडते. हा विलक्षणपणा ढसाळांच्या कवितेत पदोपदी प्रत्ययाला येतो. नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील तत्त्वज्ञानपर प्रतिमांनीही उच्चांक गाठला आहे. त्यांच्या कवितेने सामाजिक सांस्कृतिक भानातून तत्त्वमूल्यांचा उद्‌घोष केला आहे. वर्णधर्मावर अधिष्ठीत व्यवस्थेमुळे 'पाणी' हा दलित जीवनाचा सामाजिक विषय ठरला. महाड चवदार तळ्याच्या संग्रामामुळे हे पाणी ज्वालाग्राही बंड आणि मानवी हक्काची, मानवी तत्त्वाची अतिशय अर्थपूर्ण आणि व्यापक प्रतिमा ठरली आहे. ढसाळांची 'पाणी' ही कविता एकूणच कवितेत सर्वांगसुंदर अशी कविता आहे. या प्रदीर्घ कवितेतील काही भाग खालीलप्रमाणे आहे.

पाण्याला नैराश्य आणल्यानंतर हातघाईवर येतो जीवनमरणाचा प्रश्न
पाण्याचं अंत:करण अस्तं मूलगामी नि उदार
त्याचं पिस फिरलं तर क्षणात खपल्या पडतात हजारो दु:खाच्या
किती करणार तटबंदी पाण्याला
कशी घालणार वेसण पाण्याच्या खळाळत्या रूपाला
पाण्याची कधीच संपत नसतात स्टेशनं..

पाण्याचे दरवाजे असतात अल्लख ब्रम्हाला मिथ्या ठरवून
पाणी पाप पुण्याच्या पुढं धावतं..
किती सुंदर गोंडा घोळतात तुमच्या धर्मातीत राजवटी
वर्ल्या अंगाला तुमी पाणी भरायचं खाल्ल्या अंगाला आमी
वाहव्वा वाहव्वा कसा सोवळ्यानं शिकवला जातोय पाण्यालाही चातुर्वर्ण्य
ते तुम्ही पसरवलेल्या दयावादी कालव्यांना भुलत नाही..
तुम्ही पाण्याच्या नादी लागू नका त्याची जातकुळी शोधू नका
पाणी अस्तं सिद्धार्थासारखं पाणी अस्तं अशोक वृक्षासारखं
पाणी अस्तं तेजाबही
हे छळकऱ्यांनो, पाण्यासारखं सुंदर कर्तव्य दुसरं कुठलंच नस्तं जगात (६२-६५)

पाणी हे मूलभूत तत्त्व आहे. ते निधर्मी जातीतीत आणि धर्मातीत अशा स्वरूपाचे आहे. पाण्याचा रंगही रंगातीत आहे. ज्या रंगात मिळवले तसा त्याचा रंग दिसतो. डोळ्यातील आसवापासून माणसाच्या तहानेपर्यंतच्या सर्वच गोष्टीशी ते एकरूप होऊ शकते. बालकाच्या डोळ्यातील कारुण्य, निष्पाप निरागसपणा पाण्यात अंतर्भूत असतो. धर्माच्या नावाने सत्ता काबीज होते तिथे माणसाच्या जगण्याला वर्णाचे बांध घातले जातात. भेदाच्या भिंती मजबूत केल्या जातात. सोवळ्याने पाण्यालाही चातुर्वर्ण्य शिकवला जातो. मूलभूत हक्क आणि तत्त्वांना भेदनीतीने अडवण्याचा अट्टाहास केला जातो. म्हणून काही पाण्याचा प्रवाहीपणा थांबत नसतो. कारण 'पाण्यात हागलेलं लोपत नसतं'. एवढं पाणी नितळ असते. त्यात पाण्याला गलिच्छ करू पाहणाऱ्यांची मूठभरांची धर्मांध घाणही स्पष्टपणे दिसते. भूतदयावादी तत्त्वे तकलादू स्वरूपाची असतात. माणुसकीच्या हक्काबाबत माणसाला जागृत करणारे श्रेष्ठ मानवी मूल्य म्हणजे मानवतावाद. पाणी हे मानवतावादी मूल्य आहे. बांध घालून मानवतावादी तत्त्वाचे पाणी रोखता येत नाही. सातत्यशीलता हा त्याचा गुणधर्म असतो.

चैतन्यवादी तत्त्वे ही प्रतिक्रांतीवादीच असतात. 'ब्रह्मसत्य जगन्मिथ्या' हे तत्त्व अशाप्रकारचे आहे. ''वेदांताचा वापर सामाजिक धार्मिक शृंखला भक्कम करण्यासाठी ज्या क्षेत्रात प्रभावी रितीने केला गेला ते म्हणजे कर्म, पुनर्जन्म आणि मोक्ष हे प्रश्न होत. ब्रह्म आणि आत्मा एकच आहेत येथपर्यंत दर्शन झाले, पण आत्मा ब्रह्मात विलीन झाल्याने मोक्ष मिळतो हे म्हटले की धर्म आला. विशेषत: व्यक्तीचा आत्मा हा पुन:पुन: जन्म घेतो, व्यक्तीची या जन्मातील उच्चनीचता आणि सुखदु:खे गेल्या जन्मातील पापपुण्यांनी निश्चित होतात. या जन्मातील दु:खावर या जन्मात इलाज नाही. इलाज एकच तो म्हणजे या जन्मात पुण्यसंचय करून पुढील जन्मात उच्च जन्माला येऊन सुखोपभोग घेणे. या सर्व युक्तीवादाचा अर्थ तत्त्वज्ञानाला धार्मिक रूप देऊन त्याचा उपयोग वर्गीय शोषण, जुलूम आणि अन्यायासाठी करणे हाच होतो.''[१८] ऐहिक जीवनात मग ते आध्यात्मवादाच्या दृष्टीने कितीही मिथ्या किंवा मायात्मक असो वेदान्त म्हणजे चातुर्वर्ण्य आणि चातुर्वर्ण्य म्हणजे वेदान्त याबददल स्मृतिकारांना यत्किंचितही संदेह नव्हता. थोडक्यात 'ब्रह्मसत्य जगन्मिथ्या' या वेदान्त तत्त्वज्ञानातील चातुवर्ण्य, कर्म, पुनर्जन्म, पापपुण्य ह्या संकल्पना वरिष्ठ वर्गाच्या ऐहिक स्वार्थासाठी, शूद्रातिशूद्रांच्या शोषणासाठी जन्मास घातल्या आणि राबवल्या गेल्या. म्हणून अल्लख ब्रम्हाला मिथ्या ठरवून पाणी पापपुण्याच्या पुढे धावतं' असे कवीने म्हटले आहे.

मानवतावादी तत्त्वज्ञाने नीरक्षीर न्यायानेच कार्यरत होत असतात. सत्याला सत्य आणि मिथ्याला मिथ्या ठरवणे ही या तत्त्वज्ञानाची प्रतिज्ञा असते. म्हणून या तत्त्वाच्या खळाळत्या रूपाला तटबंदी घालता येत नाही प्रवाहीपणा थांबविता येत नाही.कारण हे पाणी 'सिद्धार्थासारखे', 'अशोकवृक्षासारखे' आणि 'तेजाब'ही असते. म्हणून अशा तत्त्वाला नैराश्य आणल्यानंतर जीवनमरणाचे प्रश्न जटील बनतात. अशाप्रकारे निखळ मानवी कल्याणाच्या हेतूने उदयास आलेल्या तत्त्वज्ञानाची विविध रूपे आणि कृतिसातत्य 'पाणी' या प्रतिमेमुळे साकार झाली आहे. पाणी या प्रतिमेला तत्त्वज्ञानाचे विविध आयाम प्राप्त झाले आहेत. नामदेव ढसाळ यांच्या कवितेने सामाजिक तीव्रोत्कट भानातून व्यापक अशा मानवतावादी

तत्त्वज्ञानाचे नितळ स्वरूप सदर कवितेतून स्पष्ट केले आहे. ''पाण्याचे एक अपूर्व तत्त्वज्ञान एका अपूर्व लावण्याने रूपास आणले आहे. काव्य आणि तत्त्वज्ञान यांचे सुंदर एकात्म रूप या कवितेने धारण केले आहे.'' [१९] हा रा.ग.जाधव यांचा अभिप्राय ढसाळांच्या 'पाणी' या कवितेचे महात्म्य सिद्ध करणारा आहे.

थोडक्यात, गोलपिठाने मराठी साहित्यात एक वादळ निर्माण केले. वर्णव्यवस्था आणि मानवी शोषणाला कारणीभूत ठरणारी मूल्ये यांच्या विरोधात तीव्रतर विद्रोह, विद्ध्वंसक भूमिका आणि सामान्यांविषयीची अपार करुणा या नकार स्वीकाराचा विलक्षण ताण या कवितेने व्यक्त केला आहे. 'गोलपिठा'मुळेच दलित कवितेची समर्थ पायवाट निर्माण झाली. 'गोलपिठा' या पायवाटेवरचा मैलाचा दगड ठरला. या संग्रहानंतर अवघ्या तीन वर्षांनंतर गोलपिठाच्या दुसऱ्या आवृत्तीसह 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले' (१९७५) हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. या संग्रहाने गोलपिठापेक्षा वेगळी वाट चोखाळली. त्यातून ढसाळांच्या कवितेचे बदलते रूप वाचकांच्या प्रत्ययाला आले.

शोषणाचे स्वरूप स्पष्ट करतानाच निर्मूलनाचा विचार मांडणे हे दलित जाणिवेचे खास वैशिष्ट्य आहे. ढसाळांच्या या दुसऱ्या कवितासंग्रहातील कवितेमागे नेमकी हीच भूमिका आहे. आपली भूमिका स्पष्ट करताना ढसाळ म्हणतात, 'खरं तर कला ही दोन जगात विभागली आहे. एक जग हे घमेलंवाल्याचं आणि दुसरं जग हे डबुलंवाल्याचं. मी जर कविता लिहितो छापतो तर ह्या दोन्हीपैकी एका जगाचा निश्चितच आहे. आणि ते माझं जग आहे घमेलंवाल्याचं''[२०] येथे ढसाळांनी एका जगाची बाजू घेतली आहे. ते जग घमेलंवाल्याचं आहे. अशी एक बाजू घेणे म्हणजे राजकीय भूमिका घेणे होय. ढसाळ कष्टकरी शोषित जगाच्या बाजूने उभे आहेत. म्हणून त्यांची कविता राजकीय ठरते. ''ज्या लोकांना मी जनता मानतो आणि ज्या लोकांच्या कष्टातून आजचा भारत उभा आहे ते लोक माझे अढळ श्रद्धास्थान बनतात. मग माझी कविता खेड्यापाड्यातील वैराण दारिद्र्याचा, अज्ञानाचा, दु:खाचा वेध घेते. तिरस्कार करते, त्यांच्या मुळावर घाव घालते. हे होत असताना माझ्या कवितेला पिळदार कलात्मक घाट येतो. माझी कविता वर्ग शत्रूंशी हाडवैराचा खेळ करते.'' [२१] ढसाळांच्या या भूमिकेतून नेमका शत्रू कोण आहे याचे स्पष्टीकरण केले आहे. ढसाळांची कविता कोणते कार्य पार पाडते हे वरील भूमिकेतून स्पष्ट झाले आहे. वर्णव्यवस्थेने लादलेल्या शूद्रत्वाच्या जीवनाची प्रातिनिधिक प्रतिमा त्यांच्या कवितेने चित्रित केली आहे. उदा.

शूद्रांच जीवन घेऊन जन्माला आलो
अनायसे मुकलो सगळ्याच गोष्टींना
जे जे माझं होतं होणारं होतं माझं
त्यावर सांगू शकलो नाही पहाडी अधिकार
हक्काचा वारसदार होतो पण अनाम
ओठ शिवलेले हात बेड्यांनी जखडलेले

जन्मत:च अधिकारभेद करणे हे वर्णव्यवस्थेचे खास वैशिष्ट्य आहे. शूद्र म्हणून जन्माला आलेल्यांसाठी समाजव्यवस्थेत चौथा वर्ण म्हणून स्थान होते. पण माणूस म्हणून या व्यवस्थेने त्याची ओळखच पुसून टाकली होती. व्यवस्थेच्या तुरुंगात गुलामीचे जीवन जगणे हे त्याचे संचित होते. ओठ शिवलेले, हातात बेड्या आणि गुलामीचे आयुष्य. शूद्र म्हणून जन्माला आलेल्या सर्वांच्याच वाटयाला हे आले होते. असा अर्थबंध ही कविता सूचित करते. या अर्थबंधातून वर्णव्यवस्थेने उभारलेल्या तुरुंगातील बंदिवान अशी शूद्र प्रतिमा साकार झाली आहे. याच परंपरेत व्यवस्थेचा बळी ठरलेल्या आईबापाचे चित्र ढसाळांची कविता रेखाटताना दिसते.

इथल्या व्यवस्थेची दारू पिऊन जस्सा माझा बाप झिंगला आहे
आई तुही तशीच अज्ञानाचं पाणी पिऊन खल्लास झाली आहेस

याच कवितेत 'एक गाय बांधलेली दावणीला' असेही आईचे चित्र साकारले आहे. मराठी कवितेच्या इतिहासात आईचे उदात्तीकरण मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. या कवितेने ही उदात्तीकरणाची परंपरा मोडीत काढली आहे.

वास्तवाच्या धगधगत्या भूमीवरील आई अशी पहिल्यांदाच दलित कवितेने चित्रित केली. परंपरेच्या दावणीला या आईचे आयुष्य बांधल्या गेले आहे. व्यवस्थेने माणसाचा विकास खुंटविण्यासाठी अनेक पातळ्यांवर ज्या तरतूदी केल्या त्यातील महत्त्वाची तरतूद म्हणजे माणसाला सत्याचे ज्ञान होऊ न देणे. त्यासाठी त्याला नशेत ठेवणे भाग होते. आपण माणूस आहोत याचे भानच माणसाला येता कामा नये यासाठी कायम त्याला झिंगत ठेवणे क्रमप्राप्त ठरते. बापाच्या बाबतीत ही झिंग व्यवस्थेच्या दारूने कायम ठेवली. तर स्त्रिया या सज्ञान होता, शिक्षित होता कामा नये. यासाठी स्त्री ही कुठल्याही स्वातंत्र्याला लायक नाही असे श्रुती स्मृतीने जाहीर करून टाकले. त्यासाठी वर्णव्यवस्थेने अज्ञानाचे पाणी पाजून स्त्रियांना सर्व प्रकारच्या हक्क आणि स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले. दावणीला बांधून ठेवले, अज्ञानाचे पाणी पाजून खल्लास केले. अशाप्रकारे वर्णव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेने घेतलेले माणसाचे बळी अशाप्रकारचा वर्गीय संघर्ष या कवितेने स्पष्ट केला आहे. शोषक आणि शोषित असा हा संघर्ष आहे. ढसाळांच्या कवितेतील वर्गजाणिवा इथला देश, समाज, संस्कृती, स्वातंत्र्य, न्यायव्यवस्था, संसद, लोकशाही अशा अनेकविध पातळ्यांवर साकार झाल्या असून वर्गीय अंतर्विरोध पदोपदी स्पष्ट झाला आहे.

आपण जिवानिशी जातोत / नी त्यांना वातड लागतेहे
ते लांडगेहेत नी त्यांनी / बकरीचे कातडे पांघरलेहे
ते आपले शत्रूहेत नी / स्वातंत्र्याचा जयघोष करताहेत..

जीव घेणारे आणि बळी जाणारे अशा दोन वर्गाचे सूचन येथे झाले आहे. बळी घेणारा वर्ग हा कावेबाज आहे. माणसाचा बळी घेऊनही त्याला नामानिराळे रहावयाचे आहे. म्हणजे शोषण करूनही आपण त्या गावचेच नाही असा साळसूदपणा करावयाचा आहे. स्वत:ची ही लबाडपणाची वृत्ती झाकण्यासाठी एक कावेबाज युक्ती योजली आहे. 'शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड' या म्हणीतील अर्थाचा प्रत्यय येथे येतो. लांडगे हे शोषण करणारे, बळी घेणारे आणि आपण (स्वकीय) म्हणजे बळी जाणारे शोषित. अशाप्रकारे वर्गशत्रूची प्रतिमा लांडग्याच्या रूपातून सिद्ध झाली आहे. शत्रू प्रत्यक्षात शोषित वर्गाचे बळी घेऊन, रक्त प्राशन करत आहेत आणि दुसरीकडे ते स्वातंत्र्याचा जयघोषही करीत आहेत. हा विपरीतपणाआहे. बकरीचे कातडे पांघरणे आणि स्वातंत्र्याचा जयघोष करणे या दोन्ही गोष्टी वर्गशत्रूचे कावेबाज रूप स्पष्ट करणाऱ्या आहेत.

पवित्र खाजगी मालमत्तेचे जू / आपण घेतलेहे मानेवर
नी भांडवलशाहीच्या तिव्हड्याभोवती
ढापणं लावलेल्या बैलागत फिरतोत

भांडवलशाही व्यवस्थेत कष्टकऱ्यांचे, कामगारांचे शारीर पातळीवर केल्या जाणाऱ्या शोषणाचे स्वरूप येथे स्पष्ट झाले आहे. भांडवलशाहीच्या आसाभोवती ढापणं लावलेल्या बैलागत खाजगी मालमत्तेचे जू मानेवर घेऊन ढोर मेहनत करणारा कष्टकरी वर्ग असे चित्र या कवितेने स्पष्ट केले आहे. डोळ्यावर झापड बांधल्यामुळे आजूबाजूचे काही दिसण्याचा प्रश्नच नाही. आवर्तातच गरगरत राहिल्यामुळे जीवनाविषयीचा दुसरा विचारही करता येत नाही.

पतन पावलेल्या गर्भाला जसे सूर्यदर्शन नाही
तसे आपल्याला आपल्या जीवननिष्ठांचे दर्शन नाही
झोपड्या कचरपट्टया टेकलेहे आपण बुड फुटपाथवर
नी पाहतोत अलिशान झगमगाटाकडे

ज्यांची आयुष्ये गर्भातच मारली जातात त्यांना जीवनाविषयी विचार करण्याचीही गरज उरत नसते. तसे जगणे भांडवलशाहीच्या तिवढ्यामुळे प्राप्त झाले आहे. बकाल जगणे, निवाऱ्याचा अभाव अशा अवस्थेत झगमगाटाचे जग केवळ दुरून पहात राहणे एवढेच वाटयाला येते. बकालपणात जगणारा सर्वहारा आणि झगमगाटात जगणारा अलिशान भांडवलदार वर्ग असे अंतर्विरोधाचे रूप येथे स्पष्ट होते. हा अंतर्विरोध मिटवण्यासाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही. म्हणून 'आपल्या

हाताना लढाई फुटो, आपल्या बोटांनी युद्धाच्या ठिणग्या पसरोत, आपल्या जिवाला गांजणाऱ्यांचा नाश आपल्याला अभिप्रेत असो' अशी अभिलाषा कवीने व्यक्त केली आहे. त्यासाठी दोन मार्गही कवीने सांगितले आहेत.

एक रस्ता भूकमरी आणि लाचारीचा तडजोडीचा
आणि स्वत:ला विकण्याचा
दुसरा रस्ता विद्रोहाचा, सरळसोट सत्तेवर जाण्याचा
जग बदलण्याचा आणि स्वत:लाही बदलण्याचा (पृ ५८)

कवीच्या मते आयुष्य दोन रस्त्याचे आहे. त्या दोन रस्त्यांचे एकमेकात विलिनीकरण कधीच होऊ शकत नाही. म्हणून कुठलातरी एक रस्ता निवडणे अपरिहार्य ठरते. विद्रोहाचा रस्ता जगाला आणि स्वत:लाही बदलण्यासाठी आहे. असा रस्ता ज्यांच्याकडे गमावण्यासाठी बेड्याशिवाय काहीच नाही अशा सर्वहारा वर्गाचाच असू शकतो. जनसामान्यांच्या विशाल संघर्षाशी ढसाळांच्या कवितेचे नाते अटळपणे जोडलेले आहे. जनसामान्यांचे क्रांतीकारी मानस विद्रोही प्रतिमेतून या कवितेने व्यक्त केले आहे.

ज्यांचं आयुष्यच तुरुंग बनवलं गेलय
ती तुरुंगाला घाबरतील काय?
ती रोमॅन्टिक रिव्होल्यूशनरी फुलपाखरं नाहीत
दाण्यादाण्यास येजीस झालेल्या त्यांच्या आतड्यांनी
बंडाळीस उद्धृत केले आहे त्यांना
सक्त मजुरीतही ती शिवू शकतात हवा तसा डगला उदयासाठी
आग लागली तर बंब धावावा असं त्यांना वाटतच नाही
आग लागली तर वारा धावावा
असे इच्छिणारी ही ज्वालामुखीची सुप्त भूक आहे दादानो..

समूहामध्ये क्रांतीची चेतना निर्माण करणारी उग्र विद्रोही व्यक्तिमत्वांची लढाऊ प्रतिमा येथे साक्षात झाली आहे. ही लढाऊ व्यक्तिमत्वे तुरुंगाला न घाबरणारी आहेत. कारण त्यांच्या आयुष्यालाच इथल्या व्यवस्थेने तुरुंग बनवले आहे. भुकेच्या आंगडोंबामुळे त्यांना बंडखोरी करण्यास भाग पाडले आहे. म्हणून हा लढाऊ सैनिकांचा जथ्था रोमॅन्टिक रिव्होल्यूशनरी फुलपाखरं नाहीत. रोमॅन्टिक प्रवृत्ती आणि नाजूकपणा हा एकमेकास पुरक ठरणारा मूल्यभाव त्यांच्या रंध्रात नसून ज्वालामुखीची सुप्त भूक त्यांच्या रंध्रारंध्रात दौडत आहे. उज्ज्वल उदयासाठी ती तुरुंगात सजा भोगत असतानाही विशिष्ट तजवीज करू शकतात, बाहेरच्या जगात अन्याय, अत्याचार आणि शोषणामुळे सारे समाजजीवनच फाटले आहे. ते शिवण्याचे मनसुबे सक्त मजुरी भोगताना रचत जाणे अशी कृतिशील मानसिकता या बंडखोरांची आहे. लागलेली आग विझवण्याऐवजी ती अधिकाधिक भडकत जावी अशी अंत:करणात भडकत्या विचारांची आंदोलने पेटलेली आहेत. म्हणून ती सुप्त ज्वालामुखीची भूक आहे. त्यातून या बंडखोर, क्रांतीकारी, लढाऊ समूहाची उग्र दाहकता स्पष्ट होते. ''ढसाळांचा क्रांतीसैनिक हा प्रमाण दलित मानसिकतेच्या मर्यादा ओलांडून जनसामान्यांच्या विशाल संघर्षाशी आपले नाते जोडणारा आहे. पण तो उग्र प्रकृती आहे''[२२] हा अभिप्राय ढसाळांच्या भूमिकेची आणि कवितेची व्याप्ती स्पष्ट करणारा आहे. ढसाळांची कविता आपला देश, देशाची न्यायव्यवस्था, लोकशाही, संसद इत्यादी सर्व संस्थात्मक संरचनांवर तीव्र स्वरूपाचे भाष्य करते असे प्रत्ययाला येते.

भांडवली समाजाच्या विकासातूनच तुझ्या कुरूपतेला
पडले आहे देश म्हणून नाव नाहीतर तुला कोण हुंगतो
तू आजतागायत वाढला आहेस आग्यावेताळासारखा
तुझ्या छाताडावर पडलेल्या पडिक जमिनी
तुझ्या शरीरातनं वाहणाऱ्या पिसाट काळनागिणी

तुझ्या दरयाखोऱ्यातनं होरपळणारा उघडाबंब
लेकराबाळांचा बाडदाणा

देशाची कुरूपताच कवीने चित्रित केली आहे. देशाच्या वृद्धीच्या संदर्भात 'आग्यावेताळ' ही प्रतिमा आक्राळविक्राळ रूपाचा प्रत्यय देते. उत्पादनाचं मुख्य साधन निरर्थक ठरले आहे. देशाच्या शरीरातून धमण्याऐवजी पिसाट काळनागिणी वाहताहेत आणि दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करणारा उघडाबंब मानवी समूह लेकराबाळासहित होरपळत आहे. हतबल झाला आहे. अशा दुष्काळी स्थितीचे चित्र ही कविता साकार करते. त्यातून दुष्काळी देशाची विकृत प्रतिमा सिद्ध झाली आहे. म्हणजे हा देश देश म्हणण्याच्या लायकीचा राहिला नाही असाच विचार औपरोधिक अंगाने स्पष्ट झाला आहे. या देशाचा इतिहास मुळातच गुन्हेगार आहे असे कवीने म्हटले आहे. इतिहास गुन्हेगार आणि वर्तमान नालायक असलेला देश ढसाळांच्या कवितेने साकार केला आहे. न्यायव्यवस्थेच्या संदर्भात तर ही कविता अधिकच प्रखर भाष्य करताना दिसते. उदा.

दगडी हृदयाचा न्यायाधीश
कसायाचा बाजार कोर्ट आवार
रानरेड्यासारखी माजलेली न्यायदेवता

कसायाच्या बाजारात जनावरे विकत घेतली जातात ते त्यांच्या मानेवर सुरी फिरवण्यासाठीच. त्यांची कत्तल करण्यासाठीच व्यवहार केले जातात. तसे स्वरूप कोर्ट आवाराला आले आहे. न्यायदेवता मदमत्त झाली आहे आणि न्यायाधीश पथ्थरदिल असल्यामुळे न्याय मिळण्याची शक्यताच उरली नाहीय. कत्तलखोरीचा मार्ग निष्क्रियपणे उन्मत्तपणापर्यंत पोहचतो. असे स्वरूप न्यायव्यवस्थेला प्राप्त झाले आहे. लोकशाही राज्यात न्यायदाते आणि अन्यायग्रस्तांची बाजू मांडणारे यांच्यात माणूसपण उरले नाही. राज्य घटनेने दिलेल्या सार्वभौम हक्काची राजरोसपणे पायमल्ली सुरू आहे. त्यामुळे 'कल्याणकारी राज्य' मान मोडून पडले आहे. कायदे सर्वसामान्यांच्या बाजूने उभे राहिलेले नाहीत.

हा काळ्या झग्यातला बोकड आमचा जामीन नाकारतोय
हयाने न्यायदेवतेला केले आहे वारांगणा
ती झोपते दिवसाढवळ्या पैसेवाल्याकडे
आईचं रूप घेऊन आमची जखीण होते
तिच्या मुखात सर्वंकष लोकशाही असते
वागताना हुकूमशाही

न्यायदेवतेचे वर्तन दुटप्पीपणाचे आहे. फसगत करणारे आहे. तिच्या ओठात एक आणि पोटात भलतेच काही आहे. मुखात लोकशाही असली तरी वर्तन मात्र हुकूमशाही स्वरूपाचे आहे. एकंदरीत न्यायव्यवस्थेच्या क्षेत्रात बजबजपूरी माजली आहे. न्यायव्यवस्था देशाचा पाया रचणाऱ्या जनतेच्या बाजूने नाही असा विचार या कवितेने मुखरीत केला आहे. न्यायव्यवस्थेने केलेला पक्षपात, कल्याणकारी राज्याऐवजी उदयाला आलेले तस्करी राज्य, लोकशाहीऐवजी हुकूमशाही वर्तन, अशा वास्तवामुळे सर्वसामान्यांना समजून घेणारे कुणीही उरले नाही. अशा वंचितांच्या दुनियेचे दुःख अधिकच ठळक होऊन या कवितेतून पुढे आले आहे. वास्तविक संसद आणि न्यायसंस्था हे लोकशाहीचे मूळ आधारस्तंभ आहेत असे मानले जाते. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की,

हा संसदेचा रंडीखाना । ही देश नावाची आई
राजरोस निजते कुबेराच्या सोबत

सत्ता समतोलाचे तत्त्वच बिघडले आहे. सत्तेने भ्रष्ट रूप धारण केले आहे. अन्यायग्रस्त जनता पुरती ढवळून निघाली आहे. अशा विचारांचा संस्कार ही कविता करते. कुत्रा आणि प्रजासत्ताकाचे गाणे या कवितेने खालीलप्रमाणे अर्थाचा संस्कार केला आहे.

घरेदारे वाऱ्यावर सोडून आपण परततो आहोत स्मशानाकडे
उकरतो आहोत खाचेतून बेचाळीस पिढ्यांची हाडे
विकतो आहोत चार आणे किलोने
भरतो आहोत चार हाडांची खळगी
सोन्याचा धूर ओकणाऱ्या देशात
सजली आहे हाडांची बाजारपेठ

पोटाची खळगी भरण्यासाठी स्मशानात पुरलेल्या प्रेताची हाडे उकरून, ती कवडीमोल किंमतीने बाजारात विकण्याचे काम करण्याची वेळ माणसांवर आली आहे, आणि देशात हाडांची बाजारपेठ सजली आहे. कोण्या एके काळी या देशात सोन्याचा धूर निघत होता. एवढा संपन्न आणि सुखी, सोन्याची बाजारपेठ असलेला देश आज हाडांची बाजारपेठ सजवत आहे. संपन्नता लयास गेली आणि दारिद्रय जन्माला आले आहे. स्मशानातील प्रेतांच्या हाडांचा कवडीमोल किमतीने व्यापार करणारा देश आणि देशाची ऱ्हासावस्था या कवितेने चित्रित केली आहे. दारिद्रय फुलवण्यासाठी या देशाने दरिद्री उद्योग सुरू केला आहे. क्षुद्र दरिद्रीभावाचा प्रत्यय ही कविता देते. देश आणि प्रजा यांना स्मशान आणि कुत्रे (कारण कुत्र्याचा संबंध हाडाशी असतो.) असे रूप प्राप्त झाल्याचे ठळक वास्तव अधोरेखित होते. प्रजासत्ताक राज्यातील जनतेची दरिद्री अवकळा अधोरेखित होते.

थोडक्यात, **मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले** या कवितासंग्रहातील समग्र कविता वर्गसंघर्ष अधोरेखित करते. कवीची राजकीय भूमिका सिद्ध करते. म्हणून या कवितेचे स्वरूपही राजकीय ठरले आहे. 'मी एखादी कविता लिहितो म्हणजे एखादी राजकीय कृतीच करत असतो', अशी कवीची धारणा आहे. या धारणेप्रमाणे ढसाळांच्या कवितेने राजकीय कृती शब्दांच्या माध्यमातून, एका विशिष्ट भूमिकेतून, सर्वहारांच्या वतीने केली आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

याच दशकातील नामदेव ढसाळ यांचा आणखी एक वेगळे रूप घेऊन सिद्ध झालेला कवितासंग्रह म्हणजे **आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र प्रियदर्शनी** (१९७६) ही कविता म्हणजे उद्देशिका (ode) आहे. ''उद्देशिका हा प्रकार अभिजात ग्रीक वाङ्मयातून आला आहे. उद्देशिका ही दीर्घ प्रवृत्तीची कविता होती. तीत वैयक्तिक भावनाविष्कार आणि गंभीर वैचारिक चिंतन या दोहोंचाही मेळ असे. एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण समारंभाकरिता, एखाद्या महनीय व्यक्तीचा गौरव करण्याकरता उद्देशिकेची रचना केली जात असे.''[२३] ढसाळांची उद्देशिका प्रियदर्शिनीला उद्देशून लिहिली आहे. काळाच्या एका विशिष्ट टप्प्यावर इतिहास आणि वर्तमानाचे कथन प्रियदर्शिनीला उददेशून केलेले पाहावयास मिळते.दलित जगाचा प्रतिनिधी म्हणून कवीने हे कथन केलेले असून त्यात दलित जीवनाचे दु:ख, दैन्य, दास्यासह विद्रोह आणि नकाराची भावना व्यक्त झाली आहे. वर्गलढ्याची जाणीव तीव्रतेने व्यक्त झाली आहे. वर्तमानाचा साक्षीदार म्हणजे प्रियदर्शिनी इंदिरा गांधी होय. या वर्तमान साक्षीदाराला उददेशून हा आविष्कार झाला आहे. 'ही कविता काळाला समक्ष ठेवून व इतिहासाला साक्ष ठेवून लिहिली आहे. '[२४]

दलित कवितेच्या उदयानंतर इथले सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक जीवन ढवळून निघाले होते. अभिजन परंपरेतील मराठी कविता दलित वेदनेला शब्द देऊ शकली नाही उलट दलित जगाचा दु:स्वास मात्र या कवितेने केला आहे. दलित कवितेच्या रेटयामुळे मात्र एक फॅशनेबल रोमँटीसिझम अभिजन परंपरेने आपल्या कवितेत जोपासला. त्यातून दांभिक मोठेपणा त्यांना प्राप्तही करून घेता आला असेल. मात्र दीनदलितांच्या दु:खाला देण्यासाठी त्यांच्याकडे शब्दच नव्हते. त्यांच्या आविष्काराचा इतिहास दांभिक आहे. कवीने खालीलप्रमाणे ते स्पष्ट केले आहे.

भरल्या पोटावरून हात फिरवत / सोन्याच्या काडीने दात कोरीत
यापूर्वी त्यांनी लिहिल्या होत्या / भूकबळीवर अनेक कविता
रवंथ करीत त्यांनी गायली होती / परदु:खाची शीतल गाणी
स्वत:च स्थिरजंगम सांभाळून / त्यांनीही ढाळले होते अश्रू

आता त्यांना करता येत नाहीत उजळ माथ्याने
नि करता येत नाही सादर नाटक रंगभूमीवर
खुलेपणाने सर्वसामान्यांच्या जीवनाचं

शब्दांच्या माध्यमातून दांभिक कावेबाजपणा मिरवत त्यांनी स्वत:लाही मिरवून घेतले. मात्र वास्तववादी जगाला भिडण्याची त्यांची कुवतच नव्हती. कारण दु:खिताच्या जगाचा भाग ते कधीही नव्हते. तरीही आपल्या कवितेला दु:खाच्या फॅशनेबल झालरी त्यांनी चांगल्याप्रकारे झगमगत ठेवल्या. दलित कवितेच्या वास्तववादी आविष्कारामुळे त्यांच्या नाटकीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यामुळे हे अभिजनवादी रोमँटिक कवी बेचैन झाले.

अनामिक गंडाने ते पछाडले आहेत / उठलं आहे त्यांचं आदिम मूळव्याध
डसलं आहे त्यांच्या शब्दांना पिसाळलेल कुतरु
झाली आहे त्यांना स्वच्छ निर्जंतूक पाण्याची बाधा
ते सुटले आहेत सैरावैरा नि घेताहेत / चावा समिप येणाऱ्या भल्या वस्तूंचा
अनिर्बंधतेच्या भूतानं त्यांना पछाडलं आहे नखशिखान्त (५)

सर्वहारांच्या दु:खाला शब्द देणारी, त्यांच्याच वतीने बोलणारी दलित कविता झंजावातासारखी अवतरली तेव्हा या फॅशनेबल कवींची भंबेरी उडाली. त्यांची स्वत:ची कविता विस्कळीत झाली आणि दलित कविता ही कविताच नाही अशाप्रकारचा निराशावादी सूर आळवायला त्यांनी सुरवात केली. पिसाळलेल्या कुत्र्यासारखे त्यांचे शब्दही पिसाळले आणि दलित कविता आणि कवींवर भडीमार करायला सुरुवात केली. हा इतिहास या कवीला वाचकांसमोर मांडायचा आहे. कवीची भूमिका अतिशय ठाम आहे. 'मी माझ्या शब्दांसकट फॅसिझमच्या विरोधी आहे' असे कवीने म्हटले आहे.

शाश्वत मूल्यांच्या गोष्टीसाठी / शब्द पणास लावणारा कवी मी
घेऊन आलो आहे स्वत:च्या पददलित वर्गाची 'आयडेंटिटी'

माणूस हाच कवितेचा केंद्रबिंदू आहे. माणसावर, त्यांच्या स्वातंत्र्यावर प्रचंड प्रेम करणारी ही कविता आहे. त्याच्या सामर्थ्याचं महात्म्य सांगणारी ही कविता ऱ्हास, विजय आणि छळाचा इतिहास सांगण्यासाठी सज्ज झाली आहे.

प्रकाश आणि स्वातंत्र्य ही आहे जगाची शक्ती
आणि कविता आहे जगाचं हृदय
ती जाणिवेला सखोलता देते / ती भावनेला व्यापकता देते
ती रक्तातून उमललेल्या संवेदनाफुलांवर मोहित होते
ती पूर्वजांच्या चुकांचा कर्तृत्वाचा वैगुण्याचा
ऱ्हासाचा विजयाचा छळाचा इतिहास अधोरेखित करते

आपल्या पूर्वजांचा, गतकाळाचा, छळाचा इतिहास या कवितेने अधोरेखित केला आहे. हा ऱ्हास आणि छळ कोणत्या स्वरूपाचा होता याची चर्चा या कवितेने केली आहे. त्या चर्चेत संस्कृती, रीतिरिवाज, देव, धर्म यांच्या नावावर माणसांना मारणारे, चिरडणारे आहेत. माणसाच्या हाडामासांचे लचके तोडणारे सामील आहेत. माणसांना जाळणारे आहेत. लुटणारे आहेत, कत्तली घडवून आणणारे आहेत. थोडक्यात सनातन्यांनी केलेला अमानुष छळाचा, माणसालाच सनातन्यांच्या इच्छेसाठी हद्दपार करणाऱ्या काळोखी साम्राज्याचा इतिहास या कवितेने अधोरेखित केला आहे. एका अर्थाने माणसाला पशूपातळीवर पोचविणाऱ्या धर्मसंस्कृतीचा हा इतिहास म्हणजे बहिष्कृत भारताचा इतिहास होय. माणसाला निराधार आणि बेसहारा करणाऱ्या इतिहासाचं वर्णन खालीलप्रमाणे कवीने केले आहे ते विदारक आहे.

प्रेतावरील कफनं पांघरण्याची / प्रेतावर उधळलेली खैरात हे होतं आमचं धन
आमच्या पंगती लागत कुत्र्यामांजरासोबत उष्टयावाष्ट्यासाठी
गिधाडासारखी मेलेल्या जनावरांची त्यांनी करायला लावली आम्हाला लयलूट

ज्या जंगलामध्ये रक्ताचं पाणी करून / आम्ही लावली होती झाडंझुडपं
तीच त्यांनी टाकली तोडून
वाटलं होतं आम्हाला / एक ना एक दिवशी आम्ही बसू त्या झाडांच्या
गर्दमायाळू सावलीत / झाडांची पानं पानं जातील फैलावत
त्याआडून, पूर्वदिशेकडून फाकेल लालजर्द दिशा आणि
आमच्या हृदयाच्या अंधारगुहा होऊन जातील प्रकाशमय (२४)

मात्र अंधारगुहा प्रकाशमय होण्यासारखी परिस्थिती युगानुयुगे निर्माण होऊ शकली नाही. अगणित पिढ्या बरबाद झाल्या परंतु 'आमचं बहुवांछी स्वातंत्र्य येऊ शकलं नाही आम्हापर्यंत' अशी खंत या कवितेतून व्यक्त झाली आहे. स्वातंत्र्य नाही म्हणजे गुलामी अमर होती. बहिष्कृतांची आयुष्ये वेदनेने होरपळून निघत होती.

आमच्या आयुष्यावर केली होती वेदनेने सही
जेव्हा आमचं बाळपण हातात खुळखुळ्याची काठी घेऊन
नि माथ्यावर टोपलं घेऊन रानावनातून ढेकळाढुकळांतून
पांदीपांदीनं रुळल्या वाटेनं भाकरीच्या तुकड्यासाठी
करायचं वणवण हाळी द्यायचं 'जोहार येस्कराला भाकर येवूंद्या मायबाप'

हे गतकाळातील वेदनेचे स्वरूप हादरवून सोडणारे आहे. ही वेदना केवळ आपल्या देशापुरती मर्यादित होती अशातलाही काही भाग नाही आणि केवळ गतकाळापुरतीच मर्यादित होती असेही नव्हे. ढसाळांची कविता वैश्विक दु:खालाच गवसणी घालते. ती वैश्विक होते. गतकाळासह ती वर्तमानकाळालाही आपल्या कवेत घेते. छळ आणि क्रुरतेचा वर्तमान कशाप्रकारचा आहे? भारतातील दलित अस्पृश्य असोत वा श्वेतवर्णीय व्यवस्थेचे बळी काळे लोक असोत, किंवा हुकुमशाही व्यवस्थेने घेतलेले बळी असोत हे सारे शोषक व्यवस्थेचे, व्यवस्थेने घेतलेले बळी आहेत.

ज्या संस्कृतीत काळी कातडी अस्णं हा होतो गुन्हा
ज्या संस्कृतीत अस्पृश्य अस्णं हा होतो गुन्हा..
त्याबददल किती लिहू
हार्लेम आणि घेट्टोबद्दल/ महारवाडा आणि मांगवाड्याबददल
वरळीला पेटलेल्या ठिणगीचा ज्यांनी खून पाडला
ज्यांनी शहीद भागवत जाधवच्या कधी न झुकणाऱ्या शिरावर
धोंडा घातला/ ज्यांनी नारनवरेला दगडाखाली खापला
ज्यांनी गवईबंधूची तेजस्वी बुबुळं फोडली
किलावेनमानी नि हाथीगड / जोहान्सबर्ग नि हाथीगड
ज्यांनी निग्रोच्या लाल रक्ताने आपले गोरे पापी पंजे रंगवले...

भारतीय वर्णव्यवस्था आणि पाश्चिमात्य श्वेतवर्ण व्यवस्था, या व्यवस्थेचे शोषक रूप येथे स्पष्ट होते. शोषणाची रूपे वेगळी असतील पण शोषण जागतीक पातळीवर सर्वत्र आहे. भारतीय संदर्भात स्वातंत्र्योत्तर काळातील लोकशाहीच्या प्रस्थापनेनंतर जेमतेम पंचवीस वर्षांच्या काळात भारतीय सांस्कृतिक, राजकीय नकाशावरील आणि आंतरराष्ट्रीय फलकावरील वर्तमानाचे वास्तव ही कविता अधोरेखित करते. काळ कुणासाठी थांबत नसतो आणि इतिहासाला घड म्हणावे लागत नाही. व्यक्ती हेच इतिहासाचं सृजनशील साधन असते. इतिहास सूडही घेत असतो आणि बक्षीसही देत असतो. प्रेषितांच्या अहंकारासह प्रेषिताला काळाच्या उदरात गडप करीत असतो. मी म्हणजेच इतिहास असे म्हणणारे प्रेषित काळाच्या कसोटीवर उतरू शकत नाहीत. पायाभूत दिशा देऊ शकत नाहीत. मग हे प्रेषित काय करतात?

त्यांनी काळच कृष्णार्पण केला
कर्मकांडात/वर्णभेदात/ जातिभेदात/ शोषणात

त्यांनी भविष्यालाच सडत ठेवलं / त्यांनी काळोखाची पूजा बांधली
त्यांनी माणसातल्या पशुतेचं गायन केलं.....
अन्न नि जीवनसंगीत त्यांनी टाकलं विषाळून
आकाश आणि पृथ्वी त्यांनी देऊन टाकली कसायांच्या हाती
ह्या कसायांनी माणसांची शिरं छाटून त्यांचे केले पेपरवेट..

प्रेषितांनी माणसाचा विचार केला नाही. माणसाच्या भल्याचा विचार केला नाही उलट त्याची कत्तल घडवून आणली. स्त्रियांना विद्रूप केले. हिंस्त्र श्वापदांनी पृथ्वीच्या चेहऱ्यावर ओरखडे काढावेत आणि पृथ्वीच्या पोटात ठसठसती जखम अशी कृती केल्यामुळे त्यातून निर्माण झालेली अमानुषता, जहरीपणा, हिंस्त्रता, पृथ्वीवरील जखमा यावर हे प्रेषित मलमपट्टी करू शकले नाही. ही त्यांची मर्यादा कवीने विषद केली आहे. तथागत गौतम बुद्धाने मात्र स्वत:ला प्रेषित म्हणून कधीही घोषित केले नव्हते उलट मानवी दु:खाचा विचार त्यानेच प्रथम मांडला. मानवी दु:खाचे मूळ त्याने शोधून काढले. अत्तदीपभवचा मार्ग दाखविला. घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे कार्यकारणभाव असतो हेही त्याने समजावून सांगीतले. म्हणूनच कवी म्हणतो

खरंच प्रियदर्शनी
भुकेने व्याकुळ झालो असतानाही
आम्ही आमच्या अश्रुपूर्ण डोळ्यांनी अनुभवलाय
दगडी लेण्यामधला बुद्ध..
भुकेच्या वेळा टाळून आम्ही केलं होतं चिंतन
ध्यानस्थ बुद्धाच्या दगड्युक्त चेहऱ्याचं
अंधाराला कापत जाणारे त्याचे डोळे आणि
दोन्ही हातातल्या वळणामधलं अत्तदीपभव

एका अर्थी बुद्धविचार हाच खरा इतिहासातील खजिना आहे. वर्तमानाने ज्याच्याशी संबंध जोडावा असे हे महाद्वार आहे. म्हणून क्रुसावर ठोकलेल्या येशूच्या वेदनांकित चेहऱ्याशी बुद्धाच्या चेहऱ्याची तुलना करीत कवीने येशूला प्रश्न विचारला आहे. 'कोकरांना क्षमा करून आकाशीच्या बाप्पाकडे जाताना बुद्धाचा चेहरा का घेऊन गेला नाही? पुढे ही कविता माणसाचीच महानता स्पष्ट करीत जाते. माणूस काळोखाकडून प्रकाशाकडे, स्वातंत्र्याकडे जात आहे. प्रकाश आणि स्वातंत्र्य हीच जगाची शक्ती आहे असा निर्वाळा या कवितेने दिला आहे. हे जग म्हणजे व्यासाचे उच्छिष्ट आहे असे कितीही म्हटल्या गेले तरी इतिहास घडायचा थांबत नाही. 'व्यासोच्छिष्टम जगत् सर्वम' ह्या म्हणीनंतरही इतिहास घडत राहिला आहे. इतिहासाने ही म्हण खोटी ठरविली आहे. माणसांच्या मनावर खोटया बाबींचा मारा करणाऱ्यांना इतिहास कधीही माफ करीत नसतो. अशा गोष्टी प्रसवून सर्वसामान्यांना कायम संभ्रमात ठेवणाऱ्या युक्त्या प्रयुक्त्या इतिहासात केल्या गेल्या आहेत. मात्र इतिहासाने त्यांना खोटे ठरविले आहे.

पुनरुक्ती करणारी वर्षे जात राहतात येत राहतात
पुनरुक्ती करणारे हंगाम येत राहतात जात राहतात
त्यामधल्या गतीला नि द्वंद्वाला
जे पारखे होतात त्यांचा व्यास होतो
व्यास म्हटला की त्याला गतीही नस्ते नि प्रगतीही
व्यासाच्या हातून कधीच होत नाही प्रभात जी
चिरत राहते काळोखाला

काळोखाला चिरत जाणारी प्रभात व्यासाच्या हातून कधीच होत नाही हे सत्य या कवितेने मुखरीत करून मानवी विकास कशामुळे होतो हे स्पष्ट केले आहे.

माण्सामाण्साने घडली जाते जनता आणि
जनतेचा जन्म विकास पावतो
वस्तुनिष्ठ नियमांच्या वादळामधून
मानव निसर्ग उत्पादन समाज संस्कृती
हे असतात वादळाचे पोत
क्रिया-प्रतिक्रिया परस्परांचे विचार
कृती अनुभव नि त्यांची देवघेव
यामधून होतो वादळाच्या नव्या पिढीचा उदय

अशाप्रकारे द्वंद्वात्मक भौतिक वादातून माणसाचा विकास होतो हे प्रमेय या कवितेने मांडले आहे. या वादळात झोकून दिल्याशिवाय सुख, दुःख, सुंदरता आणि भेसूरता, न्याय अन्याय, नाजूकपणा आणि कठोरता, विधायकपणा आणि विद्ध्वंसकता, साधक आणि बाधक या विरोधकांतील नेमकेपणा प्रत्ययाला येत नाही. कष्टकऱ्यांच्या ध्येयवादाने प्रियदर्शिनीचा पिंड घडला आहे असे कवीला वाटते म्हणून कवीही तिने पुकारलेल्या लढाईत सामील होतो. तो सर्वसामान्यांच्या वतीने सामील होतो. त्यात गरीब आहेत, कामगार आहेत, आदिवासी आहेत, गावकुसाबाहेरचे आहेत, शेतमजूर आहेत. या साऱ्यांच्या वतीनेच कविता शब्दांकित होते. पददलित वर्गाची आयडेंटिटी घेऊन ही कविता अवतरली आहे. म्हणून तिला समूहगानाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या कवितेने वैश्विकतेशीही नाते जोडले आहे.

कवीने प्रियदर्शिनीसमोर अराजकाचे पर्व उभे केले आहे. वर्तमान किंवा समकालीन वास्तव हे अराजकाच्या मार्गाने जाणारे आहे. या वर्तमानाला अराजकाचा सर्ग लिहायचा आहे, 'छिनालपणाचा हौदोस घालायचा आहे', हिरोशिमा नागासाकी घडवून आणायची आहे, पाण्यामध्ये विष पेरायचे आहे, दंगेधोपे घडवायचे आहेत आणि वंशवादाचं नंगं थैमान घालायचे आहे.

जाळायचीत त्यांना मुक्तांगाने सळसळणारी उभी पिकं
निळ्याभोर आभाळात पिसारत जाणाऱ्या पाखरांचे
छाटायचे आहेत त्यांना पंख
निर्माण करायच्यात बाजारपेठा
आणि मांडायचा आहे आपल्या समस्त आईचा लिलाव

समकालीन वर्तमानाचे हुकुमशाही मानसच या कवितेने स्पष्ट केले आहे. विनाशाच्या मार्गावर आणून ठेवणारे, सर्वांना भुईसपाट करणारे मनसुबे रचणाऱ्या समकालीन प्रवृत्तीचा घेतलेला हा वेध आहे. सृजनाचा मुडदा पाडून गिधाडांना आमंत्रण देणारी ही प्रवृत्ती माणसाच्या प्रेतांवर नाचण्यासाठी सज्ज झाली आहे.

वेदांनी स्त्रीला पाचवा वर्ण उल्लेखून
थट्टा केली आहे संस्कृतीची
भांडवलदारांनी स्त्रीला सेक्सडॉल संबोधून
विडंबना केली आहे अतिपवित्र मानवजातीची
सद्या देशात दुश्मनांची चालू आहेत बौद्धिकं

पिढ्या न पिढ्यांचा हा इतिहास बदलायचा असेल तर प्रियदर्शिनीने बंडखोर भूमिका घेणे अपरिहार्य ठरते. त्यासाठी 'रंकाचा छळ होऊ न देण्याचं तू निभवायला हवंस अभिवचन' अशी कवीने प्रियदर्शिनीला साद घातली आहे. कामगार, शेतकरी, विद्यार्थी, जनता हयांच्या गौरवासाठी अहोरात्र झगडणे अनिवार्य आहे. असा कृतिशील उपाय या कवितेने सूचविला आहे आणि इशारा दिला आहे.

प्रियदर्शिनी- तू जागृत रहा रात्र वैऱ्याची आहे

जर सैल सोडलास लगाम नि वाकडं पडलं चुकून तुझं पाऊल
तर माणसांचे दुश्मन येतील सत्तेवर आणि
तुझ्या अगोदर ते फासावर चढवतील जनतेच्या कवींना
त्या दिवशी इतिहास तुला क्षमा करणार नाही
त्या दुदैवी दिवसाला तू देऊ नकोस संधी

अशा इशाऱ्यावर ही कविता विराम घेते. नामदेव ढसाळांची ही समग्र कविता एक समूहगानच आहे असे म्हणता येईल. पूर्वीच्या दोनही कवितासंग्रहांपेक्षा या संग्रहाचे स्वरूप वेगळ्या पद्धतीचे आहे. काळाच्या एका विशिष्ट टप्प्यावर दलित जगाचा प्रतिनिधी म्हणून नामदेव ढसाळ हा कवी आपल्या कवितेसह उभा आहे. या कवितेत दलितांचे दु:ख, दैन्य, दास्य, विद्रोह आणि नकार व्यक्त झाला आहे. दांभिक इतिहासाचे अवलोकन करीत बहिष्कृत भारताच्या इतिहासाचे विदारक रूप या कवितेतून स्पष्ट झाले आहे. या माणूसकेंद्री कवितेने वैश्विकतेशी नाते जोडून शोषक व्यवस्थेचे धिंडवडे काढले आहेत. प्रेषितांच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. बुद्धाची महानता सांगितली आहे. विरोध विकासवाद मांडून मानवी विकासाचा मार्ग सांगितला आहे. पददलित वर्गाची आयडेंटिटी घेऊन अवतरलेल्या कवितेने समकालीन वर्तमानाचे हुकुमशाही मानस स्पष्ट करून प्रियदर्शिनीला वर्तमानाच्या फलकावर बंडखोर रूपात सादर व्हावे असे आवाहन केले आहे. दलित शोषित पीडितांच्या गौरवासाठी संघर्ष अपरिहार्य असल्याचे अधोरेखित केले आहे.

✸ बाबूराव बागूल (जन्म १७ जुलै १९३० - मृत्यू २६ मार्च २००८)

बागूलांच्या साहित्यनिर्मितीचा प्रारंभ कवितेनेच झाला आहे. १९४५ साली आंबेडकरांचे गौरवगीत गाणारी पहिली कविता लिहून त्यांनी वाङ्मयाच्या प्रांतात प्रवेश केला. बाबूराव बागूल यांचे नाव दलित साहित्याच्या आरंभबिंदूशी जोडलेले आहे. दलित साहित्याच्या निर्मितीसाठी प्रेरणा आणि दिशा देण्याबरोबरच स्वत: मोठी निर्मिती करून दलित साहित्य चळवळीची धुरा वाहण्याची ऐतिहासिक कामगिरी बागूलांनी पार पाडली. विद्रोह हे मूल्य साहित्याला प्राप्त करून दिले. त्यांनी दलित साहित्याची सैद्धान्तिक भूमिका मांडली. कथाकार, कादंबरीकार, तत्त्वचिंतक, साहित्य चळवळीचे म्होरके असे त्यांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत.

मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान बागूलांच्या कवितेने मांडले आहे. माणसासंबंधी त्यांची कविता मनसोक्त बोलते. माणूस त्याचे सामर्थ्य, कर्तृत्व, त्याची निर्मिती, त्याचे सौंदर्य आणि त्याचे मोठेपण हे बागूलांच्या कवितेच्या केंद्रस्थानी असणारे विषय आहेत. देव, धर्म,देवळे यापेक्षा माणूस महान आहे. या विचारसूत्रानुसार त्यांची कविता आकारास आली. उत्कट सामाजिक भान आणि तात्त्विक अधिष्ठान असलेल्या त्यांच्या कवितेने देवाधर्माला सहजपणे मोडीत काढले आहे. भारताच्या गुलामगिरीला दैन्य, दास्य आणि दु:खाला कारण वैदिकांनी निर्माण केलेली सर्वांगीण विषमता आहे. देशात घातक संस्कृती आर्य आक्रमकांनी निर्माण केलेल्या धर्मसंस्कृतीच्या परिणामातून निर्माण झाली आहे असे स्पष्ट प्रतिपादन बागूलांनी केले आहे. या संस्कृतीने, परंपरेने, कर्मविपाकाच्या सिद्धान्ताने माणसाला परावलंबी बनवले. माणसाच्या महत्तेलाच नाकारले. म्हणून बागूलांची कविता विघातक परंपरा आणि संस्कृतीला नकार देतेच परंतु माणसाच्या महानतेचा जोरदार पुरस्कार करते. म्हणून त्यांची कविता माणसाची होते. वैदिक परंपरा, तिचे विचारविश्व या गोष्टींना पूर्णत: नाकारणारी कविता माणसाचे मोठेपण सिद्ध करून मोठा उच्चांक गाठते.

वेदाआधी तू होतास
वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास..
अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस
अन् प्रत्येकाने मान्य केले
हे प्रतिभावान माणसा, तूच आहेस सर्वकाही
तुझ्यामुळे सजीव सुंदर झाली ही मही

वेद हे अपौरुषेय आहेत. ते परमेश्वराने निर्माण केले आहेत. ह्या वैदिक संस्कृतीच्या लाडक्या मताला सहजपणे लाथाडण्याचे काम या कवितेने केले आहे. शब्दप्रामाण्य प्रसृत करणाऱ्या वैदिक जननसंस्थेला मोडित काढले आहे. परमेश्वर या संशयास्पद किंवा अस्तित्त्वात नसलेल्या कल्पनेपेक्षा माणूस ही वस्तुस्थिती श्रेष्ठतम आहे. असा श्रेष्ठ विचार मांडला आहे. माणसाला संकुचित करणाऱ्या व्यवस्थेवर प्रचंड आघात करून माणसाचे माणूसपण आणि सामर्थ्य यांचा उत्स्फुर्त उद्घोष केला आहे.

तुमचे कष्टाळू प्रज्ञावंत हात
प्रलयकारी होऊ शकतात
याला निसर्ग साक्ष आहे हे त्या रानढोरांनी
वैदिकांनी ओळखले होते
म्हणून त्यांनी तुम्हाला शूद्र म्हटले आणि
अनेक बंधनांनी जखडून टाकले
हिंदू धर्म म्हणजे तुमची जखडणूक आहे.

जाचक कायद्याचे जोखड माणसाच्या मानेवर ठेवण्यात वैदिक संस्कृती यशस्वी ठरली. विज्ञानाचा जन्म, विकास आणि विस्तार झाला नसता तर हे जोखड कायमचे माणसाच्या मानेवरच राहिले असते. मात्र घडले वेगळेच. कष्ट करण्याची प्रेरणा, नेमकी कृती करण्याची बुद्धी माणसाजवळ होती म्हणूनच विज्ञान-तंत्रज्ञान विकसीत झाले. त्यामुळे धर्माच्या नावावर पोसल्या आणि पेरल्या गेलेल्या समग्र खुळ्या कल्पना मोडीत निघाल्या. माणूस विज्ञाननिष्ठ बनला आणि देवदेवता, परमेश्वर यांचे अस्तित्त्वात नसलेले अस्तित्त्व संपुष्टात आले. माणसाच्या प्रज्ञावान आणि प्रकाशमय हातामुळे अनेक चमत्कार पृथ्वीवर घडले. परंतु त्यापूर्वी माणसाच्या सृजनशील हाताचे मोठेपण इथल्या संस्कृतीने नाकारले होते. बागूलांची कविता माणसाच्या हाताचे सुंदर तत्त्वज्ञान मांडते-

तुमचे हात असतील बंदिस्त पण ते आहेत सृजक!
तुमचे हात असतील अबोल, अबोध
पण आहेत ते परिवर्तनाचे रथ आणि प्रगतीचे पथ
तुमची पाच बोटे म्हणजे पंचमहाभूते

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पंचमहाभूते आहेत असे मानले जाते. ही पंचमहाभूते म्हणजे प्रत्येक तत्त्व अतिशय अफाट आणि असिम आहे. ही असिमता आणि अफाटता माणसाच्या पाच बोटांमध्ये आहे. ही पाच बोटे एकत्र आली की, त्याचे रूपांतर वळलेल्या मुठीत होते आणि वळलेल्या असंख्य मुठी कोणताही चमत्कार करू शकते. माणसाचे हात साखळदंडाने बांधले म्हणून काही त्याची सृजनशक्ती कमी होत नसते. माणसाचे हात अबोल असले तरी त्यातील गतीमानता कमी होत नसते. हे गतीमान हातच प्रगतीचे पथ असतात. क्रांतीचा जनकही माणूसच आहे असा विचार बागूलांच्या कवितेने मांडला आहे. माणूस हा निसर्गालाही आपलासा वाटतो कारण सूर्य, चंद्र, तारे, सागर, नद्या, अग्नी, वादळ या साऱ्यांचेच गुणधर्म माणसामध्येही संचारले आहे. सूर्याची तेजस्वीता, चंद्राची शितलता, सागराची अथांगता, झुंजारपणा, अग्नीची प्रखरता आणि वादळाची तांडवता हे सारेच गुणविशेष माणसाने आत्मसात केले आहेत. म्हणून बागूलांनी म्हटले आहे-

अंतराळीची कोणतीही शक्ती तुझ्या प्रेमाखातर
करत नाही इर्षेचं प्रकटीकरण, विद्ध्वंसक जाळपोळ
एवढा तू अवघ्या विश्वाचा प्रियतर अन
विश्वात्मक आत्मजही

माणूस जन्माला येतो तोच मुळी मरण नावाची अटळ गोष्ट सोबतीला घेऊन. परंतु जन्म ते मृत्यूच्या दरम्यान

माणसाने आपल्या हाताने अनेकविध चमत्कार घडविलेले असतात. म्हणून माणूस अजरामर होतो. माणसाचे हात प्रसंगी प्रलयंकारी होऊ शकतात. परंतु पंचमहाभूतासारखे शक्तिमान असणारे हे हात कष्टासाठी आहेत. कष्टासाठी ते झिजत असतात तेव्हाच संपत्ती, समृद्धी आणि प्रगती साकार होत असते. माणसाचे हात प्रबुद्ध अन् श्रमशूर झाल्यापासून पृथ्वीची समृद्धी आणि श्रीमंती वाढत गेली. सभ्यता आणि संस्कृती अवतरत गेली. पृथ्वीवर झालेली प्रगती मानवी हातामुळेच झाली. मानवी हाताच्या सौंदर्य आणि सामर्थ्याचा एवढा देखणा आविष्कार यापूर्वी मराठी कवितेत झालेला नाही! हे लक्षात ठेवले पाहिजे.

कष्टकऱ्यांचा, श्रमिकांचा गौरव करणारी भूमिका बागूलांच्या कवितेने मांडली आहे. कष्टकरी माणसापूर्वी निसर्गाशिवाय इथे काहीच अस्तित्त्वात नव्हते असा ठाम विश्वास त्यांच्या कवितेने व्यक्त केला आहे. वैदिक परंपरेचे एक विश्लेषण त्यांच्या कवितेने मांडले आहे. त्यातून इतिहासाची पुनर्मांडणी बागूलांची कविता करू पाहते. वैदिकांना सृजनशील हाताची करामत माहित नव्हती असे नव्हे. मात्र त्यांना हिंसा माहीत होती. हिंसेतून अन्याय अत्याचाराला खतपाणी मिळत गेले. हिंसेच्या बळावरच त्यांनी लढाया जिंकल्या आणि स्वकीयांच्या पराभवाची नोंद इतिहासात झाली. पराभवाचा इतिहास आकारास आला. पुढे समतेच्या प्रस्थापनेसाठी अनेक पातळ्यांवरचे संघर्ष झडावे लागले. संघर्षाची एक परंपरा निर्माण झाली. त्या संघर्षशील परंपरेचे भान पहिल्यांदा म. फुल्यांनी आणून दिले. हा इतिहास बागूलांच्या कवितेने वाचकांपुढे ठेवला आहे. या निमित्ताने ही कविता जातिभेद का आणि कोणी निर्माण केले याची मीमांसा करते.

माणसाचे हात वणव्याला भारी होऊ शकतात
प्रलयाचे पायी दोरी बांधू शकतात
हे वनात वावरणाऱ्या वैदिकांनी
द्रविडांची कामगिरी पाहून ओळखले होते
म्हणून त्यांनी माणसाला मोडून ठेवण्यासाठी
जातीभेद निर्माण केले

अशाप्रकारे दोन संस्कृतीच्या संघर्षातून जातिभेद जन्माला आल्याचा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. मानवी समूहाचे, त्याच्या बलाचे विभाजन करण्यासाठी एक नामी शक्कल आर्यांनी शोधून काढली. जातिभेदातून एकसंध मानवी समूहाची शकले करायला त्यांनी सुरुवात केली. ''शुद्रादी अतिशूद्रांची मते एकमेकास मिळू नये म्हणोन पूर्वी भट लोकांनी एक धूर्त कावेबाज विचार शोधून काढिला. त्या लोकांचा समाज जसा जसा वाढत चालला त्याप्रमाणे भट लोकास भीती वाटू लागली आणि त्यांनी त्यांच्यामध्ये परस्पर वाकडेपणा राहील अशी काही तजवीज योजली, तरच आपला येथे राहण्याचा टिकाव लागून सदासर्वदा ते लोक वंशपरंपरेने आपले व आपले वंशजाचे गुलामगिरीत राहून आपणास काही श्रम न करिता त्यांचे निढळाच्या घामाने मिळवलेले उत्पन्नावर बिनधास्त मौज मारिता येतील, हा त्यांचा विचार सिद्धीस जाण्याकरिता जातिभेदाचे थोतांड उपस्थित करून, त्यांजवर अनेक स्वहितसाधक ग्रंथ केले व ते त्या अज्ञानी लोकांच्या मनांत भरविले''[२५] म. फुल्यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथात दिलेला हा दाखला लक्षात घेता स्वस्वार्थासाठी वैदिकांनी कावेबाजपणे मानवी समूहात विभाजन घडवून आणण्यासाठी जीतिभेद निर्माण केले हा निष्कर्ष हाताशी येतो. बागूलांच्या कवितेने हाच संस्कृतीसंघर्ष चित्रित केला आहे. त्यांची कविता पुराण, इतिहास आणि वर्तमान असा तिहेरी संबंध प्रस्थापित करते. देव, धर्म, देवळे यापेक्षा स्त्री महान असे विचारसूत्र या कवितेने मांडले आहे. स्त्रीचे खच्चीकरण करण्यासाठी पुरुषप्रधान संस्कृतीने कोणत्या युक्त्या प्रयुक्त्या केल्या याचा मोठा पटच या कवितेने वाचकांसमोर ठेवला आहे. स्त्रीच्या आईपणाबददल प्रत्येकच काळात काव्याला उदात्तीकरणाचा बहर आला आहे. त्यातून तिन्ही जगाचा स्वामी आईविना भिकारीच ठरतो अशी नोंद करण्यात आली आहे. म्हणून हे आईपण परमेश्वराला भारी ठरणारे आहे. मात्र धर्माच्या नावावर तिचे महन्मंगलपद देवासाठी लुटण्यात आले. ही वस्तुस्थितीही लक्षात घेतली पाहिजे. आई ही वस्तुस्थिती वरचढ ठरली हे पाहून परमेश्वराच्या पाठीराख्यांचे पित्त खवळले आणि त्यांनी परमेश्वराला 'पिता' ठरवून टाकले-

तुझे आईपण पाहून
तुझी सर्व पोरावरली माया पाहून
पिता परमेश्वराची कल्पना प्रेषिताना सूचली

मग स्त्री ही माता आणि पिता परमेश्वर हा बाप असा ठोकळेबाज विचार मांडला जाऊ लागला. तिचे महानपण ईश्वराच्या नावाशी जोडण्यात आले. स्त्री व आई म्हणून असलेले तिचे अस्तित्त्व आणि थोरपण कोणालाही हिरावून घेता येणार नाही. या ताकदीमुळेच ती देव, धर्म, देवळे यापेक्षा कोणत्याही काळात श्रेष्ठच ठरली आहे. मात्र प्राथमिक अवस्थेपासून ते पुढे अनेक काळापर्यंतचा मातृसत्ताक प्रथेचा इतिहास पाहिला तर पुरुष तसा दुय्यमच ठरणारा आहे. कारण पुरुषास जन्मास घालण्याची ताकद फक्त आणि फक्त स्त्रीमध्येच आहे! हे कोणत्याही काळातील सत्य कसे नाकारता येईल. म्हणून स्त्रीचे महानपण कोणत्याही काळात अबाधितच राहणारे आहे असा विचार बागूलांच्या कवितेने मांडला आहे. परमेश्वर, ईश्वर ह्या कल्पना कशा थोतांड आहेत हे सांगितले आहे. या देशात जन्म घेणे म्हणजे मोठी शिक्षा किंवा सक्तमजुरीच असते. जन्माला यायचे आणि मरेपर्यंत पशूपातळीवर जगायचे, कारण वर्णव्यवस्थेने तशी विभागणीच करून ठेवली होती आणि विभागणीनुसार शेवटच्या चौथ्या बेटावर दलितांना, स्त्रियांना अपरिहार्यपणे जीवन कंठावे लागते म्हणून इथे जन्म घेणे म्हणजे व्यथावेदनांच्या वारुळात शिरणेच होय असा निष्कर्ष बागूलांची कविता मांडते. याचे कारण सांगताना ती हिंदू धर्माला जबाबदार धरते.

या देशात वेदांच्याही आधी जन्माला घातले
असा मी वेदांच्या आधीचा असताना अस्पृश्य कसा?
म्हणून माणसाचा अवमान करणारा धर्म मी मोकलून देतो!
अहिंदू होतो हे मी निर्भयपणे जाहीर करतो

या प्रकारे प्रश्न उपस्थित करून धर्माला ठोकरणारी प्रखर जाणीव व्यक्त केली आहे. धर्म, स्मृती, श्रुतीने माणसाला अस्पृश्य ठरविले, नाकारले, अस्पृश्याचा पराभव केला तरी अस्पृश्याने जीवनापासून पलायन केले नाही. त्याने स्वत:ला काळोखाचा साक्षीदार म्हणून घोषित केले नाही आणि स्वत:चा संयमही सोडला नाही. म्हणून अस्पृश्याकडे भूतदयावादी दृष्टिकोनातून पाहिले जाऊ नये असे बागूलांच्या कवितेला अभिप्रेत आहे. कारण या संयमाखालीही एक जगड्व्याळ वादळ वावरत आहे. हे वादळ येताच ते संबंध उलथापालथीचे केंद्र बनणार आहे असा विश्वास व्यक्त झाला आहे. या विश्वासातूनच धर्मत्याग आणि देशत्याग करण्याची भाषा कवितेत अवतरते. एका अर्थाने ही कविता चळवळीतील संघर्षाची दीक्षा देते हे तिचे मोठेपण नोंदविलेच पाहिजे. बुद्ध- फुले- आंबेडकर ही या देशातील मानवमुक्तीच्या आंदोलनाची अभिन्न अंगे आहेत. जगाचा कर्ता करविता परमेश्वर नव्हे तर माणूस आहे. बहुजन नेता हा नियंता आहे हा मौलिक विचार बुद्ध- फुले - आंबेडकर या परंपरेने दिला. म्हणून बागूल म्हणतात-

पहिल्या प्रथम तुम्हीच पिता परमेश्वराला
पिढ्यानपिढ्यांची आत्म्याच्या साखळीची भानगड
नाकारली, ठोकरली
माणूस आणि समाज माणूस आणि मन
मान्य करणारेही तुम्हीच पहिले..
बहुजनांनी जे जगविले ते जगते अन
बहुजनांनी मारिले ते मरते
बहुजन हा नेता नियंता भारतभाग्य विधाता आहे
हेही ओळखणारे पहिले तुम्हीच

बुद्धानंतरच्या काळात अनेक वर्षे म्हणजे बुद्ध संस्कृतीचा ऱ्हास करणारी वेदान्त परंपरा प्रबळ ठरली

तेव्हापासूनच्या काळात दलित बहुजन हा अंधाराच्या खाईतच चाचपडत होता. फुले- आंबेडकरांचा उदय झाला आणि दलित बहुजनांच्या जीवनात प्रज्ञामय प्रकाश पसरत गेला हा इतिहास आहे आणि यापुढचा इतिहास बौद्धमय भारताचा असेल, प्रलय प्रतिकाराचा असेल, पराभवाचा असणार नाही अशी ग्वाही बागूलांची कविता देते. मनुस्मृतीच्या देशात ज्यांचा जन्म झाला. त्यांच्याकडे बुद्धाचा- आंबेडकरांचा विचार हाच एक जालीम उपाय आहे. मनुस्मृतीतील अन्यायी आणि जाचक निर्बंधाना चूड लावण्याचे काम या देशात तरी आंबेडकरांशिवाय दुसरे कुणीही करू शकले नाही. हा इतिहास लक्षात घेता या इतिहासाचा आदर्श नजरेसमोर ठेवून वर्तमान बदलता येईल असा प्रखर आशावाद व्यक्त केला आहे. आंबेडकरी विचारांची कृतिशीलता हाच या देशातील परिवर्तनाचा पाया आहे असा ठाम विश्वास या कवितेने व्यक्त केला आहे.

'संगरामागे संगर केल्याविना गत्यंतर नाही
आंबेडकरांचे अनुकरण करणे जरुर आहे कारण
अनेक युगानंतर, अनेक एकलव्य, शंबुकानंतर
एक आंबेडकर जगू शकले फक्त.'

युगायुगापासून चालत आलेल्या अन्याय अत्याचार आणि छळाला मूठमाती देण्यासाठी आंबेडकरांचा उदय व्हावा लागला. हाही विसाव्या शतकाचा इतिहास लक्षात घेणे गरजेचे आहे. दीनदलितांचा जो काही विकास झाला, प्रगती झाली त्याचेही एकमेव कारण आंबेडकर आहे हाही इतिहास कसा विसरता येईल? म्हणून आंबेडकरी क्रांतीविज्ञानाचे, विचारांचे अनुकरण करणे अपरिहार्यच ठरते. स्वाभिमानाचे बाळकडू पाजून परिवर्तनाच्या पायावर दलित शोषिताना उभे करण्याचा एक ठाम विचार ही कविता देते.

मन आणि विचार या दोन गोष्टी एकरूप झाल्या की क्रांतीच्या प्रसूतीचे डोहाळे लागतात. मात्र हे माणसाच्या मनात रुजविण्यासाठीच्या सर्व वाटाच बंद करून टाकल्या होत्या. तरीही शोषितांच्या मनातील परिवर्तनशक्ती संपुष्टात आली असे घडले नाही.कोणत्याही काळात क्रांतीचा गळा घोटला जाऊ शकत नाही. तिचे रसरसलेपण सुप्त रूपात सळसळतच असते.कुठेतरी एखादी ठिणगी पडायला अवकाश असतो. शोषित, सर्वहारांनी क्रांतीचे पुढारपण स्वीकारले की, ती यशस्वी होत असते.असा जगातील क्रांत्यांचा इतिहास आहे. म्हणून या देशातही असेच घडावे, क्रांतीचे आगमन व्हावे असे बागूलांना वाटते. दलितांच्या कुळात जन्माला येणे म्हणजे दु:खाच्या, दु:खदात्याच्या, शत्रूच्या विरोधात उभे राहणे असा विचार बागूल आपल्या कवितेतून प्रकट करतात. म्हणून या देशाबद्दलच्या पारंपरीक कल्पना आणि संकल्पना नाकारून 'आंबेडकर भारत' ही नवीन संकल्पना ते जन्मास घालतात. 'लोकसत्ताक भारताचा क्रांतीकारक रचनाकार' अशी संकल्पना मांडून नव्या सृजनाची, नवी निर्मिती या मताप्रमाणे पारंपरीकता, सनातनत्व या गोष्टींना मूठमाती देऊन नव्या अंकुराचे, नव्या रोपटयाचे आणि त्याचे झाडात झालेल्या रूपांतराचे एक भव्यदिव्य रूप बागूलांची कविता आपल्यासमोर ठेवते. स्त्रियांचे स्पर्धक कोण? तर ईश्वर असा विचार मांडून स्त्री पुरुष समता या तत्त्वाचा अंगीकार करून योग्य आणि उचित अशा तत्त्वविचारांची मांडणी या कवितेने केली आहे.

दुर्बल देश दास झाला
माणसाला गुलामी प्रिय नाही
बुद्धाच्या देशाला दास होणे पसंद पडणार नाही
म्हणून देशभक्त आंबेडकर डॉक्टर आंबेडकर झाले

प्रतिकाराची दीक्षा देण्यासाठी आंबेडकरांचाच उदय व्हावा लागला.भारतीय संविधानाच्या रूपाने अनेक आजाराचे उपाय आंबेडकरांनी सांगितले आहेत आणि जोपर्यंत लोकशाही आहे तोपर्यंत ह्याच उपायाची मात्रा लागू पडणार आहे. आंबेडकरी कर्तृत्वाच्या इतिहासाचे केवळ तोंडदेखले भान असून चालणार नाही. तर विचाराला कृतीची जोड देणे ही काळाची गरज आहे असे बागूलांची कविता स्पष्ट करते.

स्वातंत्र्य या मूल्याचा अर्थ पेशवाई बुडाल्यानंतर म्हणजे इंग्रजांच्या आगमनानंतरच प्रकर्षाने समजू लागला. स्वातंत्र्याच्या अर्थाचे आकलन होऊ लागले.तो अर्थ एकोणिसाव्या शतकात म. फुल्यांनी सांगितला होता. विसाव्या शतकात आंबेडकरांनी समजावून सांगितला.स्वातंत्र्याला पाहून प्रज्ञावंत हात प्रसन्न झाले आणि स्वप्न पाहणारे डोळे तृप्त झाले.मात्र वास्तवात काय घडले ?तर स्वातंत्र्य गोरगरीबांच्या घरापर्यंत पोहचलेच नाही.इन्कलाब जिंदाबादची गर्जना हवेतच विरून गेली.स्वातंत्र्याने माणसाला निराश केले, भ्रमनिरासाच्या कड्यावर आणून ठेवले. स्वातंत्र्याच्या आगमनानंतरही इथले तारुण्य उपाशीच राहिले,

स्वातंत्र्या! युरोप, अमेरिकेत तू उभारलेस
तसे इथेही जीवन आणि जग उभार!
म्हणजे हे तरुण दु:ख घेऊन, दु:ख होऊन
चौकाचौकात दिसणार नाहीत.

स्वातंत्र्यावरची माणसाची श्रद्धा कोलमडून पडली.श्रद्धेची जागा संतापाने घेतली. दु:ख सोसून आलेल्या मनाला प्रक्षोभक होण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही म्हणून बागूल म्हणतात,

हे स्वातंत्र्या! तू आलास खरा, दिसतोस खरा
परंतु आंबेडकरांची क्रांतीकारक करुणा विसरून

काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे याविषयीची भूमिका स्पष्ट असली तरी हिताचे कोणते आणि अहित कशात याचा तरतमभाव बाळगणारी सदसदविवेकबुद्धी कवीने सतत जागृत ठेवली आहे. वैचारिक आणि तात्त्विक द्वंद्वाच्या पार्श्वभूमीवर बागूलांची कविता एक वेगळे भान प्रकट करते.

कधी कधी मनामधी शिरतो तलवारीपरी विचार
फिरावे वाटीत बंदुका शस्त्रांच्या सामर्थ्यावर
संबोधीच्या साथसोबतीने टाकावा बदलून भारत..
कधी कधी मनामधी शिरतो सुगंधापरी विचार
धारण करावे चिवर व्हावे बौद्ध भिक्षू प्रखर..
मनामनातला काळोख करून गोळा दयावा दूरवर
नभापलीकडे काळोखात काळोख अन
करावा पुन्हा प्रकाशमान भारत अन माणूस महान..

स्वातंत्र्य दु:खाचा भाऊबंद झाले म्हणून या दु:खावर मात करण्यासाठी हातात शस्त्र घेणे हा काही अंतिम उपाय नव्हे याचे भान या कवितेला आहे. प्रज्ञावंत झालेल्या हातात बंदुका शोभत नाहीत हे कवीला येथे स्पष्ट करावयाचे आहे. एवढेच या कवितेचे कार्य नाही तर वैचारिक अंतर्विरोधाचे रूप या कवितेला स्पष्ट करावयाचे आहे. एका अर्थाने शस्त्रावर विश्वास ठेवून शोषणाचा अस्त करायला निघालेली जाणीव आणि अहिंसेच्या अस्त्राने मुक्तीचा मार्ग शोधणारी जाणीव हे दोन्ही मार्ग दु:खनिरोधाचे असले तरी दु:खनिरोधासाठी आपले हात शस्त्राला दयायचे नाही हिच भूमिका अधिक प्रबळ ठरते. शस्त्र आणि संबोधी या दोन्ही परस्परविरोधी गोष्टी आहेत. आंबेडकर भारतात या दोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकणार नाहीत. बुद्धाच्या मार्गाने हिंसेला स्थान नाही शस्त्राला महत्त्व नाही. आंबेडकर भारत बौद्धमय करण्याचा तो मार्ग नव्हे याचे भान कवीला आणि कवितेला आहे. भारतीय संविधानाचा अपमान होऊ दयायचा नसेल तर बुद्धाचा मार्ग स्वीकारणे अटळ आहे म्हणून भारताला पुन्हा प्रकाशमान करण्यासाठी चिवर धारण करणारी सुगंधी विचाराची भूमिका स्वीकारण्याची अपरिहार्यता प्रतिपादन करून वैचारिक आणि तात्विक द्वंद्वातून नेमका मार्ग या कवितेने दाखविला आहे.

थोडक्यात, बाबुराव बागूल यांची कविता हा दलित कवितेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. ही कविता माणूसकेंद्री असून मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान या कवितेने मांडले आहे. देव, देवळे, धर्म यापेक्षा माणूस महान आहे या विचारसूत्रानुसार

ती आकारास आली आहे.

विघातक परंपरा अणि संस्कृतीला प्रखर नकार देत माणसाच्या महानतेचा जोरदार पुरस्कार या कवितेने केला आहे. माणसाच्या कष्टाळू हाताचे सुंदर तत्त्वज्ञान मांडले आहे. मानवी हाताच्या सौंदर्य आणि सामर्थ्याचा देखणा आविष्कार केला आहे. बागूलांची कविता पुराण, इतिहास आणि वर्तमान असा तिहेरी संबंध प्रस्थापित करते. या देशात जन्म घेणे म्हणजे व्यथावेदनांच्या वारुळात जन्म घेणेच होय त्याला कारण हिंदू धर्म आहे असा निष्कर्ष ही कविता मांडते. ईश्वर, परमेश्वर या कल्पनांचे थोतांड स्पष्ट करते. चिंतनशीलता हे या कवितेचे केंद्र असून ती माणसाला संघर्षसन्मुख करते.माणसाच्या खदखदणाऱ्या मनात विद्रोहाची ठिणगी टाकते. आत्मसन्मानासाठी विद्रोहाची शिकवण देते. या कवितेने चळवळीतील संघर्षाची दीक्षा दिली आहे.

आंबेडकरी विचारांची कृतिशीलता हाच या देशातील परिवर्तनाचा पाया आहे असा ठाम विश्वास या कवितेने व्यक्त करून देशाबद्दलच्या पारंपरीक संकल्पना नाकारून 'आंबेडकर भारत' ही नवी संकल्पना अधोरेखित केली आहे. वैचारिक अंतर्विरोधाचे स्वरूप स्पष्ट करून भारताला पुन्हा प्रकाशमान करावयाचे असेल तर बुद्धाचा मार्ग स्वीकारणे अटळ आहे अशी स्पष्ट भूमिका बागूलांच्या कवितेने मांडली आहे.

✹ वामन निंबाळकर (१९३९- २०१०)

वामन निंबाळकर हे दलित कवितेच्या पहिल्या फळीतील महत्त्वाचे कवी. सामाजिक चळवळीत सक्रीय सहभाग. काही काळ त्यांनी 'अस्तितादर्श'चे सहाय्यक संपादक म्हणून काम पाहिले. वैचारिक लेखनही केले आहे. १९७३ मध्ये त्यांचा **गावकुसाबाहेरच्या कविता** हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आणि बहुचर्चित ठरला. काव्यसंग्रहाचे शीर्षकही अतिशय सूचक असे आहे.

मराठी साहित्याच्या परंपरेने दलित जीवन हा आपल्या साहित्याचा विषय कधीही केला नाही. दलित दु:खाचे चित्र मराठी कवितेत पाहावयास मिळत नाही. साहित्याच्या इतिहासातही दलित हा अलक्षित विषय राहिला आहे. ही वेदना प्रकट करण्याचे कार्य निंबाळकरांच्या कवितेने पार पाडले आहे. शब्दप्रभूना त्यांनी सवाल केला आहे.

शब्दप्रभूनो! तुम्ही रचलीत महाकाव्ये सोन्याचा घास खाणारांची
वाऱ्यासोबत चालणारांची भरजरी वस्त्र नेसणारांची
आकाशात राहणारांची
चांदण्यात न्हाऊ घातली तुम्ही तुमची कविता
भिजू घातलेत शब्दांचे ढिग पानात, फुलात, सुंगधात, मदिरेच्या कैफात
ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले, चिरडलेले जीवन
विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा

गावकुसाबाहेरचे, दलित शोषितांचे जग आणि जगणे हा पांढरपेशा लेखक कवीच्या साहित्याचा विषय झाले नाही कारण उपेक्षित जगाबद्दल त्यांना आस्था नव्हती. म्हणून नेमका प्रश्न पांढरपेशा परंपरेला विचारला आहे. शब्दाचे सामर्थ्य काय असते याचे नेमके भान निंबाळकरांना आहे.

शब्दानीच पेटतात घरे, दारे, देश आणि माणसेसुद्धा
शब्द विझवतात आगही शब्दांनी पेटलेल्या माणसाची
शब्द नसते तर पडल्या नसत्या डोळ्यातून आगीच्या ठिणग्या
वाहिले नसते आसवांचे महापूर
आले नसते जवळ कुणी गेले नसते दूर-शब्द नसते तर

येथे शब्दाची ताकद जशी प्रत्ययाला येते तशीच मध्यमवर्गीय पांढरपेशा लेखक कवींची मर्यादाही स्पष्ट होते.

कारण त्यांनी आसवांची गाणी लिहीली नाही. अशा परंपरेला नाकारणारी प्रखर जाणीव निंबाळकरांच्या कवितेने व्यक्त केली आहे. गावकुसाबाहेरचे जीवन हा कवितेचा मुख्य विषय आहे. या जीवनाचे विदारक चित्रण केले आहे. अस्पृश्यता, जातियता, स्त्रियांवरील अन्याय अत्याचार, शोषण, वेदना या सर्व विषयांना मुखरीत करीत ही कविता शोषक व्यवस्थेचा सांस्कृतिक इतिहास कथन करते. या कवीची संवेदनशीलता पशुपातळीवरच्या दरिद्री जगाचे दर्शन खालीलप्रमाणे घडविते

उन्हाळ्या-पावसाळ्याच्या पखाली रिचवत होतो
तरी आयुष्यभर पेरलेलं दारिद्रयच उगवत गेलं

पखाली वाहण्याचे काम जनावराचे असते येथे ते माणसाच्या वाटयाला आले आहे. हा असंगत अनुभव आहे. उन्हाळे पावसाळे म्हणजे जीवनाची वाटचाल, सुखदु:ख असा अर्थ व्यवहारिक जीवनात रुढ आहे. दु:खाचेच ओझे वाहण्यात आयुष्य गेले. आयुष्यभर ढोरासारखे राबून केवळ दारिद्रयच वाटयाला आले. ही प्रातिनिधिक अनुभूतीची अभिव्यक्ती आहे. या जगण्याच्या प्रवासात सोबतीला दारिद्रय जसे होते तसेच असुरक्षितता, असहाय्यता, अगतिकता आणि अन्यायही होता.

माझ्या हदयात मी जपून ठेवली पडकी घरे, कौलारू झोपड्या
फुटलेल्या मातीच्या घागरी, भांडी..
फाटलेली अनंत हदये
कानाचे पडदे फाडणारे मायबहिणींचे आक्रोश
चिमण्या बाळांच्या किंकाळ्या, चिरत गेलेले बापाचे चेहरे

गावकुसाबाहेरचे हे अगतिक जगणे म्हणजे कवीच्या हदयातील दु:खाचे भांडारच होय. जगण्याची कोणतीही सुरक्षितता नाही. आयाबहिणीची अब्रू सुरक्षित राहू शकत नाही असे हे जगणे.

पाय मृत्यूच्या दारात आहे थांबून सरण
तिरडीशी टांगलेले इथे सदाचे मरण

मृत्यू कधी ओढवेल याचा नेम नाही. माणसाचे चेहरे करपलेले आहे, मनं दुभंगली आहेत, सारे जीवनच दुष्काळून गेले आहे आणि सर्वत्र अंधार पसरलेला आहे. बहिष्कृतांचे जग हे अंधार पचवून आणि दु:खाचे ओझे पाठीवर घेऊन उभे आहे.

सारे जीवन दुष्काळून ठेवलेले वेशीबाहेरच्या माणसांचे
काळासारखे माणसानेच
पाठीवरची बिऱ्हाडं त्यांची विंचवासारखी
नजरेत त्यांच्या ओल आलेली भूकेने / रस्ते अनेक वाटांनी चहूकडे जाणारे
उन्हे शीळ घालीत गात आहेत मृत्यूचे गाणे
फरगुटातून, चिंधीतून लोंबत आहे कातडी होरपळलेली
त्यात चिपाड झालेले तान्हे, कुटुंबाचा कर्ता कंबरेत मोडलेला झाडागत
भरदिवसा पाहतो काजव्यांचे थवे, काळोखात बुडालेली राने

येथे जगण्याचा संबंध काळोखाशी आहे. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर तसा या जीवनातील संसार. भूक भागण्याची शक्यता नाही. चारी दिशांना अनेक पायवाटांनी भटकणारी पावले आणि इथले उन्हे जणू मृत्यूचेच गाणे गात आहे. अंगावर धड वस्त्र नाही म्हणून लक्तरलेल्या वस्त्रातून होरपळलेली कातडी लोंबकळताना दिसते. लेकराबाळाच्या देहाचे चिपाड झालेले आहे. कुटुंबाचा कर्ता विकलांग आणि हतबल आहे. वेशीबाहेरच्या जगाचे हे विदारक चित्र कवीने रेखाटले आहे. हे जग अभावाच्या काळोखात बुडाले आहे. कोणत्याही ऋतूत येथील जगण्यात काडीभरही फरक पडत नाही.

गोधड्या लपेटतात येथल्या थंडीला / उन्हात वाळते कातडे अंगाचे

पावसाळा कोसळतो अंगावर आणि चिखल रुततो झोपड्या झोपड्यामधून

गोधडीच्या सहायाने थंडीपासून बचाव करू पाहणाऱ्या, उन्हाने कातडी भाजून काढणाऱ्या आणि कोसळणारा पाऊस अंगावर घेणाऱ्या, थोडक्यात उघड्यावर जीवन कंठणाऱ्या जगाचे चित्र येथे साकार झाले आहे. येथे सारा जन्म घामाने भिजूनही हुंदक्यासोबत घास गिळताना हात मात्र कोरडाच आहे. नुसत्या भाकरीसाठी चाकरीचे दान जन्मासोबत वाटयाला आले आहे. सांस्कृतिक भोवतालाची, दु:खाची भव्यता दर्शविणारी प्रतिमा या कवितेने साक्षात केली आहे.

इवल्याशा त्यांच्या नजरेत दु:खाचे
डोंगराएवढे बुब्बुळ वळवळत असते
असे हे रक्तहीन चेहरे वाहताहेत अनंत काळापासून

'दु:खाचे डोंगराएवढे बुब्बुळ' ही दु:खाची वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा आहे. या दु:खाचे प्रवाहीपण 'रक्तहीन चेहरे वाहताहेत अनंत काळापासून' अशाप्रकारे प्रकट झाले आहे. शरीरात कोणतेही सत्व न उरलेल्या माणसाच्या दु:खाला काळाचे परिमाण प्राप्त करून देऊन दु:खाची भव्यता आणि सार्वकालीक दु:खाचे प्रवाहीपण मुखरीत होते.' 'अबलांच्या डोळ्यांत आसवांचे महापूर', 'अंधाराचे साम्राज्य यांच्या उशा-पायथ्यांशी', 'चिरगुटातील वात्सल्य चिपाड झालेले' या अवतरणातील प्रतिमांमधून स्त्रियांचे दु:ख, अंध:कारमय जगणे, बालकांचे हाल अशा वास्तवाचे रूप स्पष्ट होते. या देशातील जातीवास्तव एवढे भीषण होते की अस्पृश्यता आणि विटाळ या गोष्टींनी विद्यादानाची क्षेत्रेही सोडली नाहीत.

कळत नव्हते तेव्हाच कळले आपली खालची जात
बापाला मारली होती लाथ पाटलाने आईला शिवी
शाळेची पायरी चढलो तेव्हाही कळले आपली खालची जात
मी बसायचो बाहेर सारेच बसायचे आत
जात कशी असते कोठे असते
सारेच प्रश्न धुरासारखे तरंगत जातात
आणि विचारांची तडफडत असते वात

जातियतेच्या भीषणतेचा येथे प्रत्यय येतो. अस्पृश्य जातींचा शारिरीक आणि मानसिक छळ कसा अमानुषपणे केला जात होता याचाही प्रत्यय येतो. शाळा हे विद्येचे मंदिर आहे असे मानले जाते.विद्यादानासारखे पवित्र कार्य येथे पार पाडले जाते. मात्र त्याऐवजी अस्पृश्यता मजबूत करण्याचे कार्य इथे पार पाडलेले दिसते. त्यामुळे ज्ञानदानाची ठिकाणे ही ज्ञानदानाऐवजी अस्पृश्यता मजबूत करण्याची ठिकाणे बनली आहेत. या सर्व गोष्टींना इथला धर्म, धर्मग्रंथ, मनुस्मृती या गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत. मनुस्मृती म्हणजे वर्णव्यवस्थेने निर्माण केलेल्या निर्बंधाची कायदेसंहिताच मानली जाते. शूद्राने विद्या हस्तगत करण्याचा किंवा चोरूनही ऐकण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या कानात तप्त शिसे ओतण्यात यावे अशी शिक्षा मनुस्मृतीने सांगीतली आहे. हजारो वर्षे हे चालत आले आहे. 'कित्येक वर्षांचा अंधार माझ्या कानात ओतलेला.' अशाप्रकारे मनुस्मृतीचा संदर्भ या कवितेने जागविला आहे.

मनुच्या वारसदारांनो! हजारो वर्षांपासून पाहताहोत आम्ही
नग्न सायंवेळा आमच्याच.....
आमच्या डोळ्यातील महापूर पाहून
आजवर तुम्ही टाळ्या पिटल्या अत्यानंदाने
कुणाचीही झाली नाहीत एवढी बेचिराख केली आमची मने
ज्याला नाही अंत.

अन्याय आणि शोषणाची परंपरा कवीने सूचित केली आहे. अन्यायी परंपरेची अमानुषता, आसुरीपणाची प्रवृत्ती येथे स्पष्ट केली आहे. सहनशिलतेचा अंत झाला की विद्रोहाची निर्मिती होत असते.

आमच्यातील प्रचंड शक्तीने पेट घेतला आहे
त्याचा होणार आहे स्फोट
तराटून फुगलेत आमचे स्नायू
जे बोलताहेत आमच्यातील स्वत्वाची भाषा
ते सारे एकत्र येणार आहेत आणि गर्जणार आहेत
जयजयकार क्रांतीचा, माणुसकीचा.

अशाप्रकारे विद्रोही कृतिशीलतेवर ही कविता उभी आहे. उद्याचा इतिहास आमचा असेल अशी ग्वाही या कवितेने दिली आहे.

जळालेले आयुष्य पुन्हा निखाऱ्यासारखे फुलवायचे
म्हणून प्रकाशाची पायवाट मी जवळ केली आहे
आता मला जाळणारे, त्याच मार्गाने जाणार असतील
तर त्यांच्या आयुष्याची राख आढळेल त्यांना

असा इशारा या कवितेने दिला आहे. अशाप्रकारे वेदनेतून निर्माण झालेल्या विद्रोहाची अभिव्यक्ती या कवितेने केली आहे. समूहाच्या वतीने बोलणारा हा कवी आपल्या 'माय'चे कारुण्यपूर्ण चित्र उभे करतो. आजवरच्या मराठी कवितेतील आईपेक्षा या 'माय'चे रंगरूपच वेगळे आहे.

अंधाराला चिरत जेव्हा एक सावली जड येई
डोई तिच्या भार असे चालताना तोल जाई
काळी काळी कृश देह ती असे माझी माय
वणवण सकाळपासून मोळीसाठी रानात जाय

काळाकृश देह असणारी ही माय कष्ट आणि कारुण्याचे प्रतीक आहे. सर्पदंशाने मायचा मृत्यू होतो.कवी मायला पारखा होतो. कवीच्या वाटयाला उदासी येते. त्याची अस्वस्थ मनस्थिती आपल्या मायला मोळी विकणाऱ्या स्त्रियात शोधण्याचा प्रयत्न करते.

शाधते माझी नजर माय, आता मी उदास होतो
दिसता कृश मोळीवाली मोळी तिची विकत घेतो

समस्त मोळीवाल्या स्त्रियात आईची प्रतिमा पाहणारी आणि त्यांच्या मोळ्या विकत घेऊन मायच्या कष्टाला अर्थपूर्णता प्राप्त करून देणारी कवीवृत्ती येथे प्रकट झाली आहे.

थोडक्यात, वामन निंबाळकर यांच्या कवितेने शब्दाचे सामर्थ्य स्पष्ट केले आहे. चळवळीने घडविलेल्या जाणिवेतून आलेली जीवनवादी जबाबदारी पार पाडली आहे. पारंपरीक मराठी कवितेला प्रतिक्रियात्मक नकार दिला आहे. सामाजिक घटकांना नाकारणाऱ्या अभिव्यक्तीला नकार देणारी जाणीव व्यक्त केली आहे. गावकुसाबाहेरच्या अभावग्रस्त जगाचे वेदनादायी आणि विदारक चित्र रेखाटले आहे. सांस्कृतिक भोवतालाची, दु:खाची भव्यता दर्शवणारी प्रतिमा साक्षात केली आहे. प्रस्थापित व्यवस्थेबददल घृणा आणि चिड व्यक्त करून विद्रोही कृतिशीलता स्पष्ट केली आहे. वेदनेतून निर्माण झालेल्या विद्रोहाची ही अभिव्यक्ती आहे. मायचे कारुण्यपूर्ण चित्र उभी करणारी ही कविता वाचकांना अस्वस्थ करणारी आहे. उद्याचा इतिहास आमचा असेल असा आशावादही व्यक्त केला आहे. उजाडणाऱ्या प्रकाशमान दिवसाचे स्वप्न साकार करणारा आशावाद प्रकट झाला आहे.

✸ दया पवार (जन्म १५ सप्टेंबर १९३५- मृत्यू २० सप्टेंबर १९९६)

नामदेव ढसाळांच्या कवितेने धगधगत्या विद्रोहाने पेटलेली कविता दलित कवितेच्या प्रांतात दाखल केली आणि

अनेक प्रतिभा लिहित्या झाल्या. विविधांगी आविष्कार सिद्ध होऊ लागला.त्यापैकी दया पवार हे अत्यंत महत्त्वाचे कवी होत. 'गोलपिठा'च्या पाठोपाठ दया पवारांचा **कोंडवाडा** (१९७४) दाखल झाला आणि दलित कवितेत दलित जगाची कोंडी फोडणारा, दलित दु:खाला वाचा फोडणारा, घुसमटीला आणि विद्रोहाला वाट मोकळी करून देणारा आविष्कार कोंडवाडा'च्या माध्यमातून सिद्ध झाला. समूहाचे दु:ख सोबतीला घेऊन, समूहाला सोबत घेऊनच कविता बोलकी झाली.

तसा मी एकटा नाही, सोबतीला घनघोर अंधार
परंपरागत मुडदे गोठलेले, जीवघेणा नासलेला अंधार

भोवतालाच्या व्याधीग्रस्त वास्तवासह परंपरेचे सडकेपण येथे समूहाच्या अंधाऱ्या पार्श्वभूमीवर स्पष्ट होते. सांस्कृतिक पर्यावरण दुषित करणाऱ्या कारणपरंपरांचा शोध हा आत्मशोध असतो. दया पवारांच्या कवितेने हा आत्मशोध घेतला आहे. माणसाला गुलामीच्या कोंडवाड्यात कोंडणाऱ्या व्यवस्थेच्या कारनाम्याचा शोध घेतला आहे. त्या अनुषंगाने दलित जीवनाच्या, जगण्याच्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. इथल्या महान संस्कृतीच्या संदर्भातही अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

हे महान देशा, किती दिवस चालणार तुझा पंक्ती-प्रपंच?
आम्ही राहतो गावाबाहेर यात आमचा काय दोष?...
देशाबाहेर तर रहात नाही ना?
तुला महान तरी कसे म्हणावे
पायाखालचे जळीत न पाहता निरोसारखा सारंगी वाजवीत
हिमालयाचे गोडवे गातोस

दिव्याखाली अंधार असतो त्याप्रमाणे बुडाखाली, तळाला दाहकतेने भाजणाऱ्या समाजजीवनाचे भान न ठेवता केवळ शिखरावरच्या प्रदर्शनिय गोष्टीचे गोडवे गात बसावे तसे या देशाने केले आहे. रोम जळत असताना निरो फिडल वाजवीत बसला होता.ही अमानुष आणि जखमेवर मीठ चोळणारी कृती आहे. असा कृतघ्नपणा या देशाने केला आहे. त्यामुळे या देशाला महान का म्हणावे असे प्रश्नचिन्ह या कवितेने देशासमोर लावले आहे. 'कोंडवाडा' हे गुलामीचे प्रतीक आहे. कोंडवाडा हा गुरांसाठी, जनावरांसाठी असतो.हा कोंडवाडा व्यवस्थेने माणसाच्या संदर्भात निर्माण केला आहे.

आज विषाद वाटतो, कशा वागविल्या मणामणाच्या बेड्या
गाळात हत्तीचा कळप रुतावा तशा, ध्येय आकांक्षा रुतलेल्या
शिळेखाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा
किती जन्माची कैद, कुणी निर्मिला हा कोंडवाडा

जन्मोजन्मी, युगानुयुगे ज्या मानवी समूहाला जनावराच्या पातळीवरचे अमानुष जीवन जगावे लागले, त्यांचे आयुष्य म्हणजे तुरुंगच होता चोहोबाजूनी त्याची कोंडी करण्यात आली होती. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवनाच्या सर्वच क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे जगण्याचे अधिकार शूद्रातिशूद्राला, दलिताला नव्हते अशा जगाचे दु:ख 'कोंडवाडा' या प्रतीकातून स्पष्ट झाले आहे. समूहजीवनाच्या तुरुंगवाण्या जगण्याचा निर्देश या प्रतीकातून होतो. या तुरुंगवाण्या जगण्यात गुलामीची अनेक प्रतीकं अस्पृश्यांच्या गळ्यात बांधली, हातात दिली. त्यापैकी एक 'खुळखुळ्याची काठी'

वस्त्रहरण केलेली खुळखुळ्याची काठी
हाटाहाटात नागवली
आता तरी पुढे हो, नागवलेल्या काठीला
फाडून लाव आभाळाचा तुकडा

गावकामगार किंवा यसकराच्या आगमनाची सवर्णाला चाहूल लागावी यासाठी ही खुळखुळ्याची काठी होती.

अस्पृश्य हा गावकामगार होता. अस्पृश्याचा स्पर्श म्हणजे विटाळ. हा विटाळ होऊ नये म्हणून गावकामगाराच्या हातातील काठीला खुळखुळे किंवा घुंगरू बांधलेले असायचे. काठी जमिनीवर आपटल्यानंतर खुळखुळ्याच्या आवाजामुळे गावकामगार किंवा अस्पृश्य आल्याची वर्दी मिळाल्यामुळे सवर्णाला अस्पृश्यांच्या विटाळापासून सतर्क होता यावे यासाठी केलेली सोय म्हणजे ही खुळखुळ्याची काठी होय. ती दलितांच्या, अस्पृश्यांच्या अब्रुचे धिंडवडे काढणारी होती. म्हणून या गुलामीच्या विरोधात विद्रोह करण्याची जाणीव वरील कवितेत व्यक्त झालेली दिसते.

आंबेडकरोत्तर काळातील अस्वस्थ मानस, अन्याय अत्याचारामुळे उफाळून आलेली युद्धमानता, या युद्धमानतेतून विद्रोहाला मोकळी करून दिलेली वाट असे दया पवारांच्या कवितेचे स्वरूप प्रत्ययाला येते. महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कवितेने वर्तमानकालीन अन्याय अत्याचाराचे स्वरूप स्पष्ट करताना मिथकाचा उपयोग केला आहे.

लोकहो! अमानुषता शिगेला पोहचली आहे
नागभूमीत तुमची अस्मिता डिवचली आहे
कोंब फुटलेल्या हिर्व्यागार झाडासह / कोवळा लुसलुशित अंत्यज पोर
भडकत्या चितेत बळी देत आहेत
भर हाटात कैक दु:शासन / आयाबहिणीच्या निरेला झोंबत आहेत
अचूक शरसंधान करणारा तुमचा एकलव्य
आजही त्याचे हात कलम होत आहेत

अस्मिता डिवचणे, अस्पृश्यांच्या घरांना आग लावणे, आयाबहिणीची विटंबणा करणे इत्यादी स्वरूपाचे समकालीन जीवनातील अत्याचाराचे स्वरूप येथे स्पष्ट होते. नागभूमी हा बौद्धांचा प्रदेश आहे. त्यामुळे नागभूमी हा नवा मिथकीय अर्थ आहे. भडकत्या चितेत बळी देणे या कृतीमुळे खांडववनाचे संदर्भ जागृत होतात. इतिहासकाळातील 'नाग' हे श्रमण संस्कृतीचे पुरस्कर्ते आणि कट्टर बौद्ध होते. नाग हे अनार्य होते. ब्राह्मण हे आर्य, आर्यांच्या संस्कृतीचे वाहक होते. हा संघर्ष चित्रित करताना दया पवारांच्या कवितेने समकालीन सूडसत्र अणि अन्यायी वास्तवाचे प्रकटीकरण केले आहे.

खांडववन जाळणारे तुमचे पिढीजात हात
आजही तुम्ही पारंगत वडवानल पेटविण्यात..
सभोवती रोम जळते, सारंगी छेडीत आजही गातो
पोथीनिष्ठ धर्मपिठावर परंपरागत तुमचा निरो..
महाभागांनो! असे का होते कधी कुणाचे नि:संतान!
आजही वाढती तक्षक मातेमातेच्या गर्भागर्भात

खांडववनात नागांना जाळण्यात आले.बौद्धांना जाळण्याची परंपरा आजही कायम आहे हे वरील कवितेतून सूचित होते. 'तक्षक' हा नागगणाचा प्रमुख होता.तक्षकाने अर्जुनाच्या वंशातील परिक्षित राजाला दंश करून ठार मारले.परिक्षिताचा पुत्र जनमेजय याला आपल्या पित्याच्या मृत्यूचे वृत्त मंत्र्याकडून समजल्यानंतर त्याला तक्षक आणि समग्र नागकुलाविषयी अत्यंत क्रोध आला.त्याने तक्षक कुलाच्या संहारासाठी सर्पसत्रच सुरू केले. या सत्रात तक्षकाची अठरा कुले नष्ट झाली'[२६] वरील कवितेत वर्तमान अत्याचाराची दाहकता, सूडसत्राची भीषणता आणि तक्षकाची चिवट जिद्द या गोष्टींचा प्रामुख्याने प्रत्यय येतो. खांडववन, तक्षक या मिथकातून 'नाग' आणि 'ब्राह्मणांचा'चा संघर्ष चित्रित झाला आहे. या संघर्षात नाग, तक्षक हे बळी आहेत. दलित कवितेने हा संघर्ष तक्षकाच्या बाजूने उभा करून सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी केली आहे. समकालीन संदर्भातही खांडववन पेटवणारी प्रवृत्ती जिवंत असल्याचे प्रत्ययाला येते. या पार्श्वभूमीवर 'आजही वाढती तक्षक मातेमातेच्या गर्भात' हे तक्षकाचे मिथक समकालातील लढाऊ समूहाचे, अत्याचार करणाऱ्यांचे निर्दालन करण्यासाठी उदयाला येणाऱ्या संघर्षशील जाणिवेचे निदर्शक आहे. दया पवारांच्या कवितेने बुद्ध वाङ्मय आणि संस्कृतीतील मिथकांनाही नवा आशय प्राप्त करून दिला आहे.

हे सिद्धार्था, तुला समजले का रे
चंबळ खोऱ्यात दरोडेखोरांच्या हदयपरिवर्तनाची प्रक्रिया चाललीय
अन् इकडे सुसंस्कृत जगात
व्हाईट कॉलरची अमानुषता शिगेला पोचलीय
तुझे आनंद आणि सारिपुत्त
बघ, बघ कुणाच्या वळचणीला लागलेयत
तू कर्दनकाळ अशा अंगुलीमालास चळाचळा कापायला लावलेस
आम्ही तुझे छोटे अनुयायी
या अक्राळविक्राळ अंगुलीमालास कसे बरे सामोरे जावे
हे सिद्धार्था, आम्ही जर तुंबळ अराजक केले तर
आम्हाला समजावून घे.. आम्हाला समजून घे

चंबळचे खोरे हे दरोडेखोर आणि डाकूंसाठी प्रसिद्ध आहे. अंगुलीमाल हा भयंकर क्रुर डाकू होता. क्रौर्याची सीमा गाठणारा हा अंगुलीमाल बुद्धाला शरण गेला. बुद्धाचा स्वीकार त्याने केला. त्याच्या क्रौर्याचे अहिंसेच्या आचरणात रूपांतर झाले. समकालीन जीवनात दरोडेखोराच्या हदयपरिवर्तनाची प्रक्रिया सुरू आहे मात्र सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जगात अमानुषता शिगेला पोहचली आहे. आज अंगुलीमाल प्रवृत्ती उफाळून आली आहे. मात्र तिच्या क्रौर्याला अहिंसेत रूपांतरीत करणारा बुद्ध नाही. ''आनंद हा बुद्धाचा पंचवीस वर्षे स्वीय सहायक होता. बुद्धाचा प्रत्येक उपदेश आनंदने ऐकला होता. त्याच्या प्रचंड स्मृतीत सर्व धार्मिक प्रवचने साठवली होती. सारिपुत्त हा प्रज्ञेमध्ये सर्वश्रेष्ठ होता. तो धर्मसेनापती होता.''[२७] बुद्धाची विचारसुत्रे आणि तत्त्वे ज्यांनी आपल्या स्मृतीत साठवली होती असा आनंद आणि सर्वश्रेष्ठ प्रज्ञावंत सारिपुत्त या दोघानीही आजच्या संदर्भात वाममार्गानेच वाटचाल सुरू केली आहे. अशा विपरिताचे दर्शन या कवितेने घडविले आहे. अपेक्षा आणि आचरण यामध्ये दरी निर्माण झाली आहे. यावरचे भाष्य या कवितेने केले आहे. त्यामुळे आनंद, सारिपुत्त, बुद्ध या मिथकांना नवा अर्थ प्राप्त झाला आहे. यावरून असे म्हणता येईल की दया पवारांची कविता मिथकीय अंगाने समकालीन जीवनाची मीमांसा करते. हा तिचा खास विशेष आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कवितेने आपल्या समाजाला भोगाव्या लागणाऱ्या व्यथांची कारणमीमांसा केली आहे. या देशात उपेक्षित जगात जन्मास येऊनही आपल्या जगाचे भान इथल्या महाकवीला कसे आले नाही? असा मूलभूत प्रश्न विचारला आहे.

क्रौंच पक्ष्याची हत्त्या पाहून / तुझे कारुणिक मन आक्रंदून उठले
तुझा जन्म झाला गावाबाहेर / उपेक्षित वस्तीत .. जिथे दु:खच जन्मले..
तुझ्याच रक्ताचा एखादा शंबूक / तटतटून संतापाने पेटून उठला
रामराज्याची स्तुती गाणाऱ्या हे महाकवी ...
तुला महाकवी तरी कसे म्हणावे!
हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास...
...तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते

क्रौंच पक्ष्याची हत्त्या पाहून वाल्मिकीचे मन आक्रंदून उठले आणि त्या उद्विग्नतेतून रामायणासारखे महाकाव्य रचले असे म्हटले जाते. या महाकाव्यातून रामराज्याची स्तुती गायीली गेली. या महाकवीचा जन्म जर गावकुसाबाहेर झाला होता तर त्याला गावकुसाबाहेरच्या जगाचे दु:ख का दिसले नाही. गावकुसाबाहेरच्या जगाचा प्रतिनिधी 'शंबुक' विद्रोहाने पेटून उठतो. रामाकडून त्याची कत्तल केली जाते. आपल्या जगात निर्माण झालेल्या दु:खाच्या विरोधात एकही शब्द वाल्मिकीला लिहावासा वाटला नाही? बहिष्कृतांच्या जगाला वाल्मिकीच्या शब्दाने स्पर्श का केला नाही? अशा कवीला महाकवी का म्हणावे? असा मूलभूत प्रश्न उपस्थित करून या महाकवीला नाकारले आहे. चलतबुद्धाच्या प्रतीकाची

निर्मिती हाही दया पवारांच्या कवितेचा खास विशेष म्हणता येईल.

मी तुला असे कधीच पहात नाही
जेतवनात डोळे मिटून बसलेला ध्यानस्त पद्मासनातला
अथवा अजंठा वेरुळच्या लेण्यात दगडी ओठ शिवलेला
शेवटी निद्रा घेत असलेला
मी तुला पाहतो चालता बोलता
दीन दुबळ्यांच्या दु:खावर फुंकर घालणारा
जीवघेण्या काळोखात हाती मशाल घेत
झोपडी झोपडीकडे जाणारा
संसर्गजन्य रोगासारख्या नरडीचा घोट घेणाऱ्या दु:खाचे
नवे अर्थ सांगणारा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धधम्म स्वीकारताना ध्यानस्थ बुद्धापेक्षा, चालणाऱ्या बुद्धाची प्रतिमा पूज्य मानली आहे. कारण दृढनिश्चयाने दलितांनी प्रयत्नशील राहावे, स्वत:ला बदलावे, अंधश्रद्धा विसराव्यात व कर्तृत्वाने स्वत:ला सिद्ध करावे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. म्हणून या कवितेतील प्रतीकीकरण हे चलतबुद्धाच्या संदर्भात झाल्याचे पाहावयास मिळते. बुद्धाच्या ध्यानस्त, शिल्पित, निद्रिस्त रूपाऐवजी चलत रूपातील बुद्धाच्या कृतीउक्तीकडे कवीने पाहिले आहे. म्हणून वेगळ्या रूपातील बुद्धाचे प्रतीक साकार झाले आहे. बुद्धाकडे पाहण्याच्या परंपरागत वृत्तीपेक्षा आंबेडकरी जाणिवेची दृष्टी येथे प्रकट झाली आहे. म्हणून चलतबुद्धाचे प्रतीक सिद्ध झाले आहे.

प्रतीकात्मता हा ठळक विशेष 'कोंडवाडा'मधील कवितेत पाहावयास मिळतो. 'कोंडवाडा'तील कविता हा दलितांच्या दु:खाचा प्रातिनिधिक स्वर आहे. मुकाटपणे सोसाव्या लागलेल्या दु:खाचे आक्रंदन या अभिव्यक्तीतून प्रत्ययाला येते. व्यवस्थेने निर्माण केलेल्या कोंडवाड्यात जनावरागत जगाव्या लागणाऱ्या मानवी दु:खाचे हे आविष्करण आहे.

दु:खाने गदगदताना हे झाड मी पाहिलेले
तशी याची मुळे खोलवर बोधीवृक्षासारखी
बोधीवृक्षाला फुले तरी आली
हे झाड साऱ्या ऋतूत कोळपून गेलेले
धमनी धमनीत फुटू पाहणाऱ्या यातना
महारोग्याच्या बोटासारखी झडलेली पाने
हे खोड कसले! फांदी फांदीला जखडलेली कुबडी
मरण येत नाही म्हणून मरण कळा सोसणारे
दु:खाने गदगदताना हे झाड मी पाहिलेले

दु:खाच्या संदर्भात रूपकात्मक मांडणी कवीने केली आहे. कोणत्याही ऋतूत कोळपून जाणारे, धमनी धमनीत यातना फुटणारे, महारोग्याच्या बोटासारखी झडलेली पाने, फांदीला जखडलेले कुबडी या सर्व बाबीतून झाडाचा खिळखिळेपणा, यातनेने घेरलेली विदृपता प्रत्ययाला येते. मरण येत नाही म्हणून मरण कळा सोसणे हे अधिकच वेदनादायी आहे. दु:खाने गदगदण्याची तीव्रता त्यामुळे अधिकच वाढत जाते. या दु:खाची मुळे खोलवर रुजलेली आहेत हे कवीला आवर्जुन सांगायचे आहे. एकूण जगाव्या लागणाऱ्या दु:खाने भारलेल्या जीवनाचे सूचन या रूपकात्मक मांडणीतून झाले आहे. विद्रोह आणि नकाराच्या बाबतीत दया पवार अतिशय संयतपणे मांडणी करतात असे दिसून येते. मात्र विद्रोह ही सातत्यशील प्रक्रीया आहे, ती न संपणारी प्रक्रिया आहे हे दया पवार खालीलप्रमाणे सांगतात-

तुम्ही कोणत्याही कड्यावरून फेका

पंजाखालची माती सुटणार नाही
तुम्ही कोणतेही लेबल लावा
धुमसणारा जाळ विझणार नाही

'धुमसणारा जाळ' हे अग्नीप्रतीक मुक्तीसाठी कराव्या लागणाऱ्या विद्रोही कार्यकृतीची सूचना देणारे आहे. अंधारावर मात करण्यासाठी तेजाची अनिवार्यता येथे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे संघर्षाचा चिवटपणा, जिद्दीपणाही सूचित होतो. दया पवारांची बहुतांश कविता ही प्रतिमा प्रतीकाच्या भाषेत अधिक बोलणारी आहे. चळवळीतील अनेक घटनाप्रसंग त्यांच्या कवितेतून प्रतिकात्मतेने साकार झाले आहेत. उदा

डोक्याला कफन बांधून
तू काळाराम सत्याग्रह लढलेला
एखाद्या तीरासारखा मैदानात उतरलेला
आपल्या आईच्या निरेस हात घालताना
तुझ्या डोळ्यातील धगधगता अंगार मला दिसतोय रे
आम्ही केवळ कागदी ठराव आभाळात भिरकावीत
पतंगासारखी काटछाट करीत बसलो

अन्यायाच्या विरोधात आक्रमक वृत्ती हा या कार्यकर्त्याचा वृत्तीविशेष आहे. चळवळीतील कृतीशील विद्रोहाचे ते प्रतीक आहे. दुसरीकडे एका वेगळ्या प्रवृत्तीचाही येथे निर्देश झाला आहे. ती कागदी ठराव आभाळात भिरकावणारी थंड प्रवृत्ती आहे. त्यातून चळवळीतील अंतर्विरोधही सूचित होतो. या कवितेने विद्रोही-आक्रमक आणि थंड-कुचकामी अशा अंतर्विरोधी प्रतीकांचे दिग्दर्शन केले आहे.

थोडक्यात, दया पवारांच्या कवितेने दलित कवितेला प्रतिमा, प्रतीके आणि मिथकांचे मोठे योगदान दिले आहे. दस्यूचा अबलख घोडा, चातुर्वर्ण्याचा पाणवठा, मनूची अजस्त्र भिंत, पेरता सुरुंग, पडीचे जीणे, इंगळ वेचणारा फिनिक्स, अश्मयुगाचा घनदाट काळोख, मरणाचे तोरण, कळ्यासारखे खुडलेले पाय, सोन्याच्या काडीने दात कोरणारा शत्रू, दुःखाने गदगदलेले झाड या आणि इतर अनेक प्रतिमा दलित कवितेत नव्यानेच दाखल झाल्या. नागभूमी, कोंडवाडा, खुळखुळ्याची काठी, निरो, क्रुस, बुद्ध ब्रोकन मेन यासारखी प्रतीके आणि एकलव्य, शंबूक, अंगुलीमाल, आनंद, सारिपुत्र, तक्षक यासारखी मिथके यांचे उपयोजन या कवितेत झाले आहे. सोबत अनेक वाक्प्रचार म्हणीचाही यथोचित वापर आपल्या कवितेत पवारांनी केला आहे.

✸ त्र्यंबक सपकाळे जन्म २२ एप्रिल १९३०

त्र्यंबक सपकाळे यांची कविता अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरली आहे. त्यांनी आपला तिकीटचेकरचा व्यवसाय सांभाळून दलित कवितेला मोठे योगदान दिले आहे. **सुरुंग** हा त्यांचा कवितासंग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. या कवितासंग्रहाच्या मनोगतात कवीने लिहिले आहे, ''मराठीतील बरेचसे साहित्य वाचले, पण रमलोच नाही. झपाटलो नाही. माझ्या वेदनेचा सूर मला कुठे गवसलाच नाही. मी लहानपणी जे अनुभवले, माझ्या बांधवांनी जे भोगले ते अजून- माझे वय वाढले तरी- तसेच आहे. जिवंत माणसाचे दुःख पाहताना हातातील ग्रंथ गळून पडतात. अन्याय, बलात्कार, नरबळी, अस्पृश्यता यांनी भरलेले वर्तमानपत्रातले रकाने वाचून बेचैन होतो. स्वातंत्र्याचे पावशतक लोटले तरी मी तिथेच आहे''[२८] मी तिथेच राहणार का? असा प्रश्न कवीने उपस्थित केला आहे. स्वातंत्र्यानंतरही दलितांवरील अन्याय अत्याचार, स्त्रियांची अवहेलना, अस्पृश्यता या सर्व गोष्टीमुळे वाटयाला आलेली बेचैनी, अस्वस्थता वरील मनोगतातून व्यक्त झाली आहे. त्या विषयींच्या चिंतनातून एक स्फोटक आविष्कार सुरुंगमधील कवितेत झाला असे प्रत्ययास येते. वेदना, विद्रोह, नकार या त्रिसुत्रीसह प्रतीके आणि मिथकांचे अर्थपूर्ण उपयोजन हा सुरुंगमधील कवितांचा खास विशेष आहे. या देशाला उददेशून सपकाळे आपली वेदना प्रकट करतात. उदा

नागडा आलो
पण इथेही नागवला गेलो
समाज पुरुषाच्या अहंकाराने
हे संस्कृतीप्रिय देशा
माझा नागडेपणा तुला कधी झाकताच आला नाही

देशाविषयी, जन्माविषयीची ही कडवट प्रतिक्रिया आहे. देश स्वतंत्र झाला तरी दलितांपर्यंत हे स्वातंत्र्य कितपत पोहचले हा खरा प्रश्न आहे. या देशाने लोकशाही व्यवस्था स्वीकारली. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सामाजिक न्याय ही लोकशाहीची मूल्ये आहेत. मात्र लोकशाही असूनही दलितांवर अमानुषपणे अन्याय अत्याचार होतात हे पाहून कवीमन प्रचंड संतापून उठते आणि लोकशाहीचा कोणताच लाभ आम्हाला मिळाला नाही अशी खंत व्यक्त करते.

अरे, तुझी लोकशाही पोरगी आता मॅच्युअर झाली
तिच्या पहिल्या मुलासाठी मी आलेलो आहे!
सत्ता संभोगाची, रात्र मधुचंद्राची
मी अजून उपभोगली नाही
तिच्या न माझ्या मिलनातच
या देशातील खऱ्या लोकशाहीचा फुलोरा फुलणार आहे

लोकशाहीचे उपरोधिक अंगाने वास्तव चितारण्याचा प्रयत्न येथे केला आहे. लोकशाही अस्तित्त्वात आली मात्र तिच्या मूल्यांचे आचरण समाजजीवनात झालेले पाहावयास मिळत नाही त्याबददलचा हा उद्वेग व्यक्त करून कविता भारतीय संस्कृतीचे खुजेपण स्पष्ट करते.

आत्मा परमात्मा अन परब्रम्ह
तीन खुंटयावर मांडलेला तुझा पाल
आयुष्यभर तू राहिलीस बाई, झालीच नाहीस तू कधी आई
भूक तुझी मातृत्वाची भागवू शकेन मी
होशील का तू आई?
मी दत्तक यायला तयार आहे.

या मातृभूमीने कधी मातेचे प्रेम दिले नाही अशी खंत येथे व्यक्त झाली आहे. एका अर्थाने हिंदू संस्कृतीची प्रतिमाच ही कविता वाचकांसमोर उभी करते. आपल्याच मुलांना आईचे प्रेम देऊ न शकणारी ही संस्कृती आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने माणसाचे माणूसपणच हिरावून घेतले. धर्मांधता, जातियता, विषमता, उच्चनीच भेदभाव ही या संस्कृतीने दिलेली देणगी होय. पशूपक्षांना, जनावरांना पाणी पिण्यासाठी पाणवठे आहेत. तिथे अलगावाचा भाग नाही. मात्र माणसासाठी या संस्कृतीने जातवार पाणवठ्याची निर्मिती केली आहे. त्यातून विषमता पोसली आणि उच्चनिचभेदभावाला सातत्याने खतपाणी घातले म्हणून कवी उपरोधाने म्हणतो,

चातुर्वर्ण्याचे स्वागत असो! धर्मान्धतेचे स्वागत असो!
जातीयतेचे स्वागत असो! विषमतेचे स्वागत असो
काळ्या गोऱ्यांचे स्वागत असो!
हे पशू-पक्षांनो, हिंस्त्र पशुनो!
तुमचे मात्र स्वागत करता येत नाही
कारण तुमचा पाणवठा अलग नाही

वरील भीषण वास्तवामुळेच कवीमन पुरेसे स्फोटक झाले. त्या स्फोटक मानसिकतेचा आविष्कार इथल्या

सामाजिक सांस्कृतिक व्यवस्थेच्या विरोधात सुरुंग लावण्यासाठी सज्ज होतो.

हा ज्वालामुखी जागृत होणार
धगधगत्या उसवणाऱ्या लाव्हाचा महापूर वाहणार
जे मार्गात येईल ते स्वाहा करणार

अशाप्रकारे स्फोटक विद्रोहाची अभिव्यक्ती होताना दिसते. हा विद्रोह वेदनेच्या सहनशीलतेचा अंत झाल्यानंतर उफाळून आलेला आहे. मात्र त्यासाठीही आत्मभान जागृती व्हावी लागली आणि हे आत्मभान जागृतीचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांच्याविषयी कवी कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतो,

अस्मितेला जागे करून 'मी'पणाची जाणीव देऊन
तो सूर्य गेला या थंड गोळ्यास उब देऊन

आत्मभान जागृतीबरोबरच संघर्षाची दीक्षाही मिळाली त्यामुळे दलित मने पेटून उठली. इथल्या धर्म, संस्कृती, अन्यायकर्ते, शोषक व्यवस्था या साऱ्यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करू लागली. शब्दप्रामाण्याला नकार देऊ लागली आणि मानव्याच्या प्रतिष्ठापनेसाठी सज्ज होऊ लागली. त्यातून नकार आणि स्वीकाराची बैठक तयार झाली. सपकाळ्यांची कविता वरील सर्व बाबींचे प्रतिनिधित्व करताना दिसते. स्वकीयांना स्वाभिमान आणि संघर्ष शिकवते,

दे ना सोडून, खाली मान घालून
जगण्याची सवय
कुठवर करणार कालहरण कातडे ओढून डोळ्यावर
जगलास तर जिणे ताठ मानेने,
मेलास तर मुक्ती!

अशाप्रकारे ही कविता संघर्षाची चेतावनी देते. परमेश्वराच्या नावावर शूद्रातिशूद्राचे अतोनात शोषण करण्यात आले याचे पुरेसे भान या कवितेला आहे. म्हणून ती परमेश्वराचा उपहास करताना दिसते.

परमेश्वरा! तू राहिलास नावाला
धनी कुंकवाचा
म्हातारा नवरा गमतीला जसा

कुंकवाचा धनी म्हणजे केवळ नाममात्रपणा. ज्यातून कोणतीही कृती आणि निर्मिती होत नाही. सृजनाची शक्यताच नाही. अशाप्रकारे उपहासिक प्रतिमांच्या माध्यमातून परमेश्वराची खिल्ली उडवलेली दिसते. म्हाताऱ्या नवऱ्याची जशी निष्क्रियता तशी परमेश्वराची. म्हणून त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचे कर्तव्य बजावणे शक्यच नाही, म्हणून त्याला रद्दबातल ठरविणे क्रमप्राप्त ठरते. ईश्वरी सत्तेला नकार देणारी जाणीव खालीलप्रमाणे व्यक्त होते.

आम्ही गॉडमेकर देतो नोटीस तुझ्यावर
निग्लिजन्स ऑफ ड्यूटीची
युवर सर्व्हिस इज नॉट रिक्वायर्ड

अशाप्रकारे परमेश्वराला नकार देण्यात आला आहे. सर्वप्रकारच्या शोषक व्यवस्थांना नकार दिला आहे. सपकाळे यांच्या कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा, प्रतीके आणि मिथके हा खास प्रांत आहे असे दिसून येते. आंबेडकरी चळवळीतील घटनाप्रसंग, त्यामागील कार्यकारणभाव, त्याची फलश्रुती इत्यादी सर्व गोष्टीच्या अनुषंगाने स्फोटक प्रतिमांचे उपयोजन झाले आहे. उदा.

महाडच्या चवदार तळ्याचे पाणी
गावकुसाबाहेरील कोठारात पडले आणि
सुरुंगाचा स्फोट झाला

शिडी नसलेली चिरेबंदी चारमजली उन्मत्त गढी
ढासळू लागली
सुरुंगाचा स्फोट अजून होत आहे

आंबेडकरी चळवळीत महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह या घटनेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा अधिकार देणारा ठराव पारीत झालेला असतानाही कर्मठ हिंदूनी तत्कालीन अस्पृश्यांना या अधिकारापासून वंचित ठेवले होते. पाणी ही नैसर्गिक गोष्ट असून त्यावरचा अधिकार नाकारण्यात आल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघर्ष सुरू केला. माणसाच्या मूलभूत हक्काच्या प्राप्तीसाठीचा हा संघर्ष होता. या संघर्षात डॉ. आंबेडकरांना मोठे यश प्राप्त झाले. या यशस्वीतेमुळे दलिताना संघर्षाची चालना मिळाली. जातीव्यवस्था, चातुर्वर्ण्य आणि अस्पृश्यतेवर केलेला हा पहिला प्रहार होता. त्यामुळेच आंबेडकरी लढ्याचा कृतिशील विचार मनामनात पेरला गेला. वर्णव्यवस्थेवर हल्लाबोल करणारी शक्ती संघटित झाली. चवदार तळ्याच्या पाण्याला स्फोटक शक्तीचे रूप प्राप्त झाले. ते संघर्षाच्या चेतनेचे प्रतीक ठरले. गावकुसाबाहेरच्या लोकांमध्ये चेतना निर्माण झाली. चातुर्वर्ण्य व्यस्थेची गढी त्यामुळे ढासळू लागली. गढी हे सरंजामीचे वर्णवर्चस्ववादी उन्मत्तपणाचे प्रतीक आहे. त्यातून चातुर्वर्ण्याचे चिरेबंद रूपकात्मक स्वरूप चित्रित होते. त्या व्यवस्थेचा उन्मत्तपणा, मुजोरपणा सूचित होतो. 'पाणी' हे कोठारातील बारुदबत्ती पेटविणाऱ्या साधनाची ज्वलनशील प्रतिमा, गावकुसाबाहेरील वस्ती हे स्फोट घडविणाऱ्या साधनाची प्रतिमा, वस्तीतील लोकसमूह ही संघशक्तीची स्फोटक प्रतिमा ठरते तर शिडी नसलेली चिरेबंद उन्मत्त गढी ही चातुर्वर्ण्य व्यवस्थेची प्रतिमा आहे. या सर्व प्रतिमाविश्वाच्या केंद्रस्थानी आंबेडकरी विचारशक्ती आहे हे स्पष्ट होते. अशाप्रकारे प्रतिमांचे उपयोजन करून सपकाळे यांच्या कवितेने व्यापक अर्थाची सिद्धता केली आहे. 'सुरुंग'मधील कवितेत कुंती, कर्ण, इडिपस, द्रौपदी इत्यादी विविध प्राक्कथांचे उपयोजन झाले आहे. उदा

नाळ तोडल्यावर
तू आपल्या जीवनप्रवाहातून मुक्त केले
हे भारतमाते! त्वा मला प्रेम-वात्सल्य केव्हा दिले?
या कालप्रवाहात मी कर्ण न होता
अिडीपस होऊन तुझ्या शय्येवर आलो तर काय करु?

या कवितेत 'कर्ण' आणि 'अिडिपस' या दोन मिथकांना एकत्र आणून भारतमातेशी जोडून एक प्रखर प्रश्न उपस्थित केला आहे. 'कर्ण' हे भारतीय तर 'अिडिपस' हे ग्रिक मिथक आहे. दोघेही जन्माला आल्यापासून मातृप्रेमापासून, वात्सल्यापासून वंचित असलेले. या अर्थाने दोघांचीही वेदना समान पातळीवरची आहे. सपकाळे यांनी प्रकट केलेली वेदना समष्टीची असून 'आय हॅव नो होमलँड' या आंबेडकरी वेदनेशी समांतर आहे. त्यामुळे भारतमाता, कुंती आणि योकास्टा एकाच पातळीवर आलेल्या आहेत असे सूचित होते. जन्मदात्रीने आपल्या मुलाचा अव्हेर करणे किंवा प्रेम वात्सल्यापासून वंचित ठेवणे ही कृती तीनही मातांच्या संदर्भात समानशील आहे.

भारतमातेने म्हणजे या देशाने, मातृभूमीने सर्व नागरिकांना, माणसांना समान न्याय दिला असे घडले नाही. दुजाभाव आणि परकेपणाने वागविले. त्यामुळे येथे उद्वेगजनक आणि प्रखर प्रश्न निर्माण झाला आहे. कर्णाला इथल्या व्यवस्थेने अवहेलना करून पराभूत केले. जेता बनू दिले नाही. जेत्याच्या हक्कानुसार अिडीपस आपल्या आईशी विवाहबद्ध झाला. म्हणजे तिच्या शय्येवर गेला. अशीच अनाहूत कृती भारतमातेच्या संदर्भात घडली तर काय करू असा प्रश्न या कवितेने उपस्थित केला आहे. दुजाभाव आणि प्रेम वात्सल्यापासून वंचित ठेवणाऱ्या भारतमातेच्या शय्येवर जाणे ही उद्वेगातून आलेली, अवहेलना आणि अगतिकतेतून आलेली अतिशय टोकाची कृती आहे. 'कर्ण' आणि 'अिडिपस' यांना एकत्र आणणारे आणि त्यांचा भारतमातेशी दुवा जोडणारे हे कवीमन आपल्या मनातील सारा विखार किती धारदार आणि संयत रूप देऊन व्यक्त करीत आहेत हे पाहून आपण क्षणभर थक्क होऊन जातो. त्यातील व्यंजना रसिकांच्या

मनात वादळे निर्माण करते. या प्राक्कथेत या देशाविषयीचा कमालीचा परकेपणा आणि त्यातून आलेला नाती न मानण्याचा निष्ठूरपणा सुरुंगाच्या दारुसारखा ठासून भरला आहे. ''[२९] या मतानुसार नाती न मानण्याचा प्रमाद भारतमातेकडून घडला आहे. तो समूहाच्या बाबतीत घडला आहे. एका अर्थाने या देशाने या प्रमादामुळेच नात्यातील पावित्र्य भ्रष्ट करून माणसाला निष्ठूर व्हायला भाग पाडले आहे असे या मिथकांच्या अर्थांतरातून सूचित होते. 'द्रौपदी'च्या मिथकाला सपकाळे यांच्या कवितेने वेगळे आयाम प्राप्त करून दिले आहेत. उदा

रक्ताळलेल्या हातानी बांधणार मी तुझा बुचडा
तुझ्या निरीला ज्यांनी हात घातला!
मुळापासून फेकणार उपटून ते जुलमी हात
तू जळतच रहा अग्नीसारखी
तुझ्या पोटातील अंकुर निघेल तावून सुलाखून
डोहाळे तुला लागू दे
केशरी रंग परिधान करून मृत्यूला कवटाळणाऱ्या वीरांचे!

येथे द्रौपदीचे मिथक अधिकाधिक प्रतिकात्म बनत गेल्याचे दिसून येते. त्याला विद्रोहाचे परिमाण प्राप्त करून दिल्यामुळे सामाजिक भावाभिव्यक्तीला उठाव मिळतो आणि विद्रोहीमत्व ठळक होते असे प्रत्ययाला येते. यावरून असे म्हणता येईल की सपकाळे यांची कविता अत्याचारीत मिथकांच्या संदर्भात नकार आणि विद्रोहाची भावना, अपेक्षा व्यक्त करते.

संक्षिप्तत: असे म्हणता येईल की, त्र्यंबक सपकाळे यांच्या कवितेने वेदना, विद्रोह, नकार या त्रिसुत्रीसह प्रतिमा, प्रतिके आणि प्राक्कथा यांचे अतिशय अर्थपूर्ण उपयोजन केले आहे. या कवितेने मातृभूमीला उददेशून आपली व्यथा प्रकट केली आहे. लोकशाहीचे औपरोधिक अंगाने वास्तव चितारतानाच भारतीय संस्कृतीचे खुजेपण स्पष्ट केले आहे. शोषक व्यवस्थेच्या विरोधात स्फोटक मानसिकतेचा आविष्कार केला आहे. स्वकीयांना स्वाभिमान आणि संघर्ष शिकवला आहे. औपरोधिक शैलीने नकाराची भूमिका पार पाडतानाच स्फोटक आणि ज्वलनशील प्रतिमांचे तसेच मिथकांचे उपयोजन करून अर्थाची व्यापकता सिद्ध केली आहे.

✸ ज.वि.पवार (जन्म १५ जुलै १९४४)

ज.वि.पवार हे दलित चळवळीतील हाडाचे कार्यकर्ते आहेत. दलित पँथरच्या चळवळीत ते अग्रभागी होते. किंबहुना पँथर स्थापनेतील ते संस्थापक सदस्य आहेत. पँथरच्या चळवळीतून जे विद्रोही कवी उदयाला आले त्यापैकी ज.वि.पवार हे एक महत्त्वाचे कवी होत. त्यांचा **नाकेबंदी** हा कवितासंग्रह १९७६ मध्ये प्रसिद्ध झाला. आंबेडकरी प्रेरणेतून, समूहाचे प्रतिनिधित्व करणारी तडफदार विद्रोहाची कविता त्यांनी लिहिली. त्यांच्या कवितेने दलित कवितेला नकारविद्रोहासह सामाजिक मूल्य प्राप्त करून दिले.

गतकाळातील दलित जीवनावरील अन्याय अत्याचार आणि वर्तमानातील शोषण आणि अत्याचार, सामाजिक अपप्रवृत्ती या साऱ्यांचा वेध घेतानाच अन्यायाच्या विरोधातील प्रखर विद्रोही भूमिका मांडणे ही त्यांच्या कवितेची बलस्थाने आहेत. दलित कवितेतील विद्रोह स्वातंत्र्याच्या प्रबळ उर्मीतून निर्माण झाला आहे.

कारागृहाची भीती कुणाला? उभं आयुष्य तुरुंग समजून सहनलं
हे ही बरचं झालं. तुरुंगाच्या पायथ्याशी सुरुंग पेरणं शक्य झालं
समतेचं वारं प्यालेली पाखरं... त्यांना असं डांबू नका
तुरुंगासह ती उडून जाणार नाहीतच अशा भ्रमात राहू नका

विद्रोही मानसिकतेचा स्वातंत्र्येच्छा हा महत्त्वाचा घटक आहे. ती स्वातंत्र्येच्छा मूल्यात्मक अधिष्ठानामुळेच

प्रकट होताना दिसते. सदर कवितेत आत्मभान प्राप्त झालेल्या विद्रोही मनाचे मानस प्रकट झाले आहे. ही स्वातंत्र्याची उर्मी मुक्तीच्या मार्गाने मार्गस्थ होण्यासाठी कधीही कृतिशील होऊ शकते. कारण समतेच्या वाऱ्यामुळे या पाखरांच्या पंखात बळ निर्माण झाले आहे. त्यामुळे तुरुंगासह ती उडून जाऊ शकतात असे मुक्तीचे समता हे तत्त्व त्यांना प्राप्त झाले आहे. दडपशाहीच्या विरोधात विद्रोही मानसिकता कशाप्रकारे कार्यरत होते याचा प्रत्यय येतो. बंदिस्तपणाचे बांध फोडू पाहणारा विद्रोह स्पष्ट झाला आहे. अशाप्रकारे ज.वि.पवार यांच्या कवितेत प्रकट होणाऱ्या विद्रोहाला मूल्यात्मक बैठक आहे. या विद्रोहाचे प्रेरणापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. त्याचे कार्यकर्तृत्व कवीने खालीलप्रमाणे सांगितले आहे.

तू निघालास तेव्हा काळोखाचं राज्य होतं
सूर्यफुलांनी पाठ फिरविली होती...
तू झालास परिस्थितीवर स्वार आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत

निराशाजनक परिस्थितीवर मात करून नवा इतिहास घडवणाऱ्या आंबेडकरांचे एक रूप येथे साकार होते. पुढे वाचाबंद समाजाचा नायक आणि झोपलेल्यांना जागे करून, बहिष्कृत भारत उभा करणारे आंबेडकर अशी त्रिविध रूपे साकार होतात. काळोखाच्या राज्यातून, सूर्यविन्मुख रस्त्याने प्रवाहाविरुद्धचा खडतर वाटेवरचा प्रवास आणि परिस्थितीवर स्वार होऊन, मूक समाजाचे नायकत्व स्वीकारून नवा इतिहास घडविण्याचा एक प्रवास सूचित होतो. आंबेडकरी कार्य-कर्तृत्वामुळे नवा इतिहास घडला. बहिष्कृत भारत जागृत झाला. ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती येथे मुखरीत झाली आहे. 'काळोख्या राज्यावर जागृतीचा प्रकाश पेरणारा नायक' अशी आंबेडकर प्रतिमा येथे साकार झाली आहे.

ज.वि.पवार यांच्या कवितेला सामाजिक दु:खाचे अनेक पदर आहेत. व्यवस्थेचा कावेबाजपणा, दलितांवर होणारे अन्याय अत्याचार, हिंसाचार, जाळपोळ, स्त्रियांची विटंबना, या सर्व गोष्टींची भीषणता आणि भेसूरता पाहून कवीमन विद्रोहाने पेटून उठते. इथल्या सांस्कृतिक संचिताला प्रखर नकार देते. सांस्कृतिक संचिताचा पंचनामा करते.

बंद करा रे बंद करा विश्वशांतीस्तव बडविलेले पंचशीलाचे नगारे
तुम्हीच ना रे ते गर्भात आयांना आरपार कापत सुटणारे
तुम्ही मात्र पाहत बसता ते निर्ढावलेल्या डोळ्याने
रंगपंचमीच्या सहजतेने

सांस्कृतिक जगातील ढोंगबाजीचे पितळ उघडे पाडण्याचे काम या कवितेने केले आहे. एकीकडे विश्वशांती आणि ऐक्याची वल्गना करायची आणि दुसरीकडे पावलोपावली हिंसाचारी वर्तन करायचे. शीलाचे महात्म्य सांगायचे आणि स्त्रियांच्या अब्रुचे धिंडवडे काढायचे अशाप्रकारचे दुटप्पी वर्तन करणाऱ्या, कावेबाज प्रवृत्तीचे रूप येथे अधोरेखित झाले आहे. अशा प्रवृत्तीला, 'जाळून टाका तुमच्या डंक्याचे बेवारशी पंचनामे' असा इशारा दिला आहे. असे जर झाले नाही तर उद्याचे क्रांतीकारक तुमच्या अब्रुचे खोबरे केल्याशिवाय राहणार नाहीत असे सांगायलाही कवीमन विसरलेले नाही. अशा अमानुष संस्कृतीला जाळण्याची भाषा या कवितेत अवतरली आहे.

जाळायचे म्हणतो संस्कृतीचे मढे
जे शतानुशतके तिरडीवर पडून आहे
ज्याला तुम्ही घाबरत आलायत
शेतातल्या बुजगावण्याला माकडाने भ्यावे तसे

संस्कृतीला नाकारणारी जाणीव व्यक्त करताना इथे एक प्रश्न उपस्थित केला आहे. कवीमनाने केलेल्या आवाहनाचे कारण 'संस्कृतीचे मढे' हे आहे जे शतकानुशतके तिरडीवर पडून आहे. हे मढे शेतातल्या बुजगावण्यासारखे आहे म्हणजे ज्यामध्ये भिती दाखवणारे, उपद्रवी मूल्य आहे. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर मढे तिरडीवर ठेवल्या गेले

परंतु त्याला अग्नी देण्याची कृती घडली नाही. मात्र अमानुष संस्कृतीला जाळण्याची प्रेरणा देणारा विचार अस्तित्त्वात आल्यामुळे हा संस्कृतीचे मढे जाळण्याचा कृतिशील विचार आणि तसे आवाहन या कवितेतून केल्या गेले आहे. येथे स्फोटक प्रतिमेतून कृतिशील विचार प्रकट होतो. जी गोष्ट किंवा वस्तू नाकारायची आहे त्या अमूर्त वस्तूचे चेतनीकरण करून मूर्त स्वरूप दिल्या गेले आहे. एकीकडे आपल्या देशाची संस्कृती महान आणि गौरवशाली आहे असे सांगीतले जाते. मात्र प्रत्यक्षात ही संस्कृती अन्याय-अत्याचाराने खचाखच भरलेली आहे.

खरचं हो शंबुकाचे डोके उडवणारी
एकलव्याचा अंगठा कापणारी
आपली संस्कृती फार फार महान आहे
ती महान नसती तर नसतेच तोडले तिने रामदासला
वा जिवंत जाळले गोपी वडारला
ब्राह्मणगावात नसतीच मातामाऊली नागव्याने धिंडवली
नसते ऐकावे लागले चितेतील अर्भकाचे चित्कार
शेरपुरातील शंभराची राख ही ही संस्कृतीची शान
धाकलीचे गवईबंधू प्रकरण... संस्कृतीचा बहुमान

संस्कृतीचा उपहास करीत अन्यायाची भीषणता दिग्दर्शीत करण्याचे कार्य या कवितेने केले आहे. पुराणकालापासून ही अन्यायाची मालिका सुरू आहे. रामाने शंबुकाचा वध केला, द्रोणाचार्याने एकलव्याचा अंगठा दक्षिणा म्हणून कापून घेतला आणि त्याची धनुर्विद्या निकामी केली. अशाप्रकारे शंबूक, एकलव्य हे व्यवस्थेचे बळी ठरले आहेत. मात्र विसाव्या शतकात, स्वातंत्र्यानंतरच्या वीस पंचवीस वर्षांत दलितांवरील अन्याय अत्याचाराला सीमाच उरली नाही. अतिशय क्रुरपणे हे अत्याचार करण्यात आले. दलित स्त्रियांची नागव्याने धिंड काढण्यात आली, किलावेनमानीत चाळीस ते पन्नास कुटुंबांना झोपेत असताना त्यांची घरे पेटवून त्यांना जिवंत जाळण्यात आले. धाकली येथील गवईबंधूचे डोळे फोडण्यात आले, शेरपूरात दलितांच्या घरांची राखरांगोळी करण्यात आली. मन विषण्ण करणारी ही क्रुर अशी अत्याचाराची मालिका आहे. ज्या देशात अशा क्रुर आणि हिंस्त्रपणाचे वर्तन करून माणसांचे बळी घेतले जातात त्या देशाची संस्कृती महान आणि गौरवशाली आहे असे कसे म्हणता येईल? म्हणून या संस्कृतीचा तीव्रपणे उपहास करून तिचा करालपणा स्पष्ट करण्यात आला आहे. या स्वरूपाच्या भीषण अन्यायाने अन्यायग्रस्त समूह पेटून उठतो, डोळस बनतो आणि अत्याचाराच्या विरोधात संघर्षासाठी सिद्ध होतो. हीच भावना पवारांच्या कवितेने व्यक्त केली आहे. अन्यायाच्या विरोधात युद्धखोरी हाच या कवितेचा स्वभाव आहे. म्हणून पदोपदी या कवितेत युद्धमानता साकार झाली आहे. उदा-

१. चला तर म्यानाम्यानातील तलवारी आता बाहेर काढा
भिंतीभिंतीवरील बंदुकाचे चाप पुन्हा एकदा चाचपून पहा
काल स्वातंत्र्यासाठी पेटलात आज पेटेल ते पेटवित चला

२. पूर्वजांचे रक्त माझ्यात खेळत आहे
उकळी फुटून उसळी मारत आहे
त्याने तरी किती दिवस कढत रहावे
ज्वालामुखीने आतल्या आत का कोंडून रहावे

बंदुका, तलवारी, आग, ज्वालामुखी ही सर्व साधने युद्धमान मानसिकतेचे रूप स्पष्ट करणारी आहेत. रक्त आणि ज्वालामुखीने उसळी मारावी, लाव्हा बाहेर पडावा असे या मानसिकतेला वाटते. समूहमन विद्रोहामुळेच जगण्यामरण्याच्या प्रश्नासाठी संघर्षशील होते, सैनिकासारखे लढण्यासाठी उभे राहते. त्यामुळे युद्धप्रवणता हा या विद्रोहाचा स्वभाव आणि स्थायीभाव ठरला आहे. अन्यायकर्ते स्वेतर आणि विद्रोहकर्ते स्वकीय असा संबंध दलित कवितेत नेहमीच स्पष्ट होताना दिसतो. या संबंधातून तेजस्वी आणि दाहक प्रतिमा आकारास आल्याचे दिसून येते. उदा.

मायबहिणीच्या पाणउताऱ्याचे अश्रू पहायला
लावलेतच त्यांना तर वडवानलही पेटवतील
देऊ नका दाखले आमच्या राखरांगोळ्यांचे
माझ्या आग ओकणाऱ्या डोळ्यांना
ना तर विश्वाची ते राख करतील

या कवितेत अश्रू, वडवानल, राखरांगोळ्या, आग ओकणारे डोळे यासारख्या प्रतिमांमुळे विद्रोही कृतीची, आव्हानात्मक भूमिकेची सूचना मिळते. जुन्या जखमांना खतपाणी घालू नका अशाप्रकारची येथे समज देण्यात आली आहे. राखरांगोळ्यांचे दाखले म्हणजे वारंवार झालेले अन्याय, अत्याचार. पुन्हा हे घडणार असेल तर डोळ्यातून आग ओकली जाणार आहे. म्हणून या डोळ्यांना आग ओकण्याची संधी देऊ नका असे विद्रोही मनाने आवाहन केले आहे. 'पाणउताऱ्याचे अश्रू', 'राखरांगोळ्यांचे दाखले' या प्रतिमांचा निर्देश अन्यायकर्त्याकडे आहे तर 'वडवानल', 'आग ओकणारे डोळे' या प्रतिमांचा निर्देश विद्रोहकर्त्याकडे आहे. म्हणून स्वकीय आणि स्वेतरांच्या संघर्षातून अन्यायकर्त्यांना आग लावली जाईल असा निष्कर्ष वडवानल आणि आग ओकणाऱ्या डोळ्यातून काढता येतो. अशाप्रकारे पवारांची कविता प्रतिमासंघटनातून युद्धमान मानसिकतेचा प्रत्यय देते.

फुलांशी खेळणाऱ्या वयात मी निखाऱ्यांशी खेळतोय
मोकळ्या हवेत बागडणाऱ्या वयात मी कारावास भोगतोय

अशाप्रकारे विद्रोह आणि गुलामीचे स्वरूप या कवितेने स्पष्ट केले आहे. 'जहरी वाऱ्यांना पिऊन मी वादळ झालो तर ते तुम्हाला चालेल ना?' असा प्रश्न उपस्थित करून आव्हानांना सामोरे जाण्याचा पवित्रा कायम ठेवला आहे. जळत्या आयुष्याचे धगधगते अग्नीकुंड सोबतीला घेऊनच हा पवित्रा पुढीलप्रमाणे अभिव्यक्त होतो.

जळालेले आयुष्य पुन्हा निखाऱ्यासारखे फुलवायचे
म्हणून मी प्रकाशाची पायवाट जवळ केली

जळलेल्या आयुष्याला निखाऱ्यासारखे फुलवण्यासाठी विद्रोहाचे अंतिम पर्यावसान प्रकाशाची पायवाट जवळ करण्यात होते. अन्याय, अत्याचार, शोषण या सर्व पार्श्वभूमीतून निघालेले रस्ते, पायवाटा जेव्हा विद्रोह सोबतीला घेऊन निघतात तेव्हा त्यांची ध्येयनिश्चिती झालेली असते आणि ते ध्येय प्रकाशाची प्राप्ती हेच असते. 'जळालेले आयुष्य' या प्रतिमेतून धुमसणारी मानसिकता प्रकट होते. हा धुमसणारा जाळच आयुष्याला नव्याने उभे करण्यासाठी कार्यरत होतो. हे आयुष्य निखाऱ्यासारखे फुलवण्यासाठी प्रकाशाची पायवाट मार्ग दाखविते. अशाप्रकारे हा विद्रोह कृतिशील होतो. हा कृतिशील विद्रोहाचा मार्गदाता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशिवाय दुसरा कुणीही असू शकत नाही. ते दलित कवितेचे प्रेरणास्त्रोतही आहे. सगळ्या दु:खावरचे औषध म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी कवीची धारणा आहे.

तू म्हणतोयस मार्क्स हा दवा आहे
मी म्हणतोय ती एक दारू आहे
ही जातीयता फोड हे बांध फोड
बांधाबांधातील पाणी घुसु दे तुझ्या बांधात, माझ्या बांधात
पाण्यालाच बांधलेस तर तू क्रांती कसा करणार?
आंबेडकर जेथे सगळ्या दु:खाला दवा आहे
तेथे तुझ्या दारूने काय होणार?

ही कविता दोन व्यक्तिमत्वाबददल काही स्पष्ट करू पाहते. मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या दोन्ही महान विभूती आहेत. या व्यक्तिमत्वातील फरक कवीला स्पष्ट करावयाचा आहे. दोघानीही शोषणाच्या संदर्भात विचार मांडला. मार्क्सने वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान मांडले. 'जगातील कामगारांनो एक व्हा' असे आवाहनही केले होते. मार्क्सने जे

तत्त्वज्ञान मांडले तेव्हा त्यांच्यासमोर धर्म, जात, स्मृती, श्रुती, धर्मग्रंथ या सर्वांच्या आधारे माणसाचे केले जाणारे शोषण ह्या गोष्टी नव्हत्या. जन्मत:च अधिकारभेद करणारी वर्णव्यवस्थाही मार्क्सला माहित नव्हती. धर्म ही अफूची गोळी आहे. एवढेच धर्माविषयीचे मर्यादित आकलन त्याने मांडले आहे. धर्म हे शोषणाचे हत्यार आहे हे भारतात जन्माला आला असता तर मार्क्सला कळाले असते. कवी ज्या वर्गाचे, समूहाचे प्रतिनिधित्व करतो तो वर्ग, समूह, जात, धर्म, वर्ण या व्यवस्थांचा बळी आहे. हे वास्तव डॉ. आंबेडकरांनी मांडले. दलिताना मुक्तीची आणि मुक्तीसाठी संघर्षाची वाट दाखवली ती डॉ. आंबेडकरांनीच. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक या जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील दु:खाच्या, शोषणाच्या विरोधात आंबेडकरी विचार उभा आहे. समताधिष्ठीत समाजरचनेची प्रस्थापना हे आंबेडकरांचे ध्येय. म्हणून 'आंबेडकर सगळ्या दु:खाला दवा आहे' असे कवीने म्हटले आहे. दारू ही गोष्ट क्षणिक झिंग आणणारी असते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा इलाज होत नाही किंवा दारूने जखमाही भरून निघत नाहीत. दवा म्हणजे औषध हा रोगावरचा, आजारावरचा इलाज असतो. त्याने आजार बरा होतो, जखमा भरून निघतात. हा दवा-दारुमधला मूलभूत फरक आहे. जातियता आणि विषमता नष्ट करण्याचा क्रांतीकारी विचार म्हणजे आंबेडकर असे ठामपणे सूचित करण्याचा प्रयत्न या कवितेत झालेला दिसून येतो. ही विचारधारा हाच संघर्षाचा एकमेव आधार आणि प्रेरणा आहे. त्यामुळे कवीमन निर्धास्त आहे. 'आता अटकाव कसला, धमणी धमणीने ज्वालामुखी व्हायचे, इंचाइंचागणिक खंदक खणत जायचे' हा या कवितेचा निर्धार आहे. मुक्तीच्या प्रबळ उर्मीतून या कवितेत प्रखर विद्रोह प्रकटला आहे. या विद्रोहाला मूल्यात्मक बैठक आहे. गतकाळ आणि समकालातील दलित जीवनातील अन्याय, अत्याचार आणि शोषणाचे भीषण स्वरूप या कवितेने चित्रित केले आहे. अन्यायाच्या विरोधात युद्धखोरी, युद्धप्रवणता हा या कवितेचा स्वभाव आहे. विद्रोहाला वक्तृत्वाच्या पातळीवर नेणारी भाषाशैली हा या कवितेचा खास विशेष आहे.

ज.वि.पवार यांची कविता सांस्कृतिक संचिताला नकार देते. ढोंगबाजीचे पितळ उघडे पाडते, अमानुष संस्कृतीला आग लावण्याचा मनोदय व्यक्त करते. या कवितेतील स्फोटक प्रतिमासंघटनातून कृतिशील विचार आणि युद्धमान मानसिकता व्यक्त झाली आहे. जातियता, सामाजिक विषमता नष्ट करण्याचा, सर्व दु:खावरचा इलाज म्हणजे आंबेडकरी विचार असे ठामपणे या कवितेने सूचित केले आहे.

✹ प्रल्हाद चेंदवणकर १५ जुलै १९३७ - १६ जुलै २००६

प्रल्हाद चेंदवणकर यांचा **ऑडिट** हा कवितासंग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. चेंदवणकरांची कविता दलित जीवनाची वेदना दाहक भाषेत व्यक्त करते. त्याचप्रमाणे ती व्यवस्थेची तपासणी करते. नव्या जीवनाच्या स्वीकारासाठी ती आसुसलेली आहे. कारण दलित जगाचे व्यवस्थेकडून झालेले शोषण, वर्तमानातील होत असलेले अन्याय, अत्याचार, स्वातंत्र्याने केलेला भ्रमनिरास, पदोपदी होणारी मानहानी अशा उबगवाण्या जगातून बाहेर पडायचे असेल तर साऱ्या जगावर दलितांची सत्ता स्थापन झाली पाहिजे असे चेंदवणकरांना वाटते म्हणून ते कवितेच्या माध्यमातून आवाहन करतात,

मग, चल उठ तर
तुझा खांदा माझा खांदा नट बोल्टने सांधू या
तुझे रक्त माझे रक्त एका बायलरमध्ये ओतू या
अणुस्फोटाचाही झाला नसेल असा प्रचंड स्फोट करू या
दलितांची सत्ता साऱ्या जगावरती स्थापू या

अशाप्रकारे एक स्फोटक कृती करण्यासाठी केलेले हे आवाहन. चळवळीतील कार्यकर्ता कवी कसा पेटून उठतो याचे उदाहरण म्हणून वरील कवितेकडे पाहता येईल. चळवळीतून जन्माला आल्यामुळे तिच्यात एक जोशपूर्ण आवाहकता आहे. स्वाभिमानाचे जिणे प्राप्त करावयाचे असेल तर संघर्ष अटळ आहे. म्हणून लढाऊ बाण्यासह ती आक्रमक होत जाते. हिशेब तपासणीची एक विशिष्ट परिभाषा त्यांनी आपल्या कवितेत वापरली आहे हे या कवितेचे भाषिक वैशिष्ट्यही नोंदवण्यासारखे आहे. गतकाळातील गावकुसाबाहेरच्या जगावर झालेले आघात आणि मुस्कटदाबी याचा हिशेब या

कवितेने मागीतला आहे.

तुमच्या पावलाखाली / दडपलेले आमचे श्वास
अजूनही घुसमटताहेत गावाबाहेर उकिरड्यात
देणे तरी तुमचे किती / दाखवा आम्हाला हिसाब किताब
महात्मा फुले- आंबेडकरांनी / तुमचे अकॉउन्टस् ऑडिट केलेत
ग्रंथाग्रंथावरच्या पानावरचे फ्रॉडस सगळे डिक्टेट केलेत...
अजूनही संधी आहे / चूकभूल विसरून जाऊ
तुमच्या पापांची एक्चेंस बॅलन्स / रिटर्न ऑफ करून घेऊ
तुम्ही फक्त एवढच करा / माणसासारखे वागत चला
ते ही जमले नाहीच तर / दिवाळखोरी जाहीर करा

व्यवस्थेने दलित जगावर केलेले आघात आणि जखमा अद्यापही मिटलेल्या नाहीत. घुसमट अजूनही संपलेली नाही. त्यांनी केलेल्या अन्याय अत्याचाराच्या खात्याची तपासणी फुले-आंबेडकरांनी केली आहे. त्यांनी केलेले घोटाळे, फसवणूक याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यांचे हे सर्व घोटाळे धर्मग्रंथाच्या पानापानावर पाहावयास मिळतात याची जाणीव फुले आंबेडरांनीच करून दिलेली आहे. ही जाणीव ज्या समाजमनाला झालेली आहे ते समाजमन हा हिशोब मागीतल्याशिवाय राहणार नाही. म्हणून अन्यायकर्त्या व्यवस्थेसमोर आता दोनच पर्याय आहे. एक तर त्यांनी माणुसकीने वागले पाहिजे किंवा आपली दिवाळखोरी जाहीर केली पाहिजे. कवीने आपल्या विचारांचा चेंडू शोषक व्यवस्थेच्या कोर्टात टाकला आहे. निर्णय आता व्यवस्थेने घ्यावयाचा आहे. एका अर्थाने व्यवस्था परिवर्तनाचा विचार ही कविता अधोरेखित करते आणि व्यवस्थेला खजील करते. वैचारिक अधिष्ठान असलेली ही कविता दलित, शोषित, पीडीत जगाचे प्रतिनिधित्व करणारी आहे. म्हणून ती आवाहन करते स्वाभिमानाचा अंगार फुलविण्यासाठी,

तू ये! असा पुढे ये!
तुझ्या गच्च मुठीतला हिलाल घुमवित, घुमवित ये
हा पिढ्यान पिढ्यांचा बदमाश अंधार
लोळवित तुडवित ये

बंडखोरी पुकारणारे मन समूहाला चेतविल्याशिवाय राहात नाही. समूहालाही ते बंडासाठी प्रेरीत करते, उद्युक्त करते. सामाजिक जाणिवेची दाहकता येथे प्रखरपणे, प्रभावीपणे व्यक्त होताना दिसते. कवी हा स्वातंत्र्योत्तर काळाचा, या काळातील दलित विश्वाचा प्रतिनिधी आहे आणि या जगाच्या वतीनेच तो बोलत आहे. म्हणून दलित विश्वाचे गतकालीन आणि वर्तमानकालीन जगणे तो वाचकांसमोर ठेवतो. धर्म आणि व्यवस्थेने उपेक्षीत ठेवलेल्या गुलामीच्या समूहजीवनाची प्रतिमा त्यांच्या कवितेने अधोरेखित केली आहे.

तुटलेल्या कानाचा फुटलेल्या तोंडाचा
विटलेल्या अंगाचा ठार मेल्या मनाचा
मारला तरी मरत नाही जिता असून सुकळीचा
खेडेगावातील हाटेलातला कप एक चहाचा

राज्यघटना अस्तित्त्वात येईपर्यंतच्या काळात या देशात अस्पृश्यता कायम होती. त्यामुळे सवर्ण मानसिकता जात आणि अस्पृश्यतेच्या संदर्भात अबाधित होती. खेड्यापाड्यात ती अतिशय चिवटपणे जातियतेची नखे रोखून उभी होती. अस्पृश्यांना, दलिताना कोनाड्यात ठेवलेल्या राखीव फुटक्या भांड्यातून चहा, पाणी, शिळे अन्न जसे दिले जात होते तसेच सार्वजनिक ठिकाणीही हॉटेलातून कानतुटके, फुटके कप राखीव असत. या वास्तवाचे आणि जातिय मानसिकतेचे दर्शन या कवितेने घडविले आहे. केवळ अस्पृश्यांसाठीच राखीव असणाऱ्या कानतुटक्या कपाची प्रतिमा ही सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यांची ओळख खूण होती. त्या कपाचा कान तुटलेला आहे, तोंड फुटलेले आहे, अंग विटलेले आहे,

मन ठार मेलेल आहे तरी तो अजरामर आहे असे खेडेगावातील हॉटेलातल्या कपाचे चित्र येथे साकार झाले आहे. कपाचे जे स्वरूप आहे तसेच ते जातीय मानसिकतेचेही निदर्शक आहे. अशा मानसिकतेमुळेच अस्पृश्य समाजाच्या वाटयाला हीनत्वाचे, लाचारीचे जगणे अपरिहार्यपणे प्राप्त झाले होते. सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यांच्या हिणकस जगण्याची प्रतिमा म्हणून 'चहाचा कप' ही निदर्शक प्रतिमा ठरली आहे. वर्तमानाबददल बोलताना स्वातंत्र्योत्तर काळातील दलित जगण्याचे वास्तव ही कविता वाचकांसमोर ठेवते.

आयुष्यभर स्वप्नांची चिरफाडच होत गेली
ज्या ज्या वाटांवरून मी चाललो, त्या त्या नाक्यांवर
माझी नाकेबंदीच होत गेली

असे नाकेबंदी करणारे, जगण्याच्या रस्त्यात अवरोध निर्माण करणारे जगणे वाटयाला आले. हे दलित जगाचे प्रातिनिधिक चित्र आहे. अशा जगण्याच्या परिघातून बाहेर पडण्यासाठी कवीमन सिद्ध झाले आहे. आपले सर्वस्व प्राप्त करून घेण्यासाठी बंडखोर मन मार्गस्थ झाले आहे.

मी चाललो आहे आता त्या एका निश्चित दिशेने
जिथे मला माझे सर्वस्व हरवलेले परत मिळणार आहे

जगण्याची, जीवनाच्या वाटचालीची दिशा या मनाला दिसलेली आहे. माणुसकी आणि स्वाभिमानी जगण्यातच हे सर्वस्व दडलेले आहे. त्याच्या शोधासाठी हा प्रवास सुरू झाला आहे.

संक्षिप्तत: असे म्हणता येईल की, प्रल्हाद चेंदवणकर याची कविता चळवळीच्या पर्यावरणात निर्माण झाली आहे. या कवितेत एक जोशपूर्ण आवाहकता आहे. अन्यायकर्त्या व्यवस्थेला या कवितेने जाब विचारला आहे. हिशोब तपासणीची एक विशिष्ट परिभाषा या कवितेत प्रत्ययाला येते. त्या भाषेतून व्यवस्था परिवर्तनाचा विचार अधोरेखित झाला आहे. या कवितेतील प्रतिमासृष्टीतून सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यांच्या हिणकस जगण्याची प्रतिमा सिद्ध झाली आहे. त्याचप्रमाणे विद्रोही जाणिवेच्या आविष्कारातून दाहक आणि स्फोटक प्रतिमांचेही उपयोजन झाले आहे. समकालीन जीवनातील दलित जगण्याचे भेदक वास्तव स्पष्ट करून या अवहेलनापूर्ण जगण्यातून बाहेर पडून आपले हरवलेले सर्वस्व परत मिळविण्यासाठी ही कविता प्रवासाला निघाली आहे.

✸ केशव मेश्राम जन्म २४ नोव्हेंबर १९३७- ३ डिसेंबर २००७

केशव मेश्राम हे कवी, कथाकार, कादंबरीकार आणि समीक्षक म्हणून परिचित आहेत. मुंबई विद्यापीठातून मराठी विभागप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. बालवयापासून कष्टाची कामे करून त्यांनी स्वत:चा उत्कर्ष साधला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. **उत्खनन** हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९७७ मध्ये प्रसिद्ध झाला. या संग्रहातील कविता संमिश्र स्वरूपाच्या आहे. निखळ दलित जाणिवेतून त्या साकार झाल्या असे म्हणता येत नाही. 'उत्खनन' मध्ये १९६१ ते १९७५ या पंधरा वर्षांच्या कालखंडातील कविता पाहावयास मिळतात. त्यांच्या प्रारंभीच्या कविता ह्या मराठी रोमँटिक परंपरेतील कवितेसारख्याच आहेत असे दिसून येते. त्यांची बरीचशी कविता वारा, धारा, कळ्या, फुले, धुंदवेळा या स्वरूपाच्या पर्यावरणात रमणारी आहे.

धारा पडतात माथ्यावर, तू तृप्त डोळ्यांनी बघतेस
आत झाडे बहरतात, शुभ्र कौतुकाचे मन:पूर्वक हसतेस

असा माथ्यावर पडणाऱ्या धारेच्या तालातील मी-तूचा खेळ या कवितेत पाहावयास मिळतो. कळ्या फुललेल्या धुंदवेळा त्यांच्या कवितेत आहेत. कळीने कसे फुलावे यासंबंधीची न संपणारी कहाणी ही कविता सांगते

असे फुलावे कळीने, तिचे कळू नये तिला..
मंद वाऱ्याची अंगाई जोजविते आकाशाला

अशावेळी मला यावी धून धुकेबनातून
बाभळीच्या फुलांवर माझे ओथंबावे मन
नको डहुळाया काही क्षितिजाचे खोल पाणी
नाही संपता संपत एका कळीची कहाणी...

अशा पार्श्वभूमीवर ही कळीची कहाणी खुलत जाते. तिच्या चेहऱ्यावरील आत्मतृप्त सावल्याही दरवळताना दिसतात.

तुझ्या चेहऱ्यावर पसरतात समाधानाच्या सावल्या
श्वासाची लय वाढत जाते, त्वचा स्पर्शातूर होते
तुझ्या गाण्याचे सूर घेऊन येतात थंड शिरशिरी
मनातील कोलाहलाची देवाणघेवाण मार्गस्थ होते
तू... तुझा सहवास, सानिध्य हळुवार सजग बनते
माझ्या नकळत गुरुफटतो मी हात माझाही हातामध्ये
तुला जाणवतो धुमसत्या ज्वालामुखीचा अंत:स्थ आक्रोश

तिची स्पर्शातूर होत जाणारी त्वचा आणि गाण्यातील सूरांची थंड शिरशिरी. या पार्श्वभूमीवर याच्या मनातील कोलाहल, धुमसता अंत:स्थ आक्रोश असा विरोधाभास येथे स्पष्ट होतो. असे असले तरी एक गोड शिरशिरीचाच अनुभव कवीला येथे साक्षात करावयाचा आहे. याचप्रमाणे जिच्याजवळ मनातल्या कळा मोकळ्या केल्या होत्या अशी 'ती' गर्दीतल्या सारखी गर्दीतच भेटताना दिसते. वसंतातील कोवळ्या बाळबुंद पानासारखी ती, धुंदावलेली रानगौरा, तू येशील आणि माझी रात्र होशील अशी ती, टपोर डोळ्यातील अपार कारुण्य ओलीस ठेवून जाणारी, तू मिसळली आहेस माझ्या रक्तात, तुझे अस्तित्त्व गंधोत्कट झडच केवळ अशा 'ती'ची विविध रूपे मेश्रामांच्या कवितेत प्रत्ययाला येतात ही खचितच दलित कवितेच्या परंपरेतील कविता नव्हे किंवा दलित प्रेमकविताही नव्हे. कारण दलित कवितेने प्रेमकवितेलाही एक सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. मेश्रामांच्या कवितेसंबंधी म.सु.पाटील लिहितात, ''तिचे नाते कोणत्याही प्रकारे दलित संवेदनशीलतेशी नाही. तिची जात निर्भरशील कवीच्या संवेदनशीलतेशी आहे. .'' [३०] असे असले तरी दलित चळवळीचा रेटा निर्माण झाल्यानंतर केशव मेश्राम यांच्या जाणिवा बदलत गेल्या. कवितेला उददेशून ते म्हणतात-

कविते, तू उसळ कारंज्यासारखी
आजपर्यंतच्या मुक्या ओठांवर वर्णमालेशिवाय! (१०)

म्हणून आजवर जे बोलता आले नाही ते शब्दाच्या माध्यमातून प्रकट केले आहे. आपल्या शब्दाभिव्यक्तीच्या मर्यादा स्पष्ट करताना ते म्हणतात,

माझे शब्द आणि त्यांचे कान हयांच्यात आता ओळख नाही
मी अपमानीत माझ्या गावी निरर्थक शब्द जपतो म्हणून
मी कुचकामी जातीतही, माझ्यापुरते बोलतो म्हणून

अशी कबुली दिल्यानंतर मेश्रामांची कविता समाजाभिमुख होते. अवतीभवतीच्या वास्तवाचा वेध घेते. त्यांच्या नजरेच्या टप्प्यात जेवढे म्हणून समाजवास्तव येते ते ते चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या वस्तीपासून हे वास्तवचित्र रेखाटण्यास त्यांनी सुरुवात केली.

आमच्या वस्तीत भांबावतो पोस्टमन
गोंधळात संस्कार अडखळते सभ्यता अंधारतो सूर्यही
चिखलात उठावेत गुरांच्या खुरांचे ठसे तशी ठसठसती आमची घरे
भांबावतात सुधारणा आमच्या वस्तीत

ठेचकाळतात रस्ते योजनाही अडखळतात

येथे वस्तीच्या प्रतिमेतून अभावग्रस्ततेचे चित्र उभे राहते. कुणाच्या घराचा पत्ता सहजासहजी मिळत नाही, सांस्कृतिक दृष्ट्या गोंधळाची अवस्था निर्माण होते आणि सभ्यताही येथे शिरकाव करू शकत नाही. रस्ते ठेचकाळतात, योजना अडखळतात. अभावग्रस्ततेला दूर सारण्यासाठीच्या प्रयत्नाचाही येथे अभाव आहे असे वस्तीचे चित्र साकार झाले आहे. या वस्तीतील ठसठसती घरे वेदनेचा निर्देश करतात. ठसठसणे म्हणजे वेदना होणे, दुखणे खुपणे असा अर्थ येथे अभिप्रेत आहे. या प्रतिमेतून वस्तीतील लोकांच्या वाटयाला आलेल्या जखमा आणि वेदनांची सूचना मिळते. भांबावणे, अडखळणे ठेचकाळणे यातून थांबलेपणाचा, स्थितीशीलतेचा प्रत्यय येतो म्हणून सुधारणा, योजना, रस्ते या बाबतीत अवरोधाची स्थिती निर्माण झाली आहे. दु:खिताच्या वस्तीतील प्रगतीची स्थितीशीलता असे अभावग्रस्तांच्या जगाचे आणि जगण्याचे वास्तव सदर कवितेत स्पष्ट झाले आहे. जगण्याचा सामूहिक अनुभव अतिशय दाहकपणे दलित कवितेत व्यक्त झाला आहे. मेश्रामांची कविताही याला अपवाद नाही,

आम्ही जळतो आहोत आमच्या सुखदु:खासहित
गुदमरतो आहोत धुराच्या सर्वव्यापी लोटात...
आम्ही जळतो जुनाट जळजळीत स्पिरिट उतरावे घशात तसे
जपतो नुसती हाडे हेच आमच्या घराचे पोकळ वासे
शिरावे कुणीही आमच्या पांघरुणात, ओचकारेतो राहावे,
हिरवे असतानाच वाळवी होऊन पोखरत जावे,
ढलपी ढलपीत कळवळतो, आम्ही जळतो.....

माणसाच्या जळण्याच्या विविध परी येथे पाहावयास मिळतात. पहिल्या ओळीत घुसमट नंतर दाहकता, खंगरपणा, पोकळपणा, असुरक्षितता अशा गोष्टींचा प्रत्यय येतो. कुणीही यावे आणि लुटून जावे असा हा अनुभव आहे. पुढे ऐन तारुण्यातच किड लागून पोखरून जावे असे जगणे असहय झाल्यामुळे कळवळण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. ताजेपणाला, टवटवीतपणाला येथे वाळवी लागते. तारुण्य पोखरले जाते. या सर्व वास्तवामुळे जगण्याच्या कळवळण्याची सामूहिक प्रतिमा गोचर होते. अभावाची साथसोबत करणाऱ्या गल्ल्यांच्या शहरात 'गल्ला' जमवणारानीच कब्जा केला आहे. वंचितांची दुनिया मात्र बकालपणावरच उभी आहे.

वाटा इतक्या की त्यातच आम्ही राहतो
ओल धरणाऱ्या आडोशाचीच भाडेपावती घेतो
शहर 'गल्ल्या'चे आहे आमचे नाही!

एकीकडे गल्ला भरणारे सुस्थापित आणि दुसरीकडे वाटांवर वास्तव्य करून ओल धरणाऱ्या आडोशाची पावती घ्यावी लागते असा विरोधाभास येथे स्पष्ट झाला आहे. येथे जगणाऱ्यांची आयुष्ये बुटाच्या तळ्यासारखी झिजत असतात.

झिजते आयुष्य बुटाच्या तळव्यासारखे
फ्यूज उडाल्यासारखी खचतात क्षणाची वारुळे
तरी माणूस आपला जात असतो रडतखडत
माहीत असल्यानसलेल्या ज्ञातअज्ञात वाटांनी

अशाप्रकारे क्षुद्रपणाचे जगणे माणसाच्या वाटयाला आले आहे. रडतखडत, ज्ञातअज्ञात वाटांनी त्याला आपले आयुष्य पुढे ढकलावे लागते. ही जगण्याची धडपड आणि तडफड पाहून कवीमन मानसिक प्रक्षोभासह विद्रोहाने पेटून उठते.

एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली
साल्या तुकडाभर भाकरीसाठी गाडीभर लाकडं फोडशील काय?

चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसशील काय?...
बापाच्या बिडीकाडीसाठी भावाबहिणीची हाडके झिजवशील?
त्याच्या दारुच्या घोटासाठी भडवेगिरी करशील?
बाप्पा रे, देवबाप्पा रे! तुला ते जमणारच नाही
त्यासाठी पाहिजे अपमानित मातीत राबणारी
प्रेम करणारी मायमाऊली.....

या अभिव्यक्तीने मेश्रामांच्या कवितेला सामाजिक परिमाण प्राप्त करून दिले आहेत. परमेश्वराला आईवरून शिवी देणारा हा बंडखोर आविष्कार आहे. परमेश्वराला सवाल करणारी ही अभिव्यक्ती परमेश्वराच्या नकारासाठीच अवतरली आहे. परमेश्वराने कोणाचेही भले केले नाही असाच भाव येथे सूचित झाला आहे. त्याचबरोबर तुकडाभर भाकरीसाठी दलिताना उपसावे लागणारे कष्ट, झिजवावी लागणारी हाडं, जगावे लागलेले अपमानित जिणे असा दलित जगाचा वेदनादायी प्रवासही सूचित झाला आहे.

एकंदरीत केशव मेश्राम यांची कविता निर्भरशील वृत्तीकडून सामाजिक भानाकडे प्रवास करणारी आहे असे दिसून येते. 'मी अपमानित माझ्या गावी निरर्थक शब्द जपतो म्हणून' असे म्हणणारा हा कवी समूहाच्या अपमानित जगण्याचे विदारक चित्र अधोरेखित करतो. त्यामुळे त्यांच्या कवितेने सामाजिक बांधिलकीशी आपले नाते जोडले आहे असे म्हणता येते. राजकारणातील स्वार्थी प्रवृत्तीचे, पुरोगामित्वाचे पांघरलेले नकाब फाडण्याचे कार्यही मेश्रामांच्या कवितेने पार पाडले आहे.

रंगमंचावर मी पाय टाकताच डफावर थाप पडली
झाडाझाडावर लटकलेली वटवाघुळे दचकली
झाडातील जुनजुनाट काजवे दचकून उडाले
त्यांचे कुल्ले झगमगले साऱ्यांना उजेडच वाटला
माझ्या पहिल्या एंट्रीलाच अंधार टर्कन फाटला

उपरोधिक पद्धतीने बेगडी प्रवृत्तीचा बुरखा फाडण्याचे काम ही कविता करते. ''हक्कासाठी संघटित होणाऱ्या समाजाबद्दल आपल्यालाही किती आस्था आहे हे जाहीर करणे हा तर पोटभरू संघटकांचा राजकारणातला पवित्रा असतो. मनात धुमसणारा संताप, त्यातून उभारल्या जाणाऱ्या चळवळी आणि त्यांना पांठिबा देताना, त्यांचे समर्थन करताना उडणारी खोटया लोकांची त्रेधातिरपट याचे उपरोधपूर्ण चित्र या कवितेतून आले आहे.'' [३१] वस्त्राआडची कुरूपता उघडी करण्यासाठी या कवितेत अंधार ही प्रतिमा अर्थपूर्ण ठरली आहे. त्यातून स्वार्थी आणि पोटभरू राजकारण्यांची तकलादू भूमिका स्पष्ट होते.

थोडक्यात, केशव मेश्राम यांची कविता संमिश्र स्वरूपाची आहे. प्रारंभीची त्यांची कविता निर्भरशील संवेदनशीलतेची आहे. दलित साहित्य चळवळीच्या रेटयातून त्यांच्या जाणिवा बदलत गेल्या त्यानंतर त्यांची कविता समाजाभिमुख होत गेली. मेश्राम यांच्या कवितेने सामाजिक जीवनाचा वेध घेतला आहे. अभावग्रस्तांच्या जगाचे विदारक चित्र साकार केले आहे. त्यातून जगण्याच्या कळवळ्याची सामूहिक प्रतिमा गोचर झाली आहे. मानसिक प्रक्षोभासह या कवितेने विद्रोह प्रकट केला आहे. परमेश्वराला नकार दिला आहे. सामाजिक बांधिलकीशी नाते जोडणाऱ्या या कवितेने स्वार्थी आणि पोटभरू राजकारण्यांचा बुरखा फाडण्याचे कार्य पार पाडले आहे.

✸ अर्जुन डांगळे (जन्म १५ जून १९४५)

१९७१-८० हे दशक साहित्य आणि चळवळ या दृष्टीने फार महत्त्वाचे ठरले. या दशकानेच दलित साहित्य

चळवळीचा एक रेटा निर्माण केला. कारण या काळातील लेखक कवी हे प्रत्यक्ष सामाजिक सांस्कृतिक चळवळीत सहभागी होते. जसे ते सभा संमेलन, मोर्च्यात रस्त्यावर उतरत होते, सामाजिक अन्यायाच्या विरोधात पेटून उठत होते, तेवढेच ते साहित्यनिर्मितीतही सक्रीय होते. समाज आणि साहित्यिक यांच्यातील घट्ट नाते याच काळात पाहावयास मिळते. अशा चळवळीत अग्रभागी असणारे कार्यकर्ते म्हणजे अर्जुन डांगळे. ते दलित पँथरच्या संस्थापकापैकी एक आहेत. दलित साहित्य संसदेचे कार्यवाह म्हणून त्यांनी काही काळ काम केले आहे. कथा, कविता आणि वैचारिक लेखन हा त्यांच्या साहित्याचा प्रांत आहे. 'दलित साहित्य : एक अभ्यास' हा अतिशय मौलिक ग्रंथ त्यांनी सिद्ध केला आहे. 'बांधावरची माणसं' हा त्यांचा कथासंग्रह असून या त्यांच्या Poisoned Bread संपादित ग्रंथाने दलित साहित्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण झाली.

छावणी हलते आहे हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९७७ साली प्रकाशित झाला. प्रत्यक्ष चळवळीत सक्रीय कार्यकर्त्याची लढाऊ वृत्ती कशी असते याचा प्रत्यय या कवितासंग्रहाने दिला आहे. हे शीर्षकही प्रतीकात्मक आणि सूचक आहे. लढाईसाठी आगेकुच केल्याची सूचना त्यातून मिळते. 'खंत' या कवितेतून आपली भूमिका ते स्पष्ट करताना दिसतात

त्यांचे गाणे : लचकणारे
भरजरी शामियान्यात दिलेल्या आध्यात्मवाल्यांच्या प्रवचनासारखे
माझे गाणे : सरळ भिडणारे
प्रचंड मोर्चाने दिलेल्या घोषणेसारखे
त्यांचे रस्ते परिकथेतले - पंख असलेले
डोळे झाकले की इच्छितस्थळी पोहचविणारे
माझे रस्ते चक्क रस्त्यासारखे
दगडधोंड्यांचे मातीशी जखडलेले

जातीय आणि भाषिक वर्चस्वाला मोडीत काढण्याची एक रीत दलित कवितेपासून सुरू झाली. वरील कवितेतील भाषेने समूहाच्या आवाजासारखे आपले गाणे असल्याचा निर्वाळा दिला आहे. तसेच 'त्यांच्या' गाण्याच्या भाषेचा उपहासही केला आहे. वास्तवाशी संबंध नसणारे परिकथेतल्यासाखे त्यांचे रस्ते आहेत. त्यांचे जग अवास्तव, कपोलकल्पितात रमणारे आहे. येथे प्रस्थापित साहित्य आणि भाषा यांचे स्वरूप सांगताना ते कसे दांभिक आणि सत्यापासून दूर जाणारे आहे हे स्पष्ट झाले आहे. याउलट सरळ भिडण्याचा स्वभाव असलेल्या गाण्यात अनेकांचा आवाज सामील असल्याचा प्रत्यय या कवितेतील भाषिक रूपातून येतो. लचकणारे आणि भिडणारे यातून अभिव्यक्तीमधील अंतर्विरोधही स्पष्ट होतो. थोडक्यात, प्रचंड मोर्च्याने दिलेल्या घोषणेसारखी दलित कवितेची अभिव्यक्ती आहे हे येथे स्पष्ट होते. डांगळे यांची कविता 'वास्तवाच्या उघड्या नागड्या रस्त्यावरून' चालणारी आहे. समूहाच्या वतीने ती व्यक्त होते. म्हणून 'स्व'च्या जगण्यासह समूहाच्या दु:खाला या कवितेने साद घातली आहे. दलितांच्या दु:खाला कारणीभूत ठरलेल्या व्यवस्थांना नकार दिला आहे. दलित कवितेतील नकार केवळ धर्म, संस्कृती, परंपरा, रुढी, आध्यात्म एवढ्यापुरताच मर्यादित नाही तर दलितेतरांनी निर्माण केलेले साहित्य, त्यांच्या अभिव्यक्तीच्या पद्धती यांनाही दलित कवितेने नाकारले आहे.

नसेल सापडत त्यांना माझ्या गाण्यात
त्यांच्याच भाषेत सांगायचे तर
गोळीबंद अनुभवाचा कलात्मक आविष्कार
नसेलही संबंध माझ्या गाण्याचा त्यांच्या मते
कलाकृतीच्या घाटाशी त्यांनी ठरविलेल्या आकृतीबंधाशी...
आपण आपले गाणे गात राहणार
त्यांचे काय ते गात असतात साहित्याचा इतिहास घडविण्यासाठी
आपण जगतो आहोत युगाचा इतिहास घडविण्यासाठी

गोळीबंद अनुभवाचा कलात्मक आविष्कार, कलाकृतीचा घाट, आकृतीबंध ह्या संकल्पना किंवा परिभाषा कलावाद्यांनी ठरवून दिल्या आहेत आणि अभिव्यक्तीला एका चौकटीत बंदिस्त केले. ह्या चौकटीला नाकारणारी जाणीव येथे मुखरीत केली आहे. कलावादी व्यवस्थेच्या संकल्पना नाकारून, त्यांच्या केवळ साहित्याचा इतिहास घडविणाऱ्या कुटिरोद्योगाला नकार देऊन आपण जगतो आहोत युगाचा इतिहास घडविण्यासाठी ही जाणीव व्यक्त झाली आहे. एक गाणे लचकणारे, आध्यात्मवाल्याच्या प्रवचनासारखे असते तर दुसरे सरळ भिडणारे, प्रचंड मोर्च्याने दिलेल्या घोषणेसारखे असते हा मूलभूत फरक अभिव्यक्तीचा असल्यामुळे हा नकार अधिक तीव्र होतो. एकीकडे कलावादातून आलेली चौकटीतील कारागिरी आहे तर दुसरीकडे चळवळीने घडविलेल्या जाणिवेतून आलेली जीवनवादी जबाबदारी आहे. डांगळे यांची कविता जीवनवादी जबाबदारी पार पाडणारी आहे. हा कवी चळवळीच्या रणमैदानात उभा आहे. म्हणून त्याच्या कवितेने लढ्याचा पवित्रा घेतला आहे. भूकेकंगालाचा जुलूस होऊन गाण्याचे आवाहन त्यांची कविता करताना दिसते,

तू गात रहा भर चौकात
इथल्या सप्तसुरात न बसणारे तुझे गाणे
ठेवता येणार नाही तुला तुझ्या डायरीत झुळुकांची नोंद
ठेवावा लागेल फक्त वादळांचाच हिशोब
तू गात रहा भुके कंगालाचा जुलूस होऊन
तू गात रहा - मुक्तिवाहिनी किंवा व्हिएतनामी होऊन
तू गात रहा चवदार तळ्याचा सत्याग्रह होऊन

चळवळीतील सैनिकाची अस्मिता जागविणारी प्रतिमा येथे सिद्ध झाली आहे. ही सैनिकाची आवाहक प्रतिमा आहे. ऐतिहासिक घटिताच्या लढाऊ स्मृती सैनिकांना पाठबळ देणाऱ्या आहेत. विद्रोहाचा स्वर येथे प्रकट झाला आहे. कारण वादळाचा हिशेब' ठेवण्याचे आवाहन येथे आहे. युगाचा इतिहास घडविण्यासाठी कोणती कृतिशीलता अपरिहार्य आहे यासंबंधी विद्रोहाची दिशा इथे दाखविली आहे. हा विद्रोहही सामुहिकरित्या करावयाचा आहे.

आमच्या व्यथांचा जथा
येत आहे सडक ओलांडून सपाट मैदानावर
ओठात ओवून नकार डोळ्यात त्याच्या आहे अंगार
देणार आहे टक्कर या संस्कृतीच्या जुनाट बुरुजावर
कदाचित नाही पडणार खिंडार, होईल रक्तबंबाळ
राहील फक्त वेदनाच माथी,
जगू शकतो घेऊन हा वेदनांचा भार
कारण आम्ही युगानयुगाचे दु:खाचे बलुतेदार

व्यथावेदनाच विद्रोहाला जन्म देते. हे समूहाच्या पातळीवर घडते. समूहामध्ये लढाऊ बाणा जन्माला येतो आणि समूह युद्धमान होतो. नकार आणि विद्रोहासाठी चळवळीच्या पार्श्वभूमीवर, चळवळीच्या भानातून संघर्षाच्या प्रतिमा दलित कवितेत सिद्ध झाल्या आहेत. डांगळे यांच्या कवितेने अशा अनेक प्रतिमा दलित कवितेच्या प्रांताला दिल्या आहेत. वेदना, यातना ही बाब दलितांसाठी नवी नाही. युगानुयुगे त्यांच्या वाटयाला वेदनाच आलेल्या आहेत. म्हणून संघर्षाची भिती त्यांना वाटत नाही. संस्कृतीच्या जुनाट बुरुजावर रक्तबंबाळ होइस्तोवर धडका देण्याचे बळ त्यांच्यात आले आहे. कारण दलितमनाचे आत्मभान जागृत झाले आहे. स्वत्व असलेल्या जगण्यासाठी हे मन आसुसले आहे. संघर्षातूनच आपण यशस्वी होऊ असा त्यांना ठाम विश्वास आहे. म्हणून

आभाळाएवढ्या दोन डोळ्यांनी
जिंदगीभर अश्रू ढाळावेत किंवा...
कोटीकोटी चैतन्यमय हातांनी

संघर्षशील होऊन अविरत जंग करावे

दु:ख, दैन्य, दास्यावर मात करावयाची असेल तर 'अविरत जंग' हाच मार्ग त्याने स्वीकारला आहे. म्हणून कवी जुनाट संस्कृतीला आव्हान देत स्वकीयांना, समूहमनाला आवाहन करतो.

देव-देश-धर्म-जात-वर्ण यांच्या जडशीळ बेड्यात
तू स्वत:ला आणखीन किती दिवस अडकवणार...
आता तुझ्या मुर्दाड मनातून ठिणग्या फुलू देत
आता तुझ्या रुख्या सुख्या ओठातून ज्वाळा निघू देत
आता तुझ्या रुतलेल्या पावलांना चाके फुटू देत
आता तुझ्या हातातील बेड्या कडाकड तुटू देत

अशाप्रकारे प्रतिगामी शक्तीविरुद्ध पेटून उठण्याची चेतना जागृत करण्याचे कार्य ही कविता करते. कवितेतील विद्रोह कृतिशील मार्गावर आरुढ होणारा आहे. माणुसकीच्या हक्कासाठी ती तत्पर आहे. भालचंद्र फडके यांच्या मते, ''माणुसकीच्या हक्कासाठी चाललेल्या पँथरच्या लढ्यात जन्मलेली कविता हे तिचे भूषण आहे. पँथरच्या लढाऊ सैनिकाची छावणी हलणारच आणि संघर्षाचा पवित्रा घेणारच.''[३२] या मतानुसार संघर्षशील समूहमन जागृत ठेवण्याचे, छावणी हलती ठेवण्याचे काम या कवितेने केले आहे.

आंबेडकरकालीन चळवळीत दलित मने संघर्षाने पेटून उठली होती, निष्ठावंत कार्यकर्त्यांची फौज निर्माण झाली होती. आंबेडकरोत्तर काळात मात्र चळवळीचे स्वरूप बदलत गेले. निष्ठा हळूहळू बदलत गेल्या. चळवळीच्या संदर्भात भूतकाळ आणि वर्तमान अशा दोन्ही काळाचा वेध डांगळे यांच्या कवितेने घेतला आहे. त्यातून समकालीन समूहाच्या प्रवृत्तीचा प्रत्यय येतो. उदा.

गावकुसाबाहेरील निश्चल वस्तीत तू येऊन गरजलास
सारी वस्ती खडबडली, धूळ झटकीत सावध झाली
तू पुढे निघालास,
तुझ्या हाती होता धगधगता हिलाल
हादरून गेले होते सगळे काळोखाचे दलाल.....
ज्या हातावर सोपवून गेला होतास तळे
ते सगळेच हात थोटे निघाले

आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा इतिहास येथे अधोरेखित झाला आहे. धगधगता हिलाल धारण करणारे आंबेडकरी 'हात', पाण्याला स्पर्श करणारे आंबेडकरी 'हात' आणि संघर्षासाठी उभारलेले सामर्थ्यशाली 'हात' या साऱ्या हातांमुळेच चवदार तळ्यालाही स्फोटकपणाचे परिमाण प्राप्त झाले. संघर्ष म्हणजे स्फोटकता असे या लढ्याला एक नवेच रूपक प्राप्त झाले. तळ्यातील पाण्याला आंबेडकरी हातानी स्पर्श केल्यामुळे विद्रोहाचे पाणी पेटले. विद्रोहाचे पाणी पेटविण्याचे सामर्थ्य ज्या हाताहाताना म्हणजे समूहाला बाबासाहेब आंबेडकरांनी प्राप्त करून दिले होते, त्यांच्या निर्वाणानंतर हे स्फोटक हात थिटे झाले. आंबेडकरी संघर्षापासून दुरावलेल्या समूहाच्या वृत्तीचा चेहरा या कवितेने स्पष्ट केला आहे. समकालीन जीवनातील चळवळीचे विघटन किंवा संघर्षविन्मुखता कवीला येथे सांगावयाची आहे. कवीच्या दृष्टीने हे चित्र क्लेशदायक आहे. प्रतिमेच्या अंगाने विचार केल्यास धगधगता हिलाल हातात धारण केलेले 'आंबेडकर' आणि समूहाचे 'थोटे हात' या दोन प्रतिमांच्या माध्यमातून आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तरकालीन असे चित्र स्पष्ट होते. त्यामुळे या दोन्ही प्रतिमा कालसूचक ठरल्या आहेत. उपहास, उपरोध हे डांगळे यांच्या कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हा उपरोध व्यवस्थेविषयीचा जसा आहे तसाच स्वकीयांच्या संदर्भातही आहे. कवी हा कार्यकर्ता असल्यामुळे चळवळीविषयीचे त्याचे भान जागृत आहे.

गांडूच्या दिंडीत टाळ पिटीत फिरताना
जांघांच्या जंगलात बेभानपणे हरवताना
थैलीशहाचे इमानदार हुजरे होताना
इम्पोर्टेड कडब्यावर पोसले जाताना
दोस्तानो आपण आपल्या संदर्भाशी घट्ट बांधले जायला हवे
(कडब्याच्या लालचीने काही पळालेले त्यांचे असो)

सौदेबाजी राजकारणाला बळी पडणाऱ्या सहकाऱ्यांबद्दलचा उपहास येथे व्यक्त झाला आहे. 'कडब्याच्या लालचीने पळालेले' यांच्याबद्दलचा उपहास येथे आहे. फितूर झालेले, भोगवादात रममाण झालेले, पैशाला बळी पडलेले अशा लालची प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडण्याचे काम ही कविता करते. मात्र त्याच वेळेस आपण आपल्या संदर्भाशी घट्ट बांधले जायला हवे ही चळवळीतील भान जागृत ठेवणारी कार्यकर्त्याची भूमिका कवीने निर्देशित केली आहे. चळवळीतील चढउतार आणि कार्यकर्त्याची प्रवृत्ती यावर नेमका प्रकाश टाकला आहे. दलित कवितेने स्त्रीपुरुष नातेसंबंधांना एक वेगळा आयाम प्राप्त करून दिला आहे. आई-बाप-पत्नी-मुलगा-मुलगी अशा प्रतिमांचे एक वेगळे विश्व दलित कवितेत पाहावयास मिळते. रा.ग.जाधव यांनी त्यास कुटुंबकाव्य असे म्हटले आहे. डांगळे यांच्या कवितेतील आईबापाचे रूप खालीलप्रमाणे अधोरेखित होते.

हा चिऊचा हा काऊचा हा माऊचा
म्हणून घास भरविला नाही कुणी मला
निंबोणीच्या झाडामागे लपलेला चांदोमामाही
दाखविला नाही कुणी मला.....
रस्त्यावर भाजलेले माझे अनवाणी चिटुकले पाय
कोण होते गोंजारायला आणून डोळ्यात मायेची साय
लेबर कॅम्पच्या घेट्टोत आपला देह कसा वाढत गेला
खरोखरच अजूनही कळत नाही मला.....
यंत्राशी झुंज घेतलेला माझा पोलादी बाप
थकलेला भागलेला कागदी देहाचा होऊन येई
पाटावर डोके ठेवून पाय पत्र्याला लावून
घराच्या कौलाकडे पाहत चारमिनारचे झुरके घेई
अंधाराची चाहूल लागताच बाप खडबडून उठे
अभ्यास करा बाबासाहेबासारखं व्हा आमच्यागत सडू नका
बाप आमच्याकडे न बघता दाराकडे बघत डाफरत राही.....
रणरणत्या उन्हाच्या छाताडावर पाय ठेवून धारावीच्या कचरपट्टीत
गळ्यात गोणपाट अडकवून लोखंड-काच-लाकडे वेचणारी आई
पोट जाळण्यासाठी लोखंड काच अब्दुल भंगारवाल्याला विकी
अन चुलीला जाळण्यासाठी लाकडे घरी घेऊन येई
चुलीतली लाकडे फुंकत आई आमचा अभ्यास बघत राही
धुर नसताना देखिल उगाचच तिच्या डोळ्यात पाणी वाही

या कवितेत कवीने आपले चरित्रच उभे केले आहे. वेदनादायी बालपण कवीने चित्रित केले आहे. मुंबईसारख्या महानगरात लेबर कॅम्पच्या घेट्टोत म्हणजे बकाल वस्तीत आपण कसे वाढत गेलो याविषयी कविला अचंबा वाटतो. एकूण कौटुंबिक, सांपत्तिक आणि सामाजिक स्थितीगतीचे चित्र येथे रेखाटले आहे. आईच्या भावपूर्ण प्रतिमेतून दलित जगण्याचे

प्रतिबिंब उमटले आहे. जीवनाची कुरूपता त्यातून प्रत्ययाला येते. या कवितेतील आई पोट जाळण्यासाठी लोखंड काचं वेचून त्याची भंगारवाल्याकडे विक्री करणारी. त्या मोबदल्यातून संसार चालवणारी, चुलीतील लाकडे फुंकताना मुलांचा अभ्यास पाहणारी अशी आईची प्रतिमा येथे साकार झाली आहे. 'धूर नसताना देखील उगाचच तिच्या डोळ्यात पाणी वाही' हे आईचे रूप मराठी कवितेतील आईपेक्षा मूलतः भिन्न आहे. दारिद्र्याच्या स्थितीतून दुःखाला सामोरे जाण्यातून हे उगाचच तिच्या डोळ्यात येणारे पाणी आहे. या तिच्या रूपामुळे कुटुंब आणि पोराबाळांवरील मायेसह दुःखीकष्टी मनाची हतबलता स्पष्ट करणारी आई अशी कारुण्यमय प्रतिमा अधिक अर्थपूर्ण आणि वास्तवदर्शी ठरली आहे. कारखान्यात काम करणारा, मुलांनी बाबासाहेब आंबेडकरांसारखे शिकून मोठे होण्याची आस बाळगणारा बाप येथे चित्रित झाला आहे. यंत्राशी झुंज घेणारा पोलादी बाप असून या झुंजीनेच पोलादी बाप 'कागदी देहाचा' झाला आहे. यातून कष्टाने माणसाच्या देहाचे झालेले पिचलेपण स्पष्ट होते. त्याच्या वाटयाला शिक्षण आणि अभ्यास न आल्यामुळे जिंदगीच्या सडकेपणाचा अनुभव सोबतीला आहे. म्हणूनच मुलांनी बाबासाहेबासारखे व्हावे याचे भान बाळगणारा हा बाप आहे. यंत्राशी झुंज घेणारा पोलादी बाप आणि रणरणत्या उन्हाच्या छाताडावर पाय देऊन कचरपट्टीला सामोरे जाणारी आई या दोन्ही प्रतिमांमधील समान दुवा म्हणजे पोटासाठी कष्ट हाच आहे. म्हणून कष्ट आणि दारिद्र्याच्या वास्तवातूनच दलित कवितेत 'आई-बाप' ही प्रतिमा साकार झाली असे म्हणता येते

मी कुठेही असेन, तोडू शकत नाही त्याच्याशी नाळ
माझ्या स्वागतासाठी सज्ज आहे, प्रकाशमान भविष्यकाळ

अशाप्रकारे नात्यागोत्याशी असलेली बांधिलकीची भावना कवीने व्यक्त केली आहे आणि आपला भविष्यकाळ प्रकाशमान असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

सारांश, अर्जुन डांगळे यांच्या कवितेतून लढाईसाठी आगेकुच केल्याची सूचना मिळते. स्व आणि स्वकीयांच्या दुःखाला साद घातली आहे. दलितांच्या दुःखाला कारणीभूत ठरलेल्या प्रस्थापित व्यवस्थांना या कवितेने नकार दिला आहे. दलितेतरांनी निर्माण केले साहित्य, त्यांच्या अभिव्यक्ती पद्धती यांनाही या कवितेने नाकारले आहे आणि जीवनवादी जबाबदारी स्वीकारली आहे. लढ्याच्या पावित्र्यात उभ्या असलेल्या युगाचा इतिहास घडविण्यासाठी विद्रोहाची दिशा दाखविली आहे. चळवळीच्या भानातून संघर्षाच्या प्रतिमा सिद्ध केल्या आहेत. जुनाट संस्कृतीला आव्हान देण्यासाठी समूहाला आवाहन करणारी ही कविता असून माणुसकीच्या हक्कासाठी ती तत्पर आहे. आंबेडकरी चळवळीच्या संदर्भात भूतकाळ आणि वर्तमान अशा दोन्ही काळाचा वेध घेतला असून, चळवळीतील चढउतार आणि कार्यकर्त्यांची प्रवृत्ती यावर प्रकाश टाकला आहे. उपरोध हे या कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अर्जुन डांगळे यांनी आपल्या चरित्रासह कौटुंबिक, सांपत्तिक आणि सामाजिक स्थितीगतीचे चित्र आपल्या कवितेतून रेखाटले आहे. त्यांच्या कवितेतील आई-बाप ही वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा असून ही प्रतिमा कष्ट आणि दारिद्र्याच्या वास्तवातून साकार झाली आहे.

✸ राजा ढाले (जन्म ३० ऑक्टोबर १९४०)

राजा ढाले हे आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य नाव आहे. दलित पँथर, मास मुव्हमेंट, आंबेडकरी वा दलित साहित्याची चळवळ इ. सर्व चळवळीच्या केंद्रस्थानी राजा ढाले या नावाने आपली प्रखर मुद्रा उमटवली आहे. **अस्तित्वाच्या रेषा**[३३] या ज.वि.पवार संपादित ग्रंथात राजा ढाले यांचे विविधांगी साहित्य प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यातील काव्य विभागात त्यांच्या कविता आहेत. त्यात प्रामुख्याने बालगीते, स्थितीच्या कविता, इतर कविता, गेय रचना तसेच अनुवादित कवितांमध्ये काळ्या कविता, गुजराती दलित कविता, प्राचीन इजिप्शीयन प्रेमगीते, धम्मपदातील काही पदे इत्यादींचा समावेश आहे. हा सर्व काव्यसंभार साधारणतः १९६१ ते १९८३ या कालखंडातील आहे.

प्रारंभीच्या काळातील राजा ढाले यांच्या कविता लघुअनियतकालिकांच्या चळवळीशी संबंधित आहेत. **स्थितीच्या कविता १९६८** या शीर्षकाखाली रात्र, पाऊस, कातरवेळ, बाग, खिडकी या शीर्षकाच्या वेगवेगळ्या मूडच्या

कविता पाहावयास मिळतात. आयुष्याच्या विविध स्थितीचे दर्शन त्यातून घडते. या कविता स्वच्छंदतावादाच्या अंगानेच विकसीत झाल्या आहेत असे प्रत्ययाला येते. इतर काही कविता बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व, व्यक्तित्व, कर्तृत्व यांचेशी निगडीत आहेत. ढाले यांच्या या रचना गेय स्वरूपाच्या आहेत. याच काळात इतर अनेक कवी बुद्ध-भीम गीते लिहित होते. वामनदादा कर्डक यांचेपासून ही परंपरा सांगता येते.

राजा ढाले यांच्या गेय रचनांमधून साकारलेली रूपकात्मकता वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. त्यांच्या कवितेत रान, फुल, फळ, पान, नभ, भुई, बाग अशा निसर्गप्रतिमा उपयोजित झाल्या आहेत. या प्रतिमा अनुक्रमे जीव, नजर, पुस्तक, वेदना, चिंतन इत्यादी गोष्टींशी जोडून येतात. त्या माध्यमातून आंबेडकरी कर्तृत्वामुळे मुक्तीचा आनंद उपभोगता आला ही जाणीव व्यक्त होते. कळ्यांच्या पहाटे' या रचनेतून अंतरंगातील भावास्थितीचे दर्शन कवीने घडविले आहे.

कळ्यांच्या पहाटे फुलांच्या सकाळी
अंतरंग होते भूपाळी... भूपाळी...
सूर प्रार्थनेचे दूर अंतराळी
मिटल्या लोचनी दिवाळी... दिवाळी
स्वयंदीप होतो देह अशावेळी
दिसू लागे बुद्ध लेणीयांच्या ओळी...

दूरवर आसमंतात घुमणाऱ्या बुद्ध वंदनेचे सूर मिटल्या नेत्रानी अंतरंगात भरून घेताना जणू देहच प्रकाशमान झाला आहे अशी 'कळ्यांच्या पाहटे'ची अनुभूती आहे. कळ्यांची विकसनशीलता म्हणजे धुक्याचे पटल दूर सारले जाते आणि पाकळी पाकळी सुगंधात न्हाऊन निघते. अंतराळातील प्रार्थनेचे सूर, कळ्यांचे विकसन, उमलत येणारी धुक्याची पोकळी आणि बुद्ध लेण्यांची रांग अशा चार स्थितींच्या पार्श्वभूमीवर मनात घडणाऱ्या उल्हसित वृत्तीचे दर्शन घडते. प्रभातकाळी भूपाळी कानावर पडताच त्या स्वराने मन प्रसन्न व्हावे आणि प्रार्थनेच्या सूरांनी मन सुखाने न्हाऊन निघावे अशा प्रसन्नचित्त वृत्तीची अनुभूती या कवितेने घडविली आहे.

'तुझ्या गीतांचा मला फुलोरा' या रचनेतूनही विशिष्ट अशा मनोवृत्तीचे दर्शन घडताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकररूपी प्रकाशगीतातूनच जीवनाची दिशा मिळते. अंधाराच्या वाटेवर उजेडाचे दिवे लागतात. आंबेडकरांचे रूप असे आहे, की उंचच उंच गगनाची भव्यता त्यातून दिग्दर्शित होते. त्यांची सावली म्हणजे जणूकाही आकाशाने जन्माला घातलेली, स्मितहास्य करीत उदयाला आलेली पहाटच आहे. 'निशब्द रानातून झाडाखाली विसावणारा चंद्र' असे हे आंबेडकरी रूप आहे. मुक्या रानात, मुक्या मनाच्या झाडाखाली चंद्र उतरला, मनाची पोकळी त्याच्या चांदण्याने भरून निघाली. त्याच्या ध्यासाने चिंतनाचा प्रवाह आता मनातून ओसंडून वाहत असतो. आंबेडकररूपी प्रकाशाचे गाव सापडल्यामुळे युगायुगाचा अंधार नाहीसा झाला. जीवन उजळून निघाले.

युगायुगाच्या अंधारातून गाव तुझे लागले...
पिऊन वारा... अंतर- पक्षी देहातून जागले...
अंतराळली मने आमुची विसरून तृष्णाकाळ...

युगानुयुगे अंधाराच्या वाटचालीत प्रकाशाचे गाव दिसले नव्हते. आता ते दिसले, भेटले म्हणून आंबेडकरी विचारांचा वारा भरून घेतल्यामुळे अंत:करणातील पक्षी तनामनातून जागृत झाले. तृष्णेचा विसर पडला आणि मन विशाल झाले. असा हा आंबेडकरी व्यक्तित्व आणि कर्तृत्वाचा फुलोरा फुलविला आहे. या गीतांच्या झोपाळ्यावर आता शांत चित्ताने झोप लागते. बुद्धनामाचा घोष मनातून काठोकाठ ओसंडून वाहतो. 'शीळ मुक्ततेची' यासारख्या रचनेतूनही एका भावस्थितीचे दर्शन घडविले आहे. आंबेडकरी कर्तृत्वामुळे समाजमनात जी सुखासीन मनोवृत्ती निर्माण झाली त्याचीच ही प्रातिनिधिक अभिव्यक्ती आहे.

रान हे जीवाचे केले भीमाने

केली उन्हाची सावली भीमाने...
दिले पंख आम्हा दिशाही नभाची
ओठावर आली शीळ मुक्ततेची
नभाला भुईशी आणिले भीमाने

जीवाचे रान करून रखरखीत समाजमनावर छत्र धरणारे आंबेडकरी रूप येथे पाहावयास मिळते. त्याचप्रमाणे ज्ञानप्राप्ती करून घेणारे ज्ञानासक्त आंबेडकर, कोटयावधी बांधवांच्या वेदनेशी एकरूप होणारे आंबेडकर, उभी हयात आपल्या घामाचे सिंचन करून ज्ञानरूपी बाग फुलविणारे आंबेडकर अशी विविध रूपे प्रत्ययाला येतात. आंबेडकरी कर्तृत्वामुळेच या बागेतील चिंतनाची गोडफळे आम्ही अतिशय आदराने चाखतो असे कवीने म्हटले आहे. ही एक सामाजिक, सामूहिक, सुखाशीन मनोवृत्ती आहे. अफाट तत्त्वाच्या दिशेने उडण्याचे बळ देणारे आंबेडकर, आभाळाला जमिनीवर आणणारे आंबेडकर, ही आंबेडकरी रूपे आणि त्यांचा कर्तृत्वालेख पाहून 'ओठावर शीळ आली मुक्ततेची' ही अशी उल्हसित मनाची अवस्था येथे अधोरेखित होते. 'शीळ मुक्ततेची' ही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा आहे. आंबेडकरी व्यक्तित्व आणि कर्तृत्वामुळे समाजमनाच्या वाटयाला आलेल्या गोड फळाच्या आस्वादक मनाची ती मनस्वी प्रतिक्रियात्मक प्रतिमा ठरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय ही या देशाच्या इतिहासाला नवे वळण लावणारी घटना आहे. बाबासाहेबांच्या जन्मामुळे एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. नवी पहाट उगवली. 'आभाळाला पंख फुटे पालवीला शीळ' असे नवे मन्वंतर घडून आले. राजा ढाले यांची कविता मुक्तीचा आनंद उपभोगणाऱ्या समाजजीवनाचे मनोविश्व मुखरीत करते. भीमजन्मामुळे काय काय घडले असा एक उल्हसित वृत्तीने मांडलेला लेखाजोखा येथे पाहावयास मिळतो. या कवितेने बंदिवान समाजाचे रूपकात्मक वर्णन केले आहे.

युगेयुगे पिंजऱ्यात बंदिवान पाखरू
छाटलेले पंख त्याचे लागलेले ते झुरू
आज त्याचा संपला ग बंदिवास काळ
आभाळाला पंख फुटे पालवीला शीळ
जाहली सकाळ सखे जाहली सकाळ

बाबासाहेबांनी पिंजऱ्यातील पाखराला मुक्तीच्या आभाळात आणून सोडले. आंबेडकर म्हणजे मानवमुक्तीचे आंदोलनच होते. त्यांनी गुलामगिरीच्या विरोधात इरेला पेटून झुंज दिली.अशा झुंजार आंबेडकरांचे दर्शन या कवितेने घडविले आहे. त्याचप्रमाणे आंबेडकरवाणी आणि लेखणीचा तीक्ष्ण टोकदारपणाही चित्रित केला आहे. कोटयावधीचा उद्धार करणाऱ्या भीमाईच्या पुत्राचे अनोखे दर्शन राजा ढाले यांची कविता घडविते.

ना शिडी ... ना नाव कोठे... पायरी वा पंख
जन्मलेल्या त्याच मरणे ... कोठडीत निशंक!
भेदणारा ... हा मनोरा ... जातीपातीचा
जन्मला ग पुत्र ऐसा तो भीमाईचा
पांग ज्याने फेडिला गं कोटीकोटीचा

मूकपणे अन्याय सहन करून मृत्यूला कवटाळणाऱ्या, जातीपातीच्या चिरेबंद मनोऱ्यात बंदिस्त असलेल्या समाजाला मुक्तीच्या आभाळात आणून सोडणारा, चिरेबंदी व्यवस्थेला भेदणारा असा हा भीमाईचा पुत्र आहे. वर्णव्यवस्थेने आखून दिलेल्या चौकटीत विटाळ, बाट, भेदाभेद, अस्पृश्यता, ज्ञानाचा हिसकावून घेतलेला अधिकार अशा अवस्थेत समाजमन खितपत पडले होते.रुढीपरंपरांची जबरदस्त पकड होती.धर्म हे शोषणाचे केंद्र होते.अशा वेळी रुढ वाटेचा शिरस्ता मोडण्याचे काम भीमाईच्या पुत्राने केले. ज्या महू गावात आंबेडकरांचा जन्म झाला त्याच ठिकाणी भावी क्रांतीच्या लढ्यांचे मनसुबे रचल्या गेले आणि समाजाला गुलामीच्या पाशातून मुक्त करण्यात आले. असा हा मुक्तीदाता वर्णवर्चस्व

झुगारून देणारा, वर्णव्यवस्थेची चौकट उद्ध्वस्त करणारा, ताठ बाण्याने वर्णवर्चस्ववाद्यांशी टक्कर देणारा अशी भीमाची रूपे येथे साक्षात झाली आहेत. ढाले यांची कविता ही आंबेडकर दर्शनाची कविता आहे.

'तथागता मनात मी' या कवितेत स्वत:च्याच अंत:करणात बुद्धाचा शोध घेणारी जाणीव व्यक्त झाली आहे. कळीचे विकसन होऊन तिचे फुलात रूपांतर व्हावे असे बुद्धाचे फुलून येणारे रूप आहे. आभाळापेक्षाही मोठे अंत:करण म्हणून त्याच्यापुढे आभाळही लोपून जाते. जेव्हा बुद्धाने स्वत:च स्वत:कडे वळून पाहिले असेल तेव्हा त्यालाही असाच साक्षात्कार झाला असावा अशी कवी कल्पना येथे पाहावयास मिळते.

तुझ्या विशाल अंतरी ... आकाश लोपले
वळून तू ... तुझ्याकडे ... तुलाच पाहिले

अख्ख्या जगाला शांतीचा संदेश देणारा बुद्ध म्हणजे दिव्य विश्वशांतीचे प्रतीकच! विश्वबंधुत्वाची करुणामय मूर्ती म्हणजे बुद्ध. प्रकाशाचा वेध घेतानाच अहिंसेचे चांदणे पेरीत जाणारा निशस्त्र बुद्ध. असे हे थोर तत्त्व.येथे उच्चनीच भेदभावाला थारा नाही.

कुणीही नाही उच्च येथ ... कुणीही नीच ना
देव, स्वर्ग, नर्क ... सर्व, व्यर्थ वल्गना

सत्याला केवळ सत्य मानणारे असे हे निखळ तत्त्व आहे. तेथे काल्पनिक संज्ञा संकल्पना व्यर्थ ठरतात. तथागताच्या रूपाला सर्वस्वी सत्यानेच व्यापलेले आहे. अशा बुद्धाच्या रूपाला सर्वस्व वाहणारी कवीमनाची निर्व्याज भावना व्यक्त झाली आहे. आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य बुद्धाच्या सावलीत आहे. अफाटपणाला व्यापून उरणारे असे हे थोर व्यक्तीत्व आहे. पृथ्वीला झाकण्याचे आणि आभाळाला व्यापण्याचे असे हे महान सामर्थ्य आहे. दु:खाचा सखोल वेध घेणारी त्याची पापणी कार्यरत आहे. 'दिवापतंग प्रिती' ही तशी सर्वपरिचित कल्पना आहे. मात्र या संकल्पनेचा एक विपरीत अन्वय लावण्याचा प्रयत्न राजा ढाले यांच्या कवितेने केला आहे. ज्योतीवर झडप घातल्यानंतर आपण जळून खाक होणार हे पतंगाला माहीत असूनही तो ज्योतीवर झडप घालण्याचे सोडत नाही. अशाच प्रकारे इथल्या संस्कृतीपटलावर वावरणारे मानवी समूह रुढीच्या ज्योतीवर झेप घेऊन स्वत:ला जाळून घेण्यात दंग आहेत. अशा पार्श्वभूमीवर

जथे मानवाचे... जणू की पतंग
रुढी ज्योतीवरतीच... जाळण्यात दंग
तुझ्या दृष्टीची पात... ज्योतीस कापी
तुझी सावली... थोर... आकाशव्यापी

अशी कृती बुद्धाकडून घडते.तथागताच्या विज्ञाननिष्ठ दृष्टीच्या धारदार पात्याने रुढीरूपी ज्योतीला कापून काढले.बुद्धाने असा नवा दृष्टिकोन दिला. दलित पीडिताच्या मनाचा, दु:खाचा ठाव घेणारी मानवी मूल्याची खाणच जेथे दडलेली आहे. अशा मार्गदात्याने दाखविलेल्या मार्गावरूनच वाटचाल करणे श्रेयस्कर ठरणारे आहे. म्हणूनच बुद्धाचा धम्म चिरायू राहो.हा विश्वधम्म दिव्य रूपाने जगाच्या पाठीवर तळपत राहो अशी मनिषा कवितेतून व्यक्त झाली आहे. ज्याचे मन आणि वाणी निर्मळ आहे, वाऱ्याला भेदीत आसमंताला भारीत ज्याच्या गुणांची किर्तीरूपी दरवळ अनंतात पसरत जाते असे हे बुद्धरूपी सुमन! जगाला सन्मार्ग दाखविणाऱ्या, अज्ञानाच्या अंधकाराला भस्मसात करून दिप्तीमान होणाऱ्या स्वयंप्रकाशित बुद्धाला प्रेमाच्या दीपानी वंदन केले पाहिजे अशी निखळ श्रद्धेची भावना राजा ढाले यांची कविता व्यक्त करते. बुद्धाची ओळख बाबासाहेब आंबेडकरांमुळेच झाली.धम्मस्वीकारानंतर बुद्ध तत्त्वज्ञानाची ओळख विविध माध्यमातून समाजाला करून देणे ही अपरिहार्यता होती, काळाची गरज होती. ही गरज पूर्ण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राजा ढाले यांच्या कवितेने पार पाडले आहे.

महाराष्ट्रातील दलित कवितेने भारतीय दलित कवितेचे नेतृत्व केले आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.राजा

ढाले यांनी काही गुजराती कवितांचा अनुवाद केला आहे. गुजराती दलित कवितेतून दलित अस्मिता, आत्मशोध आणि प्रभावी संघर्ष अभिव्यक्त झाला आहे. मराठी दलित कविता आणि गुजराती दलित कविता यामधील हा समान धागा आहे. म्हणूनही ढाले यांनी हा अनुवाद केला असावा. अस्पृश्यता, राखीव जागा विरोधी आंदोलन, समकालीन जातीय मानसिकता असे अनेक विषय या कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत. **दलपत चौहाण** यांची कविता वाचताना सहजपणे वामन निंबाळकर, दया पवार यांच्या कवितेची आठवण होते.ऐंशीच्या दशकात गुजरातमध्ये आरक्षण विरोधी चळवळीने पेट घेतला होता.त्यावेळच्या दलितविरोधी तिरस्काराच्या तीव्रतर भावनेचे दर्शन **मधुर आनंद** यांच्या कवितेने घडविले आहे. **उषा मकवाणा** यांच्या कवितेने हरिलाच प्रश्न विचारून फक्त एकदाच हरिजन तरी बनून पहा असे आवाहन केले आहे. **नरसिंह परमार** यांच्या कवितेने हिंस्त्रतेच्या पार्श्वभूमीवर बुद्ध तत्त्वाच्या आचरणाची अपरिहार्यता व्यक्त केली आहे. जयंती मकवाणा यांची कविता अस्पृश्यतेच्या दाहकतेने वाचकांना हादरवून सोडते. उदा.

मेनहोलचं झाकण उघडताना भपकन येणारा
सहस्त्र सडलेल्या समृद्ध शवांचा सुवास
सुलट अंगाने उचललेलं मळाचं डबडं
मी दूर नागडा फिरणारा माझ्या पिढीचा वारसदार...
बस्स हेच आमच्याकरिता आरक्षण?
हॉटेलच्या पिछाडीला अलाहिदा ठेवलेला माझा
बादशाही कानतुटका कप!
आणि वृत्तपत्रांच्या पानावर
भंगी कष्टमुक्तीच्या भल्यामोठ्या जाहिराती...
माझ्या भिरुतेला ललकारत
मी केशव गांडा भंगी
(जयंती मकवाणा)

स्वतंत्र भारतातही भंग्याच्या वाटयाला नरक किंवा मैला वाहण्याशिवाय दुसरे काही येत नाही.ही मोठी शोकांतिका आहे. त्याच्यासाठी इतर कोणत्याही वाटा बंदच आहेत. भंग्याच्या कष्टाला पारावार नाही. पिढ्यानपिढ्या चालत आलेला वारसा पुढच्या पिढ्यांसाठीही राखीव आहे. नरकवासातून त्यांची सुटका नाही. दुसरीकडे या दु:खावर मिठ चोळणारी प्रवृत्ती म्हणजे भंगी कष्टमुक्तीच्या भल्यामोठ्या जाहिराती हा मोठा अंतर्विरोध आहे. सार्वजनिक जीवनात अलगता जोपासणारी, माणसाचा विटाळ बाळगणारी प्रवृत्ती कार्यरत आहे. अशाप्रकारे स्वतंत्र भारतातील दाहक सांस्कृतिक वास्तव वाचकांसमोर ठेवून गुजराती दलित कवितेने वाचकांना अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला आहे. या कवितांचा अनुवाद करून राजा ढाले यांनी गुजराती दलित कवितेची मौलीकता मराठी वाचकांसमोर ठेवली आहे.

काळ्या किंवा आफ्रोअमेरिकन कविता आणि दलित कविता यांच्यातील दु:खाचा स्वर सारखाच आहे. मात्र सांस्कृतिक पार्श्वभूमी वेगळी आहे. काळ्यांची कविता ही निषेध नकाराची कविता आहे. या कवितेला विद्रोहाची धार आहे. त्या व्यतिरीक्त या कवितेत Black is beautiful हे तत्त्व केंद्रस्थानी आहे. म्हणून काळ्या कविता दलित कवितेशी जवळीक साधणाऱ्या आहेत. श्वेतवर्णीय व्यवस्थेने काळ्यांवर लादलेल्या गुलामगिरीतून त्यांचा झालेला छळ आणि भारतीय संदर्भात चातुर्वर्ण्य व्यवस्थेने शूद्रातिशूद्रांवर, दलितांवर लादलेली गुलामगिरी व त्यातून त्यांचा झालेला छळ यात साम्य आहे. ते म्हणजे काळे आणि दलित हे व्यवस्थेचे बळी ठरले आहेत. गोऱ्यांनी काळ्यांवर आपली संस्कृती, भाषा या सर्व गोष्टी लादल्या.त्यातून काळ्यांचा वारसा हरवून गेला.म्हणून अमेरिकेतील काळे व भारतातील अस्पृश्य, दलित हे शोषित आहेत. म्हणून असे म्हणता येईल की, ब्लॅक पोएट्री आणि दलित कविता ह्या शोषित वर्गाच्या कविता आहेत. या कवितांमधून शोषितांचे दु:ख, दैन्य, दास्य यांचे जसे दर्शन घडते तसेच मुक्तीच्या मार्गशोधाचेही दर्शन घडते. म्हणून त्या मुक्तीचा मार्ग सांगणाऱ्या कविता आहेत.

लँगस्टन हयुजेस, सॅम्युएल ऍलन, रॉबर्ट हायडेन, फन्टोन जॉन्सन, फ्रॅन्क मार्शल डेव्हीस हे काळ्या कवितेच्या प्रांतातील अतिशय महत्त्वाचे कवी आहेत. त्यांच्या कवितेची ओळख राजा ढाले यांनी मराठी जगताला करून दिली आहे. **लँगस्टन हयुजेस** यांनी आपल्या कवितेतून काळ्यांची बलस्थाने आणि शक्ती याबाबत अभिमानाने सांगीतले आहे. काळ्यांनीच संस्कृतीला जन्म दिला आहे. हा कवी काळ्यांचे सामर्थ्य आणि शहाणपणाबाबत बोलतानाच स्वातंत्र्याची कथा सांगून जातो. त्याच्या कवितेने अमेरिकेतील वांशीक विषमतेचे दर्शन घडविले आहे आणि प्रचंड आशावादही व्यक्त केला आहे.

उद्या, मी बसेन टेबलाशी
जेव्हा लष्कराचे होईल आगमन
कुणीही धजावणार नाही सुनवायला
स्वयंपाक घरात जेव
तेव्हा मला, शिवाय ते पाहतील मला
मी किती देखणा आहे ते अन् शरमतील
मी सुद्धा आहे अमेरिका

उद्या गुलामगिरीच्या बेड्या तुटतील अन काळे स्वतंत्र होतील. समता येईल. विषमता पाळली जाणार नाही. कवी म्हणतो मी जरी काळा असलो तरी सुंदर आहे. हे तत्त्व मान्य होईल. **सॅम्युएल ऍलन** यांने गतकाळाचा इतिहास औपरोधिकपणे मांडला आहे. **फेन्टोन जॉन्सन** यांनी आपल्या कवितेतून काळे असल्याची जाणीव होण्यापेक्षा मरण बेहत्तर अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

माणूस जगात कुठेही असो, जर व्यवस्थेने त्याला गुलाम बनविले असेल, तो व्यवस्थेचा बळी ठरला असेल, त्याच्या बाजूने दलित कविता उभी राहते. वैश्विक दु:खाची जाणीव, दु:खाची सार्वत्रिकता भारतीय दलित कवितेत जशी पाहावयास मिळते तशीच ती काळ्या कवितेतही पाहावयास मिळते. दु:खाच्या सार्वत्रिकतेचा शोध घेण्याच्या जाणिवेतूनच राजा ढाले यांनी काळ्या कवितांचा अनुवाद केला आहे. भारतीय स्वातंत्र्याने पंचवीस वर्षे पूर्ण केली होती, त्या पार्श्वभूमीवर 'काळा स्वतंत्र्य दिन' या शीर्षकाचा राजा ढाले यांनी लिहिलेला लेख गाजला होता.हे सर्वपरिचित आहे. या काळाच्या पार्श्वभूमीवर ढाले यांनी काळ्या कवितांचा अनुवाद करणे ही समयोचित घटना आहे असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.

✸ यशवंत मनोहर (जन्म २६ मार्च १९४३)

यशवंत मनोहर हे दलित साहित्य क्षेत्रातील अग्रस्थानी असणारे नाव आहे. विविध वाङ्मयप्रकार त्यांनी समर्थपणे हाताळले आहेत. कवी, कादंबरीकार, निबंधलेखक, भाष्यकार, विचारवंत, समीक्षक, संपादक असे त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. **उत्थानगुंफा** हा त्यांचा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला १९७७ साली. दोन वर्षांतच त्याची दुसरी आवृत्तीही प्रसिद्ध झाली.

नामदेव ढसाळ यांच्या 'गोलपिठा'ने जशी साहित्यक्षेत्रात खळबळ उडवून दिली होती. तशीच खळबळ उत्थानगुंफाने उडवून दिली. विद्रोहाची दाहकता, स्फोटकपणा किती ताकदीने व्यक्त होऊ शकते हे या कवितेने दाखवून दिले. वाचकांमध्ये हा संग्रह जसा चर्चेचा विषय ठरला तेवढाच तो अभ्यासाचाही विषय ठरला.अनेक दिग्गज लेखकांनी, समीक्षकांनी विविधांगाने या कवितेची दखल घेतली आहे. सखोल चिंतनाची, स्फोटक विद्रोहाची, तत्त्वमीमांसक, मर्माग्राही विवेचन करणारी अशी ही कविता आहे. गतकालीन वेदनेचे, वर्तमान दु:खाचे स्वरूप अतिशय तीव्रपणे या कवितेने व्यक्त केले आहे. बुद्ध-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचे तात्त्विक अधिष्ठान असणाऱ्या या कवितेने प्रखर नकारासह विचारांचे झपाटलेपण सिद्ध करून वाचकांनाही झपाटून टाकले. 'आंबेडकरांच्या ओठांवर उगवलेला मी प्रलयंकारी सूर्य आहे' अशी गर्जना करीत ही कविता अवतरली आणि समाजपरिवर्तनाची आस बाळगत समाज, संस्कृती,

तत्त्वज्ञाने, शोषक व्यवस्था या सर्वांचा सखोल वेध घेत प्रस्थापित झाली. शब्द, कविता आणि कवितेचे ध्येय याविषयी कवीची एक विशिष्ट भूमिका आहे.

माझे शब्द नेसवीन मी माझ्या दु:खाला
निषिद्धांच्या भग्न अभंगाचे जळते त्रिकाळ
माझ्या शब्दात भिनलेले आहे
मी शिवू निघालो आहे माझ्या कवितेने
त्यांच्या छिन्नभिन्न आयुष्याचे भूतभविष्य वर्तमान
मी ठेवून दिले माझे ह्रदय त्यांच्या विपरीत मरणोत्सवात
जे कंदिलाप्रमाणे वेचत फिरते त्यांच्या डोळ्यात गुंतलेला अंधार
लक्षलक्ष हातानी दूर करू पाहते माझी कविता
त्यांच्यावर युगांपासून अंथरलेले बेदरकार पहाड

या कवितेतून करावयाची विद्रोही कृती स्पष्ट होते. दु:खाला शब्द नेसवण्याची एक वेगळी तऱ्हा येथे पाहावयास मिळते. देहावर वस्त्र परिधान करावे तसे दु:खाला देहाचे आणि शब्दाला वस्त्राचे रूप प्राप्त होते आणि या शब्दात 'निषिद्धांच्या भग्न अभंगाचे जळते त्रिकाळ भिनलेले' आहेत. भूत, भविष्य आणि वर्तमान अशा तीनही काळात जे निषिद्धांचे निर्बंध लादल्या गेले त्याविषयी एक प्रक्षुब्ध भावना शब्दात भिनली आहे. या तीनही काळात ज्यांची आयुष्ये भग्न, छिन्नविछिन्न करून टाकलेली आहेत ती आयुष्ये शिवण्याचे काम ही कविता करते. कविताच येथे प्रतिमात्म झाली आहे. कविता येथे फाटलेले जोडणाऱ्या सुईदोऱ्याचे रूप धारण करते. येथे कविताच विधायक व्रिद्रोहाची प्रतिमा ठरते.

स्वकीयांच्या विपरित मरणोत्सवात कवीने आपले हदय ठेवून दिले आहे. ते अंधाराचा गुंता सोडविण्यासाठी सज्ज झाले आहे. युगापासूनचे बेदरकार पहाड दूर करण्यासाठी लक्षलक्ष हात या कवितेला फुटले आहेत. असे सामर्थ्यवान रूप या कवितेच्या हाताला प्राप्त झाले आहे. पूर्वजापासूनच्या स्वत:च्या वर्तमानापर्यंतचा जळता आलेख नजरकैद असल्यामुळे तो जळता आलेख पुसून टाकून एका उजेडपर्वाचा आरंभ या कवितेला करावयाचा आहे. तेच तिचे कार्य आहे. कारण जळते त्रिकाळ, विपरीत मरणोत्सव, युगायुगापासून अंथरलेले बेदरकार पहाड ही इथल्या भूमीने दिलेली देणगी आहे. त्यामुळे सर्वव्यापी अंधाराने हैराण करणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच मुक्तीची दारे बंद होऊन गुलामी कायम झाली. धूर्त शतकांच्या जंगलात विखुरलेपणा आणि काळोख वाटयाला आला. अशाप्रकारे ही कविता इथल्या भूमीच्या नाकर्तेपणाचा साज वाचकाच्या मनावर चढवत जाते. त्रिकालाच्या स्व आणि स्वकीयांच्या प्रवासातील उग्रदाहक वास्तवाच्या दृश्यमानतेचे प्रखर विद्रोही, रौद्रभीषण प्रतिमाविश्व या कवितेत चित्रित झाले आहे. त्याद्वारे शब्द, शब्दाची ताकद, कवितेचे कार्य यासंबंधी कवीची भूमिका स्पष्ट झाली आहे. सामाजिक जीवन, समूहाचे जगणे, सामाजिक वेदना अनेक कवितांमधून खालीलप्रमाणे व्यक्त झाली आहे.

मी पाहतो मरणांचे थवे
संध्याकाळच्या सावल्यांना जेव्हा चढते भरती
मी पाहतो उन्हाचे ससंदर्भ कळप हिरवे कुरण चरणारे
मी पाहतो माझे लुत भरलेले भवताल
आचके देत मरणारे

येथे कवीच्या नजरेला दिसणारे वास्तव प्रतिमांकित अभिव्यक्तीतून मुखरीत झाले आहे. व्यक्तीमन समूहाशी, समूहाच्या जगण्याशी बांधल्या गेले म्हणजे कवितेतील 'मी' आणि समूह यांच्यातील सुखदु:ख, वेदना, जगण्याचा अनुभव यासंबंधात अभिन्नता प्रस्थापित होते. या कवितातील प्रतिमांमधून दु:ख, शोषण आणि मरण या अनुभवाचा सामाजिक संदर्भ स्पष्ट झाला आहे. 'लूत भरलेले भवताल' ही विकलांग सामूहिकतेचा निर्देश करणारी प्रतिमा आहे. समूहाच्या वाटयाला

पशूपातळीवरचे जगणे किंवा आचके देत मरण्याची वेळ येऊन ठेपली आहे. हे वास्तव तीव्रतेने वाचकाच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. अशाप्रकारे मनोहरांची कविता सामाजिक दु:खाचे, सामाजिक भोवतालाचे दारुण वास्तव अधोरेखित करते. असे जगणे आपल्या वाटयाला का आले? यामागे कोण आहे? दु:खाला कारणीभूत ठरणाऱ्या कारण परंपरांचा शोध मनोहरांची कविता घेते,

मी विचारतो नाव माझ्या जगण्याला शीर्षक देणाऱ्या पाखंड्याचे
मी विचारतो पत्ता सगळी पापाची संतान पाठीशी घालणाऱ्या
पक्षपाती शास्त्राचा / या सगळ्या लुटारुच्या अवलादीना
पोटाशी धरणाऱ्या हलाहलनिधी परमेश्वराचा

पाखंडी, पक्षपाती शास्त्रे ही सगळी लुटारुंची अवलाद पाठीशी घालणारा परमेश्वर आहे. अशा परमेश्वराचा समाचार घेणारी जाणीव येथे व्यक्त झाली आहे. माणसाचे जगणे अमानुष बनवणारा, त्याला अस्पृश्य ठरवणारा धर्म, धर्मग्रंथ, शास्त्रे जी माणसाला माणूसकीतून हद्दपार करतात. त्या सर्वांना जाब विचारणारी ही जाणीव आत्मशोधाची जाणीव आहे. मनोहरांच्या कवितेतील आशयाच्या केंद्रस्थानी असणारी ही जाणीव आहे. या जाणिवेनेच कवितेला नकाराचा आशय प्राप्त करून दिला आहे.

मी नाकारली माझी हाडे
मी उठलो त्यांच्या देवांच्या मुळावर
मी हसलो भेसूर त्यांच्या अडाणी तत्त्वज्ञानांना
मी धिक्कार केला विश्वविख्यात कमाईचा त्यांच्या

ईश्वरशाही, तिच्या नावावर पोट भरणाऱ्या पुरोहितशाही क्लृप्त्या, माणसाला गतिरुद्ध करणारी तत्त्वज्ञाने याविषयी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जी धर्मापासून धर्मग्रंथापर्यंत चिकित्सा केली त्याची पार्श्वभूमी या कवितेतील नकाराला आहे. त्यांचे देव, तत्त्वज्ञान, कमाई या साऱ्यांचा धिक्कार करणे म्हणजे एका अर्थाने त्यांची व्यवस्था हास्यास्पद ठरविणे होय. प्रस्थापित व्यवस्थेची मूल्यव्यवस्था हास्यास्पद ठरविणे अशी जाणीव या नकारामागे आहे.

'विद्रोह' हा मनोहरांच्या कवितेचा उल्लेखनिय असा प्रांत आहे. या विद्रोहानेच त्यांच्या कवितेला एक वेगळे सौंदर्य प्राप्त करून दिले आहे. बुद्धिप्रामाण्य, दंभस्फोटकता, प्रक्षुब्धता ही या विद्रोहाची खास वैशिष्ट्ये आहेत. विद्रोही मानसिकतेला बुद्धिप्रामाण्याचे मोल समजलेले असते. ही मानसिकता अन्यायी व्यवस्थेचे विश्लेषण करते. नवसमाजनिर्मितीचा विचार या विश्लेषणातून प्रगल्भपणे प्रकट झाला आहे. शब्द प्रामाण्याला नाकारताना विद्रोह कसा प्रकट होतो हे खालील कवितेतून प्रत्ययाला येते

शोभिवंत कुजकेपणाला तुम्ही म्हणता साहित्य
गुलामीला पशुत्वाला दीर्घायुष्य मागणाऱ्या
केवळ जरतारी शब्दांना दिपून तुम्ही महाकवी म्हणता
तुम्ही करता पूजा पुष्पावगुंठीत घाणीची आणि
अठरा विश्वे दारिद्र्याला गोष्ट सांगता राजा आणि राणीची

या कवितेत माणसाला गुलामीच्या अवस्थेत ठेवून पशूपातळीवर ठेवू पाहणाऱ्या साहित्य आणि ग्रंथाविषयीचा, त्या ग्रंथातील विचार कल्पनांना पूज्यनीय मानणाऱ्या प्रवृत्तीविषयीचा अतिशय कडवट उपरोध व्यक्त झाला आहे. ज्या साहित्याचा दारिद्र्यात जीवन कंठणाऱ्यांना काडीचाही उपयोग नाही, मात्र त्या साहित्यातून अशा आयुष्याच्या जखमेवर मिठच चोळले जाईल अशा छळवादी प्रवृत्तीवर आसूड ओढण्याचे कार्य या कवितेने केले आहे.

विद्रोही मन येथे स्वकीयांच्या बाजूने उभे आहे. त्याचवेळेस स्वेतर हे कसे कावेबाज आणि अमानुष श्रद्धांचे भोक्ते आहेत याविषयीची सूचना मिळते. गुलामीचे विचार प्रसृत करणाऱ्यांचा महाकवी म्हणून गौरव करणे, भुकेकंगालाना

राजाराणीची गोष्ट सांगणे अशी स्वेतरांची श्रद्धा आहे. या श्रद्धांवर हल्ला करणारी विद्रोही जाणीव येथे प्रकट झाली आहे. विद्रोही मनाच्या दृष्टीने माणसाला पशुपातळीवर पोहचविणारा विचार किंवा तत्त्वज्ञान 'पुष्पावगुंठीत घाण' अशा स्वरूपाचे आहे. अशा 'पुष्पावगुंठीत घाणी'ची पूजा वाहणारे मन हे शब्दप्रामाण्यवादी परंपरेचे आहे. विद्रोही मन हे अठराविश्वे दारिद्र्याचे प्रतिनिधी आहे. तर शब्दप्रामाण्यावादी मन हे अठराविश्वे दारिद्र्याच्या जगाला राजाराणीची गोष्ट सांगणारे आहे. त्यामुळे शब्दप्रामाण्यवादी व्यवस्थेचे डावपेच आणि अन्यायाची युक्ती विद्रोही मनाने बुद्धीच्या कसोटीवर तपासून घेतली आहे. त्यामुळेच मानसिक पातळीवरील विद्रोह या ठिकाणी प्रकट झाला आहे. विद्रोही मन हे दंभस्फोट घडविण्याचे व्रत घेऊन जगत असते. दांभिकतेवर हल्लाबोल ही या मनाची कृतिशीलता असते. या कृतिशीलतेतून विघातक ते तुडविणे आणि उपकारक ते घडविणे घडत असते.

सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकुस घडवले
कपटी चांडाळ ते आहेत
ज्यांनी माणूसपण येथे शब्दातच सडवले
ज्या नियमांनी सृष्टीचा हा विदृप विकास सिद्ध झाला
त्यांचा मी जळजळीत निषेध करतो
ज्यांनी इथल्या सूर्याला दगडांनाही
ऐहिक स्वार्थासाठी आध्यात्माचे रंग दिले
संचित निश्चित केले
त्या हरामखोर परंपरांवर मी विद्ध्वंसाचा नांगर धरतो

या कवितेत प्रामुख्याने शोषक कल्पनांच्या माध्यमातून विघातक कृती करणारे, माणूसपणाला शब्दातच सडवणारे, ऐहिक स्वार्थासाठी आध्यात्माचा उपयोग करून घेणारे, विदृप विकास करणारे या साऱ्यांची दांभिकता चव्हाटयावर मांडण्याचा प्रयत्न दाहक अभिव्यक्तीतून केला आहे. विद्रोही मनाच्या दंभस्फोटक वृत्तीचा येथे पुरेसा प्रत्यय येतो. दलित कविता जसे वास्तवाचे एक दाहक चित्र रेखाटते तसे अदृश्य रूपातील शत्रूचे सूचनही करते. म्हणून येथे साकार झालेल्या अमूर्त संकल्पना शत्रूच्या किंवा विघातक घटितांच्या कर्त्यांच्या रूपात चित्रीत होतात. दंभस्फोटक वृत्तीतून अमानुष मूल्यव्यूहाचा भेद करण्यासाठी छेदक प्रतिमांचे उपयोजन दलित कवितेने केले आहे. 'विद्ध्वंसाचा नांगर' ही छेदक प्रतिमा आहे. जे विघातक आहे ते तुडविण्यासाठी 'विद्ध्वंसाचा नांगर' कार्यरत होतो आणि उपकारक ते घडविण्यासाठी 'जळजळीत निषेध' कार्यरत होतो असे निश्चितपणे म्हणता येते. विद्रोही मनाच्या दंभस्फोटक वृत्तीने विषमतामूलक जग आणि निषेधासाठी सज्ज असलेले जग अशा दोन जगाचे चित्र प्रतिमांच्या माध्यमातून रेखाटले आहे. हा विद्रोह आणि नकार आंबेडकरी विचार जाणिवेतून व्यक्त होताना दिसतो.

जीवनाची नग्नता झेंड्यासारखी हाती घेऊन
आजवरचे वंदनीय हिशेब नाकारावे लागतील
भारतीय परमात्म्याने डिक्लेअर केलेल्या गुलामासारखी
जीवनाची सर्व पंढ तत्त्वज्ञाने पुसावी लागतील

हिंदू धर्मांतर्गत देव, देवता, परमात्मा वगैरेच्या नावाखाली जी निर्बंधाची व्यवस्था कार्यरत होती. त्या निर्बंधाची सर्व गोळाबेरीज जी माणसाला गुलाम करणारी होती, ती गुलामी लादणारी सर्व तत्त्वज्ञाने पुसून टाकण्याचा निर्धार या कवितेने व्यक्त केला आहे. परंपरागत अमानुष तत्त्वज्ञानाची व्यवस्थाच उद्ध्वस्त केली पाहिजे असा विचार येथे स्पष्ट झाला आहे. हिंदू संस्कृतीने परमात्मा, आध्यात्म, मंदिरे या सर्व गोष्टींचा शस्त्र म्हणून वापर केला. या शस्त्राने मानवी जीवनावर नागवणूक, शोषण, झापडबंदपणा या विषाची पेरणी करून मानवी जीवनास जेरीस आणले. म्हणून अशा संस्कृतीला पूर्णत: नकार दिला जातो.

मला मान्य आहे फक्त आता
माझ्यापुढची अटळ युद्धभूमी
तिथे प्रथमच जमीनदोस्त होणारी तुमची संस्कृती
तुमचा परमात्मा, तुमचे आध्यात्म, तुमची मंदिरे

नकारातून अटळ युद्धाचा पवित्रा या कवितेने घेतला आहे. विद्रोही मन लढ्यासाठी सिद्ध झाले आहे. पारंपरीकता, गतकाळ आणि मूल्यांची आधुनिकता या द्वंद्वातून यशवंत मनोहर यांच्या कवितेत विद्रोह व्यक्त झाला आहे.

डोळ्यापुढे पेटून येतात अंधारगुहांचे महासागर
उपेक्षेने मारलेल्यांच्या अतृप्त अपेक्षांच्या ज्वाळा मनाच्या अवकाशभर
दिशा शिलगावितात माझ्या काळजाला
पूर्व पिढ्यातील सांगाड्याच्या तोडलेल्या हातानी
आजतागायतच्या वर्णांध न्यायाची सावत्र संतान
सांगते निर्घृण तुरुंगवासाची कथा
दाखवतात इथल्या पान्हाचोर संस्कृतीच्या गायीने
मारलेल्या लाथाचे अमिट व्रण, पाठीवरील ताजे रक्ताळ वळ
उमटलेले गाठाळ परंपरांच्या प्रहारानी / आक्रोशतात माझ्याभोवती
अंधारातच झोडपून मारलेले पोरके पोरके श्वास
तेव्हा औट हात देहातही उधाणून येतात
अनंत जिद्दी वादळे उत्थानासाठी

युगायुगापासून गुहाजीवनाच्या पातळीवरील अंधकारमय आयुष्य ज्या समूहाच्या वाटयाला आले तो गतकाळ या कवितेत उभा राहतो. गतकाळातील होरपळणारा अनुभव येथे व्यक्त झाला आहे. मनाला व्यापून उरणाऱ्या, भाजून काढणाऱ्या अनुभवाचे दिग्दर्शन येथे घडते. भूतकाळातील पूर्वपिढ्यांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या संस्कृतीने कसा तुरुंगवास पत्करायला भाग पाडले याचाही प्रत्यय येतो.परंपरेच्या प्रवाहानी पाठीवर रक्ताळ वळ उमटविले आहेत. या सर्वांचा आक्रोश विद्रोही मनाभोवती सुरू आहे. त्यामुळे अनंत जिद्दी वादळे उत्थानासाठी उधाणून येतात. इतिहासातील, भूतकाळातील, स्वकीयांच्या पूर्व पिढ्यांवर झालेला अन्याय, अत्याचार, उपेक्षा यासाठी कारणीभूत असलेल्या अन्यायजन्य प्रतिमाचे उपयोजन करून पारंपरीकतेविरुद्ध मूल्यांच्या आधुनिकतेचा संघर्ष या कवितेने चित्रित केला आहे. परंपरा आणि आधुनिकता असा हा संघर्ष आहे. देव, धर्मासह धर्मग्रंथ आणि प्रस्थापित साहित्याला यशवंत मनोहर यांच्या कवितेने प्रखर नकार दिला आहे. उदा

मी फासतो उकळते डांबर
तुमच्या तथाकथीत देवाच्या तोंडाला
देव उभा करणाऱ्या कारस्थानी शब्दांना
त्या कावेबाज अभिनयसम्राट क्लृप्त्यांना
आणि विघातक भावकविताना प्रेरणा होणारा चंद्र
मी उकळत्या डांबरात बुडवतो

'देवाचे तोंड', 'देव उभा करणारे कारस्थानी शब्द', 'कावेबाज अभिनयसम्राट क्लुप्त्या' आणि 'विघातक भावकविताना प्रेरणा होणारा चंद्र' इत्यादीचा निषेध करणारी जाणीव येथे प्रखरपणे स्पष्ट झाली आहे. धर्मग्रंथ, ईश्वराचे स्तोम माजवणारे अध्यात्मिक ग्रंथ-स्मृती-श्रुती-पुराणे तसेच ईश्वरशाही व्यवस्थेच्या युक्त्या, प्रयुक्त्या, कावेबाजपणा, शोषण करणाऱ्या व्यवस्थेचे कारनामे या सर्व गोष्टींविषयीचा मनात खदखदणारा असंतोष प्रकट करण्यासाठी 'उकळते डांबर' या सर्वांना फासण्याची कृती करण्याशिवाय कवीमनाजवळ दुसरा पर्याय दिसत नाही. त्यातून निषेधाची तीव्रता स्पष्ट

होते. संस्कृतपासून मराठी भावकवितेपर्यंत 'चंद्रा'लाच वेठीस धरलेले दिसते. म्हणून 'चंद्र' ही प्रतिमा नाकारण्यासाठी विघातक भावकविताना प्रेरणा होणारा चंद्र उकळत्या डांबरात बुडविण्यापर्यंतची आवेशपूर्णता येथे प्रत्ययाला येते. त्यातून उपहास आणि नकार या दोन्ही जाणिवा प्रकट होतात. ह्या जाणिवा संस्कृत आणि मराठी परंपरेच्या अभिव्यक्ती चौकटीला नाकारण्यासाठी व्यक्त झाल्या आहेत.

यशवंत मनोहर यांच्या कवितेने संस्कृतीची काळी बाजू तपासून ती वाचकांसमोर ठेवली आहे. सांस्कृतिक पसाऱ्याला प्रखर नकार दिला आहे. एका अर्थाने या देशाच्या शतकानुशतके चालत आलेल्या सांस्कृतिक पसाऱ्यावर क्ष किरण सोडले आहे. त्यातून शवविच्छेदन करणाऱ्या कृतिशील प्रतिमांचे एक आगळेवेगळे विश्व साकार झाले आहे. अतिशय तीव्रोत्कट भावना आणि गहिरी चिंतनशीलता संपृक्तपणे या प्रतिमासृष्टीतून प्रकट होते. उदा.

येणाऱ्या प्रत्येक पहाटेचे कान फुंकणाऱ्या
आर्ष काळोखाच्या अर्धांगिनी ऋचा
प्रतिज्ञावंत पायाखाली आता मी तुडवीत जाईल

या देशात निर्माण झालेली महाकाव्ये आणि वैदिक वाङ्मय या दोन्ही गोष्टींना धार्मिक रूप दिल्या गेले. त्यामुळे महाकाव्य आणि वैदिक वाङ्मयासाठी नकारात्म अर्थाची प्रतिमा आर्ष 'काळोखाच्या अर्धांगिनी ऋचा' या स्वरूपात संघटित होते. खरे म्हणजे ही संयुक्त प्रतिमा आहे. महाकाव्यातील अज्ञानाचा अंधार सूचित करण्यासाठी 'आर्ष काळोख' आणि अज्ञानाची जोडीदारीण काळोखाची अभिव्यक्ती म्हणजे 'अर्धांगिणी ऋचा' अशा द्विअर्थाचे एकत्रीकरण या प्रतिमेतून झाले आहे. 'प्रतिज्ञावंत पाय' ही प्रतिमा नकाराचा भक्कम आशय व्यक्त करते. अशाप्रकारे अर्थाचे स्तर, अर्थाची अधिकाधिक व्याप्ती वाढविण्याचे काम या कवितांमधील प्रतिमांमुळे झाले आहे. मानव्याची प्रतिष्ठापना हे मनोहरांच्या कवितेचे उद्दिष्ट आहे. माणसाच्या उत्थानाचा, अंधकारातून उजेड्युगाचा मार्ग दाखविणारा विचार मनोहरांच्या कवितेने मांडला आहे.

शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो
ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देतो

माणसाच्या प्रतिष्ठेचा, माणसाला मोठेपणा देणारा विचार या कवितेत व्यक्त झाला आहे. शब्दांची पूजा न करता माणसासाठी आरती गाणे ही माणुसकीची कृती आहे. अंध:कार दूर करणे ही नितीमान कृती आहे. या कृतिशीलतेतून मानवतेचा प्रत्यय येतो. मानवी कल्याणाचा विचारच येथे पाहावयास मिळतो. यशवंत मनोहर यांच्या कवितेत चार्वाक, सिद्धार्थ गौतम बुद्ध, जोतिबा गोविंदराव फुले हे अवैदिक परंपरेतील तत्त्ववेत्ते कवितेचा विषय ठरली आहेत आणि ते साहजिकही आहे. मनोहरांच्या मते चार्वाक हे दलितांचे पहिले सरसेनापती आहेत. 'तुम्ही त्या काळचे विद्रोही, आमचे आदीविद्रोही' असे म्हटले आहे ते यथार्थही आहे. बुद्धाला त्यांनी 'दलित दु:खाची माऊली' म्हटले आहे. बुद्ध हा मूर्तिभंजनाचे युद्ध उभारणारा यौद्धा आहे. माणसांचा चिंतक आहे. अनात्मवादी, निरीश्वरवादी आहे. म्हणून 'माझा साथी वाटतोस' अशी कवीची धारणा आहे. मात्र त्यांनी केलेले बुद्धाचे मिथकीकरण महत्त्वाचे आहे.

सिद्धार्था, अस्वस्थतेने अंतापर्यंत
तुझ्या प्रज्ञेच्या चिंध्या झालेल्या मी पाहिल्या आहेत
तुला दलितांच्या खांडववनात मुसळधार कोसळताना पाहिले आहे

ब्राह्मणी संस्कृतीने आपल्या संम्मिलीनीकरणाच्या तत्त्वानुसार वरचढ आणि श्रेष्ठ ठरलेल्यांना दैवत आणि अवतार ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. नागांच्या आणि बुद्धाच्या बाबतीत असेच घडले आहे. बुद्ध तत्त्वांना छिन्नविछिन्न करण्याचा, संपविण्याचा प्रयत्न झाला असे वास्तव येथे सूचित होते. येथे खांडववनातील भक्ष्यस्थानी पडणारे नाग किंवा तक्षक नसून दलित नावाने ते आले आहे. मिथकाचे कालसंवादी अर्थांतर त्यातून स्पष्ट होते. नागांची संस्कृती ही श्रमण संस्कृती होती तर आर्यांची संस्कृती ही ब्राह्मण संस्कृती होती. खांडववनात नागाची आहुती देण्यात आली होती, नागांना जाळण्यात आले होते. बुद्धाने खांडववनात मुसळधार कोसळणे ही नागांना जोपासण्याची कृती आहे. खांडववन पेटवणारी

संस्कृती ही ब्राह्मणी संस्कृती होती. म्हणून असे म्हणता येईल की ही कविता सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी करते. यशवंत मनोहरांनी ज्योतिबा फुल्यांचे प्रतीकीकरण केले आहे.

तुझ्या वाणीवर क्रांती फिदा झाली होती
आणि तुझ्या करणीने स्थिती द्विधा झाली होती
तू बांधलीस कबर इंद्रप्रस्थाची विद्रोही प्रतिभेची शर्थ करून
आणि इतिहासाचे संधिसाधू सांधे आलास खिळखिळे करून
वर्तमानाची क्षितिजे परंपरांच्या बंदिवासातून सोडवीत
तू जायबंदी केलीस भूतकाळातील शोषणाची हेड ऑफिसेस

सदर कवितेत म. फुले यांचे क्रांतीकारी व्यक्तिमत्त्व त्यांची वाणी, करणी आणि क्रांतीकार्यातून उभे राहते. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक क्रांतीकार्यातून येथे फुल्यांचे प्रतीकीकरण झालेले दिसून येते. प्रस्थापित व्यवस्थेला गाडण्याची केलेली कामगिरी, इतिहासातील दांभिकतेवर केलेले आघात, परंपरेच्या जोखडातून वर्तमानाची क्षितिजे मोकळी करणे, भूतकाळातील शोषक व्यवस्थेला घायाळ करणे या सर्व प्रक्रियेतून म. फुल्यांचे धर्मदत्त शोषणाविरुद्ध बंडाचे प्रतीक साकार होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रश्न विचारून आंबेडकरी विचारांचे विविध पैलू मनोहरांच्या कवितेत साकार झाले आहेत.

आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस तो सुईदोरा तू कुठे ठेवलास?
अरे या मनुच्या मुलांनाही माणूस होणे भागच पडेल
अशी तुझी ती जलाल घटना कुठे ठेवलीस?
परमेश्वराच्या प्रेतावर बसून कर्मविपाकाला माती दिलीस
ती अनेकांना हैराण करणारी युगंधर जिद्द तू कुठे ठेवलीस
अरे या बेशरम अत्याचाऱ्यांना फाडताना आम्ही विजयी होऊत
असे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस?

वरील कवितेतील प्रश्नायनातून 'लक्तरलेली आयुष्ये शिवणारा सुईदोरा', माणसाला जीवनमार्ग दाखवणारी 'जलाल घटना देणारा घटनाकार', परमेश्वर आणि हिंदू धर्मातील माणसाला गतिरुद्ध करणारी तत्त्वज्ञाने नाकारणारा, त्यांना मुठमाती देणारा बुद्धीप्रामाण्यावादी युगंधर जिद्दीचा तत्त्ववेत्ता, अन्याय अत्याचाराचा नि:पात करण्यासाठी 'विजांचे शस्त्रसाठे' समाजमनाच्या हातात देणारा असे विविधार्थी पदर एकत्र गुंफून 'आंबेडकर' प्रतिमा सिद्ध झाली आहे. 'आमंची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस तो सुईदोरा' ही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा आहे. गरीब, शोषित, पीडित जगाला नवजीवनाची प्राप्ती करून देणारे आंबेडकर येथे अधोरेखित होतात. अन्याय अत्याचाराचे निर्दालन करण्यासाठी संघर्षाची दीक्षा देणारे आंबेडकर 'विजांचे शस्त्रसाठे' या प्रतिमेतून अधोरेखित होतात. फाटलेल्या जिंदगीला टाके घालणारे आणि संघर्षाची तळपती शस्त्रे हाती देणारे असे आंबेडकरी रूप स्पष्ट झाले आहे. त्यातून कनवाळूपणा आणि जहाल स्फोटकपणा हे स्वभाववैशिष्ट्य या प्रतिमानी सिद्ध केले आहे. कार्ल मार्क्स संबंधी कवीने लिहिले आहे, 'तुझ्या शब्दांनी मनू अर्धमेला झाला'. मार्क्सच्या विचारांचा स्वीकार किंवा प्रभावामुळे 'मार्क्स तुझ्या हृदयाचे वणवे या कवितांच्या हाती मी दिले आहेत' असे कवीने स्पष्ट केले आहे.

धर्म ही अफूची गोळी आहे या तुझ्या प्रहाराने
आमच्या जन्मांच्या भाळावरील शापांचे चिरंतन चरकले
आणि कर्मविपाकाच्या बेड्या चळचळा कापल्या, इतक्या दुरूनही

भारतीय संदर्भात मार्क्सच्या विधानाचा, त्याने धर्माच्या संदर्भात केलेल्या विवेचनाचा कवीने वरीलप्रमाणे अन्वय लावला आहे. मराठी कवितेच्या क्षेत्रात केशवसुताना आधुनिक काव्याचे जनक म्हटले जाते. केशवसुताच्या संदर्भात कवी म्हणतो

धगधगत्या वणव्यासारखा तू भांडलास इथल्या काळोखाशी
अरे ईश्वराचे थोबाड खेटराने रंगवणारा तू
माणसासाठी तुझा शब्द माय झाला आणि
मनामनातील मनूसाठी तू संतप्त पोलादाचा पाय झाला

इथल्या काळोखाशी कवीमनही केशवसुताच्या दाहकतेने भांडताना दिसते. असे जरी असले तरी मराठी कवितेच्या क्षेत्रात, आधुनिक काळात केशवसुतांच्याही अगोदर 'अखंडा'च्या रूपात म. फुल्यांनी आधुनिकता आणली हे ऐतिहासिक सत्य आहे. 'ईश्वराचे थोबाड खेटराने रंगवणारा तू' असे जरी केशवसुतांसंबंधी म्हटले असले तरी केशवसुताच्या कवितेतील आशावादाची अखेर परमेश्वराच्या पायाशीच होते हे सत्य नाकारता येणार नाही हे यापूर्वी पहिल्या प्रकरणातच स्पष्ट केले आहे. 'सूर्या'च्या प्रतिमेचे अधिक्य हे महत्त्वाचे वैशिष्ट्य यशवंत मनोहर यांच्या कवितेत प्रत्ययाला येते. या प्रतिमेला विविधार्थी स्तर प्राप्त झाले आहेत. उदा

माझ्याही कवितेच्या मनगटातून आता सूर्य उगवू लागला आहे
सर्वहारा क्षितिजाच्या पिंड प्रदेशात प्रखरता पेरू लागला आहे
कालच्या काळ्या सूर्याचा निषेध
तो आपल्या सुरुंग झाल्या किरणातून हाणतो आहे

येथे सूर्याचे उगवणे कवितेच्या मनगटातून होत आहे. सर्वहारांना प्रकाशमान करून, संघर्षासाठी चेतवून कालच्या काळ्या सूर्यावर निषेधाचा मारा होत आहे. याप्रकारे एकच 'सूर्य' ही प्रतिमा येथे त्रिविध कार्य करताना दिसते हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामर्थ्याची स्फोटक प्रतिमा म्हणून ती साकार झाली आहे.

विद्रोहाची नौबत झडली आजच ओठी
आला हिरवा सूर्य उधाणून विराण कंठी
जेव्हा दिसला धाप लागलेला म्हातारा सूर्य
एक समग्र झाडांच्या गावात बिमार
आम्ही हतवीर्य होणारे सूर्य ओठात घेतले नाही
आपण उद्याच्या सूर्याशी दोस्ती करु
येथून पुढे मी सूर्यफुलाची लागवड करणार आहे

अशी विविध आणि वैचित्र्यपूर्ण सूर्यदर्शने मनोहरांच्या कवितेत घडतात. 'मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे' असे म्हणताना कवीला आंबेडकरी वाणीतील क्रांतीकारी आशयच उदघोषित करावयाचा आहे. 'सूर्य झालो दोस्तहो तुम्ही मला कंठ द्या' असे समूहालाच हा कवी आवाहन करतो आणि ओठातून जे शब्दाचे धुमारे फुटणार आहेत त्यातून 'हे माझे शब्द प्रकाशाची स्तोत्रे गाणारी झाडे आहेत' अशी मानवतावादी अपेक्षा व्यक्त करतो. अशाप्रकारे एकाच प्रतिमेचे प्रकटीकरण वारंवार होत असले तरी त्यातून प्रतिमेप्रत नवनव्या अर्थाचे स्तर सूचित होत जातात. हा या प्रतिमेचा विशेष आहे. ''दरवर्षी नेमाने येणारा पावसाळा वा एकूणच पालटत जाणारे ऋतूचक्र आपणास जसे नवेच वाटते तसा नवेपणा या प्रतिमासृष्टीत सतत अवतरत राहतो. एक सूर्य घेतला तरी तो किती वेगवेगळ्या संबधित्वामध्ये येतो आणि किती नवी नवी रूपे घेतो अशी कितीतरी नवी सूर्यदर्शने घेताना त्यात कोठे शिळेपणा येत नाही''[३४] हे निरीक्षण सूर्य प्रतिमेच्या वैशिष्ट्यपूर्णतेला पुष्टी देणारे आहे. यशवंत मनोहर यांच्या कवितेने सामाजिक बिभत्सतेच्या पर्यावरणाचे वास्तवाभिमुख चित्र साकार केले आहे.

नासले आहे इथल्या नद्यांचे पाणी / कोड फुटले आहे भयंकर इथल्या दिशांना
वास मारतात जीवघेणा इथल्या गावशहरातील गल्ल्या
कावीळ झाली आहे इथल्या विचारांना / सडली आहेत इथली वळणे
हमरस्ते, चौरस्ते सडले आहेत घराघरातील प्रकाशकिरण

किडली आहेत मंडळे येथे आणि मायबापाच्या वळणावर गेलेल्या संस्था
किडवलेली आहे मानवता येथे / किडले आहे इथून वाहणाऱ्या समग्र हवेचे वर्तन
आणि मंदिरशाही कायम इथे बदचलन

सामाजिक भोवतालचे हे अभद्र रूप असून दिशांना फुटलेल्या भयंकर कोडामुळे विदृपता अधिक ठळक झाली आहे. प्राकृतिक घटकातून सामाजिक बिभत्सतेचे रूप चित्रित झाले आहे. हवेचे वर्तन समग्र पर्यावरणच दुषित करणारे आहे. पर्यावरणाने काळजाला घरेच पाडलेली आहेत आणि येणाऱ्या प्रत्येक दिवसाच्या पाठीवर 'कत्तलखोर इतिहास' उभा आहे. हा इतिहासाचा अपमानित करणारा दाब आणि पर्यावरणाचे आघात यामुळे उद्विग्न झालेल्या मनोविश्वाचे दर्शन ही कविता घडविते. जीवघेणा वर्तमान आणि कत्तलखोर इतिहास अशा वास्तवाचे सूचन केले आहे. निसर्गप्रतिमांच्या आधारे सामाजिक वास्तवाचे प्रकटीकरण मनोहरांच्या कवितेने केले आहे. उदा,

कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आमच्या आसवावर काढले आहे
कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपली माथी हरपली
नदीच्या काठाने मरण शोधीत फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही

अतिशय लोकप्रिय ठरलेली ही मनोहरांची कविता आहे. प्रतिकात्मकतेने अतिशय व्यापक असा अर्थ सिद्ध झाला आहे. जगण्याच्या संदर्भात एक विसंगत अनुभव येथे साक्षात झाला आहे. कालच्या इतिहासात किंवा गतकाळात पिके बहरण्यासारखी परिस्थिती नव्हती कारण पावसाने पाठ फिरवली होती. वर्तमानात सदरहू पीक आसवावर काढावे लागले. त्यासाठी पावसाची वाट न पाहता आसवाचे सिंचन करावे लागले. आसवावर पीक काढणे ही सुखासिनतेची कृती नव्हे. परंतु वेदनेतून नवनिर्मिती केली असा व्यापक अर्थ त्यातून सूचित होतो. कालचा इतिहास आणि आजचा वर्तमान यातून एका अंतर्विरोधाचे सूचन होते. 'कालचा पाऊस', आणि 'सहरहू पीक' या निसर्ग आणि काळाशी संबंधित अशा प्रतिमेतून, या प्रतिमेच्या नकारात्म उपयोजनातून बहिष्कृत किंवा सर्ववंचितांचे दु:ख आणि वेदना, वेदनेतून नवे जीवन उभे करणे अशा गोष्टीचा एक शोकात्म अनुभव साकार झाला आहे. त्यातून दोन वर्गाच्या जाणिवाही एकात्म झाल्या आहे. कालीक भान आणि अनुभवाची अभिव्यक्ती समष्टीच्या संदर्भात झाली आहे.

यशवंत मनोहर यांची कविता परिवर्तनाची आस बाळगणारी असून या कवितेने समाज, संस्कृती, तत्त्वज्ञाने, शोषकव्यवस्था या सर्वांचा सखोल वेध घेतला आहे. सामाजिक भोवतालाचे दारुण वास्तव अधोरेखित केले आहे. समूहाच्या दु:खाला कारणीभूत ठरणाऱ्या कारणपरंपरांचा शोध घेतला आहे. त्यातून माणसाचे जगणे अमानुष बनवणारा धर्म, धर्मग्रंथ, शास्त्रे या साऱ्यांना जाब विचारणारी जाणीव कवितेतून व्यक्त झाली आहे. देव, धर्म, धर्मग्रंथांसह प्रस्थापित साहित्याला प्रखर नकार दिला आहे. प्रस्थापित व्यवस्थेची मूल्यव्यवस्थाच हास्यास्पद ठरविली आहे. सामाजिक बिभत्सतेच्या पर्यावरणाचे वास्तवाभिमुख चित्र साकार करून, वेदनेतून नवनिर्मिती केल्याची जाणीव स्पष्ट केली आहे. वर्णजाणिवा, कालीक भान आणि अनुभवाची अभिव्यक्ती समष्टीच्या संदर्भात केली आहे.

मानव्याची प्रतिष्ठापना हेच 'उत्थानगुंफा'मधील कवितेचे उद्दिष्ट आहे. या कवितेने विषमतामूलक जग आणि निषेधासाठी सज्ज असलेले जग अशा दोन जगांचे चित्र प्रतिमांच्या माध्यमातून रेखाटले आहे. पारंपरीकतेविरुद्ध मूल्यांच्या आधुनिकतेचा संघर्ष या कवितेने चित्रित केला आहे. तीव्रोत्कट भावना आणि गहिरी चिंतनशीलता संपृक्तपणे प्रतिमासृष्टीतून प्रकट झाली आहे. अर्थांचे स्तर आणि व्याप्ती वाढविण्याचे काम या प्रतिमांमुळे झाले आहे. या कवितेने सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी केली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रश्न विचारून आंबेडकरी विचार आणि कर्तृत्वाचे विविध

पैलू साकार केले आहेत. विविधार्थी पदर गुंफून आंबेडकर प्रतिमा सिद्ध केली आहे. सूर्य प्रतिमेचे अधिक्य हे मनोहरांच्या कवितेचे खास वैशिष्ट्य आहे. या प्रतिमेला विविधांगी आणि विविधार्थी स्तर प्राप्त झाले आहेत.

मनोहरांच्या कवितेतून कवितेने करावयाची विद्रोही कृती स्पष्ट झाली आहे. दु:खाला शब्द नेसवण्याची एक नवी रीत या कवितेने सुरू केली. प्रखर विद्रोही, रौद्रभीषण प्रतिमाविश्व या कवितेत साकार झाले आहे. विद्रोही मूल्यामुळे मनोहरांच्या कवितेला एक आगळेवेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. या कवितेत पारंपरीकता, गतकाळ आणि मूल्यांची आधुनिकता या द्वंद्वातून विद्रोह प्रकट झाला आहे. विद्रोही मानसिकतेसह दांभिकतेवर हल्लाबोल करणारी कृतिशीलता स्पष्ट झाली आहे. एकूणच दलित कवितेच्या परंपरेत यशवंत मनोहर यांच्या कवितेने अमिट आणि प्रखर मुद्रा उमटविली आहे.

✸ प्रकाश जाधव (जन्म ३ नोव्हेंबर १९५१- मृत्यू २९ जुलै २०११)

दलित कवितेच्या परंपरेतील प्रकाश जाधव हे अतिशय महत्त्वाचे आणि स्वत:चे वेगळेपण सिद्ध करणारे नाव आहे. **दस्तखत** हा त्यांचा कवितासंग्रह एक अनोखे विश्व घेऊन दाखल झाला आहे. नामदेव ढसाळांच्या 'गोलपिठा'तील भाषेपेक्षा एक आगळीवेगळी भाषेची जातकुळी या कवितासंग्रहात प्रत्ययाला येते. बहिष्कृत जगाचे उघडेनागडे वास्तव भेदकपणे वाचकांसमोर येते तेव्हा वाचक हादरून जातो. बोलभाषेतूच आकाराला आलेले प्रतिमा, प्रतिके, सार्थ भाषेची नवी घडणावळ वाचकांपुढे ते पेश करतात. १९७८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या संग्रहातील पहिल्या कवितेपासूनच हा प्रत्यय वाचकांना आल्याशिवाय राहात नाही.

या ठार माथेफिरू प्रदेशातून
आता थरकापत नाही प्राण
या राडेबाज वळचणीतूनच्या माझ्या जखमी वस्तीकडे
आता लडखडत नाही पाऊल
मुकाबल्यातूनच्या आदती डोळ्यांनी पेललेले
एकसे एक धोबीपछाड आणि दरेक धुलाईनंतरचे
सरकचंदू अवयव, खरच
धमनीतले सारे मुहल्ले बिथरलेत
आता कर्फ्यू लाऊन चालणार नाही

माथेफिरू प्रदेश, जखमी वस्ती, बिथरलेले मोहल्ले अशा पार्श्वभूमीवर संचारबंदीवर स्वार व्हायला निघालेल्या व्यक्तिमत्त्वाचा व्यवस्थेच्या विरोधातील एक आक्रमक विचारव्यूह या ठिकाणी प्रत्ययाला येतो. परिस्थितीवर स्वार होणारा ठामपणा येथे प्रत्ययाला येतो. माथेफिरू प्रदेशातून न थरकापणारे प्राण, जखमी वस्तीकडे न लडखडणारे पाऊल आणि परिस्थितीशी सामना करण्याच्या सवयीतून डोळ्यांनी पाहिलेले, शरीरानी सहन केलेले अनेक अत्याचार, प्रत्येक वेळी मार खाल्ल्यामुळे सरकलेले अवयव, यामुळे धमन्यातील रक्त खवळून उठले आहे. एका अर्थी अन्यायी व्यवस्थेला दिलेल्या आव्हानाचा येथे प्रत्यय येतो. प्राण, पाऊल, डोळे, अवयव, धमणी हे सारे घटक देहाशी संबंधीत आहेत. माथेफिरू प्रदेश आणि जखमी वस्तीच्या पार्श्वभूमीवर मोहल्ल्याचे बिथरलेपण उभे आहे. मुहल्ले या अनेकवचनी शब्दामुळे सळसळत्या रक्तातील सार्वत्रिकता सूचित होते. ही सार्वत्रिकता व्यक्तीचे स्वातंत्र्य नाकारणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध उभी ठाकली आहे. अशा प्रवृत्तीविरुद्धच्या मुकाबल्यासाठी सज्ज झालेले, विद्रोह पुकारणारे बंडखोर व्यक्तीमानस प्रातिनिधिक स्वरूपात येथे व्यक्त झाले आहे. त्याचवेळी कर्फ्यू लादू पाहणाऱ्या व्यवस्थेला इशाराही दिला आहे.

स्त्रीरूपाचे आणि स्त्रीच्या जगण्यावागण्याचे अनेक पदर या कवितेतून स्पष्ट झाले आहेत. या जगण्यातील विस्कटलेपणा, विदिर्णपणा, खवळलेपणा या साऱ्यांचाच दारुण प्रत्यय प्रकाश जाधवांची कविता देते.

ओशाळलेल्या पापण्यावर एक चित्र उभे वयात आल्यापासून
विटलेल्या धडूतातील फाटलेले स्तनकडे आभाळ कोसळल्यापासून
भुवईच्या ढोलीतील खवळलेले डोळे कुंकु विस्कटल्यापासून
शेवाळलेल्या काठावर शहारलेले लव्हाळे पूर ओसरल्यापासून

या कवितेत स्त्री प्रतिमेचे काळाच्या, वयाच्या टप्प्यावरील विविध रूपे पाहावयास मिळतात. वयात आल्यापासून ओशाळलेल्या पापण्यावर उभे राहणाऱ्या स्त्रीचे चित्र येथे साकार झाले आहे. आभाळ कोसळल्यापासून, कुंकू विस्कटल्यापासून आणि पूर ओसरल्यापासून या तीन अवस्थांच्या पार्श्वभूमीवर तिच्या तीन अवस्था स्पष्ट झाल्या आहेत. त्या म्हणजे फाटलेले स्तनकडे, खवळलेले डोळे, शहारलेले लव्हाळे. त्या अवस्थांमधून विदिर्णता, संतप्तपणा आणि शहारलेपणाचा अनुभव येतो. येथे कुंकू विस्कटणे म्हणजे नवऱ्याचा मृत्यू होणे असा अर्थ अभिप्रेत नाही तर फारकत होणे, नवऱ्याने सोडून देणे असा अर्थ अभिप्रेत आहे. त्यातूनच खवळून उठण्याचा अनुभव अधिक ठळक होत जातो. या सगळ्या तापातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा नव्याने जीवनाच्या भूमीवर उभे राहणे असे घडते. ही भूमी निसरडी आहे. कधी पाय घसरेल याचा नेम नाही. लव्हाळे चिवट असतात आणि शेवाळ निसरडा. परस्पर विरोधाभासी अशा वास्तवावर हे उभे राहणे होय. म्हणजे एक जोखीम घेऊन पुन्हा नव्याने जीवनाला सामोरे जाणाऱ्या स्त्रीरूपाचे दर्शन येथे घडते. इतर कोणत्याही दलित कवितेतील स्त्रीरूपापेक्षा हे दर्शन वेगळे आहे हे स्पष्टपणे जाणवते.

शहरातील दलित जीवनाचे अनुभवविश्व 'दस्तखत'मधील कवितेने मुखरीत केले आहे. ''दस्तखतमधल्या अनुभवविश्वात गलीकुच्या, दैन्य, दास्य, विटंबना, वेश्या, राडे, रामपुरी, कडकडे, दादा, वेडे, हिजडे, मौला, बाबा, फकिर, अघोरी, चोर, दरोडेखोर, भिकारी, महारोगी, चक्री, मटका, तीन पत्ती, जन्नामन्ना, मशिदी, देवळे, चर्च, संप, मोर्चे, टाळेबंदी, लाठीचार्ज, अश्रूधूर, कर्फ्यू, तस्करी, काळाबाजार, पोलीस यंत्रणा आणि राजकीय स्थित्यंतर हे सगळे संदर्भ येतात. परंतु हे अनुभव अथवा संदर्भ केवळ आणायचे म्हणून आलेले दिसत नाहीत तर हे संदर्भ कवी आणि त्याची कविता यामध्ये एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण करतात.''[३५] या विश्वातील भाषेचे अनेक स्तर या कवितेत पाहावयास मिळतात. ते या कवितेचे एक बलस्थान आहे. भाषेमुळे अनुभवाचा जिवंतपणा प्रत्ययाला येतो.

रात धुंड्या दीस धुंड्या
पर कोन आयताच गवशा नय
पीर धुंड्या दरगा धुंड्या
पर होनी को किसने टाल्या नय
जुम्मेसे बैठ्या महयनेसे बैठ्या
पर हज का पानी आट्या नय
खुदको धुंड्या माळरान धुंड्या
कोन पाक नजर गवशा नय
दीस भाय धुंड्या रात बेगम धुंड्या
पर माणूस नामका धरम गवशा नय

माणूसकीला पारखी असलेली दुनिया येथे पाहावयास मिळते. पीर, दर्गे, उपास, तापास, आध्यात्माची ठिकाणं धुंडाळली तरी पवित्र नजरेचा कोणी नजरेस पडत नाही. अत्र तत्र सर्वत्र शोध घेतल्यानंतरही माणूस नावाचा धर्म हाताशी लागत नाही. अंतर्बाहय हा शोध घेतला तरी मानवता, माणुसकी कुठेही पाहावयास मिळत नाही. अशा पर्यावरणात हा कवी वावरतो आहे. चर्च, मशिदी, देवालये ही केवळ व्यवहाराचे अड्डे बनलेले आहेत. त्यांना माणसाच्या सुखदु:खाशी काही देणे घेणे उरलेले नाही. देवाच्या नावावर गल्ला जमविणाऱ्यांच्या दृष्टीने व्यवहार तेवढा महत्त्वाचा असतो. असे त्यांचे माणुसकीशून्य वर्तन आहे.

आकाशावेगळी झिपरी रज हुडकीत
कचऱ्याच्या ढिगाऱ्याआड बुडताना
लाख उमर खयाम जागे होतात स्वप्नातून
सच्चा वास्तवापुढे होकूसायची चित्रे आखुड वाटू लागतात
अन् विसंगत
एखादा मौला डोकीवर मशिद घेऊन बडवतो उर, अल्लाहू अकबर
तर आगेकुच करणाऱ्या महारोग्याचे काफिले
बाहेरच्या बाहेर पांगवून
बंद होऊ लागतात चर्चचे व्यवहारी दरवाजे

भयाण वास्तवापुढे वास्तववादी चित्रे तकलादू ठरतात, उमर खयामचीही झोप उडवणारे हे वास्तववादी चित्र आहे. ते भीषण आणि भेसूर आहे. या वास्तवाला सामोरे जाणे, साद घालणे अल्ला आणि गॉडलाही जमत नाही. तिथली सहिष्णूता आणि सेवाभाव सपशेल पराभूत ठरतो आणि केवळ व्यवहाराला महत्त्व प्राप्त होते. इथले जगणे पशूपेक्षाही भयंकर आहे. इथे माणसाला कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अन्नाचे कण शोधावे लागतात. दैन्य, दास्याची ही भीषणता पाहून कवीच्या मनात संतापाची तिडीक उठते आणि अवतीभवती तर सर्वत्र नपुंसकपणाच पसरलेला आहे.

बापापरीस बाप गांडू / समाजपण निमगांडूच
इथले हिरोशिमा मामाच राहून साचविणाराहेत का शेवाळे दलदल?
इथले ढग भळभळणार नाहीत का उर फुटून?
काळ्या चित्रावर चढणारच नाही का रंग लाल?

समाजवास्तवाचे भीषण चित्र बदलले पाहिजे अशी कवीची धारणा आहे. मात्र बदलासाठी प्रतिसाद देणारे, हातभार लावणारे वातावरण नाही. व्यक्ती आणि समाजमन निश्चल आहे. प्राप्त परिस्थितीविरुद्ध पेटून उठावे असे त्यांना वाटत नाही. कवीमनातील बंडखोरीला बोन्साय करणारीच परिस्थिती भोवताली आहे. युद्धखोर मन आणि भोवतालची उदासिनता असा हा अंतर्विरोध आहे. दुसरीकडे महाग्यानी लोकांना या जीवनाचा अर्थ कळत नाही.

या असंबद्ध रात्रीचे संदर्भ लागत नाहीत तात्त्विकाना
चार भिंतीतल्या सांद्र उजेडात
त्यांच्या सर्वदूर विचारांची उत्तुंग झेप औपचारिक अन् सरड्यासारखी
जिने उतरून खाली आल्याशिवाय
दिसणार नाही हा अपारदर्शी अंधार

तात्त्विक चर्चा आणि जगण्याचे वास्तव ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत. चार भिंतीच्या आत बसून चर्चा करणे आणि बाहेरच्या जगातील भेसूर वास्तवाला सामोरे जाणे, ते समजून घेणे यात जमीन अस्मानचे अंतर असते. तत्त्वज्ञान आणि विचारांची उत्तुंग झेप वास्तवासमोर खुजी ठरते. प्रत्यक्षात वास्तवाला भिडल्याखेरीज जगण्यातील काळोखाचे स्वरूप समजणार नाही. म्हणून हवेत गप्पा मारणारांचा, चार भिंतीच्या जगालाच संपूर्ण जग मानणाऱ्या तत्त्ववेत्यांचा उपहास केलेला आहे. माणसाचे माणूसपण हिरावून घेण्यासाठीच व्यवस्था कार्यरत आहे. सामाजिक अन्याय अत्याचाराने कवी संतप्त झालेला, पेटून उठलेला म्हणून तो म्हणतो,

मलाही एक सवय जडलेय आताशा
दगड फेकून आकाश फाडायची

आकाशाला भोक पाडण्याचा हा 'स्व'च्या पातळीवरील विद्रोह सामाजिक परिवर्तनासाठी पुरेसा ठरत नसतो याचेही भान कवीला आहे. त्यासाठी समूहानेच एल्गार पुकारणे अपरिहार्य ठरते. दु:खामागील कार्यकारणभाव समजला की

युद्धाचे पवित्रे घेणे सोयीचे ठरते. एकदाचा शत्रू दिसला की, त्याच्याविरोधात संघर्षाची रणनिती आखता येते.

दारिद्र्याच्या पलटणीतील काळे सैनिक आम्ही
काळतोंड्या बरकतीतून
प्रवेशद्वारा बाहेरच्या क्षुब्ध मोर्चात
प्राणांतिक श्वास अवरोधून
अगोदरच्या नकटया हुंकाराचे साक्षीदार
आमच्या हाताहातात / चलो आझाद मैदान
अन ओटीपोटात । झिंदाबाद । मुर्दाबाद

संघर्षाशिवाय कोणत्याही गोष्टीची प्राप्ती होऊ शकत नाही. मागितल्याशिवाय काही मिळत नाही. माणूसकीचे हक्क मिळणार नसतील तर प्रसंगी ते हिसकावूनही घ्यावे लागतात. हक्कासाठीच्या लढाईतील कवीही एक सैनिक आहे. पलटण दारिद्र्याची असली तरी संघर्ष हा तिचा धर्म आहे. प्रकाश जाधव यांची कविता संघर्षावर विश्वास ठेवणारी आहे. शोषक व्यवस्थेच्या विरोधात उठाव, असा तिचा स्वभाव आहे.

'आणीबाणीतल्या कविता' या शीर्षकाखाली कवीने अनेक कविता लिहिल्या आहेत. मात्र इंदिरा गांधीच्या काळातील, ऐंशीच्या दशकातील आणीबाणीशी या कवितांचा संबंध नाही आणि दलित कवीनी या आणीबाणीवर एकही कविता लिहिली नाही हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. कारण दलित कवींच्या मते युगानुयुगे दलितांच्या वाटयाला अराजक आले आहे. पूर्वापार काळापासून सत्ताव्यवस्थेने त्यांचे शोषणच केले आहे. त्यामुळे या आणीबाणीची त्यांना नवलाई नाही. कारण

बरखास्त शहाऱ्याखाली
अल्ला हो अकबरी धांदल तेव्हापासूनची
सीनाझपटी सल्तनी शहेनशहाची
जय पराजयी खून कसर
तेव्हापासूनचे लुटारू कफिले मांडलिक पोटाखालून
इ.सनाचे बलात्कार तेव्हापासूनचे
अन्यायी दस्तखत इतिहासाच्या वसिहतनाम्यावर

इसवीसनापासूनचे हे अन्याय अत्याचार आणि बलात्काराचे वास्तव हा अनुभव असल्यामुळे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आणीबाणीची दखल घेण्याची गरज दलित कवितेला वाटली नाही. या देशावर अनेक राजवटी आल्या आणि गेल्या मात्र दलितांच्या, अस्पृश्यांच्या, बहिष्कृतांच्या जगावर सुखाचा ओरखडा कधीही उमटला नाही. हेच ऐतिहासिक वास्तव येथे कवीने अधोरेखित केले आहे. इतिहासाच्या वसिहतनाम्यावर दलितांच्या संदर्भात अन्यायाचीच मोहर इतिहासाने उमटवलेली आहे आणि वर्तमानात लोकशाही व्यवस्था अस्तित्त्वात आलेली असलीतरी अद्यापही ही आणीबाणी संपलेली नाही. दलित, शोषित, पीडित माणूस आणि स्त्रिया या लोकशाहीतही सुरक्षीत नाहीत. अन्याय अत्याचाराच्या क्रुर मोहरा अजूनही उमटतच आहेत. आणीबाणी अद्यापही संपलेली नाही.

मारणाऱ्यांनी मारत रहावे
मरणाऱ्यांनी मरत रहावे
आयाबहिणीची स्वस्त मरणे पहाता पहातां
लोकशाहीतील क्षुधित घुबडे
उद्या माझेही मरण घेऊन उभी असतील माझ्या बायको समोर
निर्वस्त्र निर्वस्त्र

मरणाऱ्यांना आणि ज्यांची आब्रु लुटली जाते अशा सर्वच आयाबहिणींना क्षुधित घुबडांच्या भक्ष्यस्थानी पडावे लागते. सर्वसामान्यांच्या जीवनासाठी या लोकशाहीचा काडीमात्रही उपयोग नाही. प्राचीन काळापासून आजवर हाच प्रवास सुरू आहे. म्हणून आणीबाणी संपलेलीच नाही असा निष्कर्ष जाधवांच्या कवितेने मांडला आहे. ही आणीबाणी एकदा-ची संपुष्टात आली पाहिजे. मात्र समाजवाद येण्याची, समताधिष्ठीत समाजरचना प्रस्थापित होण्याची चिन्हे दिसत नाही याविषयीची खंत कवीने व्यक्त केली आहे.

सगळेच कसे पढी खाल्ल्यासारखे कायम
समाजवाद येण्याची चिन्ह इतकी सूम अन
सर्द असूच शकत नाही
काल व्यासपिठाभोवती गोळा झालेले चुतियापण अथवा
घोषणांचा अस्फूट चित्कार सुद्धा नाहीच
ही स्मशानशांतता युद्धपूर्वची तर नसेल ना!

अशी युद्धापूर्वीच्या शांततेची चाहूल या कवितेला लागली आहे. म्हणून ती आशावाद जोपासताना दिसते. हे युद्ध माणसाच्या मुक्तीचे असेल असा कवीचा विश्वास आहे. म्हणून त्याने म्हटले आहे

दूर व्हा
वेदनांचा स्फोट होतोय
आणि स्वातंत्र्याचा जन्म

वेदनेच्या स्फोटातूनच स्वातंत्र्याचा जन्म होणार आहे. अशा भरोशावर ही कविता येऊन स्थिरावली आहे.

✸ राम दोतोंडे (जन्म १ जुलै १९५७)

राम दोतोंडे हा सामाजिक भान असणारा कवी आहे. कारण त्याची जडणघडण विद्यार्थीदशेपासून सामाजिक चळवळीतच झाली. विद्यार्थीदशेतच त्यानी कवितालेखनाला आरंभ केला. **रापी जेव्हा लेखणी बनते** हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९७८ साली प्रसिद्ध झाला. आत्मटीका, विज्ञाननिष्ठा, मानवी मूल्यांचा उद्घोष, दैववादाला नकार ही त्यांच्या कवितेची काही वैशिष्ट्ये आहेत. लाचार वृत्ती आणि बेगडीपणाचा उपहास करणे हे त्याच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्य होय. चर्मकार व्यवसायातील अनेक शब्दकळा आणि हत्यारांचा प्रतिमेसारखा वापर त्यानी आपल्या कवितेत केला आहे हे त्याच्या कवितेचे वेगळेपण म्हणता येईल. दोतोंडे हे मिलिंद कॅम्पसचे कवी आहेत.

कवी ज्या समाजजीवनातून आला ते समाजजीवन स्थितीशील आहे. या स्थितीशील जगाचे अपत्य असलेले कवीमन आंबेडकरी विचारजाणिवा नसानसात भिनल्यामुळे त्याच्या हातातील रापीचे रूपांतर लेखणीत होते, हे कवीमन मूल्यात्मक संघर्षासाठी सज्ज होते आणि विद्रोह पुकारते. चर्मकार समाजजीवनातील स्थितीगती, पारंपरीकता आणि समकालीन स्थिती यांचा वेध घेण्याचे कार्य 'रापी जेव्हा लेखणी बनते' या संग्रहातील कवितांनी केले आहे. 'स्व'ची ओळख सांगतानाच कवीने समूहजीवनाचेही चित्र रेखाटले आहे.

हिंदू संस्कृतीच्या विर्यातून जातियतेला दिवस गेलेत
आणि त्यातूनच निर्माण झालोय मी
रस्त्याच्या कडेला बसून ऐरण हस्ती सोबत घेऊन
ठाकठूक करणारा

समूहमनाची वेदनाच येथे स्पष्ट होते. व्यवस्थेमुळे वाटयाला आलेल्या दु:खातून एक दुभंगलेपणाची जाणीव प्रकट होते. जन्माने इथे जाती आणि जगण्याच्या सीमा निश्चित केल्या जातात. व्यवस्थेने दिलेल्या देणगीमुळे संवेदनशील मने अधिकच दुभंगतात. दुभंगलेपणाच्या प्रवासात दोतोंडे यांची कविता विद्रोहाचा एक आकृतीबंध साकार करते.

व्यवस्थेचे एक विश्लेषण देते

उचललेल्या कुटक्यासाठी वहाण तुटकी तू शिवावी
सडलेला तो कुटका चघळत उपकारांची त्यांच्या जाण ठेवावी
मोट शिवून द्यावी कधी दोन महिन्याची करण्या चंदी
शेतात बलुतं मागायला जाऊन, शिव्या खायची मिळवावी संधी

माणूसपणाचा लवलेश नसलेल्या लाचार जगण्याचे भीषण वास्तव ही कविता स्पष्ट करते. बलुतेदारीची पद्धत शेकडो वर्षांपासून या देशात होती. स्वातंत्र्यानंतरही ती वेगळ्या रूपात रुढ होती. बलुतेदारांनी गावाला आवश्यक असणाऱ्या सेवा पुरवायच्या. केलेल्या कामाचा मोबदला मात्र हंगामानंतर धान्याच्या रूपात स्वीकारायचा अशी बलुत्याची रीत होती. हे बलुतेही सुखासुखी मिळत नव्हते. अशाप्रकारे बलुत्यावर जगणारा हा समूह आहे याची जाणीव कवीने करून दिली आहे. कौटुंबिक आणि सामाजिक असा दुहेरी पातळीवरचा संघर्ष या कवितेतून चित्रित झाला आहे. कुटुंबप्रमुख असलेल्या बापासोबतच या कवीचा एक संघर्ष आहे.

उगवणाऱ्या सूर्याकडे बीन ताटीचं दार होतं
कधी चोळ्या कधी गोधड्या कधी लुगड्याचा दांड
शिवायचीस तू
मजुरीला जाता जाता प्रेमानं माझ्याकडे पाहायचीस तू
अन् बा नेमानं ठाकठूक करीत होता
अधूनमधून माझ्या हातात हस्तीही देत होता

या कवितेत मायचे प्रातिनिधिक चित्र आहे. ज्या समूहजीवनातून कवी आला ते जीवन लक्षात घेतले तर बीनताटीचं दार, गोधड्या, लुगड्याला दांड भरणे हे अठराविश्व दारिद्र्याचे सूचन करणारे चित्र आहे. निरक्षर आणि अडाणी मायला शिक्षणाचे महत्त्व पटले आहे. त्यामुळे उपाशीतापाशी राहू पण लेकराबाळांना आम्ही शिक्षण देऊ हा निर्धार आंबेडकरी विचारशक्तीतून समाजमनात भिनला होता. मात्र या कवितेतील बाप ठाकठूक करण्यातच धन्यता मानणारा आहे. बाप आपल्या पोराला ठाकठूकीचा वारसा देतो ही कृती मायला न पटणारी आहे. त्यासाठी ती नवऱ्याचा मारही सहन करते कारण,

लागन एखादी नवकरी त चिमण्यासंग गोडीनं ऱ्हायसीन
न्हयी मले पण सवताहाच्या पोटाल्ये पोटभर तरी खासीन

हे तिचे मुलाविषयी भविष्याचे स्वप्न आहे. शिकल्यानंतर नोकरी मिळते एवढे समजण्याइतपत ती सजग आहे. बापाच्या कृती आणि विचारात पोटाला पोटभर खायला मिळणे एवढेच एक झापडबंद सूत्र आहे. तर स्वाभिमानासह पोटभर खायला मिळणे हे आईचे सूत्र आहे. दलित कवितेत माय बापाचे अनेकदा चित्रण झालेले पाहावयास मिळते तरी बहुतेक वेळा बापच सक्रीय होताना दिसतो. परंतु दोतोंडे यांच्या कवितेत आंबेडकरी विचारसूत्राच्या संदर्भात माय आक्रमक होताना दिसते.हे या कवितेचे वेगळेपण दलित कवितेत ठळकपणे उठून दिसणारे आहे. हा कवी बापाला थेटपणे प्रश्न विचारतो. हे प्रश्न एकूण समाजालाही लागू पडतात कारण बापाप्रमाणे हे समूहमनही पारंपरीकतेत गुरफटलेले आहे.

हे बाबा, रापीने कातडे कापण्याऐवजी
का कापले नाहीस येथल्या राक्षसी रुढीचे नाळ?
वादीने तळ शिवण्याऐवजी का शिवले नाहीस
येथल्या मनामनात समता स्वातंत्र्याचे जाळे?
हस्ती पाळूचा उपयोग तळ ठोकण्यासाठी न करता
येथल्या जातीयतेचं टाळकं ठोकून काढण्यासाठी
का नाही केलास?

राक्षसी रुढीची नाळ कापणे, समता स्वातंत्र्याचे जाळे शिवणे आणि जातियतेचे टाळके फोडणे या कृती बापाकडून अभिप्रेत होत्या. तशी शस्त्रसज्जताही बापाकडे होती. पण बापाने माघार का घेतली असा सवाल आहे. ठाकठूक करणे हेच बापाचे भागध्येय आहे. कवीमन मात्र नव्या विचाराचे वारे प्यायलेले असल्यामुळे सांस्कृतिक जगातील दोष आणि उणिवा त्याच्या लक्षात आल्या आहेत. म्हणून त्याची अभिव्यक्ती अधिक जोरकसपणे नव्या विचारतत्त्वाची मांडणी करते. विसाव्या शतकातील आंबेडकरांचे आंदोलन, विज्ञान तंत्रज्ञानाचे झालेले चांगले परिणाम त्यामुळे हस्ती, पाळू, तळ या चर्मकार जगाच्या व्यवसायाला बसलेले हादरे या गोष्टी कवीला अर्थपूर्ण वाटतात

गुलामाला गुलामगिरीची जाण
एक महामानव करीत होता
तेव्हा न जाणे मग बळ कोठून माझ्या अंगात शिरले
आरी, रापी, पाळू कोपऱ्यात फेकले
हस्ती मात्र तशीच ठेवली भिंतीला खिळे ठोकण्यासाठी

येथील विद्रोह अतिशय अर्थपूर्ण आहे. सदर कवितेत कवीने केलेल्या कृतीतून विधायक विचारच प्रसृत होतो. भिंतीची प्रतिमा समाजजीवनाचे प्रतीक म्हणून साकार होते. समाजमनात आंबेडकरी विचारांचे खिळे ठोकण्यासाठी हस्तीची गरज आहे. कवी ज्या जगातून, समाजमनातून आला त्यातील हत्यारे किंवा साधनांच्या प्रतिमा नव्या अर्थाने साकार होतात हे कवितेचे वेगळेपण आहे. पारंपरीक कारागिरीवर नव्या आधुनिक यंत्रयुगाचे मोठे आघातही झाले आहेत. त्यातून कारागिरांवर उपासमारीची पाळी आली. धंदे बुडाले. हा आर्थिक इतिहास आहे. चांभाराचे उद्योग पळवणाऱ्या बाटाला जगन्मान्यता मिळाली आणि चांभार मात्र हाडूतहुडूतचे धनी बनले. ग्राहकांच्या अहंकारी वृत्तीचाही ते बळी पडले.

आयला तुमचेही भाव वाढलेत
जोड्याचे मग कसे कमी राहणार
पर याद राखा, तुमच्यावर विसंबून नाही आम्ही

ही जी ग्राहकाची तुच्छतेची दृष्टी आहे, ती वर्णव्यवस्थेची देणगी आहे. अशा प्रवृत्तीविरुद्ध लढा अटळ असल्याचे ह्या कवितेने स्पष्ट केले आहे. जातीय वर्तुळाअंतर्गतही जीवघेणे अंतर्विरोध आहेत. अस्पृश्य जातीअंतर्गत दोन वेगवेगळ्या घटकांना आपण एकाच व्यवस्थेचे बळी आहोत याचे भान राहत नाही. त्यामुळे वर्णव्यवस्था मजबूत होण्यास आपोआपच वाव मिळतो. याचेही भान कवीला आहे.

तसं हे जग सारंच आपलं आकाशासारखं
पण येथे माणूस माणसाला माणूस म्हणून ओळखत नाही
दलित म्हटल्यावर तू जरा जवळचा वाटलास
जवळ सरकलो
तुझ्यातला मी उपभाग हे कळताच
तू पुढं चालायला सुरवात केलीस

एकाच जगाअंतर्गत जोपासला जाणारा जातीयतेचा द्वैतभाव हा अनुभव येथे साकार झाला आहे. दलित वर्गाअंतर्गत जाती पोटजातीचे एक प्रतिगामी मानस येथे सूचित होते. स्वातंत्र्योत्तर काळात कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाल्यानंतरही भेदभावाचे मानस कायम रहावे ही फार मोठी शोकांतिका आहे. ही स्वकीय जगातील तफावत प्रामाणिकपणे कवीने स्पष्ट केली आहे.

दोतोंडे यांच्या कवितेने बेगडी जगाचा पर्दाफाशही केला आहे. स्वतः कातडीबचाऊपणाची भूमिका घेणारी वृत्तीच इतरांच्या बचावाच्या वार्ता करते अशा वृत्तीचा उपहास केला आहे. त्याचप्रमाणे संघर्षाची उर्मी मरता कामा नये आणि ही उर्मी मारू पाहणाऱ्या जाचक मानसिकतेतून बाहेर पडले पाहिजे अशीच कवी आणि कवितेची भूमिका आहे.

ही भूमिका आंबेडकरी जाणिवेशी समांतर आहे. म्हणूनच दैववाद झुगारून माणसाचे सामर्थ्य प्रकट करणारी प्रखरता ही कविता मांडते.

तू म्हणालास माथा फुटला
मी म्हणालो हातावर विश्वास ठेव
तू पुन्हा म्हणालास जिथं माथाच रक्ताळला
तिथं हातावर विश्वास कसला?
पण दोस्ता, हात माथा घडवत असतात
माथा हात नव्हे!

नशिबावर हवाला ठेऊन भविष्य घडविता येत नसते. माथा घडवण्याचे सामर्थ्य माणसाच्या हातात असते. मानवी सामर्थ्यानेच जीवनाला आकार देता येतो. अशी मानवी सामर्थ्याची महनियता ही कविता वाचकांसमोर ठेवते. प्रबळ आशावाद व्यक्त करते. अंतिमत: मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेचाच उद्‌घोष करते. ही मूल्ये तथागताच्या सम्यक दृष्टीत असल्याचे आकलनही या कवितेने मांडले आहे. तथागताच्या सम्यक दृष्टीने लिहिलेला इतिहास भावी पिढीसमोर ठेवावा असे आवाहन केले आहे.

घर बदलायला निघशील तेव्हा
चांगलं घर शोधून काढ
विज्ञान विवेकाची रांगोळी घराच्या अवतीभवती काढ
झाड दारासमोर तत्त्वनिष्ठेचं असू दे
मानवाच्या कल्याणाची फळे त्याला येऊ दे

अशाप्रकारे तथागताच्या सम्यक मार्गाचे, मानवी कल्याणाचे महान तत्त्वज्ञान या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहे.

संक्षिप्तत:असे म्हणता येईल की, मानवी मूल्यांचा उद्‌घोष या कवितेने केला आहे. मूल्यात्मक संघर्षासाठी विद्रोह पुकारला आहे. व्यवस्थेमुळे वाटयाला आलेल्या दु:खातून दुभंगलेपणाची जाणीव व्यक्त केली आहे. दुभंगलेपणाच्या प्रवासात ही कविता विद्रोहाचा आकृतीबंध साकार करते. कौटुंबिक आणि सामाजिक असा दुहेरी संघर्ष चित्रित केला आहे. बापालाच प्रश्नांकित करणारी ही कविता बापाचा निष्क्रियपणा स्पष्ट करून मायचे मोठेपण सिद्ध करते. स्वकीय जगाअंतर्गत जातीय वास्तव स्पष्ट करताना व्यवस्थेवरही प्रहार केले आहेत. बेगडी जगाचा पर्दाफाश केला आहे. दैववादाला सपशेल नाकारून माणसाचे सामर्थ्य प्रकट करणारी प्रखरता मांडली आहे. तथागताच्या सम्यक दृष्टीने लिहिलेला इतिहास भावी पिढीसमोर ठेवला पाहिजे असे आवाहन या कवितेने केले आहे.

✹ रविचंद्र हडसनकर (जन्म ९ ऑगस्ट १९४९)

रविचंद्र हडसनकर यांचा **ठिणगी** हा कवितासंग्रह १९७७ साली प्रसिद्ध झाला. हा कवितासंग्रह म्हणजे धुमसणाऱ्या मनाचा आविष्कार आहे. कष्ट उपसूनही त्या कष्टाचे मोल होत नाही आणि सुखही मिळत नाही. यातून जी उद्विग्नता निर्माण होते त्या उद्विग्न मनाचा उद्‌गार म्हणजे 'ठिणगी'

उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या सर्व ऋतूत तिन्ही त्रिकाळ कष्ट पाठ सोडत नाही. घाम गाळूनही उघडेपणा कायम राहतो. निवारा आणि सुरक्षितता मिळत नाही. त्यातून आलेली ही घुसमट आहे. एकेक दाण्यासाठी घाम गाळणाऱ्यांचा दाण्यावर हक्क उरत नाही. कष्ट करणाऱ्यांच्या कष्टातून मालकाची अन्नधान्यानी घरे भरतात. मात्र कष्टकऱ्याचे रितेपण कायमच राहते. घर आणि पोट रिकामेच राहते. हे रिकामेपण असंतोषाची ठिणगी टाकायला कारणीभूत ठरते आणि धुमसणाऱ्या मनाला मोकळेपणाची वाट निर्माण करून देते. 'ठिणगी'मधील कविता ही अस्वस्थता नष्ट करण्यासाठी

उद्ध्वस्तता प्रसवणारी आहे. कवितेच्या माध्यमातून आपल्या मनाला कवीने क्रांतीचे मनसुबे समजावून सांगितले आहेत. उघड उघड पवित्रे घ्यायला शिकविले आहे. जे काही करायचे ते संहाराला तीलांजली देऊन, मन पेटून उठले पाहिजे, लढाईसाठी सज्ज झाले पाहिजे असे कवीमनाला वाटते.

शोषण आमच्या रक्ताचे / पोषण तुमच्या तक्ताचे
तक्तावरी त्या बसा खुशाल / आमुच्या हाती जळे मशाल

अशाप्रकारे फारसा आक्रोश न करता ही कविता विद्रोहाची सूचना देते. भूतकाळातील निर्बंधाचे जखडलेपण आणि वर्तमानातील मुक्तीचे क्षण असे चित्र रेखाटले आहे. मुक्तीनंतरचे वर्तमान कथन केले आहे. 'प्रत्युत्तरासाठी सरसावलेले हात', 'इतिहासावर ठसे कोरणारे पाय', 'अक्कल पिकवणारे डोके', 'तळपणारे मन' आणि 'ठिणग्या ओकणारे डोळे' अशा प्रतिमांमधून मुक्तीचे वर्तमान अधोरेखित केले आहे. जखडलेपण, गुलामी दूर झाल्याची कथा सांगितली आहे. मुक्तीच्या वर्तमानाबरोबरच समकालीन वास्तवाचा वेध या कवितेने घेतला आहे.

इथली रहाटीच विचित्र
माझा त्यांना खांद्यास खांदा खपत नाही
चिडून वाटते करावे एक घाव दोन तुकडे
जमत नाही, नाही असेही नाही
असे वार वारंवार झेलत आलो
आपण एकाच काळातील बाळे
म्हणून हाताला आवर घालत आलो

समकालीन जीवनातील हे वास्तव कवीने वाचकांसमोर ठेवले आहे. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर कवीमन सामंजस्याची भूमिका घेताना दिसते. इथल्या संस्कृतीचा कावेबाजपणा खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

इथल्या संस्कृतीने मेल्यानंतरही माणसामाणसांना नाही तर नाही
मेल्या मुडदयांनाही, निष्प्राण सांगाड्यांनाही सांगड घालू दिली नाही एकतेची
ज्यांचे ... त्यांचे अलग अलग वाढविले मसणवटे

ही भाषा दलित कवितेसाठी नवीन नाही. यापूर्वी अशा स्वरूपाचा आविष्कार अनेक वेळा झालेला आहे. जन्मत:च अधिकरभेद करणारी संस्कृती मेल्यानंतरही एकता जोपासू देत नाही. माणसाच्या मृत्यूनंतरही अलगावाची भूमिका कायम रहावी अशी सोय इथल्या संस्कृतीने करून ठेवली आहे. या सांस्कृतिक सत्याच्या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकाला उद्देशून हा कवी म्हणतो

आमच्या पांढरीतले, वेशीबाहेरील उकंड्यातले
भग्न पडक्या घराघरातले, जीर्ण मोडक्या झोपडीतले
कैक एकलव्य आपल्या चुकीच्या दुरुस्तीला
आसुसलेत धारा पाजळत
आपल्या पाची बोटाना पंच प्राणाहूनही जपत जपत
प्रारंभ करायचाय त्यांना गुरू दक्षिणेच्या समारंभाचा
त्या नव्या कोऱ्या पानावर ...

पुढचे शतक आमचेच आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या वहिल्या पानाला शब्दबद्ध करण्यासाठी 'बळीची बाळे' सज्ज झाल्याचे या कवितेने स्पष्ट केले आहे. एकविसाव्या शतकाच्या नव्याकोऱ्या पानावर अध्याय लिहिण्याचे स्वप्न पाहणारी ही कविता आहे. एकलव्याची पिढी आता सज्ज झाली आहे. चुकांची दुरुस्ती करण्याइतपत समज आणि बळ तिच्या हातात आले आहे. पाचही बोटे शाबूत ठेवण्याची कला त्यांनी आत्मसात केली आहे. वर्तमानाच्या संदर्भात एकलव्य

या मिथकाला एक वेगळा अर्थ देण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. येणारा उद्या आमचाच असेल असा आशावादही या कवितेने व्यक्त केला आहे. आक्रोश न करता, आवाजीपणाला मुरड घालून संयतपणेच विद्रोहाची अभिव्यक्ती या कवितेने केली आहे. 'जरा सांभाळून' असे म्हणत म्हणत ही कविता बंडखोरीचेच रस्ते धुंडाळते. सहनशीलतेचा अंत झाल्यानंतर बंडखोरीशिवाय दुसरा कशाचाही जन्म होत नाही. 'माणसाला माणूस न मानणाऱ्या इथल्या कुच्चर गद्दार औलादीची ऐसीतैसी' करण्यासाठी बंडावलेल्या मनाचे दर्शन घडविले आहे. कारण सोंग घेतलेल्या ढोंगी समाजाचे मानस या कवितेला कळलेले आहे. म्हणून आता केवळ कथा, कविता, लेख लिहून भागणार नाही अशी पोजही या कवितेने घेतली आहे.

शोभणारांच्या मृदू बोटातच लेखणी शोभते!
आमच्या बोटांना कुऱ्हाडीच्या दांड्याचाही स्पर्श हर्ष देतो
लेखणी इतकाच
अन् धगधगत्या टेंभ्याच्या मुठीही आवळता येतात त्यांना

अशाप्रकारचा इशारा या कवितेने दिला आहे. कथा कविता लिहून अंधार लखलखणार नाही. त्यासाठी धगधगता ठेंभाच मिरवावा लागतो. अंधारावर मात करण्यासाठी मूलभूत कृती कोणती याचे पुरेसे भान या कवितेला आहे. दारिद्र्याचे प्रतीक असलेल्या 'आई'चे चित्रही या कवितेने रेखाटले आहे.

सात ठिगळी लुगडे आणि चोळीही ठिगळाठिगळाची
माय माझी हुबेहुब मूर्ती दारिद्र्यमय त्या अवकळांची

अशा या मायनेच दु:ख, दैन्य पचविण्याचे बळ दिले. सहनशीलता, धिर आणि दारिद्र्याशी झुंजायला शिकवले. असे मायचे मोठेपण सांगितले आहे. 'माझ्या प्राणाला माऊले तुझ्या चरणी जागा योग्य' अशी कृतज्ञता व्यक्त केली आहे. अभिमानाची भावना व्यक्त केली आहे.

थोडक्यात, रविचंद्र हडसनकर यांची कविता म्हणजे उद्विग्न मनाचा उद्‌गार होय. अस्वस्थता नष्ट करण्यासाठी उद्‌ध्वस्तता प्रसवणाऱ्या या कवितेने क्रांतीचे मनसुबे समजावून सांगीतले आहेत. फारसा आक्रोश न करता विद्रोहाची सूचना दिली आहे. आवाजीपणाला मुरड घालून संयतपणेच विद्रोहाची अभिव्यक्ती केली आहे. हडसनकर यांच्या कवितेने मुक्तीनंतरचे वर्तमान कथन करून समकालीन वास्तवाचा वेध घेतला आहे. संस्कृतीचा कावेबाजपणा स्पष्ट केला आहे. वर्तमानाच्या संदर्भात पारंपरीक मिथकांना एक नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. येणारा उद्या आमचाच आहे अशाप्रकारचा आशावाद व्यक्त केला आहे. अंधारावर मात करण्याची मूलभूत कृती कोणती याचे पुरेसे भान आहे. दारिद्र्याचे प्रतीक असलेल्या 'माय'ची प्रतिमा सिद्ध केली आहे. हडसनकर यांच्या कवितेने आक्रस्ताळेपणा टाळून साध्यासोप्या शब्दकळातून उत्कट मनाचा आविष्कार केला आहे.

या दशकात आणखी काही महत्त्वाचे कवी पाहावयास मिळतात. त्यात प्रामुख्याने **सुगंधा शेंडे**, **शांताराम हिवराळे, रमाकांत जाधव, सुरेश कदम, नीलकांत चव्हाण, बी. रंगराव, अजय रामटेके, अरुणकुमार इंगळे, प्रज्ञावंत गौतम, देवेंद्र खंडारे, जयदेव मेश्राम** इत्यादी कवींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

नीलकांत चव्हाण यांचा **निखारा** हा कवितासंग्रह १९७८ मध्ये प्रसिद्ध झाला. 'निखारा'मधील कविता प्रकाशाच्या शोधासाठी निघाली आहे. 'नव्या सूर्याच्या' शोधासाठी ती चाचपडत आहे. या चाचपडण्यात आयुष्य बरबाद होत चालल्याची जाणीवही कवीने व्यक्त केली आहे. ही कविता 'पांथस्ताना सोनवाटा देणाऱ्या युगंधराचा' गौरव करणारी आहे. 'काळ्या माणसाच्या जगात वादळ होऊन जगावे लागते' असा तिचा उद्‌गार असलातरी पुरेशा सामाजिक भानाची प्रगल्भता प्राप्त व्हावयाची आहे.

प्रज्ञावंत गौतम या कवीचा 'माझा द्वेष पोसलाय' (१९७९) हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यातील कवितेने जन्मत:च द्वेष पोसल्याची कबुली दिली आहे. त्याला कारणीभूत इथली विषमता, जातीधर्म, मानवी विकृती आणि संस्कृती

असल्याचे स्पष्ट करीत 'संस्कृतीच्या सोंगांना घेऊन' वडवानल पेटला असल्याची सूचना दिली आहे. माणुसकीच्या हक्काच्या लढाईत स्पृश्यांचा सहभाग नसल्याबद्दल स्पृश्यांवर रोष व्यक्त केला आहे. उपेक्षित दोस्ताना फुले आंबेडकरांचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

अरुणकुमार इंगळे यांनी **अवलाद** (१९७१) या संग्रहात दलित जगाचे जगण्याचे वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पारंपरीक मराठी कवींना समाजाभिमुख होण्याचे आवाहन केले आहे. 'दीनाघरी धावा जरा / झोपडपट्टीशी सलगी करा/ आमच्यावरही कविता करा' असे हे आवाहन. त्यात कोणताही नवेपणा जाणवत नाही. कारण दलित कवितेने महाकवींनाही प्रश्नांकित केले आहे.

चोखा कांबळे यांच्या **पिंपळपान** या काव्यातून एका वेगळ्या जगाचा प्रत्यय येतो.हे काव्य 'खंडकाव्य' स्वरूपाचे आहे. त्यात प्रामुख्याने वेश्यांच्या पूर्वापार चालना आलेल्या व्यवसायाशी रक्ताच्या नात्याने जुळणारे अनोखे नाते हा कवी व्यक्त करतो. या काव्याच्या प्रस्तावनेत दुर्गा भागवतांनी असे म्हटले आहे, की कथाकाव्य हा दलित साहित्य परंपरेचा महत्त्वाचा वारसा आहे. नव्या वातावरणात तो सार्थपणे जिवंत ठेवण्याचे कार्य दलित कवीना करता येईल. 'पिंपळपानातून' सहानुभूतीचे दुरस्त शब्द आढळत नाही, परंतु मनस्वी उत्कट अनुभुतीचे आविष्कारण दिसते. कवी त्यातून भाववश होताना दिसतो. त्यामुळे या काव्यातील कथात्मक वास्तवाला मुक्तपणे बोलू दिले जात नाही. असे वाटत राहते. **नरेशकुमार इंगळे** यांचा 'अंगारा' हा कवितासंग्रह १९७१ साली प्रसिद्ध झाला. या कवितेत दलित समस्या केंद्रस्थानी आहे. दु:ख, दैन्य, चिड व निषेध नकारातून विद्रोही आविष्कार प्रकट झाला आहे. 'कॉमेडी आणि ऑक्टोपस' ही पँथरच्या व दलित समाजातील नेते, वक्ते, विचारवंत यांच्या अंतर्गत दुफळीवर प्रकाश टाकणारी काव्य पुस्तिका होय. आपल्या रक्ताच्या पण बेईमान झालेल्या प्रवृत्तीवर आसूड ओढणारी प्रत्ययकारी कविता त्यांनी लिहिली 'रक्त' ही त्यांची अतिशय महत्त्वाची कविता असून या कवितेतून समतेचाच विचार प्रस्तुत केला आहे. **उमाकांत रणधीर** यांच्या कवितेने अंत:करणातील स्वभाविक आणि तीव्रोत्कट आवेश प्रकट केला आहे.

रक्तलांच्छित वेदनांचा आक्रोश पाठीशी बांधून मी निघतो.
चार भिंतीच्या सुरक्षित थडग्यात
आवाज देत नाहीत. दार उघडत नाहीत
वितळतच नाहीत आकाशव्यापी ज्वालेत
त्यांचं कोवळं पांढरपण.... मी थुंकतो पचकन बंद दारावर
अन् बंदिस्त माझ्याच लालुष्ण रक्ताचे बेईमान वारसदार

अशी आत्मटिका रणधीर यांच्या कवितेत प्रत्ययाला येते.कविता मनाला अंतर्मुख करू पाहते. या दशकातील शांताराम हिवराळे यांचा **अश्रूंचा उन्हाळा** (१९७८), अजय रामटेके यांचा **युद्धाई** (१९७९), बी. रंगराव यांचा **इडिपस** (१९७९), देवेंद्र खंडारे **दस्तऐवज** (१९८०) आणि जयदेव मेश्राम यांचा **कैफियत** (१९८०) इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या दशकातील दलित कवितेच्या प्रवासात या कवितांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.

समारोप

१९७१-८० या दशकातील विविध कवींच्या कवितांचा घेतलेला परामर्ष आणि केलेल्या विश्लेषणातून काही वैशिष्ट्ये नोंदविता येतील.

दलितांमध्ये मध्यमवर्ग निर्माण झाल्यानंतर दलित साहित्य उदयाला आले. अन्याय अत्याचाराच्या तीव्रतर जाणिवेच्या प्रतिक्रियेतून दलित कविता आविष्कृत झाली. दलित कविता ही विचारांच्या वारशाची काव्यात्म निर्मिती

होय. या कवितेचा संबंध अपरिहार्यपणे सामाजिक उलथापालथीशी आहे. हजारो वर्षांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जगाचे संदर्भ दलित कवितेत मुखरीत झाले आहेत. सांस्कृतिक स्थित्यंतरामुळे दलित कविता निर्माण झाली आहे.

दलित कवितेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी सुरू केलेले मानवमुक्तीचे आंदोलन हा अभिन्न संबंध असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रारंभीच्या काळातील नामदेव ढसाळांच्या कवितेने अनेकविध वैशिष्ट्ये सिद्ध केली आहेत. दलित कवितेत समूहमनाचे दु:ख, दैन्य, दास्य, अगतिकता या सर्व बाबींची भीषणता चित्रित झाली आहे. स्वातंत्र्याचा उजेड सर्वसामान्यांपर्यंत पोहचला नसल्याची खंत प्रकट केली आहे. सामाजिक जीवनातील शोषण, अन्याय, अत्याचाराच्या विरोधातील समग्र विद्रोह पुकारला आहे. ही विद्रोही स्फोटकता आणि नकाराची जाणीव प्रस्थापित व्यवस्थेच्या निर्घृणतेमुळे जन्माला आली आहे. त्यामुळे सांस्कृतिक विसंवादाला नाकारणारी प्रखर जाणीव व्यक्त झाली आहे. संस्कृतीच्या मिरासदारांना खणखणीतपणे इशारा दिला आहे. आंबेडकरी तत्त्वज्ञान हे परिवर्तनाच्या लढ्यातील एक मूलभूत हत्यार असल्याचे स्पष्ट केले आहे.

गतकाळ, वर्तमान आणि भविष्य अशा त्रिविध संबंधाची जाणीव या कवितेतून व्यक्त होते. विद्ध्वंसकता आणि विधायकता ही या जाणिवेची दोन अंगे आहेत. मानव्याची प्रतिष्ठापना हे ध्येय आणि प्रखर आशावाद व्यक्त झाला आहे. मूल्याधिष्ठिततेमुळे दलित कवितेतील विद्रोहाला एक वेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. हा विद्रोह मानवतेवरील निष्ठेतून व्यक्त झाला आहे. या कवितेने लढाऊ बाण्याचे आक्रमक चित्र साकार केले आहे.

शोषणाविरुद्ध तीव्रतर विद्रोह आणि सामान्यांविषयी अपार करुणा या नकार स्वीकाराच्या विलक्षण ताणातून दलित कविता सिद्ध झाली आहे. शोषणाचे स्वरूप आणि शोषणाच्या निर्मूलनाचा विचार या कवितेने मांडला आहे. वर्णव्यवस्था आणि या व्यवस्थेने घेतलेला माणसाचा बळी अशा स्वरूपाचा शोषक शोषित संघर्ष स्पष्ट केला आहे. जनसामान्यांच्या विशाल संघर्षाशी या कवितेचे नाते आहे. जनसामान्यांचे क्रांतीकारी मानस ही कविता व्यक्त करते. बंडखोर समूहाची उग्रदाहकता स्पष्ट करते. ही उग्रदाहकता स्पष्ट करतानाच ढसाळांसारखा कवी आपल्या 'पाणी' या कवितेतून काव्य आणि तत्त्वज्ञान यांचे सुंदर एकात्म रूप प्रकट करताना दिसतो.

न्यायव्यवस्था, लोकशाही, संसद, सत्ताव्यवस्था या सर्व संस्थात्मक संरचनांवर तीव्रतर भाष्य दलित कवितेने केले आहे. त्याचबरोबर प्रजासत्ताक राज्यातील दरिद्री अवकळा अधोरेखित केली आहे. अभिजन परंपरेला नाकारणाऱ्या या कवितेने फॅसिझमच्या विरोधात स्पष्ट भूमिका घेतली आहे. माणसाच्या स्वातंत्र्यावर प्रचंड प्रेम करणाऱ्या या कवितेने माणसाचे महात्म्य सांगतानाच त्याचा ऱ्हास, विजय आणि छळाचा इतिहास सांगितला आहे. बहिष्कृत भारताचा इतिहास कथन केला आहे. वैश्विक दु:खाला गवसणी घातली आहे. भारतीय सांस्कृतिक, राजकीय नकाशावरील आणि आंतरराष्ट्रीय फलकावरील वर्तमानाचे वास्तव अधोरेखित केले आहे. प्रकाश आणि स्वातंत्र्य हीच जगाची शक्ती आहे असा निर्वाळा दिला आहे. समकालीन वर्तमानाचे हुकूमशाही मानसही स्पष्ट केले आहे.

नामदेव ढसाळांप्रमाणेच बाबुराव बागूल यांची कविता हा दलित कवितेतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरली आहे. चिंतनशीलता हे त्यांच्या कवितेचे केंद्र असून आत्मसन्मानासाठी ती विद्रोहाची शिकवण देते. वैचारिक अंतर्विरोधाचे स्वरूप स्पष्ट करून भारताला पुन्हा प्रकाशमान करावयाचे असेल तर बुद्धाचा मार्ग अटळ आहे अशी भूमिका या कवितेने मांडली आहे. मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान मांडले आहे. माणूस, त्याचे सामर्थ्य, कर्तृत्व, त्याची निर्मिती, सौंदर्य, मोठेपण हे सर्व दलित कवितेचे केंद्रवर्ती विषय ठरले आहेत. देव, देश, देवळे, धर्म यापेक्षा माणूस महान आहे या विचारसूत्रानुसार ही कविता आकारास आली आहे.

वैदिक परंपरा, तिचे विचारविश्व या कवितेने नाकारले आहे. माणसाच्या कष्टाळू हाताचे सुंदर तत्त्वज्ञान मांडले आहे. मानवी हाताचे सौंदर्य आणि सामर्थ्याचा देखणा आविष्कार केला आहे. व्यवस्था विश्लेषणातून इतिहासाची

पुनर्मांडणी केली आहे. पुराण-इतिहास-वर्तमान असा तिहेरी संबंध प्रस्थापित केला आहे. धर्मत्याग आणि देशत्याग करण्याची भाषा रोखठोकपणे व्यक्त केली आहे. माणसाला संघर्षसन्मुख करणाऱ्या या कवितेने चळवळीतील संघर्षाची दीक्षा दिली आहे. आंबेडकरी विचारांची कृतिशीलता हाच या देशातील परिवर्तनाचा पाया आहे. असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. 'आंबेडकर भारत' ही नवी संकल्पना जन्मास घातली आहे. विचाराला कृतीची जोड देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले आहे.

आत्मशोध घेणाऱ्या दया पवारांच्या कवितेने माणसाला गुलामीच्या कोंडवाड्यात कोंडणाऱ्या व्यवस्थेच्या कारनाम्याचा नेमका वेध घेतला आहे. या देशाला महान का म्हणावे असा प्रश्न उपस्थित केला आहे. 'कोंडवाडा' हे गुलामीचे प्रतीक असून समूहाच्या तुरुंगावाण्या जगण्याचा निर्देश त्यातून होतो. वर्तमानातील अन्याय अत्याचाराचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी मिथकांचे यथोचित उपयोजन केले आहे. त्यातून समकालीन सूडसत्र आणि अन्यायी वास्तवाचे प्रकटीकरण केले आहे. मिथकांच्या माध्यमातून सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी केली आहे. वर्तमानाच्या संदर्भात मिथकांना नवा आशय प्राप्त करून दिला आहे. चलतबुद्धाच्या प्रतीकाची निर्मिती केली आहे. दलितांच्या दुःखाचा प्रातिनिधिक स्वर कोंडवाड्यात निनादत राहतो. रूपकात्मक मांडणीतून दुःखाने भारलेल्या जीवनाचे सूचन केले आहे. विद्रोह ही सातत्यशील प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले आहे. या कवितेत तत्परता आणि निष्ठेचे प्रतीक म्हणून कार्यकर्ता साकार झाला आहे. चळवळीतील अंतर्विरोधही स्पष्ट झाला आहे. दया पवारांच्या कवितेने प्रतिमा, प्रतीके आणि मिथकांचे मोठे योगदान दलित कवितेला दिले आहे. उदा. दस्यूचा अबलख घोडा, चातुर्वर्ण्याचा पाणवठा, दुःखाने गदगदलेले झाड, नागभूमी, कोंडवाडा, खुळखुळ्याची काठी, निरो, क्रुस, बुद्ध, तक्षक, नाग, ब्रोकनमेन इ. अनेक प्रतीके आणि मिथकांसह वाक्प्रचार आणि म्हणीचाही यथोचित वापर केलेला पाहावयास मिळतो.

वामन निंबाळकरांच्या कवितेने शब्दाचे सामर्थ्य स्पष्ट केले आहे. पारंपरीक मराठी कवितेला प्रतिक्रियात्मक नकार दिला आहे. गावकुसाबाहेरच्या अभावग्रस्त जगाचे वेदनादायी चित्र रेखाटले आहे. 'माय'ची कारुण्यपूर्ण प्रतिमा चित्रित केली आहे. वेदनेतून निर्माण झालेल्या विद्रोहाची अभिव्यक्ती केली आहे. सांस्कृतिक भोवतालाच्या दुःखाची भव्य प्रतिमा साकार केली आहे.

त्र्यंबक सपकाळ्यांची कविता आपला आगळा वेगळा सूर लावताना दिसते. वेदना, विद्रोह, नकार या त्रिसुत्रीसह प्रतीके आणि मिथकांचे अर्थपूर्ण उपयोजन त्यांच्या कवितेने केले आहे. औपरोधिक अंगाने लोकशाहीचे वास्तव चितारतानाच भारतीय संस्कृतीचे खुजेपण स्पष्ट केले. हा या कवितेचा खास विशेष आहे. स्वकीयांना या कवितेने स्वाभिमान आणि संघर्ष शिकवला आहे. परमेश्वराचा येथेच्छ उपहास केला आहे. आंबेडकरी चळवळीच्या अनुषंगाने स्फोटक प्रतिमांचे उपयोजन केले आहे. त्यातून व्यापक अर्थाची सिद्धता झाली आहे. कुंती, द्रौपदी, कर्ण, इडिपस या प्राक्कथा हा सपकाळ्यांच्या कवितेचा खास प्रांत आहे. मातृभूमीला उद्देशून व्यथा प्रकट केली आहे. शोषक व्यवस्थेच्या विरोधातील स्फोटक मानसिकतेचा आविष्कार केला आहे. औपरोधिक शैली, स्फोटक आणि ज्वलनशील प्रतिमा तसेच मिथकांचे उपयोजन आणि अर्थांतर हे सपकाळे यांच्या कवितेचे महत्त्वाचे विशेष आहेत.

ज.वि.पवारांची कविता सांस्कृतिक संचिताला नकार देते. ढोंगबाजीचे पितळ उघडे पाडते आणि अमानुष संस्कृतीला आग लावण्याचा मनोदय व्यक्त करते. स्फोटक प्रतिमासंघटनातून कृतिशील विचार आणि युद्धमान मानसिकता व्यक्त झाली आहे. जातियता, सामाजिक विषमता नष्ट करण्याचा सर्व दुःखावरचा इलाज म्हणजे आंबेडकरी विचार असे ठाम प्रतिपादन केले आहे.

प्रल्हाद चेंदवणकर यांच्या काव्यात एक जोशपूर्ण आवाहकता आहे. अन्यायकर्त्या व्यवस्थेला जाब विचारणाऱ्या या कवितेने हिशोब तपासणीची एक विशिष्ट परिभाषा उपयोजित केली आहे. त्यातून व्यवस्थापरिवर्तनाचा विचार अधोरेखित झाला आहे. प्रतिमासृष्टीतून सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यांच्या हिणकस जगण्याची प्रतिमा सिद्ध

झाली आहे. विद्रोही जाणिवेच्या आविष्कारातून दाहक आणि स्फोटक प्रतिमांचे उपयोजन झाले आहे. समकालीन दलित जीवनाचे भेदक वास्तव स्पष्ट करून हरवलेले सर्वस्व प्राप्त करून घेण्यासाठी ही कविता मार्गस्थ झाली आहे.

केशव मेश्राम यांची कविता संमिश्र स्वरूपाची आहे. प्रारंभीच्या काळातील त्यांची कविता निर्भरशील संवेदनशीलतेची आहे. दलित साहित्य चळवळीच्या रेटयातून या कवीच्या जाणिवा बदलत गेल्या. त्यानंतर त्यांची कविता समाजाभिमुख झाली. या कवितेने अभावग्रस्त जगाचे विदारक चित्र साकार केले. जगण्याच्या कळवळ्याची सामूहिक प्रतिमा गोचर केली. मानसिक प्रक्षोभासह मेश्रामांच्या कवितेने विद्रोह प्रकट केला. परमेश्वराला आईवरून शिवी देऊन स्वार्थी आणि पोटभरू राजकारण्यांचा बुरखा फाडण्याचे कार्य पार पाडले आहे.

विद्रोहाची दाहकता, स्फोटकता, तीव्रता किती ताकदीने व्यक्त होऊ शकते हे यशवंत मनोहर यांच्या कवितेने प्रत्ययास आणून दिले. मनोहर यांची कविता सखोल चिंतनाची, तत्त्वमीमांसक आणि मर्मग्राही विवेचन करणारी आहे. त्यांच्या कवितेने समाज, संस्कृती, तत्त्वज्ञाने, शोषक व्यवस्था या साऱ्यांचा सखोल वेध घेतला आहे. सामूहिक दु:खाचा कार्यकारणभाव शोधला आहे. देवधर्मासह धर्मग्रंथ आणि प्रस्थापित साहित्याला नाकारले आहे. प्रस्थापित मूल्यव्यवस्थेला हास्यास्पद ठरविले आहे. वर्गजाणिवा कालीक भान आणि अनुभवाची अभिव्यक्ती समष्टीच्या संदर्भात केली आहे. वेदनेतून नवनिर्मिती केल्याची जाणीवही साक्षात केली आहे. तीव्रोत्कट भावना आणि गहिरी चिंतनशीलता संपृक्तपणे प्रतिमासृष्टीतून प्रकट झाली आहे. प्रखर विद्रोही, रौद्रभीषण प्रतिमाविश्व साकार झाले असून त्यातून अर्थाचे विविध स्तर आणि व्याप्ती वाढली आहे. विविधार्थी पदर गुंफून आंबेडकर प्रतिमा सिद्ध केली आहे. सूर्य प्रतिमेचे अधिक्य हे मनोहरांच्या कवितेचे खास वैशिष्ट्ये आहे. या प्रतिमेला विविधांगी आणि विविधार्थी स्तर प्राप्त झाले आहेत. दु:खाला शब्द नेसवण्याची एक नवी रीत या कवितेने सुरू केली. पारंपरीकता, गतकाळ आणि मूल्यांची आधुनिकता या द्वंद्वातून विद्रोह प्रकट झाला आहे. विद्रोह मूल्यामुळे एक आगळेवेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. एकूणच दलित कवितेच्या परंपरेत यशवंत मनोहर यांच्या कवितेने आपली अमिट आणि प्रखर मुद्रा उमटवली आहे.

प्रत्यक्ष चळवळीत सक्रीय असणाऱ्या कार्यकर्त्यांची लढाऊ वृत्ती कशी असते याचा प्रत्यय अर्जुन डांगळे यांच्या कवितेने दिला आहे. स्व च्या जगण्यासह समष्टीच्या दु:खाला त्यांच्या कवितेने साद घातली आहे. दलितेतरांनी निर्माण केलेले साहित्य, त्यांच्या अभिव्यक्ती पद्धती यांनाही या कवितेने नाकारले आहे आणि जीवनवादी जबाबदारी स्वीकारली आहे. लढ्याच्या पावित्र्यात उभ्या असलेल्या या कवितेने युगाचा इतिहास घडविण्यासाठी लेखन आणि विद्रोहाची दिशा दाखविली आहे. चळवळीच्या भानातून संघर्षाच्या प्रतिमा सिद्ध केल्या आहेत. माणुसकीच्या हक्कासाठी तत्पर असणाऱ्या या कवितेने चळवळीतील चढउतार आणि कार्यकर्त्यांची प्रवृत्ती यावर प्रकाश टाकला आहे. उपरोध हा या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. डांगळे यांनी आपल्या चरित्रासह कौटुंबिक, सांपत्तिक आणि सामाजिक स्थितीचे चित्र रेखाटले आहे. 'आई- बाप' ही त्यांच्या कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा असून ती कष्ट आणि दारिद्र्याच्या वास्तवातून साकार झाली आहे.

प्रकाश जाधव यांच्या कवितेने बहिष्कृत जगाचे उघडे नागडे वास्तव भेदकपणे वाचकांसमोर ठेवले आहे. बोलभाषेतून आकारास आलेली प्रतिमा, प्रतीके, सार्थ भाषेची नवी घडणावळ वाचकांपुढे पेश केली आहे. व्यक्तीचे स्वातंत्र्य नाकारणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध ही कविता उभी ठाकली आहे. बंडखोर व्यक्तिमानस प्रातिनिधिक रूपात व्यक्त झाले आहे. स्त्रीरूपाचे आणि तिच्या जगण्यावागण्याचे अनेक पदर स्पष्ट केले आहेत. इतर कोणत्याही दलित कवितेपेक्षा हे स्त्रीरूपदर्शन वेगळ्या स्वरूपाचे आहे. महानगरीय दलित जीवनाचे अनुभवविश्व मुखरीत केले आहे. भाषेचे अनेक स्तर हे या कवितेचे बलस्थान आहे. युद्धखोर मन आणि भोवतालची उदासिनता असा अंतर्विरोध ही कविता स्पष्ट करते. संघर्षावर ठाम विश्वास असणारी ही कविता व्यवस्थेच्या विरोधात उठाव करण्यासाठी सज्ज झाली आहे. दलितांच्या जीवनातील आणीबाणी अद्याप संपलेली नाही असा निष्कर्ष मांडला आहे. वेदनेच्या स्फोटातूनच स्वातंत्र्याचा, मुक्तीचा जन्म होईल अशा भरोशावर येऊन ही कविता स्थिरावली आहे.

राम दोतोंडे यांच्या कवितेने चर्मकार व्यवसायातील अनेक शब्दकळा आणि साधनांचा प्रतिमेसारखा वापर केला. मानवी मूल्यांचा उद्‌घोष करणाऱ्या या कवितेने व्यवस्थेमुळे वाटयाला आलेल्या दु:खातून दुभंगलेपणाची जाणीव व्यक्त केली आहे. दुभंगलेपणाच्या प्रवासातच ती विद्रोहाचा आकृतीबंध साकार करते. कौटुंबिक आणि सामाजिक असा दुहेरी संघर्ष चित्रित करते. दैववादाला सपशेल नाकारून माणसाचे सामर्थ्य प्रकट करणारी प्रखरता पेरण्याचे काम या कवितेने केले आहे. तथागताच्या सम्यक दृष्टीने लिहिलेला इतिहास भावी पिढीसमोर ठेवला पाहिजे असे आवाहन या कवितेने केले आहे.

कष्ट उपसूनही सुख मिळत नाही याविषयीची उद्विग्नता रविचंद्र हडसणकर यांच्या कवितेने व्यक्त केली आहे. अस्वस्थता नष्ट करण्यासाठी उद्‌ध्वस्तता प्रसवणाऱ्या या कवितेने क्रांतीचे मनसुबे समजावून सांगीतले आहेत. आवाजीपणाला मुरड घालून संयतपणे विद्रोहाची अभिव्यक्ती केली आहे. समकालीन वास्तवाचा वेध घेताना वर्तमानाच्या संदर्भात पारंपरीक मिथकांना नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. अंधारावर मात करण्याची मूलभूत कृती कोणती याचे पुरेसे भान ठेवून दारिद्र्याचे प्रतीक असलेल्या 'माय'ची प्रतिमा सिद्ध केली आहे.

एकंदरीत, दलित कवितेने दलितांवर झालेल्या अन्यायाच्या विरोधात क्षोभ व्यक्त केला आहे. गतकाळ आणि वर्तमान अशा दोन पातळ्यांवर झालेला हा अन्याय आहे. युगानुयुगे लादली गेलेली बंधने, संस्कृतीच्या मिरासदारांनी ओढलेले आसूड, मनूच्या वारसदारांकडून केल्या गेलेले शोषण, चातुर्वर्ण्य व्यवस्थेने केलेली सामाजिक वाताहत, देव-देश-धर्म-जात यांच्या जडशीळ बेड्यात जखडलेले आयुष्य, कुत्र्यामांजरासोबत उष्ट्यावाष्ट्यासाठी बसवल्या जाणाऱ्या पंगती, पावलोपावली केली जाणारी नाकेबंदी, अंधकारात खितपत पडलेली जिंदगी हे सारे गतकाळातील जगण्याचे भेसूर आणि विदृप स्वरूप दलित कवितेने स्पष्ट केले आहे.

अस्पृश्यता, जातियता, विटाळ, बाट हा सामाजिक जीवनातील सार्वत्रिक अनुभव दलित कवितेत प्रत्ययाला येतो. वर्तमानातील स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार, लुटली जाणारी इज्जत, बेअब्रू, भूक, उपासमार हा अनुभव कमीअधिक प्रमाणात दलित कवितेत सर्वत्रच पाहावयास मिळतो. दु:ख, दैन्य, दास्य, दुष्काळून ठेवलेले जीवन, दु:खाची सार्वत्रिकता, स्वातंत्र्याने केलेला भ्रमनिरास, असुरक्षितता, पायदळी तुडविली जाणारी लोकशाहीची मूल्ये, स्वातंत्र्योत्तर काळातील ब्राह्मणगाव, शेरपूर, धाकली, बावडा, किलावेनमानी इत्यादी ठिकाणी दलितांवर झालेले अमानुष अत्याचार, झालेली कत्तल, जाळली गेलेली घरे, फोडलेले डोळे, घेतलेले बळी असे अनेक संदर्भ आणि विषय दलित कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

दलित जगाची अभावग्रस्तता, घुसमट, अगतिकता, हतबलता, लुत भरलेले भवताल, अठराविश्व दारिद्र्य, पशूपातळीवरील जगणे, एकूण सामाजिक सांस्कृतिक दुषित असे पर्यावरण या सर्व संदर्भ, तपशील आणि वास्तवाला कवेत घेऊन दलित कविता एक सामाजिक सांस्कृतिक विधान करते. त्यातून मानव्याच्या प्रतिष्ठापनेचा उद्‌घोष निनादत राहतो.

धर्मांतरपूर्व काळापासून ते १९७०पर्यंतच्या कालखंडात दलित साहित्य जगताच्या परिप्रेक्ष्यात विविध गीत आणि काव्य प्रकाराच्या निर्मितीने, कलावंताच्या सर्जनशील कृतीमुळे दलित कवितेच्या इतिहासाची पायाभरणी झाली. १९७१-८० या दशकात नामदेव ढसाळ, दया, पवार, वामन निंबाळकर, ज. वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, प्रकाश जाधव अशा असंख्य कवी कलावंतांनी दलित कवितेला वेदना-विद्रोह-नकार आणि मानवतावादी मूल्यांचा समाजलक्ष्यी आशय प्राप्त करून दिला. या काळातील कवितेमुळेच दलित साहित्याच्या नवमूल्यांचा परिचय मराठी साहित्य जगताला झाला.

बुद्ध-फुले-आंबेडकर ही विचार परंपरा आणि चळवळीचे तत्त्वज्ञान व संघर्षाची कृतिशिलता हा दलित कवितेच्या जाणिवेचा मूलाधार आहे. ही जाणीव समूह जीवनाशी बांधिल आहे. तत्त्वज्ञान आणि चळवळीची मूल्ये यांच्या प्रभावातून

वास्तवाचा अन्वयार्थ लावून त्याची मांडणी करणे हा जाणिवेचा विशेष आहे. प्रस्थापित धर्म, परंपरा आणि संस्कृती यांच्याकडून मिळालेली मूल्ये आणि श्रद्धांनी दलित कवींची संवेदनशिलता नियमित होण्याऐवजी या मूल्य आणि श्रद्धांना नाकारून गतिमान झाली आहे. हे या जाणिवेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. ही जाणीव आत्मभान, आत्मशोध, नकार, विद्रोह, बंडखोरी, मानवी मूल्यांचा आग्रह इत्यादी घटकांनी समृद्ध झाली आहे.

जाणिवेमुळेच दलित कवितेला आशय प्राप्त झाला आहे. प्रामुख्याने या माणूसकेंद्री कवितेचा आशय हा स्वत:ची रचना घेऊन सिद्ध झाला आहे. माणसाचे होणारे शोषण, त्याचेवरील अन्याय, अत्याचार, जुलूम, त्याची मुस्कटदाबी, त्याचे सुखदु:ख, दैन्य, दास्य इत्यादी विविध बाबींचे चित्रण हा दलित कवितेच्या आशयाचा मुख्य भाग आहे. अस्पृश्यता, भूक, उपासमार, अगतिकता या अनुभूतीसह प्रस्थापित व्यवस्थेला दिलेला नकार, व्यवस्थेच्या विरोधातील विद्रोह, बांधिलकी, व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंध, स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतरे अशा विविध पातळ्यांवरील अनुभवविश्वाने दलित कविता मुखरीत झाली आहे. आशयाचा वेगळेपणा आणि मूल्यात्मक आविष्कार यामुळे दलित कवितेची नवता सिद्ध झाली आहे.

आत्मभान, आत्मशोध, नकार, वेदना, विद्रोह, बांधिलकी इत्यादी मूल्ये स्वत:ची रचना घेऊन सिद्ध झालेल्या दलित कवितेच्या आशयाने साकार केली आहेत. दलित कवितेने मानवमुक्तीच्या आंदोलनाचा विचार आणि मूल्ये यांचे संप्रेषण केले आहे. या कवितेने माणसाचे गाणे गाणाऱ्या संस्कृतीचा उद्‌घोष केला आहे. विद्रोह हे दलित कवितेच्या अभिव्यक्तीचे प्राणतत्त्व आहे. दलित कवितेत गतकाळाचा अन्वय आणि वर्तमानाचे वास्तव या दोन पातळ्यांवर विद्रोहाचा आविष्कार होतो. या विद्रोहाचे पर्यावसान शेवटी मानवी मूल्यांच्या स्वीकारात होते.

■

संदर्भ सूची

■

१. **प्रदीप गायकवाड,** पुनरावृत्तीची भूमिका, खास जनता अंक १९३३, पुनर्मुद्रण, समता प्रकाशन २००५.

२. **डॉ. हरिश्चंद्र निर्मळे**, दलितांची नियतकालिके

३. उक्त

४. **अविनाश डोळस, राम दोतोंडे**, संपादकीय, आधारस्तंभ (ल. बा. रायमाने गौरवग्रंथ), लोकवाङ्मय गृह

५. उक्त

६. **शंकरराव खरात**, मुलाखत, मिलिंद मॅगेझिन, १९७५-७६

७. **ल. बा. रायमाने,** मिलिंद वार्षिकांक, १९६९

८. उक्त

९. **घन:श्याम तळवटकर**, (प्रस्तावना) आकार, महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा, १९६७

१०. **अर्जुन डांगळे,** आकार (द्वि.आ.)

११. **अर्जुन डांगळे,** (निवेदन) दलित साहित्य : एक अभ्यास, म.रा.सा.सं.मंडळ,

१२. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, अग्रलेख, बहिष्कृत भारत, ३.४.१९२७.

१३. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

१४. **शंकरराव खरात**

१५. **प्रल्हाद चेंदवणकर**, (प्रस्तावना) ऑर्डर ऑर्डर, अभिनव प्रकाशन, १९७८
१६. **भालचंद्र फडके,** दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन. १९८९ (पृ. ११३)
१७. **म. सु. पाटील,** दलित कविता, पृ. ९५, लोकवांड्मय गृह,
१८. **एस. जी. सरदेसाई,** भारतीय तत्त्वज्ञान : वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, लोकवाड्मय, १९७७
१९. **रा. ग. जाधव,** निळी पहाट, (पृ. ११६), श्रीविद्या प्रकाशन च. आ. १९७५
२०. **नामदेव ढसाळ** (प्रस्तावना), मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले,
२१. उक्त
२२. **प्रकाश देशपांडे केजकर**, मराठी कविता नवी वळणे, पृ. १५९
२३. **संज्ञा संकल्पना कोश**, संपा. वसंत आबाजी डहाके व इतर, भटकळ फौंडेशन, पृ. १२८
२४. **प्र. श्री. नेरुरकर**, (प्रस्तावना) आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र प्रियदर्शिनी
२५. **म. फुले,** गुलामगिरीची प्रस्तावना
२६. **प. महादेव शास्त्री जोशी**, भारतीय संस्कृती कोश, खंड - ४, पृ. ६७
२७. **धडफळे मो. गो.,** पाली भाषेतील बौद्ध संत साहित्य- पृ. १७५, विद्यानंद प्रकाशन, २००३.
२८. **त्र्यंबक सपकाळे**, (मनोगत) सुरुंग
२९. **म. सु. पाटील**, दलित कविता, पृ. ५५, लोकवाड्मय गृह, १९८१
३०. उक्त, पृ. ३०
३१. **केशव मेश्राम**, विद्रोही कविता,
३२. **भालचंद्र फडके**, दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, पृ. १४८, श्रीविद्या प्रकाशन, १९८९
३३. **अस्तित्त्वाच्या रेषा**, संपादक ज. वि. पवार, प्रणाली प्रकाशन १९९०
३४. **म. सु. पाटील,** उक्त, पृ.४०
३५. **अर्जुन डांगळे,** (प्रस्तावना) दस्तखत, दलित साहित्य संसद

दलित कविता

(१९८१ - १९९०)

नामदेव ढसाळ । डब्ल्यू. कपूर । केशव मेश्राम
यशंवत मनोहर । शरणकुमार लिंबाळे । ज्योती लांजेवार
अरुण कृष्णाजी कांबळे । लहू कानडे । रविचंद्र हडसनकर
हिरा बनसोडे । प्रल्हाद चेंदवणकर । नीलकांत चव्हाण
राम बसाखेत्रे । वामन निंबाळकर । भीमसेन देठे
भाऊ पंचभाई । अनिल सपकाळ । किशोर घोरपडे
लोकनाथ यशवंत । भुजंग मेश्राम इत्यादी

समारोप

प्रकरण : ३

दलित कविता (१९८१-१९९०)

मागील दशकातील कवितेने आपला स्वतंत्र चेहरा मराठी साहित्य जगताला दाखविला. मराठी कवितेच्या क्षेत्रात एक नवे पर्व सुरू झाले. हजारो वर्षांपासून जो समूह मूक होता तो आपल्या पूर्वपिढ्यांच्या वेदनादायी जगासह कवितेच्या माध्यमातून मुखरीत झाला. वेदना, विद्रोह, नकार, बांधिलकी या मूल्यांसह एक नवे भाषिक अवकाश कवितेच्या क्षेत्रात समृद्धपणे दाखल झाले. पारंपरिक मराठी कवितेला नाकारून, तिच्या अभिव्यक्तीचे तंत्र झिडकारून दलित कविता सिद्ध झाली. यातच तिची नवता आहे. भाषा, प्रतिमा, प्रतिके, अभिव्यक्तीच्या तऱ्हा, जाणिवा, आशय या सर्व घटकांच्या अनुषंगाने दलित कवितेने आपली नवता सिद्ध केली आहे. या कवितेला असलेले तात्त्विक अधिष्ठान ही या कवितेची भक्कम बाजू आहे, हे सिद्ध झाले आहे.

१९८१ ते ९० या दशकात अनेक कवी लिहिते झाले. मागील दशकाच्या कवितेने नव्या कवींसाठी एक चेतनादायी वातावरण निर्माण केले. या वातावरणाच्या रेट्यामुळेच अनेक चेहरे कवितेच्या प्रांतात दाखल झाले. असे असले तरी नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, हडसनकर इत्यादी मागील दशकातील कवी याही दशकात कवितालेखन करताना दिसतात. या दशकातील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे या महत्त्वाच्या कवयित्री काव्यलेखन करताना दिसतात. शरणकुमार लिंबाळे, डब्ल्यू कपूर, अरुण कांबळे, लहू कानडे, भीमसेन देठे, विजयकुमार गवई, भाऊ पंचभाई, भुजंग मेश्राम अशी एक दमदार कवींची पिढी या दशकात उदयाला आली, त्यामुळे दलित कवितेच्या समृद्धीत अधिकच भर पडली.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेने याही दशकात आपले वर्चस्व राखले आहे असे दिसून येते. कारण या दशकात त्यांचे एकूण तीन संग्रह प्रसिद्ध झाले. **तुही इयत्ता कंची** (१९८१), **खेळ** (१९८३), **गांडू बगीचा** (१९८६) या तीनही संग्रहाचे रंगरूप वेगवेगळ्या स्वरूपाचे आहे. पँथर चळवळीतील अरुण कांबळे हे एक महत्त्वाचे नाव असून 'अरुण कृष्णाजी कांबळे' या शीर्षकाचा १९८३ साली प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह स्वत:चे वेगळेपण राखून आहे. या दशकात दाखल झालेली 'कवयित्रीची कविता' हा एक अभिव्यक्तीचा अनोखा आविष्कार ठरला आहे. त्याचप्रमाणे लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम यांची या दशकाच्या शेवटी दाखल झालेली कविता म्हणजे पूर्वसूरीचा प्रभाव नाकारून दलित कवितेत एक नवा चेहरा आणि स्वर उमटविणारी कविता ठरली आहे. दलित कवितेची व्याप्ती वाढविणाऱ्या या सर्व घटना आहेत असे म्हणता येईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दलित कविता आता मराठी साहित्याच्या प्रवासातील मुख्य प्रवाह ठरली आहे. कारण दलित कवितेचा मराठी कवितेवरही प्रभाव पडू लागला. मराठी कवितेला समाजाभिमुख करण्याचे कार्य दलित कवितेने पार पाडले आहे. मराठीतील बरेचसे कवी दलित कवितेच्या तोंडवळ्यासारखी कविता लिहिण्याचा प्रयत्न करू लागले. हा मराठी कवितेतील नवीनच प्रयत्न होता असे म्हणता येईल. त्याचप्रमाणे दलित कवितेचा एक दबदबा

निर्माण झाला. अनेक दडपलेल्या स्वरांना उजागर होण्याचे बळ दलित कवितेमुळे प्राप्त झाले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. विविध जातीसमूहात जसे शिक्षणाचे लोण पसरले तसतसा कवितेचा उच्चारही होऊ लागला ही बाबसुद्धा दलित कवितेची व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली. मागील दशकातील कवितेपेक्षा या दशकातील कवितेचे काही वेगळेपण आहे का? हे विविध कवींच्या कवितांचा परामर्श घेऊन शोध घेता येईल.

✸ नामदेव ढसाळ (जन्म- १५ फेब्रुवारी १९४९ - मृत्यू- १५ जानेवारी २०१४)

तुही इयत्ता कंची (१९८१) हा ढसाळांचा कवितासंग्रह प्रस्थापित व्यवस्थेची लायकी काय, किती आणि केवढी यावर प्रश्नचिन्ह ठोकते. आजवरच्या त्यांच्या कवितेपेक्षा या कवितेची ढब वेगळ्या स्वरूपाची आहे. चिंतनशीलता, आंतर्मुखता यासोबत सांस्कृतिक मिरासदारीला झिडकारून लावणारी, मराठी भाषेच्या कुचकामीपणाला हिणवणारी, स्वातंत्र्य, भूक, दारिद्र्याचे रूप- स्वरूप चित्रित करताना बाबासाहेब आंबेडकरांच्या महानतेचा आलेख मांडणारी अशा स्वरूपाची एक मूलभूत प्रश्न ही कविता उभा करते. तो स्वातंत्र्याच्या संदर्भात आहे. स्वातंत्र्य ही विश्वास ठेवण्यासारखी गोष्ट राहिली नाही. या स्वातंत्र्याने वेदनेचे बक्षीस दिले आहे. धड जगूही देत नाही आणि धड मरूही देत नाही अशी पकड या स्वातंत्र्याने बसविली आहे.

हे स्वातंत्र्या, तुझ्या रांडेला वांझ ठेऊ नको
तिला आमच्या खाली निजू दे
तिची कूस उजवू दे
हे स्वातंत्र्या, हे दगडा, हे बुळग्या, हे शेंदराच्या मालका
फक्त एका नियोगाची मला संधी दे

एका उद्वेगशील मनस्थितीतून अशाप्रकारची अभिव्यक्ती होताना दिसते. स्वातंत्र्यात माणसाची अर्धमेली अवस्था झाली आहे. त्यातून हा उद्वेग उफाळून आला आहे. दगडासारखे स्वातंत्र्य आणि एरंडाच्या गुऱ्हाळासारखा वाढत जाणारा, विद्रूप पानं फैलावत जाणारा देश असे या देशाचे स्वरूप असल्यामुळे या देशावर फिदा व्हावे असे काहीच नाही. वास्तविक देश प्रजासत्ताक झाला तेव्हापासून संसद, न्यायसंस्था हे लोकशाहीचे मूळ आधारस्तंभ ठरले आहेत. प्रत्यक्ष व्यवहारात या संस्थाचे विदृपीकरण झाल्याचे निदान ढसाळांची कविता करते.

हा भाकरीचा जाहिरनामा / हा संसदेचा रंडीखाना
ही देश नावाची आई / राजरोस निजते कुबेराच्या सोबत
काळ होत चालला आहे कर्मठ

संसद, देश या संस्थांचे विरूपीकरण झाले आहे. संसदेचा रंडीखाना आणि देशाला वारांगणेचे रूप प्राप्त झाले आहे. भांडवलदारांच्या विळख्यात हा देश अडकला आहे. सत्तासमतोल ढळला, तिने भ्रष्ट रूप धारण केले आहे. अन्यायग्रस्त जनता पुरती ढवळून निघाली आहे. अशा अर्थाचा संस्कार ही कविता करते. एकीकडे हा विपरीतपणा दुसरीकडे स्वातंत्र्याने सर्जनशीलताच मारून टाकली आहे.

हे आमच्यापर्यंत पोहचलेंल सर्जनशील स्वातंत्र्य
त्याच्या पौरुषत्वाचा उच्छेद करून
तुम्ही केले त्याचे नामांतर हिजड्यात...
शेवटी तुम्ही हे असं वाल्मिकीचं वारुळ करून टाकलंत करंट्यांनो
तुमच्या पुराणकथांच्या बांजिंद्या कोकशास्त्राची
आम्हाला किळस यायला लागलीय पुन्हा पुन्हा

नवं काही निर्माण होईल, नवी चेतना मिळेल, जगण्याची उर्मी मिळेल याची आता शाश्वतीच उरली नाही. दलित वंचितांच्या वाट्याला आलेली अशी विपरीताची अवस्था ढसाळांच्या कवितेने त्यांच्या बेदरकार शैलीत स्पष्ट केली आहे. विपरीताच्या वास्तवात तग धरून राहिलेच पाहिजे, त्याशिवाय जुलमाच्या हंगामात आपला प्रतिकाराचा ध्वनी झंकारत

राहिला पाहिजे अशाप्रकारची चालना आणि विद्रोहाला दिशा देण्याचे कार्य ही कविता पार पाडते.

रसद पोहोचेल, न पोहोचेल
जिथे त्यांनी देहच केलाय काबीज
श्वासोच्छ्वासांना जखडले आहे साखळदंडानी
तिथे हृदयातला कंदील विझवून कसे चालेल?

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे ढसाळांचे स्फूर्तिकेंद्र होय. दरवर्षी बाबासाहेबांवर एखाद दुसरी कविता लिहिण्याचा शिरस्ता ढसाळांनी शेवटपर्यंत कायम ठेवला. या संग्रहात ते लिहितात.

'देशाच्या नावापेक्षा तू किती तरी मोठा झालाहेस
तू कधीच उबवली नाहीस खुडूक कोंबडीसारखी अंडी '
'तू वाकवलं युगाला शेंड्यावांड्या मोडून जे होतं अप्राप्य'
सर्व दलितांसाठी तू केंद्र पुरुष झालास
'तू पहाडासारखा उभा राहिलास गुरुत्वाकर्षण हरवून बसलेल्या
पृथ्वीच्या देहात पाय रोवून
ज्या हृदयात तू साठवलीस सहिष्णूता
त्याच हृदयात जागवलास तू ज्वालामुखी विद्रोह
ईश्वराची तू केलीस शवचिकित्सा सटवीचं कापलंस नाक केलंस नकटं
पापपुण्याच्या स्वर्ग नरकाच्या भाकडकथा तू बुडवल्यास गटारात
तेहतीस कोटी बिंदचाट्यांचा तू फोदा केलास उदास
परित्यक्त जमीनीवरही तू लावलीस माया

वरीलप्रमाणे विविधांगी आंबेडकरी कर्तृत्व एका विशिष्ट भाषिक अभिव्यक्तीतून स्पष्ट झाले आहे. ढसाळांच्या कवितेतील ही भाषिक अभिव्यक्ती बरेचदा अंगावर येणारी, धक्कादायक अशा स्वरूपाची मात्र ती जोरकस आणि सार्थ आहे. भाषिक नवतेचा हा खास प्रांत ढसाळांनी प्रस्थापित केला आहे. 'तेहतीस कोटी बिंदचाट्या' आणि 'परित्यक्त भूमी' ह्या लक्षणीय प्रतिमा आहेत. हिंदू धर्मात देवदेवतांची संख्या तेहतीस कोटी असल्याचे सांगितले जाते. देव ही संकल्पना प्रत्यक्षात सिद्ध करता येत नाही. तिचे अस्तित्व सिद्ध करून दाखवता येत नाही. म्हणून ती एक संशयास्पद कल्पना ठरते. बिंद म्हणजे विर्य. मानव जन्माच्या संदर्भात विचार केल्यास विर्य आणि बिजांडाच्या संयोगातून मानवी जीव जन्मास येत असतो. म्हणून हा संयोग होणे जीवशास्त्रानुसार अपरिहार्य ठरते. केवळ बिंद चाटल्याने सृजन होत नसते. ते केवळ वांझपणच ठरते. ज्यातून सृजनच होत नाही त्या गोष्टी स्वीकारण्यात अर्थ नाही. कारण त्यातून काही फुलण्याची, फळण्याची आशाच नाही. अशा गोष्टी पूर्णतः नाकारणेच इष्ट ठरते. म्हणून त्यांची वासलात लावणे असा अर्थ 'तेहतीस कोटी बिंदचाट्यांचा तू फोदा केलास उदास' या अभिव्यक्तीतून अभिप्रेत आहे.

'परित्यक्त भूमी' म्हणजे जी अबला, निराधार, लाचार आहे. ज्या भूमीला ओसाडपणाची अवकळा प्राप्त झाली आहे. अशी भूमी. सामाजिक अंगाने विचार केल्यास जी भूमी बहिष्कृत आहे. ज्यावर माणसे आहेत मात्र त्यांना बहिष्कृत केल्या गेले आहे. त्यांना आपल्या हृदयाशी लावणे, त्यांना लळा लावणे अशी कृती घडली आहे म्हणून आंबेडकरी प्रतिमेला मातेचे रूप प्राप्त झाले आहे. परित्यक्त भूमीला माया लावली म्हणजे तिला जीवनसत्त्व मिळते. तिच्या वाढ आणि विकासाला प्रारंभ होतो. अशाप्रकारे ढसाळांच्या कवितेने सर्जनाचे प्रतीक म्हणून आंबेडकर प्रतिमा सिद्ध केली आहे. ढसाळांच्या कवितेतील भाषेत शिवराळपणा, लिंग योनीवाचक शब्दांची अर्थपूर्ण योजना केलेली प्रत्ययाला येते. ''लिंग-योनीवाचक शब्दांनी कोंडलेल्या उद्रेकाला, अनावर संतापाला वाट करून देणे हा त्यांचा प्रकृतीधर्म आहे. जास्तीत जास्त राग, चिड, अवहेलना, अपमान करायचा तर तशाच जबऱ्या शब्दगोट्यांनी ते भन्नाट मारा करतात आणि तो इतका अचूक असतो की लक्ष छिन्नभिन्नही व्हावे आणि मनही हलके मोकळे व्हावे.''[१] केशव मेश्रामांचे हे मत ढसाळी भाषेचा नेमका

प्रकृतीधर्म स्पष्ट करणारे आहे.

भुकेमुळे माणसाच्या आयुष्याचे प्रश्न गहन झाले आहेत. कारण भुकेने आपले डावपेच माणसाला कळू दिले नाहीत. म्हणून माणसे भुकेसोबत सरपटत गेली. 'आमच्या घरात एकही दाणा नाही, आज आमच्या घरात एकही शहाणा नाही' त्यामुळे भुकेला जपत राहिले तर आपला निभाव लागणार नाही. म्हणून ढसाळांची कविता सर्वांवंचित भुकेलेल्यांच्या वतीने भोगाच्या पातळीवर दोन हात करण्यासाठी सज्ज होताना दिसते.

भूक, तुझा शृंगार और
तुझ्याशिवाय कुठलीच अवदसा येत नाही आमच्या वाट्याला
भूक, तुला जर भोगता आलं नाही
तर आत्महत्या करावी लागेल आमच्या जथ्याला
आमचा पुरुषार्थ तुझ्यासमोर आहे
बघू कोण जिंकतं, तू का आम्ही!

भूकेवर मात करण्यासाठी अशी अनोखी तऱ्हा ढसाळांच्या कवितेने वाचकांसमोर ठेवली आहे. भूक आणि भोग असा संबंध जोडून एक वेगळे कृतिशील आव्हान भुकेसमोर उभे केले आहे. ईश्वर, आत्मा ह्या संकल्पना नाकारण्याची एक वेगळी तऱ्हा पाहावयास मिळते.

ईश्वर नश्वर नंदीच्या अंडासारखी
सृजनखोर जर्दाळू
आत्म्या, चल फूट भडव्या
नसती साली ब्याद

याचप्रमाणे इतरही भाषिक अभिव्यक्तीच्या विविध तऱ्हा प्रत्ययाला येतात. उदा. 'देव : माणसाने मारलेली एक अस्खलित थाप', 'मृत्यू : एक शिडी चढत जाणारी पीडा', 'आम्ही निद्रेतही गात असतो मुक्तीचं गाणं लाजीरवाणं', 'खळाळ पाण्यात फेडून टाक आता तरी ही वेदांगाची लुगडी', 'त्यांची पुष्टावलेली अभिजात ढुंगणं', 'दंगल एक दर्दभरी कविता ऐकवून जाते माणसाला', 'इथले सर्व धर्मसंस्थापक असतात मवाली,खुनी' ही सर्व अभिव्यक्ती म्हणजे त्या त्या संकल्पनांवर केलेले भाष्य आहे. भाष्य हा दलित कवितेचा एक महत्त्वाचा विशेष ढसाळांनी जोरकसपणे ठळक केला. बोलभाषेला वक्तृत्वाच्या पातळीवर नेऊन तिला विचार तत्त्वाचेही अधिष्ठान प्राप्त करून द्यायचे ही किमया ढसाळांसारख्या कवीला लिलया साधली आहे. सोबतीला उपरोधाचा जातिवंतपणा आहेच. लोकाविष्कार, लोकगीतातील लय, उखाणे, वाक्प्रचार, म्हणी या सर्वांची रेलचेल ढसाळांच्या कवितेत पाहावयास मिळते. मातोश्री रमाबाईच्या जीवन आणि व्यक्तित्त्वाला आपल्या कवितेचा विषय करणे हे क्वचितच दलित कवींना साधले आहे. मात्र ढसाळांच्या कवितेने हे आव्हान लिलया पेलले आहे.

आज तुझा एक अडगळीतला फोटो माझ्या आठवणीत आहे
त्यात सर्व आहेत, तू, तुझ्या नणंदा, जावा, दीर, लष्करातले मामंजी
पोरंबाळ आणि साहेब आणि टॉबी आणि निख्खळ कॅन्टोन्मेट
वर्षांनुवर्ष पाहात आलोय हे चित्र मी
साहेब तर परमेश्वराच्या छाताडावर बसल्यासारखे आजही वाटतात
सुपारी कातरणाऱ्या टिळकांच्या आत्म्याला त्रास देत
रमाबाई, ही सर्व पुण्याई तुझी आहे
त्या फोटोत फक्त तूच आहेस
तुझे चरित्र/ तुझ्या खस्ता/ तुझे अश्रू/ तुझे उसासे/ तुझे शहाणपण
तुझ्या डोळ्यातले आदिअंताला स्पर्श करणारं कारुण्य

तुझ्या डोळ्यातील ती निष्ठेची काळीशार पोत
तुझ्या चेहऱ्यावरले ते प्रासादिक औदासिन्य
कृष्णहातांच्या चटक्यांच्या कहाण्या सांगणाऱ्या बांगड्या
किती गं सहन केलंस हे!
अष्टौप्रहर ती भटीण सरस्वती साहेबांच्या मागे असे!
सवतीमत्सर तुला करताच आला नाही का ग?

रमाबाई ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सुविद्य पत्नी होत. वरील कवितेत त्यांच्या नितळ चारित्र्याचं आणि शोषिकतेचं 'रमाई' प्रतीक साकार झाले आहे. एका महापुरुषाच्या पत्नीची अनेक पातळ्यांवरील सहनशीलता स्पष्ट झाली आहे. दु:ख, विवंचना, कष्ट अशा पार्श्वभूमीवर बाबासाहेबांना जपण्याची पराकाष्टा रमाईने केली. यातून ऋजूता, निर्व्याज प्रेम आणि कारुण्याचे प्रतीक म्हणूनही ते सिद्ध झाले आहे. उपसावे लागलेले कष्ट आणि परिस्थितीने पिचून गेलेल्या रमाईने आपल्या पतीच्या प्रचंड विद्वत्तेशी कधीही सवतीमत्सर केला नाही. रात्रंदिवस अभ्यासात गढून जाणाऱ्या बाबासाहेबांना सांसारिक जीवन आणि पत्नीची काळजी घेण्यासाठी वेळच मिळाला नाही. 'भटीण सरस्वती' ही मार्मिक प्रतिमा आहे. सरस्वती ही विद्येची देवता मानली जाते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत विद्येचा अधिकार फक्त ब्राह्मणांना होता. या पार्श्वभूमीवर ही प्रतिमा अतिशय अर्थपूर्ण ठरली आहे. विद्या तनामनात भिनवून, विद्येच्या शिरावर बाबासाहेब उभे राहिले. त्यामुळे शिक्षण विचाराचे ते प्रेरणापुरुष ठरले. त्यांच्या शिक्षणविचाराने समाजमन विद्येच्या मार्गावर ढवळून निघाले. पतीच्या या कर्तृत्वात धन्यता मानल्याने रमाईची उंची अधिकच वाढली आहे. एक माणूस म्हणून, हाडामासाची पत्नी म्हणून, त्यागाचे प्रतीक म्हणून 'रमाई' हे प्रतीक ढसाळांनी आपल्या कवितेतून अजरामर केले आहे.

थोडक्यात, ' तुही इयत्ता कंची' या संग्रहाने नव्वदीच्या दशकात एक वेगळा दबदबा निर्माण केला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. या संग्रहानंतर दोन वर्षांनी त्यांचा **खेळ** हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. हा संग्रह 'समस्त स्त्री-पुरुषांच्या कामविलासाला' ढसाळांनी अर्पण केला. त्यावरूनही या कवितेची जातकुळी वेगळी आहे हे स्पष्ट होते. कवितेमागील मानसिकतेबाबतही सूचना मिळते असे असले तरी ढसाळांनी या 'खेळ'मधील कवितेतून अतिशय धीट भाषेतून पारंपरीक प्राक्कथांचा दुजाभाव आणि पक्षपात कथन केला आहे. उदा.

लक्ष्मी / सरस्वती पक्षपाती रांडा
आम्ही या म्हटलो त्या आल्या नाहीत
आमच्या खाली निजा म्हटलो
त्या निजल्या नाहीत

हिंदू परंपरेत लक्ष्मी ही धन आणि श्रीमंतीची देवता मानली जाते. तर सरस्वती ही विद्येची देवता मानली जाते. धन आणि विद्या या दोन्ही गोष्टींपासून वंचित ठेवल्या गेलेल्या सामाजिक समूहाची वेदना येथे प्रकट झाली आहे. मात्र ही वेदना व्यक्त करण्यासाठी वेगळ्या स्वरूपाची भाषिक अभिव्यक्ती झाली आहे. दलित कवितेत विशिष्ट संदर्भात अशीच भाषा का वापरली जाते? त्यामागे एक उद्वेग आणि संतापाची भावना आहे. पक्षपाती प्रवृत्तीविषयीची चिड आहे. ''दलित दुराव्यामुळे सांस्कृतिक परंपरेतील सर्व नायक नायिका दलित कवीमनांना परक्या, खोट्या व प्रसंगी खलनायक खलनायिका वाटतात.''[२] हे रा.ग.जाधव यांचे मत वरील अभिव्यक्तीला तंतोतंत लागू पडणारे आहे. येथे आवाहकता आणि आक्रमकता या दोन्ही प्रक्रियांना न मिळणाऱ्या प्रतिसादातून, पक्षपात करणाऱ्या विद्या आणि धनाच्या देवतांना वेश्येच्या पातळीवर आणून ठेवले आहे. म्हणजेच पारंपरीक उच्चभ्रू प्रतिमांना निचतेच्या पातळीवर आणून ठेवले आहे. उच्चभ्रू आणि उपेक्षित अशा दोन जगाचे सूचनही त्यातून होते. हा ढसाळांच्या कवितेचा अधोरेखित करण्यासारखा विशेष आहे.

गांडू बगीचा ह्या संग्रहाचे शीर्षकही अजब वाटते. काहीसे अश्लील अशिष्टही. मुंबईच्या नागपाडा भागात स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी उद्याननिर्मितीसाठी एक जागा निश्चित केली होती. पण ते उद्यान आकारास आले

नाही. मात्र त्या मोकळ्या जागेत तृतीयपंथी लोक मौजमजा करण्यासाठी पठाण वा अन्य ग्राहकांना घेऊन येत त्यामुळे लोकांनी या जागेचे 'गांडू बगीचा' असे नामांकन केले. असे हे संकेतस्थळ आणि भारत देश, 'ये गुलिस्तां हमारा' अशी ओळ येते त्याच्या गौरवगानात. माणसे वर्णजातीव्यवस्थेत भरडली जात असल्याने शरम आणणारी, अख्ख्या विश्वात फक्त आपल्या भारतातच अजुनही तशाच तऱ्हेने टिकून असणारी ही व्यवस्था, हा देश पौरुष नसलेल्या गांडू लोकांचाच आहे. कवीला असेही सूचवायचे नसेलच असेही नाही.''[३] मात्र एवढेच सूचित करणे हा या संग्रहाचा उद्देश खचितच नव्हे.

खरंच, माझा कुणीही परमेश्वर नाही
खरंच माझा कुठलाही धर्म नाही
मी उभ्या उभ्या माझ्या नशिबाला लावले आहेत घोडे

धर्म, परमेश्वर, नशीब या गोष्टी माणसाच्या जीवनातील मूलभूत गरजाच्या निवारणासाठी कुचकामीच ठरल्या आहेत. एवढेच नव्हे तर त्यांनी अनेक पिढ्यांची आयुष्येही बरबाद केली आहेत. जुलूमाचा हैदोस आणि अन्यायाची न्यायालयं जिथं माणूस म्हणून कधी न्याय मिळाला नाही. म्हणून माणूसपणासाठीचा आक्रोश ढसाळांच्या कवितेने मांडला आहे. निरपराध्यांच्या बेकसूर मरणांची उत्तरे मिळण्याची शाश्वतीच या लोकशाही राष्ट्रात उरलेली नाही.

संसदेत हिजड्यांचा नंगा नाच
इथल्या बेकसूर मरणांची उत्तरं तुला अशी मिळणार नाहीत
एका आवश्यक हिंसेसाठी उचल तुझा हात
उगार स्वत:च्या आत्महत्येविरुद्ध बंड
ही असली वसंताची गाणी कुणाच्या गांडीत घालायचीत?

अशा स्थितीत वास्तवापासून पलायन करता येणार नाही, स्वत:पासूनच एका संघर्षाला सिद्ध झाले पाहिजे. भावविभोर तर मुळीच होता येणार, ताठ मानेनेच वास्तवाला भिडता आले पाहिजे असा विचार ही कविता मांडते. या देशाने माणसाला पोरके केले आहे. हा देश म्हणजे एक छळछावणी आहे. प्रत्येक आघाड्यावर माणसाची अवहेलनाच केली. त्यामुळे नवनिर्माणाचे स्वप्न वांझोटेच ठरले. या देशाच्या स्वातंत्र्याने माणसाला भ्रमिष्ट करून सोडले. ''झाटांचा भार खांद्यावरून वाहत निर्थक भटकलो आपण या देशात'' असा निरर्थक भटकंती करायला लावणारा हा देश असल्याचा निर्वाळा या कवितेने दिला आहे. कारण श्वापदाचीच अधिसत्ता येथे प्रस्थापित झाली आहे.

माणसाच्या जथ्यांना जेरबंद करणारी श्वापदांची अधिसत्ता
हवेच्या एका एका कणावर त्यांचा ताबा
पाण्याच्या थेंबाथेंबाला मनुष्य मोताद
चिटपाखरू गाईल कसं इथे?

मुक्तीची स्वप्ने हवेतच विरून गेली. हवा, पाणी या सर्वांचा ताबा अधिसत्तेने घेतला आहे. माणूस त्यामुळे निराश्रीत झाला. त्याच्या पोरकेपणावर कोणत्याही वृक्षाने सावली धरली नाही. स्वतंत्र राष्ट्रात पारतंत्र्यच वाट्याला आले. म्हणूनही कदाचित या देशाला कवीने गांडू बगीचा असे संबोधले असावे.

✸ डब्ल्यू कपूर (जन्म २० जुलै १९५२)

डब्ल्यू कपूर यांचा **बंधमुक्त** हा कवितासंग्रह १९८१ साली प्रसिद्ध झाला. या कवीचे नाव कपूर वासनिक असे आहे. दलित कवितेच्या पारंपरीक अनुभवविश्वातून 'बंधमुक्त'मधील कविताही मुक्त होऊ शकली नाही. एकलव्य, चोखामेळा, महाड हे सारे संदर्भ या कवितेत आले आहेत. चवदार तळे हे दलित कवितेतील एक मिथकच ठरले आहे. दलित कवितेतील या मिथकाची सार्वत्रिकता हा विशेषच म्हटला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महाड हे अभिन्न नाते एकूणच दलित कवितेत ठळकपणे अधोरेखित झाले आहे. कपूर यांची कविताही त्याला अपवाद नाही.

महाडचे पाणी तुषारलेस तू उजाड वाळवंटात

नि बघ कसे फोफावलेत निखारे अस्मितादर्शाचे

चवदार तळ्याच्या पाण्याला स्फोटकपणा आणि दाहकता प्राप्त करून देण्याचे कार्य दलित कवितेने केले आहे. कपूर यांच्या कवितेने दलित जाणिवांच्या प्रकटीकरणासाठी निसर्ग प्रतिमांचा, विशेषत: भौगोलिक प्रतिमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला आहे.

माणसाच्या जंगली ही अशी वस्ती पशूंची
शोधतो मी ही जंगले जाळणारी माणसे

माणसांच्या मनातील पशू प्रवृत्तीला नष्ट करू पाहणारी जाणीव येथे उद्वेगाने व्यक्त होते. या कवितेतील 'माती'ची प्रतिमा पौराणिक ते समकालीन असा प्रवास करायला भाग पाडते. कत्तलखोर 'माती'चा इतिहास या कवितेने कथन केला आहे. उदा.

माती : मातीच्याच संदर्भांना लाथाडणारी
माती : नेमाने शंबूक वधाची तालीम देणारी
ह्या मातीचे सारेच न्यारे जसे कालवे तसेच वारे
काट्यांचे पिक फोफावते येथे हिरवळ मात्र कुजून जाते
नद्या पर्वत दगड धोंडे ह्या मातीचा परिचय
माणुसकीचा गंध नाही माती ही माणसाहारी

विद्वेषाला जन्म देणारी ही माती नवसर्जनाला मारून टाकणारी आहे. केवळ दगडधोंडे म्हणजे राष्ट्र नव्हे किंवा भौगोलिक सीमा म्हणजे राष्ट्र नव्हे. हे भान अजून या मातीला आले नाही. म्हणून येथे माणुसकीची वानवा आहे. ही माती एक राष्ट्र म्हणून अद्याप विकसित व्हावयाची आहे. देशाच्या प्रकृती आणि प्रवृत्तीबद्दलचे भाष्य अशा निसर्ग प्रतिमांमधून ही कविता करताना दिसते. विद्रोह हे दलित कवितेचे व्यवच्छेदक लक्षण ठरले आहे. त्यामुळे विद्रोहाच्या भाषेची विविध रूपे दलित कवितेत साकार झाली आहेत.

आज मी पाहू शकतो
त्यांच्या कौलारावर जाऊन बसलेली
माझ्या खोपटाची राख
अंधार कोठडीत उगवलेल्या सूर्याची शपथ
कोलिताची भाषा शिकूनच शांत होईन मी

आगीशी एकरूप होणारी ही विद्रोही भाषा आहे. अशा स्वरूपाची भाषा ढसाळ, मनोहर यांच्या कवितेत यापूर्वीच जोरकसपणे येऊन गेली आहे. अशा भाषेसह पूर्वसूरींच्या अनेक प्रतिमा डब्ल्यू कपूर यांच्या कवितेत पाहावयास मिळतात. उदा. सूर्य, तप्त निखारे, त्यांच्या सनातन दयेचे बक्षीस, फटीतून गुहेत डोकावणाऱ्या हाका, सूर्यफुले, अगडबंब काळोख, उद्ध्वस्त रात्री, मरणांचा आकांत इत्यादी प्रतिमांचे उपयोजन पाहिल्यानंतर ढसाळ, मनोहरांच्या प्रतिमासृष्टीची आठवण होते. किंबहुना त्यांचे केलेले हे अनुकरणच आहे असे वाटते. या अनुकरणासह जातियता, अस्पृश्यता आणि भेदभावाच्या प्रतिमाही साकार झाल्या आहेत. तसेच दु:खाचा पाऊस, पाझरणारा काळोख, दु:खाची गाणी गाणारे रान, अहेव शल्य, अत्याचाराची अरण्ये अशा स्वरूपाच्या अनेक प्रतिमा साकार झाल्या आहेत. प्रतिमेचा सोस असणे वाईट नाही मात्र अनुभूती, प्रतिमा आणि अर्थपूर्णता यांचा एक संपृक्त आणि सार्थ अनुभव कवितेला देता आला पाहिजे. कपूर यांच्या कवितेचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे बुद्धतत्त्व आणि बंधमुक्ती असे एक समीकरण या कवितेने मांडले आहे. दुसरा एक विशेष म्हणजे वेदनेतून विद्रोहाचा जन्म होतो अशी जाणीव व्यक्त केली आहे. अशी जाणीव एकूणच पूर्वसूरींच्या कवितेत विशेषत्वाने स्पष्ट झाली आहे. कवीच्या मते जीवनाच्या वाटचालीत अंधाराची वाट पार करताना ठेचकाळणे, जखमी होणे, वेदनांनी विव्हळणे ह्या अपरिहार्य गोष्टी होत्या. मात्र अशा जगण्याची दया येणारी एखादी नवी दिशा उगवणे,

अंधाऱ्या वाटेवर कोणीतरी दिवा पेटवणे असे घडले नाही. म्हणून आता स्वत:ची आसवे ठिणग्या होतात अशी अनुभूती व्यक्त झाली आहे. उदा

आपल्याच आसवात असा कित्येकदा भिजलो आहे
आता मात्र अश्रू माझे गळता गळता ठिणग्या होतात

अशी वेदनेतून आग उद्भवणारी किमया जीवनाने शिकविली असल्याचा प्रत्यय या कवितेने दिला आहे. गतकाळातील जातियतेचा, अस्पृश्यतेचा अनुभव खालीलप्रमाणे व्यक्त केलाआहे.

जातिवंत तुझी वृत्ती हुंगत बसते नावात जात
माझ्यासाठी तुझ्या घरी राखीव भांडी कोनाड्यात

हा गावपातळीवरील अस्पृश्यतेचा सार्वत्रिक अनुभव आहे. अस्पृश्यांना, दलिताना कोनाड्यात ठेवलेल्या राखीव भांड्यातून चहा, पाणी, शिळे अन्न दिले जात होते. नावात जात शोधण्याची प्रवृत्ती समाजजीवनात कार्यरत होती. जातीय मानसिकतेमुळे अस्पृश्य समाजाच्या वाट्याला हीनत्वाचे लाचार जगणे अपरिहार्यपणे प्राप्त झाले होते. जातीय मनोवृत्तीविषयीचा उपरोध येथे व्यक्त झाला आहे. या वृत्तीची नाळ हुंगत बसण्याशी जोडली आहे. जनावराने किंवा कुत्र्याने आपल्या वासनिक तृप्तीसाठी वास घेत, हुंगत हिंडावे तशी ही वृत्ती जातीचा वास घेत, जात हुंगत हिंडणारी सामाजिक धारणा आहे. ती जातिव्यवस्थेने पोसलेली आहे. तिच्यात बाट आणि विटाळ या गोष्टी एकजीव झाल्या आहेत. जातिभेदाची, दुजाभावाची प्रतिमा 'कोनाड्यातील राखीव भांड्यातून' साकार झाली आहे. उमेद मारून टाकू पाहणाऱ्या प्रवृत्तीला जाळण्याची भाषाही या कवितेत अवतरली आहे.

माझ्या उमेदीला ते मऊ शब्दांचे कुंपण घालतात
माझी प्रत्येक धाव सरड्याची ठरवण्याचा प्रयत्न करतात
हे काही नवीन नाही
कुंपण आता जाळलेच पाहिजे

आपल्या कृती-उक्तीला आडकाठी ठरणाऱ्या, आपल्या आवेगाला बांध घालणाऱ्या गतिरोधकांना कायमचे नष्ट करण्याचा बेत या कवितेने आखला आहे. त्यासाठी एक विशिष्ट पोज घेतली आहे. अशी जाणीवपूर्वकता या कवितेत प्रत्ययाला येते.

✹ केशव मेश्राम (२४ नोव्हेंबर १९३७)

या दशकात केशव मेश्राम यांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. **जुगलबंदी** (१९८२), **अकस्मात** (१९८४), **चरित** (१९८९) 'जुगलबंदी' या संग्रहातील केशव मेश्राम यांची कविता चरित्रात्मक अंगाने आशयप्रधान बनताना दिसते. या काळात दलित आत्मकथनांची मोठी लाट आली होती. त्याचा एक मोठा प्रभाव साहित्यविश्वावर पडला. मेश्रामासारखा कवी आत्मकथन न लिहिता कवितेच्या माध्यमातून आपल्या चरित्राचे कथन करताना दिसतो. या कवितेत आजी, आजा, बाप, माय, असे चरित्रघटक सामील झाले असून कवीने बालपणापासून मृत्यूची चाहूल लागेपर्यंतच्या विविध संदर्भ आणि तपशिलांना मुखरीत केले आहे. आजीची गोष्ट सांगताना मोठी वेदना व्यक्त झाली आहे. 'गाडाभर रद्दी खरडून महाकवी बनवणाऱ्या देशात तू का पैदा झालास?' असा सवाल आजीने आपल्या नातवास विचारला आहे. आजीने केलेल्या कथनातून कौटुंबिक, आर्थिक दारिद्र्याचे दर्शन घडते. आईबापाची रोजमर्रा जिंदगी आणि खाण्यापिण्याचे हाल याची प्रचिती येते. नातवाने देवधर्म, तीर्थयात्रा, जत्राखेत्रा या भानगडीत पडू नये असाही सल्ला दिलेला दिसतो. बापाने सांगितलेल्या आठवणी भूतकाळाला जिवंत करतात. मेलेल्या जनावराची विल्हेवाट लावण्यासाठी नकार दिल्यामुळे पाटील देशमुखाचे अत्याचार सहन करावे लागतात. नामुष्की पत्करावी लागते. या बापाने काळाराम, महाडचा सत्याग्रह, पुणे करार यासंबंधीच्याही आठवणी सांगितल्या आहेत. वर्णजाती व्यवस्थेचे शोषक रूप स्पष्ट केले आहे. गतकालीन दु:ख

पेलणाऱ्या माणसांची दुनियाच मुखरीत केली आहे.

कवीने स्वत:लाच श्रद्धांजली वाहताना आपला प्रवास कथन केला आहे. हातात पाटी लेखणी आल्यामुळे गावकीची कामे सुटली, पूर्वजांच्या वाट्याला आलेली गावाची साफसफाई, दौंडी देणे, मृत जनावर ओढणे, प्रेतासाठी खड्डे खोदणे या साऱ्या गलिच्छ कामातून शिक्षणामुळेच मुक्त होता आले. कवीचा हा मुक्तीचा स्वर आणि जीवनप्रवासाची वाटचाल अधोरेखित करणारी ही कविता असून सोसाव्या लागणाऱ्या चटक्यांचा भाजून काढणारा हा प्रवास असल्याचे सूचित करते. हळूहळू वस्तीनेही आपणाला ठोकरले, एकाकी आणि मुकपणेच पुढचा सारा प्रवास करावा लागला असे स्पष्ट केले आहे. बालपणाचा प्रवास सांगताना, गावकुसाबाहेर थोरामोठ्यांच्या शिव्या खात गेले. आपले बालपण बालपणीच खुंटले आणि आपल्यासह सवंगड्यांचे शब्द आगीत फुलल्याचे कवी सांगतो. आपल्या शब्दांची पंगतही वस्तीबाहेर बसल्याचे सांगीतले आहे.

माझे बालपण असे कोणा मिळू नये
काहीबाही गिळलेले पुन्हापुन्हा सांगू नये

असे कवीचे म्हणणे आहे. 'कबुली' या कवितेत कवीने म्हटले आहे, बालपणाची सात आठ वर्षे बेकार गेली, समजुतीच्या आयुष्यात आपण शब्दाने झपाटलो, पुढे पोटाचा हिशोब शिकवणारीच सारी वर्षे होती, अवस्थांतराची उदास वर्षे होती. मनाचा दगड पुरता फुटलेला त्यामुळे

कोणत्या विहारात ढळतील त्यावर
शांत चिवराची तृप्त उन्हेरी फुले

असा प्रश्न उपस्थित केला आहे. मरणालाही लाज वाटेल असे आयुष्य जगल्याचा निर्वाळा कवीने दिला आहे. ''उगवत्या सूर्यासोबतच मरते सलज्ज आयुष्य'' असे आयुष्याचे चित्र रेखाटले आहे. मृत्यूविषयक चिंतन मांडताना, आपले मरणही कोणाला जाणवणार नाही अशा सहजतेने आपण या जगातून जाऊ असे कवीने सांगून ठेवले आहे. 'आता मातीच्या सावलीशी सलगी करीन म्हणतो' असा आविष्कार पाहिल्यानंतर जणू मृत्यूची चाहूल लागल्याचीच जाणीव कवी व्यक्त करीत आहे असे दिसते. आयुष्याच्या तगमगीतून ही आंतरिक जाणीव व्यक्त झाली आहे. कारण

ज्यांच्यासाठी सडक फोडून वाटा खोदल्या
त्यांनीच आपणाला उखडले दगडखडीसारखे
फेकले त्वेषाने गोफण गलोलीने
अफाट आभाळात भरारणाऱ्या पंखाची
जिद्द तुटली आणि भरले डोळेही धुळीने
त्याने चित्कार तरी कसा करावा?

आपल्याच रक्तामासांच्या माणसानी दगा दिला. त्यामुळे आयुष्याशी कशी सलगी करावी आणि कोणत्या मूल्यांसाठी जगावे असे प्रश्नचिन्ह जगण्याच्या संदर्भात उभे केले आहे. आपल्या आयुष्याचा मूकपट बघण्यासारखा नाही असे स्पष्ट कथन कवीने केले आहे. **जुगलबंदी**मधील कवितेचा एक स्वर देशाविषयी, व्यवस्थेविषयी भाष्य करताना दिसतो. आसमंत प्रदूषणग्रस्त आहे. या पर्यावरणात माणसाच्या आशाआकांक्षाचा गर्भ करपून गेला आहे. विरूप बनला आहे. एकूणच कोंदटपणा सर्वत्र दाटलेला आहे. आसमंत बेरका आणि परका असल्यामुळे अशा अवकाशात निरोगी जगण्याची मुळीच हमी नाही. या देशाचे उगवते भविष्य भुकेचा बाण ताणणारे आहे. व्यवस्थेने माणसाचे अवमूल्यन केले आहे. त्याविरुद्धची एक आक्रमक प्रतिक्रिया नोंदविली आहे. दु:खाने होरपळणाऱ्यांविषयी काडीमात्रही भान नसलेल्या देशाची प्रतिमा साकार केली आहे.

असा एक देश आहे सूर्याच्या जन्मापासून जेथे
माणसांचे वाटे घातलेत

असा एक धर्म आहे ज्याची वाढ काहीना
लुतऱ्या कुत्र्यांप्रमाणे वागवूनच होते
अशी व्यवस्था आहे जी वापरते आग चुलीऐवजी
घरेच धडाधड जाळायला

या देशात जन्मत:च माणसाचे विभाजन केले जाते. 'या नपुंसक मातीत विज्ञानविर्यही रुजत नाही', अशी या देशाची माती आहे. या देशात सर्वधर्मसमभाव वाढीस लागावा असे वाटण्यात काहीच अर्थ उरत नाही. कारण राजकीय पक्ष, मंत्रीसंत्री, संसदेतील लोकप्रतिनिधी सारेच स्वार्थाच्या गाळात रुतलेले आहेत. निर्थक चर्चा करण्यात संसदेत वेळ खर्ची घातला जातो. कालबाह्य सूचनांनी लोकप्रतिनिधी लोकसभेलाच वांझ करतात. लोकशाही नावापुरतीच उरली आहे. म्हणून हा देश एक कोरडी लावसट विहीर आहे असा अभिप्राय या कवितेने नोंदविला आहे.

चरित संग्रहातील कविताही चरित्रात्मक अंगाने आविष्कृत झाली आहे. 'चरित' म्हणजे आचरण, चरित्र किंवा कथा. जीवनप्रवास आणि या प्रवासातील खाचखळगे यांचा प्रत्यय या कवितानी दिला आहे.

मिळवायला गेलो जे जे ते गेले फारच दूर
मला गिळायला अंधार बरसत घसरत आला
तळव्यांना भेगा आणि आठ्याच आठ्या आता कपाळावर
पाय काट्या घटट्यांनी भरलेले देहाचे फाटलेले अस्तर

अशाप्रकारे जीवनात हवे ते प्राप्त होऊ शकले नाही. वेदनादायी जगणे वाट्याला आले. अपमान आणि अवहेलनेची साथसंगत सातत्याने होती.

अपमान अवहेलनेची कवचकुंडले माझ्या अंगावर
रक्ताच्या माणसांनी शोषून फेकले करून कलेवर
आतल्याआत मोडावा मनगट मणका अशी भोगली पीडा
नाही गेला उपटला तरीही सलणाऱ्या अस्तित्त्वाचा खिळा

सल कायम राहिली. रक्ताच्या माणसांनी शोषण केले. त्यामुळे हा प्रवास अधिकच पीडादायी ठरला. अशा प्रवासातही 'सहानुभूतीचा जोगवा मागत दारोदार हिंडलो नाही' असा स्वाभिमानी बाणा कवीने जोपासलेला दिसतो. उडत्या पाखरासारखी सभोवतीची माणसे निघून गेली. भिंगरीसारखे आयुष्याने फिरवले. कवीच्या बापदादयांचा प्रवासही जीवघेणाच होता. त्यांच्याही वाट्याला निखारेच आले.

माझे जन्मदाते : निखारे घेऊन चालणारे
शिव्या-शापांचा लाथा बुक्क्यांचा बुका माखणारे
त्यांचेही मायबाप आम्हाला ठाऊक नसलेले
काही काहीच न बोलता मुकाट मरून गेलेले

वादळवाऱ्याने उडावीत अशा खोपटात, गावकुसाबाहेर वंचिताचा जन्म वाट्याला आला. प्रेम, माणुसकी या गोष्टींपासून पारखेच राहावे लागले. प्रत्येक वर्षी मृत्यूचाच रंग डोळ्यांनी पाहिला. जगण्याचा आक्रोश करता आला नाही आणि जुलूमाने पेटून उठावे असा अंगारही कधी फुटला नाही. असे मुकाटपणाचे हे शोषिक जगणे होते. 'सोसले आहेत मी पराभवाचे कित्येक तिखट घाव' हा कवीमानाचा अनुभव आहे. 'जखमाच फुलतात सर्वत्र पराभूत माझ्या देहभर' हे या मनाचे दु:ख आहे. मोकळ्या वाऱ्यात कधी श्वासच घेता आला नाही ही या मनाची खंत आहे. असे असले तरी जीवनाला शांत आणि संयमीपणा बुद्धविचारामुळेच प्राप्त झाला अशी ग्वाही या कवीमनाने दिली आहे.

बुद्धाचा सारथी परतला शुभ्र सदिच्छा मनात घेऊन
तेव्हापासून कोमल बनले रखरखणारे संतापी उन

ही बुद्धविचाराची ओळख ज्या महामानवाने करून दिली त्याच्या निर्वाणानंतरचे वास्तव काय याचाही ताळेबंद मांडण्याचा प्रयत्न मेश्रामांच्या कवितेने केला आहे.

एका भीमाने वृक्षाला हालवले फिरवले गयेच्या आसनस्थ बुद्धाला
स्वातंत्र्याने इतकेच आम्हा प्रवृत्त केले नव्या धर्मयुद्धाला
परिपरिनिर्वाणाची आज्ञा झाली त्याला दोनच महिन्यात केली घाई
एकोपा आधीचा नव्हताच कुणाला फळफळून आली आपसातली दुही
पिचलेली माणसे उदासच झाली निळ्या झेंड्यापोटीचे रंगच विखुरले
कोणीही उठावे सौदे पुकारावे यासाठीच केवळ अस्तित्व उरले

वास्तविक हे वास्तव आणि खंत कमी अधिक प्रमाणात बहुतांश कवींनी प्रकट केली आहे. मेश्रामांची कविताही त्याला अपवाद नाही. आंबेडकरोत्तर काळात आपसातच दुहीचे वातावरण निर्माण झाले. माणसं विखुरली. सौदेबाजी आणि व्यवहाराला उधाण आले. स्वयंघोषित नेते त्यासाठी आपले अस्तित्व पणाला लाऊ लागली. त्यामुळे आंबेडकर विचारांचे वास्तव आणि प्रत्यक्षातील आंबेडकरी समाजातील वास्तव यात तफावत निर्माण झाली आणि पिचलेली सामान्य जनता अधिकच उदास झाली. जीवनाच्या वाटचालीत अनुभवलेले हे निरीक्षणही कवीने नोंदवले आहे.

थोडक्यात, दलित आत्मकथनांच्या प्रभावामुळे मेश्रामांची कविता चरित्रात्मक अभिव्यक्तीची वाट चोखाळताना दिसते. मरणालाही लाज वाटावी असे आयुष्य जगल्याचा निर्वाळा देते. बालपणापासून मृत्यूची चाहूल लागेपर्यंतचा आलेख चितारला आहे. आपल्या आयुष्याचा मूकपट बघण्यासारखा नसल्याचे कथन केले आहे. जीवनप्रवासातील खाचखळगे, अवहेलनेची साथसंगत, बापदादयांचा जीवघेणा प्रवास, मुकाटपणाचे शोषिक जगणे असे विविध टप्पे सांगीतले आहेत. या कवितेचा एक स्वर देशाविषयी, व्यवस्थेविषयीच्या कडवट प्रतिक्रियेचा आहे. या देशाची माती वांझ असल्याचा निष्कर्ष ही कविता मांडते. शेवटी जीवनाला शांत आणि संयमीपणा बुद्धीविचारामुळेच प्राप्त झाला अशी ग्वाही कवीमनाने दिली आहे.

यशवंत मनोहर यांचे या दशकात दोन कवितासंग्रह पाहावयास मिळतात. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : चिंतनकाव्य** (१९८२) या कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अचाट आणि अफाट व्यक्तित्त्वाचा चिंतनशील वेध घेतला आहे. मात्र **मूर्तीभंजन** (१९८५) या संग्रहाच्या शीर्षकानुसार विचार केल्यास फारसे काही हाताशी लागण्यासारखे आहे असे वाटत नाही. 'आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला मी प्रलयंकारी सूर्य आहे' अशी गर्जना करणारा 'उत्थानगुंफा'म धील नायक 'मूर्तीभंजन' मध्ये एका वेगळ्या तफडेने व्याकूळ होताना दिसतो. जगण्यातील अशांतता, जखमांचा थवा गाणारी मैफल म्हणजे त्याच्यापुरता वणवाच ठरली आहे. भावनेचे प्रेत घेऊन दिशाहीन वाट हंबरताना दिसते. एका विषण्णतेच्या गर्तेत हा नायक गरगरताना दिसतो.

तू देतीस हात तर कदाचित / ऋतूपालट झालाही असता

येथेच विषण्णतेचा कार्यकारणभाव स्पष्ट होतो. मग रक्तवाहिन्यामधून तिच्या हव्याशा नकोशा तरी हव्याशा आठवणी पेटत जातात आणि लक्षात येते की 'मूर्तीभंजन' म्हणजे 'निष्पर्ण झाडाची हंबरणारी कहाणी' आहे. या कहाणीत पोरकेपणाचा अवकाशभर दाटून येणारा हंबरडा निनादत राहतो.

'फुलण्याआधीच सुकलेल्या कळ्यात / ही एक अशी सुनी जीवघेणी वाट तुझ्यावाचून चालतो आहे मी'

तिच्याशिवायच्या वाटेवरचा उरभर एक जीवघेणा आकांत अविरतपणे सुरू राहतो. तरीही तिचे विस्मरण होणे अशक्यप्राय असते. कारण ती आयुष्यभर मारणाऱ्या परंतु हव्या असणाऱ्या वीषासारखी भिनत गेली आहे. म्हणून या नायकाचा आयुष्यभरासाठी आकांत सुरू झालेला आहे.

जाताना वळून पाहिली नाहीस ही सर्वनाशाची करुण कथा
तडफडली जी तुझ्या नावावर आयुष्य जाळत्या जळत्या रेषेवर

ही वेदना सर्व कविताभर ठासून भरलेली आहे. एका नायकाच्या कृतिशील विद्रोहाचे पर्यावसान हिरव्या चाफ्याखाली होताना दिसते.

शरणकुमार लिंबाळे (जन्म १ जून १९५६)

शरणकुमार लिंबाळे यांच्या **उत्पात** (१९८२) या काव्यसंग्रहाने नव्या पिढीच्या कवितेत एक वेगळे स्थान प्राप्त केले. या कवितेत दलित जगातील व्यथावेदना आणि अंतर्विरोध स्पष्ट झाला आहे. विविध वृत्तीप्रवृतीचा वेध घेताना समकालीन प्रश्नांना हात घातला आहे. औपरोधिक शैलीतून जीवनाचे दर्शन घडवले आहे. पूर्वसूरींचा प्रभावही या कवितेवर दिसून येतो. 'जुनाट जंगलांना जाळीत चला' असे आवाहन करीत ही कविता दाखल झाली. दलित कवितेच्या प्रांतात ही जाळण्याची भाषा नवीन नाही. 'मातीवर प्रेम करीत चला' हे सूत्रही नव्याने मांडले जात आहे अशातलाही भाग नाही. मग लिंबाळे नवीन काय सांगतात असा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हा त्यांना भेडसावणारे आणि अस्वस्थ करणारे अनेक प्रश्न आपल्या कवितेतून मुखरीत करतात असे प्रत्ययाला येते.

पायरी पाळणाऱ्या मायबापाला लाथाडताना
मी कुण्याच मायबापाचा नसतोय.....
माझ्या मुठी माझ्याविरुद्धच का वळतात?
माझे वैरी माझे जातभाईच का होतात?

असे अनेक प्रश्न कवीसमोर उभे आहेत. कौटुंबिक आणि सामाजिक अशा दोन्ही स्तरावर अंतर्मुख करणारे हे प्रश्न आहेत. एकाच वेळी पोरकेपणा, खंडितपणा, स्वकीय जगातील अंतर्विरोधातून उभे झालेले, उभे होणारे तंटेबखेटे हे कवीच्या अस्वस्थतेचे आणि संतापाचे मुख्य कारण आहे. माणसाला हीन पातळीवर पोचविणारा आणखी एक जीवघेणा प्रश्न कवीला हैराण करतो.

मुसक्या बांधलेला एक माणूस
गुवाची बादली घेऊन जात असताना
त्याच्या खांद्यावर
कुण्या मूलभूत हक्काचे ओझे असते?
मी रक्तबंबाळ सोलीव जनावराच्या धडासारखा

अशा रक्तबंबाळ करणाऱ्या अनेक प्रश्नांनी कवीमन प्रचंड अस्वस्थ झालेले आहे. हे प्रश्न वाचकांनाही अंतर्मुख व्हायला भाग पाडतात. या कवितेत मानवी हक्कापासून वंचित असलेल्या गुलामाची प्रतिमा साकार झाली आहे. उद्विग्न करणारा विरोधाभास या कवितेतून स्पष्ट झाला आहे. उदा

कागदाचा बाबा माहीत आहे सर्वाला
बाबांची कागदं माहीत नाहीत कुणाला

आंबेडकरी समाज आणि आंबेडकरांच्या नावांचा उदोउदो करणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम ही कविता करते. सामाजिक मन अशा अनेक पातळ्यांवरील विरोधाभासाने बरबटलेले आहे. त्यामुळे एक उद्विग्न आणि संतापाची भावना या कवितेतून व्यक्त होते. या कवितेने आयुष्याच्या खंडितपणाचे चरित्र रेखाटले आहे. अंधाराला जाळीत निघालेले कवीमन जळून खाक झाले तरी पर्वा न करणारे आहे.

या मोडक्या कुडानं मोडकं बनविलंय
या गळक्या छप्परानं गळकं बनविलय
आईजवळ अर्धा / रस्त्यावर अर्धा / बुद्धाजवळ अर्धा
गटारीजवळ अर्धा / जीवनाजवळ अर्धा / मृत्यूशेजी अर्धा

असे जिथे तिथे विभाजित झालेले, खंडित असे छिन्नविछिन्न चरित्र आहे. आपल्या अस्तित्वाला पूर्णत्व प्राप्त

झाले नाही हेच या कवितेने सूचित केले आहे. दुसरीकडे ही कविता अत्याचारीत इतिहास पुसून टाकण्यासाठी सज्ज झालेली दिसते. उदा,

माझी आय झोपते पोटात बाँब घेऊन
जन्म घालतोय बा धडाडणाऱ्या तोफेला
आमच्यापुढे रणांगण मांडून ठेवलेय
आम्हाला इतिहास नाही ना जगतोय त्यासाठी
भविष्य आहे लढतोय त्यासाठी
सारा इतिहास बदलण्यासाठी
हृदय आमचे खाटीकखान्यात टांगून ठेवलेय

या कवितेने संघर्षभूमीची प्रतिमा साकार केली आहे. या रणभूमीवर संघर्ष करण्याची प्रेरणा आईबापाच्या रक्तातूनच कवीमनात मुरलेली आहे. म्हणून आईबापाने भोगलेले दु:खभोग, सहन केलेले अन्याय अत्याचार, माणसांच्या झालेल्या कत्तली या साऱ्यांच्याच हिशोब या रणांगणावर मांडून हा अत्याचारीत इतिहास पुसून टाकून भविष्य घडविण्यासाठी जिवावर उदार होऊनच संघर्षरत व्हायचे आहे. त्यासाठी कवीमन सज्ज झाले आहे. मात्र,

जमीनदोस्त होणारे जन्मदाते
जमीनदोस्त होणारी जन्मभूमी
अन जमीनदोस्त मी!

अशा अवस्थेत 'माझ्या पावलाची जमीन कुठली?' हा जीवघेणा प्रश्न उपस्थित केला आहे. अशा स्वरूपाचे प्रश्न उभे करण्यात ही कविता कुशल आहे. क्रांतीसन्मुख होऊ पाहणाऱ्या या कवितेत क्रांतिगर्भता असली तरी या क्रांतीगर्भाला जन्माला घालण्यासाठी भूमीच नाही. 'मातृभूमीनेच नाकारले तर लढू कुण्या युद्धभूमीसाठी?' असा प्रश्न त्यामुळेच निर्माण झाला आहे. ही अगतिकता आणि हतबलता संपुष्टात आणण्यासाठी एकदाचा निसर्ग उत्पात व्हावा आणि पृथ्वीतलावर नव्याने माणसे उगवावीत अशी उमेद या कवितेने बाळगली आहे.

असा निसर्ग उत्पात व्हावा,
कि बाभळीला गुलाबाची फुले यावीत
धोतऱ्याला गंध यावा केवड्याचा
रक्ताला पाण्याचा रंग यावा आणि पाण्याला रक्ताचा
शब्दाशब्दाच्या व्याख्या बदलाव्यात
अक्षराअक्षराचे अर्थ बदलावेत
सारा निसर्ग-माणसं-पंथ-धर्म-परंपरा आणि ग्रंथ
समूळ बदलून जावेत.....
माणसाचा लख्ख प्रकाश पडावा अन्
माण्संच माणसं म्हणून गळ्यात पडावीत

येथे ढसाळांच्या 'माण्साने' या कवितेची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. किंबहुना लिंबाळ्यांची कविता ढसाळांच्या प्रभावाखालीच वावरताना दिसते. मात्र ढसाळांच्या कवितेतील प्रत्येक शब्दकळेमागे जी सामाजिक सांस्कृतिक अर्थाची ताकदवान संपृक्तता असते तशी ती येथे दिसत नाही. एखाद्या संकल्पनेवर भाष्य करताना लिंगवाचक शब्दांचा पुरेपूर वापर मात्र या कवितेने केला आहे.

ही छिनाल व्यवस्था
मी गळ्यात घालून घेतो वेश्येच्या मांड्यागत
मी एक समाजपुरुष

गर्मीने सडलेल्या शिश्नासारखा

व्यवस्थेला भोगण्याच्या कृतीतून सडक्या अवस्थेप्रत पोचलेल्या समाजपुरुषाचे चित्र येथे साकार झाले आहे. अशी तऱ्हा ढसाळांच्या कवितेत मोठ्या प्रमाणात आढळते. कवितेच्या बाबतीत असा प्रभाव असणे वाईट नाही मात्र अनुकरण करणे उचित नव्हे. जगण्यातील चित्रविचित्र अनुभवाचा बेधडकपणा बेलाशकपणे वाचकांसमोर ठेवताना या कवितेला कोणतेही भय वाटत नाही. उदा.

येकदा एकीने मला मामा म्हणल्ते
येकदा एकीने मला हिजड्या म्हणल्ते
कवा भिती वाटायची तर कवा लाज
पैसे नसायचे कवा कवा
शिरलो एकदा मागं पुढे पहात
जमिनीवर तीन रू. बाजेवर सात
पल्याड पोत्याच्या पडद्यात होता बाप
माझ्या काळजाचे झाले हजार खाप

वेश्येकडे जाण्याचा हा अनुभव. हा कवी तेथे पोहचण्यापूर्वीच बापही तिथे हजर. त्यामुळे कवीमनाच्या हजार ठिकऱ्या होतात. आत्मटिकेला सामोरे जाताना ही कविता मुळीच घाबरत नाही. वाचकांना आचंबित करणारे वास्तव पुढ्यात टाकून ती पुढची वाटचाल करायला मोकळी होते. लिंबाळ्यांच्या कवितेचा आणखी एक विशेष म्हणजे कुटुंब आणि समाज हे समीकरण त्यांच्या कवितेने मांडले आहे. म्हणून कुटुंबघटकांचे संदर्भ वारंवार या कवितेत येतात. उदा कवीची खंडितपणाची प्रतिमा, बाजाराचे रस्ते झाडणारी, जोगवा मागणारी आजी. काळोखाचे रस्ते उजळीत येणारा पण स्वत:च्या वाटेवर दिवा नसणारा आजा. उपाशी पोटाने ओझी वाहणारा आणि वीस पैशाची हमाली मोजून फाटक्या जिंदगीचा हिसाब करणारा बाप. भाकरीच्या तुकड्यावर तुटून पडणारी बाळंतीण माय, फाटके तुटके माय बाप, निसवणाऱ्या निऱ्या सांभाळीत भरल्या उरानं राबणारी आई, दुसऱ्यांनी दिलेल्या साडीचोळीत खुलून दिसणारी प्रेयशी असा सर्व कुटुंबकाबिला सामाजिक पृष्ठभूमीवर वावरताना आणि झुंजताना दिसतो.

दलित कवितेतील पहिल्या पिढीसमोर जसा गतकाळाचा, विराट दु:खाचा इतिहास होता तसाच आंबेडकरकालीन तेजस्वी चळवळीचा नजिकचा वर्तमानही होता. दुसऱ्या पिढीसमोर मात्र आंबेडकरोत्तर चळवळीचे खंडित आणि भयानक वास्तव होते. मात्र या वास्तवालाही उघड्यानागड्या रूपात लोकांसमोर ठेवण्यात या पिढीने कोणताही मुलाहिजा बाळगला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विभूतीपूजा मुळीच मान्य नव्हती. परंतु विरोधाभास असा, की आंबेडकरोत्तर काळात मोठेच उदात्तीकरण झालेले दिसते. कोणी आंबेडकरांना देवत्त्व बहाल केले तर कोणी त्यांच्या नावे नवस बोलायला सुरवात केली. स्वार्थी राजकारण्यांनी आंबेडकर हे नाव चलनी नाण्यासारखे वापरले. ओठात आंबेडकर आणि पोटात जातीय विद्वेष असेही चित्र दिसू लागले. अनेकांनी आंबेडकरांना केवळ पुतळ्यापुरतेच मर्यादित करून टाकले. मात्र आंबेडकरांचा विचार आत्मसात केला नाही किंवा तो विचार आचरणातही आणला नाही. हा दुटप्पीपणा उपरोधिक अंगाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न लिंबाळे यांच्या कवितेने केला आहे. चळवळीच्या खंडित रूपाचे वास्तव प्रतिकात्मकतेने घडवले आहे. उदा

मी एक सार्वजनिक आंबेडकर
बी.सी. कांबळ्याचा पाव, खोब्रागड्याचा पाव
गवई गटाचा पाव, आधपाव पँथरचा
आधपाव मास मुव्हमेंटचा

सार्वजनिक आंबेडकर या मुख्य प्रतिमेला पाव, आधपाव असे संख्यात्मक परिमाण प्राप्त करून दिल्यामुळे या प्रतिमेला खंडित प्रतिमेचे रूप प्राप्त झाले आहे. चळवळीविषयी प्रतिक्रिया व्यक्त करण्यातून अशी प्रतिमा निर्माण झाली

आहे. चळवळीच्या क्षेत्रात अंतर्गत दुही माजल्याचे प्रतिकात्म चित्रण येथे पाहावयास मिळते. त्याचप्रमाणे या कवितेतून अवतारी, देव, अर्ध्या पुतळ्याचा, मायावी खुंटीला टांगलेला, एक बाजारी, एक लटकणारा अशा अनेक आंबेडकरी रूपांचा निर्देश करून सामाजिक सांस्कृतिक राजकीय अशा विविध पातळ्यावरील रूपे स्पष्ट करून खरे आंबेडकरी व्यक्तित्त्व कोणते याचा निर्देश या कवितेने खालीलप्रमाणे केला आहे.

बाप्यानो, मी एक आंबेडकर
शिल्पकार / महामानव / घटनाकार
माझा पंचनामा करा, जाहीरनामा करा
भगवान बुद्धा - तू मात्र सगळ्या लेकुरांना क्षमा कर
मी एक बोधीसत्त्व आंबेडकर

नेमके हेच व्यक्तित्त्व समाजमनाला आकळले नाही. त्यामुळे सामाजिक सांस्कृतिक घडी विस्कटून गेली ही खंत कवीमनाने प्रकट केली आहे.

काही वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमाही या कवितेनी साकार केल्या आहेत. उदा. 'सारे ग्रंथ हे जंत मिडकणाऱ्या संस्कृतीच्या पोटातील', महारोग्याच्या चट्टयासारखी वर्णरोगी भूमी, जातीच्या नाक्यावर टेहळणारे यक्ष, उजाडलेली गावकुसं, युगायुगाचे तहानलेले ओठ, सार्वजनिक रस्त्याची आजन्म गुलामी, जळणारे पोटुशी बंड, फाटके तुटके मायबाप, कलम केलेले गवई बंधुचे डोळे इ. या प्रतिमासृष्टीतून धर्मग्रंथ, देश, संस्कृती, जात, गुलामी, अन्याय अत्याचाराची क्रुरता, जगण्यातील विदारकता अशा अनेकविध अनुभवांना साक्षात करण्याचा यशस्वी प्रयत्न लिंबाळ्यांच्या कवितेने केला आहे.

थोडक्यात. गावकुसांना क्रांतीचे गीत गाण्याचे, मातीवर प्रिती करण्याचे आवाहन करून या कवितेने समकालीन जीवनातील विविध प्रश्नांना हात घातला आहे. आपल्या शब्दांनी मूकपणे जुलूम सहन करणाऱ्यांच्या ओठातील आग व्हावे, गुलामीत जगणाऱ्यांच्या रक्तपेशीत सुरुंगासारखे पेटत राहावे असे भान आणि भूमिका स्पष्ट केली आहे. औपरोधिक शैलीतून जीवनाचे दर्शन घडविले आहे. आयुष्याच्या खंडितपणाचे चित्र रेखाटले आहे. पूर्वसूरींचा प्रभावही या कवितेवर दिसून येतो. रक्तबंबाळ करणाऱ्या अनेक प्रश्नांतून वाट्याला येणाऱ्या अस्वस्थतेला वाट मोकळी करून देण्याचा प्रयत्न या कवितेतून झाला आहे. उद्विग्न करणारा विरोधाभास स्पष्ट केला आहे. अन्यायी इतिहास पुसून टाकून भविष्य घडविण्यासाठी ही कविता संघर्षरत झाली आहे. निसर्ग उत्पात व्हावा आणि पृथ्वीतलावर नव्याने माणसे उगवावीत अशी उमेद या कवितेने बाळगली आहे. एखाद्या संकल्पनेवर भाष्य करताना लिंगवाचक शब्दांचा पुरेपूर वापर केला आहे. चित्रविचित्र अनुभवाचा बेधडकपणा बेलाशकपणे वाचकांसमोर ठेवला आहे. आचंबित करणारे वास्तव वाचकांपुढे ठेवले आहे. कुटुंब आणि समाज असे समीकरण मांडले आहे. सामाजिक पृष्ठभूमीवर कुटुंब घटकांची झुंज मांडली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदात्तीकरण, विभूतीपूजा याबददल तीव्र नापसंती व्यक्त करून गटातगटाचे वास्तवदर्शन प्रतिकात्मकतेने घडविले आहे. वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमासृष्टी साकार केली आहे.

याच दशकात लिंबाळे यांचा **श्वेतपत्रिका** (१९८९) हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. 'उत्पात'मधून समग्र दलित जीवनाचे, त्यातील व्यथावेदनाचे दर्शन घडते. जुलमी व्यवस्था नाकारून निखळ माणूसपणाची व्यवस्था कवीला अभिप्रेत आहे. म्हणून त्याची माणूसपणा मिळवण्यासाठीची धडपड आहे.

किती तुरुंगाच्या भिंतीपल्याड, किती सातासमुद्रापल्याड
राहता तुम्ही संसदीय लोकशाहीत?
पाडा तुरुंगाच्या भिंती, पाडा घरादाराच्या भिंती, पाडा जातीधर्माच्या भिंती
आपण एकदा संपूर्ण भिंतीविहीन होऊयात
आणि वाटून घेऊयात तुम्ही आम्ही माणूसपण

'श्वेतपत्रिका'मधूनही लिंबाळे दलित जीवनाची वाताहत मांडताना दिसतात. ''मात्र ज्यावेळी आपण 'उत्पात'

आणि 'श्वेतपत्रिका' यांच्यातील अनुभवाची तुलना करतो त्यावेळी श्वेतपत्रिकातील अनुभव एकांगी आणि एकच सूर आळविणारा वाटतो.''[४] हे निरीक्षण यासाठी महत्त्वाचे आहे की दलित कवितेच्या क्षेत्रातील अनेक कवी अशा एकसूरी अनुभवाच्या प्रेमात पडले आहेत. त्यामुळे अनुभवाची पुनरावृत्ती या कवितेत होताना दिसते.

''शरणकुमार लिंबाळेंच्या विद्रोहाला अनेक छटा असलेल्या दिसून येतात. हा विद्रोह कधी सौम्य भाषेत प्रकट होताना, समजावणीच्या सुरात बोलतो तर कधी त्याचे स्वरूप तिखट होऊन सर्वनाशाची भाषा बोलताना दिसतो. आपल्या वेदनेला वाचा फोडण्यासाठी बंडखोरीची भाषा बोलतो.''[५] आत्माविष्कार आणि समाजपरिवर्तन या दोन उद्दिष्टांसाठी तो व्यक्त झाला आहे.

✸ ज्योती लांजेवार (जन्म २५ नोव्हेंबर १९५०)

दलित कवितेच्या प्रांतात ज्योती लांजेवार यांच्या रूपाने एक कवयित्री दाखल झाली. ही अतिशय स्वागतार्ह अशी बाब आहे. आपली कविताविषयक भूमिका मांडताना त्यांनी म्हटले आहे, की ''समाजात वावरताना जे जे अनुभव ते इतरांचे असोत की स्वत:चे त्या अनुभवविश्वातून आकार घेऊन साकारलेली प्रतिमा म्हणजे माझी कविता''[६] स्व आणि समाज अशा अनुभवातून ही कविता साकारली आहे हे या भूमिकेतून स्पष्ट होते. कोणासाठी आणि कोणाच्या बाजूने कविता लिहायची याचीही निश्चिती कवयित्रीने केली आहे. त्यातून तिची बांधिलकी स्पष्ट होते. जातिभेदाच्या भिंती बळकट करणाऱ्यांना सवाल करून ही बांधिलकी कवयित्रीने स्पष्ट केली आहे. डौलदार बागबगीचे, पानेफुले हा आपल्या कवितेचा विषय नसल्याचे जाहीर करून, वेशीलगतचे काळोखी जग, भुकेची व्याकुळता, कोरड्या शुष्क ओठावरील गाऱ्हाणे हाच आपल्या कवितेचा प्रांत असल्याचे कवयित्रीने सूचित केले आहे.

दिशा (१९८२) हा लांजेवार यांचा कवितासंग्रह एका नव्या आवाजासह दाखल झाला. अमानुषांच्या वस्तीतील क्रुर श्वापदे हा कवितेचा उपहासाचा विषय आहे. जिथे अजूनही गुलामगिरी आहे तिथे तिला आग लावली पाहिजे असे आवाहन या कवितेने केले आहे. भूक, दारिद्रय, स्त्रियांची आब्रू हे चिंतनाचे विषय आहेत. दारिद्रयामुळे अभावाचं सौंदर्य झाकण्याइतपतही परिस्थिती साथ देत नाही. असा अभावग्रस्त स्त्रियांच्या स्थितीगतीचा आलेख चितारला आहे. नैसर्गिक असे स्त्रिसुलभ जगणे वाट्याला येऊ शकत नाही.

इथे बालपणही डोळा मारते तारुण्याला
तारुण्य कवटाळते वार्धक्याला
अन्नाच्या कणाकणाला मौताज होऊन

हातातोंडाची मिळवणी करण्यातच सारे आयुष्य बरबाद करावे लागते. अशी स्त्री दु:खाची प्रातिनिधिक नोंद या कवितेने केली आहे. पुरुषी हावरट वृत्ती, लचकेतोड प्रवृत्ती याचाही निर्देश केला आहे. फाटक्या चिंध्यातून डोकावणाऱ्या शरीरावर तुटून पडणाऱ्या आधाशी नजरांचा वेध घेतला आहे. जगण्यातील निस्तेजपणा, दुष्काळ, अन्नाचा अभाव, मूलभूत गरजांपासून कोसो दूर असणाऱ्या, अंधार लपेटून ओझे बाळगणाऱ्या जगाचे चित्र रेखाटले आहे. स्त्रीच्या दु:ख, दैन्य, दास्य आणि शोषणाला अमानुषांची वस्ती कारणीभूत ठरली आहे. ही प्रतिमा वारंवार या कवितेत अधोरेखित झाली आहे.

वाटतं घ्याव हातात कोलीत अन लावावी आग
या अमानुषांच्या वस्तीला
जिथं आपल्या सर्वस्वाची होळी झाली

'अमानुषाची वस्ती' ही प्रतिमा प्रतिकात्म रूपात साकार झाली आहे. अपमानीत जिण्याला तीलांजली देऊन, दयेचे दान नाकारून, माणूस म्हणून हक्क प्राप्त झाले पाहिजे त्यासाठी या वस्तीला आग लावणे अपरिहार्य ठरते. आता त्यांच्या ओंजळीने पाणी पिण्याचे युग संपले आहे. मात्र माणुसकीचे हक्क मिळवण्यासाठी संघर्ष अपरिहार्य आहे.

धार केलेल्या तलवारी नुकत्याच म्यानाबाहेर आल्या आहेत

वाटतं आता बंड उभारून करावा शिरच्छेद
अन् लावावी आग त्यांच्या वस्तीला

अशाप्रकारे या कवितेने विद्रोहाची कात टाकली आहे. पाशवी व्यवस्थेच्या विरोधात दोन हात करण्यासाठी विद्रोह पुकारला आहे. मनात खदखदणारा असंतोष विद्रोहाच्या रूपात बाहेर पडतो. भावनिक पातळीवरील अभावाचा ताळेबंदही मांडला आहे. आपल्या चित्तवृत्ती कधी बहरल्याच नाहीत अशी खंत व्यक्त झालेली दिसते. काट्याकुट्यांनी ओरबाडलेलं रक्तबंबाळ जगणेच वाट्याला आले. मुकाटपणे ते सहन करावे लागले. आतल्या आत कुढत आसवांनी आपल्या चित्तवृत्तीचे झाड हिरवेगार ठेवण्याचा प्रयत्न केला.

आतल्या आत शोषून आसवं, पाळंमुळं भिजवीत
झाडं हिरवीगार ठेवीत आलो
प्रत्येक वेळा वसंत आला न् गेला, आपण काही घेतलं नाही
नव्हे. .. इतरांनी घेऊ दिलं नाही
आम्रवृक्ष बहरला तरी
कोकिळा कधी गायिलीच नाही

फुलण्याच्या दिवसातही फुलता बहरता आले नाही. जीवनाची कात टाकून नवी सळसळ अनुभवता आली नाही हा दु:खद अनुभव येथे साक्षात झाला आहे. हा ही अमानुषतेनं केलेला प्रहारच आहे. अमानुषतेवर प्रहार करण्यासाठीच जणू ही कविता जन्माला आली आहे. तेच या कवितेचे ध्येय असावे अशी सूचना या कवितांनी दिली आहे. अमानुषतेला केंद्र करून त्याभोवतीचे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचे चित्र स्पष्ट करून, त्यातून वाट काढत एका नव्या दिशेच्या शोधात ही कविता निघाली आहे. हे पर्यावरण कसे आहे?

या अमानुषांच्या वस्तीत
दगडांचे देव वास्तव्याला आहेत
माणुसकी पायाखाली तुडवून
भिंतीवरचे नग्नशिल्प जोपासताना
गाभाऱ्यातल्या स्वर्गवासी देवाचाही
आत्मा भटकतो आहे पिसाटासारखा

हे पर्यावरण बदलवायचे असेल तर अशा वस्तीला चूड लावणे अपरिहार्य ठरते ही अपरिहार्यता वेळोवेळी स्पष्ट झाली आहे. अमानुषांच्या वस्ती प्रमाणेच बकालाची वस्ती ही प्रतिमाही वारंवार या कवितेत येते. वास्तविक या दोन प्रतिमा दोन जगाचे सूचन करतात. दोन वर्गाच्या जाणिवाही व्यक्त करतात, ही कविता बकाल वस्तीच्या बाजूने उभी आहे. बकालवस्तीतील अनेक विरोधाभास स्पष्ट केले आहेत. ही बकाल वस्ती म्हणजे जणू काही पशूंची पाग आहे. जन्माला आलेला जीव येथे सुरक्षित राहू शकेल याची कोणतीही हमी नाही. म्हणून येथे कशाला जन्माला आलास? असा प्रश्न जन्माला आलेल्या जिवाला पुन:पुन्हा विचारला आहे. दुसरा विरोधाभास असा की सभोवतालीं जातिभेदाची घनगर्द वाळू लपेटून घेतलेली स्वागतद्वारे आहेत. अशा चक्रव्यूहातून बाहेर पडण्याची एक विद्रोही दिशा कवयित्रीला सापडली आहे. ती म्हणजे

अंतरंगात काळोख जोपासून ज्यांनी रुजवली आहे कीड
अशांच्या नरडीचा घेऊन घोट मी झाले आहे विषकन्या

'दिशा'मधील कविता ही आत्मशोधाची कविता आहे. या आत्मशोधातून कवयित्रीच्या हाताशी भ्रमनिरासच आला आहे. एका व्यापक सामाजिक अर्थासह या कवितेतील प्रतिमा सिद्ध झाल्या आहेत.

या वेशीलगतच्या झोपड्यातला काळोख मला जाळतोय

भुकेने व्याकुळल्या डोळ्यातले पाणी मला शोषून घेतेय
त्यांच्या कोरड्या शुष्क ओठांवरचे गाऱ्हाणे हृदयात माझ्या बंदिस्त
अर्धवस्त्र चिरगुटातले देह डोळ्यात माझ्या प्रश्नचिन्ह

वेशीलगतच्या झोपड्यातील जगण्याचे वास्तव येथे चित्रित झाले आहे. पाणी, काळोख, शुष्क ओठ, अर्धवस्त्र चिरगुटातले देह यासाख्या प्रतिमांमधून अभावग्रस्तांच्या जगाचे वास्तव अधोरेखित होते. या प्रतिमांच्या अनुषंगाने घडणारी कृतिशीलता ही कवयित्रीच्या संवेदनशीलतेचे दर्शन घडविते. आपल्या, स्वकीयांच्या जगाशी बांधिल असल्याची आणि या जगाशी एकरूप झाल्याची ती सूचना आहे. या प्रतिमातून जगण्याचे वास्तव आणि त्या वास्तवाच्या परिणामातून व्यथीत झालेली वृत्ती याचा प्रत्यय येतो. रंडागीत गाणाऱ्या टापूची वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा या कवितेने घडविली आहे.

रंडागीत गाणाऱ्या या हिजड्यांच्या टापूत
वांझोटे नीतिनियम लादले जातात
बैलाला बाप म्हणून... म्हशीला मावशी म्हणणार नाहीत
गाय मात्र यांची माता तिच्या अब्रूसाठी मौनाची भाषा
अन जेव्हा माणसांची होते कत्तल लुटली जाते आई-बहीण
तेव्हा कुणीच भादरत नाहीत दाढी-मिशा

प्रदेश किंवा विशिष्ट भौगोलिक प्रदेशाला टापू म्हटले जाते. या कवितेतील टापू रंडागीत गाणाऱ्या हिजड्यांचा आहे. तेथे वांझोटे नितिनियम लादले जातात. बैलाला बाप आणि गाईला माता मानले जाते. म्हशीला कोणतेच स्थान नाही. त्याहीपेक्षा भयानक म्हणजे माणसाची कत्तल होताना, आईबहिणीची इज्जत लुटली जाताना कोणालाही सुतक पाळण्याची आवश्यकता वाटत नाही. असा हा टापू आहे. 'टापू' या प्रतिमेतून वांझोट्या विश्वाचे सूचन होते. त्याच पातळीवर नितिनियमालाही नेऊन बसविले आहे. दुसरे म्हणजे जनावरांना (गाय, बैल) आईबाप मानले जाते. या प्राण्यांची कत्तल होत असेल तर निषेध पुकारला जातो. मात्र स्त्रियांची इज्जत लुटल्या गेली, माणसाची कत्तल झाली तर कोणालाही दु:ख होत नाही. ह्या अंतर्विरोधातून जिवंत माणसाचा वाझोटेपणा स्पष्ट होतो. म्हणून हा हिजड्यांचा टापू ठरतो. वांझोटे नियम, मौनाची भाषा आणि न पाळले जाणारे सुतक या तीनही गोष्टींमधून रंडागीत गाणाऱ्या 'हिजड्यांच्या टापू' ही औपरोधिक प्रतिमा अर्थसघन ठरते. त्यातून संवेदनहीनता आणि बोथटपणाचा परिणाम अधिक तीव्रतर पातळीवर जातो.

'सूर्य' प्रतिमेचे अधिक्य दलित कवितेत प्रत्ययाला येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी 'सूर्य' प्रतिमेचे मोठ्या प्रमाणात उपयोजन झाले आहे. ज्योती लांजेवार यांच्या कवितेतही डॉ. आंबेडकरांसाठी 'अक्षय सूर्या' ही प्रतिमा उपयोजित झाली आहे. वेगळ्या अर्थाच्या प्रतितीसाठी सूर्य प्रतिमेचे उपयोजन कवयित्रीने केले आहे. उदा.

या देशाचा सूर्य इतका बेईमान
की, उगवतो तेव्हा... कत्तलीने रंगून येतो
अन मावळतो तेव्हा... घरादाराची राखरांगोळी करून जातो

दिवस निघताच दंगली आणि माणसांच्या कत्तलींना सुरुवात होते आणि दिवस मावळतो तेव्हा घरादाराची राखरांगोळी झालेली असते. म्हणजे येणारा प्रत्येकच दिवस बेईमान म्हणूनच उगवतो. प्रत्येक दिवस कत्तलखोर होऊन येतो आणि घरादाराची राख करून जातो. हे वास्तव सर्वत्र म्हणजे देश पातळीवर घडणारे आहे. म्हणून 'या देशाचा सूर्य' या प्रतिमेला सार्वत्रिकतेचे परिमाण प्राप्त झाले आहेत. माणसाच्या वाट्याला येणाऱ्या दु:खविषयी, त्याच्या उदध्वस्त होणाऱ्या संसाराविषयी हा देश काडीमात्रही संवेदनशील नाही. अशा बोथट प्रवृतीच्या देशाचे रूप या प्रतिमेतून साकार झाले आहे. सूर्य प्रतिमेचे हे वेगळेपण नोंद घेण्यासारखे आहे. चंद्र या प्रतिमेचाही वैशिष्ट्यपूर्ण वापर या कवितेत केला आहे. उदा.,

दर आमावस्येनंतर चंद्र पूर्ण दिसतो म्हणतात
या वस्तीत अधुराही दिसला नाही

उघड्या नागड्या पोरांचे भवितव्य
तळहातावर घेऊन कुठलाच फकीर
इथे फिरकला नाही

कोणत्याही पातळीवर सुखाची अवस्था प्राप्त होऊ शकली नाही. अशी खंत येथे प्रकट झाली आहे. या वस्तीतील लोकांना भवितव्यच नाही आणि भवितव्य घडविणारा अजून कोणी या वस्तीला लाभला नाही म्हणून,

भोवतालचा काळोख पिऊन जगणारी काळोखी माणसे
काळोखातच विलिन होतात
चंद्र हातात येण्याआधीच हात अनंताला पोहोचले असतात

अंधाऱ्या पर्यावरणातच आयुष्य कंठावे लागते. सुखाचा कण हाती येण्याआधीच या जगातून नाहीसे व्हावे लागते. अनंतात विलिन व्हावे लागते. अंधारावर मात करणाऱ्या प्रकाशाची, सुखाची म्हणून 'चंद्र' प्रतिमा येथे कार्यरत झाली आहे. दिशाहीन प्रवासात आपले हृदय प्रकाशमान राहिले तर नेमकी दिशा सापडेलच असा आश्वासक सूर या कवितेतून प्रकट केला आहे. या कवितेतून अनेक मिथकांचे उपयोजन केले आहे उदा. शंबूक, एकलव्य, कर्ण, अभिमन्यू, कृष्ण, द्रोपदी इत्यादी. मिथकीय अंगाने स्त्रीअन्यायाचे वास्तव रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. उदा.

हे कृष्णा... तुझ्या राज्यात आयाबहिणीवर अत्याचार
अन... तू डोळे मिटावेस असे पार...
अरे अंगभर वस्त्र पुरवू नकोस
पण वस्त्र ओढणारे ते हात
मूळापासून छाटून तरी टाक,
पुनरावृत्ती होऊ देऊ नकोस नव्या महाभारताची

भर दरबारात बेअब्रू होणारी द्रोपदी आणि जन्माला आलेले दु:शासन हे सत्र पुरातनकाळापासून वर्तमानापर्यंत चालत आले आहे. त्यामुळे या प्रवृत्तीचा नायनाट झाला पाहीजे, पुन्हा नव्या महाभारताची पुनरावृत्ती होऊ नये अशी अपेक्षा येथे व्यक्त झाली आहे. मिथकाचे उपयोजन झाले असले तरी वर्तमानाच्या संदर्भात या मिथकाला नवा अर्थ प्राप्त करून दिला असे दिसत नाही. अन्याय अत्याचाराचा संदर्भ तेवढा नवा आहे. त्या अन्याय अत्याचाराच्या संदर्भात नकार दिलेला नाही. समकालीन जीवनात स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार सुरूच आहेत ही संदर्भसूचकता येथे आहे. मात्र मिथके जुनीच आहेत. जुन्याच अर्थांनी ती उपयोजिली आहेत. ज्योती लांजेवार यांच्या कवितेने आंबेडकरोत्तरकालीन वर्तमान साक्षात करण्याचा प्रयत्न केला आहे. विचाराचे आचारात रूपांतर होण्याऐवजी जयंतीदिन साजरा करणे हाच केवळ धर्म उरला आहे. आंबेडकरी धम्मविचारांची रुजवण होऊ शकली नाही या विषयीची खंत कवयित्रिने व्यक्त केली आहे. कवयित्रीची मानसिकता आशावादी आहे. पुढची पिढी चळवळीशी बेइमान होणार नाही असा विश्वास तिला वाटतो. बंडाच्या उभारणीसाठी अनेक हातांची तिला गरज वाटते. त्यासाठी पुढच्या पिढीला ती सजग करते.

मुला, तू अजून निद्रिस्तच
उठ... सूर्य उगवला आहे. .. नव्या क्रांतीचा
मुली, तुझे प्रसाधन आटोप लवकर
पदर खोच कमरेला... दारापुढे मोर्चा आहे

याप्रकारे पुढच्या पिढीला संघर्षसन्मुख करीत, चळवळीचे भान आणून देतानाच विद्रोहरत होण्याची दिशा या कवितेने दाखविली आहे. ज्योती लांजेवार यांच्या कवितेतील प्रेमजाणीव वेगळ्या वळणाने जाणारी आहे. या कवितेतील प्रिया स्वत:च पुढाकार घेऊन प्रियकराला आमंत्रित करताना दिसते.

मीच तर बोलावला होता पारवा
माझ्या अंगणी हुंदडायसाठी

पायही जडावले आहेत जडावल्या श्वासासारखे
मला कळतंय अंधारातही काळोखून गेले तुझे मनोरे
तूच सांग कोठून आणू प्रकाश
त्याने तर माझ्याकडे पाठच फिरवली
असं करू या का दोघेही आपण
जखमांचं चांदणं पिऊन पचवित बसण्यापेक्षा
दरड होऊन कोसळूयात उदंड दऱ्याखोऱ्यात (दलित प्रेमकविता / पृ. ४३)

'पारवा' ही प्रतिमा प्रियकराची निदर्शक आहे. प्रियेने त्याला आमंत्रित केले आहे. 'अंगणी हुंदडायसाठी' बोलावले आहे. हा पारवा काळोखाच्या नैराश्यात भोवंडला आहे. त्याचे मनोरे काळोखून गेले आहेत. तर प्रिया ही अंधारानेच वेढलेली आहे. प्रकाशाने तिच्याकडे पाठ फिरविली आहे. अंधाराने भोवंडलेली, घायाळ झालेली दोघांचीही रूपे येथे स्पष्ट होतात. अशा अवस्थेत जखमांना कुरवाळीत, जखमा जोपासत जगणे त्यांच्या दृष्टीने निर्थक ठरणारे आहे. म्हणून 'दगड होऊन कोसळूयात उदंड दऱ्याखोऱ्यात' असा निर्णय घेतला आहे. लौकीक जगातील 'जखमांना जोजावत' राहण्यापेक्षा 'प्रकृती' होऊन जगणे क्षेयस्कर आहे. असा विचार या अनुषंगाने सूचित झाला आहे.

थोडक्यात, ज्योती लांजेवार यांची कविता स्व आणि समाज या अनुबंधाच्या अनुभूतीतून साकार झाली आहे. बांधिलकीची ही कविता असून एक निश्चित भूमिका तिने घेतली आहे. ती आत्मशोधाची कविता आहे. अमानुषतेवर प्रहार करण्यासाठी ती जन्माला आली आहे. भूक, दारिद्र्य, स्त्रियांची अब्रू हे या कवितेच्या चिंतनाचे विषय असून तिने अभावग्रस्त स्त्रीजीवनाच्या स्थितीगतीचा आलेख चितारला आहे. ही कविता संघर्षाची अपरिहार्यता अधोरेखित करते. भावनिक पातळीवरील अभावांचा ताळेबंदही मांडते. या कवितेची प्रतिमासृष्टी समृद्ध असून वस्ती, टापू, सूर्य, चंद्र इत्यादी प्रतिमांना अर्थाची विशिष्टता प्राप्त करून दिली आहे. मिथकांचे उपयोजन केले असले तरी समकालीन संदर्भात मिथकांना नवा अर्थ प्रदान करण्यात ही कविता अपयशी ठरली आहे. पुढील पिढीला संघर्षसन्मुख करीत, चळवळीचे भान आणून देतानाच विद्रोहरत होण्याची दिशा या कवितेने दिली आहे.

✹ अरुण कृष्णाजी कांबळे (१४ मार्च १९५३-२० डिसेंबर २००९)

प्राध्यापक अरुण कांबळे हे दलित पँथरचे नेते होते. सम्यक आणि फर्डा वक्ता अशी त्यांची ओळख होती. पण या सर्वांच्या मुळाशी एका कवीचं व्यक्तिमत्व लपलेलं आहे. अत्यंत संवेदनक्षम, विलक्षण हळवेपणा आणि कोणत्याही अनुभवाचा अधिकाधिक तठस्थपणे पण स्वत:च्याच शैलीने, तर्ककठोरपणे बौद्धिक शोध घेणे हे अरुण कांबळे यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष होत.

अरुण कृष्णाजी कांबळे हे त्यांच्या कवितासंग्रहाचे नाव आहे. १९७०-८३ अशा तेरा वर्षांच्या काळातील कविता या संग्रहात समाविष्ट आहेत. कवितासंग्रहाचे शीर्षक म्हणून स्वत:चेच संपूर्ण नाव देणारा हा दलित कवितेच्या प्रांतातील एकमेव कवी आहे. माझ्या कवितेवर माझीच नाममुद्रा असली पाहिजे हा त्यांचा हेतू असावा. परंतु त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे परंपरा नाकारून आपल्याला योग्य वाटेल त्याच वाटेने जाणे हा ही विद्रोहाच्या अभिव्यक्तीचा एक भाग आहे. त्यामुळेही अरुण कांबळे यांनी आपल्या नावाचे शीर्षक आपल्या कवितासंग्रहाला दिले असावे.

विद्रोह हे मूल्य कवितेच्या माध्यमातून प्रस्थापित करण्याचे ऐतिहासिक कार्य पँथर कवितेने केले आहे. त्यात अरुण कांबळे यांची कविता अग्रस्थानी आहे. दलित पँथरने त्या काळात संबंध समाजमन ढवळून काढले होते. विद्रोहाच्या तीव्र जाणिवेमुळे दलित कविता समूहासाठी, समूहमनाला आवाहन करण्यासाठी आणि शत्रूला, वैऱ्याला आव्हान देण्यासाठी दंड ठोकून उभी होती. त्यामुळे या कवितेचा बहुतांश स्वर निवेदनात्मक, वक्तृत्वात्मक होता. त्याचा अपरिहार्य परिणाम अरुण कांबळे यांच्या कवितेवर झाला आहे. त्यांच्या कवितेत विद्रोहाचा स्वर काठोकाठ भरलेला आहे. म्हणून

या व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारी आवेशपूर्ण अभिव्यक्ती त्यांची कविता करते.

अरे, यांनीच तुडवलंय बुद्धाच्या शिष्यांना / हत्तीच्या पायाखाली
यांनीच ठोकलय येशूला गॉलगोथाच्या टेकडीवर
यांच्याच पित्यानी मारलय शंबूकाला तपश्चर्या करताना
आणि मार्टिन ल्यूथर किंगला सुद्धा / हे सारे आमचे दावेदार

अशाप्रकारे विषमतावाद्यांशी उभा दावा मांडणारी ही कविता आहे. हा दावा मांडताना शत्रू आणि मित्रामधील तरतमभावही बाळगला आहे. माणूसद्रोही, मानवतेचा खून करणाऱ्या सर्व शत्रूंशी वैर पुकारले आहे. प्रखर आशावाद हे दलित कवितेचे बलस्थान आहे. अरुण कांबळे हे चळवळ जगणारे व्यक्तिमत्त्व होते. म्हणून त्यांची वाणी मुक्तीच्या घोषणांच्या हिल्लोळानी आभाळभर झाली होती.

आमच्या मुक्तीच्या घोषणांचे हिल्लोळ
देतील धडका तुमच्या ढोंगी संस्कृतीवर
आणि करतील प्रक्रिया सर्वांवर समुद्राच्या समानतेची
आज आम्हाला प्रकाशाचं शीड उभारलेलं
स्वातंत्र्याचं गाव दिसतंय

ढोंगी संस्कृतीवर धडका देणारी कवीची वाणी आणि लेखणी, मुक्ती आणि समतेच्या परिप्रेक्ष्यात बलदंड आवेश घेऊन उभी आहे. प्रबळ आशावादाची प्रकाशमान जाणीव या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. बुद्धाच्या करुणेनं दु:खाचा शोध घेणारी जाणीव त्यांच्या कवितेत प्रकट झाली आहे. मानवी अश्रू हे दु:खाचे प्रतीक आहे. हे दु:ख टिपण्यासाठी हवी असते करुणा. ही करुणा कवीचे व्यक्तिमत्त्व व्यापून टाकते.

अश्रू असतात सत्य (असे म्हणतात)
मला ठाऊक नाहीत फसवे अश्रू
मी विश्वास ठेवतो अश्रूंवर
अश्रूला अश्रूंनीच दाद देतो
अश्रूंसाठी महायुद्ध पुकारतो आणि कविताही

अशाप्रकारे ही कविता बुद्धाच्या करुणेने अश्रूंचा, दु:खाचा शोध घेते. मग या कवीमनाला अश्रुंच्या मुळाशी दडलेली आर्थिक, सामाजिक परिस्थितीची बीजं सापडतात. करुणेनं टिपलेले अश्रूच या कविला त्या परिस्थितीविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त करतात. करुणेन दु:खाचा वेध घेणारा बुद्ध हा पहिला विद्रोही आहे. अरुण कांबळे यांच्या विद्रोहात बुद्धाची करुणा आहे. या करुणेनचं मग दुष्काळातील उपाशी लोक, अस्पृश्य, गरीब, मांग गारुडी वा वेश्या असोत. या साऱ्यांच्या दु:खाचा वेध कांबळे यांची कविता घेते आणि पुन्हा आशावादाच्या केंद्रावर विद्रोहाच्या वाटेनेच मार्गस्थ होते.

थांब डरू नकोस
एक न एक दिवस या अंधाराला दिवस जाणारायत
अन् प्रसवणार एक उत्फुल्ल प्रभात खळखळणाऱ्या भावनांची
लक्ष लक्ष जीवनांची
माझ्या हातात त्याच्याचसाठी विद्रोहाचा आसूड लखाखतोय

एका अर्थाने विद्रोह हेच अरुण कांबळे यांच्या कवितेचे प्राणतत्त्व आहे असे म्हणता येते. कारण त्यांनी म्हटले आहे.,

एक दिगंत वेदनाच होऊन आपण
व्यक्त होतो चिरकालाची की

एकाकी प्रकाशशलाका
अंधाराच्या गाभ्याला चिरत जाणारी

अरुण कांबळ्यांचा पिंड एकाकी का होईना अंधाराच्या गाभ्याला चिरत जाणाऱ्या प्रकाश शलाकेचाच होता. म्हणजे विद्रोहाचाच! आणि हा विद्रोह विधायक स्वरूपाचा आहे. या विद्रोहाचं अंतिम उद्दिष्ट मुक्ती हेच आहे. म्हणूनच या कवितेनं स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या मूल्यांवर आधारीत समाजनिर्मितीची स्वप्ने पाहिली आहेत.

या ज्वाळांचे चाळ माझ्या पायात बांधून
प्रलयंकारी नर्तनातून उभवीन मी नवी दुनिया
जेथे पाखरांच्या गीताना मुक्त रान आहे

विधायक विद्रोहातून 'जेथे पाखरांच्या गीताना मुक्त रान आहे' असा समाज निर्माण करणे हे या कवितेचे उद्दिष्ट आहे. शब्दभान, शब्दाचे मोल आणि शब्दाचे सामर्थ्य याविषयी नेमके भान कांबळे यांच्या कवितेला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यांवर बंदी घालणाऱ्या समाजव्यवस्थेत हे शब्दाचे मोल मूक समाजाला मुक्तीनंतर अधिकच प्रखरपणे आकळत असते. शब्द उच्चारणे, अभिव्यक्त होणे ही त्याच्या अस्तित्वाची अपरिहार्यताच ठरते.

मला ठाऊकच नव्हते शब्दांचे आभाळपण
कारण तुम्ही शब्दांनाच बांधले दावणीला....
साता संमिद्राच्या पल्ल्याडला माझा शब्द
शब्द नाहीयच तो लहलहणारा जळजळीत लाव्हा
जर उच्चारलाच नाही तो तर
त्वचेलाही फुटतील शब्दांचे धुमारे
आज चोखुर उधळलेला माझा शब्द
कसे सांगू तुम्हाला, आज माझा प्रत्येक शब्द आभाळ झालाय

'लहलहणाऱ्या जळजळीत लाव्हाच्या' रूपातले शब्द जेव्हा वाणी आणि लेखणीतून साकार होतात तेव्हा 'आमचे नाते सूर्यकुळाशी जुळते' असा उच्चार बाहेर पडतो आणि कविता मुक्तीच्या सोहळ्याचे चित्र रेखाटू लागते,

त्या प्रचंड गतिमान चुकाच्या गतीने
गतीचे सारे नियम धाब्यावर बसवले
आणि नियतीचे चक्र ओलांडून बंधमुक्त झालेल्या माणसांनी
जोरांनी बाग दिली
कधीच न येणारी रात्र ओलांडल्याची

मुक्तीचे चित्र रेखाटणाऱ्या या कवितेने थंडपणे, मुकपणे जगणाऱ्यांवर आसूड ओढायलाही मागेपुढे पाहिले नाही. समुहाला, समूहमनाला चेतवणारी, थंड मनांना आग लावणारी, नपुसंक मनाला पेटवणारी अशी या कवितेची रीत आहे. ''हिंदू धर्माविरुद्ध, या धर्माने निर्माण केलेल्या समाज व्यवस्थेविरुद्ध दलित कविता जशी आग ओकीत राहते त्याचप्रमाणे स्वत्व विसरणाऱ्या, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रवृत्तीविरुद्धही कांबळ्यांची कविता आग ओकित राहते.'' [७] आपल्या समाजाला, स्वकीयांना आत्मभान आणून देते. आंबेडकरी विचारांचा दिवा हाती घेऊन वाटचाल करीत राहते. शब्द हे शस्त्र आहे याचे भान कायम जागृत ठेवून धारदार तरवारीसारखी ती तळपत राहते. बाजारबुणग्यांच्या जगाविषयीचा उद्वेग या कवितेने खालीलप्रमाणे व्यक्त केला आहे.

या बुणग्यांच्या जगात जगताना
जाळून घ्यावे वाटते स्वत:ला भरचौकात
निदान तुमची थंड शरीरेतरी तापतील

माझ्या देहाच्या शेकोटीजवळ जमा होऊन बघताना

या संताप उद्वेगामागेही एक विधायक भावना आहे. 'मला जगता येत नाही खोटी कातडी पांघरून' असा कवीचा स्वभाव आहे. प्रक्षुब्ध आणि बंडखोर नायक अशी या कवीची प्रतिमा त्याच्या कवितेतून साक्षात झाली आहे.

दलित पँथरचा उदय ही ऐतिहासिक घटना तरुण पिढीच्या मनात सळसळते चैतन्य निर्माण करून गेली. स्वातंत्र्य मिळून वीस बावीस वर्षे होऊन गेली होती. तरीही या देशात दलितांवर राजरोसपणे अन्याय अत्याचार सुरूच होते. त्यामुळे तरुण पिढीच्या मनात प्रचंड असंतोष खदखदत होता. त्या काळातील आर.पी.आय.ची नेते मंडळी निष्क्रिय ठरली होती. म्हणूनही पँथरचा संताप अनावर झाला होता. प्रक्षुब्धपणा वाढतच गेला होता. ''मोर्चे निदर्शने होत होती. तरीही अन्याय अत्याचारात खंड पडत नव्हता. मग एकच मार्ग उरतो. या समाजाची नवी जडणघडण करण्याचा सनदशीर मार्गावरचा विश्वास उडालेला असतो. उरतो सशस्त्र लढ्याचा. त्यावेळी पँथर्सच्या डोक्यात हे वेड उतरलं होते नामदेव ढसाळ तर माओ, लेनिन मार्क्स,चे गव्हेरा उदधृत करीत होते.'' [८] अशा वेळेस अरुण कांबळे यांची कविता माझा गॉर्की कुठाय? असा प्रश्न उपस्थित करताना दिसते.

हे हृदय चिरणारे आक्रोश ऐकून
रोज माझ्या स्वप्नात गॉर्की येतोय
तंग फ्रॉक कोट चढवून
त्याच्या बुटक्या पौलादी दमदार सरदारासह
आज क्षितीजावर तो सरदार आलाय
त्याची पावलं टापटापतायत
ती सारवलेली लाल कडा त्याचं स्वागत करतेय...
मी उसासतोय, गॉर्की....गॉर्की....गॉर्की
माझा गॉर्की कुठाय ।

अरुण कांबळे यांच्या कवितेची मानसिकता सशस्त्र क्रांतीला अनुकूल ठरताना दिसते. ''दलित पँथरची चळवळ ऐन भरात असताना दलित तरुण भांबावलेला होता, पण दलितांचे प्रश्न सोडवण्याचे मार्ग व हत्यार त्याला सापडत नव्हते.''[९] अशा वेळेस चे गव्हेराची क्रांतीकारता कांबळ्यांच्या मनाला झपाटून टाकते.

चे गव्हेरा..
तुझं अविनाशी अस्तित्व माझ्या सर्वांगात भिनलय
क्युबा, फिडेल कॅस्ट्रो, लॅटिन अमेरिका
आमच्या धमन्याधमन्यातून
हे चे, तू प्रक्रिया कधीच न संपणारी

फिडेल कॅस्ट्रो,चे गव्हेरा ही सारी क्रांतीची प्रतीकं आहेत, सर्वंकष बदलाच्या प्रक्रियेची प्रतीकं आहेत. मात्र आपल्या देशात क्युबा-चिली सारखा समाज बदलत नव्हता, याविषयीची प्रचंड अस्वस्थता अरुण कांबळे यांच्या कवितेत व्यक्त झाली आहे. असे असले तरी त्यांची कविता परिवर्तनवादी विचाराला आणि बुद्ध-फुले-आंबेडकर या तत्त्वत्रयीशी बांधिल आहे. म्हणून चे गव्हेरा ही जशी कधीच न संपणारी प्रक्रिया आहे त्याच प्रमाणे दलितांपुढील आव्हाने अद्यापही संपलेली नाहीत, संघर्ष अव्याहतपणे सुरू ठेवणे अपरिहार्य आहे. अशी जाणीव त्यांच्या कवितेने प्रकट केली आहे. म्हणून ते म्हणतात,

तुम्ही तसे सोशिकच
कसल्याच असतील कंबरा
नाहीतर बुद्धाच्या नाका-हाताच्या कपच्या

गोंदल्याच असतील तुमच्या छातीवर..
दोस्त, कूच अजून आहेच...

संघर्षाची अपरिहार्यता या कवितेने व्यक्त केली आहे. एका अर्थाने प्रतिक्रांतीविरुद्ध क्रांतीचाच मंत्र दिला आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा वापर करून स्वत:चा स्वार्थ साधणाऱ्या प्रवृत्तीविषयीची कडवट प्रतिक्रिया कांबळे यांच्या कवितेने नोंदविली आहे. उदा.

तुमच्या विचारांची कबर बांधणारे हात
तुमच्या पुतळ्याला हार घालताना पाहून तुम्हाला काय वाटते हो..
बरं का बाबासाहेब तुमचे पुत्र
मंत्री / संत्री / अधिकारी / काहीबाही / फार मोठे / मोठ्ठे झाले
पण त्यांच्या वाट्याला कोतवालाचेच जिणे आले.

स्वार्थाने बरबटलेल्या आणि लाचार प्रवृत्तीविरुद्धची ही जळजळीत उपहासगर्भ प्रतिक्रिया आहे. थोडक्यात, अरुण कांबळे यांची कविता आवेशपूर्ण आणि वक्तृत्वात्मक आहे. विषमतावाद्यांशी या कवितेने उभा दावा मांडला आहे प्रबळ आशावादांची प्रकाशमान जाणीव या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. विद्रोह हे या कवितेचे प्राणतत्त्व आहे. या विद्रोहाचे अंतिम उद्दिष्ट मुक्ती हेच आहे. शब्दभान, शब्दाचे मोल आणि सामर्थ्य याविषयीचे नेमके भान या कवितेला आहे. स्वकीयांना आत्मभान आणून देण्याचे कार्य या कवितेने केले आहे. प्रक्षुब्ध आणि बंडखोर नायकाची प्रतिमा साकार झाली आहे. समाज बदलत नाही या विषयीची प्रचंड अस्वस्थता कवीमनाने व्यक्त केली आहे. प्रतिक्रांतीविरुद्ध क्रांतीचा मंत्र दिला आहे. आंबेडकारांच्या नावाचा वापर करून स्वार्थ साधणाऱ्या लाचार प्रवृत्तीविरुद्ध कडवट प्रतिक्रिया नोंदविली आहे.

✸ लहू कानडे (जन्म २३ ऑक्टोबर १९५५)

या दशकात **क्रांतीपर्व** हा लहू कानडे यांचा कवितासंग्रह दाखल झाला. त्यांचा हा पहिला कवितासंग्रह आहे. त्यामुळे पहिलेपणाच्या खुणा असणे साहजिकच आहे. उदा. या संग्रहातील कवितेत येणाऱ्या फकीर, सुईदोरा यासारख्या प्रतिमा किंवा 'महाकाव्यात एकही ओळ आली नाही आमच्या वाट्याला' अशा स्वरूपाची अभिव्यक्ती पाहिली म्हणजे नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार इ. पूर्वसूरींचा प्रभाव या कवितेवर आहे हे स्पष्ट होते. काहीवेळा अनुकरणही प्रत्ययाला येते. शीर्षकाप्रमाणे ही कविता क्रांतीपर्वची आहे. शोषक व्यवस्थेचा पाशवीपणा तिने उजागर केला आहे नितीला तीलांजली देणारे जमीनदार या व्यवस्थेत आहेत. माणसांना गुलाम बनवणारे अनेक घटक येथे कार्यरत आहेत. परमेश्वराच्या नावाने माणसाला अस्पृश्य ठरवून त्याचे माणूसपण हिरावून घेणारे शोषक व्यवस्थेचे विविध घटक येथे पाहावयास मिळतात. या व्यवस्थेचे स्वरूप खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे,

मेलेल्यांचे दर्शन त्याच्या आप्तेष्टांना व्हावे म्हणून
गावोगाव मरणवार्ता महारानं द्यावी
आत्मा स्वर्गात पोहचावा म्हणून -
मांगाने डफडी वाजवत जावी प्रेतयात्रेच्या पुढे
डोंबानी प्रेताची देखभाल ठेवावी - ही सर्व व्यवस्था

माणसाला गुलाम बनवणारी ही व्यवस्था उद्ध्वस्त करणे अटळ आहे. म्हणून या कवितेने असा उद्घोष केला आहे की,

या संस्कृतीचे बंगले उभारणाऱ्या गुलामांच्या हातात
थापीऐवजी आपण हॅन्डग्रेनेडस का देवू नयेत

कारण व्यवस्थेने ज्यांना गुलाम बनविले त्यांचे आत्मभान आता जागृत झाले आहे. शत्रू आणि मित्र यांच्यातील

फरक त्यांना नेमकेपणाने कळून चुकला आहे म्हणून माणसाचे माणूसपण हिरावून घेणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात या कवितेने विद्रोह पुकारला आहे.

दलितक्रांतीची बोंब ठोकून
जाळणार आहे वाङ्मय गाठोडे होळीसमान
जातिव्यवस्थेचा पुरस्कार करणारे, पायरीचे दगड
डोक्यात घालून परमेशांचे अवतार करणार आहे दुभंग
गाणार आहे देवादिकांच्या विस्मृतीचा अभंग

अशा स्वरूपाच्या कृतिशीलतेतूनच सम्यक क्रांती घडून येईल असा विश्वास या कवितेने व्यक्त केला आहे. कारण समूहमन अशा स्वरूपाच्या क्रांतीसाठी आसूसलेले आहे.

पिढ्यानपिढ्या कुजत ठेवलेल्यांना
जगण्याचे डोहाळे लागले आहेत
समता स्वातंत्र्याचा सूर्य, किरणांची गलबते
तिमीराच्या दर्यावर नांगरत आहे
पूर्वेची लाली होऊन मेलेल्यांना जागवत आहे

मानवी मूल्यांची पेरणी या सूर्याने समूहमनात केली आहे. म्हणून माणसाचं गाणं अंगाईगीत होण्यासाठी चातुर्वर्ण्य आणि साऱ्या धर्माना कायमची मुठमाती दयावी लागेल. प्रस्थापित अन्यायव्यवस्था झुगारून दयावी लागेल, मनुस्मृती विस्मृतीत ढकलावी लागेल. अंधाराला प्रकाशाच्या कुशीत सोपवावं लागेल तेव्हाच सम्यक क्रांती घडून येईल. भविष्याची स्वप्ने पाहणारी ही कविता तशी स्वप्नाळू आहे. प्रस्थापित व्यवस्थेने लादलेल्या आपल्या जगण्याची दुनियाच पूर्णतः बदलली पाहिजे असे स्वप्न या कवितेने पाहिले आहे. या स्वप्नपूर्तीसाठी समतेचे गाव उभारले जावे, जेथे दुःखाची कणव असणारे मायबाप असतील, कष्टाची भाकर असेल, लाचारीचे दान नसेल. मूलभूत गरजांची पूर्तता होईल. जेथे ममता आणि शांतीचे पर्यावरण असेल. असा स्वप्नाळू आशावाद या कवितेने जोपासला आहे. जातिव्यवस्थेच्या नर्काळ तुरुंगातून बाहेर पडण्यासाठी नव्या घरकुलाच्या शोधात ही कविता निघाली असून, या घरकुलात फुले आंबेडकर जाणिवा आणि एकजुटीचा सुरुंगसाठा असणार आहे. असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. दलित प्रेमकवितेला एक वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला आहे. क्रांतीविषयीचा आदर्शवाद आपल्या प्रियेच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न कवीमनाने केला आहे. उदा.

जेव्हा मार्ग स्मशानातून जात असतो
तेव्हा पेटलेल्या चिता पाहून गहिवरायचं नसतं
घेता आला तर घ्यायचा असतो चितेवरून अंगार
क्रांतीसाठी शृंगार म्हणून
आणि उरात नाचवायच्या असतात भडकलेल्या ज्वाला
क्रांतीसाठी वरमाला म्हणून

आपल्या प्रियेला हा कवी क्रांतीचे तत्वज्ञान सांगताना दिसतो. आपल्या अस्तित्वापेक्षा आपल्या विचारांचा स्वीकार करावा हेच या प्रियकराला आपल्या सखीकडून अभिप्रेत आहे. शृंगार आणि वरमाला याविषयीच्या पारंपरीक संकल्पना आणि समज बाद ठरवून त्यांना नवा अर्थ क्रांतीच्या संदर्भात प्रदान केला आहे. त्यातून प्रेमाची नवी त-हा पाहावयास मिळते. आपल्या सखीला सामाजिक भान आणून देण्याचे कार्य या कवितेने केले आहे. हाच या कवितेचा विशेष म्हणता येईल.

- रविचंद्र हडसनकर (जन्म २७ ऑगस्ट १९४४)

या दशकात रविचंद्र हडसनकर यांचे तीन संग्रह प्रसिद्ध झाले. **देणगी** (१९८३), **अरे मानसा मानसा** (१९८७) आणि **हळद उन्हे** (१९९०) हा गीतसंग्रह.

'देणगी' (१९८३) हा कवितासंग्रह 'ठिणगी' पेक्षा वेगळ्या जाणिवेचा आहे. ग्रामसंस्कृती, कृषीसंस्कृती हा या कवितेवा अवकाश आहे. या अवकाशातील सुखदु:खाचे प्रकटीकरण करणे हे या कवितेचे एक ध्येय आहे. त्याचप्रमाणे कष्टाचे मोल विशद करणेही महत्त्वाचे वाटते. बोलभाषेचा मुक्त वापरही कवितेत प्रत्ययाला येतो. प्रतिमासृष्टीही कृषी जीवनाशी निगडीत आहे. असे असले तरी सामाजिक भानही या कवितेने प्रकट केले आहे. काळीमाती जीवनदाती असली तरी शेतमजुरांच्या जीवनातील अभावग्रस्तता काही संपुष्टात येत नाही. अभावाच्या जगण्यासोबतच दुष्काळही सोबतीला आहे. त्यातून उदभवलेल्या समस्यांचे भेदक चित्रण ही कविता करते. भुकेचा वणवा, माणसाची जिवंतपणीच होणारी मृतवत अवस्था, अन्नासाठी धडपड असे सारे वास्तव रेखाटले आहे. नाते काळी-पांढरीशी असले तरी पांढरीने मात्र अलगावाची भूमिका जोपासली आहे. गावपांढरीत जातिपातीचे उघड व्यवहार होताना दिसतात.

पिढ्यान् पिढ्यांचे बुरसट गंजाळ
जातीजातीत वाटलेली वेगवेगळी वेटाळं
माझा विटाळ

असे हे गाव आहे. जिथे अस्पृश्यता जोपासली जाते. असे असलेतरी कवीच्या पखवाज अन् टाळाचा आवाज दिंडीत गावभर घुमताना दिसतो. अशा गाव पांढरीशी, काळ्या मातीशी कवीचे मायबाप एकरूप होताना दिसतात.

रानाचे मोठेपण मोठ्या मनाने
रित्यापोटी पचविणारे माझे मायबाप
दिलदारपणे इथेच सुकून जातात
शब्दात बसतच नाही हे मोजमाप

मायबापाचे हे मोठेपण आणि दिलदारपणा शब्दांच्या पलिकडचा आहे अशी कवीची धारणा आहे. मात्र विरोधाभास असा आहे की गाव मात्र अदयापही आतून पोखरलेले आहे.

मी पाहतोय सताड उघड्या डोळ्यांनी
माझे उद्ध्वस्त खेडे आतून पार पार पोखरलेले
माणुसकीचे पिढ्यान् पिढ्यांचे देऊळ दुभंगलेले

असे माणुसकीला पारखे झालेले हे गाव असून पिढ्यान् पिढ्या हे असेच चालत आले आहे. म्हणूनच कवितेची शिवणावळ शब्दांनी करताना गाव मधोमध कुठेतरी उसवले असल्याचा प्रत्यय कवीमनाला आल्याशिवाय राहात नाही. काबाडकष्ट करणाऱ्या आईची प्रतिमा कवीने खालीलप्रमाणे साकार केली आहे.

आभाळ फाटलं तरी फाटल्या संसाराला
ती टाके भरत बसायची
इंद्रधनुष्याच्या सात ठिगळात
माझी माय मला दिसायची.

फाटक्या संसाराला टाके भरणाऱ्या आईसोबतच कवीने आपल्या प्रेयशीची प्रतिमाही रेखाटली आहे,

माझ्या वेदना उंबरठा ओलांडून तू आलीस
चढावर गाडीचे चाक खचावे तसा मी खचताना
तूच आरे झालीस..
अंधाराने मला असे पोखरताना
तरीही तू आभाळ पांघरलेस...

वासे कुईट झालेल्या माझ्या वस्तीवर
ताठ मानेने पंचशील ध्वज रोवले.

अंधाराच्या गर्तेतील आपल्या सख्याला प्रंचड आधार देऊन त्याला कृतिशील करणारी अशी ही सखी आहे. ती त्याच्यासाठी छत्र झाली, आधार झाली आहे. हे आधारशील होणेही ताठपणे, करारी बाण्याने बुद्धतत्त्वाचे पाईक होऊन खंबीरता स्पष्ट करणारे आहे. पंचशील ध्वज हे बुद्धतत्त्वाचे प्रतीक त्याच्या वस्तीवर रोवणारी कृती सखीच्या रूपाला महत्पदावर पोहचवणारी आहे. अंतिमत: ही कविता बुद्धतत्त्वाकडेच मार्गस्थ झाली आहे. उदा.

गावाकुसाबाहेर माझी झोपडी
तरी वाड्या माड्यांची वाढविली शान
त्यांच्या खंड्यावरी ओझ्याला
मी देतच आलो माझी मान
तरी आख्खा जीव हा ओवाळतो मी या मातीवर
वार वर्णाचे विषारी वार झेलतो मी छातीवर
माझ्या अंगणात नित्य शीतल पिंपळाची छाया
माणसांनो माणसावर मी जीवापाड करतो माया

गावपांढरीतील अंतर्विरोध स्पष्ट करून मातीशी असलेली निष्ठा व्यक्त करून या कवितेने माणसावर माया करणारी जाणीव स्पष्ट केली आहे. कवीमनावर बुद्धाची करुणा, मानवता या तत्त्वांचे संस्कार झालेले आहेत. म्हणूनच अपमान पचवून माणसावर प्रेम करणारी जाणीव या कवितेतून व्यक्त होताना दिसते.

अरे मानसा मानसामधील कविता मानवी जन्माचे सार्थक व्हावे अशी अपेक्षा बाळगून आहेत. माणसावर जर अन्याय अत्याचार होत असतील तिथे माणसाने विजेसारखे कडाडून उठावे असा उपदेशही ही कविता करते. माणसाने माणसाला गुलाम करू नये. ओठात एक अन पोटात दुसरे असे दुटप्पीपणे वागू नये. समतेनं नांदावं असा जगण्याचा निर्धार करावयास शिकवणारी कविता एक मूलभूत प्रश्न उपस्थित करते.

मानसाचा जलम भला मंग आला कोठून इटाळ
जाण अभंगाचे खरे सार, यर्थ कुटू नको रे टाळ

मानवी जन्म इथे निर्थक ठरविला गेला आहे अशी खंत या कवितेने व्यक्त केली आहे. झिजणे हाच इथल्या जगण्याचा धर्म ठरला आहे. घाम गाळूनही पदरात गोंडरच पडते, माणुसकीचा गळा घोटला जातो. कित्येक पिढ्यांपासून हे असेच सुरू आहे. त्यामुळे या जन्माची भूमी एक जेलखानाच झाली आहे. दारिद्र्यामुळेच जिंदगी नासवल्या गेली आहे. असा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. समतेच्या प्रस्थापनेसाठी बुद्धतत्त्वांची अपरिहार्यता स्पष्ट केली आहे.

महाडचे पाणी प्यालोय मी । पदराशी हीच खुणगाठ आहे
जरी वाटसरू ती बुद्धगयेचा। समतासंगरासाठी ही पायवाट आहे

पुराणातील वांगी आवडीने चाखणाऱ्या भटगिरी उद्योगाचा, धर्मग्रंथ, धर्ममार्तंड आणि स्मृतीश्रुतीचा येथेच्छ समाचार या कवितेने घेतला आहे. उदा.

जे जे आपणाशी ठावे। ते ते संस्कृतात लपवावे
नित्य अज्ञानात ठेवावे। दलित जन
विज्ञाननिष्ठा ही नामी । आम्हासाठी कुचकामी
भली रोजगारहमी । भटगिरी

याचप्रमाणे केसाने गळा कापणाऱ्या कृतघ्न प्रवृतीचाही औपरोधिक समाचार घेतला आहे. समतेच्या नावाने पुकारा करणाऱ्या दांभिक चळवळींचा समाचार घेताना अशा चळवळीचे अंत:स्थ हेतू काय आहेत याचे दिग्दर्शनही केले

आहे. थोडक्यात, अखिल मानवजातीच्या दु:खाला कवेत घेणाऱ्या या कवितेने अन्याय पीडितांचा आर्त आणि करुण टाहो शब्दबद्ध केला आहे. माणसाबद्दलची करुणा प्रकट केली आहे.

✸ हिरा बनसोडे (जन्म १ ऑक्टोबर १९३९)

फिर्याद (१९८४) हा हिराबनसोडे यांचा दुसरा कवितासंग्रह होय. यापूर्वी त्यांचा 'पौणिर्मा' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला होता. या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहात कवयित्रीच्या मते 'पोर्णिमा' ही कोवळ्या फुलाची सुगंधी बरसात, उमलत्या किरणाची सोनेरी बरसात, मधूर प्रितीची गोड नजाकत, पण त्या हळव्या स्वप्नाळू भावना म्हणजे मृगजळच. त्यामुळेच स्वप्नाळू भावना बाजूला ठेवून स्वत:च्या अस्मितेने नटलेली, गुलामी झुगारणारी स्त्री रेखाटण्याचा प्रयत्न 'फिर्याद' मध्ये कवयित्रीने केली आहे.

'फिर्याद' फक्त दलित स्त्री वर्गापुरती मर्यादित नाही, तर सर्व स्त्रियांच्या गुलामगिरीचा तो पाढा आहे. आंबेडकरांची लेक होऊन आपला हक्क मागणारी स्वाभिमानी बाण्याची स्त्री अभिव्यक्ती 'फिर्याद'मध्ये प्रत्ययाला येते. महाडच्या धर्मसंगरातून दलित स्त्रीच्या जीवनाची दिशाच बदलली, लपलेल्या आत्मशक्तीला डॉ. आंबेडकरांनी जागृत केले आणि दलित स्त्री आभाळभर उंच झाली. अशी भावना कवयित्रिने व्यक्त केली आहे. 'फिर्याद' हे निवेदन आहे. ते संस्कृतीच्या संदर्भात आहे. गुलामीत डांबणाऱ्या संस्कृतीतील बहिष्कृत जगण्याविरुद्ध, लोकांच्या न्यायालयात दाखल केलेली ही 'फिर्याद' आहे. एका अर्थाने तो स्त्रीमुक्तीचाच जाहीरनामा आहे.

ही माझी फिर्याद
आमच्या कर्मठ संस्कृतीवर आहे
जिने आम्हाला बंद कोठडीत बंद केले आहे
जिने आम्हाला बहिष्कृत आयुष्याचे दान दिले आहे
जिथला वारा आम्हाला परक्यासारखा वागवतो
जिथल्या मातीमध्ये आमचे बीज अव्हेरले जाते
जिथलं पाणी आमच्याशी मृगजळाचा जीवघेणा खेळ करते
हे जहर मिसळलेले,अशुद्ध जीवन आम्ही नाकारत आहोत
या क्रूर शापातून मुक्त होण्यासाठी
उज्ज्वल अशी मंगल प्रभात तुम्ही तरी द्याल का
लोक हो! तुमच्या न्यायालयात ही फिर्याद आणली आहे
तुम्ही तरी मला न्याय द्याल का?

लोक न्यायालयात न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त करणारे हे निवेदन आहे. निवेदन हा दलित कवितेच्या अभिव्यक्तीचा एक प्रकार आहे. हे निवेदन व्यवस्थेच्या संदर्भात केले जाते, कधी आपल्या दु:खाचे कथन करण्यासाठी केले जाते तर कधी एखादा प्रस्ताव सादर करण्यासाठी केले जाते. हिरा बनसोडे यांनी आपल्या अभिव्यक्तीच्या द्वारे विविध प्रश्न उभे केले आहेत. प्रातिनिधिक रूपात या कवितेने स्त्रीदु:खाची कहाणी सांगीतली आहे. सर्व स्त्रियांच्या वतीनेच ही अभिव्यक्ती होताना दिसते. एकीकडे ही स्त्री पुरुषप्रधान व्यवस्थेचा बळी ठरते तर दुसरीकडे दलित म्हणून सवर्ण स्त्रियांकडूनही जातिव्यवस्थेचा बळी ठरते. या दुहेरी दु:खाला सामोरे जाणारे स्त्रीजावनाचे भेदक दर्शन या कवितांनी घडविले आहे. दलित स्त्रीच्या आकांक्षा, स्वप्ने, अपेक्षा फार माफक आहेत. तिला इतराप्रमाणे माणूस म्हणून जगता आले पाहिजे, तिला बहिष्कृत आयुष्य जगायचे नाही. तिला समाजाकडून, धर्माकडून, आणि व्यवस्थेकडून न्याय हवा आहे. म्हणून ही 'फिर्याद' लोकन्यायालयात मांडण्यात आली आहे. स्त्रीदु:खाला शब्द देणारी कविता म्हणून 'फिर्याद'चे मोल त्यामुळे अधिकच वाढले आहे. आपल्या न्याय हक्कासाठी सजग झालेल्या स्त्रीमनाचा उद्‌गार म्हणून 'फिर्याद'मधील एकूणच कविता दखलपात्र ठरतात.

या कवितेने स्त्रीजीवनाच्या संदर्भात अनेकक्षेत्रीय प्रश्न उपस्थित केले आहेत. सामाजिक सांस्कृतिक जीवनाच्या संदर्भात अनेक निरीक्षणे नोंदविली आहेत. इथली संस्कृती पाषाणहृदयी आहे. रुढी सांभाळणाऱ्यांच्या मांडीवर 'श्वान' बसला आहे. पुरुषी प्रवृत्ती निर्दयी आणि निगरगट्ट आहे, इथे सारे क्रूर कसाई जमा झाले आहेत. क्षणोक्षणी येथे मरणच जगावे लागते. असे अस्वस्थ करणारे प्रश्न सोबतीला घेऊन या कवितेने आपली ठळक मुद्रा उमटविली आहे. या कवितेच्या केंद्रस्थानी 'मुक्या जखमांच्या पराभूत भळभळत्या वेदना' आहेत असे प्रत्ययाला येते. या देशाची महान संस्कृती सावत्रपणाचे विषम राजकारण करणारी, मातृत्व नाकारणारी, शूरत्व खच्ची करणारी अशी पाषाणहृदयी आहे. म्हणून तिचा पाडाव करण्यासाठी एक संघर्षशील विद्रोही भूमिका या कवितेने घेतली आहे.

चतकोर तुकड्यासाठी आयुष्य दान करणारे
आमचे इमान बंडाचे निशाण घेऊन निघाले आहे
विद्रोहाचे भीषण क्रांतीगीत गात

या विद्रोहाची प्रेरणा आंबेडकरी मुक्ती लढ्यात आहे. म्हणून स्त्रीची होणारी विटंबना आता सहन केली जाणार नाही.

त्या कत्तलखोरांची फोडीन छाती
होऊन धडपडणारी संगिनी
मी आहे आंबेडकरांनी पेटवलेले महाडचे झळाळते पाणी...

असा निर्धार या कवितेने केला आहे. प्रतिमासृष्टीचे वेगळेपणही लक्षात घेण्याजोगे आहे. 'मुक्या जखमांच्या पराभूत भळभळत्या वेदना', 'पिसाळलेली वादळे', 'विवस्त्र दुःख', 'ओसाड भविष्य', 'शतकांची दुःखयात्रा', 'महाडचे झळाळते पाणी', 'प्रज्ञावंत निशाणी' इ. अनेक प्रतिमांचे केलेले उपयोजन अर्थसमृद्धी करण्यास साह्यकारी ठरले आहे. ही कविता प्रतिमांकित अभिव्यक्तीतून वेदनेचा प्रत्यय देते. भूतकाळापासून समकाळापर्यंतच्या वेदनेचा प्रवाहीपणा या अभिव्यक्तीतून प्रत्ययाला येतो. उदा.

आयुष्यभर अंधार जगणारे। प्रकाशाचा कांचनमृग न पाहिलेले
जीवनमरणाच्या अर्थहीन झोळीतून । फरफटत नेतात आयुष्याचे निर्थक ओझे
प्राचीन जखमांचा संगम होतो। अर्वाचीन वेदनाच्या जळत्या बिंदूशी

अंधार ही प्रतिमा दलित कवितेत वारंवार येताना दिसते. अंधाराच्या अधिक्यातून उपेक्षितांच्या जगाचा काळोखी विराटपणा, अथांगता आणि सर्वव्यापित्व स्पष्ट होते. प्रकाशाचा कणही जेथे दृष्टीस पडत नाही तेथे 'प्रकाशाचा कांचनमृग' ही सोनेरी प्रकाशाची उपलब्धी अशक्यप्राय बाब ठरते. अशा अभावाच्या पार्श्वभूमीवर जीवनमरणाची अर्थहीन झोळी, आयुष्याचे निर्थक ओझे, प्राचीन जखमांचा संगम या सर्व प्रतिमासंघटनातून जीवनाची अर्थहीनता, निरर्थकता, वेदना आणि दाहकता प्रत्ययाला येते, अंधार जगणारे जग अर्वाचीनतेशी संबंधित असले तरी या जगाच्या दुःखाचा आरंभ प्राचीनतेशी आहे. दुःखाचा प्रवास प्राचीन ते अर्वाचीन, भूतकाळ ते समकाळ असा प्रवाहित झाला आहे. या दोन्ही काळात दुःख हे जगण्याच्या केंद्रस्थानी आहे. अंधाऱ्या जगाला दुःखण्याची पाठ सुटत नाही म्हणून जगणे सार्थकी लागले नाही अशा अनुभूतीसह समष्टीच्या वेदनेची प्रतिमा साकार झाली. आणखी एक विशेष या कवितेचा सांगता येईल तो म्हणजे स्त्रीजीवनाशी निगडीत संकल्पना, संदर्भ विचारप्रणालीशी जोडून प्रकट होतात त्यामुळे एका नव्याच अर्थाची प्रतिती घडविली जाते. उदा.

असे कसे हे डोहाळे जगावेगळे
काय हवसं झालंय या जिवांकुराला...
एकदमच तिला महाडच्या पेटत्या पाण्याची अनिवार तहान लागली
पुणे कराराने तळमळून उठली, तिच्या मनात झटकन वीज लकाकली
ती हरवून गेली, धुंदावून गेली
सूर्यनक्षी रुजत होती, डोहाळे तेजात भिजत होते.

हे अनोखे अनुभवविश्व आहे. इथे गर्भवतीचे संदर्भ गळून पडतात, गर्भवतीच्या रूपाला नवेच अर्थबंध लगडतात, नव्याच अर्थाचा स्वर प्राप्त होतो. तिला लागलेले वेध नवजात बालकाच्या जन्माचे नसून नवजात व्यवस्था जन्माला येण्याचे आहेत. समाताधिष्ठीत समाजरचना जन्माला यावी अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करणारी जाणीव येथे साक्षात झाली आहे. ही जाणीव डोहाळ्याला वेगळ्या रूपात साकार करून सामाजिक भानाचा प्रत्यय आणून देते. नवसृजनाच्या आगमनाच्या प्रवासात अडथळे निर्माण होणे, डोहाळे कडक होत जाणे या घटनेतून स्त्री जीवनाच्या जगण्याला, तिच्या व्यक्तिमत्त्वाला एक नवा अर्थ प्राप्त होत असतो. कारण नव्या निर्मितीचे आश्वासन मिळालेले असते. या अनोख्या अनुभवाला सामोरे जाताना वेदनेसह काया मोहरून जात असते. स्त्रीसुलभ भावनांचा आत्मविभोर होऊन मन थिरकवणारा, अनोखे सुख देणारा हा अनुभव असतो. परंतु या अनुभूतीला सामाजिकतेशी जोडून, संघर्षशील विचारप्रणालीशी जोडून एका नव्या अर्थाची प्रतिती ही कविता घडविते आणि कवितेला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त करून देते. त्यामुळे प्रकाशगर्भ ओढीने गतिमान होऊ पाहणारी, संघर्षाच्या मैदानात अंधारभेद करायला निघालेली कविता असे रूप हिरा बनसोडे यांच्या कवितेला प्राप्त झाले.

दलित कवितेच्या प्रांतात एका वेगळ्या अनुभूतीचे विश्व बनसोडे यांच्या कवितेने साकार केले असून त्यांच्या कवितेने स्वत:चे वेगळेपणही अबाधित राखले आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. स्त्रीजन्माच्या दु:खाची कहाणी सांगणाऱ्या या आशयसमृद्ध कवितेने विविधांगी अभिव्यक्ती केली आहे. आपल्या कवितेने 'तलवार होऊन माजलेली बिभत्स मस्तके उडविली पाहिजेत' अशा निर्धाराने ही अभिव्यक्ती झाली आहे. पौराणिक काळापासूनचे स्त्रीगुलामीचे संदर्भ अधोरेखित करीत 'स्त्रीजन्म म्हणजे एक जुलूम आहे' असा निष्कर्ष मांडला आहे. पुरुषी निर्दयी व निगरगट्टपणावर भाष्य केले आहे. बेगडी संस्कृतीवर टिकास्त्र सोडले आहे. देव, धर्म आणि जातीच्या दंशाने पुरते घायाळ झालेल्या समाजमनाचे मनोगतच या कवितेने व्यक्त केले आहे. त्याच बरोबर अभावग्रस्त जगण्याचा कार्यकारणभाव शोधून त्यावरचा विद्रोही उपायही सांगीतला आहे.

✸ प्रल्हाद चेंदवणकर (जन्म १५ जुलै १९३७, मृत्यू १६ जुलै २००६)

ऑर्डर ऑर्डर (१९८४) हा चेंदवणकरांचा कवितासंग्रह. 'ऑर्डर ऑर्डर' ही परिभाषा न्यायालयातील आहे. नेमकेपणाने सत्य सांगण्यासाठी, गोंधळ घालणाऱ्यांना शांत राहण्यासाठी दिलेली ही समज असते. आरोपी आणि फिर्यादी या दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेऊन, न्यायदानाचा निर्णय घेणे सुलभ व्हावे अशी त्यामागची भावना असते. चेंदवणकरांची कविता अन्यायग्रस्तांच्या वतीने सत्य तेच मांडण्याचा प्रयत्न करते. हे सत्य एवढे विदारक असते की काळ्या डगल्यावाल्याने आचंबित होऊन केवळ बघत राहावे. 'ऑर्डर ऑर्डर'मधील कवितेने पांढरपेशांचे जग आणि सर्वसामान्यांचे जग यांच्यातील तफावतीचा लेखाजोखा मांडला आहे. या कवितेचे उपरोधाचे अंग मोठे बळकट आहे. औपरोधिक अभिव्यक्तीतून कावेबाज प्रवृत्तीवर आसूड ओढण्याचे काम या कवितेने केले आहे. ज्यांचेवर आसूड ओढले आहेत त्यात प्रामुख्याने स्वार्थांध, संधीसाधू, राजकारणी, भोगवादी या सर्वांचा समावेश आहे. दलित साहित्याचा दु:स्वास करणाऱ्या प्रवृत्तीकडेही या कवितेने लक्ष वेधले आहे. तसेच संस्कृतीच्या मिरासदारांना चांगलेच फटकारले आहे. उदा.

बगळे कधी कधी
अर्ध्या चड्ड्या आणि दंडुके घेऊन रस्त्यातून फिरताना दिसतात
आणखी दहा हजार वर्षे आपलीच संस्कृती राहावी म्हणून
आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे आणि
पाठ्यपुस्तक मंडळावर षड्डू ठोकून बसतात

सभ्यपणाच्या बुरख्याआड लपलेल्या कावेबाज आणि चाणाक्ष प्रवृत्तीची लक्तरे काढण्याचे काम या कवितेने केले आहे. या कवितेचा दुसरा एक विशेष म्हणजे उसवलेल्या आयुष्याला धिराचे टाके घालणाऱ्या कामगार, कष्टकरी, स्त्रिया यांचे जगण्याचे वास्तव चित्रित केले आहे. दलिताना माणूस म्हणून नाकारणाऱ्या गतकालीन आणि समकालीन शोषक संस्कृतीचा दांभिक स्वभाव निर्देशित केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात दलितांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती

साधण्याचा प्रयत्न केला ही बाब समकालीन संस्कृतीच्या तथाकथीत मिरासदारांना मानवली नाही. त्यांची द्वेषमूलक प्रवृत्ती यात्किंचितही कमी झाली नाही.अधिकाधिक बळावत गेली. नजरेतील विखार ओसरला नाही. जातीय प्रवृत्ती अधिकाधिक बळावत गेली. असा हा स्वत:ला संस्कृतीरक्षक समजणारांचा मानवद्रोही चेहरा या कवितेने उजागर केला आहे. अंतर्मुख करणाऱ्या या कवितेने लोकशाही मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या प्रवृत्तीवर प्रचंड आघात केले आहे. संसाराच्या भारुडातून सर्वसामान्यांच्या सांसारीक जगातील अभावग्रस्त स्थितीगतीचे भेदक चित्र रेखाटले आहे. स्त्रियांवरील अन्याय अत्याचारामुळे पेटून उठणारी विद्रोही जाणीव व्यक्त केली आहे. परमेश्वरासारख्या भोंगळ कल्पनांना या कवितेने दिलेला नकार पाहण्यासारखा आहे. उदा.

परमिसर!!!
कुठं दडलाया त्यो परमिसर
त्याची किरडी आवळली, त्याला मरिआइनं खाल्ला
आक्ख्या पिरतिमीचा ल्योड त्याच्या तोंडात वतला...

परमेश्वराला नाकारणारी ही जाणीव पोटतिडकीतून आविष्कृत झाली आहे. अख्ख्या पृथ्वीचा 'ल्योड' परमेश्वराच्या तोंडात ओतण्यापर्यंत मजल मारणारी, आपादमस्तक विखार भरलेली ही तीव्रतर अभिव्यक्ती आहे. एक वेगळी भाषिक त-हा येथे पाहावयास मिळते. शेवटी चेंदवणकरांची कविता एका प्रचंड आशावादावर स्थिरावता दिसते. उदा.

कुणी सांगावं, माझी ही धगधगणारी कविता
उद्या कदाचित अस्तित्वात नसेल
जखमाळलेला प्रत्येक शब्द बोधिवृक्षाच्या पानापानावर
शांतपणे पहुडलेला असेल....

बुद्धाच्या शांतीप्रिय तत्त्वाच्या दिशेनेच जीवनाचा मार्ग दिसेल असा विश्वास या कवितेला वाटतो. थोडक्यात, अन्यायग्रस्तांचे प्रतिनिधित्व करणारी ही कविता असून तिने औपराधिक अभिव्यक्तीतून कावेबाज प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडले आहे. कष्टकरी, कामगार, स्त्रिया यांच्या जगण्याचे विदारक वास्तव स्पष्ट केले आहे. वाचकांना अंतर्मुख करणाऱ्या या कवितेने सर्वसामान्यांच्या अभावग्रस्त स्थितीगतीचे चित्र रेखाटले आहे. पारंपरिक संकल्पनांना प्रखर नकार दिला आहे. अभिव्यक्तीची एकवेगळी भाषिक त-हा आविष्कृत केली आहे. बुद्धातत्त्वाच्या दिशेनेच जीवनाचा मार्ग दिसेल असा गाढ विश्वास व्यक्त केला आहे.

या दशकात काही कवींचे तीन तीन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यात **नीलकांत चव्हाण** यांचा उल्लेख करावा लागेल. **युद्ध** (१९८५), **वळ** (१९८६), **लाव्हा** (१९८७) असे दरवर्षी एक याप्रमाणे लागोपाठ तीन संग्रह प्रसिद्ध झाले. 'युद्ध'मधील कवितेत झाड या प्रतिमेचे अधिक्य पाहावयास मिळते. झाडाचे गुणधर्म मानवी तनामनात भिनत जावे असे कवीला वाटते. सावली, फुल, विचार, वस्त्र ह्या सर्व गोष्टी माणसाने झाडाकडून घ्याव्यात आणि माणूस झाड व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. दांभिकता, भ्रष्टाचार, कपटीपणा, स्वार्थांध प्रवृत्ती इत्यादीवर आघात करण्याचे कार्य या कवितेने पार पाडले आहे. अशा प्रवृत्तीचा निर्देश ऋतू प्रतिमेतून झाला आहे.

येथले ऋतू मोठे चालबाज
येथले ऋतू मोठे कावेबाज
कुठेही स्थान मिळाले पाहिजे म्हणून
दुखऱ्या मनात प्रक्षोभ पेरून मोर्चे काढतात... पुढारी बनतात..
आम्हीच तुमचे उद्धारकर्ते म्हणून बोलत सुटतात...

आपमतलबी पुढाऱ्यांचा चालबाजपणा आणि कावेबाजपणा या विषयीचे संसूचन झालेले येथे पाहावयास मिळते.

चळवळीच्या पर्यावरणात कातडीबचावूपणा करीत आपले अस्तित्व जोपासणाऱ्या प्रवृत्तीवरचे भाष्य केले आहे. तसेच समाजसेवेच्या नावाखाली भ्रष्टाचार करणारांचे भ्रष्ट रूपही चित्रित करताना कवीने स्वत:च्या अस्तित्वाचे छळछावण्यांनी अपहरण केल्याचे स्पष्ट केले आहे. 'काळोख्या रात्रीतून उगवताना ओठाशी हलाहल आहे' अशा स्थितीचे दर्शन घडविले आहे.

तिरस्कारकृत प्रस्तावना माझ्या आयुष्याला जोडून
एकदाचे ते विमुक्त झाले....
परंपरावाद्यानी भंपक आदर्शांचा सहारा घेऊन
काळोखदरीत ढकलून दिले, तेव्हापासून शोधतोय तिरस्कारकृत प्रस्तावना
जाळणारा महान सूर्य.

अशी सूर्याच्या शोधात निघालेली ही कविता आहे. हा शोध लागल्याशिवाय जीवनाला अर्थ प्राप्त होणार नाही याचे भान बाळगले आहे. कारण, 'जेथे आयुष्यच काळवंडले तेथे हिरव्या पानाचे सुक्त कसे गाऊ' असे आयुष्यापुढे प्रश्नचिन्ह उभे आहे. वर्तमान असा आहे आणि इतिहास विषण्ण करणारा आहे. या इतिहासाचे अवलोकन करताना कवीमन तेहतीस कोटी देवांचे एका वेगळ्या भाषेत वाभाडे काढताना दिसते,

साल्या ह्या देवांची लायकी... कैशी
कुत्र्याने एक टांग उंच करून मुतून जावी तैशी

यावरून कवीची बांधिलकी कोणत्या जगाशी आहे हे स्पष्ट होते. आपल्या शब्दाने कोणते भान राखावे याची जाणीव कवीमनाला आहे.

वळ या कवितासंग्रहात कवीने आत्मचरित्र कथन केले आहे. जीवनाचा प्रवास सांगीतला आहे. आईचे कष्ट, तिला झालेला सासुरवास, आजीने सांगीतलेल्या दु:खभोगाच्या कथा यासह आपण कष्टकरी आईच्या बळावर वारापाणी पिऊन जगलो असल्याची कबुली दिली आहे.

माझे बालपण मला गडद अंधारात नेते
माय मरताना पाणी न पाजणारा बाप दिसतो

या घटनेचीही परखड नोंद कवीने घेतली आहे.

लाव्हा या संग्रहात प्रज्ञासूर्य या कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महती वर्णन केली आहे. 'तुझ्या तेजाने वर्णव्यवस्थेचा काळा सूर्य पळू लागला.' 'माणसाच्या काळ्या विषारी भूतकाळाला डंख मारलास', 'सूर्य प्यालेली तुझी प्रज्ञा' अशाप्रकारे बाबासाहेब आंबेडकरांचे कर्तृत्व स्पष्ट केले आहे. आत्मटिकेला सामोरे जाताना, बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतरही समाजात जुनी जळमटं शिल्लक राहिली, मनोवृत्ती बदलली नाही याचा समाचार घेतला आहे. सामाजिक जीवन मूल्य-हासाच्या काठावर उभे असल्याचे वास्तव चित्रित केले आहे. उदा.

कलंडून जात नाही विषम ज्ञानाचा महासागर
पेटत नाही भ्रष्ट पाणी मूळासकट
विसाव्या शतकातले विज्ञान सतीच्या गावात जात नाही
फुलारत नाही पुरोगामी झाड
संस्कृतीच्या पालापाचोळ्यानं सडला आहे आड

विषमता, भ्रष्टपणा, पारंपरिकता, अंधश्रद्धा या सर्वांनीच सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण नासवून टाकले आहे. असे भेदक वास्तव या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहे.

✸ राम बसाखेत्रे (जन्म १० ऑगस्ट १९२९)

सडक लाल मुरुमाची हा राम बसाखेत्रे यांचा कवितासंग्रह १९८७ साली प्रसिद्ध झाला. शोषित वर्गाचे दु:ख

हा या कवितेचा केंद्रवर्ती विषय आहे. स्वत: कवी हे कामगार आयुक्त या पदावर कार्यरत होते. त्यामुळे कामगारांच्या दु:खाची त्यांना चांगलीच जाण आहे. कवीने आपल्या मनोगतात म्हटले आहे, ''कामगारांचे प्रश्न सोडविण्याच्या निमित्ताने मराठवाड्यातील अनेक शहरांना, गावांना भेटी देण्याचा योग आला त्यावेळी तेथील खेड्यातील दलितांचे जीवन, श्रमिकांची स्थिती, त्यांचे होणारे शोषण आणि त्यांची अगतिकता मला जवळून पाहता आली.''[१०] अशा वर्गाबद्दल कळवळ्याची भावना 'सडक लाल मुरुमाची'मधून व्यक्त झाली आहे. दलित आदिवासींची दु:खे, त्यांचे अपमानित जगणे, गटई कामगार, वेठबिगार, रस्त्यावर बेघर निराधार जीवन जगणारे, कामगार आणि शेतमजुरांचे होत असलेले शोषण अशा समाजजीवनाचा वेध घेताना या जगाच्या व्यथावेदनांना मुखरीत करण्याचा प्रयत्न बसाखेत्रे यांच्या कवितेने केला आहे. आत्मकेंद्री वृत्ती, समाजाकडे पाठ फिरविणारी प्रवृत्ती, टाळीबाज पुढारी या साऱ्यांचा तीक्ष्ण उपहास या कवितेने केला आहे. किंबहुना औपराधिकता हा या कवितेचा महत्त्वाचा विशेष ठरला आहे. टाळीबाज पुढाऱ्याबददल खालीलप्रमाणे उपहास पाहावयास मिळतो. उदा.

१. शब्दाशब्दावर अलंकार चढवून
मोर्चे रंगत नसतात दोस्तहो।
तिकडे झोपडीत चूली पेटत नाहीत
आणि इकडे सूर्याला कोंडून चंद्राला आगी लावता

२. आमच्या टोळ्यातील पिंपळपारावर दररोज
घुबडांच्या भाषणाला कावळेच फक्त श्रोते असतात.
बगळ्यांना वेळ कुठे आहे
ते तर आश्रमात गेलेले असतात सिद्धिप्राप्तीसाठी

टाळीबाज पुढाऱ्यांच्या शाब्दिक भंपकपणावरचे हे बोचरे औपरोधिक भाष्य आहे. मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ही नेतेमंडळी प्रयत्नशील राहण्याऐवजी व्यासपीठावर केवळ भाषिक फुलोरा फुलवित असतात. सामाजिक अंतर्विरोध समजून घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही. समतेच्या वल्गना जेव्हा वांझोट्या होतात तेव्हा कोरडा धिक्कार नपुंसक होतो आणि निषेधाचा मोर्चा घोषणा ओकीत समुद्रात झोपी जातो. असेही निरीक्षण नोंदविले आहे. श्रमिकांच्या जगाची वेदना मुखरीत करताना, ''जागोजागी श्रमाच्या वेदना झाडाझुडपात कुजबुजताना दिसतात असहय हुंकार'' असे वास्तव मांडले आहे. दलित जगाच्या वेदनांचा आक्रोश मांडला आहे. तमाशातील कलावती, कलावंत. तसेच वेठबिगाऱ्यांचे दु:खही पाहावयास मिळते. महारोग्याचे चित्र खालीलप्रमाणे रेखाटले आहे,

रस्त्याच्या कडेला आपल्याच रक्ताळलेल्या
जखमा बांधीत थुट्या हाताने आपल्याच
रक्ताचे अश्रू पुशीत व्याकुळतो आहे
विद्रुप चेहऱ्याचा अस्वस्थ हुंकार

अशाप्रकारे बेवारस जगाचे व्याकुळ करणारे दु:खद चित्र या कवितेने वाचकांपुढे ठेवले आहे. त्याचप्रमाणे सामाजिक बदलाचा प्रक्षोभक आविष्कार केला आहे.

गिधाडांनो शांतीदूत बनून निषेध करू नका
आपल्या सभेत जखमी डोळ्यांवर चोंच ठेवून
तिसरा डोळा आता उघडला आहे तुम्हास जाळण्यासाठी

'तिसरा डोळा' ही तशी पारंपरिक प्रतिमा आहे. मात्र शिक्षणाचा अर्थ या प्रतिमेशी जोडल्या गेला आहे. त्यामुळे शिक्षणामुळे सामाजिक जीवनात झालेल्या स्थित्यंतराचे दर्शन या कवितेने घडविले असून, अन्याय अत्याचार करणाऱ्या लचकेतोड प्रवृत्तीला गाडाचये असेल तर त्यासाठी शिक्षण हेच एकमेव साधन आहे याची जाणीव या कवितेने करून दिली आहे.

वामन निंबाळकर यांचा **महायुद्ध** हा दुसरा कवितासंग्रह १९८७ साली प्रसिद्ध झाला. या संग्रहातील कविता सखोल सामाजिक जाणिवेतून साकार झाल्या आहेत. आंबेडकरी सामाजिक क्रांतीतत्त्वाची स्फुल्लींगे कवितेतून पेरलेली आहेत. सावित्री ज्योतिबा फुले, नेल्सन मंडेला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी महान चरित्रे या कवितेने शब्दबद्ध केली आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञान आणि विचारप्रणालीशी इमान राखण्याचा संकल्प केला आहे.

आता मी उभारीन क्षितीजावर
मानवतेची इंद्रधनुषी कमान
मला माझ्या संकल्पाचे आहे भान

असे भान प्रकट करून आपल्या संकल्पाशी इमान राखण्याची प्रतिज्ञा कवीमनाने केली आहे. शब्द आणि लेखणी या विषयी आपली भूमिका मांडली आहे.

गाणार मी तुमच्याचसाठी
माझे शब्द तुफानात पेटलेल्या मशाली
त्यातच प्रकाशमान करीन तुमच्या ख्याली खुशाली....
अस्तगंत झालेल्या त्या सूर्याच्या किरणाची
माझ्या लेखणीत आहे साठवण

दलित शोषिताना उद्देशून सांगितलेले हे कवितांचे उर्जायन आहे असे कवीस वाटते, कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या सूर्यकिरणाची, त्यांच्या तत्त्वविचारांची साठवण आपल्या लेखणीत असल्याचे कवीने सार्थ अभिमानाने सांगीतले आहे. म्हणूनच कवितेने दु:खितांच्या दुनियेशी आपली नाळ जोडली आहे. माणूसपणाला आकार प्राप्त व्हावा यासाठी एका वादळाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले आहे. दैनिक जीवनातील अन्याय अत्याचारांची भीषणता पाहून उद्विग्न झालेल्या मनस्थितीचे दर्शनही घडविले आहे. प्रत्यक्षातील जगण्याचा प्रवास आणि काल्पनिक साहित्यातील प्रसंगचित्रण यातील तफावत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तवाच्या संघर्षभूमीवरील कथाचित्रण केले आहे. शोषकाची प्रतिमा खालीलप्रमाणे सिद्ध केली आहे,

आमच्या सर्वांगाला चिकटल्या आहेत
जळवा, रक्ताचे प्राशन त्यांचे न संपणारे

स्वानुभवातून स्वकीयांशी एकरूप होणारी करुणामयी भाषा कवितेत अवतरली आहे. उदा.

आसवांमध्ये कोरडे आयुष्य कुस्करून खाताना
आतड्याची भाषा समजत गेली.

कवितासंग्रहाच्या शीर्षकाच्या अनुषगांने विचार केल्यास हे महायुद्ध सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक स्वरूपाचे आहे. महायुद्धासाठी जी रणभूमी तयार आहे तिचे स्वरूपही कवितेतून स्पष्ट झाले आहे. दरोडेखोरांची जंगले, भुतांचे मोहमयी बाजार, देवमंदिरे, धर्माचा आसरा घेणारे, देवदेव्हारे इत्यादी सर्व गोष्टींची सज्जता या युद्धभूमीवर आहे. अशा युद्धभूमीवर एका युद्धाचा आरंभ करावयाचाआहे. तेव्हा,

नपुंसक आणि नकट्या शांततेचे
नाही गाणार मी अभद्र गाणे
मी नाही विझू देणार माझे पेटलेले रक्त

अशी प्रतिज्ञा कवीमनाने केली आहे. कारण प्रकाश बंदिस्त झाल्यामुळे सर्वत्र अंधार पसरला आहे. माणसाचे भाव घसरले आहेत, ती विराण भयाण झालेली आहेत, रोजची मरणे पाहून आसवे आटून गेली आहेत, रात्री मेल्या आहेत, दिवस पराभूत झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर सरसेनापतीचा आदेश शिरसावंद्य मानण्याशिवाय पर्याय नाही. कारण ज्यांचे आयुष्यच महायुद्ध झाले असा हा सरसेनापती आहे,

तू असा सरसेनापती होता की
साऱ्याच आघाड्यावर मोर्चे बांधले
तुझ्या वाणी, लेखणी आणि करणीच्या तोफगोळ्यांनी
शत्रुंचे सारेच किल्ले जमीनदोस्त केले
हजारो वर्षे पराजित झालेल्यांना तू
साऱ्याच आघाड्यांवर दिग्विजयी केले
शेवटी तुझे आयुष्यच महायुद्ध झाले

हा सरसेनापती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांचा आदेश स्वीकारल्याशिवाय इथल्या युद्धभूमीवर यशस्वी होता येणार नाही. कारण बाबासाहेबांच्या ज्ञानशक्तीने समाजमनात सुरुंगासारखे पेरलेले विचार आणि त्यांनी प्रसवलेले समग्र लेखन आणि विचारांचे भांडार या साधनांच्या आधारेच हजारो वर्षांच्या पराजिताना दिग्विजयी करण्याचे ऐतिहासिक कार्य केले आहे. युद्ध हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाला होता. त्यांचे आयुष्यच एक महायुद्ध झाले. ज्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि स्वाभिमानाच्या लढाईत पराभूतांनाही विजयी करून दाखविले अशा सरसेनापतीची प्रेरणा ही वर्तमानाच्या लढाईत विजय मिळवून देणार आहे असा सार्थ विश्वास येथे प्रकट झाला आहे. या युद्धासाठी कूच करताना अनेक अडथळेही पार करावे लागणार आहेत. 'या रस्त्यांना कापणं तसं कठीणच' कारण रस्ते जसे राजकारणी, समाजकारणी असतात त्याचप्रमाणे कारणाशिवाय पायांना रक्तबंबाळ करणारेही असतात. निटपणे चाललेल्या प्रवासात अडथळे उभारणाऱ्या प्रवृत्तीचा वेध घेतानाच प्रवासाची दिशा, सामर्थ्य आणि यशस्वीता यांचा एक ताळेबंदही या कवितेने मांडला आहे. रक्तात पेटविलेल्या मशालीसह न थकता प्रवास करण्याची अपरिहार्यता व्यक्त केली आहे. सूर्यकुलातील मुले या बाबतीत आघाडीवर राहतील असा विश्वासही व्यक्त केला आहे.

सूर्यकुलातील ही मुले डोळ्यातील बुबुळांना
सूर्यगोल बांधून घेतील
पायाला प्रकाशवेगाचे यंत्रयान लावतील
तेव्हा त्यांच्या जिभेला येईल पोलादीपणा

अशी या मुलांकडून कर्तृत्व गाजवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. ही मुले आपल्या कर्तृत्वाचा दरवळ सर्वत्र पसवरतील याबददल कवीमनाला शंका वाटत नाही.

✹ भीमसेन देठे (जन्म १ जून १९४६- ६ मे २०१७)

गावपातळीवर सवर्णांकडून, विशेषत: ब्राह्मणाकडून कसा छळवाद मांडण्यात आला होता याची करुण कहाणी भीमसेन देठे यांनी **होरपळ**मधून (१९८९) सांगीतली आहे. अवहेलनेचे जगणे त्यांच्या कवितेत साक्षात झाले आहे. बालपणातील अस्पृश्यतेचे दुखणे सांगताना ते म्हणतात,

सद्या पाटील सूर्यप्रकाशात चिडवीत होता
महारवाड्याजवळ बसू नकोस
खि खि कुलकर्णी मास्तर... पुन्हा पुन्हा बजावत होते
शाळेमध्ये येऊ नकोस...

अपमानित जिन्यांचे दु:खदायी वर्तमान पाहून त्यांचेकडे दोन उपाय होते एकतर कधी या दु:खसागरात बुडून जायचे किंवा 'हाताच्या मुठी वळू लागून रक्त लाल होते.' म्हणजे त्या बालवयातही विद्रोही कृतिशीलता ठासून भरलेली होती असा प्रत्यय येतो. दारिद्र्यात खितपत पडलेल्या जीवनाचे आणि स्त्री अत्याचाराचे भीषण दर्शनही कवितेतून घडविले आहे.

चंद्रा तू ठरलीस या विसाव्या शतकातील
वासनाकांडाची भोगवस्तू

गवई बंधूच्या डोळ्यातील वेदना / किलवेनमाणीतील भयंकर रात्र
ब्राह्मणगावातील एक नागवी रात्र
नारनवरेचा तडकणारा प्राण
भागवत जाधवच्या मेंदूचा चेंदामेंदा

दलित स्त्रीवरील अत्याचारांचे वास्तव स्पष्ट करताना एकूणच दलित अत्याचाराचे चित्र ही कविता अधोरेखित करते आणि भीषणतेचा अनुभव देते. स्वातंत्र्यातही पारंतंत्र्याचेच जीणे वाट्याला आले. त्यावरचे उपरोधिक भाष्य देठ्यांची कविता करते. कारण दलिताना स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे स्वातंत्र्यही सवर्णांनी हिसकावून घेतले, 'हे सागरा आमच्या स्वातंत्र्याला कधी घेऊन येशील रे'! असा प्रश्न त्यांचेसमोर उभा आहे. 'आरशासारखी लख्ख झाडलोट करून गाव स्वच्छ करणाऱ्या आईला झगमग चांदण्यात न्हाताच आलं नाही' अशी खंतही व्यक्त करण्यात आली आहे. आपल्या प्रियेने मुलायम स्वप्नाजवळ घुटमळू नये असा इशारा दिला आहे. त्याचबरोबर आंबेडकरोत्तर काळातील नेतृत्वहीन समाजाबरोबरच आंबेडकरी विचारांची प्रतारणा करणाऱ्या समाजमनाचे चित्रही रेखाटले आहे. उदा.

पाठ फिरवलीत तुम्ही त्या भडकणाऱ्या ज्वालांकडे
जवळ असलेल्या समुद्रात फेकून दिल्यात आणाभाका..
आपल्याला फोडायचं होतं डोंगराला
आपण आपल्यालाच फोडत बसलो.

नेतृत्वाहीनता, प्रतारणा करणारी दु:खद जाणीव, अंतर्विरोधाचे वास्तव मांडून ही कविता अंतर्मुख होण्यास भाग पाडते.

त्यांच्या सृजनशील मनास
विसर पडतो रक्त ओकून मरणाऱ्या बापाचा
त्याच्या ताठ मिशांचा
त्याने बुटाच्या ठोकरीने उडवलेल्या मुलायम धुळीचा
हाकारलेल्या आर्त हाकांचा

जबाबदारीचे भान विसरलेल्या 'प्रयोग करणाऱ्या कुत्र्यांना' इशारा देण्याचे काम ही कविता करते. लाचार आणि लांगुलचालन करणाऱ्या प्रवृत्तीला नकार देऊन आपला निषेध प्रकट करते. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पातळीवर होरपळलेल्या समाजमनाचे मनोगतच 'होरपळ'मधील कवितेने व्यक्त केले आहे.

तुम्ही आम्ही घाम गाळणारे । पावाच्या तुकड्यासाठी भंणग
उद्याच्या काळजीने चिरणारे । मरणाला डोळ्यासमोर ठेवून
हातापायाच्या बेड्यांनी वाकलेले । गळ्यातील कर्जाच्या पाशाने खचलेले

अशाप्रकारे ही कविता समूहाच्या दु:खाला मुखरीत करते. गरीब कष्टकऱ्यांच्या भणंग जीवनाचे, जगण्याच्या स्थितीचे वास्तवदर्शी चित्र या देशातील गरीबीचा आलेख चितारणारे आहे.

भाऊ पंचभाई यांचा **हुंकार वादळाचे** (१९८९) हा कवितासंग्रह. त्यांच्या कवितेचा स्वर देवालयातील दगडांना छिन्नाविछिन्न करीत घणांच्या तालावर आणि पुरोहितांच्या छाताडावर गीत गाणारा अशा स्वरूपाचा आहे. गेय स्वरूपाच्या त्यांच्या कवितेने गझलांचाही आविष्कार केला आहे. त्या गझलामधूनही सामाजिक दु:खाना वाट मोकळी करून दिली आहे.

घायाळ गावचे पक्षी आक्रोश कराया आले
का बरे अद्याप माझा गाव हा जखमाळला!

सामाजिक जीवनाच्या संदर्भात असे घायाळ करणारे प्रश्न या कवितेने उपस्थित केले आहेत. दुसरीकडे

सामाजिक अन्याय अत्याचारानी कहर केला. स्वतंत्र देशात असे घडते तेव्हा मातृभूमीच्या संदर्भातही अनेक प्रश्न उभे राहतात. जातियता आसमंतभर भारून उरणारी, जातियतेचे साप पदोपदी दंश करतात. अशावेळी चळवळी खंडीत होतात आणि जगण्याचे प्रश्न अधिकच जटील बनतात

कुठे जन्मभूमी कुठे देश माझा?
इथ बेलछी पेटते हरघडीला
कुणी मोडला हा कणा चळवळीचा?

असे जीवघेणे प्रश्न या कवितेने वाचकांपुढे ठेवले आहेत. वाताहत झालेल्या चळवळीमुळे सामाजिक जीवनाची कशी वासताल लागली आहे, अशा दु:खी पर्यावरणाचे अतिशय पोटतिडकीने वास्तव चित्र रेखाटणे हेच या कवितेचे उद्दिष्ट आहे. केवळ दु:ख्र चितारून ही कविता थांबत नाही तर माणसाला ती संघर्षशील बनविते, त्याच्या मनात संघर्षाच्या सिद्धतेची ठिणगी टाकते. उदा.

आता कधी विझू नका / मशाल व्हा क्षणोक्षणी
प्रकाश चोरला जिने / ती पेटवावी छावणी

प्रकाश चोरणाऱ्या छावण्यांना पेटवून हा होईना उजेड केला पाहिजे असाच या कवितेचा निर्धार आहे. मानवी जीवन व्यर्थ आहे असे या कवितेला मुळीच वाटत नाही. म्हणून जगण्याची प्रचंड आसक्ती या कवितेतून व्यक्त झाली आहे.

आम्ही लढू नव्याने मरणास झुंज देऊ
झेलून वार सारे आम्ही जिवंत राहू

अशी जगण्याची आसक्ती प्रकट होते. मात्र जिवंत राहण्यासाठी संघर्षाशिवाय, मरणाशी झुंज देण्याशिवाय पर्याय नसल्याचेही स्पष्ट केले आहे. एकूण दलित कवितेच्या प्रवासात आपला आगळा वेगळा सूर आवळणारी कविता म्हणून ती लक्षवेधी ठरली आहे लोकलय आणि गेयतेमुळे तिच्या रूपाचा आगळावेगळा आविष्कार झाला आहे. सर्ववंचितांच्या दु:खाला शब्द देतानाच त्यांच्यात उद्याच्या जगण्याचे आश्वासन देणारा आशावाद जागविण्याचे कार्य या कवितेने पार पाडले आहे.

अनिल सपकाळ (जन्म १३ डिसेंबर १९६६) यांचा **पांरब्या** (१९८९) हा कवितासंग्रह एक वेगळा आविष्कार घेऊन दाखल झाला. शीर्षकावरून असे प्रत्ययास येते की एका लोंबकळत्या अवस्थेबददल कवीस काही सांगावयाचे आहे. आयुष्याच्या लोंबकळत्या अवस्थेची विविध रूपे या कवितेत साक्षात झाली आहेत. स्वगतासारख्या या कवितेतून विविध भावनांची आंदोलनेही प्रकट झाली आहेत. भुकेने तडफडणारी, विषमतेमुळे अगतिक झालेली माणसे, गावकुसाबाहेर राहणारी माणसे अशा माणसाच्या भावभावनांची आंदोलने आणि त्यांच्या जगण्याचे वास्तव प्रतिकात्मतेने सूचित करण्याचे कार्य या कवितेने केले आहे. उदा.

गावाबाहेरचे वड / लोंबकळणाऱ्या पारंब्या
झडलेली पानं अन् वारुळ / पारंब्या चिखलात रुतलेल्या
मुंग्यांनी भरलेलं खोड / अन शेवाळलेल्या फांद्या
पारंब्या मुडा घालून बसलेल्या

लोंबकळणाऱ्या, चिखलात रुतलेल्या, शेवाळलेल्या आणि मुडा घालून बसलेल्या अशा पारंब्याच्या अवस्थामधून अधांतरी जगणाऱ्या समाजजीवनाच्या स्थितीगतीचे सूचन होते. 'आमावस्येच्या रात्री रडणाऱ्या पारंब्या', 'काळोखाच्या गर्भाला भिडणारा आक्रोश' यातून समाजमनाचा आकांततांडव सूचित होतो. त्याचप्रमाणे भटक्याविमुक्ताचे उघड्यावरचे नागडे संसारही चित्रित होतात. त्यामुळे या कवितेची बांधिलकी ही समूहमनाशी आणि जीवनाशी नाळेसारखी

जोडलेली आहे याचा प्रत्यय येतो. अंधारातील उपऱ्या, मुक्या, रक्त गोठलेल्या अशा स्वरूपाच्या पारंब्यांची रूपे पहिल्यानंतर काळोख्या जगाचे दु:खच त्यातून सूचकतेने मुखरीत होते. एका भेदक जगण्याचे वास्तव पुढीलप्रमाणे व्यक्त होते.

पारंब्या सावलीतून डोकावताना
जमिनीवरील मुर्दाड दगडांना डोळे मारत
प्रदर्शन भरवतात आपल्या स्तनांचं
केव्हाच विकलेली असते लाज बिस्तरवरल्या कापडाला
पोटाच्या आगीसाठी देहाचा बाजार बसवून
कुंटणखाने ढणाढणा जळतात वासनेच्या आगीत

स्त्रीजगण्याची ही अवहेलना हादरवून टाकणारी आहे. पंढांच्या जगात पारंब्याचा गावबसवा धंदा ही परिस्थितीच्या, पोटाच्या आगीच्या दैन्य दास्याच्या स्थितीतून अनिच्छेने उगवलेली अपरिहार्य अवस्था आहे. असे असले तरी वेदनांना झुगारून आक्रोश करणाऱ्या पारंब्या 'माणसाचं गाणं गाणार' असा प्रबळ आशावाद या कवितेने व्यक्त केला आहे.

या दशकात इतरही अनेक कवी कवितालेखन करताना दिसतात उदा. प्रमोद लांडगे, **गलोल** (१९८२), भागवत बनसोडे, **दळणकांडा** (१९८२), अशोक बनसोडे, **माझ्या बापाचा बाप** (१९८३), भगवान ठाकूर, **स्ट्रिट लाईटस्** (१९८३), विजयकुमार गवई, **मग अंधार पेटला** (१९८४), निरंजन पाटील, **आक्रोश** (१९८४), बबन लोंढे, **उद्गार** (१९८५), **बी. रंगराव**, काळोखाच्या कविता (१९८६), **बाबुराव परुळेकर**, अंधारयात्री (१९८७), चांगदेव खैरमोडे, **अमृतनाक आणि इतर कविता** (१९८७), मधुकर सोनावणे, **विस्फोट** (१९८८), वसंत राजस, **प्रेरणा** (१९८८), ल. स. रोकडे, **ओल्या जखमा** (१९८९), जे. जी. सुरवाडे, **आंबुसलेली तार** (१९८९), एफ. सी. मोरे, **हुंकार विद्रोहाचे** (१९८९) असे अनेक कवी आणि त्यांच्या कवितांनी दलित कवितेच्या प्रांतात मोलाची भर घातली आहे.

या पार्श्वभूमीवर **किशोर घोरपडे** (जन्म : ६ डिसेंबर १९४७) यांचा **दलदल** हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला, त्यांची पहिली कविता १९६७ साली मिलिंद मॅगेझिन मधून प्रसिद्ध झाली होती. या अर्थाने हा मिलिंद कॅम्पसने दिलेला कवी आहे असे म्हणता येईल. एका बंदिस्त करून ठेवलेल्या पर्यावरणात, सांस्कृतिक दलदलीत आपण रुतून बसलो आहोत अशा स्थितीबददलचे वास्तव टिपणारी अशी 'दलदल'मधील कविता आहे. माणसामाणसातील नातेसंबंधावर बंधने घालणारी जातव्यवस्था असल्यामुळे आंतरजातीय संबंधातून, सहजीवनातून समता प्रस्थापित करता येईल असे पर्यावरण अस्तित्वात नाही. म्हणून कवीने म्हटले आहे.

ते आपल्या नव्या संस्कारीत बाळाला
मुलॅटो म्हणतील अक्करमाशी म्हणतील हिणवतील
चोची मारून घायाळ करतील
म्हणून मी धास्तावलोय

तिकडे काळ्या माणसाला श्वेतवर्णीय व्यवस्थेने असेच हिणवले होते. इथे वर्ण व्यवस्थेने माणसामाणसात भेद निर्माण केला आहे. आणि कष्टकरी माणसाचे होणारे शोषण थांबायला तयार नाही

सांच्याला लाल तिकिटावर
सही अंगठे घेतले आधुनिक द्रोणाचार्यांने..

ही शोषणाची रीत नवी नाही. काळ बदलला म्हणून शोषण थांबते असे या देशात घडत नाही. पारतंत्र्यात असतानाही धर्ममार्तंडाचे कारनामे सुरूच होते. स्वातंत्र्यातही त्यात काही फरक पडला नाही. समता प्रस्थापित करू पाहणाऱ्या विचार पंरपरेला खल्लास करू पाहणारांचे कारनामे आजही सुरूच आहेत,

आजही तुझे मारेकरी नव्या शस्त्रासह सज्ज आहेत

नव्या पद्धतीने नवेनवे षडयंत्र रचून समतानगरात विखुरलेले

समता या मूल्यावर टाच आणू पाहणारी आधुनिक काळातील प्रतिगामी मानसिकता आजही दबा धरून बसलेली आहे. एका अर्थाने आधुनिक काळाचे प्रतिगामी मानसच या कवितेने अधोरेखित केले आहे. या दशकातील अगदी शेवटच्या टप्प्यांवर उदयाला आलेले दोन कवी म्हणजे **लोकनाथ यशवंत** आणि **भुजंग मेश्राम** या दोघांनीही दलित कवितेला नवे आयाम प्राप्त करून देण्यासाठी मौलिक स्वरूपाचे योगदान दिले आहे. त्यांची दखल घेतल्याशिवाय या दशकाच्या दलित कवितेचा समारोप करता येणार नाही.

✸ लोकनाथ यशवंत (जन्म १३ मार्च १९५६)

या दशकाच्या शेवटच्या पर्वात लोकनाथ यशवंत यांची कविता दाखल झाली. **आता होऊन जाऊ द्या** (१९८९) या कवितेने प्रचलित दलित कवितेला नवे परिमाण प्राप्त करून दिले. कारण या कवितेने अभिव्यक्तीच्या नव्या वाटा चोखाळल्या आहेत. रचनेच्या दृष्टीने काही नवे प्रयोग केले आहेत. दलित कवितेत साचलेपणा आला आहे. अशी टिकेची झोड उठविणाऱ्यांना लोकनाथच्या कवितेने समर्पक उत्तर दिले आहे. सामाजिक बांधिलकीच्या सर्व शोकांतिका डोळ्यात साठवून वाटचाल करणारी, प्रेम कवितेसारखी वाटणारी त्याची कविता रुढार्थाने प्रेमकविता नव्हे. सामाजिक बांधिलकी स्पष्ट करण्यासाठी, संवाद साधण्यासाठी प्रियेचे रूप निमित्तमात्र या कवितेत डोकावते. या निमित्ताने सामाजिक अभिसरणाच्या नावाखाली कार्यरत असणाऱ्या अनेक मूलतत्त्ववादी प्रवृत्तीचे स्वरूप सूचित करून ब्राह्मणी कावेबाज प्रवृत्तीचे रूप उलगडून दाखविण्याचे कार्य या कवितेने पार पाडले आहे. म्हणून ती संस्कृतीच्या जहरी प्रेमाची कहाणी सांगते. कोणत्या सांस्कृतिक जगाचे नेतृत्व किंवा स्वीकार करावयाचा आहे याची एक निश्चित दृष्टी या कवीकडे आहे. परिवर्तनाच्या लढाऊ जगाचे खच्चीकरण करू पाहणाऱ्या, पुनरुज्जीवनवादी प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडतानाच दोन भिन्न सांस्कृतिक जगातील द्वंद्व साकार करणे हे लोकनाथच्या कवितेचे उद्दिष्ट आहे.

अनादी काळापासून चालत आलेल्या दहशतीचा शोध या कवितेने घेतला आहे. त्यातूनच शोषणाचा इतिहास, वर्णव्यवस्थाक समाजाचे स्वरूप, माणसाला पशुपातळीवर जगायला लागणारी तत्त्वज्ञाने या साऱ्या अमानुष इतिहासाचे सूचन केले आहे. इतिहासाच्या पार्श्वभूमीवर समकालीन जीवनाचा आविष्कार करणे, आत्मशोध घेणे हे तिसऱ्या पिढीच्या दलित कवितेचे वेगळेपण आहे. स्व-जगाअंतर्गत शोध घेणारी जाणीव या पिढीच्या कवितेत आधिकच प्रबळ झालेली दिसते. सूचकता हा लोकनाथच्या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. त्या कवितेतील प्रतिमाही अतिशय सूचक आणि थोडा धक्का लागताच पाऱ्यासारखा हातातून निसटून जाणाऱ्या असतात. 'वाहता वारा' आपली आंदोलनं गावात पोहचवितो. 'आक्रोशाचा भडका' होतो. अशा प्रतिमित अभिव्यक्तीमागे एक मोठा क्रांतिगर्भ मूल्यव्यूह लगडलेला असतो. अर्थाची व्यापकता आणि सूचकता अधोरेखित करणे हे या कवितेचे मोठे सामर्थ्य आहे.

आव्हानाची भाषा ही कविता समर्थपणे पेलताना दिसते. जी शोषकांना आव्हान देते. 'तुमच्या इमारतीच्या पायाचे दगड आमचे आहेत' असे म्हणताना कवीला सर्वहाराबद्दल सूचवायचे असते. एका सांस्कृतिक जगाबददल काही बोलायचे असते. ज्यांना समाजजीवनाच्या तळालाच राहून जगावे लागले. पायाखाली राहावे लागले, वर वर चढणाऱ्या इमारतीच्या पायात ज्यांना गाडल्या गेले अशा वंचित, उपेक्षित जगाबददल 'पाया' ही कविता खूप काही सूचवून जाते. अधोगतीच्या मार्गाने जाणाऱ्या एकाच जगातील दोन प्रवृत्तीचा शोधही लोकनाथची कविता घेते. निर्दयी व्यवस्थेचे बळी ठरणाऱ्या एकाच जगातील दोन प्रवृत्ती, अंतर्विरोधाचे नेमके आकलन मांडले आहे. सर्वंकष विद्रोहाची जाणीव प्रकट करताना अपमानित क्षणाचे सुरुंग होतात. तेव्हा विद्रोहाचा स्फोट अपरिहार्य ठरत असतो.

माझे अपमानित क्षण मी पेरून ठेवले
शहरात जागोजाग
कुठे कधी स्फोट होऊन कोण छिन्न होईल
काही सांगता येत नाही

जिथला हिशेब तिथेच चुकविला पाहिजे
या हिशेबाचा मी आहे

त्वेषयुक्त वायफळ बडबडीनी काही साध्य होणारे नाही म्हणून सर्वंकष विद्रोह पुकारण्याची गरज कवीला वाटते. सहनशीलतेचा अंत झाला म्हणजे विद्रोहाचा जन्म होत असतो. 'होते होते म्हणता म्हणता फारच झाले। लवकरच आमचा दिवस येतो आहे' असे स्पष्ट करून सहनशीलता संपल्याचा निर्देश केला आहे. येणारा काळ आपलाच असल्याची घोषणाही केली आहे. चळवळीच्या नेतृत्वाबददल एक उपरोधिक भाष्य केले आहे. आंबेडकरोत्तर दलित चळवळीच्या वाताहतीची भीषणता या कवितेला विशद करावयाची आहे. कारण चळवळीबद्दलच्या मूल्यांची स्पष्टता धुसर होत गेली असा हा समकाल आहे. या काळात खंबीरता ढासळत गेली, आत्मकेंद्री वृत्ती वाढीस लागून नेतृत्व विकाऊ ठरले आणि नेमक्या आणिबाणीच्या क्षणी नेतृत्वाने पळ काढला.

एक मोर्चा / नायक होऊन आम्ही घेऊन गेलो
आम्ही पुढे मोर्चा मागे / एकाएकी मोर्चाचे संतुलन जाऊ लागले
समोर पोलीसही शस्त्रसज्ज / आम्ही नायक सावध
मोर्चा पुढे आम्ही मागे / अटितटीच्या वेळी मोर्चातून आम्ही पळ काढला
आणि रस्त्यावरील एका छक्क्याने आम्हाला गांडू म्हटले

पलायनवादी वृत्ती, मूल्य हरविलेल्या, निष्ठा ढळलेल्या स्थितीशील समाजाचे चित्रच ही कविता अधोरेखित करते. अशा जगातील पुरुषार्थाला षंढत्वानेही आव्हान द्यावे! असा पुरुषार्थ म्हणजे कमजोर नेतृत्वाची लाचखोरीच आहे हे आवर्जून सूचित होते. प्रबोधन किंवा जागृजीचे स्वरूप केवळ संशय निर्माण करणारेच असेल तर अशा प्रबोधनाला काही एक अर्थ उरत नसतो. लोकनाथची कविता उपरोधिकपणे जागृतीचे स्वरूप स्पष्ट करते. उपरोध हा त्याच्या कवितेचा स्थायीभाव आहे. वाक्य ही व्याकरणिक संज्ञाही त्याच्या कवितेचा विषय होते. ती स्वत:ची भूमिका विशद करण्यासाठी, सर्वसामान्यांच्या बद्दल पोटतिडकीने बोलणाऱ्यांचा प्रवास प्रस्थापिततेकडे होत जातो. एकदा प्रस्थापित झाल्यानंतर सर्वसामान्यांच्या जगाशी त्यांना काही देणे घेणे उरत नसते. आणि मग आपले प्रस्थापितत्व धोक्यात आले की, पुन्हा त्यांना लांबच लांब भाषणाचा आधार घ्यावा लागतो.

ज्यांचे प्रस्थापितत्व धोक्यात येते
ते लांबच लांब भाषण देत सुटतात
मी एका वाक्यात माझी संपूर्ण भूमिका मांडतो

याप्रकारे पोकळ भूमिका घेऊन जगणाऱ्यांच्या पोपटपंचीवरचे भाष्य ही कविता करते. त्याचप्रमाणे चळवळीचे विश्लेषण करताना समकालीन वास्तवही स्पष्ट करते. मूल्य हरविल्याची भीषण अवस्था उभी ठाकल्यामुळे चळवळीला मूल्याधिष्ठीतता राहू शकली नाही. आंबेडकरोत्तर काळात बुद्धिवादी, बुद्धिप्रामाण्यवादी समाजमन तयार होऊनही गटबाजी, गटाततटाचे राजकारण यामुळे परिवर्तनाच्या एका ठोस कार्यक्रमात चळवळींना रूपांतरीत होता आले नाही. ही शोकात्म जाणीव प्रकट झाली आहे. प्रतीकाचा समर्पक वापर हेही या कवितेचे वैशिष्ट्य आहे. लाचारी पत्करणाऱ्या हाताना झंझावती बळ दिल्याचा दाखला ही कविता देते.

जोहार करणारे आमचे हात। आम्ही कापून फेकले
आता शस्त्राशिवाय हातात काहीही नाही

पारंपरिक लाचारी पत्करणाऱ्या प्रवृत्तीस नाकारून त्याविरोधातील विद्रोह येथे प्रकट झाला आहे. सांस्कृतिक वर्चस्ववादी सत्तेला आणि आधिभौतिक सत्तेला आव्हान देणाऱ्या बंडखोर जाणिवा कवितेत योजलेल्या प्रतिमा आणि प्रतिकातून प्रत्ययाला येतात. जाणीवपूर्वक घडविलेल्या दोन भिन्न सांस्कृतिक जगाचे रूप त्यातून सिद्ध होते. पारंपरिक संस्कृती आणि पर्यायी संस्कृती अशी दोन रूपे सिद्ध होतात. पर्यायी संस्कृतीत कसे जगायला हवे याबद्दलची एक निश्चित

भूमिका ही कविता मांडते.

ते भेटले की त्यांना अदबीने नमस्कार करावा
एवढ्यानेही मानत नसतील तर
जोहाराचे सोंग घेऊन / त्यांच्या पोटातून शिंग आरपार काढावे
दुनिया आपली आहे

पारंपरिकतेची पारंपरिक शस्त्रानेच आतडी बाहेर काढावीत अशी विद्रोहाची एक नवी खेळी ही कविता मांडते. हाच आता 'होऊन जाऊ द्या' या शीर्षकाचा खरा मथितार्थ आहे! 'ते' या सर्वनामातून पारंपरिक संस्कृतीच्या रक्षकाचा, शोषकाचा निर्देश होतो, 'दुनिया आपली आहे' या विधानातून पर्यायी संस्कृतीचा निर्देश होतो. पर्यायी संस्कृतीची उभारणी हाच 'आता होऊन जाऊ द्या' या आव्हानामागील उद्देश आहे.

स्पष्ट भूमिकेतून सामाजिक भानाचा प्रत्यय देणाऱ्या कविता म्हणून त्या मौलिक स्वरूपाच्या ठरतात. एकंदरीत, सामाजिक बांधिलकीच्या शोकात्म कथा तठस्थपणे मांडून अनुत्तरीत प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. पुरोगामी शक्तीचे खच्चीकरण करू पाहणाऱ्या प्रवृतीचा वेध घेतला आहे. समूहमनाचा क्रांतीकारी आविष्कार केला आहे. सार्थ भाषा, अर्थाची व्यापकता, आणि सूचकता हे या कवितेचे सामर्थ्य आहे. प्रारंभीच्या दलित कवितेची भाषा आणि लोकनाथच्या कवितेची भाषा यात फरक आहे. सरळ व संयत भाषेतूनही विद्रोह प्रकट करता येतो हे या भाषेने सिद्ध केले आहे. ''लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची भाषा, रचनातंत्र व आशयाचा अवकाश वाढविणारे शीर्षक या गुणांमुळे त्याची कविता विलक्षण परिणामकारक ठरली आहे. ''[११] हे संजय मून यांचे मत रास्त आहे.

✸ भुजंग मेश्राम (जन्म ९ ऑक्टोबर १९५८- मृत्यू २७ ऑगस्ट २००७)

दलित कवितेच्या पहिल्या जोमदार लाटेनंतर दलित कवितेत काहिसा एकसुरीपणा, साचेबंदपणा येऊ लागला. अनुकरणही होऊ लागले. त्यामुळेच दलित कवितेत थांबलेपणा आलाय, साचलेपणा आलाय असे आरोप टिकाकारांनी केले. त्यात तथ्यांश नव्हता असे मुळीच नाही. परंतु साचलेपणा किंवा थांबलेपणाला छेद देणारी कविता या काळात लिहिली जात होती. स्वत:चा वेगळा ठसा उमटवत होती. अशा कवितेच्या प्रवाहात भुजंग मेश्राम हे नाव अग्रस्थानी आहे. १९९० साली **उलगुलान** प्रसिद्ध झाला आणि दलित कवितेचे प्रतल त्यामुळे विस्तारीत झाले. दलित कवितेच्या विकसीत रूपाची जाणीव या काव्यसंग्रहाने साहित्य जगताला करून दिली.

भुजंग मेश्राम हा कवी खऱ्या अर्थाने 'नागवना'चा रहिवासी होता. हे भारतीय नागवन सांस्कृतिक पटलावर उभे करून त्याच्या कवितेने जी घोडदौड केली त्याला मराठी काव्यक्षेत्रात तोड नाही. अरण्यात वाढणाऱ्या असंतोषाला भक्कम करीत 'उलगुलान'चे गाणे त्याने भारतीय कवितेत घुमविले. 'उलगुलान' ही त्याच्या कवितेची जहाल घोषणा होती. या घोषणेला क्रांतीकारकत्वाचे पाठबळ आहे. या पाठबळामागे माणुसकी फुलाविणारी मायेची पायाभरणी आहे. तसाच माणसाला माणूस म्हणून स्वीकारले जावे असा निग्रह आहे. माणूस मग तो पृथ्वीतलावर कुठेही असो त्याच्या विटंबनेच्या उद्वेगातून, ममत्वाची पखरण करीत भुजंगची कविता गतिमानपणे झेपावत राहिली.

भुजंग मेश्राम यांची कविता नागवंशी निनाद घुमवितच बहुभाषिक आयामाने सिद्ध झाली. त्यांच्या कवितेने कार्यकर्त्यांची नैतिक भूमिका बजावली. आदिम दु:खाच्या जागरातून दु:खनिरोधाच्या मार्गापर्यंत ती येऊन पोहचते. भारतीय संदर्भात दलित, आदिवासी, भटके, विमुक्त हेच मूलत: मूळ निवासी आहेत. नागवंशीय आहेत. म्हणून त्याच्या कवितेतील नागवंशी निनाद प्रस्थापित संस्कृतीचे कान भेदीत, पेटलेल्या नागवनाच्या जाळाने सांस्कृतिक अंधार जाळत सुटते. म्हणून ती जंगलझाडीपासून महानगरीय पर्यावरणापर्यंतच्या अवलोकनातून आलेल्या आत्मभानाचा ऐतिहासिक आविष्कार ठरली आहे. भुजंग मेश्राम यांनी उलगुलानच्या दुसऱ्या आवृत्तीच्या नमनात लिहिले आहे, ''आंबेडकरी प्रेरणा घिवून आदिवासी कवता येऊ लागली. मॅट्रीकला असतानाच, अस्मितादर्शमध्ये लिहाय लागलो. त्यामुळंच लोकायंमोहरं आलो.

आस्मितादर्शमुळं आत्मसन्मान कळला'',[१२] यातून एक गोष्ट स्पष्ट होते की आदिवासी कवितेचा आरंभबिंदू आंबेडकरी प्रेरणा आहे.

'उलगुलान'मधील कविता प्रथमदर्शनी एक भाषिक प्रस्फोटाचा अनुभव देतात. बोली भाषेच्या ताकदीचाही प्रत्यय देतात. त्यातून आर्य-अनार्य, ब्राहमण-श्रमण, मूळ निवासी आणि बाहेरून आलेल्या आक्रमक टोळ्या, महानगरीय संवेदना आणि झाडीपटटीचे मानस असा अनेकस्तरीय सांस्कृतिक संघर्ष उलगुलानच्या केंद्रस्थानी आहे. मराठी आणि दलित कवितेतही शब्दबद्ध होऊ शकले नाही असे महानगर, नगर आणि गावकुसापासून कोसो दूर असलेली झाडीपट्टी, रानवस्ती आणि डोंगरदऱ्यात खितपत पडलेले समाजजीवन पहिल्यांदाच 'उलगुलान'मधून साकार झाले आहे. भुजंग मेश्राम यांनी कोणत्याही सांस्कृतिक दडपणाला भीक घातली नाही, तर सांस्कृतिक वेठबिगारीला धारेवर धरले आणि जगण्यात एक बेदरकार वृत्ती दाखविली, हा कवी आदिवासी वस्तीवर जन्माला आलेला असता तरी आश्रमशाळेचे बोट धरून त्याने नगरामहानगराचा प्रवास केला होता. दलित आदिवासींच्या चळवळीतून त्याची जडणघडण झाली होती. प्रत्यक्ष चळवळीच्या प्रभावातून त्याचे व्यक्तिमत्त्व फुलत गेले. बुद्ध फुले-आंबेडकर-बिरसामुंडा ही अवैदिक परंपरेतील मानव मुक्तीच्या आंदोलनातील अभिन्न अंगे आहेत या प्रचंड आत्मविश्वासातून, दलित पँथरच्या चळवळीचा एक आवेश घेऊन त्याची कविता दाखल झाली आणि मैलाचा दगड ठरली.

या कवितेने इतिहासाचे भान सातत्याने जागविले आहे. इतिहास असा आहे, की ''आर्यांच्या अनेक टोळ्यांची आक्रमणे दीर्घकाळापर्यंत भारतावर होत राहिली. त्यांनी आपल्या वसतिस्थानासाठी जुन्या नगराचा विद्ध्वंस केला. नद्यांचे पाट फोडून टाकून नगरे नष्ट केली. जंगले जाळून आदिवासींना विस्थापित केले. आर्यांनी या माणसांना माणूस न मानता असूर, राक्षस, शाखामृग, दस्यू, नाग अशी विशेषणे बहाल केली. त्यांच्या स्त्रिया पळविल्या, मालमत्ता हरण केली, दैवतांचे विकृतीकरण केले व या जमातींना रानावनात परागंदा होण्यास भाग पाडले.''[१३] म्हणून कवीने म्हटले आहे

ते आले तेव्हा, त्यांच्याकडे भटकंती होती आणि
आमच्याकडे इतिहास
ते म्हणाले आपण सर्व करू अदलाबदल अन् बदलू जग
केला विश्वास
आता त्यांच्याकडे आहे इतिहास अन आमचेकडे विमुक्ती

इतिहासाचे आणि हिरावून घेतलेल्या इतिहासाचे रूप इथे स्पष्ट झाले असून आदिवासींच्या वाट्याला आलेले दु:खही स्पष्ट होते. ''आर्यांनी आदिवासींना आपल्या संस्कृतीचा गुलाम बनविले, त्याला रानटी ठरविले.''[१४] ही रानटी अवस्था झुगारून देण्यासाठी त्याने सतत संघर्ष केला. आर्यांनी आदिवासीचा इतिहास दडपून टाकला आणि आपला स्वत:चा दांभिक इतिहास प्रतिष्ठित ठरविला. 'एकटा सूर्य वगळला तर सगळेच मोसमी पक्षी । येऊन गेलेत इथल्या ओल्या फांद्यावर.' परकियांच्या राजवटीपासून झाडीपट्टी साफ होऊन जमिनीवर आदिवासीचे हक्क उरले नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून लोकशाही मूल्ये स्वीकारल्या नंतरही ज्यांना गुन्हेगार ठरविल्या गेले 'तो' सेटलमेंट वाला सुखी होऊ शकला नाही. विस्थापितांच्या जीवनाशी इथल्या व्यवस्थेने फार टोकाची चेष्टा केली आहे.

त्यांनी कुळ मागीतले भेटली नवाटी
आम्ही मुक्ती मागीतली भेटली विमुक्ती

विस्थापितांचे पूनर्वसन करण्यात, त्यांना मानवी हक्क प्रदान करण्यात लोकशाही अपयशी ठरली आहे. हे समकालीन वास्तव या कवितेने अधोरेखित केले आहे. इतिहासाच्या आकलनातून प्राप्त झालेल्या आत्मभानातून, आत्मशोध घेताना आपल्या समूहमनाला कराव्या लागणाऱ्या संघर्षाच्या वाटाही दाखविल्या आहेत. माणसाला नागविणाऱ्या तत्त्वमूल्यांचे तिरकस स्पष्टीकरण करीत त्या मूल्यांना ठाम नकार देऊन तीव्रतर विद्रोह प्रकट करणे हे 'उलगुलान'मधील कवितेचे कार्य आहे. ज्ञानाची, पांडित्याची परंपरा स्वत:कडे राखून ठेवणारांनी अज्ञानी समाजाला अज्ञानाच्या अंधकारात

अधिकच बुडविले. स्वत:चे वर्चस्व कायम ठेवून त्याच्या समर्थनार्थ स्मृतीश्रुतीही निर्माण केल्या. शब्दप्रामाण्यावादी आणि पोकळ पंडिताना वास्तवाचे भान नसते. निसर्गात वर्गवारी करता येत नसते. तो सर्वत्र सारखाच व्यापलेला असतो. वर्गवारी किंवा भेदभाव माणसापासून सुरू झाले.

दोन निसर्ग : दोन वर्ग
एक घट्ट रुतलेला सरंजामासारखा
दुसरा निगरगट्ट फाटलेल्या गुलामासारखा
मला नामंजूर हा पादरफुस्का सिद्धांत
जो स्वत:शीच करायला लावतो संभ्रमाचं युद्ध

स्वत:बद्दल भाम्रक कल्पना असलेल्या समाजाकडून आदिवासी अस्मिता उपेक्षित राहिली. परंतु मुख्य प्रवाहाचे सोंग आणणाऱ्या प्रवृत्तीशी टक्कर देण्याचे आत्मभान अद्याप आलेले नाही म्हणून मेश्रामांची कविता अधिकच सजग होते. पारंपरिक गोष्टींच्या मार्गानेच आपल्या समूहमनाला आधुनिक विचारापर्यंत पोहचविते. हा या कवितेने योजलेला एक युक्तिमार्ग आहे. म्हणूनच मग पोटासाठी मोसमाप्रमाणे स्थलांतर कराव्या लागणाऱ्या जगाला संघर्षाचा पवित्रा घेण्याचं 'भेदिक' सांगीतले जाते. गड्याबिगाऱ्यांच्या उपाशी जगासाठी हे भेदिक आहे 'भेदिक'सारख्या पारंपरिक प्रकारातूनच एक नवा विचार ही कविता प्रकट करते,

सरका कोलीसारखे सरका / थंडी पडली शेकोट्या पकडा
फुका जाळ एवढ्यात पेटल बगा सेकोटीची आग

माणसांना नागविण्याच्या परंपरेला आग लावण्याचे हे आवाहन आहे. ज्या इतिहास भूगोलातून सुगीत हरवलेल्या पाखरांना वगळण्यात आले, ज्या प्रवृत्तीने हे कार्य केले त्या प्रवृत्तीलाही जाळण्याचे हे आवाहन आहे 'टोंगळ्यात मुंडी घालून बसू नोका' असे गावबांधणीच्या निमित्तानेही आवाहन करण्यात आले आहे. आपल्या जगावर आक्रमकांचे प्रयोग होण्यापूर्वीच स्वत:ला तपासावे, स्वत:पल्याड जावून विचार करावा असे हे आवाहन 'गावबांधणी' करत आहे.

आईने मोक्यावर कोण आले हे बालिस्टर
नव्या खावटी तगाईचा बटोडा कराले
त्यैला फिकर एवढी आपली की शंबर टक्के सबसिडी!
आट अेकच, नाव बदलाचं-वनवासी!
थॅचाबर्बर देवधरम-इत्यास-भूगोल

मूलतत्त्ववादी प्रवृत्ती आदिवासीचे अस्तित्व पुसून टाकण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. त्यासाठी हिंदुत्वाचे वकीलपत्र घेऊन ही माणसे डोंगरावर, झाडीपट्टीत दाखल झाली आहेत. संघाचा हा कावेबाजपणा आदिवासीना, वनवासी ठरविणार आहे. हा प्रयोग आदिवासी वस्त्यांवर सुरू आहे. कराल स्वरूपाचे हे समकालीन वास्तव आहे. भौतिक किंवा मूल्यांच्या पातळीवर कुठलीही आधुनिक जाणीव त्यांच्यात भिनता कामा नये अशाप्रकारचा 'वनवासी' फॉर्म्युला आहे. विस्थापितांचे पुनर्वसन हे केवळ एक बुजागावणे झाले आहे, हे वास्तवही या कवितेने अधोरेखित केले आहे. विस्थापितांच्या नावे होणाऱ्या चळवळीही फसव्या असतात. अशाप्रकारे भूतकालीन ते समकालीन अशा प्रवासातील व्यवस्थेची पोलखोल आणि व्यवस्थेवर भाष्य करीत वास्तवाचे स्वरूप स्पष्ट करण्याचे कार्य ही कविता पार पाडते.

आदिवासींच्या सांस्कृतिक जगाची केली जाणारी लूट, महानगरीय संवेदनशीलता, मध्यमवर्गीय मानसिकता अशा विविध वृत्ती प्रवृत्तीचा शोध उलगुलानमधील कवितेने घेतला आहे. झाडीपट्टी आणि गावातील लोकजीवनाचे शोषण करून या जीवनाला विकलांग करणाऱ्या व्यवस्थेचे, आदिवासीच्या सांस्कृतिक विश्वावर डल्ला मारणाऱ्या व्यवस्थेचे रूप उलगडून दाखविले आहे. आदिवासींनी आपल्या जीवनशैलीचे स्वतंत्र वैशिष्ट्य त्याने जोपासले आहे. असे असताना त्यांना मागासलेले हिंदू ठरविणे हास्यास्पदच ठरते. त्याच्या कला संस्कृतीवर सातत्याने व्यवहारवादच जोपासला गेला.

त्याचा वापर करून घेतला हे मनाला बेचैन करणारे वास्तव भुजंगच्या कवितेने स्पष्ट कले आहे. इतिहासाच्या आकलनातून आत्मभान येते आणि कवीचा आत्मशोध सुरू होतो. आत्मशोधाच्या वाटेवर त्याला उद्याच्या भविष्याचे वेध लागतात. म्हणून तो आपल्या माणसांना आवाहन करतो,

पाच हजार वर्षांच्या हिशेबांची आकाशगंगा
उजेडात कोरण्याची शपथ घेताना एवढं करा,
गुड्या-पोळावर तुमचे मुक्त हात दिसू द्या
लोकशाहीच्या समुद्रात दिपस्तंभ शोधताना
भेटतील कैक ससंस्कृत द्रोणाचार्य
मात्र तुमचा अंगठा शाबूत असू द्या

एकलव्याचे खच्चीकरण करणे हा द्रोणाचार्याचा कावेबाजपणा आहे. पारधी पोरगा महाभारतच उलटे फिरवेल या भितीने आणि वर्णवर्चस्वाच्या अहंगंडाने द्रोणाचार्यांनि एकलव्याला निकामी केले. तेव्हापासून द्रोणाचार्य हे उपेक्षिताना विद्या नाकारणारे मिथ ठरले. पाच हजार वर्षांच्या आपल्या महान संस्कृतीत अशी अनेक स्थळे सापडतील. म्हणूनच अशा प्रवृत्तीपासून वर्तमानात सजग राहण्याचे आवाहन ही कविता करते. इतिहासाचे उत्खनन आणि वर्तमानात व्यवस्थेच्या विरोधात रणकंदन करण्याचे आवाहन करणारी बंडखोर कविता असे उलगुलानचे वर्णन करता येईल. समकालीन जीवनाचा वास्तवदर्शी आविष्कार म्हणून त्याकडे पाहता येते. स्वातंत्र्योत्तरकालीन अन्याय अत्याचाराच्या घटना, आदिवासींचे कुपोषण, उपासमार, वैचारिक द्वंद्व, आपल्याच पराभवाचे गोडवे गाणारी तिज्जनबाय, नेल्सन मंडेलाच्या भारतभेटीत आदिवासी भारताचं लपविलेलं वास्तव, वैचारीक बांधिलकी स्पष्ट करतानाच बाबासाहेब आंबेडकरांच्या निमित्ताने मांडलेले सांस्कृतिक विश्व आणि समाजमनाच्या कानामनात भिनलेलं 'उलगुलान', आजच्या काळात बिरसा मुंडाच्या क्रांतीकारकत्वाची असलेली गरज अशा कितीतरी विषयाला या कवितेने हात घातला आहे.

काळागोरा संघर्षात ज्यांचे आयुष्यच एक संघर्षभूमी झाले असे नेल्सन मंडेला. दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर काही दिवसातच त्यांनी भारताला भेट दिली होती. त्यावेळेस भारतीय प्रशासन आणि राजकीय यंत्रणेने आदिवासी भारताचा दुखरा भाग मंडेला यांच्या नजरेस पडणार नाही याची कटक्षाने दक्षता घेतली होती.

तुमचे केले जाते स्वागत मंडलना काढले जाते निकालात
तुम्हाला दाखवला जातो राजघाट, ताजमहल, लालकिल्ला
लपवला जातो बस्तर, बेलखेडा, ज्योतिबा आणि बाबा

उपेक्षित, बहिष्कृतांच्या उत्थानासाठी सर्वस्व झोकून देणाऱ्या महापुरुषानाही निकालात काढले जाते. ज्यांच्या प्रेरणेतून परिवर्तनांच्या, प्रबोधनाच्या चळवळीचं युग अवतरलं अशा महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्व-कृतीची साधी ओळखही नेल्सन मंडेलांना करून दिली जात नाही. हा या देशाचा कृतघ्नपणा आहे. असा कृतघ्नपणा एकीकडे प्रकट होत असताना दुसरीकडे सांस्कृतिक विश्वात आदिवासी समूहमनाचा घटक आपल्याच पराभवाचे गोडवे गात आहे. हे मन विदीर्ण करणारे समकालीन वास्तव आहे. जमशेदपूरची तिज्जनबाई हातात एकतारी घेऊन रंगल्या तोंडाने 'पांडवानी' सांगत असते. ती पारधी जमातीची आहे असेही सांगीतले जाते. मात्र आपल्याच गुलामी आणि पराभवाची कथा आपण सांगतो आहोत याचे भान तिला नाही. म्हणून कवीने तिला जाब विचारला आहे, 'तिज्जनबाय तू कंच्या भारताबददल बोलते आहेस? तिची कृती ही एकप्रकारे सांस्कृतिक वेठबिगार आहे बिरसामुंडासारखा क्रांतीकारी परंपरा असलेला इतिहास तिला चुकूनही आठवत नाही. व्यवस्थेलाही हेच हवे आहे. भाकड म्हशीसारखे परंपरागत विचाराचे रवंथ करणारी व्यवस्था आहे. तिज्जनबाय भाकड व्यवस्थेबद्दल चकार शब्दही बोलत नाही. आपल्या सांस्कृतिक बाजारात 'अभयारण्याला'च तीलांजली देणारी तिची कृती आहे. आपल्याच जगाची लाज उघड्यावर टाकण्याचे कृत्य तिच्या हातून घडते असे सांस्कृतिक वेठबिगारीवरील भेदक भाष्य ही कविता करते.

समकालीन वास्तवाचे दिग्दर्शन करताना मेश्राम यांची कविता ऐतिहासीक क्रांतीकारी मूल्यव्यूहाचा स्वीकार करून साकार होते. इतिहासातील, नजिकच्या भूतकाळातील मानवमुक्तीची क्रांतीकारी तत्त्वे आणि व्यक्ती यांची प्रेरणा समकालीन लढ्यासाठी स्वीकारणे अटळच आहे असे स्पष्ट होते. म्हणूनच नजिकच्या भूतकाळातील डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचा मानव मुक्तीचा लढा हे उलगुलानचेच विकसीत रूप आहे असा कविचा विश्वास आहे. आंबेडकरी विचारांना आणि तत्त्वांना शब्द देण्याचा प्रयत्न दलित कवितेचा राहिलेला आहे. उलगुलानमधील 'समुद्रपुत्र' या कवितेत मानवमुक्तीच्या विचारांची, क्रांतीतत्त्वाची घुसळण करीत जनप्रवाहात संघर्षरत झालेल्या आंबेडकरी व्यक्तिमत्त्वाची अनुभूती प्रत्ययाला येते. पोकळ पांडित्यांच्या पदव्या घेऊन मिरवणारे पंडित, कलेचा बाजार करणारेही आज अस्तित्वात आहेत,

थरकतात इथे झाडांची स्पंदने करताना व्याख्या अन्
ऋतूचक्रासोबत चालणे याला म्हणतात ते सांस्कृतिक प्रक्रिया
उन्हातल्या निष्पर्णी वृक्षांचे अर्थ त्यांना सापडतात
फक्त वेदांताच्या राखीव श्लोकाश्लोकात
मग चार दिशानाही खुशाल बसवता येते चातुर्वर्णाच्या चौकटीत
किंवा तथागताला दशावताराच्या माळीव गजऱ्यात

''वेदान्त हे केवळ एक तार्किक तत्त्वज्ञान नव्हते. ऋग्वेदाच्या अखेरच्या काळापासून भारतीय समाजात विकसीत होत जाणाऱ्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे ते वैचारीक प्रतिबिंब, वैचारीक आधिष्ठान होते. प्रथम चातुर्वर्ण्यावर उभारलेली ही वैचारीक इमारत होता होता पुढे चातुर्वण्याचा आधारस्तंभही झाली.''[१५] वैदिक परंपरेतील ते मोठे वैचारीक हत्यार होते. अवैदिक परंपरा, तत्त्वज्ञान, विचारांना आपल्यात सामावून घेण्याचा प्रयत्न या तत्त्वज्ञानाने केला. हा इतिहास डॉ. आंबेडकरांसमोर होता. अवैदिक परंपरेतील बुद्धासारख्या तत्त्ववेत्यालाही या परंपरेने देवाचा अवतार ठरवून टाकले. सर्वसामान्यांच्या डोळ्यात धुळफेक करणारा आणि त्यांना दैववादात ओढून स्थितीशील बनवणारा हा प्रकार आहे. याचे भान मेश्रामाच्या कवितेला आहे. म्हणूनच हा कवी म्हणतो,

बांधावेत त्यांनीच वाळूचे खोपे / ज्यांना कळत नाही प्रकाशाचा वास
किंवा फुलवता येत नाही समुद्राचे पडीक शेत
उधाणलेल्या लाटांचे नाग आता तुझ्याच प्रतिक्षेत

बुद्धाच्या तत्त्वाला गतिमान करणारे आंबेडकरी विचार कवटाळण्यासठी 'नाग' सज्ज झाले आहेत. हा विचार पुढे नेण्यासाठीचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. आंदोलनाचे शेत फुलवीत बिरसा मुंडाने उगवावे ही अपेक्षा आणि नागांनी समुद्रपुत्राची प्रतिक्षा करणे ह्या समानशील जाणिवा आहेत. बुद्ध-बिरसा-आंबेडकर ही अवैदिक परंपरेतील मानवमुक्तीच्या आंदोलनाची अभिन्न अंगे आहेत. याच तात्विक आधिष्ठानातून 'उलगुलान'मधील कविता आकारास आली आहे. याच तात्विक परंपरेशी बांधिलकी स्वीकारून समकालीन अंतर्विरोध आणि द्वंदाला सामोरी जाणारी जाणीव मेश्रामांच्या कवितेत प्रत्ययाला येते. या कवितेतील विद्रोह थेट माणसाला नाकारणाऱ्या त्या त्या केंद्राच्या, परंपरेच्या पार्श्वभूमीवर प्रकट होत जातो. अनुभवाच्या भाषेतील थेटपणा हाही महत्त्वाचा विशेष त्यातून प्रत्ययाला येतो 'उप्पर झाल्या अंधारला आता आपण दिवस ठिवलेच फायजे' हा या कवितेचा निर्धार आहे, अस्तित्वात नसलेल्या देवापेक्षा मानवी सामर्थ्याला महान मानणाऱ्या बंडखोर आणि विद्रोही जाणिवा या कवितेतून प्रकट झाल्या आहेत. माणसाला नाकारणाऱ्या दांभिक इतिहास आणि परंपरांचे कथन करून ही कविता थांबत नाही, तर माणूसपण जोपासणाऱ्या प्रबळ मानवतावादाचा वारसा स्वीकारून ती गतिमान होते. परिवर्तनवादी, गतिमान तत्त्वज्ञान प्रभावी करणारी पुरोगामी, प्रेरक शक्ती म्हणून बुद्धतत्त्वाचा उल्लेख केला जातो. या पार्श्वभूमीवर भारतीय समकालीन पुरोगामीत्वाचे वास्तव काय आहे याचा शोध घेत ही कविता इतिहास आणि वर्तमानाचा अन्वय लावते म्हणूनच नेल्सन मंडेलासारख्या आदिमांच्या नायकाला छद्मीपणे सवाल करते 'ग्रँडफादर, तुमची बुद्धाशी ओळख आहे की नाही' असा प्रश्न उपस्थित करण्याचे सामर्थ्य या कवितेला का प्राप्त होते? कारण तिने

'नागकन्येच्या गावाशी हितगुज केले आहे. ' नागकन्येच्या गावाच्या अंतरंगाचे आकलन तिला झाले आहे. म्हणूनच मोळी विकणाऱ्या नागकन्येच्या डोक्यातील 'पंचशील ओळी' सतत सावलीसारख्या पाठीशी असतात. 'पंचशील' हे बुद्धाच्या काळच्या समाजव्यवस्थेच्या विरुद्धचा विद्रोह आहे. आणि 'नागवन पेटले' हे समकालीन समाजव्यवस्थेच्या विरुद्धचा विद्रोह आहे. असे या कवितेचे विद्रोही स्वरूप आहे.

'उलगुलान'मधील स्त्रीप्रतिमा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा. झाडीपट्टी, कष्टकरी, मध्यमवर्ग आणि चळवळीच्या अनुषंगाने स्त्रीरूपांचा आविष्कार झालेला आहे. मध्यममार्गी स्त्रीच्या रूपाने दोन जगातील अंतर स्पष्ट होते. तर कष्टकरी आणि चळवळीतील स्त्रीच्या अनुषंगाने तिच्या सामर्थ्याचा आविष्कार होतो. कष्टकरी, दारिद्र्याच्या जगातून आलेल्या स्त्रियांची रूपे मात्र स्वत:चे असे खास व्यक्तिमत्व घेऊन येतात. कधी दु:खाची किनार तर कधी कारुण्याची झालर यामुळे ही स्त्रीरूपे आधिकच उठावदार होतात. त्यादृष्टीने 'बाजार हाट', 'सरावणा', 'निंदणी' या कविता फार महत्त्वपूर्ण आहेत. 'बाजारहाट' मध्ये एका रांडव बाईचे मनोगत आहे. त्याचवेळी व्यवस्थेचे रूपही साकार होत जाते. व्यवस्थेच्या बाजाराचे रूप या स्त्रीव्यक्तिरेखेच्या निमित्ताने स्पष्ट होते. 'सरावणा' या कवितेत श्रावण महिन्याशी एका स्त्रीने साधलेला संवाद दु:ख आणि कारुण्याने भारलेला आहे. 'निंदणी'तील स्त्री व्यक्तिरेखा आपल्या आयुष्यातील भूतकाळ कथन करते. शेतमालक तिची आब्रू लुटण्यासाठी समोर येतो तेव्हा :

मी खोचला पदर उपसला इळा अन् त्येचे बोटच ठेवले नाही
हातावरती, चकोट झालं डोळ्यावरचं बोटावर निभलं
ज्या बोटाच्या इशाऱ्यावर समदं गाव नाचाचं
ते बोटच मी खुडून टाकले

ही तिची अतिशय आक्रमक विद्रोही कृती आहे. भविष्यातील युद्ध लेखणीच्या शस्त्रानेच लढावं लागणार आहे. म्हणून ती आपल्या पोरीच्या हाती पाटी लेखणी देते. तिला पडणारे स्वप्नही ठिणग्यांचे आहे. ठिणग्यांच्या वस्तीचे तिचे स्वप्न म्हणजे जणूकाही अन्याय अत्याचार करणाऱ्या व्यवस्थेला पेटवायला निघालेल्या अंगार फुललेल्या जाणिवाच आहेत. निसर्गावस्थेतील आद्य गणसमाजात स्त्रीला प्राधान्य मिळाले होते. ''प्राथमिक अवस्थेत बिजातून वृक्ष आणि वृक्षातून फळ निर्माण व्हावे याचा मानवाला अचंबा वाटतो. संभोगाचा आणि संतती जीवनाचा काही संबंध आहे याची जाणीव नसल्यामुळे केवळ स्त्री हीच संततीची जननी आहे. इतकेच नव्हे तर विश्वाची जननी त्याला स्त्रीशक्तीच्या रूपात दिसते.''[१६] भुजंग मेश्रामांची कविता स्त्रीशक्तीची विविध रूपे साकार करते. किंबहुना आद्य गणसमाजातील स्त्री शक्तीच्या रूपाचे अंश या कवितेतील स्त्रीरूपात आहेत असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. उदा.

रानाच्या गावाचं नाव विचारत ते शस्त्रखोर यौद्धे
उभ्या पिकांमधून आले आपले दामटत रंगीत घोडे..
कापूस आतूनच पेटत असतो भुरभुर / हे त्यांना माहीत असावे
म्हणून तर तुझ्या ओटीतला कापूस पाहून / ते चुपचाप निघून गेले.

शस्त्रखोर यौद्धेही तिचे पेटण्याचं सामर्थ्य पाहून चुपचाप निघून जातात. तिच्या ओटीत कापूस आणि पदरात रानाची मनोगते कोरलेली आहेत. रानवस्तीशी सुसंगत असेच तिचे व्यक्तिमत्त्व आहे. नागवनातील स्त्रीच्या अंगी असलेलं सामर्थ्यशील रूप येथे अधोरेखित झाले आहे. अशी विविध स्त्रीरूपे दारिद्र्य, गरीबीत वाटचाल करणारी असली तरी संघर्षाचे भान कायम ठेवून युद्धमान होणारी,लढाऊ बाणा प्रकट करणारी आहेत.

थोडक्यात, व्यवस्थाविरोधी युद्धमानता हा या कवितेचा स्वभाव आहे. भुजंग मेश्राम यांच्या कवितेतील तिरकसपणातील चौफेर चौकसपणाने व्यवस्थेचे धिंडवडे काढण्यात कोणतीही कसर ठेवलेली नाही. हा कवी ज्या पर्यावरणातून आला होता. ते पर्यावरण जंगल, प्राणी, माती, पाणी, माणूस या सर्व पातळ्यांवर प्रस्थापित लुटारुंनी लुबाडले होते. या लुबाडणुकीमुळे वाट्याला आलेल्या उद्विग्नतेतून, लुबाडल्या गेलेल्यांच्या वतीने आपल्या कवितेतून आंदोलन

उभारले. त्यातून आठशे वर्षांच्या मराठी कवितेच्या परंपरेला अज्ञात असलेलं जगण्याचं भीषण शिल्प जिवंतपणे साकार झाले. त्यातून या कवितेची स्वतंत्र शैलीही साकार झाली. मराठी कवितेच्या भाषिक फुटपट्ट्या भिरकावत आणि मोजपामाचे मिटर तुडवीत ही कविता वैश्विक झाली. म्हणून ओरीसातील कलाहंडीच्या भूकबळीपासून अमेझॉनच्या खोऱ्यातील रेड इंडियन्सपर्यंतच्या भूकमारीपर्यंत ही कविता बोलत राहते. जाग्दल, नालंदा विद्यापीठापासून गावातल्या गावबांधणीपर्यंत, अश्वघोषापासून नेल्सन मंडेलापर्यंतच्या माणुसकी आणि मानवतावादाच्या क्रांतीकारी तत्त्वाने तळपत राहते. मातृसत्तेच्या अंगीकारातून नागवंशी बंडखोर स्त्रियांचे दर्शन या कवितेने घडविले आहे. अवैदिक परंपरेतील मानवमुक्तीच्या आंदोलनाचा प्रवास अधोरेखित करून या कवितेने पर्यायी संस्कृतीचा संकेत दिला आहे. ही कविता म्हणजे आदिवासी भारताची शोधयात्रा!

समारोप

या दशकातील कवितेच्या संदर्भात खालीलप्रमाणे काही निष्कर्ष मांडता येतील. १९८१-९० या कालखंडात विशेषत: नामदेव ढसाळांच्या कवितेने चिंतनशीलता, अंतर्मुखता यासोबतच सांस्कृतिक मिरासदारीला झिडकारून लावणारी, मराठी भाषेच्या कुचकामीपणाला हिणवणारी अशी अभिव्यक्ती केली आहे. स्वातंत्र्य, भूक, दारिद्र्य यांचे स्वरूप स्पष्ट करतानाच बाबासाहेब आंबेडकरांच्या महानतेचा आलेख मांडला आहे. दलित वंचिताच्या वाट्याला आलेली विपरिताची अवस्था बेदरकार शैलीत स्पष्ट करून सर्ववंचित भुकेल्यांच्या वतीने भोगाच्या पातळीवर दोन हात करण्यासाठी त्यांची कविता सज्ज झाली आहे. बोलभाषेला वक्तृत्वाच्या पातळीवर नेऊन तिला विचार तत्त्वांचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याची किमया लिलया साधली आहे. उपरोध, उपहास, लोकाविष्कार, लोकगीताची लय, उखाणे, वाक्प्रचार, म्हणी या सर्व गोष्टींची समृद्धी ढसाळांच्या कवितेत प्रत्ययाला येते. अतिशय धिट भाषेतून पारंपरिक प्राक्कथांचा दुजाभाव आणि पक्षपात कथन केला आहे. माणूसपणासाठीचा आक्रोश मांडला आहे. स्वतंत्र देशात माणसाच्या वाट्याला पारतंत्र्यच आले म्हणून या देशाला 'गांडू बगीचा' असे संबोधले आहे.

केशव मेश्रामांच्या कवितेनेही देशाविषयी, व्यवस्थेविषयी कडवटपणाचा स्वर आळविला आहे. तर भीमसेन देठे यांनी गरीब कष्टकऱ्यांच्या भणंग जीवनाचे रेखाटलेले चित्र या देशातील गरीबीचा आलेख चितारणारे आहे. भुजंग मेश्राम यांच्या कवितेने भारतीय समकालीन पुरोगामीत्वाचे वास्तव काय आहे याचा शोध घेत इतिहास आणि वर्तमानाचा अन्वय लावला आहे. डब्ल्यू. कपूर यांच्या कवितेने निसर्ग प्रतिमांचा विशेषत: भौगोलिक प्रतिमांचा मोठ्या प्रमाणात वापर करून त्याआधारे या देशाच्या प्रकृती आणि प्रवृत्तीबद्दलचे भाष्य केले आहे.

या दशकातील यशवंत मनोहरांची कविता वेगळ्या वळणाने गेलेली दिसते. पूर्वीच्या त्यांच्या कवितेत व्यवस्थेच्या विरोधात नकार विद्रोहाची आग ओकणारा नायक 'मूर्तिभंजन' मध्ये मात्र विषण्णतेच्या गर्तेत गरगरताना दिसतो. कृतिशील विद्रोही नायकाचे पोरकेपणाच्या आकांतात पर्यावसान होताना दिसते.

दलित आत्मकथनांच्या प्रभावातून कवितेने चरित्रात्मक अभिव्यक्तीची वाट चोखाळली आहे. गतकालीन, दु:ख पेलणाऱ्या माणसांची दुनिया मुखरीत केली आहे. प्रदूषणग्रस्त पर्यावरणात माणसाच्या आशा आकांक्षांचा गर्भ करपून गेल्याचे निदान केले आहे. तर काही कवितातून औपरोधिक शैलीतून जीवनाचे दर्शन घडविले आहे. पोरकेपणा, खंडीतपणा, स्वकीय जगातील अंतर्विरोध हे कवितेचे केंद्रवर्ती विषय ठरले आहेत. कुटुंब आणि समाज असे समीकरण मांडून सामाजिक पृष्ठभूमीवर वावरणारा आणि झुंजणारा कुटुंबकबिला आणि आयुष्याच्या लोंबकळत्या अवस्थेची विविध रूपे साक्षात झाली आहेत. भुकेने तडफडणाऱ्या, विषमतेने अगतिक झालेल्या माणसांच्या भावभावनांची आंदोलने, अंधातरी जगणाऱ्या समाजजीवनाच्या स्थितीगतीचे चित्र, त्याचप्रमाणे सांस्कृतिक दलदलीत रुतून बसलेल्या स्थितीचे वास्तव स्पष्ट करून आधुनिक काळाचे प्रतिगामी मानस अधोरेखित झाले आहे.

या दशकातील दलित कवितेने, ब्राह्मणी व्यवस्थेने मांडलेल्या छळवादाची कहाणी सांगीतली आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पातळीवर होरपळलेल्या समाजजीवनाचे मनोगत व्यक्त केले आहे. आदिवासी, गटई कामगार, वेठबिगार, रस्त्यावरील बेघर, निराधार, शेतमजूर, तमाशातील कलावती, कलावंत, महारोगी अशा सर्व शोषणग्रस्त समाजजीवनाचा वेध घेतला आहे. बेवाररस जगाचे व्याकूळ करणारे दु:खद चित्र रेखाटले आहे.

महानगर, नगर आणि गावकुसापासून कोसो दूर असलेली झाडीपट्टी, रानवस्ती आणि डोंगरदऱ्यात खितपत पडलेले समाजजीवन साकार झाले आहे. इतिहासाचे आणि हिरावून घेतलेल्या इतिहासाचे रूप या कवितेने सिद्ध केले आहे. काही कवितेतून गावपांढरीतील अंतर्विरोध स्पष्ट करून मातीशी असलेली निष्ठा व्यक्त करीत माणसावर माया करणारी जाणीव व्यक्त झाली आहे.

अरुण कांबळेसारख्या कवीने व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारी आवेशपूर्ण अभिव्यक्ती केली आहे. ती विषमतावाद्यांशी उभा दावा मांडणारी आहे. बाजारबुणग्याच्या जगाविषयीचा उद्वेग व्यक्त झाला आहे. प्रतिक्रांतीविरुद्ध क्रांतीचा स्वर आळविला असून, प्रक्षुब्ध आणि बंडखोर नायकाची प्रतिमा त्यांच्या कवितेतून साकार झाली आहे.

चेंदवणकरांच्या कवितेने सभ्यपणाच्या बुरख्याआड लपलेल्या कावेबाज आणि चाणाक्ष प्रवृत्तीची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. तथाकथीत संस्कृतीरक्षकाचा मानवद्रोही चेहरा उजागर केला आहे. लोकशाही मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या प्रवृत्तीवर प्रचंड आघात केला आहे. अभिव्यक्तीची एक वेगळी भाषिक तऱ्हा आविष्कृत केली आहे.

या कवितेत विद्रोहाची विविध रूपे साकार होताना दिसतात. आत्माविष्कार आणि समाजपरिवर्तन या उद्दिष्टांसाठी विद्रोह प्रकट होताना दिसतो. आपल्या शब्दांनी मूकपणे जूलूम सहन करणाऱ्यांच्या ओठातील आग व्हावे अशीही अपेक्षा व्यक्त झाली आहे. पारंपरीकतेची पारंपरिक शस्त्रानेच आतडी बाहेर काढावीत अशी विद्रोहाची नवी खेळी या कवितेने मांडली आहे. माणसाला नागविणाऱ्या तत्त्वमूल्यांचे तिरकस स्पष्टीकरण करीत त्या मूल्यांना ठाम नकार देऊन तीव्रत्तर विद्रोह पुकारणे असे या कवितेचे प्रयोजन दिसते.

चळवळीच्या खंडीतपणावर या कवितेला भाष्य करावेसे वाटते. त्यामुळे ही कविता टोळीबाज पुढाऱ्यांच्या शाब्दिक भंकसपणावर औपरोधिक भाष्य करते. लाचारी पत्करणाऱ्या आणि लांलूलचालन करणाऱ्या प्रवृत्तीला नकार देऊन निषेध नोंदविते. चळवळीच्या नेतृत्त्वाबददल औपरोधिक भाष्य करते. मूल्य हरविलेल्या, निष्ठा ढळलेल्या समाजातील पलायनवादी वृत्तीचा वेध घेऊन, पोकळ भूमिका घेऊन जगणाऱ्यांच्या पोंपटपंचीवर भाष्य करते. गटातटाच्या राजकारणामुळे चळवळींना परिवर्तनाच्या एका ठोस कार्यक्रमात रूपांतरीत होता आले नाही अशी शोकात्म जाणीव व्यक्त होते. आपल्या स्वार्थासाठी बाबासाहेबांच्या नावाचा वापर करणाऱ्या प्रवृत्तीवर कडवट प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. केसाने गळा कापणाऱ्या प्रवृत्तीचा समाचार घेतला आहे. चळवळीच्या पर्यावरणात कातडीबचाऊपणा करीत अस्तित्व जोपासणाऱ्या प्रवृत्तीवर कडवट भाष्य करण्यात आले आहे.

भुजंग मेश्राम यांच्या कवितेने दलित कवितेचे प्रतल विस्तारण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. अरण्यात वाढणाऱ्या असंतोषाला भक्कम करीत उलगुलानचे गाणे भारतीय कवितेत निनादन ठेवण्याचे कार्य पार पाडले आहे. नागवंशी निनाद घुमवीत बहुभाषिक आयामाने ती सिद्ध झाली आहे. ही कविता जगंलझाडीपासून ते महानगरीय पर्यावरणापर्यंतच्या अवलोकनातून आलेल्या आत्मभानाचा ऐतिहासिक आविष्कार ठरली आहे. या कवितेने मातृसत्तेच्या अंगिकारातून नागवंशी बंडखोर स्त्रियांचे दर्शन घडविले आहे. संघर्षाचे भान ठेवून युद्धमान होणारी, लढाऊ बाणा प्रकट करणारी ही स्त्रीरूपे आहेत. आद्यगण समाजातील स्त्रीशक्तीच्या रूपाचे अंश त्यात प्रत्ययाला येतात. अवैदिक परंपरेतील मानवमुक्तीच्या आंदोलनाचा प्रवास अधोरेखित करून पर्यायी संस्कृतिचा संकेत दिला आहे. बुद्ध-बिरसा-फुले- आंबेडकर ही मानवमुक्तीच्या आंदोलनाची अभिन्न अंगे आहेत. याच तात्त्विक अधिष्ठानातून ही कविता आकारास आली असून तिने सांस्कृतिक वेठबिगारीवरील भेदक भाष्य केले आहे.

इतिहासाच्या पार्श्वभूमीवर समकालीन जीवनाचा आविष्कार करणे हे तिसऱ्या पिढीच्या दलित कवितेचे वेगळेपण आहे. लोकनाथ यशवंतच्या कवितेने अभिव्यक्तीच्या नव्या वाटा चोखाळल्या आहेत. रचनेच्या दृष्टिने काही नवे प्रयोग केले आहेत. सामाजिक अभिसरणाच्या नावाखाली कार्यरत असणाऱ्या मूलतत्त्ववादी, पुनरुज्जीवनवादी प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडण्याचे कार्य करतानाच संस्कृतीच्या जहरी प्रेमाची कहाणी सांगीतली आहे. स्वजगाअंतर्गत शोध घेणारी जाणीव या पिढीच्या कवितेत अधिक प्रबळ झालेली दिसते. अर्थाची व्यापकता आणि सूचकता अधोरेखित करणे हे या कवितेचे सामर्थ्य आहे.

या दशकाच्या कवितेत ज्योती लांजेवार आणि हिरा बनसोडे या कवयित्रींनी आपल्या कवितेचे वेगळेपण सिद्ध केले आहे. लांजेवार यांच्या कवितेत वेशीलगतचे काळोखी जग, भूकेची व्याकुळता, कोरड्या शुष्क ओठावरील गाऱ्हाणे असा प्रांत साक्षात झाला आहे. भूक, दारिद्रय, स्त्रियांची आब्रु हे या कवितेतील चिंतनाचे विषय आहेत. अभावग्रस्त स्त्रीजीवनाच्या स्थितीगतीचा आलेख चितारून भावनिक पातळीवरील अभावाचा ताळेबंदही मांडला आहे. बोथट प्रवृत्तीच्या देशाचे रूप चित्रित केले आहे. पुढच्या पिढ्यांना विद्रोहरत होण्याची दिशा देणाऱ्या या कवितेची प्रतिमासृष्टी समृद्ध आहे. लौकीक जगातील जखमांना जोजवत राहण्यापेक्षा प्राकृतिक जगणे श्रेयस्कर मानणारी प्रेमजाणीवही व्यक्त केली आहे. हिरा बनसोडे यांच्या कवितेने बहिष्कृत जगण्याविरुद्ध लोकांच्या न्यायालयात फिर्याद दाखल केली आहे. स्त्रीमुक्तीचा तो जाहीरनामा आहे. पाषाणहृदयी संस्कृतीचा पाडाव करण्यासाठी विद्रोही भूमिका घेतली आहे. ही कविता प्रतिमांकित अभिव्यक्तीतून वेदनेचा प्रत्यय देते. स्त्रीजीवनाशी निगडीत संकल्पना, संदर्भ विचारप्रणालीशी जोडून प्रकट होतात. त्यातून नव्या अर्थाची प्रतिती घडविली जाते. पौराणिक काळापासूनचे स्त्री गुलामीचे संदर्भ अधोरेखित करून पुरुषी निर्दयी व निगरगट्टपणावर, बेगडी संस्कृतीवर ही कविता टिकास्त्र सोडते. देव, धर्म आणि जातीच्या दंशाने घायाळ झालेल्या समाजमनाचे मनोगतच या कवितेने प्रकट केले आहे.

या दशकाच्या कवितेने, एखाद दुसऱ्या कवीने स्वप्नाळू आशावादही व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे दलित प्रेमकवितेला एक वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला आहे. क्रांतीविषयीचा आदर्शवाद प्रियेच्या मनावर बिंबवण्यात ही कविता यशस्वी ठरली आहे.

बुद्धाच्या करुणेने दु:खाचा शोध घेणारी जाणीव या दशकाच्या कवितेने व्यक्त केली आहे. बुद्धत्व आणि बंधमुक्ती असे एक समीकरण मांडले आहे. आशावादाच्या केंद्रावर विद्रोहाच्या वाटेने मार्गस्थ होताना माणसावर माया करणारी जाणीव व्यक्त केली आहे. सावित्री, ज्योतिबा, आंबेडकर, रमाई, मंडेला अशी महान चरित्रे शब्दबद्ध केली आहेत. स्वानुभवातून स्वकीयांशी एकरूप होणारी करुणामयी भाषा या कवितेत अवतरली आहे.

काही कवींनी गेय रचना आणि गझलांचाही आविष्कार केला आहे. लोकलय आणि गेयतेमुळे कवितेच्या रूपाचा आगळावेगळा आविष्कार झाला आहे.

सार्थ भाषा, अर्थाची व्यापकता आणि सचूकता हे या कवितेचे सामर्थ्य आहे. भाषिक प्रस्फोटाचा, बोली भाषेच्या ताकदीचा प्रत्यय देतानाच लुबाडल्या गेलेल्यांच्या वतीने या कवितेने आंदोलन उभारले आहे. त्यातून आठशे वर्षांच्या मराठी कवितेच्या परंपरेला अज्ञात असलेल्या जगाचे भीषण शिल्प जिवंतपणे साकार झाले आहे. मराठी कवितेच्या भाषिक फुटपट्ट्या भिरकावत आणि मोजमापाचे मिटर तुडवत ही कविता वैश्विक झाली आहे.

■

संदर्भ सूची

■

१. **केशव मेश्राम**, (प्रस्तावना), तुही इयत्ता कंची, नामदेव ढसाळ
२. **रा. ग. जाधव**, निळी पहाट, पृ. ४४
३. **केशव मेश्राम,** साहित्याचा अभ्यास, दूरशिक्षण संस्था, पृ. ३९१
४. **संजय कांबळे**, नव अनुष्टुभ, मे जून २०११
५. उक्त
६. **ज्योती लांजेवार**, (भूमिका) दिशा
७. **भालचंद्र फडके,** वेदना आणि विद्रोह
८. **सुधाकर गायकवाड,** स्वागत, अरुण कृष्णाजी कांबळे, पृ. ६५
९. उक्त
१०. **राम बसाखेत्रे,** (मनोगत) सडक लाल मुरुमाची
११. **संजय मून,** यशवंत कविता लोकनाथची, पृ. १४४
१२. **भुजंग मेश्राम,** उलगुलान (दु.आ.)
१३. **लक्ष्मण माने,** विमुक्तायन, पृ. ८, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान
१४. **एल. के. मडावी,** आदिवासी स्वायत्ततेची भूमिका, पृ १
१५. **एस. जी. सरदेसाई,** भारतीय तत्त्वज्ञान, वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, पृ.२०
१६. उक्त, पृ.२६

दलित कविता : १९९१ - २०००

पार्श्वभूमी

या दशकातील कवी आणि कविता

दीपक त्रिभुवन । अरुण काळे । वामनराव जगताप । प्रमोद वाळके
दीपककुमार अंबादास । गोकुलदास मेश्राम । मोहन इंगोले
नारायण जाधव येळगावकर । शिवा इंगोले । गंगाधार अहिरे । भरतकुमार दहिहंडे
लक्ष्मीकांत घुमे । डी. बी. रत्नाकर । किशोर शांताबाई काळे । बळवंत कांबळे भगवान
भोईर । प्रज्ञा लोखंडे । प्रतिभा राजानंद । उषाकिरण आत्राम
उषा हिंगोणेकर । लोकनाथ यशवंत । लहू कानडे । मोतीराम कटारे । जावेद कुरेशी
सागर जाधव । माधव सरकुंडे । प्रकाश मोगले । महेंद्र भवरे । अमोल बागूल
आनंद गायकवाड । राम दोतोंडे । अविनाश गायकवाड । उत्तम अंभोरे
काशिनाथ वेलदोडे । माधव धेंडे । गंगाधर मेश्राम । कैलास पगारे । राहूल वानखेडे ।
मधुकर जाधव । संजीवकुमार सोनवणे । विवेक मोरे । आ. सो. शेवरे
बबन लोंढे । भास्कर कांबळे । राजेंद्र लातूरकर । रमेश देशभ्रतार
गौरवकुमार आठवले । प्रभाकर गांगुर्डे । दामोदर मोरे । प्रकाश खरात
शशिकांत हिंगोणेकर । विठ्ठल शिंदे । आ. कि. सोनोने । संजय प्रल्हादराव डोंगरे इत्यादी.

समारोप

प्रकरण ४

दलित कविता: १९९१-२०००

पार्श्वभूमी

१९९१-२००० हे विसाव्या शतकाचे अखेरचे दशक फार मोठे उलथापालथीचे दशक आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थीकदृष्ट्या अनेक घडामोडी या दशकात घडल्या, मोठी सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली आहेत. या दशकात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या प्रक्रियेने भारतीय व्यवस्थेत आपले पाय घट्ट रोवले आणि आपली नखे बाहेर काढून सामाजिक-आर्थिक क्षेत्र पुरते ढवळून काढले. जवळपास अठरा वर्षांपासून सुरू असलेला नामांतराचा लढा निर्णायक ठरला आणि याच दशकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार झाला. याच दशकाच्या आरंभी कमंडलू यात्रा आणि कारसेवा निर्णायकी ठरली आणि बाबरी मशिदीचा विद्ध्वंस झाला. हा लोकशाहीवर झालेला मोठा आघात होता.

आणिबाणी ते गोध्रा हत्याकाडांपर्यंत देशाच्या सांस्कृतिक पर्यावरणात धर्म आणि जात या दोन गोष्टीच्या केंद्रावरच जगण्यात भारतीय माणसाला सुरक्षित वाटू लागले. दलित पँथरचा उदय आणि विघटन यामुळे दलित सामाजिक पर्यावरण अधिकच असुरक्षित झालेले दिसते. महिलांचे दशक, भारतीय राष्ट्रवादाचे हिंदुत्वीकरण, धार्मिक उन्माद, रथयात्रा ते त्रिशूलवाटप, माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट आणि बाबरी मशिदीचा विद्ध्वंस अशा अनेकविध गोष्टींनी गजबजलेला हा काळ आहे. स्वातंत्र्याची पन्नासी याच दशकात झाली. मंडल आयोगाच्या शिफारसीनंतर जातीय भान अधिकच सज्ज झाले. त्यामुळे राजकीय समीकरणे बदलली असली तरी प्रत्येक जातीचे संघटन एकेक नवा जातीय चेहरा घेऊन दाखल झाले. जातीनिर्मूलनाऐवजी जातीच्या सक्षमीकरणाला वेग आला. हे अस्वस्थ करणारे वास्तव या काळात पाहावयास मिळते. हिंदू धर्माचा भाग नसलेल्या मुस्लिम समाजात मुल्लामौलवीनी जोपासलेल्या जातीवादानेही फुटीर वृत्तीला वाव मिळाला. जेव्हा एखादे राज्य किंवा जातीय गट स्वत:ची विचारधारा किंवा संस्कृती श्रेष्ठ समजून तिच्या शक्तीच्या साहाय्याने प्रचार करतो. तेव्हा त्यातून सांस्कृतिक किंवा वैचारिक साम्राज्यवाद उदयास येत असतो. या काळात मूलतत्त्ववादी शक्तीनी आपले वैचारिक, सांस्कृतिक वर्चस्व समाजमनावर लादण्याचा सपाटा लावला. धार्मिक उन्मादाने टोक गाठून बाबरी मशीद उद्ध्वस्त केल्यानंतरच्या काळात ज्या भीषण दंगली झाल्या त्यामुळे मुस्लिम समाजात असुरक्षितता निर्माण झाली. बाबरी मशिद हे प्रकरण या देशाच्या एकात्मतेवर दूरगामी परिणाम करणारा प्रचंड आघात आहे. भारतीय सामाजिक, जातीय मानसिकतेने माणसाच्या जगण्याची आणि विचार करण्याच्या पद्धतीची वर्गवारी केली आहे. अशा कप्पेबंद पार्श्वभूमीवर या दशकातील दलित कविता उदयाला आली आहे.

'खाऊजा' या प्रक्रियेने दलित बहुजनांचे अस्तित्वच धोक्यात आणले. सरकारी उद्योगाची विक्री सुरू झाली.

गिरण्या बंद पाडून किंवा आजारी दाखवून गिरण्याची जमीन विक्रीस काढल्या गेली. त्या जागेवर मॉल्स उभे झाले. मल्टीनॅशनल कंपन्याचे वर्चस्व वाढत गेले. सक्तीच्या निवृत्तीचे प्रयोगही जोरात सुरू झाले. त्यामुळे कामगार उद्ध्वस्त झाला, देशोधडीला लागला. हळूहळू कष्टकरी वर्गाला भिकेस लावण्याचे काम या दशकाने केले. याच काळात स्त्रीदेह ही प्रदर्शनीय वस्तू आहे. जगाच्या पाठीवर सुंदर स्त्री फक्त भारतातच आहे, असे जगाच्या प्लॅटफॉर्मवर जाहिरातीसह माध्यमानी पुढे आणले. त्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय अन्याचार कमी झाले असे घडले नाही. उलट स्त्रीत्वाचा अधिक्षेप अधिकाधिक होत गेला. भँवरीदेवीवरील बलात्कार, दिल्ली येथील तंदुरकांड, स्त्रियांची अनेक जळीत प्रकरणे, जळगाव येथील सेक्सकँडल, चालत्या रेल्वेत स्त्रीवर झालेला बलात्कार इत्यादी. हा सर्व प्रवास म्हणजे स्त्रीजगतांच्या खच्चीकरणाचा हा कालखंड आहे असे स्पष्ट होते.

ग्रामीण जीवनात समाजिक, आर्थिक पैलू बदलत गेल्यामुळे शेतकरी वर्ग हा अन्नदाता आहे ही समजूत मोडीत निघाली. ओलीताच्या सोयीचा अभाव, कोरडवाहू शेती, शेतमालाला न मिळणारा रास्त भाव, यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरू झाले. कर्ज आणि पाणी या दोन गोष्टींमुळे शेतकऱ्यांच्या जगण्याची वासलात लागली. सामाजिक जीवनातील हा अंतर्विरोध दलित कवितेला अंतर्मुख करणारा ठरला.

प्रत्येक काळामध्ये समाज विकासाच्या टप्प्यावर कोणतातरी एक वर्ग लढाऊ होऊन उदयास येत असतो. एक वर्ग असा असतो त्याला पद, प्रतिष्ठा, सत्ता मिळत असते. एक वर्ग वंचिततेचा धनी ठरत असतो. समाज एकसंघ नसला की, अनेक समस्या निर्माण होतात. भारतीय समाज बहुजातीय आणि बहुजिनसी आहे. कला ही सामाजिक वास्तवातून उद्भवत असते. सामाजिकतेशिवाय कलाकृती निर्माण होऊ शकत नाही. सामाजिकता हे साहित्याचं सत्व आहे. साहित्यातील सामाजिकतेला विचारप्रणालीचा आधार असतो. जातीबद्ध समाजातील एक विशिष्ट संवेदना हा सामाजिकतेचाच एक भाग असतो. ''हिंदू समाज या नावाची वस्तू कोठेच नाही. तो केवळ जातीचा संग्रह आहे. प्रत्येक जातीला आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव आहे. तिथे जीवन किंवा विनाश हा तिच्यापुरताच मर्यादित आहे. एका जातीचा दुसरीशी काही संबंध आहे ही भावनाच नाही''[१]. म्हणून दलित कवितेत जातीअंताचा विषय केंद्रवर्ती राहिला आहे. प्रत्येकच काळात 'जात' या व्यवस्थेचे विविधांगाने तिच्या मानसिकतेसहित विश्लेषण केले आहे. या दशकाच्या कवितेतही हा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही.

या दशकात हिंदुत्ववाद अधिक आक्रमक झाला आहे. धार्मिक वसाहतवाद प्रबळ होत गेला. गोब्राह्मण प्रतिपालकाच्या नावावर उभ्या झालेल्या संस्था संघटनांनी पुरोगामी वसाहती आणि गावे आपल्या ताब्यात घेतली आणि पुरोगामी मोर्चे मंदावत गेले. जातीय गणिते बदलत गेली त्यातून हिंसाचाराचा अतिरेक झाला. रथयात्रेपासून त्रिशूळ वाटपापर्यंतचा प्रवास हिंसेला खतपाणी घालणाराच होता. त्यातून एक नवा उन्माद जन्माला आला आणि अल्पसंख्य समाजाचे अस्तित्व धोक्यात आले. बुद्धपोर्णिमेला अणुचाचण्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिपरिनिर्वाण दिनीच बाबरी मशीद उद्ध्वस्त करणारा असा हा काळ आहे. आध्यात्म आणि कर्मकांडाच्या तुरुंगात माणसाला डांबणाऱ्या या काळात आधुनिकता आणि विकासाचे मार्ग खुले झाले तरी आध्यात्माच्या झापडाचे निगरगट्ट कातडे या देशातून दूर होऊ शकले नाही. राष्ट्र म्हणजे केवळ माणसांची डोकी नव्हेत. किंवा राष्ट्र म्हणजे दगड, धोंडे, निसर्गही नव्हे! जिथे राबणारा हात असतो तिथे राष्ट्राला जिवंतपणाचे रूप प्राप्त होते. माणूस या मूल्याला अर्थ प्राप्त व्हावयाचा असेल तर भ्रष्टाचार, स्वार्थांधता,धनिक सत्तांचे केंद्रीकरण या सर्वांच्या विरोधात राबणारे कष्टकरी हात उभे झाले पाहिजेत असाही व्यापक विचार या काळात बळावताना दिसतो. थोडक्यात, हे दशक म्हणजे संक्रमण, स्थित्यंतर, दहशतवाद, दंगली, धर्मांधता अशा अनेकविध बाबींनी भरलेले आणि भारावलेले असे आहे. त्याचा परिणाम एकूण समाजजीवनावर जसा झाला तसाच साहित्यावरही झालेला आहे. याच काळात चळवळीची ध्येये रसातळाला गेली आहेत असेही निदर्शनास येते. त्याचाही मोठा परिणाम या दशकातील दलित कवितेवर झाला आहे. शंभरापेक्षा अधिक कवितासंग्रह या दशकात प्रकाशित झाले आहेत.

या दशकाने प्रज्ञा लोखंडे ही एक नवी कवयित्री दिली. तिच्याच आगेमागे लिहिणाऱ्या प्रतिभा राजानंद, उज्ज्वला तुपसुंदरे, उषाकिरण आत्राम, लता राजस, उषा हिंगोणेकर, सांची भगत, धम्मज्योती कांबळे, इत्यादी कवयित्री लेखन करताना दिसतात. याच दशकात निवडक स्त्रियांच्या कवितांचा 'युगाचे हुंदके' हा प्रतिनिधिक कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यात कुमूद पावडे, सुरेखा भगत, ज्योती लांजेवार, ज्योत्ना चांदगुडे, संध्या रंगारी, मीना गजभिये, माया वासनिक अशा जवळपास वीस कवयित्रींच्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. इतरही काही संपादित कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. उदा. नामांतर कविता (संपा. दामोदर मोरे), शतकाअखेरची कविता (संपा. सिद्धोधन कांबळे), ब्रेन (संपा. उज्ज्वला तुपसुंदरे), इ.

मागील दशकातील नामदेव ढसाळ, प्रल्हाद चेंदवणकर, लोकनाथ यशवंत, राम दोतोंडे असे काही कवी याही दशकात लेखन करताना दिसतात. तर नवीन पिढीतील अरुण काळे, बळवंत कांबळे, सिद्धार्थ तांबे, दीपक त्रिभुवन, उत्तम अंभोरे, आनंद गायकवाड, अविनाश गायकवाड यासारखे अत्यंत महत्त्वाचे आणि कसदार लेखन करून स्वत:चे वेगळे स्थान प्रस्थापित करून आपले वेगळेपण सिद्ध करणारे कवी या दशकाने दिले आहेत. मागील दशकातील कवितेपेक्षा या कवितेचा स्वर वेगळा आहे असे प्रत्ययास येते.

कवयित्री

✹ प्रज्ञा लोखंडे (जन्म ११ फेब्रुवारी १९६६)

या दशकात काही महत्त्वाच्या कवयित्री कवितालेखन करताना दिसतात. त्यापैकी प्रज्ञा लोखंडे ह्या आश्वासक कवयित्री आहेत. त्यांचा **अंत:स्थ**(१९९३) हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आणि दलित साहित्य जगताला महत्त्वाची कवयित्री प्राप्त झाली. 'अंत:स्थ' मध्ये अस्तित्वासह जगण्याचा संवाद अर्थपूर्ण ठरावा यासाठी समंजस आकांत मांडला आहे. भोवतालच्या निबीड अरण्यात स्वत:लाच शोधावे, सामाजिक कोलाहलात आपला आवाज शोधावा अशी जाणीव व्यक्त झाली आहे. या शोधात अंत:स्थ युद्धभूमीवरच्या पडझडीच्या, घुसमटीच्या, तुटत गेलेल्या संदर्भाच्या वर्तमानाचे संदेश वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. त्याचप्रमाणे स्त्रीजीवनाचा सामाजिक वर्तमान आणि समकालाचे संदर्भ देत वाचकांना अंतर्मुख करणारी कविता असे 'अंतस्थ'चे स्वरूप आहे.

या कवितेने स्त्रीसुलभ प्रणयी भावनेसोबतच स्त्रीपुरुष नातेसंबंधातील जवळीकता आणि दुराव्यासोबतच उणेदुणेही व्यक्त केले आहे. हा मोकळेपणाचा आविष्कार या कवितेचा विशेष म्हणता येईल. 'मी' 'तू'चे एक द्वंद्व साकार झाले आहे. त्याचप्रमाणे निष्पर्ण दिवसाचे ओरखडे, आतल्याआत गुदमरणारे कल्लोळ, आयुष्याचे हरवलेले संदर्भ अशा अभिव्यक्तीतून एकाकीपणाचा विफल भावही सूचित होतो. एकाकी वाटचालीचा प्रवास अस्वस्थ करणारा आहे. अंत:स्थाची ती वेदनादायी झुंज आहे. असे असले तरी अंत:स्थाचे अनेक कप्पे आहेत. हे कप्पे अनोळखी असल्यागत वावरत असतात. त्यात एक कप्पा जखमांच्या व्रणाचा असतो. काळा बरोबर रुतत गेलेले सल असतात. हे कप्पे जसजसे उघडले जातात तसतसे एकेक सत्य उलगडत जाते. त्या सत्याच्या मार्गावर एकाकी प्रदेशाच्या सरहद्दीशी दिलेली झुंज असते. सुनसान अंधाराची पडझड असते. दु:ख पाठीवर घेऊन केलेला प्रवास असतो. त्यातूनच स्त्रीजीवनाच्या वर्तमानाचे आरेखन सुरू होते.

स्त्रीत्वाचा मूक आक्रोश सजवण्यात
धन्य झालेली आपली महान संस्कृती
आणि जोहारापासून सतीपर्यंतचा हा प्रवास
इक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही, रूपकँवर

भारतीय संस्कृतीचे मोठेपण एवढे आहे, की ती जबरदस्तीने स्त्रीला चितेवर चढवते. धर्माचे भाले टोचून तिला घायाळ करते आणि मृत्यू पत्करण्यासाठी तिला निगरगट्ट बनविते. स्त्रीचा कोंडमारा करण्यात, तिला गुदमरवून टाकण्यात,

तिची मुस्कटदाबी करण्यात ही संस्कृती फारच अग्रेसर आहे. स्त्रीच्या अस्तित्वाला सुरुंग लावून अत्याचाराच्या फुलबाज्या उडविण्यात ही संस्कृती दंग झाली आहे. या संस्कृतीतील पुरुषी व्यवस्थेने स्त्रीच्या आयुष्याचे बोन्साय केले आहे. वर्तमानातही स्त्रीशक्तीला बांध घालणाऱ्या अनेक शक्ती प्रबळ झाल्या, अतिशय वेगाने कार्यरत झाल्या आहेत. अशा कोलाहलाच्या पार्श्वभूमीवर ही कविता स्त्रीचे आत्मभान जागृत करते.

एकविसाच्या शतकाच्या सांस्कृतिक चिखलात
आता वाढत चाललाय दिशाहीन कोलाहल
चहूबाजूनी चिणला जातोय तुझा बुलंद आवेग
तरीही तू निमुटपणे चालतेस
त्यांनी आखून दिलेल्या रस्त्यावरून
तरीही तू बोलत नाहीस दबलेल्या हुंकाराबद्दल
रक्ताच्या सुकलेल्या ओघळाबद्दल

स्त्री खच्चीकरणाच्या या काळात आपला आवाज तिने कंठातच जेरबंद केला असे हे निराशाजनक चित्र आहे. अशावेळी आखीव रस्त्याने पावले टाकणे बचावाच्या दृष्टीने सोयीचे असले तरी त्याचवेळी ते आत्मवंचनाही ठरत असते. सुखवस्तू कोषावर चढलेली ही काजळी वेळीच दूर होणे अगत्याचे आहे. म्हणूनच या कवितेने स्त्री जीवनाच्या पुढ्यात एक सवाल टाकला आहे, ''निळ्या आभाळाच्या अथांग सावलीला सांग केव्हा कवेत घेशील?'' कोषातून बाहेर पडण्याचेच हे आवाहन आहे हे आवाहन कृतीत उतरवले नाही तर ते स्वत्वासह सांस्कृतिक विश्वालाही दगा देणारे, आत्मघातही ठरू शकते. हे भान जागविण्याचा प्रयत्न येथे दिसून येतो. मात्र इतिहासकाळापासून सांस्कृतिक दिशावर चढलेली अमानुष काजळी दूर करण्याचा प्रयत्न केला तर धर्माची हिंस्त्र नखे ओरबाडून काढतात.

दिशांवर चढलेली अमानुष काजळी
अजून तशीच आहे शंबुका, रामराज्यात होती तशीच
मी वाट पाहतेय इतिहासाच्या पानावर
तू पेरून ठेवलेल्या सुरुंगाच्या दाहक स्फोटाची

शंबूकाने तपश्चर्या केली म्हणून दाशरथी राम कत्तलखोर झाला होता. देश स्वतंत्र झाल्यावरही दलितावरील अन्याय अत्याचार थांबले नाहीत. शंबुकाची कृती हा विद्रोह आहे. मोक्षप्राप्तीच्या अधिकारासाठी वर्णव्यवस्थेच्या विरोधात तो दंड थोपटून उभा राहिला. येथे शंबूकाच्या मिथकाला नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. वर्णव्यवस्थेचा बळी हा पारंपरिक अर्थ होता. विद्रोहाचा उद्रेक हा नवा अर्थ आहे. फुले आंबेडकरी जाणिवेने या आशयाला नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. शंबुकाप्रमाणे सिद्धार्थाचे मिथकही उपयोजित झाले आहे.

यशोधरा जगत राहिली मातीच्या पावलानी
पुन्हापुन्हा झेपावत राहिले उन्मत बहर
तिच्या मनाच्या काठावर आणि तू
उतरवत गेलास सहजतेने फुलांची ऐहिक वस्त्रे

यशोधरेचे येथे साधारणीकरण केले आहे. घर सोडून गेलेल्या नवऱ्यानंतर घरात उरलेल्या स्त्रीचे असावे तसे हे यशोधरेचे स्त्रीरूप. म्हणून आभाळाची उतुंग उंची गाठणाऱ्या सिद्धार्थालाच यशोधरेच्या वतीने प्रश्नांकित करण्यात आले आहे. 'तुला दिसली का सिद्धार्था, यशोधरेच्या लख्ख डोळ्यातून निथळणारी अपार तृष्णा?'' एका अर्थाने बायको लेकरांना सोडून जाणऱ्या, स्त्रीला त्यागणाऱ्या पुरुषाला विचारलेला हा प्रश्न आहे. या कवितेने वर्तमान संघर्षाच्या संदर्भात जसा मिथकांचा आधार घेतला आहे तसाच व्यवस्थेच्या क्रुर स्वभावाचा निर्देशही केला आहे. व्यवस्थेने भरडलेल्या दलित, शोषित, पीडित, स्त्रिया या साऱ्यांच्याच दु:खाचे हुंकार कवितेतून उमटत राहतात.

किती सहज बदलल्या त्यांनी माणसांच्या व्याख्या

गर्भातल्या हुंकारातच अडकवल्या जन्मजात गुन्हेगारीच्या बेड्या
भटकंतीत मावळलेल्या आयुष्यानी कमावली
चाबूक सहन करणारी उत्तम कातडी

जन्मत:च माणसाला गुन्हेगार ठरविणारी व्यवस्था माणसाची क्रुर विटंबणा करणारी आहे. माणसाला बंदिस्त करणाऱ्या या व्यवस्थेत स्वातंत्र्याची लिपी उगवलीच नाही. अश्या व्यवस्थेला एक समज आणि इशारा देण्याचे काम या कवितेने केले आहे. त्याचप्रमाणे प्रतिकात्म अभिव्यक्तीतून स्त्रीजगताचे भेदक वास्तव अधोरेखित करणे हे या कवितेचे उद्दिष्ट आहे.

दु:खाच्या पाकळ्या चुरडून मी माझे हात रंगवून घेतले
तेव्हापासून माझ्या शरीरभर वितळत गेला
काळोखाचा हिमनग

शरीरभर दु:खाचा काळोख विरघळत गेला आहे. हा काळोख एका स्त्रीपुरता मर्यादित नाही. तो साऱ्या स्त्री जगतालाच व्यापणारा आहे. आयुष्याचे अर्थ या अंधाराने लुबाडून नेले आहेत. त्यामुळे सारे प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. पुरोगामी वस्त्यांना या अंधाराने पराभूत केले आहे. चार भिंतीवरही अंधाराची पुटं चढत जातात आणि चार भिंतीआतली स्त्री या अंधाराने पुरती विस्कटून जाते. हुंदकाही ती बाहेर काढू शकत नाही. पुरुषी सत्तेने पसरवलेला, मनुस्मृतीने जन्माला घातलेला हा काळोख आहे. किंबहुना श्रुतीस्मृती ह्या पुरुषी सत्ता बळकट करणारी आयुधे म्हणूनच भारतीय समाजव्यवस्थेत यशस्वी झाली आणि चिरकालीक ठरली. पेशवाईपर्यंत ही सनातनी परंपरा अतिशय आक्रमकपणे प्रवासकर्ती झाली. तिला सवाल करून मार्गातिक्रमणाला बांध घालणारी स्त्रीमुक्तीच्या उद्धाराची तत्त्वज्ञाने यांचा उदय आणि त्या मार्गाने स्त्री स्वातंत्र्याचा होऊ घातलेला उद्‌घोष यामुळेच पोलादी चौकटीतील बंदिस्त कोकिळेला मुक्तीचा मार्ग सापडला

या कोकिळेने मात्र ही रूपेरी बेडी आता तोडलीय
करपलेल्या आम्रवृक्षावर ती आता कंठ फुटेपर्यंत गातेय
आणि भर शिशिरातही तिच्या निळ्या स्वप्नांना / सामोरी जातेय.

अशा प्रतिकात्मकतेतून या कवितेने बंडखोर स्त्रीरूपाचे दर्शन घडविले आहे. राखेतून फिनिक्सने जन्म घ्यावा तशी ही नवी वाटचाल आहे. कारण निळ्या स्वप्नांचे आश्वासन पारंपरिकतेच्या बेड्या तोडणाऱ्या तत्त्वज्ञानामुळे तिला आपसूकच प्राप्त झाले आहे. इतर कोणत्या कुबड्या घेण्याची गरज तिला उरली नाही.

आत्मटिका, नेतृत्वातील कातडीबचाऊपणा, मतलबी आणि स्वार्थीपणा यावर आघात करायलाही या कवितेने मागेपुढे पाहिले नाही. समष्टीशी असलेल्या नातेसंबंधाचा शोध म्हणजे आत्मशोध. दलित चळवळ आणि नेतृत्वाने हा संबंध तपासून पाहिला नसल्याची खंत या कवितेने व्यक्त केली आहे. स्त्री दु:खाच्या सर्व कप्प्यांना सामावून घेतले आहे. सांस्कृतिक अंधारात, धर्माच्या अंधारात, पुरुषी व्यवस्थेच्या जाळ्यात अडकलेल्या समस्त स्त्रीजातीच्या दु:खाला शब्द देणारी अशी 'अंत:स्थ'मधील कविता आहे, असे निश्चितच म्हणता येते!

या दशकातील कवितेत इतर अनेक कवयित्रीनी मोलाचे योगदान दिले आहे. **प्रज्ञा लोखंडे** यांच्या कवितेसह उल्हासिनी कांबळे यांचा **हरवलेला किनारा** (१९९१), लता राजस, **मन करावे मोकळे** (१९९९), धम्मज्योती कांबळे, **श्वास** (१९९७), उषाकिरण आत्राम, **म्होरकी** (१९९७), प्रतिभा राजानंद, **मला हवी असणारी पहाट** (१९९७), उषा हिंगोणेकर, **मुद्रालेख** (१९९९), सांची भगत, **भावनाचे प्रतिबिंब** इत्यादी कवितासंग्रहाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. **युगाचे हुंदके** या सुरेश साबळे संपादित दलित कवयित्रींच्या प्रातिनिधिक कवितासंग्रहात जवळपास वीस कवयित्रींच्या कवितांची ओळख होते. युगायुगापासून जिच्या अस्तित्वाची कोंडी करून माणूस म्हणून जगण्याचे हक्कच नाकारण्यात आले अशा भारतीय समाजजीवनातील स्त्रीदु:खाच्या हुंदक्याचा व्यापक पट आणि विस्तीर्ण क्षेत्र प्रत्ययाला येते. या हुंदक्याच्या प्रदेशात बदनाम नागव्या झोपड्या आहेत. चिरगुटाच्या लपवाछपवीत उघड्या पडलेल्या

माऊल्यांच्या रक्ताळलेल्या मांड्या आहेत. बायांचे मायांग बाहेर काढण्यासाठी इथे दंडुके वापरले जातात. मादीचा एकेक अवयव शिताफीने उचलला जातो. माणसे पशुसारखी वागतात, विव्हळ भावनांना कुस्करून गावाबाहेर फेकले जाते. इथे माणुसकीविहीन आलये असून मंदिराचे रंगमहाल करणारे धर्ममार्तंड आहेत. त्यांच्या दिवाणखाण्यात वासनांचे डोह तुडुंब भरले आहेत. रस्त्याची कूस ओस पडत चालली आहे. आत्मभानाच्या चिंध्याचिंध्या होत चालल्या आहेत. जगण्याची स्वप्न जायबंदी होऊन विव्हळत पडली आहेत. भाकरी आणि भूकेचे थैमान माजले आहे. रस्त्यारस्त्यावर छुपे हल्लेखोर दबा धरून बसले आहेत. स्त्रीजगताचे अतिशय अस्वस्थ करणारे भेदक वास्तव कवयित्रींच्या कवितांनी स्पष्ट केले आहे.

स्त्रियांच्या कवितांनी अनुभवक्षेत्राची व्याप्ती तर वाढविलीच त्याचबरोबर त्यांच्या कवितेतील भाषिक कृतीनी अधिक समर्थपणे अर्थप्रतिती घडविली. लक्षणीय अशा प्रतिमांचे संघटन केले. बेगडी परिवर्तनवाद्यावर प्रखर भाष्य केले. मूल्य ऱ्हासाच्या कडेवर समाजजीवन उभे असते तेव्हा पहिला कडेकोट स्त्रीजीगताचाच होत असतो. युगायुगापासून दैववादाच्या आवर्तात आणि प्रेषितांच्या कल्लोळात माणसे अडकून पडली. आध्यात्माच्या पोपटपंचीची चमकदार आख्याने आणि व्याख्याने प्रत्येकच काळात झडत राहिली. माणसाची मती मंद झाली. तो अविद्येच्या अनर्थाचा मालक झाला, पण म्हणून त्याने भोगाची आलये सजविण्याचे थांबविले नाही. भोगालयात शोभेची वस्तू म्हणून त्याने स्त्रीला डावावर लावले.

काचेची वस्तू म्हणून की काय
काचेच्या बांगड्याचं तिच्यावर बंधन आलं
काचघरातल्या मॉडेलसारखं राहणं आलं
पण आपण काच नाही हे तिला कळून चुकलं
काचेच्या बाहेर पहायला लागल्यापासून
(**सुरेखा भगत**)

अशाप्रकारे अस्तित्वभानाचा प्रत्यय या कवितने दिला आहे. आत्मभानातून बदलासाठी सज्ज झालेले हे स्त्रीमन एकाएकी घडलेले नाही. बुद्ध-फुले-आंबेडकर हे महापुरुष त्यासाठी त्या त्या काळाच्या पार्श्वभूमीवर जन्माला यावे लागले. हे घडल्यामुळेच स्त्रियांचा आविष्कार सांस्कृतिक जगातील अनेक गोष्टींना हात घालणारा ठरला. समकालीन जीवनाशी या कवितेची नाळ जोडलेली आहे. समकालीन जीवनात धर्माच्या नावावर घरे भरणारी प्रवृत्ती दिवसेंदिवस अधिक प्रबळ होत गेली. धर्माच्या आवरणाखाली बाईला दडपून टाकावे तसे गुन्हेगारांचे गुन्हेही दडपले जातात. हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेने अनेक पातळ्यांवरून स्त्रीचे खच्चीकरण केले आहे. या व्यवस्थेने झेपावणाऱ्या अस्तित्वाला पंखहीन केले आहे. रुढी जोपासणाऱ्या मानसिकतेतून ही व्यवस्था निगरगट्ट झाली.

मागीतले तू म्हणून मोठ्या आनंदाने
माझे पंख मी तुला दिले
ते जपून ठेवण्याच्या निमित्तानं कड्या कुलपात बंद केलेस
आवश्यकता भासली तेव्हा तुझ्या पंखाबरोबर तू माझेही धारण केलेस
आता प्रचंड अंतर आहे आपल्यात
वेगवान गतीनं तू आभाळी झेपावलास तर
पंखहीन मी धरणीवर कोलमडले
(ज्योत्स्ना चांदगुडे)

पंखहीन करणाऱ्या रितीला धर्मग्रंथाचा आणि मनूच्या कायद्याचा प्रबळ आधार आहे. या प्रक्रियेत 'देव या संकल्पनेने मोठाच हातभार लावला. अस्तित्वात नसलेल्या देवाचे अवडंबर माजवून एकूण मानवी समाजाला वेठीस धरणारी पारंपरिकता हजारो वर्षांपासून कार्यरत आहे. एकोणिसाव्या, विसाव्या शतकात देवदेवतांपासून संताळ्यांपर्यंत

सर्वांचा दंभस्फोट करण्याचे कार्य फुले-आंबेडकरांनी केले. त्यांच्या प्रेरणेतून परिवर्तनवादी लढेही गतिमान झाले. या लढ्यातून जो विचार सर्वदूर पोहचला त्यातून जाणीवजागृतीचे मोठे कार्य साधता आले. देव, दगडाला नाकारणारी जाणीव त्यातून अधिक प्रबळ होत गेली. निरक्षर आणि अडाणी माय-माऊल्यांनाही या जाणिवेने झपाटले. सत्य-असत्यामधील तरतमभावाचे भानही त्यातून प्राप्त झाले. अडाणी मायबापही त्यामुळे सतर्क झाले. या सर्वांच्या परिणामातून स्त्रियांच्या कवितेत दगडदेवाला नाकारणारी आई, पोरगी परक्याचं धन म्हणून तिच्या शिक्षणाचा उपहास करणारा भाऊ, जिद्दीनं शिक्षण पूर्ण करणारी बहीण अशी व्यक्तिमत्त्वे, नातेसंबंध अधोरेखित झाले आहेत.

स्त्रियांच्या कवितेचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे पारंपरिक संस्कृती आणि समकालीन सांस्कृतिक वास्तव याची सांगड या कवितेने घातली आहे. सांस्कृतिक अंतर्विरोधही स्पष्ट केले आहेत. तसेच गुलामीत जखडून ठेवणाऱ्या संकल्पनांबद्दल संतप्त भावनांना वाट मोकळी करून दिली आहे. उदा.

तू तर वांझ संस्कृतीचा बिजांड
वंश न वंश मी तुझं लिंग गळ्यात मिरवते...
(माया वासनिक)

मंगळसुत्रासारखा अलंकार आणि लिंग या एकाच गुलामीत्त्वाच्या दोन प्रबळ बाजू आहेत. या विषयीचा संताप आणि विद्रोही आवाज किती शिगेला पोहचू शकतो याचा प्रत्यय या कवितेनी दिला आहे. पुरोगामित्वाच्या नावाखाली गुलामीचे अलंकार सजविणाऱ्या प्रवृत्तीवरचे स्फोटक भाष्य केले आहे. केवळ हुंदक्याला वाट मोकळी करून देणारी ही कविता नसून प्रकाशगर्भ ओढीने गतिमान होऊ पाहणारी, नव्या युगाची संगीन होऊन संघर्षाच्या मैदानात अंधारभेद करायला निघालेली ही कविता आहे.

क्रांतीज्योत हाती धरून तिनं
अंधारशिडीच्या पहिल्या पायरीवर पाय ठेवलाय
अंधारभेद व्हायला अवकाश असेल कदाचित
पण किरणांच्या दिशेने प्रवास सुरू झाला आहे
(ज्योत्सना चांदगुडे)

अशा पार्श्वभूमीवर या दशकाच्या शेवटच्या टप्प्यातील **प्रतिभा राजानंद** (जन्म २७ ऑक्टोबर १९६८) यांच्या **मला हवी असणारी पहाट** या काव्यसंग्रहाचा विचार करता येईल. कारण हा संग्रह एक नवा चेहरा घेऊन दाखल झाला. गुलाम लोकवस्तीच्या भूप्रदेशावर या कविताची नांगरणी झाली आहे. या प्रदेशातील जगणारांच्या चेहऱ्यावर अंसतोषी जाहीरनामे आहेत, ओठावर स्मशानहास्य आहे. आणि डोळ्याशी ठिणगणारा बारुदसाठा आणि मनातल्या वणव्याचे काफीर काफिले आहेत. इथला दिवस वांझ स्त्रीच्या डोळ्यासारखा रखरखीत आणि विधवा सांज घुटमळत राहणारी आहे. इथल्या बिनचेहऱ्यांच्या असंख्य सख्या बेघर झाल्या आहेत. आयुष्यच एक दुखणे होत गेले आहे. एकुणातच इथल्या सीमाहीन नकाशात गावशीव आणि जीव नाही. अशा सख्यांचे या प्रदेशातील गुदमरणे, होत असलेली घुसमट आणि झालेली कोंडी फोडण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. केव्हातरी आयुष्यात जगणे सामील होईल, श्वासाश्वासात गोठलेले सूर्य धगधगू लागतील असा दुर्दम्य आशावाद प्रतिभा राजानंद यांच्या कवितेने प्रकट केला आहे.

या कवितेत डोकावणारी 'सखी' हे स्त्रीजातीचे, स्त्रीत्वाचे प्रतीक म्हणून साकार होते. सखीशी साधलेल्या संवादातून कवयित्रीचे संवेदनशील मन अधिक आक्रमक बनते. कधी हळूवार होते, कधी सखीच्या मनावर फुंकर घालते, कधी विद्रोहाने पेटून उठते तर कधी सांस्कृतिक वेदनांच्या आवर्तात गरगरते, मात्र वेदनांचे आभाळ मनावर कोसळले म्हणून हे मन अगतिक किंवा परागंदा होत नाही. हे या कवितेचे पुर्वसूरींच्या स्त्रीवादी आविष्कारापेक्षा जाणवणारे नवेपण नजरेत भरणारे आहे. नव्या पिढीचा कवितेचा चेहरा आणि नवता सिद्ध करणारे आहे.

नाकर्तेपणा आणि निष्क्रियता, चाकोरीबद्ध जगणे किंवा आपल्यापुरते वलय आखून घेणे, आत्मकेंद्री वृत्ती

वाढीस लागून आपल्या वलयांकित ओरडण्याला गर्जनेचे रूप प्राप्त करून देण्याचा आटापिटा करणे, स्वत:ची पाठ स्वत:च थोपटून घेणे, अशा गोष्टीनाच पराक्रम मानण्याची अपप्रवृत्ती समाजमनात वाढीस लागली. अशा प्रवृत्तीच्या कुपमूंडक धारणेवर जबरदस्त आघात करणारी कविता म्हणून या कवितेचे मोल अधिकच वाढले आहे. विशेषत: शहरी वस्त्र पांघरलेल्या प्रदेशातील जाणीवकेंद्रात आपले बस्तान बसविणाऱ्या प्रवृत्तीचा ठळक निर्देश या कवितेने केला आहे. पांढरपेशी जाणीवक्षेत्रात आपलाही पांढरपेशेपणा जाहीर करणे, वास्तवाचे आणि अवतीभोवतीच्या परिस्थितीचे भान न ठेवता आपले आत्मकेंद्रीपण कुरवाळीत बसणे यालाच आयुष्य असे गोंडस नाव बहाल करणे, अशा समजुतीत वावरणाऱ्या सामाजिक जगाचा प्रचंड उपहास केला आहे. वास्तविक स्त्री ही एक शक्ती आहे, मात्र पुरुषी घातपाताने स्त्रीचा शक्तीपात केला. व्यवस्थेने तिला चालण्याचे रस्ते नेमून दिले. वाकडी वाट करण्याचा अवसरच तिला मिळू दिला नाही. त्यामुळे व्यवस्थेच्या पाठीराख्यांना चरण्यासाठी कुरण मोकळे झाले. आधुनिकता आली असली तरी व्यवस्था मात्र पारंपरिकता जोपासणारीच असते. पारंपरिकतेत व्यवस्थेचे हितसंबंध गुंतलेले असतात. व्यवस्था बांध घालते आणि आपली म्हणावी अशी नाती बिथरलेली असतात -

आपापले रस्ते शोधू म्हटलं की / बिथरतात मायबाप तुझेमाझे
पेटू पाहतात कुणी / पेटवू पाहतात तुला मला
सखे, रिंगण घुमताना हत्याराचंही भान ठेवायला हवं
शत्रूचं वैर शत्रूत्व ठरतं, आपल्यांचं काय करावं?

ही खरी गोची आहे. त्यामुळेच रुळलेल्या आवर्तात गरगरत राहते हेच जगण्याचे संचित ठरते. तिथूनच जगण्याच्या कोंडमाऱ्याची सुरुवात होते. पुरोगामीत्वाच्या नावाखाली सनातनत्वाची जोपासना करू पाहणाऱ्या कावेबाज शक्ती आणि प्रवृत्तीच्या स्वरूपाची पोलखोल करतानाच समकालीन जीवनातील वास्तवाला हात घालणे हे या कवितेचे महत्त्वाचे कार्य आहे. स्त्रीमुक्तीचा क्रांतीकारी विचार मांडणाऱ्या महापुरुषांचा वारसा सांगणाऱ्या समाज घटकानेही मूलतत्त्ववाद्याच्या गोटात स्थिरावयाला सुरुवात केली आहे. अशा समकालीन अस्वस्थ करणाऱ्या वास्तवाचा वेध कवितेने घेतला आहे. या शतकाच्या शेवटच्या पर्वात परकीय मदतीवर फोफावलेल्या स्वयंसेवी संस्था संस्कृतीने पुरोगामी चळवळीचे सत्व काढून घेतले. संधीसाधू करिअरिष्टांचा एक नवाच वर्ग या काळात उदयाला आला. अनेक स्वयंसेवी संस्था एनजीओ कल्चरच्या बळी ठरल्या. अशा संस्थाना मठाचे स्वरूप प्राप्त झाले. अशा नवप्रस्थापितांना, त्यांच्या मठांना नकार देणारी डोळस जाणीव व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे स्वकीय जगातील विरोधाभासांवरही बोट ठेवले आहे.

आपल्या आभाळाची सारी निळाई
दिवसेंदिवस कुठं हातात तर कुठं भगव्यात शिरतीय
आपली परिवर्तनासाठीची लढाई जन्मन्यापूर्वी गर्भातच मरतीय
क्रांती अन् संघर्ष नुसतेच हात चोळताहेत
समरसतेच्या नावाखाली वाटेल तिथे लोळताहेत....

बाबासाहेब आंबेडकरांशी संवाद साधत वर्तमानकाळाचे भेदक वास्तव या कवितेने मांडले आहे. समरसतेच्या जहरी कारवायांना फितूर झालेल्या मंडळीनी फुले-आंबेडकरी विचार आणि चळवळीची दिशाभूल केली. चळवळीचा चेहरा चुकीच्या दिशेला वळविला. त्यातून मूलतत्त्ववाद्यांना मोठेच बळ मिळाले. सनातनी उजव्या चळवळी यशस्वी ठरताहेत, या विपरीत वास्तवामुळे सांस्कृतिक स्थित्यंतराचे प्रतिबिंब साहित्यात उमटणे क्रमप्राप्त ठरते. अशावेळी कवितेतील प्रतिमाही विपरीत अर्थाच्या वाहक ठरतात, उलट्या प्रतिमा सरळ आणि सरळ प्रतिमा उलट्या होतात. उदा.

उलथून टाकावं डोळ्यांना अन्
लटकवावं आपल्याच हातावर वटवाघळासारखं
इथं उलटी प्रतिमा सरळ दिसते अन्
सरळ पुढे जाताना वाटा उलटतात पावलांवर

हा सांस्कृतिक आणि वैचारीक उलथापालथीचाच अपरिहार्य परिणाम असतो. या कवितेने प्रतिमा संघटनातून विपरीततेचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे. त्याचप्रमाणे एक वेगळे सौंदर्य घेऊनही ही कविता साकार होते. उदा.

सूर्याचे दरवाजे आमच्यासाठीच उघडे टाकण्याची प्रथा
केव्हाही नव्हती माझ्या देशात
परंपरेनचं घातलं जाई काळोखाचं काजळ आमच्या डोळ्यात
पापण्यापापण्यात जगण्याची स्वप्न जायबंदी होऊन विव्हळत
अन् पाखरांच्या पायात बेड्या न घ्यालण्याची प्रथा
केव्हाही नव्हती माझ्या देशात
आज डोळ्यातले काळोखगच्च नाले वाहताहेत
पातळी ओलांडून धोक्याची
शक्यता आहे, वाहतील जुन्या चौकटी दारांच्या
कोसळतील भिंती मोठ्ठाल्या जुनाट घरांच्या
उशिरानच खरं तर...पण आमचेही डोळे येत आहेत. ...

स्त्री स्वातंत्र्यास लायक आहे हे पहिल्यादा बुद्धाने सांगीतले. याच विचारतत्त्वाचे एक क्रांतीकारी रूप फुल्यांच्या विचारतत्त्वात साकार झाले. त्याचेच प्रतिबिंब हिंदू कोड बिलात उमटले. या तात्त्विक अधिष्ठानाने आणि कर्तबगार इतिहासाने एक दृष्टी इथल्या स्त्री जगताला दिली. ही दृष्टी नव्या जगाच्या, नव्या जगण्याचे मार्ग दाखविणारी आहे. हाच विचार एका नव्या अभिव्यक्ती पद्धतीने या कवितेत व्यक्त झाला आहे. उशिरा का होईना परंतु आत्मभान जागविणाऱ्या क्रांतीतत्त्वाने पारंपरिकता उलथवून टाकण्याची दृष्टी प्राप्त होत असते. कोणत्या चौकटी उद्ध्वस्त करायच्या, कोणत्या भिंतीना तडे द्यायचे, खिळखिळे करायचे याचे धडे आणि दृष्टीकोण तात्त्विक अधिष्ठानानेच दिला आहे. त्यातून एक नवा आत्मविश्वास प्राप्त झाला नव्या पहाटेकडे घेऊन जाणारा! या कवितेने वैश्विक पातळीवरील पुरुषी प्रवृत्तीचा शोध घेतला आहे.

इथे सारे सीमाहीन नकाशे तुडवू पाहतेय आयुष्याचे
कोणत्याही नकाशात तुझं-माझं गाव नाही
शिव गावाची आपल्यासाठी तुला मला जीव नाही
आपल्यासाठी भिंती दगडी अन्
त्याचं आभाळ आखीव नाही.....

तथाकथीत सुसंस्कृत व्यवस्थेने स्त्रीला दुय्यम, तिय्यम स्थानावर आणून ठेवले. काडीमोड घटस्फोट, डिव्होर्स, रेडलाईट एरिया ते अबार्शन सेंटर्स ही या शतकातील सिव्हिलाईज्ड पुरुष सत्ताक संस्कृतीची निर्मिती आहे. स्त्रियांना वाळीत टाकणाऱ्या क्लृप्त्या आहेत. स्त्रीचा गौरव करून तिला आपल्या नियंत्रणात ठेवण्याचा कावेबाजपणाही पुरुषी सत्तेने यशस्वी ठरविला आहे. पुरुषप्रधान वर्णव्यवस्थेमुळे स्त्रीस्वातंत्र्य आणि हक्काची सर्व पातळ्यावर नाकेबंदी झाली आहे. शेवटपर्यंत स्त्रीची किंमत शरीरानेच करणारा पुरुष इथून तिथून सर्वत्रच आहे. शतकाच्या प्रवासात पुरुष उत्तरोत्तर आदिम आणि हिंस्त्र होत जाणारा आहे. म्हणून 'त्यांचे आभाळ आखीव नाही' ही वैश्विक पातळीवरील पुरुषी वृत्तीचा शोध घेणारी जाणीव अतिशय समर्थपणे प्रतिभाच्या कवितेतून प्रकट झाली आहे. थोडक्यात, व्यवस्थेने घातलेले बांध उद्ध्वस्त करून वाटचाल करू पाहणाऱ्या स्त्रीत्वाचे रूप आणि नव्या पहाटेचे रूप हे द्वैत या कवितेने प्रकट केले आहे. नव्या जगाचे, जगण्याच्या उभारीचे एक नवे आश्वासन घेऊनच ह्या नव्या पहाटेचा उदय झालेला असेल, अशा पहाटेचा ध्यास आणि हव्यास बाळगणारी प्रचंड आशावादी कविता म्हणून 'मला हवी असणारी पहाट'मधील कवितांचे मोल अधिकच आहे.

फुले आंबेडकरी प्रेरणेतून साकार झालेल्या स्त्रीवादी आविष्काराचे दलित कवितेच्या प्रांतात मौलीक स्वरूपाचे योगदान आहे. या स्त्रीवादी आविष्काराने जन्म-मृत्यूच्या प्रवासात दु:खाची साथसोबत करणाऱ्या असोशी स्त्रीत्वाचं जिवंत चित्र साकार केले आहे. स्त्रीकडे भोगाची वस्तू म्हणून पाहणाऱ्या व्यवस्थेची वखवख, पुरुषातील पशूत्व, पुरुषी शोषक

क्षेत्राचे स्वरूप धिटाईने उघड केले आहे. स्त्रीच्या जगण्याला निर्थकता प्राप्त करून देणाऱ्या निर्ढावलेल्या मूल्यांचा वेध या स्त्रीवादी आविष्काराने घेतला आहे. स्त्रीमुक्तीच्या उद्गात्यांना देवत्त्वाच्या मखरीत बसवू पाहणाऱ्या सनातन व्यवस्थेच्या मानसिकतेचा, धर्माच्या आवरणाखाली बाईला दडपून टाकणाऱ्या समकालीन वास्तवाचाही वेध घेतला आहे. स्त्रीजगताचे सांस्कृतिक भान जगविण्याचाही प्रयत्न केला आहे. स्त्रीसुलभ अनुभूतीला संघर्षशील विचारप्रणालीशी जोडून नव्याच अर्थाची प्रतिती घडविली आहे. देव, धर्म, स्मृती-श्रुती, व्यवस्थेने पावलोपावली उभारलेले सुरुंग, कावेबाज वाटा, गनिमी रस्ते इ. सर्व गोष्टींचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, कधी सूचक तर कधी स्पष्ट आणि परखड विवेचन केले आहे.

ऱ्हासकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाचा फार मोठा परिणाम या कवितेवर झाला असून. त्यामुळेच वैचारिक उलथापालथ आणि विपरीत समाजवास्तव यामुळे या कवितेतील प्रतिमाविश्व समृद्ध झाले आहे. स्वकीय जगातील अंतर्विरोधाचे नेमके आकलन या कवितेने मांडले आहे. पांढरपेशीपणाचा प्रचंड उपहास केला आहे. वैश्विक पुरुषी वृत्तीचा वेध घेतला आहे. व्यवस्थेने घातलेले बांध उद्ध्वस्त करून वाटचाल करू पाहणाऱ्या स्त्रीत्वाचे रूप आणि नव्या पहाटेचे रूप असे द्वैत या कवितेने मांडले आहे. हुंदक्याना वाट मोकळी करून देतानाच या कवितेने नव्या पहाटेचा ध्यास आणि हव्यास उराशी बाळगला आहे.!

✸ उषाकिरण आत्राम (जन्म १८ एप्रिल १९५४)

उषाकिरण आत्राम यांचा **म्होरकी** हा संग्रह १९९७ मध्ये प्रसिद्ध झाला. 'म्होरकी'बद्दल कवयित्री लिहिते, '' 'म्होरकी' ही गोटुलातील हुशार जिद्दी, निर्भिड स्त्री नेतृत्व करणारी नायिका 'मोट्यारीन' या गोंडी नावाने ओळखल्या जाते. तिचेच मराठी नाव 'म्होरकी' ठेवून रानावनातल्या सखी सयांना एकत्र आणून समाज जागृती, स्त्री जागृती करण्यासाठी, शोषण, अन्याय, अत्याचार, पिळवणूक, छळ या सगळ्यांचा प्रतिकार करण्यासाठी, शोषणाविरुद्ध, अन्याय-अत्याचाराविरुद्ध बंड पुकारून क्रांती करण्यासाठी दलित, कष्टकरी, आदिम, श्रमिक शोषित, पाडित महिलांचे दुःख वेशीवर टांगण्यासाठी, इथल्या समाजव्यवस्थेवर प्रहार करणारी, इथल्या स्त्रीजीवनावर अन्याय करणाऱ्या सामाजिक रुढी बांधनावर घाव घालणारी माझी 'म्होरकी' जराही भीत नाही.''[१०] कवयित्रीचे हे मनोगत 'म्होरकी'मधील कवितेचे प्रयोजनच स्पष्ट करणारे आहे. शोषक व्यवस्थेच्या विरोधात स्त्रीजीवनाचे प्रतिनिधित्व करणारी अशी ही कविता आहे. फुले-आंबेडकर साहित्याशी बंधुत्वाचं नातं असल्याचेही कवयित्रीने नमूद करून ठेवले आहे. ''फुले आंबेडकर साहित्याशी स्वतःच नात त्या बंधुत्वाशी नाळाचं नातं जुळवूनच माझी लेखनी मी चालवित आहे. ''[११] म्हणूनच कवयित्रीने आवाहन केले आहे, 'सख्यांनो-निर्धार करू या, आपण-सावित्री फुले होऊ या', एवढेच नव्हे तर बाबासाहेब आंबेडकरांमुळेच जगण्यासाठी श्वास मिळाला असल्याची कृतज्ञतेची जाणीव व्यक्त केली आहे.

''बाबा! तू माझ्या ओठावरचा सूर्य आहेस''!
माझ्या नेत्राचा बुबुळ आहेस / माझ्यात रुजले आहे तुझे अस्तित्व
माझ्या हृदयात साठले आहे तुझे मातृत्व
मला जगायला तूच दिलास श्वास

आंबेडकरी व्यक्तित्व आणि विचारांशी एकरूप होणारी ही जाणीव आंबेडकरांना सर्वस्व मानते, 'पेलणार आहे तू दिलेली पेटती मशाल' असे कृतिशील व्हायला भाग पाडते. एवढेच नव्हे तर 'तुझ्या रक्ताचा वारस मीच आहे' असे घोषित करते, तेव्हा फुले आंबेडकरी विचार प्रेरणेतूनच ही कविता आकारास आली आहे हे स्पष्ट होते. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाचे आत्मभान जागृत केले. आत्मभान जागृतीतून माणसांची मने पेटून उठली. उद्याच्या संघर्षासाठी ती सिद्ध झाली 'म्होरकी'मधील कविता संघर्षाची विविध रूपे आणि विद्रोहाचे पैलू स्पष्ट करते

तुमची संस्कृती संस्कार परत करतोय
आम्ही आमचे जग निर्माण केले आहे
आम्ही आमचे जगणे मरणे ठरविले आहे

आता कोणीही आम्हाला थांबवू शकणार नाही

अशा निर्धाराने, प्रस्थापित व्यवस्थेला नाकारून स्वत:च्या जगाचा उद्घोष करते आणि या जगाला बुद्धाचा मार्ग दाखविते. आदिमांचे, आत्मभान जागविणाऱ्या या कवितेने बुद्धाचा विचार स्वकीयांच्या कानामनात भिनविला आहे.

तुम्ही असे कसे? दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिता?
त्याच ओंजळीने एकलव्याच्या अंगठ्याचे रक्त पितात
कुणाच्या मंत्रतंत्र उपदेशवाणीवर भाळू नका
आपणच आपले जगणे मरणे ठरवा
आपणच आपला अत्त दीप व्हा

स्वयंदीप होण्याचा हा मार्ग बुद्धाने दाखविला आहे. या विचारांचेच वहन ही कविता करते. कावेबाज व्यवस्थेच्या कारनाम्यांना बळी पडता कामा नये, आपण आपले जगणे मरणे ठरविले पाहिजे. स्वतंत्र बुद्धीने विचार करायला शिकले पाहिले असे या कवितेचे आवाहन आहे. वर्तमानाच्या नायकाला आवाहन करणाऱ्या या कवितेने शब्दाचे सामर्थ्य आणि शब्दभान मजबुतपणे व्यक्त केले आहे.

पेटू दे शब्दाच्या वाती / उजळूदे मनामनांची नाती
शब्दच शस्त्र शब्दच अस्त्र
शब्दच युद्ध शब्दच बुद्ध
हे वर्तमान नायका! सूर्योदय तुझ्याकडे सोपवित आहे
हे शब्दशस्त्र तुझ्यासाठी देवून जात आहे
इवल्या पात्याचे, सूर्यतेजाच्या नात्याचे

असे शब्दाला एक आगळे वेगळे व्यक्तिमत्व प्राप्त करून दिले आहे. या शब्दाच्या माध्यमातून स्वयंसिद्ध होण्यासाठीचे आवाहन करतानाच यातना सोसणाऱ्या लोकांनी कृतिशील झाले पाहिजे, माणूस म्हणून आपले हक्क प्राप्त करून घ्यायचे असतील तर आक्रोश करून किंवा हात जोडून हक्क मिळत नसतो. त्यासाठी मातीत रुतलेले हात आकाशाला टेकवावे लागतात. दोन हात करण्याची तयारी ठेवावी लागते. असे युद्धखोरीचे प्रशिक्षणच जणू ही कविता स्वकीयांना देते.

आता मुजरा करणारे हात आणि
नत होणारे डोके आम्ही शाबूत ठेवू
त्याच हाताशी पाजवलेले शस्त्र ठेवू /

अशा निर्णयाप्रत ही कविता आली आहे. या कवितेने पोटभरू पंढाची खिल्ली उडवितानाच मृतांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या प्रवृत्तीवर आघात केले आहे. संघर्षसिद्धीसाठी म्होरकेपण करताना स्वकीयांना एकत्रित येण्याचे आवाहन 'म्होरकी' ने केले आहे. एकजुटीचे तत्त्वज्ञान, संघशक्तीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. 'अनंत हाताचे शक्तीयुद्ध पुकारल्यानंतर हाकाऱ्यानं रान धावेल, सर्व वाटा एकत्र येतील आणि लाखपावलांची लाट पाहून 'दुधारी शस्त्र उगारणारे हात खाली येतील' तेव्हा पुढचे आपणच ठरवू 'निघालेच पुढे मी, पाठीमागून येऊ द्या मोर्चा'! असे म्होरकीने पाऊल उचलेले आहे. त्यातून तिचे क्रांतदर्शित्वच स्पष्ट होत जाते.

'म्होरकी'तील कविता म्हणजे एका अर्थाने रानाची मनोगतेच आहेत. 'माझ्या रानाला केव्हा डोळे फुटेल'? असा सवालही उपस्थीत केला आहे. अवघे रानच प्रकाशाचे डोळे बनू दे अशी अभिलाषा व्यक्त केली आहे. स्त्रीजीवनाचे प्रतिनिधित्व या कवितेने केले आहे. पदोपदी संघर्षाचाच मंत्र दिला आहे.

मी तुमची म्होरकी आहे
फेकून द्या ते फाटक्या पदरांचे बुजगावणे
सोडून फेका बंदिस्त माळांचे जोखाडणे

नजरेतील भिती टाकून द्या / ही घ्या पेटती मशाल
मी निघाले - पाठीमागून तुम्ही या.

चौकाचौकात, चोरवाटेवर शस्त्र उगारून मक्तेदार वाट पाहात आहेत. त्यांचीच शस्त्रे हिसकावून घेतली पाहिजेत असा आदेश देऊन ही 'म्होरकी' सर्वांच्या पदरात सूर्याचे वाण देते आणि सख्यांना सावध करते. असा संघर्षाच्या वाटेवरचा अखंड प्रवास या कवितेने केला आहे. आपल्या लेकीला समज देतानाही पेटण्या, जळण्याचेच तत्त्वज्ञान मनात पेरण्याचे काम या कवितेने केले आहे. ही म्होरकी आपण सूर्याचे वारसदार असल्याचे अभिमानाने सांगते आणि मुंडी मुरगाळलेल्या माना पाहण्यापेक्षा सापासारखे तात्काळ फणा काढणं, आणि डोळे शाबूत ठेवणं शिकलं पाहिजे असा सल्ला देऊन आपल्या माणसांना विद्रोहरत बनविते हे या कवितेचे बलस्थान आहे.

स्त्रीला भोगाची वस्तू समजणारी सार्वत्रिक प्रवृत्ती कशी आहे याचे दर्शन या कवितेने घडविले आहे. जन्माला आल्यापासून प्रत्येक टप्प्यांवर दुसऱ्यांच्याच कुबड्यांचा आधार घेऊन स्त्रीने जगायचे अशी सोय प्रस्थापित व्यवस्थेने करून ठेवली. स्त्रीला एक खेळणे समजून तिला सर्व अधिकारांपासून वंचित ठेवले. घरादारात, बाजारात अत्र तत्र सर्वत्र पुरुषी व्यवस्थेचा तिला बळी ठरावे लागते. बाप, भाऊ, नवरा, पाटील, सावकार, जमीनदार, शिंपी, सोनार, रेंजर या साऱ्यांनीच आदिम स्त्रीला ओरबाडून खाल्ले आहे. ही रानातल्या स्त्रीची अवहेलना. 'कुणीही यावे टिकली मारून जावे' असा तिच्या जीवनाचा छळवाद मांडला आहे. या भीषण सत्याचे, स्त्री अत्याचाराचे वास्तव मांडून अस्वस्थ करणारा अनुभव या कवितेने दिला आहे. मूक वेदनेचा इतिहास उजागर करून स्त्रीमुक्तीचा जाहीरनामाच प्रसिद्ध केला आहे. स्त्रीजगत आणि पुरुषी व्यवस्था असे द्वंद्वं येथे प्रत्ययाला येते. 'जिवंतपणीच 'मरण' मरणे, नवऱ्याच्या मरणापूर्वी आहेव मरणाची आस बाळगणे, अंधारयात्रेत अत्याचाराचे वार पचविणे. या सर्व गोष्टींना मुठमाती देऊन, अत्याचाराचे हे झाड उपटून इथे सूर्यशक्तीच्या वेलीचे रोपण करणे' हाच जाहीरनामा राबविण्याचे वचन या कवितने दिले आहे. 'स्त्रीशक्ती म्हणजेच निर्माता' हे या जाहीरनाम्याचे ब्रिद आहे.

पुन्हा एकदा रानाला सुलगावून
कुशीत मातीच्या गडप केलेली संस्कृती शोधून
लिहून काढावा लागेल आपला सुवर्णमयी इतिहास
उभे करावे लागतील रानावनातले नेमबाज अंगठे
साऱ्या मोक्यावरची आगे मोहळ उठवून
करावा लागेल त्यांच्यासारखाच दंश
बेईमान कपटी स्वार्थी वृत्तीवर

हे जाहीरनाम्यातील कलम अतिशय महत्त्वाचे आहे. एकंदरीत, उषाकिरण आत्राम यांच्या कवितेने फुले-आंबेडकरी स्त्रीवादी कवितेत मोलाची भर घातली आहे असे म्हणणे रास्त ठरेल.

उषा हिंगोणेकर यांचा **मुद्रालेख** (१९९९) हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. स्वत:ची मुद्रा घेऊन हिंगोणेकर यांची कविता दलित कवितेच्या प्रांतात दाखल झाली. 'मी भेटेल तुम्हाला रणांगणात सत्यासाठी लढणाऱ्या हरेक धगधगणाऱ्या श्वासात' अशी आपली ओळख या कवयित्रीने करून दिली. त्याच बरोबर

माझी कविता शतकानुशतकाचे दु:ख आहे
आणि क्षणाक्षणाला होणारा माझ्या काळजाचा स्फोट आहे.

शतकानुशतके वाट्याला आलेल्या दु:खाला वाट मोकळी करून देण्यासाठीच अंत:करणात स्फोट होणार आहेत. अशी सूचना या कवितने देऊन ठेवली आहे. मात्र 'आयुष्यभर जळत राहिले त्याचे दु:ख नाही पण... या दु:खाच्या ज्वाळेवर देखील हात शेकणारेच अधिक भेटत गेले' हे दु:ख आगीत जळण्यापेक्षाही भयंकर आहे. त्याचबरोबर सोडवलेले प्रश्न पुन्हा पुन्हा घरात आणून फेकणारे अवंतीभोवती आहेतच, त्यांना वठणीवर आणण्याचा धडाही या कवितेने गिरविला

आहे. ज्या विचाराने माणसाला गुलामीने जखडून ठेवले त्या विचाराला मुठीतील निखाऱ्याने भस्मसात करण्याची भाषा या कवितेत अवतरते. प्रस्थापित व्यवस्थेच्या दिशेने दगड भिरकावणारी जाणीवही येथे प्रकट झाली आहे. केवळ क्रांतीची भाषा करून चालत नाही तर 'लढाईसाठी वेदनेच्या मुळापर्यंत जावे लागते याचे पुरेसे भान या कवितेला आहे म्हणून ती अंधारऋतू नाकारणाऱ्या स्वप्नांची भाषा अवगत करते आणि वादळाला सामोरी जाते. या कवितेत वेळोवेळी एक दक्षता घेणारी भूमिका प्रत्ययाला येते. जसे की, कवीमनाच्या स्वप्नांचा छळ करणारे चेहरे, त्यांच्या चेहऱ्याचे अंतरंग तपासणे असो किंवा ज्यांनी रक्ताच्या जाती करून, जातीच्या भिंती उभारल्या अशांचा शिरच्छेद करू पाहणारी, किंवा शब्दांच्या घावांनी आयुष्य पोळलेले असल्यामुळे शब्दशस्त्राचा चक्रव्यूह भेदू पाहणारी भूमिका, शतकानुशतकाच्या वेढलेल्या तटबंदीतून बाहेर येऊ पाहणारी अशी विशिष्ट भूमिका घेऊन ही कविता अक्षरबद्ध होताना दिसते त्यातून एका राजकीय भूमिकेचाच निर्देश झाला आहे असे प्रत्ययाला येते.

खोलवर झालेल्या जखमेची जेव्हा कविता होते तेव्हा या कवितेला फुलपाखरं भेटतात आणि ती जखमेवर फुंकर घालतात. म्हणूनच मनाच्या अस्वस्थ किनाऱ्यावरून वादळात हरवलेल्या नौकांची वाट पाहणारी दृष्टी या कवितेत प्रत्ययाला येते. स्त्रीसुलभ भावभावनांचे दिग्दर्शन या कवितेने केले आहे. हिरवळीचे ऋतू आपल्यापर्यंत पोहचू दिले नसल्याची तक्रारही मांडली आहे आणि असेही नमूद केले आहे की

मी नव्हते विसंबून कुठल्याही ऋतूवर
नाहीतर, माझ्या स्वप्नांच्या मातीवर
नाचले असते गिधाडांचे थवे थयथया...

एखाद्या खांद्यावर निवांत मान टाकावी असे क्षण कधीच वाट्याला आले नाही. सारे क्षण व्यथांना जन्म देणारेच भेटलेत. मात्र मनाच्या तळ्यातून चिखल उपसताना 'त्याच्या आठवणीचा पाऊस कोसळतो'. तेव्हा 'चिखलातच स्वच्छ शुभ्र कमळं उगवत असतात' हे त्याचे बोल आठवतात म्हणून मनात पुन्हा एक आशावाद जिंवत होतो. आणि कमळं उमलण्याची प्रतीक्षा करणारी जाणीव प्रकट होते. निष्पर्ण झाडांना कोवळी हिरवी पालवी फुटली पाहिजे, फांदीफांदीवर पहाटपक्षांचे थवे फडफडले पाहिजेत असे 'हिरवे स्वप्न' या मनाने उरीपोटी बाळगले आहे. हा या कवितेतील एक महत्त्वाचा कप्पा आहे.

केवळ हिरवे स्वप्न मनाशी बाळगून ही कविता थांबत नाही तर स्त्रीजीवनासंबंधी ती बोलते. भोवताली नजर टाकल्यानंतर असे लक्षात येते, की तिची आकाशभरारी सहन न झाल्यामुळे आपल्या अवती भोवती पिंजरा असल्याचे जाणवते. म्हणून केवळ स्वप्नात रममाण होऊन चालणार नाही याचे भान आल्यानंतर कवीमनाचा उजेडाच्या प्रदेशाकडे प्रवास सुरू होतो. मात्र सुरू केलेल्या प्रवासात उजेडाची किरणे दिसली नसल्याची जाणीव होते. कारण या प्रवासात पावलोपावली धोक्याची वळणं आहेत. आणि व्यवस्थेला तर तिची आकाशभरारी सहन होत नाही. म्हणून,

माझे पेटले आकाश झाले विद्रोहाचे श्वास
काळोखल्या स्वप्नांना सूर्यफुलांचाच ध्यास

अशाप्रकारे सूर्यफुलाचा ध्यास घेतलेली ही कविता नशिबावर हवाला ठेवत नाही तर क्रांतीचे क्षितीज गाठण्यासाठी वादळांना कवेत घेते. जुलमी परंपरेचे निशाण फडकावून मस्तवालपणे नाच करणाऱ्या प्रवृत्तीचे चेहरे ओरबाडून काढण्याचा चंग या कवितेने बांधला आहे. शोषणाच्या आणि विषमतेच्या गर्तेत ढकलून देणाऱ्या संस्कृतीचे ढोल वाजता कामा नयेत असा निर्धार केला आहे.

रस्त्या-रस्त्यावर छुपे हल्लेखोर दबा धरून आहेत
पावलागणिक सुरुंग पेरलेले आहेत
कुठल्याही क्षणी आपण उद्ध्वस्त होवू शकतो

हे ओळखूनच दोस्तहो! आता रस्त्यावर यावे लागेल

अशाप्रकारे ही कविता संघर्षासाठी सज्ज झाली आहे. पुरुषी व्यवस्थेच्या गनिमी चालीची चाहूल लागल्यामुळे कोंडी झालेले मन बांध फोडून प्रकट होते तेव्हा रस्त्यावर येण्याची भाषा अपरिहार्य ठरते. अशा भाषेचा अंगिकार करत ही कविता अभिव्यक्त होते. उद्ध्वस्त होऊन चिंधड्या होण्यापेक्षा रस्त्यावर उतरून उद्ध्वस्त करू पाहणारे सुरुंग निकामी करणे ही तर नितीच्या कक्षेतील बाब आहे. अशा विद्रोहाचे मोल अधिक असते.

कवी

✹ दीपक त्रिभुवन

त्रिभुवन यांचे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. **खोल खदानी** (१९९२) **माणसाचा जनक आणि इतर कविता** (१९९६). 'खोल खदानी' हे शीर्षकच अतिशय सूचक असे आहे. खोल खदानी आणि अस्मानाला भिडलेले कन्स्ट्रक्शन असा परस्परविरोधी स्वर आणि अतर्विरोधाचा सूर 'खोल खदानी' तून प्रत्ययाला येतो. त्यातून श्रमणसंस्कृतीचे भीषण वास्तव साकार झाले आहे. आहेरे नाहीरे हा तसा सनातन संघर्ष आहे. विसाव्या शतकात जी मानवमुक्तीची आंदोलने उभी राहिली त्यातून मानवी मूल्यांचा उद्घोष झाला. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही बहिष्कृतांच्या जगावर बदलाचे ओरखडे उमटले नाही. आहे रे- नाही रे या दोन जगातील महदंतर बुजविण्यासाठी पुन्हा जाणीवगर्भ वाढले. क्रांती-प्रतिक्रांतीच्या रूपात ते वाढत गेले. त्यातूनच एक युद्धमानता आकारत गेली.

शतकाच्या पोटपाडी अस्मितेनंतरही
आकारलेय हाडामासाचे जाणीवगर्भ
अजस्त्र लाटा उजेडानं लदबदलेल्या विद्ध्वंसकाच्या
हिंस्त्र होऊन उफाळताहेत काळीज बोक्यातून
तुडवताहेत नकट्या परंपरेची मढी दारात
जुलमाच्या खोऱ्यात उतमातलाय स्वातंत्र्याचा आविष्कार
या प्रचंड पसाऱ्यात फाटलाय कागदासारखा कंठ
भेसूरपणे शब्दबद्ध होतेय
जळक्या अरण्याच्या छातीत वेदनांकन

मूलतत्त्ववादी प्रवाह तात्त्विकतेकडून कत्तलीकडे वाहात गेला. मूल्यांचाच ऱ्हास झाल्यामुळे कवीच्या जळक्या अरण्याच्या छातीत वेदनांकन शब्दबद्ध झाले आणि 'खोल खदानी'च्या रूपात ते अभिव्यक्त झाले. ऱ्हासकालीन संस्कृती संघर्षाची चित्रे खोल खदानीने रेखाटली आहेत. कवी मुळात श्रमण संस्कृतीचा प्रतिनिधी असल्यामुळे निसर्ग प्रतिकातून आपल्या अस्तित्वाची ओळख करून देतो. श्रम आणि झिज हाच त्याच्या जगाच्या जगण्याचा सारांश आहे. डोंगराच्या छातीत कोरलेल्या कवितेला म्हणजेच जगण्याला अंत नाही आणि मोळ्यांच्या भाराने मातीत झिरपणाऱ्या जगण्याला अर्थ नाही. अशा जगण्यातही स्त्रीशक्तीचे रूप हा फार मोठा आधार आहे. स्त्रीशक्तीवरील प्रगाढ विश्वास आणि श्रद्धा हे या कवितेचे वेगळेपण आहे.

समकालीन जीवनातील स्त्रीजीवनाचे भीषण रूप. उदा. 'तुझ्या त्वचेच्या खिपलीवरील जीवनभाष्य, दुष्काळी इलाख्याच्या जमिनीप्रमाणे तडकून गलेले आयुष्य' ह्या वास्तवाबरोबरच अंधारग्रस्त जगाचा हवालदिलपणा गणसंस्थेच्या पराभवानंतर चातुर्वर्ण्याच्या आगमनानंतरच्या काळात हरेक टप्प्यावरील शोषणाचे टप्पे नोंदवित स्त्रीजीवनाच्या वाभाड्याचे चित्र या कवितेने अधोरेखित केले आहे. स्त्रीच्या एकूणच स्थितीगतीचा आलेख मांडला आहे. त्याचा धागा थेट वांझ गंगेच्या खोऱ्यापर्यंत म्हणजे पवित्र समजल्या जाणाऱ्या गंगेच्या खोऱ्यात उदयाला आलेल्या संस्कृतीपर्यंत जोडला आहे.

परंतु पुरातन मातीचं बीज कायमचे नष्ट होत नसते. त्या त्या काळाच्या पार्श्वभूमीवर वातावरणाची अनुकूलता-प्रतिकूलता पाहून बीजांची रोपटी होतात. वाढत जातात. एकोणिसाव्या शतकात त्या रोपट्यांचा सावित्रीबाई फुल्यांच्या रूपात वृक्ष होतो. परंतु मूलतत्त्ववादी शक्ती फोफावत जातात आणि तात्त्विकतेपासून कत्तलीपर्यंत अशा शक्तींचा प्रवास यशस्वी होतो. ही या मातीतील वास्तवता आहे. या सर्व प्रवासाचा वेध 'खोल खदानी'ने घेतला आहे. तळाला ठेवल्या गेलेल्या, समाज व्यवस्थेच्या तळाशी राहिलेल्या समूहमनाचाच आविष्कार ही कविता करते. या कवितेने जगण्याच्या संदर्भात काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत.

सर्वकाही ध्वस्त होत गेलय दरेक मुक्कामावर
बदलले ऋतू, तू, माझी अंतर्दृष्टी
कशासाठी खोदून ठेवल्या गहिऱ्या जखमेसारख्या
जागोजाग खोल खदानी
किती पापुद्रे तळापर्यंतचे निर्घृणपणे फाटताहेत
वाहताहे हे अफाट मांस रक्त आणि पाणी
अस्मानाला भिडलय कन्स्ट्रक्शन
खाली तळ नुसती दरी/ कंठ फुटतो ना शब्द ना पाणी
कशासाठी खोदल्या आयुष्यभर खोल खदानी

उर फुटेस्तोवर खोदकाम करीत राहणाऱ्यांना एक माणूस म्हणून तरी आयुष्य जगता येते का? दरीत लोंबकळावं तसं आयुष्य असेल तर या जगण्याला अर्थ काय? आपल्या घामावर बुर्ज्वांचे बंगले उभारले जाणार असतील तर खदानी खोदण्यातच आयुष्य का घालवायचं? कशासाठी खदानी खोदायच्या? असे अनेक प्रश्न 'खोल खदानी'ने उपस्थित केले आहेत.

माझ्या नाडीच्या मंद घंटेत विखुरली आहेत
भेसूर फुले ऱ्हासाची, काळे ठिक्कर पडलेत दिवे अंतर्मनाचे
शोषून घेतलाय जणू कुणी अंगातील पाण्याचा प्रत्येक थेंब'

ही शुष्कता केवळ एकट्या कवीपुरती उरत नाही. ऱ्हासपर्वाच्या समाजमनाचे ते प्रातिनिधिक रूप ठरते. कवीची मनोवस्था समाजमनाचेच अंतरंग वाचकाच्या मनावर कोरीत जाते.

वैश्विक पातळीवर काळ्या लोकांचा सांस्कृतिक संघर्ष आणि भारतीय समाजव्यवस्थेच्या पातळीवर अस्पृश्यांची लढाई ह्या समांतर जाणिवा आहेत. निग्रोंची गुलामी आणि अस्पृश्यांचे वर्णव्यवस्थेच्या जाचातील जगणे ह्या दोन्हीही एकाच दु:खाच्या कडा आहेत. अशी या कवितेची धारणा आहे. दलित मध्यमवर्गीय प्रवृत्ती, पारंपरिकता जोपासू पाहणारी दलित प्रवृत्ती यांचाही नेमका वेध या कवितेने घेतला आहे. या वर्गाचे मध्यमवर्गीयपण एकूणच प्रबोधन आणि चळवळीच्या दृष्टीने किती घातक आहे, त्यांचे झालेले ब्राह्मणीकरण हा चिंतेचा विषय आहे. चार भिंतीच्या आतील मंथनाने प्रबोधन होत नसते. चळवळ पुढे जात नसते. प्रबोधन आणि चळवळीची मानसिकता तयार करण्याची जबाबदारी मध्यमवर्गाची असते. ती या वर्गाने नाकारली आहे. हे निरीक्षण नोंदवून या वर्गाला नकारही दिला आहे.

शकलं शकलं झालेला हा भिंतीआतला तोंडवळा
माझा असून माझा नाही जो मलाच हसतो आज खदखदा

ह्या जाणिवा पूर्वसूरींच्या कवितेपेक्षा वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर प्रभूतींच्या कवितेवर वारेमाप चर्चा झाली. एका विशिष्ट काळाची गरज म्हणून त्यांचा आविष्कार ऐतिहासिकच आहे. मात्र नव्या पिढीसमोरील वास्तव फार वेगळे आहे. दीपक त्रिभुवन यांच्या कवितेने समकालीन वास्तवाचा घेतलेला शोध दलित कवितेचे पुढचे पाऊल आहे. स्वटिकेचाच हा प्रकार आहे. माणसाची मने भोगलालसेत अडकली की, चळवळी थंडावतात

आणि बदनामही होतात. केवळ निष्ठाच नव्हे तर भोगवादी प्रवृत्तीच्या आवर्तात सापडल्यामुळे शोषणांतर्गत शोषणाला सुरुवात हे भयावह दुष्टचक्र आहे. एकीकडे पारंपरिकतेला नकार देतानाच दुसरीकडे पारंपरिकताच कवटाळायची या समकालीन मानसिकतेचा वेध ही कविता घेते. भोवतालातील पर्यावरणाचे वास्तव, त्यातून निर्माण होणारा ताण असह्य झाल्यामुळे त्यातून सुटण्याची कवीमनाची धडपड आहे. म्हणून कवितेला उद्देशून त्याने म्हटले आहे

कुदळीने घाव घाल देठादेठावर / उपटून टाक बांधून टाकणाऱ्या
माझ्या महार नावाच्या महावृक्षाच्या / आयुष्यमान जाळ्यामुळ्या

विसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वातील अंतर्मुख होऊन घेतलेल्या शोधातून दिलेला नकार अतिशय अर्थपूर्ण आहे.

मानसाचा जनक आणि इतर कविता या संग्रहातील 'मानसाचा जनक' आणि 'शहर : चिरफाळलेल्या हुंदक्याची कलाकुसर' या प्रदीर्घ स्वरूपाच्या कविता आहेत पहिली कविता तीनशे पंचाहत्तर ओळीची तर दुसरी तीनशे सोळा ओळीची.

'माणसाचा जनक' ही कविता म. फुल्यांच्या अंतर्गत तळमळीसहित प्रत्यक्ष कृतीपर्यंतचा एक धगधगता आलेख चितारणारी कविता आहे. फुल्यांनीच शुद्रातिशुद्रांना आत्मभान आणि आत्मप्रतिती दिली. स्त्री श्रेष्ठत्वाचं आणि माणूसनिर्मितीचं सूत्र सांगीतले. म्हणूनच रक्तपिपासू लांडग्यांच्या जगाला हादरे बसू लागले. परंपरेच्या जुलमी जमिनीचा अखंड पट्टा फुल्यांच्या विचारचक्राने चिरत गेला. म्हणूनच फुले हे 'क्रौर्यप्रिय श्वापदांच्या वांझ भूमीतील पहिला धरणीकंप' ठरले. काळाची गरज म्हणून फुल्यांच्या आगमनाला माणसाच्या जनकाचे रूप प्राप्त होते. फुले काळाला घडवितात, काळ फुल्यांना घडवितो असे एक चित्र या कवितेतून साकार होते. पाखंडाच्या विरोधात, भटशाहीच्या समूळ नाशासाठी फुले झगड झगड झगडले मात्र 'सत्यशोधक हुजरे झाले भटाचे' असे या कवितेचे निरीक्षण आहे. अनुयायी बेईमान झाले म्हणून युगपुरुषाचे विचार काळ आणि व्यक्ती रोखू शकत नाही. फुल्यातील सम्यक बुद्ध जरी त्यांच्याच अनुयायांकडून भर रस्त्यात विकला गेला तरी, फुल्यांच्याच क्रांतीकारी विचारांची मशाल हाती घेऊन बाबासाहेब आंबेडकरांचा उदय झाला.

काळोखारण्ये छेदीत तो, रानरान पेटवीत
अस्पृश्यांच्या डोळ्याडोळ्यांतून ओथंबला

हा सर्व इतिहास या कवितेने मुखरीत केला आहे. चिंतनगर्भ कविता ही बरेचदा प्रतीकांची बनलेली असते. प्रतिक हे अनेक पातळ्यांवरील मूल्यभावांचा प्रत्यय घडवीत असते. फुल्यांना प्रतीक रूपात साकार करण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. एका महात्म्याचे विचार- जीवनकर्तृत्वाचा इतिहास त्याच्या व्यक्तिमत्वासह पाहणारे डोळस मन, चिंतनाचा परीसस्पर्श करणारे संवेदनशील मन कवीजवळ असल्यामुळै, प्रतिमा, प्रतिकांच्या नेमक्या योजनेमुळे कवितेचा घाट पिळदार झाला आहे.

या संग्रहातील 'शहर :चिरफाळलेल्या हुंदक्याची कलाकुसर' ही कविता औरंगाबादसारख्या ऐतिहासिक शहराशी संबंधित इतिहासातील राजवटी, सांस्कृतिक आक्रमणे आणि शोषणाची रूपे साकार करते. विविध राजवटीच्या काळात सर्वसामान्यांच्या जीवनात फारसा फरक पडला नाही. धार्मिक फॅसिझमने प्रत्येक काळात प्रजेला आपल्या कह्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. माणसामाणसातील विश्व सतत सडत ठेवले. कुठल्याही काळात खऱ्या सौंदर्यशील गोष्टींना नरकाचे रहिवासी ठरविण्यात आले. त्यात भंगी आणि वेश्या ह्या उपेक्षित जगाच्या प्रतिनिधींचा समावेश आहे.

कुठलाही धर्म भंग्याला भंगी / वेश्येला वेशाच ठेवतो
कुठलेही साम्राज्य भंगी आणि वेश्यांना तळाशी गाडतं

हा विरोधाभास मन विस्कटून टाकणारा आहे. भंगी एकाच वेळी मैला वाहतो आणि धर्मसंस्कृतिचाही मैला वाहण्याचे काम नेटाने करतो. धर्म माणसाच्या शोषणाचे प्रवक्तेपण करतो आणि दंगलीचा प्रणेताही बनतो. आणि ऱ्हासाची

भेसुर फुले ओंजळीत घेऊन उजळ माथ्याने फिरतो. ह्या प्रखर वास्तवासह इतिहास आणि वर्तमानाच्या पातळीवर तोल सांभांळत समकालीन सत्य साकार करणे हे त्रिभुवन यांच्या कवितेचे वेगळेपण आहे. बुद्धतत्त्व हे या कवितेचे केंद्र आहे.

निश्चित रौद्रजन्य क्रोध
बुद्धाची अभंग एकाग्रता भंग करील
तेव्हा नवीन शिल्प आपण
झोपड्या झोपड्यात कोरू गुहेऐवजी.....

समकालीन जीवनात बदलत्या परिस्थितीनुरूप करावयाचा हा निर्धार आहे. बदलत्या काळाशी सुसंगत भान बाळगले पाहिजे हाच बुद्धाच्या प्रत्युत्य समुत्पादाचा वर्तमानकालीन अर्थ ही कविता विशद करते.

थोडक्यात, त्रिभुवन यांची कविता चिंतनगर्भतेकडे अधिक झुकणारी क्रांती-प्रतिक्रांतीच्या प्रवाहाचा वेध घेणारी, श्रमण संस्कृतीचा संघर्ष चित्रित करणारी अशी आहे. या कवितेने स्त्री शक्तीवरील गाढ श्रद्धा आणि विश्वास प्रकट केला असून समाजव्यवस्थेच्या तळाला राहिलेल्या समूहमनाला मुखरीत केले आहे. ही कविता आंबेडकरी चळवळीचा इतिहास, सामर्थ्य आणि मर्यादांचा वेध घेऊन समकालीन दलित मध्यमवर्गीय मानसिकतेचा शोध घेते. ऐतिहासिक शहराच्या पार्श्वभूमीवर धर्माचे विश्लेषण करीत शोषणाचा इतिहास कथन करते. अंतिमत: ही कविता मानवमुक्तीचाच विचार मांडते. त्याचबरोबर ती कलात्मकतेचीही बूज राखते. हे त्रिभुवन यांच्या कवितेचे सामर्थ्य आहे.

✸ अरुण काळे (जन्म २५ एप्रिल १९५२)

अरुण काळे हा या दशकाने दिलेला अतिशय ताकदीचा आणि महत्त्वाचा कवी. साठोत्तरी दलित कवितेच्या केंद्रस्थानी जसे नामदेव ढसाळ हे नाव होते. तसे अरुण काळे हे शीर्षस्थानी असलेले नाव आहे. त्याच्या कवितेने खरे तर फुले-आंबेडकरी कवितेत एक नवा ट्रेंड आणला, त्यामुळे कवितेला नवे वळण लागले. 'तुम्हाला आणि मला जे काय दिले ते क्रांतीबाने आणि क्रांतीसूर्यानेच'. हा ठामपणा त्याच्या कवितीक जगण्याचे मुख्य सूत्र होते. हा कवी दलित पँथरच्या उदयाबरोबरच उमेदीत आला. पँथरच्या विघटनाने उद्ध्वस्त होऊनही स्वत:ला सावरत नव्या उमेदीने तो कवितेच्या केंद्रावर उभा झाला आणि परिघावरच्या प्रचंड रणधुमाळीच्या आवाका तो कवितेत तोलत आणि पेलत राहिला. वैश्विक परिघावर मूलतत्त्ववादापासून रंगवर्णी व्यवस्थेपर्यंतचा मोठा पल्ला गाठताना त्याच्या कवितेने नाना वळणे घेतली आहेत. स्वकीय भूमीवर धर्म आणि अराजकाचं अतिशय सुक्ष्म आणि अंतर्मुखतेनं मांडलेलं समाजलक्ष्यी चिंतन हा त्याच्या कवितेचा मूळ गाभा आहे.

या दशकात **रॉकगार्डन** (१९९३), आणि **सायरनचे शहर** (१९९७) असे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले, 'रॉकगार्डन'मध्ये अरुण काळे यांनी काळोखी कारनाम्याच्या पीकपाण्याचा वेध घेतला आहे. रॉकगार्डनमध्ये जळ, स्थळ, काष्ट, पाषाण हेच स्थायीभाव आहेत. माणसाच्या आदिम गाण्यासोबतच स्वत:चे स्वत:पण जपणारे, मानवतेच्या सुरेल ताना आळवणारे रंग या कवितेत आहेत. विधायक रूपात ही कविता आविष्कृत झाली असून डॉ, बाबासाहेब आंबेडकर हा या कवितेचा आस्थाविषय आहे.

जखमांना खतपाणी घालणारे प्रदेश नाकारून
मुळासकट सर्व जखमा घेऊन आलोय मी
बोधीवृक्षाच्या निर्जंतूक सावलीत
खपलीची वाट बघण्यात पिढ्यांची चिघळणूक झाली
खपलीशिवाय जखमा भरून निघतात प्रक्रिया संपवता येते
त्या बुलंद डॉक्टरच्या दिशादर्शी बोटाने मार्ग दाखवला

पापक्षालनाने जखमा भरून निघतात हा कर्मविपाकाचा सिद्धांत कसा थोतांड आहे हे स्पष्ट करताना रोगावर इलाज

केला तर जखमा भरून निघतात हा विज्ञाननिष्ठ मार्ग आंबेडकरांनी दाखवला. चेहरा आणि अस्तित्व हरविलेल्या समूहाला नवे रूप, अस्तित्वाचे भान आणून देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले, म्हणूनच 'सूर्यानेही स्वत:ला भीमराव म्हणून घ्यावं एवढं तुझं मोठेपण' असे देदिप्यमान आणि भव्यदिव्य व्यक्तिमत्त्व या कवितेने चित्रित केले आहे. बाबासाहेबाचा उदय ही उजेडयुगाची सुरुवात होती. या उजेडयुगाचा इतिहास अरुणच्या कवितेने कथन केला आहे. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व, कर्तृत्व आणि तत्त्वविचारांचे विविधांगी पैलू 'रॉकगार्डन'मधील कवितांनी साकार केले आहेत.

अरुणची कविता प्रतिकात्मकतेतून सामाजिक, सांस्कृतिक अर्थाचे सूचन करते. या कवितेने नव्या मूल्यव्यवस्थेच्या उदयाची गरज प्रतिपादन केली आहे. 'रक्तात रुजलेल्या बोरीबाभळी' ही कविता या दृष्टीने फार महत्त्वाची आहे.

इथे मोहाला झिंग कुसळाची / इथले खैर खातात पानपट्टया
ही बोन्साय केलेली झुडुपावळ / हे त्रिसरणाचे पळस
हे धोतऱ्या, कण्हेरीचे गनिमी कावे....

'त्रिसरणाचे पळस' हे सार्वकालिक सत्याचे दिग्दर्शन करणारे आहे. नैसर्गिक घटकांना नैसर्गिक न्याय मिळत नाही. सामाजिक पातळीवरही नैसर्गिकपणे, मुक्तपणे वावरता येईल अशी सोय नाही. सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक सत्त्वाचे शोषण करणारी, सत्त्वच निकामी ठरवणारी ही व्यवस्था आहे. रक्तात भिनलेले जहर आणि जगण्यातील गुंतागुंत सोडवण्यासाठी नव्या सत्त्वाची आवश्यकता आहे. म्हणजेच नव्या मूल्यव्यवस्थेची मागणी ही कविता करते. अत्यल्प शब्दातून मोठा अर्थ ध्वनित करणे हा या कवितेचा खास विशेष आहे. उदा,

एक छोटासा गाव / त्याला लागे लगेच ठाव
इथल्या सर्व बालकांना जन्मविते एकच प्रसुतीगृह
आणि तिथूनच अलगपणे चालू लागतात
त्यांचे रस्ते वेगवेगळ्या स्मशानाकडे....

मृत्यूनंतरही समता नावाची गोष्ट दिसणार नाही अशी दक्षता सनातन व्यवस्थेने घेतली आहे. विविधांगी, विविधार्थाचे अनुबंध स्पष्ट करीत जाणे हे या कवितेचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. लघुत्तम मांडणीतून महत्तम आशयाची व्याप्ती स्पष्ट व्हायला भाग पाडणे हा अरुणच्या कवितेचा शैलीविशेष आहे.

या कवितेने पावसाच्या रूपाचा आणि विरूपाचा अन्वय लावला आहे. मराठी कवितेत तर पावसाचे जेवढे उदात्तीकरण झाले तेवढे कुठेही झाले नाही. रोमँटिक अंगाने बराच धोधो पाऊस मराठी कवितेत कोसळला आहे. महानोरांपासून इंदिरा संतांपर्यंत अनेक उदाहरणे सांगता येतील. अरुणच्या कवितेतील पाऊस मात्र 'काळ' म्हणून उभा आहे. उच्चभ्रूंच्या जगात मात्र या पावसामुळे पॉश वस्त्यातील रस्ते चकचकीत होतात. हवेत सुखद गारवा येताच त्यांचे गार्डन टवटवीत होतात. त्यावेळेस झोपडपट्टीच्या जगात हुडहुडी भरलेली असते. वर्गीय विसंगतीचे हे वास्तव आहे. पावसाचे धर्मांध रूपही प्रत्ययाला येते. त्यामुळे सामाजिक परिमाण अधिक गडद झालेले आहेत.

जेव्हा तू धुतोस त्यांची प्रार्थना मंदिरे
तेव्हा यांच्या घरातील फोटोंचे फाटलेले असतात रंग
पावसा! तू हो ना निधर्मी, लोकशाही, समाजवादी
वाट सर्वांना समान हिरवळ आणि येऊ दे
सर्वांच्या हवेत सुखद गारवा

हा पाऊस निखळ निसर्गातला नाही. माणसामाणसात दरी निर्माण करणारा, वर्गावर्गात अंतर निर्माण करणारा, दुहीचे बीज रुजवून विषमतेची देणगी देणारा असा हा पाऊस एका अपप्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतो. 'पाऊस' ही प्रतिमा केवळ निसर्गघटक नाही, तर सामाजिक वास्तवाच्या अर्थाची वाहक आहे. ही कविता जशी जीवनावर भाष्य करते तशी सामाजिक मानसिकतेची चिरफाडही करते. निसर्ग प्रतिमांच्या संघंटनातून वर्गीय आणि सामाजिक विसंगतीचे चित्र स्पष्ट

केल्यामुळे या कवितेला सामाजिक परिमाण प्राप्त झाले आहे.

अरुण काळेच्या कवितेचा मोठा भाग चिंतनगर्भतेने व्यापलेला आहे. खऱ्या अर्थाने ती जीवनवादी आहे. तिने सांस्कृतिक काळवंडलेपणाचा गडदपणा अधिक ठळक केला आहे. तिने निसर्गातील अनेक गोष्टींना काळ्या विशेषणाच्या रंगाने रंगविले आहे. त्यामुळे सांस्कृतिक विश्वाचे घनगर्द आकार रेखीव होत जातात. माणसाच्या घाम आणि श्रमातून सौंदर्याला आकार प्राप्त झाला आहे. काळ्या दगडातून शिल्प उभे झाले, या निर्मितीसाठी राबणारी, इतरांसाठी निवारा उभारणारी माणसे मात्र बेघर झाली. पोलादी छिन्न्याच्या आघातातून अजिंठा साकारला. बुद्ध संस्कृतीचा एक महान ठेवा उभा राहिला. त्यासाठी अनेकांचे हात आणि परिश्रम कामी आले. रक्त ओकेपर्यंत माणसे राबली. पण त्या माणसाचे पुढे काय झाले? ज्या ज्या ठिकाणी माणूस नागवला गेला, नाकारला गेला त्या सर्वांच्याच वतीने अरुण काळेची कविता आपल्या जाणिवा व्यक्त करते. एका अर्थाने माणसाच्या संदर्भातील वैश्विक जाणिवेला या कवितेने हात घातला आहे. माणसाच्या महानतेचे तत्त्वज्ञान मांडले आहे.

पाण्यासाठी संघर्ष हे मानवमुक्तीच्या आंदोलनातील भारतीय संदर्भात पहिले पाऊल होते. तिथूनच सामाजिक निसर्गाचे रंगरूप पालटायला सुरुवात झाली. 'काळे ते सुंदर' या तत्त्वामुळे जगातील दु:खीत पीडीतांपर्यंत या कवितेने नाळ जोडली आहे. सांस्कृतिक काळेपणाच्या पार्श्वभूमीवर विचारांच्या उजेडाची, मानवतेच्या तेजस्वीपणाची पखरण या कवितेने केली आहे. भारतीय परंपरेत ज्या सौंदर्याच्या कल्पना सांगण्यात आल्या त्यात सत्य, शिव, सुंदर या मुल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र भूकेच्या संदर्भात या मूल्यांची विभागणी झाली आहे. त्यामुळे ती हास्यास्पदही ठरली आहे.

भूक, गरिबांसाठी सत्य आहे / भूक धर्ममार्तंडाचे शिव आहे
भूक, धनिकांसाठी सुंदर आहे

उपरोधातून भुकेचे विरूपण या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहे. भूक ही सर्वव्यापी असल्यामुळे जागतिक आदान प्रदानाच्या शक्यतांशी तिचा संबंध असतो. भूकेपोटीच टाचा घासून मरणही पत्करावे लागते. म्हणूनच काहीनां ती शाप असते. काहींना ती जाचक, तापदायक ठरते. मात्र आजवर ती कुणासाठीही वरदान ठरलेली नाही. तशी ती ठरावी या वास्तवाविषयीचे चिंतन या कवितेतून साकार झाले आहे.

दंगलीविषयीचे चिंतनही या कवितेने साकार केले आहे. पारतंत्र्यातून बाहेर पडतानाच या देशाच्या शिरावर दंगलीचा कलंक लागला आहे. एका दंगलीत दुसऱ्या दंगलीची बीजे पेरलेली असतात. विशेष म्हणजे दंगलीचे बळी दलित, शोषित, पीडीत आणि अल्पसंख्यांकच ठरत आले आहेत.

ती रखेल बहुमताची / नाचतेय हजारो वर्षे हुपाट संस्कृतीच्या
महारोगी बोटांच्या फिरत्या रंगमंचावर!
पेश करतेय विक्राळ नाट्य / साजशृंगार तिनं केला असेल म्यान
पण ती अजून शमलेली नाही.

अशाप्रकारे दंगलीने आपल्या थरार नाट्यातून तिचे करालपण आणि दहशतीची ताकद दाखवून दिली आहे. उद्याच्या पिढ्या गर्भातच मारून टाकण्यापासून संसार, घरेदारे उद्ध्वस्त करीन तिरस्काराचे वारे साऱ्या आसमंतात वाहते ठेवण्याचे कार्य ती पार पाडते. हा सगळा कडेलोट झाल्यानंतर ती शमल्यासारखी वाटते पण मुळात शांत झालेली नसते. राखेखाली निखारा असावा असे तिचे अस्तित्व असते. दंगलीच्या अस्तित्वाचे भीषण पैलू या कवितेने उलगडून दाखविले आहेत. थोडक्यात, भूक, दंगल, सांस्कृतिक काळवंडलेपणाच्या पार्श्वभूमीवर समकालीन जीवनाविषयीचे चिंतन अरुण काळेंच्या कवितेतून प्रकट झाले आहे. या कवितेने सामाजिक मुस्कटदाबीच्या पार्श्वभूमीवर स्त्री अत्याचाराचे भेदक चित्र रेखाटले आहे.

तुझे नग्नांग चोरून खाणाऱ्या अधाशी नजरा

आणि मायांगावर सोडले जाणारे बॅट्र्यांचे प्रकाशझोत
तुझे बांधलेले हात केविलवाणी धडपड आणि
आसमंत चिरून जाणाऱ्या आर्त आरोळ्या...

अंगावर शहारे आणणारे हे स्त्रीच्या धुळवडीचे चित्र आधाशी आणि हिंस्र पुरुषी व्यवस्थेचे दर्शन घडविणारे आहे. विसाव्या शतकातील आंबेडकरी लढा हे इतिहासाने नोंदवून ठेवलेले अटळ वास्तव आहे. हे वास्तव पचवणे ज्यांना जड गेले आणि जात आहे अशा सामाजिक, सांस्कृतिक अपप्रवृत्तीने वेगवेगळ्या तऱ्हेने, विविध पातळ्यांवर डॉ, आबेडकरांच्या बदनामीची दुकाने उघडली, पत्रकार अरुण शौरीसारख्या अनेक प्रवृत्ती त्यामागे कार्यरत होत्या. मात्र विचारी माणसाने हे थोतांड केव्हाच ओळखले.

आंबेडकरी विचारांच्या मुशीतून तयार झालेल्या डोळस विचारी माणसाने षडयंत्रणालयाचे पितळ उघडे पाडले आहे. दगडाचे नैवेद्य आणि विचार यात तरतम करण्याइतपत माणूस सजग झाला आहे. अभिजनांच्या घरंदाज गायकी संस्कृतीला एक आखीवपणाची चौकट असते. तर बहुजन गायकी परंपरेत मुक्तपणा असतो. बहुजनांची परंपरा ही माणसाचे गाणे गाणारी परंपरा आहे.

आपलं घराणं मैदानात गाणाराचं
आन् आपलं गाणं शास्त्रीय विचाराचं
आता कुठला रियाज अन् कुठली तालीम
मी गाणे गातोय माणसांचे आदिम!

सांस्कृतिक पातळीवर भाषा जीवनव्यवहार, संपर्काची कल्पना, व्यक्ती व्यक्ती संबंध याबाबतीत सामूहिकतेचा प्रत्यय बहुजनांच्या संस्कृतीत प्रत्ययाला येतो. अभिजन संस्कृतीची जाणीव प्रचंड स्वकेंद्री असते. तर बहुजन संस्कृतीची जाणीव जातीच्या, वर्णाच्या पलिकडे जाणारी, माणूसकेंद्री असते. माणसाचे गाणे गाणाऱ्या संस्कृतीचा उद्घोष या कवितेने केला आहे. 'रॉकगार्डन'मधील कविता आत्मटिकेला धिटपणे सामोरे जाते. स्वकीय जगातील दोष उघड्यावर मांडताना तिला भिती वाटत नाही. स्वेतराच्या जगाला जशी ती ताकदीनिशी उघडेनागडे करते तशी स्वकीय जगाच्या बाबतीतही वर्तन करताना दिसते. अरुण काळे हा कवी चळवळीवर निष्ठा असणारा कार्यकर्ता आहे. म्हणून त्याला स्वकीयांच्या गुणदोषाची पर्वच वाटत नाही. रोकठोकपणे तो ठोकाठोकी करतो. चळवळीच्या वाटचालीला गतीरोधक ठरणाऱ्या अनेक प्रवृत्तीवर तो आसूड ओढतो. चळवळीचा वेग मंदावल्यामुळे खिन्न होतो. बुद्धिप्रामाण्य, तर्कशुद्धता, विज्ञाननिष्ठा, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवी मूल्यांच्या पायावर उभ्या असलेल्या धम्माची, पर्यायाने बुद्धाची ओळख आंबेडकरांमुळेच झाली. परंतु पुढे आंबेडकरोत्तर काळात धम्मस्वीकारानंतर काय? धम्मस्वीकारांनतरचे आचाराचे वास्तव कोणते? असे प्रश्न उपस्थित झाले.

तू आणि तुझा धर्मप्रवर्तक शिष्य / पुष्कळ करून गेलाय निर्माण
पण आम्हालाच जर पितळेचे दागिने वापरण्याची हौस असेल तर
कसलं कळावं सोन्याचं मूल्य!
म्हणून वाटतं कधीकधी तू आमच्या नादानपणाला
हसत तर नाहीस ना?

येथे वर्तमानाच्या संदर्भात बुद्धाच्या स्मिताचा नवा अन्वयार्थ लावला असून समकालीन आचाराच्या वास्तवाचा त्याला आधार आहे. ज्या तत्त्वांचा जीवनमार्ग म्हणून स्वीकार केला त्या तत्त्वानाच हरताळ फासण्याची कृती घडल्यामुळे बुद्धाच्या स्मिताचा नवा अर्थ जो आजच्या वर्तमानाला म्हणजेच नादान कृतीला शोभणारा आहे. अशा अर्थाच्या अन्वयामुळे एक वेगळे कलात्म परिमाण या कवितेला प्राप्त झाले आहेत. स्वकीय जगातील निर्ढावलेल्या फुटीर अपप्रवृत्तीला या कवितेने फैलावर घेतले आहे. 'पायाच्या पुण्याईने' या कवितेत कार्यकर्त्याचा बेरकीपणा, बेगडीपणा, दांभिकता, आत्मसंतुष्टता या

सर्व गोष्टीचे दर्शन घडविले आहे. हा कार्यकर्ता व्यवस्थेचा बळी आहे. दुसरीकडे तो दयेला पात्र आहे. स्वत:चे भलेबुरे कळत नाही असा एक टिपीकल कार्यकर्ता या कवितेने पेश केला आहे. जीवनातील विसंगतीचे विडंबणात्मक शैलीतून दर्शन घडविण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. उघड्यानागड्या वास्तवामुळे जशी ही कविता अस्वस्थ करते तशीच ती मिश्किल उपरोधाच्या अंगाने जाणारी असल्याने एक बोचरे हास्यही फुलविते.

रॉकगार्डनमधील लढाऊ व्यक्तिमत्त्वाच्या कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'आईसाठी', 'नेल्सन मंडेला' यांसारख्या अतिशय महत्त्वाच्या कविता आहेत. कडू काळाशी झुंज देणारी आई येथे पाहावयास मिळते. मानवमुक्तीच्या आंदोलनातील मंडेला हे एक महान पर्व आहे.

केप ऑफ गुड होपला वळसा घालून जाताना
कुठलाही विचार तुला ओलांडून जाऊ शकत नाही
माणसाच्या मुक्तीचे गाणे तुझ्याशिवाय
पूर्ण होऊ शकत नाही.

माणसाच्या गाण्यातील अपरिहार्यता म्हणजे नेल्सन मंडेला! संघर्षशील लढाऊ व्यक्तिमत्त्व ते गुलामी विरुद्धच्या बंडाची प्रेरक शक्ती असे मंडेलांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व या कवितेने रेखाटले आहे. अरुण काळेची कविता सहानुभूतीदाराचे नकली प्रेम, केवळ वेळ मारून नेण्यासाठी सांत्वनाचे नाटक करणाऱ्या कृती उक्तीना उघडेनागडे करण्याचे काम करते. माणसाने माणसाशी माणसासारखे वर्तन करावे असा विचार मांडते. या कवितेत विचाराच्या अनुषंगानेच प्रेम प्रकट होते.

सायरनचे शहर (१९९७) हे अरुणच्या कवितेचे पुढचे पाऊल आहे. दंगल-दहशत-दडपशाही आणि दांभिकता या वास्तवाचे भयकारी दर्शन या कवितांनी घडविले आहे. हे 'द'काराचे भयकारी वास्तव शहराच्या केंद्रस्थानी असून त्याभोवती धर्म, समाज, राजकारण, सांस्कृतिक क्षेत्रे, वस्त्या, माणसे, टोळ्या, मेंढरे, बुळगे गिधाडे, घुबडे या सर्व घटकांच्या अनुषंगाने येणारे सामर्थ्य आणि दुबळेपणा, दहशत आणि भित्रेपणा, क्रुरता आणि कारुण्य, हिंसा आणि शांतता , कलह आणि तह, धुरकटपणा आणि काळवंडलेपणा, अमानवीकरण आणि मानवता ह्या सर्व विरोधकांचा प्रत्यय कधी सूचक रूपात, कधी ठळक तर कधी परखड आणि स्पष्टपणे प्रत्ययाला येतो. शहराच्या आक्राळविक्राळ रूपांचे अनेक पैलू या कवितेत साक्षात झाले आहेत. ''वस्तुत: समकालीन वास्तव प्रकट करणे ही कलावंतापुढील अवघड समस्या असते. परंतु अरुण काळे त्यातून सहजपणे मार्ग काढतात, आपले अनुभव काव्यात्म रितीने प्रकट करताना उपहास, उपरोधामुळे या महानगरीय जीवनानुभवाला अधिकच धार प्राप्त होते. मर्ढेकरानंतर महानगरीय वास्तवाचे एवढे प्रभावी आणि उत्कट दर्शन प्रथमच घडत आहे. ''[२] असे डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांनी या कवितेविषयी आपले मत मांडले आहे. परंतु महानगरीय वास्तवाचे उग्रभीषण दर्शन घडविणे एवढेच या कवितेचे कार्य नाही. हे शहर कोण्या एका नगराचे प्रतीक नसून विविध ताणाखाली जगणाऱ्या, तुमच्या आमच्या मनावर दहशतीचा पंजा सतत उगारून असणाऱ्या, माणसाच्या रक्ताची मागणी करणाऱ्या हिंस्त्र आणि अमानुष शक्तीचे, युद्धखोर आणि क्रुद्ध क्रुर शक्तीचे प्रतीक ठरते. अनियंत्रिपणे अधिराज्य करणाऱ्या शक्तीलाही आपल्या ताब्यात ठेवणारी एक अधिसत्ता किंवा सत्ताबाह्य सत्ताकेंद्र अस्तित्वात असते. अशा क्रुर अधिसत्तेच्या भयसूचक चेहऱ्याचे दर्शन 'सायरनचे शहर'मधील कवितेने घडविले आहे.

मनुवादी व्यवस्था ते संगणक युग या प्रवासात मूलतत्त्ववाद आणि आंतकवाद हातात हात घालूनच प्रवास करीत आले. धर्मशास्त्राच्या जोडीला आधुनिक शस्त्रेही असल्यामुळे माणसाचे मरण अधिकच सोपे झाले आहे. आतंकवादाची मूळं जात, धर्म, सत्ताकांक्षा आणि भूक या घटकातच सामावलेली आहेत असा विचार 'सायरनचे शहर'मधील कवितेने मांडला आहे.

आतंक, देशाच्या छाताडावर बसलेलं घुबड
लोकशाही, दु:खाच्या झाडावर बसून वाढणारं स्वप्न

नागरिक आणि श्वापद एकत्र
ही युद्धभूमी जातधर्माची, सत्ताकांक्षीची, पोटाची

नोकरशाही, सामंतशाही, सावकारी या सर्वांनीच हा प्रदेश पोखरून काढला आहे. तो म्हाताऱ्या त्वचेसारखा रखरखीत आणि नि:सत्व बनला आहे. सरकारे आणि प्रसारमाध्यमे सर्वसामान्यांच्या बाजूची राहिलेली नाहीत. धनाढ्यांच्या बाजूने झुकली आहेत. त्यांना दंगलीच्या कहाण्या आणि होरपळीचे झकपक फोकस यासाठी जिवाचे रान करणे अगत्याचे असते. माणसाच्या मन आणि भावनांचा विचार त्यांचे लेखी नसतो. वित्तहानीच्या हिशोबाला प्राधान्य असते. दंगलीचे शास्त्र बनविणाऱ्यांना पुरक अशीच माध्यमांची भूमिका असते. अशातच दंगलीचे प्रणेते संरक्षणाच्या कवचात सुरक्षित राहून दंगलीचे शास्त्र घडवीत असतात. या प्रणेत्यांच्या अंतरंगातील सैतान शांततेच्या बुरख्यातून जातीयुद्ध पसरवीत जातात. धर्मही दंगलीचा प्रणेता बनतो आणि युगायुगांच्या जखमांचे दान माणसाला देतो. पूर्वनियोजित कटातून हे साध्य केले जाते.

त्याच्या पुण्यस्मरणात टाकलेला खडा
कुणी बनवला विजयदिन, कुणी काळा दिन

ज्या महामानवाने या देशाला संविधान दिले त्याच्याच स्मृतीदिनी बाबरी मशिदीचा विद्ध्वंस घडवून आणणे हा नियोजित षडयंत्राचाच एक भाग होता. बुद्धजयंतीच्या दिवशी अणूचाचण्या घेणे, स्फोट घडवून आणणे ही या षडयंत्राची दुसरी बाजू आहे. एकाच वेळी तत्त्ववेत्याचे आणि अल्पसंख्यांकाचे खच्चीकरण करणे हा मुख्य उद्देश मूलतत्त्ववाद्यांनी सफल केला म्हणून सहा डिसेंबर हा हिंदू राष्ट्रवाद्यांचा विजय दिन आणि अल्पसंख्यांकांच्या दृष्टीने काळा दिवस ठरला. कधीही न भरून निघणारी ही जखम आहे. मूलतत्त्ववादाचे आणि आतंकवादाचे शवविच्छेदन अरुणच्या कवितेने अतिशय प्रभावीपणे केले आहे.

सायरनच्या शहरात बदलत जाणाऱ्या माणसाचे संदर्भ, माणूस आणि त्याचे जगणे, माणूस आणि त्याचे व्यक्तिमत्त्व याचे क्षकिरणच वाचकांपुढे ठेवले आहे. माणूस प्राण्यासंबंधीचे चिंतनकाव्य असेच या कवितेचे स्वरूप आहे. ही कविता माणसाच्या सृजनशील आणि विद्ध्वंसक रूपाचे दर्शन घडविते. माणसाची महानता आणि मलीनता, उत्क्रांती आणि पशूत्व, संस्कृतीचा शिल्पकार आणि विकृतीचा निर्माता अशी माणसाची विविध रूपे, माणसाचे सामर्थ्य आणि मर्यादांचा लपंडाव कविताभर विखुरला आहे. विज्ञानाचे स्वागत करतानाच अंधश्रद्धेत गुरफटणारा माणूसच आहे. आणि नीती अनितीचा डोहही माणूसच साचवितो.

तू आईवर महाकाव्य रचणारा / तू आईला बाजारात विकणारा
शुद्राहून बदत्तर बनवणारा / नरकाच्या भितीखाली वावरणारा
धर्म ओकणारा तू निवासी

तत्त्वाच्या पातळीवर मातेचे गुनगान करणारी, महाकाव्यातून आईचा गौरव करणारी प्रतिभा जितकी उच्च स्थानावर जाऊन पोहचते तितक्यात वेगाने माणूस व्यवहाराच्या पातळीवर तिला नरकात आणून ठेवतो. माणसाचा निचांक आणि उंच्चाक किती आणि कसा आहे?

तू निर्मिलेस युद्धाला आणि बुद्धाला
धर्मयुद्ध करणारा रानटी / तू नखानं पाखरं सोलणारा
तू वर्णद्वेषाचा काळिमा फासतोस आभाळाला.....

प्रेम, नितीमत्ता ही मूल्ये कालबाह्य ठरली आहेत की काय? जगाच्या कल्याणासाठी शांततेचा संदेश देणारी तत्त्वज्ञाने माणसाने नासवून टाकली आहेत. शस्त्रास्त्राच्या आलम दुनियेत विद्ध्वंसाची वात पेटविणे हाच गुणधर्म ठरतो आहे. काराल स्वरूपाचे वास्तव मांडून अरुणची कविता माणसाला हादरवून टाकते. आजच्या ग्लोबल युगात ग्रहयुद्धे सुरू झाली. परग्रहावरून पृथ्वीवरील माणसे मारणे सोपे झाले आहे. परंतु जिथे गृहयुद्धेच एवढी टोकाला गेली आहेत की, परग्रहावरून क्षेपणास्त्राचा मारा करण्याचीही गरज उरली नाही. कारण,

एकतर दुश्मन वस्तीतच असतात
किंवा ओळखीचे किंवा मित्र किंवा शेजारी किंवा....
कुठल्याही तत्त्वासाठी वापरतो अद्ययावत शस्त्र कुणीही
ज्याच्या हाती विज्ञान तो सज्ञान भले तो अज्ञान

शास्त्रासाठी शस्त्राच्या माध्यमातून, दंगलीच्या साधनाने माणसे मारणे अतिसहज आणि सुलभ झाले आहे. मरण स्वस्त झाले आणि दास्य दैन्य अफाट वाढले आहे. नव्या शतकाच्या तोंडावरील हे वास्तव मन बधीर करणारे आहे. म्हणून शहराच्या पार्श्वभूमीवर कवीने उपस्थित केलेले प्रश्न, या शहराने आपल्याला काय दिले? कसं म्हणू हे शहर माझं आहे? प्रकाशाच्या पायवाटा पुसट होतात की काय? मानवता होते की काय नि:संतान? हे माझ्या मंगल देशा तू कुठं आहेस? हे सारे चिंताक्रांत प्रश्न अधिकच अर्थपूर्ण ठरतात आणि वाचकांनाही व्यथीत करतात.

अरुणची कविता बुद्ध संस्कृतीच्या परंपरेतील मिथ्स्, नजिकच्या इतिहासातील प्रतिमा अतिशय ताकदीने उभ्या करते. तक्षक, अमृतनाक, सिधनाक, रमाई या साऱ्याच प्रतिमा आपल्या सामर्थ्यासह साकार होतात. हा कवी स्वत:सह चळवळीला तपासतो. त्यातून आत्मटिका अधिकच प्रखर होत जाते. नेतृत्व, नेतेगिरी, चळवळ, तिचे यशापयश या गोष्टी कवितेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. स्वत:ला तपासण्याची तयारी अलिकडच्या कवितेत प्रामुख्याने दिसून येते. अरुणच्या कवितेने प्रतीकांच्या उपयोजनातून समकालीन जीवनाच्या संदर्भात विपरीत किंवा नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. पारंपरिक प्रतीकांना नवा अर्थ देण्याची प्रक्रिया या कवितेत घडली आहे. उदा.

गिधाडे तर राहू लागली शहरातच
मिळवलेत त्यांनी घटनात्मक हक्क नागरी संस्कृतीचे
बोलताहेत मानवी हक्कावर
गिधाडे आता शांतता समित्यावर असतात.
अन् विचारपूसही करतात जखमींची
ओवतात सर्वांना प्रार्थनेच्या दोऱ्यात
पेटवून पाणी, पेटवून रक्त गिधाडे स्वत:च अंकुश झालीत
व्यवस्थेला हाताळतात व्यवस्थीत किंवा काढतात मोडीत
गिधाडे आता काहीही होऊ शकतात
कबुतरांना खाऊन शांततेचे प्रतीकही होऊ शकतात.

मृत जनावराचे मांस, मांसाचे लचके तोडणे हे गिधाडाचे संचित आहे. मात्र येथे विशिष्ट प्रवृतीच्या संदर्भात 'गिधाडा'चे कार्य घडताना दिसते. म्हणून त्याला नवा अर्थ प्राप्त होतो. ज्याप्रमाणे वटवाघूळ झाडाला नेहमी उलटे लटकलेले असते तसा उलटा, उफराटा प्रकार येथे घडला आहे. या कवितेत अनेक घटकांची उलटापालट झाली आहे. अशा उलटापालटीतून गिधाडाला फॅसिस्ट प्रवृतीच्या माणसाचे रूप प्राप्त करून दिले आहे. त्यामुळे अनियंत्रितपणे अधिराज्य गाजविणाऱ्या फॅसिस्ट प्रवृतीचे प्रतीक असा अर्थ गिधाडांना प्राप्त झाला आहे. सामान्य माणूस भयभित, दहशतीखाली आणि गिधाडे दहशतवाद्यांच्या भूमिकेत शहरावर अधिराज्य गाजवित आहेत. म्हणून 'गिधाडे' या प्रतीकाचा नवार्थबोध घडल्याचे प्रत्ययाला येते. अशा अनेक प्रतिमा, प्रतीकांचा आढळ 'सायरनचे शहर' मध्ये होताना दिसतो. त्यामुळे सायरनचे आवाज या शहरातील माणसांना दचकवून सोडतात. भयभित करून सोडतात आणि माणसे आपला जीव मुठीत धरून सरपटत राहतात.

थोडक्यात, अरुण काळेच्या कवितेला चिंतनाचे बळ अधिक आहे. उपरोध, उपहास हा त्याच्या कवितेचा स्थायीभाव आहे. असे असलेतरी अनुभूतीचे कलात्म आविष्करण हे त्याच्या कवितेचे प्रबळ तत्त्व आहे. अनुभवाकडे तठस्थतेने पाहण्याच्या वृत्तीमुळे ही कविता अधिक पिळदार होते. सायरनच्या शहराऐवजी निरामय वस्तीचे स्वप्न पाहणारी,

समतेच्या पदपथावरील वाटचाल करू पाहणारी ही कविता शहराच्या उग्रभीषण आणि विद्रूप अंत:करणावर जालीम उपाय सूचविते. प्रज्ञासूर्याला अभिप्रेत असलेल्या समाजनिर्मितीचा ध्यास आणि ध्येय या कवितेने उराशी बाळगले आहे.

या दशकातील सुरुवातीच्या पाच वर्षांतील काही महत्त्वपूर्ण कवितासंग्रहांचा निर्देश करता येईल. उदा. उल्हासिनी कांबळे, **हरवलेला किनारा** (१९९१), भरतकुमार दहिहंडे, **कफन**, वामनराव जगताप, **छेदचक्र** (१९९१), रमेशचंद्र सोनावणे, **नालंदा** (१९९१), प्रमोद वाळके, **हे गाव कुणाचे आहे** (१९९२), भगवान भोईर, **उन्हातलं झाड** (१९९२), भगवान जाधव, **आक्रोश** (१९९२), वामन करवाडे, **काळसास** (१९९३), बलभीम तरकसे, **भीम गीतांजली** (१९९३), दीपककुमार अंबादास, **वायटुळ** (१९९३), नारायण अतिवाडकर, **जाळुनि किंवा पुरूनी टाका** (१९९३), गोकुळदास मेश्राम, **उद्ध्वस्त करायचं आहे मला** (१९९३), मोहन इंगोले, **वैशाखी पळस** (१९९३), गंगाधर मेश्राम, **टेहळणी** (१९९४), काशिनाथ वेलदोडे, **घुसमट** (१९९३), नारायण येळगावकर, **भीमाचे गोंधळी** (१९९४), धर्मराज धेंडे, **जळवा** (१९९४), शिवा इंगोले, **चिंतनसूर्य** (१९९४), राजेश डोंगरे, **चळवळीच्या कविता** (१९९५) इत्यादी.

वामनराव जगताप याचे **छेदचक्र** आणि **अग्निदिव्य** असे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. 'छेदचक्र'मधील कविता नामांतर आंदोलन, या आंदोलनात बळी पडणारे लोक, राखीव जागा, दलित मध्यमवर्गीय प्रवृत्ती इ. विषयांनी प्रभावित झालेली आहे. **हे गाव कुणाचे आहे**? असा प्रश्न **प्रमोद वाळके** यांनी उपस्थित केला आहे. तो प्रातिनिधिक आहे आणि 'गाव' प्रतिकात्मक आहे. या गावात फुल्यांची फुलबाग ओस पडली आहे, मायाळू सावित्रीची कुस वांझोटी झाली आहे, भाकरीच्या तुकड्यासाठी येथे आक्रोश सुरू आहे, दलालांनी आपली घरे भरली आहेत. घरभेदयांच्या कारवायांना येथे ऊत आला आहे. बुद्धाचे, शिवबाचे संस्कार येथे नागडे झाले आहेत. म्हणून 'हे गाव कुणाचे आहे'! असा जीवघेणा प्रश्न या कवितेने उपस्थित केला आहे. वाळके यांच्या कवितेने समकालीन जीवनातील समस्यांना हात घातला आहे. धार्मिक, श्रमिक आणि अंधारयात्रिक यांचेभोवती रुंजी घालणाऱ्या या कवितेने काही निरीक्षणे नोंदविली आहेत. 'कैफात धर्मवेडे रस्ते दलाल झाले' त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सर्वसामान्यांना नागविणाऱ्यांना व्यवस्थेच्या विरोधात संघर्षरत होण्याची प्रेरणा मिळाल्यामुळे 'अंधार यात्रिकांचे रस्ते मशाल झाले' असे निरीक्षण या कवितेने नोंदविले आहे.

भीमप्रवाहाचे पाणी कसे झाले हे दुषीत
अंकुरही तरारेना सुपीक जमिनीत

असे सांस्कृतिक जीवनातील निरीक्षणही नोंदविण्यात आले आहे. वाळके यांच्या कवितेने काही प्रयोगही केले आहे. वेगवेगळे काव्यप्रकार हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. शाहिरी परंपरेतील 'सवाल जवाब' रचनेचा आकृतीबंध स्वीकारून शील आणि चारित्र्याचे महत्त्व सांगीतले आहे. वऱ्हाडी बोलीचे उपयोजन केले आहे. त्याआधारे काही गेय रचनाही केल्या आहेत. जात्यावरच्या गाण्याचाही रचनाबंध पाहावयास मिळतो. उदा.

माय दरण दरते। उरला शेवटचा फेरं
पंचशीलाचे निशाण। डोले नागभूमीवर

गजलांची रचनाही केली आहे. त्यातून आंबेडकरी विचारांची पेरणी केली आहे. तसेच साहित्यक्षेत्रातील सवत्यासुभ्याचाही समाचार घेतला आहे. उदा.

आम्ही नवकवी जसे बाजारात उभे
निर्मियले सुभे प्रस्थापितानी

अशाप्रकारे वाळके यांच्या कवितेने समकालीन प्रश्नांसह विषयवैविध्य राखण्याचा प्रयत्न केला आहे. **दीपककुमार अंबादास** यांची **वायटुळ** ही प्रतिकात्मक कविता आहे. नामांतर आंदोलनाचा एक प्रभाव या कवितेवर आहे. तसेच 'तू बांधून ठेवलेल्या चळवळीचे प्रत्येक गावात धिंगाणे सुरू झाले' असे चळवळीच्या 'फुटीरतेचे एक

वास्तव मुखरीत करण्याचा प्रयत्न केला आहे. 'वायटूळ' हे विद्रोहाचे प्रतीक म्हणूनच साकार झाले आहे. विशेषत: रामजन्मभूमी, रथयात्रा, दंगली, झुंडशाही यामुळे निष्पापांचे गेलेले बळी या वर्तमान सत्यावर प्रकाश टाकणारी ही कविता मूलतत्त्ववादी प्रवृत्तीवर आघात करते. भ्रष्टाचाराच्या अनेक जागा दाखवून दिल्या आहेत. शैक्षणिक संस्थांमधील भ्रष्टाचार, डोनेशनच्या नावाखाली चालणारा बाजार, भांडवलदारांची दरोडेशाही, स्वार्थी पुढारी 'या लबाडांच्या थोबाडावर दगड मारून' ही 'वायटूळ' घोंगावत राहते. 'वायटळू' ही वादळापेक्षा लहान असते. ती प्रासंगिक असते. मात्र वायटूळीच्या तडाख्यात जे सापडतात त्या सर्वांची दाणादाण उडत असते. 'धर्माच्या नावावर माणसांच्या कत्तली घडवून आणणारांच्या, माजलेल्यांच्या घरावर आग टाकून घोटाळणारी ही 'वायटूळ' आहे. अशा पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर उपस्थित झालेले अनेक प्रश्न वाचकांच्या पुढ्यात ठेवले आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे येथे स्वप्न पाहण्याची मुभाच या पर्यावरणाने दिली नाही.

जेथे जावे तेथे गिधाडांची वस्ती
स्वप्नांचे चांदणे कुठल्या आकाशात फुलवावे

अशी अवस्था झाली आहे. जे पर्यावरण निर्माण झाले ते अनैसर्गिक आहे. म्हणून

हे सूर्यफुला तू दिलेला नवा संदेश
आमचा वायटूळ पेरत असते

अशी कबुली या कवितेने दिली आहे. एका अर्थाने आंबेडकरी विचारशस्त्राने शत्रूवर चाल करण्यासाठी सज्ज झालेल्य विद्रोहीमत्त्वाचे आरेखन या 'वायटूळ' ने केले आहे.

गोकुलदास मेश्राम यांचा **उद्ध्वस्त करायचं आहे मला** हा संग्रह परिवर्तनासाठी पारंपरिकता उद्ध्वस्त केली पाहिजे असा विचार मांडणारा आहे. तटबंद्या उद्ध्वस्त करून रानातील विषारी श्वापदे मारण्यासाठी रान पेटविले पाहिजे. आंधळ्या लेखकांना सत्य लिहिता येत नाही म्हणून डोळस करायचे आहे. प्रस्थापित व्यवस्थेने स्वत:साठीच राखीव ठेवलेल्या हिरव्या कुरणाचे सार्वत्रिकीकरण करावयाचे आहे. अशा रचनात्मक मार्गाचा विचार कवितेतून प्रकट झाला आहे. शोषकांना जाळले पाहिजे असाही उच्चार ही कविता करते. उच्चनीच भावनेतून आकारास आलेल्या मानवी वर्तनातील विषमतेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. लाचारी नाकारणारी जाणीव व्यक्त केली आहे. महापुरुषांचे पुतळे उभारल्याने समाजमनात त्यांचे विचार रुजत नसतात. पुतळे उभारणे हा तसा विभूतीपूजेचाच प्रकार आहे. मनुष्यत्व ही प्राप्त करून घ्यावयाची बाब आहे. मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त करून घेता आले नाही तर हिंस्त्रता, पशुत्व, कपटीपणा, सूडबुद्धी, व्यभीचार या साऱ्याच अवगुणाचा प्रादुर्भाव माणसांच्या ठायी होतो. आंबेडकरी विचार, आंदोलने म्हणजे परिवर्तन आणि क्रांतीचा पाऊस असल्याचे कवीने नमूद केले आहे. चवदार तळ्यावर हा पाऊस बरसल्यामुळे संघर्ष, ज्ञान आणि साहित्याचे पीक पिकल्याचे परिवर्तनाचे ऐतिहासिक वास्तव अधोरेखित केले आहे. **वैशाखी पळस** ही **प्रा. मोहन इंगोले** यांची गेय रचना असून त्या माध्यमातून इंगोले यांनी 'भीमायन' रचले आहे. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतची 'भीमगाथा' सांगीतली आहे. शेवटी आदरांजली वाहताना कवी म्हणतो

हे युगपुरुषा! महामानवा! सकळजना तू उद्धरीले
विद्यापती तू ज्ञानसागरा, ज्ञानवंत तुज ज्ञान म्हणाले ।।
दीन जनास्तव राबराबला, थांब आता तुज युग म्हणाले
प्रस्थानाची वेळ जाहली 'बोधिसत्वा' तुज बोधी म्हणाले ।।
थकला आता घेई विसावा, हृदयी माझ्या चैत्य म्हणाले ।।

ही सारी भीमगाथा वाचताना, ऐकताना राजानंद गडपायले यांच्या 'गीत भीमायन' डोळ्यासमोर उभे राहते.

भीमाचे गोंधळी हा **नारायण जाधव येळगावकर** यांचा गेय रचनेचा काव्यसंग्रह. आंबेडकरी शाहिरीची फार मोठी परंपरा आहे. त्या परंपरेला जोडून घेणारे अलिकडच्या काळातील नारायण जाधव हे महत्त्वाचे नाव आहे. वामनदादा

कर्डक हे या परंपरेचे शिरोमणी आहेत. आणि तेच या कवीचे आदर्श आहेत. या काव्यसंग्रहात प्रामुख्याने युगपुरुष बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाची गाथा मांडली आहे.

जहाल विषारी जिथे विषमता / कुणी कुणाचा कुणीही नव्हता
तिथे भीमाने दिले जगाला बंधुत्वाचे धडे ।।२।।
अवचित पडती भारत भूवर समानतेचे सडे..

शिक्षणाचं महत्त्व, तथागताचा विचार, स्वातंत्र्य असे अनेक विषय या गीतांच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्याचप्रमाणे देशभक्तीपर गीतांच्या चालीवरील, भजनाच्या चालीवरील गीतांचाही आढळ होतो. म. फुले, सावित्रीबाई फुले यांचे कार्यकर्तृत्व, समकालीन जीवनातील अंतर्विरोध अशा अनेक विषयांना या रचनांनी हात घातला आहे.

बुद्धाच्या देशात हिंसेने घातलेले थैमान, राजकारण्यांची बदमाशी, सत्तेच्या खुर्चीभोवतीची लाचारी, स्त्रियांवरील अत्याचार, असुरक्षितता हे सारे वास्तव या रचनांनी मुखरीत केले आहे. उदा.

गांधीचा देश रोजच रक्ताने न्हात आहे
देशाचे शेत आता कुंपणच खात आहे
आपलेच ओठ आणि आपलेच दात आहे
जागा हो बांधवा तू वैऱ्याची रात आहे
हे सारे थेर पाहून फडफडतो कसला आता
तडफडतो नुसता तिरंगा ।।३।। जिथे तिथे नाच नंगा...

हिंसा, दांभिकता, यासोबतच येथे सर्वधर्मसमभावाची गाणी गळा फाडून गायिली जातात. त्याच वेळी वेगळ्या राज्याची मागणीही केली जाते. असा विरोधाभास या गीतातून प्रत्ययाला येतो. आंबेडकरोत्तर काळात समाजाची पंख छाटलेल्या पाखरासारखी अवस्था झाली या स्थितीचे करुण चित्र रेखाटले आहे. जातीवादी शक्तीनी दलित संघर्षात, आंदोलनात जिवाची बाजी लावणारांचे जीव घेतले, त्याचवेळी गटबाजीच्या राजकारणानेही माणसाचा वापर करायला सुरुवात केली. सामान्य माणूस, आंबेडकर अनुयायी सैरभैर झाला.

हा भीमा मी तुझ्याविण छत्रहीन झालो
दिशाहीन दृष्टीहीन नेत्रहीन झालो
कसी कास कुणाची धरू ।।४।। पंख छाटलेलं पाखरु...

अशा दिशाहीन अवस्थेत 'आपसातील दुहीतच आपले मरण' असल्याचा निष्कर्ष मांडला आहे. वामनदादा कर्डकांच्या कर्तृत्वाचा गौरव जाधव यांनी केला आहे. 'मनुमनाशी लढण्यासाठी घेऊन तबलापेटी वामन गायला' आयुष्याच्या अंतापर्यंत.

किर्तीची उंच मनोरे। लाथाडून वैभव सारे
झोपडीतल्या दुबळ्यांसाठी। खाऊन कांदा रोटी ।।३।। वामन गायला.

त्याच बरोबर आंबेडकरी शाहीर प्रभाकर गवई, गोपीनाथ मिसाळ आणि त्यांचे सहकारी या सर्वांनी कलापथकाच्या माध्यमातून प्रबोधनाचे महान कार्य केले त्याचाही आलेख या गीतांनी चितारला आहे.

उठलयं वादळ उधाण या रचनेत दलित साहित्याचा इतिहास काव्यबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात आंबेडकरी शाहिरांपासून ते पहिल्या पढीतील बहुतांश लेखक कवींचा नावानिशी उल्लेख केला आहे. या साहित्य चळवळीचे 'हाती विद्रोहाचा घेऊन झेंडा चालला, तांडा चालला' असे वर्णन केले आहे. हे करीत असताना 'डॉ. म.ना. वानखेडेंनी घातला पाया / अन् पानतावणे सर झाले कळस।' असेही उद्‌गार काढले आहे. त्याबाबत डॉ.गंगाधर पानतावणे यांनीच खुलासा केला आहे. , ''मला वाटते ही अत्युक्ती आहे. आमच्या साहित्याचा पाया दुसरा तिसरा कोणी नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच तो घातला आहे. आणि तेच शिखर आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे।''[३] त्यामुळे इतर कोणीही

कळस होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. मात्र आंबेडकरोत्तर काळातील इतिहास असा आहे की औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालय आणि नागसेनवन परिसरानेच दलित साहित्याचा पाया घातला. त्यात डॉ. म.भि.चिटणीस आणि डॉ. म.ना. वानखेडे यांचे योगदान अनन्यसाधारण आहे आणि पुढील काळातील 'अस्मितादर्श'चे ही योगदान अनन्यसाधारण आहे.

'भिमाचे गोंधळी या रचनेत शाहिराने दलितांच्या चळवळीतील, विविध गटांच्या सर्व पुढाऱ्यांना गोंधळासाठी आवाहन केले, 'आवळ्या भोपळ्याच्या मोटीवाणी' या पुढाऱ्यांचा मेळ आहे. एकीकरणाचा घोळ आहे. भीमाच्या धनावरचे हे सारे चोर आहे. अशीही संभावना केली आहे. शेवटी

अन्यायाशी झुंजणारी। भीमरायाची काठी व्हा
काठी काठी करा ऐखट्टी बांधा तिची मोळी.

असे आवाहन केले आहे. थोडक्यात, नारायण जाधव येळगावकर यांची एकूणच रचना वैविध्यपूर्ण असून प्रबोधनासाठी तिने स्वत:ला वाहून घेतले आहे. आंबेडकरी शाहिरी परंपरा विकसीत करण्यासाठी 'भीमाचे गोंधळी' ने मोलाचे योगदान दिले आहे.

✹ शिवा इंगोले

यांचे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. **चिंतनसूर्य** (१९९४) आणि **उजेडयात्रा** (१९९९). या कवीची कविताविषयक भूमिका आणि कवितेचे विषय ठरलेले आहेत. एका कवितेत म्हटल्याप्रमाणे, माझे असतात कवितेचे विषय साधेसुधे, अंधार उजेडाचे, उनसावल्याचे, कण्हण्याचे, काहीसे हसणाऱ्या क्षणाचे. आपली कविता नकारात्मक चिंतनाची असल्याचेही कवीने जाहीर केले आहे. हा कवी भूकेने व्याकुळलेल्या कवितेच्या ओळीवर उभा आहे. अशा वेळी भोवतालकडे निरखून पाहताना त्याला अनेक गोष्टी प्रत्ययाला येतात. उजेडाची मागणी केल्यानंतर ओंजळीत अंधाराची फुले टाकणारी दुनिया भोवताली अस्ताव्यस्त पसरली आहे. म्हणून भुकेलेल्या माणसांच्या अंधारात प्रकाशाचे डोळे घेउन महायुद्धाचे आगमन व्हावे असे या कवीमनाला वाटते.कवितेच्या फुलण्याची प्रक्रियाही वेगळ्या स्वरूपाची आहे.

हातावर भाकर खाणाऱ्या घामकर्मीच्या मांडीवर
निजावे मूल, तशी माझी कविता फुलत जाते

हे घडत असताना कवी भोवतालची निरीक्षणे नोंदवित जातो.रुढीग्रस्त वाळवीने सामाजिक मन पोखरून काढले आहे. त्यातून माणसाचे 'मरणव्याकूळ माहेर' निर्माण झाले आहे. त्यातून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेत ही कविता गुंतली आहे. कारण क्षयवृक्षासारखे खुरटलेपण इथल्या सांस्कृतिक पर्यावरणामुळे वाट्याला आले आहे. निसर्गप्रतिमांचे प्राबल्य या कवितेत असून त्या प्रतिमांच्या माध्यमातून मानसिक आणि सामाजिक पातळीवरील अंतर्विरोधाचा वेध घेण्याचा प्रयत्न ही कविता करते. निसर्गचक्राच्या आणि सामाजिक दिनचर्येच्या प्रवासात सनातन सूर्य, सनातन संध्याकाळ यांनी आसमंत व्यापला आहे. भयव्याकूळता, विवंचना, जखमातून वाहणारा अंगार, सूर्यावरचा अंधार अशा पर्यावरणात ही कविता घडत गेली आहे. गुदमरलेपणातूनच कवितेला वादळदिवा चेतवण्याची उर्मी प्राप्त झाली आहे. त्यामुळे ती स्वत: पेटून प्रवासाला निघाली आहे. मानवतेचा मळा फुलून यावा यासाठी सारे विश्वच तहानलेले आहे असे वास्तव अधोरेखित करते. बुद्धाच्या करुणेने हे विश्व ओथंबून जाईल असा आशावाद कवितेने जोपासला आहे.

आता पावसाच्या सरी कोसळतील घरादारावर
एखादा फुले आंबेडकर बरसून उठेल वादळी ऋतूसारखा
मग ही झाडे मोहरून उठतील
असंख्य मायबहिणींच्या गात्रांवर
कोसळतील अस्मितेच्या जलधारा नि मग
सारेच जाईल विश्व व्यापून करुणेच्या महासागराने!

ही कविता आशावादी असली तरी गटातटाच्या वितंडवादाने ती खंतावली आहे असेही प्रत्ययाला येते.

तशी ही चारही पाखरे
एकाच कोषातील त्याच जेतवनातली
वाढत आली महू गावच्या मातीतून
त्याच गावच्या रक्तवाहिन्यातून
काळाराम मंदिरापर्यंत, महाडच्या चवदार तळ्यापर्यंत
आणि थबकली दीक्षाभूमीच्या संपन्नतेत! ...
आता तर या पाखरांच्या चिवचिवाटात
आंबेडकरांचे संभाषणही ऐकू येत नाही

या खंतावलेपणातून आणि भोवतालच्या निराश करणाऱ्या पर्यावरणाच्या कडेवर ही कविता विसावताना दिसते.

जेथे फुलांना गंध नाही झाडांना पाणी नाही
मातीला ओढ नाही
कसे झाले आहे सर्व विराण स्मशानवत
गाव खेडे शहर आणि आपला देश देखील!

अशा वैराण देशाचे चित्र रेखाटून एका अर्थाने वर्तमान देशस्थितीवरच या कवितेने नेमकेपणाने बोट ठेवले आहे.

✹ गंगाधर अहिरे (जन्म ३ फेब्रुवारी १९६३)

सीमा सरकताहेत (१९९४) हा गंगाधर अहिरे यांचा पहिला कवितासंग्रह. बाबूराव बागूल यांच्या मते, ''येथील संस्कृतीमध्ये शतकानुशतके वर्णव्यवस्थेकडून गुणकर्तृत्वाचा प्रचंड संहार केला गेला परंतु फुले आंबेडकर प्रकटले आणि शूद्र अतिशूद्रांमधील दबून राहिलेले गुणकर्तृत्व एखाद्या पुराप्रमाणे घोंगावत उसळले. अज्ञानाचे दगड रचूनच वर्णव्यस्थेने कृत्रीम सीमा निर्माण केल्या होत्या आणि त्या तुटून पडत आहेत आणि विराट मानुषता दिगंताला भिडायला निघाली त्यास अनुलक्षूनच कवी अहिरे आपल्या काव्यसंग्रहाचे शीर्षक 'सीमा सरकताहेत' असे देतो आहे''[४]. 'मनाच्या कोऱ्या कागदावर शब्दांचे निखारे ओकायचे आहेत मला विझलेल्यांना पेटविण्यासाठी' ही कविताविषयक भूमिका आहे. कवितेचे ते एक प्रयोजन आहे. भिजलेली वेदना आणि कण्हणाऱ्या दु:खाची कहाणी तिने सांगीतली आहे. माणसाच्या शोधात निघालेल्या या कवितेने आत्मभान जागृतीतून एका नैतिक जबाबदार निष्ठेतून आत्मशोध घेतला आहे.

बेगडी बुरख्यांना मी जाब विचारीत सुटलो
कित्येक प्रश्नांची उत्तरे बहुढंगी
आणि मीच एक प्रश्न झालो
मजला शोधीत मीच अंतरंगात झुकलो
माणसांच्या वाळवंटात माणूस पेरू लागलो ...

हा शोध घेताना आडवाटेने अनेकदा दगडी अस्तित्वाने ठेचकाळले. परंतु ही वाट जेव्हा आत्मटिकेच्या खडतर मार्गावर पोहचते तेव्हा स्वकीयांच्या जगातील विरोधाभासाने कवीमन अस्वस्थ होते.

चोरी झालीय मुकूटाची / राजवाडा गुलाम झालाय
हायब्रिड जमातीकडून ...

राजवाडा म्हणजे महारवाडा. रक्तालाच गद्दार झालेल्या प्रवृत्तीने आपल्या आपल्या समाजाचा शिरपेच निलाम करायलाही कमी केले नाही. संधीसाधूंची एक वेगळीच जमात उदयाला आली. तिने समाजाचे वाटोळे केले असे कडवट भाष्य कवितेने केले आहे. नेत्यांची स्वार्थलोलूप प्रवृत्ती, निष्ठांचा लिलाव, गटबाजीचे राजकारण असे अनेक विषय कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत. पोटाच्या भूकेचे प्रश्न एवढे जीवघेणे आहेत की तिथे रिकाम्या पोटी संघर्षाच्या मैदानात

कसे उभे ठाकायचे असाही मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. मात्र तशाही अवस्थेत जगण्याची आसक्ती आणि एक कणखरपणा, चिवटपणा झोपडीच्या फटीतून स्वप्न पाहणाऱ्या, फुटपाथवरच्या माणसाने टिकवून ठेवला आहे.

माणसे खंबीर उलत नाहीत, तुटत नाही
फुटतही नाही ही फुटपाथवरील जमात
बिना भेसळीचं काँक्रीट आहे

असे तग धरून राहणारांचे सामर्थ्य प्रकट केले आहे. संग्रामाविना असलेल्या जगण्याला बाबासाहेबांनी संग्रामसन्मुख केल्यामुळे संघर्षाच्या सीमा सरकत गेल्या. हा इतिहास आहे. बिलोरी मनोरे ढासळवून मानवमुक्तीचा बुद्ध दीनदलितांच्या, शोषितांच्या हातात दिला त्यामुळेच सीमा सरकवण्याचे बळ त्यांच्या हाताना प्राप्त झाले. मात्र पूर्वजांच्या संघर्षाचा वारसा पुढच्या पिढीला चालवता आला नाही. वारसदारांनी फक्त आपापसात भांडाभांडीशिवाय दुसरे काही केले नाही. त्यातून यश तर दुरापास्तच झाले. पण संघर्षालाही कधीच आकार प्राप्त झाला नाही.

गडगडणारे ढग संपलेत सारे
केविलवाणे काजवे तळपताहेत सूर्य होऊन
आता नळ हाय पण पाणी नाय
ढग असून नितळ सरी नाही
भांड्याची भांडणं पाण्यावरून

असा विसंगतीला हात घालण्याचा प्रयत्न आणि पूर्वजापासून वर्तमानापर्यंत बदलाचा इतिहास रंगभूमीच्या परिभाषेतून मांडण्याचा या कवितेचा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण आहे. आयुष्याच्या रंगमंचावर नेभळट संवाद ओकीत शेळपट होऊन मूकपणे जखमा सांधत बसणारी एक पिढी, तिच्यात चैतन्य ओतण्याचा, मनातनावरील मळभ आणि उदासिनता दूर करून आत्मभान पेरणाऱ्या डॉक्टरांचा प्रवेश या रंगभूमीवर झाला आणि रंगभूमीचे निकष बदलून गेले. त्यांनी जखमांवर फुंकर घातल्यामुळे 'मुक्तीच्या संग्रामाचा बेबंद तुफानी संवाद' या रंगमंचावर निनादत राहिला. सामाजिक, सांस्कृतिक रंगमंचावरचा हा नवा प्रयोग ठरला त्याच प्रेरणेतून संघर्षाचे वळण वर्तमानापर्यंत येऊन ठेपले. या रंगमंचावरील तिसरा अंक हा आंबेडकरोत्तर काळातील आहे. कवीमनाने हा तिसरा अंक म्हणजे समूहाच्या साक्षीनेच विधायक विद्रोहाकडे सीमा सरकत असल्याचा भास निर्माण केला आहे.

असंख्य हात उभारीत शेवटच्या अंकात
मी बुद्ध पेरणार आहे सर्वत्र
लोकहो बेगडी पाशातून मुक्त व्हा ...
सीमा सरकताहेत ...!

भावनेच्या उद्रेकातून पिंपळाचा वारसदार निर्माण करू असेही आश्वासन दिले आहे. मुर्दाड मने पेटून उठावीत यासाठीची धडपड आणि अंधारलेल्या शुन्यात आपल्यातलाच हरवलेला माणूस शोधणारी प्रवृत्ती या कवितेत दिसून येते. प्रतिकाराची कृती न करणे म्हणजे षंढपणाच अशी कबुली देणारी ही कविता आहे.

आमची प्रश्नावली अनुत्तरीत
खंडित रेषांचे षटकोनी गणित
गुणाकार भागाकार सगळेच वजा
नागडी पोपटपंची व्यासपीठावर

राशन नसलेले भाषण ठोकून सगळेच थकलेले आहेत. परिवर्तनाच्या वाटेवर म्हणून स्वयंदीप होणे एवढेच आता हाताशी उरले आहे. काळोख पिणारे बाळ जन्मास येणार असल्याची चाहूल या कवितेला लागली आहे. 'मोहळ उठलय, आसमंतात दाटलंय, गावभर झालंय, गावकुस पेटलंय' अशी सज्जता झाल्याची ग्वाही दिली आहे. सहनशील

प्रवृत्तीचे वावडे आहे. म्हणून तशा प्रवृत्तीवर ती आघात करते. मूकपणे अन्याय सहन करणारांची मने पेटून उठली पाहिजेत हे तिचे जागराचे उद्दिष्ट आहे. 'कुठवर आता सोसायची भाडखाऊंची ही उचलेगिरी' हा तिचा सवाल आहे. प्रचलित मराठी कवितेने आता कुस बदलली पाहिजे. कल्पनेच्या रथातून वास्तवाला वस्त्रात गुंडाळून, अलंकारी शब्दांच्या नक्षत्रांच्या गर्दीत पाहूणचार घेत वाटचाल करणाऱ्या कवितेने आता खोपटात येऊन चिंध्या झालेल्या गोधडीवर विसावा घ्यावा. तरच तिच्या आयुष्याचे सार्थक होईल असे या कवितेचे आवाहन आहे.

आ. कि. सोनोने (जन्म १ जुलै १९४४), यांनी १९५८ साली भजनी मंडळ स्थापन करून काव्यलेखनास प्रारंभ केला. पुढे एच. एम. व्ही तर्फे त्यांची गाणी ध्वनिफितीतही समाविष्ट झाली. **धम्मसौरभ** ही त्यांची बुद्धभीम गीतांची पुस्तिका १९७४ मध्ये प्रसिद्ध झाली. पुढे **कृषी व सहकार गीते** (१९८८), **वऱ्हाडी मेवा** (१९८६) अशी पद्यात्मक रचना प्रसिद्ध झाली. **बुद्धास प्रिय झाला** (१९९०) हा गीतांचा संग्रह प्रसिद्ध झाला. किसन खरात, प्रतापसिंग बोदडे यासारख्या दिग्गज गायकांनी त्यांची गीते गायिली आहेत. त्यांच्या गीत रचनांवर दिनबंधू शेगावकर यांचा प्रभाव असल्याचे जाणवते. **गिल्ली मिसळ** हा त्यांचा कवितासंग्रह १९९० मध्ये प्रसिद्ध झाला. 'कविता ही सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने मध्यममार्गी असावी अशी त्यांची कविताविषयक भूमिका आहे. त्यांच्या कविता जीवनावर भाष्य करणाऱ्या आहेत. मात्र या कवितेतून बऱ्याचदा पारंपरीक संकल्पना उपयोजित झाल्या आहेत. उदा. इहलोक, परलोक, कर्म, स्वर्ग, ऋचा इ. आंबेडकरी कवितेला त्या बाधा आणणाऱ्या आहेत. वऱ्हाडी बोलीतील कविता माणसाचे रंगरूप दिग्दर्शित करतात. उदा.

मले तं मोठा राजा अचंबा वाटते
मानुस मान्सावर बहिष्कार टाकते
तसा तं धार्मिक दिस्ते मानुस / तीर्थयात्रा बी करते माणुस
चिळी मुंगीले पोसते मानुस / मान्सालेच जहर दिसते मानुस ...

गिऱ्हान (२०००) या संग्रहातील सोनोने यांच्या कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ''माणूस घडण्या घडविण्यासाठी संभवत: सामाजिक व्यवस्था कारणीभूत असते. म्हणून माझी कविता व्यक्ती विशेषत्वाला दोष देत नाही. माझी कविता व्यवस्थेशी भांडते! व्यवस्थेचा संबंध माणसाच्या अवस्थेशी असतो. ही अवस्था दुरुस्त होऊन माणसाची अवस्था सुधारावी एवढाच तिचा आग्रह असतो.'' (हितगूज) अशी भूमिका कवीने मांडली आहे. वऱ्हाडी बोलीतील वेगळ्या बाजाच्या कविता या संग्रहात प्रत्ययाला येतात. 'राबनाराले भाकर नायी, ऐदी खाते तुपपोई' ही या कवितेची तक्रार आहे.

लोकशाहीच्या लुटारुंची अजून हावूस फिटली नायी
यायच्या दांगळात गरीब हटले पण गरीबी कायी हटली नायी

हे लोकशाहीच्या अर्धशतकाचे वास्तव सोनोने यांची कविता वाचकांपुढे ठेवते. या लुटारूनीच धर्म आणि राजकारणाच्या जोडीने जातीचे इंधन तेवत ठेवले म्हणून या देशाला जातीचे ग्रहण लागल्यामुळे देश प्रगतीपथावर पोहचू शकला नाही.

लोकशाहीले पळली कसी एकाएकी भुल
गुलाबाले उगवलं कसं धोतऱ्याचं फुल
उंडा लावला गोऱ्ह्याले निपजला नंदीबैल
जात पेटवते गाव नाही पेटवत चुल
भुकंपाहून भारी हाये बापा जातीचं इंधन ...
माह्या देशाले जातीचं बारा महीने गिऱ्हान

हे या देशाचे वास्तव आहे. सूर्यचंद्राला घडीभर ग्रहण लागते मात्र या देशाला ते बारोमास लागलेले असते. या जातीने माणसाच्या माणुसकीचे भरीत करून टाकले आहे. जातिवादामुळे देशाच्या स्वातंत्र्यालाही काही अर्थ उरला नाही. म्हणून या जातीला आग लावली पाहिजे, 'करा इंधन जातीचं तिले पेटवा चुलीत' असा आवेश इथे प्रकट झाला आहे. मात्र

पेटवणाऱ्यांची भाषा करणारांच्या मनात येथे अंगार फुलताना दिसत नाही. 'सारे पेटवाले निघाले, पेटत कोनीच नायी'! हा विरोधाभास आहे. विषमता संपुष्टात आणण्यासाठी कोणीही कृतिशील होताना दिसत नाही.

परिवर्तनाच्या फुकट हुला देता लोकाले
समता म्हंजे तरोट्याची भाजी वाट्टे का तुमाले!
विषमतेसी खेट्याले पायजे खेटत कोनीच नायी!

जोवर कृतिशीलता नाही तोवर गुलामी कायमच राहणार असे समीकरण या कवितेने मांडले आहे. निवडणुकीआधी गरीबीवर तावातावात बोलणारे, मात्र निवडून गेल्यानंतर कोमात जाणारे राजकारणी, गावपातळीवरचे विक्षिप्त राजकारण, हेवेदावे, राजकीय जातीवाद, शिक्षितांचा अर्धवट शहाणपणा असे अनेक विषय मुखरीत करीत या कवितेने मानवी प्रवृत्तीवर भाष्य केले आहे. माणसाचा वापर करून माणुसकी उकळून पिणारी माणसे, आईची पूजा करून बायकोला जाळणारी माणसे, गरिबांच्या माना मुरगाळून स्वत:ची खिसे भरणारी स्वार्थांध मानवी प्रवृत्ती अशा वास्तवाचे कथन केले आहे. माध्यमे सर्वसामान्यांच्या बाजूची नाहीत हे वास्तवही अधोरेखित केले आहे.

दु:खानं ठुलं आता आयुष्य गाहान
सुखाले लागली रक्ताची ताहान
आता उंदिर तोळते सर्पाची मान
बेंडकोई मंते मिच माहान
धर्माले कोळं सुटतच नायी
हेतं टिव्हीत दिसतच नायी ...

माध्यमांचा हा दुटप्पीपणा आहे. दारिद्रय, गरीबी, अन्नान्न दशा अशा गोष्टी पडदयावर दिसता कामा नये याची दक्षता माध्यमानी घेतली आहे. सांस्कृतिक जीवनातील विपरिताच्या वास्तवाची दखल इथल्या धर्माला कधी घ्यावीशी वाटली नाही. धर्म आणि माध्यमे जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे वास्तव या कवितेने वाचकांच्या पुढ्यात ठेवले आहे.

भरतकुमार दहिहंडे यांचा **कफन** हा कवितासंग्रह आहे. संघर्षाच्या वाटेवरचा प्रवास सुरू करण्यासाठी सर्व पातळ्यांवरची सज्जता झाली असून संघर्षापुढे इतर सारे दुय्यमच ठरणारे आहे. अशी सूचना 'कफन' या शीर्षकातून मिळते. उदा.

तुम्ही तुमच्या दुनियेतले संस्कार
गर्भातच शिकवले असते तर आम्ही येताना इथं
कफनच बांधून आलो असतो

विद्रोहाच्या पवित्र्यात उभी असलेली ही कविता संघर्षाच्या वाटेवरील अडथळ्यांची, अटकाव करणाऱ्या परिस्थितीची जाणीव करून देते. विप्रश्न अवस्था निर्माण झाली आहे. कुडाच्या भिंतीत दबलेले आवाज रुतून बसले आहे. भिंतीच्या तळातून रक्ताच्या रंगाचा पाझर पाझरत आहे, डोळ्यात काळोख तरंगत आहे आणि पोट जाळण्यासाठी कणभरही आधार नाही अशावेळी

धाकटी धावतेय गिऱ्हाईकाच्या शोधात
मनमाड जंक्शनच्या पाठीमागच्या अंधारात
हातात मेणदिवा घेऊन उभी
उभ्या राहिलेल्या आगीनगाडीतले एखादं सावज
टकवतं दिडरूपया अन् विझवतं मेणदिवा
पुन्हा काळोखाच्या पोटात शोधतय आगीनगाडीचं इंजिन

पुढल्या स्टेशनचे रस्ते.....

स्त्रीत्वाला आपल्या अस्तित्वाचा लिलाव करायला लावणारी ही परिस्थिती वाचकांपढे ठेवून अस्वस्थतेचा अनुभव दिला आहे. सामाजिक सत्याचे भीषण वास्तव मांडून ही कविता अंतर्मुख व्हायला भाग पाडते. अनुभव मांडण्याची एक वेगळी तऱ्हा येथे प्रत्ययाला येते. अनुभवाची तीव्रता प्रतिकात्मतेतून अधिक सघन केली जाते हा या कवितेचा विशेष म्हटला पाहिजे. उदा.

त्याला किळस आली आता आता परिवर्तनाच्या
पाचकळ मौसमाची
पूर्वी असं व्हायचं नाही शिशिरातही झाड डगमगायचं नाही
उरलं सुरलं त्यानं जपायचा लावलाय सपाटा
पाखरांच्या वस्त्यांचाही त्यानं काढायचा ठरवलाय काटा
इतक निष्ठूर कसं होऊ शकतं झाडाचं झाडपण?

एका निष्ठूर प्रवृत्तीची प्रचिती, अस्वस्थतेची व्याकूळता आणि निर्माण झालेल्या प्रश्नातून वाट्याला आलेली हतबलता अतिशय सूचकतेने व्यक्त होते. आपल्या जिंदगीला हवाला नाही. आसवांचे महापूर साठवून ठेवले आहेत. त्यामुळे इतरांना दुषणे देण्यात अर्थ नाही अशी कैफियत मांडली आहे. अशा पार्श्वभूमीवर लढण्याशिवाय पर्याय नाही.

मागे अंधार आहे अन् पुढे अंधार खाई
पळणार कुठे आता लढण्याचीच घाई!

आहे त्या ठिकाणावरून आता लढाईला सुरुवात करणे अटळ आहे त्यामुळे या कवितेने संघर्षाचे कफन आपल्या आयुष्याच्या कपाळावर बांधले आहे. एका अटळ संघर्षाची अपरिहार्यता अधोरेखित केली आहे. शरणकुमार लिंबाळे यांच्या मते भरतकुमार दहिहंडे यांची कविता, ''कागदापेक्षा काळजाची त्वचा घेऊन अवतरते! अतिशय अस्वस्थ करणारी परिस्थिती कवी आपल्या कवितेत संयमाने व्यक्त करतोय. कारण त्याची कविता विचार, विद्रोह, विवेक व वास्तवाची जाणीव असलेली कविता आहे. [६] ''

भगवान भोईर (जन्म १ जून १९५०- ३१ ऑगस्ट २०१६) यांचे या दशकात दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. **उन्हातले झाड** (१९९२), **उजेडगाणी** (१९९६).

'उन्हातले झाड' हे समाजजीवनाचे आणि समूह मनाचे प्रतीक म्हणून कवितेत साकार झाले आहे. रखरखत्या उन्हाचा मारा सहन करणारे हे झाड स्वत: तळपत राहून इतरांना सावली देते. त्यातून मानवतावादाचीही सूचना मिळते.

झाडानी सवता तापायचं उन्हात / पर दुसऱ्यांना सावली द्यायची!
आपुन म्हणजे झाडच की, सदाचं उन्हात असलेले

इतरांची सेवा करण्यात, दास्यात युगानुयुगे आयुष्य झिजवित आलेल्या, गतकाळापासून ते वर्तमानापर्यंतच्या रखरखीत जगण्याचा प्रवास येथे सूचित होतो. या प्रवासात वाट्याला आलेल्या दु:खाचा कार्यकारणभाव कोणता, आसवांची निर्मिती कशामुळे झाली? याचा शोध घेण्याचा प्रयत्न कवितेने केला आहे. मात्र हाताशी आलेली उत्तरे वेदनादायी आहेत.

आभाळाचं वय जितकं / तितकं आमच्या आसवाचं वय
आपण आपल्या कातडीचं जोडं / शिवाया लागलूना तवापास्नं
आपल्या आसवांचा जलम झाला बग!

अशा, युगानुयुगाच्या अनंत दु:खाचा आलेख चितारला आहे. यासोबतच दलित, आदिवासी, वडार स्त्रिया, देवदासी, वेशा अशा स्त्रीजगताची वेदना मुखरीत केली आहे. 'आसवांच्या मान्सांची' ही कविता आहे. या आसवांच्या मान्सापैकी एक म्हणजे देवदासी.

आमी देवदासी देवाला वाहिलेल्या
जो खाटल्यावर आमच्यासंग निजत नाय
आंग झाकायला लुगडं देत नाय, तो मेला देव!
आमचा नवरा! तेच्या नावानं कुकू लावायचं....
आमच्याकडं येणारा परत्येक पुरुष आमचा नवरा असतो
आमचा नवरा कदी मरत नाय आमी अखंड सौभाग्यवती....

देवाच्या नावावर मंदिरकेंद्री शोषक व्यवस्था अस्तित्वात आली आणि पुरुषांनी तिला भोगाची वस्तू ठरविले. अशा बहुचक संस्कृतीने स्त्रीला असे डावावर लागले आहे. गुलाम बनविले आहे. अशा सामाजिक, सांस्कृतिक विकृतीचा प्रत्यय या कवितेने दिला आहे. इथे देवळातला दगड पवित्र ठरतो परंतु झोपडीतल्या माणसाला अपवित्र ठरविले जाते. अशा दगडी संस्कृतीचा उपहास केला आहे. 'भगव्या वस्त्रातले भगवान गवतासारखे वाढले' अशा पर्यावरणात माणूस म्हणून उभे व्हायचे असेल तर

एक प्रचंड वादळ यावे / सगळेच मार्ग पुसले जावेत!
एकच वाट निर्माण व्हावी / मानवतेच्या धवल रंगाची

असा मार्ग या कवितेने दाखविला आहे. मानव्याची प्रतिष्ठापना हे तिचे ध्येय आहे. 'मला हव्यात लक्ष ठिणग्या, मला हवेत लक्ष किरण' उन्हातले झाड असे संघर्षाच्या मार्गावर उभे झाले आहे. 'आमच्या शिव्यांनी देशद्रोह केला नाही, माणुसकी सोडली नाही' हीच या कवितेची नैतिकता होय. रापीला आता लेखणीची धार आल्याचे आश्वासन या कवितेने दिले आहे. ''भोईरांच उन्हातलं झाड' ही त्यांच्या व्यथा वेदनांची यात्रा आहे! न थांबणारी, न थबकणारी, न करपणारी, न विझणारी, तेजस्वी क्षितीजाचा वेध घेणारी.[७]'' असा अभिप्राय डॉ. गंगाधर पानतावणे यांनी या कवितेसंबंधी नोंदविला आहे.

उजेडगाणी या कवितासंग्रहातील 'उजेडगाणी' ओठावर का आली या मागील कार्यकारणभाव सांगीतला आहे. 'मी युंगधराचे दिशादर्शक बोट मागत असताना उजेडगाणी ओठावर आली 'त्यामुळे अंधारगाणी गायचे नाकारण्यासाठी उर्जा प्राप्त झाली. त्यामुळेच सनातन तळ्याचे बांध फोडण्यासाठी हाती सुरुंग आले. गतकाळाच्या पराभूत पायऱ्या उतरताना उरात वणव्याने पेट घेतला. इथल्या सनातन परंपरा, सौंदर्याच्या कल्पना या साऱ्यांना मुठमाती देत असताना 'स्वांतत्र्य समता बंधुत्वाची फुले फुलली' हाच या उजेड गाण्याचा इत्यर्थ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार आणि कर्तृत्वगाथेची, त्यातून समाज मनाला प्राप्त झालेल्या दिशा आणि यशाची प्रकाशयात्रा म्हाजे 'उजेडगाणी'!

लक्ष्मीकांत घुमे (जन्म २० मार्च १९५८, मृत्यू १८ ऑगस्ट २००४), यांचा **भाकरीच्या शोधात** (१९९२) हा दीर्घ कवितासंग्रह. वास्तविक सदर कवितासंग्रह १९८९ साली प्रसिद्ध झाला होता. या संग्रहास शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारही प्राप्त झाला. त्याची दुसरी आवृत्ती १९९२ मध्ये प्रसिद्ध झाली. भाकरीचे एक अपूर्व तत्त्वज्ञान या कवीने अधोरेखित केले. हा भाकरीचा शोध आईच्या पोटात असल्यापासूनचा आहे. जन्माला आल्यानंतर हळूहळू भाकरीचा अर्थ समजत गेला. तेव्हापासून भाकरीच्या तुकड्यासाठी कवीमनाचा घेराव सुरू झाला आहे. भूकेच्या आयुष्याने पाठलाग करायला सुरुवात केल्यापासून रिकाम्या पोटाचे इंटरव्हयू घेत, भाकरीच्या आयुष्याचे चिरकाल टिकणारे संदर्भ देत या कवीमनाने कफल्लकाच्या उघड्या नागड्या वस्त्यांमधून भाकरीविषयी मातीत दफन होणारे अस्तित्वहीन माणसाचे सांगाडे पाहिले आहेत. भूक आणि भाकरीचा अनुभव वाचकाला अस्वस्थ आणि बेजार करून सोडणारा आहे.

हा भाकरीचा शोध अनेक ठिकाणी वाचकांना भ्रमंती करून आणतो. फुटपाथ, स्मशान, शहरातील चौक, गल्ल्या, गल्लीबोळ, वस्ती, दारोदार, घराघरातून, झोपडपट्ट्यातून, मंदिराच्या आवारातून, गल्लीपासून दिल्लीपर्यंत भूक आणि भाकरीचे मुक्कामपोष्ट शोधायला भाग पाडते. मात्र भाकरीच्या पूर्वजाचा शोध लागत नाही आणि भूकेचा आगडोंब थांबत नाही. 'भाकरीच्या शोधात' ही प्रदीर्घ कविता वाचकांना अस्वस्थ करून अंतर्मुख व्हायला भाग पाडते. हा शोध घेताना फार चमत्कारीक गोष्टी पाहावयास मिळतात. भिकाऱ्याच्या चौकातून, शहरातून, गल्लीबोळातून कुठलाही चौक,

'भूकबळी' म्हणून शहीद झालेल्या माणसाच्या नावे लागला असे कोणत्याच शहरात आढळत नाही.

एम्प्लॉयमेंटच्या यादीत भरावेत सुशिक्षित बेकारांच्या
नावाचे ऑफिसतोड फिगर
तसे चौकात, गल्लीत दिसून येताहेत
नव्या नव्या चेहऱ्याचे भिकेच्या नोकरीसाठी
वस्तीत दारोदार भटकून केलेले विनवणी अर्ज

समस्यांचं कर्ज फेडत ज्यांचं आयुष्य झिजून जाते त्यांची पोरं अ ब क ड ऐवजी बालपणापासून 'अल्ला के नाम पे दे/ भगवान के नाम पे दे' शिकत असतात. आणि या पोरांनी अनुभव कथन केल्यानंतर त्यांचे मायबाप एकेक चौक / गल्ली वाटून देतात. हे रहाटगाडगे आयुष्याच्या अंतापर्यंत पिढ्या न पिढ्या चालूच राहते. त्यांच्या लाचारीच्या परिश्रमावरच रोजच्या पोटापाण्याचा पगार ठरत असतो. उष्टे अन्न आणि शिळ्या तुकड्याशिवाय त्यांना कुठलीही पगारवाढ किंवा बोनस मिळत नसते. अश्या बेसुमार दारिद्र्यात खितपत पडलेल्या भीषण भूकेचे विदारक वास्तव वाचकांच्या पुढ्यात या कवितेने ठेवले आहे. ते प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. त्यातून या देशातील बालपण, तारुण्य, म्हातारपण कसे उपाशीच आहे, या देशाने ते कायम ठेवले आहे अशी भीषणभूत वास्तवता अधोरेखित होते. भाकरीच्या पूर्वजांच्या अस्तित्वाचाही शोध लागत नाही. त्यामुळे शिल्लक राहिलेल्या आयुष्याच्या तक्रारीही मांडता येत नाहीत. तरीही भूक आणि भाकरीच्या अभावाच्या पर्यावरणात अतिशय धक्कादायक वास्तव आणि विरोधाभास अधोरेखित होतात.

जिथे घर एक कत्तलखाना झालाय
खंगलेल्या ढोराला बांधून ठेवावे कत्तलीच्या उद्घाटनासाठी
तशा वाढत आहेत राशनसाठी माणसा-बायकांच्या रांगा
राज्यकर्त्यांच्या बिल्डिंगमध्ये शिरतात कॉलगर्लच्या टांगा

दुसरीकडे पोट गहाण ठेवणारे जलील रस्ते, स्मगलिंग करणारे लोक, माणसांच्या रक्ताचे घोट घेणारे त्यांचे रक्तपिपासू मेंदू, कित्येकांच्या निष्पाप आयुष्याला जायबंदी करण्याचा त्यांचा शौक, त्यांनी दिलेले स्लो पॉयझन. अशा अक्राळविक्राळ पर्यावरणात आयुष्याच्या जमिनीवर उभे राहायचे कसे हा जीवघेणा आणि छळणारा प्रश्न या भूकेकंगालांच्या दुनियेत आ वासून उभा आहे. देशाचे मोठेपण, देशाचा अफाटपणा, देशाचा नकाशा यात भुकेकंगालांना कुठेच आणि कोणतेच स्थान नाही. उदा.

ह्या देशाच्या नकाशात
मास्तरांनी मला हिमालय दाखविल्याचे आठवते
तेव्हापासून मी सारखी नजर रोखून शोधतोहे इथे
राजे हो, उपाशी राहणाऱ्या लोकांचा प्रदेश का दिसत नाही?

असा मार्मिक आणि अस्वस्थ करणारा हा प्रश्न आहे. भूकेकंगालांना या देशात कोणतेच स्थान नाही, त्याच्या अस्तित्वाला अर्थ नाही हेच या कवितेने सूचित केले आहे. लोकशाहीच्या पाच दशकात गरीबी दूर झाली नाही आणि उपासमार थांबली नाही तरीही देशाचे गुणगाण गाणारे पवाडे गायीले जातात.

फाटक्या अंगाला ठिगळ लावून ढुंगण झाकणारी ही लोकशाही
जिथे अंगाला कपडा नाही खायला भाकर नाही अन्
कित्येकांच्या घरावर छप्परांचा आधार नाही
तरीही 'भारत माझा देश आहे' एवढे म्हणावेच लागते

अशा वास्तवात या देशाने माणसांना इतिहासाच्या नकली कहाण्या सांगून बेवारश्यासारखे वाढविले आणि लोकप्रतिनिधी, संसद, न्यायालय या सर्वांना माणसांची 'भूक' हा जीवनाचा विषय आहे याचे भानच उरले नाही. अशी

केविलवाणी स्थिती माणसाच्या संदर्भात इतर कुठल्या राष्ट्रात होत नसावी! त्यामुळे मनाच्या तळाशी पहूडलेली विद्रोहाची ठिणगी आग ओकल्यासारखी बाहेर पडते

आता मी सुद्धा एक गोष्ट केल्याशिवाय राहणार नाही
एखाद्या राष्ट्रपुरुषासारखे भाकरीचे फोटो फ्रेम करून
लावीन चौकाचौकात
मग ज्यांना मिळत नाही भाकर ते येतील चौकाचौकात
एकदाची दंगल तेवढी उसळायला हवी
मी पार्लमेंटच्या छाताडावर भाकरीचे चित्र
लावल्याशिवाय सोडणार नाही!!!

अशा विद्रोहावर येऊन ही कविता स्थिरावते. लक्ष्मीकांत घुमे यांच्या कवितेने 'भाकर' हा विषय अतिशय आस्थापूर्वक साकारून या देशाच्या भूकेचे भीषण वास्तव तेवढ्याच सजग शब्दातून समर्थपणे वाचकांसमोर ठेवले. दलित कवितेच्या प्रांतातील हा एक अनोखा आविष्कार आहे. घुमे यांच्या कवितेने अस्वस्थ करणारा, सुन्नपणाचा अनुभव वाचकांना देतानाच अंतर्मुखही केले आहे.

✸ डी. बी. रत्नाकर (जन्म १५ मार्च १९६६, मृत्यू १७ जून २०१२)

डी. बी. रत्नाकर यांचा **हॉटेल माझा देश** (१९९९) हा पहिलाच कवितासंग्रह असला तरी स्वत:चे वेगळेपण जोपासणारा आहे. **लक्तरांची गझल** (१९९४) मध्ये प्रसिद्ध झाला. हॉटेल मध्ये प्रत्यक्ष कामगाराचे जीवन जगणारा हा कवी असल्यामुळे प्रत्यक्षानुभूतीचा आधार या कविताना आहे. हॉटेल लाईनचे सुक्ष्म निरीक्षण करून, हॉटेल जीवनाशी एकरूप होऊन घेतलेल्या, जगलेल्या अनुभवाची ही कविता आहे. ''घरंदाज गरिबी, अनाथ, या ना त्या कारणाने घरातून पळून आलेले, दुसरे कोणतेही काम न जमणारे, बाई, बाटली, मटका या नादातले आणि शिक्षण घेत काम करणारे असे कितीतरी प्रकारचे लोक हॉटेलात काम करतात. हे सगळे कामगार अनेक जाती, धर्म, पंथाचे असतात. मात्र सगळे एकत्र राहतात. ड्युटीपुरते पद, बाकी एकत्र. इथे उच्च-निच्च ही भावना कोणाच्याही मनात नसते. 'माणूस' ही एकच जात इथे असते.''[४] त्यामुळेच 'हॉटेल हे एकात्मतेचे समतेचे प्रतीक आहे. असे कवीला वाटते, म्हणून हॉटेल माझा देश आहे असे कवीने म्हटले आहे. ज्या देशात मी वाढलो, जगलो, शिकलो त्या भारत देशात हॉटेल लाईनमधील समता कधी प्रस्थापित होईल का? हॉटेलातील माणसाला समजून घेऊन त्याला माणुसकीची वागणूक कोणी देईल का? त्याचे अलिखित प्रश्न सोडविण्यासाठी कोणी पुढे येईल का? असे अनेक प्रश्न या कवितेच्या निमित्ताने कवीने उपस्थित केले आहेत.

हॉटेल जीवनाचे विविधांगी वास्तव या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहे. जगण्याविषयी, आयुष्याविषयी, अस्तित्वाविषयी जीवघेणे प्रश्न उपस्थित केले आहेत. विविध पातळ्यांवरील हॉटेलमधील अपमानित जीवनाचे भेदक वास्तव प्रकट केले आहे. इथल्या अपमानाच्या तऱ्हाही वेगवेगळ्या आहेत. काळीज कापणारे, डोळे फाडणारे, जीव मारून टाकणारे, आत्महत्येत प्रवृत्त करणारे असे पदोपदी वाट्याला येणारे अपमान! इथे कष्टाचे मोल केले जात नाही.

इथं मोलाचं कष्ट आहे / पण कष्टाला मोल नाही
जगण्याला अर्थ नाही / मरण्याला अर्थ नाही
माणसाला संदर्भ नाही / संदर्भाचा माणूस नाही
फक्त आहेत अश्रू.... माणसाच्या डोळ्यात
म्होरीत तुंबलेल्या खरकट्या पाण्यासारखे!

मुंगीएवढ्या चुकीबद्दलही शिव्या खाव्या लागतात. मालक आणि गिऱ्हाईकाच्या कचाट्यात कष्ट उपसणाराची इथे गोची आणि कोंडी होते. त्यामुळे वाट्याला येणारे दु:ख आणि होणारी घुसमट, आतल्या आतच ऍश ट्रेसारखे स्वत:स विझवावे लागते.

नको त्यांनी भोगून टाकलेल्या
उष्ट्या सिग्रेट तुकड्यांना पोटात घेऊन
आतल्या आत धुमसणारा..... ऍश ट्रे
प्लायऊड टेबलावर एकांतात अंधूक धूर ओकत असतो...
मी ही एक ऍश ट्रे
दु:ख वेदनांचे तुकडे आतल्या आत विझवणारा

अश्रूंचा अंधूक धूर ओकायलाही इथे मुभा नसते. प्रश्न पोटाचा असतो त्यामुळे सारे निमुटपणे सोसावे लागते. तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागतो. हॉटेल लाईनमधल्या अनेक गोष्टी कवितेत प्रतिकाचे रूप धारण करतात आणि एका वेगळ्याच अर्थाची प्रतिती मिळते. उदा.

वॉश बेसीनच्या स्टील नळीवर लटकणारा
निर्मळ मनाने, जात पात न मानता
शोषून घेतो हरेकाची घाण
टॉवेल सारखी माणसं जन्मली दिशा दिशांत तर....?

जातपात विरहित समाजनिर्मितीचा विचारच अशा प्रतिकात्मतेतून सूचित होतो. येथे कवीचा दृष्टिकोन हॉटेलच्या परिप्रेक्ष्यातही आपले सामाजिक भान विसरत नाही ही महत्त्वाची बाब आहे. मात्र येथे दैनंदिन जीवनातील तोचतोपणा आहे. त्यामुळे येणारी उबग खालीलप्रमाणे व्यक्त होते.

कसलं हे जीवन? कसलं हे जेवण?
आम्ही हजारोंची पोटे तुडुंब भरतो
खुद्द आम्हीच अर्धपोटी राहतो कधी उपाशीही
हे रोजचच रोज रोज आणि रोजचच

अशा वेळेस आपल्या अस्तित्त्वाचे प्रश्न निरुत्तर ठरतात. जगण्याचे प्रयोजन नेमके काय? जीवनाचा अर्थ काय? येथे जगण्याच्या प्रयोजनाचाच विसर पडतो.

मुतारीच्या भांड्यातल्या डांबर गोळीसारखा मी विरघळतोय
विष्ठेसारखा पाण्याबरोबर खोल खोल खोलखोल जातोय
माझं अस्तित्व... मी शोधतोय...

आपल्या अस्तित्वाबद्दल हॉटेलनीच सांगीतले असे ही कविता स्पष्ट करते. कारण हॉटेल हाच जगण्याचा आधार ठरला आहे. या हॉटेलनेच अनौरस संतती, कोंडाळ्यातील अर्भके, लावारीस बालके, अनैतिक गर्भगोळे यापैकी जे हॉटेलकडे पोटाची आग विझवण्यासाठी वळतात तेव्हा,

हॉटेल दिलदार त्यांना स्वीकारतं अन्नही भरवतं
सहारा देतं मायबाप होऊन
जिसका कोई नही उसका तो हॉटेल होता है.....
खुदा किस काम का होता है.....?

म्हणूनच माणसाला तारणारी, माणसाची उपासी पोटे भरणारी, दये मायेने फुललेली, लहान मोठ्या मनाची तिथं एकात्मता असते. कायद्याशिवाय घडलेली! असे हॉटेल महात्म्य कवितेने सांगीतले आहे. जातीपातीला गाढव लावणारी ही हॉटेल लाईन असल्याचा निर्वाळा दिला आहे. इथे जात, धर्म, पंथ नसतो फक्त माणूस असतो म्हणून 'त्या माणसांचा देश, हॉटेल माझा देश' अशी भावना व्यक्त केली आहे. मात्र जगण्याविषयी. जीवनाविषयीचे विदारक भाष्य केले आहे.

सार्वजनिक संडास मुतारीसारखं

आमचं सार्वजनिक आयुष्य
कुणीबी यावं भसाभसा हागावं फळाफळा मुतावं
आम्ही मात्र मुतारीच्या भांड्यागत
सगळं गिळून गप्प बसावं.

एकंदरीत हॉटेल लाईनच्या परिप्रेक्ष्यात एकात्म देशाचं चित्र रेखाटण्याचे कार्य या कवितेने पार पाडले आहे. ''ही कविता एक नवीनच पण दाहकता असलेला अनुभव घेऊन येते. हॉटेल संस्कृती व भारतीय संस्कृती यात तुलना करण्याचा प्रयत्न थक्क करणारा आहे. ''[९] हे मत कवितेचे मोठेपण अधोरेखित करणारे आहे.

बळवंत कांबळे यांचा **निषेध** हा कवितासंग्रह मागील दशकाच्या आरंभी प्रसिद्ध झाला होता. या दशकात त्यांचे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. **गावभोग** (१९९३) आणि **देव मायनस धर्म** (१९९७) या दोन्ही संग्रहातून कांबळे यांनी स्वत:च्या कवितेचा नवा चेहरा सिद्ध केला आहे. भारतीय संस्कृतीने अशा काही योजना आखून ठेवल्या आहेत की, जन्माला आल्यानंतर त्या जिवाला हक्काचा बाप सांगता येणार नाही. इथल्या संस्कृतीने जन्माला घातलेल्या देवादासी प्रथेतून हा प्रत्यय येतो. बळवंत कांबळे यांच्या 'गावभोग' या कवितासंग्रहात हाच विषय केंद्रस्थानी आहे.

धर्माच्या नावाने अवघ्या स्त्रीत्त्वाचा सौदा
येथेच मांडला जातो त्यांचा बाजार
ख्याली खुशालीतूनच होतो लिलावसुद्धा!
पेटत्या मांडवाखाली न्याहाळीत आभाळाचे रंग
इथल्या पाखंडी संस्कृतीचे लिंग
आपल्या सर्वस्वावर फिरवून घेते नियतीचा नांगर
ती होते निराधर
मावळत्या दिशेची सांजवात उद्ध्वस्त प्रदेशाच्या गावकुसात
पुन्हा पुन्हा सवंगपणे पासली पडत जाते....
काळोखाच्या गर्भात देत हुंकार खोपटाच्या कोपऱ्यात
अन् जन्म घेतो एक बहिष्कृत पुत्र

देवदासीला हक्काचा नवरा नसतो. तिचे लग्न देवाबरोबर लागलेले असते. परंतु तिचा उपभोग मात्र पुरुषी समाज घेत असतो. आणि हे सारे धर्माच्या नावाखाली बिनबोभाटपणे सुरू असते. भोगवादी, पुरुषी व्यवस्थेने तिला बाजारातील भोगाची वस्तू ठरविले आहे. सर्व भोग नियतीवर सोपवून निराधार होणे हेच देवदासीचे संचित इथल्या संस्कृतीने निश्चित केले आहे. सांस्कृतिक रचितातून, सक्तीच्या लादण्यातून, 'बहिष्कृत पुत्राची' युग विसंगत अशी संस्कृती जन्माला येते. अशा संस्कृतीतून सांस्कृतिक संचिताचे अनौरस रूप दिग्दर्शित होते. पुरुषी भोगाच्या आक्रमणाने झालेल्या देवदासीच्या दुर्दशेचे भेदक चित्र 'गावभोग'मधून साक्षात झाले आहे.

बळवंत कांबळे हा कवी 'गावभोगा'च्या पर्यावरणातूनच आलेला असल्यामुळे त्या जगाचे भेदक वास्तव त्यांनी प्रखरपणे मांडले आहे. अद्यापही माणूस म्हणून देवदासीला समाजाने स्वीकारले नाही. याविषयीची जीवघेणी खंत व्यक्त केली आहे. देवदासी परंपरेला छेद देऊन फुले-आंबेडकरी जीवनपद्धतीचा स्वीकार करण्याचे आवाहनही त्यांनी भारतीय स्त्रीला केले आहे. भारतीय समाजात देव आणि धर्म ही माणसाच्या शोषणाची दोन मोठी केंद्रे आहेत. **देव मायनस धर्म** (१९९७) या कवितासंग्रहातील कवितांचा हाच मध्यवर्ती विषय आहे. देव या संकल्पनेविषयी ही कविता चर्चा करताना दिसते. परंपरा आणि धर्मशास्त्राने सांगीतलेले देवाचे स्वरूप मोठे चमत्कारीक आहे.

परमेश्वर! विश्वनिर्मितीचा धनी
शंकर त्याचा क्रोध/ ब्रह्मदेव त्याची बुद्धी छंद ऋषी

त्याचं इंद्रिय छिद्र/ प्रजापती त्याचं शिस्न
लक्ष्मी त्याचं वक्षस्थळ

ह्या सर्व बनावाचे माणसावर गारुड करण्यात आले. धर्मग्रथांने ते माणसाच्या मनावर बिंबविले आणि शब्दप्रामाण्यामुळे त्याविषयी शंका उपस्थित करणे किंवा त्या विरोधात ब्र ही उच्चारणे निषिद्ध मानले गेले. एका अर्थाने या धर्म आणि धर्मग्रथांनीच 'देवा'ची प्रस्थापना केली. त्यानी माणसाला देव आणि दैववादी बनविले त्यामुळे माणसे झापडबंद झाली. विचारशक्ती हरवून बसली. ईश्वरी व्यवस्थेत, मोक्ष मिळविण्यासाठी धर्माने दलालाची भूमिका निभावली. आणि ईश्वराला पारलौकीक ठरवून जीवनाचा हेतू मोक्ष सांगीतला. त्याला धर्मव्यवस्थेने कर्मविपाकाचा आधार सांगीतला.

१. मागूनही मिळत नसतो मोक्ष किंवा
आत्मशांती चेतना उर्मी
कल्पित गुढत्वाचे पक्षी नेहमीच असतात माणसाच्या खांद्यावर

२. देवाचा दुसरा मानसपुत्र मनू!
अखंड मानवजातीलाच ठेवतो धर्मबंधनात कोंडून

'कल्पित गुढत्वाचे पक्षी' धर्मव्यवस्थेने माणसावर वचक ठेवण्यासाठी, भिती दाखविण्यासाठी निर्माण केले. स्मृती-श्रुती हे हिंदू धर्माचे कायदेग्रंथच होते. धर्मबंधनात मानवजातीला कोंडून ठेवण्याचे कार्य मनुस्मृतीने पार पाडले. त्यामुळे ही 'भगव्या सोवळ्यातील धार्मीक शालीनता गाडून टाकण्याशिवाय शुद्रातिशुद्रांजवळ दुसरा कोणता पर्याय उरला नाही म्हणून मोक्ष, आध्यात्म, सोवळ्यातील धर्म, धर्मग्रंथ, ईश्वरी व्यवस्था या साऱ्यांना नाकारणारी जाणीव प्रखरपणे या कवितेतून व्यक्त होते. धर्म, वर्तमान, राजकारण या विषयीचे समकालीन वास्तव बळवंत कांबळे यांच्या कवितेने मांडले आहे.

झाडांना करावं कलम तसं धर्माच्या फांदीला केलं गेलय
राजकारणाचं नवं कलम तेव्हापासून
काही राजकारणी धतुरे धर्म नाचवताहेत संसदेच्या दारात
नंग्या तलवारीच्या पात्यावर आणि
अयोध्येच्या निष्पाप मातीला लागते तहान
राम-रहिमच्या रक्ताची

या दशकातील सांप्रदायिक वास्तव या प्रकारे व्यक्त होते. बाबरी मशिदीच्या विद्ध्वंसाचे आणि माणसाच्या कत्तली घडवून आणणाऱ्या धर्मांध शक्तीचे कत्तलखोर कारनामे या कवितेने उजागर केले आहेत. म्हणून धर्मांध आणि परंपरावाद्यांच्या संस्कृतीला चूड लावण्याचे काम ज्या महामानवाने केले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर ईश्वरशाहीच्या विरोधात जो मूर्तिभंजक युगंधर ठरला, ज्याने पिंपळपानाची प्रबुद्ध सळसळ काळजावर कोरून घेतली आणि बदलाचा मार्ग दाखविला

सांप्रदायिक साम्राज्यावर प्रज्ञा शील करुणा कोरणारा
मानवी चित्तधारेला प्रज्ञा देणारा
पहिला तत्त्वज्ञानी भाष्यकार

अशा सिद्धार्थ गौतमाचा विचार खऱ्या अर्थाने माणसाला त्याचे माणूसपण प्राप्त करून देऊ शकतो, तोच या विश्वाच्या अंतापर्यंत असू शकतो. त्यामुळेच ईश्वरी व्यवस्था, धर्म व्यवस्थेची वजाबाकी होऊन निखळ मानवतावादी व्यवस्था प्रस्थापित होईल असा विधायक विचार या कवितेने अधोरेखित केला आहे.

'देव मायनस धर्म'मधील दुसऱ्या भागातील कविता 'तिच्या' शी संवाद साधणाऱ्या आहेत. प्रेयशीसोबत संवाद साधताना या कवीमनाने तिला बहिष्कृताच्या लढ्याचे महत्त्व वाटले नाही याविषयी खंत प्रकट केली आहे. 'तुलाही

दु:खित जगाच्या जखमाचे डोळे व्हावे लागेल' असेही बजावले आहे.

हजारो वर्षांचा पारंपरिक माझा इतिहास मोडीत काढून
तुझ्या ईश्वरी सर्वस्वावर अधिराज्य करण्याची हिंमत
आजही मी बाळगून आहे
तू फक्त तुझ्या स्पृश्य काळजावर
निळा डोंगरमाथा कोरून घेण्यास विसरू नकोस

या स्वरूपाचे आवाहन केलेले दिसून येते. ईश्वरी सर्वस्वावर अधिराज्य गाजवायचे असेल तर 'स्पृश्य काळजानी' बदलणे अपरिहार्य आहे. मनाच्या पातळीवर हे वैचारिक बदल झाले पाहिजेत तरच माणूस म्हणून एकमेकांना स्वीकारण्याचे सार्थक होईल असा सकारात्मक विचार या कवितेने मांडला आहे.

✹ किशोर शांताबाई काळे (जन्म १ जून १९६८ - मृत्यू फेब्रुवारी २००७)

किशोर काळे यांच्या **आई तुझं लेकरू** (१९९५) या कवितेने पोरक्या दु:खाची जाणीव करून दिली आहे. कोल्हाटी समाजात बाप ठावूक असूनही बापाचे नाव लावायला परवानगी मिळत नाही. म्हणून किशोर काळे यांनी आपल्या नावासमोर आईचे नाव लावले. बापाचं नाव का लावले नाही याची कारणमीमांसाही कवीने केली आहे. त्यांच्या मते

नऊ महिन्याचा भार सोसून / आईनं मला जन्म दिला
बाप मात्र कुत्र्यासारखा पळून गेला / अशा बापाचं नाव मी का लावू? ...
पोराला बापाचं नाव लावता येत नाही
म्हणून त्याला दगडदेवाचं नाव लावतात
जो देव बापासंग कुत्र्यासारखा पळून गेला
अशा पळपुट्या देवबापाचं नाव तरी मी का लावू?

असे अंतर्मुख करणारे प्रश्न या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहेत. ते अस्वस्थ करणारे आहेत. बाप आणि देवबापाला प्रखर नकार का दिला गेला याची उत्तरे सदर कवितेने दिली आहे. आईबद्दल हा कवी लिहितो

शाळेत नाव दाखल करतानाच
मास्तरने मला जाणीव करून दिली की,
माझ्या माथ्यावर बापाच्या नावाचं आभाळ नसणार
म्हणून मी 'शांताबाई' या तुझ्या नावातील वेलांटीचाच पदर
माझ्या माथ्यावर पांघरुण घेतला पतीव्रता सवाष्णीसारखाच....

जन्माला आल्यापासूनच जिथे 'नाजाएज अवलाद' असे प्रमाणपत्र समाजाकडून दिले जाते. अशा जगण्याचे अतिशय वेदनादायी चित्र किशोर काळे यांनी रेखाटले आहे. आत्मचरित्राच्या अंगाने जाणाऱ्या या कवितेने कोल्हाटी समाजाच्या दु:खाचे चित्र गडद रूपात अधोरेखित केले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून अर्धशतक झाले तरी पारतंत्र्यातील जगणे सुटले नाही उलट ते अधिक जाचक होत गेले. ही दु:खद जाणीव किशोर काळे व्यक्त करतात.

चमचमत्या पदराचा पाठमोरा मोरपिसारा फुलवून
तू जेव्हा बोर्डावर छुम... छन्...न...न करत नाचतेस
तेव्हा तुझा ढळलेला पदर पाहून
प्रेक्षक फेटा-टोपी उडवत शिट्ट्या मारतात
त्यावेळी मला आठवतो
१५ ऑगस्टला फडफडणारा या देशाचा तिरंगा!

असे बोचरे सत्य येथे उजागर होते. कोल्हाटी समाजातील स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाची भळभळती

जाणीव या कवितामध्ये विखुरलेली आहे. या बायकांना बाप, भाऊ, बोर्डावर नाचवतात. तिने पैसा कमवून आणावा यासाठी पुरुष मंडळी बायकांनाच डावावर लावतात. आईबद्दलची तक्रार खालीलप्रमाणे हा कवी व्यक्त करतो.

पोटच्या पोराची पाठराखण करायचं सोडून
नवऱ्याची राखण करत बसलीस
तेव्हा मात्र माझ्या माथ्यावरील
मायेच्या आभाळाचे जावूळ उसवले
अन् आभाळाचा किनारा शोधणाऱ्या पाखराने
पिचलेली पोरकी आसवं पुसली

आई-मुलाच्या नात्यातील हा विरोधाभास अतिशय अस्वस्थ करणारा आहे. पोरकेपणाच्या दु:खाची ही तीव्रता कवीमनाचे पोरकेपण अधिकाधिक ठळक करीत जाते. एकीकडे समाज व्यवस्थेने नाकारले आणि दुसरीकडे जन्मदेत्या आईनेच झिडकारले. दु:खाचा असा अफाटपणा काविताभर विखुरलेला आहे. आयुष्याच्या रस्त्यावर सारे आयुष्यच अडखळत अपमान आणि निर्भत्सनेच्या आघातानी दबत पिचत गेले अशा जगण्याची सत्य कहाणी म्हणजे किशोर काळे यांच्या कविता!

या कवीमनाला 'आयुष्याच्या' आमावश्येचे भय नाही मात्र माया, वात्सल्य, जिव्हाळ्यापासून वंचित असल्याची खंत आहे. कारण 'नाचणारणीचा मुलगा', 'नाजायज ओलाद' असे डंख मारणारे निवडुंगच त्याच्या आयुष्यावर नाचले आहेत. या कवीचे 'कोल्हाट्याचं पोर' हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर कोल्हाट्याची संस्कृती बुडविली कोल्हाट्याची बेअब्रु झाली. असा हाकारा पिटत जातपंचायतीने जातीबाहेर टाकले तेव्हा हा कवी म्हणतो

संस्कृती म्हणजे तरी काय हो?
दागिने, चालीरीली, अंधश्रद्धा
की बंद दरवाज्याआडचे धुंद रिवाज..?

याला संस्कृती म्हणायचे का असा प्रश्न उपस्थित करून माणसामधील सद्गुण आणि मूल्य व्यवस्थेला आलेली काजळी झटकून काढणं म्हणजे संस्कृती आणि ही बाब जातपंचायतीपेक्षा महान आहे. असा निर्वाळाही दिला आहे. युगानुयुगे ज्यांच्या अब्रुचाच पत्ता नव्हता ते जातपंचायतीच्या बुरख्याआडून आब्रूच्या बाता करतात.

ते आता अब्रूच्या बाता कराया लागले
ह्ये बी एक चांगलच झालं का नाय?
आवो तुमच्या गरत्या समाजात पोरीला पदर येया लागल्यावर
बाप-भावाचं काळीज दडपून जातया
पन आमच्यामंदी बगा, बाप-भाऊ वाटच बगत असत्यात
की कवा माझ्या भन-बेटीला पदर येतुया
आन तिचा 'चिरा' उतरवून कवा नोटा कमावतुया!

अशी अनैतिकता जेथे आहे तिथे 'अब्रू' कशी काय असणार. या कोल्हाटी समाजातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे बाप आणि भाऊ आपल्या पोरीला, बहिणीला दुसऱ्यांच्या वरातीत नाचवतात. तिचे रक्षक बनण्याऐवजी भक्षक बनतात. पुरुषी वासनेच्या रेशमी फासावर बहिणीला लटकावून देतात. अशी भीषणता या सांस्कृतिक जगात आहे. वाचकांना हादरवून सोडणारे हे धक्कादायक वास्तव स्तिमित करणारे आहे. किशोर काळे यांच्या कवितेने हे सामाजिक सांस्कृतिक विश्व कवितेतून चितारून भारतीय संस्कृतीतील काळ्या कुट्ट बाजूचे दर्शन घडविले आहे.!

सिद्धार्थ तांबे (२ नोव्हेंबर १९६४- ५ फेब्रुवारी २००९)

सिद्धार्थ तांबे यांनी **यातनांच्या कहाण्या होताना** (१९९५) या कवितेतून वेदनेच्या कहाण्या सांगीतल्या

आहेत. वैफल्यग्रस्थ अवस्थेत या कहाण्या आविष्कृत झाल्या आहेत. तरीही पराभूत व्हायचे नाही अशा निश्चयातून अभिव्यक्ती झाली आहे. त्यातून वेदनेच्या खपल्या काढण्यात ही कविता सक्रीय होताना दिसते.

आमच्या यातनांच्या कहाण्या होताना
निर्ढावलेल्या इतिहासाच्या डोळ्यात
ढग यायचेच विसरून जातात
कुठल्याही आईचा पदर आमची आसवं पुसण्यासाठी
जन्मलेलाच नसतो केव्हा....

माणसाच्या वेदनेचे काय होते हा जीवघेणा प्रश्न अपस्थित केला आहे. या वेदनेवर कुणी फुंकर घालते का की, आपण त्या गावचे नाहीच असे म्हणून पलायन केले जाते का?

मी माणसाच्या वेदनेवर कविता लिहितो
तुम्ही व्वा! म्हणता मी कवी होतो
पुढे त्या माणसाच्या वेदनेचे काय होते?

संवेदना बोथट झालेल्या, इच्छाशक्ती हरविलेल्या साऱ्या समाजमनाला विचारलेला हा प्रश्न आहे. दु:ख दारिद्र्याचे चित्र पडदयावर झळकावणे हा काही वेदनेवरचा उपाय नसतो तो प्रदर्शनाचाच भाग असतो. दु:ख दारिद्र्यावरचे उपाय त्यातून पुढे येत नाहीत.

निर्माते दिग्दर्शक दारिद्र्याच्या प्रश्नावर
आर्ट फिल्म काढतात
टाळ्या वाजवून आपण म्हणतो
काय रिऍलिटी आहे यार!
पुढे त्या दारिद्र्याच्या प्रश्नाचं काय होतं?

प्रश्नाची उत्तरे मिळत नाही. दु:खाच्या मूळापर्यंत पोहचून कोणीही कोणत्याही उपाययोजना करत नाही. वेदना कायम राहते. प्रश्न जागेवरच राहतात. अशा स्वरूपाची आत्मटिका आणि उपरोधाची तीव्र धार असलेली कविता सिद्धार्थ तांबे यांनी साहित्य जगताला दिली.

याच वर्षी लोकनाथ यशवंत यांचा आणि **शेवटी काय झाले**, नामदेव ढसाळ यांचा **या सत्तेत जीव रमत नाही**, केतन पिंपळापुरे यांचा **सूर्यकंकण** व राजेश डोंगरे यांचा **चळवळीच्या कविता** इ. कवितासंग्रह प्रसिद्ध झाले.

आता होऊन जाऊ द्या! असे आवाहन केल्यानंतरही लोकनाथ यशवंत यांची कविता प्रश्नार्थक झालेली दिसते. **आणि शेवटी काय झाले**'ने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. तोवरच्या काळात धर्मांतराला चार दशके पूर्ण झाली होती. गटातटाच्या राजकारणाला ऊत आला होता. त्यामुळे समाजमनात एक संतप्त भावना निर्माण झाली होती. दलितांच्या चळवळी मुलभूत बाबींच्या संदर्भात संघर्षसन्मुख होण्याऐवजी भावनिक आणि अस्मितेच्या प्रश्नातच अधिक गुंतत गेल्या. राजकीय पुढाऱ्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे केवळ भांडवल केले. आणि सामाजिक राजकीय प्रश्न बासणात गुंडाळून ठेवले. स्वत:चे खिसे भरताना सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीचे भान राहिले नाही. कातडीबचाऊ भूमिका घेऊन समाजमनाच्या डोळ्यात धुळफेक करण्याचे काम या लोकांनी केले अशा प्रवृत्तीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचे काम लोकनाथ यशवंत यांच्या कवितेने केले. उपरोध, उपहास हा स्थायीभाव पहिल्या कवितेप्रमाणेच याही कवितेत कायम आहे असे दिसून येते.

तुम्ही गेले काय / आणि डबकेच साचून आले
बेडूक राजे होऊन बसलेत / मगर विधवा झाली...आणि
षंढ प्रेषितांची वाणी बोलू लागली

आम्ही असे दळभद्री की
सारे उघड्या डोळ्यांनी बघावं लागताहे.

काजव्यांनी स्वत:ला सूर्य समजावे अशी प्रवृत्ती बळावत गेली. आणि निगरगट्ट मनाने ती कार्यरत झाली. या वास्तवाने अस्वस्थ होऊनही केवळ हतबल होण्यापलिकडे काही करता येत नसल्याची अशी दु:खद भावना व्यक्त केली आहे. आत्मटिका करण्यात ही कविता मश्गूल झालेली दिसते. त्यामुळे स्वकीय जगाअंतर्गत बेइमानी करणाऱ्याविषयी एक कडवट भावना ती व्यक्त करते. पुरोगामी चळवळीकडे समाजमन आशेने डोळे लावून बसले होते पण या चळवळीनीही दगा दिल्याचे वास्तव या काळात पाहावयास मिळते. त्यामुळे झालेला सर्वसामान्यांचा भ्रमनिरासच या कवितेने वाचकांसमोर ठेवला आहे.

मार्क्स- लेनिन- माओ- स्टॉलिन- चार्वाक
धुव्वाधार चर्चा झाल्यावर
साहेब अधिकाऱ्याच्या मुत्रीघरात गेले / आणि आम्ही कामगाराच्या

पुरोगामी चळवळीत म्हणून मिरवणारे जे कोणी असतात त्यांचे तत्त्व आणि व्यवहार मात्र वेगळे असतात. या वास्तवावर नेमकेपणाने भाष्य करण्याचे काम ही कविता करते. सामाजिक राजकीय चळवळीतील अंतर्विरोधाचे वास्तव पाहून या वृत्ती प्रवृत्तीचा वेध घेताना एक तीक्ष्ण उपरोध येथे प्रत्ययाला येतो. एक प्रकारे खिल्ली उडविण्याचा प्रकार येथे पाहावयास मिळतो. त्याचप्रमाणे 'सारे ग्रंथ हे जंत / मिडकणाऱ्या संस्कृतीच्या पोटातील' या पद्धतीने धर्मग्रंथ आणि संस्कृतीचा उपहास होताना दिसतो. पुराण-इतिहास-वर्तमान अशी अन्यायाची परंपरा शाबूत ठेवणारी, आपला देश आणि संस्कृतीची थोरवी उपरोधाचा विषय ठरली आहे. देश, इतिहास आणि संस्कृतीचे गायिले जाणारे गोडवे प्रत्यक्षात अन्याय अत्याचाराच्या भीषणतेपुढे कुचकामी ठरतात.

वारसाहक्क सांगणारी अनौरसाची माळ जगते आहे
जयंत्या पुण्यतिथ्यातून
त्यातला तो थोर ज्याचे भिकेचे भांडे मोठे

विषारी प्रवृत्तीवरही या कवितने भाष्य केले आहे. जिभेला दोन टोके असलेला माणूस पहिला की माझा थरकाप होतो'. एखाद्या विशिष्ट जीवन प्रणालीचा स्वीकार हा केवळ तत्त्वत:च स्वीकारला जातो. आचाराच्या पातळीवर बोंबाबोंबच असते. किंबहुना पारंपरिक व्यवस्थेची मूल्ये अनाचाराच्या पातळीवर मनात घट्ट रुजून बसलेली असतात अशा वेळेस त्या दांभिक प्रवृत्तीचा खरा चेहरा कसा आहे हे अतिशय मार्मिकपणे लोकनाथ यशवंत याच्या कवितेने स्पष्ट केले आहे. एका स्थितीशील समाजाच्या सामूहिक अपयशाची नोंद करून ठेवली आहे.

या दशकातील **केतन पिंपळापुरे** यांच्या कवितेने **सूर्यकंकण**मधून दैववादाला ठोकणाऱ्या वादळी विद्रोहाचा प्रत्यय दिला. माणुसकीचे गाणे हरविल्याची खंत प्रकट केली. प्रस्थापित व्यवस्थेला नाकारतानाच या देशात सांडलेल्या रक्ताचा हिशोब मागीतला आणि स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह ठोकले. वर्गजाणिवा व्यक्त केल्या.

रक्तभिजल्या मातीत उगवली विषाची पिके
आणि कष्टकऱ्यांच्या हातात भुकेची पारितोषिके
साथी चला आता शेवटचा हिशोब करून घेऊ

गांजलेल्या आयुष्याला धार लावून युद्धभूमीवर पाऊल ठेवण्याची कृतिशीलताही या कवितेत दिसून येते. सृजनशील विद्रोहाला बंदुकीचा धाक दाखवता येत नसतो. आंतरउर्मीतुन तो उफाळून येत असतो. तसाच तो मुक्तीच्या प्रबळ उर्मीतून, मानव्याच्या भव्यदिव्य प्रस्थापनेच्या इर्षेतून उफाळून येत असतो. अशाही जाणिवा पिंपळापुरे यांच्या कवितेतून प्रकट झाल्या आहेत. पूर्वसूरींच्या कवितेत शब्दविषयक जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. पारंपरिक अभिव्यक्ती परंपरा नाकारताना कवी म्हणतो

ज्यांच्या शब्दांना कधी फुटलीच नाही
माणसाच्या मायेची पालवी
ते शब्दांचे जादूगार आमचे आदर्श नाहीत....
म्हणूनच 'अग्नीची अंगाई' लिहून ठेवण्याची नैतिक जबाबदारी कवीने स्वीकारलेली आहे.

✸ लहू कानडे (जन्म २३ आक्टोबर १९५५)

टाचाटिभा (१९९६) या काव्यसंग्रहाने दलित कवितेच्या जगतात नव्या बदलाची मोहर उमटविली आहे. ही कविता सामाजिक गंभीर स्वरूपाची असून काळानुरूप आणि अनुभूतीच्या बदलत्या केंद्रानुसार साकार झाली आहे. दलित आत्मकथनाचा आकृतिबंध लहू कानड्यांनी कवितारूपात साकार केला आहे. अलिकडच्या काळातील कवितेत भाषिक बदल होत गेल्याचे जाणवते. विविध समाजगटातून, जातीसमूहातून आलेल्या कवींनी आपल्या समूहाची भाषा कवितेत उपयोजित केली आहे. त्यामुळे दलित कवितेचे रूप बदलण्यास मदतच झाली आहे. लहू कानडे यांनी एका विशिष्ट समूहमनाची भाषा आपल्या कवितेत केंद्रस्थानी आणली त्याद्वारे एक सांस्कृतिक जग उभे केले आहे. या भाषेला सागळ संस्कृतीची भाषा असे म्हणता येईल.

'टाचाटिभा'तील सुरुवातीच्या 'आजा बाप आणि मी' या कवितेच्या बंधातून तीन पिढ्यांचा इतिहास सूचित होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेत गावगाड्याशी संबंधित असलेल्या बारा बलूतेदारापैकी 'चर्मकार' हा एक बलुतेदार होता. अस्पृश्यतेचा दाहक अनुभव या समूहाच्या जगण्याच्या केंद्रस्थानी होता. जातीव्यवस्थेच्या आवर्तात सापडलेल्या समूहजीवनाची, त्याच्या अटळ दु:खाची अटळ कहाणी 'टाचाटिभा' अधोरेखित करते. या कवितेचा नायक रापीऐवजी, टाचाटिभ्याऐवजी हाती आलेली पाटी पेन्सील घेऊन निघालेला, जीवनाच्या चिंतनापर्यंतच्या प्रवासात कवितेच्या ओळीओळीतून वाचकास भेटतो. कष्ट आणि दारिद्र्याचं प्रतीक असलेली 'माय' ही कारुण्यपूर्ण रूपात वाचकांना भेटते.

आदिमतेपासून मानवी जीवनाचा, उत्क्रांती आणि इतिहासाचा शोध ही कविता घेते. डार्वीन ते आंबेडकर या ऐतिहासिक प्रवासात माकड ते माणूस आणि माणूस ते माणूसपणा असलेला समाज असा प्रवास, अशा प्रवासात वैज्ञानिक दृष्टीकोनातून माणूस आणि इहवादी दृष्टिकोनातून माणूस असे संशोधन आकार घेते. अवैदिक परंपरेच्या विकासात चार्वाक ते आंबेडकर हा फार मोठा ऐतिहासिक प्रवास आहे. 'स्वत:चे मार्गदाते स्वत:च व्हा, स्वयंप्रकाशित व्हा' हे बुद्ध तत्त्वही या प्रबळ वैचारिक, ऐतिहासिक प्रवासाचा एक वैभवशाली भाग आहे. म्हणून दशदिशाच्या अंधाराचे काळेकुट्ट जग पाजळण्यासाठी 'अत्तदीप' होणे ही काळाचीच गरज ठरते. अंतिमत: कानड्यांची कविता बुद्ध विचारच उद्घोषित करते.

ही कविता दोन काळाच्या मध्यावरील स्फोटक स्थितीचे वास्तव स्पष्ट करते. पूर्वजाच्या काळ्याकुट्ट अंधाऱ्या इतिहासाचे व्यवस्थेकडून केले जाणारे आघात आणि स्वजगांतर्गत वास्तव स्थितीचे मनावर होणारे आघात यातून गोची झालेल्या अस्वस्थ मनाची मानसिकता स्पष्ट होते. पारतंत्र्यात, वसाहतवादाच्या छायेत वावरणाऱ्या, सरंजामीच्या कैफात वाहून जाणाऱ्यांना देश स्वतंत्र झाला तरी मानसिकतेत फरक पडत नाही. स्वातंत्र्यानंतर ही मानसिकता परत उफाळून आली. पिढ्यांपिढ्याचे जुलमी मेंदू पुन्हा ऐतिहासिक मानसिकतेत गरगरू लागले. मुक्तपणे वावर करणाऱ्यांच्या अधिकारावर बंधने घालण्यास सुरुवात झाली.

यज्ञ मांडलाय त्यांनी आहूतीसाठी / जंगलभर राहुट्या ठोकल्यात
आता आकाशलक्षी पाखरावर / त्यांनी गलोली रोखल्यात

असे वास्तव असतानाही सवलतीमुळे होऊ पाहणारे लाभ हा हेव्यादाव्याचा विषय ठरतो. ही प्रवृत्ती कधी दगाबाजी करेल याचा नेम नाही. अशाप्रकारे ही कविता समकालीन जीवनातील उपेक्षितांच्या जीवनाचा वेध घेते. तसेच ती मूलतत्त्ववादी प्रवृत्तीचाही वेध घेते. सवलती घेणाऱ्यांना 'सरकारचे जावई' म्हणून हिणवल्या जाते. अशा प्रवृत्तीवरही

ही कविता बोट ठेवते.

ग्रामीण स्तरावर जातीयतेचे स्वरूप भीषण असते. दृश्य रूपात ते कार्यरत असते. शहरात उघड स्वरूपात जातीयतेचे व्यवहार होत नाहीत. जातीयतेचे दृश्यमान कोंडवाडे शहराने पुसून टाकले आहेत. असे निरीक्षण नोंदवितानाच, वाडा आणि शेती संस्कृती व झोपडी आणि सागळ संस्कृती अशा दोन सांस्कृतिक जगातील अंतर्विरोध लहू कानड्यांची कविता स्पष्ट करते. परंपरेच्या दुष्काळी जगात परिवर्तनाचा पाऊस पडून जातीयतेचे रान साफ होईल. अशा स्वरूपाचा आशावाद या कवितेतून प्रकट झाला आहे. तडजोडी करीत जगाव्या लागणाऱ्या आयुष्याने कवीमनाची चरफड होते. मुखवटे धारण करून जगणे म्हणजे खरे आयुष्य नव्हे.

असंख्य तडजोडी आणि मुखवट्यांचा असह्य भार
माझ्यातून माणूसच झालाय रिता
आता येत नाही
पहिल्यासारखी छाताड फोडून एखादी कविता

धपापणाऱ्या छातीतून एखादी कविता आकार घेत नाही कारण युद्धासाठी प्रेरीत करणारे चेतना देणारे तत्त्वच हद्दपार झाले आहे. बंडखोरीचे तत्त्व आपल्या काळजातून बेगडी जगाने हिसकावून घेतले आहे. निळ्या जगातून पुढे आलेल्यांनी प्रस्थापित झाल्यानंतर तडजोडी स्वीकारल्या, मुखवटे धारण केले आणि मुखवटा धारण केलेल्या जगाला ते वास्तवाचा मुलामा देण्याचा खटाटोप करू लागले. त्यामुळे फार मोठे सामाजिक वास्तव नाकारल्या गेले. एकप्रकारे आपणच आपल्या जगाशी केलेली ही प्रतारणा होय. मध्यमवर्गीय दलित मानसिकतेचे वास्तवच कवीने अधोरेखित केले आहे. छातीवर बेगडी अस्तर आहे आणि तडजोडीचे चिलखत असल्यामुळे छाताड फोडून कविता येत नाही. ही एक अस्वस्थ करणारी जाणीव आहे. समाजमन आणि स्वत:चे म्हणून असलेले तडजोडपूर्ण जग अशा दोन जगातील विलक्षण वैचित्र्य याचे एक कलात्म आविष्कारण या कवितेने केले आहे.

सखीचा संदर्भ असलेल्या काही कविता 'टाचाटिभा' त आहेत. संघर्षशील प्रवासाच्या पार्श्वभूमीवरील ह्या कविता असल्यामुळे कवितेला एक वेगळेच परिमाण प्राप्त झाले आहे. आपल्या सखीने युद्धाचाच एक भाग बनावे असे कवीमनाला वाटते. जीवनच एक युद्धभूमी आहे. या युद्धभूमीवरच्या प्रवासात काय स्वीकारायचं आणि काय नाकारायच अणि जीवन यशस्वी कसं करायचं असाच काहिसा विचार युद्धभूमीवरील कवितातून व्यक्त होतो. ग्लोबल युगात अर्थव्यवस्थेचे सारे संदर्भच बदलेले आहेत. मुठभरांच्याच गुणवत्ता आणि कार्यक्षमतेला प्रचंड महत्त्व येऊन मोठे सामाजिक जग नाकारले जात आहे. माणसाला प्रतिष्ठा मिळवून देणारी तत्त्वे या ग्लोबल रणधुमाळीत लयाला जाण्याची भितीयुक्त शक्यता कवीला जाणवते.

अवघ्या जगाचं रूपांतर होताना / एका ग्लोबल व्हिलेजमध्ये
पिंपळपानानाही कशी पडून गेलीय / पसायदानाची भुरळ

पयासदानाची भूमिका स्थितीशीलता जोपासणाऱ्या तत्त्वाशी निगडीत आहे. पारंपरिकता जोपासणाऱ्या शब्दप्रामाण्य दर्शनिक प्रवाहाशी ही भूमिका निगडीत आहे. म्हणूनच दैववादाला नाकारताना कवी म्हणतो.

मला भरोसा नाहीय / प्राक्तन नावाच्या छिनाल भूलभूलैयाचा
ज्याने नासवला किती एक आसराब जगण्याचा

मायावी तत्त्वाची भुरळ पडते ही अस्वस्थ जाणीव कवीच्या चिंतनाचा विषय आहे. नव्या शतकाची लागलेली चाहूल, येऊ घातलेल्या शतकाच्या भानातून हाताशी लागणाऱ्या काही शक्यता यातून अस्वस्थ मनाची स्पंदने या कवितेतून अभिव्यक्त झाली आहेत.

थोडक्यात, लहू कानडे यांच्या कवितेतून दलित कवितेचे विकसीत रूप दिसून येते. दलित आत्मकथनाचा

मूल्यव्यूह स्वीकारून ही कविता साकार झाली असून त्यामुळे दलित कवितेला वेगळे परिमाण प्राप्त झाले आहेत. समकालीन जीवनाचा वेध घेताना प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर कालीन सामाजिक, राजकीय जीवन, राजकीय अपप्रवृत्ती, कारखानदारी अपप्रवृत्ती, मूलतत्त्ववादी प्रवृत्ती आदीचा वेध घेणारी ही कविता सर्वहारांच्या जगण्याचे वास्तव स्पष्ट करते आणि आंबेडकरोत्तर दलित चळवळीचे स्वरूपही स्पष्ट करते. जीवनाचा अर्थ साकल्याने सांगताना नव्या शतकाविषयीचे भान प्रकट करते. चिंतनगर्भता, प्रतिकात्मता, अर्थाची व्यामिश्रता, अनेकार्थता ही 'टाचाटिभा'तील कवितांची वैशिष्ट्ये आहेत. उसवलेल्या जगाचे अटळ दु:खच 'टाचाटिभा'तून प्रकट झाले आहे.

✸ मोतीराम कटारे (जन्म १ जून १९५५)

दिशांताची पाखरं (१९९७) हा मोतीराम कटारे यांचा पहिलाच कवितासंग्रह. हे एक चिंतनकाव्य आहे. ही तशी आत्मप्रत्ययी कविता आहे. दलित प्रेम कवितेच्या परिप्रेक्ष्यात या कवितेचा विचार करता येईल.या कवितेत मी-तू च्या विभ्रमाचे अनेकरंगी पैलू आहेत. प्रकाशगर्भ ओढ असणारे व्यक्तिमत्त्व म्हणून कवितागत 'मी' समग्र कवितेत वाचकांना भेटतो. मानवी अस्तित्वाच्या वाटचालीला पुरक ठरणाऱ्या नैतिक तत्त्वाचा पुरस्कार आणि जीवनाकडे बघण्याचा एक गंभीर दृष्टीकोण स्वीकारतो. बुद्ध तत्त्वाच्या प्रभावातून हा दृष्टीकोण प्रकट झाला आहे.

स्वप्न म्हणजे लालसा स्वप्न म्हणे तृष्णा
स्वप्न आपण नाकारली पाहिजेत.

मुक्ती म्हणजे निर्वाण. निर्वाण म्हणजे राग, द्वेष यांचा क्षय. लालसा तृष्णा ह्या गोष्टी निर्वाण पदाकडे जाणाऱ्या मार्गातील मुख्य अडथळे आहेत. निर्वाण ही जिंवतपणीच प्राप्त करून घ्यावयाची बाब आहे. मरणोत्तर आयुष्याला बुद्ध तत्त्वज्ञानात स्थान नाही. अनासक्तकाळी लालसाविरहित, तृष्णाविरहित जगून जीवनाचे सार्थक करणे म्हणजेच निर्वाण होय, कवीमन बुद्धतत्त्वाने प्रभावित असल्यामुळे 'तू'चे रूपही त्याला बुद्धासारखे दिसते. उदा.

तू काहीच बोलत नाहीस, बोललीच तर.....
परदेश गमनाला निघालेल्या सूर्याकडे पहात म्हणतेस
तू सूर्यपुत्र नाहीस एवढे जाहीर कर! ...
तेव्हा ढगांच्या पदराआड लपलेल्या चंद्रासारखा
मी असतो काळाठिक्कर अन् तू असतेस मुर्तिमंत बुद्ध.

त्याप्रमाणे कवितेला मातेचेही रूप प्राप्त होतान दिसते. त्यांची कविता 'आईवर गेली' असे दिसते. नवसृजन मातेच्या वळणावर जाते. म्हणून ममत्वाशी नाते सांगणाऱ्या तत्त्वाचा ती आंगीकार करते असे म्हणता येते. निसर्गप्रतिमांचे चेतनीकरण होऊनही 'तू-मी'चे संबंध स्पष्ट होतात. या संबंधाच्या आविष्कारात 'तू' च्या अनेकरंगी विभ्रमात स्त्रीजातीचे प्रातिनिधिक रूप म्हणूनही 'तू'चा आविष्कार होतो

संस्कृतीने बहाल केलेला स्त्रीत्वाचा कोणताच आदर्श
तू पेटवला नाहीस शब्दात अथवा कृतीत
तरीही इथला सनातन समाज उठला पेटून
तू संस्कृती पेटविल्याच्या आविर्भावात

सांस्कृतिक विश्वातील स्त्री अस्तित्वाच्या अनुषंगाने अनेक बाबींची चर्चा कटारे यांची कविता करते. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या वर्चस्वाखाली, काळाच्या प्रत्येक टप्प्यावर अकाली ऋतूतील पानगळीचे जगणे स्त्रीच्या वाट्याला आले म्हणून तिच्या जीवनाला नवा अर्थ देण्याचे आवाहन करते. पुरुषी वृत्तीचा कावेबाजपणा, स्त्रीला लालूच दाखवून सर्वस्व लूबाडणारी पुरुषी वृत्ती, अशा विविध गोष्टींचे सूचन करते. स्त्रीमुक्तीच्या, बंधमुक्तीच्या विचारांचा वसा या कवितेने घेतला आहे.

शतकान्ताच्या क्षितिजापार (१९९९) दिशान्ताची पाखरं नंतरचा हा दुसरा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. स्त्रीपुरुष नात्यातील निखळ व विवेकी रूप या कवितेत प्रत्ययाला येते. 'भारतीय स्त्री मुक्ती चळवळीने परदेशी मूल्यांना अधिक महत्त्व दिले. बऱ्याचदा पुरुषद्वेष त्यांच्या वागण्याबोलण्यातून डोकावतो त्यामुळे ही चळवळ फक्त उच्चभ्रुंपुरतीच मर्यादित राहिली. स्त्रीपुरुष संबंधाबाबतही या चळवळीला लोकप्रबोधन करता आलं नाही'[१२] अशी खंत कवीने आपल्या मनोगतात व्यक्त केली आहे. शोकांतिकेच्या रणभूमीवर सतत कोसळत राहून, सहनशिलतेचा अंत झाला म्हणजे वेदनेच्या पुरात वाहून जाणे यालाच जर जगणे म्हणायचे असेल तर हे जगणे शतकानुशतके स्त्रीजगताच्या वाट्याला आले आहे. सामाजिक व्यभिचाराच्या अर्थाने 'ऋतू' प्रतिमा या कवितेत साकार होताना दिसते. उदा.

ऋतूच इथले असे कसे?
बाइनंच व्हावं आभाळ...पाऊस...रहावं कोसळत धुवांधार
कोसळता कोसळता एक दिवस वाहून जावं महापूरात...

कोणत्याही मोसमात तिच्या जगण्याशी सुसंगत किंवा जगण्याला साद देत, आधार देणारा कुणी उरला नाही. स्त्री पुरुषांच्या निर्मळ नातेसंबंधांना समाज संस्कृतीने हद्दपार केले आहे. निर्थक ठरविले आहे. धर्मग्रंथातील तत्त्वांनी माणसाच्या जगण्यावर निर्बंध घातले आणि या निर्बंधाचा सर्वात मोठा बळी स्त्री ठरली आहे. पाखंडी विचार तत्त्वांनी माणुसकीच्या गाण्याची बोलतीच बंद केली. प्रेम, मैत्री, करुणा या मूल्यांनाच तिलांजली देण्याचे काम सुरू झाले.

मनाचं स्वातंत्र्य धर्म पुस्तकात गहाण टाकल्यावर
गाता येत नाही माणसाच्या महानतेचं गाणं
ईश्वरी वचनाखातर तळहातावर शीर घेऊन
ते करतात माणसांच्या कत्तली पाडतात रक्ताचे सडे
कोण देणार यांना प्रेमाचे धडे

माणूस निर्माण करण्याचे सामर्थ्य केवळ स्त्रीमध्ये आहे. मात्र व्यवहाराच्या पातळीवर तिला पुरुषी शिकाऱ्याने सावजच ठरविले. एकूणात, जागतिक पातळीवर विचार केला तरी स्त्रीत्व हे पुरुषप्रधान संस्कृतीच्या गरजेनुसार घडविले गेले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीच्या स्त्रीत्वाची घडण पुरुषप्रधानतेला जुळवून घेणारी, पक्की करणारी आणि वाढविणारी असते. म्हणून 'भोगाची वस्तू' ही पुरुषप्रधान व्यवस्थेच्या गरजेतून निर्माण करण्यात आली आणि मुक्त बाजारपेठा आणि उदार आर्थिक धोरणाच्या वातावरणात उपभोग्य वस्तू अधिकाधिक सजवून, प्रदर्शनात उभी करून तिला सार्वत्रिक ठरविले जाते. भारतीय पातळीवर स्त्रीला तत्त्वाच्या पातळीवर अस्तित्वहीन करून ठेवले आहे. सामाजिक. सांस्कृतिक क्षेत्रातून हद्दपार करून तिच्या हक्काची सनद जाळून टाकण्यात आली. पुरुषी अहंकाराचे वस्त्र नजरेवर पांघरल्यामुळे आणि स्त्री ही देहधर्मापुरतीच ही ठाम समजूत युगानुयुगे चालत आल्यामुळे स्त्री अस्तित्व देहापुरतेच मर्यादित झाले. नर-मादी ह्या आदिम संबंधासारखाच विचार केला जातो. माणूस म्हणून केला जात नाही. मात्र प्राणीपातळीवरील नातेसंबंधानाही उदात्त पातळीवर पोहचविण्यात व्यवस्था यशस्वी ठरली आहे. प्राण्यात निसर्ग नियमानुसार संबंध प्रस्थापित होतात. माणूसप्राणी उदात्तीकरण करतो आणि अनैसर्गिक संबंधही प्रस्थापित करतो. कारण 'वापरा आणि फेका' या स्थायीभावाच्या तत्त्वाचा तो गुलाम झाला आहे. अशा प्रवृत्तीवर निषेधात्मक भाष्य कटारे यांच्या कवितेने केले आहे.

तुझ्या नात्याचे अर्थ शोधत राहतं शहर
देहापाशी येऊन थांबतं उत्तर
खरचं देहाचं नातं एवढं का असतं पवित्र, उदात्त
मग का दिसत नाही दैहिक एकरूपतेची नाती एकजीव
त्याच्या मंगलतेची गाणी गाणाऱ्यांची येते मला कीव

त्यामुळे हे कवीमन स्त्रीजातीला आवाहन करते 'विरुद्ध दिशेला फिरव तोंड, विझू घातलेल्या तुझ्या सूर्याला

तेजोमय होऊन दे अलिंगन'. स्त्रीव्यक्तिमत्वाला एक नवा अर्थ प्राप्त व्हावा असा आशावाद या कवितेने उराशी बाळगला आहे. कारण पुरुषी व्यवस्थेने प्रत्येक नाक्यावरच्या दुकानात गुलामीचे अलंकार सुशोभित करून ठेवले आहेत. विधिनिषेधाच्या कल्पनांनी तर स्त्रीजगताला क्षणोक्षणी पिळवटून टाकले आहे. मस्तवालपणाच्या आदेशांनी तिची नाकेबंदी केली आहे. असे अनेक दाखले देत, शोषकांच्या कारखान्यात झालेले, शोषणाच्या वखारीत रचून ठेवलेले उत्पादन म्हणजे स्त्री! अशी स्त्रीरूपे आणि प्रतिमा या कवितेत साकार झाल्या आहेत. स्त्रीवादी अंगाने ही कविता व्यवस्थेची चिरफाड करते. सामाजिक विदृपतेला प्रखरपणे नकार देते म्हणून ही कविता स्त्रीवादी ठरली आहे.

पारंपरिकतेच्या पगड्याखाली जी स्त्री संस्कारीत झाली त्या स्त्रीसमाजाने आपल्या संततीलाही पारंपरिकतेचेच धडे दिले. समाज आणि सांस्कृतिक, कौटुंबिक जीवनातील अनेक संकल्पनांचे चुकीचे संस्कार पुढील नव्या पिढ्यांवर केल्या गेले. प्रेम, स्वप्न, वासना, लग्न, उद्ध्वस्तता, यातना, वंचना, मन मारून जगणे, धर्म, धर्मग्रंथ, कारुण्य आणि काळोख, सहनशीलता, जगण्यामरण्याचा संघर्ष अशा अनेक बाबींच्या अनुषंगाने स्त्रीजावनाच्या वाताहतीची कहाणी या कवितेने सांगीतली आहे. अगदी आरंभकाळाच्या स्त्री प्रतिमांपासून ते आधुनिक, नव्या युगधर्माला सलाम करणारी स्त्री असा प्रवास अधोरेखित केला आहे. स्त्रीमुक्ती चळवळीच्या नावाखाली उच्चभ्रू वर्गातील स्त्रियांनी स्वत:ला गाजवून घेतले. सर्वसामान्य स्त्रियांच्या प्रश्नांची जाण आणि भान या चळवळीला उरले नाही. समग्र स्त्रीवर्गाच्या समस्यांच्या मूळापर्यंत भिडण्याचे सामर्थ्य या चळवळीजवळ नव्हते.

फुले-आंबेडकर आले गेले / तेही नावापुरतेच गं उरले
भुंड्या बायांची चळवळ-प्रबोधन / कधीच झालं नाही उलगुलान

स्त्रीपुरुष समतेच्या तत्त्वांचा उद्घोष करणाऱ्या महापुरुषांची नावेही केवळ नावापुरती, चलनी नाण्यासारखी वापरायची अशी टूम स्वातंत्र्योत्तर काळात निघाली होती. त्याला तथाकथीत स्त्रीवादी चळवळही अपवाद ठरली नाही. त्याविषयी उपरोध या कवितेत प्रत्ययाला येतो. मनपाखराची स्वगते असेही एक रूप या कवितेचे आहे. मनातील विविधरंगी भावभावनांचे विभ्रम पाखराच्या निमित्ताने प्रकट होतात. प्रवाहाविरुद्ध पोहणे म्हणजेच आयुष्य याची जाणीव करून देतानाच नवे गाव वसवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवाहाविरुद्ध कुणी पोहणारा पाहिलास काय?
आयुष्य असतं त्याचंच नाव / आपण वसवूया नवा गाव
फुल्यांच्या सावित्रीचं देऊ त्याला नाव

स्त्री-पुरुष समतेची वस्ती अर्थात समताधिष्ठीत समाजरचना अभिप्रेत असणाऱ्या आकांक्षाविभोर मनाचे दर्शन येथे घडते आणि हे मन एकट्या व्यक्तीचे नसते तर ते समूहाचेच असते. स्त्रीपणाकडून माणूसपणाची प्राप्ती करून घ्यावयाची असेल तर अशी गावे वसविली पाहिजेत हेच माणसांच्या मनावर बिंबविणे हे मोतीराम कटारे यांच्या कवितेचे प्रयोजन आहे.

✸ जावेद कुरेशी (जन्म १५ जून १९६२)

दलित कवितेने चार दशकाच्या प्रवासात अनेक वळणे घेतली आहेत. मुस्लिम मराठी लेखकांची परंपरा मराठी साहित्यात आहे. मुस्लिम कवींचे मराठी कवितेसाठी मोठे योगदान आहे हे मान्य केले तरी मुस्लिमातील दलितत्वाला हात घालण्याची हिंमत मुस्लिम कवीनी केली नाही हे कटू असले तरी सत्य आहे. याबाबतीत मुस्लिम मराठी कविता तोकडीच ठरली. किंबहुना सुफी सतांचा हवाला देत संत साहित्याशी नाते जोडताना ही कविता प्रस्थापित मराठी कवितेशीच संधान साधणारी आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अशा पार्श्वभूमीवर जावेद कुरेशी यांचा **बएत** (१९९७) हा कवितासंग्रह दलित कवितेच्या अंत:सूत्राशी नाते सांगणारा पहिलाच कवितासंग्रह आहे असे स्पष्ट होते. मुस्लिम दलित समाजाची व्यथा, वेदना आणि उपेक्षेसह सांस्कृतिक संघर्ष या कवितेतून साकार झाला आहे. समकालीन जीवनातील एका भेदक वास्तवाला या कवितेने हात घातला आहे. देश स्वतंत्र झाला तोच मुळी दंगलीचा शाप घेऊन एका रंगाची दंगल शमली की, दुसऱ्या रंगाची दंगल सुरू होते. या सूडचक्रात निरपराध माणसे उद्ध्वस्त होतात.

गुलाल उधळणारे हात माझे पार जायबंदी होतात
संदलाचे आवाज आता रणशिंग फुंकतात
आणि जेव्हा जेव्हा जातो रामजन्मोत्सवाचा रथ
माझी वस्ती वस्ती अन् रस्ते गल्ली/ उद्ध्वस्त अयोध्या होतात

बाबरी मशिदीच्या विद्ध्वंसाचे भेसूर सत्य येथे मुखरीत झाले आहे. अशा या भेसूर वास्तवामुळे मनुसंस्कृतीला नव्याने आव्हान देण्याची गरज कवीला वाटते.

हा युद्धनामा त्यांच्यासाठी ज्यांनी
इतिहासातील गांडू बगीचे आमच्या नावे केले
हा युद्धनामा त्यांच्यासाठी
ज्यांची मनुस्मृती आम्ही पालथी केली.

एका सांस्कृतिक संघर्षाची नांदी देणारी ही कविता आहे. समतेच्या संगरात सामील होणाऱ्या बहुसंख्यांकानी अल्पसंख्य समाजाकडे भूतदयावादी दृष्टीनेच पाहिले त्यामुळे अल्पसंख्यांकांचे आत्मभान जागृत होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतल्या गेली. परंतु काळाच्या गतीने वेगळेच रूप धारण केले.

समतेचे तुफान पेलण्यासाठी पहा केव्हाचीच पेटलीत रे
फुले आंबेडकर चंदनवृक्ष
आमच्याच काफल्यांसाठी माणुसकीच्या व्यवस्थेसाठी

ही जाणीव अत्यंत महत्त्वाची आहे. कारण इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेने मुस्लिमांना 'परके' असल्याची जाणीव हेतुपुरस्सर करून दिली आणि माणूस हे एक मूल्य असल्याचे भान फुले आंबेडकरांनीच मानवी समाजाला दिले. कवी ज्या दलित जीवनाची व्यथा मांडतो ते समाजजीवन धर्माच्या दलालांनी अधोगतीस नेऊन पोहचविले आहे. अशा अंधारग्रस्त समाजाला प्रकाशाच्या पायवाटेवर आणून ठेवू इच्छिणारा जबरदस्त आशावाद, धर्मांध तत्त्वांना नकार आणि मानवतावादी तत्त्वांचा पुरस्कार करून, एका अस्मितायुद्धाची सुरुवात करून नव्या इतिहासाच्या आगमनाची प्रतीक्षा करणारी जाणीव 'बएत' मध्ये प्रकट झाली आहे. या देशाचे नागरीक म्हणून नाकारले जाणे आणि मुसलमान म्हणून झिडकारले जाणे या विद्वेषाच्या कल्पनेमुळे अस्वस्थ होऊन विद्रोह पुकारला जातो तोही फुले-आंबेडकरी चंदनवृक्षाच्या तत्त्वांनी ही जाणीव मौलीक स्वरूपाची आहे. फुले आंबेडकरी तत्त्वाची 'बएत' स्वीकारणे ही काळाची गरज आहे असा विचार या कवितेमधून प्रतित होतो. धर्माच्या दलालांवर अंकुश ठेवण्यासाठीही हा विचार उपकारक ठरणारा आहे.

आलिमवादाचा खरपूस समाचार 'बएत'मधील कवितेने घेतला आहे. आलिम धर्मांध होतात आणि माणसं बेमौत मरतात. अलिमांना प्रतिसवाल करण्याची कुणालाही प्राज्ञा नाही. धर्मासाठी समाजाला वेठीस धरायचे आणि समाजवास्तव मात्र नाकारायचे असे आलिमाच्या प्रवृत्तीचे बेदरकार पैलू कवितेतून प्रत्ययाला येतात. मुस्लिमात जातीव्यवस्था तीव्र असल्याचे वास्तवही स्पष्ट केले आहे. मुस्लिम धर्मांतर्गत अनेक विसंगती प्रत्ययास आणून दिल्या आहेत. उपरोध, उपहास हा या कवितेचा स्थायीभाव असून स्वधर्मांतर्गत दांभिक प्रवृत्ती, सनातनी प्रवृत्ती, नकली पुरोगामीत्व यावर हल्ला करताना उपरोधाची धार अधिकाधिक तीव्र होताना दिसते.

हिंदू राष्ट्राच्या वेदीसाठी
मीच झालोय कुर्बानीचा बोकड
आता ठेवलय काय बाकी
मेलो तर आहेच दंगेखोर, वाचलो तर आंतकवादी.

स्वांतंत्र्योत्तर काळातील भारतीय संस्कृतीत, प्रस्थापित व्यवस्थेने मुस्लिमांना प्राप्त करून दिलेले नवे आयाम येथे स्पष्ट होतात. परंपरेने चालत आलेल्या 'कुर्बानीचा बोकड' या संकल्पनेला समकालीन जीवनाचा वास्तव संदर्भ

लगडलेला असल्यामुळे आणि प्रतिनिधिक असल्यामुळे या संदर्भाला अधिकच अर्थवत्तेची खोली प्राप्त झाली आहे.

एकंदरीत. एका वेगळ्या जगाचा प्रत्यय आणून देणाऱ्या, संस्कृती संघर्षाचे चित्र रेखाटणाऱ्या, एका नव्या अस्मितायुद्धाची घोषणा करणाऱ्या युद्धमान कविता हा बएतचा विशेष आहे. प्रस्थापित व्यवस्थेला नकार आणि महंम्मद पैगंबर, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वविचारांचे अधिष्ठान असणाऱ्या नवसमाज निर्मितीची स्वप्ने पाहणारा आशावाद, हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. मुस्लिम दलितांनी वर्तमान वास्तवाला कशाप्रकारे सामोरे जाणे अनिवार्य आहे, इतिहासाचे नव्याने सिंहावलोकन करणे कसे आवश्यक आहे हे सांगणारा 'हिदायतनामा', मुफलिसांचा वेदनालेख म्हणजे 'बएत', असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

✸ सागर जाधव (जन्म १६ मे १९६५)

उजेड (१९९७) या कवितासंग्रहात बाबासाहेबांच्या कविता, मायच्या कविता, पावसाच्या कविता, उजेडाच्या कविता व इतर कविता असे पाच विभाग आहेत. कवीमनावर यशवंत मनोहर यांच्या कवितेचा प्रभाव आहे. आणि अनुकरणही आहे. असे जाणवते. उदा. 'ज्वाळांचे पीक' ही पहिलीच कविता.

सारे काही सोसून अचानक ओठातून
आगीचे डोंब उसळले तर उगाच नको म्हणू
ओठावर अंगार कसा फुलारला?
आठवतय तुला महाडला आमचा बाप
आमच्या नसानसातून ज्वाळांचे पीक पेरून गेला

ही कविता वाचताना सहजच यशवंत मनोहर यांचीही कविता आठवते उदा.

'तुमच्या निंदलेल्या ओठातून ज्वाळांचे जळते पीक घेणार आहे'
'इथून विजा ओकतील ओठ अटळ आता इथून स्फोट' (यशवंत मनोहर)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा प्रत्येक फुले आंबेडकरी कवींचा अतिशय आस्थेचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. सागर जाधवांची कविताही बाबासाहेबांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करते. कारण बाबासाहेबांनी माणसाला त्याचे माणसूपण प्राप्त करून दिले

बाबासाहेब! तुम्ही ओंजळभर पाणी घेतले
नि शतकाचे इतिहास कलथले
तेव्हाच या पृथ्वीवर माणूस म्हणून माझे शिक्कामोर्तब झाले.

मात्र याचे भान आंबेडकरी अनुयायांनी तरी कितपत राखले हा खरा प्रश्न आहे त्यामुळे हे कवीमन अतिशय व्याकूळ होते.

पेरूनी समतेचं रान भीम गेला कसा वनी
कुपावरल्या सरड्यांनी रानाची व् केली हानी

हे त्याच्या व्याकुळतेचे मुख्य कारण आहे. 'मरण जेव्हा जेव्हा चालून आले, दरवेळी तुमच्या शब्दानीच तारले' एवढे सामर्थ्य आंबेडकरांच्या शब्दात आहे. असे असले तरी शब्दासाठी कोणी जगत नाहीत ही खंत आहे. चळवळीचे मातेरे झाल्यानंतर नव्याने चळवळी बांधण्याचे हरेक पातळ्यावरील प्रयत्न अपयशी ठरले. अठरापगड जातीसारखे अठरापगड पक्ष संघटना उभ्या झाल्या आणि 'एक ना धड भाराभर चिंध्या' असे रूप चळवळीला प्राप्त झाले. याला चळवळ तरी कसे म्हणायचे?

सागर जाधव यांची कविता उजेड पळवून नेणाऱ्या व्यवस्थेच्या संदर्भात काही सांगू पाहते. बुद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे शांतता धारण करणे क्रमप्राप्तच ठरते, मात्र कोणी डोळ्यातील उजेड उपसला असेल तर जगण्याचा

हरेक क्षण युद्ध होणे अटळ आहे. परंतु त्यासाठी कोणते पवित्रे घ्यावेत या प्रश्नांची उत्तरे निरुत्तरच राहतात. जाधव यांच्या कवितेने 'माय' विषयीच्या कवितेत 'भाकरीचा चंद्र' यासारख्या प्रतिमांचेही अनुकरण केले आहे. उदा. 'मही माय रोज दुरडीत चंद्र झाकून ठेवायची', 'भूक भूक करीत शोधीत आहोत मायने दुरडीत झाकलेला चंद्र' इ. मात्र या कवितांमधील 'माय' च्या आयुष्याचा, तिच्या संघर्षाचा मांडलेला ताळेबंद अस्वस्थ करणारा आहे, 'माय म्हणजे शब्दांचेही उर फाडून निरंतर ओसंडून वाहणारं महाकाव्यं! ' तिच्या ओढीच्या संघर्षातून वेदनेन रक्तबंबाळ झालेली ही कविता आहे.

मायचा गतकाळ, वर्तमान आणि कवीचा वर्तमान हे दोन्ही काळोखाचे सवंगडी! परंतु उजेडाच्या युक्त्या त्याला माहीत झाल्या आहेत. कारण काळोख पेरणाऱ्या व्यवस्थेचे स्वरूप त्याला माहीत झाले आहे. एका अर्थाने काळोख्या गतकाळाचा आणि वर्तमानाचाही त्याला सूडच घ्यावयाचा आहे. दलित कवितेतील 'पाऊस' हा मराठी कवितेतील पावसापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा आहे. पावसाच्या कवितेलाही येथे सामाजिकतेचाच पाया असतो. किंबहुना दलित कवितेचा तो महत्त्वाचा विशेष आहे.

असे समजू नका / पावसाळा सुरू झाला
नि झोपड्या चिंब झाल्या म्हणून
ह्या वस्तीतला बारुद निकामी झाला

हे वैज्ञानिक सत्याच्या कसोटीवर उतरणारे आहे असे वाटत नाही. झोपड्यातून गळणाऱ्या पाण्यामुळे बारुद निकामी झाल्याशिवाय राहात नाही. जर हा पाऊस मनामनात पेरलेला असेल तर निकामी होण्याचा प्रश्नच उरत नाही. हा पाऊसही मग व्यवस्थेचे रूप बनून बरसणारा असतो. माणसाच्या स्फोटकपणाला निकामी करण्यासाठी निघालेला व्यवस्थेचा पावसाळा! कारण ही माणसे वादळ उशाला घेऊन झोपणारी आहेत. हे वादळ विचार तत्त्वाचं आहे म्हणून पाऊस आणि वस्त्या, झोपड्या, माणसे, गाव असा हा संघर्ष आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी
मी साऱ्या आशा- आकांक्षा पेरून बसलो
आणि ऐन मोसमात पावसानेच दगा दिला

बीजधारणेसाठी जमीन आणि पाण्याचे परस्परात समावेशन होणे गरजेचे असते. जमीन आणि बीज यांच्या फलनासाठी दुवा साधणारी पावसाची प्रतिमा जी दगाबाज आहे. त्यामुळे बीजधारणा होण्याची शक्यता नाही, बीजावर आशा आकांक्षेचे आरोपण केल्यामुळे पावसाच्या प्रतिमेचे कार्य बदलते आणि या वृत्तीला मानवी जीवनाचा संदर्भ असल्यामुळे दगाबाज पाऊस, माणसाची होणारी निराशा, हतबलता सूचित होते. पुढे पेरलेल्या योजनाचे अंकूरही गर्भातच जळतात. मोड धरण्याआधीच बीज करपून जाणे आणि अंकूर गर्भातच जळणे ह्या दोन्ही समांतर कृती आहेत. एक जमिनिशी निगडीत आणि दुसरी मानवी जीवनाशी निगडीत आहे. अशाप्रकारे सागर जाधव यांच्या कवितेतील प्रतिकात्मकता माणसाच्या जीवनाशी, समूहाच्या मनाशी निगडीत असणाऱ्या भावभावनांचे दिग्दर्शन करते. हा या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे.

सागर जाधव यांच्या 'उजेडाच्या कविता'ही लक्षणीय स्वरूपाच्या आहेत. त्यातील प्रतिमासृष्टीही लक्षणीय आहे. काळोख आणि उजेड असा संघर्ष या कवितेने छेडला आहे. काळोखाचे प्रदेश माणसांच्या रक्तावर जगविल्यामुळे माणसे शुष्क झाली. रक्त शोषून घेणाऱ्या व्यवस्थेने अंधाराचे तुरुंग उभारले. उजेडाचे नाव सांगून माणसाला काळोखाच्या प्रदेशात ढकलणारी व्यवस्था जी दगाबाजी करून माणसाला बरबाद करते अशा व्यवस्थेची अनेक रूपे या कवितेने निदर्शनास आणून दिली आहेत.

काळोखाच्या छाताडावर निर्वाणीचे अस्त्र लावू
या गावा शहरांना आतून बाहेरून उजेडाचा रंग देऊ

कोंडलेल्या उजेडाचे श्वास एकदाचे मुक्त केल्यानंतरच वरील कृती घडणार आहे. येथे काळोख पुरुष भिंतीआड दडला आहे किंवा भिंतीच काळवंडलेल्या आहेत. त्यामागील कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्नही या कवितेने केला आहे.

म्हणून या कवितेत काळोखाच्या शेकडो प्रतिमांचा आढळ होतो. 'पावसाच्या पाण्याने काळोखाची पाळंमुळं फोफावत तर नसतील ना' अशी शंकाही उपस्थित करण्यात आली आहे. शेवटी उजेडाच्या पेरणीचा मार्गही सापडला आहे. काळोखाच्या छाताडावर निर्वाणीचे अस्त्र लावण्याची प्रेरणा मिळाली आहे.

अरे तुम्ही असे समजत असाल
की आमच्या मस्तकावर काळोख थापून
तुम्हाला निर्धास्तपणे जगता येईल / आमचे गावही उद्ध्वस्त करता येईल
पण तो आमचे श्वास उजेडाने पेटवून गेलाय
पाहूया किती काळ तुम्हाला बिनधास्तपणे जगता येईल!

अशाप्रकारे उजेडाच्या निर्मितीच्या संघर्षासाठी सज्ज झालेले सामूहिक मनच येथे अधोरेखित झाले आहे. काळोखी वैऱ्यांना उजेडाच्या अस्त्राने नामशेष करण्यासाठी या कवितेने आगेकूच केली आहे.

✸ माधव सरकुंडे (जन्म ११ डिसेंबर १९६३)

१९८० नंतरच्या दलित कवितेत विकसीत रूपाचा आविष्कार झाला आहे. वेगवेगळ्या वाटा चोखाळल्या आहेत. माधव सरकुंडे यांचा **मनोगत** (१९९७) हा संग्रह दलित कवितेच्या विकसित रूपाचा प्रत्यय देणारा आहे. सरकुंडे यांनीही स्वकथनाच्या मूल्यव्यूहातून आपली कविता साकार करण्याच्या प्रत्यत्न केला आहे. कवितेतून पूर्वजांचा इतिहास कथन केला आहे. कवीला पूर्वजांच्या इतिहासाचे सांगाडे दिसतात. काळजीनं कोळ झालेली कुडांची घरं, उपासमारीचे उदंड उकिरडे, रक्तपितीने बोट झडलेले माणसांचे बेटं, वेदनेकडून महावेदनेकडे होत गलेला प्रवास हा पूर्वजांचा भूतकालीन प्रवास पाहून कवीमनाची संवेदनाच गुदमरून जाते. जिवघेण्या आणि गुदमरून टाकणाऱ्या भूतकाळातून कवीला वर्तमानाचे नेमके भान प्राप्त होते. त्यातून त्याच्या गुदमरलेल्या संवेदनांना विद्रोहाचे धुमारे फुटतात आणि माणसांचे सौंदर्य विकृत करणाऱ्या विचारांचे अंडकोषच नष्ट करण्यापर्यंतची तीव्रता या विद्रोहातून प्रकट होते. कवी ज्या जगातून आला आहे त्या जगाचे स्वरूप स्पष्ट करतानाच स्वत:चीही ओळख करून देतो. स्वसोबत समष्टीचे रूपही स्पष्ट करतो.

मी माडीया, मी आंध, मी गोंड, प्रधान
महार मांग ढोर चामार मी
आणि ज्यांच्या नावावर माझ्या देशाने
जात नोंदविली ते सगळेच मी,

मीचे आम्हीत रूपांतर होते आणि बहिष्कृतांचे समूहमनच आविष्कृत होते. प्रामुख्याने आदिवासींचे समूहमन अधोरेखित झाले आहे. स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव एकीकडे साजरा होत असताना एक जग एकविसाव्या शतकाकडे जाण्याची जय्यत तयारी करीत आहे. संगणकाचे युग अवतरले आहे. अन् रानवस्त्यातील समाज कमरेला लंगोट्या गुंडाळून जीवन जगतो आहे. अणुबॉम्ब आणि अग्निबाणाच्या चाचण्या यशस्वी होताना आदिवासींच्या पिढ्या तिरकमठा, वाघरं आणि फाशांच्या बाराखडीत फरफटत आहेत. प्रत्येक वाडी,पोडात बापाचाच वारसा पोरगा सांभाळतो आहे. शेकडो संवेदनाहीन पिढ्या दास्यात जखडल्या आहेत हे आदिवासीच्या जगण्याचं वास्तव हादरवून टाकणारे आहे. कवी याच जगाचे अपत्य आहे. भूतकाळ हारदवून टाकणारा आणि वर्तमान अवसान गाळणारा, त्यामुळे आयुष्यच एक 'ठणक' झाले आहे. माणसाच्या गुलामीला लोळवणाऱ्या आणि माणसाच्या महानतेला आळविणाऱ्या चेतनादायी तत्त्वविचारातून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या तत्त्वज्ञाकडून जी प्रेरणा मिळाली त्यामुळेच आत्मभान प्राप्त झाले. आणि आत्मशोधाच्या वाटेवर स्वअस्तित्वासोबतच समष्टीजीवनाच्या रूपाचे आकलन झाले. शत्रू आणि मित्र यातील फरकाचे आकलन झाले. माणसाला नागविणारे आणि माणसाला जोजविणारे तत्त्व यातील तफावतही कळाली. स्व सामर्थ्याची जाणीव झाली. हा आत्मशोध 'मनोगत'मधील कविताभर विखुरलेला आहे.

मी एक कलंदर ठणक आहे / माणसाच्या गुलामीला लोळवणारी

माणसाच्या थोरवीला आळवणारी

सभोवतीच्या आपल्या समुहाचं जगणं आणि या देशातील, माणसाला नाकारणारं दांभिक विश्व या द्वंद्वातून सरकुंडे यांच्या कवितेतील चिंतन आकार घेते. स्वकियांच्या दु:खाने जखमी झालेल्या मनाची ही ठणक आहे. तर दुसरीकडे स्वला, स्वकीयांच्या जगाला दु:ख देणारे स्वेतराचे जग आहे. या जगाला लोळवायला निघालेली ही ठणक आहे. माणसाच्या महनियतेचा,त्याच्या सामर्थ्याच्या विचार मांडणारी ही जाणीव आहे. बंधमुक्तीचा, मानवी मूल्यांचाच विचार सरकुंडे यांच्या कवितेतून स्पष्ट होतो.

इतिहास आणि वर्तमानाची सांगड घालणारी ही कविता स्वत:ची अशी एक प्रतितीनिष्ठा व्यक्त करते. त्यासाठी कवीने योजलेल्या शब्दकळा आणि भाषासंकेत यातून आदिवासींच्या जगाबरोबरच समकालीन जगाचं एक भीषण स्वरूप स्पष्ट होते. आपल्या समूहमनाच्या दु:खाला शब्द देण्याचे कार्य या कवितेने केले असून. शब्दाच्या सामर्थ्याबरोबरच शब्दांच्या मर्यादांची जाणीवही व्यक्त होते. 'शब्दांचा खेळ करून आयुष्याचे मेळ बसविता येत नाही' असे स्पष्ट केले आहे. अंत:स्थ उद्विग्नतेचा स्फोटक आविष्कार या कवितेतून झाला आहे.

ऐन प्रसुतीच्या मोक्यावर कळाही जातात चोरी
भर हंगामात उजाडतो शिवार, पाखरं घरट्यात तडफडतात
पाऊल टाकावे तिथे प्रश्न उगवतो
कधी आतून कधी बाहेरून नागवतो
इथला प्रत्येक हुंदका माझा आहे

नुसत्या शाब्दीक आवाहनाने माणसे युद्धमान होत नसतात. युद्धमान बनण्यासाठी माणसाच्या सामर्थ्यावरील विश्वास जागवावा लागतो याचेही भान या कवितेला आहे. माणसाच्या सामर्थ्यावरील विश्वास हे या कवितेचे केंद्र आहे. म्हणूनच देव आणि दैववादाला नकार देणाऱ्या तसेच स्थितीवादाला आणि गतीरुद्धतेला नाकारणाऱ्या जाणिवा प्रकट होतात.

काळजावरील गुलामीचा डाग पुसल्याशिवास युद्धमान होता येत नाही. म्हणूनच कवी आपल्या माणसांना खऱ्या खोट्याचे स्वरूप समजून घेण्याचे आवाहन करतो. त्यातूनच ही कविता इतिहासाचे एक विश्लेषण देते. इहवादी तत्त्वज्ञाने पराभूत करून पारलौकिकाला महत्त्व देणारी तत्त्वज्ञाने आणि नीतीमत्तेच्या कल्पनांचा उगम झाला. माणसाला पारलौकिकाच्या वेठीस धरून, धर्माला तत्त्वज्ञानाचे पांघरून घालून त्याचा वापर माणसाच्या शोषणासाठी करणाऱ्या नितीतत्त्वाने माणसाचे माणूसपण हिरावून घेतले. या ऐतिहासिक भानातूनच दलित कवितेने सर्वंकष विद्रोह आणि नकार प्रकट केला. साहजिकच एक विद्ध्वंसक भूमिकाही मांडली. सरकुंड्यांची कविताही त्याला अपवाद नाही.

माणसाचं सौंदर्य विरूप करणाऱ्या विचाराचे
अंडकोषच नष्ट करावे वाटतात मला
ठेचून काढावे वाटतात उजेडाची अंडी गिळणारी तत्त्वज्ञानी व्याळं
आग लावावी वाटते इथल्या पाण्यात पाहणाऱ्या पाण्याला
अप्सरेचं सोंग घेतलेल्या हिजड्यासारखी इथली निती
विवस्त्र करावी वाटते भर चौकात
कवितेच्या ज्वालामुखी हातानी...

ही विद्ध्वंसाची भाषा अमानुषतेचे कराल वास्तव स्पष्ट करते आणि अपूर्णातून पूर्णत्वाकडे घेऊन जाणाऱ्या ऐतिहासिक मानवी मूल्याचा स्वीकार करते. या कवितेच्या दृष्टीपटलावर दु:खिताचेच मनोगत उमटले आहे. म्हणूनच पोकळ पांडित्य मिरवणाऱ्या पोपटपंछीचे आकलन या कवितेला झाले आहे. वास्तव नाकारून कल्पितांचे प्रदेश शब्दबद्ध करणाऱ्यांना दु:खाची चवच कळत नाही. अशा, सपक जगाचा उपहास ही कविता करते. स्त्रीजीवनाच्या दु:खाची आणि

वाताहतीची कहाणी सांगते मात्र स्त्रीजगाअंतर्गतही वर्तुळे आहेत. कोणत्या जगातील स्त्री दु:खात भरडली जाते आहे आणि कोणती स्त्री बेगडी जगात वावरते आहे याचा शोध सरकुंड्यांची कविता घेते. दोन भिन्न जगातील स्त्रीरूपांचे दर्शन घडविते. रानावनात भटकणाऱ्या, आदिम अवस्थेत जगणाऱ्या स्त्रीचं रूप आणि याच स्त्रीरूपाच्या जगावर प्रतिष्ठा मिळवणारे 'फियाट'मधील 'स्लिव्हलेस' स्त्रीरूप. हे स्लिव्हलेसचं स्त्रीक्षेत्र फाटक्या, लक्तरलेल्यांच्या जिवावर बेगडीपणा मिरविते. हा स्त्रीजगाअंतर्गत शोषणाचाच प्रकार आहे. स्त्रीमुक्ती चळवळीचे तत्त्वज्ञान आणि कृतीशीलता यावर परखड भाष्य सरकुंड्यांची कविता करते. स्त्रीजगतातील विसंगती आणि स्तर सूचित करते. उपेक्षित जगातील स्त्रीजीवनाबद्दल सश्रद्ध भावना सरकुंडे यांच्या कवितेत व्यक्त झाली आहे. त्यांच्या कवितेतील वातावरण हादरवून टाकणारे आहे.

अंधार होताच उजेडाची नैतिकता वस्तीकडे सरकते
सोवळे टाकून नागड्या देहावरून थरकते
एखाद्या उन्मत कठाळ्याने गायीचे जननेंद्रीय चाटल्यागत.....

उच्चभ्रू, सोवळ्यातील समाज आपली नितीमतेची वस्त्रे फेकून नागडा होतो. उपभोगाच्या प्रवासात आपले नागडेपण जोपासत जातो. शिरजोरीचा आव आणतो आणि व्यभिचारावर कर्मविपाकाची वस्त्रे पांघरतो. अशा समाजमनाचे, पुरुषी प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडण्याचे कार्य ही कविता करते. ती बेगडी परिवर्तनावर विश्वास ठेवत नाही. वरवरचे बदल म्हणजे खरे बदल नव्हेत किंवा बदलाचे केवळ प्रदर्शनी स्वरूप म्हणजेही खरे बदल नव्हेत.

एकाच हॉटेलमध्ये आठरापगड माणसं येतात
एकाच प्लेटमध्ये जेवून जातात
म्हणून देशात समानता आली असे मानू नये
जिथं जन्मानच होतात शिक्कामोर्तब घनघोर शाप
तिथं मिळतील उ:शाप असे मनातही आणू नये.

जिथे जन्मावरूनच जगण्याच्या सीमा निश्चित होतात तिथे सांस्कृतिक युद्ध हे चिरकाल टिकणारे असतात. सरकुंड्यांची कविता जगण्याची बाराखडी शिकत असतानाच युद्धाची कला शिकण्याचे आवाहन करते. परिवर्तनासाठीचे युद्धपवित्रे घेते. बंडखोर आत्मविश्वास प्रकट करते. चळवळीविषयीच्या निष्ठा, प्रमाणिकपणा न उरल्यामुळे चळवळी शतखंडीत झाल्या. कार्यकर्त्यांमध्ये एक भ्रमनिरासाची लाट आली. एकेकाळी डरकाळी फोडणारांची गत पिंजऱ्यातील सिंहासारखी झाली. एकाचवेळी दुहेरी प्रतारणा झाली. 'स्व' शी आणि स्वकीयांशी!

मी माझ्या काळजालाच दगा दिला
एक सोन्याचा पिंजरा अन् चार मासाच्या तुकड्यात
मी माझ्यातल्या सिंहाला हवाली केले गांधीवादी रिंगमास्टरच्या
तेव्हापासून माझे जग सर्कशीएवढेच झाले

सोनेरी गुलामीत जखडून समष्टीला वाऱ्यावर सोडणारे अल्पसंतुष्टी आणि आपमतलबी विकावू नेतृत्व यामुळेच समाज सैरभैर झाला. समकालीन जीवनातील हे विदारक चित्र आंबेडकरोत्तर काळातील परिवर्तनवादी चळवळीचे आहे. दलित कवितेने स्वातंत्र्यबद्दलही मतमतांतरे स्पष्ट केली आहेत. हा देश आपला देश आहे असे मानण्यासारखे या देशाने दलिताना काय दिले? असा सवाल दलित कवी विचारतात. गेल्या पन्नास वर्षांत वाढत गेलेला दहशतवाद, गुंडागिरी, तस्करी आणि स्वार्थाच्या गर्दीत चेंगरून गेलेली समता. असं स्वातंत्र्य पारतंत्र्याहून घातक असते. असा विचार या कवितेने मांडला आहे. स्वातंत्र्याने काडीमोडीच्या संसारात काडीएवढाही बदल झाला नसल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. 'दिडशे वर्षांच्या गुलामीत पोटमारा झालेल्या स्वार्थाची तृप्ती म्हणजे स्वातंत्र्य' असे भाष्य या कवितेने केले आहे. अर्धशतकात तीन पिढ्यांच्या बरबादीनंतरही स्वातंत्र्याचा अर्थ कळत नाही. उद्याचा नागरिक घडविणारी क्षेत्रे नितीमत्ता हरवून बसली आहेत. फुटपाथवरच्या प्रश्नांची उत्तरं मिळत नाहीत. असा हा स्वातंत्र्याच्या अर्धशतकाचा डोकं बधीर करणारा, अस्वस्थ करणारा

ताळेबंद या कवितेने मांडला आहे.

थोडक्यात, माणसाचं गाणे गाणाऱ्या या कवितेने इतिहास आणि वर्तमानाची सांगड घातली आहे. माणसाच्या सामर्थ्यावर विश्वास प्रकट करणारी ही युद्धमान कविता असून देव, दैववाद आणि स्थितीशीलता जोपासणाऱ्या तत्त्वांना नाकारणाऱ्या जाणिवा प्रकट झाल्या आहेत. आदिवासींच्या जगण्याचा भेदक आविष्कार या कवितेतून झाला आहे. भारतीय समाजाच्या स्त्रीजीवनातील अंतर्विरोध स्पष्ट करीत उपेक्षित, शोषित स्त्रीबद्दल सश्रद्ध भावना व्यक्त केली आहे. नीतिमत्ता हरविलेल्या समाजमनाचा कानोसा, मध्यमवर्गीय मानसिकता, बेगडी परिवर्तन, समकालीन जीवनातील चळवळीचे स्वरूप इत्यादी गोष्टींचा वेध घेताना ही कविता अधिकाधिक चिंतनशील होत जाते. स्वातंत्र्याच्या अर्धशतकाचा ताळेबंद मांडताना वाचकांना अंतर्मुख करते. या कवितेच्या दृष्टीपटलावर उपेक्षित, शोषित आणि बहिष्कृत माणसांच्या दु:खाचेच मनोगत उमटले आहे. त्याच्या आशा आकांक्षेचे मनोगत उमटले आहे!

✸ प्रकाश मोगले (जन्म ३ मार्च १९६२)

दंभस्फोट १९९७ हा प्रकाश मोगले यांचा पहिलाच कवितासंग्रह. त्यांची कविता रोकठोक भाषेत सामाजिक राजकीय दांभिकतेवर, दलित जगांतर्गत असलेल्या विरोधाभासावर हल्लाबोल करताना दिसते. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात मूलत्त्ववाद्यांनी दांभिकतेचा कळस गाठला होता. या वास्तवाचे विविधांगी रूपे मोगले यांच्या कवितेत जागोजागी प्रत्ययाला येतात. या दशकाच्या दहशतीचे विशेषत: हिंदुत्त्वाच्या नावावर माणसाच्या रक्ताची चटक लागलेल्या कत्तलखोर मानसिकतेचा आणि त्यांच्या कृतिशीलतेचा समाचार या कवितेने घेतला आहे.

तुला सांगतो सखे, सावध अस
कालच भगवे फतवे निघालेत
माणसाच्या सामूहिक कत्तलीचे
निळे आकाश लालेलाल करण्याचे...

यावरून या दहशतवादाची तीव्रता लक्षात येते. 'आज परशुरामाचे वारस अर्ध्या चड्ड्या घालून घेऊ लागलेत महात्म्यांचा शोध, गांधीनंतर कोण'? हे या दशकातील मूलतत्त्ववादी मानसिकतेचे दहशतवादी वास्तव आहे.

एक विशिष्ट भाषिक अवकाश या कवितेने व्यापलेला आहे. उपरोध, उपहास हा या कवितेचा स्थायीभाव आहे. सांस्कृतिक मक्तेदारीच्या कावेबाजपणाबद्दलचे वास्तव रेखाटताना बौद्धिक पेटंट आपल्याकडेच राखून ठेवणारांविषयी भाष्य करताना 'विश्वकोषात येण्यासाठी धडपडणारे, चरफडणारे सुजलाम-सुफलाम लोक वेगळेच असतात, लक्ष्मी सरस्वतीने ठेवलेले' असे कडवट भाष्य ही कविता करते. कारण सामान्य माणूस हा विश्वकोषाचा विषय कधीच नसतो.

तू विश्वकोषात स्वत:ला पाहू नकोस
त्यात नसतं तुझं उजाड शिवार, भक्काळी गेलेलं पोट अन् फाटकी मोट
त्यात नसते कपाळावरील वांझ आभाळ, पटक्याच्या चिंध्या
अन् तसाच काटेरी माळ

पारंपरिक सांस्कृतिक मूल्यव्यवस्था मूठभरांच्याच हातात असल्याने हितसंबंध जोपासणाऱ्या मुठभरांचा वर्ग संस्कृतीला आपल्या सेवेत जुंपतो त्यावेळी संस्कृतीला विकृतीचे रूप प्राप्त होते, त्यावेळी संस्कृतीमधील माणूस हरपतो. हेच सांस्कृतिक व्यवस्थेचे विकृत वास्तव अधोरेखित केले आहे. एका अर्थाने 'दंभस्फोट' म्हणजे विपरीत सांस्कृतिक राजकारणावरील स्फोटक भाष्य आहे. दवंडी आणि लिलावाच्या भाषेतून 'दंभस्फोट' मध्ये झालेली अभिव्यक्ती लक्षणीय स्वरूपाची आहे. एक आवेश आहे, उपरोध आहे, नकार आणि विद्रोहही आहे. उदा

ऐका हो ऐका
बाबांच्या जन्मशताब्दी वर्षांत गांधी पुतळ्याजवळ

भव्य सेल सुरू आहे, मालाची हमी, किमतीत कमी आहे
विकणे आहेत माणसाला पशू करणारे देव, धर्म
अन् त्यांचे अघोरी कर्म
विकणे आहेत मंदिरे, त्यांचे बडवे, धर्माचे ठेकेदार पुरोहित भडवे
जमलेच तर ही महान संस्कृतीही विकणे आहे
जीनं मला अस्पृश्य बनविले.....
कुणीही यावे मला घेवुन जावे
येता येता आपल्या जातीचे कुपन घेऊन यावे
जातीनुसार सुट आहे मालाची लयलूट आहे
चार मठासोबत एक शंकराचार्यही फुकट आहे

दांभिकतेचा कडेलोट करणारी पारंपरिकता आणि सांस्कृतिक व्यवस्थेची मूल्यात्मक चौकट नाकारण्यातून येथे विद्रोहात्मकता साकार झाली आहे. एका अर्थी ही सांस्कृतिक मूल्यव्यवस्था म्हणजे जणूकाही भंगारातील माल आहे, म्हणून तो कवडीमोलाच्या भावात विकायला काढला आहे. पारंपरिक मूल्यव्यवस्थेला हास्यास्पद ठरविणे हा विद्रोहाच्या अभिव्यक्तीचा एक खास प्रांत दलित कवितेत आहे. तो या कवितेने अधिक विकसीत केला आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. 'दंभस्फोट'मधील कवितेत, उद्विग्नतेतून व्यक्त झालेल्या भाषेचा आविष्कार झाला आहे. विशेषत: वैचारीक पंढपणाचा आणि वांझोट्या चर्चा या गोष्टींचा उबग आल्यामुळे ही उद्विग्नता प्रकट होते.

ज्यांनी बाबांचा रथ मोडून तोडून विकला
त्यांच्या वंशाला दिवा नसो
बाहेर अंधार दात विचकित असता जे संतुष्ट आहेत
सवलतीच्या तुकड्यावर सुस्तावलेत अजगरासारखे
त्यांच्या सर्वांगाला आग लागो
मी थुंकतो सगळ्यांच्याच मानसिक मेंगेपणावर
मी निघालोय चवदार तळ्यातील गाळ उपसायला
सोबत याल तर स्वागत असो न याल तर एक शिवी देतो

ही एका अर्थाने आत्मटिका आहे. स्वकीयांवर आसूड ओढणारी ही अभिव्यक्ती आहे. चळवळीचा थांबलेपणा, मध्यमवर्गीयांचा सुस्तपणा आणि निष्क्रियता हे सारेच नपुंसकतेचे लक्षण असल्याचे निरीक्षण कवीने नोंदविले आहे. या वास्तवाने अस्वस्थ होऊन वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्याची अपरिहार्यता ही कविता व्यक्त करते. उदा.

बिळाबिळात बसलेल्या अस्सल नागांनो पेटून उठा, फुत्कार टाका
शंबूकाचं डोकं उडवणारे हात एकदाच कलम करा
पुन्हा पुन्हा खांडववन जाळणारे हात एकदाच जिवंत जाळा
मग पुन्हा कोणी पोचीराम होणार नाही मराठवाडा जळणार नाही

नामांतर आंदोलन काळातील जाळला गेलेला मराठवाडा आणि खांडववन असा मिथकांशी जोडलेला वर्तमान संदर्भ. त्यामुळे अर्थाची वेगळी निष्पत्ती झालेली दिसते. वर्तमानाच्या आशयसमृद्धीसाठी पौराणिक मिथकाचे उपयोजन येथे झाले असून संघर्षासिद्धीसाठीचे सामर्थ्य आणि पराक्रमाचे स्मरण करून देण्याचे कार्य या मिथकांच्या माध्यमातून झाले आहे. कारण एकजुटीच्या अभावामुळेच असे संघर्षसिद्धीचे पवित्रे कवी मनाला घ्यायला भाग पाडले आहे.

आमची चळवळ सिदडासारखी वळवळते
जळत्या घरातली म्हातारी कळवळते
हर हर महादेवच्या गर्जनेत बुधवाडा पेट घेतो

माणसं कापले जातात अन् मग सावकाश कळपा कळपाने
निळे झेंडे निषेध नोंदवू लागतात

चळवळीच्या शतखंडाचे हे आंबेडकरोत्तर काळातील वास्तव आहे. नेतेगीरी करणारे लोक एकमेकाच्या तगंड्या ओढतात त्यामुळे चळवळ लंगडी ठरली आहे. म्हणून अन्यायकर्त्यांचे चांगलेच फावले आणि जनता होरपळत राहिली. त्यामुळेच कवीमन संतप्त आणि उद्विग्न झालेले दिसते. ऐंशीच्या दशकात दलित पँथरच्या चळवळीने समाजमनात सळसळते चैतन्य निर्माण केले होते. एक नवा जोम आणि उत्साह निर्माण केला. आकाशात लखलखणाऱ्या विजेसारखे पँथरचे अस्तित्व जाणवले होते. पुढे अल्पावधीतच या चळवळीचेही पतन झाले हा वर्तमान कवीमनाने अनुभवला आहे. म्हणून तडजोडी करणाऱ्या पँथर प्रवृत्तीवरही अतिशय सडकून टिका या कवितेने कली आहे.

तुही इयत्ता कंची असं विचारणारे तुम्ही
आज बाळवाडीत दाखल झालात
स्वातंत्र्य कंच्या गाढवीचं नाव विचारणारे तुम्ही
कसल्या गर्दभाच्या गळ्याला मिठ्या मारताय?

असा प्रश्न विचारण्याचे धाडस मोगले यांच्या कवितेने केले आहे. एके काळी आरपीआयच्या नेत्यांच्या निष्क्रियतेवर पँथरच्या तरुण नेत्यांनी आगपाखड केली आणि पँथरनंतरच्या काळात तरुण वर्गाने वरील प्रकारचे प्रश्न उपस्थित केले आहेत. एंकदरीत दलितांचे राजकारण आंबेडकरोत्तर काळात अपयशीच ठरत गेले. तोच या कवितेचा विषय ठरले आहे.

माणूस, माणसाचे कल्याण, माणसाची माणुसकी, माणसाचे हक्क याविषयीच्या चिंतनाची सातत्यशीलता मोगले यांच्या कवितेत ओतप्रोत भरलेली आहे. देव धर्मापेक्षा माणूस मोठा असतो. माणसाशिवाय दुसरं काही सुंदर नसते. त्यामुळे ज्यांच्या सुधारणा 'जानव्यातच' अडकल्या त्यांनी मानवमुक्तीच्या गप्पा करणे हे दांभिकपणाचे लक्षण ठरते. 'हिन्दुराष्ट्रवादाच्या भगव्या कपड्यात ते झाकू पाहतात वर्णवाद जाती', 'रामजन्मभूमीसाठी म्हणतात देश कापू', असं म्हणणाऱ्या प्रवृत्ती माणसांचा विचार करू शकत नाहीत.

माणसांच्या सामूहिक मरणाचे हे ठेकेदार
पेरताहेत विष मनामनात
'गर्व से कहो'चे नारे लावणारे हे भगवे शिकारी...
आता घराघरात वाजताहेत ऋतुंभरा
साधु आणि साध्वीही साधताहेत आपापला स्वार्थ...

अशा विषधारी प्रवृत्तीमुळेच राष्ट्रात एकसंधता उरली नाही. माणसाची मनं दुभंगली तर देश अभंग कसा राहू शकेल? असा प्रश्न या कवितेने उपस्थित केला आहे.

घरटे विस्कटून कधी मंदिरावर कळस चढत नसतात
अन् माणसाचे हात छाटून कधी ताजमहल उभे राहात नसतात
माणूस तर या सृष्टीचा रचनाकार
सर्व मंगल मांगल्याचा शिल्पकार

अशा प्रकारे माणसाची महानता, त्याचे सामर्थ्य याविषयीचे चिंतन कवितेतून प्रकट होताना दिसते. या ठिकाणी बागूलांच्या कवितेची आठवण होते. मानवतावादाला केंद्र करून ही कविता मीमांसक झाली आहे असे प्रत्ययाला येते.

काल शेजारच्या प्रदेशात भगवे शिकारी निवडून आलेत..
म्हणून तुला सांगतो तेवढे पिंपळाचे झाड तोडू नकोस
अन् पाणवठ्यावरही सक्त नजर ठेव...

जखमी जीव इकडच येताहेत जमलंच तर डॉक्टरांना बोलव
पंख छाटलेले जटायू वाचलेच पाहिजेत
ते बघ पाखरांचे थवे उरात बाण घेऊन पिंपळावर विसावताहेत
जा लवकर जलदी कर, डॉक्टरांचा संप असेल तर
विहारातल्या सिद्धार्थला फोन कर
जखमी हंसाचा बाण उपसण्याचा त्याला सराव आहे
पाखरं वाचणं महत्त्वाचं आहे

मानवतावादाचे सुंदर शिल्पच या कवितेने साकार केले आहे. मिथकांचे यथोचित उपयोजन करून अर्थश्रीमंती वाढविली आहे. थोडक्यात, प्रकाश मोगले यांच्या कवितेने विसाव्या शतकातील शेवटच्या दशकात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. दलित कवितेच्या विकासाला अर्थसमृद्ध हातभार लावला आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

✸ महेंद्र भवरे (जन्म २४ जून १९६१)

चितांक्रांत मुलुखाचे रुदन (१९९८) हा कवितासंग्रह या शतकाच्या शेवटच्या पर्वात प्रसिद्ध झाला. या कवितेसंबंधी 'फुले आंबेडकरी प्रेरणेचे नवे कवी नवे आकलन' या ग्रंथात मोतीराम कटारे लिहितात, ''कवितेच्या शीर्षकातून वेदनांचा अनुभव सुरू होतो तो संबंध कविताभर फिरून आल्यावर अधिक गडद होतो आणि या रुदन करीत असलेल्या चिंताक्रांत मुलुखातील समुहाच्या दु:ख निवारणासाठी आपण निघाले पाहिजे असे सूचक आवाहन कविता करीत असल्याचे आपल्या लक्षात येते.''[१३] आशय आणि अभिव्यक्ती यांचे एकजिवित्व दलित कवितेत अभावानेच आढळते महेंद्र भवरे यांच्या कवितेचा हाही एक विशेष आहे, की आशय आणि अभिव्यक्ती या एकजीव होऊन येतात, त्यामुळे कवितेच्या सौंदर्याला आणखी झळाळी प्राप्त होते, विद्रोहाची अनेक रूपे कवितासंग्रहात पाहावयास मिळतात. या कवितासंग्रहाचे ते वैशिष्ट्य आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कविताभर कवी आपली कैफियत अत्यंत शांतपणे मांडता मांडता तो या मताला येऊन जातो की मी जे काही सांगू इच्छितो, जे काही करू इच्छितो, मला जे आवश्यक आहे मला ते मिळत नाहीये, म्हणून मला विद्रोह केला पाहिजे आणि ते मिळवले पाहिजे. त्यातूनच प्रत्येक कवितेचा शेवट असा बंडात, विद्रोहात होतो, ते या कवितासंग्रहाचे सामर्थ्य होऊन येते. उदा.,

१. सद्सद् विवेकाच्या शब्दांनो
रोमारोंमात फुलू दे जळजळीत अंगार
मनामनात रुजू दे घुसमटलेल्या मेंदूच्या ठिणग्या
संस्कृती रक्षकांच्या भक्षकी घरांना बेसुमार धडका बसू दे
फिरू दे गाढवाचा उलटा नांगर
त्यांच्या फतफतलेल्या दलदलीत जमिनीवर

२. डोहांचे कळप हाकीत काचांच्या शहराशहरातून
मलाही बेभानपणे वाटावं
रक्तमासाच्या जाहिरनाम्यावर
माझाही असावा एक अभिप्राय
जाळणाऱ्यांना जाळत निघालं पाहिजे

या कवितेत विद्रोह उपरेपणाने येत नाही तर तो कवितेची आणि आशयाची गरज म्हणून येतो.

महेंद्र भवरे यांची कविता नुसते दु:ख मांडून थांबत नाही तर त्या दु:खावरचा उपाय थेट सूचवते तर कधी आस्वादकालाच प्रश्न विचारून त्याला विचारप्रवृत्त करते. एखाद्याला विचारप्रवृत्त करणे व होणे हे माणसाच्या जिवंतपणाचे लक्षण असते. जो जिवंत असतो तोच इतरांच्याही जीवनाविषयी सजगपणे विचार करू शकतो. हा विचार स्वपुरता मर्यादित

न राहता त्याला वैश्विकतेचे रूप येते. १९८० नंतरच्या कवितेने जातीच्या मर्यादा ओलांडल्या. महेंद्र भवरे यांची कविता याच विकासक्रमाने विकसीत झाली असून ती जाती समुहापुरती मर्यादित रहात नाही. ती दलित प्रतिमा आणि प्रतीकांत आडकली असली तरी माणसाच्याच पूजापातीत रमणारी आहे. म्हणून तिला जात, धर्म, देश यांच्या सीमा रहात नाहीत. शतकांच्या प्रतिनिधित्वाचे स्वप्न पाहणारा हा कवी कवितेसंदर्भातील आपल्या अपेक्षा उंचावतो.

अरुण काळे यांच्या मते, ''इथल्या सामाजिक घडामोडी व व्यवस्थेतीत विषमता व त्यापायी वाया गेलेली, कुजलेली माणसं, त्यांचा आक्रोश हा भवरे यांच्या चिंतनाचा स्थायीभाव आहे. हा आक्रोश म्हणजे रडणे नव्हे. ते रुदन आहे व रुदन हे सामूहिक असते. आत्मशोध आणि आत्मटिकेबरोबरच ही कविता इतिहासाच्या एका काळ्या बाजूला नाकारीत भविष्याचे रेखाटन करते. पुनर्मूल्यमापनाची मागणी करते व नवसमाजरचनेत माणसामाणसामधील नाती, त्यांची प्रतिष्ठा, त्यांचे संबेध कसे असतील या समाताधिष्ठित समाजनिर्मितीचा एक आराखडा ही कविता मांडते. ही कविता वर्तमानकालीन संदर्भात अन्वयार्थ लावीत आपली उंची निश्चित करते. त्याचबरोबर दलित कवितेवर असलेले साचलेपणाचे आरोपही धूवून टाकते. केवळ तात्त्विक उहापोह केल्याने प्रश्न सुटणार नाही, तत्त्व आणि कृती यांचा मेळ घातल्याशिवाय अपेक्षित परिवर्तन घडणार नाही. म्हणून कवी म्हणतो,

मुक्तछंदी दस्तावेजं करू शकणार नाहीत
हजारो पातळ्यांवरचा संघर्ष दूर
हाताची भाषा शिकावीच लागते दोस्त!

या कवितेतील भाषेचा आवाका मोठा आहे. भावनिक व वैचारिक पातळीवर तेवढ्याच ताकदीने ही भाषा अवतरते. उदा. 'रंगबाजीचा प्रपंच', 'बिळं उसवतो'। अशा शब्दकळा कवी वापरतो. शब्दांना लिलया वाकवण्याची ताकद वादातीत आहे. ''[१४]

''भवरेची कविता पीडिताची व्यथा घेऊनच जन्माला येते. तथागताच्या करुणेचा एक सुप्त प्रवाह त्याच्या कवितामधून वाहतो. बोधिवृक्ष, चवदार तळे इ. संदर्भ घेऊन निर्माण झालेली ही कविता दलित ह्या संज्ञेचा व्यापक अर्थ घेऊन अवतरते. दलित चळवळीत काम करणाऱ्या पण आपलं इमान विकणाऱ्या तथाकथीत पुढाऱ्यांच्या मनोवृत्तीवर ही कविता जेव्हा हल्ला चढविते तेव्हा तिला तळपत्या तलवारीची धार येते. या कवितेतील शोषितांचं विश्व प्रत्ययकारी आहे. हे विश्व 'नेल्सन मंडेला'सारख्या कवितेमुळं अधिक व्यापक बनतं. भारतवर्षांतील अस्पृश्येतेविरुद्ध बाबासाहेबांनी उठविलेला आवाज आणि निग्रो क्रांती याच नातं जुळतं हा विचार या कवितेत मांडला आहे. एकूणच भवरे यांची कविता स्वत्वाचा शोध घेणारी आहे. हे संवेदनशील मनाचं आक्रंदन अंतर्मुख करणारं आहे. ''[१५]

'' या कवितात भावविश्वाची व्यापक उभारणी झालेली दिसते. राजकीय, सामाजिक वास्तवाने माणसे अगतिक झाली आहेत, त्या चिंताक्रांत माणसाचे हे रुदन आहे. वंचिताच्या, स्वच्या कक्षा विस्तारीत एक एक वर्तुळ वाढवत नेणारी ही कविता प्रगल्भतेचं लक्षण आहे. लोकशाही ते हिंसाचार, सामान्य माणसाची वेदना, भोवतालाचं निरीक्षण आणि उद्ध्वस्त झाल्यामुळे प्रकटणारा संताप भवरेच्या कवितेत आहे. चळवळीवर अत्यंत परखड टिका करणारी आणि प्रासंगिकतेच्या पलीकडे जाणारी ही कविता आहे. बहुजनांना भेडसावणाऱ्या प्रश्नांसाठी जी भूमिका घ्यावी लागते ती भूमिका चळवळ घेत नाही. एखादी अपावादात्मक भूमिका दिसेलही. चळवळी तत्त्वापेक्षा तपशिलात जातात. ह्या भीषण वास्तवाबरोबरच अत्यंत ठाम असा स्वत:वरचा विश्वास भवरेची कविता व्यक्त करते.''[१६]

''दु:खाचे प्रदेश जिथे जिथे आहेत ते सगळेच प्रदेश कवीला आपले वाटतात, दीर्घ अवकाश पेलणारा चिंतनाचा आवाका आणि ठोस असं जीवनासंबंधीचे चिंतन त्याच्या कवितेत आहे. शब्दकळा रुढ दलित कवितेपेक्षा वेगळी आहे. भयावह वास्तवाचं व्यापक भान या शब्दकळेतून प्रकट झाले आहे. सरळ जीवनाचा दु:ख देण्याचा निर्देश ही कविता करीत नाही तर जीवनाचे अंत:स्तर प्रकट करते.''[१७]

✸ अमोल बागूल (जन्म ८ मे १९७२)

ऋतूंचे मृत्युपत्र (१९९९) ह्या कवितासंग्रहातील कविता लक्ष्यवेधी ठरल्या आहेत. मानवतावादाचा भक्कम पाया या कवितेला आहे. मात्र या कवितांची अभिव्यक्ती वेगळ्या स्वरूपाची आहे. स्त्री प्रश्नोपनिषद, क्रांतिक, पुणे अधिक उणे, अव्यक्त अशा चार भागात ह्या कविता विभागल्या आहेत. स्त्रीप्रश्नोपनिषदातून स्त्रीजीवनाचे अनेक प्रश्न मुखारीत केले आहेत. पुरुषी प्रवृत्ती किती सहजपणे स्त्रीच्या अस्तित्वाला बगल देते याचा वेध घेतला आहे. स्त्रीच्या सोशिकतेचं आणि सामर्थ्यांचंही दर्शन या कवितेने घडविले आहे.

सृजनाचे चांदणे फुलता फुलता
ओठात दात रोवून ती हंबरडे कैद करते
ती नजरेनेच पाण्याला आग लावू शकते

बाईकडे 'बाई' म्हणूनच पाहण्याची एक दृष्टी स्त्री-प्रश्नोपनिषदात प्रत्ययाला येते. स्त्रीच्या व्यक्तित्वात असलेल्या बलस्थानाबद्दल ही कविता बोलत राहते. तरीही तिला हवा असलेला आरसा कुठेच दिसत नाही. तिच्या अस्सल रूपाची जाणीवच तिला होऊ दिली जात नाही. अशा कावेबाज पुरुषी युक्त्या प्रयुक्त्याच्या राजकारणाचा पर्दाफाश या कवितेने केला आहे. एका अर्थाने स्त्रीवादी जाणिवा या कवितेने प्रकट केल्या आहेत असे प्रत्ययाला येते.

'क्रांतिक' या विभागातील कविता देवाच्या नावावर लुबाडणूक करणाऱ्या प्रवृत्तीला नागडे करते, देव नावाचे बुजगावणे ब्राह्मणी व्यवस्थेने, पुरोहित वर्गाने उभे करून सर्वसामान्यांची कशी लुबाडणूक केली याचे सूचन ह्या कवितेने केले आहे. काही रोखठोक सवालही उपस्थित केले आहेत. 'भटांची भडवेगिरी कोणती', 'नपुंसकांचा नंगानाच कसा आहे', 'कसायाची कणव', 'संस्कृतीचे छिनालपण' याबद्दलची मते परखडपणे व्यक्त केली आहेत. या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण करीत क्रांतीच्या कवितेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. अन्यायाची परंपरा सूचकपणे कथन केली आहे. एकलव्य, शंबूक, चोखामेळा ही मिथके सूचकपणे उपयोजित झाली आहेत. पानाचा देठ तोडून फेकून द्यावा तसे इथल्या संस्कृतीने समर्थ प्रतिमा आणि प्रतिभांना देठासारखे तोडून फेकून दिले. या सर्व मिथकीय नायकांनी बदलत्या काळात विद्रोह केला आणि आपले स्थान नव्याने प्रस्थापित केले अशा अर्थाचा निर्देश ही कविता करते. मात्र इथल्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणात 'जातीचा शिक्का कपाळी बसू नये' म्हणून डरकाळी फोडणाऱ्या महानायकाला जातीतच बंदिस्त केले जाते हे वास्तवही स्पष्ट केले आहे. विशेषत: आंबेडकरोत्तर काळातील युगावरचे भाष्य या कवितेने केले आहे. आंबेडकरोत्तर काळात व्यवहारवाद वाढीस लागला आणि तत्त्वाचे आचरण बिनमहत्त्वाचे ठरले. सर्वानीच शिक्षण तर घेतले मात्र नपुंसकत्वाच्या पदव्याही गळ्यात अडकवून घेतल्या. संघर्षशीलता कोमात गेली. स्थितीशीलतेला उधाण आले.

तो निघून गेल्यानंतर...
आम्ही अंगावर फुटू पाहणारे धुमारे
भंगारात विकून टाकले / आमची मुळेही छाटून टाकली
बघा, आता बांडगुळाचे पीक ऐन भरात आहे

षंढयुगाचे आणि बांडगुळी उत्पादनाचे युग अवतरल्याची सूचना या कवितेने दिली आहे. क्रांतीचे वारे उलट्याच दिशेला वाहात गेल्यामुळे वाट्याला आलेल्या वैफल्याचे दिग्दर्शन केले आहे.

'पुणे आधिक उणे' या भागात उपरोधिक शैलीचा पुरेपर उपयोग केला आहे. महाराष्ट्र देशी पुणे ही सांस्कृतिक राजधानी मानली जाते. या शहराला पेशवाईच्या छंदीफंदीपणाचाही मोठा इतिहास आहे. पुण्याच्या उणेपणावर नेमके बोट ठेवले आहे. हे शहर आत्मकेंद्री आत्ममग्न झाले आहे. एकेकाळी म. फुल्यांनी युगायुगाच्या तहानलेल्या लोकांसाठी पाण्याचा हौद खुला केला होता तो खुलेपणा आज वर्तमानात येथे उरलेला नाही. 'ध'चा 'मा' करणाऱ्या या शहरात कधी कोणता दगा दिला जाईल याचाही नेम नाही. सावित्रीबाई फुल्यांवर शेणगोळे फेकणारे, सुधारकांची जिवंतपणीच प्रेतयात्रा काढणारे, पंडिता रमाबाईला बहिष्कृत करणाऱ्या या शहराला संस्कृतीचे माहेरघर तरी कसे म्हणावे? शिवबा, ज्योतिबा

आणि आगरकरांच्या नावाने हे शहर ओळखले जायला काही हरकत नव्हती. मात्र जेथे साडेतीन शहाण्यांचे साम्राज्य असते तिथेच साडेतीन टक्केवाल्यांचीच छिनाल असली तरी संस्कृती सुखनैव नांदत असते हे या कवितेने स्पष्टपणे नोंदविले आहे.

या संग्रहातील 'अव्यक्त' या विभागात संमिश्र अनुभूतीच्या कविता आहेत. लाईन (आऊट) ऑफ कंट्रोल'मध्ये देशावरचे भाष्य पुढीलप्रमाणे केलेले दिसते.

देश म्हणजे, नाक्यावरच्या हॉटेलातीन चमचमीत मिसळ
ज्यावर पसरलेला असतो देशभक्तीचा तवंग, सुस्त
कुणीही यावं पाव बुडवून खावं

आईचं दुध, रक्ताचा रंग आणि पाणी म्हणजे H^2O हे समीकरण पृथ्वीतलावर कुठेच बदलत नाही यावर कवीमनाचा ठाम विश्वास असला तरी या देशाने मात्र भ्रमीनिरास केला आहे. हेच उद्विग्नपणे या कवितेने मांडले आहे. या विभागात आठवणीतल्या पावासापासून डायरीतल्या पानापर्यंतची भटकंती आहे. अव्यक्त राहिलेल्या अनेक गोष्टींना मुखरीत केले आहे. त्यात काही मनाच्या कप्प्यात दडून बसलेले अनेक हळवे क्षण आहेत. रडण्यापडण्यापासून 'तिच्याकडून' नाकारल्या जाण्याच्याही गोष्टी आहेत. तिच्या भेटीच्या ताटातुटीच्या खाणाखुणाही आहेत. बेफाम दिवस, बेलाग रात्रीही आहेत. त्याच प्रमाणे शहरातल्या गल्ल्यांनी लुटलेले तारुण्य आहे. अशाप्रकारे 'ऋतूंचे मृत्युपत्र' ने वैविध्य रखण्याचा प्रयत्न केला आहे.

या दशकाच्या आणि विसाव्या शतकाच्या अंतिम वर्षांत अतिशय महत्त्वपूर्ण आणि नवा चेहरा घेऊन दाखल झालेली कविता पाहावयास मिळते. राम दातोंडे, उत्तम अंभोरे, आनंद गायकवाड, गौरवकुमार आठवले, रमेश देशभ्रतार, राजेंद्र लातुरकर, संजय डोंगरे, दामोदर मोरे, विठ्ठल शिंदे, प्रभाकर गांगुर्डे, मनीष तपासे, वसंत जामनिक, प्रकाश मोगले, अविनाश गायकवाड इ. कवींचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. या सर्वांच्या कवितेमुळे दलित कवितेचे रंगरूप पालटण्यास मदत झाली. गौरवकुमार आठवल्यांची गझल रचना किंवा विठ्ठल शिंदे यांची गेय रचना असेही वेगळेपण प्रत्ययाला येते. या सर्व कवींपैकी आनंद गायकवाड यांच्या कवितेचा स्वर, भाषा आणि अभिव्यक्ती वेगळेपण जोपासणारी आहे.

आनंद गायकवाड, (जन्म २८ ऑगस्ट १९६०) **आखरीचं तुव्हच सडान चिबवीन** (२०००) कवितासंग्रहाच्या शीर्षकापासूनच नवेपणाचा प्रत्यय येतो. 'आखरीचे तुव्हच सडान चिबवीन' हे विधान व्यवस्थेला उद्देशून केले आहे. सडान चिबवणे म्हणजे मढे वाजवणे. डफडे वाजवत प्रेत स्मशानात पोहचवणे, डफड्याच्या नादात मसणवट्यापर्यंत प्रेताची विल्हेवाट लावणे. ही व्यवस्था परिवर्तनाच्या नपुंसक योजना मांडून अडाणचोट सोंगाचे प्रदर्शन करणारी, एअरकंडीशनमध्ये बसून झोपड्यांना हायजॅक करणारी, वामनी वंशाचे रक्त अंगात खेळवत बाबरी उद्ध्वस्त करणारी, चैत्यभूमीस नख लावून रक्ताचा पाऊस पाडणारी इ. असे या मूलतत्त्ववादी व्यवस्थेची अनेक रूपे आहेत. या व्यवस्थेने माणसाचे जगणेच हराम केले आहे. असे जगणे जगण्यापेक्षा लढत लढत मरणे काय वाईट असा पवित्रा या कवितेने घेतला आहे. व्यवस्थेचे आकलन आणि अवलोकनातून संघर्षाचा पवित्रा घेण्याचे बळ या कवितेला लाभले आहे. गायकवाड यांची कविता भावनिक प्रश्नात सहसा अडकत नाही. मात्र जगण्याच्या संदर्भात काही मुलभूत प्रश्न मांडते. मग ते जगणे कार्यकर्त्याचे, त्याच्या कुटुंबाचे, समाजाचे, कंगालाचे, कष्टकरी मजुराचे, हातगाडी ढकलणारांचे, वंचितांच्या दुनियेचे, लक्तरलेल्या जिंदगीचे असे जगण्याच्या संदर्भातील प्रश्नायन अस्वस्थ करणारे आहे. वंचितांची बाजू घेणारी राजकीय कविता म्हणून गायकवाड यांच्या कवितेने मोल अधिकच वाढले आहे.

माणसाच्या रोजमर्रा जिंदगीला दु:खाचीच तटबंदी घातली जात असेल तर ती कशी तोडायची हा मूलभूत प्रश्न आहे. जगण्याच्या संदर्भात दोलायमानता, भौतिक जगाची हमी नाही आणि सांस्कृतिक सामाजिक जगात तर भेदाभेदाची महारोगी पार्श्वभूमी अशा पार्श्वभूमीवर एखादा द्रष्टाच जगण्याची दिशा दाखवू शकतो. इतिहासात तसे घडलेही आहे, डॉ. आंबेडकरांच्या उदयामुळे अस्पृश्यता, अमानुषता, गुलामीचे पारतंत्र्य यातून मुक्तीच्या मार्गावरचा प्रवास शक्य झाला.

म्हणूनच 'तुझ्यामुळे देश आपला म्हणायला लाज वाटत नाही' ही जाणीव माणसामाणसात पेरली गेली, 'आय हॅव नो होमलँड' ते 'तिरंग्याशिवाय मी कोणताही झेंडा वर चढू देत नाही' इथपर्यंत माणसाला परिवर्तनशील बनवणारा हा प्रवास म्हणजे आंबेडकरी विचारक्रांतीची देणगीच आहे.

अंगांगाला चिपकून बसलेला
अस्पृश्यतेचा युनियन जॅक क्षणात उतरविलास
तेव्हा आमचा पंधरा ऑगस्ट झाला.

मात्र एक पारतंत्र्य जाऊन दुसरे अमानुष पारतंत्र्य वाट्याला आले हेही आंबेडकरोत्तर काळातील वास्तव आहे. काळ्या फिरंग्याची सल्तनत अजूनही उजळ माथ्याने वावरताहे. म्हणून काळ्या फिरंग्याच्या मूलतत्त्ववादी संहितेला आग लावण्याची भाषा आविष्कृत होते.

तुझ्या सकट कराराले शिंगी लावीन
अन् मायच्यान आखरीचं तुव्हच सडान चिबवीन

शिंगी म्हणजे आग. व्यवस्थेच्या कराराला आग लावण्याचे बळ आंबेडकरी विचारक्रांतीने प्राप्त करून दिले आहे. सनातनी परंपरा आणि विज्ञाननिष्ठ भूमिका यांच्यातील एक जबरदस्त संघर्षनाट्य आनंद गायकवाड यांची कविता चित्रित करते.

चालता चालता पावलागणीक तप्त शब्द घडू लागले
प्रवास जसा बुद्ध झाला तसे युद्ध झडू लागले
यातनाची यात्रा संपायला अजूनही अवकाश आहे
आज युद्धासाठी बुद्ध उभा नि बुद्धभूमीकडे वळतोय हा प्रवास
युद्ध धम्माचा ध्वज घेऊन
अरे हीच घटना आता जहाल होऊ लागली
अन् यातनाची यात्रा आता लाल होऊ लागली

या कवितेचा धम्म युद्ध हाच आहे. भाषिक कृतीतून नव्या रूपातील संघर्ष चित्रित होतो. संघर्षाचा पवित्रा आता बदलेला आहे. संघर्षाचे हे नवे भान 'सडान' चिबवण्यासाठीचे आहे. मूळात कवी हा चळवळीतील कृतिशील कार्यकर्ता असल्यामुळे त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय भान सतत जागृत आहे म्हणून चळवळींना तपासण्याची, सिंहावलोकन करण्याची दृष्टीही कवितेतून प्रत्ययाला येते. दलितांच्या चळवळीत आजवरच्या इतिहासात, स्वातंत्र्योत्तर काळात भावनिक प्रश्नांवरील आंदोलनात एक पिढी बरबाद झाली. सत्ताधाऱ्यांनी दलितांच्या भावनिक प्रश्नांचे घोंगडे भिजत ठेवून दलितांच्या मतांवर पाच सात निवडणुका जिंकल्या. त्यांनी आपली घरे भरली आणि दलितांची घरे खाक होऊन ओस पडली. या सिंहावलोकन आणि चिंतनातून ही कविता साकार होते. त्यातूनच कार्यकर्त्याच्या द्विधा मानसिकतेचे चित्र साकार होते. कारण हा कवी केवळ भाषणे देत फिरणारा नेता नाही किंवा चार भिंतीत राहून, खिडकीतून मोर्चा पाहणारा नाही तर प्रत्यक्षात मोर्चातला कवी आहे. हे लक्षात घेतलं तर त्याची कृती, उक्ती आणि वक्तृत्व या बाबींना एक वेगळीच चमक आहे असे प्रत्ययाला येते.

चारी बाजूस जमावबंदीची सूचना विथ सायरन
अशावेळी तूच सांग मी काय करावे
शेकडो धरणे पायात बांधलेले मनगटात असंख्य घेराव
मेंदूत कडकडीत हरताळ अगणित
कितीतरी मोर्चे ओठावर ठेपलेले
पाच हजार वर्षांचे उपोषण पोटात
डोळ्यात लाली लाखो मशाल मोर्चाची

मीच आंदोलन झालोय, जमाव झालोय
अशावेळी त्यांचा कायदा राखू की माझी सुव्यवस्था?

सनदशीर मार्गाचे लढे कायद्यानेच रोखून धरले आहेत आणि न्याय हक्काचे मार्ग कायद्याच्या शस्त्राने बोथट केले जातात. कायद्याची बूज राखली तर न्याय मिळत नाही आणि कायदा हातात घेतला तर गुन्हेगार म्हणून गजाआड किंवा सुव्यवस्थेच्या लाठीचा शिकार व्हावे लागते हे प्रखर वास्तव वाचकांसमोर ठेवून ही कविता अनुत्तराच्या खाईत ढकलून देते. एक उद्‌वेग, एक संताप आणि अस्वस्थाची सळसळ हाडीमाशी भिनलेल्या कार्यकर्त्यांच्या हतबल आणि अगतिक मानसिकतेचे दर्शन या कवितेत प्रत्ययाला येते. स्वेतराचे आक्रमण परतवून लावायचे आणि स्वकीयांच्या अपप्रवृत्तीवरही हल्ला करायचा असे संघर्षाचे द्वैत मांडतानाच स्वप्नाळू आदर्श सांगण्यापेक्षा अव्याहत संघर्षाची अपरिहार्यता सांगणे या कवितेला महत्त्वाचे वाटते. मूळ निवासीच्या संघर्षाची गाथा प्रतिमित अभिव्यक्तीतून साकार झाली आहे. बाबुराव बागूलाच्या कवितेने 'या देशात जन्म घेणे ही चूकच ठरते' असे सांगितले मात्र ही चूक सुधारण्याचे दोन मार्ग सांगीतले होते. एक तर हा देश सोडून जायचे किंवा भीषण युद्धाला आरंभ करायचा. इथल्या मातीशी आपले आदिम नाते असेल तर या धरेशी फारकत घेऊन पलायन करण्यात मर्दानगी नाही.

इथून तिथून कुठूही हुसकावून लावलं तरी
उठून झोपडीतून धरा लपेटून घेईन मी
शांत शांत आसमंत संत महंत होऊन अंत पाहील
तेव्हा प्रांत प्रांत सांधणाऱ्या एखाद्या ज्वलंत अधरावर
कबीराचा दोहा बनून राहीन मी

मानवतेच्या मुक्तांगणात उभे व्हायचे असेल, अमानुषतेचा अंधार नेस्तनाबूत करावयाचा असेल तर 'भागो नही बदलो' या तत्त्वाचा स्वीकार अटळच आहे. कबीराचा दोहा बनायचे असेल तर स्वत:चे घर जाळूनच पेटती मशाल हातात घेऊन अंधाराचे प्रदेश जाळत सुटणे अपरिहार्य आहे. माणूस म्हणून आपल्या अस्तित्वाची सार्थकता आणि मानवतेच्या महामार्गावर आरुढ होऊन अथक वाटचाल करण्याचा, मुक्तीच्या राजमार्गाचा विचार या कवितेने मांडला आहे. त्याचबरोबर भपकेबाज आणि चंगळवादी, उच्चभ्रू आणि व्हाईट कॉलरवाले शेठ सावकार, वातानुकुलीत गाड्यात फिरणारे हुकुमशाही प्रवृत्तीचे, परकीय आर्थिक मदतीतून भपकेबाज प्रतिष्ठा मिळवणारे अशा प्रचंड 'आहेरे'च्या मुजोर मस्तवाल जगाविरुद्धचे युद्धपवित्रे आणि संघर्षाची विविध रूपे चितारून गायकवाड यांच्या कवितेने वंचितांच्या दुनियेला संघर्षसन्मुख केले आहे.

'आखरीचं तुव्हच सडान चिबवीन'मधील 'पाटीपुऱ्याच्या कविता' हा एक अनोखा आविष्कार आहे. जिवंत आणि प्रबळ भाषाविष्कार, सर्वसामान्याच्या दैनंदिन जगण्याच्या भाषेचा प्रत्यय या कवितेने दिला आहे. बोलभाषेचा प्रखर विद्रोह कसा असतो हे दाखवून दिले आहे. उदा.

लखाणी बाटा चामारच ना बापू?
अपने को बाटा होता आये नही का!
टुरी, जरू जसी चिपकी है जात
ओको कसो काटता आये?
पागल रे बापू तू, अरे तब रापी कोनते काम की?

एकंदरीत, या दशकाच्या कवितेत आनंद गायकवाड यांच्या कवितेने मौलीक स्वरूपाचे योगदान दिले आहे. कार्यकर्त्याच्या कवितेचा आविष्कार कसा असू शकतो हे दाखवून दिले आहे. वक्तृत्वपूर्णता आणि बोलभाषिक प्रबळता, आशयाची सघनता यामुळे या कवितेचा स्वतंत्र चेहरा साकार झाला आहे.

रापी जेव्हा लेखणी बनते या पहिल्या कवितासंग्रहानंतर तब्बल बावीस वर्षांनी **राम दातोंडे** यांचा **गल्ली बदललेला मोर्चा** हा दुसरा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. या संग्रहास महाराष्ट्र फौंडेशनचा प्रतिष्ठेचा पुरस्कारही प्राप्त झाला.

या कालखंडात बदलत गेलेले सामाजिक, राजकीय वास्तव, पुरोगाम्यानी बदललेले आपले मार्ग, चळवळीचा थांबलेपणा, त्यातून आलेले वैफल्य, सांस्कृतिक स्थितीशीलता, सांस्कृतिक दहशतवाद, स्त्रीशोषणाच्या विविध तऱ्हा, लोकशाही मूल्यांची होत गेलेली अधोगती या सर्व बाबी विषयीचे चिंतन आणि चिंता दोतोंडे यांच्या कवितेतून व्यक्त झाली आहे. चळवळीची तपासणी करीत, 'गल्ली बदललेला मोर्चा' कवितेतून पुढे सरकताना दिसतो. एका विशिष्ट भूमिकेतून कविता साकार झाल्या आहेत. समूहाशी असलेली बांधिलकी आणि स्वत:ची असलेली नैतिक जबाबदारी अशा दुहेरी भूमिकेतून कविता स्पष्ट होत जाते. दलित व्हाईट कॉलरवाल्यांची पेचदार अवस्था या कवितेने अधोरेखित केली आहे. वरच्या वर्गाकडून हेटाळणी आणि खालच्या वर्गाकडून नकार अशा स्थितीत तो सापडला आहे. त्यामुळे खालच्या आणि वरच्या अशा दोन्ही वर्गाकडून सहानुभूतीची प्राप्ती व्हावी यासाठी त्याची कसरत सुरू आहे. चौकोनी कुटुंबापलिकडे आपण काही करू शकत नाही. एकीकडे अगतिकता दुसरीकडे स्वकीयांकडून दबाव यामुळे झालेल्या केविलवाण्या अवस्थेचे दर्शन या कवितेने घडविले आहे. अशा आत्मटिकेकडून ही कविता व्यवस्था विश्लेषणाकडे वळते पुरुषी. व्यवस्थेच्या छळवादी वर्तनावर खालीलप्रमाणे प्रकाश टाकला आहे.

तू ये प्रिये, सात फेऱ्यांच्या गोंधळातून
शुभ्र वस्त्रानंतरच्या 'साधो साधो' तून
'निकाह कबुल है' च्या पोपटपंचीतून किंवा
नोंदणी कार्यालयातल्या नोंदीतून
चूल तेवढी समजून घे
उतारवयात मी घडवून आणीन तुझा सत्कार
एक आदर्श पतिव्रता म्हणून, तू ये प्रिये

पुराण-इतिहास-वर्तमान या प्रवासात पुरुषी व्यवस्थेच्या पापाची आणि केलेल्या अनाचाराची बेरीज आणि गुणाकार हजारो पटीने वाढतच गेला. तोंड दाबून बुक्क्याचा मार स्त्रीने सहन केला पाहिजे असेच आजवर घडत आले. या सर्व प्रक्रियेचा ताळेबंद दोतोंडे यांची कविता मांडते. स्त्री ही भोगाची वस्तू आणि दास्यांची मालकीण असण्यातच पुरुष प्रधान संस्कृतीचे हित दडलेले आहे. म्हणूनच स्त्री अत्याचार आणि शोषणाच्या विरोधात दाद मागणारी कृती हा संस्कृतीच्या दृष्टीने निषेधाचा विषय असतो. स्त्रीचे उदात्तीकरण केले म्हणजे पुन्हा स्त्रीशोषण आणि अन्याय अत्याचाराचे मार्ग मोकळे होतात. स्त्रीवादाची चर्चा आपल्याकडे होत असली तरी स्त्रीवादाच्या नावाखाली पाश्चात्याच्या मोजमापाने इथले स्त्रीजीवन मोजण्याचा प्रयत्न केला जातो. पाश्चात्यांच्या शरीरअंगाने विकसीत होत गेलेला स्त्रीवाद जिथे स्त्रीयोनीच नाकारली गेली आहे तिथे लागू करता येईल का हा खरा प्रश्न आहे. तथाकथीत स्त्रीवादाने अंतर्मुख व्हावे असे सुतोवाच दोतोंडे यांच्या कवितेने करून ठेवले आहे.

गजऱ्याच्या मैफिलीत त्यांच्या
मी तुझ्या खरचटलेल्या जांघाची आणि
ओरबाडलेल्या स्तनांची कहाणी सांगीतली
तर ते धावले काळे झेंडे घेऊन माझ्या दिशेने
वर आभाळ नागवं होतं तसंच!

अशा नागड्या पार्श्वभूमीवर स्त्रीवादाचा झेंडा कोणत्या सांस्कृतिक दिशेने झेपावतो हे पाहणे महत्त्वपूर्ण ठरेल. असे अनेक प्रश्न उपस्थित करूनही राम दातोंडे यांची कविता सोपेपणाकडून समृद्ध आशयगर्भतेकडे वाटचाल करताना दिसते. मोर्च्याने गल्ली बदलल्यामुळे झालेल्या विविध परिणाम आणि वैफल्याची चर्चा कविताभर विखुरलेली आहे. ध्येयपूर्तीच्या मार्गावरील अपयशाचे दिग्दर्शन या कवितेने केले आहे. आंबेडकरोत्तर काळात परिवर्तनाच्या चळवळी मंदावत गेल्या हे वास्तव नाकारण्यात अर्थ नाही. आत्मकेंद्रीपणाभोवती एक चौकट आखून घेतल्यामुळे ही स्थितीशीलता वाढत गेली. वर्तमान थांबलेपणात गुंतवणारा आणि भविष्याला सामोरे जाण्याची धमक उरली नाही.

ते आले विझू पाहणाऱ्या मशाली हातात घेऊन
पावलागणीक आत्मविश्वास आभाळ करीत
त्यांना नको आहे भुकेल्याच्या भाकरीएवढी वेदना
उरात लपवून उष्ठाळणाऱ्या भविष्याला सामोरं जाणं

असे मोर्च्याचे स्वरूप आहे. ध्येयसिद्धीऐवजी स्वार्थसिद्धीच्या गल्लीने मोर्चा निघाला आणि समूहजीवन भ्रमनिरासाच्या गर्तेत गरगरत राहिले. 'ज्यानं नातं सांगीतल स्वत:चं आकाश धरतीशी, त्याचेच अनुयायी खुराड्यात बंद झाले' अशी अतिशय शोचनीय अवस्था झाली. पुरोगामीत्वाचा प्रवास प्रतिगामीत्वाकडे होत गेला आणि चळवळीची ध्येये रसातळाला जायला फारसा उशीर लागला नाही. चळवळीतील एकनिष्ठ अनुयायांच्या वाट्याला वैफल्य आले. नेत्यांच्या कृतीने या अनुयायावर केवळ आवाक होण्याचीच वेळ आली.

सर, तुमच्या घरात हा खिदळण्याचा आवाज कसला?
मी आवाक होऊन ऐकतोय तेव्हापासून
मी परत निघालोय, दरवाजा बंदच राहू द्या हवा तर
मोर्चानं गल्ली बदललेली दिसतेय!

वर्तमान सत्याच्या वर्मावर या कवितेने नेमके बोट ठेवले आहे. अशाप्रकारे 'गल्ली बदललेला मोर्चा' ही चळवळींच्या तपासणीची कविता आहे. थोडक्यात, सामाजिक दुभंगलेपणाची स्थिती दातोंडे यांच्या कवितेने व्यक्त केली असून आत्मटिकेकडून व्यवस्था विश्लेषणाकडे या कवितेने आपला मोर्चा वळवला आहे. सांस्कृतिक विघटन आणि धार्मिक वर्चस्ववाद्यांच्या थैमानाचे वर्तमान या कवितेने रेखाटले आहे. परिवर्तनवादी मोर्च्याने फितुरीच्या मार्गाने वाटचाल केल्याचे वास्तव मांडून अनेक अंतर्विरोध उजागर केले आहेत. चळवळीच्या सिंहावलोकनातून साकार झाल्यामुळे चळवळीच्या तपासणीची कविता असे रूप तिला प्राप्त झाले आहे.

अविनाश गायकवाड (जन्म ८ जुलै १९६३) त्यांचा **जंजाळ** (१९९९) हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. 'जंजाळ' म्हणजे जगण्याची गुंतागुंत. ही गुंतागुंत अनेक पातळ्यावरील आहे. तृष्णा, वासना, लालसा, भोग, आसक्ती या सर्व मोहापायी निर्माण झालेला मानवी जीवनातील गुंता आणि दुसरीकडे सत्ता, राजकारण, शोषक व्यवस्था, मूलतत्त्ववादी व्यवस्था या सर्व गोष्टी माणसाभोवती जाळे फेकतात, माणसाचे जगणे हराम करतात. एकदा या जाळ्यात अडकले की शेवटपर्यंत सुटका नाही. असे हे जंजाळ आहे. माणसाच्या जगण्यातील गुंतागुंत हाच या कवितेतील चिंतनाचा विषय आहे. जीवनाचे आचरण कसे असावे या विषयीची चर्चा या कवितेने केली आहे. बांडगुळासारखे किंवा कलम होऊन, परजिवी किंवा आधरवेलीसारखे जगणे आणि अशा जगण्याचा भपकेबाजपणा मिरवणे याला खरे जगणे म्हणता येणार नाही. दुसऱ्यांच्या घरातील उजेड चोरून स्वत:ची घरं प्रकाशमान करता येत नसतात.

परप्रकाशी ऐदी चांदण्या खुडून / आपलंच आंगण सजवण्यापेक्षा
दाखवता यावी धगधगीत उजेडाला / सामोरं जाण्याची दिलेरी

स्वत:चे मार्गदाते स्वत:च झाले पाहिजे, स्वयंप्रकाशित झाले पाहिजे असे बुद्धाने सांगीतले आहे. म्हणून इतिहासातून प्राप्त झालेली माणुसकीची मळवाट या कवितेने चोखाळली आहे. चळवळीच्या शतखंडाचे वास्तवही स्पष्ट केले आहे. स्वार्थलोलूप नेतेगिरी घबाड मिळेल त्या दिशेने वहावत जाते आणि जनता नुसतीच फरफटत जाते. स्वार्थांध नेतेगिरीने कळस गाठला आहे. असे वास्तव स्पष्ट करून आत्मटिका करणे या कवितेला प्रशस्त वाटते. वास्तवाला धिटाईने सामोरे जाणे हा नव्या पिढीच्या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. अविनाशची कविताही त्याला अपवाद नाही.

अस्तित्वहीन करून टाकणारा भूतकाळ विसरून
चौकटीत छान ॲडजेस्ट करत
किती बेपर्वाइने उभारला सुरक्षित भिंतीआड

आणखी एक कोंडवाडा

मध्यमवर्गीय चौकट - विशेषत: दलित जीवनाच्या संदर्भात, वैयक्तिक आणि भौतिक पातळीवर सुखाची पातळी प्राप्त करून देणारी असली तरी सामाजिक पातळीवर चौकटीचे जगणे म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा चेहरा पुसून टाकणे होय. ऐहिक पातळीवर तथाकथीत सुरक्षितता समाजमूल्यांच्या पातळीवर चेहराविहीन ठरणारी आहे. आपल्यातला माणूस मारून एक कावेबाज विकाऊ दलाल आपण बाजारात उभा करीत आहोत याचे भान 'चौकटीत' बंदिस्त झालेल्या जगाला उरले नाही. साहित्याच्या क्षेत्रातही साहित्याचे राजकारण आणि राजकारणाचे साहित्य करणारी अपप्रवृत्ती उदयाला आली. राजकीय अनाचार, सांस्कृतिक दहशतवाद, पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व, तिच्या अमानुष कारवाया, मूलतत्त्ववादी सत्तेच्या अमलामुळे माणसाच्या जीवनात निर्माण झालेली असुरक्षितता, झुंडीच्या मानसिकतेला जन्म देणारे सत्ताबाह्य सत्ताकेंद्र, विद्ध्वंसक कारवाया करणारी सत्तास्थाने अशा अनेकविध विषयांना या कवितेने हात घातला आहे. राजकीय जीवनाच्या संदर्भात काही ठोस विधाने ही कविता करते.

अंधार प्रकाशाचे नकली वस्त्र लेवून
हिंडू लागला आहे दिमाखात दिवसा उजेडी
तळ्यात जोरकस उमलू लागलीयत कमळं
आता चालत राहायचं का त्यांच्या मोहाने
वा कानाडोळा करून झापड लावल्या बैलासारखं
कुणाला हवय का बिनशौर्याचं आंदण
दलदलीचा प्रदेश तोच तो पुरातन चिखल

कावेबाज सांस्कृतिक, राजकीय रणभूमीवर आणि काळाच्याही टप्प्यावर कराव्या लागणाऱ्या धावपळीसाठी 'वख्ताचं पिसाळलं कुत्रं पाठी लागल्यागत' धावाव लागत आहे. अशा स्वरूपाचे भाषिक कृतीचे विधान अधिक जोरकसपणे गती आणि अधोगतीचे वास्तव सूचित करते. सांस्कृतिक विश्वच ऱ्हासशील झाले तर मूल्ये कुचकामी ठरतात आणि अधोगतीच्या मार्गावर ऱ्हासशीलताच मूल्यरूप धारण करते. अशा वेळेस

भूकलक्षी पाळीव माणसातही शोधावं लागतं
मायक्रोस्कोपी नजरेतून लखलखीत इमान....

मानवी जीवन, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील अंतर्विरोध असा आहे की माणसानेच माणसाला गुलाम करण्याची सत्तेची अहमहमिका प्रत्येक काळातच वाढत गेली. प्रत्येक काळात धर्म आणि पुरुषाने उभारलेल्या अनियंत्रित अधिराज्यक्षेत्राच्या सीमा स्त्रीगुलामीच्या पाशाने सजवल्या आहेत. आणि जगात धर्माच्या नावावर अधिक रक्त सांडले आहे. धार्मिक अस्मिता एकदा नग्न होऊन रस्त्यावर उतरली की या अस्मितेने पछाडलेली माणसे कधी नराधमात रूपांतरीत होतील याचा नेम नाही. अशा अनेक पातळ्यावरील चिंतन आणि निरीक्षणे या कवितेने नोंदविली आहेत.

जगण्याची सुरक्षितता नसलेल्या जगाचे तगमगणे प्रातिनिधिक अर्थाने प्रकट झाले आहे. तत्त्वज्ञानाच्या तार्किक भाषेत ही कविता संवाद साधते. सत्याचा अपलाप करीत जगणे हे खरे जगणे नसतेच. अथांगतेतून जगण्याचा शोध घेऊ पाहणारी प्रगल्भ जाणीव या कवितेने व्यक्त केली आहे. दहशतवाद पेरणारी यंत्रणा आणि आमिष दाखवून माणसाचे तोंड बंद करणारी यंत्रणा राबविणे हे प्रस्थापित सत्तेचे कारस्थान असते. झुंडीच्या मानसशास्त्राच्या नसनाड्या हाती ठेवणारे सत्ताबाह्य सत्ताकेंद्र माणसाचा केवळ वापर करून घेत असते. माणसे झापडबंद होतात. दुसऱ्यांच्या इषाऱ्यावर नाचणाऱ्यांना स्वत:च्या मेंदूचेही भान राहत नाही. असे मानवी समूह अमानुषतेच्या गाळात रुतत जातात. म्हणून 'मेंदू गहाण टाकून कोणत्या चिखलातून चाललाय हा माणसांचा रथ?' असा रास्त सवाल उपस्थित केला आहे. जेव्हा विकलांग समूहांना वेठीस धरून त्यांचे जगणे अधिकच विदृप केले जाते त्यावेळेस असुरक्षितता आणि अराजकता हातात हात घालूनच येतात. त्यातून माणसाला दु:खाचा वारसा मिळतो. या वारशात कुजत राहायचं की, या दु:खावर मात करण्यासाठी पेटून उठायचं?

तशी आता शब्दांना शिवायलाही / वाटू लागलीय लाज
आणि माझे मित्र गात्रंगात्र / कधी उठतील धग घेऊन?

गात्रे गाळत बसण्यापेक्षा पेटून उठले पाहिजे असेच सूचन या कवितेने केले आहे. हे युग विज्ञान, तंत्रज्ञान, संगणकाचं आहे. विज्ञानात प्रत्येक गोष्ट पुराव्यानिशी सिद्ध करावी लागते. वैदिक संस्कृतीने मात्र शब्दप्रामाण्यालाच सत्य मानले. त्यामुळे त्यांचा कर्मकांड जोपासण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला. आधुनिकता आली, विकासाचे मार्ग ज्ञानविज्ञानाने खुले केले तरी आध्यात्माच्या झापडाचे निगरगट्ट कातडे दूर होऊ शकले नाही. या देशात रास्त अपेक्षांना सुरुंग लावणाऱ्या फॅसिस्ट प्रवृत्ती केव्हाच एकवटल्या आहेत.

शांतीची पांढरीफेक कबुतरं / आकाशात सोडणारे आणि
बोधीवृक्षावर घाव घालणारे आम्ही
इतिहासाचा अपस्मार झालेली मृतदृष्टी / काश्मीर ते कन्याकुमारी
वठलेल्या प्रश्नातून तरारून उठणारी
विसंगत वंशावळ अनंत प्रश्नांची
कोणत्या फ्रेममध्ये बसवायची आता
बुद्ध पौर्णिमेची अणुचाचणी?

अहिंसा आणि शांततेचा संदेश अख्ख्या विश्वाला देणाऱ्या बुद्धाच्या देशात मात्र बुद्धाचे स्मितही अपहृत केले जाते. बुद्ध जयंतीच्याच दिवशी अणुचाचण्याचे बार उडवले जातात. नेमकी बुद्धतत्त्वाच्या विरोधी कृती जाणीवपूर्वक घडवून आणली जाते. ही क्रुर मानसिकता नाझी हिटलरच्या मानसिकतेशी समांतर आहे. म्हणूनच कवीने उपस्थित केलेला प्रश्न अस्वस्थ आणि अंतर्मुख करणारा आहे. कवितेच्याच अनुषंगाने दुसरा एक प्रश्न उपस्थित केला आहे. षंढ आयुष्य बंदिस्त करून घेण्यासाठीच तर कवितेचा तुरुंग उभारला नाही ना? अशी शंका कवीमनाला पोखरू लागते, शंकांचे निरसन होत नाही आणि प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. मग जंजाळातून बाहेर कसे पडायचे असा प्रश्न उपस्थित होतो.

शिंदळकीच्या सावलीत उजवते सत्तेची कुस
क्रुसावर सारे उन्हातले मनातले सूत कातले कितीही
तरी बनत नाही वस्त्र दु:ख झाकण्यापुरते
मरण मिळते आंदण बिनमागितल्या बाजारात
बोभाट बिनबोभाट

नीतीमत्ता, शील, चारित्र्य या गोष्टीची वर्तमान सत्तेला गरज वाटत नाही. जंजाळातून बाहेर पडण्याचे कितीही मोठे चिंतन आणि विचारमंथन केले तरी मार्ग सापडत नाही. मृत्यूच्या देणगीशिवाय दुसरी कोणतीही मौल्यवान भेट जंजाळाच्या दुनियेत मिळू शकत नाही. जंजाळातून परतीचे मार्ग नाहीत, जंजाळातच मृत्यू पत्करणे हेच एकमेव सत्य! कोळी आणि जाळ्याचा हा खेळ आहे. मात्र जाळे व्यवस्थेने पसरले आहे आणि या खेळात कोळ्याचा मृत्यू अटळ आहे. जंजाळ म्हणजे मृत्यूचे आंदण!

उत्तम अंभोरे (जन्म २७ जानेवारी १९६३) हे या काळातील महत्त्वाचे कवी आहेत. २००० साली **पत्ता बदलत जाणारा गनीम** हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. हे शीर्षकही अनोखे आहे. 'गनीम' हा शब्द अरबी भाषेतील 'घनिम' या शब्दावरून आलेला असून त्याचा अर्थ लुटारू असा होतो. गनिमी तंत्राने लढणाऱ्या मराठ्यांना उद्देशून मोगलांनी हा शब्द वापरला. अनपेक्षित छापे घालणे. लुटमार करणे, छोट्या चकमकी घडवून आणणे हे सर्व गनिमी युद्धतंत्रात येते. स्वकीय परंतु जुलमी व अन्यायी राजवट उलथून टाकण्यासाठी शोषित जनता अंतर्गत युद्ध पुकारते तेव्हा गनिमी तंत्राचा वापर करण्यात येत असतो. परंतु भारतीय सामाजिक, राजकीय व्यवस्थेने मात्र शोषित, पीडीताना अधिकाधिक बरबाद करण्यासाठीच गनिमी काव्याचा वापर केला आहे हे विपरीत वास्तव 'पत्ता बदलत जाणारा गनिम' या संग्रहातील कवितेतून

सूचित झाले आहे.

वरचढ ठरणाऱ्या तत्त्वविचाराना आपल्या सनातनी परंपरेत सामावून घेऊन त्या तत्त्वविचारांचे चैतन्य रसातळाला पोहोचवायचे, प्रसंगी महापुरुषांना अवताराच्या मालिकेत बसवायचे ही परंपरा आपल्या देशात वेदान्त तत्त्वज्ञानापासून आहे. या परंपरेचा पर्दाफाश ही कविता करते. वर्तमानातील गनिमी मूलतत्त्ववाद्यांचा चेहरा वाचकापुढे ठेवते.

जमिनीत बांबू गाडून आकाशालाच तंबू केल्याचे
ताणतणावे दिल्याचे आम्ही ऐकले होते पाहिले होते
आता या राहुट्याराहुट्यांना रंगरंगोटी सजावट नि
पारावर भजनाचे आलाप फक्त नामस्मरणाचे
त्या तंबूचे तीनतेरा नि आपला सातबारा
उकरण्याचे कसब चालू आहे
राहुट्याराहुट्यात बसले कसाब नि
आकाश खाली लोंबकळते आहे

मंदगती जहराने चढत जाणाऱ्या आवाजांना साऊंडप्रुफ घरात जेरबंद करायचे, आध्यात्माची चमकदार वस्त्रे पांघरून माणसाची मती गुंग करायची, त्याला हळूहळू निकामी करायचे, उत्सवी जुलूस काढून माणसाचे भान हरवायचे, माणसाला गतिरुद्ध करायचे या सर्व खेळीत मूलतत्त्ववादी शक्ती यशस्वी झाल्या. आपल्या काव्याचा, बारकाव्याचा मागमूसही समाजाला लागू नये याची पुरेपूर दक्षता गनिमी मूलतत्त्ववादाने घेतली आहे. समाजाला मागमूस लागेपर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले असते. एखादी पिढी बरबाद झाल्यानंतरच ते आपल्या लक्षात येते तोवर गनिमाने आपला पत्ता बदललेला असतो. इतका इथला मूलतत्त्ववादी गनीम वाक्बगार आणि सराईत आहे. या वास्तवाचे आकलन या कवितेने मांडले आहे.

प्रत्येक काळात नवी मूल्ये, तत्त्वविचार साहित्याला नवे वळण देण्यासाठी उपकारक ठरत असतात. गांधीवादी साहित्यात भूतदया केंद्रस्थानी आली, मार्क्सवादी लेखक पांढरपेशा वर्गातून पुढे आले. त्यांनी मार्क्सला एक विचारप्रणाली म्हणून स्वीकारले नाही. भारतातील वर्गवादी तत्त्वज्ञान भारतीय समाजातील धर्म, जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था या संकल्पनांच्या संदर्भात ब्र काढायलाही तयार नाही. या राजकीय सांस्कृतिक संदर्भाचा अन्वय समकालाशी जोडून एक वास्तव अर्थानुवाद अंभोरे यांच्या कवितेनी केला आहे. समकालीन राजकीय ऱ्हासाचे आकलन ही कविता मांडते. लोकशाही प्रक्रियेमुळे सामाजिक संतुलन बदलले असले तरी परंपरागत श्रेष्ठीच्याच हातात सामाजिक धुरीणत्व कायम आहे.

म्हणे हवा पालटलीय / सारंकाही आपलंच आहे
आपल्या खुद मालकीचं / अट फक्त एकच
आपण पिंजऱ्यात राहून यांचं गाणं गायचंय....

प्रस्थापिताचे पक्षपाती होण्याऐवजी जनसामान्यांचा कैवार घेणे ही या कवितेची भूमिका आहे. फॅसिस्ट शक्ती, मूलतत्त्ववादी षडयंत्रे, पारंपरिक कावेबाज व्यवस्था आणि वर्तमानी गनीम यांच्या विरोधात स्पष्टपणे वैरत्व या कवितेने पुकारले आहे. म्हणून ती कविता राजकीय आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. शत्रूने कालानुरूप कावेबाजपणे आपल्या हत्याराचेही रूप बदलले आहे. केवळ भावनिकतेच्या आवर्तात अडकलेल्या आंदोलनात आपल्या हत्याराचेही भान असणे अगत्याचे असते. भूतकालीन संघर्षाच्या केवळ आठवांचे शिल्प उभारून निर्धास्त होणे अवसान घातकीपणाचे ठरते. उदा.

आताही शत्रूच्या छावण्याची पुराण ठिकाणं
तीच ती समजून पाडून घेताहोत आपण
आपल्याच पायावर दगड

आपण फक्त भावनिक शब्दकल्लोळात
नि शत्रू आपणास लोळवून जातो

परिवर्तनवादी चळवळीच्या संदर्भात काही भाष्य या कवितेने केले आहे. दुष्मनी आणि फितुरी, गनिमी कावा आणि उघड दुश्मनी, प्रलोभने आणि आव्हाने, भावनिकता आणि कठोरपणा अशी अनेक विरोधके अंभोरे यांच्या कवितेने मांडली आहेत. मध्यमवर्गीय झुल पांघरून आर्थिक सुरक्षेचे कवच धारण केले की, सामाजिक जबाबदारी नाकारणे, समाजाकडे पाठ फिरवणे या कृतघ्नपणाच्या प्रवृत्तीची चिरफाड या कवितेने केली आहे. दुसऱ्यांचे दोष दाखवून आपली सदोषता लपवता येत नसते. असे स्वकीय जगाचे भान जागृत करणारे वक्तृत्व या कवितेत प्रकर्षाने प्रत्ययाला येते.

पराभवाचा समुद्र हळूहळू आपल्याकडे सरकत जातो
अवतरल्या संदर्भाचे शेष अवशेष बंडखोरीच्या पावित्र्यात
अन् आपण धुम ठोकतो आपल्यापासून आपल्यापर्यंत

घालून घेतलेल्या कुंपणात मिरवून घेण्यापलिकडे काहीच करणे शक्य नसते. स्वकीयांचे भान जागविण्याचा कटाक्षाने प्रयत्न करणे हा या कवितेचा स्वभाव आहे.

तहहयात तहाची भाषा शरणागतता पेरत नेते रक्तात
पिढ्यांचे जूलूस उभे राहूनही तोंडपुजेच ठरत जातात
तडजोडीच्या फांद्याफांद्यावर बसून वंशवृक्षाची हत्या करतात.

आपले कोण, परके कोण हे ओळखण्याची दक्षता घेण्याचे आवाहन करणारी ही कविता असून पर्यावरणावर सर्वत्र गनीम आरुढ झाले आहेत. म्हणून सभोवतालचे वास्तव नाकारून मख्खपणे मौन बाळगणाऱ्या प्रवृत्तीवर ही कविता हल्ला चढवते. तहाची भाषा आणि फितुरीचे व्याकरण या गोष्टींनी सामाजिक सांस्कृतिक जीवनाचा घात केला म्हणूनच गद्दार प्रवृत्तीला सुरुंग लावणारी भाषा कवितेत अवतरते. पावलोपावली लांडीलबाडी करीत, रचलेल्या षड्यंत्रात यशस्वी होत जाणाऱ्या गनिमांचे पत्ते सांगण्यात उत्तम अंभोरे यांची कविता यशस्वी ठरली आहे.

काशिनाथ वेलदोडे (जन्म २० मे १९५६) यांचा **घुसमट** हा कवितासंग्रह १९९३मध्ये प्रसिद्ध झाला. 'जग जगविणाऱ्या सर्व श्रमिकांना' अर्पण केलेल्या या कवितासंग्रहात प्रामुख्याने सामान्य, शोषित, पीडित, कामगार, कष्टकऱ्यांचे जगणे, आणि सामान्य माणसांच्या व्यथा वेदना सोप्या भाषेत शब्दांकित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे इथल्या 'जाती'चे वर्णन करताना 'दीड फुट पायाची हडळ' अशी प्रतिमा वापरली आहे. 'येथील माणसांना अविकसीत ठेवणाऱ्या अधू संस्कृतीची वारस, मनूची कन्या म्हणजे जात' असे जातविषयक विवेचन या कवितेने केले आहे. अंतरीच्या विराट वेदना शब्द होतात परंतु शब्द विजेप्रमाणे विराट होत नाहीत. त्यामुळेच प्राणांतिक घुसमट प्रेषितांचे महावाक्य होऊ शकत नाही अशी प्रामाणिक कबुली या कवीने दिली आहे.

शब्द माझे विजेप्रमाणे होईनात विराट
किंवा महात्म्याच्या आसुडाप्रमाणे करीत नाहीत कडकडाट
आंबेडकरांची आकाशव्यापी तळमळ जाणवते मला
पण शब्दात माझ्या होईना ती बद्ध
ही माझी प्राणांतिक घुसमट होईल केव्हा प्रेषितांचे महावाक्य?

माधव धेंडे यांचा **जळवा** हा कवितासंग्रह शीर्षकाप्रमाणेच शोषक व्यवस्थेचा निर्देश करते. सरकारी कार्यालयापासून ते संसदेपर्यंत पसरत गेलेल्या 'जळवाचे' दर्शन त्यांच्या कवितेनी घडविले आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर होणारे शोषण या सर्वांसाठी 'जळवा' हे प्रतीक कवीने उपयोजिले आहे. 'नाळ खंडली तवापासनं उसनं जगनं हाय' 'सात पिढ्यांला जोहार घातले पर हितं सारी जळवाची मालकी हाय' अशा प्रकारे सर्वत्र शोषक व्यवस्थेचेच वर्चस्व असल्याचे 'जळवा'मधील कवितांनी स्पष्ट केले आहे.

गंगाधर मेश्राम यांच्या **टेहळणी** (१९९४) या संग्रहातील कविता टेहळणीचे कार्य पार पाडतात. ही टेहळणी सामाजिक, सांस्कृतिक, संदर्भातील जागरुकता अशा स्वरूपाची आहे. त्यानिमित्ताने शंका-कुशंका या कवितेने उपस्थित केल्या आहे.

तुम्ही मनूचे वारसदार!
आम्हाला दाखविता ते दात दुधाचेच कशावरून?
कारण आम्हाला ते दिसतात आमच्याच रक्ताने माखलेले

अशी शंका उपस्थित झाली आहे. शंका आणि अविश्वास अशा दोन गोष्टींचा लंबक या कवितेत दिसून येतो. उदा.

'कुणी कुलकर्णी बोधी झाली
तरीही संशय न घेऊन कसं चालेलं
वारा येईल तसा तिवा मांडणारी तुमची संस्कृती
टेहळणी न करून कसं चालेल?

दायीत्व सांगणाऱ्यांनीच छळ केला या वेदनेतून मेश्राम यांची कविता साकार होताना दिसते. एकीकडे आयुष्य दु:खाने ग्रासलेले आहे दुसरीकडे गावाने 'जागल्यांचे' निर्धार छाटलेले आहेत. आणि घरात बेकीचे पर्यावरण आहे

तुनं लावलं रोपटं त्याची झालीया गा बाग
आपल्याच गा माळ्यानं तिले लावलीया आग

'टेहळणी'मधील हायकू रचनाही बुद्ध-आंबेडकरांच्या तत्त्वांचे पखरण करणाऱ्या आहेत. जीवनाविषयी बोलणाऱ्या आहेत. मेश्राम यांच्या कवितेविषयी दामोदर मोरे म्हणतात, ''करुणेचं अधिष्ठान असलेली संवेदनशीलता, आणि सामाजिक भान असलेली सजगता या कवितेत आहे. आंबेडकरवादाची ती वाहक आहे आणि प्रबोधनाचा प्रकाश पीडितापर्यंत पोचविणे हा तिचा ध्यास आहे. ''[१८]

कैलास पगारे (१ फेब्रुवारी १९५४- २८ डिसेंबर २०१५) यांचा **याही मोसमात** (१९९४) हा संग्रह प्रसिद्ध झाला. 'जखमा जपत जपत जखमांचा कवी झालो' असे कवीने म्हटले आहे. 'वस्तीच्या डोक्यावर याही मोसमात पावसाळी एकही ढग नाही' किंवा 'तडा गेलेल्या हृदयाला स्वरांच्या मैफिलीत एकही तार पुकारत नाही' यातून या जखमा झाल्या आहेत. पगारे हे तसे कामगार कवी म्हणून कष्टकऱ्यांचे दु:ख हा त्यांच्या कवितेचा आस्थेचा विषय आहे. त्याचबरोबर राबणाऱ्या हाताचा विद्रोहही साकार केला आहे.

हे हात आता हात राहिले नाहीत / हे हात आता पेटून उठलेत
हे हात आता वादळ झालेत / हे हात आता धारदार तलवारीसम
तळपायला लागलेत

हाताचे सामर्थ्य आणि विद्रोह याचे प्रकटीकरण झालेले पाहावयास मिळते. एखाद्या प्रतिकात्मक कवितेतून सामाजिक, राजकीय जीवनातील अंतर्विरोधाला या कवितेने मुखरीत केले आहे.

आकाशाची हितगुज करणारी कणखर बाण्याची
सागवणी झाडं हल्ली सहसा दिसत नाहीत..
खांडववन बेचिराख केलं तरीही झाडाकडून प्रतिकार झाला नाही
असंही ऐकलय की काही झाडं हवापालट म्हणून
गाव सोडून बंगल्यात राहायला गेलीत आणि
आपण अमुक तमुख गावाचे होतो हेच विसरून गेलीत.

कृतघ्नपणाचे प्रतीक म्हणूनच 'झाडा'ची प्रतिमा येथे कार्यरत झाली आहे. कणखरपणा स्वाभिमान, सामाजिक

बांधिलकी या गोष्टींचे भानच उरले नसल्याचे वरील कवितेतून स्पष्ट होते. पगारे यांच्या कवितेवर नारायण सुर्व्यांच्या कवितेचा मोठा प्रभाव आहे. प्रभाव असणे वाईट नाही. मात्र अनुकरण केल्याने आपल्या स्वत:च्याच कवितेची ओळख हरविली जाते. पगारे यांनी सुर्व्यांच्या कवितेचे अनुकरण केले आहे. उदा.

१. आखून दिलेले आयुष्य नकार देऊन जगताना
माझ्याही घरावर कावळ्यांनी कावकाव केलीच नाही असेही नाही..

२. एक आम्हींच असे निघालो की
थांबणे कुठे जमलेच नाही

३. उद्याची चिंता नको / झंजावती वादळ होऊ
गाडून टाकू खाणाखुणा / अभाळाला कवेत घेऊ
वणव्यात विषमतेच्या किती काळ भाजलो, भाजणे बरे नाही.

वि. वा. शिरवाडकरांनी या कवितेसंबंधी असे म्हटले आहे, की ''काळजातून उगवलेली ही कविता आहे यात शंकाच नाही. पण जे अनेकांनी अनेकदा लिहिले आहे, त्याचीच वेगळ्या शब्दात पुनरुक्ती होत आहे हे पगारेंच्या काव्यातही जाणवते. ही काव्याची मर्यादा आहे.''[१९]

राहुल वानखेडे यांचा **व्यवस्थाविद्ध्वंस** (१९९६) हा संग्रह प्रसिद्ध झाला. राहुल वानखेडे या कवीने कवितेविषयी भूमिका मांडताना म्हटले आहे, की ''स्वतंत्र भारतात दोन घटना राबताना दिसतात. एक लिखित असलेली भारतीय राज्यघटना व दुसरी हजारो वर्षे भारतीय समाजाचे नियमन करणारी 'मनुस्मृती' ही अदृश्य 'घटना' परंतु जगताना मात्र ही अदृश्य घटनाच पदोपदी जाणवते. या दृश्य-अदृश्य घटनांच्या पदोपदी होणाऱ्या संघर्षामुळे आजचे वास्तव जास्त गुंतागुंतीचे व्हायला लागले.''[२०] त्यामुळे या गुंतागुंतीची उकल करताना 'अदृश्य घटने'चा विद्ध्वंस करण्यासाठी वानखेडे यांची कविता सज्ज झाली आहे. इथल्या कणाकणाला परिवर्तनाची तहान लागली आहे' असे निरीक्षण त्यांच्या कवितेने नोंदविले आहे. अदृश्य घटनेचे एकेक कारनामे ही कविता वाचकांपुढे ठेवते. उदा.

कधी जातीच्या नावावर
तुमच्याच शोषित बांधवाच्या रक्ताच्या तहानेचे
तत्त्वज्ञान पाजले जाते देव-धर्माच्या नळकांड्याने
तर कधी भाषेच्या प्रांताच्या पैशांच्या तफावतीचे ताफे
तुमच्या सुपूर्द करून पाडत असतात फुट आणि
करतात दफन तुमच्या पिढ्या

मूलतत्त्ववादी व्यवस्थेचे असे स्वरूप ही कविता कथन करते. अशाप्रकारच्या कावेबाज व्यवस्थेचा विद्ध्वंस करायचा असेल तर,

या मातीच्या गर्भावर आकाशाच्या कपाळावर
दिशांच्या वक्षावर आम्ही आमचे नाव लिहू
येणाऱ्या भविष्याला आम्ही आमचे आडनाव देऊ!

असा आत्मविश्वास या कवितेने व्यक्त केला आहे. व्यवस्थेविरुद्ध आगपाखड करणारी भाषा बहुतांश कवितामधून उपयोजित झाली आहे. दंगली, कत्तली, माणसे कापण्याचा पाशवी खेळ, अन्यायाचे मोहोळ, कुजलेले आयुष्य, रक्ताला चटावलेली जिभेवरील लाळ, सत्तेच्या कोल्ह्याच्या जिव्हा, भगव्यातला आतंक, नागव्यातली विकृती, परंपरेची जल्लादी मस्ती, जुल्माच्या वेदना, भुक्या कंगालाचे काफिले, सत्तेच्या दलालांचा बाजार अशा समकालीन वास्तवाच्या आसमंताने व्याप्त अशा स्वरूपाची ही कविता आहे.

मधुकर जाधव यांनी **अस्तित्वाच्या सावल्या**मध्ये अस्तित्व हरवून बसलेला समाज भीमक्रांतीच्या ज्वालानी पेटला आहे अशी सूचना देऊन ठेवली आहे. इथल्या सत्ताव्यवस्थेने दलितांच्या भावनिकतेचा कसा अपहार केला अहे. याविषयीचे मार्मिक निरीक्षण नोंदविले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या सुधारणाचा कवडसा
याही वस्तीत थोडासा पोहचलाय
मारलाय एक पुतळा वस्तीच्या थोबाडीत
भाकरीचा प्रश्न तसाच अनुत्तरीत ठेवून

संजीवकुमार सोनवणे या कवीचा **माझ्या घराचे दार** या शीर्षकाचा कवितासंग्रह प्रसिद्ध असून शीर्षकाप्रमाणे आपल्या घराचे दार उघडे ठेवून बाहेरच्या जगातील धर्मांध आणि मूलतत्त्वी वास्तवाचे रेखाटन केले आहे. आणि 'दार बंद करण्यापूर्वी माझ्या जातिबांधवाचे आपापसातील भांडण मला थांबवून घेतले पाहिजे' असा अंतर्विरोधही मांडला आहे. या घराच्या दाराच्या 'करकरणाऱ्या बिजागऱ्यांनाही गंज चढलेला आहे' ते प्रतिकात्मक आहे.

बदमास जिंदगीना बदली गयात धंदा
आपलाच मानूसले देत नही कोनी खांदा

म्हणून हा बिजगऱ्यांना गंज चढलेला आहे. ''संजीकुमारची कविता वेदनेच्या अनुभूतीने न्हाऊन निघताना ती अधिक प्रगल्भ होते. संयत होते. पण म्हणून तिने आपला जन्मसंदर्भ आणि संघर्षवादी ध्येयवाद उपेक्षिलेला नाही'' असा अभिप्राय डॉ. श्रीपाल सबनीस यांनी नोंदविला आहे. त्यावरून या कवितेचे मोठेपण सूचित होते.

या काळातील इतरही काही कवितासंग्रहाचा निर्देश करता येईल, रमेश चिल्ले यांचा **ओस झाल्या दिशा**, मनोहर जाधव यांचा **कधी कधी**, आत्माराम गोडबोले यांचा **आत्मरंग**, राजेंद्र तायडे यांचा **पाऊलखुणा**, के. डी. पवार यांचा **उद्रेकरेषा**, इसादास भडके यांचा **लेखाजोखा**, विवेक मोरे यांचा **उठाव**, आ. सो. शेवरे यांचा **दफणवेणा** इत्यादी.

उठावमधील **विवेक मोरे** यांच्या कविता वक्तृत्वपूर्ण शैलीच्या आहेत. काही कविता कथनाच्या अंगाने जाणाऱ्या आहे. काही मंचिय कविता आहेत. हा 'उठाव' सांमाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पातळ्यावरील असून, आपल्याच माणसांसाठी तो केला आहे. बुद्ध, आंबेडकरांच्या विचाराच्या मार्गानेच तो केला आहे. आम्हाला काढावयाची आहे मरणयात्रा इथल्या जातीयवादी सैतानाची असा या कवितेचा निर्धार आहे. शहिद भागवत जाधवच्या स्मृती जागवताना कवी म्हणतो-

प्रतिगाम्यांना निर्वस्त्र करून
समतेची निळी पहाट जागविण्याकरिता
तुझी आठवणच देणार आहे आम्हाला हजारो हत्तीचं बळ

या प्रेरणेतून उठावाला बळ मिळणार आहे असा या कवितेने विश्वास व्यक्त केला आहे. 'अत्त दीप भव'च्या मार्गाने या उठावास सुरुवात झाली आहे. या प्रवासात जी मानव मुक्तीची आंदोलने झाली त्या आंदोलनाचे प्रेरणास्त्रोत, नव्या उदयाची पार्श्वभूमी म्हणजे सूर्याने अंधार गिळल्याचा इतिहास होय.

सूर्याने अंधार गिळला
मुक्तीचे तांबडे फुटले/ वस्ती वस्तीत सूर्य पेटले

असे नव्या पहाटेच्या उदयाचे चित्र कवी रेखाटतो.

कवी ज्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणातून आला त्या पर्यावरणाचे वास्तव चितारताना बेकार गिरण कामगाराची रोजीरोटीच कशी हिसकावून घेण्यात आली याची दाहकता कवितेत पेरलेली दिसते.गिरण्या बंद पाडून, उद्योग आजारी दाखवून त्या जागेवर मोठे मॉल्स आणि गगनचुंबी इमारती उभारण्यासाठीच व्यवस्थेने हे कारनामे केले आहेत.

गिरण्या बंद पडल्यामुळे, कामगार उदध्वस्त झाला.त्याच्या कुटुंबाची वाताहत झाली, संसाराची वाट लागली, स्वप्नांची राखरांगोळी झाली.जागतिकीकरणाचा हा परिणाम आहे. नारायण सुर्वेसारख्या कामगार कवीने या वास्तवाला स्पर्श केला नाही.मात्र विवेक मोरेनी हे वास्तव वाचकांपुढे ठेवले आहे ते महत्त्वपूर्ण आहे.

धार्मिक विद्वेष, दंगली अशा अपप्रवृत्तीने काळवंडलेला काळ मोरे यांच्या कवितेने शब्दात पकडण्याचा प्रयत्न केला आहे. बाबरी मशिदीच्या विद्ध्वंसानंतरचे दंगलीचे वास्तव, त्यानंतर रस्त्यावर उतरलेला धर्म,'जातीधर्माचे भडवे गाती दंग्याचे गोडवे' अशी भीषणता आणि 'शांततेचं सोंग घेउन नीतिमत्ता झोपी गेली'.त्यामुळे धर्माच्या नावावर माणसाच्या कत्तली सुरू झाल्या.स्वातंत्र्यानंतरच्या काळात एवढी उग्र भीषणता पहिल्यांदाच प्रत्ययाला आली.

कोंबडे कापावे तैसे माणसाला कापले
रक्त हे गळते कसे सांडून त्यांनी पाहिले
आपल्या आईचे अंग नग्न कैसे दिसते
भरदिवसा लुगडे फेडून त्यांनी पाहिले

माणसांची कत्तल आणि स्त्रियांची बेअब्रू या गोष्टींनी या काळात कळस गाठला होता.या वास्तवाला मुखरीत करण्याचे काम मोरेंच्या कवितेने केले आहे. स्वकियांच्या जगातील धम्मस्वीकारानंतरचे आचाराचे वास्तव यावरही 'उठाव'मधील कवितेने प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर गटातटाचे राजकारण हा आंबेडकरी चळवळीत एक फार्स झाला आहे. ताकदीनिशी निळी पताका बिनधास्त फडफडेल असे एकीकरणामुळे लोकांना वाटले होते पण पुन्हा जैसे थे परिस्थिती निर्माण झाली.प्रत्येकवेळी जनतेचा भ्रमनिरास करण्याचे कार्य या गटबाजीने इमाने इतबारे पार पाडले आहे. त्याचबरोबर जयंत्या, मयंत्या, विभूतीपूजा याचेही अवडंबर माजविण्यात आले आहे. म्हणूनच मोऱ्यांची कविता अशा स्वरूपाच्या पाखंडीपणावर आघात करते.दांभिकपणाचे वास्तव उजागर करते.

कामगारांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे यासाठीची एक तळमळ या कवितेत दिसून येते.त्यामुळे कम्युनिष्ट विचारसरणीच्या, कामगार कवी म्हणवून घेणाऱ्या, नेहरुच्या मरणाने व्यथीत होणाऱ्या, शाली स्वीकारून शालीन झालेल्या नारायण सुर्व्यांना आवाहन केले आहे.

कौतुकशाली झगमगाटातून जर कधी फुरसद मिळाली
अन आठवलाच जर तुला.. भागवत जाधव,
पोचिराम कांबळे, जनार्दन मवाडे, अंबादास साबणे
अन गौतम वाघमारे तर..
लिहशिल का रे माझ्या बाबासाहेबावर एक कविता?

अशाप्रकारे उपरोध आणि मार्मिक प्रश्नाने या कवितेचा एक वेगळा स्वभाव स्पष्ट झाला आहे. त्यातून सुर्व्यांच्या बांधिलकीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. असे प्रश्नाला तोंड फोडणारी ही कविता आहे.

आ. सो. शेवरे यांचा **दफणवेणा** हा कवितासंग्रह या दशकात प्रसिद्ध झाला. 'गांधारीची फुले'नंतर जवळपास बारा वर्षांनंतर हा संग्रह प्रसिद्ध झाला.'अंधारातच कापली नाळ कवितेची आणि उभा राहिलो दारात पावसाच्या सरीसारखा' अशी कवितेच्या जन्माची कथा या कवीने सांगितली आहे. मुळात युद्धविरोधी गीत गाणारी ही कविता असून तित उपरोधाची तीक्ष्णता प्रत्ययाला येते.'मृत्यूपत्र'सारख्या कवितेतून काय नाकारायचे याची नोंद केली आहे.

त्यावर मी नोंद केली आहे साऱ्या सवलतीची
आणि बेहिशेबी अन्यायांचीही..
तू देऊ केलेल्या सर्व सुखसोयी
आणि दिलेली जातही मी तुलाच परत करणार आहे
याची नोंदही मृत्यूपत्रात केली आहे

येथे जात्यंताचा विचार सूचित होत असला तरी, या देशात माणसाच्या मृत्यूसोबतच त्याची जात जाते. हे वास्तवही प्रत्ययाला आणून दिल आहे. त्याचबरोबर जखमी हंसाला सिद्धार्थासारखे कवेत घ्यावे तशी जखमांशी नाते जोडणारी ही कविता आहे. एकीकडे महारोगासारख्या अंगाला चिकटून असणाऱ्या गरीबीबददल कथन करतानाच माणूसकीला अडविणारी भिंत कधी पडणार आहे? असा या कवितेचा सवाल आहे. प्रतिकात्मकतेतून आशयविधता संपन्न करण्याचा प्रयत्न दफणवेणा तील कवितांनी केला आहे.

या काळातील इतरही काही कवितासंग्रहाचा निर्देश करता येईल. उदा. कैलास पवार यांचा **आंदण,** आप्पासाहेब तारदळेकर यांचा **भीमा तुझ्याचसाठी**, प्रकाश खरात यांचा **पार्थिव अपार्थिव**, निरंजन गवई यांचा **कयास**, गुरुदत्त जनबंधू यांचा **कळप**, पुंडलीक धोंगडे यांचा **जातयुद्ध**, प्रल्हाद बोरकर यांचा **कोरस**, प्रमोद लांडगे यांचा **माझी माय**, शंकर गोडबोले यांचा **माती बोले गुज**, अरुण गोडबोले यांचा **क्रांतिगर्भ**, विजय सोरते यांचा **कविता एका पांथस्थाच्या**, एच. के. होनराव यांचा **चिंतनिका**, भास्कर खंडारे यांचा **बोधिवृक्ष**, भास्कर कांबळे यांचा **सूर्यलिपी**, घनश्याम धेंडे यांचा **बासरी**, दया हिवराळे यांचा **आभार**, खंडू अंढागळे यांचा **आंधळ्याची काठी**, सुरेश जगताप यांचा **रथ**, शशीकांत हिंगोणेकर यांचा **युद्ध सुरू आहे**, बबन लोंढे यांचा **तक्षकाच्या कविता**, आनंद विंगकर यांचा **आत्मटिकेच्या उदास रात्री**, वसंत जामनिक यांचा **आंबेडकरी गस्त**, ना. मु. कांबळे यांचा **कोंडमारा** इत्यादी.

या दशकात स्वातंत्र्याची पन्नाशी झाली होती. त्याअनुषंगाने अनेक कवींनी आपल्या कवितेतून प्रतिक्रिया नोंदविली आहे. 'धूसर झाली मांगल्याची पायवाट' स्वातंत्र्याने सर्वसामान्याचा भ्रमनिरास केला.परजिवावर, पररक्तावर बांडगुळांनी, जळवांनी वाढावे तसे इथले राजकारण आणि राजकारणी स्वातंत्र्यावर पोसल्या गेले. गरीब पीडिताना थोटे करण्याचे काम इथल्या राजकारण्यांनी केले

त्यांनी त्यांचे वापरले हात
कलम करण्यासाठी माझे हात

माणसाला विकलांग करणारे स्वातंत्र्य बेगडी ठरले. विकासाच्या वाटा बंद झाल्या. स्वातंत्र्याचा सूर्य काळवंडून गेला. या स्वातंत्र्याने 'सावतर माय' च्या लेकरासारखं वागवून छदमी आनंद मिळविला.

तू बघतोस पायथ्याशी पेकाट मोडलेल्या
झोपड्यामधलं इवळणारं अठराविश्व दारिद्रय
गावागाड्यात, दुर्गम खेड्यात आजही तुझा अभाव आहे

असा अभावाचा सर्वत्रच संचार आहे आणि सतरा ठिगळे लावलेल्या धर्माच्या गोधडीमुळे राष्ट्रीय एकात्मताही नजरेस पडत नाही.

शांततेचं शुभ्र कबुतर जखमी होऊन तडफडतय
दिल्लीच्या लाल किल्ल्यावर
अन देशाचा पंतप्रधान फडकवतोय तिरंगा
देत शांतता, बंधुत्वाचा संदेश

अशाप्रकारे स्वातंत्र्याच्या पन्नाशीनंतरचे विविधांगी वास्तव या काळातील कवितेमधून व्यक्त झाले आहे. मात्र नामदेव ढसाळांच्या एखाद दुसऱ्या कवितेच्या ओळीतून जे स्वातंत्र्यावरील भाष्य जोरकसपणे उफाळून येते तशी अभिव्यक्ती नंतरच्या काळातील कवींना करता आलेली नाही.

बबन लोंढे यांचा **तक्षकाच्या कविता** (१९९९) हा संग्रह प्रसिद्ध झाला. 'शब्दाचा किस पाडून आणता येत नाही पेनला धार' असे कवीने नमूद केले आहे त्याचबरोबर 'शस्त्र आहे आता वळलेला हाताच्या मुठीतच' असाही सूर आळविला आहे. लोंढे यांच्या कवितेने विद्रोही पवित्रा घेऊन संघर्षाची सूचना दिली आहे.

कालपर्यंत गल्लीबोळातले आता राजमार्गावर आलेयत
सत्ता, संपत्ती नि प्रतिष्ठा त्यांच्या घरी नांदतेय
खरं तर त्याबददल आपली काहीच तक्रार नाहीये
मात्र आपली रोजीरोटी दुर्मिळ होत चाललीय
युद्ध होणारच नाही असे कसे म्हणता!

अशी पूर्वसूचना देतानाच निसर्ग प्रतिमांच्या उपयोजनातून बुद्धत्वाचे सर्वव्यापी दर्शनही घडविले आहे. उदा.

रानभर पळस फुललाय
जसं की निसर्गाने चिवर धारण केलय
पिंपळ बहरलाय जसा की सिद्धार्थ बुद्ध झालाय
नि अंतरंगात शुभ्र मोगरा दरवळतोय गाथेसारखा...

अंतरंगातील गाथेची दरवळ असूनही या कवीमनाला ग्रेसच्या प्रेमात आकंठ बुडावेसे वाटते. 'ग्रेस आपल्या जखमांवर फुंकर घालतो' अशी कवीची धारणा आहे. काही कवितेवर भुजंग मेश्राम यांच्या कवितेचा प्रभाव आणि अनुकरणही जाणवते.'तक्षका! अटळ असू दे तुझा नकार', 'नागवन पेटले आहे', 'नागपुत्राच्या कविता' उलगुलानमध्ये प्रत्ययाला येतात.बबन लोंढे यांच्या कवितासंग्रहात,'ते निसर्गाविषयी बोलतात', 'नागपुत्रासाठी काही कविता', 'गोंडवन पेटले आहे' अशा शीर्षकाच्या कविता आहेत. एकूणच संग्रहाच्या शीर्षकानुसार त्या आशयघन आहेत असे वाटत नाही.

भास्कर कांबळे, सूर्यलिपी (१९९९) ही कविता 'आम्हाला फुलाची भाषा येत नाही' असे म्हणत, दलितांमधल्या व्हाईट कालरवाल्यांनी आपली अँटीसोशियल मने अशोक चक्रांकित करावीत असे आवाहन करते.

आडनावानं जात ओळखल्यावर
ज्यांना इथल्या जात्यंध व्यवस्थेशी दोन हात करता येत नाही
त्यांनी खुशाल आपल्या गावाचं नाव आडनाव म्हणून लावावे!
युद्धभूमीवरून पाठ फिरवणाऱ्यातला मी नव्हे!

जात लपवण्यासाठी आडनावाची ढाल वापरणाऱ्याचा उपहास येथे केलेला दिसून येतो. स्वत:ची वाट स्वत:च चोखाळण्याचा निर्धारही या कवितेने केला आहे. जिथे जगण्याचेच बजेट कोलमडून पडते जिथे बजेटच्या चर्चासत्रासाठी आमंत्रणे दिली जातात.अशा दांभिक आणि दुटप्पीपणा करणाऱ्या व्यवस्थेवर असूड ओढण्याचे काम कांबळे यांची कविता करते.सम्यक क्रांतीच्या रणांगणावर आंबेडकरी विचारांच्या तोफा आणताना युद्धभूमीला पाठ दाखवू नका असे स्वकीयांना या कवितेने आवाहन केले आहे. प्रस्थापितांनी आता सनातन भात्यातील विषारी बाण संविधानाच्या पायावर ठेवून वैश्विक व्हावे अशी आकांक्षा या कवितेने उरीपोटी बाळगली आहे.

राजेंद्र लातूरकर यांच्या **अस्मितासंगर**मधील कवितेतून येणाऱ्या आशय विषयाचा अवकाश पूर्वपरंपरेतील कवितेसारखाच जाणवतो. उदा., पुराण संस्कृतीचा निषेध, आंबेडकरद्रोह करणाऱ्यांचा निषेध, बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्त्वाचा गौरव इ.

उष:काल होण्याआधी उडून गेली पाखरे
उमलतील का उद्या तिथे माणसांची सरोवरे?

असा प्रश्न या कवितेसमोर उभा ठाकला आहे. माणुसकीच्या शोधात ही कविता मार्गक्रमण करीत निघाली आहे. आपल्याकडे जगण्याच्या भौतिक प्रश्नांपेक्षा अस्मितेच्या प्रश्नांना अधिक प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे कवी लेखकांची प्रतिभाही भौतिक प्रश्नांपेक्षा अस्मितेच्या प्रश्नातच अधिक अडकून पडली.

वणव्याची धगमध्ये **रमेश देशभ्रतार** यांनी भूमिका मांडताना म्हटले आहे, 'बालपण, शिक्षण,

सामाजिक चळवळी, नोकरी, कामगार वर्ग, कष्टकऱ्यांची ससेहोलपट या संबंध विविध टप्प्यांशी जवळीक साधत साधत माझी कविता त्यांचेशी नाते जोडत गेलेली आहे. पर्यायाने त्याचा संपूर्ण चेहरामोहरा माझ्या काव्यसंग्रहात आपणास बघावयास मिळेल' (माझी भूमिका) 'आम्ही फक्त मंचकावर आंबेडकरी फेसपावडरचा मुलामा चढविलेले कसलेले कलावंत' अशाप्रकारचे वास्तव नोंदवून आंबेडकरांच्या शूर शिपायांच्या पराभवाची कथा सांगीतली आहे. या कवितेला उपरोधाची धार आहे. 'कविता असावी माणसांची ठरावी परिवर्तनाची नांदी' असेही कवीला वाटते.

कवितेने न डुलवावी मान / राजकर्त्यांच्या इशाऱ्यावर
येसन घातलेल्या पोसणीच्या बैलासारखी

अशी कवीची धारणा आहे. या कवितेला निळ्या रंगाचे जबरदस्त आकर्षण आहे. उदा.

जुनं ते सोनं गाणारा तीन हजार वर्षांपूर्वीचा पियानो
बेआवाज होणारच एक दिवस निळ्या पहाटेच्या साक्षीने

केशव मेश्राम यांच्या मते, ''दलित कवितेच्या तिसऱ्या पिढीसमांतर निर्माण होणारी आपली स्वत:ची अभिव्यक्ती पद्धती शोधू पाहणाऱ्या पुढच्याही पिढीचा हा आर्त उद्‌गार आहे. काही कविता व आविष्कारात कवी गोंधळलेलाही वाटतो. कारण त्यामुळे कविता नुसती विधानात्मक, अतितपशील देणारी आणि गद्यात्मक बनता बनता गद्यच झालेली, कवितापण कमी पडलेली, अशीही काही ठिकाणी दिसते.''[२३]

या दशकाच्या शेवटच्या पर्वात **तुकाराम गायकवाड** यांचा **आसूड** हा संग्रह प्रसिद्ध झाला. धर्म, जात, अस्पृश्यता, फुले, आंबेडकर चळवळीतील फाटाफुट हे नेहमीचेच विषय या कवितेत आहेत. फुले आंबेडकरी कवितेत फुले आंबेडकर हा नाविन्याचा विषय राहिलेला नाही. भेदभाव करणाऱ्या धर्म आणि संस्कृतीवर म. फुल्यांनी 'आसूड' ओढले हा इतिहास आहे.

तुझ्या आसूड फटकाऱ्याने सोवळे पार गळून गेले
तुझ्या नुसत्या पायरवाने देवही सारे पळून गेले

हे फुल्यांचे कर्तृत्व या कवितेने स्पष्ट केले आहे. इथल्या संस्कृतीत असलेला अंतर्विरोध असा आहे, की तिच्या विचार आणि आचारात मोठे अंतर आहे. इथल्या नैसर्गिक घटकातही भेदभावाची सुरुवात माणसाने केली आहे. आभाळातील पाणी जमीनीवर आले की त्या पाण्यालाही स्पृश्य अस्पृश्य ठरविले जाते. असा सांस्कृतिक काळोख या कवितेने चित्रित केला आहे.

गौरवकुमार आठवले यांनी **सवाल**मधून गजलेचा आकृतीबंध स्वीकारून कविता लिहीली आहे. त्यात काही गजला आहेत तर काही गजलसदृश अशा रचना आहेत. माणसाला माणूस म्हणून न स्वीकारणाऱ्या व्यवस्थेला नाकारणारी जाणीव व्यक्त केली आहे. उदा.

माणूस मानण्याला ज्यांचा नकार होता
त्या षंढ संस्कृतीला मी ठोकरून आलो

निवडणुका, राजकारण, लोकप्रतिनिधिंची स्वार्थांध दृष्टी, जनेतेकडे त्यांनी फिरविलेली पाठ, शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचार, प्रेमाच्या गुजगोष्टी अशा अनेक विषयांना मुखरीत करण्याचे काम आठवले यांच्या गजलेनी केले आहे.

माणसांनो शब्द माझे माणसांचे गीत आहे
माणसांना जोडणाऱ्या माणसांची प्रित आहे

असा उद्‌घोष केला आहे. त्याचबरोबर आंबेडकरोत्तर काळातील गटबाजीबद्‌दल खंतही व्यक्त केली आहे.

आमची झालीच नाही एकता बाबा अजूनी
दोन पाट्या, तीन झेंडे, एकट्या गावात आहे

अशाप्रकारे आपल्या कवितेला सामाजिक परिमाण प्राप्त करून देण्याचा प्रयत्न सवालमधील रचनांनी केला आहे.

प्रल्हाद बोरकर यांनी **फोकस**मधील कवितेत लोकनाथ यशवंत यांच्या कवितेच्या रचनाबंधाचे अनुकरण केले आहे. उदा.

बंदूक टाकून शिपाई बिनधास्त झोपलेला
ऐन झोपेत भेकडांनी हल्ला चढविला
अरे, तुला कसं कळालं नाही यार
त्यांच्यात न आपल्यात तोच फरक आहे
आपण जागेपणी वार करतो, ते झोपेत

गाफीलपणा आणि जागरुकता या दरम्यानच्या दृष्टीचा प्रत्यय बोरकरांच्या कवितेने दिला आहे. निष्काम वादात गुंतण्यापेक्षा आपण आपला सूर्य शोधला पाहिजे असे भान या कवितेने प्रकट केल आहे. ज्यांच्या आयुष्यात कधी काळोख मावळलाच नाही अशा अनभिज्ञ उदासीन वाटांवरून बोरकरांच्या कवितेचा फोकस फिरताना दिसतो.यात काही गेय रचना आहेत आणि प्रेमविषयक जाणिवाही प्रकट झाल्या आहेत.

✹ प्रभाकर गांगुर्डे

या दशकाच्या आणि शतकाच्या अगदी शेवटी म्हणजे नोव्हे. २००० मध्ये गांगुर्डे यांचा **अनित्यातील संदर्भ** हा संग्रह प्रसिद्ध झाला आणि एका अर्थाने या शतकाचा समारोपही बुद्ध तत्त्वाच्या कवितेने झाला असे या शीर्षकावरून खात्रीने म्हणता येते.

शब्दानी उडवीत जाव्या ठिणग्या
प्रवाहाच्या प्रवाहीपणावर, वादळाच्या वादळग्रस्तेवर
शब्दांनी द्यावा नवा आशय पेटल्या जाणिवांना

अशी या कवीची शब्दविषयक भूमिका आहे. शब्दांचे प्रयोजन याप्रकारे त्यांनी स्पष्ट केले आहे. सामाजिक,सांस्कृतिक रस्त्यावर वळणावळणावर पाट्या बदलताना दिसतात, अनेक वाटांमधून एक मध्यममार्ग काढायचा असतो. तिथे उरबडवेपणा करून चालत नाही. मध्यममार्ग सूर्याच्या दिशेने वळवायचा असतो जिथे सूर्य कधी मावळलेलाच नसतो.अशा ठिकाणी पोहचल्यानंतर जन्माला आणि जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्याचे मार्ग मोकळे होत असतात. मात्र या देशाचे वास्तव असे आहे, की इथे 'संस्कृती संवर्धनाचा मार्ग गुलामगिरीतून जातो' आणि 'दु:खाची वाट निर्वाणातूनच जाते' याचे भान सांस्कृतिक युद्धाच्या भूमीवर सातत्याने ठेवणे गरजेचे असते. असे भान बाळगले तरच माणसाचे दु:ख अंधारून जाऊ शकत नाही. वेदनेला अर्थ देणारे शब्द असतील तर त्या शब्दांना काही एक मोल प्राप्त होते.शब्दफुलांचा भार वाहण्यालाही काही अर्थ प्राप्त होतो. तसा अर्थ प्राप्त करून देण्याचे कार्य गांगुर्डे यांच्या कवितेनी केले आहे.

जिथे शब्दांना वास नसेल प्रेमाचा
तिथून सुरू होतो मनाचा विस्फोट

वरील सत्यासह मनाचा विस्फोट होण्याची इतरही अनेक कारणे आहेत. आपण मुक्तीच्या गोष्टीला सुरुवात केली की आपला आवाज बंद होण्याची अपेक्षा बाळगली जाते. अशी अपेक्षा बाळगणारा जमाव भोवती जमा होतो आणि त्यांचा कावेबाजपणा लक्षात येण्याआधीच आपल्या मुक्तीची स्वप्ने वायफळ ठरविली जातात.त्यात गुढवादी तत्त्वज्ञानानी माणसाला संभ्रमीत करून त्याच्या जीवनाचे वाटोळे केले आहे.

ब्रम्हसत्यम जगत मिथ्या तुझ्या गुढगुंजनातून
पोळली गेली अनेकांची हदये

मला हवा होता जगाचा कायापालट
तू मात्र देत राहिलास माणसाचाच बळी
देव, आत्मा, ब्रम्ह नसत्या उठाठेवी
आता ते सांगतात ईश्वर सर्वत्र भरलेला आहे

गुढवादी तत्त्वज्ञाने नेहमीच माणसाला सत्यापासून वंचित ठेवतात. माणसाला संभ्रमात टाकतात. ब्रह्म सत्य, जगन्मिथ्या हे ही असेच वेदान्ताचे, संभ्रमाचे तत्त्वज्ञान आहे. जगत मिथ्या असेल तर मग जगात घडणारे व्यवहार, हालचाली, चलनवलन हे सारे मिथ्या आहे काय? मानवी जीवनातील जगणे याला मिथ्या म्हणायचे काय? याचे उत्तर मिळत नाही कारण दांभिक तत्त्वज्ञान लोकांच्या तोंडावर फेकायचे आणि शब्दप्रामाण्यांनी त्याचे तोंड बंद करायचे असा खेळ हजारो वर्षांपासून या देशात सुरू आहे. हा खेळ संपविण्यासाठी बुद्धतत्त्वाचा उताराच लागू पडणारा आहे. सत्याला सत्य आणि तेही विज्ञानाच्या कसोटीवर उतरणारे असेल तरच सत्य मानावे असा निर्वाळा बुद्ध तत्त्वज्ञानाने दिला आहे. म्हणून

ज्यांनी जपले विभाजनाचे तत्त्व
तेच आता निघालेच जगाच्या सफरीवर
कोलंबसाच्या इर्षेने

अशावेळी रुळलेली पायवाट मोडून नव्या विचारांना जन्म देणे अपरिहार्यच ठरते. हे कार्य बुद्धाने पार पाडलेले आहे. कारण बुद्धासमोर मानवी हिंसेचा इतिहास होता, इतिहासाच्या प्रत्येक पानावर मानवी रक्त सांडल्याचे भान होते आणि माणसाला संभ्रमात टाकणाऱ्या तत्त्वज्ञानालाही शह द्यावयाचा होता.त्यातूनच बुद्धाचा 'प्रत्युत्य समुत्पाद' जन्माला आला.सतत परिवर्तन हे विश्वाचे आद्य सत्य आहे. कोणतीही गोष्ट सतत अस्तित्त्वात येत असते आणि अस्तित्त्वातून जात असते.या मूलभूत सत्याला 'अनित्य' हे नाव आहे. ज्या परिस्थितीमुळे आणि कारणामुळे काही नवीन निर्माण होते त्यास समुदाय म्हणतात आणि बदलणाऱ्या परिस्थितीला निरोध म्हणतात.समुदाय आणि निरोध या विश्वव्यापी प्रक्रियेलाच प्रत्युत्यसमुत्पाद म्हणतात.त्यात अनित्याचे संदर्भ अंतर्भुत असतात.गांगुर्डे यांनी या संदर्भांना मुखरीत करण्याचा प्रयत्न केला आहे आणि मानवतावादाचे महन्मंगल सुत्त उभारले आहे. मात्र हे करीत असताना त्यांनी पूर्वसुरींचे अनुकरणही केले आहे. उदा.

ईश्वराची पूजा करीत नाही मी माणसाचे गीत गातो
माणसासाठी आयुष्य वेचतो
यशवंत मनोहर यांनी म्हटले आहे
शब्दांची पूजा करीत नाही मी माणसाचे गीत गातो
ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांचे हाती उजेड देतो (उत्थानगुंफा)

अशावेळी आपल्या कवितेतून अर्थाची नवी प्रतिती येत नाही याचे भान कवीने बाळगावयास हवे होते.'कधी तरी शब्दांनी गाणे गात फिरावे तेही जमले नाही' असा निर्वाळा कवीने दिला आहे.

उद्या सारी फुले झडून जातील आणि फुटेल नवी पालवी
जीवनाच्या नव्या उभारणीवर फुलू लागतील नवे विचार

अशा आशवादावर येऊन ही कविता स्थिरावली आहे.

दामोदर मोरे (जन्म ५ फेब्रुवारी १९५३) यांचा **अंगारलेणी** हा कवितासंग्रह या दशकाच्या शेवटच्या पर्वात प्रसिद्ध झाला. मात्र शीर्षकाप्रमाणे अंगार फुलवण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे असे वाटत नाही. कवितेविषयी भूमिका मांडताना या कवीने असे म्हटले आहे, की ''माणूस हा कवितेचा केंद्रबिंदू असला पाहिजे. माझ्या नजरेच्या नखांनी मी शब्द सोलून पाहिले तेव्हा जाती धर्माची टरफलंच दिसली. म्हणून मी माझ्या प्रज्ञा, शील, करुणेच्या बोटात मानवी मूल्यांचे

सर्जन आणि संरक्षण करण्यासाठी लेखणी धरली.त्यातून हिसकावून घेतलय जे आपलं ते हिसकावून घेणं हाच युगधर्म''[२४] असा उद्घोष मानवी हक्काच्या संदर्भात या कवितेने केला आहे. 'बुद्धाच्या अर्धोन्मिलित नेत्र पाकळ्यातून मानवतेचा गंध दरवळत राहणार' असा विश्वास असणारी ही कविता,

कविता म्हणजे। तंगतंग चोळी
अंग अंग जाळी । रसिकांचे

असा उद्घोष करते तेव्हा कोणत्या रसिकांसाठी ही कविता आहे असा प्रश्न उपस्थित होतो. फुले-आंबेडकरी कवितेचे स्वरूप तपासले असता ती 'तंग चोळी'सारखी असल्याचे कुठेही निदर्शनास येत नाही. सहवास गं भीमाचा, आंबेडकरी शतक, मार्टीन ल्युथर किंग, सम्राज्ञी (रमाई)सारख्या कविता लिहिणारा हा कवी आणि त्याची कविता मध्येच रोमँटिक वळण घेताना दिसते.उदा.

१. धुंद रात गंधवी मुग्ध मनी गारवा
अंग अंग मोहरवी उरी प्रित पारवा
विरह नितंब न साहिती रक्त तापले शिरी
गुलाबी गेंद दाहकती माझ्या मला उरी
मदन मारी मुसंडी रे, परी तू येशी केधवा

२. गोर गोरटे अंग चोरटे चोरटीच ही नजर
किती झाकशी अंगाअंगातरी ढळतसे हा पदर

३. लागले गं वेड मला, वेड असे नको लावू
वळूनी वळूनी पुन्हा, माझ्याकडे नको पाहू
तूच उरी डंख करी, रात्र लागे उसायला...
आतल्या आत मी, लागलो जळायला...

अशा स्वरूपाचा आविष्कार पाहिल्यानंतर कवितेविषयीच्या भूमिकेला तडे जातात आणि कवितेचे उद्दिष्ट्य हरवून जाते.आयुष्यावर भाष्य करताना कवीने म्हटले आहे.

आयुष्य... दु:खितांच्या वेदनेची ठणक नसलेल्या
किटुकल्या मराठी कवींच्या
बाष्कळ बिटुकल्या बातांसारखं..

सदर कवितेच्या बाबतीतही असेच म्हणता येऊ शकेल.

मनीष तपासे यांनी **स्थलांतर**मधून समकालीन जीवनाचे भेदक वास्तव सूचित केले आहे. स्थलांतर हे नव्या मुक्त अवकाशाच्या प्राप्तीसाठी आहे. नवेपणाच्या अनेक खुणा या संग्रहात आहेत. काही कविता आणि गझलामधून भावनिक आंदोलनेही हेलकावताना दिसतात.मध्यमवर्गीय मानसिकतेचे चित्र रेखाटण्याचाही प्रयत्न केला आहे. तर **खंडू अंढागळे** यांनी **आंधळ्याची काठी**मधून बेगडी लोकशाहीवर ताशेरे ओढले आहेत. 'संदर्भच बदलले अर्थाचे, ऋणानुबंध ओस पडलेत पडक्या गढीसारखे', अस्मिता हरविलेल्या भारतीय मानसिकतेचे दर्शन अंढागळे यांनी आपल्या कवितेतून घडविले आहे. **वसंत जामनिक** यांनी **आंबेडकरी गस्त**मधून सामाजिक जागृतीसाठी विचारांची गस्त घातली आहे.

पार्थिव अपार्थिव (१९९८) या संग्रहातील प्रकाश खरात यांच्या कविता चिंतनशील स्वरूपाच्या आहेत. सदर कवितेत मूल्यऱ्हास, स्खलनशीलता, घुसमट अशा जीवनातील वास्तवाचे प्रारूप वाचकांपुढे ठेवलेले दिसते.भोवताली पसरलेले प्रदेश नपुंसक असल्याची जाणीवही व्यक्त केली आहे.

नपुंसक प्रदेशात पाहतोय दोनच दोन दृष्ये

दैन्यात तोंड खुपसलेली डुकरे अथवा दु:स्वप्नांची शिखरे

अशा पार्श्वभूमीवर मनाची होणारी घुसमट अधिकच वाढत जाणारी असते कारण सभोवतीचे वास्तव विक्राळ स्वरूपात अस्ताव्यस्त पसरलेले असते.

जागतेपणाची सवय झालेल्या डोळ्यांनी
पाह्यलीयत आभुषणे व्यालेली श्वापदे
अथवा पहाटपक्ष्यांची नियोजित घुसमट

जगण्याचा प्रवाहच अवमानित झाला आहे. इथे मरणाच्या पात्यावरून चालावे लागते.बलिदानाने वाटचाल सिद्ध करावी लागते आणि मृत्यूच्या उन्हात गुलमोहर फुलवावा लागतो.अशा विषण्ण करून सोडणाऱ्या परिस्थितीत जगण्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होतात.अशावेळी अस्तित्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर हाताशी काळोखाशिवाय दुसरे काही लागत नाही.

अस्तित्वाचं उत्खनन करतोय / नि उचंबळत नाहीय जिवंत झरा
हे लढावू रक्त निवत तर नाहीय?/
सरोवरातील निरागस कमळांच्या झाल्यायत रक्तलांछित जिव्हा
ऐकतोय स्खलन एके स्खलनचा गजर
सृजनाला घडतोय मृत्यूप्रवास
प्रकाशरथाला तुझ्या नाकर्तेपणाची खीळ बसलीय
महाकाव्याचा उजेड दुर्लक्षिला गेलाय
अथवा वर्तमानाचा काळोख दाटलाय

'स्व'च्या अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर सामाजिक वास्तवाचे चित्रण वरीलप्रमाणे या कवितेतून स्पष्ट होताना दिसते.लढावू बाणा हरवला आहे. निरागसता चिरडली जाते, नाकर्तेपणा वाढला, सृजनाला वाव उरला नाही आणि वर्तमान काळोखाने व्यापलेले आहे. मन विषण्ण करणारे हे काळोखाचे वास्तव आहे. वर्तमान केवळ अंधारानेच व्यापलेला नाही तर तो अश्रूही ढाळतो आहे. भविष्य आकांत करते आहे.

रात्र बनलीय बृहन्नडा हिडीस जल्लोष करीत
दिवे तेवतायत लोचटपणे स्त्रवतायत पतन उजेड
घुसमटतोय विषकन्येच्या मिठीत

मूल्य ऱ्हासाच्या कड्यावर उभे असलेल्या, पतन पावलेल्या सांस्कृतिक काळोखाचे भेदक चित्रण प्रतिकात्म अभिव्यक्तीतून करण्यात खरात यांची कविता यशस्वी ठरली आहे. वैफल्यग्रस्त जीवनाचे दर्शनही ही कविता घडविते.

वैफल्यदिंडी गजर करीत चाललीय
नि व्यभिचाराची मैफल उत्तरोत्तर रंगतेय

त्यामुळे भणंग आयुष्याचा क्रुस मुकाटपणे वाहिला पाहिजे एवढेच वास्तव शिल्लक राहते.अस्तित्त्वाचे दिवे विझवून टाकणाऱ्या काळोखाने वेढल्यामुळे अशी स्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच मांगल्य भणंग होऊन वणवण फिरताना दिसते, अस्तित्त्वाचे शिंगरू मार्गस्थ रुळावरून येरझाऱ्यानी मरू घातले आहे. अशावेळेस माणसाला तारून नेणारा एकच मार्ग शिल्लक असतो तो बुद्धाचा असतो.

कुठल्याही दिशेनं सळसळोत नागिणी
कुठल्याही दिशेनं ओघळो नग्न विष
लढेन करुणेच्या शैलीनं
तथागतागत मनोस्तंभ उभा असल्यावर

अशाप्रकारे वैफल्यातून बाहेर पडण्याचा हा मजबूत मार्ग आहे. 'तुझी पताका हाती घेताना झुगारतोय अंधार संचित अन लडिवाळ वैफल्य' अशी एक खंबीर भूमिका कवितेने सद्धम्माबाबत घेतली आहे.

शशिकांत हिंगोणेकर यांच्या **युद्ध सुरू आहे** (१९९९) या कवितासंग्रहाच्या शीर्षकानुसार विचार केल्यास ते रणांगणावरील युद्ध आहे असे नव्हे. तर ते सामाजिक, सांस्कृतिक स्तरावरचे युद्ध आहे. कविता वाचल्यानंतर तसा प्रत्यय येतो.रणांगणावर शस्त्राच्या जागी शब्द ठेवून युद्ध जिंकता येत नाही याचे भान कवीला आहे.

शब्दांच्या काफिल्यात रमत नाही मन आता
शब्दांनी : भूक, अपमान, अत्याचार मिटत नाही आता
शब्दांच्या काफिल्यात होते शब्दांशीच खेळणे
आणि टळत नाही शब्दातच मरणे

हे भान असणे फार अगत्याचे आहे. शाब्दीक कृती आणि प्रत्यक्षातील कृती यात महदंतर असते.केवळ वाचिक कृती करून, भाषिक कृतीने युद्ध जिंकता येत नसते आणि कवितेने क्रांतीही होत नसते.मात्र कवितेने क्रांतीसाठी आवश्यक असणाऱ्या विचारांची पेरणी मनाच्या पातळीवर करता येते. म्हणून 'युद्ध सुरू आहे' असे म्हटले म्हणजे कवी हातात शस्त्र घेऊन रणांगणातच उतरला असे नव्हे! जे जे अमंगल, विदृप आहे, माणसाला नागविणारे आहे, विषमता, अमानुषता, पिळवणूक, शोषण विकृती या सर्वाच्या विरोधात एक भूमिका घेणे असा या युद्धाचा अर्थ आहे. मरणप्राय अवस्थेतही ओठांवर वादळाची गाणी असणे, सोबतीला उद्रेकाची भाषा असणे, ही या युद्धाची जबरदस्त आसक्ती असण्याची लक्षणे आहेत.

माझी ओळख कुणाला देऊ?
माझ्या काळजाच्या तळाशी अगदी खोल दडलेले आहे
सुरुंगाचे अस्वस्थ कोठार

मनाच्या पातळीवरील ही खदखदणारी स्थिती आहे. तिचा स्फोट होणे म्हणजे संतप्त, उद्रेकी प्रतिक्रियेसह क्षोभ व्यक्त करणे होय. वेदनेतूनच विद्रोहाचा उगम होत असतो.त्याची अभिव्यक्ती झाल्याशिवाय कवीमनाचे काळीज थंड होत नसते.मात्र त्यासाठीही प्रेरणास्त्रोत असावे लागतात.अन्यथा विद्रोहालाही निर्थकता प्राप्त होत असते.

मी माझ्या स्वप्नांचे झरे घेऊन केव्हाचा हिंडतो आहे
निळ्या पहाटेच्या भेटीसाठी केव्हापासूनचा अस्वस्थ आहे

म्हणून ही अस्वस्थता विसर्जित होण्यासाठी किंवा तिचे विरेचन होण्यासाठी तडफडणारी एक मनोवस्था येथे प्रत्ययाला येते आणि ती निळ्या पहाटेच्या शोधात निघते.कारण तिथूनच युद्धपवित्र्याचे प्रशिक्षण मिळू शकते. हे प्रशिक्षण पूर्ण झाले की मग बंद दरवाजे उखडून फेकणे, जुल्मी दरवाजे उखडून फेकणे, विनाशाचे केंद्रबिंदू उदध्वस्त करणे, विचाराचा अग्नी धगधगत ठेवणे, मुठ्ठी घटट आवळणे, अंधार कापून काढण्यासाठी सज्ज होणे, काळाचा हात हातात घेणे, मनातले तुफान गतिमान होणे, विद्रोहाचे पाणी पेटवणे, वादळ होणे अशा अनेकानेक कृतिशीलतेचा आवेग अनावर होत असतो. एका अर्थाने हे सर्व युद्धपवित्रे असतात त्याचवेळी शत्रू पक्षाकडून या युद्धपवित्र्यावर पाणी फिरवण्याचे कार्यही जोमात सुरू असते.याचे भान नसले की मग पराभव अटळ असतो.

ते आता छातीवर वार करणार नाहीत
पाठीत खंजीर खुपसण्याचे त्यांचे सराव सुरू आहेत
ते नतमस्तक होतील आपल्या पावलांवर
आणि नकळत पावलांच्या दिशाच बदलवून टाकतील

या शक्यता आजमावता आल्या नाही म्हणजे मग युद्धालाही काही अर्थ उरत नाही.याचे भान हिंगोणेकर यांच्या कवितेने योग्य प्रकारे राखले आहे.

विठ्ठल शिंदे (जन्म १२ एप्रिल १९५५) हे तसे चळवळीतील कवी. त्यांचे **हाळी, चित्तरकथा, रानगाणी** असे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या बहुतांश कविता ह्या गेय स्वरूपाच्या आहेत. 'हाळी' कवितासंग्रहात दलित कष्टकरी वर्गाला जागवणाऱ्या गेय कविता होत्या. 'सर्वसामान्यांना जागवणे हे त्यांच्या कवितेचे प्रयोजन असल्याने अभिव्यक्तीसाठी मुक्तछंदाऐवजी ते गेयतेला प्राधान्य देतात.त्यांची कविता माणसाला भिडते आणि बदलाला, संघर्षाला प्रवृत्त करते हेच त्यांच्या कवितेचे यश आहे'.

चित्तरकथा (१९९८) हे विठ्ठल शिंदे यांचे रमाबाई नगरातील हत्याकांडावर आधारित दीर्घ काव्य होय. ११ जुलै १९९७ रोजी घाटकोपर येथे हे दलितांचे हत्याकांड झाले.त्यात दहा लोक ठार झाले व ३६ जखमी झाले होते. पोलिसांचा हा अमानुष गोळीबार होता. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना झाल्यामुळे लोकांनी दृतगती मार्गावर उतरून रास्ता रोको केला.त्यावेळेस एस. आर. पी तुकडीचे प्रमुख मनोहर कदम व त्यांच्या साथीदारांनी हा गोळीबार केला होता आणि दहा निष्पाप दलितांची हत्या केली. याच घटनेची चित्तरकथा शिंदे यांनी सांगितली आहे. या दीर्घ काव्यातून बळी गेलेल्यांची करुण कहाणी सांगीतली आहे. त्याचवेळी हल्लेखोर पोलिसांचे क्रुर रूपही स्पष्ट केले आहे.

दया माया कसली त्यांना, ती पोलिसांची टोळी
हे पोलिस गुलाम इथले, जातीचे धर्मरुढीचे
हे हुजरे पोलिस इथले, हे वैरी हो न्यायाचे
अत्याचारी, थैमानाला, फासा पुरता टाका रे
समाज जोखा, दंड ठोका, पाऊल पुढेच टाका रे, हत्याकांड रोखा...

असे आर्जव जनतेला करतानाच संघर्षासाठी सदैव सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. **रानगाणी** (२०००) हा विठ्ठल शिंदे यांचा तिसरा कवितासंग्रह होय. यात त्यांनी स्त्री जाणिवा व्यक्त केल्या असून, ज्यांच्या जिवाचं रान झालय त्यांची व ज्यांनी जिवाचं रान करून आयुष्य उभं केलं त्यांच्याविषयीची गाणी लिहीली. भरडल्या गेलेल्या जिवांची करुण कहाणी या गाण्यांमधून सांगण्याचा प्रयत्न शिंदे यांनी केला आहे. विविध पातळ्यावर कष्ट उपसणारी, अनेक आघाड्यावर, जीवनाच्या रणांगणावर संघर्षरत असणारी स्त्रीरूपे या गीतांमधून प्रत्ययाला येतात. आंबेडकरांच्या जन्मापासून त्यांच्या कर्तृत्वापर्यंतचा एक प्रवासही येथे प्रत्ययाला येतो. आंबेडकरांच्या उदयामुळेच

जगतात दुर्बलांचा काळोख दाटलेला
झोपेत जागवाया आला उजेड आला

असे वर्णन केले आहे. बुद्धविहारात उल्हसित मनाने जाणाऱ्या, मनात बुद्धाचा विचार रुजविणाऱ्या स्त्रियांची मनोगते या गीतांमधून स्पष्ट झाली आहेत. आंबेडकर जयंतीसाठी बहिणीला माहेरी घेऊन जाण्यासाठी आलेला मुऱ्हाळीही येथे पाहावयास मिळतो.ज्योतिबा फुल्यांपासून सावित्रीबाई फुल्यांपर्यंतचा कर्तृत्वालेख प्रत्ययाला येतो.रानात कष्ट उपसणाऱ्या आदिवासी स्त्रियांना शिक्षणाचे भान आणून देण्याचे कार्य या गीतानी पार पाडले आहे. फुले आंबेडकरांनी शिक्षणाच्या वाटा खुल्या केल्या याचे भान इथे जागविलेले आहे.

फुले बाबासायबानी देऊनीया रेटा
खुल्या केल्या माहयासाठी शिकायच्या वाटा
कानी घे वं माय ध्यानी घे वं माय..
एकलव्य बिरसाची लेक वं तू हाई
गोंडवन पेटलेलं डोळ्यानं तू पाही
फाटकं वं खेटर तू नही आता गाय

स्त्रियांनी आपल्या जन्माचे सार्थक करावे असेही आवाहन करण्यात आले आहे. दलित पँथरची त्या काळातील अन्यायाच्या विरोधातील बंडखोर वृत्ती कशी होती याचाही प्रत्यय या रचनांनी दिला आहे. उदा.

बहिणीच्या अब्रुवर जर का हात नराधम टाकी
धावूनी येशी संकट काळी आमुची लज्जा राखी
बहिणीचे तुज लाख दुवे रे नेत्रातूनी झडले
नाते नवे जोडले रे पँथरा नाते नवे जोडले

एकंदरीत, विठ्ठल शिंदे यांची ही रानगाणी सामाजिक भानाचा पुरेपूर प्रत्यय देणारी आहेत यात काही शंका नाही.समाजमनाला चेतविण्याचे सामर्थ्य या गाण्यात आहे. आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात आंबेडकरी शाहिरांनी लोकप्रबोधनासाठी गाण्याच्या माध्यमातून फार मोठे योगदान दिले आहे. त्या परंपरेत मोलाची भर घालण्याचे कार्य विठ्ठल शिंदे यांच्या गीतांनी केले आहे असे निश्चित म्हणता येते.

✸ संजय प्रल्हादराव डोंगरे (जन्म २६ जून १९६८)

हीच ती वेळ आहे हा डोंगरे यांचा कवितासंग्रह २००० मध्ये प्रसिद्ध झाला. या कवितांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कवितांनी बुद्ध संस्कृतीतील मिथकांचा स्वातंत्र्याशी अन्वय लावून अर्थसमृद्धी घडवून आणली. सूचकता हा या कवितेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात 'कमंडलू'चा प्रत्यय सर्व देशवासियांना आला.रस्त्यावर उतरलेल्या धर्माने हिंसाचाराला खतपाणी घातले.बुद्धाच्या देशात हे जाणीवपूर्वक घडविल्या गेले.शांतता राखायची की हिंसाचाराला कुरवाळायचे, जळीतावर पाणी मारायचे की, फिनिक्स जन्माला घालायचा याचा निर्णय करण्याची वेळ आली आहे.

कमंडलू लटकते तेव्हा
सिद्धार्थ गौतम माझ्या मनात, मी तुमच्या मनात, तुम्ही देशात
अन देश राखेत तब्दील होत असते
म्हणून देशाने भान ठेवावे
सिद्धार्थ आणि बुद्ध यापैकी नक्की कोण? हे जाहीर करावे

गतप्राण झालेल्या निरपराधांचे आणि धर्मांधाच्या कुटील नितीचे बळी ठरलेल्यांचे काय? असे अनेक प्रश्न मूलतत्त्ववाद्यांच्या हिंसक कृत्यामुळे या देशात निर्माण झाले आहेत. मात्र त्यांची उत्तरे अद्यापही मिळालेली नाहीत, म्हणून या कवितेने विद्रोहाची एक विशिष्ट भूमिका घेतली आहे.

सूर्योदय झाल्याशिवाय
कोंबड्याच्या आरवण्यावर भरवसा ठेवू नये
सूर्य दिसेल या आशेने रात्र संपण्याची वाट पाहू नये
भाला उचलावा अन चांदण्यात खस्सकन खुपसावा

अंधाऱ्या पार्श्वभूमीवर प्रकाशाचा शोध ही इतरावर अवलंबून राहण्याची बाब नव्हे! त्यासाठी कोणाचीही वाट न पाहता स्वयंदीप होणे हाच जीवनाचा रास्त मार्ग असू शकतो.तोच बुद्धाने दाखविलेला मार्ग आहे. अंधारावर भाले उगारल्याशिवाय प्रकाशाचे डोळे किलकिले होऊ शकणार नाही, असेच या कवितेने सूचविले आहे. या देशात मूलतत्त्ववाद्यांच्या धर्मांध तत्त्वांची पायाभरणी डॉ. आंबेडकरांच्या उदयाच्या काळातच झाली. हिंदूराष्ट्रवादाची मांडणी याच काळात करण्यात आली. एकचालकानुवर्ती हुकूमशाही हेच मूलतत्त्ववादी रक्ताचे मानस आहे. मूलतत्त्ववादाचा उदय हा त्यांच्या मुक्तीचा दिवस असतो, स्वातंत्र्याचा दिवस असतो.म्हणून देशाच्या स्वातंत्र्याशी त्यांना तसे काही देणेघेणे नसते. त्यामुळे १९४७ आणि १९२५ मधला फरक समजून घेणे अपरिहार्य ठरते.एकीकडे स्वातंत्र्याने जनसामान्यांचा भ्रमनिरास केला आणि मूलतत्त्ववाद तर माणसाच्या मानगुटीवरच बसला आहे. स्वातंत्र्याच्या पन्नासीने काय साध्य केले असाच प्रश्न ही कविता उपस्थित करते. कारण स्वातंत्र्यानंतर अनेक प्रश्न निर्माण झाले.

नुकतीच मला स्वातंत्र्याची गोम कळायला लागली होती

तिचा मला पागल बनविण्याचा प्रयत्न
मी दारुत धुवून काढला
तिच्या भावाची खाकी हापपँट पाहूनही
मी सावरलो नव्हतो
आता कुठे कळलय तो १९४७ ऐवजी १९२५ साजरा करतो

मूलतत्त्ववाद्यांवर आणि एकाच देशात दोन राष्ट्रे निर्माण करू पाहणाऱ्या प्रवृत्तीवर वारंवार आघात करण्याचे काम या कवितेने केले आहे. त्याचबरोबर एका सांस्कृतिक संघर्षाची सूचनाही दिली आहे. 'संस्कृतीच्या रथाचे घोडे बदलायचे आहेत'. हा सांस्कृतिक संघर्ष नेटाने राबवायचा असेल तर हीच वेळ आहे, सांस्कृतिक बदलाच्या आरंभाची! हेच या कवितेने ठणकावून सांगीतले आहे.

वाळवंटाचे हज्जारो काफिले सरसावून
आमच्या वस्तीत शिरणाऱ्या पगडीकडे लक्ष असू द्यावे
समरसतेच्या सामसूमीवर विश्वास न ठेवता
थोडे थोडे आतून स्वत:ला तावून घ्यावे
वेळ केव्हाची येऊन ठेपलीय
आता अंधाराने अंधारावर जुलूम करू नये
अन् झाडांच्या बहरण्याला दृष्ट लावू नये
दोस्त हो, काळ आपल्या हातात आहे

सांस्कृतिक व्यभिचारांच्या अनेक जागांचा निर्देश वारंवार या कवितेमध्ये होताना दिसतो. जाणवं, खाकी चड्डी, खाकी हापपँट ही जणूकाही हिंदूराष्ट्रवाद्यांची प्रतिके ठरली आहेत. लोकशाही देशातील दुसऱ्या राष्ट्रनिर्मितीचे त्यांचे उद्योग पदोपदी प्रत्ययाला येतात. गावात लोकशाही नांदत नाही आणि जातियता प्रबळ ठरते. वक्रप्रवृत्ती सरळ तोंडाने भ्रष्टाचारात तोंड खुपसत असते अशा प्रवृत्तीवर व्यंगात्मक भाष्य ही कविता करते.उदा.

कुत्र्याची वाकडी शेपटी सरळ करण्यात
सारा गाव घामाघूम झाला
त्याच्या पीठ खाणाऱ्या तोंडाकडे कुणाचेच लक्ष नव्हते

आजच्या वर्तमानात योग दिनाचे नगारे पिटले जात आहेत. त्याला देशपाळीवर मोठी प्रसिद्धीही दिली जात आहे. हा विषय शैक्षणिक क्षेत्रात सक्तीचा करण्यात यावा यासाठी सत्तेने तत्परता दाखविली आहे. त्यातून भूकेचे कोणते प्रश्न कसे सुटणार हे मात्र अनाकलनीय आहे.

दीर्घ श्वास घेऊन प्राणायामाच्या पद्धतीने
मी हवा आत घेतली आणि
पोटात हवा भरल्याने भूक शमत नाही
या माझ्या सिद्धांताचा जन्म झाला

मूलभूत प्रश्न बाजूला ठेवून अर्थाअर्थी संबंध नसणाऱ्या गोष्टीचे स्तोम माजवायचे हाच सत्ताधाऱ्यांचा नियम आहे. प्रजेला निर्थक प्रश्नाच्या संभ्रमात ढकलून निर्धास्तपणे सत्तेचा भोग घेणे अशाप्रकारची ही राजनिती आहे. अशा राजनितीची बुरखेफाड करणे हे या कवितेचे एक उद्दिष्ट आहे.

स्वकीय जगाअंतर्गत दोषदिग्दर्शनही या कवितेने केले आहे. विशेषत: नेतेगिरीचे भ्रष्ट रूप उजागर केले आहे. बापदादयांपासून ही पोखरणारी आणि कोषात बंदिस्त झालेली नेतेगिरी जनतेच्या हिताला कधीही पोषक ठरली नाही.अशा निष्क्रीय नेतेगिरीवर या कवितेने भाष्य केले आहे. संकुचित मानवी वृत्ती, संशयखोर वृत्ती यावरही भाष्य केले आहे.

चळवळीला पडलेले खिंडार किंवा गटबाजीची दगाबाजी हा या पिढीचा आवडता विषय आहे. डोंगरे यांची कविताही याला अपवाद नाही.स्वार्थांध, दगाबाज आणि आत्मकेंद्री नेतृत्वाचा दुटप्पीपणा खालीलप्रमाणे उजागर होतो.

झुबकेदार लबलब हलणारी तुझी शेपटी
आणि निळ्या आकाशाशी नातं सांगणं
सायाचे हो, तुमचा हा कंपूप्रधान हल्ला
आतापर्यंत मी सहन केला..

दुसरीकडे दलितामधील मध्यमवर्गही आपल्या कोषातून बाहेर पडायला तयार नाही.

तुझी लुसलुस, चरित्रसंपन्नतेच्या वर्गात
तुझे आर्जव, डरकाळी व्हावे म्हणून
आणि तुझा प्रत्येक प्रयत्न शेपूट हलवीत
शिधा टिकवीत नोकरी सांभाळण्याइतपत

मध्यमवर्ग आपली चाकोरी मजबूत करीत अधिकाधिक आत्मकेंद्री झाला.त्याला सामाजिक भान राहिले नाही. हे त्याचे सामाजिक दुराचरण होय असे म्हणता येईल. आंबेडकरोत्तर चळवळीत नामांतर आंदोलन हा महत्त्वाचा टप्पा आहे. नामांतर आंदोलनाचे अनेक संदर्भ डोंगरे यांच्या कवितेत आहेत. नामांतर आंदोलनात गौतम वाघमारेचे आत्मदहन म्हणजे नामांतराचे रान पेटवण्याचाच प्रयत्न होता.पुढे नामांतराचे राजकारण करून दिल्लीपर्यंत पोहचलेल्या लोकांनी शेपूट घालून खुर्चीत बसणे पसंद केले. फुले आंबेडकरी कवितेत बाबासाहेब आंबेडकर हा प्रत्येक कवीचा आस्थेचा विषय ठरला आहे. आंबेडकरी जाणिवा माणसात कसा अमुलाग्र बदल घडवून आणतात याचा नमुना या कवितेने वाचकांपुढे ठेवला आहे.

आज मी जाणिवेने प्रेरित होऊन
संस्कृतीची ऐसीतैसी करतो
आजही बदलू न पाहणाऱ्या व्यवस्थेवर
भराभर उभ्याने मुतून
माझे नवीन निकष कर्मठांसमोर मांडतो
अर्थात हे सारं तुमचंच देणं आहे बाबासाहेब!

मात्र आत्मभान जागृत झाले म्हणून काही निर्धास्त राहून चालत नाही.उलट पुढच्या जबाबदाऱ्या अधिक मोठ्या असतात. प्राप्त परिस्थितीत भान जागृतीची सातत्यशीलता ठेवावी लागते. म्हणूनच सांस्कृतिक रणभूमीवर डोळ्यात तेल घालून सज्ज राहण्याचा आदेशच या कवितेने दिला आहे आणि सांस्कृतिक व्यभिचाराच्या कावेबाजपणावर करडी नजर ठेवली आहे!

समारोप

येथवर केलेल्या एकूण विवेचनाच्या आधारे एकत्रितपणे काही निष्कर्ष मांडता येतील. विसाव्या शतकातील शेवटचे दशक अनेक घडामोडींनी भरलेले आहे. त्याचे पडसाद या दशकातील कवितेत उमटले आहेत. या दशकाच्या सुरुवातीला झालेला बाबरी मशिदीचा विद्ध्वंस ही घटना या देशाच्या एकात्मतेवर दूरगामी परिणाम करणारी ठरली.फुले आंबेडकरी कवितेत जातीअंताचा विषय केंद्रवर्ती राहिला आहे. या दशकात हिंदुत्ववाद अधिक आक्रमक झाला.धार्मिक वसाहतवाद प्रबळ होत गेला.संक्रमण, स्थित्यंतर, दहशतवाद, धर्मांधता, दंगली अशा अनेकविध बाबींनी भारावलेल्या या काळाचा प्रभाव कवितेवर पडलेला दिसून येतो. शंभरापेक्षा अधिक कवितासंग्रह या दशकात प्रसिद्ध झाले आहेत. अरुण

काळे, दीपक त्रिभुवन, आनंद गायकवाड, अविनाश गायकवाड, माधव सरकुंडे, राम दोतोंडे, उत्तम अंभोरे, प्रज्ञा लोखंडे हे या दशकाने दिलेले महत्त्वाचे कवी होत.

अरुण काळे हा या दशकातील समर्थ कवी होय. स्वकीय भूमीवर धर्म आणि अराजकाचं अतिशय सुक्ष्म आणि अंतर्मुखतेनं मांडलेलं समाजलक्ष्यी चिंतन हा त्यांच्या कवितेचा मूळ गाभा आहे. ती जीवनावर भाष्य करते, सामाजिक मानसिकतेची चिरफाड करते, सामाजिक विसंगतीचे चित्रही स्पष्ट करते.नागवल्या गेलेल्या माणसाच्या महानतेचे तत्त्वज्ञान मांडून सांस्कृतिक काळेपणाच्या पार्श्वभूमीवर विचाराच्या उजेडाची, मानवतेच्या तेजस्वीपणाची पखरण या कवितेने केली आहे. आशयाच्या ठाशीवपणासह कलात्म परिमाण कवितेला प्राप्त झाले आहेत. पारंपरीक सौंदर्यतत्त्वे हास्यास्पद ठरवित माणसाचे गाणे गाणाऱ्या संस्कृतीचा उद्घोष केला आहे.

या दशकातील कविता क्रांती-प्रतिक्रांतीचा वेध घेणारी असून श्रमण संस्कृतीचा संघर्ष तिने चित्रित केला आहे. मानवमुक्तीचा विचार मांडतानाच कलात्मकतेचीही बूज राखली आहे. भावनिक प्रश्नात न अडकता जगण्याच्या संदर्भात काही मूलभूत प्रश्न मांडले आहेत. वंचितांची बाजू घेणारी राजकीय भूमिका मांडली आहे. सनातनी परंपरा आणि विज्ञाननिष्ठ भूमिका यांच्यातील एक जबरदस्त संघर्षनाट्य कवितेतून प्रत्ययाला येते. युद्ध हाच या कवितेचा धम्म आहे. उजेड पळवून नेणाऱ्या व्यवस्थेच्या संदर्भात ती बोलत राहते.काळोख-उजेड असा संघर्ष चितारते.उजेडाच्या निर्मितीसाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षासाठी सज्ज झालेले सामूहिक मन प्रत्ययाला येते. काळोखी वैऱ्यांना उजेडाच्या अस्त्राने नामशेष करण्यासाठी या कवितेने आगेकूच केली आहे.

आत्मटिका हा या कवितेचा विशेष प्रकर्षाने जाणवतो. आंबेडकरी चळवळीचा इतिहास, सामर्थ्य आणि मर्यादा, समकालीन दलित मध्यमवर्गीय मानसिकता याचा वेध घेतला असून, आत्मटिकेला धिटपणे सामोरे जात स्वकीय जगातील दोष उघड्यावर मांडताना या कवितेला भिती वाटत नाही. स्वेतरांच्या जगाला जशी ती ताकदीनीशी उघडेनागडे करते तशी स्वकीय जगाच्या बाबतीतही वर्तन करताना दिसते.आंबेडकरोत्तर काळात अपयशी ठरत गेलेले राजकारण हे या कवितेचे केंद्र आहे. तडजोड करणाऱ्या प्रवृत्तीवर ती सडेतोडपणे टिका करते. आंबेडकरोत्तर काळात वाढीस लागलेल्या व्यवहारवादाचे स्पष्टीकरण या कवितेने केले आहे. षंढयुगाचे आणि बांडगुळी उत्पादनाचे युग अवतरल्याची सूचना दिली आहे. क्रांतीचे वारे उलटे वाहात गेल्यामुळे वाट्याला आलेल्या वैफल्याचे दिग्दर्शन केले आहे. मोर्च्यांने गल्ली बदलल्यामुळे झालेल्या विविध परिणामाची चर्चा केली आहे. दुभंगलेपणाची स्थिती स्पष्ट केली आहे. समकालीन राजकीय ऱ्हासाचे आकलन मांडले आहे.

दंगल, दहशत, दडपशाही, दांभिकता या वास्तवाचे भयकारी दर्शन घडवून क्रुर अधिसत्तेचा भयसूचक चेहरा वाचकांपुढे ठेवला आहे. आतंकवादाची मूळं जात, धर्म, सत्ताकांक्षा आणि भूक या घटकातच सामावली आहेत असा विचार मांडला आहे. अतिशय प्रभावीपणे मूलतत्त्ववाद आणि आतंकवादाचे शवविच्छेदन केले आहे. रामजन्मभूमी, रथयात्रा, दंगली, झुंडशाही यामुळे निष्पापांचे गेलेले बळी या वर्तमान सत्यावर प्रकाश टाकला आहे. दहशतीचा विशेषत: हिंदुत्वाच्या नावावर माणसाच्या रक्ताची चटक लागलेल्या कत्तलखोर मानसिकतेचा आणि त्यांच्या कृतिशीलतेचा समाचार घेतला आहे. मूलतत्त्ववादी प्रवृत्तीचे दहशतवादी वास्तव स्पष्ट केले आहे. सांस्कृतिक विघटन अणि धार्मिक वर्चस्ववाद्यांच्या थैमानाचे वर्तमान अधोरेखित केले आहे. भारतीय सामाजिक, राजकीय व्यवस्थेने शोषित पिडिताना अधिकाधिक बरबाद करण्यासाठीच गनिमी काव्याचा वापर केला आहे. हे स्पष्ट करून वर्तमानातील गनिमी मूलतत्त्ववाद्यांचा चेहरा वाचकांपुढे ठेवला आहे. मूलतत्त्ववाद्यांवर आणि एकाच देशात दोन राष्ट्रे निर्माण करू पाहणाऱ्या प्रवृत्तीवर वारंवार आघात करणे, सांस्कृतिक व्यभिचाराच्या अनेक जागांचा निर्देश पुन:पुन्हा करणे, त्यांच्या कावेबाजपणावर करडी नजर ठेवणे असे कार्य या कवितेने पार पाडले आहे.

बेसुमार दारिद्रयात खितपत पडलेल्या भीषण भूकेचे विदारक वास्तव या कवितेतून प्रत्ययाला येते.या देशातील

बालपण, तारुण्य, म्हातारपण उपाशीच आहे. या देशाने ते कसे कायम ठेवले आहे अशी वास्तवता अधोरेखित केली आहे. मुस्लिम, आदिवासी कवितेनेही फुले आंबेडकरी कवितेशी अनुबंध जोडला आहे. त्यात माधव सरकुंडे, जावेद कुरेशी, उषाकिरण आत्राम यांचे योगदान महत्त्वाचे आहे. देव आणि दैववादाला नकार देणाऱ्या या कवितेने स्थितीशीलता आणि गतीरुद्धतेला नाकारणाऱ्या जाणिवा प्रकट केल्या आहेत. इतिहासाचे एक विश्लेषण दिले आहे. ऐतिहासिक, तात्त्विक मीमांसा करताना प्रतिकात्मतेचा आधार घेतला आहे. या कवितेच्या दृष्टिपटलावर दु:खितांचे मनोगत उमटले आहे. या कवितेने व्यभिचारावर कर्मविपाकाची वस्त्रे पांघरणाऱ्या समाजमनाचे पितळ उघडे पाडले आहे. जगण्याची बाराखडी शिकतानाच युद्धाची कला शिकण्याचे आवाहन केले आहे. आदिवासी जगण्याचा भेदक आविष्कार करताना, नितीमत्ता हरविलेल्या समाजमनाचा कानोसा घेताना, समकालीन चळवळीचे स्वरूप तपासताना ही कविता अधिकाधिक चिंतनशील होत जाते. स्वातंत्र्याच्या अर्धशतकाचा ताळेबंद मांडताना वाचकांना अंतर्मुख करते.

फुले आंबेडकरी मुस्लीम कविता मुस्लिमांमधील दलितांची व्यथा वेदना आणि उपेक्षेसह सांस्कृतिक संघर्ष छेडते. धर्मासाठी समाजाला वेठीस धरायचे आणि समाजवास्तव नाकारायचे असे आलिम प्रवृत्तीचे बेदरकार पैलू या कवितेत प्रत्ययाला येतात. मुस्लिमांमध्ये जातीव्यवस्था तीव्र असल्याचे वास्तवही स्पष्ट होते. एका नव्या युद्धाची घोषणा करणाऱ्या या कवितेने म.पैगंबर, म.फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्त्वांचे अधिष्ठान असणाऱ्या नवसमाजनिर्मितीची स्वप्ने पाहणारा आशावाद जोपासला आहे. मुफालिसांचा वेदना आलेख मांडला आहे.

दलित आत्मकथनाचा मूलव्यूह स्वीकारून फुले आंबेडकरी कविता साकार झाली आहे. जातीव्यवस्थेच्या आर्वतात सापडलेल्या समूहजीवनाची, त्याच्या अटळ दु:खाची कहाणी तिने सांगितली आहे. वर्णव्यवस्थेच्या आवारात बिना वहाणेने वावरणाऱ्या समाजाचे चित्र रेखाटले आहे. वाडा व शेती आणि झोपडी व सागळ अशा दोन सांस्कृतिक जगातील अंतर्विरोध स्पष्ट केला आहे. भूतकालीन अंधाऱ्या इतिहासाचे व्यवस्थेकडून केले जाणारे आघात आणि स्वकीयांच्या जगाचे मनावर होणारे आघात यातून गोची झालेले मन व्यक्त झाले आहे. चिंतनगर्भता, प्रतिकात्मकता, अर्थाची व्यामीश्रता, अनेकार्थता असे विशेष प्रत्ययाला येतात.

फुले आंबेडकरी कवितेत विद्रोह उपरेपणाने येत नाही, तर तो कवितेची आणि आशयाची गरज म्हणून येतो. ही कविता दु:ख मांडून थांबत नाही तर दु:खावरचा उपाय सुचविते. ती जातीसमूहापुरती मर्यादीत राहात नाही. पुनर्मूल्यमापनाची मागणी करते. समताधिष्ठित समाजनिर्मितीचा आराखडा मांडते. या कवितेतून तथागताच्या करुणेचा सुप्त प्रवाह वाहताना दिसतो.भारतवर्षांतील अस्पृश्यतेविरुद्ध बाबासाहेब आंबेडकरांनी उठवलेला आवाज आणि काळ्या लोकांची (आफ्रो अमेरिकन) क्रांती यांचे नाते जुळते असा विचार मांडला आहे. या कवितेतील संवेदनशील मनाचेआक्रंदन अंतर्मुख करणारे आहे. लोकशाही ते हिंसाचार, भोवतालाचे निरीक्षण आणि उदध्वस्त झाल्यामुळे प्रकटणारा संताप कवितेतून व्यक्त झाला आहे. दीर्घ अवकाश पेलणारा चिंतनाचा आवाका आणि जीवनासंबंधीचे ठोस आणि भयावह वास्तवाचे व्यापक भान या कवितेतील शब्दकळेतून प्रकट झाले आहे. प्रचलित राजकारणावर स्फोटक भाष्य केले आहे. दवंडी आणि लिलावाच्या भाषेतून दंभस्फोटक अभिव्यक्ती झाली आहे. पारंपरीक मूल्यव्यवस्थेला हास्यास्पद ठरविणारा विद्रोह प्रकट झाला आहे. उद्विग्नतेतून भाषिक आविष्कार झाला आहे. कार्यकर्त्याच्या द्विधा मानसिकतेचे चित्र साकारताना स्वप्नाळू आदर्श सांगण्यापेक्षा अव्याहत संघर्षाची अपरिहार्यता सांगणे या कवितेला महत्त्वाचे वाटते. 'आहेरे'च्या मुजोर मस्तवाल जगाविरुद्धचे युद्धपवित्रे आणि संघर्षाची विविध रूपे चितारून या कवितेने वंचितांच्या दुनियेला संघर्षसन्मुख केले आहे. बोलभाषेतील विद्रोह कसा प्रखर असतो हे ही दाखवून दिले आहे. वक्तृत्वपूर्णता, बोलभाषिक प्रबळता, आशयाची सघनता यामुळे या कवितेचा नवा चेहरा सिद्ध झाला.

तत्त्वज्ञानाच्या तार्किक भाषेत संवाद साधणाऱ्या या कवितेने झुंडीच्या मानसिकतेला जन्म देणाऱ्या सत्ताबाह्य सत्ताकेंद्राचा शोध घेतला आहे. भाषिक कृतीचे विधान अधिक जोरकसपणे गती आणि अधोगतीचे वास्तव सूचित करते. तहाची भाषा आणि फितुरीचे व्याकरण या गोष्टींनी सामाजिक सांस्कृतिक जीवनाचा घात केला म्हणूनच गद्दार प्रवृत्तीला

सुरुंग लावणारी भाषा या कवितेत अवतरते. दुश्मनी आणि फितुरी, गनिमी कावा आणि उघड दुश्मनी, प्रलोभने आणि आव्हाने, भावनिकता आणि कठोरपणा अशी अनेक विरोधके या कवितेत प्रत्ययाला येतात.

दलित व्हाईट कॉलरवाल्यांची पेचदार अवस्था ही कविता स्पष्ट करते. आंबेडकरोत्तर काळात जयंत्या, मयंत्या आणि विभूतीपूजा यांचे अवडंबर माजवण्यात आले. अशा पाखंडीपणावर ती आघात करते. सम्यक क्रांतीच्या रणांगणावर आंबेडकरी विचारांच्या तोफा आणताना युद्धभूमीला पाठ दाखवू नका असे स्वकीयांना आवाहन केले आहे. डोळ्यात तेल घालून सज्ज राहण्याचा आदेशच दिला आहे. प्रस्थापितांनी सनातन भात्यातील विषारी बाण संविधानाच्या पायावर ठेवून वैश्विक व्हावे अशी आकांक्षा या कवितेने व्यक्त केली आहे.

बुद्ध संस्कृतीतील मिथ्स, नजिकच्या इतिहासातील प्रतिमा उदा.तक्षक, अमृतनाक, सिधनाक, रमाई या साऱ्या प्रतिमा आपल्या सामर्थ्यासह साकार होतात. आशयसमृद्धी आणि आशयविस्तारासाठी मिथकांचे उपयोजन झाले असून संघर्षसिद्धीसाठी सामर्थ्य आणि पराक्रमाचे स्मरण करून देण्याचे कार्य या मिथकांच्या माध्यमातून झाले आहे. एकलव्य, शंबूक, चोखामेळा या सर्व मिथकीय नायकांनी बदलत्या काळात विद्रोह केला आणि आपले स्थान नव्याने प्रस्थापित केले अशा अर्थाचा निर्देश या कवितांनी केला आहे.

पतन पावलेल्या सांस्कृतिक काळोखाचे भेदक चित्रण प्रतिकात्मक अभिव्यक्तीतून करण्यात आले आहे. सदधम्माबाबत खंबीर भूमिका घेतली आहे. प्रतिकांच्या माध्यमातून समकालीन जीवनाच्या संदर्भात विपरीत किंवा नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. उपरोध उपहास हा या कवितेचा स्थायी भाव असलातरी अनुभूतीचे कलात्म आविष्करण हे या कवितेचे प्रबळ तत्त्व आहे. अनुभवाकडे तठस्थपणे पाहण्याच्या वृत्तीमुळे ही कविता अधिक पिळदार झाली आहे. प्रज्ञासूर्याला अभिप्रेत असलेल्या समाजनिर्मितीचा ध्यास आणि ध्येय या कवितेने उराशी बाळगले आहे.

काही कवींनी वेगवेगळे आकृतीबंध हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. सवालजवाब रचनेचा आकृतीबंध स्वीकारून शील आणि चारित्र्याचे महत्त्व सांगीतले आहे. जात्यावरच्या गाण्यासारखीही रचना केली आहे. वऱ्हाडी बोलीचेही उपयोजन केले आहे. विविध गेय रचनांमधून शिक्षणाचे महत्त्व, तथागताचा विचार, स्वातंत्र्य इ.अनेक विषय या रचनांच्या केंद्रस्थानी आले आहेत. बुद्धाच्या देशात हिंसेने घातलेले थैमान, राजकारण्यांची बदमाशी, सत्तेच्या खुर्चीभोवतीची लाचारी, स्त्रियांवरील अत्याचार, असुरक्षितता हे सारे वास्तव मुखरीत झाले आहे.

फुले आंबेडकरी कवितेत स्त्री जगताची वेदना मुखरीत झाली आहे. दलित, आदिवासी, वडार, कोल्हाटी, देवदासी, वेश्या अशा स्त्री जगताची भळभळती वेदना प्रकट झाली आहे. या कवितेने सांस्कृतिक संचिताचे अनौरस रूप दिग्दर्शित केले आहे. कवयित्रीच्या कवितांनी एक वेगळे अनुभवक्षेत्र व्यापले आहे. स्त्रियांची कविता स्त्रीजगताचे आत्मभान जागृत करते. धर्माच्या आणि पुरुषी व्यवस्थेच्या जाळ्यात अडकलेल्या स्त्रीजातीच्या दु:खाला शब्द देण्याचा प्रयत्न केला आहे. सनातनत्वाची जोपासना करू पाहणाऱ्या कावेबाज शक्ती आणि प्रवृत्तीची पोलखोल करणे हे या कवितेचे महत्त्वाचे कार्य आहे. स्त्रीच्या जगण्याला निर्थकता प्राप्त करून देणाऱ्या निर्ढावलेल्या मूल्यांचा वेध घेतला आहे. तसेच स्त्रीमुक्तीच्या उद्गात्यांना देवत्वाच्या मखरीत बसवू पाहणाऱ्या सनातन व्यवस्थेच्या मानसिकतेचा, धर्माच्या आवरणाखाली बाईला दडपून टाकणाऱ्या समकालीन वास्तवाचाही वेध घेऊन स्त्रीजगताचे सांस्कृतिक भान जागवले आहे. देव-धर्म, स्मृती- श्रुती व्यवस्थेने पावलोपावली उभारलेले तुरुंग, कावेबाज वाटा, गनिमी रस्ते इ.सर्व गोष्टींचे कधी सूचक तर कधी स्पष्ट आणि परखड विवेचन केले आहे. ऱ्हासकालीन आणि सामाजिक सांस्कृतिक वास्तवाचा फार मोठा परिणाम या कवितेवर झाला आहे.

दलित चळवळ आणि नेतृत्त्वाने समष्टीशी असलेला नातेसंबंध तपासून पाहिला नाही अशी खंत या कवितेने व्यक्त केली आहे. शहरी वस्त्र पांघरलेल्या प्रदेशातील जाणीव केंद्रात आपले बस्तान बसविणाऱ्या प्रवृत्तीचा ठळक निर्देश केला आहे. जन्ममत्यूच्या प्रवासात दु:खाची साथसोबत करणाऱ्या असोशी स्त्रीत्वाचे जिवंत चित्र या कवितेने साकार केले

आहे. स्त्रीकडे भोगाची वस्तू म्हणून पाहणाऱ्या व्यवस्थेची वखवख, पुरुषातील पशुत्व आणि पुरुषी शोषक क्षेत्राचे स्वरूप धिटाईने उघड केले आहे.

या कवितेने आदिम स्त्रियांचे आत्मभान जागविण्याचा प्रयत्न केला आहे. बुद्धाचा विचार कानामनात भिनविण्याचा प्रयत्न उषाकिरण आत्रामसारख्या कवयित्रीने केला आहे. एकजुटीचे तत्त्वज्ञान, संघर्षशक्तीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पेटण्या जाळण्याचे तत्त्वज्ञान पेरण्याचे काम केले आहे. आदिम स्त्रीच्या जगण्याचे भेदक वास्तव मांडले आहे. सूर्याचे वारसदार असल्याचे घोषित केले आहे. रानातल्या स्त्रीची होणारी अवहेलना कथन केली आहे. स्त्रीजगत आणि पुरुषी व्यवस्था असे द्वंद्व साकारले आहे.

स्त्रियांच्या कवितांनी अनुभवक्षेत्राच्या व्याप्तीसह कवितेतील भाषिक कृतींनी समर्थपणे अर्थप्राप्ती घडविली आहे. पौराणिक मिथकांना फुले आंबेडकरी जाणिवेतून नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. प्रतिमा संघटनातून बेगडी परिवर्तनवाद्यांवर प्रखर भाष्य केले आहे. नवप्रस्थापित आणि त्यांचे मठ यांना नकार देणारी डोळस जाणीव व्यक्त केली आहे. पारंपरीक संस्कृती आणि समकालीन वास्तव याची सांगड घालून सांस्कृतिक अंतर्विरोध स्पष्ट केले आहेत. गुलामीत जखडून ठेवणाऱ्या संकल्पनांबददल संतप्त भावनांना वाट मोकळी करून दिली आहे. पुरोगामीत्वाच्या नावाखाली गुलामीचे अलंकार सजविणाऱ्या प्रवृत्तीवरचे स्फोटक भाष्य केले आहे.

या कवितेचा महत्त्वाचा विशेष म्हणजे वेदनांचे आभाळ मनावर कोसळले म्हणून स्त्रीमन आगतिक किंवा परागंदा होत नाही तर स्त्रीसुलभ अनुभूतीला संघर्षशील विचारप्रणालीशी जोडून नव्याच अर्थाची प्रतिती घडविते. वैश्विक पुरुषी प्रवृत्तीचा वेध घेणाऱ्या या कवितेचा आविष्कार पूर्वसूरीच्या स्त्रीवादी आविष्कारापेक्षा वेगळा आहे. हुंदक्याला वाट मोकळी करून देतानाच नव्या पहाटेचा ध्यास आणि हव्यास या कवितेने उराशी बाळगला आहे.

काही कवितांमधून हिरवळीचे ऋतू आपल्यापर्यंत पोहचू दिले नसल्याची तक्रार मांडली आहे. जुलमी परंपरेचे निशाण फडकावून नाच करणाऱ्या प्रवृत्तीचे चेहरे ओरबाडून काढण्याचा चंग या कवितेने बांधला आहे. पुरुषी गनीमी चालीची चाहूल लागल्यामुळे कोंडी झालेले मन बांध फोडून प्रकट होते.तेव्हा रस्त्यावर उतरण्याची भाषा अपरिहार्यपणे या कवितेतून व्यक्त होते. पाश्चात्यांच्या शरीर अंगाने विकसीत होत गेलेला स्त्रीवाद जिथे स्त्रीयोनीच नाकारली गेली आहे तिथे कसा काय लागू करता येईल असा प्रश्न उपस्थित करून तथाकथीत स्त्रीवादाने अंतर्मुख व्हावे असे सुतोवाच या कवितेने केले आहे.

■

संदर्भ सूची

■

१. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, जातीसंस्थेचे उच्चाटन
२. **नागनाथ कोतापल्ले**, (मलपृष्ठावरील मजकूर) सायरनचे शहर, अरुण काळे, १९९७
३. **गंगाधर पानतावणे,** (प्रस्तावना) भीमाचे गोंधळी,
नारायण जाधव येळगावकर, १९९४
४. **बाबुराव बागूल**, (प्रस्तावना) सीमा सरकताहेत, गंगाधर अहिरे
५. **शरणकुमार लिंबाळे,** (प्रस्तावना) कफन, भरतकुमार दहिहंडे, १९९१
६. **गंगाधर पानतावणे,** (प्रस्तावना) उन्हातलं झाड, भगवान भोईर, १९९२
७. **डी. बी. रत्नाकर**, (मनोगत) हॉटेल माझा देश, १९९२

८. **डी. बी. रत्नाकर,** हॉटेल माझा देश, (प्रस्तावना) १९९२
९. **उषाकिरण आत्राम,** (मनोगत) म्होरकी, १९९७
१०. उक्त
११. **मोतीराम कटारे,** (मनोगत) शतकान्ताच्या क्षितीजापार, १९९९
१२. **मोतीराम कटारे,** फुले आंबेडकरी प्रेरणेचे नवे कवी नवे आकलन, पृ १६८
१३. **अरुण काळे,** ग्रंथसंगत, जानेवारी २००३, संपादक दिलीप स्वामी
१४. **नेताजी पाटील**, जनपरिवार, २७ सप्टेंबर १९९९
१५. **भा. ल. भोळे,** साहित्यसंगम, सप्टेंबर १९९९
१६. **नागनाथ कोतापल्ले**, साहित्यसंगम, सप्टेंबर १९९९
१७. **दामोदर मोरे**, (प्रस्तावना) टेहळणी, गंगाधर मेश्राम, १९९४
१८. **वि. वा. शिरवाडकर,** (प्रस्तावना) याही मोसमात, कैलास पगारे, १९९४
१९. **राहूल वानखेडे,** (भूमिका) व्यवस्थाविद्ध्वंस, १९९६
२०. **रमेश देशभ्रतार**, (माझी भूमिका) वणव्याची धग, २०००
२१. **केशव मेश्राम,** (प्रस्तावना) वणव्याची धग, रमेश देशभ्रतार २०००
२२. **दामोदर मोरे,** माझी कविता माझी काव्यदृष्टी, अंगारलेणी २०००
२३. **मोतीराम कटारे**, मलपृष्ठावरील मजकूर- चित्तर कथा, विठ्ठल शिंदे, १९९८

एकविसाव्या शतकाच्या पाऊलखुणा

पार्श्वभूमी

या दशकातील कवी आणि कविता

युवराज सोनटक्के । कैलास भाले । राजेंद्र गोणारकर । मंगेश बनसोड । महेंद्र गायकवाड
मारोतराव जाधव । दिगंबर झाडे । उत्तम पवार । अशोक इंगळे । विनोद बुरबुरे
ना. तु. पोघे । रमेश बोर्डेकर । सर्जेराव चव्हाण । आदिनाथ इंगोले । महेंद्र भवरे
मच्छिंद्र चोरमारे । उत्तम अंभोरे । प्रदीप जाधव । अविनाश गायकवाड । रोहन नागदिवे
शेषेराव पिराजी धांडे । शिवा इंगोले । केतन पिंपळापुरे । सिद्धार्थ तांबे । अरुण काळे
शांताराम हिवराळे । कृष्णा निर्मळे । वैभव सोनारकर । दीपध्वज कासोदे
किशोर मेढे । सुनिल अवचार । मोहन शिरसाट इत्यादी.

कवयित्रींच्या कविता

प्रज्ञा दया पवार । हिरा बनसोडे । विमल वाघमारे । आशालता कांबळे । उमा गवई
उषाकिरण आत्राम । शांता का. पवार । माया वासनिक – गेडाम । कमल कदम
संध्या रंगारी । कविता मोरवणकर । श्यामल गरुड इत्यादी.

आंबेडकरी गझल

वामनदादा कर्डक । भाऊ पंचभाई । गौरवकुमार आठवले । डी. बी. रत्नाकर
प्रमोद वाळके । सिद्धार्थ भगत इत्यादी.

समारोप

प्रकरण : ५

दलित कविता - एकविसाव्या शतकाच्या पाऊलखुणा

पार्श्वभूमी

एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकाची कविता ही अनेक अर्थांनी महत्त्वाची ठरली आहे. जागतिकीकरणाच्या समाजजीवनावरील अनिष्ट परिणामाची प्रखर जाणीव या दशकाच्या कवितेनेच करून दिली आहे. या दशकाचा नजिकचा वर्तमान हा भारतीय संदर्भात माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनाचा आहे. तसाच तो धार्मिक उन्मादाचा आहे. मूलतत्त्ववाद्यांच्या उन्मादाचा आहे. तसाच तो शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचाही आहे. त्यावर वरकडी करण्याचे काम खाजगीकरण, आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरण या प्रक्रियेने केले आहे. त्यामुळे दलित बहुजनाचे अस्तित्व धोक्यात आणून कष्टकऱ्यांना, सामान्य माणसाला भिकेस लावण्याचे काम नजिकच्या वर्तमानाने केले आहे.

या काळात दलित या संज्ञेच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित करण्यात आले. ते दलित ही संज्ञा नाकारण्याच्या संदर्भातील आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्म स्वीकारला. धम्मस्वीकारानंतर, आंबेडकरोत्तर काळात साहित्याच्या प्रांतात बौद्ध साहित्यसंमेलने झाली. परंतु त्याला बौद्ध धर्मियांचे संमेलन असे स्वरूप प्राप्त झाले. ही एक कोंडीची अवस्था होती. ती कोंडी फोडण्यासाठी आणि व्यापक परिणाम साधण्यासाठी दलित ही संज्ञा स्वीकारण्यात आली. विचारमंथनातून दलित या संकल्पनेला एक नवा अर्थ प्राप्त करून देण्यात आला. दलित ही संज्ञा, दलित जाणिवा, दलित साहित्याचे तत्त्वज्ञान, दलित साहित्याची व्याख्या, दलित साहित्याचे स्वरूप, वैशिष्ट्ये यासंबंधीचे सिद्धांतन करण्यात आले. याचा अर्थ एखादी संज्ञा संकल्पना स्वीकारताना त्याचे सिद्धांतन होणे अपरिहार्य ठरते. त्यामुळे दलित कवितेचा इतिहास लिहिताना ही संज्ञा कशी टाळायची हा एक ऐतिहासिक पेच ठरतो.

ही संकल्पना नाकारण्यामागे काही सांस्कृतिक कारणे आहेत. तिकडे अमेरिकेत काळ्या लोकांनी त्यांना अपमानास्पद ठरविणाऱ्या संकल्पना झुगारून दिल्या आहेत. त्यांनी nigro मधील n कॅपिटल लिहिला जावा यासाठीही अनेक वर्षे संघर्ष केला. त्यांनी 'ब्लॅक इज ब्युटीफुल' हे तत्त्वज्ञान मांडले. पुढे त्यांनी निग्रो हा शब्दही झिडकारून लावला. ब्लॅक लिटरेचरला आज आफ्रिकन अमेरिकन या नावाने ओळखले जाते. अशीच वृत्ती दलित साहित्याच्या प्रांतातही बळावलेली दिसते. त्यामागचे एक कारण असेही आहे, की संघाची एक विंग असणाऱ्या समरसता मंचाने पर्यावरण दुषित केले. दलित साहित्याच्या प्रांतातील काही लोकांनी आंबेडकरी विचारमंच सोडून समरसतेच्या व्यासपीठावर जायला सुरुवात केली आणि आम्ही तिथे जाऊन फुले आंबेडकरांचाच विचार मांडतो असे टेचात सांगायला सुरुवात केली. दलित साहित्याच्या प्रांतातील कुंपणावरचे, कुंपणाच्या काठावरचे असेही लोक समरसतेच्या व्यासपीठावर जाऊन धडकले. आंबेडकरी अनुयायांनी त्यांच्या दुटप्पीपणावर आसूड ओढले. त्यांच्या भूमिकेवर शंका उपस्थित करण्यात आली. त्याचबरोबर दलितत्व ही स्थिती आहे. ती झुगारून दिली पाहिजे अशा विचारप्रवाहाने जोर धरला. त्यातूनही दलित

ऐवजी आंबेडकरी, फुले आंबेडकरी अशा संकल्पनांचा उद्घोष होऊ लागला. त्यामुळे दलित हा शब्द नाकारण्याची प्रवृत्ती जोरकसपणे वाढीस लागली.मात्र पर्यायी संज्ञा संकल्पनेच्या संदर्भात सैद्धान्तिक मांडणी झालेली नाही.त्यामुळे तुर्तास दलित किंवा फुले आंबेडकरी कविता अशी संज्ञा स्वीकारणे अपरिहार्य ठरते.

दलित वा फुले आंबेडकरी कविता जाणिवेमुळेच आशयघन झाली आहे. आंबेडकरी ज्ञानशक्तीमुळे अभिव्यक्तीचे साधन आणि सामर्थ्य प्रकट करणारी जाणीव आत्मभानामुळे स्पष्ट होते. कवितेच्या आविष्काराची बैठक आत्मशोधामुळे तयार होते. आत्मशोधामुळे अनुभूतीमागे असणाऱ्या कार्यकारणभावाचा शोध घेतला जातो. जाणिवेमुळेच नकाराचा आशय प्राप्त होतो. प्रतिकाराचे आंबेडकरी तत्त्वज्ञान हेच विद्रोहाच्या निर्मितीचे आदिकारण ठरले आहे. मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी हा विद्रोह असल्यामुळे रचनात्मकता, विधायकता हे विशेष विद्रोहाला प्राप्त झाले आहेत. विचारांच्या पाठबळामुळे ही कविता भावविवश होण्याऐवजी ती विचारसौष्ठवाची कविता ठरली आहे.

या काळाचे सामाजिक, सांस्कृतिक वास्तव असे दिसते की, भारतीय समाज बहुजिनसी आणि बहुजातीय आहे. जातीबद्ध समाजातील एक विशिष्ट संवेदना हा सामाजिकतेताच एक भाग असतो. जातीव्यवस्था ही शोषणव्यवस्था आहे. तिचे मूळ वर्णव्यवस्थेत आहे. भारतीय मानसिकता विभाजनप्रिय आहे. जातीतील अभिजन आणि राजकीय नेत्यांनी मिळून राजकारणातही प्रभावशाली जातीपुंज तयार झाला आहे. दलित मुस्लीम द्वेषावर उभा झालेला हिंदुत्ववाद हे या देशातील एक भयानक सत्य आहे. जातवास्तव हे हिंदूच्या बाबतीत रास्तच आहे परंतु जे अहिंदू आहेत त्यांच्यातही जातीने शिरकाव केला आहे. त्यामुळे भारतीय जातीय भूमी अधिकच विस्तार पावली आहे.

जातीची अस्मिता आणि वर्गचेतना यांबाबत द्विधा स्थिती आहे. भारतीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर झाले नाही. त्यामुळे लोकशाहीपूर्व काळात जसे धर्म, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, पुरोहितशाही इ. शोषक व्यवस्थेची केंद्रे होती.तेव्हापासूनच शोषक आणि शोषित अशी वर्गवारी भारतीय समाजात पाहावयास मिळते. भारतीय समाजात समकालीन जीवनात कामगार, कष्टकरी, शेतमजूर, भूमीहीन, दलित, आदिवासी हे सारेच सर्वहारा वर्गाचे घटक आहेत. आपल्या देशातल्या वर्गाला वर्ग म्हणता येणार नाही अशी परिस्थिती आहे. कारण येथे वर्ग हा जातीच्या कचाट्यातून बाहेर पडला नाही. त्यामुळे वर्गचेतनेच्या संदर्भात प्रश्न निर्माण होतात.त्यामुळे वर्गजाणिवा अद्यापही प्रबळ ठरत नाहीत. समकालीन सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात गरीब माणूस कुठे असेल, ग्लोबल व्यवस्थेत तो कुठे असेल, त्याच्या संघर्षाचे तत्त्वज्ञान कोणते? ग्लोबल व्यवस्थेत लढे कोणत्या स्वरूपाचे असू शकतील या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या दशकातील कवितेने केला आहे.

प्रचलित मराठी कविता वैदिक वाङ्मयाचे स्त्रीवादी वाचन करायला तयार नाही. आपल्याकडील स्त्री - पुरुष नातेसंबंधाची कविता विवाहसंस्थेच्या पलिकडे जात नाही.प्रस्थापित वर्गातून आलेली कविता शरीर आणि मन यांच्या संबंधापलिकडे फारसा शोध घेताना दिसत नाही. त्यामुळे सामान्य पातळीवर विविध जातीस्तरावर स्त्रियांचे दुखणे आणि प्रश्न बाजूलाच राहतात. समकालीन जीवनात बाजारू वस्तू म्हणूनच स्त्रीला सजविण्याची चढाओढ सुरू आहे. तिचे लेदर करन्सीत रूपांतर केले जात आहे. चामडी नाण्याचं मूल्य आणि तिची क्रयशक्ती डॉटकॉम युगव्यवस्थेने ठरवून दिली आहे. चलन आणि चामडी चलन या गोष्टी समांतर ठरू पाहात आहे. केवळ लिंग या एकाच आधारावर सर्व स्त्रियांची स्थिती समान नाही. श्रीमंत - उच्च - मध्यम - कनिष्ठ - दलित - आदिवासी या सर्व स्त्रीवर्गात भिन्नता दिसून येते. एक स्त्री म्हणून काही प्रश्न समान असले तरी जातीसंस्था आणि वर्णधर्माने काही विशिष्ट प्रश्न स्त्रियांच्या आयुष्याच्या ओटीत घातले आहे हे लक्षात घ्यावे लागते.

आपला देश चालविणाऱ्या लोकांनी गॅट करार आणि डंकेल प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या, तेव्हाच शेतकऱ्यांच्या आत्महत्येची तयारी सुरू झाली. सांस्कृतिक संचिताचे अनौरस रूप याच काळात अधिक भडक झालेले दिसते. फुले आंबेडकरी चळवळीच्या परिप्रेक्ष्यात चळवळीचे खंडित वास्तव, दलित मध्यमवर्गीय आत्मकेंद्रितता, धार्मिक मूलतत्त्ववाद

आणि फॅसिस्ट शक्तीचा क्रुर चेहरा याच काळात आक्रमक झाला होता. या वर्तमानात दगाबाजांचा उन्मादी विजय होताना दिसतो. ग्लोबल वार्मिंगने जसे निसर्गाचे पर्यावरण बिघडवून टाकले तसे ग्लोबल वर्तमानाने सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण बिघडवून टाकले.सामान्य माणसाची फरफट आणि ससेहोलपट सुरू झाली. सामाजिक भोवताल आणि कोलाहलाने माणसाला सुन्न करून सोडले.सामान्यांच्या जगात वेदनांचे बीज पेरून महासत्ता मुजोर आणि मगरुर झाली. समाजजीवन एखादे अराजक आल्यासारखे हतबुद्ध झाले. हे एक नवे स्थित्यंतर या दशकात पाहावयास मिळते. या स्थित्यंतराचा परिणाम समाजजीवनावर मोठ्या प्रमाणात झाला. या प्रक्रियेमुळे घटनात्मक मूल्यांना बाधा निर्माण झाली. त्यामुळे जागतिकीकरण आणि मानवी मूल्यांची व्यवस्था या संदर्भात प्रश्न निर्माण झाले. स्थित्यंतरामुळे जीवनपद्धतीवर परिणाम होत असतो. मूल्यांच्या संदर्भात बदल होत असतो. बदलत्या जीवनाचे संदर्भ साहित्यात प्रतिबिंबित होत असतात. त्यातून साहित्याचे वेगळेपणही सिद्ध होत असते. या दशकाच्या कवितेतही हा प्रत्यय येताना दिसतो.

खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण ही अर्थव्यवस्थेशी निगडीत असणारी प्रक्रिया असून शोषण हा तिचा स्थायीभाव आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वातून उपभोगी ग्राहक संस्कृती निर्माण करणे हे तिचे उद्दिष्ट आहे. खाजगीकरण आणि उदारीकरणाला मूलतत्त्ववादाची जोड मिळाल्यामुळे समता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये जागतिकीकरणाने कुचकामी ठरविली आहेत. या प्रक्रियेमुळे दारिद्रयरेषेखालील सर्व समाजाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. महासत्तेचे वर्चस्व आणि दहशतीचा ताण फुलेआंबेडकरी कवितेवर पडला आहे. याचा पुरेसा प्रत्यय या दशकातील कवितेने दिला आहे. जागतिकीकरण या नव्या शोषक व्यवस्थेच्या परिप्रेक्ष्यात स्थानिक पातळीवर जातीय अहंकाराचे विषाणू सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक स्तरावर कार्यरत झाले. कल्याणकारी राज्य ही संकल्पना धोक्यात आली आहे. जग जवळ आले आणि माणसाच्या हिताचे कल्याणाचे कार्यक्रम नष्ट होऊ लागले. वैचारिक, पुरोगामी, परिवर्तनाच्या चळवळी निकालात निघाल्या. एनजीओ कल्चरने छोट्या छोट्या चळवळीच्या गटांची वाट लावली. या प्रक्रियेने माणसाला सर्व पातळ्यांवरील निर्णयप्रक्रियेतून नामशेष केले. गतकाळ आणि वर्तमान शोषणाच्या पातळीवर समानच राहिला. खरे तर जागतिकीकरणामुळे उतरंडी उरणार नाहीत अशी अपेक्षा निर्माण झाली होती.परंतु जागतिकीकरणाने स्वातंत्र्यासारखाच भ्रमनिरास केला. स्त्रीपुरुषांचे वस्तुकरण आणि विरूपीकरण झाल्यामुळे विषमता आणि स्तरभेद कायमच राहिले. मूलतत्त्ववाद, जातीवाद आणि जागतिकीकरण यांच्या अभद्र युतीमुळे जागतिक स्तरावरही भेदाभेद कायमच राहिले. या सर्व वास्तवाचे पडसाद या दशकाच्या कवितेत उमटले आहेत असे प्रत्ययास येते.

या दशकात ज्येष्ठ कवींपैकी **केशव मेश्राम** 'कृतक पुत्र' (२००१), 'अनिवास' (२००५), **यशवंत मनोहर** यांचे 'जीवनायन' २००१), 'प्रतिक्षायन', 'काव्यभीमायन' (२००७), 'अग्नीचा आदिबंध', 'स्वप्नसंहिता' (२००८) असे पाच कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. **ज. वि. पवार** 'रक्ताळलेले टिंब' (२००६), या दशकाच्या शेवटी **नामदेव ढसाळ** यांचा 'निर्वाणाआधीची पीडा' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. तो त्यांचा अखेरचाच कवितासंग्रह ठरला. पहिल्या पिढीतील **केशव मेश्राम, बाबूराव बागूल, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे** अशा दिग्गज कवींचे निधन या काळात झाले. त्यामुळे फुले आंबेडकरी कवितेचे अपरिमित नुकसान झाले.

या दशकात प्रज्ञा दया पवार. ज्योती लांजेवार यांचेसह माया वासनिक, सुषमा अंधारे, नेहा गोडघाटे, आशालता कांबळे, उमा गवई, संध्या रंगारी इत्यादी कवयित्री कवितालेखन करताना दिसतात. युवराज सोनटक्के, केतन पिंपळापुरे, आदिनाथ इंगोले, अशोक इंगळे, दीपध्वज कासोदे, मच्छिंद्र चोरमारे, महेंद्र गायकवाड, रोहन नागदिवे, अविनाश गायकवाड, प्रदीप जाधव, उत्तम अंभोरे इ.कवींनी फुले आंबेडकरी कवितेला मौलिक स्वरूपाचे योगदान दिले. मात्र अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' व 'ग्लोबलचं गावकुस' या दोन कवितासंग्रहामुळे या दशकातील फुले आंबेडकरी कविता अधिक समृद्ध झाली असे प्रत्ययास येते.

फुले आंबेडकरी कवितेतील एक सशक्त स्वर म्हणून **युवराज सोनटक्के** यांच्या **अग्निशाळा** (२००१) या कवितासंग्रहातील कवितांचा विचार करता येईल. युवराज सोनटक्के हे भारतीय खान ब्युरोमध्ये राजपत्रित अधिकारी

आहेत. मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तिन्ही भाषेतून प्रकाशित होणाऱ्या 'अनुशीलन' या नियतकालिकाचे ते संपादक आहेत. 'काव्यकिरीट' सन्मानाने त्यांना गौरविण्यात आले आहे. कवितेविषयी त्यांची विशिष्ट अशी भूमिका आहे. त्यांच्या मते, 'कवी कवितेला जीवनाच्या सत्यापाशी नेऊन तिला प्रासंगिक, दीर्घजीवी आणि प्रामाणिक बनवितो.केवळ कविता वाचने पुरेसे नाही तर कवितेला अनुभवून विचार करणे, समजणे आवश्यक आहे. विचारशीलता आधुनिक संवेदनेचे अनिवार्य अंग आहे. विचारकविता एक उर्जावान बारुद आहे जी साहित्य व जीवनाला प्रासंगिक सार्थक मानवमूल्य प्रदान करते. ती परंपरागत मानदंड, रुढ मान्यता व सडलेल्या मूल्यांना स्वीकारीत नाही. ती संपूर्ण शासनतंत्र व्यवस्थेचा विरोध करते. ती स्वत: क्रांती, विद्रोह व मुक्तीचा पर्याय आहे'[१]. या भूमिकेनुसारच युवराज सोनटक्के यांची कविता परंपरागत मूल्यव्यवस्थेची तोडफोड करण्याचे काम करते. सूत्रवत जिवंत दु:खाला आम्ही बांधून ठेवतो. कवितांच्या ओळीत उपेक्षितांच्या भावनांचा आदर करतो, हृदयाच्या स्पंदनाने विश्वाला दु:खितांचे क्रुर क्रंदन सादर करतो असे आपल्या कवितेत त्यांनी नमूद केले आहे. जन्मदात्या आईपासून प्रारंभ करणारी त्यांची कविता अस्तित्वात नसलेल्या ईश्वर नावाच्या महामारीपर्यंत प्रवास करते.

मराठी कवितेत आईचे उदात्तीकरण आणि धो धो बरसणारा पाऊस मोठ्या प्रमाणात दिसतो. सोनटक्के यांच्या कवितेत या दोन्ही प्रतिमांचे विरूपीकरण केले आहे. आईसंबंधी 'गर्भातच आपणास मारून टाकले असते तर थोर तुझे उपकार' मानले असते. अशी उद्विग्नतेतून आलेली प्रतिक्रिया व्यक्त होते. तिने माणूस जन्माला घातला नाही. अशी तक्रार नोंदवून समाज घडविण्यासाठी जन्माला आलेली संतती निष्काम ठरली त्यामुळे ती वांझोटी राहून तिने मृत्यू पत्करला असता तर तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली असती. असा कडवट सूर येथे व्यक्त होतो.

विषमतेच्या जुलमी वरवंट्याखाली भरडलेले दु:खितांचे जीवन
त्यांनी पिसाळलेल्या लांब दाव्याने खुंटीला टांगून ठेवले
तेव्हापासून माझ्या रक्ताने झेललेल्या उग्र जखमा
आपापसात क्रांतीची भाषा बोलू लागल्या

एका अर्थाने कवितेच्या निर्मितीमागील कार्यकारणभाव या कवितेने सांगीतला आहे. निर्मितीला उर्जा देण्याचे कार्य भोवतालच्या वास्तवाने पार पाडले आहे. क्रांतीची भाषा बोलायला भाग पाडले आहे. हे वास्तव निर्दय आणि अमानुष आहे.

यातनांच्या आरोळ्या ओकीत
आसवात भिजते बावरलेली अंधारछाया
शोषितांच्या तडफडत्या रक्तावर झुलते
सांस्कृतिक म्हणविणारी तुमची काया

सांस्कृतिक पटलावरच्या वेदनांचा आलेख या कवितेने चितारला आहे. जीवनाचे सर्व आधार आयुष्याच्या फासावर चढविण्याचे काम इथल्या सांस्कृतिक जगताने केले आहे. उन्हाची किरणे पिऊन तापलेल्यांचे रेताड जीवन, विषमतेच्या वणव्यावर टांगलेले निराश्रीत सुरकुतलेली शरीरे, किंचाळणाऱ्या बंबाळ जखमा, कुस्करलेले स्त्री देहाचे हंगाम अशा सर्व यातनादायी पर्यावरणामुळे ही कविता अतिशय टोकदारपणे शोकसंवेदन व्यक्त करते. ओसंडून जाणारा 'शोकरक्ताचा महापूर' यांसारख्या प्रतिमेतून दु:खभीषणता, रौद्रता सूचित करते. एकीकडे दु:खातून थिजलेले, पिचलेले वास्तव आहे तर दुसरीकडे आघात करणारे कठोरपण आहे. अशा अनेक अंतर्विरोधांनी व्याप्त अशी ही कविता आहे. वाट्याला आलेली वेदना आणि भडकलेले अंत:करण याचे साक्षात चित्र या कवितेने रेखाटले आहे. उदा.

वेदनांना वंदन करीत अश्रूंच्या कवेत हमसून रडलो
आणि जिंदगीच्या पालवीला गर्द रंग चढलाच नाही
उकिरड्यात उन्हात उसवला देह अबोली

शैशवातच उरी उगवल्या निखळ निखाऱ्यांच्या वेली

तनामनाला भाजून काढणाऱ्या वेदनांचा चिरदाह एवढा भयंकर आहे की जिंदगीला नवे धुमारे फुटावेत असा सांस्कृतिक निसर्ग वाट्याला आला नाही. सहनशक्तीच्या पलिकडचे हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. यातना आणि शोषण या वास्तवातून प्रखर होत गेलेली जाणीव या कवितेतून शब्दबद्ध झाली आहे.

निसर्गाच्या उफराट्या काळजाचे कारनामे या कवितेने स्पष्ट केले आहेत. निसर्गाचे चेतनीकरण झालेले दिसून येते. त्यामुळे या कवितेत कत्तलखोर, निर्दयी, अपराधी , अंधार पेरणारा, उलट्या काळजाचा असा निसर्ग प्रकट झाला आहे. तर प्रियेशी संवाद साधताना ही कविता जणू अग्निसौंदर्याचे अलंकारच सजविते असा प्रत्यय येतो. उद्धट प्रकाशाला तीलांजली देऊन प्रियेने आपल्याकडे यावे अशी आस बाळगणारे कवीमन फुले आंबेडकरी कवितेच्या प्रांतातील प्रेम कवितेला एक वेगळाच सामाजिक भानाचा साज चढवित आहे असे दिसून येते.ही प्रेयसी प्रियकराच्या आशाआकांक्षांची पूर्तता करेलच असे नाही.

पण तुझी बातच और
काळोख संपन्नतेत विजेरी प्रखर झोत
तळपवू शकली नाहीस की विषमेच्या संघर्षात
शोषकांची विषारी ग्रंथी छाटू शकली नाहीस ...
तुझे करारच बेकरार होते

ह्या तिच्या अस्तित्वाच्या मर्यादा आहेत. अशा पार्श्वभूमीवर कवीमन आपले मानस खालीलप्रमाणे व्यक्त करते.

गावकुसाबाहेर फाटलेल्या उजेडाचे तुकडे वेचीत आली असतीस
तर हृदयातील ओलसर आनंदाने तुला न्हाऊ घातले असते.

अशाप्रकारे कवीमनाची कैफियत येथे अधोरेखित झाली आहे. प्रतिमा, प्रतीकांचे प्राबल्य या कवितेत प्रकर्षाने जाणवते.उदा 'लुटलेल्या देहाच्या विधवा चिंध्या', 'अघोरी इच्छांचे हलकट सामर्थ्य', 'शोकरक्त महापूर', 'रक्तातील थेंबाचा थवा', 'दु:खाच्या पिकावर पोसलेला निवडुंग', 'आगीचे डंख', 'वादळडंखच्या भगभगणाऱ्या वार्ता', 'रुढीचे गर्भाशय उसवणारे हात', 'दु:खाची रांगोळी', 'मृत्यूस्वराची परित्यक्ता', 'नागव्या जखमा', 'विषारी उन्हाचा भोगउत्सव', 'वेदनांची वरात' इ. असंख्य प्रतिमांचे संघटन या कवितांमधून झाले आहे. मुक्तछंदात्मक, विधानात्मक, वैचारिक अभिव्यक्तीसोबतच कवीने गझल, चारोळी अशा अभिव्यक्तीतून आंबेडकरी विचार मजबूतपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. थोडक्यात, फुले आंबेडकरी कवितेच्या वाटचालीतील विस्तवी परंपरा विकसीत करणारी ही कविता आहे असे शीर्षकापासून आशयापर्यंत पदोपदी प्रत्ययाला येते.

विद्रोहाच्या अग्निरसात विरून जावीत
ही परंपरामय निर्दयतेची नक्षत्रे
सरणाने साखळलेल्या संसाराला मुक्त करण्यास
आता परजावी तेजाची शस्त्रे

असा निर्धार कवीमनाने केला आहे. त्याचबरोबर अशीही खात्री दिली आहे की,

आंबेडकरांच्या अग्निशाळेतून बाहेर पाऊल टाकले
तेव्हापासून मीच आभाळ झालो आहे
कदाचित यापुढचा सगळा क्रांतीचा पाऊस
माझ्यातूनच कोसळेल

या खात्रीशीर आत्मविश्वासामुळे आंबेडकरी विचारातूनच परिवर्तन घडून येणार आहे असा ठाम विश्वास येथे व्यक्त झाला आहे. डॉ. शत्रुघ्न जाधव यांच्या मते, ''आत्मशोधाचे सखोल गांभीर्य, व्यवस्थाभंजनाची ठोस भूमिका,

आंबेडकरी विचारसंस्कृतीचा शुद्ध परिपोष, मानवी मूल्यांची आग्रही पाठराखणी, भीषण वास्तवाचे क्रुद्ध आक्रंदन, आंबेडकरी प्रेमनीतीचा आविष्कार अशा अनेक गुणवैशिष्ट्यांचा समावेश कवी युवराज सोनटक्के यांच्या अग्निशाळेत आहे.''[२] ह्या मतातून 'अग्निशाळे'ची बलस्थाने स्पष्ट होतात.

कैलास भाले (जन्म १५ मार्च १९७७) यांचा **पोळणाऱ्या सावल्या** (२००१) हा कवितासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे. या शीर्षकातूनच एका दाहकतेचा प्रत्यय येतो आणि विरोधाभासही सूचित होतो. फुले आंबेडकरी कवितेत एक अस्पर्शीत जग या कवितेमुळे चित्रित झाले आहे. या कवितेत मातंग समाजाचे जीवनदर्शन विविधांगाने चित्रित आणि मुखरित झाले आहे. व्यवस्था माणसाला घाण्याच्या बैलासारखी फिरायला भाग पाडते. चाकोरीबद्ध आणि झापडबंद करून ठेवले की व्यवस्थेला टाळूवरचे लोणी खाण्यासाठी रान मोकळे होते. अशा व्यवस्थेच्या आवर्तात गरगरणाऱ्या समाजजीवनाचे प्रत्ययकारी दर्शन या कवितेत घडविले आहे. कवीने आपली भूमिका मांडताना म्हटले आहे की ''आमच्या पूर्वजानी सूर्यास्तानंतर देवासाठी गाववेशीत शहाडा वाजविला. मी माणसांच्या सूर्योदयासाठी कविता लिहितोय. सामाजिक जाणीवेचा हा सांस्कृतिक जीवनानुभव कविता होऊन अवतरला.''[३]

गतकाळापासून वर्तमानापर्यंतची सांस्कृतिक स्थित्यंतरे टिपण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. पोळलेल्या सावल्यांनी मांडलेले वास्तव अस्वस्थ करणारे आहे. या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वास्ववदर्शी मांगवाडा त्याच्या जगण्या-खुपण्यासह चित्रित केला आहे. पोराबाळांना घेऊन गिऱ्हाण मागणारा मांगवाडा येथे साक्षात झाला आहे. गिऱ्हाणाच्या आरोळ्यासह कुत्र्याचे भुंकणे येथे आहे. मरून पडलेली गुरेढोरे ओढणे, येसकर होऊन दुरडीसाठी भाकर मागणे, गावकीच्या कामासह जातीची अस्मिता पणाला लावणे या सर्व कृतिशिलतेसह पोट आगीच्या वासनेनं पोटपाणी पिकविण्याची वेळ येथे येते. येथे बायकोला झोडपणारा बांदांड्या बाप आहे, गावगाड्याची राखण करणारा हा बाप आणि भाकरीच्या तुकड्याची वाट पाहणारी माय आहे. आपला गावगाडा कोणी हिरावून तर घेणार नाही ना अशा भितीने हे मायबाप ग्रासलेले आहेत.

चोरीच्या आळापोटी पोलिसांच्या तपासात
घरातल्या दुरडीत भाकरी सापडल्या म्हणून
गुन्हेगार ठरणारे आम्ही

असा उफराटेपणा असलेल्या पर्यावरणातील हा प्रवास अस्वस्थ करणारा आहे तसाच अंतर्मुखही करणारा आहे. जगण्यातील पेच आणि ताण स्पष्ट करून जुन्या आणि नव्या मांगवाड्यातील एक संघर्षही चितारला आहे. बापाची व्यथा मांडतानाच त्याला प्रश्नांकित करण्याचे कार्य ही कविता पार पाडते. बापाने पत्करलेली लाचारी आणि व्यवस्थेने त्याचा मारून टाकलेला स्वाभिमान असे द्वंद्व पदोपदी प्रत्ययाला येते.

तुकड्याच्या बळावर जतन केलेली जात
तशी कुत्रा होऊन जगण्याचीच खरी ओळख सांगते
पण पोटच्यांच्या पोटासाठी अंगावर धावणाऱ्यांचा
लचका तोडण्याचं तर तो विसरूनच गेला
मरून पडलेलं पुन्हा ओढण्याच्या सवयीनं

व्यवस्थेने लावलेल्या सवयीची आणि एकूणच व्यवस्थेची गुलामी पत्करल्यानंतर यापेक्षा वेगळे जगणे वाट्याला येऊ शकत नाही.बारा बलुतेदार हे ग्रामव्यवस्थेचे गुलामच होते.गावाच्या सेवेसाठी ते बांधले गेले होते.त्यामुळे वेळकाळाचे त्यांच्यासाठी काही बंधनच नव्हते.महार, मांग, चांभार या गुलामाना अतिशय अपमानास्पद जिणे जगावे लागले.उष्ट्या पाष्ट्यावर आयुष्याची गुजराण करणे हेच त्यांचे संचित होते.बलुतंही सन्मानाने मिळत नव्हते. बलुत्याऐवजी मातेरे वाट्याला आले आणि आयुष्याचे मातेरेच झाले! आयुष्याला ग्रहण लागले!

गिऱ्हाणाने चंद्र गिळला तेव्हाही आम्ही जागेच होतो

दे दान सुटे गिऱ्हाणच्या आरोळीत
अख्ख्या गावगाड्याचे गिऱ्हाण सुटले
आणि सुपाटोपल्याच्या जुन्या जिर्ण वस्त्रदानातून
पुन्हा आम्हालाच चिकटले
कोणत्याच आरोळीने कधीच न सुटण्यासाठी

सूर्य चंद्राला ग्रहण लागले म्हणजे ते सुटण्यासाठी 'दे दान सुटे गिऱ्हाण' म्हणून दान म्हणजे भिक तीही मातंगानी मागीतली म्हणजे ग्रहण सुटते अशी समजूत या देशात हजारो वर्षांपासून आहे. मात्र ग्रहण लागण्यामागील खगोलशास्त्रीय अर्थ समजून घेण्याची गरज कधी मातंगाना वाटली नाही आणि त्याचा अर्थ समजावून सांगण्याची व्यवस्थेला काही गरजच नव्हती. शूद्राना आहे त्या स्थितीत ठेवणे हे तर इथल्या संस्कृतीचे उद्दिष्ट होते. म्हणून स्वकियांना आवाहन करताना कवीमन आक्रंदून उठते.

कुत्र्या कावळ्याचं माणसाला वाढताना
माणुसकीची ही निर्लज्ज संस्कृती
तुला कशी कळली नाही हे माझ्या मांगवाड्या!

दैन्य दास्याच्या ओझ्याने वाकलेला मांगवाडा लाचारीचे जगणे पसंद करतो.मात्र या लाचारीवर मात करण्यासाठीचे मनसुबे त्यांना रचता आले असते.तसे या मांगवाड्याने केले नाही म्हणून कवीमनाचा उद्रेक झालेला दिसतो.

गावकुसातल्या फळकार कालवडीवर
उडणाऱ्या उन्मत्त सांडाचे आंड ठेचून
वठणीवर आणणारे आम्ही
जातीच्या गावगुंडाना वेसन घालू शकलो नाही
मांगवाड्याने ठरविले असते तर छिनाल जाण्यांनाही
मांगकाव्याने खुंट्याला बांधले असते
गावातल्या मोकाट गोऱ्हयाची हूरळ टाळण्यासाठी

या समाजाला युक्त्या प्रयुक्त्या आणि कावेबाजपणा करून कधी जगताच आले नाही.तशी क्षमता असूनही जातीच्या गावगुंडाना ठेचण्याचे बळ त्यांच्यात असूनही त्या बळाचा शोध त्यांना लागला नाही उलट लाचारीने जगण्यात धन्यता मानली.याविषयीची खंत आणि उद्वेग कवीमनाने व्यक्त केला आहे. उकलता येण्यासारखे पिळ मनात कायमच ठेवले याविषयीचा हा उद्रेक आहे. बापाला प्रश्नांकित करणारी ही कविता आपसूकच दोन पिढ्यातील संघर्षही चित्रित करते.

गावच्या गल्लीबोळाची झाडलोट करताना
माझ्या बापा
घरादाराचा आणि मांगवाड्याचा उकिरडा झाला तरी
फडे केरसुण्यांवरची तुझी निष्ठा ढळली नाही

बापाची पिढी स्थितीशिलतेला कवटाळणारी, मजबूरी म्हणून लाचार होणारी आहे आणि बापाच्या जगण्यावागण्याला दुषणे देणारी मुलाची कृतिशिलता आहे. हा मुलाच्या उद्विग्नतेचा भाग आहे. असे असले तरी खरे ऐकूनही बहिरं होऊन जगण्याचं सोंग घेणारा बाप या मुलाला किंगलिअरपेक्षाही मोलाचा वाटतो.या कवितेने क्रांतीचे वांझोटे अर्थ प्रसृत करणाऱ्या परंपरेवर आसूड ओढले आहे. महापुरुषांनाही त्या त्या जातवाल्यांनी वारसा हक्काची जंगम मालमत्ता समजून वाटून घेतले आणि परिवर्तनाच्या चळवळींना दांभिकतेचे रूप प्राप्त झाले.अशा प्रवृत्तीवर नेमके बोट ठेवण्याचे कार्य या कवितेने केले आहे. आण्णाभाऊ साठे यांच्याविषयीच्या विविध कवितांमधून प्रखर आत्मटिका प्रत्ययाला येते.

आण्णाभाऊ साठेंचे प्रखर क्रांतीकारकत्व पुढच्या पिढ्यांनी आपल्या स्वार्थात विरघळून टाकल्याची जिवघेणी खंत ही कविता प्रकट करते. विविध पातळ्यावर आण्णाभाऊंचा वापर कोणी कशाप्रकारे केला याची चर्चा परखडपणे केलेली आहे. मतलबी पुढाऱ्यांनी आण्णाभाऊंच्या नावाने मांगवाड्यातील एक गट्ठा मते विकत घेतली. आण्णाभाऊंच्या 'फकिरा'ची खरी ओळख मांगवाड्याला झालीच नाही.

छिनाल वेश्यांच्या अड्ड्यात आणि
जातपुढाऱ्याच्या अलिशान बंगल्यात
कोणताच मूलभूत फरक वाटत नाही
आडदांड मांडीसाठी... गांडीसाठी खनाळ

बदलीची ऑर्डर काढण्यासाठी जातपुढाऱ्याने लाच मागीतली ही सुधारीत शोषणाची नवी आवृत्ती ठरली.मांगवाड्यातील शिकल्या सवरल्या लोकांनी तर मोठाच दगा दिला.सोयी सवलती आणि आरक्षणाच्या बळावर मोठी पदं पटकावणारांनी धोका दिला आणि विश्वासघात केला.

बायकुला घेऊन ते सरकारी कॉटर्समध्ये राहतं
आणि त्याचा झिजलेला उघडा बाप
शहरी गावठाणात पाल टाकून राहतो
जागेच्या अतिक्रमणासाठी
आण्णाभाऊ, आमच्या ह्या नव्या गोधडीला
तुमचं ठिगळ किती शोभून दिसतं!

सरंजामदारांनी केलेले शोषण वेगळेच मात्र 'जातलांडग्यांनी दिवसाढवळ्या नयतरणी शेळी गिळली.' हे अधिक धक्कादायक, जिवघेणे आणि सुन्न करणारे आहे. पारतंत्र्यात माणूस विचारानं तरी स्वतंत्र होता. स्वातंत्र्याची मक्तेदारी दलालांच्या हातात गेली आणि स्वातंत्र्याच्या नावाखाली सत्तांतराचे नवे पर्व सुरू झाले.आपल्याकडे आधुनिकता आणि आधुनिक मूल्ये आली असे म्हटले जाते.असे झाले असते तर माणूस सुसंस्कृत झाला असता.पण तसे घडले नाही. सुसंस्कृतपणा नसल्यामुळे माणुसकीही प्रत्ययाला आली नाही.शिक्षण आणि सदाचाराशिवाय असा प्रत्यय येणेही शक्य नसते.स्वाभिमानी जगण्यासाठीचे आत्मभान जागविण्यासाठी आंबेडकरी संघर्ष आणि संस्कृतीताच उदय व्हावा लागला. त्यातून स्वीकार नकाराचे तत्त्वज्ञान उदयाला आले आणि माणसे सजग झाली म्हणूनच,

अत्याधुनिक माणसांच्या घनदाट जंगलात
हरवलेल्या माणुसकीची जात शोधताना
माझ्या केविलवाण्या धडपडीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर
तुमच्या वाघिणीच्या दुधाची आठवण होते!

असे या कवितेने उद्धृत केले आहे. प्रतिकाराच्या आंबेडकरी तत्त्वज्ञानातून आत्मभान आणि विद्रोहाची जाणीव प्रगल्भ होत गेली.विद्रोहाची रूपेही त्यामुळे साकार होत गेली.

आतापर्यंतचा इतिहास राहिला
आम्ही वाजविलं अन् तुमचं रंगात आलं
यापुढं ध्यानात ठेवा, आम्ही आमच्यापुरतंच वाजवूत
आणि जमलंच तर रंगात बी आणूत
आमच्याच विद्रोहाचं गाणं!

आत्मभान जागृतीतून आलेली ही जाणीव आहे. आंबेडकरी तत्त्वभानातून जागृत झालेले मन अशा कृतिशिलतेपर्यंत पोहचते. हा मनपरिवर्तनाचा विकास आहे असे म्हटले पाहिजे. मात्र जातीअंताच्या लढाईत जे कोणते पेच

आहेत किंवा जे विरोधाभास आहेत ते चक्रावून टाकणारे आहेत.

दूरच्या संस्कृतीनं गाववेशीत नाकारले तेव्हा
जवळच्या महारवाड्यानेही स्वीकारले नाही
आता तर जातीचे अधिकारी आणि पुढाऱ्यांनाच
मांगवाड्याची लाज वाटते
माय अस्पृश्यते! वान्या बामणाना शिव्या घालताना
कोणत्या माणसाचा द्वेष करू?

अशी ही पेचदार अवस्था आहे. अस्वस्थता, हतबलता आणि अंतर्मुखता या साऱ्यांचाच एकत्रित अनुभव येथे प्रत्ययाला येतो. पेचदार अनुभूती वाचकांसमोर ठेवून एक सुन्नपणाचा अनुभव देण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे म्हणूनच समस्येवर नेमका घाव घालण्याची अपरिहार्यता ही कविता व्यक्त करते. सर्व पातळ्यावरील जाचातून मुक्त व्हायचे असेल तर एकच केले पाहिजे.

उभ्या हातानं सोटमुळावर घाव घाला
झाड उन्मळून पडेल त्याचं दु:ख तर आहेच,
पण पोळणाऱ्या सावल्या नष्ट झाल्या पाहिजे

एकंदरीत एका विशिष्ट जातसमूहाचा अवकाश व्यापणाऱ्या या कवितेने जातीय आणि सामाजिक सत्य बेडरपणे व्यक्त केले आहे असे निश्चितच म्हणता येते. फुले आंबेडकरी कवितेच्या परंपरेत 'पोळलेल्या सावल्या'ने आपल्या आशयाभिव्यक्तीमुळे स्वत:चे वेगळे स्थान प्रस्थापित केले आहे. ''या कवितासंग्रहात ग्रहणग्रस्ततेची असंख्य स्फुरणे आहेत. वेदनांचे असंख्य डंख आहेत. पुढल्या पिढ्यांनी विचारलेल्या सूर्योदयाचा अर्थ समजावून सांगण्यासाठी पुरेल एवढा उजेड पोळलेल्या सावल्या या कवितासंग्रहात निश्चितपणे आहे''[४] असे नेमके भाष्य यशवंत मनोहर यांनी या कवितेसंबंधी केले आहे.

राजेंद्र गोणारकर (जन्म ८ मार्च १९७५) यांच्या **अनारंभ** (२००१)मधील कवितेने वर्तमान वास्तवाला भिडण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र ही कृती करताना ती आक्रमक होत नाही तर संयतपणेच विद्रोहाची अभिव्यक्ती करताना दिसते.

रोजच इथे होताहेत उत्सव
नव्या नव्या सांस्कृतिक फोडाचे
आधीच विदृप होत जाणाऱ्या समाजमनावर
परत केल्या जात आहे कलम जुन्याच खोडाचे

म्हणून व्यवस्थेने जे मतलबी कावे जपून ठेवले आहेत त्यांचे निरोप समारंभ ठेवणे अगत्याचे झाले आहे. त्याशिवाय नव्या सुगंधाच्या स्वागतासाठी फुलांच रान फुलारून येणार नाही. आपल्या मातीवरचे आभाळ आपणच रचले पाहिजे असे आवाहन करणारे कवीमन, वाट्याला आलेल्या दु:खाबद्दल कडवटपणा व्यक्त करीत नाही. कारण दु:खाकडेही सकारात्मकतेने पाहण्याची दृष्टी या कवीमनाला बुद्ध विचाराने दिली आहे.

आजवरचे इथले सारेच पावसाळे
नि:संशय पक्षपाती बेईमान होते पण आपण मात्र
अजिंठा लेणीतील बुद्धाच्या अर्ध मिटल्या डोळ्यातून
ओसंडणाऱ्या अपरंपार करुणेगत सर्वांवर सारखंच बरसलं पाहिजे

आपली मुस हलकी होत गेली की आपल्या मुठीचा आवेगही क्षीण होत जातो याचे भान राखणेही क्रमप्राप्त ठरते. धर्म आणि जातीने माणसांच्या संवेदनाही विभाजित केल्या आहेत. त्यामुळेच माणुसकीच्या लढाईत पराभूत झाल्याचा

निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. या संग्रहातील 'ताजमहाल'सारखी कविता वाचताना हिंदीतील साहीर लुधियानवी यांची कविता आठवते. 'मला दिसताहेत हजारो कारागिरांचे छाटलेले हात प्रत्येक पायरीवर' या दु:खाशी कवीमन एकरूप होते. ताजमहल घडविणाऱ्या हाताचे पुढे काय झाले? हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.त्यामागे एक क्रुर इतिहास दडलेला आहे. या इतिहासात हजारोंचे अश्रू गोठलेले आहेत. त्यांची नावे कोरून ठेवण्याऐवजी इतिहासाने ती पुसून टाकली आहेत. पारंपरीक सनातन मानसिकतेची तिरस्करणीय चलाखी उजागर करण्याचे काम या कवितेने केले आहे. सहजपणे कोणत्याही व्यवस्थेवर विश्वास ठेवावा असे दिवस आता उरले नाहीत. दगाबाज प्रहर कधी घात करतील याचा नेम नाही. दरेक मुक्क्मावर इथले सनातनत्व कडवट होत गेले.तसतसे पिंपळपानही मलूल होत गेले. त्यामुळे इतिहासाचे भान राखणे कसे अगत्याचे आहे याची जाणीव करून दिली आहे. नव्या शतकाबद्दलची संशयग्रस्त मनोवस्था प्रकट केली आहे.

अवघं शतकच सामान्यांना चिरडत जाणार असेल
आयुष्य उभ्या उभ्या दुष्काळत जाणार असेल
तर या निर्णायक वेळी
आपण आपले मार्ग आखणार की नाही?
नव्या शतकाच्या अंतराळात आपलेही निशाण असणार की नाही?

अशा प्रश्नावर ही कविता स्थिरावली आहे. कारण मागच्या शतकाने भोगायला लावलेल्या भोगवट्याचा इतिहास ताजाच आहे. नव्या शतकाने अस्तित्वाबद्दलचे प्रश्न माणसाच्या पुढ्यात मांडून ठेवले आहेत. म्हणून ही कविता नव्या शतकाकडे साशंक नजरेने पाहताना दिसते.

मंगेश बनसोड (७ एप्रिल १९७१)

मंगेश बनसोड यांचा **मी येणाऱ्या पिढीची दिशा घेऊन फिरतोय** (२००१) असा लांबलचक शीर्षक असलेला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला.या कवीची कविताविषयक एक विशिष्ट धारणा आहे.

कवितेकडे असते ताकद
शोषक महासत्तेच्या विरोधातली
कविता देते क्रांतीला बळ / कविता देते नवा विचार
कविता ठरवते येणाऱ्या पिढीची दिशा
मी येणाऱ्या पिढीची दिशा घेऊन फिरतोय

कवितेची ताकद काय आहे याची पुरेशी जाणीव कवीला आहे. ज्या पिढीची दिशा घेऊन हे कवीमन फिरते आहे ती पिढी संभ्रमाच्या उंबरठ्यावर उभी आहे. मानसिक पातळीवर एका विशिष्ट व्यवस्थेचा सूड घेण्याच्या मनस्थितीत आहे, तसेच ती शहरातील सुंदर मुलीच्या सौंदर्याची आसक्ती बाळगणारीही आहे. प्रसंगी ती भ्रमिष्ट होण्याच्या दोलायमान अवस्थेत आहे. उदा.

माझ्या अवतीभवती कुणी नसताना देखील
मला सारख्या किंकाळ्या नि मेंदू सुन्न करणारे
आवाज कसे ऐकू येत होते

ही भ्रमिष्ट झाल्याचीच खूण आहे. कवी ज्या पिढीचे प्रतिनिधित्व करीत आहे त्या पिढीची अशी अवस्था झाली आहे. एका नैराश्याच्या आवर्तात ही पिढी सापडली आहे. त्यामागे पोटापाण्याचे, चरितार्थाचे प्रश्न जसे एकवटले आहेत तशीच आयुष्यात स्थिरताही प्राप्त झालेली नाही. म्हणून भरकटलेपणाने चोहोबाजूनी घेरले आहे.

एवढ्या मोठ्या जातीय दंगलीच्या बातम्याच
तेवढ्या फक्त मी वाचत गेलो
माझं रक्त वगैरे खवळलं नाही

पूर्वी मोर्च्यात उपाशीपोटी दिलेल्या घोषणांना
अलिकडे तितकसं महत्त्व उरलं नाही माझ्या लेखी!

अस्थिरतेतून येणारा भरकटलेपणा, निर्विकारपणा आणि संवेदनाचा बोथटपणाच येथे प्रत्ययाला येतो. अशा मनोवस्थेतील हे कवीमन 'मी इथल्या संस्कृतीवर, परंपरेवर व व्यवस्थेवर उभ्याने धार मारत पुढे जात आहे'. अशी कृती करताना दिसते त्यामागेही एक उद्विग्नपणा आहे. नैराश्य आहे. नैराश्याच्या आवर्तातून स्वत:ला सोडवून घेऊ पाहणारी निर्थक धडपड हेच या पिढीचे वास्तव आहे. या निराशेपोटीच विद्ध्वंसाची भाषा या कवितेत अवतरली आहे. दु:खाचा एक वेगळा अन्वय या कवितेने लावला आहे. 'जेव्हा जे मिळायचं ते कधीच मिळालं नाही वेळेवर', 'मी आपल्याच गर्तेत चिरडल्या जातो', 'गर्दी मला क्षुद्र किडा समजते'. असे या दु:खाचे अनेक पैलू आहेत.

दु:ख बेसुमार वाढत गेले की
डोळ्यासमोर पसरत जातो घनदाट अरण्याचा
एक व्याकूळ परिसर

काळाने या पिढीला दु:खाच्या खाईत ढकलून दिले आहे. त्यामुळे वाट्याला जी हतबलता आली त्या हतबलतेला शब्द देण्याचा प्रयत्न मंगेश बनसोड यांच्या कवितेने केला आहे. वर्तमान वास्तवावर या कवितेने भाष्य केले आहे. वर्तमानातही जातीय मानसिकतेने पिछा सोडलेला नाही.

आडनावावरून लोकांनी जात ओळखली
कास्ट सर्टिफिकेटवरून कन्फर्म केली
फोलकट व्यवस्थेनं नोकरी नाकारली
कॅलिबरचा सगळाच झाला भुगा

वर्तमान असा जातीयतेचे चटके देणारा आहे, माणसाला नाकारणारा आहे. अशा सडत चाललेल्या या वर्तमानाचं काय करू?असा प्रश्न उभा ठाकला आहे. या वर्तमानाने भविष्याची आस धरण्याची कोणतीही संधी दिलेली नाही.असा माणसाला स्थितीशील बनवणाऱ्या गतिरोधक वर्तमानाने अख्या एका पिढीला वेठीस धरले आहे. त्या पिढीचे वर्तमान वाचकांसमोर ठेवण्याचे कार्य मंगेश बनसोड यांच्या कवितेने प्रामाणिकपणे पार पाडले आहे.

✸ महेंद्र गायकवाड (जन्म २२ ऑगस्ट १९६५)

काजव्यांच्या खांद्यांवर संगिनी (२००२) हा खाण कामगार असलेल्या महेंद्र गायकवाड यांचा पहिला कवितासंग्रह.कवीच्या मते कविता ही बंड, क्रांती आणि प्रबोधनाच्या शक्तीचे प्रभावी माध्यम आहे. श्वासासाठी जशी ऑक्सीजनची गरज असते तशीच जगण्यासाठी कवितेची गरज असते अशी या कवीची धारणा आहे. कष्टावर निष्ठा असणारा हा कवी आहे. काजव्यांच्या खांद्यांवरील संगिनी युद्धाची प्रतिक्षा करीत आहेत. या शीर्षकातून असा एक प्रश्न उपस्थित होतो की. काजव्यांचे अस्तित्व आणि प्रकाश पेरण्याची कितपत शक्ती त्याच्यात असते? मूळात ताकदीच्या बाबतीत क्षीणता असणाऱ्यांनी आपल्या खांद्यांवर बंदुकांचा भार पेलणे हे विसंगत आहे. या कवितांनी अस्वस्थ वर्तमानाचे प्रतिकात्म चित्र रेखाटले आहे. उदा.,

परिवर्तनाचे संदर्भ कालबाह्य चिंध्या पांघरून
लोकशाहीसोबत बिनधास्त झोपतात
कफल्लकाच्या घरट्यात भूतकाळाला शाबूत ठेवून
आमचा वर्तमान शून्यलिंगी होतो

काळाला समांतर, अभिप्रेत असणारे परिवर्तन घडूनच येत नाही.म्हणून वर्तमान शून्यलिंगी झाला आहे. अशा वेळेस समता, परिवर्तन हे शब्दही वांझोटेच ठरतात. माणसाला खुरटवून टाकणारी व्यवस्था विकासाचे सर्व मार्ग बंद

करून टाकते.इथे क्रांतीच्या संकल्पनाही हास्यास्पद ठरतात. डाव्या विचारसरणीचे जतन करतानाच ज्यांना उजव्यांच्या गुप्त दरबारात कधी शरीक झालो याचा थांगपत्ताही लागत नाही तेव्हा क्रांतीच्या संकल्पनेला आपसूकच तडे जातात. गरीबांना चिरडून टाकणारी सत्ताशक्ती किती क्रूर झाली याचे दिग्दर्शन या कवितेने केले आहे. संवेदनशून्यता सत्ताव्यवस्थेच्या रोमारोमात भिनलेली असल्यामुळे माणुसकीची जाणीव हद्दपार होते. तेव्हा पुरोगामी म्हणवून घेणारी सरकारे किती निर्दयी आणि क्रूर आहेत याचा प्रत्यय येतो.

आपली माती संवेदनाशून्य झाली
तेव्हापासून पुरोगामी सरकार
बुलडोझर फिरविण्याचा आदेश देताहे
उद्ध्वस्त करताहे मोडक्या देहाच्या झोपड्या
उभारताहे गगनचुंबी इमारती
त्यांना हिरवे, स्वच्छ, सुंदर शहर हवे आहे!

स्वच्छ सुंदर शहराच्या निर्मितीसाठी झोपड्या जमीनदोस्त केल्या जातात.माणसांचे स्थानांतर केले जाते किंवा देशोधडीस लावले जाते.देशोधडीला लावणारी ही व्यवस्था अतिशय कावेबाज आहे. शोषण आणि दमणाच्या विरोधात निघणारे मोर्चेही या व्यवस्थेच्या निर्देशानुसारच काढले जातात आणि माणसे हवालदिल होतात. संघटनांना विकत घेऊन चळवळींना मोडीत काढणारी ही व्यवस्था माणसांची खरेदी करून त्याचे जगण्याचे प्रश्न कायमच ठेवते.ज्यांना बुड टेकवायलाही जागा नाही अशी माणसे अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकली आहेत.

ज्यांच्या मातीचा ठिकाणा नाही
असली असुरक्षित माणसे
दगडी देवाचे रक्षण करू लागलीत
अशांना देश सोडण्याचे आदेश देऊ नये तर काय करावे?

जिवंत माणसाऐवजी दगडी देव ज्यांना प्रिय असतो अशी माणसे देशात असली काय नि परदेशात गेली काय फारसा फरक पडत नसतो. घरभेदी प्रवृत्तीवरही या कवितेने भाष्य केले आहे. असुरक्षिततेतून आलेली अस्वस्थता प्रत्ययाला येते. जागतिकीकरणाच्या उदयानंतर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपले हातपाय पसरायला सुरवात केली. त्यांनी माणसांचे सत्वच शोषून घ्यायला सुरवात केली. अशा पर्यावरणात माणुसकीशून्य वर्तनाला उधाण आले.

हिजड्याच्या तालमृदंगावर
मुन्नीबाईच्या कोठ्यावर नाचताना
मानाचा मुजरा घ्यावा लागेल
तेव्हा देशीविदेशी विषारी नाग संगिनी रोखून
ओथंबलेल्या स्तनाशी चाळे करतील
आणि घटाघटा दूध पितील हा दिवस दूर नाही!

कोणत्या परिणामाला सामोरे जावे लागणार आहे याचे सूचन ही कविता करते. व्यापार आणि ग्राहक हेच नाते सर्वश्रेष्ठ मानले जाईल आणि सांस्कृतिक जगाच्या ऱ्हासाला आपसूकच सुरुवात होईल!

या दशकाच्या शेवटी **महेंद्र गायकवाड** यांचा **ओलीस ठेवलेली माणसे** हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. जागतिकीकरणाच्या भांडवली अर्थव्यवस्थेमुळे स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याची खंत व्यक्त करीत भेदाभेद नितीवर आग ओकणारी तिखट भाषा या कवितेत प्रत्ययाला येते. निर्मळ माणसांसाठी आणि उज्ज्वल मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी परंपरागत आणि युद्धखोर व्यवस्थेचा विद्ध्वंस होणे या कवितेला अपरिहार्य वाटते. कारण ही व्यवस्था माणसाचे जगणेच खुंटवून टाकते.संमिलीनीकरणाच्या जाळ्यात माणसाला अडकवून झुलवत ठेवायचे असा तिचा स्वभाव आहे.

विसाच्या शतकाच्या शेवटच्या पर्वापासून सांप्रदायिकता, धर्म, आध्यात्म या परिभाषांना उधाण आलेले दिसते.धर्म नावाच्या जहाल वृक्षाने जमिनीत पाय रोवले आणि सारी जमीनच विषाक्त झाली.आध्यात्म नावाच्या खुंट्याभोवती धर्माने फिरवत आणि झुलवत ठेवले.मूलतत्त्ववाद्यांना हुकूमशाही प्रिय असते. त्यामुळे लोकशाहीतील लोकांना संपुष्टात आणणे त्यांच्या सोयीचे असते.

धर्म पेरत राहा या मातीत
मूलतत्त्ववाद उगवेल
सुगीच्या दिवसात कणसातल्या दाण्याप्रमाणे
टिपता येईल माणसाला

माणसाला जेरबंद करून दहशतीने माणसाचा आवाज बंद करणारी दमणकारी प्रवृत्ती जोरकसपणे कार्यरत झाली. माणसात झुंज लावून विषमता कायम ठेवणे हे या प्रवृत्तीचे धोरण असते. दंगलीचे आणि कत्तलीचे पीक भरात यावे यासाठी आध्यात्माला उधाण आले. समकालीन वास्तवाचे असे निरीक्षण नोंदविले आहे. बेबंद फॅसिस्टांना शाबूत ठेवून प्रत्येक गल्लीबोळात संस्कृतीचा ढोल वाजतो. बुवाबाबांच्या वाढलेल्या प्रश्नांना चालना देऊन लैंगिक शोषणापासून माणसाचा बळी घेण्यापर्यंत या साऱ्या गोष्टींसाठी अनुकूल वातावरण सांप्रदायिकतेने निर्माण केले. घटलेल्या माणसाबद्दल, तुटलेल्या सुखाबद्दल देश, देव, धर्माला काही देणेघेणे उरले नाही.नैसर्गिक आपत्तीत माणसे परागंदा होतात अशा अवस्थेत टाळूवरचे लोणी कसे खाता येईल अशी निर्लज्ज प्रवृत्ती आपला हिशोब मांडण्यात गर्क असते. देशाला सीमा असतात पण अन्याय अत्याचाराला सीमा उरलेली नाही. देश एक यातनागृह झाले आहे. तेथे सारे जहाँ से अच्छा कोणत्या तोंडाने म्हणता येईल? निषेधाशिवाय दुसरे काय करता येईल?असे अनेक प्रश्न या शतकात उपस्थित झाले आहेत. सुखाने नांदता येण्यासारखी परिस्थिती उरली नाही.धर्मांधतेचे जहरी फुत्कार मारणारांनी एकात्मतेची प्रतिज्ञा द्यावी असा विनोद या शतकात घडताना दिसतो.अशी लाजीरवाणी स्थिती या देशात उभी ठाकली आहे. अशा सर्व पार्श्वभूमीवर सनातन्यांच्या प्रतिगामी कुटनितीवर तिक्ष्ण नजरेने जागता पहारा ठेवणारी, शोषणापासून माणसाला वाचवणारी, जबाबदार नैतिकतेची मानवतावादी भूमिका महेंद्र गायकवाड यांच्या कवितेने ठामपणे मांडली आहे.

जे राष्ट्र पिंजऱ्यातील पोपटाची भाषा बोलते, धर्मोपदेशानुसार वागते असे राष्ट्र महासत्तेला प्रिय असते. बाजारू व्यवस्थेला नफेखोरीशीच देणेघेणे असते. धर्मांध आणि आध्यात्माच्या देशात बाजारीकरणाला मोठा वाव असतो.आपल्या देशातही वेगळे काही घडले नाही.

साम्राज्यवादी वसाहतवाद्यांची मुक्त बाजारपेठ
उपहासाने बुद्धाला हसवते येशूला क्रुसावर लटकविते
या महाकाय देशाचे धीट मनसुबे गवतासारखे
पुन्हा उगवले तर
अधर्माचा उच्चांक गाठला जाईल
माणसाचा भाव लुळकत राहील
अन् दंगली, कत्तलीचे शेअर्स खरेदी करता येतील

दंगली आणि कत्तलीच्या उत्पादनात जर भरघोष नफा मिळणार असेल तर त्याची ठेकेदारी महासत्ता आनंदाने करू शकते. अधर्म आणि हिंसेची पॅकेजेस या देशाला सहजपणे प्राप्त होऊ शकतात. त्यात माणसाचे मरण अटळ आहे! म्हणूनच या कवितेने इशारा दिला आहे.

काल आम्हाला जातिधर्माने वजा केले
अजुनही आम्ही शासक शोषकांची खुराक आहोत
म्हणूनच तुम्ही तुटून पडले निरागसांच्या खजिन्यावर

अन् लुटून नेले स्वातंत्र्य, समता, ममता, श्रम
आता सांभाळा चांदण्या रात्रीतले तुमचे बहुरूपी चेहरे
आम्ही केव्हाही टराटर फाडू
सूर्य उगवला आहे
आहेस गावात तर सापडशील डावात

अशा विद्रोहाच्या टप्प्यावर गायकवाड यांची कविता स्थिरावली आहे.

मारोतराव जाधव यांचा **आडीवाडी** (२००३) हा संग्रह म्हणजे भटक्या विमुक्त समाजातील बेलदार जमातीच्या कवीचा पहिलाच कवितासंग्रह होय. कवीने मनोगतात म्हटले आहे, 'माझा कवितासंग्रह विशिष्ट अशा व्यक्ती, गाव, स्थळ, जातीपुरता मर्यादित नसून तो संपूर्ण भटक्या विमुक्तांचा जीवन घडामोडींचा जिवंत चित्रपटच'[५]. भटक्या विमुक्तांच्या ४५ जातींची, त्यांच्या जगण्याची ओळख वाचकांना करून देण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी मोकाट जनावराप्रमाणे आडीवाडी भटकणाऱ्या समाजाच्या वेदना या कवितेतून प्रकट झाल्या आहेत. यातनांच्या कुंडात जन्म आणि जगण्यात केवळ भटकंती. उभा जन्म तळपत्या उन्हात भटकत राहायचे हे जगण्याच्या संचिताचे भोग अविरतपणे भोगायचे , अस्थिरतेच्या वणव्यात जळत राहणे हाच एकमेव पर्याय. चोरासारखा जीव गहाण ठेवून, दु:खावर दु:खाचे कलम करीत कुठवर जगायचे असा निरुत्तर करणारा प्रश्न या कवितेने ठळकपणे अधोरेखित केला आहे. इतरांची घरे बांधून देणाऱ्या या समाजाच्या डोक्यावर छप्परही नसते. जगण्याला दिशा नाही.जिथे त्यांचा जन्म आणि मृत्यूचीही नोंद होत नाही, त्यांची मूळंच या मातीतून उखडली गेली आहेत. 'असाच आमचा जन्म बेवारस ढोरासारखा, अनाथ पोरासारखा' अशा जगण्याचे वास्तव आडीवाडीतून प्रत्ययाला येते.

घाली बोजा चाली रे घाली बोजा चाली
देका कशा ही ओडाच्या हाली
बोजा हागनदारीनं उतरला
पाल ठोकननं ओड उबा रेला
छोर हांडा गेती पाण्यानं गेली, घाली बोजा ...

आडीवाडीचा ओड हागनदारीत उभा करावा लागतो. अशा घाणीच्या साम्राज्यातील जगाचे विदृप रूप या कवितेने साकार केले आहे. पूर्वसूरींच्या कवितांचा मोठा प्रभाव आणि अनुकरणही या कवितेत प्रत्ययाला येते. 'स्व'ला प्राप्त झालेले आत्मभान, स्वकियांचे भान जागृत करणारे वक्तृत्व, स्वेतरावर आवेशाने तुटून पडणारी बंडखोर आणि आक्रमक वृत्ती पाहावयास मिळते.

त्यांचा कारभार वेळकाढू, संधीसाधू नाटकीपणाचा
दुर्गंधी गटारातल्या पाण्याचा
त्यांचा लुचाट चेहरा वाणाचा ना गुणाचा मखमल भाटाचा
हे खोटेनाटे एवढे मोठे कशासाठी?
जाणून घेण्यास त्यांच्यावर चालून जावेसे वाटते
त्यांच्या पराक्रमी घटनांशी मन जुळवताना शरमल्यासारखे होते
त्यांच्या पंचरंगी मनाच्या दुर्गंधी कोठारात पचकन थुंकावेसे वाटते

अशा स्वरूपाच्या कवितांमधून संताप आणि विद्रोहाचा कडेलोट होताना दिसतो. प्रस्थापित व्यवस्था, व्यवस्थेतील सत्तांध, मदांध आणि स्वार्थी प्रवृत्तीवर आसूड ओढत ही कविता विविध पातळ्यांवरील विद्रोहाच्या छटा प्रस्तुत करते. स्वातंत्र्याचा प्रकाश अद्यापही या आडीवाडीपर्यंत पोहचला नाही.राबणे आणि मरणे हाच इथला धर्म आहे. अधरवेलीसारखा, फेकला तिथे वाढला, दिसेल तिकडे चालला.इथल्या जगण्याचे पर्यावरणच प्रदूषित झाले आहे. इथल्या

गर्भवतीच्या पोटातही वेदनाचे युद्ध आहे. उभा जन्मच येथे ओसाड रान झाले आहे. सामाजिक जीवनात तर प्रतिष्ठेचे निकषच बदलले आहेत. नीतिमत्ता, शील या गोष्टी हद्दपार झाल्या आहेत. अमानुषतेचे पीक भराभर वाढत गेले. म्हणून माणूस कुणाला म्हणावे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

आतालगोर फायलं तं मोठ्यायचेच मोठे झाले
सुखात सुख भोगत गेले आनंदात आनंद मानवत ऱ्हायले
भटकणारे भटकत ऱ्हायले भिक मागत गावोगाव
निर्लज्ज साले करत ऱ्हायले स्वत:ची भाववाढ
गब्बर बनले खाताखाता शेंड्यावरची साय
खाऊन खाऊन माजलेल्यायले पृथ्वीवरच न्याय हाय

अशी खंत प्रकट केली आहे. असे असलेतरी कुकर्मात अधोगतीचा जाळ असतो. म्हणून एक दिवस ही परिस्थिती बदलेल असा आशावाद कवीने व्यक्त केला आहे आणि अंतिमत: जुलमावर आघात करण्याचे आवाहन समूहमनाला केले आहे. बेलदारानी आपल्या शस्त्रानिशी सज्ज होण्याचे आवाहन ही कविता करते.हातात सुतकी, पार, कुदळ, फावडे घेऊन यावे आणि आपल्या ताकदीनिशी जुलूम आणि अन्यायावर घाव घालावे. अशाप्रकारे छळवणुकीचे वाळवंट, त्या वाळवंटातील अन्याय अत्याचाराचे पिरॅमिड सपाट करण्याचा बेत या कवितेने आखला आहे आणि समूहासोबत कवीही आघाडीवर आहे.

डरू नका येन - वेनं आवा माजे पिच्याडी
आपले रस्तेमं दुश्मन आले
जंदा उचला पार, फावडे, कुदळी
तुमचे साटू कडंबी मुंडारी म रयं ...

दिगंबर झाडे यांचा **वज्रनाद** हा कवितासंग्रह २००३ मध्ये प्रसिद्ध झाला. सामाजिक जीवनातील विसंवादावर बोट ठेवण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. अस्तित्वाची निर्थकता, अभावग्रस्तता, घुसमट झालेली आणि सहनशीलतेच्या पलिकडे गेलेली मनोवस्था, चळवळीच्या संदर्भातील भाष्य, उत्थानाच्या पहाटेचा ध्यास, घरभेदी प्रवृत्तीचा पंचनामा हे या कवितेचे काही आस्थाविषय आहेत. त्याचबरोबर शंका, तक्रारी, अपेक्षा, प्रश्न आणि खंत जमेल त्या पद्धतीने व्यक्त करण्याची रीत या कवितेतून दिसून येते. ''आधीच्या इतर दलित कवीप्रमाणेच दिगंबर झाडे यांच्याही कवितेत या देशातील सनातन संस्कृती, विषम व्यवस्था आणि त्यांचे चिरंतन अस्तित्व टिकवून धरणारे ग्रंथ - शास्त्र - रुढी - परंपरा यांच्या विषयीचा कमालीचा त्वेष व्यक्त होतो. भूतकाळातील विषाक्त व्रण अजूनही त्यांच्या मनावर कायम असल्यामुळे भूतकालीन आठवणींचा उजाळा या कवितेच्या अंत:करणात अधूनमधून अस्वस्थतेची कळ उठवित जातो. त्यामुळे भूतकालीन घटनांचे, आठवणींचे संदर्भ त्यांच्या कवितेत नव्याने प्रस्फुटित होतात.''[६] अभिव्यक्तीच्या संदर्भात एक विशेष सांगता येईल तो म्हणजे या कवितेला असलेला प्रतिमेचा हव्यास.उदा.

डोळ्यांना भुकेच्या लागल्या आहेत धारा
भाकरीचे घोस येत नसतात झाडाला
आणि आपले भांडवल एवढे की
इंधनही अपुरे जिंदगीचा मुडदा जाळायला

क्षुधाविषयक प्रतिमा, भुकेचे आसवांशी जोडलेले नाते, आयुष्याची झालेली प्रेतवत अवस्था अशा स्थितीचे सूचन या प्रतिमा संघटनातून झालेले दिसते.क्षुधातृप्तीसाठी आणि जीवनाच्या प्रवासासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गोष्टींची वाणवा असणाऱ्या स्थितीचे दर्शन या प्रतिमांमुळे प्रत्ययाला येते. त्याचप्रमाणे इतर विविध कवितांमधून वस्तीला विकलांगता प्राप्त झाल्याचे चित्र, वैफल्याची फळे हाती लागल्याची शोकात्म अनुभूती, करंटेपणा, विपरित भाव दर्शविणाऱ्या

अनेकविध प्रतिमाचा आढळ होतो.त्यामुळे या कवितांचा अर्थविस्तार झाला आहे. 'बोधिवृक्ष' ही सुद्धा लक्षणीय प्रतिमा म्हणून या कवितेत अवतरते.

मी अजून स्थिरावलो नाही
थोडी उसंत म्हणून थांबलो पिंपळाखाली
पिंपळ बहरला आणि सळसळ भरली शरीरभर
पिंपळाची उर्जा एकवटली माझ्यात
तेव्हापासून मी माणूस झालो

पिंपळाच्या झाडाला प्राप्त झालेले 'बोधिवृक्ष' हे नवे रूपक आहे. पिंपळाच्या झाडाखाली बुद्धाला ज्ञान प्राप्त झाले या घटनेमुळे पिंपळाच्या झाडाचे रूपकत्व नवा विचार आणि ज्ञान या गोष्टींची सांगड घालणारे ठरले. पिंपळाची उर्जा शरीर मनात एकवटणे म्हणजे बुद्धाचा विचार आत्मसात करणे होय. हा विचार आत्मसात केला म्हणजे माणसाला माणूस झाल्याचा प्रत्यय येतो असा विचार या ठिकाणी प्रकट झाला आहे. बुद्धाच्या मानवतावादी विचारांचे दिग्दर्शन या कवितेतून झालेले दिसून येतो.कॉलनी आणि वस्तीतील तफावत स्पष्ट करण्यासाठी भौगोलिक प्रतिमाचे उपयोजन करून परस्परविरोधी भाववृत्तीचा प्रत्यय दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूकनायक ही आंबेडकरी प्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण रितीने घडविली आहे. आपल्या कवितेच्या अर्थसमृद्धीसाठी नाविन्यपूर्ण प्रतिमांचे उपयोजन दिगंबर झाडे यांनी वज्रनाद मध्ये केले आहे.

उत्तम पवार (१० एप्रिल १९६८- २२ जुलै २०१६) यांच्या **सत्तेच्या आतबाहेर** (२००३) या कवितेने सत्तेच्या आतबाहेर असलेल्या आणि परिघाबाहेरील अनेक गोष्टींचा परिचय करून दिला आहे. शोषित पीडितांसाठी झगडणारा एक कार्यकर्ता या नात्याने प्रस्थापित मूल्यव्यवस्थेसंबंधी पडलेल्या प्रश्नातून, त्यातून येणाऱ्या अस्वस्थतेतून ही कविता जन्माला आली आहे. सत्तेच्या आत देशाला मागास करणारे कावेबाज, स्वार्थांध आणि सत्तांध लोक आहेत. या लोकांनीच सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचा खेळ केला आहे. धर्माचे राजकारण केले आहे. लाचार होणारी, सवतसुभे मांडणारी सौदेबाज दलालांची टोळी येथे कार्यरत आहे. त्यामुळेच परिघाबाहेरील वंचितांच्या दुनियेत अठराविश्व दारिद्र्याची मक्तेदारी आहे. इथे स्वातंत्र्य महाग आणि गरीबांचे मरण स्वस्त आहे. यातनांच्या या जीवघेण्या प्रवासात मानव्याचा चुराडा झाला आहे. प्रकाश पोरका बनला आहे. श्वासांची घुसमट, कोलाहल आणि कल्लोळ आहे. याच पार्श्वभूमीवर खटाऱ्यासारखी गचके खाणारी आणि वाऱ्याच्या झुळकीने कोलमडणारी वाया गेलेली युवाशक्तीही आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांची आस लागलेली भाबडी मने आणि रस्त्यांना ठिगळ लावतील या आशेने मोर्चात सामील होणारे पाय अशा गोष्टी आहेत.

होऊ दे उद्ध्वस्त तुझं घर माझं घर।
येऊ दे महापूर वाहू दे तुझं घर माझं घर

अशी एक भूमिका या कवितेने मांडली आहे. लोकशाहीचं घर निरपेक्ष लोकशाही राज्यात कितपत शाबूत आहे असा सवालही उपस्थित केला आहे. कवितागत निवेदक आपल्या भानाची सजगताही ठळक करीत जातो.

मला माहीत आहेत जंगलात लपलेली जनावरे
माहीत आहेत रस्ते आणि गुहा / चुकवीन म्हणतो पाठलाग
वाटेत उभी आहेत सनातनी बुरुज / उघडी आहेत धर्मशास्त्रे
चालून येतात मोर्चे / होताहेत निदर्शने आत्मदहन
मी पाहतो डोळ्यादेखत / शोधतो मार्ग माणसं जोडण्याचा

संघर्षाचे भान आणि लढ्याची वाट याबाबत कुठल्याही प्रकारची शंका कवी मनाला नाही.वादळाशी टक्कर देत तो निर्भयपणे उभा आहे. त्याच्या कवितेला संघर्षनाशाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आपण रस्त्यावर उतरून लढायचे, डोकी

फोडून घेत रक्तबंबाळ व्हायचे आणि आपल्या प्रश्नांशी बांधील नसणारांनी मात्र विनापरिश्रम मालिदा खायचा हे समीकरण आता बदलले पाहिजे इतिहासात अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत आणि वर्तमानातील प्रश्न आ वासून उभे आहेत.

आपणच झालं पाहिजे क्रांतीचा नायक
नाहीतर कुणीही होऊन जातो हिरो
आपल्या प्रश्नांशी बांधील नसलेला
आपलं जीवन न जगलेला

याचे भान आपल्या माणसांना आणून देण्याचे कार्य या कवितेने केले आहे. माणसाच्या कोतेपणाचे दर्शनही घडविले आहे.

मान्य मानव चंद्रावर पोहचला
तुम्ही मागासवर्गीयांच्या विहिरीपर्यंत पोहचू शकत नाहीत त्याचे काय?
ठिक आहे आम्हास मागासवर्गीय म्हणून हिणवता
पण तुम्ही देशालाच मागास केलेत त्याचे काय?

विज्ञानतंत्रज्ञानाच्या बळावर झेप घेणारा माणूस सांस्कृतिक क्षेत्रात मात्र कुपमंडूकच ठरला आहे. राजकीय जगातील दुटप्पीपणाचा चेहरा या कवितेने ओरबाडून काढला आहे. स्वतंत्र लोकशाही राष्ट्र म्हणून या देशाला संबोधले जात असले तरी समाजातील भूतकालीन जातीय संकुचित वृत्ती बदलली नाही. वर्तमानातील जातीय दंगली आणि गरीबांच्या संसाराची जाळपोळ या गोष्टी अशा मनोवृत्तीच्या निर्देशक आहेत. पुनरुज्जीवनवादी शक्तींचा बेलछी, किलावेनमानीपासून पोचीराम कांबळे ते अंबादास साबणे ते रमाबाई नगरातील हत्याकांडापर्यंतचा प्रवास अद्यापही संपलेला नाही. पंचावन्न वर्षांच्या स्वतंत्र लोकशाही राष्ट्रातील ही मोठी शोकांतिका आहे. इथली सत्तास्थाने मात्र या शोकात्म वास्तवाशी काहीच देणेघेणे नसल्यासारखी स्वत:तच मश्गूल असतात. सांत्वनापासून पत्रकार परिषदांपर्यंत केवळ प्रदर्शन करण्यातच त्यांचे हित असते.याचे समीकरण या कवितेने मांडले आहे.

सांत्वन + निधी + पत्रकार परिषद + निष्कर्ष अंबादास हत्या = गौडबंगाल
स्वतंत्रते इथे सत्यमेव जयते मयत आहे

सत्ताधाऱ्यांना सारे समाजमनच आपल्या हातचे बाहुले बनून राहावे असे वाटत असते.वर्णव्यवस्थेचा कायदा मोडीत निघू नये म्हणून सत्ता फक्त विशिष्ट वर्गाच्याच हाती राहावी याची दक्षता ते घेत असतात. या देशाच्या पन्नासीनंतरच्या काळातही या कवितेने स्वातंत्र्य, संस्कृती आणि देशाबद्दलचे प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी भारतमातेलाच ज्वालामुखी होऊन अन्यायाचं दहन करण्याचं आवाहन कवीमनाने केले आहे. राजकीय संस्कृतीचे अध:पतन अत्यंत उपरोधिक स्वरात व्यक्त केले आहे.

मित्रा सत्ता नसताना झेंडा खांद्यावर घेऊन
घोषणा देत वडापाव खात ... पत्रकं वाटत ... पोस्टर्स चिकटवताना
पाहायचो तुला ...
आता सत्तेचा तू एक घटक सैरभैर पळत सुटतोस
सत्तेच्या धुंदीत हल्ली दिसतोस पूर्वीचा नसल्यासारखा
शब्दसुद्धा पूर्वीचे राहिले नाहीत
भेंचोद, मारचोदने केलेय जवळ
तुझे सहकारी करू लागलेयत सलाम

सत्तेच्या गळाला लागल्यानंतर नेतृत्व लाचार होते.विद्रोह विरून जातो. परिभाषा बदलते. जगण्याचे संदर्भ बदलून जातात. अशा नेतृत्वापासून मग सामान्य कार्यकर्ती माणसे दूर जातात. पोटासाठी काहीतरी केलं पाहिजे, चळवळीचं

नंतर बघता येईल असे म्हणत पोट, खिसे आणि घरे भरण्याच्या प्रश्नांना अग्रक्रम मिळतो आणि चळवळ पिछाडीवर जाते. हेही एक अस्वस्थ करणारे वास्तव आहे. एकूणच सत्तेच्या आतबाहेर किंवा परिघावर कार्यकर्ता मरतो. चळवळ देशोधडीला लागते आणि समाजमन पतंगासारखे गटांगळ्या खात राहतं.

कवीच्या चारित्र्याचा, जगण्याचा संबंध लढ्याशी आहे. लढ्याचा संबंध तत्त्वाशी आहे. अशाप्रकारे भौतिक आणि तात्त्विक दोन्ही पातळ्यांवरील कवीचा संदर्भ साकार झाला आहे. पुरुषप्रधान भोगवादी प्रवृत्तीबद्दल पराकोटीचा उपरोधही व्यक्त केला आहे. उदा.,

रांडबाजा करताना येत नसतो धर्म आडवा
येत नसते जात आडवी
तेव्हा आपण काटेकोरपणे पाळतो सर्वधर्मसमभाव

पोटात विषमता ठेवून ओठांवरल्या समतेला काही अर्थ नसतो. म्हणून समतेच्या प्रस्थापनेसाठी मानवी मूल्यांच्या पाऊसढगांनी कोसळावे आणि माणसाला माणूसपण प्राप्त व्हावे अशी मानव्याची प्रतिष्ठापना करणारी आणि मानवतेचे महन्मंगल सुक्त रचणारी ही माणसांची कविता आहे.

✸ अशोक रा. इंगळे (जन्म १ मे १९७३)

युद्धपक्षी (२००४) हा या दशकातील एक महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. या संग्रहातील कविता बुद्धाच्या करुणेने ओथंबली असून आंबेडकरी विचारांच्या प्रकाशात न्हाऊन निघाली आहे. मानवमुक्तीचा ध्यास तिला लागला असून शब्दाशस्त्राच्या ओठी क्रांतीगीत देणे हे 'युद्धपक्षी'चे एक प्रयोजन आहे. त्याचप्रमाणे संघर्षातून जन्माला आलेल्या या कवितेने समाजातील जीवंत माणसावर प्रेम करणे शिकविले असा निर्वाळा कवीने आपल्या मनोगतातून दिला आहे. मरगळलेले वास्तव प्रदिप्त करण्याचा ध्यास या कवितेला असून कार्यकर्त्याच्या भूमिकेतूनच हा कवी आपली अभिव्यक्ती करतो असे प्रत्ययाला येते. माणूस बदलेल, परिवर्तन घडून येईलच असा विश्वास बाळगणाऱ्या या कवितेची सामान्य माणसाच्या मनातील खदखदणाऱ्या असंतोषाला वाट मोकळी करून देण्यासाठी इथला आसमंत पेटून उठला पाहिजे अशी आकांक्षा आहे.

मी निळ्या नभी सप्तरंगी ध्येयाची लेणी कोरतो आहे
उद्याच्या सूर्यकुलातील परिवारासाठी
मार्गाला महामार्ग जोडण्यासाठी माझी प्रज्ञा धडपडते आहे

गतकाळाचे भान ठेवून नव्या शतकाला भिडण्यासाठी तावून सुलाखून तयार असलेली कवीची जाणीव पोकळ तत्त्वज्ञानात वाहून जाणारी नाही. कारण चिंध्या झालेल्या पोकळ तत्त्वज्ञानातील निष्क्रियता कळून चुकल्यामुळे कवीमन अधिकच सजग झाले आहे. या जाणिवेने समकालीन जीवनातील वास्तवाचा, सांस्कृतिक मानसिकतेचा आणि सामाजिक उदासिनतेचा शोध घेतला आहे. मूळात या युद्धपक्ष्याचा निवारा रणरणत्या पार्श्वभूमीवर उभा आहे.

वाळवंटात घर माझे ओठी सूर्यगीत आहे
तुमच्या जखमी दिलांचा मी युद्धपक्षी आहे

रणरणत्या पार्श्वभूमीवर ओठात सूर्यगीत सोबतीला घेऊन जखमी मनाच्या समूहाचे प्रतिनिधित्व करीत युद्धरत होणाऱ्या पक्ष्याची प्रतिमा येथे साक्षात झाली आहे. फुले आंबेडकरी कवितेत सूर्यप्रतिमा आंबेडकर प्रतिमा म्हणून अनेकदा उपयोजित झाली आहे. या कवितेतील प्रतिमेचा निर्देश आंबेडकरी युद्धपवित्र्याकडे असल्याचे सूचित होते. आंबेडकरी परिवर्तन विचाराने दु:खी पीडित समूहमनाशी स्वत:स जोडून घेऊन परिवर्तनाच्या रणसंग्रामात उतरण्याची सज्जता असणारा हा युद्धपक्षी आहे. मात्र या नायकाला रणांगणावर शस्त्राने युद्ध खेळावयाचे नाही कारण ही भूमी बुद्ध तत्त्वानी भारलेली आणि भारावलेली आहे. त्यामुळे बदलासाठी अनिवार्य असणाऱ्या विचारतत्त्वांची शस्त्रे या कवितेने पाजळून ठेवलेली

आहेत. मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी हे युद्ध आहे. या युद्धाच्या प्रक्रियेत सातत्यशीलता आहे. त्यामुळे पुढच्या पिढ्याही या तत्त्वांच्या शस्त्रानी तावूनसुलाखून निघणेही क्रमप्राप्त आहे. म्हणून या कवितेतील 'फिनिक्स' आणि 'बुद्धभूमी' या प्रतिमांच्या संयोगातून एक वेगळा सौंदर्याविष्कार झाल्याचे प्रत्ययाला येते.

फिनिक्स पक्षी फार मोठ्या ध्येयनिष्ठतेने
किनाऱ्याकडे वळत आहेत
हे विसाव्या शतकातले सनातन उंबरठे उद्ध्वस्त करण्यासाठी
तेव्हा बोधिवृक्षांच्या सळसळणाऱ्या पानांचा सुगंध
तू त्यांच्यापासून लपवून ठेवू शकणार नाहीस
कारण तो या मातीच्या कणाकणात भिनलेला आहे

या मातीतून उभे राहणारे जग हे शोषणमुक्त, व्यवस्थेचे बंधन नसणारे, बुद्धतत्त्वाच्या खतामुळे उगवलेल्या नव्या जगण्याचे आश्वासन देणारे असेल. कवीने येथे कलात्म भान राखल्याचे प्रत्ययाला येते. या मातीत रुजलेले बुद्ध तत्त्व आणि आगीतून उभे राहिलेले तेजतत्त्व असा सौंदर्याविष्कार फुललेला येथे प्रत्ययाला येतो. दु:ख पिणारी, बुद्धाची करुणा पाजळणारी आणि अमावस्येला सूर्य होणारी माणसं या कवितेच्या मन:चक्षूला दिसली आहेत. म्हणूनच उदास संस्कृतीतील उदास विचारांना या कवितेने नाकारले आहे. कारण उदास विचारांची माळ गुंफणाऱ्या लोकांनीच हा देश पोकापोकासा केला आहे. नासक्या विचारांची पांढरी कबुतरं ज्यांच्या डोक्यावर बसली आहेत, ती उडवून लावायची असतील तर विद्रोह करून उठले पाहिजे असाही युद्धपवित्र्याचा एक भाग येथे पाहावयास मिळतो. या कवितेत भरारीपक्षाची कृतिशीलताही पाहावयास मिळते. ती विचारांचे वहन करण्याचे साधन या अर्थाने संघटित झाली आहे.

माझ्या प्रकाशगीताचे अपवर्तन होऊ नये म्हणून
भरारीपक्षाच्या प्रिय ओठावर चवदार तळे ठेवावे
कारण मला हवाय त्याच्या ओठावर सम्यक विद्रोह अखंडपणे

दिशा चुकू नये आणि आपल्या विचारांचे अपवर्तन होऊ नये याची पुरेपूर खबरदारी कवीमनाने घेतली आहे. या कवितेचा दुसरा एक महत्त्वाचा भाग म्हणजे आधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या काळात मूल्यांचा होत गेलेला ऱ्हास, नवसांस्कृतिक युगाचे आगमन आणि हरवत गेलेला माणुसकीचा गहीवर या सर्व गोष्टींची नोंद या कवितेने घेतली आहे. मायेने हाक मारणारे आसपास कोणी नाहीत ज्यावर विश्वासाने मान टाकावी असे खांदे आता उरले नाहीत. अशा हतबल प्रवासात माणसाच्या शोधात ही कविता निघाली आहे. माणसांचा भकासपणा सर्वत्र पसरला आहे. त्यामुळे झकास चेहऱ्याने मिरविण्यासारखी परिस्थिती उरली नाही. उदासीची छाया सर्वत्र पसरली आहे. गिरगट्ट दगडी हृदयांना पाझर फुटण्याची शक्यता नाही.

काय गंमत खरंच काचेची हृदयं घेऊन
या दगडांच्या प्रदेशात राहतो आपण
काचेची स्वप्ने समजून घेईल
असा इथे एकही कबीर उरला नाही

आपले म्हणून ओलावा मिळण्याची शक्यता धुसर झाली असे हे बेदर्दी पर्यावरण आहे. अशा पार्श्वभूमीवर उद्याच्या सुंदर स्वप्नांसाठी, माणसाचा धम्म रुजविण्यासाठी ही कविता कटिबद्ध झाली आहे. कारण ती एका आंबेडकरी मुसाफिराची कविता आहे आणि कवीने पहारेकऱ्याची भूमिका पार पाडली आहे. सामाजिक, सांस्कृतिक जगातील पोकळपणा आणि खिळखिळेपणाच्या पार्श्वभूमीवर प्रर्वतकांच्या, तत्त्ववेत्त्यांच्या विचारतत्त्वाचा फॅशनसारखा वापर करणारी कुटिल निती जन्माला आली. राजकारण्यांनी त्यासाठी मोठाच हातभार लावला. तत्त्व आणि विचारांचे भांडवल धंदयासाठी करायचे ही नवी व्यापारी निती प्रबोधनाच्या चळवळीतील मोठा अडसर ठरली आहे. या स्वार्थी व्यवहाराच्या

महारोगापेक्षा कवितेचा रोग चांगला असल्याचा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. जाणिवा अंधूक, धुसर करणारी देवदत्त प्रवृत्ती सजग झाली आणि प्रज्ञा धूळ खात पडली याविषयीची जिवघेणी खंत कवितेतून प्रकट झाली आहे. भूकमारीच्या पार्श्वभूमीवर संसदेत कोंबडबाजार भरतो. लोकप्रतिनिधीची कृतिशीलता हास्यास्पद ठरते.

खूप मंथन केल्यावर कळते
देवदत्ताने राष्ट्रपक्षीच आंधळे केले
अन् मला दिसतेय शांत नालंदा विद्यापीठ
सतत आक्रोशताना मुक्तीसाठी

देश चालविणारांना आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचाच विसर पडला आहे. ही प्रवृत्ती सरड्यासारखी रंग बदलणारी आहे. तिने माणसाचे गळे कापण्याचेच काम केले आहे. दैन्यदास्याने बरबटलेल्या प्रज्ञेशी तिला काही देणेघेणे नाही. त्याचवेळी सामान्य माणसाची माणुसकी शाबूत आहे. संघर्षाचे भानही कायम आहे.

देश काय असतो? कसा असतो
हे वेळेवर झोपडपट्टीत जाऊन पहात असतो
तिथे गेल्यावर वेगळेच चित्र दिसते
कुणाच्या घरी सांजीचा आटा नसते
कुणाच्या मांडीला पदर नसते
अन् कुणाच्या शमनात संघर्षाचे वादळ असते
अरे तेच नाव आमच्या ओठावर
क्रांतीचे गाव असते

सर्वसामान्यांच्या मनातील संघर्षाचे वादळच क्रांतीच्या गावाची दिशा दाखवित असते आणि राजकारणी आळीमिळीगुपचिळी असतात. आपली घरे मजबूत करण्यासाठीच कार्यकर्त्यांचा वापर करणारे नेते एकदा स्थिरस्थावर झाले की त्यांना पुढे चळवळीशी काही देणेघेणे उरत नाही. अशा दांभिक दगाबाज आणि मतलबी प्रवृत्तीवर ही कविता कोरडे ओढते. चळवळ म्हणजे फॅशन नव्हे किंवा दरदिवशी बदलला जाणारा पोशाख नव्हे. परिवर्तनाची बीज गाभण राहिली पाहिजेत तरच चळवळीचा म्होरक्या होण्यात हशील आहे याचे भान या कवितेने आणून दिले आहे. तसेच झोपडपट्ट्या आणि फुटपाथवरूनच विद्रोहाचा जन्म होईल असा विश्वास व्यक्त केला आहे. कास्तकारांच्या हृदयाला कुरतडून खाणाऱ्या प्रवृत्तीचाही समाचार घेतला आहे. लोकशाही राष्ट्रात मूलतत्त्ववाद्यांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या गोष्टी कराव्यात यासारखा विनोद नाही. रस्त्यावरच्या भिकाऱ्याला सुद्धा मूलतत्त्ववाद्यांची ही फुशारकी हास्यास्पद वाटू लागली आहे. काळ वेगाने बदलला तरी माणुसकी विकसित झाली नाही, संस्कृती सभ्यतेत परावर्तित झाली नाही याला काही प्रगती म्हणता यावयाचे नाही. कधीकाळी बुद्धाने पाण्याच्या लवादातून स्वत:ला हद्दपार करून घेतले आणि ज्ञानप्राप्तीनंतर दु:खाचे कारण तृष्णा असा त्याला शोध लागला होता. आज तर मूलभूत गरजांनी वेगळेच रूप धारण केले आहे.

हे प्रबुद्ध मानवा आता
भांडणतंटा न करताही आमच्यावर
पाण्याच्या भीषण टंचाईमुळे
परिव्रजा स्वीकारण्याची वेळ आली आहे

येथे तृषा तृप्तीच होऊ शकत नाही म्हणून परिव्रजेचा मार्ग पत्करण्याची वेळ येते. याला काळाचा महिमा म्हणायचे की निसर्गाचा उफराटा न्याय असे अंतर्मुख करणारे प्रश्न या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहेत. अशा अनेकविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी खरेतर शोषक आणि अन्यायी व्यवस्थेच्या मूळावरच घाव घालायचे आहेत. मात्र हे मूळ हाती लागत नाही.घाव घालण्यासाठी आंबेडकरी विचाराचे क्षेपणास्त्र उपलब्ध आहे. या क्षेपणास्त्राचे मोल सांगणारे संस्कार पुढील पिढ्यांवर केले पाहिजेत ही काळाची गरज आहे. जाणीव ही ज्ञानात्मक आणि भानात्मक संज्ञा आहे. या संज्ञेचा

संस्कार करण्याची जबाबदारी स्वत:सह सर्व समाजाचीच असल्याचे प्रतिपादन या कवितेने केले आहे.

विनोद बुरबुरे (जन्म २ जुलै १९७३) यांचा **उत्क्रांत लेणी** (२००१) हा कवितसंग्रह या शतकाच्या आरंभीच प्रसिद्ध झाला. मात्र नव्या शतकाचे स्वागत करण्यास अनुत्सूक असणारे कवीमन येथे प्रत्ययाला येते. कारण कालच्या ऐतिहासिक शतकाने माणसाला भटकंतीशिवाय काहीच दिले नाही. जर्जर भूतकाळ वर्तमानावर आरुढ झाला आहे.

मावळणारी प्रत्येक सांज भूकेचा प्रश्न घेऊन येते
उगवणारी प्रत्येक किर्रऽऽ रात्र
पहाटेस एखादे अनैतिक अर्भक जन्मास घेऊन येते

शतकाचा आलेख कोरताना हे शतक बेबस, लाचार, अगतिक आणि जुलमी असल्याचा निष्कर्ष हाताशी असल्यामुळेच कवीमन नव्या शतकाचे स्वागत करणे नाकारते. केवळ आपल्याच धुंदीत चूर असणाऱ्या आपल्या समकालीन पिढीच्या वर्तनाचे वास्तव वर्तमान मांडण्याचा प्रयत्न कवीने केला आहे.

तलब कोणतीही असो, पोटात असली की
तुमचा विद्रोह धमाल करतो
एकंदरीत, तंबाखू असेपर्यंत तुमचा विद्रोह चमक घेतो
शापी थंडी असेपर्यंत तो घोट गिळत तळपतो
अन् गांजा, अफू, हुंदक्यात असला की
तो अधिकच प्रखर झिंगतो

स्वार्थापायी हितसंबंधात गुंतलेल्या स्वत:च्या अस्मितेच्या संदर्भात बेपर्वा असलेल्या प्रवृत्तीवरचे भाष्य या कवितेने केले आहे. भरकटलेले संदर्भ आपल्या कवितेने शोधले पाहिजेत अशी आस बाळगणाऱ्या कवीमनाने आपल्या कवितेने सूर्यांकुळास जन्म दयावा अशी अभिलाषा व्यक्त केली आहे. या कवितेला क्रांतीच्या रंगाचे जबरदस्त आकर्षण आहे. म्हणूनच सामाजिक संवेदना हरवत गेलेल्या मानसिकतेविषयीचे अस्वस्थ करणारे वास्तव वाचकांच्या पुढ्यात ठेवले आहे. मानवतेचा समुचित अनर्थ टाळण्यासाठी अंतर्विरोधी सुशिक्षित शेवाळणे मोडीत काढणे या कवितेला महत्त्वाचे वाटते. अस्मितेची सुपीक हिरवळ फुलावी यासाठीची धडपड करताना या कवितेची दमछाक होताना दिसते. ज्यांनी या भूमीचे मातृत्व नागविले, संवैधानिक कर्तृत्व पांगविले त्यांच्या समूळ संहारासाठी क्रांतीचे आगमन होण्याची अपरिहार्यता या कवितेने पटवून दिली आहे.

सामाजिक अंतर्विरोध स्पष्ट करणे हे या कवितेचे एक उद्दिष्ट आहे. राजकारण्यांची बेगडी उचलेगिरी, निवडणुकीच्या काळातील प्रासंगिक आणि बॅनरपुरती असणारी उसनी बांधिलकी यावर प्रहार करण्याचे काम ही कविता करते. स्वकीय जगातील अंतर्विरोधही उजागर करते.उदा.

तुझ्या प्रवर्तनचक्राचे घोडे
पुढे चालून गधे निघाले
अन् सिंहाची डरकाळी फोडणारे छावे
पुरते, पखाली वाहणारे रेडे निघाले

आपलीच माणसे प्रज्ञासूर्याचा विचार एवढ्या तत्परतेने कशी विसरली हे नजरेस पडल्यामुळे कवीमनाची उत्क्रांत नजर आपल्यातलाच माणूस सर करण्यास्तव कृतिशील होताना दिसते.

अजुनही यांच्या डोक्यात विचारांचे अर्थहीन झुले?
का कशी नाही अंगारलीत यांच्या हृदयात
तुमच्या सिद्धांताची सिद्धार्थफुले

मायावी कोरड्या जिव्हाळ्याना बळी पडणारी माणसे, यांच्या मातीच्या घराला फुटीची दारे आहेत. दुसरीकडे

विषाक्त स्मशानभाव वधारले आहेत. येथे माणुसकीचा लिलाव निवांतपणे होतो आहे. म्हणूनच या कवितेने माणुसकी हरवत गेल्याची जीवघेणी खंत व्यक्त केली आहे. माणुसकीचे स्वरूप केवळ आश्वासनासारखे झाले आहे, ज्याची पूर्तता कधीच होत नसते! पैसा तिथे माणुसकी, तिचा गहिवर आटत गेला, विश्वास हरवला आहे. म्हणून माणुसकीचे स्वत्व स्फुरले पाहिजे अशा आग्रहातून उत्क्रांतीची लेणी कोरणारी उजेडाची गाणी या कवितेच्या ओठावर उगवली आहेत!

ना. तु. पोघे हे मिलिंद कॅम्पसचे कवी. मिलिंद वार्षिकांकातूनच त्यांच्या कवितेचा प्रारंभ झाला. त्या काळात त्यांची इंद्रधनू ही कविता गाजली होती **आणि सूर्य गवसला** हा त्यांचा कवितासंग्रह २००१ मध्ये प्रसिद्ध झाला. मूल्यऱ्हासाच्या कड्यावर उभ्या असलेल्या गावाचे चित्र या कवितेने रेखाटले आहे. गावात आता जहरीपणा ओतप्रोत भरला आहे. राजकीय अपप्रवृत्तीने गाव नासवला आहे. दगाबाजीचा प्रपंच वाढला आहे. शांतता नांदेल असे वातावरणच आता उरले नाही. मायेची पाखरे दूर देशी उडून गेली आहेत. सामाजिक सांस्कृतिक प्रदूषणाचे हे प्रतिकात्म चित्रण आहे. माणसाच्या वस्तीत द्वेषमूलकता व्यापून उरली आहे. अमानुषता कोणते टोक गाठेल याचा नेम नाही. अहंकाराच्या मस्तीत ही वस्ती जात आणि धर्म सोबतीला घेऊन स्वार्थाचे आखाडे रंगवताना दिसते.

द्वेषाच्या आखाड्यात स्वार्थाची कुस्ती आहे
पाखरांनो, इथे घरटी बांधू नका
ही माणसाची वस्ती आहे

अशा पार्श्वभूमीवर आपल्या अंगणात बोधीवृक्ष लावणारी ही कविता माणुसकीला काळिमा फासणाऱ्या कुठल्याही घटनेचा तीव्रतम निषेध करते. मात्र हा निषेध करताना कोणताही अभिनिवेश ती दाखवत नाही. माणसाच्या हृदयातील करुणेचा प्रांत आणि माणुसकीचे रान उद्ध्वस्त झाल्यामुळे बुद्धाच्या शोधात ती निघाली आहे. कारण जातीधर्माच्या विखाराने प्रदूषित झालेल्या आसमंतात श्वास गुदमरून गेले आहेत. त्यामुळे जगण्यावरच प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. उदय होण्यापूर्वीच अस्त व्हावा अशी स्थिती आहे.

शुभ्र हिऱ्यामाणकांचे भरघोष पीक हाती यावे
म्हणून मी मूठभर मातीचे परीक्षण केले तेव्हा
मातीतून जातीचा नुसता दर्प येत होता
आणि माझ्या लक्षात आले फुलोऱ्यातली लुसलुशीत कणसं
अशीच पोटऱ्यातच का जळून जाताहेत

असा घटितामगील कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. त्यातून सामाजिक भूमीवरील वास्तवाचे नेमके निरीक्षण तिला टिपता आले आहे. स्वत:च्या स्वार्थासाठी चळवळीलाच डावावर लावणाऱ्या, आपल्याच माणसाला दगाफटका देणाऱ्या प्रवृत्तीचाही समाचार ही कविता घेते. काळ्या कारस्थानाच्या हालचालीवर लक्ष ठेवते. सुस्तावलेल्या समाजमनामुळे झालेल्या नुकसानीचा हिशोब मांडते. अंधारयुगाला अखेरचा सलाम करून मुक्तीचा महासंगर आणि अस्मितेचा जागर घालण्याचा चंग या कवितेने बांधला आहे.

आम्ही तर अंधारयात्री
निघालो आहोत प्रकाशाच्या शोधात!
गुलामीचे बंध तोडून मुक्त माणसांच्या मुलुखात
यायचेच असेल आमच्याबरोबर तर जरुर या
पण मनाची जळमटे खुंटीला टांगून या
परतून येऊच याची खात्री नाही
असेही घरी सांगून या

काळोख खोदता खोदताच सूर्य हाती आल्यामुळे अंधाराच्या साम्राज्यात उजेडाचा जन्म झाल्याची प्रचिती

या कवितेला आली आहे. या कवितेतील प्रतिमासृष्टीने आपले वेगळेपण राखले आहे. सौंदर्यबोधक प्रतिमेच्या अर्थाला शह देऊन वास्तवातील प्रतिमात्मतेचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे सुखाचे सप्तरंग आहेत तर दुसरीकडे ओढगस्ती दु:खाचे सप्तरंग आहेत. हे अभावग्रस्त जगाच्या दु:खाचे रंग अधिक गडद आणि गहिरे आहेत. ऋतू प्रतिमांची अभावाच्या अनुभूतीशी सांगड घातल्यामुळे निसर्गचक्रातील विविध ऋतूचे नैसर्गिक अर्थ पार बदलून गेले आहेत. नैसर्गिक अर्थाच्या विपरीत अर्थाने ह्या ऋतूप्रतिमा साकार होतात.उदा.

वर्षाऋतू डोळ्यात साठवून गावकुसाबाहेर
ग्रिष्मात जन्मलेली आम्ही माणसे
शरदाचे चांदणं आमच्या शिवारात खुललंच नाही
निवडुंगाच्या बनात वसंत कधी फुललाच नाही

गावकुसाबाहेरच्या काटेरी बनात उघड्यावर जगणाऱ्या दलित समूहाचे चित्र येथे साकार झाले आहे. ऋतूपरत्वे बदलत जाणाऱ्या सृष्टीचक्राप्रमाणे कोणताही बदल या समूहाच्या जगण्यात झाला नाही. अभावग्रस्ताच्या जगण्याचे वास्तव प्रतिमांच्या विपरीत अर्थामुळे साकार झाले आहे. सामाजिक ऋतूचक्राची स्थितीशीलता या प्रतिमाविश्वाने अधारेखित केली आहे. त्याचप्रमाणे काही प्रतिमा अर्थसंकोचही करतात असे प्रत्ययाला येते. उदा.

हा सूर्य आहे लाचार / लुळा पांगळा मूक बधीर
स्वत:पुरता प्रकाशणारा / तोंड ओळखून हसणारा

या प्रतिमासंघटनातून सामाजिक अपप्रवृत्तीचा निर्देश होताना दिसतो.सूर्याचा वारसा सांगणारी माणसे आपल्या तत्त्वाला पारखी झाली आहेत. स्वार्थांध झाल्यामुळे आपल्या समूहाकडे पाठ फिरवली आहे. समूहसन्मुख होण्याऐवजी समूहविन्मुख झाल्यामुळे वस्तीत भरदिवसा अंधार पसरला आहे. स्वयंघोषित, स्वयंभू सूर्याने सामाजिक दगाबाजी केली आहे. अशा अर्थाची प्रचिती येते.सूर्य या तत्त्वाचा आणि प्रतिमेचा संकोच (अर्थाच्या दृष्टीने) येथे झाला असे प्रत्ययास येते.

माणसाच्या मुक्तीचा ध्यास घेणारी **रमेश बोर्डेकर** यांची **पोरके आभाळ** (२००३)मधील कविता उपेक्षितांचे अंतरंग उजागर करते. झोपलेल्यांच्या मुर्दाड मनातील गजर होण्याचे आश्वासनही देते.

व्हावे खुले खुले हे आभाळ माणसांचे
या मागणीत माझ्या, कुठलाच डाव नाही

असा तिचा मूल्यात्मक स्वर आहे. मर्ढेकरांनी कधी काळी 'बुद्ध गयेचा पिवळा वारा' असे म्हटले होते. या कवितेत मात्र बुद्ध गयेचा शांतीच्या पताका खांद्यावर घेऊन चौखुर उधळणारा घोडा प्रत्ययाला येतो. मानवतेच्या प्रस्थापनेसाठी हे चौखूर उधळणे आहे.

रंगेल इतिहासाची खोटारडी पाने फाडून
त्यात आक्रोश वेदना अन् तळागाळाचा वास्तववादी
इतिहास दाखल करणार आहे
इथे धुमसणाऱ्या प्रत्येक अणुभट्टीस
एक पिंपळपान भेट देणार आहे

बुद्ध तत्त्वाचे रोपण नव्या शतकाच्या केंद्रावर होणार आहे असे उल्हसित मनाचे मनोगत या कवितेने सादर केले आहे. लोकशाही राज्यावरील उपरोधिक भाष्य या कवितेने केले आहे. कर्क प्रकृतीला उधाण आल्याने स्वार्थाच्या वाटा मोकळ्या होत गेल्या आणि चोरांच्या उलट्या बोंबाचा सुकाळ सुरू झाल्याचे वास्तव अधोरेखित केले आहे. पूर्वसूरींचा बराचसा स्वर या कवितेत ऐकू येतो.

✹ सर्जेराव चव्हाण (जन्म : १ जानेवारी १९५०)

आपण गाफील राहिलो तर (२००१) ही सर्जेराव चव्हाण यांची इशारेवजा कविता आहे. या कवितेने बुद्धाची करुणा आणि आंबेडकरी संघर्षाशिवाय दुसरे काहीच देता येण्यासारखे नसल्याचे घोषित केले आहे. फाटका संसार आणि हातावर पोटे असणाऱ्या, मरणवाटेवरच्या प्रवाशांची वेदना मुखरीत केली आहे. सामाजिक, गंभीर स्वरूपाच्या या कवितेने समकालीन जीवनातील अनेक प्रश्न आणि समस्यांचा आलेख मांडून स्वकीय आणि स्वेतराचे वर्तमान वास्तव अधोरखित केले आहे. आपण गाफील राहिलो तर काय काय अनाचार माजू शकेल, कोणत्या सांस्कृतिक उलथापालथी होऊ शकतील याचा लेखाजोखा मांडला आहे. समकालीन जीवनात धर्मांधतेला विसावा देणाऱ्या महावृक्षाचा विस्तार झाला आहे. काळ बदलला, नवे तंत्रज्ञान विज्ञान आले म्हणून सनातनी मानसिकता बदलते असे भारतीय संदर्भात तरी घडत नाही. सामाजिक आसमंतात असुरक्षितता आणि अविश्वसनिय पर्यावरण व्यापून उरले आहे. या पर्यावरणात भगवी लिपस्टिक लावलेला काफिला नागड्या संगिनीसह वाटेवर उभा आहे.

आजकाल रंग बदलू लागली आहेत
आपली वाटणारी झाडेसुद्धा
स्वत:च्या डोळ्यावरदेखील भरवसा ठेवण्याचे
दिवस नाही राहिले आता

इकडे आड तिकडे विहीर अशी सांस्कृतिक स्थिती झाली आहे. अशावेळी गाफील राहिल्यास ते आपलं सरण रचायला भाग पाडतील म्हणून पदोपदी दक्षता बाळगण्याचे आवाहन स्वकीयांना करते. पुराणप्रिय संस्कृती समतेच्या मार्गात आडवी येत असल्याने तिला चूड लावल्याशिवाय समतेची पहाट दिसणार नाही अशी ग्वाही या कवितेने दिली आहे. बरबटलेल्या हाताची बोटे चाटणारी प्रवृत्ती देशाचे भवितव्य घडवू शकत नाही. ते फक्त आश्वासनाचे फव्वारे उडवत असतात त्यामुळे त्यांचेकडून जीवनाला हमी मिळण्याची तसूभरही शक्यता नाही. म्हणून आपल्या जीवनाचा अर्थ आपणच तपासून पाहायचा असेल तर विद्रोही कृतिशिलतेसाठी सज्ज राहणे अनिवार्य ठरते.

लाचार गुर्मीत जगणारांचे हात करावेत कलम
हासडावी जीभ गर्भातच गारद करावी त्यांची वंशावळ

प्रतिक्रांतीवाद्यांच्या संस्कृतीला पुरक ठरणाऱ्या गोष्टी स्वकीयाकडून घडतात आणि 'जिभेवर विषारी गोडवा ठेवून खदाखदा हसतो फॅसिझम' त्यामुळे लोकशाहीचे सारेच खांब खिळखिळे झाले आहेत. स्वकीयांच्या फितुरीने तर एवढे टोक गाठलेआहे की,

आमचे छावे तुमच्या छावणीत डेरेदाखल
तुम्ही फेकलेली हाडे चघळीत
उभे आहेत तुमच्या दारावर

अशा फितुरीमुळे चळवळीला खिंडार पडले. 'तुकडा झेलण्यासाठी घोळत फिरती गोंडा' अशा लाचारीच्या रस्त्यावरील प्रवास सामाजिक अध:पतनासही कारणीभूत ठरला आहे. आणखी एक विरोधाभास असा, की अंधाराच्या बुडावर बसणारे सूर्यावर थुंकून थुंकून स्वत:चाच चेहरा घाण करून घेत आहेत. मूलतत्त्ववादी सूत्रधाराने तर आपल्या चाली रचण्याचे सूत्र हातात घेतले आहे.

गावात आता नाही फुटत
एकमेकांच्या सुखदु:खाला वाचा पहिल्यासारखी
सूत्रधारांनी रंगीत कुंपण लावल्यापासून
सात पिढ्यांचे वैर डोळ्यात साठवून
वागताहेत सख्खे भाऊ

कुटुंबापासून सामाजिक कुटुंबापर्यंत बंधुभाव उरला नाही. वैरभाव आणि विभाजनाला ऊत आला. हे मूलतत्त्ववाद्यांचे यशच आहे. म्हणूनही गाफील राहून चालणार नाही असे वारंवार या कवितेने बजावून ठेवले आहे. पाण्याच्या घोटाबरोबर भाकरीचे क्रांतीगीत गाण्यातूनच अंधारक्षितिजावर प्रकाशकोंब उगवलेले दिसतील असा दुर्दम्य आशावाद या कवितेने उरीपोटी कवटाळला आहे.

आदिनाथ इंगोले (जन्म २४ एप्रिल १९६०) हे या दशकातील एक महत्त्वाचे कवी होत. इंगोले हे तसे मिलिंद कॅम्पसचे कवी. विद्यार्थी संघटनेत त्यांचा दीर्घकाळ सहभाग होता. पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणूनही नेतृत्व केले आहे. शालेय जीवनापासूनच त्यांनी गीतकाव्य लेखनाला प्रारंभ केला. आजही चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या ओठावर त्यांची स्फूर्तीगीते आहेत. ध्वनिफितीतूनही त्यांची गीते प्रसारीत झाली आहे. २००३ मध्ये त्यांचा **पाखंड** हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला.

सनातन धर्म, वैदिक परंपरा यांच्या विरोधातून ज्या तत्त्वज्ञांनी विज्ञाननिष्ठेचा पुरस्कार करीत सनातनी वृत्तीला नाकारले, त्यांच्या परंपरेला छेद दिला. अशा विद्रोही लोकांना, अवैदिक परंपरेला सनातन्यांनी पाखंडी ठरविले. म्हणून विद्रोही कृती करणे म्हणजे पाखंड, पाखंड म्हणजे नास्तिक! असा पाखंड या शब्दाचा अर्थ अभिप्रेत आहे. देवाधर्माच्या नावावर खोट्याला रेटून नेणारी, दहशत माजवणारी जी निती आहे, खरं बोलणारांना नास्तिक ठरविणारी धर्माच्या ठेकेदाराची नितीमत्ता, याला निती तरी कसे म्हणावे? अनितीने वागणाऱ्या, समाजमनावर दांभिकतेचा मारा करणाऱ्या, थोतांड माजविणाऱ्या प्रवृत्तीला नागवे करणे म्हणजेच पाखंड होय. शोषण, भेदभाव जिथे आहे त्यावर घाव घालणारी, अनिष्टाला धिक्कारणारी आणि नव्या माणसाच्या निर्मितीचा, प्रेम या विश्वव्यापी मूल्याचा स्वीकार करणारी कृतिशीलता म्हणजे पाखंड आणि तीच खरी नैतिकता होय.

तात्त्विक वाद घालत इतिहासाची पुनर्मांडणी या कवितेला करावयाची आहे. घातपाती भेदनीती, अन्यायी परंपरेचे दाखले देत देश म्हणजे देशातील माणसं हे मान्य नसलेल्या संघाच्या मनूवादी, देशद्रोही राष्ट्रवादाला प्रश्नांकित केले आहे. त्यांच्या राष्ट्रवादात इतर धर्मियांना स्थान नाही. हिंदू वांशिक एकनिष्ठतेला त्यांनी केंद्रवर्ती स्थान दिले आहे. इतरांनी श्रम करावेत आणि त्यांनी आयत्या पिठावर रेघोट्या ओढाव्यात अशी त्यांच्या धर्माची रीत आहे.

१. तुमच्या बापानं घातलेत का कधी मातीत हात
श्रमाचा घाम गाळून पिकवलेत का कधी दोन दाणे
बरं खाणं ते खाणं अन् खाल्ल्या ताटात हागून जाणं
हा तुमचा सनातन धर्म

२. गॉडवाले,अल्लावाले जन्मजात देशद्रोही
त्यांना म्हणे देशामध्ये राहण्याची मुभा नाही
आजही नाही ही त्यांची सनातन खाज आहे

इतिहासाचे भान बाळगणाऱ्या दृष्टीने या कवितेने धर्माला जाळून टाकण्याची अपरिहार्यता स्पष्ट केली आहे. त्याविषयीची एक ठाम भूमिका या कवितेने घेतली आहे. धर्मग्रंथाची निर्मिती माणसानेच केली आहे. ईश्वर प्रेषित नावाची भूतेही माणसानेच माणसाच्या मानगुटीवर बसविली आहेत. स्वर्ग - नरक - पाप - पुण्य या सर्व संकल्पना म्हणजे अज्ञानातून आलेली तर्कटी आहेत. पूर्वकर्म, पुनर्जन्म या गोष्टी ऐतखाऊ सनातन धर्माने माणसाच्या मनावर बिंबवून त्याला परावलंबी केले. त्याच्या विकासाच्या वाटा बंद केल्या. त्याला स्थितीशील केले.

मिथ्या पुनर्जन्म मिथ्या पूर्वकर्म
ऐतखाऊ धर्म सनातन

पुनर्जन्म ही संकल्पना कर्मफल सिद्धांतावर आधारलेली आहे. शरद बेडेकर यांच्या मते, ''स्मृतीपुराण काळात जेव्हा पुरोहितांची एक जात बनून धर्माचरण सांगण्याची मक्तेदारी त्या जन्माधारीत जातीकडे आल्यावर त्यांनी वाईट कर्माचे

(पापाचे) फळ भोगावे लागू नये म्हणून अगणित व्रतवैकल्ये, मंत्रजप, तीर्थयात्रा असे पापविमोचनाचे (प्रायश्चित्त) अनेक उपाय सांगितले. ज्यातून पुरोहिताना अर्थप्राप्ती होत होती. भगवद्गीने उचलून धरलेली आधुनिक काळात बदनाम ठरलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था ही आत्मा या संकल्पनेला व कर्मफलसिद्धान्ताला एकत्र करून ताणून ताणून रचलेल्या पूर्वजन्म व पूनर्जन्म या सिद्धान्तावर उभारलेली कल्पनांची भरारी आहे. दरिद्री व अन्यायग्रस्त ऐहिक जीवन जगणाऱ्या दुर्देवी जनतेने त्याविरुद्ध बंड करून उठू नये यासाठी ती अत्यंत उपयुक्त ठरत असल्याने त्या कल्पनारंजनाला धर्मामध्ये महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.''[७] फॅसिस्ट आणि पुरोहित यांच्या युतीतून माणसाला मातीत घालण्याचे काम झाले आहे. लोकशाही राष्ट्रात धर्माच्या नावाने मते मागणारी दरोडेखोरांची टोळी आणि धर्माच्या नावावर उदयाला आलेल्या सत्तेतच दंगलीचे मर्म दडले आहे. एखाद्या पिसाळलेल्या श्वानासारखे हे धर्मवेड आहे. ज्याच्या रुधिरात हा रेबीज शिरलेला आहे असे लोक माणसाला चावा घेत सुटले. प्रत्येकच धर्म येथे बंदिशाळा झाला आहे. त्यामुळे धर्मसत्ता नावाच्या तुरुंगाला सुरुंग लावल्याशिवाय माणसाला स्वांतत्र्याचे मोल कळणार नाही.

आधुनिक काळात जगण्याच्या मार्गावर पांढरपेशी व्यवस्थेने संभ्रमाचे धुके पसरवले. त्यातून प्रगतीचा महामार्ग दिसू नये अशी स्थिती निर्माण झाल्यास संघर्षाशिवाय पर्याय नसतो.उन्नतीचा महामार्ग रोखून धरणाऱ्या शक्तीच्या विरोधात निर्णायक युद्ध लढण्याची अपरिहार्यता या कवितेने व्यक्त केली आहे.

दोस्त! आपण उभे आहोत युद्धभूमीवर
अन् कड्यावरचा दोर कापून टाकल्यानंतर
मावळ्यांसारखी झालेली आपली अवस्था
पळवाटा शोधण्यात नाही अर्थ
आता लढावेच लागणार आहे केवळ निर्णायक युद्ध

जगणेच जर रणभूमी झाले असेल तर त्या रणाला पाठ दाखवून पलायन केल्यास ती मर्दानगी ठरणार नाही. सरड्यासारखे रंग बदलणारी प्रवृत्ती तर आयुष्याला कोणतीही दिशा देऊ शकत नाही. सुरक्षेच्या कवचात सुरक्षित राहून तात्त्विकतेचा आव आणणाऱ्या तकलादू प्रवृत्तीवरही या कवितेने आसूड ओढले आहेत. सनातनी गुरुजी परंपरेला या कवितेने झोडपून काढले आहे.

गुरुजी, देश म्हण्जी काय ते आधी तुम्ही शिका
नंतर पोरायले शिकवा
फकस्त वंदे मातरम्, भारत माता की जय नोका सांगू
काल तुम्ही इतिहास शिकीवला म्हणे
अन् पोरं गल्लीत हिंदू मुसलमान होऊन
लडाई खेळू लागलेत

ज्यांना देश म्हणजे काय हे माहीत नसते असे शिक्षक उद्याची पिढी काय घडवणार? विद्यादानासारखे पवित्र कार्य ज्यांनी पार पाडायचे ते शिक्षकच जर धर्मांध असतील तर काय घडू शकते याचा धांडोळा ही कविता घेते. दोन धर्मांमध्ये दंगली घडवून आणणारी ही शिक्षकी मानसिकता पाहता, पारंपरीक गुरुजी संस्था जी दक्षिणेच्या नावाखाली अंगठा मागून विद्याच निकामी ठरवते. माणसात तेढ निर्माण करते.तिचाच वारसा आधुनिक काळातही सजगपणे वाटचाल करीत आहे असे प्रत्ययाला येते. बुद्धाचा प्रतित्यसमुत्पाद सांगणारी आदिनाथची कविता बुद्धाला नव्या प्रबुद्ध रूपात पाहण्याची अपेक्षा व्यक्त करते. बुद्ध, मार्क्स आणि साम्राज्यवादाविरुद्ध, सर्वहारांच्या शोषणमुक्तीसाठी संघर्षरत असलेल्या शक्तीची एकी झाली पाहिजे अशी अभिलाषा व्यक्त करते.

काल बुद्ध पुन्हा भिक्षापात्र घेऊन
सुकेशिनीच्या झोपडीसमोर उभा होता

सुकेशिनी म्हणाली, बुद्धा थांब
पासली पडून येते नंतर तुला खीर देते
आता केसावर भागत नाही

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' आणि 'इन्कलाब जिंदाबाद' यांच्या संयोगातून नव्याने बुद्ध प्रबुद्ध होईल असा विश्वास कवीमनाने व्यक्त केला आहे. सारंकाही आपोआप बदलेल, परिवर्तन होईल असं मानणाऱ्या निष्क्रिय कवी प्रवृत्तीला या कवितेने झिडकारले आहे. कृतीशून्य प्रवृत्तीला आव्हान दिले आहे.

बंधू, कागद काळे करण्याची
घाण सवय तर जडलीच आहे
काही कामाचं बोल
कुठवर रुजवायचेत विर्यातील सूर्य रात्रीच्या योनीत
जेव्हा दरेक रात्र गाभूडतेय सकाळी

आपली सुरक्षितता सांभाळून, कातडीबचावू भूमिका घेऊन विद्रोहाची भाषा केल्याने कोणी कवी विद्रोही ठरत नाही.कवीला तसे शब्दाचे खेळ तर कितीही करता येतील. मात्र कवितेत पेरलेल्या शब्दाप्रमाणे जहाल आणि कृतिशील होता येईल का हा खरा प्रश्न आहे. नुसत्याच शाब्दिक आक्रोशाने कसे भागेल?कवी हा विचारवंत असतो, तत्त्वज्ञ असतो, समाजनिरीक्षक असतो तसा तो कार्यकर्ताही असतो. म्हणून शब्द जसे कवितेत उतरतात तसे शब्दासारखे कवीला रस्त्यावरही उतरता आले पाहिजे तरच त्याची कविता खऱ्या अर्थाने जिवंतपणाचे रूप धारण करेल. असे विद्रोही कवी बंधूस जाणीव करून देण्याचे काम या कवितेने पार पाडले आहे. त्याचप्रमाणे फॅशनेबल स्त्रीमुक्तीचा टेंभा मिरवून प्रदर्शन करणाऱ्या प्रवृतीवरचे तिखट भाष्य केले आहे.

चार भिंतीच्या आत साजरा होत आहे
आंतरराष्ट्रीय महिला दिन
अन् तो दारावर थाप देतोय
अगं ।।.फुटला की नाही तुमचा पोळा
काय चाललय हळदी कुंकू की उखाणे

अशा चळवळी हळदी कुंकवात विरघळून उखाणे घेण्यापुरत्याच उरल्या. खरे तर धर्म नाकारणे आणि स्त्री पुरुष समता शोधणे ह्या दोन संकल्पना स्त्रीमुक्ती चळवळीने अमलात आणणे अभिप्रेत होते. मात्र या संकल्पनांना मूर्त रूप तर मिळालेच नाही, त्याचवेळी ही चळवळ हास्यास्पद ठरली. यासंबंधीचे औपरोधिक भाष्य या कवितेने केले आहे.

आदिनाथाच्या गेय रचनाही प्रभावी ठरल्या आहेत. या रचनांना स्फूर्तीगानाचे रूप प्राप्त झाले आहे. 'उठ पेट मानवा', 'स्त्रीमुक्ती गीत', 'कर जीवन आपलं गोड', 'बाई भीम माहा' अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. 'देव नाय जगात' ही त्याची गाजलेली रचना होय.

ठिव माय ध्यानात सांगून ठिवलं भीमानं
देव नाय जगात, ऱ्हावू नको त्याले भिऊन ।।धृ।।
काय मागलं ते देवानं देलंका माय ।
काय देवानं केलं भलं का माय ।
नको देवाच्या वाऱ्या करुवं माय ।
नको भोंदूच्या झोऱ्या भरुवं माय ।
तोडवं देव्हारा, घरातले देव दे फेकून ।।१ ।।
अज्ञानाचा अंधार सोडवं माय ।

थोडा डोस्क्यात उजेड पाडवं माय ।
पोरापोरीला साळत धाडवं माय ।
लाव पिंपळाचं दारी झाडवं माय ।
आवं बुधानं, भीमानं खरं ते ठिवलं लिहून ।।५।।

आंबेडकरी लोकगीतांनी जसे प्रबोधन आणि लोकशिक्षणाचे महान कार्य केले तसे आदिनाथच्या गीतांनीही असे कार्य पार पाडले आहे.

महेंद्र भवरे यांच्या **महासत्तेचे पीडादान** (२००५) या काव्यसंग्रहाने जागतिकीकरणाच्या समाजजीवनावरील अनिष्ट परिणामाची कविता सादर केली आहे. तीव्र निषेधाची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. पण ही प्रतिक्रिया सरळ शब्दात व्यक्त न करता प्रतिमा- प्रतीकांच्या सहाय्याने व्यक्त करण्याची शैली कवीने उचलली आहे. संजय मून[८] यांच्या मते, ''ही कविता मायावी अजागळं जोपासणाऱ्या संस्कृतीचा जसा उल्लेख करते तशीच ती 'अंगावर धावतय साम्राज्यवादाचं कुत्र', 'मल्टीनॅशनल हात', 'मुक्ताबाईचा बाजार', 'फायबर ग्लासातून सायबर न्याहाळणारी नजर' या वाक्प्रचारासारख्या दिसणाऱ्या ओळीतून जागतिकीकरणाचा वेध घेते. मानवी जीवन सुव्यवस्थित व्हावे यासाठी मानवाने अनेक व्यवस्था निर्माण केल्या आहेत. यात चिंतनाच्या, तत्त्वज्ञानाच्या व्यवस्थेपासून ते प्रत्यक्ष आचरणावर नियंत्रण ठेवणाऱ्या सामाजिक राजकीय व्यवस्थेपर्यंत माणूस हाच केंद्र आहे. भवरे यांच्या कवितेत जी खंत आणि बोच व्यक्त होते ती मूळात या व्यवस्था भुईसपाट होत जाण्याबद्दल आहे.''

माणुसकीचे छप्पर गेले आसमंतात उडून
मूल्यांचे खग्रास ग्रहण मागत सुटतेय दान
भिकारचोट कराराच्या चौकटीवर
चौकट झालीय खिळखिळी

नैतिकतेची व्यवस्था कोलमडल्याचे संकेत कवी देतो. नीतिव्यवस्थेप्रमाणे चिंतनाची, वैचारिकतेची, तत्त्वज्ञानाची व्यवस्थाही उद्ध्वस्त होत असल्याचे संकेत या कवितेने दिले आहे. परिवर्तनाच्या चळवळीनी निर्माण केलेल्या विचार, कृती आणि सामाजिक व्यवहाराच्या व्यवस्थेचे भवितव्यही काही वेगळे नाही.

१. आधुनिकतेच्या वाऱ्यात
उडून गेलीयत परिवर्तनाची परिपत्रकं

२. आम्ही शोधतो अस्तित्वाची मूळं
सामील होतो त्यांच्या कुळागराच्या तराळकीत
उधाणवेडी आक्रोशमयता विरून गेलीय हवेत
तुपात घोळलेल्या प्रदूषणी गप्पात शिरतोय
खुश्किच्या मार्गाने

३. प्रस्थापितांची कोपरखळी विस्थापिताना हिसके
गोठलेल्या पाण्यावर आंदोलनं खातायत गचके
सत्तेच्या होकायंत्राची फिरलीय दिशा अन्
दूर्दशेचे रान भराभर वाढत गेले

या शिवाय या देशातील राजकीय व्यवस्था, आर्थिक व्यवस्था नेस्तनाबूत होण्याच्या मार्गावर आहेत. हेही या कवितांतून सूचित होते. उदा.

डोक्यात खोचून शिरपेच फळफळले डावपेच
अन् उधाणला महासत्तेच्या वटभरणाचा उत्सव

किंवा

निरर्थाच्या अर्थनितीवर उतू गेला फेस
आमच्या हाती आले केस

सगळ्याच व्यवस्था कोलमडत जाणारा हा काळ आहे. या सगळ्याचे केंद्र असलेला सामान्य माणूस त्याची या काळात अधिकाधिक वाताहत होत चाललीय. याबद्दलची उद्विग्नता ही कविता व्यक्त करते. या सर्व व्यवस्था कोलमडण्याच्या पार्श्वभूमीवर पारंपरीक दलित कवितेने जिचा प्रस्थापित व्यवस्था म्हणून उल्लेख केला तिचे भवितव्य काय? तर 'गुलामांचे मळे दिवसेंदिवस कसे फुलताहेत' ही व्यवस्था दिवसेंदिवस नव्या रूपात 'दंगलीच्या शास्त्राचा सिद्धान्त' तयार करीत अधिकाधिक घट्ट होताना दिसते. एकीकडे सर्व व्यवस्था कोलमडत असताना दुसरीकडे मात्र शोषक व्यवस्था अधिक आक्रमक अवस्थेत आहे हे सत्य या कवितेतून उमगते. कवितेतील लोकगीतांच्या लयीचा वापर हा या कवितेच्या रचनातंत्राचा आणखी एक विशेष म्हणून उल्लेख करावा लागेल.

'दारावरची थाप करी चुपचाप मुखाची वाणी'
'भगभगणारी भूक कोवळे मुख धरते हत्याराचे पाते'
'बुड झालं खुड आता भाकड झालं खोड
'नव्या नवेल्या पालवीला अकाली आले मोड'

यांसारख्या कितीतरी ओळीतून लोकगीताची लय सूक्ष्मपणे पाझरताना दिसते. किंवा

सरोसतीबाय तुहा गल्ला कुठं हाय
बालकटी मापदंडाचा दांडा कुठं हाय
गुबगुबीत स्त्रीवादाचा डल्ला कुठं हाय
वळचणीचा चाळ आता कुजबुजत नाय
रगतपिती हाताचा खुळखुळा सुटत नाय

यासारखी संपूर्ण कवितेची अभिव्यक्ती लोकगीताच्या लयीपर्यंत पोचणे हा कवितेचा श्रेष्ठ आविष्कार होय. अशा अभिव्यक्तीमुळे ही कविता अस्सल भारतीय परंपरेची अभिव्यक्ती ठरते.

विवेक जोग यांच्यामते, ''वाचकाला समकक्ष करणारं समकालीन वास्तव इथे स्वत:च्या लयीत गुंफलेलं आहे. इथली तिथली अगदी जगड्व्याळ झालेली आणि पुनरपि इथल्या जगण्याचे पाश आवळणारी अर्थात लाट जागतिकीकरणाची, आर्थिक उदारीकरणाची, खाजगीकरणाची - त्सुनामी म्हणावी अशी, इतकी! महासत्तेच्या राक्षसी, पाशवी विषाणुंनी सर्वदूर पसरवलेली, अत्यंत कुटील अशी. नाईलाजाने म्हणत म्हणत या लाटेवर स्वार झालेल्या सर्वसर्वांनी आजच्या, आधीच पिचलेल्या, जेमतेम अर्धपोटी असणाऱ्या दीन - दुबळ्यांची काय आणि कशी वासलात लावली आहे त्याचा प्रखर स्वर म्हणजे 'महासत्तेचे पीडादान.' '' सामाजिक सांस्कृतिक प्रदूषण हेच पर्यावरण करविणाऱ्या वर्गाची लक्तरं इथे उघड केली आहेत. माणसांना ठार बधीर करणारी प्रसारमाध्यमं, मूलतत्त्ववाद्यांचे छुपे मनसुबे नि कावे, अनेक स्तरांवर वाढत चाललेले वसाहतवादाचे प्रस्थ, आर्थिक उदारीकरणाच्या गोंडस नावाखाली होत राहिलेली पंगुत्वाची पैदास, परिणामी सामान्यांच्या अब्रूचे निघणारे धिंडवडे, कर्जबाजाऱ्यांचे आत्मघाती दर्द, क्षुल्लक गोष्टीसाठी झडणारी हत्याकांडे अशा नाना यातनांची शब्दयात्रा म्हणजे हे 'पीडादान' होय.

हे अंतर्गत यादवीचं साम्राज्य
हे साम्राज्यवादाचे आक्रमण
हे मल्टिनॅशनलांचे रॅशनल कावे
हा मुक्ताबाईचा बाजार, हे किरटें उद्योग बेजार
हे देहधारी निर्वस्त्र वस्त्रोद्योग

हे नव्या शतकाचे उद्दाम उदीम उद्यमशील

शब्दाचे हे करवतीपण, त्यातला उपरोध, त्यातली भावार्तता कुणाही सहृदयी मानवाला भिडणारी अशीच आहे. एकीकडे वैज्ञानिक प्रगतीची शिखरे आणि पाड्या खेड्यात उभे ठाकलेले कठोरभीषण जगणे ह्यातले अमानुष अंतर जागवून कवी येथे लिहिता झाला आहे. जागतिकीकरणामुळे सर्वत्र जी विसंगत दृश्ये दिसू लागली त्याविषयीचा उपहास या कवितेत आहे. सत्ताधाऱ्यांची गुलामगिरी स्वीकारणारे सामान्य, वाढत्या असुरक्षिततेमुळे वाढलेली बुवाबाजी, अडाणी जनतेची चाललेली फसवणूक, आपापसात साटंलोटं करून स्वत:चे गोडवे गाऊन घेणारे राजकारणी, भुकेकंगाल जनता हे सारे चित्र या कवितेत स्पष्ट झाले आहे. एकाचवेळी अनेक गोष्टींचा उच्चार ही कविता करते.

जगण्यामरण्याचे बिल आता त्यांच्याच मेजावर
खुर्चीत मेजरचा पुतळा
पुतळ्याच्या हातात आगीनबांबाची कळ हाय
आपली नुस्ती हाय हाय त्यायची नुस्ती हायफाय
आपलं डोकं खाली वर पाय
आपल्या डोक्यावर त्यांचेच पाय

जागतिकीकरणामुळे आम माणसाच्या वाट्याला जीवघेणी अनिश्चितता आली. ज्ञानाचा अर्थ बदलला. शिक्षणक्षेत्रातही बाजारूपणा आला. आधुनिकतेच्या नावाखाली परिर्वतनाचा खरा अर्थ हरवला. आर्थिक महासत्तेच्या उद्दामपणाचा फटका जगभरातल्या सर्व विकसनशील देशाप्रमाणे आपल्यालाही बसला आहे. आता गुलामगिरीची परमावधी होऊन आपले जगणे- मरणे जणू त्यांच्याच कब्जात गेले आहे. एका बाजूला महासत्तेने करायला लावलेली अण्वस्त्रसज्जता आणि दुसऱ्या बाजूला वाढीस लागलेला मूलतत्त्ववाद, दहशतवाद या सर्व आक्रमणाने देशातील शांतताही लयाला गेली आहे. हिंसा मग ती धर्माच्या नावाखाली असो की साम्राज्यवादाच्या भूमिकेतून असो आजच्या काळाचे ते व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. असे अनेकानेक ताणेबाणे या कवितेने स्पष्ट केले असून महासत्तेचे वर्चस्व आणि दहशतीच्या ताणातून ही कविता अक्षरबद्ध झाली आहे.

मच्छिंद्र चोरमारे (जन्म १५ मार्च १९७०) **तापलेले दिवस** (२००६) या कवितासंग्रहाच्या मनोगतात कवीने लिहिले आहे, 'आईवडीलाच्या कष्टात पहिली कविता सापडली.जेव्हा जेव्हा पोटातली आग डोक्यात गेली तेव्हा तेव्हा कविता लिहिली.निरपराध माणसाचं जळणं पाहिलं की कविता काळजात पेटायची. आजवरच्या अनेक बऱ्यावाईट अनुभवाचे दाहक चटके तापलेले दिवस मध्ये शब्दबद्ध केलेत'[१०]. हे कवीने मांडलेले मनोगत म्हणजे त्याच्या कवितानिर्मितीमागील कार्यकारणभावच आहे. जोपर्यंत कलाकृतीच्या अंगाला चिपकलेल्या बोगसपणाच्या खिपल्या गळून पडत नाहीत तोपर्यंत तो आत्मशोध ठरत नाही असेही कवीने म्हटले आहे. गरीब माणूस होता तिथेच ठेवून या व्यवस्थेने शोषण प्रक्रिया कशी अबाधित ठेवली, याचं उदाहरण म्हणून तापलेले दिवस पुढे आले आहेत.

पुढच्या पिढीचे स्वप्न साकार करण्यासाठी अगोदरच्या पिढीला झिजावे लागले.त्यात मायबापाचे योगदान अनन्यसाधारण आहे. मायबापाच्या भावभावना आणि इच्छा आकांक्षाचे चित्र या कवितेने साकार केले आहे. ते प्रातिनिधिक आहे.

१. आपला पोरगा साहेब व्हावा / आपले दारिद्रय दूर व्हावे
एवढ्यासाठीच ती राबत जाते
हाडाला चिपकलेल्या जीर्ण कातडीत
स्वप्नाच्या अगणित पालव्या फुटत जातात
अन् पुन्हा ते दोन्ही हात राबू लागतात
दिवस माळाआड जाईतोवर

२. अस्थिपंजर होऊनही बाप झुंजत जातो
मोडक्या संसाराशी निरंतर
सांगत जातो पोराला
घायाळ समाजाच्या अंधार युगाची कहाणी

या कष्टकरी आईबापाला आपला पोरगा साहेब व्हावा असे वाटत राहते. तेव्हा या आईबापासमोर बाबासाहेब आंबेडकरांची साहेबी प्रतिमा असते. म्हणूनच हाडाला चिपकलेल्या जीर्ण कातडीत स्वप्नांच्या अगणित पालव्या फुटतात आणि हे हात स्वप्नातून पुन्हा कष्टाच्या वास्तवात कार्यरत होतात. कुणापुढे गाऊ तुझ्या घामाचे गाणे, मोळीनेच दिले माझ्या लेखणीचे जिणे अशी कृतार्थतेची भावना कवीने व्यक्त केली आहे. बापाने जी सजगता बाळगली त्यातूनही पुढच्या पिढीला चालना मिळाली.

पोरा! तू धिक्काराचा महाबुरुज उभा कर
या वस्तीच्या काळजाकाळजावर
गरिबीच्या भोंग्यातून ऐकू येणारी
झिजलेल्या देहाची अवकळा झाकून टाक मखमली वस्त्रातून

बापाच्या या चेतनेने पुढची पिढी गतिमान झाली. अंधाराला पराभूत करण्याचा चंग तिने बांधला. मायबापाच्या पिढीचे हे ऋण पोराच्या पिढीला कधी विसरता येणार नाही. म्हणूनच ही कविता मोडलेल्या माणसांची कथा सांगते. या कथेत इथल्या संस्कृतीचा अमानुषपणा, तिच्या गनिमी काव्याचे तंत्र, माणसाचा बंद केलेला आवाज अशी अनेक उपकथानके आहेत. शिक्षणामुळे प्राप्त झालेल्या आत्मभानातून सांस्कृतिक विच्छेदनाची कशी प्रेरणा मिळाली याविषयीची हकिकत ही कविता सांगते.रक्तबंबाळ जखमांच्या कहाणीच्या पार्श्वभूमीवर बुद्धविचाराचे वहन या कवितेने केले आहे. 'तुझ्या वाटेवरचा प्रकाश तूच हो अन् गात जा अनंत प्रकाशाचे गाणे' असा उद्घोष ती करते. दु:खाचा काफिला हाकारताना येणारे अडथळे, अडसर याचे चित्र रेखाटून जाणिवा आणि उणिवा अशी विरोधके मांडली आहेत. सामाजिक कुंठितावस्था हा या कवितेतील एक चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. स्वप्ने साकार करण्याचा अवसरच इथल्या वर्तमानाने दिला नाही. वर्तमानातून बाहेर पडून स्वप्ने आपल्या वाटेने चालायला लागतील अशीही परिस्थिती उरली नाही.

आभाळभर पसरलेल्या स्वप्नांचे थवे
बंदिस्त होतात वर्तमानाच्या चिरेबंद कोंडवाड्यात
पेटलेल्या बाहूतून झिरपत जाणारं उबदार रक्त
मोर्चातल्या घोषणात पेटतं आणि आमसभेत थंडगार होतं
भविष्याचे काळेकुट्ट ढग आयुष्यावर अंधार पांघरून उभे
या निस्तेज मंडपातील उजेडाच्या भयाने
काळवंडलेले चिंतातूर चेहरे उठून जातात क्रमाक्रमाने ...

येथे निस्तेजपणा आणि दिशाहीनतेत गरगरणाऱ्या फाटाफुटीच्या वास्तवातून येणारी अस्वस्थता शब्दरूप घेताना दिसते.आत्मकेंद्रीपणावरील भाष्य फुले आंबेडकरी कवितेत अलिकडच्या काळात सर्वत्रच प्रत्ययाला येते.

थोडा उजेडाचा आसरा मिळाला की
आपण घराच्या चौकटीतच
क्रांतीची भाषा बोलत गेलो
आपापली दारं खिडक्या बंद करून

अशा वास्तवात कराव्या लागणाऱ्या कृतिशिलतेची सूचना ही कविता देऊन ठेवते. उजेड हवाच असेल पुढच्या पिढीसाठी तर पुन्हा एकदा जळावंच लागणार आहे. आपले दुखणे, खुपणे, राग, लोभ, व्यथा कोणासमोर मांडायच्या?

तर त्यासाठी बाबासाहेब हेच हक्काचे ठिकाण. अनेक कवीनी आपल्या व्यथा बाबासाहेबांना उद्देशून मांडल्या आहेत. चोरमारेंची कविताही त्याला अपवाद नाही.

बाबासाहेब, तुम्ही आयुष्यभर दगड फोडून
बनविलेली माणसे
आमच्या गल्लीत वळलीच नाहीत याचे दु:ख वाटते
कालपर्यंत बरं होतं, जखमांना खपल्या धरलेली माणसं भेटायची
आज मीच माझी जखम फुंकतो आहे, खपलीसाठी

अशी वेदना प्रकट करतानाच आंबेडकररूपी वादळाने क्रांतीबीज पेरल्यामुळे कोणते सामर्थ्य अंगी संचारले याविषयीची गाथा हे कवीमन उल्हसित मनाने चित्रित करते. तिथे कोणताही पोकळ अभिनिवेश नसतो.तर जाणीव जागृतीमुळे संघर्षासाठी मने कशी तयार झालीत याविषयीचा आत्मविश्वास असतो. आंबेडकरी विचारांचे वादळ पंखात भरून घेतलेली पाखरे या कवितेत विहार करताना दिसतात. त्यांच्या मुखी वादळाचे गीत आहे. पाखरांच्या प्रतिमेतून आंबेडकरी विचार आणि कृतिशिलतेचे संयोजन झाल्याचे दिसून येते. सामाजिक, सांस्कृतिक, समकालीन जीवनातील अंतर्विरोधाची मांडणी हा या कवितासंग्रहातील महत्त्वाचा टप्पा आहे. अंतर्विरोधाचा सूर येथे टिपेला पोहचताना दिसतो.

लढले गटागटाने घरांचा धूर झाला
प्रत्येक जण होता हाती धरून भाला
आपल्याच प्रेतावरती आपले सवार झाले
निळे कपाळ माझे त्यांनी गुलाल केले

रक्ताच्या नात्यातही विखार आणि द्वेष भरलेला आहे. आपली माणसे आपल्याच समूहमनाची कत्तल करीत सुटले. सामाजिक आणि राजकीय अपयशातून हे दु:ख वाट्याला आले. एकमेकांच्या जिवावर नेम धरून असलेली भयप्रद अवस्था येथे चित्रित झाली असून ती सुन्नपणाचा अनुभव देणारी आहे. निराधार आणि निराश्रीत जगण्याच्या पार्श्वभूमीवर अनेक विपरीत विरोधके वाचकांसमोर ठेवून चिंताजनक स्थितीचे चित्र साकार करणे हे या कवितेचे एक उद्दिष्ट आहे. निष्ठूरपणा आणि जेरबंद झालेला आवाज, माणसांच्या कत्तली आणि अमानुषतेचे प्राबल्य, नवसृजनासाठी पुरक नसणारे पर्यावरण अशा अनेकविध बाबींची मांडणी करून आत्मशोधातून अभावग्रस्त जगाची कैफियत सादर केली आहे. माणुसकीच्या नात्यावर गदा आणणारी, दुजाभावाला केंद्र करणारी व्यवस्था नेस्तनाबूत करण्यासाठी कोणती दक्षता घेतली पाहिजे याचेही दिग्दर्शन या कवितेने केले आहे. परक्यांनी येथे येऊन स्थानापन्न होऊन आपली मूळं घट्ट केलीत.मात्र मूळच्यांना येथे आधारही मिळाला नाही.हे सामाजिक आणि ऐतिहासिक सत्य आहे. अशी सत्ये मांडण्यात या कवितेला स्वारस्य आहे.

आपल्या मातीवर उपऱ्यांनी सुंदर घरं बांधलीत
बायकोपोरे सजवलीत
आपण मात्र झोपडीतच बेवडा मारून बेशुद्ध झालो
आणि क्रांतीचं स्वप्न आपल्याला हिजडा म्हणत
दूर सरकत गेलं

स्वकीय जगाअंतर्गत दिसणाऱ्या सत्याची मांडणी करून, कातडी सोलून काढणाऱ्या युगावरचे भाष्यही या कवितेने केले आहे. विविधतेत एकता असे गौरवाने सांगणाऱ्या देशात रिमोट कंट्रोलच्या जमान्यात माणसाच्या जगण्यामरण्याचे आणि सांस्कृतिक जगताचे नियंत्रणआपल्या हातात ठेवणारी सत्ताबाह्य सत्ताकेंद्रे उदयाला आली आणि आधुनिकतेच्या काळातही प्रतिगाम्यांचे मानस यशस्वी होत गेले. येथे सुरक्षिततेला वाव नाही आणि अत्याचाराची वानवा नाही.

लोकशाहीचं उत्खनन होत चाललेल्या या देशात
माणसाच्या मेंदूतून पाझरणारं दंगलखोर रक्त

घराघराला आगीचं कुलूप लावून झोपी जातं
शांतीदूताच्याही हातातून हिसकावली जाताहेत
माणसांसाठी जागणारी माणुसकीची तत्त्वे

तत्त्वहीन माणसांच्या जगात हिंस्र पशूंचे कळप पाळले जातात.हा दहशतवाद सर्वत्र बोकाळलेला आहे. केवळ एका देशापुरता तो सिमीत राहिलेला नाही.माणसाचे जगणे संपवायला निघालेली दंगल, तिने माणसाची निर्भयता हिरावून घेतली, मुक्तपणा बंदिस्त केला आणि कष्ट उपसणाऱ्या हाताची घडी बांधून ठेवली.एवढी दहशत दंगलीने निर्माण केली. दंगलीच्या वारंवारतेने, तिच्या क्रुरतेने संवेदनशील माणसाला भूमिका घ्यायला भाग पाडले.

१. म्यानातली बंदिस्त माणसं शांतीदूताला माफी मागू लागली
आपल्या हाताच्या मुठी आवळून क्रांतीला हाक देऊ लागली

२. माझ्या वस्तीचं गुजरात नंग्या डोळ्याने, रिक्त हाताने
उरात हंबरडा घेऊन पहात राहिलो
तलवार त्यांची, रक्त आमचे असे वारंवार घडत गेले
तसतसे माझे हात शस्त्र बनत गेले

प्राप्त परिस्थितीत हातानी शस्त्राचे रूप धारण करणे अपरिहार्य ठरते. दहशतवाद, हिंस्रता, धर्मांधता, धर्माच्या नावावर होणाऱ्या माणसांच्या कत्तली हे या देशातील वास्तव हिंदू दहशतवादी राजकारणामुळे अधिकच आक्रमक झाले. त्यातून विद्वेषाची पेरणी होत गेली. द्वेष आणि विभाजनाचे पीक तरारून वर आले. मानवी संवेदनांचेही विभाजन झाले. माणसाच्या मरणांची समीकरणे मांडणे सुलभ झाले. दंगलीचे नियोजित मेंदू माणसाच्या अघोषित मरणाची अंमलबजावणी करू लागले. सामान्य आणि निरपराध माणसाचे जगणे धोक्यात आले. जगणे अनिश्चित झाले. अशा सर्व धगधगत्या पार्श्वभूमीवर अफुच्या गोळीतून जन्मलेली धुंदी गारद करण्याइतपत धमणीत भरून घेतलेली आग पेरीत नेण्याचे कार्य तत्परतेने पार पाडण्यासाठी सज्ज झालेला नायक या कवितेत उभा आहे. एक बेडरपणा, निर्भयता, नि:स्वार्थीपणा आणि कर्तव्याची जाणीव हे सारेच गुणविशेष या नायकाच्या रोमारोमात भिनलेले आहेत.

इथल्या व्यवस्थेने दु:खमुक्तीला फुस लावून माणसाचे मेंदू जेरबंद केलेत कारण मेंदू बंडाची भाषा बोलत असते म्हणून मेंदूवर लेप लावून त्याला कुपोषित करायचे, झापडबंद करायचे असे कृत्य केले. इथल्या धर्माने माणसाच्या पोटाच्या भूकेची हमी दिली नाही.म्हणून धर्माच्या कुबड्या बाजूला सारून वेड पांघरलेल्या धर्माचे पांघरुण भिरकावून देऊन माणसाचे जग सुंदर बनविता येईल याविषयीच्या चिंतनाला या कवितेने आकार दिला आहे. माणसासाठी धर्म बाजूला सारण्यातच खरी मानवता आहे. त्रिशूलाच्या टोकावर माणसाला लटकवण्याऐवजी भेगाळलेल्या जमिनीत पंचशील पेरीत जाणे हीच खरी मानवता होय. बुद्धतत्त्वांचे रोपण जागोजागी या कवितेत झाल्याचे दिसून येते तो या कवितेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. मानवी हक्कावर गदा आणणाऱ्या आणि लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या कृतीला क्रांती कसे म्हणता येईल? युद्ध कुणासाठी आणि बळी कुणाचा?असे मूलभूत प्रश्न उभे केले आहेत.

इथे उपऱ्यांनी केलाय बोगस इतिहास पैदा
पण तूही आपला बदललास इरादा
तुझं शोषणाविरोधी बंड बंदुकीच्या टोकावर घेऊन
लोकशाहीच्या जंगलातून लढता येत नाही
कारण बंदूक माणसागणिक पुरत नसते
क्रांती जंगलातून उगवत नसते

व्यवस्थेने उबगलेल्या लोकांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन त्याच्या हातात शस्त्रे दिली, ही शस्त्रे देणारी हिंस्र

व्यवस्था कोणत्या क्रांतीच्या गावात पोहचणार आहे हे काही सांगता यावयाचे नाही. गावागावातील माणसांना ओलीस ठेवून माणसांना बेघर आणि स्त्रियांना जर्जर करणाऱ्या कृतीला दहशतवादी म्हणायचे की नक्षलवादी? असा चिंताक्रांत प्रश्न उपस्थित केला आहे. क्रांती व्हायची असेल किंवा करायची असेल तर ती माणसात राहूनच व्हावी जंगलात जाऊन नव्हे! अशाप्रकारे समकालीन जीवनातील गुंतागुंतीच्या वास्तवाला शब्दाकार देऊन चोरमारे यांच्या कवितेने तापलेल्या दिवसाचे विविधांगी पदर संयमशीलतेने उलगडून दाखविले आहेत.

पुढे २०११ मध्ये **कोंडी फोडून पुढे** हा **मच्छिंद्र चोरमारे** यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. माणसाच्या अमानुष जगण्याची कोंडी शेवटी कवितेलाच फोडावी लागते. या धारणेतून ही कविता मुखरीत होते. इथल्या व्यवस्थेने माणसाला सतावण्याची, मनात असलेली, मेंदूत घोळत राहणारी सल सातत्याने डिवचत राहते त्यामुळे कोंडी झालेले मन फुटून बाहेर पडू पाहते. गुदमरलेले श्वास मोकळे करण्याचा हा प्रयत्न म्हणजेच कोंडी फोडून पुढे जाणे होय. गतकाळातील पूर्वजांची केलेली कोंडी, त्यात दाबून गेलेल्यांना आपल्या अंगात नकाराचे वीष व्यवस्थेच्या विरोधात भिनवून घेता आले नाही. म्हणूनच पिढ्या, गणिक क्रुर अत्याचार वाढत गेले. असा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. बांधिलकी मानणाऱ्या कवीची जबाबदारी कोणती याची नेमकेपणाने या कवितेने जाणीव करून दिली आहे.

कवीला होता येत नाही दु:खातून मुक्त
दु:खमुक्त झाला की तो राहत नसतो कवी
ज्यांच्या ढुंगणाला टोचते पृथ्वी
ते चंद्र शोधित जातात मंगळाचा मुका घेतात. (२५)

जीवनाकडे पाहण्याची गंभीर दृष्टी कवीमनाकडे आहे. म्हणूनच व्यवस्थेला बळी पडणाऱ्या कवीबद्दल, समाजविन्मुख होणाऱ्या त्याच्या मानसिकतेबद्दल प्रखर भाष्य ही कविता करते. कविता आणि वाचक यांचे नातेसंबंध याबाबतही कविता काही सांगू पाहते.

कविता नसावी वर्णव्यवस्थेसारखी छिनाल
वाचकही नसावा भाडखाऊसारखा दलाल

पूर्वचपार चालत आलेल्या व्यवस्थेने माणसाच्या केलेल्या फजितवड्याचे करुण गंभीर चित्र रेखाटून ही कविता वाचकांना अंतर्मुख करते. या फजितीने व्हावे बंड आणि पुन्हा एकदा भीमा कोरेगाव स्तंभानं थोपटावे दंड ही स्फुरण पेरणारी कृतिशीलता या कवितेला अभिप्रेत आहे. क्रूर व्यवस्थेला आडवे उभे कापण्यासाठी अधिर झालेले कवीमानस येथे अधोरेखित होते. गुलामीचे घाव आणि लाचारीचे व्रणही सहजासहजी विसरता येण्यासारखी बाब नव्हे. गतकाळाच्या ह्या खुणा वर्तमानात विद्रोहासारख्या ऊफाळून वर येतात आणि संप्रदायाचा झगा घालून वर्तमानात वावरणारांची धोबीपछाड करू पाहतात. धर्माच्या उन्मादी टोळीच्या मागावर राहून प्रतिक्रांतीच्या मार्गात बॅरीकेडसारख्या उभ्या राहतात. कारण मूलतत्त्ववादी व्यवस्था कोणत्याही काळात आपले मनसुबे यशस्वी करण्यासाठी भूतकाळापासून वर्तमानापर्यंत विविधांगाने आणि मार्गाने समाजमनावर प्रभाव टाकत आली आहे. तिच्या दुटप्पीपणा आणि वेगळेपणावर आसूड ओढतच कवितेची अभिव्यक्ती होते.

आतल्या गाठीच्या सनातनी परंपरेने माणसाच्या ऱ्हासाची मूळ गाथा कायम ठेवून क्रांतीच्या फसव्या आणि दांभिक डोलाऱ्याची भाषा जन्माला घातली. माणसाच्या ऱ्हासाचे मूळ सूत्र कायम ठेवणाऱ्या परंपरागत सनातन व्यवस्थेचा सूड केवळ क्रांतीच घेऊ शकते.स्थितीशीलतेवर प्रहार करून समता निर्माण करण्याचे, नवनिर्माणाचे सामर्थ्य तिच्यात असते. त्यामुळे तिच्या स्वागतासाठी कोंडी फोडण्याचे अनेक मार्ग या कवितेने दिग्दर्शित केले आहेत. आमची कोंडी आपल्यालाच फोडायची आहे. याचे भान मात्र सातत्याने बाळगणे अगत्याचे आहे. ती वर्तमानाचीच गरज आहे. मात्र वर्तमानात एकीकडे जागतिकीकरणाच्या अर्थसत्तेचे नफेखोरी इथे मुख्य सूत्र ठरले आहे. जागतिकीकरणाने स्वातंत्र्यासारखाच माणसाचा भ्रमनिरास केला आहे. कार्पोरेट जग माणसाकडून काम करून घेऊन त्याला निकामी बनवण्यात माहीर आहे. त्याचा वापर

करून माणसाला शेवटी ते स्क्रॅप मध्येच ढकलून देते.

कार्पोरेट दुनियेच्या संक्रमित उष्ट्यावर
कचऱ्या भरतो पोट, बनतो महारोगी
आपल्या हातातील कवितेचा कागद
कचराच बनतो शेवटी

हे भयान वास्तव या कवी कवितेसमोर आहे. या भयाणतेपुढे कवितेची सभ्य अक्षरे लाचार होतात. हा कवीचा अनुभव आहे. दुसरीकडे आसक्ती आणि पोकळ देशभक्ती स्वार्थाच्या हमरस्त्यावरून वाटचाल करीत असते. म्हणूनच एक उपरोधिक प्रतिक्रियाही कविता नोंदवून जाते.

लबाडाचं घबाड कोणी हिसकावू लागला की
पेशी ताणून विरोध होतो सुरू
आसक्तीतून जन्मते देशभक्ती
हिसकावणाऱ्याला दावते हिसका

देशभक्तीचा पोकळ डोलारा अशाप्रकारे या कवितेने उलगडून दाखविला आहे. 'धर्म'सारखी प्रदीर्घ कविता हे चिंतन काव्यच आहे. सद्या एकही धर्म पूर्णत: आस्तित्त्वात नसून कोणी धार्मिकही नाही. धर्माचं उद्दिष्ट असते. 'स्वयं दिप भव' माणूस माणूस बनल्या शिवाय हे स्वयंदीप होणे त्याच्या वाट्याला येणार नाही. हे अंतिम सत्य सांगताना अंतिमत: मानवतेचा मूलमंत्र पेरण्याचेच काम केले आहे.

उत्तम अंभोरे (जन्म २७ जानेवारी १९६३) हे या दशकातील महत्त्वाचे कवी. **धगीवरची अक्षरं** (२००७) हा त्यांचा दुसरा महत्त्वपूर्ण कवितासंग्रह. प्रदूषित सामाजिक विस्कळीतपणा, राजकीय कावेबाजी, दगाबाजांचा उन्मादी विजय, दिशाहीन आंदोलन आणि चळवळीचा थांबलेपणा या विषयीची चिंता आणि चिंतन हा या कवितेचा केंद्रवर्ती विषय आहे. भाषिक अवकाशातील आडव्या उभ्या आणि तिरकस पट्ट्यावर ही धगीवरची अक्षरं उच्चार करताना दिसतात. शब्दाशब्दातून केवळ युद्धाची भाषा वांझोटी ठरते.शब्दांचे घोडे नाचविल्याने युद्ध जिंकता येत नाही. केवळ युद्धाची परिभाषा शिकूनच चालत नाही तर युद्धाचा व्यूह आणि कृतिशिलता अंगीकारल्याशिवाय युद्धाच्या भाषेला अर्थ उरत नाही. आपल्या भाषेचे सत्व हरवल्याचे भान कवितेला आल्याचा प्रत्यय धगीवरच्या अक्षरानी दिला आहे. शोषक व्यवस्था शोषणविरोधी भाषेचा अवलंब करते मात्र शोषण करायचे सोडत नाही.हा अंतर्विरोध या व्यवस्थेच्या राजकीय खेळीचाच एक भाग असतो. समरसतावाद्यांनी भाषा हायजॅक करून कावेबाज राजकारण यशस्वी करून दाखवले आहे. मूळनिवासींना वनवासी बनविण्याचे षडयंत्र त्यांनी रचले. सांस्कृतिक राजकारण करीत भाषिक कोलांटउड्या मारत राहणे हा त्यांचा कावेबाज खेळ असतो.मूलतत्त्ववाद्यांच्या भाषिक सांस्कृतिक राजकारणामुळे वडाची साल पिंपळाला लावणे सहजशक्य होते. त्यांच्या भाषिक कृतीत विज्ञाननिष्ठेला काडीमात्र स्थान नसते. त्यामुळे अनेक अंधश्रद्धा आणि अश्रद्ध संकल्पनांचे विपरीत अर्थ लोकमनात रुजविण्यात उजव्या शक्ती यशस्वी होताना दिसतात. भाषिक हत्याराचा विपरीत वापर हे धार्मिक मूलतत्त्ववाद्यांच्या सांस्कृतिक राजकारणाचे ताकदीचे अंग आहे. प्रतिक्रांतीच्या भाषेने सामाजिक जीवनात थैमान घालून सामाजिक सांस्कृतिक जीवन नासवून टाकले.म्हणून प्रतिक्रांतीच्या भाषेवर वार करण्यासाठी क्रांतीचे स्फुल्लींग पेरणारी भाषा आत्मसात करण्याचे आवाहन या कवितेने केले आहे. मूलतत्त्वाद्यांच्या, प्रतिक्रांतीवाद्यांच्या आणि उजव्या शक्तींच्या भाषिक राजकीय खेळीचे रूप उजागर करण्यात 'धगीवरची अक्षरं' यशस्वी ठरली आहेत.

वैयक्तिकतेकडून सामाजिकतेकडे प्रवास करीत ही कविता अधिकाधिक व्यापक होत जाते.सामाजिक सांस्कृतिक इतिहासात आणि वर्तमानातसुद्धा तोतया बुद्धिवाद्यांनी लटकेपणा करायला मागेपुढे पाहिले नाही.वास्तव इतिहासावर दांभिकतेचे पांघरुण घालून इतिहासातील वंशावळीस आपल्याही रक्ताचे नाव जोडून मिजासखोरी केली.

गढीच्या कोसळण्याच्या कहाण्या

पुराणातील मढी उकरून रडणं पडणं
परकेपणाचं अंगावर धावून आलेलं जनावर
हे सारं सारं उगाळताना आपलं पेंढारी मानस
नि आपमतलबी वागणं याचा मेळ कुठच बसत नाही
नि याचं त्यांना सोयिरसुतकही असत नाही

वर्तमान आव्हानात्मक असला की माणसं भूतकाळाकडे पलायन करतात. विसाव्या शतकात दलित आदिवासीचे लढे केंद्रस्थानी असताना पुनरुज्जीवनवादी लोकांनी शिळ्या कढीला ऊत आणून शोषित पीडितांच्या लढ्यांना बदनाम करण्याचे षडयंत्र अनेक पातळ्यांवर उभारले. शाब्दिक फाफटपसारे वाढवत वास्तवाला झटकणे, शाब्दिक मैथुनात सुख शोधणे एवढ्यापुरताच बुद्धिवादी आणि त्याचा बुद्धिवाद मर्यादित होत जातो. अशा समाजहिताच्या केवळ गप्पा मारणाऱ्या पोकळ बुद्धिवाद्यांचे वस्त्रहरण या कवितेने केले आहे.

सांस्कृतिक प्रतीकांची उलटी मांडणी आपल्या देशात सुरू आहे. म्हणून मूलतत्त्ववाद्यांनी जन्माला घातलेली परिभाषा समजून घेणे अगत्याचे ठरते. त्यांनी रुढ केलेल्या विपरीत प्रतीमांचे वास्तव आणि उफराट्या न्यायाने वागणाऱ्या सांस्कृतिक चेहऱ्याचे दर्शन ही कविता घडविते. भाडोत्री बुद्धिवंताचा एक वर्ग सत्ताधाऱ्यांनी समाजाच्या दृष्टीने निरर्थक ठरणारी चर्चा करण्यासाठीच पाळलेला असतो. आपल्याकडे विसाव्या शतकातील बुद्धिवादी लबाड निघाला. आपला बुद्धिवाद त्याने स्वार्थासाठी वापरला आहे. प्रज्ञा आणि प्रज्ञावंत यांच्यातील अंतर्विरोधाचे, लपंडावाचे एक अनोखे दर्शन ही कविता घडविते.

प्रज्ञा गाजर चोखू लागली की
प्रज्ञावंत आपोआपच लोळू लागतो
प्रज्ञा सत्तेच्या ताब्यात रमली की
प्रज्ञावंत आपोआपच लपाछपीचा खेळ खेळू लागतो

इथल्या राजकारण्यांनी आंबेडकरांचे नाव घेत अंधश्रद्धेला श्रद्धा समजून एक भुलभुलैया निर्माण करून ठेवला. दिशाहीन झाल्यामुळे आंदोलन आपला चेहराच हरवून बसले आहे. मात्र हे वास्तव पाहून कुणाचंही रक्त उसळत नाही किंवा कोणी पेटून उठत नाही.हा थंडपणा विलक्षण अस्वस्थ करणारा आहे.

घोडे तसे हललेच नाहीत
टापा उचलल्या त्या लाथाडीसाठी
नि माथ्यावर गुलाल माखून निळ्या आकाशाकडं
तोंड वेंगाडून पाहात राहिले
हत्तीच्या बलाबलाची चर्चा आकाशभर नि
हत्ती सर्कशीत रिंगमास्टरच्या चाबकाच्या तालावर
हळूहळू उचलतो पाय, सोंड हलवून करतो हाय हाय

एकेकाळच्या शोषक व्यवस्थेच्या विरोधात उभा ठाकलेला क्रांतीकारी चेहरा, पुरोगामी चेहरा बदलत गेला. प्रस्थापित व्यवस्थेचा विरोधक हळूहळू त्या व्यवस्थेचाच भाग कधी बनला ते लक्षातही आले नाही. त्याच्या जगण्याची चाल बादचाल झाली.व्यवस्थेचा तो दास झाला.दलित मध्यमवर्गीयांचे झालेले ब्राह्मणीकरण हा ही असाच प्रकार आहे.

देव आणि दैवतीकरण यामध्ये अडकलेल्या मनोवृत्तीलाही या कवितेने प्रश्नांकित केले आहे. अस्तित्वाला प्राप्त करून घेतलेल्या बकालपणाचं एक अभद्र चित्रही रेखाटले आहे. सामाजिक निरोगीपणा, बांधिलकीची अटळता ह्या गोष्टी इतिहासजमा झाल्यात की काय? असे अस्वस्थ करणारे प्रश्न उभारून डाव्या संघर्षशाली शक्ती उजव्यांच्या हातात हात घालूनच वाटचाल करीत आहेत हे वास्तवही मूल्यऱ्हासाचा कडेलोट झाल्याचेच द्योतक असल्याचा निर्वाळा दिला आहे.

नाझी हिटलरच्या मानसिकतेला समांतर मानसिकता समकालीन जीवनात फणा उभारून उभी आहे. या देशाचा इतिहास पराभवाचा आहे. त्या पराभावाची कारणे इथल्या विषम संस्कृती, धर्म, परंपरा आणि शास्त्रपुराणात दडलेली आहेत आणि याच पारंपरीक इतिहासाचे पुनरुज्जीवन हे समरसतावाद्यांचे उद्दिष्ट आहे. याविषयीची मांडणी या कवितेने केली आहे. फितुरी, कावेबाजपणा, इतरांमध्ये झुंज लावून आपण नामानिराळे राहणे, संभ्रमाचे बीज पेरून आपण त्या गावचेच नाही अशी भूमिका घेणे अशा राजकीय खेळींचे मर्माग्राही विवेचन केले आहे.

आमच्याकडची मेंढरं त्यांना पाहिजेत
म्हणजे मेंढपाळ असण्याचा आनंद त्यांना पुरेपूर उपभोगता येतो
एखादा जरी एडका फुरुफुरून शिंग दाखवू लागला की
ते होतात घामाघूम अन् त्याचा दिला जातो बळी
बाकीच्या मेंढरांना वाटू नये याचं सोयरसुतक म्हणून
त्यांनाही मेजवानीत शरीक करण्याची खेळल्या जाते खेळी

फुटीरतेला जन्म देणारा राजकीय चाणाक्षपणा आणि संम्मिलीनीकरणाच्या तत्त्वाचा वापर करून अमिषसत्ता माणसाचा कसा बळी घेते अशा राजकीय अपप्रवृत्तीचे दर्शन घडविण्याचे कार्य नेमकेपणाने या कवितेने पार पाडले आहे.

थोडक्यात, धगीवरच्या अक्षरांनी आपल्या भाषेचे सत्व हरविल्याचे भान प्रकट केले असून, शोषक व्यवस्थेच्या भाषेचं कार्यलक्ष्यी प्रयोजन कसे फसवे असते. याचा प्रत्यय देतानाच मूलतत्त्ववाद्यांच्या भाषिक सांस्कृतिक राजकारणाचा पर्दाफाश केला आहे. मूल्यऱ्हासाच्या कड्यावर उभे राहून खुश्किच्या मार्गाने स्वार्थाचे इप्सित साध्य करू पाहणाऱ्या अध:पतित जगाचे भेसूर चित्र रेखाटून, वाचकांना अस्वस्थ करीत अंतर्मुखतेपर्यंत घेऊन जाणे हे या कवितेचे सामर्थ्य आहे. वर्तमानाने वाढून ठेवलेल्या सामाजिक दगाबाजीचे वास्तव चित्रित करून दगाबाजीच्या विजयी उन्मादामुळे आपल्यातला आपलेपणा सैरभैर झाल्याचे शोकाकूल वर्तमान वाचकांच्या मनावर कोरले आहे.

✸ प्रदीप जाधव (जन्म १३ जुलै १९५९)

जाधव यांच्या **म्हणूनच शब्द हिंसक होतात** (२००७) ह्या संग्रहाच्या शीर्षकापासूनच काही प्रश्न उपस्थित होतात. सामाजिक, सांस्कृतिक, पौराणिक, राजकीय, ऐतिहासिक अशा अनेकविध पातळ्यांवरील प्रश्नांचा घेतलेला वेध म्हणजे 'म्हणूनच शब्द हिंसक होतात! ' अन्नाऐवजी कचऱ्यावर जगावे लागते. मातीशी असणारी नाळ तुटत चालली आहे. शहराचा कोणता रंग केव्हा गडद होऊन दंगलग्रस्त निर्वासितांच्या छावण्या फुलवून बेरंग करतील याचा नेम नाही. क्रौर्य कायम ठेवून कळप गतिमान होत चालले आहेत. त्यामुळे नैतिकता रसातळाला पोहचली आहे. उघड्या मनाच्या दारातून वेदना भळभळताहेत. अस्तित्वावर प्रश्नचिन्ह लागले आहेत आणि नसानसातून शरीरभर अस्वस्थता वाहते आहे. म्हणूनच शब्द हिंसक होतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची, त्याचा विचार आणि कृतिशीलतेची सावली विसाव्या शतकावर पसरली होती. एखादा विचार किंवा तत्त्व वरचढ ठरत असेल तर व्यवस्था अनेक पातळ्यावरून नाना पद्धतीने त्या विचारतत्त्वाला संपविण्याचा प्रयत्न करते किंवा स्वत:च्या परंपरेत सामावून घेण्याचा प्रयत्न करीत असते.

त्याने नाकारला मनू, त्याची पेटवली स्मृती
अंधाऱ्या मनामनात, त्याने चेतविल्या ज्योती
तोही मरेना पेलेना, त्यांनी पुन्हा केला कावा
आधुनिक मनू हाच, आता त्यांनी केला दावा

अशाप्रकारे कावेबाज व्यवस्था आंबेडकरांना आधुनिक मनू संबोधून मनूच्या परंपरेशी नाव जोडण्याचा प्रयत्न करते. त्यामागे एक नियोजनबद्ध यंत्रणा कार्यरत असते. ही यंत्रणा उद्ध्वस्त झाली पाहिजे असे कवितेला वाटते.

अशाप्रकारच्या व्यवस्थेला क्रौर्याचा एकचालकानुवर्ती प्रवास हवा असतो. या प्रवासात धर्मजातपंथाच्या नावे हिंसेचे दगड पावलोपावली रोवून ठेवलेले असतात. हिंस्त्र श्वापदाच्या कळपासारखीच त्यांची मानसिकता जंगलाच्या कायद्याची कास धरणारी असते. म्हणून ती लोकशाहीविरोधी असते.

कळपाला नसतो कधीच एकच एक चेहरा
कळप तोच, बदलत जातो चेहरा
कधी धर्माचा कधी जातीचा कधी प्रांताचा
तर कधी नुसत्याच झुंडशाहीचा
विशेष म्हणजे लपत नाही कधीच
त्याच्या कोणत्याही चेहऱ्यावरचं एवढंही कौर्य

माणूस जेव्हा जनावराचा धर्म पाळू लागतो तेव्हा अमानुषता आणि हिंसेचा जन्म झालेला असतो. हिंसेच्या शस्त्राचाही जन्म झालेला असतो. तिथूनच लोकशाही मूल्यांच्या ऱ्हासाला सुरवात झालेली असते. हे ही खरं की कुणाच्यातरी डोक्याशिवाय कळप तसूभरही हालत नाही. जात्यंध, धर्मांध आणि वर्चस्ववादी कळपाला बथ्थड मेंदू प्रिय असतो. किंबहुना लोकांना झापडबंद करून आपला मस्तवाल प्रवास चालू ठेवण्यातच त्यांचे हित असते. त्यामागे हुकूमशाही रक्त गतिमानपणे कार्यरत असते. याचे नेमके स्पष्टीकरण ही कविता करते. समकालीन जीवनातील सांस्कृतिक आणि सामाजिक भयगंडाचा कार्यकारणभावही स्पष्ट केला आहे. या कवितेतून असुरक्षित सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाचे विविधांगी पदर साक्षात होतात.

हे शहरही तस्सच रंगीबेरंगी भगवं हिरवं निळं पांढरं
हे शहर असेलही स्वभावाने शांत पण रंगाचा काय भरवसा?
ते तर आता कधीही होऊ शकतात गर्द अन् फुलवू शकतात
इथंही दंगलग्रस्त निर्वासितांच्या बेरंग छावण्या
विशेष म्हणजे या छावण्यात आपण नसूच
आपल्या पोराबाळासहित किंवा शिवायही
याची तर देता येत नाही काडीमात्रही शाश्वती

धर्मांधता, धर्माच्या नावाने होणाऱ्या दंगली, त्यात जाणारे निरपराधांचे बळी, या सर्व पातळ्यांवरील दहशतीचा ताण आणि दाब माणसाला भयग्रस्त करून सोडतो. रंगीबेरंगी आणि भयपिडित असा हा अंतर्विरोध केवळ शहरापुरताच मर्यादित राहत नाही तर एकूणच सामाजिक प्रतिकात्मकतेचे रूप धारण करतो. या ताणातूनच कविताही अक्षरबद्ध होते. जीवनातील अटळ सत्य म्हणजे मृत्यू. मरणपथावर माणसाला पावले टाकावी लागत नाही तर मरणाचा रस्ताच एक दिवस माणसाकडे चालत येतो.हे वास्तवही प्रतिमित अभिव्यक्तीतून स्पष्ट होते.एकाच प्रतिमेतून विविधांगी अर्थाची सूचना मिळते हे या कवितेचे खास वैशिष्ट्य आहे. स्त्रीविषयक जाणिवा आणि पुरुषी प्रवृत्तीचा शोधही या कवितेने घेतला आहे. स्त्रीचे सर्वस्व लुटण्यासाठी तिला गुलामीच्या अलंकाराने मढविण्यासाठी अनेकानेक युक्त्या प्रयुक्त्या योजल्या आहेत.

तेच अगतिक अंधारी असाह्यपण
आणि मूक पावसाचे क्षीण ऋतू
माळेतून गळ्यात आवंढ्यासह परत परत

हा वेदनेचा प्रवास जो सोन्याच्या पिंजऱ्यातून सुरू होतो.धर्माने तिला वैरी मानले आणि पुरुषाने तिला गुलामीच्या विविधरंगी अलंकाराने मंडीत केले. तिला आपल्या नियंत्रणात, अखत्यारीत ठेवण्यासाठी मोठी चलाखी केली.

त्याने म्हटले तू धनाची पेटी / मग तिने मिरवले स्वत:ला
समजून त्याची मौल्यवान वस्तू / त्याने म्हटले शेवटी तू देवी
तिने मग त्याला कायमचा परमेश्वर केले

भोगाची वस्तू आणि पापाचे महाद्वार हे समीकरण धर्म आणि पुरुषाने दृढ केले. हा इतिहास या कवितेने वाचकांसमोर ठेवला आहे. एवढ्यावरच ही कविता थांबत नाही.तर आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचार आणि कार्याशी कृतघ्न झालेल्या वर्तमान स्त्री मानसिकतेचा वेध घेते.

तिनं तर तुझ्या पावलावर
उभं राहण्याचं बळ दिलं होतं ना?
मग कसं टिकून आहे अजून
तुझ्या पावलांना जडलेलं हे फेऱ्याचं व्यसन?

भ्रष्टतेचं प्रतीक असलेल्या वडाभोवती गुलामी आणि पतीला देव मानणाऱ्या पारंपरीक प्रथेत गुरफटत गेलेला इतिहास आणि वर्तमानाचं भान नसलेल्या प्रवृत्तीचा वेध येथे घेतलेला दिसून येतो.

प्रदीप जाधवांच्या कवितेने मानवी अस्तित्वाचे प्रश्न, अस्तित्वाची अर्थपूर्णता आणि निर्थकता याबरोबरच मृत्यूविषयक चिंतनही मांडले आहे. नैतिकता अनैतिकता यापलिकडे गेलेली सरोगेट मदर ही संकल्पना तसेच मर्क्युरीचं गारुड, ग्लोबल खेडे, तथाकथीत स्वाध्याय, वटसावित्री, आजीसारखा रिचार्जर या आणि अशा स्वरूपाच्या अनेक संकल्पना आणि प्रतिमांच्या उपयोजनामुळे कवितेला एक भारदस्तपणा प्राप्त झाला आहे. बदलता काळ, संगणक युग, माहितीचा स्फोट या सर्व गोष्टी आल्या तरी मानवी प्रवृत्ती बदलली नाही.या समकालीन वास्तवाचा वेध प्रदीप जाधवांच्या कवितेने सामग्राने घेतला आहे.

✸ अविनाश गायकवाड

अजुनही अस्वस्थ रोहिणी (२००८) हा या दशकातील गायकवाड यांचा अतिशय महत्त्वाचा कवितासंग्रह होय. हा कवितासंग्रह स्वत:चे वेगळेपण सिद्ध करणारा ठरला. वैश्विकीकरणाच्या वर्तमानात निर्माण झालेल्या, प्रभावित झालेल्या विविधक्षेत्रीय समस्यांचे स्वरूप या कवितेने स्पष्ट केले आहे. भाकर आणि इज्जत या काही झिरपणीच्या सिद्धांतानुसार प्राप्त होणाऱ्या गोष्टी आहेत असे नव्हे. दारिद्र्याची चेष्टा करणारी व्यवस्था आहे. गरीबांच्या डोळ्यात आसवांचे सातत्य कसे राहिल, उपासमारीत वैविध्य कसे राहील याची व्यवस्थेला फिकीर असते. गरिबीला तर स्वप्नातही अर्थशून्य कुबेरनगरी धुमाकूळ घालीत असते. गरिबीची दु:खाशी सलगी असते. गावोगावच्या मजूर नाक्यावर, बंद कारखान्यात गरिबीचे अस्तित्व असते. दुष्काळ निवारण्याच्या छावणीतील आर्त सुस्कारे, खंगत जाणाऱ्या झोपड्या, राबणारे कष्टकरी हात या सर्वांचा गळा दाबावा असे गरिबीला वाटत नाही. कर्जाच्या वस्त्रांनी तिला कितीही सजवले तरी तिचा प्रवाहीपणा आटत नाही. सातत्याने ती वाहातच राहते. दारिद्र्याची अशी रूपे स्पष्ट करून सामाजिक विकृतीचा औपरोधिक वेध या कवितेने घेतला आहे. वेगाने बदलत जाणाऱ्या आजच्या सामाजिक, आर्थिक वर्तमानाचा लेखाजोगा अस्वस्थ करणारा आहे. जागतिकीकरणाच्या काळातील वापरा आणि फेका हे सूत्र माणसाच्या जगण्याला व्यापून उरले आहे. या काळाची वृत्ती मिजासखोर आहे.

पाठ खाज खाज खाजवली, चरून कुरण सिलीकॉन व्हॅली
आयत्या बिळावर मधूर बोली, रोल्सराईस मर्सिडिज एसी
माज बजाजी फाईव्हस्टार मखलासी

माणसाचा आधार काढून घेऊन त्याला नागडे करणारी प्रवृत्ती जोरकसपणे कार्यरत झाली.सामान्य माणूस उघडा पडत गेला.त्याच्याकडे मेंदू असूनही विचार करायला वाव ठेवला नाही.या अर्थाने वर्तमानाचे वारे बहकले आहे. ज्याच्या हाती ससा तो पारधी या परंपरेने चालत आलेल्या म्हणीला तुकारामबोवानी शह दिला होता. 'तुका म्हणे फासा वाघुरा कुऱ्हाडी प्रसंगी जो काढी पारधी तो' असा अर्थ समजावून सांगितला होता. त्यालाही आता काही शतकं ओलांडली आहेत. रिमोट कंट्रोलचे शतक आले आणि परत पारध्याचे अर्थ बदलून गेले.

जे चालत येतात रोरावत / पांघरुण आयाळ सशस्त्र

सांगकामे निकलगैबाने झपक झोक्यात
जे तत्पर बटणाच्या बाहुलीसारखे
टाळक्यांचा ज्यांच्या हातात रिमोट ते पारधी

या बदलत्या अर्थमांडणीचे श्रेय अविनाश गायकवाडच्या कवितेला दिले पाहिजे.व्यवस्थेने सांगकाम्या गैबान्यांना कामाला लावले आणि हे गैबाने बिनडोकपणे ज्यांच्या हाताचे बाहुले बनले त्यांच्या मेंदूचे नियंत्रण मात्र व्यवस्थेच्या हातात. अल्पसंतुष्टांना हाताशी धरून, त्यांना फितवून त्यांच्याच समूहाला, माणसाला मारून टाकणारी ही हिंसक तऱ्हा नजिकच्या वर्तमानाने पाहावयास भाग पाडले.त्याचबरोबर जातीवादी हिंस्त्र श्वापदानी द्वेषाग्नीतून दलितांची हत्याकांडे घडविली.

कसेल त्याची जमीन नसेल त्याचे काय
खैरलांजीत दिवसा हिंस्त्र श्वापदाचे पाय

ज्यांच्याकडे कष्टाने मिळवलेल्या जमिनी कसण्यासाठी आहेत आणि कसणारे लोक जर सवर्ण नसतील, दलित असतील, आंबेडकरी विचारांचे असतील तर ते सवर्णाच्या द्वेषाचे कारण ठरते. हा द्वेष एवढा टोकाला पोहचला की, स्त्रियांची बेअब्रू करून, हत्या करून फेकून देण्यात आले. गावातील भैयालाल भोतमांगे बौद्ध आहे, त्याच्याकडे जमीन आहे ही गोष्ट जातीवाद्यांना सहन झाली नाही आणि खैरलांजी घडले हे भीषण वास्तव या कवितेने अधोरेखित केले आहे. सवर्ण मानसिकतेचा वेध घेतला आहे. शेती कसणाऱ्या शेतकरी, शेतमजुराचे दु:ख समजून घेणारी व्यवस्थाच अस्तित्वात नाही. त्यामुळे आसुडाऐवजी शेतकरी आत्महत्या करतो. आसूड उगारण्याचे त्राण उरलेले नाही. कारण,

मुद्देमुळाला मूळ मुद्याला / गाजर दाखवून बावनट सत्ताधीश
फिरवतो हवेत जादूची मध्ययुगीन मूठ,
घालतो भजनं यशासाठी साकडं

मूळ प्रश्नांना बगल देऊन त्याच्या समस्येला फाट्यावर मारले जाते.कल्याणकारी वगैरे म्हटल्या जाणाऱ्या राज्याची आता वाट लागली आहे. त्यामुळे माणसाच्या मरणाचे मार्ग मोकळे झाले आहेत. लोकप्रतिनिधींनी वर्तमानाला आत्महत्येचा काळ म्हणून घोषित केले आहे. हेच लोक स्वच्छता अभियानाच्याही गप्पा मारतात.विठ्ठलनामाचा जप करणारे, चंद्रभागेत डुबकी मारणारे लोक गावात पाऊल टाकल्याबरोबर पारंपरीक, जातीय, धार्मिक मनोवृत्तीचे बनून जातात. जिथे मनेच साफ नाहीत तिथे गावाची स्वच्छता काय होणार! ती मनाच्या पातळीवर पहिल्यांदा होणे आवश्यक आहे. मूलभूत परिवर्तनाच्या मानसिकते-शिवाय कोणत्याही अभियानाला अर्थ उरणार नाही.

अविनाश गायकवाडची कविता 'अत्त दीप भव'च्या मार्गाने निघाली आहे. म्हणूनच रोहिणीचा संदर्भ आजच्या काळात देणे कवीला समकालीन वाटते. आईच्या वात्सल्याचा बुद्धाच्या करुणेशी अन्वय लावून या कवितेने अर्थविस्ताराची झेप घेतली आहे.

खूप पान्हा फुटल्यानंतरच
झाला असेल सिद्धार्थाचा बुद्ध, पिंपळाचा बोधीवृक्ष

पिंपळाचे बोधीवृक्षात रूपांतर झाले आणि कारुण्याचे स्त्रोत अपरंपार वाहायला सुरवात झाली. एका इतिहासाचे हे साक्षात रूप आहे. पिढ्यागणिक जशी जनुकं वाढतात तशी दु:खातही भर पडत जाते. दु:खाचा कार्यकारणभाव आणि उपाय बुद्धाने सांगीतला.

कळवळली ओथंबली करुणा. उजेड अंधार निरोगी दुखणाईत
हे कारण हा उपाय तुम्हीच उजेड तुमच्या हाती दिवा
कुठे कसा लावायचा तुम्हीच ठरवा

अशा मूलभूत तत्त्वज्ञानाला शह देण्यासाठी, त्याला बदनाम करण्यासाठी ब्रह्मसत्य जगन्मिथ्या आले. आत्म्याचे

अमरत्व आले. परंतु अमर झालेले तत्त्वज्ञान कधी मरत नसते. हे सत्यही नाकारता येणार नाही. असे असले तरी गेलाबाजार कावेबाजपणापासून उन्मादापर्यंत जी लचकेतोड झाली त्यातून वाट्याला आलेल्या दुःखाने हाहाकार माजविला. हे सत्य या कवितेने मुखरीत केले आहे. आधुनिक काळात सभ्यता आणि संस्कृतीचे गोडवे गायिल्या गेले. आज संस्कृतीने एका नव्या स्थित्यंतराला जन्म दिला.माहितीच्या महाजालाचा उदय झाला. लोकांना प्रचंड माहिती उपलब्ध झाली आणि ज्ञानाची पुरती वाट लागली. माहितीच्या बळावरच माणसे एकमेकांच्या नरडीचा घोट घेऊ लागली. अशावेळेस बुद्धाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.रोहिणी नदीच्या पाण्यावरून दोन गणात पेटलेला संघर्ष आणि रक्तरंजित वास्तव.त्याचप्रमाणे वर्तमानातील सायबरस्पेसच्या युगात माणसाच्या निर्दयपणे होणाऱ्या कत्तली यात काही फरक नाही. आजच्या सुसाट वेगाने बदलणाऱ्या काळात बुद्ध होणार आहे? रोहिणीचे पाणी बुद्धचरणाची वाट पाहात राहिले.वर्तमानालाही बुद्धाला साद घालण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.बुद्धकालीन इतिहासाचे स्मरण आणि वर्तमानाचे वास्तव याचा मेळ घालण्याचा प्रयत्न असे या कवितेचे सूत्र आहे. शांतगंभीर इतिहासापुढे क्रुद्धक्रुर वर्तमान ठेवून ही कविता दोलायमानतेचा अनुभव अधिक तीव्रतर करीत जाते.दोन सांस्कृतिक जगाचे विरोधाभास वेगळ्याच भाषिक रूपात अभिव्यक्त करते.त्यातून वर्तमानाचे भीषण वास्तव सूचित होते.

कैफ रेहमानी गुलाली / लपत छपत का उघड उर्मट
आरोळ्या ठोकत नासून उर्जास्त्रोत
चिंध्या होत गलथानपणे पोसत चालली कडू किरायतीची झाडं

हे दोन्ही कैफ धर्माच्या अफूने तर्र झाले आहेत. एक उघडउघड उर्मटपणे कृतिशील होणारा, दुसरा कावेबाजपणे कार्यरत राहणारा. कडू किरायतीची झाडं हे त्याच्या निर्माणाचे फलित आहे. या दोघांच्याही निर्दयी वृत्तीने माणसाची मने मारून टाकली आहेत. एका भीषणभूत वास्तवाचे रूपस्वरूप अनोख्या शब्दकळातून साक्षात करण्याची एक नवी रीत येथे प्रत्ययाला येते.या कवितेच्या भाषिक आकाराने अर्थपूर्णता सबल केली आहे. या कवितेला बोलभाषेचा एक ताल आहे. त्याचप्रमाणे एक लोकलयही आहे. त्यामुळे अभिव्यक्तीचा ताजेपणा, जिवंतपणा प्रत्ययाला येतो.

रोहिणीच्या अस्वस्थ होण्यामागे इतिहास आणि वर्तमान आहे. इतिहासाचा विचार केला तर पाणी या तत्त्वामुळे उद्भवलेल्या सामाजिक क्रांतीच्या विचाराचे ऐतिहासिक परिमाण प्राप्त होतात.पाण्याच्या लवादामुळे बुद्धतत्त्वाची निर्मिती झाली. पाण्याला आपण जीवन म्हणतो.तथागत बुद्ध, कबीर, बाबासाहेब आंबेडकर, म. फुले ह्या पाण्याशी अनुबंधित ऐतिहासिक प्रतिमा आहेत. एका अर्थाने पाणी संघर्षाच्या तत्त्वाकडून दुःखनिवारणापर्यंत बुद्धाचा प्रवास झाला. या प्रवासात नंतर मात्र कधी रोहिणीच्या पाण्याला बुद्धाचा चरणस्पर्श झाला नाही. तेव्हापासून 'साद घालते रोहिणी.' पाण्याला अन्यायाच्या विरोधातून उदयाला आलेले क्रांतीचे वाहक तत्त्व असा अर्थ प्राप्त झाला. वर्तमानात हेच तत्त्व साद घालते आहे. मात्र या तत्त्वाला हरताळ फासणारा वर्तमान आहे. म्हणून अजूनही अस्वस्थ रोहिणी आहे. पाणी म्हणजे जीवन. एका जीवनाच्या संघर्षातून श्वासाची फुले मिळाली माणसाला. दुःखाचा निरोध होऊन माणसाला श्वासाची फुले जोवर प्राप्त होणार नाही तोवर रोहिणीचा अस्वस्थपणा कायम राहणार आहे!

रोहन नागदिवे (१५ ऑगस्ट १९६१- ९ जून २०१२) यांचा **स्थितीचा ओला कोलाज** (२००७) हा संग्रह या दशकात प्रसिद्ध झाला. माणसाच्या जीवनातील कुरूपता, विरूपता, विषमता नष्ट व्हावी आणि मानवी जीवनाला निसर्गदत्त सुंदरपण यावे या जीवनदृष्टीच्या ध्यासातून कवीने आपली अभिव्यक्ती केली आहे. वर्तमानाच्या स्थितीगतीचे एक चित्र वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे.

वुडवर्ड प्यालेले प्रबोधनाचे बाळ ओढीत आहे चिलीम
गुलाल उधळीत सर्व रस्ते जात आहेत संसदेकडे
मतदाता झाला आहे प्रेतदाता स्थितीचा हा असा कोलाज (१२)

असे वास्तव मांडून गतकाळ ते वर्तमानापर्यंतच्या प्रवासातील अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. आर्य

व्यवस्थेला प्रश्नांकित करताना प्रतिक्रांतीचा इतिहास अधोरेखित करून अलिकडच्या त्यांच्या काळ्या कारनाम्याचा समाचार घेतला आहे.

बाबरीचे रुदन, लेण्यांची छाटलेली अवयव
नामांतरातील राखरांगोळी, रमाबाई नगरातील आक्रोश
खैरलांजींची विटंबना
स्वातंत्र्यसंग्राम सैनिक नसल्याचे ऍफिडेव्हिट
युद्धातील निष्पापांचा मृत्यू
इतिहासाचे हे छोटेसे घडे
तुमच्या गुन्ह्यांचे अनंत खडे...
तुमचे रक्तच अनैसर्गिक
ज्यात नसतो घाम तुमच्या जगण्याचे सगळे संदर्भ वाम

त्यांची अनैसर्गिक तत्त्वे माणसाला नामशेष करण्यात कसे आघाडीवर आहेत तो नजीकच्या वर्तनासहचा इतिहास या कवितेने कथन केला आहे. 'हे वेदांताच्या उरल्यासुरल्या विषारी मात्रे आता तू मारूनच दाखव चवताळलेली युगपुत्रे' असे आर्यांच्या पिलावळीला आव्हान दिले आहे. धर्माला आव्हान दिले आहे. वेदांताला आव्हान दिले आहे. अनेकविध आव्हाने पेलण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. माणसाला माणसाचे माणूसपण प्राप्त व्हावे यासाठीच माणसाला गतीरुद्ध करणाऱ्या साऱ्या संकल्पनांना आव्हान देतानाच पूर्णत:च त्या संकल्पना नाकारल्या आहेत. माणूस केवळ मनुष्यसदृश झाला पण मनुष्यत्वाचे काय? हा जीवघेणा प्रश्न या कवितेसमोर आहे. दु:खाचं मूळ शोधणं सोप्प आहे मात्र त्याच्या निर्मूलनार्थ अंमलबजावणी करणे कठीण आहे कारण दु:खाच्या नाना तऱ्हा आहेत आणि माणूस या नाना तऱ्हांचा भारवाहक असतो त्यानेच माणूस थकून जातो. हे वास्तव पाहून दु:ख माणसाच्या या थकलेपणावर अनाहुतपणे हसत असते. अंतर्मुख करणारे चिंतन या कवितेने मांडले आहे. बळी तो कान पिळी हा न्याय कोणत्याही काळात अस्तित्वात असतो.त्यातही मूलतत्त्ववाद्यांच्या हातात कारभार गेला म्हणजे काय हाहाकार माजू शकते याची प्रचिती ही कविता देते.

बळाने जमवल्या आहेत विटा
मंदिर नावाचे गॅस चेंबर बांधण्यासाठी
पेटविल्या आहेत भट्टया नरमेधासाठी

हिटलरी प्रवृत्तीचा आदर्श असणारी ही कुनिती येथे उजागर झाली आहे. क्षणार्धात काय घडेल याची शाश्वती देता येत नाही.

स्नेह आत्ता येतो असं सांगून जातो
आणि वादग्रस्त ढाचा उद्ध्वस्त झाल्याची बातमी होतो

हा सारा कुनियोजित कटाचा भाग असतो. सर्वसामान्यांना वाटते हे अचानकच घडले असावे. जनता म्हणजे गुलाम, खुळखुळे, टाचेखालचे थोटूक असे प्रमेय मांडले जाते.क्रांतीला मारक ठरणारी त्यांची निती वेळोवेळी सरड्यासारखी रंग बदलत असते आणि सामान्य माणसे त्यांच्या भविष्यासह विकलांग ठरत जातात. त्यामुळे माणुसकीचे विकेंद्रीकरण होणे अपरिहार्य आहे. गमवण्यासारखे ज्यांच्याकडे काहीच नसते ते कोणताही पवित्रा घेऊ शकतात.

मला शत्रू समजणारे माझे सर्व मित्र
मंदिरात मग्न आहेत आरतीत
दुधपित्या बोक्यासारखे
आणि मी रोखून धरले आहे
पिसाळलेल्या कुत्र्यांना मंदिराच्या दारावर

अशाप्रकारचा विद्रोही पवित्रा या कवितेने घेतला आहे. दुसरीकडे विपरीताचे हे वास्तव असे आहे की लोकांच्या मूलभूत गरजांशी कोणलाही देणेघेणे उरले नाही. लोकांच्या राज्यांच्या गोष्टी लोकशाही राष्ट्रात केल्या जातात. लोकांच्या गरजांकडे पाठ फिरवली जाते त्याला लोकांचे राष्ट्र कसे म्हणता येईल. सर्वत्र गोलमाल कारभाराला ऊत आला आहे.

राष्ट्रा, यारा! हे कसे गोलमाल
गध्याच्या पुढ्यात गुलगुले नकटीच्या नाकात नथ
नाकवालीच्या नाकाला फक्त भोक

अशा विपरितातून राष्ट्र कसे उभे राहिल हा खरा प्रश्न आहे. ग्लोबल व्यवस्थेच्या काळात तो अधिक जटिल बनला आहे. कारण या महाखेड्याने माणसाला ग्राहक बनविण्याचे जाळे फेकले आहे. त्यात माणसे सहजपणे अडकत आहेत. माणसाला कुत्र्यामांजरासारखे पाळीव करण्याचाही या यंत्रणेचा कार्यक्रम आहे.

सांप्रत परंपरा प्रसवत आहे वेदांती सहिष्णुता
तिने उभे केले आहे आपल्या जगण्याला
मृत्यू आणि संघर्ष या दोन पर्यायावर ताणलेल्या दोरीवर

ही परंपरा सृजनाशी शत्रूत्व पुकारणारी आहे. ती नपुंसकांना सृजनाचे बाप ठरविते. अस्पृश्यतेला कडेवर घेऊन विटाळातून मुक्त होण्यासाठी ती गंगेत न्हाऊन तृप्त होते. अशावेळेस संघर्ष अटळ ठरतो. त्यामुळे भविष्याच्या लयीला नवी चाल देण्यासाठी यातनाच्या खांद्यावर संघर्षाचे ध्वजारोहण समतेच्या पताका घेऊनच करावे लागेल तरच सुंदराची निर्मिती होऊ शकेल. ग्लोबल व्यवस्थेने मूलतत्तववादाशी हातमिळवणी केली आहे. त्या व्यवस्थेने कष्टकऱ्यांच्या मूलभूत अधिकाराला कैद केले आहे. एका अफाट मानवी समूहाला मूठभरानी वेठीस धरले आहे. माणसाचा चेहराच या युगाने सपाट करून टाकला आहे. ही व्यवस्था अक्राळविक्राळ स्वरूपाची आहे. या युगाने संज्ञासंकल्पनाचे अर्थ बदलून टाकले आहेत. विविध संज्ञांना विपरीत अर्थाने मढविले.वापरा आणि फेका म्हणजे सत्याचा विजय असा विपरीत अर्थ प्रदान केला. अशा फेकलेल्या लोकांच्या वतीनेच कवीमन व्यक्त झाले आहे. फेकलेल्या नाकारल्या गेलेल्या पुसून टाकलेल्यांच्या अस्तित्वाचे प्रश्न या कवितेत सर्वत्र पाहावयास मिळतात. विज्ञान म्हणजे नफा असा अर्थ ज्यांना समजत नाही त्यांना अस्पृश्य ठरविण्यात आले आहे. अशी या युगाची भाषा आहे. मानवाधिकाराला या युगाने कुचकामी ठरविले आहे. उपयोगात येण्यापूर्वीच या मानवाधिकाराला फेकून देण्यात आले आहे. अशा वेळेस चोहोकडून माणसाची नाकेबंदीच झाली आहे. या व्यवस्था नावाच्या गुहेत रिमोटने बंदिस्त केल्यामुळे माणसापुढे आता दोनच पर्याय उरले आहेत. एकतर गुदमरून मरायचे किंवा संघटित होऊन गुहेच्या दारावर तुटून पडायचे.

या गुहेत विद्याविभूषित उच्चपदस्थ पुत्रांनी
पालनपोषणाबद्दल आभार मानले आणि
परसाकडच्या गोट्यासारखे फेकून दिले पित्याला वृद्धाश्रमात
तेथे व्यवसायिक सेवेने गुदमरून मेला वृद्ध
तेव्हा रक्ताच्या खांद्याने पाठविल्या शोकसंवेदना ई-मेलने

अशा वेळेस फेकल्या गेलेल्या लोकांनीच माणुसकी दाखविली. प्रेताला खांदा दिला. सर्व सोपस्कार इतमामाने पार पाडले.कारण त्यांची भाषा मानवतेची आणि त्यांचे विज्ञान उत्थानाचे आहे. म्हणून त्यांनी गुदमरून मरण पत्करणे परवडणार नाही.गुहेच्या दारावर तुटूनच पडले पाहिजे. तीच त्यांची नैतिकता ठरेल असे या कवितेने उद्घोषित केले आहे.

रस्ता सोडून चालला कुठं? असा प्रश्नार्थक शीर्षकाचा **शेषराव पिराजी धांडे** यांचा कवितासंग्रह (२००९) प्रसिद्ध झाला. समकालीन जीवनातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनातील समस्या हा या कवितांचा मुख्य आशय. आंबेडकरी विचारतत्त्वाचा रस्ता सोडून वाटचाल केल्यामुळे कोणते घातपात झाले, नुकसान झाले याविषयी ही कविता चर्चा करताना दिसते. चळवळीतील वैगुण्याभोवतीच ही कविता रेंगाळताना दिसते.

चळवळ झाली जीर्ण वस्त्रासारखी / ज्याला दांडही भरता येत नाही
आणि ठिगळही लावता येत नाही
आता वस्त्र बदलल्याशिवाय पर्याय नाही

असा पर्याय या कवितेसमोर आहे. अलिकडच्या काळात एकूणच फुले आंबेडकरी कवितेत चळवळ, नेतृत्व याबद्दलचा आकांततांडव जोरात सुरू आहे. नेतृत्वाबद्दल आगपाखड केली जाते. मात्र त्यामागील कार्यकारणभावाची चिकित्सा करण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. चळवळीला दुषणे देण्याची एक लाटच कवितेत आली आहे. अस्तित्वाच्या लढाईत अस्तित्वहीन झाल्याची खंत ही कविता व्यक्त करते. हा पराभवाचा प्रवास अस्वस्थ करणारा आहे. माणसे एवढी खालची पातळी गाठतात की, हजार पाचशे रूपयातही विकली जातात. ह्या लाचारीचा उगम कशात आहे? तडजोडी स्वीकारीत वाटचाल केली की, तो मार्ग दुबळेपणाच्या थांब्यावर जाऊन पोहचतो. राजकीय कावा तर असा आहे, की ज्याच्या जगण्याचेच वांदे झालेत, पोटात अन्नाचा कण नाही अशा लोकांना मोर्चात लाठ्या खाण्यासाठी जाऊन पोट भरावे लागते. ही अचंबित करणारी बाब आहे. सत्ताधाऱ्यांच्या बाबतीत तर असे असते की, कुठल्या ना कुठल्या पक्षात घरातला प्रत्येक सदस्य उभा असतो. सरकार बदलले तरी घरावरच्या पाट्या तेवढ्या बदलतात. असा त्यांचा आट्यापाट्याचा खेळ सुरू असतो. नेते कार्यकर्त्यांच्या बळावर मोठे होतात, कार्यकर्ते उपाशी लोकांना रस्त्यावर उतरवतात, मोर्चामुळे कार्यकर्त्याची सांजेची सोय होते. श्रमपरिहार म्हणून मग कार्यकर्त्याचे पाय गुत्याकडे वळतात. चळवळीचा असा क्रम असतो असे निरीक्षण या कवितेने मांडले आहे. एक गट निषेध करणारा, दुसरा गट हातमिळवणी करतो.तोही गुत्याच्या मार्गाने जातो आणि आनंद व्यक्त करतो. दुसरीकडे एकमेकांचे पाय ओढण्याची स्पर्धा लागली आहे. आपसातच वैरत्व निर्माण होते आणि शत्रूला आपले ध्येय साध्य करणे अधिकच सोयीचे ठरते. मोर्चात पाच अन् बारमध्ये पन्नासची रांग असते त्यामुळे चौकातील चळवळ नपुंसक बनत जाते. जो रोजंदारी देईल त्याच्या सभेच्या गर्दीत सहभागी होणे हा जगण्याचा पर्याय ठरतो आणि पुरोगामीत्व शोपिस सारखे मिरवत असते. स्वातंत्र्यावर धुवांधार चर्चा करणारे आपल्याच घरातील स्त्रियांना गुलाम ठेवण्यात धन्यता मानतात. येनकेन प्रकारे लोकशाही मूल्यांची वाट लावण्यासाठी ते तत्पर असतात.

सेनापती, कालच्या मोर्चाचं नेतृत्व तुमच्याकडे होतं
आम्ही विसंबून राहिलो तुमच्या निर्णयावर
तुम्ही मात्र जीव मुठीत घेऊन पसार झालात
व्वा! सेनापती, तृतीयपंथी निघालात

धांडे यांच्या कवितेवर लोकनाथ यशवंतच्या कवितेचा प्रभाव आहे आणि काही ठिकाणी अनुकरणही आहे. वरील कविता वाचताना लोकनाथची 'लिडर'ही कविता सहजच आठवते. त्या कवितेत रस्त्यावरच्या छक्क्याने नेतृत्वाला गांडू म्हटले होते. येथे सेनापतीच तृतीयपंथी असल्याचे या कवितेने दाखवून दिले आहे. जागतिकीकरणाच्या काळात प्रश्न समूहाचे म्हणून सोडविण्याचे, संघर्षाचे दिवस उरले नाही. नफा हेच बाजाराचे तत्त्व सर्व जगण्याचा भाग झाले. या बाजाराने स्त्रीलाही डावावर लावले.

मी तिच्या प्रश्नावर आंदोलन करत गेलो
कधी मोर्चा, कधी धरणे, निषेध व्यक्त करत गेलो
कालांतराने ती मला भेटली नि म्हणाली
माझ्या प्रश्नावर तू लढू नकोस
मी ते विसरले तू ही विसर
मी धंदा सुरू केला व्यवहाराचे बोल!

ग्लोबल व्यवस्थेने छोट्या मोठ्या चळवळी आणि आंदोलने मारून टाकली. त्याचे विपरीत परिणाम पदोपदी

प्रत्ययाला येत आहेत. असेच वास्तव या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहे. या काळात जातियतेनेही नवे रूप धारण केले. नव्या रूपात अस्पृश्यता कायम केली. चहाऐवजी कोल्ड्रींक्स पाजून घरातील भांड्यात चहा देण्याचे टाळले. विज्ञान, तंत्रज्ञान, माहितीयुगाच्या प्रगतीचा लाभ घेत आध्यात्म आणि धर्म शाबूत ठेवायचा अशी मानसिकता प्रबळ होत गेली. त्यामुळे आपलेपणाच्या जगण्याला मुकायला भाग पाडणारा हा काळ आहे असा निष्कर्ष कवितेने मांडला आहे.

प्रतिबद्धता हा **शिवा इंगोले** यांचा तिसरा कवितासंग्रह. या कवितेत त्यांनी मनूवाद्यांचा आधुनिक काळातील मूलतत्त्ववादी चेहरा उजागर केला आहे. उदा.

परिवर्तनाचे शेपूट सहज कापले त्यांनी
अजगराला मिळणारी चड्डी आणि
डायनासोरचा मेंदू झाकणारी टोपी
दाही दिशांना चावणारा चेहरा
मनुला पुन्हा प्रसन्न करतो आहे

भडवेगिरी करणाऱ्या कपटी शेंड्या कापून संस्कृतीरक्षणाची धर्मशाळा पेटवून देण्याची अपरिहार्यता ही कविता व्यक्त करते. झेंड्यालाही पारख्या झालेल्या देशाचे करुण चित्र रेखाटते. देशाच्या संदर्भात उघडानागडा, बोडखेपणाचा अनुभव चित्रित केला आहे.

अंगावरचा सदरा टरकन फाटावा तसा झालाय माझा देश
ठिगळं तरी लावावीत किती?
माझ्या स्वातंत्र्याच्या झाल्यात चिंध्या चिंध्या
आता सारेच सत्यावर्त उन्हाने केले निर्वस्त्र
बापाविना अपत्य भावाविना बहिण आणि
झेंड्यालाही झालाय माझा देश पोरका

राजधानी प्रजाहीन झाली आहे. प्रार्थनामंदिर बांधण्यासाठी मात्र बाहेर साधूंचा गलका आणि गावात दंगलीचा वणवा पेटला आहे. असे अस्वस्थ करणारे देशाचे चरित्र या कवितेने रेखाटले आहे.

केतन पिंपळापुरे (५ ऑक्टोबर १९६५- ३१ जुलै २०१५) **मार्शल रेस** (२००२), **डेमोफून** (२००६) हे दोन्ही संग्रह मौलीक स्वरूपाचे ठरले आहेत. या दशकातील हा अतिशय महत्त्वाचा कवी आहे. मार्शल रेस या संग्रहातील कवितातून गांजलेल्या आयुष्याला धार लावून युद्धभूमीवर पाऊल ठेवण्याची कृतिशीलता दिसून येते. आपल्या अभिव्यक्ती आणि विचारांना पूरक ठरणाऱ्या वैश्विक संदर्भाशी या कवितेने नाळ जोडली आहे. या कवितेने चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनूस्मृतीदहन आणि फ्रेंच राज्यक्रांती असा संबंध जोडला आहे. **मार्शल रेस**मधील कवितेला धम्म क्रांतीचे जबरदस्त आकर्षण आहे. सृष्टीच्या पुनर्रचनेचे वेड आहे. जगातील विविध क्रांत्या, तत्त्वज्ञाने, चळवळी, मानवमुक्तीची आंदोलने याची पुरेशी जाणीव कवीमनाला आहे. आपल्या यशस्वीतेचे गौरवगान करताना अंतर्विरोध विरोधाभासाचे शवविच्छेदन करण्याचे पुरेसे भान मार्शल रेसने बाळगले आहे.

ज्यांनी पत्करले कोरभर भाकरीसाठी
भगव्या शेजेवरील शहिदत्व
त्यांच्या मरणावर धार मारून झोपड्यांनी चेतवावा
आपल्या आतड्यातील जखमी सूर्य

मानव्याच्या प्रतिष्ठापनेची लढाई जिंकायची असेल तर संघटित होऊन संघर्षरत झाल्याशिवाय ती जिंकता येणार नाही असे या कवितेला प्रकर्षाने वाटते. आंबेडकरी क्रांतीसूत्रे आणि बुद्ध तत्त्वज्ञान या अधिष्ठानावर ही कविता उभी आहे. मूल्यगर्भता केंद्रस्थानी ठेवून क्रांतदर्शत्वाची पाखरण करणारी कविता म्हणून ती महत्त्वपूर्ण ठरते. 'मी तथागताच्या

डोळ्यातील स्वप्नांचा राजहंस आहे' असे ही कविता घोषित करते.त्याहीपेक्षा 'आत्मा-परमात्म्याच्या मृत्यूचा वैज्ञानिक आतंक आहे' अशी अभिव्यक्ती बुद्धाच्या विज्ञाननिष्ठेचा पुरस्कार करणारी आहे. ऋषीमुनींच्या भाकडकथा आणि चमत्कारांच्या थोतांडांवर विश्वास ठेवणाऱ्या या अंधश्रद्धेच्या देशात वरील उपायच खऱ्या अर्थाने जालीम ठरणारा आहे. म्हणून 'मार्शल रेस'मधील विचार, तत्त्वज्ञान आणि कवितेने योजलेली संघर्षाची हत्यारे अन्याय अत्याचाराचा अंतिम विद्ध्वंस करण्यासाठी पुरेशी धारदार ठरली आहेत.

डेमोफून हा एक वेगळ्या स्वरूपाचा कवितासंग्रह आहे. 'डेमोफून' हे एक ग्रीक मिथक आहे. जीवनाच्या वाटचालीसाठी, संघर्षासाठी तावूनसुलाखून मजबूत होणे असा या मिथकाचा अर्थ आहे. या मिथकाचा एका भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उल्लेख केला आहे. ''प्रत्येक मानवाच्या अंत:करणात कारुण्याने भिजलेली एक वात असते तिला चेतवावे लागते. ती ज्योत चेतवणे हेच या 'डेमोफूनचे' प्रयोजन आहे'.''[११] असे या कवीने नमूद केले आहे. एका अफाट आणि भेसूर वास्तवाच्या पार्श्वभूमीवर या कवितेला संघर्षाचा जाळ पेटवायचा आहे. 'डेमोफून' झालेल्यांना आगीची भिती वाटत नसते कारण आगीचे प्राशन करून आगीशी एकरूप होऊनच, जळतजळतच 'डेमोफून' तयार झालेला असतो.

सूर्याने कोसळावे माथ्यावर
आणि जळून जावा सृष्टीचा पर्णपिसारा
पावलाखाली आगीचा उफाळता लोळ
वणव्याने दयावे करकचून अलिंगन
तरीही जन्माला येतील माझ्या जळत्या हृदयातून
करुणेची हिरवीगर्द स्वप्ने

याबद्दलची खात्री डेमोफूनी जाणिवेला असते. डेमोफून झालेले मन जीवनाचा नकार स्वीकारत नसते.त याच्या मनात कायम चेतनेचे ढोल नगारे वाजत असतात. निळ्या ज्वाळांनी आसमंत पेटला आहे असे भास त्याला होत असतात. कोणत्याही प्रकारची तडजोड न स्वीकारता केवळ सत्यासाठी समर्पण करणारी मने पेटून उठतात त्यांना दाहक रस्त्याने प्रवास करावा लागतो.

फुलांच्या पायघड्या नाकारून स्वीकारल्या ज्यांनी अग्नीवाटा
त्यांच्याच जीवनात फुलून येते जीवनाची गर्द लाली
भूक छेडते ज्यांच्या आतड्यांच्या तारांवर भाकरीची रक्तधून
त्यांच्याच ओठावर जळून येते क्रांतीची ज्वलज्जहाल हाळी

दुर्दम्य इच्छाशक्ती आणि अन्यायाच्या विरोधातील रक्तातील सळसळ यांच्या एकात्मतेतून अशा प्रवासाला सुरुवात होत असते. सजग जाणिवा, समष्टीसाठी करुणा आणि उरात चेतवलेली ध्येयाची आस अग्निवाटेवरून ज्याला गतीमान करत असते तिथेच बदलाच्या शक्यताना धुमारे फुटत असतात.कारण अशा गतिमानतेत प्रवाहाविरुद्ध पोहून जाण्याची जबरदस्त उर्मी सळसळत असते.अशी जीवने क्रांत्योत्सवासाठी आतुर झालेली असतात.एका नव्या जगाच्या नवनिर्माणासाठीच्या दाहक अग्निपर्वाचे एक तळपते सौंदर्य या कवितेने फुलवले आहे.

अग्निदिव्यातून गेल्याशिवाय वेदनांचा मुक्तीमार्ग मिळत नसतो. दु:ख आणि वेदनेतूनच नवे सृजन उदयास येत असते, असा विचार जागोजागी या कवितेने मांडला आहे. 'डेमोफून'मधील कविता बुद्धीप्रामाण्यवादाने जडावलेली आहे. त्यामुळे विज्ञाननिष्ठेच्या पायावर उभे राहून सांस्कृतिक संचिताचे आणि रचिताचे एक छिद्रान्वेशी अन्वेषण ही कविता करते. जीवनाविषयीचे चिंतन मांडतानाच जीवनाचे पंचशील सांगितले आहे. जीवन गतीशील, कृतीशील, धैर्यशील, संघर्षशील आणि सच्छिल असावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. हे जीवनाचे पंचशील सांगतानच जीवनातील गुंतागुंतीचे वास्तव सांगण्यासही ही कविता विसरत नाही. जीवनाच्या वाटेवर अडथळे निर्माण झाले असता सृजनासाठी जन्मव्याकूळ कूस

शोधण्यासाठी ती मार्गस्थ झाली आहे.

या कवितेतील परिसर हा भीमवाडीचा आहे. जेथे बोधीवृक्षाच्या पारावरची उदासीनता आहे. माणसांची मने, इच्छा करपून गेल्या आहेत. म्हातारपणाचा उर वैफल्याने फाटून गेला आहे. त्यामुळे मानवमुक्तीच्या आंबेडकरी आंदोलनाचा तळपता इतिहास पुढ्यात ठेवून या कवितेने आंबेडकरी क्रांतीचा जागर घातला आहे. उद्देश एवढाच की, प्राप्त परिस्थितीत या माणसांची मने पेटून उठतील, हातात सूर्यफुलांची स्वप्ने घेऊन डेमोफून आपला मोर्चा वर्तमानाची वाट तुडवत गतिमान होतील तेव्हा भविष्यकाळ त्यांना मानाचा मुजरा करण्यासाठी तत्पर असेल अशी आशा उरोपोटी बाळगली आहे. वर्तमानाची आव्हाने आ वासून उभी आहेत. त्यांना आग लावण्यासाठी संघर्षाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. चोहाबाजूनी वेढलेल्या दु:खाचा आलेख मांडून, माणसाच्या वाट्याला आलेले दु:ख मग ते पृथ्वीतलावर कुठेही असो त्याचेशी एकरूप होणारी भावना कवितेत ओथंबून वाहताना दिसते. 'इतिहासाने वाढून दिलेल्या मरणाची लागली आहे माझ्या दानपात्रात रीघ'. त्यात व्हिएतनामच्या जखमांपासून तिबेटपर्यंतच्या शुभ्र धरतीवरील काशाय रक्त आहे. ऑपरेशन ब्लू स्टारमधील सांडलेल्या रक्तापासून, नक्सलवाडीतून उठलेल्या बंदुकीतून सांडलेली रक्तधार आहे. या सर्व रक्तपाताने सढळ हस्ते रक्तदान दिले आहे. दु:खाच्या महादानातून आयुष्याचा महासागर भरला तरी वेदनांच्या आक्रंदनात खंड पडणार नाही. रक्तपाताचा हा मार्ग मनुष्योत्थानाचा मार्ग होऊ शकत नाही. बुद्धाचे अहिंसातत्त्व कवीमनात दुमदुमत राहते. अख्या दुनियेच्या दु:खाला कवेत घेऊन निराश न होता अथकपणे 'चरत भिक्कवे चरिकं' म्हणत भ्रमण करणारी चरितेची जाणीव कविताभर विखुरलेली आहे.

ग्लोबल गावाच्या अतिक्रमणामुळे उजाड आणि विराण होत गेलेल्या गावाचे विषण्ण करणारे चित्र या कवितेने रेखाटले आहे. उद्ध्वस्त होत गेलेल्या गावात पोराची वाट पाहता पाहताच प्राण सोडणारा बाप आहे. कर्जात बुडत जाणारी पिके, घराच्या तडकलेल्या भिंती, न पेटणारी चूल, न विझणारा भूकेचा जाळ, गरीबांच्या झोपड्या जाळणारा दग्ध उन्हाळा आहे. पुरग्रस्तासारखे गाव भकास झाले आहे. या गावातील चुली मरणपंथाला लागल्या आहेत. गॅसच्या शेगडीने आक्रमण केले. टीव्हीचे आगमन झाले. पोटासाठी चालणारे गावाच्या पातळीवरील किडूकमिडूक व्यवसाय आता संपुष्टात आले आहेत. इंस्टंट फुड आणि शितपेयाच्या बाटलीत गाव पुरता बुडाला आहे. मोबाईलने गावाचा ताबा घेतला आहे. चावडीच्या गप्पा त्यामुळे मौनात गेल्या आहेत. विहाराच्या आवारातील पंचशील झेंडा एकटाच लहरत असतो. निष्ठेचे सत्व वाहून गेले आहे. त्यासोबतच बाबासाहेबांचा फोटोही या गावातून हरविला आहे. असा सुन्न करणारा गावाचा अनुभव पिंपळापुरे यांच्या कवितेने दिला आहे.

भ्रष्ट व्यवस्थेने लोकशाही मूल्यांचे 'रेट लाईट मार्केट' बनविले आहे. या व्यवस्थेत नाझी हिटलरी प्रवृत्ती गतिमान झाली.लोकशाहीच्या बुरख्याआड फॅसिझम क्रुरपणे कार्यरत आहे. त्यामुळे लोकशाही धोक्यात आली आहे. नाझीझमच्या नियोगातून मूलतत्त्ववाद्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद जन्मास आला आहे. वंशवर्णवादाने देश बरबादीच्या उंबरठ्यावर उभा आहे. फॅसिझमचा रंग बदलला तरी कत्तलखोरीचा वर्ण आणि धर्म बदलत नसतो.

ह्या सुजलाम सुफलाम शहराच्या
प्रत्येक पंचवार्षिक पाळीत हरेक राजसत्ता आपल्या
कर्जबंबाळ अर्थनीतीला लावत असते
मेक इन अमेरिका किंवा
वर्ल्ड बँकेची सॅनेटरी नॅपकीन

शहराचे प्रतीक येथे देशाचे सूचन करते. देश मेळघाटासारखा एकीकडे भुकेकंगाल झाला आहे. दुसरीकडे रक्तरंजित दहशतवादाने पेट घेतला आहे. नक्षलवाद जोमाने वाढला आहे. खाकी, खादी आणि सफेद गणवेशवाल्यांनी साम्राज्यवादाला गवसणी घातली आहे. देशाला हल्लेखोराच्या हवाली करून पांगळे सरकार धर्मग्लानीत झिंगत राहिले! सर्वसामान्यांचे, दलित, पीडित, स्त्रियांचे जगणेच असुरक्षित झाले.अशावेळी धर्मांधानी मौन बाळगणेच पसंद केले. देशावर

त्यांनी अंधाराचे जाळे फेकले. जणूकाही हा देश महासत्तेचा बटिक बनला आहे. अतिशय अस्वस्थ करणारा अनुभव 'डेमोफून'ने दिला आहे.

✸ सिद्धार्थ तांबे (२ नोव्हेंबर १९६४- ५ फेब्रुवारी २००९)

सिद्धार्थ तांबे यांच्या **आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून** (२००६) या संग्रहातील कवितेने समकालीन जीवनातील प्रवृत्ती आणि प्रकृतीला भिडण्याचा जोरदार प्रयत्न केला आहे. संग्रहाच्या शीर्षकावरून प्लेटोची आठवण होणे साहजिक आहे. समाजातील नैतिक व राजकीय दोष दूर करण्यासाठी एक आदर्श राज्यपद्धती निर्माण करण्याचे त्याचे ध्येय होते. या ध्येयाची पूर्तता सुयोग्य शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकेल, त्याला अन्य पर्याय नाही अशी प्लेटोची खात्री होती. कारण तत्कालीन प्रचलित शिक्षणपद्धतीतील दोष त्याला दिसत होते. म्हणून त्याला 'आयडीयल स्टेट'साठी नवीन शिक्षणपद्धतीची आवश्यकता वाटत होती. सिद्धार्थ तांब्यांची कविता आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून भाष्य करते. भोंदूगिरीचे प्राबल्य वाढत गेलेल्या या देशात लोकशिक्षणाची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन या कवितेने केले आहे. त्यामुळे जे जे भोंगळ आहे ते सारे निकालात काढण्याची अपरिहार्यता आवर्जून स्पष्ट केली आहे. प्लेटोच्या आयडियल स्टेटमध्ये कवी व काव्य यांना स्थान नाही. सिद्धार्थ तांबे आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून अभिव्यक्त होतो तेव्हा निसंशयपणे सोशीयल स्टेटमध्ये उभा असतो. या सोशीयल स्टेटमधून जेव्हा तो वर्तमान वास्तवात डोकावतो तेव्हा सोशीयल स्टेट धोक्यात आल्याची जाणीव होते. या वास्तवात बेचिराख झालेली जिंदगी, वस्तीचा पिढीजात षंढपणा, धर्माने केलेल्या काळ्या कायद्यामुळे काळ्या बुरख्यात गुदमरणाऱ्या स्त्रिया, लोकांची घरटी वसवताना व्यवस्थेचा बळी ठरणारे सामाजिक कार्यकर्ते, भगवद्भक्तीच्या प्लेझरमध्ये सुखाने घोरणारे स्वदेशी हिंदुराव, धर्माच्या नावावर होणाऱ्या रक्तरंजित दंगलीने प्रदूषित झालेला आसमंत, आपल्या दहशतीने माणसांना गारठवून टाकणारे राजकारणी, अध्यात्मिक वावटळीचे पोरखेळ, भाकड आरत्या, भजनातील धर्मांधता, बाबागिरी, बापूगिरी, भोंदूगिरी या त्रयीसोबतच लेकीबाळीच्या अंगाशी झटं घेणारे धर्मात्मे, नास्तिकांवर भुंकणारी सनातन कुत्री अशा अनेकविध गोष्टींचा प्रत्यय आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून सिद्धार्थ तांब्यांच्या कवितेने दिला आहे. हे सारे बेडरपणे अभिव्यक्त झाले आहे.

पारंपरिक प्रतिमा, प्रतीकांना हास्यास्पद ठरविणे हा विद्रोहाच्या अभिव्यक्तीचा एक मार्ग असतो. हा मार्ग या कवितेने स्वीकारला आहे. भारतीय समाजात ब्राह्मणी धर्माने चिवटपणे शब्दप्रामाण्य टिकवून ठेवले आणि या शब्दप्रामाण्याला पुरक ठरणारी प्रतीके देवदेवतांच्या मालिकेत लटकावून ठेवली. म्हणून काही वैज्ञानिक सत्य कोणत्याही काळात अजरामर व्हायचे थांबत नसते. म्हणूनच आध्यात्माच्या परिप्रेक्ष्यातील धर्माच्या कोंडवाड्यात डांबून ठेवलेल्या पारंपरीक प्रतीकांना सवाल करून तांब्याची कविता त्या प्रतीकांना हास्यास्पद ठरविते. 'सौभाग्यवती कुमारी शारदा ब्रह्मे' या कवितेत कवी म्हणतो

सारे विश्व तुझ्याकडून विद्या शिकले, मग
तुझे गुरूपण गंगेच्या पाण्यातच का हेलपाटतेय?
तुझी सांस्कृतिक टिटवी शेंदरी त्रिशूळाच्या
टोकावरच बसून का हुंगते?
वात्सायनाला पंचाऐंशीवं आसन शिकविणाऱ्या आर्ये
सांगतेस का विकास पश्चिमेचा?
अशोकचक्र चारही दिशा व्यापून कसे राहिले?

या प्रश्नांची उत्तरे मिळणार नसतील तर शारदा ब्रह्मेचे अवमूल्यन अटळच आहे! अशाप्रकारे ही कविता पारंपरीक प्रतिकांना हास्यास्पद ठरवून एक नैतिक अधिष्ठान प्रस्थापित करते.

दहशतवादाच्या सावल्या माणसाला गारद करीत आहेत आणि माध्यमानीही आपली दहशत निर्माण केली आहे. आध्यात्माच्या पांघरुणाखाली कावेबाजीचा खेळ माध्यमाच्या आश्रयाने सुरू आहे. इतर कुठल्याही मार्केटिंगपेक्षा

आध्यात्माचे मार्केटिंग जोरात सुरू आहे. हिंदुत्ववाद्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साधनांचा आधार घेत स्वदेशीचा उदोउदो करणे, इंपोर्टेड माईकमधून स्वदेशीची घोषणा करणे यासारखा दुटप्पीपणा दुसरा कोणताच नाही. माध्यमांचाच आधार घेऊन भोंदू बापूंनी आपले स्थान बळकट केले आहे. माणसे तर भोंदू बापूच्या नादी लागून वश होत चालली आहेत. सामाजिक जीवनातील, माणसाच्या जगण्यातील मूलभूत प्रश्नांपासून अंधाराच्या तळघरात माणसाला नेऊन सोडण्यात ही बापू मंडळी आणि हायटेक भोंदू मंडळी आज यशस्वी ठरत चालली आहेत. ही चिंताजनक परिस्थिती तांब्यांची कविता वाचकांपुढे ठेवते.

कोणत्या दिशेला निघालोय
कळत नाही होकायंत्र बिघडल्यापासून
विचारावा पत्ता मिणमिणत्या उजेडाला
तर भादव्यात उत्तररात्री अवघे गोकुळ दांडीयात दंग
नि धर्मात्मे अंगझटीला आलेले लेकीबाळीच्या

धर्मात्म्याचे चाळे कसे रंगात आले आहेत हे उघड्यावर मांडण्याचे कार्य या कवितेने पार पाडले आहे. दुसरीकडे एक वास्तव असेही आहे, की धर्माचे अवडंबर आणि 'गर्वसे कहो'ची भाषा भौतिक प्रश्न सोडवू शकत नाही. या देशात सांप्रदायिकता हा माणसात वाढत चाललेल्या रानटीपणावर उपाय ठरू शकत नाही. म्हणून 'माणसात वाढणाऱ्या जंगलाचं काय' हा प्रश्न अतिशय अस्वस्थ करून सोडतो. पोटाच्या भूकेचा तिरपागडा अर्थ लावण्यात माध्यमे फार वाकबगार ठरली आहेत. माध्यमांचे होणारे अतिरेकी आक्रमण सत्याला एका क्षणात दूरवर घेऊन जाऊ शकते. अशी ताकद या माध्यमात आहे. मूलतत्त्ववाद्यांनी माध्यमाचे क्षेत्र आपल्या ताब्यात घेतले आहे. माणसं चिरडली जातात, अन्नान्न दशेनी मरतात. दलितांचे बळी घेतले जातात.राजरोसपणे हत्याकांडे घडविली जातात. या वास्तवाकडे मात्र माध्यमाचा कॅमेरा फिरत नाही.

मनाला जानवे आणि बौद्धिक नसबंदी करून
त्यांनी हाती कॅमेरा घेतलाय
दिसतच नाही त्यांना हा जळणारा आकांत
तो धावतो गब्बर क्रिकेटपटूंच्या खुशालचेंडू अभिरुचीवरून
कधीही रनआऊट न होता
धावतो राष्ट्रपतीच्या गाडीमागून
गरीबाचे मूल भुकेने ओरडते / राष्ट्रपतीना वाटते ते जांभई देते
श्रीमंताचे मूल जांभई देते / राष्ट्रपतीना वाटते ते भूकेने ओरडते
साकारतो कॅमेरा हे दारिद्र्याच्या मयसभेचे जादूई चित्रण
नि मिळवतो राष्ट्रपती पदक

अशाप्रकारे माध्यमाचे वास्तव, दुटप्पीपणा आणि मानवी अनैतिकता याचा वेध ही कविता घेते.

सज्जन पेटलेयत क्षात्रतेजाने
म्हणतायत, घुसव बैल पिकात अद्वातद्वा
उपटून टाक हिरवी रोपटं मुळासकट
नि सिद्ध कर आपले राष्ट्रीयत्व

मूलतत्त्ववाद मग तो कोणत्याही धर्माच्या आवरणाखाली जोपासला जात असेल सर्वत्र त्याची जात सारखीच असते.भारतीय संदर्भात हिंदू असो की मुस्लीम, स्त्रीच्या दुय्यमत्वाला, तिय्यमत्वाला एका आखीव चौकटीपलीकडे प्रवेश द्यायला तयार नाहीत. तिने केलाच चौकट ओलांडण्याचा अट्टाहास तर धर्मव्याघ्राची नखे सरसावलेलीच असतात. अशावेळी तिला बंदिस्त कवचात सरपटत राहण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. धर्माने तिच्यावर पांघरलेला बुरखाही काळाच असतो. विणलेल्या कोषात गुदमरून गेलेल्या स्त्रीविश्वाचे मूक हुंदके या कवितेने उजागर केले आहेत. जाग

आलेल्या माणसाचे वैचारिक भानही प्रकट केले आहे. आत्मटिकेला धिटपणे सामोरे जाणे हा तांबे यांच्या कवितेचा स्वभाव आहे. दलित जगाअंतर्गत अंतर्विरोधाचे भेदक दर्शन घडविले आहे. वर्गांतर झालेल्या दलितांची मानसिकता आणि जगण्याच्या वास्तवाचे रूप औपरोधिक अंगाने मुखरीत करण्याचा जोरदार प्रयत्न या कवितेत दिसून येतो. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर राजकीय सौदेबाजी करणाऱ्या राजकीय अपप्रवृत्तीवर आसूड ओढले आहेत. उदा.,

निपजलो आम्ही इतके थोर की आमच्या पिढ्यांना
लागू दिला नाही तुझ्या सम्यक कर्तृत्वाचा वारा
रस्तोरस्ती तुझी भजनं गाणाऱ्यानीच
घरादारातून बांधली तुझ्या सद्धम्माची तिरडी

भारतीय समाजात प्रत्येक जातीचे सार्वभौम साम्राज्य आहे. त्यामुळे प्रत्येक जात दुसऱ्या जातीकडे द्वेषाने पाहते आणि ही सुरुवात जन्मत:च होते. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत मार्क्सचे घोषवाक्य जातिभेदाच्या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी कुचकामी ठरते.

तू इतका रक्तरंजित आकांत मांडायला नको होतास
तुझे दु:ख काहीच नाही कार्ल मार्क्स
मनूच्या देशात जन्मायला हवा होतास
प्रत्येक पावलावर भूकंप होता
फाटक्या मुठीतल्या चार पैशावर
हक्क नाकारत होती मनूची पोरे
तू अर्थवंचिताचा कैवारी
जन्मवंचितांचे दु:ख तुला कसे कळावे!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मार्क्सची मर्यादा भारताच्या संदर्भात कळाली होती. मार्क्सच्या पुढे वर्ग होता आणि धर्म त्याच्यादृष्टीने अफूची गोळी! परंतु या देशात वर्गाचे रूपांतर जातीत झाले. इथल्या धर्माचा विचार मार्क्सपुढे नव्हता. इथे प्रश्न निर्माण झाले ते धर्मामुळे. धर्म आणि ईश्वराच्या नावाखाली माणसाचे शोषण करण्याची आगळीवेगळी तऱ्हा ब्राह्मणी धर्माने हजारो वर्षांपूर्वीच अवगत केली. त्यामुळे या देशात धर्म आणि जात हे घटक वगळून सामाजिक विचार करता येत नाही.

सिद्धार्थ तांबे यांच्या 'आंबेडकर चौक' या कवितेने उच्चांक गाठला आहे. रस्तोरस्ती आणि गल्लीबोळात मूलतत्त्ववादी केंद्रे हातात धर्मांध त्रिशूळ घेऊन माणसाचा घास घेण्यासाठी, माणसाला संभ्रमात टाकून नामानिराळे राहण्यासाठी टपून बसली आहेत. त्यामुळे माणूस गोंधळून गेला आहे. हा गोंधळ वाढवण्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत. आंबेडकर चौकातून बाहेर पडण्यासाठी अनेक गोष्टी आडकाठी ठरल्या आहेत. सिद्धिविनायक मंदिरापासून ते श्रीकृष्ण बियरबारपर्यंत आणि त्याच्याच बाजूला असलेली मशीद आणि राममंदिराचा नव्याने विकसीत होणारा भाग, मोडकळीस आलेल्या शाळा, स्वयंघोषित संताची हायटेक कुटी जी फरार, वांटेड आणि भ्रष्ट राजकीय लोकांचा अड्डा बनली आहे. दत्तमंदिरासमोरील कुत्रे कधीही आध्यात्म भुंकताना दिसतात.गांधी मार्गावरच देशी दारुचे दुकान आहे. या सर्व गोष्टीमुळे गोंधळ उडाला आहे. कवी आपल्या गोंधळलेल्या मित्राला फोनवरून साधलेल्या संवादातून म्हणतो..

हॅलो... गोंधळ उडालाय म्हणतोस
अरे, पावलोपावली दिशा दाखवायला देव असताना
असं होईलच कसं?
हॅलो.. जरा आवाज वाढव,
माणसाने माणसाकडे थेट यावं असा सरळ मार्ग इथे नाही दोस्ता
बरं असं कर, मीच येतो घ्यायला

हलू नकोस आहेस तिथून
तू आंबेडकर चौकातच थांब
तिथून कुठलाही माणूस अगदी स्पष्ट दिसतो

मानवतेची होरपळ करून अमानवी कृत्यांची प्रशिक्षण केंद्रे जोरात विकसित होत आहेत. अशावेळी आपल्यातला माणूस जिवंत ठेवायचा असेल तर एकच मार्ग उपलब्ध आहे, तो म्हणजे आंबेडकरी मानवतावादी मानवमुक्तीचा मार्ग! माणसाला संभ्रमात टाकून त्याचा गोंधळ उडवून टाकणाऱ्या वास्तवात एकच दिपस्तंभ म्हणजे आंबेडकरी विचारांचा मार्ग! असा विचारांचा संस्कार ही कविता करते.

'आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून' या कवितांनी प्रतीकांच्या माध्यमातून सांस्कृतिक ठेव्याची पुनर्स्थापना केली आहे. 'मानवतेच्या नेत्रातला तू एकमेव चिरंतन अश्रू', 'सम्यक कर्तृत्वाचा वारा', 'मौनाच्या उत्तराने बुद्ध सूर्याला भेटला यांसारखी प्रतीके बुद्धतत्त्वांच्या, मूल्यांच्या उद्घोषासाठीच उपयोजित झाली आहेत. ती विचार आणि ज्ञानाची सांगड घालणारी आहेत. पारंपरीक मिथकांना, प्रतिकांना पक्षपाती आणि दुजाभावाच्या निदर्शक प्रतिमा म्हणून साकार करण्यात ही कविता यशस्वी ठरली आहे. धर्माच्या कोंडवाड्यात डांबून ठेवलेल्या पारंपरिक प्रतिकांना निर्भर्त्सित करून, हास्यास्पद ठरवून एक नैतिक अधिष्ठान प्रस्थापित केले आहे. 'सौभाग्यवती कुमारी शारदा ब्रह्मे', 'पोटपूजा लफंग्याची देव अनामत ठेव', 'काय तुझे सोंड्या मिटले का डोळे', पसायदानाचा निर्बीज बैल' अशा अनेक हिंदू व्यवस्थेअंतर्गत असलेल्या प्रतिमा प्रतीकांना निर्भर्त्सित करून विद्रोहाची अभिव्यक्ती करण्याचा एक मार्ग या कवितेने स्वीकारला आहे. बोचरा उपरोध आणि प्रखर आत्मटिकेला सामोरे जाणे हा या कवितेचा स्वभाव आहे. घटना, प्रसंग आणि प्रवृत्तीच्या अनुषंगाने भाष्य करीत दलित जीवनातील अंतर्विरोध, विसंगती, मानसिकता, जगण्याचे वास्तव मुखरीत करताना बेडर अभिव्यक्ती करणे हा एकूणच कवितेचा स्वभाव आहे. या समग्र कवितेतून विद्रोही मानसिकता प्रकट झाली आहे. विद्रोही आशय प्रकट करण्यासाठी ती कार्यरत झाली असून सांस्कृतिक अपप्रवृत्तीच्या विद्ध्वंसाची अपरिहार्यता या मानसिकतेच्या केंद्रस्थानी आहे.

✸ अरुण काळे (२५ एप्रिल १९५२- २० फेब्रुवारी २००८)

रॉक गार्डन आणि **सायरनचे शहर** या संग्रहातून अरुण काळेच्या कवितेचा वेगळा आवाज निनादला होता. २००६मध्ये प्रसिद्ध झालेल्या **नंतर आलेले लोक** या कवितासंग्रहाने फुले आंबेडकरी कवितेसह एकूणच प्रचलित मराठी काव्य प्रांतालाही आवर्जुन दखल घ्यायला भाग पाडले. माणूस भंगारात जाता कामा नये यासाठी कवितेतून पुन्हा पुन्हा उगवत राहणे अरुण काळे यांना अगत्याचे वाटते. नात्याची नव्याने मांडामांड करण्यासाठी लांब पल्ल्याचे विजयी सूत्र मांडण्यासाठी त्यांची कविता गतिमान होताना दिसते. कवी जसा काळाचे अपत्य असतो तसा तो स्वत:चाही काळ असतो. काळाशी त्याला झटापट करावी लागते. यात ज्याला यश येते जे यशस्वी ठरतात, त्यांची कविता काळासारखी, जीवनासारखी होते. अरुण काळेची कविता जीवनसारखी आहे. स्वत:शी, कवितेशी आणि अनुभूतीशी अतिशय प्रामाणिक असणारा हा कवी. म्हणून 'आयुष्याचा फेरविचार करून कविता लिहिण्यात पॉईंट नसतो' अशी त्यांची धारणा आहे.

'नंतर आलेले लोक' ही कविता एक इतिहास मांडून वर्तमानावर बोट ठेवते. हा इतिहास वर्चस्ववादी शोषणाचा आहे. हुकूमशाही मानस असणारा आहे. अतिक्रमण करून स्वत:ची जहांगिरी प्रस्थापित करणारा आहे. दुसऱ्यांचे सर्वस्व बळकावणारा आहे. हा इतिहास टोळीवाल्या आक्रमकांचा आहे. माणसाला नाकारणारा आहे. माणसा माणसात भेद निर्माण करणारा आहे. विद्ध्वंसक, कपटी आणि मतलबी असलेल्या नंतर आलेल्या लोकांनी मूळच्या लोकांना कसे हद्दपार केले याविषयी विस्ताराने बोलणारी ही कविता आहे. बाहेरून आलेल्या आर्यांनी अतिक्रमण करून, मूळच्या रहिवाशांना पराभूत करून दास केले, बहिष्कृत केले आणि आपल्या सत्तेची निट घडी बसवली. त्यानंतर या भूमीवर अनेक राजवटी येऊन गेल्या. पुढे मसाला विकणारे लोक राज्यकर्ते बनले, असा इतिहास आहे. अनेक वर्षे त्यांनी या देशातल्या लोकांना

पारतंत्र्यात ढकलून दिले. त्या काळात कंपनीचे सरकार होते. आज कंपन्यांचे सरकार नसले तरी कंपन्यांनी मात्र विळखा घातला आहे. प्राचीन काळापासून वर्तमानापर्यंतच्या शोषक सत्तेचे रूप 'नंतर आलेले लोक'मधील कवितांनी स्पष्ट केले आहे.

नंतर आलेले लोक खोटे होते
त्यांनी ढोंग आणि असत्याचा झेंडा रोवला
वंशाने भेद केला, रंगाने भेद केला
भेदाला गडद करून वर्ग आणि वर्णभेद केला
फुट पाडून मात करण्याचा कायम कट केला

नंतर येत गेलेले लोक बदलत गेले पण सत्तावर्चस्व आणि शोषण कायमच राहिले. वसाहतवादी, व्यापारी, राज्यकर्ते, भांडवलदार, चंगळवादी अशी त्यांची रूपे बदलत गेली. या साऱ्यांनीच माणूस शोधला नाही. त्यांनी मानवी मूल्यांना शह देऊन विद्ध्वंसकतेचा अतिरेक केला. अशा लोकांचे दिग्दर्शन करीत या कवितेने त्यांच्या कपटीपणाची चर्चा केली आहे. मूळच्या लोकांना हद्दपार करणारी नंतर आलेल्या लोकांची कृती निर्घृण, अमानुष आणि क्रुर स्वरूपाची होती. आजही या नंतर आलेल्या लोकांची संस्कृती नवा साजशृंगार करून मिरवीत आहे. या अर्थाने ही कविता इतिहासाचे दाखले देत वर्तमानाला थेटपणे भिडते असे तिचे स्वरूप आहे. समकालीन संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करून नवसांस्कृतिक व्यवस्थेची पुनर्मांडणी झाली पाहिजे असा या कवितेचा निर्धार आहे. वर्तमानात प्रत्यक्ष मानवी जीवनात उदारता नाही आणि खुलेपणाही नाही. उदारीकरणाचे डंके पिटल्याने उदारीकरण होत नाही. खुलेपणाचे मार्ग बंद करून मुक्त अर्थव्यवस्था कार्यतत्पर राहिली. या व्यवस्थेत आदिवासी, भटके, मूळ रहिवासी या साऱ्यांना प्रवेशबंदीच राहिली.मुक्तव्यवस्थेने विभाजन कायम ठेवले.

हे तृष्णायुद्ध अन् हे धर्मग्रंथ
हे भाऊबंदकी जमिनीचे वाद
हे बांध अन् ह्या सीमा, हा संगणकीय पडदा
अन् हे त्यावर नसलेले भूमिहीन आदिम
ही मॅचफिक्सिंग झाली आहे
युद्ध हरण्याच्या करारावर सही झाली आहे

सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी खुल्या असणाऱ्या या अर्थयुद्धात बळी मात्र सर्वसामान्याचाच जाणार आहे. एकीकडे चंगळवादी संस्कृती व दुसरीकडे अभावग्रस्तांची संस्कृती माणसाचा वापर करून आपले काम झाले की, त्याला फेकून देणारी, माणसाला अगतिक करणारी अशी आजची व्यवस्था कार्यरत आहे. मानवी समूहांना कुंपणापलीकडे आणि गावकुसाबाहेर ठेवणारी, गुलामीची रोपं विकसीत करणारी यंत्रणा कार्यरत असल्याचे हे वास्तव आहे. रणांगणावरील युद्ध या शतकातल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक रणभूमीवर उतरले आहे. या युद्धाला संगणकीय पडद्याने मोठा हातभार लावला आहे. या पडद्याने सर्ववंचितांची दुनियाच पडदयामागे अंधारात ठेवली आहे. जाहिरातीमधील गुळगुळीत आणि झगमगीत जग एकीकडे तर वंचितांची दुनिया दुसरीकडे.यांच्यातील हे विषम युद्ध आहे. तेथे सर्ववंचितांचा पराभव अटळ आहे. हे शतक आणि ग्लोबल गाव पक्षपाती आहे. या कवितेने या शतकाशी आणि ग्लोबल गावाशी दावा मांडला आहे. कारण या गावात सर्वभेद, बुद्धिभेद मौजूद आहेत. जात, धर्म, वरच्या आळ्या, खालच्या आळ्या ही भेदरेषा कायम आहे. स्थानिक पातळीवर जातीय अहंकाराचे विषाणू सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरावर कार्यरत आहेत. त्याचे मूळ नव्या भांडवली व्यवस्थेत आहे.

आता या आयटीच्या युगात
दलिताना डिलिट करण्यासाठी
नवनवीन सॉफ्टवेअर येत आहेत

प्रोग्रॅम खराब करण्यासाठी सोडले जाताहेत विषाणू

शोषक व्यवस्थेच्या घातक हत्याराची प्रतिमा म्हणजे विषाणू. जागतिकीकरणाच्या आक्रमक व्यवस्थेने सोडलेल्या विषाणूची विविध रूपे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जगात पाहावयास मिळतात. आरक्षणाचे तत्त्व मोडीत निघण्याच्या वाटेवर आहे. बेकारी वाढत गेली, रोजगाराचे प्रश्न निर्माण झाले, गिरण्या कारखाने यांच्या जमिनी विक्रीला काढून कामगाराला देशोधडीला लावले जात आहे. पायाभूत सुविधांच्या खाजगीकरणातून राष्ट्र हे तत्त्व मोडीत निघण्याच्या वाटेवर आहे. हे जागतिकीकरणाच्या विषाणूचे प्रताप आहेत. जागतिक भांडवलशाहीचे दोन शिलेदार म्हणून जागतिक संज्ञापन आणि जागतिक प्रसारमाध्यमे यांच्याकडे बघितले पाहिजे. माहिती क्रांतीच्या युगातील शोषकाची, चंगळवाद, चाळवाचाळव आणि नष्टचर्याची प्रतिमा म्हणून 'विषाणू' ही प्रतिमा फुले आंबेडकरी कवितेत केंद्रस्थानी आली आहे. मुक्त अर्थव्यवस्था ही शोषणाचीच हत्यारे घेऊन दाखल झाली आहे. आर्थिक उदारीकरण हा अरुणच्या कवितेतील उपरोधाचा विषय आहे. पूर्वी शूद्रांची जी अवस्था होती तीच अवस्था आजच्या सायबर युगात दलितांची झाली आहे. 'आय. एस. आय. मार्काचे शूद्र घावले सायबरखिंडीत' खिंडीत गाठून मारण्याचा प्रयत्न इतिहासकाळात झाला. वर्तमानात सायबरखिंडीत गाठले जाते.

ग्लोबल गावाचा काळ हा निर्जिवीकरणाचा, माणसाला विकलांग करणारा आहे. जे स्पर्धेत टिकू शकणार नाही ते सारे ग्लोबल गावाच्या दृष्टीने विकलांगच ठरतात.त्यांच्याबद्दल सहानुभूती किंवा प्रेम ग्लोबल गावाच्या हृदयात नाही.अशी ग्लोबल गावाची भेसूर प्रतिमा आहे. अरुणची कविता वर्तमान व्यवस्थेतील अनेक विरूपे आणि विरोधके यांची सांगड घालून वास्तवाविषयी निष्कर्ष मांडते.गतकाळ आणि समकाळ यांच्या संमीश्रणातून एक नवे अनुभवविश्व साकार करते. उपरोध, उपहासातून हे अनुभवविश्व अधिक ठळक होत जाते.मूलतत्त्ववाद, जातिवाद आणि जागतिकीकरण यांची युती घडून आली.त्यामुळे जुन्या संदर्भांना पुष्टी देणारी आधुनिक भर जागतिकीकरणाने घातली.

तिकडे रंगात सुट नाही / ते रेड इंडियन हे आदिम
ते जिप्सी हे भटके / तिकडे तुच्छता इकडे अस्पृश्यता अर्थात : मनात
तिकडे कुंपण इकडे गावकुस अर्थात : अदृश्य
वर वर उदार डंके खुल्या समुद्राचे गेट बंद नेमके

अशाप्रकारे धर्म, वंश, जात, वर्ण या शोषणाच्या व्यवस्था जागतिक आणि भारतीय स्तरावर कायम राहिल्या आहेत. वास्तविक खुल्या व्यवस्थेत हे सर्व भेदाभेद मिटायला हवे होते पण तसे घडले नाही. व्यवस्थेचे नामांतर झाल्यामुळे प्रश्न सुटतात असे होत नाही. सर्व पातळ्यांवर रस्त्यातला माणूस डांबरीकरणासारखा पुन्हा पुन्हा उखडल्या गेला हीच या समग्र कवितेची खंत आहे. प्रेम या मूल्यास व्यापारी जगात काडीचीही किंमत उरली नाही. या युगाने प्रेमाला देवळात डांबून द्वेषाला द्वेषाचीच एक्स्चेंज ऑफर दिली आहे. हवा, पाणी, रस्ते, वाटा या साऱ्यांचे नियंत्रण आता ग्लोबल व्यवस्थेच्या हातात गेले आहे. मानवी जीवनाचे, जीवनाच्या सर्व अंगाचे वैश्विकीकरण झाले नाही. तसे झाले असते तर मग द्वेषाचे राजकारण उरले नसते. या राजकारणात फक्त पैसेवाले, धनिक टिकू शकतात आणि ते मूठभर असतात. म्हणून आर्थिक सत्तेचे हे वैश्विकीकरण आहे. येथे प्रत्येक गोष्ट बाजारू मूल्यानेच तोलली जाते. स्त्रीपुरुषाचे वस्तूकरण होते आणि वस्तूच्या कार्याची क्षमता पाहून तिचे मोल ठरविले जाते किंवा कवडीमोल ठरविले जाते. 'वापरा आणि फेका' हे या जगाचे मूलभूत सूत्र असते. येथे संवेदनशीलतेचेही बाजारीकरण केले जाते.मानवी जीवनात प्रेम हे संस्कृतीच्या केंद्रस्थानी असलेले मूल्य आहे. त्याचे सार्वत्रिकीकरण करणे ही काळाची गरज आहे. म्हणून 'प्रेमाचे होऊ द्या ना बाबा जागतिकीकरण' असा सूर या कवितेने आळविला आहे.

दांभिक इतिहास सांगणाऱ्या, लिहिणाऱ्या पोटार्थी बुद्धिवाद्याची टर या कवितेने उडविली आहे. अनैतिक भूमिका घेणाऱ्यांना फैलावर घेतले आहे. भाटगिरी करणारे बुद्धिवादी लोक सत्तेची तळी उचलत असतात. 'महाकवीची पोझ घेणारे हे भाट', 'एका हातात लेखणी एका हातात ताट' असे भाटगिरीकरणाचे रूप उजागर केले आहे. वर्तमान बाजारयुगाने

स्त्रीची लैंगिक अवहेलना केली आहे. तिला वेगवेगळ्या पद्धतीने बाजारात उभे केले आहे. या युगाने तिची बारबाला ही नवी ओळख करून दिली आहे. आज वेगवेगळ्या पद्धतीने तिला डावावर लावले जाते. 'बीग बाझारसारख्या फिक्स भावाने'! अन्नपाणी विसरून रात्रभर नाचा, त्याशिवाय पोटाची भूक भागणार नाही. हे आजच्या इंद्रधनुषी अंधाराच्या आणि लखलखाटी बाजारातील स्त्री या वस्तूचे वास्तव आहे.

कधी कधी होत नाही बोव्हनीसुद्धा
पैसे फेकले की कुणाशीही होतात पॉजीटिव्ह
भोरभये पनघटवर जाण्याऐवजी
त्या आंबलेल्या आंग घेऊन परतताहेत पहाटे
उदयाचळी मित्रांचा त्यांचा संबंध तुटलाय
प्रसन्न सकाळी त्यांची गडद रात्र होतेय सुरू

कोणत्याही प्रकारचे भावनिक, नैसर्गिक जगणे त्यांच्या वाट्याला येणार नाही याची काळजी या बाजाराने घेतली आहे. अध:स्तरावरचे हे जगणे हादरवून सोडते इतके ते भेदकपणे या कवितेने वाचकांपुढे ठेवले आहे. या बारबाला विविध जातीधर्माच्या आहेत. ख्रिश्चन, शिख, मुस्लीम, हिंदू इ.अप्सरा, राजनर्तकी, देवनवरी, मुरळी, नगरवधू, गणिका ते बारबाला असा हा प्रवास आहे. एवढा सारा भयानक विषय असताना आजवर कोणत्याच कवीला हा विषय आपल्या कवितेचा करता आला नाही.हा प्रश्नही या कवितेने तथाकथीत कवीच्या मस्तकी मारला आहे. आपल्याकडे पश्चिमेकडून आलेल्या छापील स्त्रीवादाची चर्चा जोरात, तावातावाने होते. मात्र प्रत्यक्षात जगण्याचे प्रात्यक्षिक जगासमोर मांडणाऱ्या स्त्रीजीवनाचे, तिच्या जगण्याचे, तिच्या संघर्षाचे तत्त्वज्ञान होत नाही. आपल्याकडे उचलेगिरीचे, छापील तत्त्वाचे, इथल्या वास्तवाला भिडू न शकणाऱ्या कुचकामी तत्त्वांना जोरजबरदस्तीने भिडवण्याचा प्रयत्न केला जातो आणि सहजतेने खरे सत्यत्व नामानिराळे ठेवले जाते. 'लहानीबाय लार्जर दॅन लाईफ' या कवितेतील स्त्रीने धर्माच्या नावाने निर्माण केलेली निर्बंधाची, भोगाची केंद्रे उद्ध्वस्त करून टाकली आहेत. ती खऱ्या अर्थाने आजची स्त्रीसत्ताकाची प्रतिनिधी आहे. कारण ती प्रचलित पुरुषी नियमांना फाट्यावर मारून आपले निर्णय घेते आणि स्वत:च्या जबाबदारीचे भानही राखते. जगण्यातला थेटपणा आणि निर्णयक्षमता ह्या तिच्या जगण्याच्या अतिशय प्रबळ बाजू आहेत.

चार चौघीसारखी उपवर होताच तिचं लग्न झालं
सहा महिन्यातच विधवा झाल्यावर
तिने मंगळसूत्र तोडलं नाही अन्
कुंकू लावणं सोडलं नाही

ही स्त्री पुरुषापेक्षाही जास्त काम करून बिनधास्त उभी राहणारी आहे. तोंडाची वाफ वायफळ दवडण्यापेक्षा कामावर तिचा विश्वास आहे. माता, प्रेयसी, कार्यकर्ता अशा विविध रूपात तिचे चित्र साकार झाले आहे. हे स्त्रीरूप मराठी कवितेत अभूतपूर्व आहे. तिच्या वागण्यात कोणताही कृत्रिमपणा नाही. जिला खऱ्या अर्थाने मुक्त स्त्री म्हणता येईल असे हे स्त्रीरूप आहे. इथल्या स्त्रीवाद्यांनीही पश्चिमेऐवजी भारतीय भूमीवरच आपले पाय ठेवावेत याची जाणीव या कवितेने करून दिली आहे.

अरुण काळेची कविता वाचताना अनेकदा वॉल्ट व्हिटमनच्या कवितेची आठवण होते. असे म्हटले जाते, की लोकशाहीचा शाहीर म्हणून व्हिटमनने मोठ्या उत्साहाने भूमिका बजावली असली तरी त्याच्या सर्वोत्तम कविता जीवनाच्या काळातील आवर्तनासंबंधी आहेत. अरुण काळेच्या कविता संक्रमण काळाचे आणि स्थित्यंतरातील दिवसांची अपत्ये आहेत. संक्रमणाच्या केंद्रावर उभे राहूनच त्याच्या कवितेने भारताचा वेध घेतला आहे. व्हिटमनने आत्म्याला उद्देशून भारताचा वेध घेतला आहे. याउलट अरुण काळेच्या कवितेची अनुभूती आहे. त्याचं घराणं जसं मैदानात गाणाऱ्याचं आहे तशी त्याची अस्मिता मेलेल्या ढोराला सद्गती देत उपाशी पोराला जागवणारी आहे. आध्यात्माशी उभं वैर मांडणारी

आहे. लोकात वावरताना लोक, लोकभाषा आणि लोककलांना मुखरीत करणारी आहे. आत्मा वगैरे गोष्टी त्याच्या दृष्टीने क:पदार्थ आहेत. कारण हा कवी निरीश्वरवादी, अनात्मवादी परंपरेचा पाईक आहे. म्हणून वास्तवाला सामोरे जाऊनच तो भारताचा वेध घेतो.

मजूर सर्वांना मालक म्हणतो / छोट्या मालकाला बाबा म्हणतो
भिकारी शेठला काका म्हणतो / आदिवासी सर्वांना सायब म्हणतो
महारीन पाटलिनीला म्हणतो आत्याबाय
सगळे उपेक्षित देशाला म्हणतात माय

माय म्हणते धुडूऽऽत / देश माती आहे की माणूस!

अरुणची कविता भारतीय निसर्गाच्या फलकावर सांस्कृतिक पर्यावरणात प्रचलित काळ आणि अवकाशाच्या परिप्रेक्ष्यात माणूस आणि मानवता शोधते. इथून तिथून मानव समान असे सूत्र त्याच्या अभिव्यक्तीमागे आहे. व्हिटमनला अपौरुषेय शब्दाने मोहीनी घातलेली दिसते. वेद हे अपौरुषेय आहेत. हे भारतीय सनातन संस्कृतीचे लाडके मत आहे. 'वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा' असा दावा तुकारामाने केला आहे, तर 'वेद हे भेद आहेत' असे स्पष्ट प्रतिपादन म. फुल्यांनी केले आहे. अरुणच्या कवितेची नाळ अवैदिक तत्त्वप्रणालीशी जोडली आहे. फुले आंबेडकर हे अवैदिक तत्त्वप्रणालीचे प्रवक्ते आहेत. म्हणून अरुणची कविता आजच्या युगाच्या भाषेत बोलताना दिसते.

तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा
आणि मल्टिमीडिया कीबोर्ड
हा संगणक, ही मेमरी अन् अपडेट प्रोग्रॅमही तूच दिलेला

आध्यात्मिक वस्त्रे पांघरून माणसाला गुंगविणाऱ्या कावेबाज व्यवस्थेविरुद्ध मूल्यांच्या पातळीवरील घनघोर संघर्ष या कवितेने पुकारला आहे. अपौरुषेय शब्दांना प्रमाण मानणाऱ्या परंपरेचे शवविच्छेदन करीतच हा संघर्ष पुकारला आहे. त्याचप्रमाणे वर्तमान युगाच्या भाषेतूनच राजकीय हास्यास्पदतेचं भेदक आणि पारदर्शी चित्र रेखाटले आहे. उदा.

मातेच्या दुधाला मिळतंय मार्केट
माणसाला मिळतेय एक्सचेंज ऑफर
पुरोगामी दुकानात चालतय कुणाचंही क्रेडीट कार्ड
पुन्हा पुन्हा तेच विषय घेऊन
परीक्षा देतात परिवर्तनाच्या चळवळी
कारभारणीसारखं चुपचाप कुणाच्या मागं चाललं
बौद्धिक नेतृत्व
रातोरात क्रांतीची स्वप्न पाहणारांना
सकाळी व्हाव लागतं हास्यास्पद

वर्तमानाचा हा फलक सतत हलता ठेवण्याचं कार्य या कवितेने पार पाडले आहे. ती तत्त्वज्ञानाच्या सखोल गंभीरपणानं जडावलेली आहे. वर्तमानाचे विश्लेषण करीत सामाजिक, राजकीय आकलनाची स्पष्ट आणि ठामेठोक मांडणी या कवितेने केली असून विषमता आणि दुजाभाव पेरणाऱ्या प्रवृतींना समतेचा अंगिकार करण्याचे आवाहन केले आहे. वैविध्याला सामावत समग्रतेचा वेध या कवितेने घेतला असून प्रार्थनेसारख्या मागण्या करणाऱ्या या कवितेने सामाजिक, मानसिक चिरफाडही केली आहे. प्रतिकात्म अर्थासह सामाजिक वास्तवाचे सूचन, सामाजिक भान प्रकट करताना, भाष्य करतानाच वर्तमानाच्या संदर्भात स्थितीसापेक्ष वास्तवाचे चित्र साकार केले आहे.

ग्लोबलचं गावकुस (२००८) हा अरुण काळे यांचा त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेला शेवटचा कवितासंग्रह होय. ग्लोबल खेडूतांच्या बाजूने बोलण्यासाठी सज्ज झालेली ही कविता आहे. ग्लोबल पातळीवर इथल्या दलितांचे

आणि तिकडच्या काळ्या लोकांचे दु:ख सारखेच आहे. संकटाचे, दु:खाचे प्रभावक्षेत्र सर्वत्र सारखेच आहे. या युगाने सगळीकडेच शोषणाच्या वसाहती उभारल्या आहेत. त्यामुळे शोषित वंचितांचा जागतिक आणि स्थानिक पातळीवरचा वर्ग आणि दुसरीकडे विषमतेच्या साम्राज्याला ग्लोबल गावाचे नाव देणारा शोषकांचा वर्ग असे विभाजन झाले आहे. त्यातून गावकूस ही प्रतिमा दोन्ही वर्गातील दरी आणि विभाजन सूचित करण्यासाठीच या कवितेने योजली आहे. ग्लोबल गावची निती आणि उद्दिष्ट कोणते?

कारकून बनवणारं शिक्षण कुचकामी केलय
चिकाटीनं शिकणारांनाही नामोहरम करून
व्यापार धंद्यास आम्ही उद्युक्त करतोय
आज प्रत्येक गोष्ट व्यापार, धर्म असो देव असो
किंवा तत्सम काहीही, व्यापार म्हणजे व्यापार

असा व्यापार वाढवून स्पर्धा वाढवायच्या, व्यापाराच्या कक्षा रुंद करायच्या, बाजारपेठा काबीज करायच्या, नेटिव्हाना आणि सत्ताधाऱ्यांना मिंधे करायचे आणि आपले साम्राज्य प्रस्थापित करायचे असे या ग्लोबल व्यवस्थेचे मनसुबे आहेत. हे मनसुबे यशस्वीही होताहेत.टाकावू गोष्टींनाही या बाजाराने किंमत मिळवून दिली आहे.

आधी अन्नाला पैसे लागत / पुढे शेणालाही पैसे लागू लागले
एकच बाजार होता बंधुभावाचा / पुढं सारं शहरच मार्केट झाले

ज्ञान, विज्ञान आणि अंधश्रद्धेचा त्रिवेणी संगम झाला. रस्ते प्रशस्त झाले, फ्लायओव्हरही झाले.मात्र माणसांना जोडणारा पूल तेवढा बांधायचा राहून गेला.शहराचे आक्टोपसी हात माणसांना गिळंकृत करण्यासाठीच कार्यरत झाले. मात्र माणसा माणसामध्ये विभाजन कायम ठेवूनच! त्यामुळे माणसांची बेटे निर्माण झाली आणि विषमताग्रस्त शहरात शेजारीही शेजाऱ्यांना ओळखेनासे झाले. एवढी प्रगती या ग्लोबल युगात झाली. सनातन पर्यावरणातील दुषित झालेली मानसिकता कोणत्याही काळात चिवटपणे तग धरून असते. तशी ती आजही आहे. 'इथं कधीच फुटत नाही हुंदका माणूस जळण्याचा.' पूर्वीच्या काळात गावाच्या बंदोबस्तासाठी आणि संरक्षणासाठी गावाभोवती कच्च्या विटांची भिंत बांधण्याची प्रथा प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. अशा भिंतीला गावकूस म्हणत. अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळ होऊ नये म्हणून शिवकाळात व पेशवाईत महार, मांग, ढोर, चांभार या अस्पृश्यांची घरे गावकुसाबाहेरच ठेवण्यात आली होती. बाराव्या, तेराव्या शतकात सुरू झालेल्या संत परंपरेत महारापासून बहुजन जातीपर्यंतचे संत होऊन गेले. परंतु इथल्या धर्मव्यवस्थेने त्यांना त्यांच्या जातीप्रमाणेच वागणूक दिली. चोखामेळ्याला भिंतीखाली चिणून मारण्यात आले. तुकारामाच्या अभंगाच्या वह्या नदीत बुडवण्यात आल्या. हा इतिहासातील भाग ग्लोबलचं गावकूसमुळे वेगळ्या रूपात जिवंत झाला आहे. जागतिकीकरणाच्या काळात दलिताना दडपून मारले जाणार आहे. बहुजनाला पुलावरून फेकण्यात आले आहे. चांभाराच्या व्यवसायाला मार्केटात स्थान उरलं नाही. रंगारंग भाज्यांनाच मॉलमध्ये प्रवेश आहे. अशाप्रकारे ग्लोबल गावातील चालणारे व्यवहार अरुण काळेच्या कवितेत प्रत्ययाला येतात. जगाचे ग्लोबल खेड्यात रूपांतर झाले तरी, माणसांना दूर करण्यात 'ग्लोबल गाव' यशस्वी झाले आणि आपसूकच 'गावकूस निर्माण' झाले. मात्र त्यासाठी गावकुसाची भिंत बांधण्याची गरज नाही. सर्व प्रकारच्या संधीपासून व्यवस्थेने माणसांना दूर ठेवणे यातून जो अंतराय निर्माण झाला त्यालाच गावकूस म्हणता येईल.

आजच्या काळात मोबाईल क्रांतीमुळे संवाद प्रचंड प्रमाणात वाढला. मात्र संवेदनशीलता हरविली.पूर्वीच्या काळाप्रमाणेच जातीय तुच्छतावादी प्रवृत्ती वर्तमान ग्लोबल गावातील सवर्णानी कायम ठेवली.याविषयीचा एक उद्वेग या कवितेत दिसतो. परिभाषा बदलली तरी मनोवृत्ती आणि उच्चनिचतेची भावना कायम राहिली. जातधर्माचा अहंकार आणि आकांक्षेची भूमी द्वेषाची पेरणी करून आपली उत्पादन शक्ती वाढवत राहिली. जातीय आणि हिंसक विपरिताचे वास्तव दलित हत्याकांडात दिसून आले. दलितांच्या कत्तलीमागे सातत्यशीलता असते. स्वातंत्र्य केवळ संकल्पनेपुरतेच उरले आहे. परिवर्तन या शब्दाला काही अर्थ उरला नाही.

स्वातंत्र्यात दलित आदिवासींच झालं कुपोषण
वरून म्हणतात हे जिवंतपणाचं लक्षण
अंगवस्त्र कपड्यांनी हरवलीय मूलभूतता
लक्षात येत नाही कुणाची आहे सत्ता

दुसरीकडे धर्माचे लांगूलचालन करणारांच्या दाबाखाली भितीची जनुकं वाढत जातात. एवढी दहशत धर्म नावाच्या शस्त्राने निर्माण केली आहे. दु:खी लोक दु:खी शब्द एकत्र नांदतात आणि बुद्धिवंत, विचारवंत, प्रज्ञावंताचे या वास्तवापुढे डोके चालत नाही. ही या युगाची पराभूत मानसिकता आहे. माध्यमातून मिरवणे हे राजकारण्याचे जगण्याचे सूत्र ठरले आहे. मुलं बापाच्या आदर्शांची टिंगल करू लागली आहेत. सृजनशील लोकही शिळ्या कढीलाच ऊत आणत आहेत.

भीषण दुष्काळ नाही अतिवृष्टी नाही
राजकीय उलथापालथ नाही
चीन पाकिस्तानशी युद्ध नाही
तरी असहायता आहे सर्वत्र
कधी कधी सरकारही असहाय झाल्यासारखं वाटतं
सृजनशील लोक मागचेच प्रश्न सोडवताहेत
आजच्या प्रश्नासाठी वेळच पुरला नाही म्हणतील ते
अशात कवीचे शब्द असहाय झाले तर संपलंच

जे वास्तव आहे ते किमान कवीनी तरी शब्दातून टिपले पाहिजे. हे कार्य कवीशिवाय दुसरे कोण करणार? असा कवीची जबाबदारी आणि त्याच्यावरील विश्वास या कवितेने प्रकट केला आहे. ज्या गोष्टींना इथल्या संस्कृतीने पवित्र मानले होते ते सारेच विक्रीस काढले.बहुराष्ट्रीय कंपन्यांनी ते खरेदी केले. नैसर्गिक संपत्तीवरही कंपन्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले आणि माणूस दु:खाच्या खाईत ढकलल्या गेला. भंगारातल्यासारखी माणसाची अवस्था झाली. शेकडो हाताची कामे एका यंत्राकडून व्हावीत तशी संगणक युगाची करामत आहे. त्यामुळे कामगारांचे संपत जाणे, माणसांचे संपत जाणे, माणुसकी आणि बंधुभाव, समता या मूल्यांना संपुष्टात आणणे, सृजनशक्तीला मारून टाकून विकृतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात सुरू आहे. माणसांना निकामी ठरवून रोबोट माणसाची एक नवी प्रगत जात आता निर्माण केली जात आहे. त्यामुळे माणसाचा पराभव अटळ आहे.

ग्लोबल गावातील जाहिरातीच्या धंद्यामुळे लैंगिकता एका अभूतपूर्व टोकाला जाऊन पोहचली आहे. स्त्रीच्या शरीराचे एक विचित्र पद्धतीने प्रदर्शन केले जात आहे. स्त्रीच्या स्वातंत्र्यापेक्षा उदात्तीकरणाच्या कावेबाज प्रवृत्तीचे, दाखविल्या जाणाऱ्या भूतदयेचे वस्त्रहरण अरुणच्या कवितेने केले आहे. अंतिमत: या कवितेने माणसाचीच चिंता वाहिली आहे. इथल्या सनातन व्यवस्थेने आत्म्याचे अमरत्व सांगून मोठाच संभ्रम निर्माण करून ठेवला आहे. इथले कवीही अमर होण्याची स्वप्ने पाहतात आणि त्या नादात त्यांना माणसाचेच नेमके भान राहात नाही.

आपल्याकडे बहुतेक कवीबिवीचं अमरतेसाठी
चाललय कामकाज
खरं तर हे दु:ख टिकलंय म्हणून टिकल्यात आपल्या कविता
भाषेत दम असेल तर भाषा जगेलच
आधी माणूस जगला पाहिजे
तर प्रश्न उभा झाला तुम्ही अभिव्यक्त कसे होणार?
भाषेशिवाय अभिव्यक्ती झाली तर ठिक
नाहीतर नवीन भाषा शोधतातच की माणसं

'आधी माणूस जगला पाहिजे' ही मानवतावादी भूमिका कवीने घेतली पाहिजे. भाषेच्या संदर्भात फुकाची चिंता वाहणारांच्या डोळ्यात झणझणीत अंजन या कवितेने घातलेआहे. ज्यांच्याकडे प्रतिभा नाही, वाचन, चिंतन, मनन नाही असेही लोक कवी असल्याचा टेंभा मिरवितात. अशांचा दांभिकपणा उजागर करण्याचे काम ही कविता करते.

हे कवी गॅप सर्टिफिकेट जोडून
सतरा नंबर फॉर्म भरून एक्सटर्नल परीक्षेला बसलेले
हे साहित्यिक हळदीकुंकू
तुम्ही मला बोलवा मी तुम्हाला बोलवतो
यांच्या भरवशावर राहिलो आणि
मनासारखी जगण्याला चांगली चाल लावता आली नाही

अशी दु:खद जाणीव कवीने व्यक्त केली आहे. त्याचबरोबर अरुण काळे यांनी स्वत:ची भूमिका स्पष्ट करताना ठोसपणे सांगीतले आहे, की 'अवैधमार्गाने मी माझा कुठलाही शब्द लोकांपर्यंत पोचवला नाही'. ही या कवीची कवितेविषयीची नैतिकता आहे. स्वत:च्या अनुभूतीशी आणि अभिव्यक्तीशी प्रामाणिक असणारी एवढी नितळ भूमिका असणारा कवी या काळाच्या पटलावर दुसरा कोणी असेल असे वाटत नाही.

समकालीन वास्तवाची समांतर कविता म्हणून अरुण काळेची कविता मौलिक ठरली आहे. जागतिकीकरण दलितांच्या, पीडितांच्या बाजूने नाही तर जागतिकीकरणाच्या कराल रूपातून एक नवी शोषक व्यवस्था अस्तित्वात आली आहे. या व्यवस्थेचे ताणेबाणे, शोषणाच्या तऱ्हा, वर्चस्वाचे रूप विद्रूप जेवढ्या बारकाईने आणि अभ्यासपूर्ण रितीने अरुणच्या कवितेने समजून घेतले आहे, तसे मराठी कवितेतच काय भारतीय कवितेतही पाहावयास मिळणार नाही. मल्टीलुटालुटीच्या युगावरचे भाष्य या कवितेने केले आहे. हे गाव ग्लोबल असेल, ''हे गाव नोबल नाय.'' सायबर युगाने माणसाची कोंडी केली आहे. नवे युग अवतरले म्हणून विषमता कमी झालेली नाही. मॉल्सपासून पानठेल्यापर्यंत आणि स्पेसशटलपासून सायकल रिक्षापर्यंतचे हेलपाटे ही विषमता कायमच आहे. नव्या रूपात आहेरे नाहीरे ही दरी मोठ्या प्रमाणात रुंदावत गेली आहे. एकीकडे सर्व प्रकारच्या बलसत्ता आणि दुसरीकडे सर्ववंचितांची दुबळी दुनिया अशा लढाईत दुबळ्यांचा पराभव अटळच आहे. याविषयीचा लेखाजोखा अरुणच्या कवितेने वाचकांसमोर ठेवला आहे. तोही आजच्या युगाच्या लोकभाषेतून. त्यामुळे ही कविता वैयक्तिक राहात नाही. सर्वांची होते. त्याचे मुख्य कारण असे की, ती समूहजीवनाच्या, समूहमनाच्या अनेकस्तरीय भाषिक रूपांना अतिशय आत्मियतेने कवटाळते. प्रादेशिक, बोली, घरगुती, बोलभाषा, विविध जातीपोटजातीची, अधोविश्वाची, भायगिरीची, टपोरी लोकांची, भिकाऱ्यांची, फकिराची, टिनटप्पर, रद्दीलोखंडवाल्यांची, तुरुंगातील कैद्यांची आयभैनीची आणि बापलेकासह संगणक युग आणि आयटी पार्काची अशा अनेकस्तरीय भाषांचा गलबला आपल्या कवितेत मेळविला आहे. भाषेचे कोणतेही क्षेत्र राखून ठेवले नाही.हा भाषिक खुलेआमपणाच अरुण काळे यांच्या कवितेचे सौंदर्यस्थळ आहे. नियमबद्ध, व्याकरणिक, शिष्टसंमत भाषाव्यवस्थेला फाटा देण्याचा एक जातिवंत मार्ग म्हणूनही या भाषिक स्तराचे अधिक्य कवितेच्या केंद्रस्थानी येते. कवितेतील भाषिक संघटन वाचकांना भारून टाकते. आम जनतेची खास भाषा आपल्या कवितेतून बोलणारा अरुण हा खऱ्या अर्थाने जनतासन्मुख, लोकांचा कवी ठरला आहे.

भारतासारख्या जागतिक झोपडपट्टीतील दलितांबद्दल, त्यांच्या नागवणुकीबद्दल, ससेहोलपटीबद्दल आणि डिलीट केल्या गेलेल्या दलितांबद्दल ही कविता बोलत राहते. भांडत राहते.अरुण काळेची कविता हा एकूणच मराठी कवितेचा महत्त्वाचा टप्पा आहे. भारतीय कवितेतील नवे वळण आहे. नव्या युगाची सर्वस्वी नवी प्रतिमासृष्टी घडविण्यातही ही कविता कमालीची यशस्वी ठरली आहे. विचारानुभवाचा सुघटित आविष्कार या कवितेत प्रकट झाला आहे. सौंदर्यापासून माणुसकीपर्यंत सारी मोडतोडच झाली आहे. ही मोडतोड अरुणसारख्या सर्जनशील कलावंताला अस्वस्थतेच्या खोल खाईत ढकलून देते. हा कलावंत अस्वस्थतेच्या निर्दय आगीत होरपळत गेला. त्यातूनच आशयाभिव्यक्तीच्या नाविन्यासह

विचारानुभवाचे सौष्ठव त्याच्या कवितेला प्राप्त झाले आहे.

या दशकातील काही कवितासंग्रहांचा नामनिर्देश करता येईल. उदा. प्रमोद वाळके **मुहाजिर**, सुनिल भडांगे **अंधारसाम्राज्य**, सुनिल चंद्रकर **आठवणीच्या पाकळ्या,** बबन चहांदे **रानच सारे पेटून उठले**, विनोद कांबळे **चव**, रामदास वाघ **कष्टाची भाकरी**, राजेंद्र सोनावणे **माणूस नावाचं गाव**, कों. जो. नरवाडे **कोंड्याचा मांडा,** नीलकांत ढोले **कळा काळजाच्या**, एस. एस. लोखंडे **अंकित**, काशिनाथ वेलदोडे **वात्सल्य**, वैभव सोनारकर **ब्ल्यू प्रिंट**, अरुण घोडेराव **काफिरनामा**, नारायण मगर **दिशा,** सुनिल कांबळे **टेळका,** दीपध्वज कासोदे **संसद**, सुखदेव पाटील **प्रहार**, शशिकांत हिंगोणेकर **कवितेचे दिवस**, डी. बी. जगत्पुरिया **वज्रमुठ**, भागवत बनसोडे **झुंजार,** रामदास इंगळे **तुम्ही कोणत्या मार्गावर**, धर्मराज निमसरकर **निळ्या पहाटेच्या सूर्याचे अधोरेखित**, भगवान ठाकूर **तहानलेलं तळं**, प्रशांत पंढरीनाथ **कबीराचं देणं**, मोतीराम कटारे **हिरवे ऋतू उतरवून**, **आत्माराम कनिराम राठोड यांच्या कविता**, डब्ल्यू. कपूर **क्रोधांगार** इत्यादी असंख्य कवितासंग्रह या दशकात प्रसिद्ध झाले आहेत.

शांताराम हिवराळे यांचा **अश्रूंचा उन्हाळा** हा संग्रह १९७८मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर जवळपास अठ्ठावीस वर्षांनी **प्रारब्ध** (२००७) हा संग्रह प्रसिद्ध झाला. 'अश्रूंचा उन्हाळा'मध्ये उन्हाळा या प्रतीकांचे विविधांगी उपयोजन केले होते. वैराणपणा, सामाजिक विषमता, अपेक्षाभंग, वैफल्य आणि समकालीन जीवन अशी 'उन्हाळा'ची प्रतीकात्म रूपे या कवितेत प्रत्ययाला येतात. 'प्रारब्ध'मधील प्रतिमासृष्टी समृद्ध आहे. परंतु समकालीन जीवनाचा घेतलेला वेध लक्षणीय स्वरूपाचा आहे. उदा.

आता अलिकडे तर माणसे नुस्तेच
बातम्यांचे मथळे वाचताहेत
पूर्वीसारखे हळहळत नाहीत माणसे
किंवा दु:खीही होत नाहीत माणसे
पण छातीत धडकी भरल्यासारखे
गर्भगळीत झाल्यासारखे नुस्तेच अगतिक होतात माणसे...

अशाप्रकारे दहशतीचा ताण या कवितेने व्यक्त केला आहे. घातपात घडवून आणण्याचे सुरुंग लावण्याचे प्रशिक्षण म्हणजेच माणुसकी, अशी माणुसकी उतू जात असल्याचे उपरोधिक निरीक्षण कवीमनाने नोंदवून ठेवले आहे.

कृष्णा निर्मळे यांचे **पाणुता** (२००३), **येस** (२००५) असे दोन संग्रह प्रसिद्ध झाले. गाव- येस- पाणुता ही या कवितेच्या अनुभवाची केंद्रे आहेत. 'पाणुता' म्हणजे दारिद्र्याच्या तहानलेल्यांची, रुळलेल्यांची निरंतर वहिवाट. 'जातीनुरूप तिथेही वाहतात परंपरेच्या राशी'. नव्या सहस्त्रकातही जातीचे प्रश्न सुटलेच नाहीत. ते अधिकच जटिल बनत गेले. 'टाळाविना तुळशीची माळ असूनही चांभाराचा म्हणून दर्शनाची मारामार' अशी विषमतेची भावना कायमच आहे. अस्पृश्यांचा 'पाणुता' नदीच्या शेवटीच असतो. वर्तमानातही तो कायम आहे. इथल्या आध्यात्मातूनही अन्यायाचाच वास येतो.सर्वसामान्य माणूस अन्याय अत्याचारात होरपळत आहे असे सामाजिक भान या कवितेतून व्यक्त होताना दिसते. सामाजिक विरूपाचे दर्शन या कवितेने घडविले आहे. चंद्रकुमार नलगे यांच्या मते, ''कवीने आपल्या मनातील घालमेल अनेक परीने आपल्या कवितेतून मांडली आहे. अंत:करणातील कल्लोळ व्यक्त होताना त्याला ताल तोल नसेलही पण त्यात विचारांचा प्रांजळपणा आणि भावनांच्या आविष्कारातील तळमळ मात्र जरुर आहे. ''(प्रस्तावना, पाणुता)

वैभव सोनारकर यांच्या **ब्लूप्रिंट**मधून बरेचदा पूर्वसूरींचा स्वर ऐकायला मिळतो. मात्र काही कविता वैशिष्ट्यपूर्ण असून नव्या प्रतिमांचे उपयोजन झाल्याचेही प्रत्ययाला येते.त्यांच्या कवितेने एका नव्या व्यवस्थेचे बुद्धिवादी ब्लूप्रिंट सादर केले आहे. एक 'न्यायवंत नकाशा' सादर केला आहे. या नकाशात देवाच्या नावाने चालणाऱ्या माणूसद्रोही मंदिराऐवजी फक्त माणसांची वसाहत आहे.

कोणत्याच चोरवाटा राहू देणार नाही मी
माझ्या शहरात परमेश्वराच्या प्रवेशासाठी!
या शहराच्या संरक्षणासाठी मी बांधणार आहे
तुम्ही धास्ती घेतलेल्या आंबेडकरी विज्ञानाचे कुंपण
माझ्या शहराचा पहारा करणार आहेत
बुद्धाचे धगधगते विद्रोही डोळे

मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आंबेडकरी मार्ग या कवितेने निवडला आहे. 'अक्षरा अक्षरातून पाझरावेत बंधुत्वाचे झरे' अशा उद्दिष्टातून ही कविता आगेकूच करते.मात्र 'इथली हवा अद्यापही विज्ञानाशी जुळवून घेऊ शकत नाही.' असे उद्दिष्टपूर्तीच्या मार्गात अनेक अडथळे आहेत याचेही भान या कवितेला आहे.

कित्येक वळणे घेऊनही
अखेर जातीपाशी येऊन थांबणारे
इथल्या रस्त्यांचे नेटवर्क
अद्यापही इथल्या आभाळात स्वातंत्र्य गुदमरून जाते

या देशाच्या सांस्कृतिक विश्वात प्रत्येकच काळात 'जात' हा क्रूरतम असा अडथळा मानवी संबंध आणि विकासाच्या बाबतीत ठरला आहे. म्हणून हे जातीपाशी येऊन थांबणारे 'रस्त्याचे नेटवर्क' माणसाचे स्वातंत्र्य गुदमरवून टाकण्यास कारणीभूत ठरले आहे. म्हणून

मी अजून चालतो आहे पावलांना रस्ते बांधून
तुही जरा सोबत ये उजेडगावचे पत्ते घेऊन

असे 'उजेडगावचे पत्ते' सोबतीला घेतल्याशिवाय या अडथळ्यांचा अंधार दूर होऊ शकणार नाही याचेही पुरेसे भान या कवितेने राखले आहे. शेवटी

तुझ्या शब्दांच्या उजेडात चालताना
काळोखी वाट काळोखी वाटत नाही

असा आंबेडकरी विचारांचा आधार आपला प्रवास उजळूनच टाकणार आहे अशा प्रकारचा विश्वास या कवितेने व्यक्त केला आहे.

याच काळातील **दीपध्वज कासोदे** यांच्या **संसद** कवितेने आवाहनाबरोबरच अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. ''भावनिक प्रश्नांभोवती फिरत राहणारी चळवळ, त्यातल्या त्यात आत्मशोधाचा अभाव आणि साहित्याने घेतलेली काहीशी राजकीय तटस्थता'' या अस्वस्थतेतून कासोदे यांची कविता साकार झाली आहे. लोकशाहीतही जातीय भूमी, धर्मांधता कायमच राहिली म्हणून 'धर्मनिरपेक्षतेचा बुरखा फाडून मतपेटीतली धर्मांधता जाळून टाकायला हवी' असे मनोगत या कवितेने व्यक्त केले आहे. लोकप्रतिनिधी रस्त्यावरच्या माणसाच्या प्रश्नावर सभागृहात कधीही बोलत नसतात. लोकप्रतिनिधी लोकशाहीतील आपली कर्तव्येच विसरून गेले आहेत. इथली राजकीय व्यवस्थाच गढूळ झाली आहे. म्हणून या व्यवस्थेविरुद्ध एक संतापाची भावना या कवितेने अधोरेखित केली आहे.

वरील सर्व कवी आणि त्यांच्या कवितेबरोबरच ना. मु. कांबळे **कोंडमारा,** भगवंत तायडे **शिवलेले ओठ** या कवींचाही आवर्जुन उल्लेख केला पाहिजे. **किशोर मेढे** यांचा **अस्तित्वाचे आकाश** हा कवितासंग्रहही दखलपात्र ठरला आहे. किशोर मेढे यांनी गावापासून महानगरापर्यंतचा एक आलेख आपल्या कवितेतून चित्रित केला आहे. गाव सोडून शहराकडे वाटचाल केली म्हणजे गावापासून कायमची नाळ तुटते असे मात्र घडत नसते.

या मातीशी जन्मोजन्मीचे अतूट नाते जुळून आहे
म्हणून लांब राहूनही नाळ तिथेच खिळून आहे

ही माती साक्षीदार आहे अहोरात्र केलेल्या संघर्षाची
ही माती भागीदार आहे अर्धपोटी काढलेल्या रात्रीची

भौगोलिक स्थलांतर केले म्हणून प्रश्न संपतात, दु:ख दूर होते, संघर्ष संपतात असे मात्र घडत नाही. हे स्थलांतरही काही राजीखुशीने झालेले नसते.त्यामागे मजबूर करणारी अनेकानेक कारणे असतात.

फुटपाथवर कोणीही खुशीनं येत नसतं
आलेल्याजवळ स्वत:चं काहीच नसतं
घरपट्टी, वीजपट्टी भरणं ठीक आहे पण
फुटपाथवर येणं मात्र जीवघेणं असतं

माणसं स्वेच्छेनं फुटपाथवर येत नसतात. परिस्थितीच त्यांना फुटपाथवर खेचून आणत असते. मग अस्तित्वासाठीचे माणसांचे संघर्ष फुटपाथवर सुरू होतात. ते संघर्षही जीवघेणे असतात. त्यामुळे गाव काय अन् शहर काय, हातावरच ज्यांची पोटे आहेत त्यांचे जगण्यासाठीचे संघर्ष पिछा सोडत नसतात. आता तर शहरांनाही जागतिकीकरणाने विळखा घातला आहे. त्यामुळे जगण्याचे आणि अस्तित्वाचे प्रश्न अधिकच जटिल झाले आहेत.

रोजगाराच्या शोधात खेडी शहराकडे निघाली
जागतिकीकरणाच्या विळख्यात शहरेच गुदमरू लागली

अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या अनिष्ट परिणामाचे वास्तव या कवितेने अधोरेखित केले आहे. आता शब्द टाकल्यावर कामे होतील असेही दिवस राहिले नाहीत.शब्दाला किंमत उरली नाही.

शब्दांनी कामं व्हायची ते शब्द कधीच मातीमोल झाले
शब्दाच्या जागी पैसे आले
शब्दांचे दिवस आता निव्वळ चर्चेसाठी उरले
पैशानी शब्दांना केव्हाच गिळले...

अशा विदारक सत्याला या कवितेने स्पर्श केला आहे. आता माणूसकेंद्री व्यवहारांना काडीमात्र किंमत उरली नाही. पैसा हेच केंद्रवर्ती मूल्य ठरले आहे. पैशापुढे मानवी आस्था कुचकामी ठरली आहे. अशा वास्तवावरचे भाष्य या कवितेने केले आहे. उग्रदाहक सत्याला मुखरीत करणारी ही कविता आहे. धनिकांच्या जाणिवेत आणि नेणिवेतही वासनांधता ठासून भरलेली असते. हे सत्य सांगण्यासही ही कविता विसरत नाही. धनिकांचे कलाप्रेम कसे बेगडी असते हे ही स्पष्ट केले आहे.

चित्रांचे भव्य प्रदर्शन, प्रत्येक चित्रात
कलावंतांनी जीव ओतलेला
एका चित्रात आदिवासी - अर्धनग्न स्त्री
अगदी हुबेहूब चितारलेली
येणाऱ्या जाणाऱ्या धनिकांच्या डोळ्याचे
खास आकर्षण बनलेली...
चित्र पाहताक्षणी मला आठवला
पाड्यातील मुक्या आदिवासी स्त्रीवर
काही नराधमांचा बलात्कार
धनिकांच्या डोळ्यातही पाशवी हुंकार

अशा विविध अपप्रवृत्तीवर कवीने भाष्य केले आहे. थोडक्यात, अस्तित्व, अस्तित्वाचे प्रश्न, अस्तित्व टिकवण्यासाठीची धडपड, अस्तित्वासाठीचे संघर्ष या कवितेने उजागर केले आहेत. याच काळातील **पंडित कांबळे**

यांचा **संदर्भ** हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला.समकालीन देशस्थितीवर त्यांच्या कवितेने भाष्य केले आहे.

आम्ही पाहतोय आमचा प्रगतीशील देश
भ्रष्टाचारी किड्यांनी पोखरून टाकलाय
पण अजूनही कुठून तरी मधूर आवाज ऐकू येतोय
बलसागर भारत होवो

असे उपरोधिक भाष्य करणारी कांबळे यांची कविता जगण्यातील दु:ख, दैन्य, दास्यासह ठसठसणाऱ्या वेदनेसह मुखरीत झाली आहे. या दशकातील **जगदीश घनघाव** यांचा **षडयंत्र** हा अखंड संग्रह. एक प्रयोग म्हणून महत्त्वाचा आहे. त्यानिमित्ताने घनघाव यांनी म. फुल्यांची अभिव्यक्ती परंपरा पुनरुज्जिवीत केली. गंगाधर मेश्राम यांचा **हायकू जाणीवेचे** हा हायकूंचा संग्रहही एक प्रयोग म्हणून महत्त्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे भीमक्रांतीगीतांचा **शिकवण भीमाची** हा आ**दिनाथ इंगोले** यांचा गीतसंग्रहही मौलीक स्वरूपाचा ठरला आहे. **आनंद गायकवाड** यांचा **हिंदाण** हा प्रायोगिक कवितासंग्रह. यासंग्रहात एका शब्दाची एक ओळ अशी कवितेची रचना केली आहे. पुढे **प्रशांत वंजारे** या कवीनेही **शरसंधान**मधून अशाच स्वरूपाचा प्रयोग केला आहे.

हे दशक संपताना किंवा संपल्यानंतर प्रारंभीच्या काळात काही कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यात विठ्ठल शिंदे यांचे **निब्बाणाची वाट**, **सर्जक** हे दोन कवितासंग्रह आहेत. पद्माकर तामगाडगे **ग्लासनोस्त**, किसन गाडेकर, **थांबणे शक्य नाही**, अशोक शिरसाट **माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी**, बाबुराव गुरव **उद्ध्वस्त अवशेष**, शुक्राचार्य गायकवाड **या निळ्या नभाखाली**, सुनिल अवचार **महासत्तेच्या दारात कटोरा घेऊन उभा राहणार नाही**, **ब्राव्हो! फॉक्स माईन्डस् ऑफ कॅपिटॅलिस्ट्स**, प्रेमानंद गज्वी **एकतारी** इत्यादी.

आता चळवळ पेटली तर बरे होईल असे **किसन गाडेकर** यांना वाटते. तर एकोप्याचा डाव कोणी मोडू नये' असे अशोक शिरसाट आवाहन करतात. पद्माकर तामगाडगे यांच्या कवितेचा स्वर मात्र वेगळा आहे. हे संग्रहाच्या शीर्षकापासूनच प्रत्ययाला येते. वर्तमानयुगात 'क्रांतीचा नायक मेला आहे' असा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे.

सुनील अवचार हा कवी आहे तसाच तो शिल्पकार आणि चित्रकारही आहे. जागतिकीकरणाने प्रभावीत आणि पराभूत झालेल्या नेमक्या जागा त्याच्या कवितेने हेरलेल्या आहेत म्हणून त्या जागावर एकतर मारा करायचा किंवा पराभूत जागांचे विदारक सत्य मांडून वाचकांना दचकवायचे असे एक सूत्र कवितेत दिसून येते. परिघावरचे जगणे, परिघावरच्या जगणाऱ्या माणसाची अगतिकता आणि हतबलता हे सुनीलच्या कवितेचे केंद्र आहे. मात्र मुठभरांची सत्ताकेंद्रे या परिघावरच्या जगण्याला पराभूत करून सोडणारे आहे याचे विदारक सत्य वाचकांच्या नजरेस आणून देणे हे या कवितेचे दुसरे सूत्र आहे.

अरुण काळेंनी म्हणून ठेवले आहे, की 'अक्षर सुधारण्यासाठी कोणी कविता लिहित नसतो.' सुनीलच्या कवितेवरही त्याची स्वतःचीच अक्षरमुद्रा आहे. ती माणसासाठी झिजणारी अशा स्वरूपाची आहे. थोडे वेगळ्या नजरेने न्याहाळल्यास असे प्रत्ययाला येते कि, त्याच्या कवितेत शोषकांच्या केंद्रावर शोषितांचा परीघ विस्तारत गेला आहे. वापरा आणि फेका हा वर्तमानाचा धर्म बनला आहे आणि धर्माने विज्ञानाला, बुद्धीवंताना मोडीत काढले, मानवी तत्त्वांना निकालात काढले, मानवी संवेदनांना मारून टाकले आहे. आणि आभासी जगाला वास्तवात रूपांतरीत करून माणसाचा जमिनीवरचा त्याचा उभा राहण्याचा आधार काढून घेतला आहे. माध्यमातील झगमगीत जग एकीकडे तर दुसरीकडे भुके कंगालांचे जग, सायबर शस्त्रांचे यौद्धे एकीकडे तर दुसरीकडे सर्व वंचितांची दुनिया. आजच्या काळातील माध्यमे म्हणजे आक्रमक सत्तेचे दुसरे प्रबळ रूप आहे. ही माध्यमे दलित, शोषित, पीडित, श्रमिकांच्या बाजूने नाहीत.

मीडियाची हेडलाईन सेक्सला चिअर्स करते
पॉलिटीक्सवर डाऊनलोड होते.
मिडीया डोकावतो व्हाईट हाऊसमध्ये

एसी.चे प्रश्न पेज श्रीमध्ये
श्रमाची धग मात्र हलक्या हाताने
फेकली जाते डिलीट बॉक्समध्ये

अशी माध्यमांची नीती आहे. सुनीलच्या कविता कॉमन मॅनच्या वतीने बोलतात. हा सामान्य माणूस एकेकाळी वर्तमानपत्राच्या पानावर आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगाचित्रातून डोकावत होता. तो आता इंटरनेटने पुसून टाकला आहे. शायनिंग इंडिया किंवा सबका विकासचा एखादा कवडसाही कॉमन मॅनच्या अंधाऱ्या जगापर्यंत पोहोचला नाही, या युगाने नितीमूल्यांच्या फांदीवर निवडुंगाची कलम केली. पूर्वी कंपनीचे सरकार असायचे आता कंपन्या बसल्या जागेवरूनच एका क्लिकच्या अंतरावर स्पेस निर्माण करतात. कॉमन मॅनच्या अस्तित्वाला छेद देऊन त्यांच्या डोक्यावर सरण देऊन त्यांच्या झोळीत मृत्यूचे दान टाकतात. वेदनांचे बीज पेरून महासत्ता मग्रूर आणि मुजोर बनलेली आहे. आणि कॉमन मॅन मॉल्स समोर डोक्यावर सरण घेऊन भीक मागतो आहे. असा कॉमन मॅन सुनीलच्या कवितेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

संसदेतील खाटकाने विचारला आहे निर्णय पब्लिकला
इच्छामरणाचे अर्ज पाहून
भुकेनी मारायचे का आत्महत्या करून?

पब्लिकच्या प्रतिनिधीऐवजी खाटीकच संसदेत बसले आहेत आणि लोकांना मरणाचेच ऑप्शन देणारी एक पर्यायी व्यवस्था त्यांनी निर्माण केली आहे. त्यामुळे मानवी हक्कांचे संरक्षण, न्याय, सहिष्णुता या गोष्टी आता कालबाह्य झाल्या आहेत. त्यामुळे मानवी मूल्ये बेचीराख झाली आहेत. म्हणून येऊ घातलेल्या जगाची ब्ल्यूप्रिंट सुनीलच्या कवितेने वाचकांसमोर ठेवली आहे. ती दचकवणारी आणि अतिशय भयावह अशा स्वरूपाची आहे.

राष्ट्रपुरुषाच्या पुतळ्याजवळ माणसाची कत्तल केलेले ढीग
हातात रिकामे कटोरे, डोळ्यांत शवपेट्या वाहून नेणारे जत्थे
माणसांच्या अश्रूंचा पूर, जखमांची दुर्गंधी
हिंस्त्र पशूंनी ओरबाडलेले नखांचे व्रण.....
हे चित्र पाहुन बुद्ध मूर्च्छित होतो आहे. ...

हे भयावह चित्र पाहिल्यानंतर शिंडलर्स लिस्ट नावाचा चित्रपट आठवतो, हिटलरने गॅसचेंबरमध्ये कोंडून मारलेले माणसाच्या मुडद्यांचे ढीग नजरेसमोर उभे राहतात. उद्याचे जग असेच असणार आहे अशी भेसूर सूचना या कवितेने तुम्हा आम्हाला दिली आहे. असे असले तरी कवीमनाची एक ठाम भूमिका जी खऱ्या खुऱ्या माणसाचीच भूमिका आहे. ज्यातून मानवी स्वाभिमानाचा कणखरपणा दिग्दर्शित झाला आहे. म्हणून त्याची कविता आभासी जगाच्या निर्मात्यांना, माणसांना मारणाऱ्या षडयंत्रवाल्यांना आव्हान देते आणि अनेक गोष्टी ती ठणकावून सांगते,

तुम्हाला अभिप्रेत असलेला मी झालो नाही आणखी
माझ्या स्वाभिमानी मणक्यांना तुम्ही नाही वाकवू शकत
पुरस्कार देऊन
मी तुमच्या भुवयांना आपल्या जीवनप्रवासाची
होकायंत्रे मानत नाही आणि
तुमच्या क्रूर प्रतिमेला सॅल्युटही ठोकत नाही!
मी डस्टबीन नाही तुमच्या करपलेल्या निष्टांचा
कॅरीबॅगसारखे झाले असले जरी माणसामाणसातले संबंध
तरीही माझ्या हातून लिहिली गेलेली कविता
माणसाला सलाम करते, त्यांचे दुःख आपले समजते
मी कोषातून बाहेर पडलो आणि दुःखाने मला पंख दिले

Our world is not for sale!

असा या कवितेचा उद्‌गार आहे. माणसाच्या बाजूने लढणारी ती राजकीय कविता आहे. म्हणूनच दुःखातूनही आम्ही नवसृजन घडवूच असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. या काळाने निर्माण केलेल्या ऱ्हासाच्या, विनाशाच्या वाटेवरून आपणास वाचवायचे असेल तर

महापुरुषाच्या हॅलोजनमध्ये पहा
आजचे समकालीन वास्तव
उद्याच्या भविष्याचे आंदोलन....

अशी दिशादर्शकताही या कवितेत प्रत्ययाला येते. अनेक वैश्विक संदर्भ त्याच्या कवितेत येतात विचाराच्या, कलेच्या, तत्त्वज्ञांच्या संदर्भांतून मानवतेची भूमिका सूचित होते. खऱ्या अर्थाने ग्लोबल वर्तमानाचा, आजच्या काळाचा हा प्रातिनिधिक कवी आहे. अरुण काळे, केतन पिंपळापुरे यांच्या नंतरचा हा महत्त्वाचा कवी आहे असे सुनील अवचार यांच्या बाबतीत निश्चितच म्हणता येते.

मोहन शिरसाट नव्या पिढीतील या कविचाही आवर्जून उल्लेख करावा लागेल. शिरसाट यांच्या कवितेची एक विशिष्ट भूमिका आणि दृष्टिकोन आहे. 'तुम्हाला दिव्याखाली अंधार दिसतो, मला अंधाराच्या छाताडावर दिवा दिसतो' अशा दृष्टिमुळेच त्यांची कविता एकूणच समाजमन न्याहाळण्याचा प्रयत्न करते. ती संगमरवरी वृत्तीचा बिमोड करू पाहते, दांभिकतेला झिडकारते, सोंगाड्यांची फौज तिला पालथी पाडाविशी वाटते.उंटावरच्या शहाण्याला ती धडा शिकवू इच्छिते. कारण हे शहाणे मचाणावर बसून सर्वांची इंद्रिये गहाण ठेवतात, तहान लागल्यावर कुणालाही पाणी पाजत नाहीत, त्यांची कृती अमानुष आहे.

आमच्या पायातल्या वायना काढून घेऊन
तापलेल्या भूमीवरून पाय पोळविलेत
माणसामाणसात अंतर पाडलेत
आमची आमच्यात लावून दिली आणि हा नामानिराळा झाला

असा हा शहाणा कावेबाज आहे. भरचौकात त्याचा पंचनामा करून त्याच्या पाठीवर कायमस्वरूपी 'माणसाच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा' चिकटवणे या कवितेला प्रशस्त वाटते. कारण ती निळाईच्या छताखाली वावरणारी आहे. त्यामुळे तिच्यात उजेडाचे रक्त खवळत असते. म्हणून ती अवतारवादी बुजगावण्याचा खेळ संपविण्यासाठी, त्यांचे डाव उधळून लावण्यासाठी समतावादी वादळाशी सलगी करते. आंबेडकरी प्रकाशपाणी पिऊन ती तयार झाली आहे. म्हणून तिचा विश्वास सत्यावर, बुद्धिमत्तेवर त्याहीपेक्षा माणसावर दृढविश्वास आहे. काळपुरुषाची नस ओळखून कोणती दक्षता घ्यावी लागेल याचे मनसुबे शिरसाट यांच्या कवितेने रचले आहेत. प्रत्येक काळात सत्तेशी जुळवून घेणाऱ्या ब्राह्मणी कावेबाज प्रवृत्तीवर या कवितेने भाष्य केले आहे. जागतिकीकरणाचे आगमन झाले आणि त्या व्यवस्थेशी जुळवून घेण्यासाठी ही प्रवृत्ती कशी पुढे सरसावली याचा नेमका वेध घेतला आहे. गांधीहत्येनंतर ते नगरात आले आणि आता आधुनिकतेचे फासे टाकायला सुरवात केली.

डंकेल प्रस्ताव ऐकताच ग्लोबलायझेशचं वारं कॅच करून
अमेरिकादी देशात तुम्ही रांगा लावल्यात
आणि येथे स्वदेशी मुव्हमेंटच्या चाकात हवा भरली
उरल्यासुरल्यांनी खाजगीकरणाची खुटी मजबूत केली
अन् आरक्षणाच्या मूळांचा ओलावा तोडला...

अशाच प्रकारे सनातन प्रवृत्तीवरही भाष्य केले आहे. कारण ही प्रवृत्ती सर्वत्र मुर्दाड संस्कृतीची दुर्गंधी पसरलेली असताना सर्दी झाल्याचे ढोंग करते.

आमचे पुढे पडणारे पाऊल
तुमच्या मनात सलते अन् तुम्ही
धर्मवादी भावनांना उचकावून ठेवताय
आम्ही जाणतो, तुमचा बारदाणा सज्ज असतो
मंदिराच्या पायाभरणीची वाट पाहात...

असे निरीक्षण या कवितेने नोंदविले आहे. अशा प्रवृत्तीचा समचार घेणे हा या कवितेचा स्वभाव आहे. तत्त्वासाठी लढणे सोपे असते पण लढता लढता तत्त्वाप्रमाणे जगणे कठीण असते याचे पुरते भान मोहन शिरसाट यांच्या कवितेने राखले आहे.

कवयित्रींच्या कविता

प्रज्ञा दया पवार यांचे **उत्कट जीवघेण्या धगीवर** (२००२), **मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा** (२००७) हे दोन्ही कवितासंग्रह स्त्रीवादी आविष्कार म्हणून फुले आंबडकरी कवितेत मोलाची भर घालणारे ठरले आहेत. फुले आंबेडकरी साहित्य हे बांधिलकीचे साहित्य आहे. त्यामुळे मानवमुक्तीच्या परंपरा, तत्त्वपरंपरा आणि आंदोलनं विकसीत करणाऱ्या तात्त्विक अधिष्ठानाच्या परंपरेतच स्त्रीवादाची उभारणी करणे क्रमप्राप्त ठरते.प्रज्ञा पवार ही फुले आंबेडकरी स्त्रीवादाचे, स्त्रीजाणिवेचे राजकीय भान असलेली सजग कवयित्री आहे. 'अंत:स्थ' मध्ये त्यांनी अस्तित्वासह जगण्याचा संवाद अर्थपूर्ण ठरावा यासाठी समंजस आकांत मांडला होता. 'कविता होऊ शकत नाही.जगण्याला पर्याय' अशी मर्यादा स्पष्ट करून कवितेचा आविष्कार या कवयित्रीने केला आहे.

प्रज्ञा पवारांची कविता एक विशिष्ट भूमिका घेऊन प्रकट होते. त्यामुळे आपसूकच तिला एक नैतिकता प्राप्त झाली आहे. बाईपणाच्या उत्कट जीवघेण्या धगीची आच या कवितेला लागली असून, तिने लादलेल्या बाईपणाच्या दु:खाचा पसारा मांडला आहे. यातनेच्या अक्षरांना नवा जन्म देणे हे कवितेचे थोरपण असते.असे थोरपण सोबतीला असले की, बाईपणाचे कवच भेदून प्रज्ञा करुणेच्या अपरंपार गाभ्यापर्यंत पोहचता येते. त्यामुळे जीवघेणी धगही सुसह्य करता येते. काळजाला पोखरणाऱ्या अधिसत्तेबद्दल ही कविता बोलत राहते. बाईपणाची समग्रता, शारीर मनाच्या अंत:स्थरावरची समग्रता टिपण्याचा प्रयत्न ही कविता करते. तावून सुलाखून निघालेल्या शरीराच्या बाईसमोर जगण्याचे विविध पर्याय असू शकतात. बाईच्या बाईपणाला गृहीत धरण्याचे दिवस आता राहिले नाहीत. असा इशाराच या कवितेने समग्र पुरुष जातीला दिला आहे. 'उत्कट जीवघेण्या धगीवर' शाश्वत स्वातंत्र्याची गाज ऐकायला येईल असा विश्वास व्यक्त केला आहे. दु:खाचे सल काळजात जोजवणाऱ्या मनाचे आक्रंदन येथे पाहावयास मिळते. स्त्रीचे रितेपण, सांसारिक कोंडी, विखारी वृत्ती, त्यातून घरात माजलेले काहूर, वाट्याला आलेले पोरकेपण, त्यातून झालेली दु:खाची उत्पत्ती असा क्रम ही कविता मांडते. म्हणजे दु:खनिर्मितीचा कार्यकारणभावच सांगते. बाईपणाच्या दु:खाचा प्रदीर्घ आलेख उत्कट जीवघेण्या धगीने मांडला आहे. एकदा बाईपण वाट्याला आले की, तिच्या बाईपणाच्या धर्माचे पालन सुरू होते. 'रांधा वाढा उष्टी काढा' या सूत्रासोबतच जगण्यासाठी कष्टाच्या जाचाचे गणित सोडवताना 'राबराबराबा मरमरमरा' हे तिच्या जगण्याचे समीकरण ठरून जाते.

अंधाऱ्या निखाऱ्यावर शतकानुशतकं शेकतेय भाकऱ्या
कधीपासून धुतेय न संपणारं धुणं
काढतेय अनादी उष्टं खरकटं
कधीपासून सूर्याच्या तुकड्यावर स्वत:लाच वाळवत ठेवणं

जगण्याच्या या धर्माबरोबरच तिच्यावर लादलेली बाळंतपणं निमूट आणि बिनबोभाटपणे पार पाडायची असतात. गर्भाशयावर लादलेले हे पुरुषी ताण तिला सोसावेच लागतात.पुरुष नावाचा काळसर्प कधी, केव्हा आणि दंश करेल याचा तर काही नेमच नसतो.काळपुरुषाची सावली तिच्यावर शतकानुशतके पडलेली आहे. मात्र स्त्री स्वत:च्या सावलीच्या शोधात निघाली आहे. परंतु तिच्यावरचे लादलेपण तिला पुन्हापुन्हा चौकोनी गुहेकडेच प्रवास करायला पुरुषी सांस्कृतिक भाले टोचून भाग पाडले जाते.एकदा गुहेत प्रवेश केला की, मग मरेपर्यंत अंधाराशी दोन हात करून लढा देत राहायचे यापलिकडे तिच्या जीवनात काही उरलेले नसते. हे बाईपणाचे दु:ख विराट आहे. स्त्रीजगण्याच्या स्तराचा मुलाहिजा या कवितेने ठेवलेला नाही.सर्वव्यापीपणा हा या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. स्थितीशील वास्तवात बदलाचा कोणताही ओरखडा उमटत नसतो.स्त्रीच्या अस्तित्वाचे तीनतेरा वाजवणारी परिस्थिती अंतर्बाह्य सर्वत्रच असते. साकळलेल्या रक्ताचे उद्दाम गुरगुरणाऱ्या आवाजाखाली भयभीत झालेले शरीर, दु:खाच्या मनावर होणारे आघात यामुळे हाडामासाच्या चेहऱ्याची ओळख उरलेली नसते. 'काळ्याभोर पाषाणासारखा कुठे हरवला चेहरा माझा हाडामासाचा' ही अस्तित्व हरवल्याची जाणीव जीवघेणी आहे. बाईपणाच्या दु:खाचे असे भेदक वास्तव 'उत्कट जीवघेण्या धगीवर' अधिकच अस्वस्थ करणारे ठरले आहे. स्त्रीपुरुष नातेसंबंध हा या कवितेचा महत्त्वाचा विषय आहे.

संपवता येत नाही
संपल्यावर फेकूनही देता येत नाही
एखाद्या शॅम्पूच्या बाटलीसारखं किंवा
वापरलेल्या सॅनिटरी नॅपकिनसारखं
संपत चाललेलं नातं

प्रेमाचे रूपांतर येथे सहजीवनात होऊ शकत नाही ही या नात्यातील मोठी समस्या आहे. स्त्रीमन नाते जोपासण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असते आणि पुरुषमन आपल्या कावेबाजीचे पितळ उघडे पडू नये यासाठी नात्यातील सत्य नागड्या स्वरूपात पुढे येऊ देत नाही. अशा सत्याला कवितेने उजागर केले आहे. औपचारिकता म्हणून नात्याकडे पाहता येत नसते.एकमेकाप्रती समर्पणाची भावना असणे ही नात्याची पहिली अट आहे. एकदा नात्याच्या डोहात उडी घेतली की, हे नाते गुणदोषासहित स्वीकारायचे असते. स्त्री-पुरुष हे द्वंद्व अनादीकाळापासून चालत आले आहे. पुरुषाच्या आधाराने निराधार जगणे, त्याच्या तृप्तीची पूर्तता करणे, त्याच्यासाठी राबणे, त्याच्या माथ्यावरचा घर्मबिंदू होणे, त्याच्यावर प्रेमाची उधळण करीत राहणे हे स्त्रीचे विधिलिखीत! पुरुष मात्र तिच्या जमिनीत आरपार घुसलेला. त्याचं छत्र विनाछपराचं तरीही त्याच्यासाठी सर्वस्व अर्पण करायचे! तो अहंकाराने ताठ वाकलेला, कधी विस्तीर्ण अथांग झालेला.तिने मात्र याच्यासाठी तिन्ही त्रिकाळ पाकळत राहायचे. त्याच्याकडून अपेक्षा तर अशी होती की तो काळोखाला पोखरून उजेडाची पखरण करेल. परंतु तो तर जुनाच, कावेबाज!

कुरवाळून भोगणारा पुरुष जुनाच
निमित्तमात्र राहिला नव्हता
अख्ख्या जगण्याच्या तळाशी
गच्च रुतून बसला होता

तिच्या जगण्याचा ताबा त्याने घेतला असे पुरुषी हुकूमशाही रक्ताचे मानस आणि चिवटपणा या कवितेने स्पष्ट केला आहे. केंद्रावर पुरुष म्हटल्यानंतर परिघावर स्त्री हे पूर्वचपार चालत आलेले समीकरण आहे.

केंद्र आणि परिघाच्या सुबक परंपरेत
अर्थहीन होत जातं जिवापाड जपलेलं नातं

सहजीवनाची विलगता हा तिच्या आयुष्यातील अस्तित्वाला निर्थक ठरविणारा एक भयानक दुष्ट आघात असतो. नशीब, प्राक्तन, दैव ही एका नव्या गुलामीच्या शस्त्राची निर्मिती आहे. या गुलामीच्या पिंजऱ्यात बंदिस्त होण्याशिवाय

पर्याय नसतो.केंद्र परिघ ही विषम विभागणी आहे. येथे केंद्र परिघाला वाटेल तसे फिरवू शकते.

जबरी संभोगासारखा पाऊस पडतो
चांदण्याचा हिंस्र दाह भोवतालात फेर धरतो
तेव्हा तू कुठं असतोस? मी कुठं असते? कुठं असतो आपण?

पाऊस, दाह ह्या प्रतिमा येथे एका भीषण मनोविश्वाचे दर्शन घडवितात.त्या प्रतिमा दचकवणाऱ्या आहेत. तृष्णेची कुस तर उपटून फेकता येत नाही.मनाच्या खांद्यावर त्याचे ओझे वाहणे हे जगण्याचे संचित बनून जाते. सांस्कृतिक संदर्भात एक मजबूत विधान या कवितेने केले आहे. या कवितेत स्त्रीला संस्कारीत करणारी संस्कृती मातेच्या आदिबंधात साकार झाली आहे. जन्म देऊन भरणपोषण करण्यापर्यंतचा संस्कृतीच्या मातृत्वाचा प्रवास येथे पाहावयास मिळतो. या संस्कृतीने जन्मत:च गळ्याला नख लावलेले नाही. तर अंगाई ते अंताईपर्यंत तिने सुफळ संपूर्ण संस्कार केले आहेत. मात्र

संस्कृतिमाता मला फॅण्टसीचं विणकाम शिकवते
नातिचरामीचा शेंदूर फासलेला चिवट दोर
अलगद माझ्याभोवती आवळू लागते

असा हा मातेचा आदिबंध द्वेष आणि सुडाचा, क्रौर्यानी भारलेला आहे. विरोधाभासी मातृत्वाचे खलनायकी विदृप रूप या संस्कृतिमातेचे आहे. जिवंतपणीच मरणयातना देणे असे या कृतिशील संस्कृतीचे मोठेपण आहे! बाईपणाच्या संदर्भात तिचा वेगळाच कावा आहे. हे मातृत्व पुढे एवढे जीवघेणे होत जाते की ते निरंकुश सत्तेचे रूप धारण करते.ते अन्यायी आणि वर्चस्ववादी आहे. या आदिबंधाचा अवकाश आणि परिप्रेक्ष्यात रितेपणाचे गर्भ वाढत जाणारे आहेत. सृजनाचे अमानुष जीव जन्मास येणार आहेत. त्यामुळे सजग होऊन या आदिबंधाला नाकारले पाहिजे. म्हणून

होऊ दे मला तुझी सर्वात लाडकी लेक
तुझी सावली नाकारणारी

अशी प्रखर नकाराची जाणीव व्यक्त होते. हा सत्वाचा आत्मशोध आहे. सांस्कृतिक इतिहासात स्त्रीला ओलीस ठेवलेल्या प्रवृत्तीला दिलेला हा नकार आहे. येथे व्यक्त झालेल्या स्त्रीमनाला, स्त्रीला नवसांस्कृतिक जगाच्या उभारणीसाठी सिद्ध व्हायचे आहे. पारंपरीक संस्कृतिच्या छत्रछायेखाली वावरायचे नाही. अशाप्रकारे ही कविता संस्कृतीच्या नकाराची असून तिने विचाराचा सुघटित आविष्कार केला आहे. स्त्रीजातीच्या सामर्थ्याच्या अनोख्या रसायनाचे सौंदर्य वाचकांपुढे ठेवले आहे. तिची भूक पोटाची, किंवा शरीराचीही नव्हे तर माणुसकीसाठी आसूसलेली असिम अपरंपार अशी तिची भूक आहे. निखळ मानवी प्रेमाची तिला आसक्ती आहे. तिला नरमादीच्या पुरातन वेष्टनातून बाहेर पडायचे आहे. म्हणूनच नित्यनूतन दु:खाची व्याकुळता कायम ठेवून सत्याला सत्यच म्हणणारी एक पारदर्शी वृत्तीही अधोरेखित केली आहे. आणि या पारदर्शी वळणावर प्रेमाला प्रेम आणि व्यभिचाराला व्यभिचारच म्हटले पाहिजे. या वळणावर पुरुषानेही पारदर्शी होणे अभिप्रेत आहे. 'संबंधातील असंबद्धता दूर सारूनच त्याने या जगण्याला आकार द्यावा, त्यातून दोघाचेही जगणे अर्थपूर्ण ठरेल असा विश्वास या स्त्रीमनाला वाटतो.नव्या वळणावरचे हे नवे समीकरण मांडणारी जाणीव असून जीर्णपुरातन अवशेषातून बाहेर पडून एक नवी कात टाकलेलं सळसळतं जगणं येथे अभिप्रेत आहे. वर्तमानातील स्त्रीजीवनाची सजगता अतिशय मार्मिकपणे या कवितेने चित्रित केली आहे. चार भिंतीच्या आत अडखळणारी तिची पावलं आता तिथल्या तिथेच अडखळत नाहीत. पूर्वापार चालत आलेल्या मालक गुलाम या संबंधाला स्त्रिया आता नाकारताहेत. स्वत:साठीही जगण्याचे तंत्र त्या आत्मसात करीत आहेत. म्हणून कवयित्रीने मोठा मार्मिक प्रश्न उपस्थित केला आहे, की ''बायकांना अलिकडे काय झालय! विसर पडलाय का त्यांना आपल्या बाईपणाचा?'' आधुनिक काळातील स्त्रीच्या बदलाचे हे आश्वासक चित्र आहे. धर्माने लादलेल्या, निश्चित केलेल्या निर्बंधाना फाट्यावर मारण्याइतपत शहाणपण शिक्षणामुळे आपसूकच प्राप्त झाले आहे. हा स्त्रीच्या चैतन्यशील प्रवासाचा आलेख अतिशय प्रेरणादायी आहे. बाईपणाकडून माणूसपणाकडे होत गेलेला हा प्रवास प्रेरक आहे. तृष्णेच्या विनाशाचा मार्ग बाईला आता सापडला आहे.

स्त्रीला व्यक्ती म्हणून सुस्थापित करण्यासाठीचा संघर्ष या कवितेने छेडला आहे. त्याचे मूळ बुद्ध विचारात आहे. ते कवयित्रीचे कुळ आहे. वाऱ्यावर उडणाऱ्या मोकळ्या पदराला आणि तृष्णेची फुले वेचणाऱ्या हाताला पतझडीची विराण अवस्था प्राप्त झाली आहे. आत्ममैथुनात मग्न होणारे पुरुषी वर्तमान आहे आणि स्त्रीचे पतझडीचे वर्तमान आहे. पुरुषी वर्तमान तर स्थिरावू देणारे नाही. म्हणून निर्णयाचा चेंडू स्त्रियाच्या कोर्टात आहे. याचे भान आणून देण्याचे कार्य ही कविता करते. पुराण मिथकांचाही आधार तिने घेतला आहे. कुंतीच्या मिथकाला या कवितेने एक नवा अर्थ दिला आहे.

माझ्या अवघ्या असण्यातून सतत वाहणारी
दु:खाची लवलवती धार तुझ्यातूनच उगम पावते
हे सर्वस्वी खरं नाही
तू केवळ निमित्त! माझ्यातल्या कुंतीच्या अंशाने
निरंतर कवटाळला लालसर सूर्याचा गोळा

सूर्याच्या तप्ततेला कवटाळण्याची प्रक्रिया कुंतीच्या बाबतीत एकदाच घडली.इथला स्त्रीजन्म कायम वणव्यातच होरपळणारा आहे. आगीतून फुफाट्यात पडणारा आहे. कुंतीचा अंश स्त्रीजन्माच्या रक्तातच भिनलेला आहे. तिच्या जगण्याची जमीन मजबूत आहे. तिच्यात रुजून नव्याने उगवायचे सामर्थ्य तिच्यात आहे. वाढत्या वयासारखा तिचा जिवंतपणा वाढत जाणारा आहे. त्यामुळे धगधगता गोळा तिने कवटाळला आहे. हे तिच्या जिवंतपणाचे लक्षण आहे.

काही व्यक्तिचित्रेही या कवितेत आहेत. घुंगराच्या वेदनेशी सख्खं नातं जोडलेली, आपल्या लख्ख यातनेचा काळोख गुडूप अंधारात विझवणारी, अख्या आयुष्याच्या शोकांतिकेची नायिका ठरलेल्या विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांचे व्यक्तित्व त्यांच्या आयुष्यातील वेदना यातनांच्या चढउतारासह चितारले आहे. 'तू माझा बाप आहेस' या कवितेत कवयित्रीने बापाशी साधलेल्या संवादातून, विचारलेल्या प्रश्नातून बापलेकीपलिकडच्या नात्याचा शोध घेतला आहे. बाप, मित्र, प्रियतम, सखा असे नात्याचे विविध रंग तिला एकाच व्यक्तिमत्वातून प्रत्ययाला आले आहेत.

'समग्राशी डोळा भिडवून' प्रज्ञा पवार यांनी आपल्या कवितेतून समकालीन स्त्रीजगण्याचा परिप्रेक्ष्य कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. कवयित्रीला स्त्रीच्या दु:खाचा कार्यकारणभाव शोधायचा आहे. बुद्धाच्या मुक्ती मार्गावर, बुद्धतत्त्वाच्या आरशातच तिला समग्राचा शोध घ्यायचा आहे. बुद्धाच्या अनित्यवादाचे सत्य तिला कळून चुकले आहे. स्वत:च्या अस्तित्वाशी हातमिळवणी करताना परिपूर्णतेचे सम्यक आकलन साऱ्याच आधुनिक थेरीच्या वतीने तिला मांडायचे आहे.

मलाही व्हायचं आहे प्रकृती / मलाही व्हायचं आहे सुजाता
पटाचारा, उत्पलवर्णा, संघमित्रा / मलाही लिहायची आहे थेरीगाथा :
इसवीसन दोन हजार सहा...

थेरीगाथांमध्ये नव्याने जाग्या झालेल्या किंवा नव्या मार्गाने प्रवाहित झालेल्या स्त्रीशक्तीचा किंवा भावनांचा आढळ होतो.सर्व बाबतीत केवळ पुरुषच शहाणे असतात असे नाही. त्या त्या बाबतीत स्त्रीदेखील विद्वान व विचक्षणा असते. हे महाप्रजापती गौतमीने दाखवून दिले आहे. किंबहुना तिच्यामुळेच बुद्धसंघात स्त्रियांना प्रवेश मिळाला आणि थेरीगाथेच्या माध्यमातून एका नव्या ज्ञानपर्वाला आरंभ झाला. बुद्ध भिक्षुणीनी लौकीकाचे बंध झुगारून आयुष्याचा संघर्ष हिमतीने केला. अस्मितेची ज्योत चेतवून चेतनादायी तत्त्वांचा शोध लावला. त्यासाठी स्वत:शीही भांडण आवश्यक होते. ते साऱ्या थेरींनी आत्मसन्मानाने केले. कवयित्रीलाही आत्मसन्मानाने स्वत:शी भांडण करावयाचे आहे. ''मी जोखते आहे स्वत:लाच अस्तित्वाशी हातमिळवणी करताना'' असे ती म्हणते. थेरींनी हजारो वर्षांपूर्वीच आपल्या ज्ञानसत्तेचा वाटा उचलला, अभिव्यक्तीचा एक नवा इतिहास लिहिल्या गेला. थेरीगाथा हा स्त्री-स्वातंत्र्याचा पहिला उद्‌गार होता. थेरीगाथेत स्त्रिया पूर्वजीवनाबद्दल मोकळेपणाने संवाद साधतात आणि बुद्धाच्या मार्गाने वाटचाल केल्याचे सुखनिधान आनंदाने वर्तवतात.कवयित्रीला समकालीन जीवनातील, नव्या शतकातील थेरीगाथा नव्याने लिहायची आहे. त्यासाठीच तिने समग्राशी डोळा भिडविला आहे. लिंगनिरपेक्ष निर्वाणाच्या शोधात कवयित्रीची दृष्टी स्थिर झालेली आहे. नवा इतिहास

घडवायचा असेल तर आपल्यावर लादलेले दुय्यमत्व ठोकरून लावणे आणि विधिरचिताला पर्याय शोधणे या मूलभूत गोष्टींची पूर्तता करणे अपरिहार्य ठरते.म्हणूनच 'तिने फाडून टाकलं पुरुषी अधिसत्तेनं फडफडणारं शब्दकोषाचं एकेक पान'. पुरुषी अधिसत्तेला नाकारणारी, शब्दप्रामाण्याला नाकारणारी जाणीव येथे प्रकट होते.या जाणीवेच्या मार्गाने जाताना जुना पुरुष झिडकारून लावल्याशिवाय नवे काही घडू शकणार नाही. कारण स्त्रीला समासाबाहेर ठेवणारी, परिघाकडे लोटून देणारी, तिच्या योनीपासून विविध अवयवाचे राजकारण करणारी अशी पुरुषरचित स्त्रीसंहिता ग्लोबल काळापर्यंतही चालूच आहे. त्यामुळे तिच्या वेदनेचे रूप पालटले आहे असे आजही म्हणता येत नाही. तिच्यातले 'प्रियदर्शित' लखलखीतपणे आजही उजेडात येत नाही, येऊ दिले जात नाही. हा एक कालीक पेच या कवितेने मांडला आहे.

स्त्रीची मापं काढण्याच्या मोजपट्ट्या भारतीय समाजव्यवस्थेने ठरवून टाकल्या आहेत. आधुनिक काळात तिच्या विदृपाची रूपं तेवढी बदलत गेली आहेत. पतिता आणि पतिव्रता या गोष्टीही उच्चरवात सांगितल्या जातात.बाईला भाजून काढणारे पर्याय तयारच करून ठेवले आहेत. ते बाईच्या जगण्याचे पर्याय ठरू शकत नाहीत. 'किरकोळ बाई करून करून काय करेल, आगीतून निघून फुफाट्यात पडेल'. आग आणि फुफाटा हे किरकोळ बाईप्रमाणे भाषेला असलेले पर्याय जे पुरुष रचित आहेत. इकडे आड तिकडे विहीर! कुणीकडेही गेले तरी बाईची होरपळ आणि मरण अटळच ठरते. पुरोगामी म्हणवून घेणारे पुरुष तरी कुठे पुरोगामी असतात?अशा पुरुषांना ते हाडामांसाचे आहेत असं गृहित धरणं सुद्धा चुकीचचं ठरेल. ज्या पुरुषाला जीवलग मानले तेही सुरक्षित अंतरावरूनच जिवलगाची भूमिका निभावत असतात.परमपुरुषाकडेही विधिरचिताचा शेंदूर फासलेला चिवट तंतू असतोच.त यामुळे स्त्रीदेहातील जिताजागता अंधार डोळेभरून पाहण्याची त्याची क्षमता नसते'

मराठी साहित्यातून, काव्यातून आईचे केले गेलेले उदात्तीकरण हा ही पुरुषी राजकारणाचाच एक भाग आहे. सतरा तुकड्यात, सतरा रूपात तिचे केल्या गेलेले विभाजन हाही पुरुषी व्यवस्थेचा कावाच आहे. तिला जातीत विभागल्या गेले, धर्मात विभागल्या गेले, धंद्याला लावण्यात आले, वेश्यापण लादल्या गेले वेश्येपासून बाईपर्यंत, तिला गावशिव नसलेली भटकीविमुक्त ठरविण्यात आले पण मुक्त होऊ दिले नाही.तिला भर चौकात नागवे करण्यात आले, सती जायला भाग पाडण्यात आले, धर्मांधांनी तिचे आकांत गर्भातच मारून टाकले, तिच्या कर्तृत्वाला अदृश्य ठेवण्यात आले, कर्तृत्व आणि अस्तित्वाला पुसून टाकण्यात आले. त्यामुळे बाईपासून आईपर्यंतचे आलेख कधीच चितारल्या गेले नाहीत. समग्रपणाला कवेत घेणारे तिचे अस्खलीत अस्तित्व असताना तिच्या अस्तित्वाच्या चिरफळ्या करण्यात आल्या. त्या एका चौकटीत सुशोभित करण्यात आल्या. आता ही चौकट उद्ध्वस्त होणे अटळ आहे असेच या कवितेने सूचित केले आहे. कवयित्रीला स्त्रीसंवेदनशीलतेची सार्वत्रिकता कवितेच्या केंद्रावर आणायची आहे.

कवयित्रीला मोह होतो यशोधरेचा
सिद्धार्थाच्या रित्या कटोऱ्यातील अपरंपार क्षुधा
काठोकाठ शमवणाऱ्या यशोधरेच्या हाताचा
सिद्धार्थाला बुद्धत्व बहाल करणाऱ्या
यशोधरेच्या लसलसत्या विराट तृष्णेचा

बुद्धत्त्वापेक्षा यशोधरेचा पारंपरीक, दैहिक आणि दर्शनिक काळोख मोजण्यात कवयित्रीला अधिक स्वारस्य आहे. 'मी कशाला खिजगणतीत धरू, आत्मसंभोगापलिकडे काहीच पाहू न शकणाऱ्या भाष्यकारांना' अशी फाट्यावर मारण्याची एक नवी रीत या कवितेत पाहावयास मिळते.या कवितेला जसे यशोधरेचा काळोख शोधण्यात स्वारस्य आहे. तसेच रमाईचं जितंजागतं बाईपण अधारेखित करायचे आहे. रमाईचा मूक विद्रोह, अश्रू, ठणका आणि साहेबावरचं तिचं प्रेम, तिच्या खस्ता, श्रम, थापलेल्या गोवऱ्या, सांसारिक वणवण, स्वप्नभंगाचे कोरडेठाक आवंढे हे सारे मांडत असतानाच

मला लिहायचीय,
देवच नसलेले क्रांतीकारी पंढरपूर उभारताना

तू चिरा झालीस इमारतीची त्याची गोष्ट
कधी न संपणारी

अशा इतिहासात दडलेल्या, लपविल्या गेलेल्या, अंधारात राहिलेल्या साऱ्यांना कवितेच्या उजेडात मांडायचे आहे. म्हणूनच पुराणातल्या सावित्रीचं गुळगुळीत मिथक तोडणाऱ्या सावित्रीबाई जोतिराव फुल्यांना ही कविता केवळ नव्या मिथकाच्या रूपात पाहात नाही तर सनातन मायावी आरसा फोडून टाकणाऱ्या कृतिशील जिवंतपणात शोधते तेव्हा कवयित्रीसकट अनेक स्त्रियांना आपल्या पाळामुळांचा शोध घेण्याची प्रेरणा मिळते. एका अर्वाचीन बाईचे सारे विराट विकल भोग भोगलेल्या, दांभिक कर्मविपाकाचे डावपेच उघड करणाऱ्या, जिला भाकरी थापताथापताच अक्षरांचा वास आला आणि उत्पत्ती स्थिती पार बिघडून गेल्याचे जिला भान होते अशा अंतर्बाह्य राजकारणी असलेल्या सावित्रीबाई फुल्यांचे रूप या कवितेने साक्षात केले आहे. त्याचबरोबर समकालीन अपरिहार्यता कोणती याचेही भान प्रकट केले आहे.

मला हवाय माझा समकालीन तोंडवळा
समष्टीच्या ग्लोबल कल्लोळात
अम्लान करुणेच्या अनाहत आवाजाचा

स्वत्वाचा, अस्मितेचा आरपार गहिरा उजेड शोधायला निघालेली ही कविता असून प्रखर सत्याचं आदिघरही तिला शोधायचे आहे. त्यासाठी नव्या मूळाक्षरांना जन्म देऊन नवी बाराखडी निर्माण करण्याचा या कवितेचा मानस आहे. त यामुळे 'ए फॉर आंबेडकर' या नव्या मूळाक्षराचा शोध लागला आहे. ही मूळाक्षरे गिरवताना आपसूकच

कविता होऊ लागते अत्यंत स्वाभाविक
नाकारते नैयायिकांचा पूर्वपक्ष
नाकारतेय पौरुषेय अपौरुषेयाची नापीक दलदल
कविता वाचवू पाहते अपार उरली सुरली करुणा
तुझ्या लोकायत प्रकाशात!

संशय हे न्यायशास्त्राचे मार्गदर्शक तत्त्व असते. यज्ञकांड करणारे पूर्ववैदिक ब्राह्मण पुरोहित जेव्हा जुनाट सनातनी ठरू लागले तेव्हा आपल्या प्रतिगामी हितसंबंधाच्या बचावासाठी त्यांनी एक तत्त्वज्ञान बनवले ते म्हणजे पूर्वमीमांसा. कर्मकांडाचे सर्वांगीण आणि आग्रही तत्त्वज्ञान. वेद हे अपौरुषेय आहेत असे मानले जाते. म्हणूनच या कवितेनेही नापीक दलदलीला नाकारले आहे. या कवितेला आंबेडकरी विचार तत्त्वांच्या प्रकाशातच करुणा जोपासायची आहे. स्वातंत्र्याचा मोकळा श्वास स्वत:सह समष्टीलाही मिळावा अशी अभिलाषा व्यक्त केली आहे. जुलूमशाही व्यवस्थेचं लादलेपण झुगारून देऊन एकजीनसीपणा आणि समतेच्या प्रस्थापनेची आकांक्षा उरीपोटी बाळगली आहे. एकूणात या कवितेकडे पांरपरिक पुरुषी मानसिकता, पारंपरिक नजरेने पाहता येत नाही किंवा तथाकथीत पश्चिमी छापील स्त्रीवादाच्या चष्म्यातूनही पाहता येत नाही. या देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि स्त्री जगण्याच्या स्तरांचे स्त्रीवादी वाचन करूनच आपल्या चष्म्याची भिंग बदलून घ्यावी लागतात!

या दशकात इतरही काही कवयित्रींचे महत्त्वपूर्ण कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. **शापित पैंजण** (सुषमा अंधारे), **प्रकाशाची वाट** (विमल वाघमारे), **इंडिया इज माय कंट्री** (नेहा गोडघाटे), **वर्तुळ** (प्रेरणा व्यवहारे), **यशोधरेची लेक** (आशालता कांबळे), **पाचवी भिंत** (उमा गवई), **मरण मानवतेचे** (सुनंदा गायकवाड), **लेखणीच्या तलवारी** (उषाकिरण आत्राम), **पॉवर हाऊस** (शांता का. पवार), **सूर्याचा सूर्य** (मनिषा कांबळे), **अजून वादळ उठले नाही** (ज्योती लांजेवार), **संध्यारंग** (संध्या रंगारी) इत्यादी सर्व कवयित्रींच्या कवितेने फुले आंबेडकरी कवितेची परंपरा समृद्ध केली आहे.

फुले आंबेडकरी कवितेच्या प्रांतात **हिरा बनसोडे** यांनी 'फिर्याद'मुळे स्वत:चे वेगळे स्थान प्रस्थापित केले आहे. या दशकातील **फिनिक्स** या काव्यसंग्रहाने एक वेगळे भावविश्व प्रकट केले आहे. स्त्रीभावनांचा वेगळा आविष्कार

घडविला आहे. बालिका ते नवयौवना आणि ध्येयगंधा ते स्थितप्रज्ञ राणी असा स्त्रीजीवनाचा एक प्रवास कथन केला आहे. या प्रवासात मग पारंपरीकतेचे वरदान समजून अहोरात्र जळत राहणे, अस्तित्वहीन पुतळी होणे, कंठात हुंदका दाबत एकांतवास भोगणे, फाटलेले हृदय शिवत बसणे, देहातील असह्य कळा पदराखाली झाकणे या प्रक्रिया आपसूकच घडत जातात. आयुष्याच्या रणभूमीवर ज्यांच्यासाठी आपण युद्ध पुकारले ते मात्र परक्यासारखे तटस्थ, दुरस्त, निर्विकार असतात. आपण मात्र शोधत बसतो आपलेच हरवलेले मोरपंख जे कायमचेच हरवलेले असतात.अशी हरवलेपणाची जाणीव प्रकट झाली आहे.

फिनिक्समधील कवितेने आठवणीचाही एक प्रवास कथन केला आहे. जुन्या आठवणीने हळवे होणारे मन येथे प्रत्ययाला येते.खूप दिवसानी मैत्रिणी भेटल्यासारख्या या आठवणी आहेत. अल्लड पोरीसारख्या, विरहिणीसारख्या, चंद्रव्याकुळ, बिलवरी चुड्यासारख्या आणि स्वप्नभूमीवर थरथरणाऱ्या आठवणी! पुढे त्या गंभीर रूप धारण करतात. असे आठवणीचे दिवे या कवीमनाने स्थितप्रज्ञ आठवणीच्या प्रवाहात स्वस्थचित्ताने सोडले आहेत. इथल्या स्त्रीजन्माला सारे उन्हाळेच बहाल करण्यात आले आहेत.

गंध कळीत भरतो न भरतो
तोच पाकळ्या गळून जाव्या
असे ओसाडत जाणे शिशिरासारखे

अनुभवाचे कडवट घोट घेतच वाटचाल करणे अपरिहार्य ठरते. दिशा सांजावल्यावर जखमा उशाशी घेऊन रात्रीच्या आडोशाला कुठवर थांबायचे असा प्रश्न उपस्थित होतो. जीवनालाच ओसाडपण प्राप्त झाले आहे. अंधारात राहायची सवय झाली की प्रकाशाची आवडच नाहीशी होते. पाखरासारखी स्वप्ने कधी उडून जातात हे कळतही नाही.

आपण अशा रस्त्याने जातो
की त्याला शेवटी घरच मिळत नाही
जे दार आपण ठोठावतो तिथे कुणी राहात नाही

ज्याला अश्रूचा वास येतो असे 'दुःखाचे फुल हृदयात दुःख कोंडून हसत असते.' 'दुःखाचे फुल'ही अभिनव प्रतिमा या कवितेने घडविली आहे. 'गुलामीच्या डंखकळा' ही सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा आहे. गुलामीच्या डंखकळानी जीवन उजळून जाते. जातीचे काटे सर्वत्र पेरलेले असल्याने भग्न आशांचा मनोरा उभा राहतो. जातीजमातीच्या भिंतीमुळे मातीचा उर फुटून निघतो. असे जीवन का स्वीकारायचे! असा प्रश्न उपस्थित करून हे कवीमन जीवन जगण्याचा नवा पर्याय स्वीकारते.

जसा लाभला हा जन्म तसा का हो मी सोशीन
माय भीमाईच्या गर्भी जल्म सूर्याचा घेईन

कारण इथे जगण्याचे एक भक्कम आश्वासन मिळते. निळं आभाळ मिठीत आणि मुठीत घेण्यास्तव झेपावणाऱ्या 'फिनिक्स'ची प्रतिमा बाबासाहेब आंबेडकरांसाठीच उपयोजिली आहे. अशा फिनिक्सच्या गर्भी सूर्याचा जन्म घेऊन जीवनाचे सार्थक होईल असा विश्वास कवीमनाने व्यक्त केला आहे.

उद्ध्वस्त बागेतून फिरताना ओले डोळे खिन्न होताच
कसे अलगद ओंजळीत आले हिरवेगार पिंपळपान

पिंपळपानाचेही जबरदस्त आकर्षण आहे. उद्ध्वस्त आणि खिन्नपणाच्या पार्श्वभूमीवर पिंपळपानाचा लाभ होतो आणि आयुष्याला एक नवा अर्थ प्राप्त होतो. पुढच्या पिढीनेही अढळपद प्राप्त केले पाहिजे असे आवाहन केले आहे. कारण अढळपद प्राप्त करण्याइतपत सबळ वारसा या पिढीला लाभला आहे. या पिढीच्या हातात सावित्रीने ज्ञानदिवे दिले आहेत. रमाईने सोसलेल्या कष्टाचा आदर्श दिला आहे आणि यशोधरेने प्रज्ञा करुणेचे तेजस्वी पिंपळपान शिरावर ठेवले आहे. म्हणून कवयित्रीने आवाहन केले आहे.

तुझ्या जास्वंदी ओठावरले कोमल गाणे
दडवून ठेव त्या झाडाच्या बुंध्याशी
येऊ दे तिथे विद्रोहाचे शंखनाद आणि
हातात घे विजेच्या धडधडत्या मशाली

कोवळ्या कळ्यांना उद्ध्वस्त करणाऱ्यांना, पंख कापलेल्या पाखरांचा लिलाव करणाऱ्यांना आणि माणुसकीला जमीनदोस्त करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारे क्षमा न करता त्यांच्या जुलमासकट त्यांना गाडून टाकले पाहिजे अशी अपेक्षा नव्या पिढीकडून या कवितेने केली आहे.

प्रकाशाची वाट (२००१) हा **विमल वाघमारे** यांचा कवितासंग्रह. कवितेच्या गर्भार ओठावर उद्याचा सूर्य असावा अशी आस या कवितेने बाळगली आहे. शब्दाची तलवार कवितेच्या ओळीओळीतून भीमाकडून प्राप्त व्हावी अशी अपेक्षाही कवयित्रीने व्यक्त केली आहे. सरस्वतीला नाकारीत क्रांतीज्योतीला माता मानून तिच्या प्रकाशात जीवनाची वाटचाल करणाऱ्या कवयित्रीने पहिलाच प्रश्न उपस्थित केला आहे. 'ही सरस्वती कोण, जिने प्रसवले भिकार द्रौणं!' एकचालकानुवर्ती मूलतत्त्ववादी सत्तेची पोलखोलही केली आहे.

एकशाही दरबार त्यांचा राजशाही उत्तरे
तुमच्या प्रश्नाला भाकरीच्या का, नेमकी जागा उरे?
भोगू द्या सावकाश त्यांना अष्टांगाचे भोग सारे
तोवर रांगेत तुम्ही तिष्ठायचे भोगा वारे

अशा उपरोधाने ठासून भरलेल्या या कवितेने पुरुषी व्यवस्थेचा स्वभावही स्पष्ट केला आहे. मुलगी म्हणून जन्माला आल्यानंतर पुरुषी व्यवस्थेत तिला कोणकोणत्या भोगांना सामोरे जावे लागते याचा लेखाजोखा मांडला आहे. माणूस, माणसाची माणुसकी हरवत चालल्याची खंत व्यक्त केली आहे. सनातनी प्रवृत्तीचा समाचार घेतला आहे. फुले आंबेडकरांचा उदय झाला नसता तर परकेपणाच्या या भूमीवर राजरोसपणे आमचे अंकुर गर्भातच खुडले गेले असते अशी स्पष्ट नोंद केली आहे. माझ्या हाती तेजाचं किरण आलं अन् पायरीचं ध्यान उंबऱ्यात गेलं हा बदलही टिपला आहे.

ते हुजरे खुर्चीचे गजरे करतात मुजरे अंधाराला
ते केव्हाच हरलेत समाजाचा पीळ नित्तिमतेच्या जुगारात ...

असे स्वकीयांवर टिकास्त्रही सोडले आहे.

यशोधरेची लेक (२००५) या कवितेतून **आशालता कांबळे** यांनी यशोधरेशी संवाद साधत रमाईच्या मनातही तूच होतीस का? असा प्रश्न उपस्थित करून यशोधरा आणि रमाई यांच्या त्यागातून स्वसामर्थ्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय राज्यघटनेचा मागमूस पुसण्यासाठी सज्ज असलेल्या धर्मरक्षकांच्या काळ्या कारनाम्याचा वेध उपरोधिक अंगाने घेतला आहे. सामाजिक विद्रूप पर्यावरणाचे चित्र साकार करणे हे या कवितेचे उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे वाट्याला आलेला अपमान आणि उदासी याचेही आविष्करण केले आहे.

तुझ्या आयुष्यातील काळोखालाच बिलगायला निघालेली मी
मला वाटेतच थांबवतोस तेव्हा माझ्या वाट्याला येतो
पुन्हा एकदा अवसेचा काळोख

असे अपमानित क्षण सोबतीला घेऊन हे स्त्रीमन अंतर्मुख होते तेव्हा 'दुनियेचे रंग माझ्यासारखेच नसतात हे किती उशिरा समजलं' याची जाणीव होते आणि त्यानंतर आज आपण ज्योतिबाच्या सावित्रीसारखे असून दुनिया आपल्यासाठी धगधगत्या ज्वालेसारखी असल्याचे भान कवयित्रीने जागविले आहे.

पाचवी भिंत (२००७) हा **उमा गवई** यांचा कवितासंग्रह.चार भिंतीच्या आत गुदमरलेल्या श्वासांना समर्पित केला आहे. चार भिंतीच्या घराची पाचवी भिंत ही स्त्री पुरुष नातेसंबंधातील दुराव्याची भिंत आहे. या शीर्षकातून ते सूचित

होते. कवयित्रीने मनोगतात म्हटल्याप्रमाणे 'ही कविता स्त्री मनाचं प्रतिनिधित्व करते.स्त्री मनाची होणारी घुसमट तिनं आज वेशीवर टांगली आहे. 'साऱ्या दुनियेला दिसावी' म्हणून बाईचं वास्तव मांडताना ही कविता खालीलप्रमाणे व्यक्त होते.

बाई रानात वनात पुरुषाच्या मनात, भोगाच्या बनात
बाई दु:खाचं अग्निकुंड, वेदनांचं कोठार, जळवांच्या तनात

'वास्तवाच्या वणव्यात जरा होरपळून घे' असे आवाहन आपल्या कवितेला या कवयित्रीने केले आहे. तळापासून मूळापर्यंत एकाकी तप्तपणा अंगभर लपेटून घेणारे, अग्नीफुलांचा रंगसोहळा पाहणारे स्त्रीमनही व्यक्त झाले आहे. आजही सावित्रीच्या देशात मुलासाठी नवस अन् जन्माआधीच मुलीला मारतात. मरणाआधीच चिता रचली जाते.त्यामुळे जगायचे कसे हे कोडे सुटत नाही.त्यामुळे खंतावलेले स्त्रीमन येथे प्रकट होते. माहेराचे घर ओलांडून सासरच्या उंबरठ्यावर पाऊल ठेचाळते तेव्हा सावरणारा आधाराचा हात सापडत नाही आणि मग चार भिंतीच्या आत मूक आकांत, उदासी आणि कोंडलेल्या श्वासामुळे होणारी तडफड, तगमग असे चित्र स्पष्ट केले आहे. पौराणिक, पारंपरीक स्त्रीप्रतिमांचा आधार घेऊन स्त्रीदु:खाचे प्रकटीकरण करण्याचा प्रयत्न दिसून येतो. स्त्रीची पावलोपावली कोंडी करणाऱ्या, त्यातही एकाकी वाटचाल करणाऱ्या स्त्रियांची गोची करणाऱ्या पुरुषी मानसाचे वास्तव उजागर केले आहे. उदा.

नाहीच सोबतीला मी एकटी निघाले
बदफैली जगाने केलेत मज सवाल किती
नारा समतेचा मी ही दिला कंठभर
धाडसाला माझ्या या म्हणाले, बाई चवचाल किती

यासोबतच दुसराही एक अंतर्विरोध स्पष्ट केला आहे तो म्हणजे दिवसा अत्याचाराविरोधी महिला संघटनेच्या गगनभेदी घोषणा देणाऱ्या स्त्रीला रात्री वासनेनं बरबटलेलं लिबलिबीत धूड अनुभवावे लागते.हा विरोधाभास जीवघेणा आहे. 'स्त्रीजीवनाची, तिच्या बंदिवासाची, तिच्या घुसमटीची पण तरीही दु:खामुक्तीचे पंख लावून ही कविता वाचकांच्या मनात घर करते.' असा अभिप्राय ऋषीकेश कांबळे यांनी या कवितेच्या संदर्भात दिला आहे.

समतापर्वातून उदयाला आलेल्या मनिषा आनंदराव कांबळे यांनी 'सूर्याचा सूर्य'या कवितासंग्रहातून आंबेडकरी श्रद्धा प्रकट केली आहे. या कवितेत नवखेपणाचा स्वर ऐकावयास मिळतो. असेच सुनंदा गायकवाड यांच्या **मरण मानवतेचे** या संग्रहातील कवितांबाबतही म्हणता येईल. 'संवेदना सांत्वनाचेच घाव झाले! खैरलांजी मानवतेच्या मरणाचे घाव झाले' असा वेदनादायी उच्चार खैरलांजीच्या संदर्भात केला आहे.

लेखणीच्या तलवारी हा **उषाकिरण आत्राम** यांचा म्होरकी नंतरचा एक सशक्त कवितासंग्रह आहे. कवयित्रीने दोन शब्द माझे मध्ये लिहिले आहे, की 'माझी कविता वेदनेचं विश्व टिपते. दु:ख, दारिद्रय, पीडा, वेदना, अत्याचार, अन्याय, शोषणाचं समाजव्यवस्थेचं खरं रूप शब्दातून मांडते. माझी कविता आदिवासी, दलित स्त्रिया व तळागाळातील लोकांच्या वेदनेतील भाषा जाणते.' असे नमूद केले आहे. या कवितासंग्रहात सामाजिक परिवर्तनाच्या कविता, झाडीबोली कविता आणि विविध विषयांवरील गीतांचा समावेश करण्यात आला आहे.

सूर्यनगरीच्या भीमरायाची मी आहे सूर्यवात!
मी आहे दरीखोरीत फुलणाऱ्या लाल पळसाची आग
मी आहे मूळची अस्सल नाग!
मी आहे अस्सल टिकावू साग
सूर्यनगरीच्या भीमबाबाची मी रम्य पहाट ...!

अशी आपली ओळख कवयित्रीने करून दिली आहे आणि 'सूर्यवाती'ला शोभणारे विद्रोहाचे स्फुल्लींग आपल्या कवितेतून पेरले आहेत. 'श्रमिकांनो कष्टकऱ्यानो दलित आदिवासींनो! एकाच पिळातील धागे व्हा' असे आवाहन केले आहे.

स्त्रीजीवनाच्या संदर्भात एक विशिष्ट भूमिका मांडली आहे. माणसाला जन्माला घालण्याचे सामर्थ्य केवळ स्त्रीमध्येच आहे.

बाईचा जिनगीभर भवरा करून फिरवतो बाप्या
आपल्या तालावर आपल्या अधिकारावर
पन मी म्हन्तो - नऊ महीने मायच्या गर्भातच वाढला ना?
अगासातून पल्ला नाही- न्- धरेतरीनं संभाळला नाही
दुनिया जलमाले घालनारी - बाय कमी कशी?

असा रोकडा सवाल करून सत्याचे दिग्दर्शन करीत पुरुषी व्यवस्थेला स्पष्टपणे जाणीव करून दिली आहे. एवढेच नव्हे तर वर्णव्यवस्थेच्या तत्त्वज्ञानाला आणि वैदिक परंपरेच्या दांभिकपणाला प्रश्नांकित करून विज्ञाननिष्ठेचा रस्ता दाखविला आहे. पुरुष सुक्ताची पोलखोल केली आहे.

आम्ही मायेच्या पोटातच जन्मलो
ते हातापायातून नाकातोंडातून जन्मल्याचा इतिहास सांगतात
तो इतिहास खरा कसा?
मायेच्या पोटातून जन्म घेणं असत्य कसं?

सत्याच्या महाद्वाराला कुलूपबंद करून, अंधाऱ्या गुंफेत बंदिस्त करून, अंधारतळी दडपून टाकणारांची कारस्थाने फार काळ टिकू शकणार नाहीत.आज ना उद्या सत्य इतिहास पुढे येईलच. 'सूर्याएवढे सत्य आम्ही आहोतफअसे घोषित करून इतिहासाच्या पुनर्लेखनाची आणि पुनर्मांडणीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आदिवासीना अंकित करून त्यांना 'वनवासी' ठरवू पाहणाऱ्या मूलतत्त्ववाद्यांना बाहेरचा रस्ता दाखविण्याचे धाडस या कवितेने दाखविले आहे.

आमच्या घरात तुमची पथारी आहे
ती आम्ही केव्हाही फेकू
घरघुशांनी ... आम्हाला वनवासी म्हणू नये!

असा पवित्रा घेतला आहे. 'त्यांचे हुजरे होऊन आपण सलामी देण्यापेक्षा त्यांच्या मुंड्या उडवायला पाहिजेतफ असाही मार्ग दाखविला आहे. 'वसरी म्हणून पसरी करणारे' आमचा काय उद्धार करणार?असा सडेतोड सवाल केला आहे. जे येतात ते आदिवासीबद्दल भूतदया दाखवून आदिवासींची दुःखे आदिवासीनाच सांगत बसतात. तो त्यांचा उरबडवा आकांत असतो. 'बेट्या! तू गा किती च्यालू' असे म्हणून उरबडव्यांची खिल्ली उडवली आहे.

उरबडव्यांनो तुम्हीच आमचे हत्यारे आहात ...
कधी तरी आमच्या तनाच्या झोपडीतूनही
सूर्य निघेलच ...

असा मजबूत आशावाद ठामपणे व्यक्त केला आहे. या कवितेने उपस्थित केलेले अनेकानेक प्रश्न अंतर्मुख करणारे आहेत. उनवादळ वाऱ्याला हासत नाचत तोंड देणारे आदिवासी बिच्चारे कसे? वाघाला मांडीवर घेणारा, सापाला गळ्यात बांधणारा, रानवाटा, गुहादऱ्यात बिनधास्त घुमणारा आदिवासी बिच्चारा कसा? असे प्रश्न भूतदयावाद्यांच्या मुखावर फेकून त्यांना निरुत्तर केले आहे. ज्यांना देशसेवा आणि देशाचे संरक्षण करण्याचे अधिकार दिले तेच लोक सामान्य माणसांचे खिसे कापतात.परकीय शत्रूपेक्षा हे अंतर्गत शत्रू भयानक आहेत.

शरम करा त्यांच्या खाकी वर्दीवर
आणि पान खाऊन थुंका तिरक्या टोपीवर

असा उद्वेग व्यक्त होतो. आदिवासीचे मरण स्वस्त करणारी व्यवस्था कार्यरत असल्यामुळे रानकपारीत चौफेर बंदुकधारी, जीव जाईपर्यंत मुसक्या आवळल्या जातात, मुंडके कापून फेकून दिले जाते. हा जणू या व्यवस्थेचा जन्मजात

अधिकार! म्हणून या देशाला देश तरी का म्हणावे?असा सवाल उपस्थित करून विद्रोही पवित्रा घेतला जातो.

या देशात हिजड्यांची औलाद आहे काय?
की सारे पंगू लुळे बहिरे आंधळे आहेत
ह्या दरवाजासकट हा पायवा मी उखडून फेकणार ...

खरंच आपल्याला जगण्यावागण्याचा अधिकार आहे का? मग खरं बोलणारांची मुंडकी का छाटतात? रोज आदिवासींना कापून रक्ताचा पाऊस पडतो त्या दिवसाला कोणता स्वातंत्र्य दिवस म्हणायचे? नक्षलवाद्यांच्या हातातील शस्त्रे कोणाच्या कारखान्यातील?

एकमेकांची कापडं फाडून नागडे करण्याच्या शर्यतीत
आपण गुंतलोत चिखल फेकण्यात
मग परक्यांनी शिमगा केला म्हणून
बोंबा मारण्यात काय अर्थ?

हे सारेच प्रश्नायन डोके सुन्न करणारे आहे. 'बाताल मावा देस?' हा प्रश्न अधिकच अस्वस्थ करून अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडतो. आत्मटिकाही जोरकसपणे केली आहे. गोंड गवारी आदिवासींना मतांचा गठ्ठा बनवणारे, राजकारणी, त्यांच्या अमिषाला बळी पडून, बुद्धी गहाण टाकून दुसऱ्यांचे जोडे पुसण्यात धन्यता मानणाऱ्या स्वकीयांना ही कविता संघर्ष सन्मुख करते.

स्वाभिमान विकून दुसऱ्याच्या सतरंज्या उचलण्यात
धन्यता मानणारे आम्ही ...
गोंडवनाच्या कंगाल वारसदारानो!
हातातल्या सतरंज्या फेकून लेखनीच्या तरवारीने
वार करणे शिका!

धगधगता अंगार आपल्या समूहात पेरून विद्रोहाच्या मार्गावर आपल्या माणसांना उभे करण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे. 'बकऱ्या होऊन जगण्यात काय अर्थ आहे?वाघाचे बच्चे होऊन डरकाळी फोडा.'' असा आंबेडकरी स्वाभिमानी संदेश दिला आहे.

आंबेडकरी चळवळीत भीमगीतांचे, बुद्धगीतांचे बहुमूल्य असे योगदान लाभले आहे. आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग होता. परंतु ज्यांना बाराखडीचीही ओळख नव्हती अशा स्त्रियांनी जात्यावरच्या ओव्यांमधून आणि लोकगीतांमधून आंबेडकरांच्या कर्तृत्व आणि विचारांचा जागर घातला होता.हा इतिहास आहे. आंबेडकरी लोकगीतांची परंपरा आजही कायम आहे. मात्र साधने बदलली आहेत आणि व्यवसाय आणि व्यवहाराच्या दृष्टिकोनातून आज अशी गीते आळवली जातात.चळवळीचा भाग म्हणून ते घडत नाही. मात्र एखादी स्त्री आपल्या व्यवसायातून निवृत्त झाल्यानंतरही आंबेडकरी गीतांचा ध्यास उरी बाळगून, तशी निर्मिती करून आंबेडकरी गीतांची जोपासना करताना दिसते. त्या कवयित्रीचे नाव **शांता का.पवार.** २०१० मध्ये त्यांचा **पॉवर हाऊस** हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. बालपणी या कवयित्रीने दादासाहेब गायकवाड यांच्या सभा ऐकलेल्या आहेत. आज आम्ही एवढे सुखासमाधानाने जगत आहोत ही सारी बाबासाहेबांचीच कमाई आहे. त्यांच्यामुळेच आम्ही माणसासारखे जगू लागलो, वागू लागलो, बोलू लागलो व लिहू लागलो असे कवयित्रीने मनोगतात नमूद केले आहे. बाबासाहेबांपासून ते प्रबोधनकार ठाकरेपर्यंतच्या विचारवंतांचे साहित्य वाचून, सत्य काय ते समजून घेऊन कवयित्रीला प्रबोधनात्मक कविता लिहिण्याची प्रेरणा प्राप्त झाली आहे. 'पॉवर हाऊस'मधील कविता गेय स्वरूपाच्या असून साध्या सरळ भाषेत त्या लिहिलेल्या आहेत. विविधांगानी आंबेडकरांचे व्यक्तित्व, कर्तृत्व आणि विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. मिलिंद शिंदे यांनी 'भिमा तू उघडीले मानवतेचे द्वारफ हे शांता पवार यांचे गीत गायले आहे. ध्वनिफितीलाही हेच शीर्षक दिले आहे. या संग्रहात शंभरापेक्षा अधिक रचना असून

अर्ध्याअधिक रचना एकट्या बाबासाहेबांविषयी आहेत.

मुक्या जिवांना केले बोलके
वळण लाविले छान, भिमा तू आईहुनी महान

अशी थोरवी सांगितली आहे. आंबेडकरांच्या उदयामुळेच वंचिताना प्रकाश लाभला.त्यांच्यामुळेच माणुसकीच्या सद्धमाचे 'पावर हाऊस' भारतात निर्माण झाले.

बुद्ध भीम ही पावर आपुली
जोडा कनेक्शन घरोघरी
पंचशील अष्टांग मार्गानी
वीज सप्लाय होईल अंतरी

असा आशय व्यक्त करण्यात आला आहे. 'भाजी भाकरीचा भीमम 'हृदयसम्राट जीवनदाता', 'आभाळीचा चांद', 'कैवारी', 'भारताचा शिल्पकार', 'धैर्याचा मेरु', 'दलितांचा जीवनदाता', 'युगंधर', 'दिपस्तंभ', 'युगपुरुष' अशा शेकडो प्रतिमा आणि प्रतिके बाबासाहेबांच्या अनुषंगाने या रचनांमधून उपयोजित झाली आहेत. अनेक उपदेशपर रचनाही येथे पाहावयास मिळतात त्यामागे प्रबोधनाचीच तळमळ आहे असे दिसून येते.उदा.

विश्वात नाही कोठे स्वर्ग आणि नर्क
धरेवरच आहे सारा जगण्यातला अर्क
सृष्टीचं जे सत्य, तेच शिकावं मानवानं

अशा रचनांमधून आंबेडकरी विज्ञाननिष्ठ भूमिकाच सूचित होते.त्याचप्रमाणे बहुजन समाजाचे मानसिक वास्तवही स्पष्ट केले आहे. आजही बहुजनांना स्वत:ची मते नाहीत, त्यांच्या धडावर त्यांचे डोके नाही असेच संसूचन केले आहे. धम्माचा स्वीकार करण्यातच बहुजनांचे हित आहे असा विचार मांडला आहे. देव, धर्म, ग्रंथ, पुराण हे कसे थोतांड आहे हे ही स्पष्ट केले आहे. भारतीय स्त्रीचा इतिहास कथन केला आहे.

नर नारी कुठे कुणी निर्माण केले
मनुस्मृतीने तर स्त्रीलाच बळी दिले
स्त्री ही पादत्राण तिने पायीच राहणे बरे
एवढे सारे उपकार मनुनेच केले

मात्र स्त्रीमुक्तीचा उद्‌गार बुद्ध, फुले आंबेडकरांमुळेच या देशात निनादत गेला असा उच्चार या कवितेने केला आहे. त्यामुळेच बुद्ध, फुले, सावित्रीबाई, रमाई, गाडगे महाराज, शिवाजी महाराज हे सारे महान लोक 'पावर हाऊसफमधील कवितेचे केंद्रवर्ती विषय ठरले आहेत. त्याचबरोबर वामनदादा कर्डक, बाबूराव बागूल, प्रल्हाद शिंदे हे ही या कवितेचे आस्थेचे विषय ठरले आहेत. थोडक्यात, आंबेडकरी कर्तृत्वाला साद घालतानाच चळवळीतील महान योगदान देणाऱ्या महनिय व्यक्तीच्या कार्याचे मोल सांगितले आहे. स्त्रीदु:खाला वाट मोकळी करून देतानाच तिचे सामर्थ्यही स्पष्ट केले आहे. 'चैत्यभूमी आज आमुची बुद्धगया न्यारी' असे या प्रेरणास्थानाचे वर्णन केले आहे. शेवटी

लेखणी या युगपुरुषाची सांगून जाते काही
त्या मार्गावर मानवजात अखंड चालत जाई

असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. एका अर्थाने वामनदादाच्या गीतांचा वारसा चालविण्याचे काम या गीतांनी केले आहे. त्यामुळे संपादक राकेश वानखेडे यांनी संपादकीयात म्हटल्याप्रमाणे शांता का. पवार ह्या 'वामनमार्गी कवयित्री' ठरल्या आहेत.

माया वासनिक –गेडाम यांनी **अंत:क्षोभ** (२००६)मधून अंत:करणातील क्षोभाला वाट मोकळी करून दिली आहे. प्रक्षुब्ध आणि अस्वस्थ मनस्थितीचा प्रत्यय दिला आहे. हा देश म्हणजे जणू भाजलेल्या जखमांचा ढिगारा

आहे. असे वास्तववादी निरीक्षण नोंदविले आहे. या देशातील बेकारी आणि भिकारी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. इथे माणसाची ओळख दाखविली जात नाही.मात्र आंतरराष्ट्रीय भिकाऱ्यांना मग तो पांढऱ्याशुभ्र खादीतला असो वा काळी टोपी अन् खाकी पँटमधला असो त्याला गर्दीतही ओळखले जाते.अशाप्रकारे मूलतत्त्ववादी आणि सत्ताधारी यांची संभावना करून उपरोधाची तीव्र धार कवितेला प्राप्त करून दिली आहे. प्रियकराशी संवाद साधताना, प्रकाश असून तिमिरात जळणाऱ्या प्रियकरास रोकडा सवाल केला आहे.

तू वाघाच्या जातीचा ना!
मग मुर्दाड गवतात का राहतोस?
वाघ कितीही भुकेला असला तरी
तो गवत कधीच खात नाही

म्हणून जखमाना साक्षी ठेवून अत्तदीप होण्याचा तेजोमय ताऱ्याकडे प्रस्थान ठेवण्याचा मार्ग तिने स्वीकारला आहे. प्रियकराने माघार घेतल्यास एकट्यानेच युद्ध छावणीच्या रस्त्याने आगेकुच करणारी प्रेयशी येथे प्रत्ययाला येते. त्याचप्रमाणे आयुष्याला घायाळ करणाऱ्या प्रियकराची अनैनिकता या कवितेने चव्हाट्यावर मांडली आहे. आपल्या प्रियेचा मुक्या आसवांचा हुंकार त्याला बघण्याची गरज वाटत नाही.तिचा निर्णय म्हणजे त्याच्या विचारावरील प्रहारच वाटतो. ज्याच्या एका शब्दाखातर आयुष्याचे निर्णय बदलून टाकले त्याने मात्र जेव्हा जेव्हा अधिकाराने बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हा तेव्हा तिचा मेंदू ठेचायलाही मागेपुढे पाहिले नाही.तरीही ह्या जखमा हसतमुखाने सोसल्या अशा अनेक जखमांचे, चिरंजिवी जखमांचे संदर्भ ताजे केले आहेत. त्याचबरोबर एक जीवघेणी वेदनाही मुखरीत केली आहे.

आता मला कुळाचा दिवा नको
अब्रुचे धिंडवडे काढून,
माझ्या जखमांचे कातडे सोलून
त्याने पान्ह्याला कलंकित केले
म्हणून मी त्याचा खून केला
सांगा पोट विकत घेता का तुम्ही?

अपमानाचा कडेलोट होतो तेव्हा त्याचे एका विदारक कृतीत रूपांतर होत असते.त्याचा प्रत्यय देऊन या कवितेने एक सुन्न करणारा प्रश्न वाचकांसमोर उभा केला आहे. बाबासाहेबांच्या तैलचित्राशी संवाद साधताना विभाजनाचे खंडित वास्तव अधोरेखित केले आहे. माया वासनिक यांच्या कवितेत गर्भ ही प्रतिमा वांरवार उपयोजित झाली आहे.

तिमिरात गर्भ गवसला नाही तरी तिनं साद घातली नाही प्रकाशाला

गर्भ हा जातीचा नसतो गर्भ माणसाचा असतो, कालचे गर्भ संस्कृतीने पछाडलेले, गर्भाच्या जाती वेगळ्या पण माणसाची जात एकच, काल परवाच गर्भार मातीच्या प्रसववेदना सुरू झाल्या, पृथ्वीच्या गर्भात विषकल्पवृक्षाची सपाटून वाढ होत आहे, मनुवादी मेंदूची कच्ची बांडगुळं लोकशाहीच्या गर्भाच्या समीक्षेसाठी अपुरी लक्तरे पांघरून बसलीत. पेशवाईच्या रासलीला काळोख्या गर्भात.अशी या प्रतिमेची वारंवारता कवितेत प्रत्ययाला येते.एकच प्रतिमा आशयानुरूप विविधार्थी स्तर सूचित करते.त्यामुळे या कवितेचा आशय भक्कम होतानाच कवितेला कलात्म परिमाण प्राप्त होतात.

जाब (२००५ ती.आ.) हा **कमल कदम** यांचा कवितासंग्रह. यातील कविता आत्मभान प्राप्त झाल्यामुळे व्यवस्थेलाच जाब विचारतात. कवयित्री स्वत:विषयी प्रश्न उपस्थित करून उत्तरे देण्याचा प्रयत्न करते. व्यवस्थाविरोधी कृतिशीलता प्रत्ययाला येते.

अशी मी, तशी मी, कोण मी, कशी मी?
एक तीर मी, आर मी, पार मी
तलवारीची धार मी

एका अर्थाने स्वचा शोध लागला आहे तो जाहीर करण्याचे धाडस केले आहे. 'दुखावल्या नागिणीची विषारी ही जात मी' अशाप्रकारे व्यक्तिमत्वाला आणि स्त्रीजीवनाला अर्थ प्राप्त झाल्याचे स्पष्ट केले आहे. इथले स्त्रीजीवन असुरक्षित असल्याचे वास्तव कथन केले आहे. कवयित्रीने आपल्या माहेराची माती सुपीक असून तिथे सम्यक विचाराचे पीक जोमाने वाढत असल्याचे सांगून, माहेराचा सार्थ अभिमान बाळगला आहे. आईच्या उपकाराची परतफेड कशी करावी हा प्रश्न कवयित्रीसमोर उभा आहे. सामाजिक जीवनातील विषमतेला या कवितेने हात घातला आहे.

ओघळून घामाचे पाणी विहिरीचा चिरा - चिरा
घडविला ज्यांनी त्यानाच पारखे झाले पाणी

असा सामाजिक अंतर्विरोध स्पष्ट केला आहे. समाजव्यवस्था, कालबाह्य परंपरा आणि वर्तमानाला जाब विचारण्याचे धाडस केले आहे.

जाब विचारावाच म्हणतोत अंधाराला ठेचाळताना
ओघळलेल्या एकेका रक्ताच्या थेंबाचा!
प्रकाशाचे दार तुम्ही बंद का केलेत?
कोंबडा झाकलात म्हणून सूर्य उगवायचा राहिला तर नाही ना?

स्त्रियांना अज्ञानअंध:कारात ढकलून देणारी, तिची पावले रक्तबंबाळ करणारी अशी व्यवस्था आहे. जातीचे बंध अद्यापही सैल झालेले नाहीत आणि कोणतीही सुरक्षितता नसलेला असा काळ आहे. अशावेळी लेखक, साहित्यिक तरी काही एक भूमिका घेतील अशी कवयित्रीची समजूत आहे. सामाजिक बांधिलकी जाहीर करणारे साहित्यिक निर्मितीच्या वांझोट्या कळा प्रसवतात, बोटचेपी भूमिका घेतात.अन्याय अत्याचाराशी ते बांधिल नसतात.अशा बांधिलकीवरच या कवितेने प्रश्नचिन्ह उभे केले आहे. चळवळीबद्दलही चिंता वाहिली आहे. समतेच्या दारात भिकारीच गोळा झाल्याचे वास्तव कथन केले आहे. सोवळ्या ओवळ्याची लागण झालेल्यांना जयभीम म्हणावयाचीही लाज वाटते असेही निरीक्षण नोंदविले आहे. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे पहिला आणि शेवटचा 'एकच अवतार' असून तो समतेच्या विचाराचा अवतार असल्याचे कवयित्रीने सांगितले आहे. वास्तविक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: अवतारासारख्या थोतांडाला नाकारले असताना त्यांना अवतार म्हणणे ही आंबेडकरी विचारांची केलेली प्रतारणा होय असे म्हणता येईल. धम्मस्वीकारानंतरच्या पिढीने असे म्हणणे हे अज्ञानाचे प्रकटीकरण केल्यासारखे वाटते.

संध्या रंगारी (जन्म १२ जुलै १९७७) हे फुले आंबेडकरी कवितेच्या क्षेत्रातील या दशकातील एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांचा पहिला कवितासंग्रह **आघात** १९९४ साली प्रसिद्ध झाला होता.२००३ मध्ये **कवडसे** हा वैशिष्ट्यपूर्ण कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. 'कवडसे'मध्ये त्यांनी आपली कविताविषयक भूमिका स्पष्ट केली आहे. कवितेला बेगडीपणाचा आव आणता येत नाही. कवितेला एक मंद मदगंधही असावा. मानवतेचे सोहळे साजरे करण्याचे तिला डोहाळे लागले पाहिजेत. होरपळ असह्य होताना तिला पेटवत जातात शब्द. 'कवितेच्या जंगलात हरवताना पुन्हा स्वत:ला नव्याने भेटते' हा कवयित्रीचा निर्मितीनंतरचा अनुभव आहे.

पेरावीत कवितेने शब्दांच्या मातीत
बोधीवृक्षाची बीजे अन् द्यावी
प्रज्ञाशील करुणेची गार सावली

ही या कवितेची मुख्य भूमिका आहे. या भूमिकेप्रत पोहचण्या अगोदर अनेक पातळ्यावरील वेदना पार कराव्या लागतात.अस्तित्वाच्या प्रश्नापासून या वेदनेला सुरुवात होते.घरासाठी सर्वस्व वाहणाऱ्या स्त्रीवर परकेपणानं पोखरण्याची वेळ येऊन ठेपते.सगळ्यांच सगळं करूनही तिच्या अस्तित्वाला मात्र आकार येऊ शकत नाही.तिचे अस्तित्व पुसून टाकले जाते.पिंजऱ्याला घर म्हणायची सवय तिला करून घ्यावी लागते.अस्तित्वाच्या शोधात निघाल्यानंतर तिला कळते की, ज्याला ती तिचे म्हणत होती त्या घरासाठी ती शोभेची बाहुली होती.कौटुंबिक पातळीवर ही स्त्रीची अवस्था आहे आणि

घराबाहेर बाजारात जिला देह सजवून विक्रीसाठी खुला करावा लागतो.नवऱ्याच्या आनंदासाठी वेणीफणी करून सजून धजून त्याच्या स्वागतासाठी दारात उभी राहून प्रतीक्षा करणारी स्त्री आणि बाजारातील गिऱ्हाईकासाठी सजून धजून प्रतीक्षा करणारी स्त्री. दोन्हीकडे दु:खाची जात समानच आहे. अशा दु:खाशी एकरूप होणारी जाणीव या कवितेतून साक्षात होते.

पुरुषाला हव्या असलेल्या मुशीतून स्त्रीला घडविले जाते ही भारतीय पुरुषी मानसिकता या कवितेने उजागर केली आहे. पुरुषाचा मुखवटा आणि चेहरा याचा थांगपत्ता लागू न देणारी प्रवृत्ती, त्याचा कावेबाजपणा, दुटप्पी वर्तनातून कार्यभाग साधणारी वृत्ती अशा अनेकविध गोष्टींचा समाचार ही कविता घेते.अशा पुरुषी पर्यावरणात जर बंडखोरीचा पवित्रा स्त्रीने घेतला नाही तर मग तिचे कुजून जाणे या व्यवस्थेत अपरिहार्यच ठरते.म्हणून हे कवीमन खचून जाणाऱ्या स्त्रीमनाला धिर देण्याचा प्रयत्न करते.मुक्तीच्या प्रबळ उर्मीचे स्वर कविताभर निनादत राहतात.

उठ सखे नको ग खचू अशी
प्रसवू आपण उजेडाच्या राशी
भिंती - भिंतीत चिणलेत त्यांनी आपले श्वास
श्वासाना आता स्वातंत्र्याची आस

नात्याची ओझी वाहण्यात गुदमरून गेलेला जीव नात्यांची ओझी झटकूनही टाकू शकत नाही. म्हणून स्वत:साठी आपलं स्वत:चं वेगळं जग निर्माण करण्याच्या निर्णयाप्रत हे स्त्रीमन आले आहे. 'परंपरेनं घातलेलं काजळ पुसून टाकलं अन् तिला लख्ख दिसायला लागलं' असा निर्वाळाही दिला आहे.

मला झाडासारखं असं
मातीतून उगवता आलं असतं तर बरं झालं असतं
मुळांनी घट्ट धरून ठेवली असती जमीन
अन् फांद्यांनी आकाश पेललं असतं

हे सृजनाचे आभाळ तिला प्राप्त झाले नाही म्हणूनच हे स्त्रीमन आपल्या सख्यांना साद घालते.या मातीत समता रुजवायची असेल तर अशा कृतींना प्रतिसाद मिळणेही तितकेच महत्त्वाचे आणि अर्थपूर्ण ठरणार आहे. म्हणून ओठावर केवळ उसने हसू आणून भागणार नाही. किती दिवस आसवांना वाट मोकळी करून देत राहायचे?काळोखाच्या गावात आंधळ्यांची वस्ती आहे म्हणून सूर्यपक्षी होऊन स्वप्नांचा गर्भपात न होऊ देता उजेडच जन्माला घातला पाहिजे असा विद्रोही पवित्रा या कवितेने घेतला आहे. परिवर्तन, बदलाच्या संदर्भात चढ्या आवाजात चर्चा करणे कसे फोलपणाचे आहे हेही या कवितेने दाखवून दिले आहे. 'आपल्याच आयाबायाच्या देहात देव का शिरतातफ?कोणत्याही काळात जोवर मानसिकतेत बदल होणार नाही तोवर बदलाची भाषा नपुंसकच ठरते. स्वकीयांच्या जगात तर विरोधाभास असा आहे की,

मनं आमची थंड झाली
सूर्याची पिल्लं अशी षंढ झाली
संघटनेला आमच्या फुटीरतेचा शाप
आम्ही वाटून खातो आमचाच बाप

स्वकीयांच्या जगात असा अंतर्विरोध असल्यामुळे व्यवस्थेच्या कुटिल कारवायांना बांध घालता येत नाही. एका अर्थाने हतबल आणि मजबूर झालेल्या मनाचे हे आक्रंदन या कवितेत प्रत्ययाला येते ते प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे.

या दशकाच्या शेवटी म्हणजे २०१० मध्ये **संध्या रंगारी** यांचा **संध्यारंग** हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्यामुळे फुले आंबेडकरी स्त्रीवादी कवितेचे प्रतल विस्तार पावले.या संग्रहात जवळपास १५८ कविता पाच भागात विभागलेल्या आहेत. कविता बाईच्या, कविता दंगलीच्या, कविता चळवळीच्या, कविता तुझ्यामाझ्या आणि कविता कवितेच्या अशी विभागणी केलेली दिसते. 'कवडसे'मधून या कवयित्रीच्या कवितेच्या चांगूलपणाची चाहूल लागली होती. 'संध्यारंग'ने कवितेला एका उच्च पातळीवर नेऊन ठेवले आहे. एका विशिष्ट भूमिकेतून त्या कविता साकार झाल्या आहेत.

स्त्रीत्वाचे जोखड फेकता येत नाही
मला माझ्यासाठी जगता येत नाही
मी सतत कोणाची तरी कोणीतरी असते
मी माझी कधीच का नसते

असा जिवघेणा प्रश्न उपस्थित केला आहे. या कवितेतील शरीरशास्त्र समजून घेतल्यास व्यवस्थेचा स्वभाव स्पष्ट होत जातो. प्रत्येक व्यवस्थेच्या स्वभावानुसार स्त्रीच्या शरीराची पद्धतशीरपणे पुरुष अवहेलना करीत असतो. उदा.पुरुषाने एखाद्या जनावराची शिकार केल्यानंतर ते सावज भाजून खावे, एकेका अवयवाचा लचका तोडावा तसे बाईच्या बाबतीत पुरुषी व्यवस्थेचे असते.

काय असतं बाई असणं म्हणजे
थोडी हाडं थोड मांस
भाजता येतो चघळता येतो तो साज

विवाहसंस्था नावाच्या व्यवस्थेत तर तिला मोठ्या हिंस्रतेला सामोरे जावे लागते. 'कणाच मोडते ती बाईचा, कापून टाकते नखं अन् शिंगसुद्धा' अशाप्रकारे तिच्या शरीराचे अवयव विदृप केले जातात.घर नावाची व्यवस्था स्त्रीचे रूपांतर यंत्रात करून टाकते. सुटे सुटे भाग एकत्र करून जसे यंत्र बनविले जाते तसे स्त्रीचे यंत्र बनवताना तिचे शरीरावयव शाबूत ठेवून मन मारून टाकले जाते.कणा मोडला जातो, त्यामुळे सेवेसाठी तत्पर असणे एवढेच या यंत्राचे कार्य उरते. बाजार व्यवस्थेने स्त्रीच्या शरीराचे वस्तूकरण केले आहे. वस्तूसारखे सहजपणे हाताळता येणे शक्य व्हावे म्हणून वस्तूकरण ही बाजारव्यवस्थेची गरज आहे. आधुनिक काळात स्त्रीच्या क्रयशक्तीवरून तिची उत्पादनक्षमता ठरविली जाते. त्यानुसार तिची किंमत ठरवता येते.

नऊ महिन्यासाठी खोली द्यावी किरायाने
नवख्या माणसाला तसं
गर्भाशय दिलं तिनं किरायाने
तेव्हापासून फॅक्टरीचं रूप आलं तिला

मग माणसासाठी कच्चा माल तयार करणारी बाजारपेठ असा तिच्या रूपाला आकार दिला गेला.जागतिकीकरणाने दिलेली ही देणगी आहे. थोडक्यात, तिच्या शरीराचं एका लेदर करन्सीत, चामडी नाण्यात रूपांतर जागतिकीकरण किंवा ग्लोबल व्यवस्थेने केले आहे.

बाईल फक्त शरीर असते भावभावना, संवेदना नसतातच, असेच गृहीत धरून व्यवस्थेचे व्यवहार सुरू असतात. 'बाई वाटली जाते कामात, माणसात, तुकड्या तुकड्यात.हेही खरं आहे. बाई कुठं असते माणूस?' माणूस म्हणून तिचा स्वीकार केला जात नाही.म्हणून ऐहिक, दैहिक पातळी ओलांडून जाणे अद्यापही बाईला साधलेले नाही. व्हाईट कॉलर व्यवस्थेला तर दुटप्पीपणे जगणे अगत्याचेच असते.घरातल्या पुरुषाला स्त्रीचे महत्त्वाकांक्षी असणे आवडत नसते.

बाहेर पार्टीत जेवढं चांगलं बोलतो
तितक्याच घाणेरड्या अगदी खालच्या थराच्या
शिव्या देतो घरात

नवरा नावाची व्यवस्था बायकोकडून वेगवेगळ्या प्रहराप्रमाणे अपेक्षा ठेवत असते आणि एका कामातून थोडा विसावा घ्यावा म्हटले तर घर तिच्या उरावर बसायला तयारच असते.नवरा तिच्या शरीराची विविध पद्धतीने अवहेलना करीत असतो. तिच्या मुस्कटात मारून 'उभं आडवं सोलून काढतो', तिच्या देहावर वेगवेगळे गुलामीचे अलंकार चढवून तिला खुरटवून टाकले जाते.

नाकात नथ हातात कडे पायात तोडे बोटात जोडवे

घराघरात पोरी बोन्साय करून सजवलेल्या

आणि तिला स्वातंत्र्य नावाची गोष्ट तर कधीच बहाल केली जात नाही.कारण 'न स्त्री स्वातत्र्यंअर्हती' या तत्त्वज्ञानाची निर्मिती पुरुषी व्यवस्थेसाठीच करून ठेवलेली असल्यामुळे पुरुष हे तत्त्व आपल्या बायकांच्या संदर्भात पुरेपूर आचरणात आणत असतो. धर्म नावाच्या व्यवस्थेने तर इथल्या मातीत विष कालवले तेव्हापासून माणसाच्या विटाळाला सुरुवात झाली. स्त्रीच्या देहावर सर्व धर्मानी घाव घालायला सुरुवात केली.तिचा गर्भ वाढू द्यायचा की नाही हा अधिकारही स्त्रीला उरला नाही. संसार नावाच्या व्यवस्थेने स्त्रीला स्वप्न पाहण्याची मुभा ठेवली नाही. त्यामुळे तिच्या त्वचेचा रंग उडाला आणि पाय भेगाळून गेले. बाह्य जगात तर 'ह्याचे त्याचे डोळे स्त्रीच्या भरदार शरीरावर' नेमच धरून असतात. ज्याचं त्याचं मन भोगासाठी आतुरलेलं असते आणि ती विधवा झाली तरी गावाच्या मनात तिचे शरीर घर करून असते.

आजच्या काळात माहिती संगणकाच्या युगात आधुनिकता टोकालाच गेली आणि संवेदना बोथट झाल्या. नात्यागोत्याला आणि भावना संवेदनांनाही एक बाजारू टच प्राप्त झाला.त्यामुळे माया, ममता, जिव्हाळा या गोष्टी आता शब्दकोषापुरत्याच उरल्या आहेत. त्यात कोणतीही अनौपचारिकता, अकृत्रिमता शिल्लक राहिलेली नाही.

बाजारातून शुभेच्छा घेतो विकत अगदी फुलांसकट
नात्यांमध्ये एकेक दिवस डेडिकेट करता करता
डिलीटही करून टाकतोच की कळत नकळत

अशा साऱ्या पार्श्वभूमीवर पुरुष केंद्रावर आहे आणि स्त्री परिघावर हे ठरलेले गणित. त्यामुळे हे कवीमन, 'मला संपवायची ही कातरीतली अवस्था, व्हायचय केंद्र हाताळायची व्यवस्था' असा पवित्रा घेते आणि पुरुषी सत्तेशी दोन हात करण्यासाठी सिद्ध होते. पुरुषी अहंकारी सत्तेवर तिला घाव घालायचे आहेत. त्यासाठी

शरीराची केली ढाल अन् तलवारही
औजार अन् हत्यारही

असा जामानिमा आपल्या देहाच्या सामर्थ्यानेच संघर्षासाठी तिने तयार ठेवला आहे. कर्ज काढल्यानंतर ते हप्त्याहप्त्यानी फेडायचे असते.स्त्रीही हप्त्याहप्त्यानी आयुष्य झिजत झिजत संपून जाते. संपत जाणाऱ्या अशा आयुष्याची संध्या रंगारी यांनी सांगितलेली कहाणी अस्वस्थ करणारी, अंतर्मुख व्हायला भाग पाडणारी आहे. अतिशय गंभीर स्वरूपाची ही कविता असून स्त्रीजीवनाच्या आणि जगण्याच्या चिंतनातून ती आकारास आली आहे.

संध्यारंगमधील दंगलीच्या कविता वाचताना अरुण काळेच्या 'सायरनचे शहर'मधील कविता सहजपणे आठवतात. नागवंशाचा नायनाट करण्यासाठी खांडववन पेटवून देण्यात आले होते. दंगलीमागचा कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्न या कवितेने केला आहे. नामांतराच्या दंगलीचेही संदर्भ या कवितेने दिले आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी राजकारण्यांच्या दृष्टीने दंगल घडवून आणणे हे एक महत्त्वाचे साधन अलिकडच्या काळात उपयोगात आणले जाते. माणसातील माणूसपण आणि जगण्याची इच्छाच या दंगलीने मारून टाकली आहे. दंगलीचे परिणाम एवढे भीषण असतात की,

दंगल उसळते तेव्हा माणसं कोसळतात
दंगल मावळते तेव्हा कोसळलेली माणसं उठत नाहीत

अशाप्रकारे दंगली माणसाला आयुष्यातूनच उठवतात पुन्हा कधीही उभे न राहण्यासाठी! चळवळीच्या कवितांमधून चळवळीच्या थांबलेपणाचा वेध घेतला आहे. पँथरसारख्या बंडखोर संघटनेतील माणसांनी कशा तडजोडी केल्या हेही धिटपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. धम्मचळवळीवरही टिकास्त्र सोडले आहे. धम्मपरिषदेला येत गेलेले कर्मकांडाचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

धम्मपरिषदेचा भरलाय ऊरुस
उधळताहेत निळ चुरमुरे फुटाणे बत्ताशात चळवळ

भिक्कू बडव्यांचं प्रतिरूप
धम्म होतोय धर्म जाणून मर्म आपण मख्ख ...

'काषाय वस्त्र असे मलीन होताना तुम्ही कसे निवांत भदंत' हा अतिशय अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. चळवळीतील माणसे व्यवहाराच्या पातळीवर उतरल्यामुळे चळवळीचे कंबरडे मोडले असा निष्कर्ष या कवितांनी मांडला आहे. नेस्तनाबूत झालेल्या चळवळीतून वाट्याला आलेले वैफल्य मांडले आहे. सामाजिक बांधिलकीला प्राप्त झालेले थिल्लर रूप स्पष्ट केले आहे. 'जयंतीला वर्गणी दिली की संपतेच बांधिलकी' एवढे दारिद्रय बांधिलकीला आले आहे. आत्मटिकेला बेधडकपणे ही कविता सामोरी गेली आहे असे दिसून येते.

तू आंबेडकरवादी म्हणून मिरवतोस मंचावर
तेव्हा तेव्हा खोटाच वाटतो मला तुझा चेहरा
घरी आलं की काढून ठेवतोस खुंटावर
तुझा परिवर्तनवादी सदरा

असे निरीक्षण नोंदविले आहे. परिवर्तनाच्या चळवळींना फॅशनेबल रूप प्राप्त झाले.ध्येये हरवली, उद्दिष्टांचे तीनतेरा वाजले.अनुयायांनी दुटप्पीपणे वागायला सुरवात केली.हे वास्तव रोकठोकपणे मांडले आहे.

'कविता तुझ्या माझ्या'मधून मी- तूमधील अंतर्विरोध प्रत्ययाला येतो. बाहेर समाजसेवक असणारा माणूस घरात नवराच असतो. पूर्वीच्या असलेल्या मित्राचे नवऱ्यात रूपांतर झाले की, त्याच्यातील मित्र हरवून जातो आणि तिच्यातील मैत्रीणही! स्त्रीला खाजगी मालमत्ता समजल्या जाणाऱ्या समाजात

कुठलेच गुलाम मालकावर प्रेम करत नसतात
अन् मालक गुलामाला कधीच बरोबरीचे हक्क देत नसतात

हे सत्य मुखरीत केले आहे. एकंदरीतच फुले आंबेडकरी स्त्रीवादी कवितेत संध्या रंगारी यांच्या संध्यारंग ने आपली अमिट मुद्रा उमटवली आहे असे निश्चितच म्हणता येते.

कवयित्रींच्या कवितांमध्ये अनेक नावांचा निर्देश करता येईल. उदा. निला वाघमारे **आरास**, मनिषा जाधव **गाथा बोधिवृक्षाच्या पानाची**, पुष्पा कांबळे **जपलेल्या जखमा**, माया जाधव **जागृती**, मालती इंगळे **निळे आकाश माझे आहे**, सरिता जांभुळे **रानमाय**, स्मिता नगरकर **विवाहितेचे अश्रू**, कविता मोरवणकर **मुक्ता**, छाया कोरेगावकर **आकांत प्रिय माझा** इ.

कविता मोरवणकर यांची कविता आपल्या घुसमटणीला वाट मोकळी करून देत आहे असे प्रत्ययाला येते.

किती दिवस फेडू द्यायची देहावरची वस्त्र
किती दिवस जळत राहायचं ज्योतीसारखं आतल्या आत?
आता ही आग बाहेर यायलाच हवी

असा मूकपणाचा आक्रोश उजागर करणारी ही कविता आहे. आजवर कोंडून ठेवलेल्या निर्धाराच्या वाटा तिला मोकळ्या करावयाच्या आहेत. पैशाच्या रूपात आपले बालपण विकणाऱ्या, बालपणाच्या केला जाणाऱ्या शोषणबद्दल ही कविता बोलत राहते.चार भिंतीच्या आत बंदिस्त करणाऱ्या रिती रिवाजाच्या गाठोड्याला आग लावण्याची भाषाही येथे पाहावयास मिळते. या कवितेला 'आगी'चे जबरदस्त आकर्षण आहे. गनिमी काव्याने वागणाऱ्या, नकाब पांघरलेल्या स्त्रीमुक्तीवाद्यांची पोलखोलही या कवितेने केली आहे. परंपरानिष्ठ आणि कावेबाज पुरुषप्रधान समाजावर भाष्य केले आहे. धर्मामुळे भाकरीचे प्रश्न सुटत नसतात हे सत्यही अधोरेखित केले आहे. 'मुक्ता' या संग्रहात काही गझलही पाहावयास मिळतात.

१. मांडूनी शब्दातून काळोख आता
मी प्रकाशाला अशी जगवीत गेले
२. काळोख पांघरूनी ही रात चाललेली
हृदयात विस्तवाला ठेवून आज गेला
अशाप्रकारे काळोख प्रकाशाचे द्वंद्व या गझलांमधून प्रत्ययाला येते.

श्यामल गरुड (जन्म ६ जुलै १९७०)

या काळातील ज्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झाले नाहीत मात्र अतिशय समर्थ अशी कविता कवयित्रीच्या प्रांताला दिली आहे त्यात श्यामल गरुड यांचा आवर्जुन उल्लेख केला पाहिजे. एक तर श्यामलच्या कवितेचा अवकाश भाषिक मोडतोडीच्या रूपाने साकार झाला आहे तर आशय नाविन्यपूर्णतेने व्यापलेला आहे हे प्रथमदर्शनीच प्रत्ययाला येते. पुरुषी व्यवस्थेला ठामेठोकपणे आव्हान देणारी ही कविता आहे. आतल्या उर्मीने उभी राहून या कवितेतील नायिका नाडल्या गेलेल्या सर्व स्त्रियांच्या वतीनेच धिटपणे बोलत राहते. स्त्रियांना जगू देण्याचे आवाहन करते. या स्त्रियांची अशी इच्छा आकांक्षा आहे की त्यांना पुरुषी उपकाराच्या कुबड्यांचा आधार घेऊन वाटचाल करावयाची नाहीय. त्या जगण्याची खाज म्हणून जे जे भोगायचं ते ते त्या भोगतील. ठासून मारणाऱ्या व्यवस्थेची मायबहीण नव्हे तर 'भाऊ - बाप' त्यांना काढायचे आहेत. भर चौकात गप्पा मारत, लग्नसंस्थेच्या तुंबलेल्या गटाराचे होल खोलून, सडलेल्या संस्कृतीचा विटाळ करू पाहणारे स्त्रीसमूहमन येथे व्यक्त झाले आहे आणि हे समूहमन व्यक्त होताना अधिकाधिक आक्रमक होत जाते. पण येथे उसना आवेश नसतो. अंत:करण फोडून बाहेर यावे तसे शब्द फुटत जातात.

किती दिवस ओरपणार विटाळातूनच
गोल गरगरीत झालेला त्यांचा देह
दोन पायांमध्ये बाईपण शोधणाऱ्यांना
मारू द्या त्यांना आडवं
पोसते त्यांच्याच गर्भाशयात पितृसत्ताक व्यवस्था
तिला संपवताय गर्भात तुम्ही
सांभाळताहात रुढी परम्परा तुमच्या भुंड्याखालचं
धूडकं सांभाळावं इतक्या आदबीने

स्त्रीला केवळ भोगाचे खेळणे मानत आलेल्या पुरुषी व्यवस्थेला आडवं मारणारी ही भाषा अनोखी आहे. मुलीचे गर्भ पाडायला भाग पाडणारी पुरुषी व्यवस्था रुढी परंपराही मोठ्या आदबीने सांभाळते.त्याविषयीचा उपरोधही नेमकेपणाने व्यक्त झाला आहे. स्त्रीचं नैतिक, लैंगिक दमण करणारी ही व्यवस्था तिला लिलया बाजारात पोचवते. अशी हिडीस संस्कृती जन्माला घालणाऱ्या व्यवस्थेचा प्रचंड उपहास या कवितेत आहे. 'धर्माने वाढविलेली दुकानदारी गुवाच्या गाडग्यात' बुडवायला निघालेली ही कविता स्त्रीच्या सम्यक स्वातंत्र्याचा जाहीरनामा 'फडकावत ठेवते' बाईपणाच्या बुळबुळीत चिखलातून बाहेर पडून केवळ माणूसपणाच्या टोकाशी येऊन उभं राहण्याच्या स्वातंत्र्याकडे झेपावणारा हा जाहीरनामा आहे. माणूस जन्माला घालण्याचे सामर्थ्य केवळ स्त्रीमधेच एकवटले आहे.

तिने जिथे जिथे भिरकावला मुठभर दाना
तिथेच वसली तुमची वस्ती
तिने नाही उगवले बॉम्ब - काडतुसे - अफू
नाही बनवल्या बंदुकी अश्रूधुरांच्या नळकांड्या
तिने नाही फिरवले रणगाडे भरल्या घरांवर
नाही टिचवल्या बांगड्या सौभाग्याच्या

तिने नाही वाढवली सर्वहारांची चिपाडं झालेली पोटं
तिने थापल्या भाकरी, जागवली इथली जीवसृष्टी
तिने घातला जन्माला सुंदर माणूस

असं तिच्या अस्तित्वाचं लखलखीत सौंदर्य ही कविता व्यवस्थेच्या तोंडावर फेकून मारते की ज्यामुळे पुरुषच गर्भगळीत व्हावा! कारण त्याचे कर्तृत्व काय, तर पुरुषाने भाकरीचे तुकडे मोडून दाही दिशांमध्ये भूक वाढविली, सीमा बाटवल्या, नक्षलवादी वाढवले, क्षेपणास्त्राच्या रेतीने माती नासवली आणि हाच माणूस आंतरराष्ट्रीय स्तरावर एवढा कृतिशील झाला की,

तुम्ही वाढवला जिहाद ट्विन्स टॉवर्स उडवेपर्यंत
तुम्ही पिलात तेलाच्या विहिरी केलेत गुलाम नमाजी देशांना
तुम्ही केलेत इराक बेचिराख लटकवला जिगरबाज शहंशाह खुलेआम
तुम्ही हिरोशिमा नागासाकीच्या येणाऱ्या पिढ्यांच्या दुधात
कालवली बॉम्बची भुकटी
तुम्ही उतरवले लालबावटे डावलली किंमत श्रमाची
तुम्ही दाबल्या बुद्धाच्या आर्त प्रार्थना तिबेटमध्ये
तुम्ही केलेत फिमेल जेनायटल म्युटीलेशन सोमाली वाळवंटात
तुम्ही पाडला बाबरी मस्जिदीचा ढाच्या
घुसविल्यात भगव्या तलवारी स्त्रियांच्या गर्भात...

अशाप्रकारे ही कविता वैश्विक जाणिवा प्रकट करते. महासत्तेचा मुजोरपणा उजागर करीत, जागतिकीकरण आणि मूलतत्त्ववाद्यांच्या एकीकरणातून स्त्रियांच्या झालेल्या लैंगिक अवहेलनेचं हादरवून सोडणारं चित्र वाचकांपुढे ठेवते आणि अंतर्मुख करते. माणसाच्या गुलामीची नवी अर्थव्यवस्था जन्माला घालणारा हा माणूस! जेव्हा जेव्हा माणूस पराभूत झाला, हार पत्करण्याची वेळ आली तेव्हा तेव्हा त्याने स्त्रीलाच डावावर लावले.अनादी काळापासून हे चालत आले आहे. मात्र किती घोळवायची तुमची छप्पन भोकी संस्कृती असा खडा सवाल वर्तमानावर उभा केला आहे.

स्त्रीचं मोठेपण माहीत असूनही पुरुष मात्र वेडेपणाचं सोंग पांघरून पेडगावच्या रस्त्याने वाटचाल करण्यात मोठा वाक्बगार ठरला आहे. अशा पुरुषाला तर ही कविता घायाळ करून सोडते. मध्यमवर्गीय फॅशनेबल स्त्रिवाद्यांचा बुरखाही टर्रकन फाडून टाकण्याचे काम या कवितेने केले आहे. कारण या इझमपलिकडचे जगणे या बेगडी लोकांना ज्ञातच नसते. अशा जगाची सफर ही कविता घडवून आणते.

तिनं झटकली कापडं की वाटायचं
या शहरामधल्या एका उकिरड्यावरचा उडाला खकाना
राखून ठेवला तिच्यासाठी महानगराने मोस्ट सेलेबल कोपरा
इथल्या खाऊजा धोरणात टिकून राहायला...
कातडी सोलून सांगीतल्या नाही तिने त्याच्या रांडकथान्या...
हे शहर दिसतं अधिक सुंदर काहींना तिच्यामुळे...
पकडली तिने माझी पचपचीत मध्यमवर्गीय नस
झटकून टाकला माझ्या अंगावरून जाणारा
बाईपणाचा पांढरपेशी रोग...
मी माझेच अंधारे कोनाडे एकांतात भेदरून
लाऊन घ्यायची आतली दारं खिडक्या गच्च
तरीही उभी दिसायची माझ्या मेंदूच्या नाक्यावरच ती

माझ्या आतल्या स्त्रीवादाला आडवं मारत...

असं स्त्रीच्या जगण्याचं वास्तव तथाकथीत इझमच्या चौकटीत कधीच डोकावत नाही. म्हणून ही कविता इझमच्या चौकटीतील फॅशनेबल स्त्रीवादाला आडवं मारण्याचं काम करते. रस्ते गल्ल्या बोळकांडातून, चौकाचौकातून स्त्रीदेहाचा चिखल तुडवणारी पुरुष माणसे म्हणजे जणूकाही 'गाभ्रीची औलादच' आहे.

आदिम होऊन उघड्यावरच चढतात कुत्र्यावानी
सोललेल्या बकऱ्यांच्या बॉड्या लटकाव्यात
मटणाच्या दुकानात अगदी तशाच
उलट्या टांगायच्या ठेवल्यात फक्त स्त्रिया त्यांनी
हवे असलेले मांसाचे तुकडे खाण्यासाठी
चिमुटभर मास ओढून करतात उघडे सांगाडे
योनीच्या आत घुसून शोधतात घराणे आदिमायचे
लिंगावर पृथ्वी तोलण्यास निघाली ही सडल्या थेंबाची पैदास न्यारी
नव्याच जैविक भोकातली ही गाभ्रीची औलाद सारी

अशा प्रकारचा हा भाषिक परिवेश पाहिल्यानंतर अंतर्मनातील जळजळ, खदखद कशी बाहेर पडते याचा पुरेपुर प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. विद्रोहाचे एक टोक गाठून वासनांध पुरुषी समाजाचे शवविच्छेदन केले आहे. ही कविता एका विशिष्ट तत्त्वज्ञानाशी बांधिलकी सांगणारी आहे. निर्वाणाअगोदरच्या प्रार्थना ऐकायला आपला कोणीच बाप्पा लपला नाही ढगाआड किंवा खेटर काढून कुठलेच गाभारे ओलांडले नाहीत. अंधारात आर्त विराण्या भाकल्या नाही किंवा कोणत्या विद्येच्या देवीची ओटीही भरली नाही असे कवयित्रीचे संस्कारक्षम मन 'अक्षरमाय सावित्रींच्या घराण्याशी' नाते जोडते आणि 'सनातन्यांच्या तुंबल्या गटारात विटाळाची पुडी फेकते' या मनाने कुठल्या इझमपुढे झोळी धरली नाही, तर तिचं नातं जसं एका जैविक बापाशी आहे तसंच दुसऱ्या एका वैचारिक विज्ञाननिष्ठ बापाशीही आहे.

दिलं तू समष्टीचं अभेद शस्त्र
तुझ्याच बोटाच्या दिशेने आमचे अवघे विश्व
अलगद लपेटलंय काशाय वस्त्रात
गर्भात चौखूर उधाणलेलं अशोकचक्र
बा, किती भयमुक्त आभाळातून व्यायलास आम्हा

अशी विचारतत्त्वाची बांधिलकी स्पष्ट केली आहे. एकंदरीतच या कवितेने सुन्न करणारा अनुभव वाचकांना दिला आहे. काही शब्दकळांवरून नजर फिरवली तरी अनेक संदर्भ आणि अर्थाची सूचकता या शब्दकळांमध्ये साठवलेली आहे असे प्रत्ययाला येते.उदा. 'भगव्या तलवारी स्त्रियांच्या गर्भात', 'छप्पनभोकी संस्कृती', 'जैविक कुथाकुथ', 'पदराखालच्या दिगंत शुभ्र झऱ्याखाली', 'उकिरड्यावरचा खकाना', 'रांडकथान्या', 'इझममधला फोकनाडपणा', 'बाईपणाचा पांढरपेशी रोग', 'अंधारे कोनाडे', 'ओटीपोटाच्या खोबण्यातून', 'देहाचा चिखल', 'लिंगावर पृथ्वी तोलण्यास', 'सडल्या थेंबाची पैदास', 'गाभ्रीची औलाद', 'बाजिंदी जुगलबंदी', 'मुरब्बी निसरड्या गुहेचे सरताज', 'जैविक चिवडाचिवडी', 'माहेरची मायवाट नाभीपर्यंत', 'पांचटभोकी चैतन्यदायी अभ्रे', 'काळतोंड्याचे बिनलायसन चाळे', 'प्लास्टिकचे इंद्रिय सांडतात घरंदाज हरळी', 'सनातन्यांच्या तुंबल्या गटारात', 'विटाळाची पुडी' इत्यादी असंख्य शब्दकळा बरेचदा दचकवून सोडतात, कधी कणव निर्माण करतात, स्त्रीजगण्याचा पसारा मंडित करतात. तर अनेक शब्दकळा या प्रतिमेचेच कार्य साधतात आणि अर्थविस्तार करतात.हे भाषिक वैभव या कवितेचे सौंदर्यस्थळ आहे. असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.

संक्षिप्तत: असे म्हणता येईल की, स्त्रीयांची कविता फुले आंबेडकरी कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण विभाग आहे. या कवितामधून एक हरवलेपणाची जाणीव व्यक्त झाली आहे. जुन्या आठवणींनी हळवे होणारे मनही येथे प्रत्ययाला येते.

जीवनाला ओसाडपणा प्राप्त झाल्याचे निर्देशित झाले आहे. माणुसकीला जमीनदोस्त करणाऱ्यांना त्यांच्या जुलमासकट गाडून टाकले पाहिजे असा क्षोभही व्यक्त झाला आहे.

सदर कवितेने एकचालकानुवर्ती मूलतत्त्ववादी सत्तेची पोलखोल केली आहे. मुलगी म्हणून जन्माला आल्यानंतर पुरुषी व्यवस्थेत तिला कोणकोणत्या भोगांना सामोरे जावे लागते याचा लेखाजोखा मांडला आहे. त्याचप्रमाणे तेजाचे किरण हाती लागल्यानंतर पायरीचे ध्यान उंबऱ्यात गेले असा बदलही टिपला आहे.

या कवितेने भारतीय राज्यघटनेचा मागमूस पुसण्यासाठी सज्ज असलेल्या धर्मरक्षकांच्या काळ्या कारनाम्यांचा उपरोधिक अंगाने वेध घेतला आहे. आपण ज्योतिबाच्या सावित्रीसारखे असून दुनिया आपल्यासाठी धगधगत्या ज्वालेसारखी असल्याचे भान या कवयित्रीनी जागविले आहे.

तळापासून मूळापर्यंत एकाकी तप्तपणा अंगभर लपेटून घेणारे, अग्नीफुलांचा रंगसोहळा पाहणारे स्त्रीमन या कवितातून व्यक्त झाले आहे. चार भिंतीच्या आतील मूक आकांत, उदासी आणि कोंडलेल्या श्वासामुळे होणाऱ्या तडफड, तगमगीचे चित्र स्पष्ट केले आहे.

पौराणिक, पारंपरीक स्त्रीप्रतिमांचा आधार घेऊन स्त्रीदु:खाचे प्रकटीकरण या कवितांनी केले आहे. एकाकी वाटचाल करणाऱ्या स्त्रीयांची गोची करणाऱ्या पुरुषी मानसिकतेचे वास्तव उजागर केले आहे.

आदिवासी जगातून आलेल्या कवयित्रीनी आंबेडकरी प्रेरणेतून स्त्रीजगताच्या संदर्भात एक विशिष्ट भूमिका घेतली आहे. माणसाला जन्माला घालण्याचे सामर्थ्य केवळ स्त्रीमध्येच असल्याचे ठामपणे सांगून वर्णव्यवस्थेच्या तत्त्वज्ञानाला आणि वैदिक परंपरेच्या दांभिकपणाला प्रश्नांकित करून विज्ञाननिष्ठेचा मार्ग दाखविला आहे. पुरुषसुक्ताची पोलखोल करून इतिहासाच्या पुनर्लेखनाची आणि पुनर्मांडणीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आदिवासीना वनवासी ठरवू पाहणाऱ्या मूलतत्त्ववाद्यांना बाहेरचा रस्ता दाखविण्याचे धाडस या कवितेने दाखविले आहे. भूतदयावाद्यांच्या उरबडवेपणाची खिल्ली उडविली आहे. आंबेडकरी स्वाभिमानी बाण्याचा संदेश दिला आहे.

कवयित्रीच्या परंपरेत आंबेडकरी गीते लिहिण्याचाही प्रयत्न झाला आहे. या गीतरचनेच्या माध्यमातून अनेकविध आंबेडकर प्रतिमा आणि प्रतिकांचे उपयोजन झाले आहे. त्यात उपदेशपर रचनाही पाहावयास मिळतात.स्त्रीमुक्तीचा उद्‌गार बुद्ध- फुले- आंबेडकर या परंपरेनेच या देशात निनादत ठेवला असा उच्चार या गीतांनी केला आहे. आंबेडकरी कर्तृत्वाला साद घालतानाच चळवळीला योगदान देणाऱ्या महनीय व्यक्तींच्या कार्याचे मोलही सांगीतले आहे. स्त्रीदु:खाला वाट मोकळी करून देतानाच तिचे सामर्थ्यही स्पष्ट केले आहे.

या कवितांनी प्रक्षुब्ध आणि अस्वस्थ मनस्थितीचा प्रत्यय दिला आहे. हा देश म्हणजे जणू भाजलेल्या जखमांचा ढिगारा आहे असे निरीक्षण नोंदविले आहे. प्रियकराने माघार घेतल्यावर एकट्यानेच युद्ध छावणीच्या रस्त्याने आगेकूच करणारी प्रेयशी या कवितेत पाहावयास मिळते.

विभाजनाचे खंडित वास्तव अधोरेखित केले आहे. गर्भ ही प्रतिमा वारंवार उपयोजिली गेली आहे. एकच प्रतिमा आशयानुरूप विविधार्थी स्तर सूचित करते.त्यामुळे या कवितेचा आशय भक्कम होतानाच कवितेला कलात्म परिमाण प्राप्त होतात. या कवितेला मानवतेचे सोहळे साजरे करण्याचे डोहाळे लागले आहेत.

घर आणि बाजार या परिप्रेक्ष्यात स्त्रीजीवनाचा लोलक हेलकावताना दिसतो. पुरुषी व्यवस्थेत स्त्रीच्या अस्तित्वाला क:पदार्थ समजणारी प्रवृत्ती कशी अघोरी आहे हे प्रतिकात्मतेने या कवितेतून स्पष्ट होते. पुरुषाचा मुखवटा आणि चेहरा याचा थांगपत्ता लागू न देणारी प्रवृत्ती, त्याचा कावेबाजपणा, दुटप्पी वर्तनातून कार्यभाग साधणारी वृत्ती अशा अनेकविध गोष्टींचा समाचार घेतला आहे. परिवर्तन आणि बदलाच्या संदर्भात चढ्या आवाजात चर्चा करणे कसे फोलपणाचे आहे हेही दाखवून दिले आहे. स्त्रीपुरुष समता हे मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. हतबल आणि मजबूर झालेल्या स्त्रीमनाचे

आक्रंदन प्रातिनिधिक रूपात या कवितेत प्रत्ययाला येते.

घर नावाची व्यवस्था स्त्रीचे रूपांतर यंत्रात करून टाकते. बाजारव्यवस्था तिच्या शरीराचे वस्तूकरण करते. ग्लोबल व्यवस्था चमडी नाण्यात रूपांतर करते. नवरा नावाची व्यवस्था बायकोकडून वेगवेगळ्या प्रहाराप्रमाणे अपेक्षा ठेवत असते. संसार नावाच्या व्यवस्थेने तिला स्वप्न पाहण्याची मुभा ठेवली नाही. असे व्यवस्थेच्या विविध स्तरावर, विविध पातळ्यावरील स्त्री शोषणाचे स्तर स्पष्ट केले आहेत. स्त्रीला फक्त शरीर असते भावना, संवेदना नसतातच असे गृहीत धरून व्यवहार सुरू ठेवणाऱ्या व्यवस्थेचे रूप, प्रारूप उघड केले आहे. हप्त्याहप्त्याने झिजत झिजत संपत जाणाऱ्या आयुष्याची अस्वस्थ करणारी कहाणी या कवितेने सांगितली आहे.

पुरुष केंद्रावर आणि स्त्री परिघावर हे ठरलेले गणित असल्यामुळे केंद्र होऊन व्यवस्था हाताळण्याची स्त्रीमनाची आकांक्षा प्रकट झाली आहे. पुरुषी व्यवस्थेत माझ्या देहावर माझंच स्वामीत्व हवं आहे, पुरुषाचा मालकी हक्क नको अशी बंडखोर भावना व्यक्त झाली आहे. पुरुषी सत्तेशी दोन हात करीत, पुरुषी अहंकारी सत्तेवर घाव घालण्यासाठी सज्ज झालेले स्त्रीमन या कवितेत प्रत्ययाला येते.

चळवळीतील माणसे व्यवहाराच्या पातळीवर उतरल्यामुळे चळवळीचे कंबरडे मोडले असा निष्कर्ष मांडला आहे. धम्मचळवळीवरही टिकास्त्र सोडले आहे. धम्मचळवळीतील कर्मकांडाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. चळवळी फॅशनेबल झाल्या असे म्हटले आहे. दंगली माणसाला आयुष्यातून उठवतात हे वास्तव नोंदविले आहे. समाजसेवक असणारा माणूस घरात नवराच असतो हेही वास्तव नोंदविले आहे.

एकंदरीतच स्त्रियांच्या कवितेमुळे फुले आंबेडकरी स्त्रीवादी कवितेचे प्रतल विस्तार पावले आहे.

आंबेडकरी गझल

वामन कर्डक हे आंबेडकरवादी गझलेचे आरंभबिंदू आहेत. वामन कर्डक यांनी हिंदी काव्याचाही अभ्यास केला होता. ''उर्दूतले गझल, खमसा, नज्म हे सर्व प्रकार मी मराठीत व हिंदीत आणले''[१२] अशी नोंद वामनदादांच्या 'माझ्या जीवनाचं गाणं' या आत्मचरित्रात आहे. १९५० च्या दरम्यान त्यांनी भीमा कोरेगावच्या महार सैनिकांनी गाजवलेल्या शौर्यावर गझल लिहिली. ''वामनदादांची काव्यप्रतिमा, त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची आकलनक्षमता आणि त्यांच्या लेखनाची गती पाहू जाता वामनदादा १९५०- ५५ पासून गझल लिहित असावेत असे अनुमान निश्चित करता येते.''[१३]

मराठी गझलेपुरते सांगायचे झाल्यास माधवराव पटवर्धन आणि त्यानंतर एकदम सुरेश भटांवर उड्या पडतात. या दोन परंपरांच्या आधेमधे काहीच घडले नाही का? असा प्रश्न निर्माण होतो. सुरेश भटांच्याही पूर्वी म्हणजे १९४३ पासून वेगळ्या जाणिवेची गझल लिहिली जात होती. त्या गझलेचे प्रणेते वामनदादा कर्डक हे होत. सुरेश भटांचे अस्तित्व १९६५ नंतरचे आहे हे लक्षात घेता वामनदादांचा काळ माधव ज्युलीयन यांच्या नंतरचा आणि सुरेश भटांपूर्वीचा आहे. स्वातंत्र्यपूर्व परंपरेतच वामनदादांचा उदय झाला. त्यामुळे भटांपूर्वीचा सामर्थ्यशाली गझलकार म्हणून वामनदादा कर्डक यांचा निर्देश केला पाहिजे. ते ऐतिहासिक सत्याला धरून होईल. या ऐतिहासिक सत्याचे भान मात्र मराठी गझल परंपरेला राहिले नाही. 'गज्जलांजली' हा माधव ज्युलीयन यांचा संग्रह १९३० च्या दरम्यान प्रकाशित झाला. तर सुरेश भट यांचा 'रंग माझा वेगळा' १९७४ मध्ये प्रसिद्ध झाला. पहिली परंपरा स्वातंत्र्यपूर्व तर दुसरी साठोत्तर! त्यामुळे 'माधव' आणि 'सुरेश' यांच्यामध्ये वामनदादा आहेत याचे भान बाळगणे अगत्याचे ठरते. मराठी परंपरा सत्य दडपण्यात माहीर आहे. त्यामुळे वामनदादांची परंपरा कोणती? तिचे तात्त्विक अधिष्ठान काय? त्यांनी गझलेत कोणते नवे परिवर्तन घडवून आणले हे स्पष्ट केल्याशिवाय गझलेच्या इतिहासातील दडलेले सत्य पुढे येणार नाही.

माधवराव पटवर्धनांची गझल १९३३ च्या दरम्यान पुढे आली. त्यानंतर वामनदादांनीच गझल लिहिली आहे

हे ऐतिहासिक सत्य नाकारता येणार नाही. उर्दूमध्ये 'जदीद' म्हणजे सामाजिक, राजकीय, नवमतवाद आला. तसा वामनदादांच्या गझलेत आंबेडकरवाद आला. उर्दूत जसा तरक्कीपसंद म्हणजे सुधारणावाद आला तसा वामनदादांच्या गझलेत मानवतावाद आला. हे वामनदादाच्या गझलेने मराठी गझलेला दिलेले नवे आयाम आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. वामनदादांच्या गझलेत केवळ तंत्रावरच पकड नव्हे तर पारंपरीक संकेताना छेद देऊन नवे संकेत निर्माण करण्याचेही सामर्थ्य आहे. 'संग्रामपिटक' (संपा. प्रमोद वाळके) या गझलसंग्रहाच्या आधारे परामर्श घेता येईल.

काल जिंकले ते इथे हीन केले
पाऊली स्वत:च्या इथे लीन केले
भूमी भारताची हिरावून सारी
धनी भारताचे पराधीन केले
हिरावून सारे ताट अमृताचे
शिळे चाखणारे असे दीन केले
महापातकी या मनूच्या पिलांनी
आपुलेच वाडे सुखासीन केले
हिरावून सारे सुख माणसाचे
मुख वामनाचे उदासीन केले (संग्रामपिटक, पृ.२३)

पहिल्या दोन ओळीत एक विरोधाभास आहे. मात्र दुसऱ्या ओळीतील शेवटच्या भागात गोड कलात्मक धक्का देणारी भावचमत्कृती नाही तर एका ऐतिहासिक सामाजिक वास्तवाची भीषणता अधोरेखित होते. त्यामुळे पुढील प्रत्येक मिसऱ्यात एका दु:खद अनुभवाचे प्रकटीकरण होत राहते. इथेच वामनदादाच्या गझलेचे वेगळेपण स्पष्ट होते. येथे उर्दूमधील संकेताला पद्धतशीरपणे छेद दिलेला आहे. त्यामुळे या गझलेला सामाजिक परिमाण प्राप्त झाले आहेत. म्हणजे कोणताही यांत्रिकपणा न येताही सामाजिक वास्तवाचे चित्र स्पष्ट झाले आहे. शेवटच्या दोन ओळीत कवीला आपली गझल चमकवायची नाही किंवा कुठली चमत्कृती राबवायची नाही तर सामाजिक तक्रार करावयाची आहे. थोडक्यात वामनदादांच्या गझलेने तंत्राचे भान सांभाळूनही उर्दूतील गझल संकेताला छेद दिला आहे. गोड कलात्मक धक्का देण्याऐवजी सामाजिक वास्तव मुखरीत केले आहे. त्यातून गझलेचा वेगळा स्वभाव स्पष्ट झाला आहे. अनपेक्षित नवा अर्थ प्रकट करणारी गझल जीवनवादीच असते. अशा गझलेची सुरुवात वामनदादांपासून झाली आहे. वामनदादांच्या गझलेचे केंद्र समाज हेच आहे. किंबहुना ती समाजकेंद्रीच गझल आहे. सामाजिक घडामोडी, सामाजिक विसंगतीचे वास्तवचित्र त्यांच्या गझलेने रसिकांसमोर ठेवले आहे. उदा.

पाहिले ना जे कधी ते आज आम्ही पाहतो
जात असता माऊलीची लाज आम्ही पाहतो
भंगले संसार स्वप्न घर पित्याचे भंगले
बांधणारे भिंत धोकेबाज आम्ही पाहतो

सामाजिक जीवनात स्त्रियांच्या अब्रूची सुरक्षितता राहिलेली नाही. एकाच घरात विलगतेच्या भिंती उभ्या राहिल्या. घरात एकसंधता नाही.घरभेदी धोकेबाजांनी ही विभागणी केल्याचे प्रत्ययाला येते.समाजजीवनाचे बारकाईने निरीक्षण करणारी दृष्टी वामनदादांकडे आहे. म्हणून ते मानवतेच्या अभावाचे सामाजिक अवलक्षण अधोरेखित करतात. आंबेडकरी मानवतावाद हा वामनदादांच्या गझलेचा प्राण आहे. किंबहुना आंबेडकरी विचारप्रेरणेतून वामनदादांची गझल आकारास आली आहे. समताधिष्ठित समाजरचना, मानवी मूल्यांची प्रस्थापना हा आंबेडकरी मानवतावादाचा केंद्रबिंदू आहे. मानवी नात्याचे आणि माणसामाणसातील संबंधाचे दिग्दर्शन मानवतावादात केलेले असते. ''मानव आणि समाज अथवा त्याचे सामाजिक जीवन याविषयीच्या विचारांची व्यवस्था म्हणजे मानवतावाद''[१४] यात मानवाची प्रतिष्ठा, मूल्ये, मूलभूत अधिकार, हक्काचे समर्थन, समानता, न्याय, एकमेकांशी सदय वागणूक हे माणसामाणसातील संबंधाचे निकष

मानले गेले आहेत. मानव्याची प्रतिष्ठापना हे वामनदादांच्या गझलेचे उद्दिष्ट आहे.

माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे हीत व्हावे

अशी मानवतावादी दृष्टी प्रत्ययाला येते. माणसाच्या वाट्याला आलेल्या दु:खाचा कार्यकारणभाव बाबासाहेब आंबेडकर नावाच्या महामानवाने शोधून काढला. मानवतेच्या प्रस्थापनेसाठी आंबेडकरी मार्ग वामनदादांनी दाखविला आहे.

मी म्हणालो वामनाचा अन् मनूचा खून कर
तो म्हणाला हाच हाती बाण दे रे माणसा

परंपरागत, सनातनवादी विचारांना शह देणे म्हणजे मनूचा खून करणे होय. मानवी विकासाच्या मार्गात मनूने आपल्या कायदेसंहितेतून जे निर्बंध माणसावर लादले होते ते निर्बंध धूडकावून लावणे म्हणजे मनूचा खून करणे होय. मानवतेच्या मार्गावर पाऊल ठेवायचे असेलतर पहिल्यांदा हे अडथळे दूर सारणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून माणसामाणसात भेद निर्माण करणाऱ्या, मानवहितविरोधी अभद्र पराक्रम करणाऱ्या मनूच्या प्रतिमेचा निर्देश वामनदादांच्या गझलेत अनेक ठिकाणी आला आहे. उदा.

१. गेली हजार वर्षे नव्हता मनात हर्ष
मसनातल्या मनूचे आघात साहिले मी
२. महापातकी या मनूच्या पिलांनी
आपुलेच वाडे सुखासीन केले

म्हणून 'मनूचा खून' करणे ही अपरिहार्यता ठरली.त्यासाठी महामानव आंबेडकरांनी अग्नीबाणाने मनुस्मृतीशी संधान साधले.दहन केले, हा मनुस्मृतीचा प्रतिकात्मक खून होता.मानवतेच्या महामार्गावरील ही धोंड दूर करण्याची, जाहीर धिक्काराची ही अभिनव कृती होती. म्हणून वामनदादा म्हणतात

काल भीमाने तुकडे केले मनुस्मृतीच्या सापाचे
उगीच आता भिऊ नका रे या सापाच्या कातीला

मानवतावादाच्या प्रबलतेसाठी क्रांतीप्रवणता गतिशील असणे अपरिहार्य असते.एक निश्चित भूमिका मानवतावादाच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक असते.तशी भूमिका वरील द्विपदीमधून उजागर होताना दिसते. वामनदादांनी आपल्या गझलेतून आंबेडकरवादाची अभिव्यक्ती केली.

जातीपातीचे बीज ना उरावे दूर मसनात नेऊन पुरावे
लोप व्हावा, मनाच्या मळाचा झरा व्हावे अशा जीवनाचा

जातीविहीन समाज निर्माण व्हावा, मानवी मनातून माणुसकीचे झरे वाहावेत अशी समताधिष्ठीत समाजरचनेची आंबेडकरी भूमिकाच वरील शेरातून स्पष्ट झाली आहे.

भीमतत्त्वरूपी प्याला प्याले जीवनात सुखी ते झाले
अमृत पिताना हे वामन ती जीभ तुझी का पोळावी

आंबेडकरी विचारधनच माणसाला तारून नेणारे आहे असा विश्वास येथे प्रकट झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान तत्त्वज्ञाचे तत्त्वज्ञान आणि विचारांची अभिव्यक्ती आपल्या गझलेतून करणे ही वामनदादांच्या गझलेची नुदरत आहे. या गझलेला तात्त्विक अधिष्ठानाचा पाया आहे आणि मानवतावादाची झालर आहे. हीच खरी वामनदादांची गझलीयत आहे. सांस्कृतिक बिभत्स विचारधारेच्या विरोधात जे आंबेडकरी प्रतिकाराचे तत्त्वज्ञान उभे झाले

त्यातून विद्रोहाचा जन्म झाला.या विद्रोहाची प्रस्थापना वामनदादांच्या गझलेने केली आहे. उदा.

विषारी जगाचे विष गाळणारे
दात सारे सारे पाडणार आहे
कीड लागलेली मनूची प्रणाली
मनूच्या घराला धाडणार आहे

हा आंबेडकरी विचारातून प्राप्त झालेला दिशादर्शक विद्रोह आहे. वामनदादांच्या गझलेतील विद्रोही पवित्रे एक ठाम भूमिका घेऊन खंबीरपणे आणि आत्मविश्वासाने प्रकट होताना दिसतात.उदा.

पाहिला काल तुझा माज आम्ही धरणीवर
जिरवू तोच तुझा माज आम्ही धरणीवर
केला काल आम्ही संकटाशी लढताना
सामना तोच करू आज आम्ही धरणीवर

अशाप्रकारे बदलाची, परिवर्तनाची नांदी या विद्रोही पवित्र्यातून साक्षात होते. नवसमाजनिर्मितीची, एकजुटीची, समता प्रस्थापित करण्यासाठीची कृतिशीलता, अहिंसा तत्त्वांची अपरिहार्यता, मानवतावादाची निकड, माणुसकीची प्रस्थापना, बुद्ध आंबेडकरी नवनैतिकता या सर्व बाबी वामनदादांच्या गझलेशी एकरूप झाल्या आहेत. त्यातूनच त्यांच्या गझलेचा जदीदनामा सादर झाला आहे.

सकलांसाठी प्रकाशणारी उजळी धरणी सारी जी
अशीच भारी साथ असावी आज दिव्याच्या वातीला

समस्त मानवजातीला उजळून काढणारी समतेची ज्योत तेवत राहावी अशी मनोकामना या गझलेने व्यक्त केली आहे. माणुसकीचा जाहीरनामा सादर केला आहे. भारतासारख्या भूमीवर दुर्जनांनी पेरलेल्या अंधारबीजांचे समूळ उच्चाटन करण्यास्तव ही गझल सज्ज झाली आहे. समताधिष्ठित समाजरचनेचे स्वप्न साकार करण्यास्तव ती कटिबद्ध झाली आहे. हाच या गझलेचा जदीदनामा आहे. ही गझल आंबेडकरी चळवळीची गझल आहे. चळवळीतील चढउताराची ती साक्षीदार आहे. म्हणूनच आंबेडकरोत्तर काळातील सामाजिक, राजकीय जीवनातील बेकी फुट आणि चळवळीच्या वाताहतीची दुखरी नस तिने नेमकेपणाने पकडली आहे. ही वेदना अतिशय दु:खद अंत:करणाने व्यक्त झाली आहे.

१. भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयाच्या न्यारेच टोक असते
२. जात असता तात वदला ताज तख्ता या जपा
त्याच ठायी आज दुसरा ताज आम्ही पाहतो

नैतिकता हरविलेल्या सामाजिक मानसिकतेचे हे वास्तव अधिकच अस्वस्थ करणारे ठरते. आंबेडकरोत्तर चळवळीच्या वास्तवाला हात घालून या गझलेने अंतर्मुख केले आहे. या गझलेचे स्वरूप गहन गंभीर असून प्रातिनिधिक दु:खद स्वर त्यातून निनादत राहतो. वामनदादांच्या गझलेतील प्रतिमासृष्टीमुळेही नवता सिद्ध झाली आहे. सांस्कृतिक स्थित्यंतर हे त्यांच्या नवप्रतिमानिर्मितीचे एक महत्त्वाचे कारण ठरले आहे. त्यामुळे मराठी गझलेला, काव्यसृष्टीला अपरिचित असणाऱ्या असंख्य प्रतिमांनी त्यांची गझल अर्थसंपृक्त ठरली आहे. धम्मस्वीकाराने जसा इतिहास निर्माण केला तसाच भीमजयंतीनेही!

आली भल्या पहाटी गेली भल्या पहाटी
जनता तिनेच जागी केली भल्या पहाटी
वैशाख पौर्णिमेला देण्या पुन्हा उजाळा
एप्रिलमधील चवदा आली भल्या पहाटी

भीमजयंतीने घराघरात स्वाभिमानाचे जिणे पोहचविले. वामनदादाची गझल क्रांतितत्त्वाचे वहन करणारी आहे. क्रांतीतत्त्वाचा शिरपेच तिने आपल्या माथ्यावर धारण केला आहे. त्यांच्या गझलेतील प्रतिमासृष्टी हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा एवढी वैशिष्ट्यपूर्ण आहे. ''वामनदादा हे स्वतंत्र प्रज्ञेचे कवी आहेत. त्यांच्या गाण्यातून, कवितेतून येणाऱ्या प्रतिमा देखील स्वत:च्या आहेत. त्या प्रतिमा प्रतीकांना आंबेडकर चळवळीचा एक ऐतिहासिक संदर्भ आहे. मराठी भाषेत कधी नव्हत्या त्या प्रतिमांचा शोध वामनदादांना लागला आहे. ''[१५] वामनदादांच्या एकूणच काव्यकर्तृत्वासंबंधीचे हे एक प्रातिनिधिक मत आहे. त्यांच्या कवितेत शेकडो 'भीम प्रतिमा प्रत्ययाला येतात' 'भीम' ही समूहमनाची अढळ प्रतिमा आहे.

काय सांगू तुला आता भीम माझा कसा होता
लेकराला जशी माता भीम माझा तसा होता
काय सांगू तुला वामन भीम माझा कसा होता
सात ठिगळांच्या बंडीचा भीम माझा खिसा होता

आंबेडकरी कर्तृत्वाच्या प्रतिमांसह सामान्य माणसांच्या मनातील लाखमोलाची भावना व्यक्त करणाऱ्या भावप्रतिमा सार्थ ठरविण्यात ही गझल सफल झाली आहे. भीममाऊली, भीमाई यासारख्या भीमप्रतिमा वारंवार गझलांमधून साकार झाल्या आहेत. त्यामुळे भीम ही वामनदादांच्या गझलेची सूत्रप्रतिमा ठरली आहे. त्यांच्या गझलेत लाजवाब अशी प्रतीकात्मकता पाहावयास मिळते. नवी प्रतीकेही घडविली आहेत. उदा.

फुलेंच्या फुलबागेतून फुलांचा अर्क जमवूनी
मधाचे थेंब जो देतो अशा पोळ्यात आहे तो

वामनदादांचे हे मोहळ फुले आंबेडकरांच्या विचारविश्वाची महता स्पष्ट करणारे आहे. तसेच ते फुले आंबेडकर या प्रतीकाची प्रस्थापना करणारे आहे. प्रतीके निर्माण करण्याची विलक्षण हातोटी वामनदादाकडे आहे. भीमवाडी, भीमाचे घरटे, निळं निशाण, गौतमाचा गाव, फुलमाळी, भीमरायाचा मळा, नागांची नागनगरी, नागनदी, नागभूमी, चैत्यभूमी अशी असंख्य प्रतीके त्यांच्या गझलेत प्रत्ययाला येतात. थोडक्यात, गझलेतील प्रतिमासृष्टी आणि प्रतीकांच्या नवनिर्मितीने वामनदादांची गझल अतिशय अर्थसंपन्न ठरली आहे. नवनवी परिमाणे तिला प्राप्त झाली आहेत.

वामनपरी नादान मनूचा वर्चस्व सांगणारा
इतिहास खोडला मी भीमा तुझ्यामुळे

त्यांच्या गझलेनी वर्चस्ववादी इतिहास खोडला आणि नवससांस्कृतिक इतिहासाची मांडणी केली. आंबेडकरी गझल तरक्कीपसंद गझल नव्यानेच प्रस्थापित केली. जदीदनामा सादर केला. अशा स्वरूपाची गझल लिहिणारे वामनदादा हे मराठीतील पहिले गझलकार आहे. त्यांच्या गझलेने एकूणच नवा इतिहास प्रस्थापित केला आहे.

वामनदादानी स्थापित केलेल्या गझलेच्या मळवाटेवरून अनेक फुले आंबेडकरी गझलकारांनी गझलनिर्मिती केली आहे. त्यात प्रामुख्याने भाऊ पंचभाई, इ. मो. नारनवरे, गौरवकुमार आठवले, डी.बी. रत्नाकर, ल.स. रोकडे, सिद्धार्थ भगत,प्रमोद वाळके, रविप्रकाश चापके, किरणकुमार मडावी, विनोद बुरबुरे, सुरेश धनवे अशा अनेक गझलकारांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. या सर्व गझलकारांच्या अभिव्यक्तीवर फुले आंबेडकरी विचारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. या गझलांनी एक संघर्षाची भूमिका घेतली आहे असे दिसते.

येवू दिले न आम्हा गावामध्ये जयांनी
छातीवरी तयांच्या नाचून आज गावू
आम्ही लढू नव्याने मरणास झुंज देऊ
झेलून वार सारे आम्ही जिवंत राहू (भाऊ पंचभाई)

संघर्ष छेडण्याची एक नवी उभारी येथे प्रत्ययाला येते. त्याचप्रमाणे जगण्याची आसक्तीही पाहावयास मिळते. जिवंत राहण्यासाठी लढा आणि संघर्षाची अपरिहार्यता येथे स्पष्ट झाली आहे. ल.स. रोकडे यांची गझलही भीमसैनिकांना

बंधने तोडण्यासाठी आवाहन करताना दिसते. उदा.

हे भीमबांधवा रे ये भीमसैनिका रे
दावून भीमशक्ती तोडून टाक फासे (ल.स.रोकडे)

वर्चस्वबंधांना तोडून टाकण्यासाठी भीमशक्ती दाखवून देण्याची गरज येथे स्पष्ट झाली आहे. प्रतिकाराचे आंबेडकरी तत्त्वज्ञान वेळोवेळी संघर्षाचे भान जागविण्याचा प्रयत्न करते असे पदोपदी प्रत्ययाला येते.

सूर्य मला सांगून गेला पुन्हा आता रडू नको
देश पेटवाया निघालेल्यांना सैल सोडू नको (डी.बी. रत्नाकर)

सिद्धार्थ भगत यांची गझल तर लढाईचे भान तीव्रपणे व्यक्त करताना दिसते. आपणच आपल्या लढ्याचे नायक झाले पाहिजे असा निर्धार ती व्यक्त करताना दिसते.

रान समस्त एकदा पेटविलेच पाहिजे
आपण प्रश्न आपले सोडविलेच पाहिजे
आपण व्हायचे पुढे, नायक आपुले स्वतः
वाट बघायचे आता थांबविलेच पाहिजे (सिद्धार्थ भगत)

संघर्षाची सुरुवात स्वत:पासूनच केली पाहिजे असे या लढाईचे सूत्र आहे. फुले आंबेडकरी कवितेत जशी चळवळीच्या दुभंगलेपणाबद्दलची एक तिटकाऱ्याची भावना, गटबाजीच्या वास्तवावर टिकास्त्र सोडणे, अंतर्विरोधावर बोट ठेवणे ही प्रवृत्ती प्रत्ययाला येते. तशीच ती आंबेडकरी गझलकारांमध्येही दिसून येते. उदा.

१. नावाने भीमाच्या आम्ही व्यापार केला सुरु
थाटली नवी दुकाने संहार केला सुरू
(एफ. सी. मोरे)

२. गटागटात आम्ही तुला वाटून घेतले
वेळी अवेळी स्वार्थासाठी चाटून घेतले
(डी.बी. रत्नाकर)

३. आमची झालीच नाही एकता बाबा अजूनी
दोन पाट्या, तीन झेंडे एकट्या गावात आहे
(गौरवकुमार आठवले)

४. दुकानदाऱ्या सुरू तयांच्या कधी अशा अन् कधी तशाही
असून आम्ही तुझे शिपाई नको तिथेही मवाळ होतो
(सिद्धार्थ भगत)

सामाजिक जीवनातील हा अंतर्विरोध स्पष्ट करणे म्हणजे आत्मटिका करणेच होय. स्वार्थांधता, व्यापारी वृत्ती, विभाजन, आंबेडकरी बाणा म्यान करणे अशा अनेकविध वृत्तीप्रवृत्तींना उजागर करण्याचे काम या गझलांनी केले आहे. अभिव्यक्तीचा प्रकार कोणताही असो, कविता काय किंवा गझल काय दोन्हीकडे विषय मात्र समानच दिसतात. तत्त्वज्ञान किंवा विचारांच्या अनुषंगाने विचार केला तरी अशीच परिस्थिती पाहावयास मिळते याचे कारण एकच आहे ते म्हणजे प्रेरणास्थान आणि तात्त्विक अधिष्ठान. त्यामुळे निर्मितीच्या दिशाही ठरून गेल्या आहे. बुद्ध- फुले- आंबेडकर या विचारपरंपरेचा अंगिकार हे सूत्र गझलेतही प्रत्ययाला येते. उदा.

वसन काषाय लेवुनी निघाल्या या दिशा आता
तयाचे धम्म अनुसरणे तुझ्यासाठीच आहे ना
(प्रमोद वाळके)

आपले जगणे सार्थ ठरावे म्हणून तथागताच्या दानपात्रातील करुणरसाची केलेली याचना समर्पणाची भावना व्यक्त करते.

दे मला दानपात्रातील करुणारस पदस्था ह्या
शेवटी माझेही जगणे तुझ्यासाठीच आहे ना
(प्रमोद वाळके)

बुद्धविचार हाच जगण्याचा मार्ग आहे. ती एक जीवनप्रणाली आहे याबद्दल कवीमन निशंक आहे. म्हणून या विचारातील मूल्यांचे दान मागणारी धारणा अधिक प्रबळ होताना दिसते.

गाथेचे गौतमाच्या मी पान मागतो रे
या दीक्षाभूमीवरती मी दान मागतो रे
तो धम्म सारथी गा संघास हाक देई
समाजजागल्याचे प्रस्थान मागतो रे
(प्रमोद वाळके)

गौतमाच्या गाथेचे दान मागणारे हे मन समाजजागल्याच्या भूमिकेत परावर्तित होण्यासाठीही उत्सुक बनलेले दिसते. शेवटी दु:खाचा नाश करण्यासाठी तथागताशिवाय दुसरा कोणता मार्ग असू शकतो. थोडक्यात आपली प्रेरणा, तात्त्विक अधिष्ठान या परिप्रेक्ष्यात ही गझल आपले वेगळेपण राखताना दिसते. आंबेडकरी गझलेने सामाजिक भानही जागविले आहे. सामाजिक अंतर्विरोध उजागर करीत ती आपल्या निष्ठाही ढळू देत नाही. आपल्या परंपरेचे तिला नेमके भान आहे. या गझलेला वामनदादांच्या गझलेची परंपराच समृद्ध करावयाची आहे असे स्पष्टपणे प्रत्ययाला येते. म्हणूनच हे गझलकार आपल्या गझलेतून सामाजिक भानाचा पुरेपूर प्रत्यय देतात असे दिसून येते. 'स्व' सह समष्टी अशी तिची एकरूपता आहे.

गाव माझा एवढा आश्वस्त आहे
अन् सभोती लांडग्याची गस्त आहे
फक्त माझ्या गावचा हा प्रश्न नाही
आज सारा देश माझा त्रस्त आहे
(सिद्धार्थ भगत)

अशा असुरक्षित आणि चिंताक्रांत सामाजिक वास्तवाचा वेध या गझलेने घेतला आहे. माणसाचे जगणे महाग झाले आणि मरणे कठीण झाले आहे असा भोवतालाचा एक पेच जगण्याच्या संदर्भात निर्माण झाला आहे. समकालीन जीवनाच्या संदर्भात नवे स्थित्यंतर घडून आल्यामुळे प्रश्नांची तीव्रता वाढतच गेली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वातून देशापातळीवरच एक वेगळे अराजक निर्माण झाले आहे.

डौलात डोलतो हा झेंडा जरी तिरंगी
आहेत भोवताली माझ्या किती फिरंगी
तेव्हा गुलाम केले एकाच कंपनीने
आल्यात शेकडोनी आता तिच्या वतीने
नेतील देश सारा माझा रसातळाला
(सिद्धार्थ भगत)

अशावेळेस संघर्षाची दिशा कोणती असली पाहिजे याचेही दिग्दर्शन या गझलेने केले आहे. उदा.

आपुल्या बळे लढूया अपुले लढे गडे हो
नसतोच सोबतीला सगळा समाज काही

सामाजिक स्तरावरील संघर्षाच्या ताकदीची मर्यादा कवीने येथे सूचित केली आहे. सिद्धार्थ भगतसारख्या गझलकारांची अशी अभिव्यक्ती पाहिल्यानंतर ही त्यांची गझल वामनदादांची जदीदी आणि तरक्कीपसंद गझलेची परंपरा समर्थपणे पुढे नेत आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही असेच प्रमोद वाळके यांच्या गझलेबाबतही म्हणता येईल.

नवनिर्माणाच्या वाटेने ही गझल मार्गस्थ झाली आहे. यशवंत मनोहर यांनी प्रमोद वाळके यांच्या गझललेखनासंबंधी म्हटले आहे, ''आंबेडकरवादी गझलेचा संदर्भ घेतला तर वामनदादा कर्डकांनी जिला जन्म दिला त्या आंबेडकरवादी गझलेचे आजचे सर्वश्रेष्ठ शिलेदार लेखन ठरते अशी माझी धारणा आहे. ''[१६] हे मत अगदी रास्त आहे. थोडक्यात, वामनदादाच्या गझलेनी वर्चस्ववादी इतिहास खोडून काढण्याची नवी रीत रुढ केली आणि आंबेडकरी गझल, तरक्कीपसंद गझल नव्यानेच प्रस्थापित करून जदीदनामा सादर केला. अशा स्वरूपाची गझल लिहिणारे वामनदादा हे मराठीतील पहिले गझलकार ठरले आहेत. त्यांनी निर्मिलेली परंपरा पुढे चालू ठेवण्याचे कार्य भाऊ पंचभाई ते सिद्धार्थ भगत या पुढच्या पिढीने अतिशय समर्थपणे पार पाडले आहे.

समारोप

या दशकातील कवितेने समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक वास्तव मुखरीत करण्याचा प्रयत्न केला आहे. समकालीन जीवनात गरीब माणूस कुठे असेल, ग्लोबल व्यवस्थेत तो कुठे असेल, त्याच्या संघर्षाचे तत्त्वज्ञान कोणते, ग्लोबल व्यवस्थेत कोणत्या स्वरूपाचे लढे असू शकतील या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सांस्कृतिक संचिताचे अनौरस रूप याच काळात अधिक भडक झालेले दिसते. फुले - आंबेडकरी चळवळीच्या परिप्रेक्ष्यात चळवळीचे खंडित वास्तव, दलित मध्यमवर्गीय आत्मकेंद्रितता, धार्मिक मूलतत्त्वाद आणि फॅसिस्ट शक्तीचा क्रुर चेहरा या साऱ्यांचा शोध घेण्याचे कार्य या दशकातील कवितेने पार पाडले आहे.

जागतिकीकरण हे एक नवे स्थित्यंतर आहे. स्थित्यंतरामुळे जीवनपद्धतीवर परिणाम होत असतो. मूल्यांच्या संदर्भात बदल होत असतो. बदलत्या जीवनाचे संदर्भ साहित्यात प्रतिबिंबित होत असतात. त्यातून साहित्याचे वेगळेपणही सिद्ध होत असते. या दशकाच्या कवितेतही हा प्रत्यय येतो. महासत्तेचे वर्चस्व आणि दहशतीचा ताण फुले आंबेडकरी कवितेवर पडला आहे हेही प्रत्ययाला येते.

सांस्कृतिक पटलावरच्या वेदनांचा आलेख चितारणाऱ्या या कवितेने अतिशय टोकदार शोकसंवेदना व्यक्त केली आहे. वाट्याला आलेली वेदना आणि भडकलेले अंत:करण याचे साक्षात चित्र रेखाटले आहे. युवराज सोनटक्केसारख्या कवीने फुले आंबेडकरी कवितेच्या वाटचालीतील विस्तवी परंपरा कायम राखण्याचा प्रयत्न केला आहे. प्रियेशी संवाद साधताना त्यांच्या कवितेने जणू अग्नीसौंदर्याचे अलंकारच सजविले आहेत. प्रेमकवितेलाही सामाजिक भानाचा साज चढविला.

कैलास भाले यांच्या कवितेने मातंग समाजाचे विविधांगी जीवनदर्शन घडविले आहे. वास्तवदर्शी मांगवाडा त्याच्या जगण्याखुपण्यासह चित्रित केला आहे. जगण्यातील पेच आणि ताण स्पष्ट करून जुन्या आणि नव्या मांगवाड्यातील एक संघर्षही चित्रित केला आहे. या समाजाला लाचारीवर मात करण्यासाठीचे मनसुबे रचता आले नाही तशी क्षमता असूनही उकलता येण्यासारखे पीळ मनात कायमच ठेवले याविषयीचा उद्रेक व्यक्त केला आहे. अण्णाभाऊच्या फकिराची खरी ओळख मांगवाड्याला झालीच नाही. एकंदरीत एका विशिष्ट जातसमूहाचा अवकाश व्यापणाऱ्या या कवितेने जातीय आणि सामाजिक सत्य बेडरपणे व्यक्त केले आहे. अस्वस्थता, हतबलता आणि अंतर्मुखता याचा एकत्रित अनुभवाचा प्रत्यय दिला आहे. पेचदार अनुभूती वाचकांसमोर ठेवून सुन्नपणाचा अनुभव दिला आहे.

संवेदनाशून्यता सत्ताव्यवस्थेच्या रोमारोमात भिनलेली असल्यामुळे माणुसकीची जाणीव हद्दपार होते. तेव्हा

पुरोगामी म्हणवून घेणारी सरकारे किती निर्दयी आणि क्रुर आहेत याचा प्रत्यय येतो. जागतिकीकरणाच्या भांडवली व्यवस्थेमुळे स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याची खंत या कवितेने व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे सनातन्यांच्या प्रतिगामी कुटनितीवर तिक्ष्ण नजरेने जागता पहारा ठेवून जबाबदार नैतिकतेची मानवतावादी भूमिका ठामपणे मांडली आहे.

मारोतराव जाधव या बेलदार कवीने भटक्या विमुक्तांचा, जीवनातील घडामोडीचा जिवंत चित्रपटच साकारला. घाणीच्या साम्राज्यातील जगाचे विदृप रूप साकार केले आहे. चोरासारखा जीव गहाण ठेवून, दु:खावर दु:खाचे कलम करीत कुठवर जगायचे असा प्रश्न ठळकपणे अधोरेखित केला आहे. व्यवस्थेतील सत्तांध, मदांध आणि स्वार्थी प्रवृत्तीवर आसूड ओढत विविध पातळ्यावरील विद्रोहाच्या छटा प्रस्तुत केल्या आहेत. छळवणुकीच्या वाळवंटातील अन्याय अत्याचाराचे पिरॅमिड सपाट करण्याचा बेत या कवितेने आखला आहे.

काही कवितांमधून वस्तीला विकलांगता प्राप्त झाल्याचे चित्र, वैफल्याची फळे हाती लागल्याची शोकात्म अनुभूती, करंटेपणा आणि विपरीत भाव दर्शविणाऱ्या अनेकविध प्रतिमांचा आढळ होतो. कवितेच्या अर्थसमृद्धीसाठी नाविन्यपूर्ण प्रतिमांचे उपयोजन झाले आहे. एखादा कवी राजकीय संस्कृतीचे अध:पतन अत्यंत उपरोधिक स्वरात व्यक्त करताना दिसतो. सत्तेच्या आतबाहेर किंवा परिघावर कार्यकर्ता मरतो. चळवळ देशोधडीला लागते आणि समाजमन गटांगळ्या खात राहते असेही निरीक्षण नोंदविले आहे.

मरगळलेले वास्तव प्रदिप्त करण्याचा ध्यास या कवितेला लागला असून बदलासाठी अनिवार्य असणाऱ्या विचारतत्त्वांची शस्त्रे तिने पाजळून ठेवली आहेत. त्या शस्त्राच्या आधारे मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी युद्ध पुकारायचे आहे. इथल्या मातीत रुजलेले बुद्धतत्त्व आणि आगीतून उभे राहिलेले तेजतत्त्व असा सौंदयाविष्कार या कवितेने फुलविला आहे. आधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या काळात मूल्यांचा होत गेलेला ऱ्हास, नवसांस्कृतिक युगाचे आगमन, हरवत गेलेला माणुसकीचा गहिवर या सर्व गोष्टींची नोंद घेतली आहे. उद्याच्या सुंदर स्वप्नासाठी माणसाचा 'धम्म' रुजविण्यासाठी ही कविता कटिबद्ध झाली आहे. धंदयासाठी तत्त्व आणि विचारांचे भांडवल करायचे ही नवी व्यापारी निती प्रबोधनाच्या चळवळीतील मोठा अडसर ठरली आहे. या स्वार्थी व्यवहाराच्या महारोगापेक्षा कवितेचा रोग चांगला असल्याचा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे.

मच्छिंद्र चोरमारे यांच्या कवितेने मोडलेल्या माणसांची कथा सांगीतली आहे. या कथेत इथल्या संस्कृतीचा अमानुषपणा, तिच्या गनिमी काव्याचे तंत्र, माणसाचा बंद केलेला आवाज अशी अनेक उपकथानके आहेत. दु:खाचा काफिला हाकारताना येणारे अडथळे, अडसर यांचे चित्र रेखाटून जाणिवा आणि उणिवा अशी विरोधके मांडली आहेत. अंतर्विरोधाचा सूर येथे टिपेला पोहचलेला दिसतो. माणसाला नाकारणाऱ्या व्यवस्थेचा जहरीपणा नमूद केला आहे. कातडी सोलून काढणाऱ्या युगावरचे भाष्य केले आहे. अफूच्या गोळीतून जन्मलेली धुंदी गारद करण्याइतपत धमनीत भरून घेतलेली आग पेरीत नेण्याचे कार्य तत्परतेने पार पाडण्यासाठी सज्ज झालेला नायक या कवितेत उभा आहे. बुद्ध तत्त्वांचे रोपण करीत, गुंतागुंतीच्या वास्तवाला शब्दाकार देऊन तापलेल्या दिवसाचे विविधांगी पदर संयमशीलतेने उलगडून दाखविले आहेत.

प्रदूषित सामाजिक विस्कळीतपणा, राजकीय कावेबाजी, दगाबाजांचा उन्मादी विजय, दीशाहीन आंदोलन आणि चळवळीचा थांबलेपणा याविषयीची चिंता आणि चिंतन हे या कवितेचे केंद्रवर्ती विषय आहेत. प्रतिक्रांतीच्या भाषेवर वार करण्यासाठी क्रांतीचे स्फुल्लींग पेरणारी भाषा आत्मसात करण्याचे आवाहन करून ही कविता मूलतत्त्ववाद्यांच्या, प्रतिक्रांतीवाद्यांच्या आणि उजव्या शक्तींच्या भाषिक राजकीय खेळीचे रूप उजागर करते. समाजहिताच्या केवळ गप्पा मारणाऱ्या पोकळ बुद्धिवाद्यांचे वस्त्रहरण करते. देव आणि दैवतीकरण यामध्ये अडकलेल्या मनोवृत्तीला प्रश्नांकित करते. शोषक व्यवस्थेच्या भाषेचे कार्यलक्ष्यी प्रयोजन फसवे असल्याचे सिद्ध करून खुश्किच्या मार्गाने स्वार्थाचे इप्सित साध्य करू पाहणाऱ्या अध:पतित जगाचे भेसूर चित्र रेखाटून वाचकांना अस्वस्थ करीत अंतर्मुखतेपर्यंत घेऊन जाणे हे या कवितेचे

सामर्थ्य आहे.

समकालीन सामाजिक, सांस्कृतिक भयगंडाचा कार्यकारणभाव स्पष्ट करीत असुरक्षित सामाजिक वास्तवाचे विविधांगी पदर साक्षात केले आहेत. अस्तित्वाची अर्थपूर्णता आणि निर्थकता याचबरोबर मृत्यूविषयक चिंतन मांडले आहे. सामाजिक विकृतीचा औपरोधिक वेध घेताना या कवितेच्या भाषिक आकाराने अर्थपूर्णता सबल केली आहे. बुद्धकालीन इतिहासाचे स्मरण आणि वर्तमानाचे वास्तव यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न असे या कवितेचे सूत्र आहे.

सामाजिक संवेदना हरवत गेलेल्या मानसिकतेविषयीचे अस्वस्थ करणारे वास्तव रेखाटण्यात या कवितेला स्वारस्य आहे. ज्यांनी या भूमीचे मातृत्व नागविले, संवैधानिक कर्तृत्व पांगविले त्यांच्या समूळ संहारासाठी क्रांतीचे आगमन होण्याची अपरिहार्यता या कवितेने पटवून दिली आहे. अंधारयुगाला अखेरचा सलाम करून मुक्तीचा महासंगर आणि अस्मितेचा जागर घालण्याचा चंग बांधला आहे.

सौंदर्यबोधक प्रतिमेच्या अर्थाला शह देऊन वास्तवातील प्रतिमात्मतेचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. ऋतूप्रतिमांची अभावाच्या अनुभूतीशी सांगड घातल्यामुळे निसर्गचक्रातील विविध ऋतूंचे नैसर्गिक अर्थ पार बदलून गेले आहेत. सामाजिक ऋतूचक्राची स्थितीशीलता या प्रतिमाविश्वाने अधोरेखित केली आहे. या कवितेने फाटका संसार आणि हातावर पोटे असणाऱ्या मरणवाटेवरच्या प्रवाशांची वेदना मुखरीत केली आहे. आपण गाफील राहिलो तर काय काय अनाचार माजू शकेल याचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या कवितेला तात्त्विक वाद घालत इतिहासाची पुनर्मांडणी करावयाची आहे. घातपाती भेदनिती आणि अन्यायी परंपरेचे दाखले देत, 'देश म्हणजे देशातील नागरिक' हे मान्य नसलेल्या संघाच्या मनूवादी, देशद्रोही राष्ट्रवादाला प्रश्नांकित केले आहे. आधुनिक काळात पांढरपेशी व्यवस्थेने जगण्याच्या मार्गावर संभ्रमाचे धुके पसरविले. ते दूर करण्यासाठी, उन्नतीचा महामार्ग रोकणाऱ्या शक्तीच्या विरोधातील निर्णायक युद्धाची अपरिहार्यता व्यक्त केली आहे. सारं काही आपोआप बदलेल असं मानणाऱ्या निष्क्रिय कवी प्रवृत्तीला आव्हान दिले आहे. फॅशनेबल स्त्रीमुक्ती चळवळीचा टेंभा मिरवून प्रदर्शन करणाऱ्या प्रवृत्तीवरचे तिखट भाष्य केले आहे.

माणसाच्या जीवनातील कुरूपता, विरूपता आणि विषमता नष्ट होऊन मानवी जीवनाला निसर्गदत्त सुंदरपण यावे या जीवनदृष्टीच्या ध्यासातून या कवितेचा आविष्कार झाला आहे. माणूस केवळ मनुष्यसदृश झाला पण मनुष्यत्वाचे काय? असा जीवघेणा प्रश्न या कवितेसमोर आहे. त्यामुळे माणुसकीचे विकेंद्रीकरण होण्याची अपरिहार्यता व्यक्त झाली आहे. माणसाचा चेहराच या युगाने पुसून टाकला आहे. फेकलेल्या, नाकारल्या गेलेल्या, पुसून टाकलेल्यांच्या अस्तित्वाचे प्रश्न या कवितेत सर्वत्र पाहावयास मिळतात.

एकूणच फुले आंबेडकरी कवितेत चळवळ, नेतृत्व याबद्दलचा आकांततांडव जोरात सुरू आहे. नेतृत्वाबद्दल आगपाखड केली जाते, मात्र त्यामागील कार्यकारणभावाची चिकित्सा करण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. चळवळीला दुषणे देण्याची एक लाटच कवितेत आली आहे. त्याबाबत अभिनिविशाने भाष्य करण्याची एक टूम पाहावयास मिळते.

दु:खाकडे सकारात्मकतेने पाहण्याची बुद्ध विचाराची दृष्टी या कवितेला लाभली आहे. धर्म आणि जातीने माणसांच्या संवेदनाही विभाजीत केल्या आहेत त्यामुळेच माणुसकीच्या लढाईत पराभूत झाल्याचा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. पारंपरीक सनातन मानसिकतेची तिरस्करणीय चलाखी उजागर करणारी ही कविता नव्या शतकाकडे साशंक नजरेने पाहताना दिसते.

केतन पिंपळापुरे या समर्थ कवीच्या कवितेला धम्मक्रांतीचे जबरदस्त आकर्षण आहे. सृष्टीच्या पुनर्रचनेचे वेड आहे. मूल्यगर्भता केंद्रस्थानी ठेवून क्रांतदर्शत्वाची पखरण करणारी कविता अतिशय महत्त्वपूर्ण ठरली आहे. नव्या जगाच्या नवनिर्माणासाठी दाहक अग्निपर्वाचे एक तळपते सौंदर्य या कवितेने फुलविले आहे. अग्निदिव्यातून गेल्याशिवाय वेदनांचा मुक्तीमार्ग मिळत नसतो. दु:ख आणि वेदनेतूनच नवे सृजन उदयास येत असते. असा विचार जागोजाग मांडला आहे. सृजनासाठी जन्मव्याकुळ कुस शोधण्यास्तव ती मार्गस्थ झाली आहे. मानवमुक्तीच्या आंबेडकरी आंदोलनाचा तळपता

इतिहास पुढ्यात ठेवून आंबेडकरी क्रांतीचा जागर तिने घातला आहे.

ग्लोबल गावाच्या अतिक्रमणामुळे उजाड आणि विराण होत गेलेल्या गावाचे विषण्ण करणारे चित्र रेखाटले आहे. लोकशाहीच्या बुरख्याआड फॅसिझम क्रुरपणे कार्यरत असल्यामुळे लोकशाही धोक्यात आली. नाझीझमच्या नियोगातून मूलतत्त्ववाद्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद जन्मास आला. वंशवर्णवादाने देश बर्बादीच्या उंबरठ्यावर उभा आहे. हा देश महासत्तेचा बटिक बनला आहे. असे निरीक्षण नोंदविले आहे.

विणलेल्या कोषात गुदमरून गेलेल्या स्त्रीविश्वाचे मूक हुंदके या कवितेने उजागर केले आहेत. आत्मटिकेला धिटपणे सामोरे जाणे हा तिचा स्वभाव आहे. वर्गांतर झालेल्या दलितांची मानसिकता आणि जगण्याच्या वास्तवाचे रूप औपरोधिक अंगाने मुखरीत करण्याचा जोरदार प्रयत्न या कवितेत दिसून येतो. या कवितांनी प्रतिकांच्या माध्यमातून सांस्कृतिक ठेव्याची पुनर्स्थापना केली आहे. त्याचबरोबर हिंदू व्यवस्थेअंतर्गत असलेल्या प्रतिमा प्रतीकांना निर्भर्त्सित करून विद्रोहाची अभिव्यक्ती करण्याचा एक मार्ग अनुसरला आहे. त्यातून एक नैतिक अधिष्ठान कवितेला प्राप्त करून दिले आहे. विद्रोही आशय प्रकट करण्यासाठी विद्रोही मानसिकता या कवितेतून प्रकट झाली आहे.

अरुण काळेच्या कवितेने फुले आंबेडकरी कवितेला अनेकविध वैशिष्ट्ये प्राप्त करून दिली आहेत. समकालीन वास्तवाची समांतर कविता म्हणून मौलीक ठरलेल्या या कवितेने जागतिकीकरणाच्या कराल रूपातून अस्तित्वात आलेल्या शोषक व्यवस्थेचे ताणेबाणे, शोषणाच्या तऱ्हा, वर्चस्वाचे रूप - विदृप स्पष्ट करून मल्टी लुटालुटीच्या युगावरचे भाष्य केले आहे. एकीकडे सर्वप्रकारच्या बलसत्ता आणि दुसरीकडे सर्ववंचितांची दुबळी दुनिया यात दुबळ्यांचा पराभव अटळच आहे याविषयीचा लेखाजोखा मांडला आहे.

या कवितेने समूहमनाच्या अनेकस्तरीय भाषिक रूपांना अतिशय आत्मियतेने कवटाळले आहे. प्रादेशिक, बोली, घरगुती, बोलभाषा, विविध जाती - पोटजातीची, अधोविश्वाची, भायगिरी, टपोरी लोकांची, भिकारी, फकीर, टिनटप्पर - रद्दीलोखंडवाले, तुरुंगातील कैदी, आयभैन आणि बापलेकासह संगणकयुग आणि आय.टी पार्काची अशा अनेकस्तरीय भाषांचा गलबला आपल्या कवितेत मेळविला आहे. नियमबद्ध, व्याकरणिक, शिष्टसंमत भाषाव्यस्थेला फाटा देण्याचा एक जातिवंत मार्ग म्हणूनही या भाषिक स्तराचे अधिक्य कवितेच्या केंद्रस्थानी येते. कवितेतील भाषिक संघटन वाचकांना भारून टाकते. आम जनतेची खास भाषा या निमित्ताने कवितेच्या केंद्रस्थानी आली आहे.

अरुण काळेची कविता हा एकूणच मराठी कवितेचा महत्त्वाचा टप्पा आहे. भारतीय कवितेतील नवे वळणआहे. नव्या युगाची सर्वस्वी नवी प्रतिमासृष्टी घडविण्यात ही कविता कमालीची यशस्वी ठरली आहे. आशयाभिव्यक्तीच्या नाविन्यासह विचारानुभवाचे सौष्ठव तिला प्राप्त झाले आहे.

स्त्रियांच्या कवितेनी विशिष्टता राखली आहे. प्रज्ञा पवारसारख्या कवयित्रीने लादलेल्या बाईपणाचा पसारा मांडला आहे. बाईच्या बाईपणाला गृहीत धरण्याचे दिवस आता राहिले नाहीत असा इशाराच समग्र पुरुषजातीला दिला आहे. बाईपणाच्या दु:खाचा प्रदीर्घ आलेख उत्कट जीवघेण्या धगीने मांडला आहे. पुरुषी हुकुमशाही रक्ताचे मानस आणि चिवटपणा स्पष्ट केला आहे. सांस्कृतिक संदर्भात एक मजबूत विधान केले आहे. संस्कृतीमातेच्या आदिबंधातून विरोधाभासी मातृत्वाचे खलनायकी विदृप रूप साकारले आहे. चटक्यांच्या वणव्यांचा प्रदीर्घ इतिहास पाठीवर घेऊन फिरणारी स्त्री या कवितेत चित्रित झाली आहे. वर्तमानातील स्त्रीजीवनाची सजगता अतिशय मार्मिकपणे चित्रित केली आहे. तृष्णेमुळे निर्माण होणाऱ्या दु:खाचे दाखले देत स्त्रीच्या आत्मभानजागृतीची अपरिहार्यता व्यक्त केली आहे. समग्राशी डोळा भिडवून समकालीन स्त्रीजगण्याचा परिप्रेक्ष्य कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे.

या कवितेने नव्या शतकातील थेरीगाथा नव्याने लिहिण्याचा संकल्प सोडला आहे. गृहीत स्त्रीप्रतिमेला तडा देण्याचे काम केले आहे. पुरुषी अधिसत्तेला नाकारत ग्लोबल तिठ्यावरील वास्तववादी पेच वाचकांसमोर ठेवला आहे. वास्तवाच्या रणभूमीवर निखळ अस्तित्वासह एक ठाम भूमिका घेऊन वर्तमानाच्या स्थितीशीलतेवर हल्ला करणारे स्त्रीरूप

कवितेत प्रत्ययाला येते. बुद्धाच्या बुद्धत्वापेक्षा यशोधरेचा पारंपरीक, दैहिक आणि दार्शनिक काळोख मोजण्यात कवयित्रीला अधिक स्वारस्य आहे. पुराणातल्या सावित्रीच्या गुळगुळीत मिथकाऐवजी अंतर्बाह्य राजकारणी असे सावित्रीबाई फुल्यांचे रूप साक्षात करण्याचा या कवितेचा प्रयत्न आहे. स्वत्वाचा, अस्मितेचा आरपार गहिरा उजेड शोधायला निघालेल्या या कवितेने प्रखर सत्याचे आदिघरही शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

इतर अनेक कवयित्रीनी आपल्या कवितेतून आपल्या विभाजनाचे खंडित वास्तव अधोरेखित केले आहे. हतबल आणि मजबूर झालेल्या स्त्रीमनाचे आक्रंदन प्रातिनिधिक रूपात प्रकट झाले आहे. घर आणि बाजार या परिप्रेक्ष्यात स्त्रीजीवनाचा लोलक हेलकावताना दिसतो. घर नावाची व्यवस्था स्त्रीचे यंत्रात रूपांतर करून टाकते. बाजार व्यवस्था तिच्या शरीराचे वस्तूकरण करते. ग्लोबल व्यवस्था तिचे चामडी नाण्यात रूपांतर करते. नवरा नावाची व्यवस्था वेगवेगळ्या प्रहराप्रमाणे अपेक्षा ठेवत असते. संसार नावाच्या व्यवस्थेने तिला स्वप्न पाहण्याची मुभा ठेवली नाही. असे व्यवस्थेच्या अनेकविध पातळ्यांवरील शोषणाचे स्तर स्पष्ट झाले आहेत. स्त्रीला फक्त शरीर असते. भावना, संवेदना नसतातच असे गृहीत धरून व्यवहार करणाऱ्या व्यवस्थेचे रूप, प्रारूप उजागर केले आहे.

स्त्रियांच्या कवितेनी अनेक महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली आहेत. उदा. समाजसेवक असणारा माणूस घरात नवराच असतो. पुरुषाचा मुखवटा आणि चेहरा याचा थांगपत्ता लागत नाही. पुरुष कावेबाजी आणि दुटप्पी वर्तनातून कार्यभाग साधतो. एकाकी वाटचाल करणाऱ्या स्त्रियांची पुरुषमंडळी गोची करतात. हा देश म्हणजे जणू भाजलेल्या जखमांचा ढिगारा आहे असेही नोंदविले आहे. पुरुषी व्यवस्थेत 'माझ्या देहावर स्वामीत्व हवं आहे, पुरुषाचा मालकी हक्क नको' अशी बंडखोर भावना व्यक्त झाली आहे. परिवर्तन आणि बदल या संदर्भात चढ्या आवाजात चर्चा करणे कसे फोलपणाचे आहे हेही दाखवून दिले आहे.

आदिवासी जगातून आलेल्या कवयित्रींनी आंबेडकरी प्रेरणेतून स्त्रीजगताच्या संदर्भात एक विशिष्ट भूमिका घेतली आहे. माणसाला जन्माला घालण्याचे सामर्थ्य केवळ स्त्रीमध्येच असल्याचे ठामपणे सांगून वर्णव्यवस्थेच्या तत्त्वज्ञानाला आणि वैदिक परंपरेच्या दांभिकपणाला प्रश्नांकित करून विज्ञाननिष्ठेचा मार्ग दाखविला आहे. पुरुषसुक्ताची पोलखोल करून इतिहासाच्या पुनर्लेखनाची आणि पुनर्मांडणीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आदिवासींना 'वनवासी' ठरवू पाहणाऱ्या मूलतत्त्ववाद्यांना बाहेरचा रस्ता दाखविण्याचे धाडस दाखविले आहे. त्याचप्रमाणे भूतदयावाद्यांची खिल्ली उडवत आंबेडकरी स्वाभिमानी बाण्याचा संदेश या कवितेने दिला आहे.

कवयित्रींच्या परंपरेत आंबेडकरी गीते लिहिण्याचाही प्रयत्न झाला आहे. या गीतरचनेच्या माध्यमातून अनेकविध आंबेडकर प्रतिमा आणि प्रतीकांचे उपयोजन झाले आहे. त्यात उपदेशपर रचनाही पाहावयास मिळतात. स्त्रीमुक्तीचा उद्‌गार बुद्ध - फुले - आंबेडकर या परंपरेनेच या देशात निनादत ठेवला असा उच्चार या गीतांनी केला आहे. आंबेडकरी कर्तृत्वाला साद घालतानाच चळवळीला योगदान देणाऱ्या महनीय व्यक्तींच्या कार्याचे मोलही सांगीतले आहे. स्त्रीदु:खाला वाट मोकळी करून देतानाच तिचे सामर्थ्यही स्पष्ट केले आहे.

एकंदरीत, स्त्रियांची कविता हा फुले आंबेडकरी कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण विभाग आहे. या कवितांनी प्रक्षुब्ध आणि अस्वस्थ मनस्थितीचा प्रत्यय दिला आहे. हरवलेपणाची जाणीव व्यक्त करतानाच क्षोभही व्यक्त केला आहे. चार भिंतीच्या आतील मूक आकांत, उदासी आणि कोंडलेल्या श्वासामुळे होणाऱ्या तडफड आणि तगमगीचे चित्र स्पष्ट केले आहे. तळापासून मूळापर्यंत एकाकी तप्तपणा अंगभर लपेटून घेणारे, अग्निफुलांचा रंगसोहळा पाहणारे आणि मानवतेचे सोहळे साजरे करण्याचे डोहाळे लागलेले स्त्रीमन या कवितातून व्यक्त झाले आहे. आपण ज्योतिबाच्या सावित्रीसारख्या असून दुनिया आपल्यासाठी धगधगत्या ज्वालेसारखी असल्याचे भान या कवयित्रींनी जागविले आहे.

वामनदादा कर्डक हे आंबेडकरी गझलेचे आरंभबिंदू आहेत. त्याची गझल समाज केंद्री असून आंबेडकरी मानवतावाद हा तिचा प्राण आहे. मानव्याची प्रतिष्ठापणा हे तिचे उद्दिष्ट आहे. तिने आंबेडकरी विद्रोहाची प्रस्थापना केली

आहे. बुद्ध आंबेडकरी नवनैतिकतेतून त्यांच्या गझलेचा जदीदनामा सादर झाला आहे. त्यांच्या गझलेतील प्रतिमासृष्टीमुळे नवता सिद्ध झाली आहे. या प्रतिमा प्रतीकांना आंबेडकर चळवळीचा ऐतिहासिक संदर्भ आहे. त्यांच्या गझलेने वर्चस्ववादी इतिहास सोडून नवसांस्कृतिक इतिहासाची मांडणी केली. तरक्कीपसंद गझल नव्यानेच प्रस्थापित केली. अशा स्वरूपाची गझल लिहिणारे वामनदादा हे मराठीतील पहिले गझलकार ठरले आहेत.

दलित कवितेप्रमाणेच बुद्ध-फुले-आंबेडकर या विचार परंपरेचा अंगिकार हे सूत्र आंबेडकरी गझलेत प्रत्ययाला येते. वामनदादांनी निर्मिलेली परंपरा पुढे चालू ठेवण्याचे कार्य भाई पंचभाई ते सिद्धार्थ भगत या पुढच्या पिढीने अतिशय समर्थपणे पार पाडले आहे.

■

संदर्भ सूची

■

१. युवराज सोनटक्के, (प्रसंगोपात), अग्निशाळा
२. शत्रुघ्न जाधव, कवितारती, जुलै २००३
३. कैलास भाले, (मनोगत), पोळणाऱ्या सावल्या २००१
४. यशवंत मनोहर, (प्रस्तावना), पोळणाऱ्या सावल्या, कैलास भाले
५. मारोतराव जाधव, (मनोगत), आडीवाडी
६. अशोक पळवेकर, (प्रस्तावना) वज्रनाद, दिगंबर झाडे
७. शरद बेडेकर, लोकसत्ता, दि. ३१ ऑगस्ट २०१५
८. संजय मून, दर्शन, ए - मे - जून २००६
९. विवेक जोग, लक्षवेधी पुस्तके, ललित, मार्च २००५
१०. मच्छिंद्र चोरमारे, मनोगत - तापलेले दिवस
११. केतन पिंपळापुरे, मनोगत, डेमोफून
१२. वामनदादा कर्डक, माझ्या जीवनाचं गाणं, आत्मचरित्र, पृ. १७
१३. सागर जाधव, माधव गायकवाड, (संपादकीय)
महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड १
१४. सदा कऱ्हाडे, साहित्य आणि समाज, पृ. २२
१५. अविनाश डोळस, वामनदादा कर्डक यांची गीतरचना
(संपा. परशुराम गिमेकर), पृ. ५९
१६. यशवंत मनोहर, (प्रस्तावना), प्रश्नांची गझल, प्रमोद वाळके

उपसंहार

प्रकरण : ६

उपसंहार

कोणत्याही कालखंडाच्या इतिहासाचा वेध घेताना त्या कालखंडाची पार्श्वभूमी आणि पूर्वपक्ष सांगणे अपरिहार्य ठरते. आंबेडकरपूर्व काळातील चळवळी आणि साहित्याविष्कार यांचा विचार करता असे दिसून येते, की भारतीय संदर्भात प्रबोधनाच्या चळवळीसाठी एकोणिसावे शतक उजाडावे लागले. म. फुले आणि त्यांच्या चळवळीमुळे भारतात प्रबोधनाचे युग अवतरले. फुल्यांच्या चळवळीने मानवतावाद, बुद्धिप्रामाण्यवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मानवी मूल्यांची जोपासना केली. जातीव्यवस्थेच्या दडपणाखाली जगणारा माणूस आपली उन्नती करून घेऊ शकत नाही. आत्मोन्नतीच्या आड येणाऱ्या सर्व बंधनांना झुगारून दिले पाहिजे हा फुल्यांच्या विचारांचा केंद्रवर्ती आशय आहे. सामाजिक लढ्यांचा आवाज फुल्यांनी सांस्कृतिक माध्यमातून मुखरीत केला.त्यांची एकूणसाहित्यनिर्मिती म्हणजे शुद्रातिशुद्रांच्या शोषणविरुद्धचा पहिला विद्रोही आवाज होता.

फुल्यांच्या काळातच उदयास आलेले गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागुजी बनसोडे इ.समाजसुधारक लेखक, कवींनी १९ व्या शतकात पार पाडलेले समाजकार्य आणि त्यांचा लेखनप्रपंच हा आंबेडकरपूर्व काळातील एक महत्त्वपूर्ण ठेवा आहे. गोपाळबाबा वलंगकर हे आधुनिक काळातील पहिले दलित कवी ठरतात.त्यांचे पद्यलेखन म्हणजे सामाजिक अंतरंगाचा स्फोटक आशय. त्यांनी म. फुल्यांच्या अखंड रचनेचा वारसा पुढे चालू ठेवला. अखंडाच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा मुखरीत केल्या. दलित-पिडितांमध्ये संघर्षाचे भान जागविले. पुढील काळात हरिभाऊ तोरणे, गणेश अक्काजी गवई, भाऊ फक्कड इ.शाहिरांनी प्रबोधनाचे महान कार्य केले. फुल्यांचा विचार आणि चळवळीच्या प्रभावातून उदयाला आलेल्या वरील सर्व कवी, लेखक, शाहिरांनी आपल्या कवितेतून परिवर्तनवादी विचार प्रकट केला. मुक्तीसाठी संघर्ष हेच या परंपरेतील काव्याचे सूत्र होते. फुल्यांच्या निधनानंतर ही परंपरा खंडित झाल्याचे दिसून येते.

२० व्या शतकातील आंबेडकरी चळवळ हे मानवमुक्तीच्या आंदोलनाचे ऐतिहासिक पर्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ सुरू केली.स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय या मानवी मूल्यांचा पुरस्कार डॉ. आंबेडकरांनी केला.या मूल्यांच्या आड येणाऱ्या रुढी, परंपरा, धर्म, धर्मग्रंथ या सर्व गोष्टींना त्यांनी नकार दिला. समाजवादी समाजरचनेची निर्मिती हे डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे मुख्य सूत्र होते. कोणत्याही काळात समाज, संस्कृती, तत्त्वज्ञाने, विचार, चळवळी यांचा प्रभाव साहित्यावर पडत असतो.सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय चळवळीचे नेतृत्व आंबेडकरांनी स्वीकारल्यानंतर चळवळीच्या गरजेतून विचारांच्या प्रसारासाठी, लोकप्रबोधनासाठी आंबेडकरी जलसे आकाराला आले. आंबेडकरी चळवळीच्या पायाभरणीच्या काळात आंबेडकरी जलशांनी मौलिक स्वरूपाचे कार्य केले.

आंबेडकरी जलशांच्या वाटचालीत साधारणतः १९३०-४५ या काळात अनेक कलावंतांनी आपले योगदान दिले. त्यात प्रामुख्याने भीमराव करडक, पांडुरंग गोविंद पवार, दिनकर भीमाजी भोसले, रामचंद्र आंडागळे, शिवराम

गडकरी, रामचंद्र सोनवणे, केरुजी घेगडे, केरुबुवा गायकवाड, अर्जुन भालेराव, केशव सुका आहेर, पतितपावनदास, अमृतबुवा बावस्कर, चांगदेव खैरमोडे अशा असंख्य कलावंतांचा समावेश आहे. जलसा म्हणजे अस्पृश्यांच्या माणुसकीच्या हक्कांचा साद्यंत इतिहास होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय बैठकीवरून जो बहुमोल उपदेश करीत, जो संदेश देत त्या संदेशाचा आणि उपदेशाचा अनुवाद म्हणजे जलसा होय. जलशाचे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्व, विचार, तत्त्वज्ञान आणि कर्तृत्वापासून जलसाकारांना प्रेरणा मिळाली. जलशातील आशय पद्यात्मक असून हा आशय डॉ. आंबेडकरांच्या उदयापासून त्यांच्या महापरिनिर्वाणापर्यंतच्या समकालीन घटनाप्रसंगांचा आणि चळवळीचा आलेख चितारणारा आहे. भीमराव कर्डक हे आंबेडकरी जलशाचे आद्य प्रवर्तक होत.

जलशातील गीतांनी हिंदू धर्मातील दांभिकता, सनातनी वृत्ती, सांस्कृतिक क्षेत्रातील अंतर्विरोध इ.अनेक गोष्टींचे दर्शन घडविले.जातिभेद, अस्पृश्यता, महारवतन, सावकारी, शिक्षण अशा अनेक विषयांना स्पर्श करून दलितांमध्ये स्वत्व आणि स्वाभिमान जागा करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य पार पाडले.दलितांचे प्रबोधन केले. काही शाहिरांनी पाळणा, पोवाडा, फटका, स्त्रीगीते अशाही रचना केल्या आहेत. आंबेडकरी चळवळीतील सत्याग्रह, महाडचा संगर, मनुस्मृतीदहन, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, मजूर पक्ष, धम्मस्वीकार असे अनेक विषय आपल्या काव्यरचनेतून हाताळले आहेत. आंबेडकरी कर्तृत्व आणि व्यक्तित्व अतिशय साध्या सोप्या भाषेत मात्र प्रभावीपणे रेखाटण्यात शाहिरांची लेखनी यशस्वी ठरली आहे. जलशातील काव्यातून सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्थितीगतीचे निरीक्षण लोकभाषेतूनच प्रभावीपणे नोंदविले आहे. विविध भाषिक रूपांचा अविष्कारही त्यातून झाला आहे. हिंदू देवदेवताना नकार देताना या देवदेवताना आग लावण्याची भाषा प्रकटली आहे. गुलामीचा धिक्कार आणि ताठ बाण्याचा स्वीकार हे सूत्र सर्वत्रच आढळून येते. दलितांना स्वाभिमान शिकवणारी, त्यांच्या भावभावनांना बोलके करणारी भाषा आणि परंपरागत मानसिकता बदलण्यासाठीची कडवट भाषा अशी विविध रूपे शाहिरांच्या रचनेतून प्रकट झाली आहेत. प्रस्थापित व्यवस्थेला नकार आणि व्यवस्थेच्या विरोधातील विद्रोही भाषेतून बंडखोरीचा संदेश देण्यात जलशातील काव्यरचना यशस्वी ठरली आहे. काळ आणि लोकमानस याचाही प्रभाव या शाहिरी रचनेवर दिसून येतो.

आंबेडकरी जलसे मंदावल्यानंतर आंबेडकरी शाहिरांनी वेगवेगळ्या पद्धतीने चळवळीसाठी गाणी लिहून लोकांसमोर सादर केली. बैठ्या गायन पार्ट्यांच्या माध्यमातून हे सादरीकरण करण्यात आले. त्यात प्रामुख्याने वामनदादा कर्डक, राजानंद गडपायले, श्रीधर ओहळ, सदानंद वाद्रे, धरमदास मोहिते, नागोराव पाटणकर, दिनबंधू, दलितानंद, लक्ष्मण केदार हे बैठ्या गायनातील पहिल्या पिढिचे कवी होत. आंबेडकरी विचाराने प्राप्त झालेला दृष्टिकोन मांडण्याचा जोरदार प्रयत्न या गीतकाव्यामागे आहे. विचार, प्रचार आणि प्रसारासाठी काव्यनिर्मिती ही विसाव्या शतकातील महत्त्वपूर्ण घटना आहे. गायनपार्ट्या आणि भजनी मंडळांचे कार्य ह्या काळाचा विचार केल्यास फारच महत्त्वपूर्ण ठरते. सर्व कलावंतांनी आपल्या काव्यातून रुढी, परंपरांचे थोतांड झिडकारून तथागत बुद्धाचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आणि आंबेडकरी मुक्तीसंग्रामाचे रूप जनतेपर्यंत पोहचविले. आंबेडकरी विचारकृती लोकमनात रुजविण्याचे कार्य या गीतकाव्यानी केले म्हणून या काव्यप्रकाराला 'आंबेडकरी लोकगीत' असे म्हटले जाते.

वामन कर्डकांच्या काळात अनेक लोक लिहिते झाले आणि गीतकाव्यातून आंबेडकरी चळवळीला मोठे बळ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न झाला. आंबेडकरी लोकगीतांसोबतच बुद्धगीताच्या माध्यमातून प्रबोधनाचे महान कार्य साधले आहे. चळवळीचा एक भाग म्हणून हे काव्य निर्माण झाले हे लक्षात घेणे आवश्यक ठरते. आंबेडकरी विचार घराघरात, झोपड्या झोपड्यातील कानामनात पोहचविण्याचे कार्य या गीतकाव्यांनी केले आहे. चळवळ गतीमान करण्याच्या प्रेरणेतून या गीतकाव्याचा जन्म झाला आहे. म्हणून ते आंबेडकरी चळवळीतील ऐतिहासिक पर्व ठरले आहे.

आंबेडकरी लोकगीतांचा १९४५- १९७० हा कालखंड बहराचा कालखंड म्हणता येईल. दलित कवितेच्या उदयानंतरही ही लोकगीते वेगवेगळ्या माध्यमातून सादर होत राहिली. आजही ऑर्केस्ट्रा, सीडी, कॅसेट्सच्या माध्यमातून ऐकायला मिळतात. बुद्ध- फुले-आंबेडकर या विचारपरंपरेतून प्राप्त झालेली मूल्ये केंद्रस्थानी ठेवून आंबेडकरी

लोकगीतांची निर्मिती झाली आहे. आंबेडकरी लोकगीतांचा आविष्कार आंबेडकरी चळवळीला समांतर आहे. किंबहुना तो चळवळीचाच एक भाग आहे. प्रबोधन, लोकजागृती हे या गीतांचे उद्दिष्ट आहे. आंबेडकरांचा विचार, उपदेश , शिक्षणापासून धम्मापर्यंतचा विचार आणि प्रचार प्रसार करण्याचे कार्य या गीतांनी पार पाडले आहे. आंबेडकरी लोकगीतांनी वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र आणि चारित्र्य नितळपणे शब्दांच्या माध्यमातून मांडण्याची एक नवी रीत या गीतांनी घालून दिली. साध्यासोप्या शब्दकळेतून स्फुर्तीप्रद आशय पेरला. दलितांमध्ये अस्मिताजागृती करण्यासाठी आंबेडकरी चळवळीच्या धगधगत्या इतिहासाची आठवण वर्तमानपिढीला करून देण्याचे कार्य या गीतांनी केले आहे.

दलितांच्या वाट्याला आलेले दु:ख, दैन्य, दास्य, याचे मूळ हिंदू धर्मात असल्याचा निष्कर्ष या गीतांनी मांडला आहे. स्वकीयांना नवी उभारी देण्याचे, सामाजिक क्रांतीचा विचार जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य केले. दलित- अस्पृश्यांच्या कठोर वास्तवाचे दर्शन घडविले आहे. सामाजिक क्रांतीसाठी संघटित संघर्षाची अपरिहार्यता प्रकट केली आहे. सर्वसामान्य, अडाणी, निरक्षर जनतेच्या मनात परिवर्तनासाठी पेटून उठण्याचा विचार अधोरेखित केला आहे. धर्माच्या संदर्भात प्रश्न उभे केले आहेत. गुलामीमागील कार्यकारणभाव शोधला आहे. जुन्या रुढी परंपरा, देवदेवताना नाकारणारी प्रखर जाणीव व्यक्त केली आहे. दलितांमध्ये लढाऊ बाणा निर्माण केला. संघर्षातून यशस्वी होणारा आशावाद शिकविला. आंबेडकरी संघर्ष आणि प्रयत्नवाद जनतेला शिकविण्याचे महान कार्य या गीतांनी पार पाडले आहे.

डॉ. आंबेडकरांचे चरित्रघटक, आंबेडकर जयंती, धम्मस्वीकार, धम्मस्वीकारानंतरचे सांस्कृतिक स्थित्यंतर, महापरिनिर्वाण, आंबेडकरोत्तर काळातील विघटन-विभाजन इत्यादी ठळक विषय आंबेडकरी लोकगीतांनी हाताळले आहेत. गीतकारांनी आपल्या गीतातून ब्राह्मणी कावेबाजपणाचे रूप बेडरपणे स्पष्ट केले आहे. तसाच आत्मटीकेचा सूरही आळविला आहे. आत्मटीकेतून चळवळीच्या अंतर्विरोधाचे वास्तव स्पष्ट केले आहे. हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. या गीतांनी समकालीन सामाजिक राजकीय निष्क्रियतेवर भाष्य केले आहे. सामाजिक स्थिती आणि स्थित्यंतराचे स्वरूप स्पष्ट केले आहे. आंबेडकरोत्तर काळातील विघटन, गटातटाचे राजकारण यावर सडेतोड टीका केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण हा अनेक गीतकारांच्या गीतांचा विषय झाला आहे. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणामुळे निर्माण झालेल्या शोकाकूल स्थितीगतीचे, दलितांच्या भावभावना आणि मानसिकतेचे चित्र साकार झाले आहे. हृदय पिळवटून टाकणारे, श्रोत्यांची मने व्यथीत करणारे हे शोकदर्शन गंभीर परिणाम साधणारे आहे. काही गीतकारांनी आपल्या रचनांमधून कथारूप आविष्कार घडविला आहे. काही गीतांवर पारंपरीक रचनांचा प्रभाव स्पष्टपणे प्रत्ययाला येतो. काही गीतकारांनी डॉ. आंबेडकरांसाठी अवतार, ईश्वर अशा संकल्पनांचे उपयोजन केले आहे. पुनर्जन्म, ईश्वरशाही जोपासणाऱ्या पारंपरीक संकल्पनाचाही वापर केला आहे.

या लोकगीतातील रूपकात्मक रचना वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या आहेत. या संदर्भात वामन कर्डक, राजानंद गडपायले, लक्ष्मण राजगुरु, हरेंद्र जाधव या कलावंताचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. यांनी आपल्या रचनांमधून सांगरूपकाचे उपयोजन केले आहे. 'मळ्या'चे रूपक या सर्वांनीच योजले आहे. या सांगरूपकाचे पुढे प्रतिकात रूपांतर होते. हे रूपक 'आंबेडकर' प्रतिकात परावर्तीत होते. या स्वरूपाच्या रूपकात्मक मांडणीतून आंबेडकरी समूहाचा प्रातिनिधिक , भावनिक उद्‌गार अभिव्यक्त झाला आहे. या स्वरूपाची गीते आजही आदर्शवत ठरणारी आहेत.

या गीतांनी बुद्ध तत्त्वांचा उद्‌घोष करताना श्रोत्यांशी मनोभावे संवाद साधला आहे. बुद्ध- भीमगीतांमुळे बुद्ध तत्त्वज्ञानातील अनेक संकल्पना विविध पद्धतीने साकार झाल्या आहेत. नव्या प्रतिमा सिद्ध झाल्या आहेत. उदा. समतेची बाग, पंचशीलाची वाट, त्रिसरणाची झडप, बोधीवृक्ष, बौद्ध धम्माचा खोपा, बोधीसत्त्वाच्या तत्त्वाचं खत, अष्टशीलाची कुपी, दीक्षाभूमीचे खळे, पिंपळपार, पंचशीलेची पोतडी, त्रिसरणाची विणा, पंचशीलाचे टाळ अशा असंख्य प्रतिमा नव्यानेच सिद्ध झाल्या. बुद्धभीम गीतांच्या माध्यमातून निरीश्वरवादी, अनात्मवादी तत्त्वज्ञानाची मांडणी करून अवैदिक परंपरा नव्याने मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. मानवी जीवनाचं, उदात्त मूल्यांचं तत्त्वज्ञान मांडून विज्ञाननिष्ठ विचारसरणीची

पेरणी केली आहे. दलितांच्या जीवनाला प्राप्त झालेला नवप्रकाश, मिळालेली मानसन्मानाची पदे ही भीमाईच्या कमाईची फळं आहेत असा उद्घोष केला आहे. अन्यायाविरुद्ध बंडखोरी आणि बंडखोरीसोबत स्वाभिमान शिकवणारे आंबेडकरी रूप सिद्ध झाले असून शेकडो आंबेडकरी प्रतिमा आणि प्रतिकांची सिद्धता केली आहे. उदा. दलितांचा सखा, दलितांचा राजा, कोहीनूर भारताचा, दु:खितांचा सन्मित्र सोबती, शोषितांच्या अस्मितेचा अंगार, विद्वत्तेचा पंडित, घटनापती, सिंहाचा छावा, नवज्ञानाचा रवी, अंधेऱ्या वस्तीत दिवा लावणारा, दलितांची माऊली अशा अनेकानेक आंबेडकरी प्रतिमा सिद्ध झाल्या असून आंबेडकरांचे नवसर्जक प्रतीक साकार झाले आहे. आंबेडकरी चळवळीचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक लेखाजोगा आंबेडकरी लोकगीतांनी मांडला असून ही गीते म्हणजे - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अचाट आणि अफाट कामगिरीचा पद्यमय इतिहास होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित कवितेचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी सुरू केलेल्या वृत्तपत्रातून दलित कवितेचा कुळारंभ झालेला दिसतो. त्याचप्रमाणे आंबेडकरी लोकगीते जोमदारपणे चळवळीचा विचार लोकांपर्यंत पोहचवित असताना एक विशिष्ट भूमिका घेउन कविताही लिहिली जात होती. ती फुटकळ रूपात प्रसिद्ध होत होती. एखाद दुसरा कविता संग्रहही प्रसिद्ध झालेला पाहावयास मिळतो. असे असले तरी अभिव्यक्तीचे साधन म्हणून आंबेडकरी वृत्तपत्रांनीच कवितेला, अभिव्यक्तीला आधार दिला आहे असे इतिहासात पाहावयास मिळते.

विसाव्या शतकाच्या पहिल्या पर्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली वृत्तपत्रे, साप्ताहिके यामुळे जनमानसात विलक्षण क्रांती घडून आली. सामाजिक प्रबोधन आणि चळवळ प्रभावी ठरण्यासाठी वृत्तपत्रे, नियतकालिके ही प्रभावी साधने ठरली आहेत. बाबासाहेबांनी सुरू केलेली वृत्तपत्रे आणि साप्ताहिकाच्या माध्यमातून दलितांचे आत्मभान जागृत झाले, स्वाभिमान जागृत झाला आणि संघर्षाची दीक्षा प्राप्त झाली. शोषणमुक्तीचे जे संघर्ष जगात झाले त्यापैकी सर्वात विचित्र व क्रुरतम अशा जातिव्यवस्थेविरुद्ध महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या अनुयायांनी केलेल्या महान संघर्षाचा आलेख म्हणजे बाबासाहेबांची वृत्तपत्रे, पाक्षिके होत. त्यातील वैचारिक लेखन हा महत्त्वाचा दस्ताऐवज आहे. वैचारिक गद्याची समृद्धी हे या वृत्तपत्रांचे खास लक्षण म्हणता येइल. परंतु कवितेला सुद्धा या वृत्तपत्रांनी स्थान दिले आहे. आंबेडकरी व्यक्तिमत्व आणि सामाजिक जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता 'जनता' या साप्ताहिकातून सातत्याने प्रकाशित झाल्या आहेत.

डॉ. आंबेडकरांचे समकालीन असलेल्या देवराय इंगळे यांना विसाव्या शतकातील पहिले दलित कवी असे म्हणता येईल. त्यांच्या कवितेने अस्पृश्यांना स्वावलंबी बनण्याचे आवाहन केले आहे. बहिष्कृत वर्गास जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. सत्यधर्म हाच खरा धर्म असल्याचे प्रतिपादन केले आहे. दांभिकतेचा भेद करीत दुटप्पीपणावर कठोर भाष्य केले आहे. आंबेडकरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या कवितेच्या तुलनेत देवराय इंगळे यांनी सामाजिक भानातून बेडर अभिव्यक्तीची परंपरा रुढ केली. मात्र दलितांच्या, अस्पृश्यांच्या वतीने देवाजवळ करुणा भाकणारी, आळवणी, आर्जवे करणारी त्यांची कविता 'देव' या संकल्पनेचा परिप्रेक्ष्य ओलांडू शकली नाही. ही त्या काळाची, काळाच्या चौकटीचीच मर्यादा होती.

१९३०-१९४० या दशकात आंबेडकरी वृत्तपत्रांनी दलित कवितेचा पाया घातला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विसाव्या शतकातील दलित कवितेचा कुळारंभ आंबेडकरी वृत्तपत्रातून झाला. दलित कवितेच्या आविष्काराला या वृत्तपत्रांनी महत्त्वाचे स्थान दिले. या कवितेवर मराठी कवितेचा मोठा प्रभाव आहे. संस्कृतप्रचुर, विद्वज्जड भाषेचा प्रभाव आहे. संस्कृत भाषेतील शब्दांचे उपयोजनही केले आहे. या भाषिक उपयोजनातूनच 'आंबेडकर स्तुतीगान' असा काव्यप्रकार अस्तित्वात आला. आंबेडकरी कर्तृत्वालेख मांडताना बाबासाहेबांची विविध रूपे साकार झाली आहेत. गौरवाची भावना व्यक्त करताना बाबासाहेबांना 'अवतार'ही ठरविल्या गेले आहे. अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून वर्णन करताना कल्पनाविलासही मांडला आहे. काही कवींनी 'नवा मनू', 'देवदूत' असेही संबोधले आहे. थोडक्यात कुळारंभाच्या या कवितेत आपल्या प्रेरणास्थानाची विभूतीपूजा आरंभिली आहे.

या कवितांनी पारंपरीक मराठीतील विविध वृत्तरचनांचा आधार घेतला. मध्ययुगीन काळातील 'भूपाळी'सारखा प्रकार हाताळला गेला. भूपाळीच्या माध्यमातून आंबेडकरांप्रती श्रद्धा व्यक्त केली. गझलसदृश रचना करण्याचाही प्रयत्न केला आहे. 'राजहंस माझा निजला'च्या चालीवर केलेले अनुकरणही प्रत्ययाला येते. पारंपरीक, धार्मिक, आध्यात्मिक संकल्पनांचा पुरेपूर वापर केला आहे. अंत्यज जनतेशा, अमृत, नरक, मनू, सती देवता, भूमाता देवी इत्यादी अनेक बाबी निदर्शनास येतात.

काळाराम मंदिर सत्याग्रह हा आंबेडकरी चळवळीतील दीर्घकाळ चाललेला लढा होता. या ऐतिहासिक घटनेचा मोठा प्रभाव या कवितेवर आहे. या लढ्याचे, तत्कालीन वातावरणाचे चित्र रेखाटलेले असून दलित कवींना प्रेरणा देणारी ही महत्त्वाची घटना ठरली. सामाजिक स्थितीगतीचे वास्तव मांडणे हा या कवितेचा स्थायीभाव ठरला आहे. समाज, धर्म, वतनदारी, दलितांचे जगणे असे अनेक विषय कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत. या कवितांनी दलिताना आपल्या हक्कप्राप्तीचे भान जागविण्यासाठी जागृतीचा डंका पिटला आहे.

१९५० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. हे महाविद्यालय १९६० ते १९८० या काळात एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र बनले. या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य डॉ. म. भी. चिटणीस आणि नंतरच्या काळात डॉ. म. ना. वानखेडे यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा आणि चळवळीचा वेध घेऊन समाजात सुरू असलेल्या मूल्यसंघर्षाला अभिव्यक्ती मिळवून देण्यासाठी वैचारिक व वाङ्मयीन उपक्रमांना योग्य दिशा दाखवली. त्यासाठी मिलिंद जर्नल, मिलिंद मॅगेझिन, मिलिंद साहित्य परिषद, 'अस्मिता त्रैमासिक' यांसारखे उपक्रम सुरू केले. १९६३च्या दरम्यान या मिलिंद महाविद्यालयात आणखी एक नवा उपक्रम पुढे आला तो पुढे इतिहास बनला. तो म्हणजे मिलिंद हस्तलिखित पाक्षिक. यातून नव्याने अभिव्यक्त होऊ पाहणाऱ्या पिढीला एक अभिव्यक्तीचे साधन प्राप्त झाले. यातून पुढे सशक्त लेखक कवींची पिढी पुढे आली. सुखराम हिवराळे, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, योगिराज वाघमारे, अरुणा लोखंडे, ते ना. तु. पोघे, राम दोतोंडे, महेंद्र भवरेंपर्यंत अशी कवी लेखकाची परंपरा मिलिंद कॅम्पसने रुढ केली. भित्तीपत्रकाबरोबरच मिलिंद वार्षिकांक हे विद्यार्थ्यांसाठी अभिव्यक्त होण्याचे माध्यम ठरले. १९६० ते १९७५ या बारा वर्षांच्या कालखंडात मिलिंद वार्षिकांकातून शेकडो कवींनी हजारो कविता लिहिल्या आहेत. म्हणून साठोत्तरी दलित कवितेच्या इतिहासाचा धांडोळा घेताना मिलिंद कॅम्पस्ची कविता टाळून पुढे जाता येणार नाही. कारण मिलिंद संस्कृतीने अनेक दिग्गज कवी दलित साहित्य प्रांताला दिले आहेत. ज्यांनी पुढे दलित कवितेच्या वटवृक्षाचा विस्तार करण्यास्तव मोठाच हातभार लावला आहे.

मिलिंद कॅम्पस्ची प्रारंभीची कविता अगदीच चाचपडताना दिसते. पूर्वसूरीच्या कवितेचे अनुकरण आशयविषयाच्या बाबतीत तिला टाळता आलले नाही. बरेचसे कवी हे स्वच्छंदतावादाच्या आश्रयानेच अभिव्यक्त होताना दिसतात. 'कातळासही फुटली भाषा नव्या युगाची प्रथम तेधवा' ही मिलिंद कॅम्पस्ची अनोखी ओळख आहे. भाषा जरी पारंपरिक मराठी कवितेच्या वळणाची असली तरी आशय मात्र नवा आहे. एका स्फुर्तीगीताचे हे बोल मिलिंद कॅम्पस्मध्ये नव्या बीजाचे रोपण झाल्याचे सूचित करते. मिलिंद मॅगेझिनचे पहिले महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यातील विविद्यार्थ्यांचे अनुभव. हे अनुभव अस्सल आणि रसरशित असे आहेत. या मॅगेझिनचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे यातील कविता. काव्यामध्ये आविष्कारीत झालेले अनुभव जिवंत आणि अस्सल वाटतात. विद्यार्थ्यांचेच अनुभव अगदी सहजतेने आणि उस्फुर्तपणे व्यक्त झालेले आहेत. त्यामुळे त्याला व्यापक भावनात्मकतेची बैठक आपोआपच लाभते. फॅशन किंवा हौस म्हणून उपऱ्या भावनेतून आलेल्या कविता येथे नाहीत. यातील भावनांचा संबंध प्रत्यक्ष जीवनातील भावआंदोलनाशी आहे. त्यामुळे त्याला एक वेगळा जिवंतपणा प्राप्त झाला आहे. वेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांच्या या कविताना विविध आयाम प्राप्त झाले आहेत.

थोडक्यात, मिलिंद कॅम्पस्ची कविता म्हणजे साठोत्तरी दलित कवितेचा ओनामा आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. या कवितेने नव्या बीजाचे रोपण केले आहे. त्यासाठी मिलिंद वार्षिकांकांचे मोलाचे,

ऐतिहासिक योगदान लाभले आहे. अगदी प्रारंभीची कविता प्रेमालापात अडकली आहे. मात्र लवकरच तिला सामाजिक भान आल्याचे दिसून येते. तत्कालीन दलितांवरील अन्याय अत्याचाराचे पडसाद कवितेत उमटले असून, तिने तुटलेल्या माणसाचे भयावह वास्तव चित्रित केले आहे. त्याचबरोबर वेदनांच्या ओझ्याने वाकलेल्या समाजाचे प्रातिनिधिक चित्र साकार केले आहे. या कवितेला समता आणि मानवतेचा ध्यास असून स्वातंत्र्याने माणसाची केलेली गळचेपी, माणसाला प्राप्त झालेले कलेवराचे रूप, स्वातंत्र्याने केलेला भ्रमनिरास स्पष्ट केला आहे. राजकारण्यांना इशारा देणाऱ्या या कवितेने विद्रोहाचे एक वेगळे रूप साकार केले आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारले आहेत. गावकुसाबाहेरचे संघर्षशील मन चित्रित केले आहे. अन्यायाचे हिशेब मांडून व्यवस्थेला आव्हान दिले आहे. सामाजिक जीवनातील विसंगती स्पष्ट करून माणुसकीला पारखे झालेल्या तसेच ओसाड आणि रखरखित सामाजिक स्थितीचे दर्शन घडवले आहे. सामाजिक भानासह राष्ट्रप्रेमही व्यक्त केले आहे. राष्ट्रप्रेमाबरोबरच सांस्कृतिक ठेव्याची महती विशद करताना सौंदर्याविष्कारही घडविला आहे. मिलिंद कॅम्पस्च्या कवितेचे हे वैभव आहे.

समकालीन जीवनातील अन्याय अत्याचार, दलितांची हत्याकांडे, अस्पृश्यता, बहिष्कार, स्त्रियावरील अत्याचार अशा अनेक विषयांना या कवितेने आपले केंद्र केले आहे. संघर्षरत असलेल्या या कवितेने रवंथखोर व्यवस्था आणि तिला धिक्कारणारा तळागाळातला समाज असे द्वैत मांडले आहे. चिंतनशील असलेली ही कविता मानवतावादाच्या रस्त्याने मार्गस्थ झाली आहे. लोकगीत आणि लोकलयीचा आकृतीबंध स्वीकारला आहे. त्यातून बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीची आंतरिक भावना व्यक्त केली आहे. गेय रचनाही सिद्ध झाल्या आहेत. अभिव्यक्तीसाठी बोलीभाषेचेही उपयोजन केले आहे. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध या दोन व्यक्तित्वांनी मिलिंद कवींचे भावविश्व व्यापले आहे. त्यामुळे या व्यक्तित्वाबद्दल जशी श्रद्धेची भावना व्यक्त होते तशीच त्या व्यक्तित्वाची थोरवीही कथन केली जाते. धम्मस्वीकारामुळे नव्या युगाचा आरंभ झाल्याचा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे. मिलिंद संस्कृतीचा आत्मतेजाने फुललेला क्रांतीस्वर निनादत ठेवला आहे. आंबेडकरी ज्ञानभूमीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भावविश्वाचे प्रातिनिधिक चित्र या कवितेने रेखाटले असून या ज्ञानभूमीबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली आहे. मिलिंद कॅम्पस् आणि नागसेनवन परिसराचे देखणे, ज्ञानाची आसक्ती असणारे आणि गंभीर रूप साकार केले आहे.

मिलिंद कॅम्पस्च्या कवितेने प्रखर स्त्रीवादी जाणिवा प्रकट केल्या आहेत. आईचे अनोखे आणि अभूतपूर्व रूप साक्षात केले आहे. कवयित्रींच्या कवितांनी आईचे उदात्तीकरण करणाऱ्या जगाचा उपहास केला आहे. त्याचबरोबर आईने आपल्या मुलीकडे दु:खाचा वारसा सोपविला याविषयी संतापाची भावना व्यक्त केली आहे. जनावरागत वावरणाऱ्या पुरुषी व्यवस्थेला आव्हान दिले आहे. आधुनिक युगाच्या आणि आधुनिक मूल्यांच्या आधारे संघर्षासाठी सिद्ध झालेल्या स्त्रीमनाचा विद्रोही आविष्कार झाला आहे. पुरुषी व्यवस्थेच्या दुटप्पीपणावर कठोर भाष्य केले आहे. तसेच प्रेमकवितेलाही सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रारंभ मिलिंद कॅम्पसच्या कवितेने केला आहे. मिलिंद कॅम्पस्च्या कवितेमुळेच दलित कवितेला नवे वळण प्राप्त झाले आहे. साठोत्तरी दलित कवितेचा आरंभबिंदू म्हणून तिचे स्थान ऐतिहासिक स्वरूपाचे ठरले आहे.

साठोत्तर काळातील 'आकार' हा पहिला प्रातिनिधिक कवितासंग्रह आहे. 'आकार' हा केवळ कवितासंग्रह नसून दलित बौद्धांचा साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचा 'सांस्कृतिक दस्तऐवज' आहे. पुस्तकरूपाने प्रथम दलित वर्गातील कवींची कविता एकत्र आणण्याचे कार्य या कवितासंग्रहाने केले. एका अर्थाने या काव्यसंग्रहाचे कार्य हे पायाभरणीचे होते असे म्हटल्यास अनुचित ठरणार नाही. नव्याने विकसीत होणाऱ्या जाणिवांचा आविष्कार 'आकार' या कवितासंग्रहातून दिसतो. 'आकार' हा काव्यसंग्रह आंबेडकरी जाणिवांचा साठोत्तर काळातील पहिला प्रातिनिधिक वाङ्मयीन आविष्कार होय. या संग्रहास असा आद्यत्वाचा मान देणे अनुचित ठरणार नाही.

आंबेडकरी वृत्तपत्रे आणि इतर वृत्तपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके यामधून प्रसिद्ध झालेली कविता पाहिल्यास असे प्रत्ययाला येते, की या कवितेच्या केंद्रस्थानीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व आहे. नव्याने

चाचपडणारी ही कविता जुन्या परंपरागत काव्याविष्काराच्या अनुकरणातून बाहेर पडू शकली नाही. दलित कवितेचा स्वतंत्र चेहरा खऱ्या अर्थाने सिद्ध झाला तो १९७१- ८० या दशकात. या दशकातील कवितेने आजवरच्या एकूणच कवितेच्या परंपरेला प्रचंड धक्के दिले. ती स्वत:च्या भाषिक सामर्थ्यासह स्वत:च्या दणकट अंगापिंडासह, तेवढ्याच दमदार आक्रमक चालीसह प्रवासाला निघाली आणि एकूणच कवितेच्या इतिहासाला नवे वळण लागले. दलित कविता ही विसाव्या शतकातील एक वाङ्मयीन आणि सांस्कृतिक वस्तुस्थिती आहे. दलित कवितेचा प्रारंभ खऱ्या अर्थाने साठोत्तर काळात झाला असला तरी त्यापूर्वीच जलशातील गाणी, आंबेडकरी लोकगीते, विविध कवींनी केलेले आविष्कार इत्यादी. यामुळे दलित कवितेची पायाभरणी झाली होती असे म्हणता येईल.

दलितांमध्ये मध्यमवर्ग निर्माण झाल्यानंतर दलित साहित्य उदयाला आले. अन्याय अत्याचाराच्या तीव्रतर जाणिवेच्या प्रतिक्रियेतून दलित कविता आविष्कृत झाली. दलित कविता ही विचारांच्या वारशाची काव्यात्म निर्मिती होय. या कवितेचा संबंध अपरिहार्यपणे सामाजिक उलथापालथीशी आहे. हजारो वर्षांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जगाचे संदर्भ दलित कवितेत मुखरीत झाले आहेत. सांस्कृतिक स्थित्यंतरामुळे ती निर्माण झाली आहे. दलित कवितेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी सुरू केलेले मानवमुक्तीचे आंदोलन हा अभिन्न संबंध असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रारंभीच्या काळातील नामदेव ढसाळांच्या कवितेने अनेकविध वैशिष्ट्ये सिद्ध केली आहेत. समूहमनाचे दु:ख, दैन्य, दास्य, अगतिकता या सर्व बाबींची भीषणता चित्रित झाली आहे. स्वातंत्र्याचा उजेड सर्वसामान्यांपर्यंत पोहचला नसल्याची खंत प्रकट केली आहे. सामाजिक जीवनातील शोषण, अन्याय, अत्याचाराच्या विरोधातील समग्र विद्रोह या कवितेने पुकारला आहे. ही विद्रोही स्फोटकता आणि नकाराची जाणीव प्रस्थापित व्यवस्थेच्या निर्घृणतेमुळे जन्माला आली आहे. त्यामुळे सांस्कृतिक विसंवादाला नाकारणारी प्रखर जाणीव व्यक्त झाली आहे. संस्कृतीच्या मिरासदारांना या कवितेने खणखणीतपणे इशारा दिला आहे. आंबेडकरी तत्त्वज्ञान हे परिवर्तनाच्या लढ्यातील एक मूलभूत हत्यार असल्याचे स्पष्ट केले आहे.

गतकाळ, वर्तमान आणि भविष्य अशा त्रिविध संबंधाची जाणीव या कवितेतून व्यक्त होते. विद्ध्वंसकता आणि विधायकता ही या जाणिवेची दोन अंगे आहेत. मानव्याची प्रतिष्ठापना हे ध्येय आणि प्रखर आशावाद या कवितेतून व्यक्त झाला आहे. मूल्याधिष्ठिततेमुळे दलित कवितेतील विद्रोहाला एक वेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. हा विद्रोह मानवतेवरील निष्ठेतून व्यक्त झाला आहे. या कवितेने लढाऊ बाण्याचे आक्रमक चित्र साकार केले आहे. शोषणाविरुद्ध तीव्रतर विद्रोह आणि सामान्यांविषयी अपार करुणा या नकार स्वीकाराच्या विलक्षण ताणातून दलित कविता सिद्ध झाली आहे. शोषणाचे स्वरूप आणि शोषणाच्या निर्मूलनाचा विचार या कवितेने मांडला आहे. वर्णव्यवस्था आणि या व्यवस्थेने घेतलेला माणसाचा बळी अशा स्वरूपाचा शोषक शोषित संघर्ष स्पष्ट केला आहे. जनसामान्यांच्या विशाल संघर्षाशी तिचे नाते आहे. जनसामान्यांचे क्रांतीकारी मानस ती व्यक्त करते. बंडखोर समूहाची उग्रदाहकता स्पष्ट करते. ही उग्रदाहकता स्पष्ट करतानाच ढसाळांसारखा कवी आपल्या 'पाणी' या कवितेतून काव्य आणि तत्त्वज्ञान यांचे सुंदर एकात्म रूप प्रकट करताना दिसतो.

न्यायव्यवस्था, लोकशाही, संसद, सत्ताव्यवस्था या सर्व संस्थात्मक संरचनांवर तीव्रतर भाष्य दलित कवितेने केले आहे. त्याचबरोबर प्रजासत्ताक राज्यातील दरिद्री अवकळा अधोरेखित केली आहे. अभिजन परंपरेला नाकारणाऱ्या या कवितेने फॅसिझमच्या विरोधात स्पष्ट भूमिका घेतली आहे. माणसाच्या स्वातंत्र्यावर प्रचंड प्रेम करणाऱ्या या कवितेने माणसाचे महात्म्य सांगतानाच त्याचा ऱ्हास, विजय आणि छळाचा इतिहास सांगितला आहे. बहिष्कृत भारताचा इतिहास कथन केला आहे. वैश्विक दु:खाला गवसणी घातली आहे. भारतीय सांस्कृतिक, राजकीय नकाशावरील आणि आंतरराष्ट्रीय फलकावरील वर्तमानाचे वास्तव अधोरेखित केले आहे. प्रकाश आणि स्वातंत्र्य हीच जगाची शक्ती आहे असा निर्वाळा दिला आहे. समकालीन वर्तमानाचे हुकूमशाही मानसही स्पष्ट केले आहे. नामदेव ढसाळांप्रमाणेच बाबुराव बागूल यांची कविता हा दलित कवितेतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरली आहे. चिंतनशीलता हे त्यांच्या कवितेचे केंद्र असून आत्मसन्मानासाठी

ती विद्रोहाची शिकवण देते. या कवितेने वैचारिक अंतर्विरोधाचे स्वरूप स्पष्ट करून भारताला पुन्हा प्रकाशमान करावयाचे असेल तर बुद्धाचा मार्ग अटळ आहे अशी भूमिका मांडली आहे. मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान मांडले आहे. माणूस, त्याचे सामर्थ्य, कर्तृत्व, त्याची निर्मिती, सौंदर्य, मोठेपण हे सर्व दलित कवितेचे केंद्रवर्ती विषय ठरले आहेत. देव, देश, देवळे, धर्म यापेक्षा माणूस महान आहे या विचारसूत्रानुसार ती आकारास आली आहे.

वैदिक परंपरा, तिचे विचारविश्व या कवितेने नाकारले आहे. माणसाच्या कष्टाळू हाताचे सुंदर तत्त्वज्ञान मांडले आहे. मानवी हाताचे सौंदर्य आणि सामर्थ्याचा देखणा आविष्कार केला आहे. व्यवस्था विश्लेषणातून इतिहासाची पुनर्मांडणी केली आहे. पुराण-इतिहास-वर्तमान असा तिहेरी संबंध प्रस्थापित केला आहे. धर्मत्याग आणि देशत्याग करण्याची भाषा रोखठोकपणे व्यक्त केली आहे. माणसाला संघर्षसन्मुख करणाऱ्या या कवितेने चळवळीतील संघर्षाची दीक्षा दिली आहे. आंबेडकरी विचारांची कृतिशीलता हाच या देशातील परिवर्तनाचा पाया आहे. असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. 'आंबेडकर भारत' ही नवी संकल्पना जन्मास घातली आहे. विचाराला कृतीची जोड देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले आहे.

आत्मशोध घेणाऱ्या दया पवारांच्या कवितेने माणसाला गुलामीच्या कोंडवाड्यात कोंडणाऱ्या व्यवस्थेच्या कारनाम्याचा नेमका वेध घेतला आहे. या देशाला महान का म्हणावे असा प्रश्न उपस्थित केला आहे. 'कोंडवाडा' हे गुलामीचे प्रतीक असून समूहाच्या तुरुंगवाण्या जगण्याचा निर्देश त्यातून होतो. वर्तमानातील अन्याय अत्याचाराचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी मिथकांचे यथोचित उपयोजन केले आहे. त्यातून समकालीन सूडसत्र आणि अन्यायी वास्तवाचे प्रकटीकरण झाले आहे. मिथकांच्या माध्यमातून सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी केली आहे. वर्तमानाच्या संदर्भात मिथकांना नवा आशय प्राप्त करून दिला आहे. चलत्बुद्धाच्या प्रतीकाची निर्मिती केली आहे. दलितांच्या दुःखाचा प्रातिनिधिक स्वर कोंडवाड्यात निनादत राहतो. रूपकात्मक मांडणीतून दुःखाने भारलेल्या जीवनाचे सूचन केले आहे. विद्रोह ही सातत्यशील प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले आहे. तत्परता आणि निष्ठेचे प्रतीक म्हणून कार्यकर्ता साकार झाला आहे. चळवळीतील अंतर्विरोधही स्पष्ट झाला आहे. दया पवारांच्या कवितेने प्रतिमा, प्रतीके आणि मिथकांचे मोठे योगदान दलित कवितेला दिले आहे. उदा. दस्यूचा अबलख घोडा, चातुर्वर्ण्याचा पाणवठा, दुःखाने गदगदलेले झाड, नागभूमी, कोंडवाडा, खुळखुळ्याची काठी, निरो, क्रुस, बुद्ध, तक्षक, नाग, ब्रोकनमेन इ. अनेक प्रतीके आणि मिथकांसह वाक्प्रचार आणि म्हणीचाही यथोचित वापर केलेला पाहावयास मिळतो.

वामन निंबाळकरांच्या कवितेने शब्दाचे सामर्थ्य स्पष्ट केले आहे. पारंपरीक मराठी कवितेला प्रतिक्रियात्मक नकार दिला आहे. गावकुसाबाहेरच्या अभावग्रस्त जगाचे वेदनादायी चित्र रेखाटले आहे. 'माय'ची कारुण्यपूर्ण प्रतिमा चित्रित केली आहे. वेदनेतून निर्माण झालेल्या विद्रोहाची अभिव्यक्ती केली आहे. सांस्कृतिक भोवतालाच्या दुःखाची भव्य प्रतिमा साकार केली आहे. त्र्यंबक सपकाळ्यांची कविता आपला आगळा वेगळा सूर लावताना दिसते. वेदना, विद्रोह, नकार या त्रिसुत्रीसह प्रतीके आणि मिथकांचे अर्थपूर्ण उपयोजन त्यांच्या कवितेने केले आहे. औपरोधिक अंगाने लोकशाहीचे वास्तव चितारतानाच भारतीय संस्कृतीचे खुजेपण स्पष्ट केले आहे. हा या कवितेचा खास विशेष आहे. स्वकीयांना स्वाभिमान आणि संघर्ष शिकवला आहे. परमेश्वराचा येथेच्छ उपहास केला आहे. आंबेडकरी चळवळीच्या अनुषंगाने स्फोटक प्रतिमांचे उपयोजन केले आहे. त्यातून व्यापक अर्थाची सिद्धता झाली आहे. कुंती, द्रौपदी, कर्ण, इडिपस या प्राक्कथा हा सपकाळ्यांच्या कवितेचा खास प्रांत आहे. मातृभूमीला उद्देशून या कवितेने व्यथा प्रकट केली आहे. शोषक व्यवस्थेच्या विरोधातील स्फोटक मानसिकतेचा आविष्कार केला आहे. औपरोधिक शैली, स्फोटक आणि ज्वलनशील प्रतिमा तसेच मिथकांचे उपयोजन आणि अर्थांतर हे सपकाळे यांच्या कवितेचे महत्त्वाचे विशेष आहेत.

ज. वि. पवारांची कविता सांस्कृतिक संचिताला नकार देते. ढोंगबाजीचे पितळ उघडे पाडते आणि अमानुष संस्कृतीला आग लावण्याचा मनोदय व्यक्त करते. त्यांच्या कवितेतील स्फोटक प्रतिमासंघटनातून कृतिशील विचार आणि युद्धमान मानसिकता व्यक्त झाली आहे. जातियता, सामाजिक विषमता नष्ट करण्याचा सर्व दुःखावरचा इलाज

म्हणजे आंबेडकरी विचार असे ठाम प्रतिपादन केले आहे. प्रल्हाद चेंदवणकर यांच्या काव्यात एक जोशपूर्ण आवाहकता आहे. अन्यायकर्त्या व्यवस्थेला जाब विचारणाऱ्या या कवितेने हिशोब तपासणीची एक विशिष्ट परिभाषा उपयोजित केली आहे. त्यातून व्यवस्थापरिवर्तनाचा विचार अधोरेखित झाला आहे. या कवितेतील प्रतिमासृष्टीतून सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यांच्या हिणकस जगण्याची प्रतिमा सिद्ध झाली आहे. विद्रोही जाणिवेच्या आविष्कारातून दाहक आणि स्फोटक प्रतिमांचे उपयोजन झाले आहे. समकालीन दलित जीवनाचे भेदक वास्तव स्पष्ट करून हरवलेले सर्वस्व प्राप्त करून घेण्यासाठी ही कविता मार्गस्थ झाली आहे. केशव मेश्राम यांची कविता संमिश्र स्वरूपाची आहे. प्रारंभीच्या काळातील त्यांची कविता निर्भरशील संवेदनशीलतेची आहे. दलित साहित्य चळवळीच्या रेट्यातून या कवीच्या जाणिवा बदलत गेल्या. त्यानंतर त्यांची कविता समाजाभिमुख झाली. या कवितेने अभावग्रस्त जगाचे विदारक चित्र साकार केले. जगण्याच्या कळवळ्याची सामूहिक प्रतिमा गोचर केली. मानसिक प्रक्षोभासह मेश्रामांच्या कवितेने विद्रोह प्रकट केला. परमेश्वराला आईवरून शिवी देणाऱ्या या कवितेने स्वार्थी आणि पोटभरू राजकारण्यांचा बुरखा फाडण्याचे कार्य पार पाडले आहे.

विद्रोहाची दाहकता, स्फोटकता, तीव्रता किती ताकदीने व्यक्त होऊ शकते हे यशवंत मनोहर यांच्या कवितेने प्रत्ययास आणून दिले. मनोहर यांची कविता सखोल चिंतनाची, तत्त्वमीमांसक आणि मर्माग्राही विवेचन करणारी आहे. त्यांच्या कवितेने समाज, संस्कृती, तत्त्वज्ञाने, शोषक व्यवस्था या साऱ्यांचा सखोल वेध घेतला आहे. सामूहिक दुःखाचा कार्यकारणभाव शोधला आहे. देवधर्मासह धर्मग्रंथ आणि प्रस्थापित साहित्याला नाकारले आहे. प्रस्थापित मूल्यव्यवस्थेला हास्यास्पद ठरविले आहे. वर्गजाणिवा कालीक भान आणि अनुभवाची अभिव्यक्ती समष्टीच्या संदर्भात केली आहे. वेदनेतून नवनिर्मिती केल्याची जाणीवही साक्षात केली आहे. तीव्रोत्कट भावना आणि गहिरी चिंतनशीलता संपृक्तपणे प्रतिमासृष्टीतून प्रकट झाली आहे. प्रखर विद्रोही, रौद्रभीषण प्रतिमाविश्व साकार झाले असून त्यातून अर्थाचे विविध स्तर आणि व्याप्ती वाढली आहे. विविधार्थी पदर गुंफून आंबेडकर प्रतिमा सिद्ध केली आहे. सूर्य प्रतिमेचे अधिक्य हे मनोहरांच्या कवितेचे खास वैशिष्ट्ये आहे. या प्रतिमेला विविधांगी आणि विविधार्थी स्तर प्राप्त झाले आहेत. दुःखाला शब्द नेसवण्याची एक नवी रीत या कवितेने सुरू केली. पारंपरीकता, गतकाळ आणि मूल्यांची आधुनिकता या द्वंद्वातून विद्रोह प्रकट झाला आहे. विद्रोह मूल्यामुळे एक आगळेवेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. एकूणच दलित कवितेच्या परंपरेत यशवंत मनोहर यांच्या कवितेने आपली अमिट आणि प्रखर मुद्रा उमटवली आहे.

प्रत्यक्ष चळवळीत सक्रीय असणाऱ्या कार्यकर्त्याची लढाऊ वृत्ती कशी असते याचा प्रत्यय अर्जुन डांगळे यांच्या कवितेने दिला आहे. स्व च्या जगण्यासह समष्टीच्या दुःखाला त्यांच्या कवितेने साद घातली आहे. दलितेतरांनी निर्माण केलेले साहित्य, त्यांच्या अभिव्यक्ती पद्धती यांनाही नाकारून जीवनवादी जबाबदारी स्वीकारली आहे. लढ्याच्या पावित्र्यात उभ्या असलेल्या या कवितेने युगाचा इतिहास घडविण्यासाठी लेखन आणि विद्रोहाची दिशा दाखविली आहे. चळवळीच्या भानातून संघर्षाच्या प्रतिमा सिद्ध केल्या आहेत. माणुसकीच्या हक्कासाठी तत्पर असणाऱ्या या कवितेने चळवळीतील चढउतार आणि कार्यकर्त्यांची प्रवृत्ती यावर प्रकाश टाकला आहे. उपरोध हा तिचा महत्त्वाचा विशेष आहे. डांगळे यांनी आपल्या चरित्रासह कौटुंबिक, सांपत्तिक आणि सामाजिक स्थितीचे चित्र रेखाटले आहे. आई- बाप' ही त्यांच्या कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा असून ती कष्ट आणि दारिद्र्याच्या वास्तवातून साकार झाली आहे.

प्रकाश जाधव यांच्या कवितेने बहिष्कृत जगाचे उघडे नागडे वास्तव भेदकपणे वाचकांसमोर ठेवले आहे. बोलभाषेतून आकारास आलेली प्रतिमा प्रतीके सार्थ भाषेची नवी घडणावळ वाचकांपुढे पेश केली आहे. व्यक्तीचे स्वातंत्र्य नाकारणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध ही कविता उभी ठाकली आहे. बंडखोर व्यक्तिमानस प्रातिनिधिक रूपात व्यक्त झाले आहे. स्त्रीरूपाचे आणि तिच्या जगण्यावागण्याचे अनेक पदर स्पष्ट केले आहेत. इतर कोणत्याही दलित कवितेपेक्षा हे स्त्रीरूपदर्शन वेगळ्या स्वरूपाचे आहे. महानगरीय दलित जीवनाचे अनुभवविश्व मुखरीत केले आहे. भाषेचे अनेक स्तर हे या कवितेचे बलस्थान आहे. युद्धखोर मन आणि भोवतालची उदासिनता असा अंतर्विरोधही स्पष्ट केला आहे. संघर्षावर ठाम विश्वास असणारी ही कविता व्यवस्थेच्या विरोधात उठाव करण्यासाठी सज्ज झाली आहे. दलितांच्या जीवनातील आणीबाणी अद्याप

संपलेली नाही असा निष्कर्ष मांडला आहे. वेदनेच्या स्फोटातूनच स्वातंत्र्याचा, मुक्तीचा जन्म होईल अशा भरोशावर येऊन ही कविता स्थिरावली आहे.

राम दोतोंडे यांच्या कवितेने चर्मकार व्यवसायातील अनेक शब्दकळा आणि साधनांचा प्रतिमेसारखा वापर केला. मानवी मूल्यांचा उद्घोष करीत व्यवस्थेमुळे वाट्याला आलेल्या दु:खातून दुभंगलेपणाची जाणीव व्यक्त केली आहे. दुभंगलेपणाच्या प्रवासातच ही कविता विद्रोहाचा आकृतीबंध साकार करते. कौटुंबिक आणि सामाजिक असा दुहेरी संघर्ष चित्रित करते. दैववादाला सपशेल नाकारून माणसाचे सामर्थ्य प्रकट करणारी प्रखरता पेरण्याचे काम करते. तथागताच्या सम्यक दृष्टीने लिहिलेला इतिहास भावी पिढीसमोर ठेवला पाहिजे असे आवाहन या कवितेने केले आहे. कष्ट उपसूनही सुख मिळत नाही याविषयीची उद्विग्नता रविचंद्र हडसणकर यांच्या कवितेने व्यक्त केली आहे. अस्वस्थता नष्ट करण्यासाठी उदध्वस्तता प्रसवणाऱ्या या कवितेने क्रांतीचे मनसुबे समजावून सांगीतले आहेत. आवाजीपणाला मुरड घालून संयतपणे विद्रोहाची अभिव्यक्ती केली आहे. समकालीन वास्तवाचा वेध घेताना वर्तमानाच्या संदर्भात पारंपरीक मिथकांना नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. अंधारावर मात करण्याची मूलभूत कृती कोणती याचे पुरेसे भान राखले आहे. दारिद्रयाचे प्रतीक असलेल्या 'माय'ची प्रतिमा सिद्ध केली आहे.

एकंदरीत, दलित कवितेने दलितांवर झालेल्या अन्यायाच्या विरोधात क्षोभ व्यक्त केला आहे. गतकाळ आणि वर्तमान अशा दोन पातळ्यांवर झालेला हा अन्याय आहे. युगानुयुगे लादली गेलेली बंधने, संस्कृतीच्या मिरासदारांनी ओढलेले आसूड, मनूच्या वारसदारांकडून केल्या गेलेले शोषण, चातुर्वर्ण्य व्यवस्थेने केलेली सामाजिक वाताहत, देव-देश-धर्म-जात यांच्या जडशीळ बेड्यात जखडलेले आयुष्य, कुत्र्यामांजरासोबत उष्ट्यावाष्ट्यासाठी बसवल्या जाणाऱ्या पंगती, पावलोपावली केली जाणारी नाकेबंदी, अंध:कारात खितपत पडलेली जिंदगी हे सारे गतकाळातील जगण्याचे भेसूर आणि विदृप स्वरूप दलित कवितेने स्पष्ट केले आहे. अस्पृश्यता, जातियता, विटाळ, बाट हा सामाजिक जीवनातील सार्वत्रिक अनुभव दलित कवितेत प्रत्ययाला येतो. वर्तमानातील स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार, लुटली जाणारी इज्जत, बेअब्रू, भूक, उपासमार हा अनुभव कमीअधिक प्रमाणात दलित कवितेत सर्वत्रच पाहावयास मिळतो. दु:ख, दैन्य, दास्य, दुष्काळून ठेवलेले जीवन, दु:खाची सार्वत्रिकता, स्वातंत्र्याने केलेला भ्रमनिरास, असुरक्षितता, पायदळी तुडविली जाणारी लोकशाहीची मूल्ये, स्वातंत्र्योत्तर काळातील ब्राह्मणगाव, शेरपूर, धाकली, बावडा, किलावेनमानी इत्यादी ठिकाणी दलितांवर झालेले अमानुष अत्याचार, झालेली कत्तल, जाळली गेलेली घरे, फोडलेले डोळे, घेतलेले बळी असे अनेक संदर्भ आणि विषय दलित कवितेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

दलित जगाची अभावग्रस्तता, घुसमट, अगतिकता, हतबलता, लुत भरलेले भवताल, अठराविश्व दारिद्रय, पशूपातळीवरील जगणे, एकूण सामाजिक सांस्कृतिक दुषित असे पर्यावरण या सर्व संदर्भ, तपशील आणि वास्तवाला कवेत घेऊन दलित कविता एक सामाजिक सांस्कृतिक विधान करते. त्यातून मानव्याच्या प्रतिष्ठापनेचा उद्घोष निनादत राहतो. नामदेव ढसाळ, दया, पवार, वामन निंबाळकर, ज. वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, प्रकाश जाधव अशा असंख्य कवी कलावंतांनी दलित कवितेला वेदना-विद्रोह-नकार आणि मानवतावादी मूल्यांचा समाजलक्ष्यी आशय प्राप्त करून दिला. कवितेमुळेच दलित साहित्याच्या नवमूल्यांचा परिचय मराठी साहित्य जगताला झाला.

बुद्ध-फुले-आंबेडकर ही विचार परंपरा आणि चळवळीचे तत्त्वज्ञान व संघर्षाची कृतिशिलता हा दलित कवितेच्या जाणिवेचा मूलाधार आहे. ही जाणीव समूह जीवनाशी बांधिल आहे. तत्त्वज्ञान आणि चळवळीची मूल्ये यांच्या प्रभावातून वास्तवाचा अन्वयार्थ लावून त्याची मांडणी करणे हा जाणिवेचा विशेष आहे. प्रस्थापित धर्म, परंपरा आणि संस्कृती यांच्याकडून मिळालेली मूल्ये आणि श्रद्धांनी दलित कवींची संवेदनशिलता नियमित होण्याऐवजी या मूल्य आणि श्रद्धांना नाकारून गतिमान झाली आहे. हे या जाणिवेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. ही जाणीव आत्मभान, आत्मशोध, नकार, विद्रोह, बंडखोरी, मानवी मूल्यांचा आग्रह इत्यादी घटकांनी समृद्ध झाली आहे. जाणिवेमुळेच दलित कवितेला आशय प्राप्त झाला आहे. प्रामुख्याने या माणूसकेंद्री कवितेचा आशय हा स्वत:ची रचना घेऊन सिद्ध झाला आहे. माणसाचे

होणारे शोषण, त्याचेवरील अन्याय, अत्याचार, जुलूम, त्याची मुस्कटदाबी, त्याचे सुखदु:ख, दैन्य, दास्य इत्यादी विविध बाबींचे चित्रण हा दलित कवितेच्या आशयाचा मुख्य भाग आहे. अस्पृश्यता, भूक, उपासमार, अगतिकता या अनुभूतीसह प्रस्थापित व्यवस्थेला दिलेला नकार, व्यवस्थेच्या विरोधातील विद्रोह, बांधिलकी, व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंध, स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतरे अशा विविध पातळ्यांवरील अनुभवविश्वाने दलित कविता मुखरीत झाली आहे. आशयाचा वेगळेपणा आणि मूल्यात्मक आविष्कार यामुळे दलित कवितेची नवता सिद्ध झाली आहे.

आत्मभान, आत्मशोध, नकार, वेदना, विद्रोह, बांधिलकी इत्यादी मूल्ये स्वत:ची रचना घेऊन सिद्ध झालेल्या दलित कवितेच्या आशयाने सिद्ध केली आहेत. दलित कवितेने मानवमुक्तीच्या आंदोलनाचा विचार आणि मूल्ये यांचे संप्रेषण केले आहे. माणसाचे गाणे गाणाऱ्या संस्कृतीचा उद्घोष केला आहे. विद्रोह हे दलित कवितेच्या अभिव्यक्तीचे प्राणतत्त्व आहे. दलित कवितेत गतकाळाचा अन्वय आणि वर्तमानाचे वास्तव या दोन पातळ्यांवर विद्रोहाचा आविष्कार होतो. या विद्रोहाचे पर्यावसान शेवटी मानवी मूल्यांच्या स्वीकारात होते. हजारो वर्षांपासून जो समूह मूक होता तो आपल्या पूर्वपिढ्यांच्या वेदनादायी जगासह कवितेच्या माध्यमातून मुखरीत झाला. वेदना, विद्रोह, नकार, बांधिलकी या मूल्यांसह एक नवे भाषिक अवकाश कवितेच्या क्षेत्रात समृद्धपणे दाखल झाले. पारंपरीक मराठी कवितेला नाकारून, तिच्या अभिव्यक्तीचे तंत्र झिडकारून दलित कविता सिद्ध झाली. यातच तिची नवता आहे. भाषा, प्रतिमा, प्रतिके, अभिव्यक्तीच्या तऱ्हा, जाणिवा, आशय या सर्व घटकांच्या अनुषंगाने दलित कवितेने आपली नवता सिद्ध केली आहे. या कवितेला असलेले तात्त्विक अधिष्ठान ही या कवितेची भक्कम बाजू आहे.

१९८१ ते १९९० या दशकाच्या काव्य प्रवासात पँथर चळवळीतील अरुण कांबळे हे एक महत्त्वाचे नाव असून 'अरुण कृष्णाजी कांबळे' या शीर्षकाचा त्यांचा काव्यसंग्रह स्वत:चे वेगळेपण राखून आहे. कवयित्रीची कविता हा एक अभिव्यक्तीचा अनोखा आविष्कार ठरला आहे. त्याचप्रमाणे लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम यांची कविता म्हणजे पूर्वसूरीचा प्रभाव नाकारून दलित कवितेत एक नवा चेहरा आणि स्वर उमटविणारी कविता ठरली आहे. दलित कवितेची व्याप्ती वाढविणाऱ्या या सर्व घटना आहेत असे म्हणता येईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दलित कविता ही मराठी साहित्याच्या प्रवासातील मुख्य प्रवाह ठरली आहे. कारण दलित कवितेचा मराठी कवितेवरही प्रभाव पडू लागला. मराठी कवितेला समाजाभिमुख करण्याचे कार्य दलित कवितेने पार पाडले आहे. मराठीतील बरेचसे कवी दलित कवितेच्या तोंडवळ्यासारखी कविता लिहिण्याचा प्रयत्न करू लागले. हा मराठी कवितेतील नवीनच प्रयत्न होता असे म्हणता येईल. त्याचप्रमाणे दलित कवितेचा एक दबदबा निर्माण झाला. अनेक दडपलेल्या स्वरांना उजागर होण्याचे बळ दलित कवितेमुळे प्राप्त झाले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. विविध जातीसमूहात जसे शिक्षणाचे लोण पसरले तसतसा कवितेचा उच्चारही होऊ लागला ही बाबसुद्धा दलित कवितेची व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली.

दलित कवितेने चिंतनशीलता, अंतर्मुखता यासोबतच सांस्कृतिक मिरासदारीला झिडकारून लावणारी, मराठी भाषेच्या कुचकामीपणाला हिणवणारी अशी अभिव्यक्ती केली आहे. स्वातंत्र्य, भूक, दारिद्र्य यांचे स्वरूप स्पष्ट करतानाच बाबासाहेब आंबेडकरांच्या महानतेचा आलेख मांडला आहे. दलित वंचिताच्या वाट्याला आलेली विपरिताची अवस्था बेदरकार शैलीत स्पष्ट करून सर्ववंचित भुकेल्यांच्या वतीने भोगाच्या पातळीवर दोन हात करण्यासाठी त्यांची कविता सज्ज झाली आहे. बोलभाषेला वक्तृत्वाच्या पातळीवर नेऊन तिला विचार तत्त्वांचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याची किमया लिलया साधली आहे. उपरोध, उपहास, लोकाविष्कार, लोकगीताची लय, उखाणे, वाक्प्रचार, म्हणी या सर्व गोष्टींची समृद्धी या कवितेत प्रत्ययाला येते. अतिशय धिट भाषेतून पारंपरिक प्राक्कथांचा दुजाभाव आणि पक्षपात या कवितेने कथन केला आहे. माणूसपणासाठीचा आक्रोश मांडला आहे. स्वतंत्र देशात माणसाच्या वाट्याला पारतंत्र्यच आले म्हणून ढसाळांनी या देशाला 'गांडू बगीचा' असे संबोधले आहे.

केशव मेश्रामांच्या कवितेनेही देशाविषयी, व्यवस्थेविषयी कडवटपणाचा स्वर आळविला आहे. तर भीमसेन

देठे यांनी गरीब कष्टकऱ्यांच्या भणंग जीवनाचे रेखाटलेले चित्र या देशातील गरीबीचा आलेख चितारणारे आहे. तर भुजंग मेश्राम यांच्या कवितेने भारतीय समकालीन पुरोगामीत्वाचे वास्तव काय आहे याचा शोध घेत इतिहास आणि वर्तमानाचा अन्वय लावला आहे. डब्ल्यू. कपूर यांच्या कवितेने निसर्ग प्रतिमांचा विशेषत: भौगोलिक प्रतिमांचा मोठ्या प्रमाणात वापर करून त्याआधारे या देशाच्या प्रकृती आणि प्रवृत्तीबद्दलचे भाष्य केले आहे. पुढील काळात यशवंत मनोहरांची कविता वेगळ्या वळणाने गेलेली दिसते. पूर्वीच्या त्यांच्या कवितेत व्यवस्थेच्या विरोधात नकार विद्रोहाची आग ओकणारा नायक 'मुर्तिभंजन'मध्ये मात्र विषण्णतेच्या गर्तेत गरगरताना दिसतो. कृतिशील विद्रोही नायकाचे पोरकेपणाच्या आकांतात पर्यावसान होताना दिसते.

दलित आत्मकथनांच्या प्रभावातून कवितेने चरित्रात्मक अभिव्यक्तीची वाट चोखाळली आहे. गतकालीन, दु:ख पेलणाऱ्या माणसांची दुनिया मुखरीत केली आहे. प्रदूषणग्रस्त पर्यावरणात माणसाच्या आशा आकांक्षांचा गर्भ करपून गेल्याचे निदान या कवितेने केले आहे. तर काही कवितातून औपरोधिक शैलीतून जीवनाचे दर्शन घडविले आहे. पोरकेपणा, खंडीतपणा, स्वकीय जगातील अंतर्विरोध हे कवितेचे केंद्रवर्ती विषय ठरले आहेत. कुटुंब आणि समाज असे समीकरण मांडून सामाजिक पृष्ठभूमीवर वावरणारा आणि झुंजणारा कुटुंबकबिला साक्षात केला आहे. आयुष्याच्या लोंबकळत्या अवस्थेची विविध रूपे साक्षात झाली आहेत. भुकेने तडफडणाऱ्या, विषमतेने अगतिक झालेल्या माणसांच्या भावभावनांची आंदोलने प्रकट झाली आहेत. अधांतरी जगणाऱ्या समाजजीवनाच्या स्थितीगतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे सांस्कृतिक दलदलीत रुतून बसलेल्या स्थितीचे वास्तव स्पष्ट करून आधुनिक काळाचे प्रतिगामी मानस अधोरेखित केले आहे.

ब्राह्मणी व्यवस्थेने मांडलेल्या छळवादाची कहाणी सांगीतली आहे. समाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पातळीवर होरपळलेल्या समाजजीवनाचे मनोगत व्यक्त केले आहे. आदिवासी, गटई कामगार, वेठबिगार, रस्त्यावरील बेघर, निराधार, शेतमजूर, तमाशातील कलावती, कलावंत, महारोगी अशा सर्व शोषणग्रस्त समाजजीवनाचा वेध घेतला आहे. बेवाररस जगाचे व्याकूळ करणारे दु:खद चित्र रेखाटले आहे. महानगर, नगर आणि गावकुसापासून कोसो दूर असलेली झाडीपट्टी, रानवस्ती आणि डोंगरदऱ्यात खितपत पडलेले समाजजीवन साकार झाले आहे. इतिहासाचे आणि हिरावून घेतलेल्या इतिहासाचे रूप सिद्ध केले आहे. काही कवितेतून गावपांढरीतील अंतर्विरोध स्पष्ट करून मातीशी असलेली निष्ठा व्यक्त करीत माणसावर माया करणारी जाणीव व्यक्त झाली आहे.

अरुण कांबळेसारख्या कवीने व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारी आवेशपूर्ण अभिव्यक्ती केली आहे. ती विषमतावाद्यांशी उभा दावा मांडणारी आहे. बाजारबुणग्याच्या जगाविषयीचा उद्वेग व्यक्त झाला आहे. प्रतिक्रांतीविरुद्ध क्रांतीचा स्वर या कवितेने आळविला असून, प्रक्षुब्ध आणि बंडखोर नायकाची प्रतिमा त्यांच्या कवितेतून साकार झाली आहे. चेंदवणकरांच्या कवितेने सभ्यपणाच्या बुरख्याआड लपलेल्या कावेबाज आणि चाणाक्ष प्रवृत्तीची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. तथाकथीत संस्कृतीरक्षकाचा मानवद्रोही चेहरा उजागर केला आहे. लोकशाही मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या प्रवृत्तीवर प्रचंड आघात केला आहे. अभिव्यक्तीची एक वेगळी भाषिक तऱ्हा आविष्कृत केली आहे.

या कवितेत विद्रोहाची विविध रूपे साकार होताना दिसतात. आत्माविष्कार आणि समाजपरिवर्तन या उद्दिष्टांसाठी विद्रोह प्रकट होताना दिसतो. आपल्या शब्दांनी मूकपणे जूलूम सहन करणाऱ्यांच्या ओठातील आग व्हावे अशीही अपेक्षा व्यक्त झाली आहे. पारंपरीकतेची पारंपरिक शस्त्रानेच आतडी बाहेर काढावीत अशी विद्रोहाची नवी खेळी या कवितेने मांडली आहे. माणसाला नागविणाऱ्या तत्त्वमूल्यांचे तिरकस स्पष्टीकरण करीत त्या मूल्यांना ठाम नकार देऊन तीव्रत्तर विद्रोह पुकारणे असे या कवितेचे प्रयोजन दिसते.

एक वैशिष्ट्य असे दिसते की, चळवळीच्या खंडीतपणावर या कवितेला भाष्य करावेसे वाटते. त्यामुळे ती टोळीबाज पुढाऱ्यांच्या शाब्दिक भंकसपणावर औपरोधिक भाष्य करते. लाचारी पत्करणाऱ्या आणि लांलूलचालन

करणाऱ्या प्रवृत्तीला नकार देऊन निषेध नोंदविते. चळवळीच्या नेतृत्त्वाबददल औपरोधिक भाष्य करते. मूल्य हरविलेल्या, निष्ठा ढळलेल्या समाजातील पलायनवादी वृत्तीचा वेध घेऊन, पोकळ भूमिका घेऊन जगणाऱ्यांच्या पोंपटपंचीवर भाष्य करते. गटातटाच्या राजकारणामुळे चळवळींना परिवर्तनाच्या एका ठोस कार्यक्रमात रूपांतरीत होता आले नाही अशी शोकात्म जाणीव व्यक्त होते. आपल्या स्वार्थासाठी बाबासाहेबांच्या नावाचा वापर करणाऱ्या प्रवृत्तीवर कडवट प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. केसाने गळा कापणाऱ्या प्रवृत्तीचा समाचार घेतला आहे. चळवळीच्या पर्यावरणात कातडीबचाऊपणा करीत अस्तित्व जोपासणाऱ्या प्रवृत्तीवर कडवट भाष्य करण्यात आले आहे.

भुजंग मेश्राम यांच्या कवितेने दलित कवितेचे प्रतल विस्तारण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. अरण्यात वाढणाऱ्या असंतोषाला भक्कम करीत उलगुलानचे गाणे भारतीय कवितेत निनादन ठेवण्याचे कार्य पार पाडले आहे. नागवंशी निनाद घुमवीत बहुभाषिक आयामाने ती सिद्ध झाली आहे. ही कविता जगंलझाडीपासून ते महानगरीय पर्यावरणापर्यंतच्या अवलोकनातून आलेल्या आत्मभानाचा ऐतिहासिक आविष्कार ठरली आहे. या कवितेने मातृसत्तेच्या अंगिकारातून नागवंशी बंडखोर स्त्रियांचे दर्शन घडविले आहे. संघर्षाचे भान ठेवून युद्धमान होणारी, लढाऊ बाणा प्रकट करणारी ही स्त्रीरूपे आहेत. आद्यगण समाजातील स्त्रीशक्तीच्या रूपाचे अंश त्यात प्रत्ययाला येतात. अवैदिक परंपरेतील मानवमुक्तीच्या आंदोलनाचा प्रवास अधोरेखित करून या कवितेने पर्यायी संस्कृतिचा संकेत दिला आहे. बुद्ध-बिरसा-फुले- आंबेडकर ही मानवमुक्तीच्या आंदोलनाची अभिन्न अंगे आहेत. याच तात्त्विक अधिष्ठानातून ती आकारास आली आहे. सांस्कृतिक वेठबिगारीवरील भेदक भाष्य तिने केले आहे.

इतिहासाच्या पार्श्वभूमीवर समकालीन जीवनाचा आविष्कार करणे हे तिसऱ्या पिढीच्या दलित कवितेचे वेगळेपण आहे. लोकनाथ यशवंतच्या कवितेने अभिव्यक्तीच्या नव्या वाटा चोखाळल्या आहेत. रचनेच्या दृष्टिने काही नवे प्रयोग केले आहेत. सामाजिक अभिसरणाच्या नावाखाली कार्यरत असणाऱ्या मूलतत्त्ववादी, पुनरुज्जीवनवादी प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडण्याचे कार्य करतानाच संस्कृतीच्या जहरी प्रेमाची कहाणी सांगीतली आहे. स्वजगाअंतर्गत शोध घेणारी जाणीव या पिढीच्या कवितेत अधिक प्रबळ झालेली दिसते. अर्थाची व्यापकता आणि सूचकता अधोरेखित करणे हे तिचे सामर्थ्य आहे.

ज्योती लांजेवार आणि हिरा बनसोडे या कवयित्रींनी आपल्या कवितेचे वेगळेपण सिद्ध केले आहे. लांजेवार यांच्या कवितेत वेशीलगतचे काळोखी जग, भूकेची व्याकुळता, कोरड्या शुष्क ओठावरील गाऱ्हाणे असा प्रांत साक्षात झाला आहे. भूक, दारिद्रय, स्त्रियांची आब्रु हे या कवितेतील चिंतनाचे विषय आहेत. अभावग्रस्त स्त्रीजावनाच्या स्थितीगतीचा आलेख चितारून भावनिक पातळीवरील अभावाचा ताळेबंदही या कवितेने मांडला आहे. बोथट प्रवृत्तीच्या देशाचे रूप चित्रित केले आहे. पुढच्या पिढ्यांना विद्रोहरत होण्याची दिशा देणाऱ्या या कवितेची प्रतिमासृष्टी समृद्ध आहे. लौकीक जगातील जखमांना जोजवत राहण्यापेक्षा प्राकृतिक जगणे श्रेयस्कर मानणारी प्रेमजाणीवही व्यक्त केली आहे. हिरा बनसोडे यांच्या कवितेने बहिष्कृत जगण्याविरुद्ध लोकांच्या न्यायालयात फिर्याद दाखल केली आहे. स्त्रीमुक्तीचा तो जाहीरनामा आहे. पाषाणहृदयी संस्कृतीचा पाडाव करण्यासाठी विद्रोही भूमिका घेतली आहे. ही कविता प्रतिमांकित अभिव्यक्तीतून वेदनेचा प्रत्यय देते. स्त्रीजीवनाशी निगडीत संकल्पना, संदर्भ विचारप्रणालीशी जोडून प्रकट होतात. त्यातून नव्या अर्थाची प्रतिती घडविली जाते. पौराणिक काळापासूनचे स्त्री गुलामीचे संदर्भ अधोरेखित करून पुरुषी निर्दयी व निगरगट्टपणावर ती भाष्य करते. बेगडी संस्कृतीवर टिकास्त्र सोडते. देव, धर्म आणि जातीच्या दंशाने घायाळ झालेल्या समाजमनाचे मनोगतच या कवितेने प्रकट केले आहे.

एखाद दुसऱ्या कवीने स्वप्नाळू आशावादही व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे दलित प्रेमकवितेला एक वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला आहे. क्रांतीविषयीचा आदर्शवाद प्रियेच्या मनावर बिंबवण्यात ही कविता यशस्वी ठरली आहे. बुद्धाच्या करुणेने दु:खाचा शोध घेणारी जाणीव कवितेतून व्यक्त केली आहे. बुद्धत्व आणि बंधमुक्ती असे एक समीकरण मांडले आहे. आशावादाच्या केंद्रावर विद्रोहाच्या वाटेने मार्गस्थ होताना माणसावर माया करणारी जाणीव

व्यक्त केली आहे. सावित्री, ज्योतिबा, आंबेडकर, रमाई, मंडेला अशी महान चरित्रे शब्दबद्ध केली आहेत. स्वानुभवातून स्वकीयांशी एकरूप होणारी करुणामयी भाषा या कवितेत अवतरली आहे.

काही कवींनी गेय रचना आणि गझलांचाही आविष्कार केला आहे. लोकलय आणि गेयतेमुळे या कवितेच्या रूपाचा आगळावेगळा आविष्कार झाला आहे. सार्थ भाषा, अर्थाची व्यापकता आणि सचूकता हे या कवितेचे सामर्थ्य आहे. भाषिक प्रस्फोटाचा, बोली भाषेच्या ताकदीचा प्रत्यय देतानाच लुबाडल्या गेलेल्यांच्या वतीने आंदोलन उभारले आहे. त्यातून आठशे वर्षांच्या मराठी कवितेच्या परंपरेला अज्ञात असलेल्या जगाचे भीषण शिल्प जिवंतपणे साकार झाले आहे. मराठी कवितेच्या भाषिक फुटपट्ट्या भिरकावत आणि मोजमापाचे मिटर तुडवत ही कविता वैश्विक झाली आहे.

विसाव्या शतकाचे अखेरचे दशक फार मोठे उलथापालथीचे दशक आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या अनेक घडामोडी या दशकात घडल्या, मोठी सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली आहेत. या दशकात जागतिकीकरण, खाजगीकर, उदारीकरण या प्रक्रियेने भारतीय व्यवस्थेत आपले पाय घट्ट रोवले आणि आपली नखे बाहेर काढून सामाजिक-आर्थिक क्षेत्र पुरते ढवळून काढले. जवळपास अठरा वर्षांपासून सुरू असलेला नामांतराचा लढा निर्णायक ठरला आणि याच दशकात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार झाला. याच दशकाच्या आरंभी कमंडलू यात्रा आणि कारसेवा निर्णायकी ठरली आणि बाबरी मशिदीचा विद्ध्वंस झाला.

आणिबाणी ते गुजरात हत्याकाडांपर्यंत देशाच्या सांस्कृतिक पर्यावरणात धर्म आणि जात या दोन गोष्टीच्या केंद्रावरच जगण्यात भारतीय माणसाला सुरक्षित वाटू लागले. दलित पँथरचा उदय आणि विघटन यामुळे दलित सामाजिक पर्यावरण अधिकच असुरक्षित झालेले दिसते. महिलांचे दशक, भारतीय राष्ट्रवादाचे हिंदुत्वीकरण, धार्मिक उन्माद, रथयात्रा ते त्रिशूलवाटप, माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट आणि बाबरी मशिदीचा विद्ध्वंस अशा अनेकविध गोष्टींनी गजबजलेला हा काळ आहे. स्वातंत्र्याची पन्नासी याच दशकात झाली. मंडळ आयोगाच्या शिफारसीनंतर जातीय भान अधिकच सजग झाले. त्यामुळे राजकीय समीकरणे बदलली असली तरी प्रत्येक जातीचे संघटन एकेक नवा जातीय चेहरा घेऊन दाखल झाले. जातीनिर्मूलनाऐवजी जातीच्या सक्षमीकरणाला वेग आला. हे अस्वस्थ करणारे वास्तव या काळात पाहावयास मिळते. हिंदू धर्माचा भाग नसलेल्या मुस्लिम समाजात मुल्लामौलवीनी जोपासलेल्या जातीवादानेही फुटीर वृत्तीला वाव मिळाला. जेव्हा एखादे राज्य किंवा जातीय गट स्वत:ची विचारधारा किंवा संस्कृती श्रेष्ठ समजून तिच्या शक्तीच्या साहाय्याने प्रचार करते तेव्हा त्यातून सांस्कृतिक किंवा वैचारिक साम्राज्यवाद उदयास येत असतो. या काळात मूलतत्त्ववादी शक्तीनी आपले वैचारिक, सांस्कृतिक वर्चस्व समाजमनावर लादण्याचा सपाटा लावला. धार्मिक उन्मादाने टोक गाठून बाबरी मशीद उद्ध्वस्त केल्यानंतरच्या काळात ज्या भीषण दंगली झाल्या त्यामुळे मुस्लिम समाजात असुरक्षितता निर्माण झाली. बाबरी मशिद हे प्रकरण या देशाच्या लोकशाहीवर, एकात्मतेवर दूरगामी परिणाम करणारा प्रचंड आघात आहे. भारतीय सामाजिक, जातीय मानसिकतेने माणसाच्या जगण्याची आणि विचार करण्याच्या पद्धतीची वर्गवारी केली आहे. अशा कप्पेबंद पार्श्वभूमीवर या दशकातील दलित कविता उदयाला आली आहे.

'खाऊजा' या प्रक्रियेने दलित बहुजनांचे अस्तित्वच धोक्यात आणले. सरकारी उद्योगाची विक्री सुरू झाली. गिरण्या बंद पाडून किंवा आजारी दाखवून गिरण्याची जमीन विक्रीस काढल्या गेली. त्या जागेवर मॉल्स उभे झाले. मल्टीनॅशनल कंपन्याचे वर्चस्व वाढत गेले. सक्तीच्या निवृत्तीचे प्रयोगही जोरात सुरू झाले. त्यामुळे कामगार उद्ध्वस्त झाला, देशोधडीला लागला. हळूहळू कष्टकरी वर्गाला भिकेस लावण्याचे काम या दशकाने केले. याच काळात स्त्रीदेह ही प्रदर्शनीय वस्तू आहे. जगाच्या पाठीवर सुंदर स्त्री फक्त भारतातच आहे. असे जगाच्या प्लॅटफॉर्मवर जाहिरातीसह माध्यमानी पुढे आणले. त्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय अन्याचार कमी झाले असे घडले नाही. उलट स्त्रीत्वाचा अधिक्षेप अधिकाधिक होत गेला. भँवरीदेवीवरील बलात्कार, दिल्ली येथील तंदुरकांड, स्त्रियांची अनेक जळीत प्रकरणे, जळगाव येथील सेक्सकँडल, चालत्या रेल्वेत स्त्रीवर झालेला बलात्कार इत्यादी. हा सर्व प्रवास म्हणजे स्त्रीजगतांच्या खच्चीकरणाचा हा कालखंड आहे असे स्पष्ट होते.

ग्रामीण जीवनात समाजिक, आर्थिक पैलू बदलत गेल्यामुळे शेतकरी वर्ग हा अन्नदाता आहे ही समजूत मोडीत निघाली. ओलीताच्या सोयीचा अभाव, कोरडवाहू शेती, शेतमालाला न मिळणारा रास्त भाव, यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरू झाले. कर्ज आणि पाणी या दोन गोष्टींमुळे शेतकऱ्यांच्या जगण्याची वासलात लागली. सामाजिक जीवनातील हा अंतर्विरोध दलित कवितेला अंतर्मुख करणारा ठरला. प्रत्येक काळामध्ये समाज विकासाच्या टप्प्यावर कोणतातरी एक वर्ग लढाऊ होऊन उदयास येत असतो. एक वर्ग असा असतो त्याला पद, प्रतिष्ठा, सत्ता मिळत असते. एक वर्ग वंचिततेचा धनी ठरत असतो. समाज एकसंघ नसला की, अनेक समस्या निर्माण होतात. भारतीय समाज बहुजातीय आणि बहुजिनसी आहे. कला ही सामाजिक वास्तवातून उद्भवत असते. सामाजिकतेशिवाय कलाकृती निर्माण होऊ शकत नाही. सामाजिकता हे साहित्याचं सत्व आहे. साहित्यातील सामाजिकतेला विचारप्रणालीचा आधार असतो. जातीबद्ध समाजातील एक विशिष्ट संवेदना हा सामाजिकतेचाच एक भाग असतो. म्हणून दलित कवितेत जातीअंताचा विषय केंद्रवर्ती राहिला आहे. प्रत्येकच काळात 'जात' या व्यवस्थेचे विविधांगाने तिच्या मानसिकतेसहित विश्लेषण केले आहे. या दशकाच्या कवितेतही हा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही.

या दशकात हिंदुत्ववाद अधिक आक्रमक झाला आहे. धार्मिक वसाहतवाद प्रबळ होत गेला. गोब्राह्मण प्रतिपालकाच्या नावावर उभ्या झालेल्या संस्था संघटनांनी पुरोगामी वसाहती आणि गावे आपल्या ताब्यात घेतली आणि पुरोगामी मोर्चे मंदावत गेले. जातीय गणिते बदलत गेली त्यातून हिंसाचाराचा अतिरेक झाला. रथयात्रेपासून त्रिशूळ वाटपापर्यंतचा प्रवास हिंसेला खतपाणी घालणाराच होता. त्यातून एक नवा उन्माद जन्माला आला आणि अल्पसंख्य समाजाचे अस्तित्व धोक्यात आले. बुद्धपोर्णिमेला अणुचाचण्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिपरिनिर्वाण दिनीच बाबरी मशीद उद्ध्वस्त करणारा असा हा काळ आहे. आध्यात्म आणि कर्मकांडाच्या तुरुंगात माणसाला डांबणाऱ्या या काळात आधुनिकता आणि विकासाचे मार्ग खुले झाले तरी आध्यात्माच्या झापडाचे निगरगट्ट कातडे या देशातून दूर होऊ शकले नाही. राष्ट्र म्हणजे केवळ माणसांची डोकी नव्हेत. किंवा राष्ट्र म्हणजे दगड, धोंडे, निसर्गही नव्हे! जिथे राबणारा हात असतो तिथे राष्ट्राला जिवंतपणाचे रूप प्राप्त होते. माणूस या मूल्याला अर्थ प्राप्त व्हावयाला असेल तर भ्रष्टाचार, स्वार्थांधता,धनिक सत्तांचे केंद्रीकरण या सर्वांच्या विरोधात राबणारे कष्टकरी हात उभे झाले पाहिजेत असाही व्यापक विचार या काळात बळावताना दिसतो. थोडक्यात, हे दशक म्हणजे संक्रमण, स्थित्यंतर, दहशतवाद, दंगली, धर्मांधता अशा अनेकविध बाबींनी भरलेले आणि भारावलेले असे आहे. त्याचा परिणाम एकूण समाजजीवनावर जसा झाला तसाच साहित्यावरही झालेला आहे. याच काळात चळवळीची ध्येये रसातळाला गेली आहेत असेही निदर्शनास येते. त्याचाही मोठा परिणाम या दशकातील दलित कवितेवर झाला आहे. शंभरापेक्षा अधिक कवितासंग्रह या दशकात प्रकाशित झाले आहेत.

नवीन पिढीतील अरुण काळे, बळवंत कांबळे, सिद्धार्थ तांबे, दीपक त्रिभुवन, उत्तम अंभोरे, आनंद गायकवाड, अविनाश गायकवाड यासारखे अत्यंत महत्त्वाचे आणि कसदार लेखन करून स्वत:चे वेगळे स्थान प्रस्थापित करून आपले वेगळेपण सिद्ध करणारे कवी या दशकाने दिले आहेत. या दशकात हिंदुत्ववाद अधिक आक्रमक झाला.धार्मिक वसाहतवाद प्रबळ होत गेला.संक्रमण, स्थित्यंतर, दहशतवाद, धर्मांधता, दंगली अशा अनेकविध बाबींनी भारावलेल्या या काळाचा प्रभाव कवितेवर पडलेला दिसून येतो. अरुण काळे हा या दशकातील समर्थ कवी होय. स्वकीय भूमीवर धर्म आणि अराजकाचं अतिशय सुक्ष्म आणि अंतर्मुखतेनं मांडलेलं समाजलक्ष्यी चिंतन हा त्यांच्या कवितेचा मूळ गाभा आहे. ती जीवनावर भाष्य करते, सामाजिक मानसिकतेची चिरफाड करते, सामाजिक विसंगतीचे चित्रही स्पष्ट करते.नागवल्या गेलेल्या माणसाच्या महानतेचे तत्त्वज्ञान मांडून सांस्कृतिक काळेपणाच्या पार्श्वभूमीवर विचाराच्या उजेडाची, मानवतेच्या तेजस्वीपणाची पखरण काळे यांच्या कवितेने केली आहे. आशयाच्या ठाशीवपणासह कलात्म परिमाण कवितेला प्राप्त झाले आहेत. पारंपरीक सौंदर्यतत्त्वे हास्यास्पद ठरवित माणसाचे गाणे गाणाऱ्या संस्कृतीचा उद्घोष त्यांच्या कवितेने केला आहे.

या दशकातील कविता क्रांती-प्रतिक्रांतीचा वेध घेणारी असून श्रमण संस्कृतीचा संघर्ष तिने चित्रित केला आहे. मानवमुक्तीचा विचार मांडतानाच कलात्मकतेचीही बूज राखली आहे. भावनिक प्रश्नात न अडकता जगण्याच्या संदर्भात काही मूलभूत प्रश्न मांडले आहेत. वंचितांची बाजू घेणारी राजकीय भूमिका मांडली आहे. सनातनी परंपरा आणि विज्ञाननिष्ठ भूमिका यांच्यातील एक जबरदस्त संघर्षनाट्य कवितेतून प्रत्ययाला येते. युद्ध हाच या कवितेचा धम्म आहे. उजेड पळवून नेणाऱ्या व्यवस्थेच्या संदर्भात ती बोलत राहते.काळोख-उजेड असा संघर्ष चितारते. उजेडाच्या निर्मितीसाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षासाठी सज्ज झालेले सामूहिक मन कवितेतून प्रत्ययाला येते. काळोखी वैऱ्यांना उजेडच्या अस्त्राने नामशेष करण्यासाठी या कवितेने आगेकूच केली आहे.

आत्मटिका हा या कवितेचा विशेष प्रकर्षाने जाणवतो. आंबेडकरी चळवळीचा इतिहास, सामर्थ्य आणि मर्यादा, समकालीन दलित मध्यमवर्गीय मानसिकता याचा वेध कवितेने घेतला असून, आत्मटिकेला धिटपणे सामोरे जात स्वकीय जगातील दोष उघड्यावर मांडताना या कवितेला भिती वाटत नाही. स्वेतरांच्या जगाला जशी ती ताकदीनीशी उघडेनागडे करते तशी स्वकीय जगाच्या बाबतीतही वर्तन करताना दिसते.आंबेडकरोत्तर काळात अपयशी ठरत गेलेले राजकारण हे या कवितेचे केंद्र आहे. तडजोड करणाऱ्या प्रवृत्तीवर ती सडेतोडपणे टिका करते.आंबेडकरोत्तर काळात वाढीस लागलेल्या व्यवहारवादाचे स्पष्टीकरण या कवितेने केले आहे. पंढ युगाचे आणि बांडगुळी उत्पादनाचे युग अवतरल्याची सूचना दिली आहे. क्रांतीचे वारे उलटे वाहात गेल्यामुळे वाट्याला आलेल्या वैफल्याचे दिग्दर्शन केले आहे. मोर्च्याने गल्ली बदलल्यामुळे झालेल्या विविध परिणामाची चर्चा केली आहे. दुभंगलेपणाची स्थिती स्पष्ट केली आहे. समकालीन राजकीय ऱ्हासाचे आकलन मांडले आहे.

नव्वदोत्तर कवितेने दंगल, दहशत, दडपशाही, दांभिकता या वास्तवाचे भयकारी दर्शन घडवून क्रुर अधिसत्तेचा भयसूचक चेहरा वाचकांपुढे ठेवला आहे. आतंकवादाची मूळं जात, धर्म, सत्ताकांक्षा आणि भूक या घटकातच सामावली आहेत असा विचार मांडला आहे. अतिशय प्रभावीपणे मूलतत्त्ववाद आणि आतंकवादाचे शवविच्छेदन केले आहे. रामजन्मभूमी, रथयात्रा, दंगली, झुंडशाही यामुळे निष्पापांचे गेलेले बळी या वर्तमान सत्यावर प्रकाश टाकला आहे. दहशतीचा विशेषत: हिंदुत्वाच्या नावावर माणसाच्या रक्ताची चटक लागलेल्या कत्तलखोर मानसिकतेचा आणि त्यांच्या कृतिशीलतेचा समाचार घेतला आहे. मूलतत्त्ववादी प्रवृत्तीचे दहशतवादी वास्तव स्पष्ट केले आहे. सांस्कृतिक विघटन अणि धार्मिक वर्चस्ववाद्यांच्या थैमानाचे वर्तमान अधोरेखित केले आहे. भारतीय सामाजिक, राजकीय व्यवस्थेने शोषित पिडिताना अधिकाधिक बरबाद करण्यासाठीच गनिमी काव्याचा वापर केला आहे. हे स्पष्ट करून वर्तमानातील गनिमी मूलतत्त्ववाद्यांचा चेहरा वाचकांपुढे ठेवला आहे. मूलतत्त्ववाद्यांवर आणि एकाच देशात दोन राष्ट्रे निर्माण करू पाहणाऱ्या प्रवृत्तीवर वारंवार आघात करणे, सांस्कृतिक व्यभिचाराच्या अनेक जागांचा निर्देश पुन:पुन्हा करणे, त्यांच्या कावेबाजपणावर करडी नजर ठेवणे असे कार्य या कवितेने पार पाडले आहे.

बेसुमार दारिद्रयात खितपत पडलेल्या भीषण भूकेचे विदारक वास्तव या कवितेतून प्रत्ययाला येते.या देशातील बालपण, तारुण्य, म्हातारपण उपाशीच आहे. या देशाने ते कसे कायम ठेवले आहे अशी वास्तवता अधोरेखित केली आहे. मुस्लिम, आदिवासी कवितेनेही फुले आंबेडकरी कवितेशी अनुबंध जोडला आहे. त्यात माधव सरकुंडे, जावेद कुरेशी, उषाकिरण आत्राम यांचे योगदान महत्त्वाचे आहे. देव आणि दैववादाला नकार देणाऱ्या या कवितेने स्थितीशीलता आणि गतीरुद्धतेला नाकारणाऱ्या जाणिवा प्रकट केल्या आहेत. इतिहासाचे एक विश्लेषण दिले आहे. ऐतिहासिक, तात्त्विक मीमांसा करताना प्रतिकात्मतेचा आधार घेतला आहे. या कवितेच्या दृष्टिपटलावर दु:खितांचे मनोगत उमटले आहे. तिने व्यभिचारावर कर्मविपाकाची वस्त्रे पांघरणाऱ्या समाजमनाचे पितळ उघडे पाडले आहे. जगण्याची बाराखडी शिकतानाच युद्धाची कला शिकण्याचे आवाहन केले आहे. आदिवासी जगण्याचा भेदक आविष्कार करताना, नितीमत्ता हरविलेल्या समाजमनाचा कानोसा घेताना, समकालीन चळवळीचे स्वरूप तपासताना ही कविता अधिकाधिक चिंतनशील होत जाते. स्वातंत्र्याच्या अर्धशतकाचा ताळेबंद मांडताना वाचकांना अंतर्मुख करते.

फुले आंबेडकरी मुस्लीम कविता मुस्लिमांमधील दलितांची व्यथा वेदना आणि उपेक्षेसह सांस्कृतिक संघर्ष छेडते. धर्मासाठी समाजाला वेठीस धरायचे आणि समाजवास्तव नाकारायचे असे आलिम प्रवृत्तीचे बेदरकार पैलू या कवितेत प्रत्ययाला येतात. मुस्लिमांमध्ये जातीव्यवस्था तीव्र असल्याचे वास्तवही स्पष्ट होते. एका नव्या युद्धाची घोषणा करणाऱ्या या कवितेने म.पैगंबर, म.फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्त्वांचे अधिष्ठान असणाऱ्या नवसमाजनिर्मितीची स्वप्ने पाहणारा आशावाद जोपासला आहे. मुफलिसांचा वेदना आलेख मांडला आहे. जातीव्यवस्थेच्या आर्वतात सापडलेल्या समूहजीवनाची, त्याच्या अटळ दु:खाची कहाणी तिने सांगितली आहे. वर्णव्यवस्थेच्या आवारात बिना वहाणेने वावरणाऱ्या समाजाचे चित्र रेखाटले आहे. वाडा व शेती आणि झोपडी व सागळ अशा दोन सांस्कृतिक जगातील अंतर्विरोध स्पष्ट केला आहे. भूतकालीन अंधाऱ्या इतिहासाचे व्यवस्थेकडून केले जाणारे आघात आणि स्वकीयांच्या जगाचे मनावर होणारे आघात यातून गोची झालेले मन व्यक्त झाले आहे. चिंतनगर्भता, प्रतिकात्मकता, अर्थाची व्यामीश्रता, अनेकार्थता असे विशेष प्रत्ययाला येतात.

फुले आंबेडकरी कवितेत विद्रोह उपरेपणाने येत नाही.तर तो कवितेची आणि आशयाची गरज म्हणून येतो. ही कविता दु:ख मांडून थांबत नाही तर दु:खावरचा उपाय सुचविते. ती जातीसमूहापुरती मर्यादीत राहात नाही. पुनर्मूल्यमापनाची मागणी करते.समताधिष्ठित समाजनिर्मितीचा आराखडा मांडते.या कवितेतून तथागताच्या करुणेचा सुप्त प्रवाह वाहताना दिसतो.भारतवर्षांतील अस्पृश्यतेविरुद्ध बाबासाहेब आंबेडकरांनी उठवलेला आवाज आणि काळ्या लोकांची (आफ्रो अमेरिकन) क्रांती यांचे नाते जुळते असा विचार या कवितेने मांडला आहे. या कवितेतील संवेदनशील मनाचेआक्रंदन अंतर्मुख करणारे आहे. लोकशाही ते हिंसाचार, भोवतालाचे निरीक्षण आणि उदध्वस्त झाल्यामुळे प्रकटणारा संताप कवितेतून व्यक्त झाला आहे. दीर्घ अवकाश पेलणारा चिंतनाचा आवाका आणि जीवनासंबंधीचे ठोस आणि भयावह वास्तवाचे व्यापक भान या कवितेतील शब्दकळेतून प्रकट झाले आहे. प्रचलित राजकारणावर स्फोटक भाष्य केले आहे. दवंडी आणि लिलावाच्या भाषेतून दंभस्फोटक अभिव्यक्ती झाली आहे. पारंपरीक मूल्यव्यवस्थेला हास्यास्पद ठरविणारा विद्रोह प्रकट झाला आहे. उद्विग्नतेतून भाषिक आविष्कार झाला आहे. कार्यकर्त्याच्या द्विधा मानसिकतेचे चित्र साकारताना स्वप्नाळू आदर्श सांगण्यापेक्षा अव्याहत संघर्षाची अपरिहार्यता सांगणे या कवितेला महत्त्वाचे वाटते. आहेरे च्या मुजोर मस्तवाल जगाविरुद्धचे युद्धपवित्रे आणि संघर्षाची विविध रूपे चितारून तिने वंचितांच्या दुनियेला संघर्षसन्मुख केले आहे. बोलभाषेतील विद्रोह कसा प्रखर असतो हेही दाखवून दिले आहे. वक्तृत्वपूर्णता, बोलभाषिक प्रबळता, आशयाची सघनता यामुळे या कवितेचा नवा चेहरा सिद्ध झाला.

तत्त्वज्ञानाच्या तार्किक भाषेत संवाद साधणाऱ्या या कवितेने झुंडीच्या मानसिकतेला जन्म देणाऱ्या सत्ताबाह्य सत्ताकेंद्राचा शोध घेतला आहे. भाषिक कृतीचे विधान अधिक जोरकसपणे गती आणि अधोगतीचे वास्तव सूचित करते. तहाची भाषा आणि फितुरीचे व्याकरण या गोष्टींनी सामाजिक सांस्कृतिक जीवनाचा घात केला म्हणूनच गद्दार प्रवत्तीला सुरुंग लावणारी भाषा या कवितेत अवतरते.दुश्मनी आणि फितुरी, गनिमी कावा आणि उघड दुश्मनी, प्रलोभने आणि आव्हाने, भावनिकता आणि कठोरपणा अशी अनेक विरोधके या कवितेत प्रत्ययाला येतात.

दलित व्हाईट कॉलरवाल्यांची पेचदार अवस्था ही कविता स्पष्ट करते. आंबेडकरोत्तर काळात जयंत्या, मयंत्या आणि विभूतीपूजा यांचे अवडंबर माजवण्यात आले. अशा पाखंडीपणावर ही कविता आघात करते. सम्यक क्रांतीच्या रणांगणावर आंबेडकरी विचारांच्या तोफा आणताना युद्धभूमीला पाठ दाखवू नका असे स्वकीयांना आवाहन केले आहे. डोळ्यात तेल घालून सज्ज राहण्याचा आदेशच दिला आहे. प्रस्थापितांनी सनातन भात्यातील विषारी बाण संविधानाच्या पायावर ठेवून वैश्विक व्हावे अशी आकांक्षा या कवितेने व्यक्त केली आहे.

बुद्ध संस्कृतीतील मिथ्स, नजिकच्या इतिहासातील प्रतिमा उदा.तक्षक, अमृतनाक, सिधनाक, रमाई या साऱ्या प्रतिमा आपल्या सामर्थ्यासह साकार होतात. आशयसमृद्धी आणि आशयविस्तारासाठी मिथकांचे उपयोजन झाले असून संघर्षसिद्धीसाठी सामर्थ्य आणि पराक्रमाचे स्मरण करून देण्याचे कार्य या मिथकांच्या माध्यमातून झाले आहे. एकलव्य,

शंबूक, चोखामेळा या सर्व मिथकीय नायकांनी बदलत्या काळात विद्रोह केला आणि आपले स्थान नव्याने प्रस्थापित केले अशा अर्थाचा निर्देश या कवितांनी केला आहे.

पतन पावलेल्या सांस्कृतिक काळोखाचे भेदक चित्रण प्रतिकात्मक अभिव्यक्तीतून करण्यात आले आहे. सद्धम्माबाबत खंबीर भूमिका घेतली आहे. प्रतिकांच्या माध्यमातून समकालीन जीवनाच्या संदर्भात विपरीत किंवा नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. उपरोध उपहास हा या कवितेचा स्थायी भाव असलातरी अनुभूतीचे कलात्म आविष्करण हे या कवितेचे प्रबळ तत्त्व आहे. अनुभवाकडे तठस्थपणे पाहण्याच्या वृत्तीमुळे ती अधिक पिळदार झाली आहे. प्रज्ञासूर्याला अभिप्रेत असलेल्या समाजनिर्मितीचा ध्यास आणि ध्येय तिने उराशी बाळगले आहे.

काही कवींनी वेगवेगळे आकृतीबंध हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. सवालजवाब रचनेचा आकृतीबंध स्वीकारून शील आणि चारित्र्याचे महत्त्व सांगीतले आहे. जात्यावरच्या गाण्यासारखीही रचना केली आहे. वऱ्हाडी बोलीचेही उपयोजन केले आहे. विविध गेय रचनांमधून शिक्षणाचे महत्त्व, तथागताचा विचार, स्वातंत्र्य इ.अनेक विषय या रचनांच्या केंद्रस्थानी आले आहेत. बुद्धाच्या देशात हिंसेने घातलेले थैमान, राजकारण्यांची बदमाशी, सत्तेच्या खुर्चीभोवतीची लाचारी, स्त्रियांवरील अत्याचार, असुरक्षितता हे सारे वास्तव मुखरीत झाले आहे.

फुले आंबेडकरी कवितेत स्त्री जगताची वेदना मुखरीत झाली आहे. दलित, आदिवासी, वडार, कोल्हाटी, देवदासी, वेश्या अशा स्त्री जगताची भळभळती वेदना प्रकट झाली आहे. या कवितेने सांस्कृतिक संचिताचे अनौरस रूप दिग्दर्शित केले आहे. कवयित्रींच्या कवितांनी एक वेगळे अनुभवक्षेत्र व्यापले आहे. स्त्रियांची कविता स्त्रीजगताचे आत्मभान जागृत करते. धर्माच्या आणि पुरुषी व्यवस्थेच्या जाळ्यात अडकलेल्या स्त्रीजातीच्या दु:खाला शब्द देण्याचा प्रयत्न केला आहे. सनातनत्वाची जोपासना करू पाहणाऱ्या कावेबाज शक्ती आणि प्रवृत्तीची पोलखोल करणे हे या कवितेचे महत्त्वाचे कार्य आहे. स्त्रीच्या जगण्याला निर्थकता प्राप्त करून देणाऱ्या निर्ढावलेल्या मूल्यांचा वेध घेतला आहे. तसेच स्त्रीमुक्तीच्या उदगात्यांना देवत्वाच्या मखरीत बसवू पाहणाऱ्या सनातन व्यवस्थेच्या मानसिकतेचा, धर्माच्या आवरणाखाली बाईला दडपून टाकणाऱ्या समकालीन वास्तवाचाही वेध घेऊन स्त्रीजगताचे सांस्कृतिक भान जागवले आहे. देव-धर्म, स्मृती- श्रुती व्यवस्थेने पावलोपावली उभारलेले तुरुंग, कावेबाज वाटा, गनिमी रस्ते इ.सर्व गोष्टींचे कधी सूचक तर कधी स्पष्ट आणि परखड विवेचन केले आहे. ऱ्हासकालीन आणि सामाजिक सांस्कृतिक वास्तवाचा फार मोठा परिणाम या कवितेवर झाला आहे.

दलित चळवळ आणि नेतृत्त्वाने समष्टीशी असलेला नातेसंबंध तपासून पाहिला नाही अशी खंत कवयित्रींच्या कवितेतून व्यक्त झाली आहे. शहरी वस्त्र पांघरलेल्या प्रदेशातील जाणीव केंद्रात आपले बस्तान बसविणाऱ्या प्रवृत्तीचा ठळक निर्देश केला आहे. जन्ममत्यूच्या प्रवासात दु:खाची साथसोबत करणाऱ्या असोशी स्त्रीत्वाचे जिवंत चित्र साकार केले आहे. स्त्रीकडे भोगाची वस्तू म्हणून पाहणाऱ्या व्यवस्थेची वखवख, पुरुषातील पशुत्व आणि पुरुषी शोषक क्षेत्राचे स्वरूप धिटाईने उघड केले आहे. आदिम स्त्रियांचे आत्मभान जागविण्याचा प्रयत्न केला आहे. बुद्धाचा विचार कानामनात भिनविण्याचा प्रयत्न उषाकिरण आत्रामसारख्या कवयित्रीनी केला आहे. एकजुटीचे तत्त्वज्ञान, संघर्षशक्तीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पेटण्या जाळण्याचे तत्त्वज्ञान पेरण्याचे काम केले आहे. आदिम स्त्रीच्या जगण्याचे भेदक वास्तव मांडले आहे. सूर्याचे वारसदार असल्याचे घोषित केले आहे. रानातल्या स्त्रीची होणारी अवहेलना कथन केली आहे. स्त्रीजगत आणि पुरुषी व्यवस्था असे द्वंद्व साकारले आहे.

स्त्रियांच्या कवितांनी अनुभवक्षेत्राच्या व्याप्तीसह कवितेतील भाषिक कृतींनी समर्थपणे अर्थप्राप्ती घडविली आहे. पौराणिक मिथकांना फुले आंबेडकरी जाणीवेतून नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. प्रतिमा संघटनातून बेगडी परिवर्तनवाद्यांवर प्रखर भाष्य केले आहे. नव प्रस्थापित आणि त्यांचे मठ यांना नकार देणारी डोळस जाणीव व्यक्त केली आहे. पारंपरीक संस्कृती आणि समकालीन वास्तव याची सांगड घालून सांस्कृतिक अंतर्विरोध स्पष्ट केले आहेत. गुलामीत

जखडून ठेवणाऱ्या संकल्पनांबद्दल संतप्त भावनांना वाट मोकळी करून दिली आहे. पुरोगामीत्वाच्या नावाखाली गुलामीचे अलंकार सजविणाऱ्या प्रवृत्तीवरचे स्फोटक भाष्य केले आहे. या कवितेचा महत्त्वाचा विशेष म्हणजे वेदनांचे आभाळ मनावर कोसळले म्हणून स्त्रीमन आगतिक किंवा परागंदा होत नाही तर ते स्त्रीसुलभ अनुभूतीला संघर्षशील विचारप्रणालीशी जोडून नव्याच अर्थाची प्रतिती घडविते. वैश्विक पुरुषी प्रवृत्तीचा वेध घेणाऱ्या या कवितेचा आविष्कार पूर्वसूरीच्या स्त्रीवादी आविष्कारापेक्षा वेगळा आहे. हुंदक्याला वाट मोकळी करून देतानाच नव्या पहाटेचा ध्यास आणि हव्यास या कवितेने उराशी बाळगला आहे.

काही कवितांमधून हिरवळीचे ऋतू आपल्यापर्यंत पोहचू दिले नसल्याची तक्रारही मांडली आहे. जुलमी परंपरेचे निशाण फडकावून नाच करणाऱ्या प्रवृत्तीचे चेहरे ओरबाडून काढण्याचा चंग या कवितेने बांधला आहे. पुरुषी गनिमी चालीची चाहूल लागल्यामुळे कोंडी झालेले मन बांध फोडून प्रकट होते. तेव्हा रस्त्यावर उतरण्याची भाषा अपरिहार्यपणे या कवितेतून व्यक्त होते. पाश्चात्यांच्या शरीर अंगाने विकसीत होत गेलेला स्त्रीवाद जिथे स्त्रीयोनीच नाकारली गेली आहे तिथे कसा काय लागू करता येईल असा प्रश्न उपस्थित करून तथाकथीत स्त्रीवादाने अंतर्मुख व्हावे असे सुतोवाच कवयित्रींच्या कवितेने केले आहे.

एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकाची कविता ही अनेक अर्थांनी महत्त्वाची ठरली आहे. जागतिकीकरणाच्या समाजजीवनावरील अनिष्ट परिणामाची प्रखर जाणीव या दशकाच्या कवितेनेच करून दिली आहे. दलित वा फुले आंबेडकरी कविता जाणिवेमुळेच आशयघन झाली आहे. आंबेडकरी ज्ञानशक्तीमुळे अभिव्यक्तीचे साधन आणि सामर्थ्य प्रकट करणारी जाणीव आत्मभानामुळे स्पष्ट होते. कवितेच्या आविष्काराची बैठक आत्मशोधामुळे तयार होते. आत्मशोधामुळे अनुभूतीमागे असणाऱ्या कार्यकारणभावाचा शोध घेतला जातो. जाणिवेमुळेच नकाराचा आशय प्राप्त होतो. प्रतिकाराचे आंबेडकरी तत्त्वज्ञान हेच विद्रोहाच्या निर्मितीचे आदिकारण ठरले आहे. मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी हा विद्रोह असल्यामुळे रचनात्मकता, विधायकता हे विशेष विद्रोहाला प्राप्त झाले आहेत. विचारांच्या पाठबळामुळे ही कविता भावविवश होण्याऐवजी ती विचारसौष्ठवाची कविता ठरली आहे.

जातीची अस्मिता आणि वर्गचेतना याबाबत द्विधा स्थिती आहे. भारतीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर झाले नाही.त्यामुळे लोकशाहीपूर्व काळात जसे धर्म, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, पुरोहितशाही इ.शोषक व्यवस्थेची केंद्रे होती.तेव्हापासूनच शोषक आणि शोषित अशी वर्गवारी भारतीय समाजात पाहावयास मिळते.भारतीय समाजात समकालीन जीवनात कामगार, कष्टकरी, शेतमजूर, भूमीहीन, दलित, आदिवासी हे सारेच सर्वहारा वर्गाचे घटक आहेत. आपल्या देशातल्या वर्गाला वर्ग म्हणता येणार नाही अशी परिस्थिती आहे. कारण येथे वर्ग हा जातीच्या कचाट्यातून बाहेर पडला नाही.त्यामुळे वर्गचेतनेच्या संदर्भात प्रश्न निर्माण होतात.त्यामुळे वर्गजाणिवा अदयापही प्रबळ ठरत नाहीत. समकालीन सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात गरीब माणूस कुठे असेल, ग्लोबल व्यवस्थेत तो कुठे असेल, त्याच्या संघर्षाचे तत्त्वज्ञान कोणते? ग्लोबल व्यवस्थेत लढे कोणत्या स्वरूपाचे असू शकतील या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या दशकातील कवितेने केला आहे.

प्रचलित मराठी कविता वैदिक वाङ्मयाचे स्त्रीवादी वाचन करायला तयार नाही. आपल्याकडील स्त्री - पुरुष नातेसंबंधाची कविता विवाहसंस्थेच्या पलिकडे जात नाही.प्रस्थापित वर्गातून आलेली कविता शरीर आणि मन यांच्या संबंधापलिकडे फारसा शोध घेताना दिसत नाही. त्यामुळे सामान्य पातळीवर विविध जातीस्तरावर स्त्रियांचे दुखणे आणि प्रश्न बाजूलाच राहतात. समकालीन जीवनात बाजारू वस्तू म्हणूनच स्त्रीला सजविण्याची चढाओढ सुरू आहे. तिचे लेदर करन्सीत रूपांतर केले जात आहे. चामडी नाण्याचं मूल्य आणि तिची क्रयशक्ती डॉटकॉम युगव्यवस्थेने ठरवून दिली आहे. चलन आणि चामडी चलन या गोष्टी समांतर ठरू पाहात आहे. केवळ लिंग या एकाच आधारावर सर्व स्त्रियांची स्थिती समान नाही. श्रीमंत - उच्च - मध्यम - कनिष्ठ - दलित - आदिवासी या सर्व स्त्रीवर्गात भिन्नता दिसून येते. एक स्त्री म्हणून काही प्रश्न समान असले तरी जातीसंस्था आणि वर्णधर्माने काही विशिष्ट प्रश्न स्त्रियांच्या आयुष्याच्या ओटीत घातले आहे

हे लक्षात घ्यावे लागते.

आपला देश चालविणाऱ्या लोकांनी गॅट करार आणि डंकेल प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या, तेव्हाच शेतकऱ्यांच्या आत्महत्येची तयारी सुरू झाली.सांस्कृतिक संचिताचे अनौरस रूप याच काळात अधिक भडक झालेले दिसते.फुले आंबेडकरी चळवळीच्या परिप्रेक्ष्यात चळवळीचे खंडित वास्तव, दलित मध्यमवर्गीय आत्मकेंद्रितता, धार्मिक मूलतत्त्ववाद आणि फॅसिस्ट शक्तीचा क्रुर चेहरा याच काळात आक्रमक झाला होता.या वर्तमानात दगाबाजांचा उन्मादी विजय होताना दिसतो.ग्लोबल वार्मिंगने जसे निसर्गाचे पर्यावरण बिघडवून टाकले तसे ग्लोबल वर्तमानाने सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण बिघडवून टाकले.सामान्य माणसाची फरफट आणि ससेहोलपट सुरू झाली.सामाजिक भोवताल आणि कोलाहलाने माणसाला सुन्न करून सोडले.सामान्यांच्या जगात वेदनांचे बीज पेरून महासत्ता मुजोर आणि मगरुर झाली. समाजजीवन एखादे अराजक आल्यासारखे हतबुद्ध झाले.हे एक नवे स्थित्यंतर या दशकात पाहावयास मिळते. या स्थित्यंतराचा परिणाम समाजजीवनावर मोठ्या प्रमाणात झाला. या प्रक्रियेमुळे घटनात्मक मूल्यांना बाधा निर्माण झाली. त्यामुळे जागतिकीकरण आणि मानवी मूल्यांची व्यवस्था या संदर्भात प्रश्न निर्माण झाले. स्थित्यंतरामुळे जीवनपद्धतीवर परिणाम होत असतो. मूल्यांच्या संदर्भात बदल होत असतो.बदलत्या जीवनाचे संदर्भ साहित्यात प्रतिबिंबित होत असतात. त्यातून साहित्याचे वेगळेपणही सिद्ध होत असते.या दशकाच्या कवितेतही हा प्रत्यय येताना दिसतो.

खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण ही अर्थव्यवस्थेशी निगडीत असणारी प्रक्रिया असून शोषण हा तिचा स्थायीभाव आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वातून उपभोगी ग्राहक संस्कृती निर्माण करणे हे तिचे उद्दिष्ट आहे. खाजगीकरण आणि उदारीकरणाला मूलतत्त्ववादाची जोड मिळाल्यामुळे समता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये जागतिकीकरणाने कुचकामी ठरविली आहेत. या प्रक्रियेमुळे दारिद्र्यरेषेखालील सर्व समाजाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. महासत्तेचे वर्चस्व आणि दहशतीचा ताण फुलेआंबेडकरी कवितेवर पडला आहे. याचा पुरेसा प्रत्यय या दशकातील कवितेने दिला आहे. जागतिकीकरण या नव्या शोषक व्यवस्थेच्या परिप्रेक्ष्यात स्थानिक पातळीवर जातीय अहंकाराचे विषाणू सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक स्तरावर कार्यरत झाले. कल्याणकारी राज्य ही संकल्पना धोक्यात आली आहे. जग जवळ आले आणि माणसाच्या हिताचे कल्याणाचे कार्यक्रम नष्ट होऊ लागले. वैचारिक, पुरोगामी परिवर्तनाच्या चळवळी निकालात निघाल्या.एन. जी.ओ. कल्चरने छोट्या छोट्या चळवळीच्या गटांची वाट लावली. या प्रक्रियेने माणसाला सर्व पातळ्यांवरील निर्णयप्रक्रियेतून नामशेष केले. गतकाळ आणि वर्तमान शोषणाच्या पातळीवर समानच राहिला. खरे तर जागतिकीकरणामुळे उतरंडी उरणार नाहीत अशी अपेक्षा निर्माण झाली होती. परंतु जागतिकीकरणाने स्वातंत्र्यासारखाच भ्रमनिरास केला.स्त्रीपुरुषांचे वस्तुकरण आणि विरूपीकरण झाल्यामुळे विषमता आणि स्तरभेद कायमच राहिले. मूलतत्त्ववाद, जातीवाद आणि जागतिकीकरण यांच्या अभद्र युतीमुळे जागतिक स्तरावरही भेदाभेद कायमच राहिले.या सर्व वास्तवाचे पडसाद या दशकाच्या कवितेत उमटले आहेत.

फुले - आंबेडकरी चळवळीच्या परिप्रेक्ष्यात चळवळीचे खंडित वास्तव, दलित मध्यमवर्गीय आत्मकेंद्रितता, धार्मिक मूलतत्त्वाद आणि फॅसिस्ट शक्तीचा क्रुर चेहरा या साऱ्यांचा शोध घेण्याचे कार्य या दशकातील कवितेने पार पाडले आहे. सांस्कृतिक पटलावरच्या वेदनांचा आलेख चितारणाऱ्या या कवितेने अतिशय टोकदार शोकसंवेदन व्यक्त केले आहे. वाट्याला आलेली वेदना आणि भडकलेले अंत:करण याचे साक्षात चित्र रेखाटले आहे. युवराज सोनटक्केसारख्या कवीने फुले आंबेडकरी कवितेच्या वाटचालीतील विस्तवी परंपरा कायम राखण्याचा प्रयत्न केला आहे. प्रियेशी संवाद साधताना त्यांच्या कवितेने जणू अग्नीसौंदर्याचे अलंकारच सजविले आहेत. प्रेमकवितेलाही सामाजिक भानाचा साज चढविला.

कैलास भाले यांच्या कवितेने मातंग समाजाचे विविधांगी जीवनदर्शन घडविले आहे. वास्तवदर्शी मांगवाडा त्याच्या जगण्याखुपण्यासह चित्रित केला आहे. जगण्यातील पेच आणि ताण स्पष्ट करून जुन्या आणि नव्या मांगवाड्यातील एक संघर्षही चित्रित केला आहे. या समाजाला लाचारीवर मात करण्यासाठीचे मनसुबे रचता आले नाही तशी क्षमता

असूनही उकलता येण्यासारखे पीळ मनात कायमच ठेवले याविषयीचा उद्रेक व्यक्त केला आहे. अण्णाभाऊच्या फकिराची खरी ओळख मांगवाड्याला झालीच नाही. एकंदरीत एका विशिष्ट जातसमूहाचा अवकाश व्यापणाऱ्या या कवितेने जातीय आणि सामाजिक सत्य बेडरपणे व्यक्त केले आहे. अस्वस्थता, हतबलता आणि अंतर्मुखता यांच्या एकत्रित अनुभवाचा प्रत्यय दिला आहे. पेचदार अनुभूती वाचकांसमोर ठेवून सुन्नपणाचा अनुभव दिला आहे. संवेदनाशून्यता सत्ताव्यवस्थेच्या रोमारोमात भिनलेली असल्यामुळे माणुसकीची जाणीव हद्दपार होते. तेव्हा पुरोगामी म्हणवून घेणारी सरकारे किती निर्दयी आणि क्रुर आहेत याचा प्रत्यय येतो. जागतिकीकरणाच्या भांडवली व्यवस्थेमुळे स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याची खंत या कवितेने व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे सनातन्यांच्या प्रतिगामी कुटनितीवर तिक्ष्ण नजरेने जागता पहारा ठेवून जबाबदार नैतिकतेची मानवतावादी भूमिका ठामपणे मांडली आहे.

मारोतराव जाधव या बेलदार कवीने भटक्या विमुक्तांचा, जीवनातील घडामोडीचा जिवंत चित्रपटच साकारला. घाणीच्या साम्राज्यातील जगाचे विदृप रूप साकार केले आहे. चोरासारखा जीव गहाण ठेवून, दु:खावर दु:खाचे कलम करीत कुठवर जगायचे असा प्रश्न ठळकपणे अधोरेखित केला आहे. व्यवस्थेतील सत्तांध, मदांध आणि स्वार्थी प्रवृत्तीवर आसूड ओढत विविध पातळ्यावरील विद्रोहाच्या छटा प्रस्तुत केल्या आहेत. छळवणुकीच्या वाळवंटातील अन्यायअत्याचाराचे पिरॅमिड सपाट करण्याचा बेत आखला आहे. काही कवितांमधून वस्तीला विकलांगता प्राप्त झाल्याचे चित्र, वैफल्याची फळे हाती लागल्याची शोकात्म अनुभूती, करंटेपणा आणि विपरीत भाव दर्शविणाऱ्या अनेकविध प्रतिमांचा आढळ होतो. कवितेच्या अर्थसमृद्धीसाठी नाविन्यपूर्ण प्रतिमांचे उपयोजन झाले आहे.

एखादा कवी राजकीय संस्कृतीचे अध:पतन अत्यंत उपरोधिक स्वरात व्यक्त करताना दिसतो. सत्तेच्या आतबाहेर किंवा परिघावर कार्यकर्ता मरतो. चळवळ देशोधडीला लागते आणि समाजमन गटांगळ्या खात राहते असेही निरीक्षण नोंदविले आहे. मरगळलेले वास्तव प्रदिप्त करण्याचा ध्यास या कवितेला लागला असून बदलासाठी अनिवार्य असणाऱ्या विचारतत्त्वांची शस्त्रे या कवितेने पाजळून ठेवली आहेत. त्या शस्त्राच्या आधारे मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी युद्ध पुकारायचे आहे. इथल्या मातीत रुजलेले बुद्धतत्त्व आणि आगीतून उभे राहिलेले तेजतत्त्व असा सौंदयाविष्कार या कवितेने फुलविला आहे. आधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या काळात मूल्यांचा होत गेलेला ऱ्हास, नवसांस्कृतिक युगाचे आगमन, हरवत गेलेला माणुसकीचा गहिवर या सर्व गोष्टींची नोंद घेतली आहे. उद्याच्या सुंदर स्वप्नासाठी माणसाचा 'धम्म' रुजविण्यासाठी ही कविता कटिबद्ध झाली आहे. धंदयासाठी तत्त्व आणि विचारांचे भांडवल करायचे ही नवी व्यापारी निती प्रबोधनाच्या चळवळीतील मोठा अडसर ठरली आहे. या स्वार्थी व्यवहाराच्या महारोगापेक्षा कवितेचा रोग चांगला असल्याचा निष्कर्ष या कवितेने मांडला आहे.

मच्छिंद्र चोरमारे यांच्या कवितेने मोडलेल्या माणसांची कथा सांगीतली आहे. या कथेत इथल्या संस्कृतीचा अमानुषपणा, तिच्या गनिमी काव्याचे तंत्र, माणसाचा बंद केलेला आवाज अशी अनेक उपकथानके आहेत. दु:खाचा काफिला हाकारताना येणारे अडथळे, अडसर यांचे चित्र रेखाटून जाणिवा आणि उणिवा अशी विरोधके मांडली आहेत. अंतर्विरोधाचा सूर येथे टिपेला पोहचलेला दिसतो. माणसाला नाकारणाऱ्या व्यवस्थेचा जहरीपणा नमूद केला आहे. कातडी सोलून काढणाऱ्या युगावरचे भाष्य केले आहे. अफूच्या गोळीतून जन्मलेली धुंदी गारद करण्याइतपत धमनीत भरून घेतलेली आग पेरीत नेण्याचे कार्य तत्परतेने पार पाडण्यासाठी सज्ज झालेला नायक या कवितेत उभा आहे. बुद्ध तत्त्वांचे रोपण करीत, गुंतागुंतीच्या वास्तवाला शब्दाकार देऊन तापलेल्या दिवसाचे विविधांगी पदर संयमशीलतेने उलगडून दाखविले आहेत.

प्रदूषित सामाजिक विस्कळीतपणा, राजकीय कावेबाजी, दगाबाजांचा उन्मादी विजय, दीशाहीन आंदोलन आणि चळवळीचा थांबलेपणा याविषयीची चिंता आणि चिंतन हे या कवितेचे केंद्रवर्ती विषय आहेत. प्रतिक्रांतीच्या भाषेवर वार करण्यासाठी क्रांतीचे स्फुल्लींग पेरणारी भाषा आत्मसात करण्याचे आवाहन करून ही कविता मूलतत्त्ववाद्यांच्या, प्रतिक्रांतीवाद्यांच्या आणि उजव्या शक्तींच्या भाषिक राजकीय खेळीचे रूप उजागर करते. समाजहिताच्या केवळ गप्पा

मारणाऱ्या पोकळ बुद्धिवाद्यांचे वस्त्रहरण करते. देव आणि दैवतीकरण यामध्ये अडकलेल्या मनोवृत्तीला प्रश्नांकित करते. शोषक व्यवस्थेच्या भाषेचे कार्यलक्ष्यी प्रयोजन फसवे असल्याचे सिद्ध करून खुश्किच्या मार्गाने स्वार्थाचे इप्सित साध्य करू पाहणाऱ्या अध:पतित जगाचे भेसूर चित्र रेखाटून वाचकांना अस्वस्थ करीत अंतर्मुखतेपर्यंत घेऊन जाणे हे या कवितेचे सामर्थ्य आहे.

समकालीन सामाजिक, सांस्कृतिक भयगंडाचा कार्यकारणभाव स्पष्ट करीत असुरक्षित सामाजिक वास्तवाचे विविधांगी पदर साक्षात केले आहेत. अस्तित्वाची अर्थपूर्णता आणि निर्थकता याचबरोबर मृत्यूविषयक चिंतन या कवितेने मांडले आहे. सामाजिक विकृतीचा औपरोधिक वेध घेताना भाषिक आकाराने अर्थपूर्णता सबल केली आहे. बुद्धकालीन इतिहासाचे स्मरण आणि वर्तमानाचे वास्तव यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न असे या कवितेचे सूत्र आहे. सामाजिक संवेदना हरवत गेलेल्या मानसिकतेविषयीचे अस्वस्थ करणारे वास्तव रेखाटण्यात या कवितेला स्वारस्य आहे. ज्यांनी या भूमीचे मातृत्व नागविले, संवैधानिक कर्तृत्व पांगविले त्यांच्या समूळ संहारासाठी क्रांतीचे आगमन होण्याची अपरिहार्यता या कवितेने पटवून दिली आहे. अंधारयुगाला अखेरचा सलाम करून मुक्तीचा महासंगर आणि अस्मितेचा जागर घालण्याचा चंग या कवितेने बांधला आहे.

सौंदर्यबोधक प्रतिमेच्या अर्थाला शह देऊन वास्तवातील प्रतिमात्मतेचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. ऋतूप्रतिमांची अभावाच्या अनुभूतीशी सांगड घातल्यामुळे निसर्गचक्रातील विविध ऋतूंचे नैसर्गिक अर्थ पार बदलून गेले आहेत. सामाजिक ऋतूचक्राची स्थितीशीलता या प्रतिमाविश्वाने अधोरेखित केली आहे. फाटका संसार आणि हातावर पोटे असणाऱ्या मरणवाटेवरच्या प्रवाशांची वेदना मुखरीत केली आहे. आपण गाफील राहिलो तर काय काय अनाचार माजू शकेल याचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

या कवितेला तात्त्विक वाद घालत इतिहासाची पुनर्मांडणी करावयाची आहे. घातपाती भेदनिती आणि अन्यायी परंपरेचे दाखले देत, 'देश म्हणजे देशातील नागरिक' हे मान्य नसलेल्या संघाच्या मनूवादी, देशद्रोही राष्ट्रवादाला प्रश्नांकित केले आहे. आधुनिक काळात पांढरपेशी व्यवस्थेने जगण्याच्या मार्गावर संभ्रमाचे धुके पसरविले. ते दूर करण्यासाठी, उन्नतीचा महामार्ग रोकणाऱ्या शक्तीच्या विरोधातील निर्णायक युद्धाची अपरिहार्यता व्यक्त केली आहे. सारं काही आपोआप बदलेल असं मानणाऱ्या निष्क्रिय कवी प्रवृत्तीला आव्हान दिले आहे. फॅशनेबल स्त्रीमुक्ती चळवळीचा टेंभा मिरवून प्रदर्शन करणाऱ्या प्रवृत्तीवरचे तिखट भाष्य केले आहे. माणसाच्या जीवनातील कुरूपता, विरूपता आणि विषमता नष्ट होऊन मानवी जीवनाला निसर्गदत्त सुंदरपण यावे या जीवनदृष्टीच्या ध्यासातून कवितेचा आविष्कार झाला आहे. माणूस केवळ मनुष्यसदृश झाला पण मनुष्यत्वाचे काय? असा जीवघेणा प्रश्न या कवितेसमोर आहे. त्यामुळे माणुसकीचे विकेंद्रीकरण होण्याची अपरिहार्यता व्यक्त झाली आहे. माणसाचा चेहराच या युगाने पुसून टाकला आहे. फेकलेल्या, नाकारल्या गेलेल्या, पुसून टाकलेल्यांच्या अस्तित्वाचे प्रश्न या कवितेत सर्वत्र पाहावयास मिळतात.

एकूणच फुले आंबेडकरी कवितेत चळवळ, नेतृत्व याबद्दलचा आकांततांडव जोरात सुरू आहे. नेतृत्वाबद्दल आगपाखड केली जाते, मात्र त्यामागील कार्यकारणभावाची चिकित्सा करण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. चळवळीला दुषणे देण्याची एक लाटच कवितेत आली आहे. त्याबाबत अभिनिवेशाने भाष्य करण्याची एक टूम पाहावयास मिळते. दु:खाकडे सकारात्मकतेने पाहण्याची बुद्ध विचाराची दृष्टी या कवितेला लाभली आहे. धर्म आणि जातीने माणसांच्या संवेदनाही विभाजीत केल्या आहेत त्यामुळेच माणुसकीच्या लढाईत पराभूत झाल्याचा निष्कर्ष तिने मांडला आहे. पारंपरीक सनातन मानसिकतेची तिरस्करणीय चलाखी उजागर करणारी ही कविता नव्या शतकाकडे साशंक नजरेने पाहताना दिसते.

केतन पिंपळापुरे या समर्थ कवीच्या कवितेला धम्मक्रांतीचे जबरदस्त आकर्षण आहे. सृष्टीच्या पुनर्रचनेचे वेड आहे. मूल्यगर्भता केंद्रस्थानी ठेवून क्रांतदर्शत्वाची पखरण करणारी त्यांची कविता अतिशय महत्त्वपूर्ण ठरली आहे. नव्या जगाच्या नवनिर्माणासाठी दाहक अग्निपर्वाचे एक तळपते सौंदर्य तिने फुलविले आहे. अग्निदिव्यातून गेल्याशिवाय वेदनांचा

मुक्तीमार्ग मिळत नसतो. दु:ख आणि वेदनेतूनच नवे सृजन उदयास येत असते. असा विचार जागोजाग या कवितेने मांडला आहे. सृजनासाठी जन्मव्याकुळ कुस शोधण्यास्तव ती मार्गस्थ झाली आहे. मानवमुक्तीच्या आंबेडकरी आंदोलनाचा तळपता इतिहास पुढ्यात ठेवून आंबेडकरी क्रांतीचा जागर तिने घातला आहे. ग्लोबल गावाच्या अतिक्रमणामुळे उजाड आणि विराण होत गेलेल्या गावाचे विषण्ण करणारे चित्र रेखाटले आहे. लोकशाहीच्या बुरख्याआड फॅसिझम क्रुरपणे कार्यरत असल्यामुळे लोकशाही धोक्यात आली. नाझीझमच्या नियोगातून मूलतत्त्ववाद्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद जन्मास आला. वंशवर्णवादाने देश बर्बादीच्या उंबरठ्यावर उभा आहे. हा देश महासत्तेचा बटिक बनला आहे. असे निरीक्षण या कवितेने नोंदविले आहे. तसेच विणलेल्या कोषात गुदमरून गेलेल्या स्त्रीविश्वाचे मूक हुंदके उजागर केले आहेत. आत्मटिकेला धिटपणे सामोरे जाणे हा कवितेचा स्वभाव आहे. वर्गांतर झालेल्या दलितांची मानसिकता आणि जगण्याच्या वास्तवाचे रूप औपरोधिक अंगाने मुखरीत करण्याचा जोरदार प्रयत्न दिसून येतो. या कवितांनी प्रतिकांच्या माध्यमातून सांस्कृतिक ठेव्याची पुनर्स्थापना केली आहे. त्याचबरोबर हिंदू व्यवस्थेअंतर्गत असलेल्या प्रतिमा प्रतीकांना निर्भर्त्सित करून विद्रोहाची अभिव्यक्ती करण्याचा एक मार्ग अनुसरला आहे. त्यातून एक नैतिक अधिष्ठान कवितेला प्राप्त करून दिले आहे. विद्रोही आशय प्रकट करण्यासाठी विद्रोही मानसिकता या कवितेतून प्रकट झाली आहे.

अरुण काळेच्या कवितेने फुले आंबेडकरी कवितेला अनेकविध वैशिष्ट्ये प्राप्त करून दिली आहेत. समकालीन वास्तवाची समांतर कविता म्हणून मौलीक ठरलेल्या या कवितेने जागतिकीकरणाच्या कराल रूपातून अस्तित्वात आलेल्या शोषक व्यवस्थेचे ताणेबाणे, शोषणाच्या तऱ्हा, वर्चस्वाचे रूप- विदृप स्पष्ट करून मल्टी लुटालुटीच्या युगावरचे भाष्य केले आहे. एकीकडे सर्वप्रकारच्या बलसत्ता आणि दुसरीकडे सर्ववंचितांची दुबळी दुनिया यात दुबळ्यांचा पराभव अटळच आहे याविषयीचा लेखाजोखा मांडला आहे. या कवितेने समूहमनाच्या अनेकस्तरीय भाषिक रूपांना अतिशय आत्मियतेने कवटाळले आहे. प्रादेशिक, बोली, घरगुती, बोलभाषा, विविध जाती- पोटजातीची, अधोविश्वाची, भायगिरी, टपोरी लोकांची, भिकारी, फकीर, टिनटप्पर- रद्दीलोखंडवाले, तुरुंगातील कैदी, आयभैन आणि बापलेकासह संगणकयुग आणि आय.टी पार्काची अशा अनेकस्तरीय भाषांचा गलबला आपल्या कवितेत मेळविला आहे. नियमबद्ध, व्याकरणिक, शिष्टसंमत भाषाव्यस्थेला फाटा देण्याचा एक जातिवंत मार्ग म्हणूनही या भाषिक स्तराचे अधिक्य कवितेच्या केंद्रस्थानी येते. कवितेतील भाषिक संघटन वाचकांना भारून टाकते. आम जनतेची खास भाषा या निमित्ताने कवितेच्या केंद्रस्थानी आली आहे. अरुण काळेची कविता हा एकूणच मराठी कवितेचा महत्त्वाचा टप्पा आहे. भारतीय कवितेतील नवे वळणआहे. नव्या युगाची सर्वस्वी नवी प्रतिमासृष्टी घडविण्यात ही कविता कमालीची यशस्वी ठरली आहे. आशयाभिव्यक्तीच्या नाविन्यासह विचारानुभवाचे सौष्ठव काळे यांच्या कवितेला प्राप्त झाले आहे.

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातील कवितेने नव्या व्यवस्थेचे बुद्धिवादी ब्लूप्रिंट सादर केले आहे. गावापासून महानगरापर्यंतचा एक आलेख चित्रित केला आहे. माणूसकेंद्री व्यवहारांना काडीमात्र किंमत उरली नाही. पैशापुढे मानवी आस्था कुचकामी ठरली. अशा वास्तवावरचे भाष्य केले आहे. धनिकांच्या जाणिवा आणि नेणिवेत वासनांधता ठासून भरलेली असते, त्यांचे कलाप्रेम बेगडी असते हे सत्यही मुखरीत केले आहे. अस्तित्व, अस्तित्वाचे प्रश्न, ते टिकविण्यासाठीची धडपड आणि संघर्ष उजागर केले आहेत. अस्वस्थ भारतातील उद्ध्वस्त झालेल्या माणसाचे चित्र रेखाटले आहे. या कवितेला यशस्वी होत गेलेल्या प्रतिक्रांतीचा कार्यकारणभाव शोधण्याचा ध्यास लागला आहे. समतावादी वादळाशी सलगी करीत आंबेडकरी प्रकाशपाणी पिऊन ही कविता तयार झाली आहे.

वामन कर्डक हे आंबेडकरवादी गझलेचे आरंभबिंदू आहेत. उर्दूमध्ये 'जदीद' म्हणजे सामाजिक, राजकीय नवमतवाद आला तसा वामनदादांच्या गझलेत आंबेडकरवाद आला. उर्दूत जसा तरक्कीपसंद म्हणजे सुधारणावाद आला तसा वामनदादांच्या गझलेत मानवतावाद आला. हे त्यांच्या गझलेने मराठी गझलेला दिलेले नवे आयाम आहेत. वामनदादांचा काळ माधव ज्युलीयन यांच्या नंतरचा आणि सुरेश भटांपूर्वीचा आहे. त्यांची गझल समाजकेंद्री आहे. या गझलेने सामाजिक घडामोडी, सामाजिक विसंगतीचे वास्तव रसिकांसमोर ठेवले आहे. आंबेडकरी विचार आणि

तत्त्वज्ञानाची अभिव्यक्ती ही त्यांच्या गझलेची नुदरत आहे. आंबेडकरी विद्रोहाची प्रस्थापना या गझलेने केली आहे. बुद्ध-आंबेडकरी नवनैतिकतेतून या गझलेचा जदीदनामा सादर झाला आहे. समताधिष्ठीत समाजरचनेचे स्वप्न साकार करण्यास्तव ती कटिबद्ध झाली आहे. हाच या गझलेचा जदीदनामा आहे. या गझलेचे स्वरूप गहनगंभीर असून प्रातिनिधिक दु:खद स्वर त्यातून निनादत राहतो.

प्रतिमासृष्टी आणि प्रतीकांच्या नवनिर्मितीमुळे आंबेडकरी गझल अतिशय अर्थसंपन्न ठरली आहे. या गझलेने वर्चस्ववादी इतिहास खोडून काढण्याची नवी रीत रुढ केली आणि आंबेडकरी तरक्कीपसंद गझल नव्यानेच प्रस्थापित करून जदीदनामा सादर केला. या गझलेच्या मळवाटेवरून अनेक फुले-आंबेडकरी गझलकारांनी प्रवास केला. त्यात भाऊ पंचभाई ते सिद्धार्थ भगत अशी मोठी परंपरा निर्माण झाली. या परंपरेने संघर्षाची भूमिका घेतली, सामाजिक भान जागविले, 'स्व'सह समष्टी अशी तिची एकरूपता आहे. वामनदादांची जदीदी आणि तरक्कीपसंद गझलेची परंपरा समर्थपणे पुढे नेण्याचे काम या परंपरेने केले आहे.

स्त्रियांच्या कवितेनी विशिष्टता राखली आहे. प्रज्ञा पवारसारख्या कवयित्रीने लादलेल्या बाईपणाचा पसारा मांडला आहे. बाईच्या बाईपणाला गृहीत धरण्याचे दिवस आता राहिले नाहीत असा इशाराच समग्र पुरुषजातीला दिला आहे. बाईपणाच्या दु:खाचा प्रदीर्घ आलेख उत्कट जीवघेण्या धगीने मांडला आहे. पुरुषी हुकुमशाही रक्ताचे मानस आणि चिवटपणा स्पष्ट केला आहे. सांस्कृतिक संदर्भात एक मजबूत विधान केले आहे. संस्कृतीमातेच्या आदिबंधातून विरोधाभासी मातृत्वाचे खलनायकी विदृप रूप साकारले आहे. चटक्यांच्या वणव्यांचा प्रदीर्घ इतिहास पाठीवर घेऊन फिरणारी स्त्री या कवितेत चित्रित झाली आहे. वर्तमानातील स्त्रीजीवनाची सजगता अतिशय मार्मिकपणे चित्रित केली आहे. तृष्णेमुळे निर्माण होणाऱ्या दु:खाचे दाखले देत स्त्रीच्या आत्मभानजागृतीची अपरिहार्यता व्यक्त केली आहे. समग्राशी डोळा भिडवून समकालीन स्त्रीजगण्याचा परिप्रेक्ष्य कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे.

या कवितेने नव्या शतकातील थेरीगाथा नव्याने लिहिण्याचा संकल्प सोडला आहे. गृहीत स्त्रीप्रतिमेला तडा देण्याचे काम केले आहे. पुरुषी अधिसत्तेला नाकारत ग्लोबल तिठ्यावरील वास्तववादी पेच वाचकांसमोर ठेवला आहे. वास्तवाच्या रणभूमीवर निखळ अस्तित्वासह एक ठाम भूमिका घेऊन वर्तमानाच्या स्थितीशीलतेवर हल्ला करणारे स्त्रीरूप या कवितेत प्रत्ययाला येते. बुद्धाच्या बुद्धत्वापेक्षा यशोधरेचा पारंपरीक, दैहिक आणि दार्शनिक काळोख मोजण्यात कवयित्रीला अधिक स्वारस्य आहे. पुराणातल्या सावित्रीच्या गुळगुळीत मिथकाऐवजी अंतर्बाह्य राजकारणी असे सावित्रीबाई फुल्यांचे रूप साक्षात करण्याचा या कवितेचा प्रयत्न आहे. स्वत्वाचा, अस्मितेचा आरपार गहिरा उजेड शोधायला निघालेल्या या कवितेने प्रखर सत्याचे आदिघरही शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

इतर अनेक कवयित्रींनी कवितेतून आपल्या विभाजनाचे खंडित वास्तव अधोरेखित केले आहे. हतबल आणि मजबूर झालेल्या स्त्रीमनाचे आक्रंदन प्रातिनिधिक रूपात प्रकट झाले आहे. घर आणि बाजार या परिप्रेक्ष्यात स्त्रीजीवनाचा लोलक हेलकावताना दिसतो. घर नावाची व्यवस्था स्त्रीचे यंत्रात रूपांतर करून टाकते. बाजार व्यवस्था तिच्या शरीराचे वस्तूकरण करते. ग्लोबल व्यवस्था तिचे चामडी नाण्यात रूपांतर करते. नवरा नावाची व्यवस्था वेगवेगळ्या प्रहराप्रमाणे अपेक्षा ठेवत असते. संसार नावाच्या व्यवस्थेने तिला स्वप्न पाहण्याची मुभा ठेवली नाही. असे व्यवस्थेच्या अनेकविध पातळ्यांवरील शोषणाचे स्तर स्पष्ट झाले आहेत. स्त्रीला फक्त शरीर असते. भावना, संवेदना नसतातच असे गृहीत धरून व्यवहार करणाऱ्या व्यवस्थेचे रूप, प्रारूप उजागर केले आहे.

स्त्रियांच्या कवितेनी अनेक महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली आहेत. उदा. समाजसेवक असणारा माणूस घरात नवराच असतो. पुरुषाचा मुखवटा आणि चेहरा याचा थांगपत्ता लागत नाही. पुरुष कावेबाजी आणि दुटप्पी वर्तनातून कार्यभाग साधतो. एकाकी वाटचाल करणाऱ्या स्त्रियांची पुरुषमंडळी गोची करतात. हा देश म्हणजे जणू भाजलेल्या जखमांचा ढिगारा आहे असेही नोंदविले आहे. पुरुषी व्यवस्थेत 'माझ्या देहावर स्वामीत्व हवं आहे, पुरुषाचा मालकी हक्क

नको' अशी बंडखोर भावना या कवितांमधून व्यक्त झाली आहे. परिवर्तन आणि बदल या संदर्भात चढ्या आवाजात चर्चा करणे कसे फोलपणाचे आहे हेही या कवितांनी दाखवून दिले आहे.

आदिवासी जगातून आलेल्या कवयित्रींनी आंबेडकरी प्रेरणेतून स्त्रीजगताच्या संदर्भात एक विशिष्ट भूमिका घेतली आहे. माणसाला जन्माला घालण्याचे सामर्थ्य केवळ स्त्रीमध्येच असल्याचे ठामपणे सांगून वर्णव्यवस्थेच्या तत्त्वज्ञानाला आणि वैदिक परंपरेच्या दांभिकपणाला प्रश्नांकित करून विज्ञाननिष्ठेचा मार्ग दाखविला आहे. पुरुषसुक्ताची पोलखोल करून इतिहासाच्या पुनर्लेखनाची आणि पुनर्मांडणीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आदिवासींना 'वनवासी' ठरवू पाहणाऱ्या मूलतत्त्ववाद्यांना बाहेरचा रस्ता दाखविण्याचे धाडस दाखविले आहे. त्याचप्रमाणे भूतदयावाद्यांची खिल्ली उडवत आंबेडकरी स्वाभिमानी बाण्याचा संदेश दिला आहे. कवयित्रींच्या परंपरेत आंबेडकरी गीते लिहिण्याचाही प्रयत्न झाला आहे. या गीतरचनेच्या माध्यमातून अनेकविध आंबेडकर प्रतिमा आणि प्रतीकांचे उपयोजन झाले आहे. त्यात उपदेशपर रचनाही पाहावयास मिळतात. स्त्रीमुक्तीचा उद्‌गार बुद्ध- फुले- आंबेडकर या परंपरेनेच या देशात निनादत ठेवला असा उच्चार या गीतांनी केला आहे. आंबेडकरी कर्तृत्वाला साद घालतानाच चळवळीला योगदान देणाऱ्या महनीय व्यक्तींच्या कार्याचे मोलही सांगीतले आहे. स्त्रीदु:खाला वाट मोकळी करून देतानाच तिचे सामर्थ्यही स्पष्ट केले आहे.

स्त्रियांच्या कवितेला 'आगी'चे जबरदस्त आकर्षण आहे. धर्मामुळे भाकरीचे प्रश्न सुटत नसतात हे सत्यही या कवितेने अधोरेखित केले आहे. कवितेतील नायिका नाडल्या गेलेल्या स्त्रियांच्या वतीने धिटपणे बोलत राहते. सडलेल्या संस्कृतीचा विटाळ करू पाहणारे स्त्रीसमूहमन अधिकाधिक आक्रमकपणे व्यक्त होताना दिसते. पुरुषी व्यवस्थेला आडवं मारणारी अनोखी भाषा प्रत्ययाला येते. या कवितेने महासत्तेचा मुजोरपणा उजागर करीत, जागतिकीकरण आणि मूलतत्त्ववाद्यांच्या एकीकरणातून स्त्रियांच्या झालेल्या लैंगिक अवहेलनेचे हादरवून सोडणारे चित्र साकार करून वाचकांना अंतर्मुख केले आहे. विशिष्ट इझमच्या चौकटीतील फॅशनेबल स्त्रीवादाची संभावना केली आहे. सुन्न करणारा अनुभव वाचकांना दिला आहे. कवितेतील असंख्य शब्दकळा बरेचदा दचकवून सोडतात. तर कधी कणव निर्माण करतात, स्त्रीजगण्याचा पसारा मंडित करतात. अनेक शब्दकळा प्रतिमेचेच कार्य साधतात आणि अर्थविस्तार करतात. हे भाषिक वैभव या कवितेचे सौंदर्यस्थळ आहे असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.

एकंदरीत, स्त्रीयांची कविता हा फुले आंबेडकरी कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण विभाग आहे. या कवितांनी प्रक्षुब्ध आणि अस्वस्थ मनस्थितीचा प्रत्यय दिला आहे. हरवलेपणाची जाणीव व्यक्त करतानाच क्षोभही व्यक्त केला आहे. चार भिंतीच्या आतील मूक आकांत, उदासी आणि कोंडलेल्या श्वासामुळे होणाऱ्या तडफड आणि तगमगीचे चित्र स्पष्ट केले आहे. तळापासून मूळापर्यंत एकाकी तप्तपणा अंगभर लपेटून घेणारे, अग्निफुलांचा रंगसोहळा पाहणारे आणि मानवतेचे सोहळे साजरे करण्याचे डोहाळे लागलेले स्त्रीमन या कवितातून व्यक्त झाले आहे. आपण ज्योतिबाच्या सावित्रीसारख्या असून दुनिया आपल्यासाठी धगधगत्या ज्वालेसारखी असल्याचे भान या कवयित्रींनी जागविले आहे.

वामनदादा कर्डक हे आंबेडकरी गझलेचे आरंभबिंदू आहेत. त्यांची गझल समाजकेंद्री असून आंबेडकरी मानवतावाद हा तिचा प्राण आहे. मानव्याची प्रतिष्ठापणा हे तिचे उद्दिष्ट आहे. तिने आंबेडकरी विद्रोहाची प्रस्थापना केली आहे. बुद्ध आंबेडकरी नवनैतिकतेतून त्यांच्या गझलेचा जदीदनामा सादर झाला आहे. त्यांच्या गझलेतील प्रतिमासृष्टीमुळे नवता सिद्ध झाली आहे. या प्रतिमा प्रतीकांना आंबेडकर चळवळीचा ऐतिहासिक संदर्भ आहे. त्यांच्या गझलेने वर्चस्ववादी इतिहास खोडून नवसांस्कृतिक इतिहासाची मांडणी केली. तरक्कीपसंद गझल नव्यानेच प्रस्थापित केली. अशा स्वरूपाची गझल लिहिणारे वामनदादा हे मराठीतील पहिले गझलकार ठरले आहेत.

दलित कवितेप्रमाणेच बुद्ध-फुले-आंबेडकर या विचार परंपरेचा अंगिकार हे सूत्र आंबेडकरी गझलेत प्रत्ययाला येते. वामनदादांनी निर्मिलेली परंपरा पुढे चालू ठेवण्याचे कार्य भाई पंचभाई ते सिद्धार्थ भगत या पुढच्या पिढीने अतिशय समर्थपणे पार पाडले आहे.

परिशिष्ट : १

संदर्भ ग्रंथ सूची

१. म. फुले, गुलामगिरी, समग्र फुले वाङ्मय, म.रा.सा.संस्कृती मंडळ, ५वी आवृत्ती, १९९१
२. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा ज्योतीराव फुले, साहित्य अकादमी, दिल्ली, १९९६
३. क्षिरसागर शकुंतला, (संपादक) संपूर्ण केशवसुत, पाप्युलर प्रकाशन, २००१
४. जोशी मधुकर, दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ,
स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, २०००
५. पानतावणे गंगाधर, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, १९७६
६. पानतावणे गंगाधर, वादळाचे वंशज, प्रचार प्रकाशन, १९८२
७. किरवले कृष्णा, आंबेडकरी शाहिरी : एक शोध, नालंदा प्रकाशन, १९९२
८. ठाकूर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा प्रकाशन, २००५
९. भगत दत्ता, दलित साहित्य, य.च.म.मु.विद्यापीठ, १९९२
१०. कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन, २००८
११. बबन लोंढे, (संपा)आंबेडकरी लोकगीते, अक्षर प्रकाशन, २०००
१२. कर्डक वामन, माझ्या जीवनाचे गाणे, (शब्दांकन) निर्मल प्रकाशन, १९९६
१३. कर्डक वामन, मोहळ, पद्मपाणी प्रकाशन समिती, १९७६
१४. अस्मितादर्श, वार्षिक विशेषांक, संपादक, गंगाधर पानतावणे, १९९८
१५. खंडेराव हरीश, प्रवर्तक काव्य मीमांसा, प्रज्ञा प्रकाशन, १९९१
१६. गायकवाड महेंद्र, दलित शाहिरी, संघर्ष प्रकाशन, १९९७
१७. गायकवाड प्रदीप, जनता खास अंक १९३३, पुनर्मुद्रण, समता प्रकाशन, २००५
१८. निर्मळे हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा प्रकाशन, १९८७
१९. डोळस अविनाश, दोतोंडे राम, (संपा) आधारस्तंभ
(ल. बा. रायमाने गौरवग्रंथ), लोकवाङ्मयगृह, २०१२
२०. खरात शंकरराव, मिलिंद मॅगेझिन, १९७५, ७६

२१. रायमाने ल.बा., मिलिंद वार्षिकांक, १९६९
२२. तळवटकर घन:श्याम, आकार, महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा, १९६७
२३. डांगळे अर्जुन, दलित साहित्य : एक अभ्यास, म.रा.सा.सं.मंडळ, १९७८
२४. आंबेडकर बाबासाहेब, बहिष्कृत भारत, ३.४.१९२७
२५. फडके भालचंद्र, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८९
२६. पाटील. म. सु., दलित कविता, लोकवाङ्मय गृह, १९८१
२७. सरदेसाई एस. जी., भारतीय तत्त्वज्ञान : वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, लोकवाङ्मय, १९७७
२८. जाधव रा. ग., निळी पहाट, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९७५
२९. मेश्राम केशव, साहित्याचा अभ्यास, दूरशिक्षण संस्था, मुंबई विद्यापीठ
३०. कांबळे संजय, नवअनुष्टुभ, मे - जून २०११
३१. मून संजय, यशवंत कविता लोकनाथची, संपादक - मेघमाला मेश्राम, अवेमारिया प्रकाशन, २०१३
३२. माने लक्ष्मण, विमुक्तायन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
३३. मडावी एल. के, आदिवासी स्वायत्ततेची भूमिका,
३४. वाघमारे चंद्रकांत, कर्नाटक दलित पितामह देवराय इंगळे : चरित्र आणि काव्य, उज्वलगंगा प्रकाशन, विजयनगर, बेळगाव, २००२
३५. जाधव सागर, गायकवाड माधव, महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड १
३६. गिमेकर परशुराम, (संपादक) वामनदादा कर्डक यांची गीतरचना, कैलास पब्लिकेशन्स, २००५
३७. कऱ्हाडे सदा, साहित्य आणि समाज, लोकवाङ्मय गृह, १९९५
३८. वाळके प्रमोद, (संपादक) संग्रामपिटक, वामनदादा कर्डक यांची गझल, भाग १, युगसाक्षी प्रकाशन, २०१३
३९. कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद : तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, १९८१
४०. आंबेडकर बी. आर., जातिभेद निर्मूलन, (भाषांतर प्रा.मा.फ.गांजरे), अशोक प्रकाशन, १९४८
४१. कोतापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन, २००८
४२. चंदनशिवे सुनिल, मराठी दलित कविता, डिम्पल प्रकाशन, २००५
४३. डोळस अविनाश, आंबेडकरी विचार आणि साहित्य, साकेत प्रकाशन, १९९४
४४. देशपांडे प्रकाश, मराठी कविता नवी वळणे, साकेत प्रकाशन, १९९४
४५. मनोहर यशवंत, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाशन, १९९९
४६. लिंबाळे शरणकुमार, (संपा) दलित प्रेमकविता, प्रचार प्रकाशन, १९८६
४७. पाटील म. सु., दलित कविता, लोकवाङ्मयगृह, १९८१
४८. मेश्राम योगेंद्र, दलित साहित्य : उद्गम आणि विकास, मंगेश प्रकाशन, १९९८

परिशिष्ट : २

काव्यसंग्रह सूची

दलित कविता १९७१ - १९८०

१. **गोलपिठा,** नामदेव ढसाळ, निलकंठ प्रकाशन, पुणे, १९७२
२. **पिंपळपान**, चोखा कांबळे, महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा, मुंबई, १९७२
३. **गावकुसाबाहेरील कविता**, वामन निंबाळकर, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९७३
४. **कोंडवाडा**, दया पवार, मेहता पब्लिशिंग, पुणे, १९७४
५. **मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले**, नामदेव ढसाळ, १९७५
६. **सुरुंग**, त्र्यंबक सपकाळे, अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, १९७६
७. **नाकेबंदी**, ज.वि.पवार, मुक्तछंद प्रकाशन, मुंबई, १९७६
८. **ऑडीट,** प्रल्हाद चेंदवणकर, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७६
९. **ऑर्डर ऑर्डर**, प्रल्हाद चेंदवणकर, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७६
१०. **उत्खनन**, केशव मेश्राम, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७
११. **उत्थानगुंफा**, यशवंत मनोहर, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९७७
१२. **ठिणगी**, रविचंद्र हडसणकर, अभिनव प्रकाशन, पुणे, १९७७
१३. **छावणी हलते आहे**, अर्जुन डांगळे, कर्मवीर प्रकाशन, मुंबई, १९७७
१४. **अम्रपाली भावपल्लवी,** सुगंधा शेंडे, सी.डी. मुलींचे वसतीगृह, नागपूर, १९७७
१५. **प्रियदर्शनी,** आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र, नामदेव ढसाळ, आंबेडकर प्रबोधिनी, १९७६
१६. **दस्तखत,** प्रकाश जाधव, दलित साहित्य संसद, मुंबई, १९७८
१७. **विद्रोही कविता,**(संपादित) केशव मेश्राम, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८
१८. **रापी जेव्हा लेखणी बनते,** राम दोतोंडे, अस्तित्व प्रकाशन, औरंगाबाद, १९७८
१९. **अश्रूंचा उन्हाळा,** शांताराम हिवराळे, सौ. तारा म्हात्रे, औरंगाबाद, १९७८
२०. **चंदन,** रमाकांत जाधव, हिरा प्रकाशन, नागपूर, १९७८

२१. **सांजर,** सुरेश कदम, १९७८
२२. **निखारा,** नीलकांत चव्हाण, कविता प्रकाशन, १९७८
२३. **इडिपस,** बी. रंगराव १९७९
२४. **युद्धाई,** अजय रामटेके, अस्तित्व प्रकाशन, १९७९
२५. **अवलाद**, अरुणकुमार इंगळे, प्रज्ञा प्रकाशन, सोलापूर, १९७९
२६. **माझा द्वेष पोसलाय,** प्रज्ञावंत गौतम, राहूल प्रकाशन, कोल्हापूर, १९७९
२७. **दस्तऐवज,** देवेंद्र खंडारे, १९८०
२८. **कैफियत,** जयदेव मेश्राम, १९८०

१९८१ - १९९०

१. **बंधमुक्त,** डब्ल्यू कपूर, त्रिरत्न प्रकाशन, जि. भंडारा, १९८१
२. **तुही इयत्ता कंची,** नामदेव ढसाळ, आंबेडकरी प्रबोधिनी, १९८१
३. **गांडू बगीचा**, नामदेव ढसाळ, आंबेडकर प्रबोधिनी, १९८६
४. **जुगलबंदी,** केशव मेश्राम, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८२
५. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : चिंतनकाव्य**, यशवंत मनोहर, सुनिल प्रकाशन, नागपूर, १९८२
६. **दिशा,** ज्योती लांजेवार, निखिल प्रकाशन, नागपूर, १९८२
७. **उत्पात,** शरणकुमार लिंबाळे, परिवर्तन प्रकाशन, अहमदनगर, १९८२
८. **उच्छवास युगंधराचे,**(संपा) ज.वि. पवार, समता साहित्य, सोलापूर, १९८२
९. **गलोल,** प्रमोद लांडगे, १९८२
१०. **दळणकांडा**, भागवत बनसोडे, १९८२
११. **खेळ,** नामदेव ढसाळ, प्रास प्रकाशन, मुंबई, १९८३
१२. **अरुण कृष्णाजी कांबळे,** अरुण कांबळे, संकल्प प्रकाशन, मुंबई, १९८३
१३. **माझ्या बापाचा बाप,** अशोक बनसोडे, १९८३
१४. **क्रांतिपर्व,** लहू कानडे, भूमिका प्रकाशन, औरंगाबाद, १९८३
१५. **देणगी,** रविचंद्र हडसणकर, १९८३
१६. **स्ट्रीट लाईट्स,** भगवान ठाकूर, दिग्विजय प्रकाशन, १९८३
१७. **फिर्याद,** हिरा बनसोडे, समाज प्रबोधन संस्था, पुणे, १९८४
१८. **अकस्मात,** केशव मेश्राम, सुरेश एजन्सी, पुणे, १९८४
१९. **ऑर्डर ऑर्डर,** प्रल्हाद चेंदवणवर, अभिनव प्रकाशन, १९८४
२०. **मग अंधार पेटला**, विजयकुमार गवई, १९८४
२१. **आक्रोश,** निरंजन पाटील, १९८४
२२. **मुर्तिभंजन,** यशवंत मनोहर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८५
२३. **उद्‌गार,** बबन लोंढे, संकल्प प्रकाशन, १९८५
२४. **युद्ध,** नीलकांत चव्हाण, कविता प्रकाशन, नाशिक, १९८५
२५. **काळोखाच्या कविता,** बी. रंगराव, १९८६
२६. **वळ,** नीलकांत चव्हाण, कविता प्रकाशन, नाशिक, १९८६
२७. **दलित प्रेमकविता**,(संपा) शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८६

२८. **महायुद्ध,** वामन निंबाळकर, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९८७
२९. **लाव्हा,** नीलकांत चव्हाण, कविता प्रकाशन, नाशिक, १९८७
३०. **अंधारयात्री,** बाबू परुळेकर, प्रशांत प्रकाशन, पुणे, १९८७
३१. **अमृतनाक आणि इतर कविता**, चांगदेव खैरमोडे, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८७
३२. **गोधड,** वाहरू सोनावणे, रविराज प्रकाशन, पुणे, १९८७
३३. **सडक लाल मुरुमाची,** राम बसाखेत्रे, रचना प्रकाशन, १९८७
३४. **विस्फोट,** मधुकर सोनवणे, १९८८
३५. **प्रेरणा,** वसंत राजस, १९८८
३६. **होरपळ,** भीमसेन देठे, आडोनी प्रकाशन, मुंबई, १९८९
३७. **आता होऊन जाऊ दया**, लोकनाथ यशवंत, मुक्तछंद प्रकाशन, १९८९
३८. **हुंकार वादळाचे,** भाऊ पंचभाई, १९८९
३९. **ओल्या जखमा,** ल.स. रोकडे, अभिजित प्रकाशन, नागपूर, १९८९
४०. **श्वेतपत्रिका**, शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८९
४१. **पारंब्या,** अनिल सपकाळ, भलरी प्रकाशन, वसई, १९८९
४२. **आंबुसलेली तार**, जे.जी. सुरवाडे, अलका प्रकाशन, १९८९
४३. **चरित**, केशव मेश्राम, आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई, १९८९
४४. **हुंकार विद्रोहाचे,** एफ.सी. मोरे, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८९
४५. **हळद उन्हे,** रविचंद्र हडसणकर, १९८९
४६. **दलदल,** किशोर घोरपडे, अक्षय प्रकाशन, जालना, १९९०
४७. **उलगुलान**, भुजंग मेश्राम, तथागत प्रकाशन, १९९०

१९९१- २०००

१. **हरवलेला किनारा,** उल्हासिनी कांबळे, १९९१
२. **छेदचक्र,** वामनराव जगताप, अनुदीप प्रकाशन, औरंगाबाद, १९९१
३. **नामांतर कविता,** (संपा) दामोदर मोरे, पंचशील मित्रमंडळ, १९९१
४. **नालंदा,** रमेशचंद्र सोनावणे, पैठणी प्रकाशन, औरंगाबाद, १९९१
५. **कफन,** भरतकुमार दहिहंडे, श्रमिक प्रकाशन, १९९१
६. **आघात,** संध्या रंगारी, शब्ददान प्रकाशन, १९९२
७. **भाकरीच्या शोधात,** लक्ष्मीकांत घुगे, अर्नेष्टो प्रकाशन, वणी, १९९२
८. **शब्द निळे आभाळ,** ज्योती लांजेवार, संकल्प प्रकाशन, १९९२
९. **याही मोसमात,** कैलास पगारे, ज्ञानेश प्रकाशन, १९९२
१०. **खोल खदानी,** दीपक त्रिभुवन, मधुश्री प्रकाशन, पुणे, १९९२
११. **हे गाव कुणाचे आहे,** प्रमोद वाळके, प्रेरणा प्रकाशन, मुंबई, १९९२
१२. **उन्हातलं झाड,** भगवान भोईर, स्वप्निल प्रकाशन, १९९२
१३. **हॉटेल माझा देश**, डी.बी. रत्नाकर, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, १९९२
१४. **ऑडिट,** प्रल्हाद चेंदवणकर, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९९२
१५. **आक्रोश**, भगवान जाधव, शिवराज प्रिंटर्स, बुलढाणा, १९९२
१६. **अंत:स्थ,** प्रज्ञा लोखंडे, मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९३

१७. **काळसास**, वामन करवाडे, डिम्पल प्रकाशन वसई, १९९३
१८. **रॉकगार्डन,** अरुण काळे, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९९३
१९. **भीम गीतांजली,** बलभीम तरकसे, दलित साहित्य संसद, अंबेजोगाई, १९९३
२०. **वायटूळ,** दीपककुमार अंबादास, समतायुग प्रकाशन, चिमूर, १९९३
२१. **जाळुनि किंवा पुरूनी टाका,** नारायण अतिवाडकर,
प्रमोद प्रकाशन, बेळगाव, १९९३
२२. **गावभोग**, बळवंत कांबळे, सम्यक प्रकाशन, ऐनापूर, १९९३
२३. **उद्ध्वस्त करायचं आहे मला**, गोकुलदास मेश्राम, मिलिंद प्रकाशन, चंद्रपूर, १९९३
२४. **वैशाखी पळस,** मोहन इंगोले, सुमती प्रकाशन, १९९३
२५. **घुसमट,** काशिनाथ वेलदोडे, १९९३
२६. **टेहळणी,** गंगाधर मेश्राम, भूमिका प्रकाशन, कल्याण, १९९४
२७. **लक्तरांची गझल,** डी.बी. रत्नाकर, नीहारा प्रकाश, पुणे, १९९४
२८. **भीमाचे गोंधळी,** नारायण येळगावकर, अपेक्षा प्रकाशन, १९९४
२९. **सीमा सरकताहेत,** गंगाधर अहिरे, १९९४
३०. **जळवा,** धर्माराज धेंडे, १९९४
३१. **चिंतनसूर्य,** शिवा इंगोले, वंदन प्रकाशन, १९९४
३२. **या सत्तेत जीव रमत नाही**, नामदेव ढसाळ, अभिजात प्रकाशन, १९९५
३३. **स्मशानभूमी,** कचरू भालेराव, ललितराज प्रकाशन, अहमदनगर, १९९५
३४. **आणि शेवटी काय झाले,** लोकनाथ यशवंत, यमक प्रकाशन, चंद्रपूर, १९९५
३५. **सूर्यकंकण,** केतन पिंपळापुरे, मंजूल प्रकाशन, पुणे, १९९५
३६. **चळवळीच्या कविता,** राजेश डोंगरे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९५
३७. **आई तुझं लेकरू,** किशोर काळे, आपलं प्रकाशन, १९९५
३८. **यातनाच्या कहाण्या होतात,** सिद्धार्थ तांबे, भलरी प्रकाशन, पुणे, १९९५
३९. **माणसाचा जनक आणि इतर कविता,** दीपक त्रिभुवन
सफल प्रकाशन, वैजापूर, १९९६
४०. **टाचटिभा,** लहू कानडे, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९६
४१. **शतकाअखेरची पहाट,** (संपा) सिद्धोधन कांबळे,
किर्ती प्रकाशन, औरंगाबाद, १९९६
४२. **ओस झाल्या दिशा,** रमेश चिल्ले, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९९६
४३. **अग्निदिव्य,** वामनराव जगताप, अनुदीप प्रकाशन, औरंगाबाद, १९९६
४४. **कधीकधी,** मनोहर जाधव, नवीन उद्योग, पुणे, १९९६
४५. **आत्मरंग**, आत्माराम ठोंबरे, आत्मरंग प्रकाशन, अमरावती, १९९६
४६. **पाऊलखुणा,** राजेंद्र तायडे, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, १९९६
४७. **उद्रेकरेषा**, के.डी. पवार, दर्शन प्रकाशन, औरंगाबाद, १९९६
४८. **लेखाजोखा**, इसादास भडके, यमक प्रकाशन, चंद्रपूर, १९९६
४९. **उजेडगाणी,** भगवान भोईर, स्वप्निल प्रकाशन, भिवंडी, १९९६
५०. **पल्याड मळ्यात**, किशन राऊत, प्रसाद प्रकाशन, परभणी, १९९६
५१. **माझ्या घराचे दार,** संजीवकुमार सोनावणे, नवीन उद्योग, पुणे, १९९६

५२. **निळे आकाश,** केशव हंडोरे, लोकशाही प्रतिष्ठान, जालना, १९९६
५३. **व्यवस्था विद्ध्वंस,** राहूल वानखेडे, असंग प्रकाशन, नागपूर, १९९६
५४. **अस्तित्वाच्या सावल्या**, शब्दांगण प्रकाशन, १९९६
५५. **उठाव,** विवेक मोरे, सृष्टी प्रकाशन, १९९६
५६. **दफणवेणा,** आ.सो. शेवरे, संहिता प्रकाशन, १९९६
५७. **देव मायनस धर्म,** बळवंत कांबळे, सम्यक प्रकाशन, ऐनापूर, १९९७
५८. **सायरनचे शहर,** अरुण काळे, सत्यजीत प्रकाशन, नाशिक, १९९७
५९. **मनोगत,** माधव सरकुंडे, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, १९९७
६०. **मला हवी असणारी पहाट,** प्रतिभा राजानंद इंप्रेशन पब्लिशिंग, बेळगाव, १९९७
६१. **दिशांताची पाखरं,** मोतीराम कटारे, १९९७
६२. **उजेड**, सागर जाधव, अशोक प्रकाशन, यवतमाळ, १९९७
६३. **जाग रे बंधो,** निर्माण प्रकाशन, लोकशाहीर घोगरे, १९९७
६४. **ब्रेन,** (संपा) उज्ज्वला तुपसुंदरे, युगसंवाद प्रकाशन, नागपूर, १९९७
६५. **श्वास,** धम्मज्योती कांबळे, १९९७
६६. **बएत,** जावेद कुरैशी, युगसंवाद प्रकाशन, नागपूर, १९९७
६७. **आंदण**, कैलास पवार, मंजूल प्रकाशन, १९९७
६८. **म्होरकी,** उषाकिरण आत्राम, गोंडी साहित्य परिषद, १९९७
६९. **दंभस्फोट,** प्रकाश मोगले, लोकविद्या प्रकाशन, परभणी, १९९७
७०. **भीमा तुझ्याचसाठी,** आप्पासाहेब तारळेकर, ग्रंथविशेष प्रतिष्ठान, सातारा, १९९७
७१. **मन करावे मोकळे,** लता राजस, मायबोली प्रकाशन, मुंबई, १९९९
७२. **पाणी कुठवर आलं गं बाई,** दया पवार, मेहता पब्लिशिंग, पुणे, १९९८
७३. **कोंडमारा,** ना.मु. कांबळे, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९९८
७४. **चिंताक्रांत मुलुखाचे रुदन**, महेंद्र भवरे, अस्तित्व प्रकाशन, औरंगाबाद, १९९८
७५. **पार्थिव अपार्थिव,** प्रकाश खरात, भीमस्मृती प्रकाशन, मुंबई, १९९८
७६. **कयास,** निरंजन गवई, एस.जी. कोळेकर एंटरप्राईजेस, पुणे, १९९८
७७. **कळप,** गुरुदत्त जनबंधू, स्वप्ना प्रकाशन, ब्रह्मपुरी, १९९८
७८. **जातयुद्ध,** पुंडलिक धोंगडे, प्रेरणा प्रकाशन, नागपूर, १९९८
७९. **कोरस,** प्रल्हाद बोरकर, दीक्षा प्रकाशन, सांगली, १९९८
८०. **माझी माय,** प्रमोद लांडगे, समता प्रकाशन, सोलापूर, १९९८
८१. **माती बोले गुज**, शंकर वाडेवाले, इसाप प्रकाशन, नांदेड, १९९८
८२. **क्रांतिगर्भ,** अरुण शेगावकर, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, १९९८
८३. **जाब,** कमल कदम, निर्मल प्रकाशन, नांदेड १९९५, तिसरी आवृत्ती, २००५
८४. **युगाचे हुंदके,** (संपा) सुरेश साबळे, संदेश प्रकाशन, बुलढाणा, १९९८
८५. **कविता एका पांथस्थाच्या,** विजय सोरते, संवाद प्रकाशन, १९९८
८६. **चिंतनिका,** एच.के. होनराव, वेध प्रकाशन, लातूर, १९९८
८७. **बोधिवृक्ष,** भास्कर खंडारे, तक्षशिला प्रकाशन, १९९८
८८. **उजेड्यात्रा,** शिवा इंगोले, पूर्वच प्रकाशन, १९९९
८९. **शतकांताच्या क्षितिजापार,** मोतीराम कटारे, १९९९

९०. **सूर्यलिपी** भास्कर कांबळे प्रज्ञाप्रबोध प्रकाशन, सांगली, १९९९
९१. **जंजाळ,** अविनाश गायकवाड, आशय प्रकाशन, १९९९
९२. **बासरी,** घनश्याम धेंडे, मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९९
९३. **ऋतूंचे मृत्यूपत्र,** अमोल बागूल, गौरव प्रकाशन, नाशिक, १९९९
९४. **आभार,** दया हिवराळे, लक्ष्मी हिवराळे, १९९९
९५. **आंधळ्याची काठी,** खंडू अढांगळे, सहयोग प्रकाशन, १९९९
९६. **मुद्रालेख**, उषा हिंगोणेकर, सुविद्या प्रकाशन, पुणे, १९९९
९७. **रथ,** सुदेश जगताप, प्रतीक प्रकाशन, १९९९
९८. **युद्ध सुरू आहे,** शशिकांत हिंगोणेकर, अस्मिता प्रकाशन, १९९९
९९. **तक्षकाच्या कविता,** बबन लोंढे, शारदा प्रकाशन, पुणे, १९९९
१००. **आत्मटिकेच्या उदास रात्री**, आनंद विंगकर, लोकवाङ्मय, १९९९
१०१. **पत्ता बदलत जाणारा गनिम,** उत्तम अंभोरे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २०००
१०२. **आखरीचं तुव्हंच सडान चिभवीन**, आनंद गायकवाड, आंबेडकर अकादमी, यवतमाळ, २०००
१०३. **गल्ली बदललेला मोर्चा**, राम दोतोंडे, सुगावा प्रकाशन, पुणे, २०००
१०४. **सवाल,** गौरवकुमार आठवले, श्रीसमर्थ साई वितरण, पुणे, २०००
१०५. **वणव्याची धग**, रमेश देशभ्रतार, चंद्रपूर, २०००
१०६. **अस्मितासंगर**, राजेंद्र लातुरकर, इसाप प्रकाशन, नांदेड, २०००
१०७. **हीच ती वेळ आहे**, संजय डोंगरे, संदर्भ प्रकाशन, वाडेगाव, २०००
१०८. **अंगारलेणी**, दामोदर मोरे, शारदा प्रकाशन, २०००
१०९. **रानगाणी,** विठ्ठल शिंदे, जाई प्रकाशन, २०००
११०. **अनित्यातील संदर्भ,** प्रभाकर गांगुर्डे, प्रज्ञा प्रकाशन, २०००
१११. **स्थलांतर,** मनीष तपासे, श्रीसमर्थ साई वितरण, २०००
११२. **आंबेडकरी गस्त,** वसंत जामनिक, प्रबुद्ध प्रकाशन, सोलापूर, २०००
११३. **आसूड,** तुकाराम जाधव, २०००
११४. **गिऱ्हान,** आ.कि. सोनोने, सुषमा प्रकाशन, २०००
११५. **भावनांचे प्रतिबिंब**, साची भगत, शैली प्रकाशन, तुमसर
११६. **चुरडलेल्या तत्त्वांच्या शोकांतिकेतून**, कांताराम सोनवणे, प्रणेता साहित्य संसद, २०००

२००१ - २०१०

१. **अनारंभ,** राजेंद्र गोणारकर, दीक्षा प्रकाशन, नांदेड, २००१
२. **आणि सूर्य गवसला,** ना.तु. पोघे, सुविद्या प्रकाशन, पुणे, २००१
३. **कृतकपुत्र,** केशव मेश्राम, डिम्पल पब्लिकेशन, वसई, २००१
४. **जीवनायन,** यशवंत मनोहर, मौज प्रकाशन, मुंबई, २००१
५. **मृगजळाचे गाव माझे,** मनोहर रणपिसे, २००१
६. **मुहाजिर,** प्रमोद वाळके, जागर प्रकाशन, वसई, २००१
७. **अग्निशाळा,** युवराज सोनटक्के, श्वाश्वत प्रकाशन,बेंगलूर, २००१

८. **उत्क्रांत लेणी,** विनोद बुरबरे, प्रबोधन प्रकाशन, २००१
९. **पोळणाऱ्या सावल्या,** कैलास भाले, मैत्र प्रकाशन, २००१
१०. **टेळका,** सुनिल कांबळे, प्रणेता प्रकाशन, २००१
११. **अंधारसाम्राज्य,** सुनिल भडांगे, डिम्पल पब्लिकेशन, वसई, २००१
१२. **आठवणीच्या पाकळ्या गळताना**, कृष्णा चंद्रकर, ज्योत्स्ना प्रकाशन, २००१
१३. **मुहाजीर,** जावेद कुरैशी, युगसंवाद प्रकाशन, नागपूर, २००१
१४. **इंडिया इज माय कंट्री,** नेहा गोडघाटे, युगसंवाद प्रकाशन, नागपूर, २००१
१५. **विद्ध्वंसाचे सुरुंग**, पी. विठ्ठल, २००१
१६. **आपण गाफील राहिलो तर,** सर्जेराव चव्हाण,
संत गाडगेमहाराज प्रकाशन, बुलढाणा, २००१
१७. **मी येणाऱ्या पिढ्यांची दिशा घेऊन फिरतोय,** मंगेश बनसोड
लोकवाङ्मय प्रकाशन, २००१
१८. **फिनिक्स,** हिरा बनसोडे, डिम्पल पब्लिकेशन, २००१
१९. **प्रकाशाची वाट**, विमल वाघमारे, यथार्थ प्रकाशन, २००१
२०. **वर्तुळ,** प्रेरणा प्रकाशन, अश्वघोष वाचनालय, २००१
२१. **भीमाचं रान**, आ.कि. सोनोने, सुषमा प्रकाशन, २००१
२२. **रानच सारे पेटून उठले,** बबन चहांदे, सिद्धार्थ प्रकाशन, नागपूर, २००२
२३. **पहारेकरी,** मारोती खंडेराव, डिम्पल प्रकाशन, २००२
२४. **मार्शल रेस,** केतन पिंपळापुरे, समता संगर प्रकाशन, नागपूर, २००२
२५. **चव,** विनोद कांबळे, सुधाकर कांबळे, तमदलगे, २००२
२६. **उत्कट जीवघेण्या धगीवर**, प्रज्ञा लोखंडे, लोकवाङ्य, २००२
२७. **कष्टाची भाकरी**, रामदास वाघ, विधाई प्रकाशन, पुणे, २००२
२८. **माणूस नावाचं गाव**, राजेंद्र सोनवणे, अचिला प्रकाशन, औरंगाबाद, २००२
२९. **अजुन वादळ उठले नाही**, ज्योती लांजेवार, आर.आर. पाटील, २००२
३०. **काजव्याच्या खांद्यावर संगिनी**, महेंद्र गायकवाड, शब्दमित्र प्रकाशन, २००२
३१. **कोंड्याचा मांडा,** कों.जो. नरवाडे, श्रावस्ती प्रकाशन, २००२
३२. **शापित पैंजण,** सुषमा अंधारे, देवाशिष प्रकाशन, पुणे, २००२
३३. **वज्रनाद,** दिगंबर झाडे, क्रांतिमा प्रकाशन, अमरावती, २००३
३४. **आत्माराम कनिराम राठोड यांच्या कविता**
भाषा, संशोधन प्रकाशन, वडोदरा, २००३
३५. **आडीवाडी,** मारोतराव जाधव, विदर्भ प्रकाशन, पुसद, २००३
३६. **कळा काळजाच्या,**नीलकांत ढोले, गौरी प्रकाशन, नागपूर, २००३
३७. **अंकित,** एस.एस. लोखंडे, आनंद प्रकाशन, चिमुर, २००३
३८. **अजूनही,** शशिकांत हिंगोणेकर, सुविद्या प्रकाशन, पुणे, २००३
३९. **माय,** दीपक रंगारी, संवादिनी कम्युनिकेशन, २००३
४०. **कबिराचं देणं,** प्रशांत मोरे, डिम्पल प्रकाशन २००३
४१. **नागपुत्राच्या कविता,** धुरंधर मिठबांवकर, आंबेडकरी साहित्य संसद, २००३
४२. **कवडसे,** संध्या रंगारी, आनंद प्रकाशन, २००३

४३. **पाखंड,** आदिनाथ इंगोले, शब्ददान प्रकाशन, २००३
४४. **सत्तेच्या आतबाहेर,** उत्तम पवार, दिग्नाग प्रकाशन, पुणे, २००३
४५. **कबीराचं देणं,** प्रशांत पंढरीनाथ, डिम्पल पब्लिकेशन, वसई, २००३
४६. **युद्धपक्षी,** अशोक इंगळे, प्रज्ञा प्रकाशन, पातूर, २००४
४७. **प्रतिबद्धता,** शिवा इंगोले, अनघा प्रकाशन, पुणे, २००४
४८. **रानमाय,** सरिता जांभुळे, लोकसेवा मुद्रणालय, २००४
४९. **वेदाआधी तू होतास**, बाबुराव बागूल, दिशा प्रकाशन, नाशिक, २००४
५०. **अस्मितांकुर**, एल.डी.बलखंडे, मिलिंद प्रकाशन, नागपूर, २००४
५१. **शुभ्र कमळांचे तळे,** मनोहर रणपिसे, २००४
५२. **निखाऱ्याच्या रांगोळ्या,** भाऊ पंचभाई, २००४
५३. **वात्सल्य,** काशिनाथ वेलदोडे, २००४
५४. **ब्ल्यू प्रिंट,** वैभव सोनारकर, डिम्पल पब्लिकेशन, वसई, २००४
५५. **माझी सनद कुठे आहे,** चामुलाल राठवा, २००४
५६. **काफिरनामा,** अरुण धोडेराव युगसंवाद प्रकाशन, नागपूर, २००४
५७. **मुक्ती,** (संपा) प्रमोद अहिरे, क्रांतीप्रेरणा प्रकाशन, २००४
५८. **सूर्यझेप आणि तळगर्भ,** रविचंद्र हडसनकर, सुवर्णभूमी प्रकाशन, नांदेड, २००४
५९. **राजमुद्रा,** रविचंद्र हडसनकर, सुवर्णभूमी प्रकाशन, नांदेड, २००४
६०. **महासत्तेचे पीडादान,** महेंद्र भवरे, अभिधानंतर प्रकाशन, मुंबई, २००५
६१. **आरास,** नीला वाघमारे, मृणाल आर्ट, २००५
६२. **यशोधरेची लेक,** आशालता कांबळे, फिनिक्स प्रकाशन, कणकवली, २००५
६३. **दिशा,** नारायण मगर, प्रविण प्रकाशन, सोलापूर, २००५
६४. **अनिवास,** केशव मेश्राम, डिम्पल प्रकाशन, वसई, २००५
६५. **संसद,** दीपध्वज कासोदे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००५
६६. **प्रहार,** सुखदेव पाटील, संकेत प्रकाशन, नागपूर, २००५
६७. **भीममुद्रा,** रविचंद्र हडसनकर, सुवर्णभूमी प्रकाशन, नांदेड, २००५
६८. **नंतर आलेले लोक,** अरुण काळे, लोकवाङ्मय मुंबई, २००६
६९. **हिरवे ऋतू उतरवून,** मोतीराम कटारे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६
७०. **क्रोधांगार,** डब्ल्यू. कपूर, डिम्पल प्रकाशन, २००६
७१. **बोधिवृक्षाची फुले,** शुक्राचार्य गायकवाड, सुमेरू प्रकाशन, २००६
७२. **स्पंदन निळ्या नभाचे,** प्रमोद वाळके, वाङ्मय सेवा प्रकाशन, २००६
७३. **युद्धयात्रा,** सिद्धार्थ भगत, निनाद प्रकाशन, यवतमाळ, २००६
७४. **काळजाची वात,** दीपक अंगेवार, सोमनाथ प्रकाशन, मुंबई, २००६
७५. **खोल जगण्याच्या तळाशी**, विजय आव्हाड, सोमनाथ प्रकाशन, मुंबई, २००६
७६. **तापलेले दिवस,** मच्छिंद्र चोरमारे, मुक्तछंद प्रकाशन, नागपूर, २००६
७७. **आयडीयल स्टेटच्या हद्दीबाहेरून**, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००६
७८. **जागतिकीकरणात माझी कविता**, उत्तम कांबळे, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६
७९. **डेमोफून,** केतन पिंपळापुरे, समतासंगर प्रकाशन, नागपूर, २००६
८०. **कवितेचे दिवस,** शशिकांत हिंगोणेकर, सुविद्या प्रकाशन, पुणे, २००६

८१. **येथून पुढे** प्रभू, राजगडकर, जागरुक प्रकाशन, २००६
८२. **अंतःक्षोभ**, माया वासनिक, डिम्पल प्रकाशन, २००६
८३. **वज्रमुठ**, डी.बी. जगत्पुरीया, वीणा प्रकाशन, २००६
८४. **रक्ताळलेलं टिंब**, ज.वि. पवार, अस्मिता कम्युनिकेशन, २००६
८५. **झुंजार,** भागवत बनसोडे, परचुरे प्रकाशन, मुंबई, २००७
८६. **प्रतीक्षायन**, यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००७
८७. **काव्य भीमायन**, यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००७
८८. **पेटत्या पलित्यांचा जुलूस**, शिद्धोधन कांबळे, परिसर प्रकाशन, २००७
८९. **विवाहितेचे अश्रू,** स्मिता नगरकर, २००७
९०. **एका झाडाचे आक्रंदन,** ज्योती लांजेवार, डिम्पल प्रकाशन, २००७
९१. **निळे आकाश माझे आहे,** मालती इंगळे, आकांक्षा प्रकाशन, २००७
९२. **मुक्ता,** कविता मोरवणकर, डिम्पल प्रकाशन, २००७
९३. **सुफी,** मनोहर रणपिसे, सोमनाथ प्रकाशन, मुंबई, २००७
९४. **रुबरू**, सरवर भोला, २००७
९५. **मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा**, प्रज्ञा लोखंडे, २००७
९६. **स्थितीचा ओला कोलाज,** रोहन नागदिवे, २००७
९७. **तुम्ही कोणत्या मार्गावर**, रामदास इंगळे, सृजन प्रकाशन, २००७
९८. **प्रारब्ध,** शांताराम हिवराळे, हिरा प्रकाशन, पुणे, २००७
९९. **पाचवी भिंत,** उमा गवई, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २००७
१००. **निळ्या पहाटेच्या सूर्यपुत्रांचे अधोरेखित**, धर्मराज निमसरकर, निहारा प्रकाशन, २००७
१०१. **धगीवरची अक्षरं,** उत्तम अंभोरे, रामलाल पुस्तक समिती, जालना, २००७
१०२. **ग्लोबलचं गावकुस,** अरुण काळे, लोकवाङ्मय, २००८
१०३. **अनुष्का,** धनेश बडवाने, सुयश प्रकाशन, पुणे, २००८
१०४. **अग्नीचा आदिबंध**, यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००८
१०५. **स्वप्नसंहिता**, यशवंत मनोहर, मौज प्रकाशन, मुंबई, २००८
१०६. **आरसा,** विजय आव्हाड, सोमनाथ प्रकाशन, मुंबई, २००८
१०७. **म्हणूनच शब्द हिंसक होतात,** प्रदिप जाधव, २००८
१०८. **जागृती,** माया दामोदर, दिलीपराज प्रकाशन, २००८
१०९. **यापुढे माझी लढाई,** सिद्धार्थ भगत, निनाद प्रकाशन, यवतमाळ, २००९
११०. **तहानलेलं तळं,** घनश्याम धेंडे, अक्षरभारती अकादमी, पुणे, २००९
१११. **रस्ता सोडून चालला कुठं?**, शेषराव पिराजी धांडे, मुक्तछंद प्रकाशन, २००९
११२. **प्रेषित**, मनोहर रणपिसे,सोमनाथ प्रकाशन, मुंबई, २००९
११३. **उद्रेक**, शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००९
११४. **ब्लॅक इज ब्युटीफुल,** माधव सरकुंडे, सुगावा प्रकाशन, २००९
११५. **सूर्याचा सूर्य,** मनिषा कांबळे, उर्जा प्रकाशन, २००९
११६. **दरवेळी,** विमल गाडेकर, कौस्तुभ प्रकाशन, २००९
११७. **महासत्तेचा तळठाव शोधताना,** मधुकर जाधव, गोदा प्रकाशन, २००९

११८. **अस्वस्थाच्या कॅनव्हासवर**, प्रमोद अहिरे, ऑप्टेटिव्ह, २००९
११९. **मरण मानवतेचे**, सुनंदा गायकवाड, नील प्रकाशन, २००९
१२०. **लेखणीच्या तलवारी**, उषाकिरण आत्राम, २००९
१२१. **काळोखाला भेदणारा सूर्य**, देवानंद पवार, निलकंठ प्रकाशन, २००९
१२२. **लेखणीच्या तलवारी,** उषाकिरण आत्राम, २००९
१२३. **हिरवे दुःख**, दीपक अंगेवार, सोमनाथ प्रकाशन, मुंबई, २०१०
१२४. **उन्हाच्या कटाविरुद्ध,** नागराज मंजुळे, माइंड अँड मिडिया, २०१०
१२५. **प्रत्ययपर्व,** मनोहर जाधव, ग्रंथाली, २०१०
१२६. **वादळ निळ्या नभातील,** भगवान ठाकूर, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०
१२७. **अद्वैत**, मनोहर रणपिसे, सोमनाथ प्रकाशन, मुंबई, २०१०
१२८. **निर्वाणाआधीची पीडा**, नामदेव ढसाळ, आर्यन प्रकाशन, सांगली, २०१०
१२९. **संध्यारंग,** संध्या रंगारी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१०
१३०. **पॉवर हाऊस,** शांता का. पवार, समाज प्रबोधन संस्था, २०१०
१३१. **एक तारी, प्रेमानंद गज्वी**, विजय प्रकाशन, २०१०
१३२. **ओलीस ठेवलेली माणसे,** महेंद्र गायकवाड, संघर्ष प्रकाशन, २०१०
१३३. **कोंडी फोडून पुढे,** मच्छिंद्र चोरमारे, सुविद्या प्रकाशन, पुणे, २०११
१३४. **चवदार तळ्याचे पाणी,** रविचंद्र हडसनकर, निर्मल प्रकाशन, २०११

डॉ. महेंद्र भवरे

डॉ. महेंद्र भवरे हे मुंबई विद्यापीठात मराठी विषयाचे अध्यापक आहेत. कवी, समीक्षक आणि संशोधक म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 'चिंताक्रांत मुलुखाचे रुदन', 'महासत्तेचे पीडादान' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'दलित कवितेतील नवे प्रवाह', 'मराठी कवितेच्या नव्या दिशा', 'दलित कविता आणि प्रतिमा' हे समीक्षा ग्रंथ बहुचर्चित ठरले. 'प्रेमानंद गज्वी यांचा लेखन प्रवास' या ग्रंथाच्या संपादनासह यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी वाङ्मयेतिहासाच्या आठ पुस्तकांचे संपादन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार, अनुष्टुभ प्रतिष्ठानचा विभावरी पाटील वाङ्मय पुरस्कार, मुंबई मराठी साहित्य संघाचा समीक्षक पुरस्कार, प्रभाकर पाध्ये स्मृती पुरस्कारासह विखे-पाटील पुरस्कार, शरदचंद्र मुक्तीबोध पुरस्कार, कविता राजधानी, नामदेव ढसाळ काव्य पुरस्कार इत्यादी विविध पुरस्कारांनी सन्मानित. फुले आंबेडकरी साहित्य संमेलन आणि आंबेडकर युवा साहित्य संमेलन अशा दोन संमलनाचे अध्यक्षपदही भूषविले आहे.

भारतीय साहित्यात स्वातंत्र्योत्तर काळात एक अभूतपूर्व घटना घडली ती म्हणजे दलित साहित्याचा उदय. दलित साहित्य ही विसाव्या शतकातील एक वाङ्मयीन आणि सांस्कृतिक घटना आहे. या साहित्याच्या प्रांतात कविता या वाङ्मय प्रकाराने अर्धशतकाचा कालखंड ओलांडला आहे. हा इतिहास पुढील पिढ्यांना, अभ्यासक आणि संशोधकांना अवगत होणे ही काळाची गरज आहे. सामाजिक सांस्कृतिक जीवनात व्यवस्थेविरुद्ध एखादे बंड झाले की त्यातून समाजाला आणि साहित्याला काही मूल्ये प्राप्त होत असतात. विसाव्या शतकात अशा ऐतिहासिक बंडाची सुरुवात दलित साहित्याने केली. त्यातून साहित्याला नवी मूल्ये प्राप्त झाली. दलित कवितेने साहित्य विश्वाला दिलेले योगदान, तिचे स्वरूप, काळाप्रमाणे तिच्यात होत गेलेली स्थित्यंतरे आणि बदल यासंबंधी कालानुक्रमे आणि चिकित्सकपणे या कवितेचा इतिहास या ग्रंथात अक्षरबद्ध झाला आहे. दलित साहित्य चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात झाली. या चळवळीच्या प्रेरणेतून भारतातील विविध राज्यातून दलित साहित्याच्या अभिव्यक्तीला चालना मिळाली. त्यामुळे भारतातील विविध भाषिक समाजात साहित्य संपन्न करण्याची मोठी आणि महत्त्वाची भूमिका दलित कवितेने पार पाडली आहे. आंबेडकरपूर्व, आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तर अशा त्रिकालातील कवितेचा घेतलेला परामर्श, माणसांच्या होणाऱ्या शोषणाच्या विरोधात, माणसाच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या दलित कवितेचा स्वभाव आणि या कवितेतील फुले-आंबेडकरी विचार सर्व स्तरावर पोहचण्यास या इतिहासाची निश्चित मदत होईल.